Barcode : 99999990192769
Title - Lokmanya Tilak Chayen Chritra Vol-III (1928)
Author - NULL
Language - english
Pages - 713
Publication Year - 1928
Barcode EAN.UCC-13
9 999999 019276

लाल बहादुर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी
L.B.S. National Academy of Administration
मसूरी
MUSSOORIE
पुस्तकालय
LIBRARY

अवाप्ति संख्या
Accession No. 4984
वर्ग संख्या
Class No. Mar 320.54092
पुस्तक संख्या
Book No. टिळक
भाग-3

# लो. टिळक यांचे चरित्र.

## उत्तरार्ध—खंड ३

( सन १९१४ पासून १९२० पर्यंत )

लेखक

नरसिंह चिंतामण केळकर

शके १८४९.] पुणें [सन १९२८.

प्रकाशक–न. चिं. केळकर,
५५४ सदाशिव पेठ, पुणें शहर.

[ या ग्रंथाच्या भाषांतराचे प्रकाशनाचे पुनर्मुद्रणाचे वगैरे सर्व हक्क ग्रंथकाराने आपल्या स्वाधीन ठेवले आहेत ]

मुद्रक–गणेश काशिनाथ गोखले,
सेक्रेटरी श्री गणेश प्रिंटिंग वर्क्स,
४९५ शनवार पेठ, पुणें शहर.

# प्रस्तावना

संकल्पाप्रमाणे **टिळकचरित्राचा** ग्रंथ आज संपूर्ण होऊन हातावेगळा करिता येत आहे याविषयी आनंद होतो.

या ग्रंथाचा पूर्वार्ध १९२३ च्या एप्रिलात लिहून झाला. त्यानंतर हा उत्तरार्ध लिहिण्याला हाती घेण्यास जवळ जवळ पाच वर्षे लागली. इतका विलंब लागण्याची कारणे वाचकाना सांगितल्याशिवायहि ध्यानात येण्यासारखीच आहेत. अर्थात् असली कारणे केव्हांहि संपत नसतात. तथापि हाती घेतलेले हे काम अर्धेच राहिले तर ते मुळी न केल्यासारखेच झाले असे नेहमी वाटे. ग्रंथ पुरा करण्याकरता जमवून ठेवलेली साधनसामुग्री रोज दृष्टीला पडून आपला परामर्ष न घेतल्याबद्दल निषेध करीत होती. वाचकवर्गहि दरवर्षी टिळकांच्या जन्मतिथीच्या किंवा मृत्युतिथीच्या सुमारास, ग्रंथाची आठवण ठेऊन, खासगी रीतीने व केव्हा वर्तमानपत्रातूनहि, उरलेला ग्रंथखंड वाचावयास लवकर मिळावा अशी अपेक्षा प्रकट करीत होता. आणि स्वतःच्या संकल्पाला हे उत्तेजन समजून ग्रंथ पुरा करून लवकरच हाती देईन अशी आश्वासने मीहि त्याना कृतज्ञताबुद्धीने देत होतो. वरील सर्व कारणांकरिता केव्हा तरी निश्चयाने बसून ग्रंथ पुरा करणे हे अनिर्वाह्य झाले होते. छपाईचे काम सुरू करण्याचे मनात आणताच येथील 'श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स' आणि 'श्रीसमर्थ भारत' छापखाना यानी ताबडतोब छापण्यास प्रारंभ करण्याची तयारी दाखविली. आणि गेल्या दोन महिन्यात इतर कामे बाजूला ठेऊन मोठ्या तत्परतेने हे काम त्यानी करून दिले म्हणूनच हा ग्रंथ इतक्या लवकर प्रसिद्ध करता आला. चालू जानेवारी महिन्यात असेंब्लीच्या कामावर जाऊन रुजू होण्यापूर्वी मी पुण्यास असता, हे काम समक्ष उरकले तरच ते पार पडते, एरवी पुढे उन्हाळ्यात छपाईचे वगैरे काम संपवून ता. १ ऑगस्टच्या पूर्वी कबूल केल्याप्रमाणे वाचकांच्या हाती पुस्तक देणे अशक्य होणार असे मला अनुभवाने आढळून आले होते. कसेहि असो. घाईत घाई करून का होईना ग्रंथ पुरा करण्याचा संकल्प तडीस गेला, आणि टिळकांच्या येत्या पुण्यतिथीच्या आधीच पाच महिने तो वाचकांचे हाती देता आला याबद्दल वरील दोन्ही छापखान्यांचे चालक यांचे आम्ही अत्यंत आभारी आहो. तसेच कोकाटेबंधूनी दुसऱ्या खंडाची पुस्तके त्वरित बांधून देण्याचे कबूल केले, या ग्रंथाची साधनसामुग्री पुष्कळ दिवसापासून काळजीपूर्वक व आस्थेवाईकपणे वेळोवेळी जमवून ठेवणे, ग्रंथ लिहून होत असता ती वेळच्यावेळी लागेल तशी पुरविणे, आणि संदर्भ उतारे अवतरणे वगैरे काढून देणे, इत्यादि गोष्टींचे सहाय्य चिरंजीव काशिनाथ नरसिंह ऊर्फ बापूराव केळकर याने केले. श्री. पां. वा. गाडगीळ 'वाङ्मयविशारद'

यानी विषयवार इंडेक्स कार्डे तयार केली. श्री. वि. पां. दांडेकर बी. ए. यानी स्वयंसेवक या नात्याने मधूनमधून लेखकाचे काम केले. आणि वाईचे इनामदार श्री. बाळासाहेब साठे यांनी आक्टोबर महिन्यात काही दिवस पाचगणी येथील आपले घर आम्हाला राहावयास दिल्यामुळे तेथे एकांतवासात बराच मजकूर लिहून झाला. या कारणांकरिता मी वरील सर्वांचा फार आभारी आहे.

या ग्रंथाचा पूर्वार्ध व हल्लीचा हा उत्तरार्ध यांच्या स्वरूपात मुख्य फरक काय आहे हे वाचकाना न सांगताहि लक्षात येण्यासारखे आहे. या उत्तरार्धात वर्णन केलेला टिळकांच्या कारकीर्दीचा दुसरा भाग तुलनात्मक दृष्टीने अर्थात् बराच अधिक महत्त्वाचा होय. चरित्रलेखकाच्या दृष्टीने सांगण्यासारखा फरक हा की या भागाच्या संबंधात चरित्रलेखनाची साधने अधिक उपलब्ध झाली. विशेषतः या उत्तरार्धात सुमारे साडेचारशे पत्रे छापता आली. अस्सल पत्रांची मौज ही असते की ती अधिक विश्वसनीय तर असतातच परंतु पत्र–लेखनाच्या काळच्या परिस्थितीवर अनेक बाजूंनी प्रकाश पाडणारीहि असतात.

श्री. स. वि. बापट यांच्या ‘ आठवणी व आख्यायिका ’ या पुस्तकाच्या दोन भागांचाहि उपयोग थोडथोडा झाला. या ग्रंथाचा तिसराहि भाग येत्या ऑगस्ट-मध्ये प्रसिद्ध होणार आहे.व या तीनहि भागांच्या योगाने आणखी एका वेगळ्या रीतीने टिळक–चरित्र कोणास लिहिण्याची स्फूर्ति झाली तर त्याला ते साधन उपयोगी पडण्यासारखे आहे. थोर लोकांची चरित्रे अनेक प्रकारानी लिहिली जाऊ शकतात. मी लिहिले ते मुख्यतः घडलेला इतिहास संगतवार सांगण्याच्याच दृष्टीने लिहिले आहे.

हल्लीच्या या ग्रंथात अनुच्चारित अनुस्वार न लिहिण्याची नवी पद्धति मी स्वीकारिली आहे. तसेच प्रत्येक भागाच्या शेवटी पृष्ठसंख्या पुरी करून पुनःनव्या भागाला नवा क्रमांक सुरू केला आहे. या दोन्ही सुधारणा सकारण आहेत याहून त्यांचे अधिक समर्थन येथे करीत नाहीं.

मकरसंक्रांत शके १८४९
पुणें १० जानेवारी १९२८ } **न. चिं. केळकर.**

---

# ग्रंथरचनेची समजूत

या चरित्राचा पूर्वार्ध १९२३ साली प्रसिद्ध झाला. त्यात सन १८९९ सालापर्यंतची हकीकत दिलेली आहे. त्याला 'खंड पहिला' असे नाव दिलेले आहे. त्यात एकंदर २८ भाग असून पृष्ठसंख्या ६७२ आहे.

हल्लीचा ग्रंथ त्याच चरित्रग्रंथाचा पुढील व उरलेला संपूर्ण अंश असून त्याला उत्तरार्ध असे नाव दिलेले आहे. सोयीकरिता या उत्तरार्धाचेहि दोन विभाग करून पूर्वीचा क्रम पुढे चालू ठेवला आहे. पैकी पहिल्याला 'उत्तरार्ध खंड दोन' व दुसऱ्याला 'उत्तरार्ध खंड तीन' अशी नावे दिली आहेत. या 'उत्तरार्ध खंड दोन' मध्ये एक ते नऊ भाग असून त्यांची पृष्ठसंख्या ५५२ आहे. 'उत्तरार्ध खंड तीन' यामध्येहि एक ते नऊ इतके भाग असून त्याची पृष्ठसंख्या मात्र ७०४ आहे.

अशा रीतीने या समग्र चरित्र-ग्रंथाची एकदर पाने १९४४ होतात ती अशी:--

**पूर्वार्ध**-- खंड १ भाग २८ एकंदर पानांची संख्या ६८८

**उत्तरार्ध**--खंड २ भाग ९ एकंदर पानांची संख्या ५५२

**उत्तरार्ध**-- खंड ३ भाग ९ एकंदर पानांची संख्या ७०४

पूर्वार्ध ५ वर्षांपूर्वी प्रसिद्ध झाला व त्यानंतर उत्तरार्ध हल्ली प्रसिद्ध होत आहे म्हणून संदर्भ देता घेता वाचकांचा घोटाळा होऊ नये म्हणून हा सर्व खुलासा करणे अवश्य आहे.

---

# अनुक्रमणिका

## उत्तरार्ध

### खंड ३ भाग १ [ सन १९१४ ते १९१५ ]

( १ ) मंडालेहून सुटका पृ. १. ( २ ) सुटकेनंतरची नजरकैद पृ. ५. ( ३ ) टिळकांचा जाहीरनामा पृ. १०. ( ४ ) राष्ट्रीय सभेचा वाद पृ. १३. ( ५ ) गोपाळराव गोखले यांचा मृत्यु पृ. १९. ( ६ ) राष्ट्रीय पक्षाची परिषद पृ. २५. ( ७ ) होमरूल लीगची स्थापना पृ. २९. ( ८ ) सर फेरोजशहा मेथा पृ. ३२. ( ९ ) मुंबईची राष्ट्रीय सभा पृ. ३५. परिशिष्ट १. १९१४–१५ मधील पत्रे पृ. ३७. परिशिष्ट २. चोराच्या उलट्या बोंबा पृ. ४७.

### खंड ३ भाग २ [ सन १९१६ ]

( १ ) अनुकूलतेची भरती पृ. १. (२) बेळगावची प्रांतिक परिषद पृ. ३. ( ३ ) समेटाचा वाद पृ. ६. ( ४ ) समेटाचें शहाणपण पृ. ९. ( ५ ) होमरूलची चळवळ व दडपशाही पृ. १०. (६) वाढदिवसाचा समारंभ पृ. १५. ( ७ ) राजद्रोहाचा तिसरा खटला पृ. २५. ( ८ ) हायकोर्टाचा निकाल पृ. ४९. ( ९ ) खटल्यानंतरची चळवळ पृ. ५८. ( १० ) लखनौची राष्ट्रीय सभा पृ. ५९. परिशिष्ट. १९१६ सालामधील निवडक पत्रे पृ. ७१.

### खंड ३ भाग ३ [ १९१७ ते १९१८ ]

( १ ) लखनौ कॉंग्रेसनंतरचा दौरा. पृ. १. ( २ ) लष्करभरतीचा उपदेश पृ. ७. ( ३ ) कर्नाटकातील दौरा पृ. ११. ( ४ ) स्वराज्यसंघाचा वाढदिवस पृ. १४. ( ५ ) बेझंटबाईना अटक पृ. १७. ( ६ ) सत्याग्रहाच्या चळवळीचा प्रारंभ पृ. १९. ( ७ ) विलायतेतील चळवळीची प्रस्तावना पृ. २१. ( ८ ) भारतमंत्र्यांचा जाहीरनामा पृ. २४. ( ९ ) इतस्ततः पृ. २५. ( १० ) टिळकांचा मोठा दौरा पृ. २९. ( ११ ) कोलंबोची सफर पृ. ४१. ( १२ ) युद्धपरिषदा पृ. ४९. ( १३ ) मुंबईची जादा कॉंग्रेस पृ. ५७. ( १४ ) विलायतेस प्रयाण पृ. ५९. ( १५ ) दिल्लीची राष्ट्रीय सभा पृ. ६०. परिशिष्ट. १९१७ व १९१८ या सालामधील निवडक पत्रे पृ. ६२.

### खंड ३ भाग ४ [ चिरोल प्रकरण ]

( १ ) प्रस्तावना पृ. १. ( २ ) पूर्वतयारी पृ. ४. ( ३ ) कमिशनपुढील पुरावा पृ. ८. ( ४ ) विलायतेतील सुनावणी पृ. १७. ( ५ ) टिळकांची सरतपासणी पृ. २८. ( ६ ) टिळकांची उलट तपासणी पृ. ३५. ( ७ ) टिळकांची फेरतपासणी पृ. ५८. ( ८ ) कार्सन साहेबांचे भाषण पृ. ६१. ( ९ ) चिरोल

साहेबांची साक्ष पृ. ६४. ( १० ) लॉर्ड सँडहर्स्ट यांची साक्ष पृ. ६९. ( ११ ) सर चार्लस लॅब यांची साक्ष पृ. ७१. ( १२ ) सर एडवर्ड जाइल्स यांची साक्ष पृ. ७२. ( १३ ) सर एडवर्ड कार्सन यांचा समारोप पृ. ७३. ( १४ ) सर जॉन सायमन यांचा समारोप पृ. ७६. ( १५ ) न्या. मू. डार्लिंग यांचा समारोप पृ. ८३. (१६) साक्षीपुराव्याचे पृथःकरण पृ. [illegible]. (१७) चिरोल साहेबांची मुलाखत पृ. १००. ( १८ ) खटल्याबद्दल तिऱ्हाइताचे मत पृ. १०२. ( १९ ) वकील व त्यांची मते पृ. १०४. ( २० ) कार्सन साहेबांचे शब्दचित्र पृ. १०७. ( २१ ) चिरोल प्रकरणातला खर्च पृ. १०९. ( २२ ) टिळकाविषयी चिरोलचे अखेरचे मत पृ. १११.

## खंड ३ भाग ५ [ विलायतेतील हकीकत. ]

( १ ) प्रास्ताविक पृ. १. ( २ ) प्रवास पृ. ६. ( ३ ) भाषणबंदी उठली पृ. ९. ( ४ ) निवडक कागदपत्र पृ. १० ( ५ ) विलायतेतील चळवळीचे समालोचन पृ. ७०. ( ६ ) विलायतेतील मजूरपक्ष पृ. ८५. परिशिष्ट १. टिळकांचा तहपरिषदेस अर्ज पृ. ९२. परिशिष्ट २. टिळक व लेडी सिडेनहॅम पृ. ९६. परिशिष्ट ३. ब्रिटिश साम्राज्य व विश्वबंधुत्व पृ. ९७. परिशिष्ट ४. इंग्लंडातला संप पृ. १०१. परिशिष्ट ५. इंग्लंडचे पुराणमतवादित्व पृ. १०३. परिशिष्ट ६. तहाचा उत्सव पृ. १०५.

## खंड ३ भाग ६ [ सन १९१९—१९२० ]

( १ ) रौलेट ॲक्ट पृ. १. ( २ ) गांधी व सत्याग्रहाची चळवळ पृ. ३. ( ३ ) सत्याग्रहाची हकीकत पृ. ५. ( ४ ) अमृतसरच्या लोकांचा छळ. पृ. ८. ( ५ ) चिरोल केसफंड पृ. १५. ( ६ ) टिळक विलायतेहून परत येतात पृ. १८. ( ७ ) पुण्याचा स्वागतसभारंभ पृ. २०. ( ८ ) मद्रासची सफर. पृ. २४. ( ११ ) सांगलीचे ज्योतिषसंमेलन पृ. ४५. ( १२ ) जुन्नरची जिल्हा सभा पृ. ५०. ( १३ ) टिळकांचा सिंधप्रांतातील दौरा पृ. ५२. ( १४ ) सोलापुरची प्रां. परिषद पृ. ५४. ( १५ ) कॉंग्रेस डेमोक्रॅटिक पार्टीचा जाहीरनामा पृ. ५९. (१६) पर्सफंड-समर्पण-समारंभ पृ. ६०. ( १७ ) ताईमहाराज प्रकरणातले भरतवाक्य ६४. ( १८ ) अखेरचा आजार पृ. ६५. ( १९ ) अलौकिक स्मशानयात्रा पृ. ६८. ( २० ) अस्थींचा पुण्यनगरप्रवेशसभारंभ. पृ. ७०. परिशिष्ट (सन १९१९-२० सालातील निवडक पत्रे ) पृ. ७३.

## खंड ३ भाग ७. [ गीतारहस्य व इतर प्रबंध ]

( १ ) प्रास्ताविक पृ. १. ( २ ) खाल्डियन व भारतीय वेद पृ. ५. (३) सांडलेली सांख्यकारिका पृ. ७ ( ४ ) वेदांग ज्योतिष पृ. १०. ( ५ ) तीन

ग्रंथांची तुलना पृ. २०. ( ६ ) गीतारहस्य पृ. २१. ( ७ ) गीतारहस्याचे तात्पर्य पृ. २४. ( ८ ) गीतारहस्यावरील अभिप्राय व टीका पृ. ३६. ( ९ ) टीकाकाराना टिळकांचे उत्तर. पृ. ५६. ( १० ) समारोप. ७१.

## खंड ३ भाग ८. [ राजकारणाचे मार्ग व अत्याचार ]

( १ ) टिळकांचा जाहीरनामा पृ. १. ( २ ) कडक टीका हा अत्याचाराचा उपदेश नव्हे पृ. ६. ( ३ ) अत्याचारी लोक व टिळक पृ. ८. ( ४ ) आयर्लंडचा दाखला पृ. १६. ( ५ ) रौलेट कमिटीचा रिपोर्ट पृ. ४१ ( ६ ) टिळक व अत्याचार पृ. ४५.

## खंड ३ भाग ९ [ उपसंहार ]

( १ ) व्यक्तिविषयक पृ. १ ( २ ) सामाजिक व धार्मिक पृ. २६ ( ३ ) टिळकांचा सांप्रदाय पृ. ४३ ( ४ ) उपसंहार पृ. ४८.



बाळ गंगाधर टिळक

# लो० टिळकांचे चरित्र

## उत्तरार्ध

### खंड ३ भाग १ (सन १९१४ ते १९१५)

### (१) मंडालेहून सुटका

सन १९१४ च्या जूनच्या शेवटच्या आठवड्यात टिळकांची सुटका होऊन ते पुण्यास परत आले. त्यांना सोडण्याची व्यवस्था सरकाराने इतक्या गुप्तपणाने केली होती की तिचा सुगावा आधी कोणासहि लागला नाही आणि लागला असता तरी त्या बातमीवर फारसा कोणी विश्वास ठेवला नसता. कारण त्या पूर्वी सहा वर्षांत टिळक सुटणार अशाविषयी निरनिराळ्या वेळी बातम्या उटल्या होत्या. त्या सगळ्या खोट्या ठरल्या होत्या. आणि बातम्या जितक्या मुद्देसूद उठत तितका त्यांचा खोटेपणा लोकांच्या मनाला अधिक पटे. यातील पुष्कळशा बातम्या मुळात अनुमानिक असत. राजकीय परिस्थितीत कोठे काही फेरफार झाला म्हणजे त्यावरून लोक आपल्या ठिकाणी अनुमाने करीत आणि मुळात मनचे एक बोलला दुसऱ्याने त्यात भर टाकली तिसऱ्याने ती भर वाढविली असे होता होता त्या खोट्या बातमीची वावडी बने. पण शेवटी ती वाऱ्यावर उडून जाई. यामुळे बातम्या सांगणाराचा पराभव होऊन लोक कोणतीहि बातमी ऐकली तरी ती खोटीच असणार असे मानण्याला मनाने तयार झाले होते. १९११ साली जॉर्ज बादशहा गादीवर बसले त्यावेळी या बातम्याना फार जोर आला होता. कारण हिंदुस्थानातील लोकाना खुप करण्यासारखी एक मोठी गोष्ट म्हटली म्हणजे टिळकांची सुटका असे सहजच वाटे. नवा राजा गादीवर बसण्याचे वेळी कैद्याना बंधमुक्त करण्याचा प्रकार सर्व देशात सनातन आहे. आणि सामान्य बंदीजनापेक्षा राजकीय कैद्याना मुक्त होण्याचा हक्क अशा प्रसंगी अधिक असतो. राज्यारोहण हा राजकीय स्वरूपाचा प्रसंग असल्यामुळे राजकीय दृष्ट्या लोकाना आनंद देणारे काही कृत्य नव्या राजाने करावे ही अपेक्षा स्वाभाविक असते. पण या प्रसंगी ही केवळ लोकांचीच अपेक्षा होती असे नाही तर टिळकांची मुक्तता यावेळी करावी की नाही असा प्रश्न सरकार दरबारी प्रत्यक्ष उपस्थित झाला होता हे काही खोटे नाही. पण लॉर्ड सिडेनहॅम हे यावेळी मुंबईचे गव्हर्नर असल्यामुळे त्यानी या सूचनेला जोराचा विरोध केला. आणि आपल्या म्हणण्याला जोर यावा याकरिता त्यानी इलाख्यातील काही संस्थानिक व काही राजकीय पुढारी यांचे प्रतिकूल अभिप्राय मिळवून ते वरिष्ठ सरकाराकडे पाठविले होते असे म्हणतात. नक्की

कोणाला अभिप्राय विचारले व कोणी ते प्रतिकूल दिले हे सांगणे अर्थात कठीण आहे. ते बाहेर पके कोणाला कळणार? यासंबंधाने काही थोडा पुरावा आमच्याजवळ आहे. पण आता नाव गाव सांगून उगाच पोटदुखी उत्पन्न करण्याचे कारण नाही. त्या नसत्या वादाविणे आता काही अडलेहि नाही म्हणून तो विषय आम्ही सोडून देतो. पण इतकी गोष्ट निश्चित आहे की लॉर्ड सिडेनहॅम यांच्या आग्रहामुळे टिळकांची सुटका तेव्हा झाली नाही. राजकीय परिस्थितीवरून सुटकेची अनुमाने व्यवहारचतुर म्हणविणाऱ्या लोकानी जशी केली तशीच टिळकांच्या पत्रिकेवरून ग्रहगणित करून काही ज्योतिषानींहि अनुमाने केली होती. त्याना 'भविष्ये' असे म्हणण्याची रीत आहे पण तीहि अनुमानेच होत. पण यावेळीं गणित चुकले म्हणा ज्योतिषाचे नियम चुकले म्हणा ही अनुमाने व भविष्ये दोन्हीहि फुकट गेली. पृथ्वीवरचे ग्रह आणि अंतरिक्षातले ग्रह दोघानीहि भविष्यवाद्याना अद्दल घडेल असा दगा दिला. पण टिळकांच्या कैदेची मुदत निश्चित होती आणि त्यावरून ठरविलेले अनुमान मात्र खरे ठरणारे होते. पण एका अर्थी तेहि चुकले. ही चूक दुतर्फी होत होती. काही लोकाना वाटे की शिक्षेची सहा वर्षे ता. २२ जुलै १९१४ रोजी पुरी होतात. म्हणून नक्की त्याच दिवशी आणून टिळकाना सोडतील. काहीना वाटे की शिक्षा जरील तारखेस झाली असली तरी टिळकाना ता. २४ जून रोजी पकडण्यात आले त्याअर्थी तो दिवस व शिक्षा झाल्याचा दिवस याच्यामधले दिवस शिक्षेच्या मुदतीतच मोजले जातील. याशिवाय गणिताचा तिसरा एक प्रकार होता तो असा की चांगल्या वर्तणुकीबद्दल कैद्याना काही नियमाप्रमाणे सूट मिळते. त्याचा फायदा टिळकाना देतील. पण हे नियम सर्वस्वी अबाधित नसतात. जेलरची शिफारस आणि सरकारची मान्यता या दोहोवर सूट मिळण्याचे दिवस अवलंबून असतात. पण या सर्वांहून वेगळे असे अनिश्चितपणाचे आणखी एक कारण होते. ते असे की सन १८९८ मध्ये टिळकांची येरवड्याहून सुटका झाली तेव्हा त्याना सुमारे सहा महिने आधी सोडले होते. आणि मला राजद्रोहाच्या गुन्ह्याकरिता पुनः शिक्षा झाली तर उरलेली ही शिक्षेची मुदत त्यावेळी भरून देईन अशी कबूली सरकारने टिळकांकडून घेतली होती. ती शर्त १९०८ च्या खटल्याच्या शेवटी सरकारने कोर्टापुढे उपस्थित केली होती. हे लोकांच्या स्मरणात असल्यामुळे ते सहा महिनेहि आता भरून घेतात की काय किंवा ते जमा धरूनच सहा वर्षांची शिक्षा दिली याचा नीट खुलासा त्यावेळी झालेला नव्हता. म्हणून जुलै ता. २२ रोजी तरी टिळक सुटतील हे कोणी सांगावे असे लोकाना वाटले. टिळकांची मंडाले येथून आलेली पत्रे पूर्वी दिली आहेत त्यावरून टिळकहि स्वतः आपला अंदाज बांधीत होते आणि त्यानी शेवटच्या पत्रात 'हे माझे येथील शेवटचे पत्र' असे स्पष्ट लिहिले होते. यावरून टिळकांना काही सुगावा लागला असावा असे मानण्याला जागा होती. पण ही पत्रे खाजगी होती. शिवाय उगीच लोकाना आशा लावावी व कदाचित् ती फसावी हे बरे नव्हे असे समजून केसरीने या माहितीचा

उपयोग प्रसिद्धपणे केला नाही व ही अवघड जबाबदारी आपणावर घेतली नाही. तात्पर्य, टिळक पुढेमागे लवकर सु गार या ठोकळ अनुमानाखेरीच कोणास काहीच म्हणता येत नव्हते.

इकडे सरकारने आपल्या मनाशी सुटकेची तारिख निश्चित करून टिळकाना आणण्याकरिता पुण्याहून पोलीस इन्स्पेक्टर सदावर्ते याना मंडालेस पाठविले होते. त्यानी ता. १७ जून रोजी मध्यरात्रीच्या सुमारास टिळकाना पुण्यास आणून गायकवाडवाड्याच्या दरवाज्यापाशी अर्चाचित उभे केले. दरवाजा लाऊन देवडीवर भय्या निजला होता. पण टिळकाना त्याने न ओळखल्यामुळे तो एकदम दरवाजा उघडीना. तेव्हा सदावर्ते याना व स्वतः टिळकाना सर्व खुलासा करावा लागला तेव्हाच दरवाजा उघडला जाऊन स्वतःच्या वाड्यात टिळकांचा प्रवेश झाला. टिळक वाड्यात गेल्यावरच धोंडोपंत विध्वंस याना ही सुटकेची बातमी समजली. लगेच चोहोकडे दिवाबत्ती होऊन बैठका घातल्या आणि हाताशी मिळाली ती एक दोन माणसे मित्रमंडळीना ही आनंदाची खबर कळविण्याकरिता पिटाळण्यात आली. तास अर्ध्या तासात माणसांची रीघ सुरू झाली. या गर्दीने पूर्वीच्या सहा वर्षा-तल्या शून्याकाराचा सर्व वचपा काढला. ज्याने यावे त्याने एकवार पायावर डोके ठेवून दूर बसावे असे होता होता माडी भरून गेली. शेवटी पहाटे चार वाज-ण्याच्या सुमारास मंडळी घरोघर पाठवून टिळकानी विश्रान्ती घेतली. दुसरे दिवशी सकाळी टिळक सुटल्याची वार्ता सर्व गावभर पसरली बाहेर तारा व पत्रे जाऊ लागली व बाहेरून येऊ लागली. अभिनंदनाच्या पत्रोत्तराकरिता कचेरी दोन दिवस एकसारखी खुली होती आणि आप्त स्नेही वगैरे तर काय पण अगदी अनोळखी स्त्रीपुरुषहि वाड्यात येऊन दर्शन घेऊन जात. प्रथम १–२ दिवस 'दर्शन' देण्याच्या उद्योगाशिवाय टिळकांना दुसरा उद्योगच करिता आला नाही पुढेहि काही दिवस दिनचर्येतले ते एक ठराविक काम होऊन बसले होते.

शनिवार ता. २० रोजीं सार्वजनिकसभेमध्ये अण्णासाहेब पटवर्धन यांच्या अध्य-क्षतेखाली सभा भरून गायकवाडवाड्यात पुण्याचे नागारेकानी त्यांस जाहीर पान-सुपारी करावी व सुटकेबद्दल आनंद प्रदर्शित करावा असे ठरले. त्याप्रमाणे रविवारी सायंकाळी सहा वाजता गायकवाडवाड्यात पानसुपारी देण्यासाठी जाहीर सभा भरली होती. साडेचार पासूनच मंडळी येण्यास सुरवात झाली व सहा वाजण्याच्या सुमा-रास वाड्यातील मैदान गच्च भरून गेले. या समारंभास नागपूर वऱ्हाड खानदेश नाशिक सोलापूर नगर बेळगांव वगैरे दूरदूरच्या ठिकाणाहून मंडळी आली होती. प्रेक्षक समूह सुमारे पाच सहा हजारावर होता. सवासहा वाजता उमरावतीचे दादासाहेब खापर्डे, रा. ब. चिंतामणराव वैद्य, सातारचे दादासाहेब करंदीकर नगरचे बाळासाहेब देशपांडे प्रो. विजापूरकर वगैरे मंडळी बरोबर घेऊन लोक-मान्यानी पानसुपारीच्या जागेत पाऊल टाकताच टाळ्यांचा प्रचंड कडकडाट व "टिळक महाराज की जय" असा जयघोष करून लोकानी त्यांचे स्वागत केले.

नंतर अण्णासाहेब पटवर्धन यानीं अध्यक्षस्थान स्वीकारल्यानंतर राष्ट्रीय पक्षाच्या अनेक संस्थाकडून तसेच वऱ्हाड नागपूर सातारा नगर खानदेश मुंबई येथील पुढाऱ्यानी व प्रतिनिधीनी टिळकांच्या गळ्यांत हार घातले. यानंतर टिळकांचे भाषण झाले. सुटकेनंतर टिळकांचे हे पहिलेच जाहीर भाषण होते. टिळक म्हणाले---

" सुख व दुःख यांत भेद आहे. दुःखाला भागीदार मिळाले असता ते कमी होतें, तसे सुखाचे नाहीं. सुखाला भागीदार मिळाले असता उलट ते वाढतेच. आज येथे जमलेला समाज व आज दोन तीन दिवस माझे भेटीकरिता आलेला जनसमूह पाहून माझ्या सुटकेपासून मला जे सुख झाले असेल त्याची वाढ सहस्रपट नव्हे लक्षपट झाली आहे. माझ्याशी चार शब्द बोलावे अशी पुष्कळांची इच्छा होती व त्या चार शब्दासाठी कित्येकांनी दोन दोन तास खर्चही केले. त्यांचा हा जो काल व्यर्थ गेला त्याबद्दल मला वाईट वाटते. परंतुखरी माझा त्याला नाइलाज होता. हल्लीच्या माझ्या प्रकृतीच्या मानाने मला प्रत्येकाशी चार शब्द बोलणे अशक्य आहे. ही सबब म्हणून मी पुढे आणीत नाही तर ही सत्य गोष्ट आहे व आपण सर्वांनी सत्य म्हणूनच तिचा स्वीकार करावा अशी माझी प्रार्थना आहे. "

"आज सहा वर्षांनी मी परत आलो व जेव्हा सर्व परिस्थिति पाहू लागलो तेव्हा मला वॉशिंग्टन आयर्व्हिनच्या स्केच बुकामधील रिप् व्हॅन विंकलची गोष्ट आठवली. तो कित्येक वर्षे झोपेत होता. तो जेव्हा जागा झाला तेव्हा त्याला सर्व सृष्टि नवी दिसू लागली. तशी माझी अवस्था झाली आहे. आज सहा वर्षांत कोणकोणत्या गोष्टी झाल्या, त्या वेळी असलेल्या माणसांपैकी हयात किती व गेली किती याची मला वार्ता लागू नये--त्याचे मला स्मरणसुद्धा होऊ नये--अशा प्रकारची माझी व्यवस्था ठेवण्यात आली होती.जग आहे की नाही, असल्यास ते कोणत्या स्थितीत आहे हे मी विसरावे असाच मला या रीतीने वागविण्यात हेतु असावा असे मला वाटले. मग प्रत्यक्ष सरकारच्या मनात काय होते ते कोणास ठाऊक ? येथे जमलेल्या समाजाने आज माझे जे स्वागत केले आहे त्यावरून लोक मला विसरले नाहीत असे वाटते. मीहि लोकाना विसरलो नाही. माझ्यावर असलेले प्रेम लोकानी आज येथे जमून जसे व्यक्त केले तशा तऱ्हेने माझे लोकावर असलेले प्रेम व्यक्त होण्यासारखे नाही. तथापि माझे लोकांवर असलेले प्रेम आहे तसेच कायम आहे व त्याची आठवण मला होती हे आपण निःसंशय खरे मानावे. सहा वर्षांपूर्वी मी आपल्याशी ज्या तऱ्हेने वागलो त्याच तऱ्हेने त्याच नात्याने व त्याच पेशाने यापुढे मी वागेन आणि आपणही माझा पूर्वीप्रमाणेच स्वीकार करण्यास तयार आहा याचे येथे आज जमलेला समाज हेच एक प्रमाण आहे. "

"पुढे तुम्ही काय करणार असा पुष्कळानी मला प्रश्न केला. आता यापुढे पाऊल कसे ठेवावे याचाच विचार करावयाचा आहे. ज्या रस्त्याने आपल्याला जावयाचे तो साफ आहे की नाही हे प्रथम पहावे लागते. वैदिकांचा अशी एक चाल आहे की

रस्त्यातून जावयाचे म्हणजे आपल्या पंचपात्रीतील पळीभर पाणी पुढे टाकून रस्ता शुद्ध करावा व मग पुढे पाऊल टाकावे. आपल्यालाही कदाचित् तसाच रस्ता शुद्ध करावा लागेल. मार्ग शुद्ध आहे की नाही हे आज काही सांगता येत नाही तेव्हा मी जे मौन धरले आहे ते सकारण आहे हे आपल्या लक्षात येईल. माझे आणखी बोलणे ऐकण्याची लोकांची इच्छा असेल. परंतु प्रेमाच्या तीव्रतेच्या आवेशात आज तसे करणे हे इष्ट नाही. प्रेमांध होऊन जाण्याचा हल्लीचा प्रसंग नाही. प्रस्तावने-दाखल मी आज या चार गोष्टी सांगितल्या आहेत याचा ग्रंथ पुढे व्हावयाचा आहे. प्रस्तावनेवरून तो ग्रंथ कसा असेल याची कल्पना होईल. कांही चुकीची कल्पना झाली असल्यास ग्रंथ वाचून ती दुरुस्त होईल." अखेर लोकांचे आभार मानून टिळकानी आपले भाषण पुरे केले.

टिळक सुटून आल्यानंतर सर्व लोकांनीं आपापल्या रीतीने आनंद प्रदर्शित केलाच. पण केसरीनेही आनंद प्रदर्शित करण्याचे कारण विशेष होते. कारण केळकर यानी केसरी हाती घेतल्यानंतर नऊ महिन्यातच नवीन प्रेसॲक्टचा पूर्ण अंमल केसरीवर होणारसे दिसून आले आणि इशारतीच्या रूपानें मखमाली पिश-वींत घातलेल्या प्रेस ॲक्टच्या पंजाचा आघात केसरीवर पडला. अर्थात् टिळक तुरुंगांत असता केसरी बंद न पडता त्यांनीं परत येऊन केसरी जिवंत पहावा अशीच केसरीकारांची व सर्व लोकांची आकांक्षा होती. 'या आकांक्षेस अखेर यश दिल्याबद्दल त्या वरिष्ठ व सर्वंकश अशा ईश्वरीशक्तीचे आम्ही ऋणि आहो' असे उद्गार 'टिळक सुटले!' या आनंदोद्गारवाचक अग्रलेखांत केसरीकारानी काढले.

## (२) सुटके नंतरची नजर कैद

टिळकांचा पुनः जयजयकार होऊ लागणार ही गोष्ट लक्षात घेऊन सरकारने उलट उपाय आधीच योजिला होता. वाड्यातील गर्दी कमी व्हावी हीच सर-कारची इच्छा पण ती टिळकांचा दर्शनदानाचा त्रास कमी व्हावा म्हणून नव्हे तर त्यांच्या दर्शनाने आपले अंकित व ऋणानुबंधी लोक विटाळतील त्याना वाचवावे म्हणून! ता. २५ जून १९१४ रोजी मुंबई सरकारने टिळकांच्या भेटीच्या बंदीचा एकवटहुकूम काढला. मोर नाचला म्हणजे लांडोरीनेहि नाचलेच पाहिजे. त्या-प्रमाणे कोल्हापूर दरबाराने ता. २२ जुलै रोजीं दिवाण सबनीस यांच्या सहींने तसाच जाहीरनामा आपल्या राज्यात काढला तो जसाच्या तसा खाली दिला आहे त्यावरून मूळचा जाहीरनामा काय होता हेहि कळून येईल.

"बाळ गंगाधर टिळक बंधमुक्त होऊन पुणे येथे परत आल्यामुळे मुंबई इला-ख्याच्या राजकीय परिस्थितीत बराच फेरफार होण्याचा संभव आहे. म्हणून टिळक याने आपली मते बदलली आहेत व आजपर्यंत चळवळ करण्याच्या त्याने स्वीकार-लेल्या मार्गात फेरबदल करण्याचा त्याचा विचार आहे असे त्याच्या प्रत्यक्ष कृतीवरून

दिसून येईपर्यंत तो ब्रिटिश सरकारचा व—त्या सरकारशी करवीर दरबारचे संबंध पूर्ण सख्यत्वाचे असल्याने—करवीर दरबारचा शत्रु आहे असे मानून चालणे भाग आहे व त्याचेशी संबंध ठेवणाऱ्या अगर त्याजकडे वारंवार जाणाऱ्या लोकांच्या ठिकाणी उभय सरकारावद्दल स्नेहभाव नाही असे मानले पाहिजे. सबब ज्याना म्हणून करवीर सरकारचा कोणतेहि प्रकारचा आश्रय आहे अगर या सरकारातून ज्याना पदवी वगैरे मान मिळाला आहे अशा लोकानी, विशेषतः इनामदार वतनदार किताब धारण करणारे दरबारचे हरएक दर्जाचे नोकर पेन्शन्दार व सरकारी व सरकारने मान्य केलेल्या शाळातील शिक्षक व इतर नोकर यानी टिळकाशी कोणत्याहि प्रकारचा संबंध ठेविता कामा नये अशी श्रीमन्महाराम छत्रपति साहेब सरकार करवीर यांची आज्ञा आहे. अशा लोकांपैकी कोणाकडूनही याविरुद्ध वर्तन झाल्यास ते हुजूरून अत्यंत दोषार्ह असे समजले जाऊन त्याबद्दल व्यक्तिविषयक विचार होऊन योग्य ते शासन करण्यात येईल. शाळातील विद्यार्थ्यांनी टिळकाची भेट घेऊं नये अगर त्याच्याशी कोणताही संबंध ठेवू नये अशाबद्दल सरकारने मान्य केलेल्या सर्व शाळाच्या व्यवस्थापकानी पूर्ण खबरदारी घेतली पाहिजे. टिळक व त्याचे मशहूर अनुयायी ज्यांचा नेहमी ब्रिटिश सरकारच्या राज्यकारभाराविरुद्ध लोकमत तयार करण्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सारखा प्रयत्न चालू असतो त्यांच्याशीही उपरिनिर्दिष्ट करवीर दरबारच्या प्रजाजनानी संबंध ठेवू नये अशीही हुजूरची आज्ञा आहे. आणि तशा प्रकारचा संबंध कोणी उघड किंवा गुप्तपणे ठेविल्याचे दिसून आल्यास त्याबद्दल केव्हाही उपेक्षा केली जाणार नाही. ही समज एकदाच दिली आहे. पुनः या बाबतीत सवलतीचा विचार होणार नाही व या आज्ञेचे उल्लंघन करणारास क्षमा केली जाणार नाही."

प्रत्यक्ष सरकारी नोकर टिळकाना भेटावयाला कशाला जाईल? येऊन जाऊन पेन्द्' नर खासगी शाळातील लोक व विद्यार्थी हेच टिळकाना भेटावयाचे. पण या हुकुमाना धाब्यावर बसविणारे पुष्कळ लोक भेटले. उलट ज्याना हा हुकूम लागू नव्हता अशानी केवळ भीतीने टिळकांचे नाव व घर वर्ज केले. 'लेकी बोले सुने लागे.' एकाला धाक घातला की तो सर्वांना लागावयाचाच.

वरील हुकुमानी गर्दी हटली असे नाही. कारण सरकारचा हुकूम ज्याना लागू होईल असे लोक आधी थोडे आणि त्यातूनहि तो न मानणारे काही होतेच. विद्यार्थी वगैरे लोकानी तर हुकूम मुळीच मानला नाही. त्याचप्रमाणे पोलीस ज्याना ओळखण्याची फारशी भीति नव्हती त्यानीहि आपल्या अप्रसिद्धीचा फायदा घेतला. सरकारने पहारा ठेवला असला तरी एक किंवा दोन शिपाई. ते काही नावे टिपून घेत. त्यातील काही खरी असत काही खोटी असत. पण नावे खरी असली तरी प्रत्यक्ष सरकारच्या तावडीत सापडणारे लोक त्यात किती असणार? बरे, पोलिसानी तेथ काही सिनेमाचा कॅमेरा उभा केला नव्हता की येणारा जाणाराचे फोटो फिल्मवर घ्यावे आणि ती पोलीस अधिकाऱ्याला नेऊन उकलून दाख-

वावी. तात्पर्य अमुक व्यक्ति टिळकाना भेटावयाला गेली किंवा न गेली याची नक्की माहिती मिळण्यापेक्षा आपली ' इभ्रत ' राखण्याकरिता व लोकाना दरारा बसविण्याकरिताच हा हुकूम काढला होता. या हुकुमात अर्थात् बेकायदेशीर असे काहीच नव्हते. पण त्याने सरकारच्या मनाचा हलकेपणा मात्र प्रगट झाला. हे धोरण टिळकांच्याच बाबतीत सरकारने ठेवले होते असे नाही. तुरुंगांतून सुटून आलेल्या ठळकशाच काय पण किरकोळ अशा राजकीय गुन्हेगारावर सरकार नजर ठेवीत असे. त्या १०।१५ वर्षांत पोलिसांना हे एक नवेच काम झाले होते आणि हे काम वाढले म्हणून प्रगट व गुप्त पोलिसखाते बरेच फुगले होते. वास्तविक तुरुंगातून सुटून आल्यावर सरकारने कोणाला उपद्रव का द्यावा? एरवी कैदी सुटून आल्यावर किंबहुना ते सुटण्यापूर्वीहि त्यांची उपजीविका पुढे चालावी याकरिता सरकार काही उपाय योजीत असते. पण नैतिक गुन्हे करणारावर सरकारची माया आणि राजकीय गुन्हे करणाराशी मात्र त्यांचा द्वेष अशी विपरीत वृत्ती त्यानी स्वीकारली होती. त्यात दिलदारीचा मागमूसहि नव्हता. चळवळीत पडलेल्या लोकांचे उद्योगधंदे तुरुंगात गेल्याने बंद तर पडतच. पण ते सुटून आल्यावरहि कांहीच्या मागे असा ससेमिरा लागे की सरकारची अवकृपा होईल म्हणून त्याना कोणी थारा देऊ नये. यामुळे अशा लोकांच्या अंगी असलेली विद्याकलाही फुकट होऊन अनेक लोक अन्नालाहि महाग झाले. या छळाचे नैतिक समर्थन कसे होणार? कोणाला कोठे नोकरी मिळालीच तर पोलिसानी नोकरी देणाराच्या मागे लागावे, आणि त्याला आज ही तर उद्या ती आणि परवा तिसरीच अशी नोकरी पाहण्याचे प्रसंग यावेत. आकाशातील ग्रहणाचा वेध ग्रहणाच्या फक्त आधीच काही वेळ लागतो आणि मोक्षकाळी स्नान केल्यावर ग्रहणदोषाची बाधा रहात नाही. पण सरकारी ग्रहणाचा वेध खटल्याच्या आधी लागे. पुढे ज्यावर खटला होणार त्यावर पोलिसाच्या काळ्या डगल्याची छाया बरीच आधी पडे तशीच ती तुरुंगातून सुटून येऊन गुन्ह्याचे पापक्षालन केल्यावरहि बराच काळ टिकत असे. टिळकाना भेटण्यासंबंधाचे हे हुकूम पुण्यालाच नव्हे तर सर्व इला-ख्याला लागू होते. आणि ते पाळण्यांत जिल्हा कलेक्टरच्या दर्जाच्याहि लोकानी ठिकठिकाणी बराच मूर्खपणा प्रगट केला. आपण या बाबतीत कोणाला हटकतो याचेहि त्याना भान राहिले नाही. बेळगावचे वकील दत्तोपंत बेळवी अशी गोष्ट सागतात की ते रीतीप्रमाणें टिळकाना येऊन भेटून गेल्यावर त्याना बेळगाव बोलावणें पाठवून दिमाखाने विचारले की कायहो तुम्ही टिळकाना गेला होता म्हणे? त्यावर बेळवी म्हणाले होय गेलो होतो. कलेक्टर म्हणाले सरकारी वटहुकूम तुम्हाला माहीत नाही काय? त्यावर बेळवी यानी तित-क्याच दिमाखाने उत्तर दिले की मी कोण आहे हे तुम्हाला माहीत नाही काय? मी एक स्वतंत्र वकील आहे व टिळकाना भेटण्याकरिता हायकोर्ट माझी सनद काढून घेईल असे मला वाटत नाही. शिवाय मी कायदे कौन्सिलचा सभासद आहे.

मला या हुकुमाचे काय सागता ? शिक्षा भोगून आलेल्या लोकाना कोणी भेटू नये असा जेव्हा कायदा होईल तेव्हा पाहता येईल. पण बेळवीसारखे स्पष्ट-वक्ते सर्वच कसे मिळणार ? पण या बाबतीत प्रश्नोत्तरे होण्याचे फारसे प्रसंगच आले नाहीत. धनुष्याची दोरी वाजवूनच जेथें काम भागते तेथे प्रत्यक्ष बाण सोडण्याचे कारण कितीसे पडणार? अर्थात् ज्याना टिळकांच्या भेटीपेक्षा आपल्या उदरनिर्वाहाच्या साधनाची किंमत अधिक वाटण्यासारखी होती ते बिचारे टिळकांच्या भेटीला जातलिच कशाला? आणि ज्याना त्याची तशी किंमत नव्हती त्यानी तर हुकुमाची उघड उघड अवज्ञा केली. सरहद्दीवर असे काही लोक होते की सरकारला म्हटले तर त्यांचे नुकसान करतां येईल म्हटले तर करता येणार नाही. अशा लोकांपैकी ज्यांची जशी मनोवृत्ती होती त्यानी तसे आचरण केले.तथापि एकंदरीने हुकुमाची अवज्ञा बरीच झाली आणि कोणाला जर असे वाटत असले की या हुकुमाने टिळकांच्या घरासमोरच्या रस्त्याला स्मशानाचे स्वरूप येईल तर ती मात्र त्यांची कल्पना चुकीची ठरली. फक्त इतकेच झाले की जे कोणी सरदार संस्थानिक सरकारी नोकर टिळकांना न भेटणारे पण नारायण पेठच्या त्या रस्त्यावरून एरव्ही जाणारे त्याना मात्र हा रस्ता काही दिवस वर्ज करावा लागला. कारण त्यावेळी चहाडखोराना हा एक धंदाच होऊन बसला होता. ज्याचे नुकसान करावयाचे तो टिळकाना भेटावयाला गेला होता अशी गुप्त बातमी पोलिसाकडे दिली म्हणजे चहाडखोराचे थोडे बहुत काम होई. कारण तो भेटावयाला गेला होता की नाही याची चौकशी करणार कोण व त्याचा पुरावा मिळणार कसा ?

टिळकाना कोणी न भेटण्याविषयी सरकारने जाहीरनामा काढलाच होता. परंतु त्याना कोणी प्रत्यक्ष भेटावयास न जाता आपल्याच ठिकाणी बसून सभात मिरवणुकीत त्यांच्या नावाचा जयजयकार करतील व अशा रीतीने त्यांचे वैभव वाढवितील ते कसे थांबवावे याचीहि सरकाराला काळजी होतीच. यापैकी त्याना सभा थांबविता आल्या नाहीत. कारण सभाबंदीचा कायदा आता चालू नव्हता. व केवळ अभिनंदनाकरिता सभा झाल्या तर त्याची वर्दी आगाऊ लागून मॅजिस्ट्रेटचा हुकूम काढून त्या बंद करणें या गोष्टी सोयीच्या नव्हत्या. तथापि आपला हुकूम गाजविण्याला आणि टिळकाविषयीची आपली भावना व्यक्त करण्याला एक मर्मस्थान लवकरच उपस्थित झाले व ते पुण्यातील गणपती उत्सव हे होय. म्हणून पुण्याचे डि. मॅजिस्ट्रेट यानी पोलीस ॲक्टान्वये जाहीरनामा काढला. त्यात पुणे शहर लष्कर व एकंदर पुणे जिल्हा यामध्ये खालील गोष्टी मना केल्या होत्या.

१. गणपती देवाचे नावाशिवाय इतर शब्दाचा सार्वजनिक रीतीने मोठ्याने उच्चार करिता कामा नये. व जाहीर ठिकाणी मंजूर केलेल्याशिवाय इतर पद्ये व भाषणे म्हणता कामा नये.

२. राजद्रोहाचे गुन्ह्याबद्दल शिक्षा झालेल्या इसमांच्या तसविरा अथवा चित्रे दाखविता कामा नयेत. व असे इसम अथवा त्यांची 'नातेवाईक' मंडळी

याना प्रमुख जागी उभे करून त्याना माळा वगैरे घालून त्यांचा गौरव करून दाखविता कामा नये.

३. भजनी लोकाना उद्देशून किंवा मेळ्याना उद्देशून मिरवणुकीत मध्येच उभे राहून कोणी व्याख्याने देऊ नयेत अगर भाषणे करू नयेत.

वरील जाहीरनामा वाचला म्हणजे असे वाटते की टिळकांसंबंधी आदरबुद्धी दाखविण्याचे किती दरवाजे, किती दिंड्या, किती चोरवाटा, किती पाऊलवाटा असतील याचे संशोधन करून त्या सर्व कशा बुजविता येतील याचा विचार करून हुकूम लिहिण्यात, कल्पक पोलिस अधिकाऱ्याचा मेंदू पुष्कळच शिणला असला पाहिजे. स्वतः टिळकानी गणपतीच्या मिरवणुकीत जाऊ नये असे कलेक्टरसाहेबानी सरकारच्या इच्छेवरून खाजगी पत्र लिहून टिळकाना कळविले होते व ते त्यानी या वर्षापुरते मान्यहि केले होते. पण टिळकांचे मुलगे मिरवणुकीत जाणार व तेथे त्यांना कोणी मुकाऱ्याने माळा घातल्या तरी तो सन्मान देखील अप्रत्यक्षपणे टिळकांचा व तो त्याना या आडमार्गाने पोचेल या भीतीने वरील हुकुमात टिळकांच्या मुलांचीहि नावे घालण्यात आली यावरून सरकारच्या हलक्या मनाची साक्ष कोणासहि पटणार आहे. पण प्रतिक्रियाही क्रियेइतकीच शक्तिवान असते हें तत्त्व या ठिकाणी लागू पडले, आणि तो हुकूम आणि हा हुकूम मोडून दंडाच्या रकमानी लोकांनीं सरकारचा खजिना भरणे जरी सोयीचे नव्हते तरी टिळकांच्या मान्यतेत आता भर पडण्याची काही बाकी उरलेली नव्हती. सरकारी हुकूम निघाला म्हणून आहे ती मान्यता कमी होईल हा सरकारचा नुसता भ्रम होता. म्हणून त्यानी जितकी जितकी कल्पकता या बाबतीत अधिक चालविली तितका तितका लोकात त्यांचा उपहासच अधिक झाला. हा हुकूम पाळला जावा म्हणून उत्सवाच्या चालकानी आपली पराकाष्ठा केली. त्यामुळे जाहीरनाम्याविरुद्ध कोणी वर्तन केले नाही तथापि शेण भुईवर पडले आणि ते माती न घेता उठले तर ते शेण कसले ? या न्यायाने पोलिसानी एका वहिमी गृहस्थावर टिळक महाराज की जय असे ओरडल्याचा आरोप ठेवून त्याला भला मोठा दंड करविला व तो चोपून वसूल केला.

अशा प्रकारचे हुकूम काढणे हे सरकाराला जसे आपल्या ‘ इभ्रतीचे ’ एक लक्षण वाटले तसेच टिळकानाहि तो एक अपमान व उपमर्द वाटला. आणि आपल्यावरील पहारा दूर व्हावा म्हणून त्यानी ती खटपट विलायतेस सुरू केली. कारण हिंदुस्थानात ती यशस्वी होण्याचा संभव कमी. पार्लमेंटचे सभासद केरहार्डी यांच्याकडे त्यानी सविस्तर हकीगतीचे पत्र लिहून पाठविले व त्यानी स्टेट सेक्रेटरी म्र्यू याच्याकडे लिहून तक्रार केली. लॉर्ड म्र्यू यानी लगेच कळविले की, मी मुंबई सरकाराकडे या प्रकरणी रिपोर्ट मागविला आहे व तो येताच मी फिरून तुम्हाला लिहीन. या पत्रव्यवहाराला सहजच महिना सवामहिना लागला. पण दरम्यान एक अकल्पित गोष्ट घडून आली त्यामुळे या प्रश्नाचा निकाल लवकर लागण्याला मदत

झाली. ही गोष्ट म्हणजे युरोपातील महायुद्धाला ता. ४ आगष्ट १९१४ रोजी सुरवात झाली ही होय ! या गोष्टीचा परिणाम टिळक व सरकार या दोघावर दोन प्रकारचा झाला. हे युद्ध म्हणजे इंग्रज सरकारावर फार मोठे संकट होते ही गोष्ट महशूर आहे. या संकटामुळे जितक्या निरनिराळ्या लोकांची आपल्याला सहानुभूति मिळेल तितक्यांची मिळवावी अशी सरकाराला सहजच इच्छा उत्पन्न झाली. महायुद्ध जुंपल्यामुळे हिंदुस्थानात केवळ बंडच होईल अशी भीति सरकाराला नव्हती. कारण तशी असती तर हिंदुस्थानातले गोरे लष्करच काय पण बरेचसे काळे लष्करहि हिंदुस्थानाबाहेर पाठविण्यात आले ते पाठविले नसते. पण अशा संकटकाळी प्रत्यक्ष बंडाची भीति नसली तरी सहानुभूतीने जे समाधान मिळते ते सरकारासारख्यालाहि नको होते असे नाही. बंड नाहीच पण एरव्हीची चळवळहि कोणी फारशी करू नये असे सामोपचाराने घडविता आले तर तो मुत्सद्दीपणाच ठरणार होता. तेव्हा मुंबई सरकारने हस्ते परहस्ते असा डाव टाकला की, टिळकांच्या दारावरचा पहारा उठवून ता. २५ जूनचा हुकूम परत घेण्याला आम्ही तयार आहो पण उलट टिळकानीहि मन थोडे मोठे करून सरकारच्या या संकटाच्या वेळी त्याना सहानुभूतीपर उद्गार काढावे म्हणजे परस्पर हिशेब मिटला.

## ( ३ ) टिळकांचा जाहीरनामा

इकडे टिळकांचीहि मनस्थिती यावेळी कशी असेल याचा थोडासा विचार करू. England's difficulty is our opportunity हे ब्रीदवाक्य त्यानी आपल्या मनावर नेहमी कोरून ठेवले होते. पण या संधीचा उपयोग करून घेण्याचेहि प्रकार असू शकतात. हिंदुस्थानात बंडाची खरोखरीच तयारी असती तर संधीचा फायदा घेण्याचा प्रकार वेगळा ठरला असता. पण तशी तयारी कोणतीच नव्हती. लोकांच्या मनाची नाही व साधनाचीहि नाही. अर्थात् हा फायदा घेण्याचा दुसरा प्रकार म्हटला म्हणजे सरकारला सहानुभूति दाखवून त्याच्या मोबदला काय मिळेल ते उचलावयाचे. अखेर पुणे कलेक्टरशी वाटाघाट होऊन ता. २७ आगष्ट रोजी टिळकानी एक जाहीरपत्रक काढले. ते ३० ऑगस्टच्या मराठ्यात व ता. १ सप्टेंबरच्या केसरीत प्रसिद्ध झाले. ते येणेप्रमाणे. "सध्याच्या काळची परिस्थिति नेहमीच्याहून निराळी असल्यामुळे या प्रसंगी सरकाराबद्दल माझी भावना कशी आहे यासंबंधी कसल्याही प्रकारचा गैरसमज असल्यास तो दूर व्हावा, या हेतूने खाली लिहिलेला मजकूर प्रसिद्ध करण्यासाठी मी आपणाकडे पाठवीत आहे. माझ्या वाड्यांत गणपत्युत्सवासंबंधाने माझी स्नेही मंडळी परवा जमली असता त्यास उद्देशून मी जे भाषण केले त्यात हेच विचार मी प्रदर्शित केलेले आहेत. तथापि ते विचार त्यापेक्षाही अधिक प्रसिद्ध होणे मला इष्ट वाटत असल्यामुळे मी हे पत्र आपणास लिहीत आहे. मी पुण्यास सुखरूप परत आलो म्हणून माझे अभिनंदन करण्यासाठी माझे घरी आलेल्या गृहस्थास उद्देशून दोन महिन्यापूर्वी मी जे भाषण केले त्यात असे

म्हटले होते की पूर्वी रिप्व्हॅनार्विकल या नावाच्या अरण्यात गेलेल्या एका मनुष्यास तेथेच गाढ निद्रा लागून पुष्कळ दिवसानंतर तो घरी आल्यावर त्याची जी स्थिती झाली तद्वतच पुष्कळ अंशी माझी अवस्था झालेली आहे. माझ्या सहा वर्षांच्या गैरहजेरीत काय काय घडून आले यासंबंधाने आपली माहिती पुरी करून घेण्यास आणि हिंदुस्थानात दरम्यान ज्या ज्या गोष्टी घडल्या त्यांचा आढावा घेण्यास यानंतर मला बरेच प्रसंग आले. त्यावरून मला आपणास खात्रीने असे सांगता येते की वर्तमानपत्रांच्या कायद्यासारखे काही प्रकार यद्यपि घडून आले असले—या प्रकारासंबंधी या स्थळी मला विस्ताराने चर्चा करण्याची जरूर नाही—तथापि हिंदुस्थान देश आपणास अत्यंत इष्ट असलेले ध्येय प्राप्त करून घेण्याचा मार्ग धिमेपणाने आक्रमण करील याबद्दल निदान मी तरी निराश झालेला नाही. लॉर्ड मोर्ले व लॉर्ड मिंटो यांच्या कारकीर्दीत ज्या सुधारणांचा उपक्रम झाला त्यावरून असे दिसून येईल की राज्यकारभारांत प्रगतिपर फेरबदल करण्याची आवश्यकता सरकारच्या पूर्णपणे लक्षात आलेली असून राज्यकारभाराच्या कामी लोकांशी दिवसानुदिवस अधिकाधिक संबंध ठेवण्याची सरकारची इच्छा आहे. या गोष्टी-वरून अधिकारी व प्रजा याजमधील परस्पर विश्वास बराच वाढत चालला अस-ल्याचे आणि प्रजेची गाऱ्हाणी ऐकून ती दूर करण्याचा सतत प्रयत्न सुरू अस-ल्याचे दिसून येते असे म्हणता येईल आणि आम्हीहि ते मान्य करणे रास्त होईल. सार्वजनिक दृष्ट्या विचार करता हा इतका फायदाच झाला असे मला वाटते. आणि हा फायदा जरी सर्वांशी निर्भेळ नसला तरी मला अशी दृढ आशा वाटत आहे की अखेर या राजकीय सुधारणात जे काही चांगले आहे ते शिल्लक व कायम राहील आणि ज्याबद्दल आमची हरकत आहे ते नाहीसे होईल. कित्येकाना माझे हे म्हणणे आशावादीपणाचे दिसेल पण मी श्रद्धेने ज्या गोष्टी स्वीकारल्या आहेत त्यापैकी ही एक असून, फक्त अशा प्रकारचा विश्वास आपल्या देशाच्या कल्याणासाठी सरकारच्या सहकार्यतेने झटण्याची आह्मास स्फूर्ति होण्यास कारण होतो असे माझे मत आहे.

"दुसऱ्या एका गोष्टीचाही येथें उल्लेख करणे जरूर आहे. माझ्या सहा वर्षांच्या गैरहजेरीत येथील व इंग्लंडातील इंग्रजी पत्रात उदाहणार्थ मि. चिरोल यांच्या पुस्तकात माझे लेख व कृत्ये यांचा असा अर्थ करण्याचा प्रयत्न झाल्याचे मला दिसून येते की त्यामुळे अत्याचाराच्या कृत्याना प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष चिथावणी मिळाली अथवा मी जी भाषणे केली ती हिंदुस्थानातील इंग्रजसरकारचे राज्य उलथून पाडण्याचे हेतूने केली. मी आपला बचाव करण्यास नागरिक या नात्याने स्वतंत्र नव्हतो अशा वेळी हे प्रयत्न करण्यात आले ही शोचनीय गोष्ट होय. तथापि या पहिल्याच सार्वजनिक प्रसंगी मजवरील या घाणेरड्या व सर्वस्वी निरा-धार अशा आरोपाचा मनःपूर्वक तिटकाऱ्याने निषेध करणे मला जरूर आहे. राजकीय चळवळ करणाऱ्या इतर लोकाप्रमाणे काही बाबीत किंबहुना काही अंशी

अंतर्गत राज्यव्यवस्थेसंबंधानेहि सरकारामध्यें व मजमध्ये विशिष्ट मतभेद आहे. परंतु त्यामुळे माझी वृत्ति किंवा माझी कृत्ये इंग्रज सरकाराबद्दल द्वेषभाव व्यक्त करणारी आहेत असे म्हणणे असमंजसपणाचे आहे. माझा हेतु अगर इच्छा केव्हाच अशा प्रकारची नव्हती. मी एकदाच व कायमचे असे सांगून ठेवतो की आयर्लंडातील होमरूलपक्षाचे आयरिश लोकाप्रमाणे आमचा प्रयत्नहि चालू राज्य पद्धतीत सुधारणा घडवून आणण्याचा असून राज्य बुडविण्याचा नाही आणि मी निःशंकपणे असे म्हणतो की हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागात अत्याचाराचे जे प्रकार घडून आलेले आहेत ते माझ्या स्वभावाला प्रतिकूल आहेत इतकेच नव्हे तर अशा कृत्याच्या योगाने आमच्या राजकीय प्रगतीचे पाऊलहि दुर्दैवाने बरेचसे मागे पडले असेहि माझे मत आहे. व्यक्तिशः किंवा सार्वजनिक यापैकी कोणत्याहि दृष्टीने विचार केला तरी अशा प्रकारची कृत्ये एकसारखीच दोषार्ह होत व ही गोष्ट मी पूर्वीहि अनेक वेळा बोलून दाखविली आहे.

"इंग्रजी राज्यातील केवळ सुधारलेल्या राज्यपद्धतीमुळेच नव्हे तर सदर राज्यपद्धतीने हिंदुस्थानातील निरनिराळ्या जाती व लोक यांचे एकीकरण होऊन त्यातून कालांतराने संयुक्त हिंदी राष्ट्र निर्माण होण्याचाहि संभव असल्यामुळे इंग्रजी राज्यापासून हिंदुस्थानचा अगणित फायदा होत आहे असे जे म्हणतात ते बरोबर आहे. स्वातंत्र्यप्रिय ब्रिटिश लोकाखेरीज दुसरे कोणीही राज्यकर्ते जर येथे असते तर त्यानी अशा प्रकारचे राष्ट्रीय ध्येय मनात आणून त्याला नामरूप देण्याच्या कामी आम्हास मदत केली असती असे मला वाटत नाही. हिंदुस्थानाबद्दल मनात कळकळ असणाऱ्या प्रत्येक इसमास हे व याचप्रमाणे इंग्रजी राज्यापासून होणारे दुसरे फायदे पूर्णपणे अवगत आहेत आणि इंग्रजी बादशाही तख्ताबद्दल आमच्या सर्वांचे मनात असलेली राजनिष्ठेची भावना व मनोवृत्ती एकवटून व्यक्त होण्यास कारण झालेला सध्याचा बिकट प्रसंग पर्यायाने आम्हास उपकारकच आहे असे माझे मत आहे.

"जर्मनीच्या बादशहाने अनेक तहनामे आणि पुनः पुनः दिलेली राज्याखंडत्वाची अभिवचने मोडून एका कमकुवत संस्थानाच्या सरहद्दीवर स्वारी केल्यामुळे सदर संस्थानाच्या बचावासाठी जर्मन बादशहाचे विरुद्ध इंग्लंडास हाती शस्त्र धरणे भाग पडले आहे हे आपणास माहीत आहेच. अशा बिकट प्रसंगी प्रत्येक हिंदी प्रजाजनाने—मग तो लहान असो वा मोठा असो श्रीमंत असो वा गरीब असो—इंग्रज सरकारास आपल्याला शक्य असेल तेवढी मदत करून पाठबळ देणे हे त्याचे कर्तव्य आहे असे माझे दृढ मत आहे आणि यासंबंधी लोकमत जोराने व्यक्त करण्याकरता इतर ठिकाणी घडून आल्याप्रमाणे सर्व पक्षाच्या जातीच्या व वर्गाच्या लोकांची जाहीर सभा पुण्यासहि भरविण्यात यावी त्याला आता किंचितही विलंब लावू नये असे माझे म्हणणे आहे. अशा गोष्टीला पूर्वीच्या दाखल्याची केव्हाच जरूर नसते पण कोणास तो पाहिजेच असेल तर सन १८७९—

८० साली अफगाणिस्थानाशी युद्ध सुरू असताना आलेल्या संकटासंबंधी पुण्याच्या शहरवासी लोकाची जी जाहीर भा भरविण्यात आली होती तिची हकीकत त्यानें पहावी. यावरून सरकाराविषयी आमची राजनिष्ठा व त्यास मदत करण्याविषयीची आमची बुद्धि ही नैसर्गिक व अढळ आहेत आणि अशा प्रसंगी आमची कर्तव्ये व जबाबदारी आम्ही राजनिष्ठपणाने ओळखीत असतो असेच सिद्ध होते."

टिळकांचा हा जाहीरनामा निघताच सरकारानें २५ जूनचा आपला जाहीरनामा परत घेतला. लगेच मुंबई सरकाराने या दोन्ही गोष्टी स्टेट सेक्रेटरीकडे कळविल्या आणि लॉर्ड क्र्यू यानी केरहार्डी याना लिहून कळविलें कीं, ' टिळकानी सरकाराविषयी स्नेहभावाचे उद्गार काढल्यामुळे आम्ही त्याजवरचा पहारा वगैरे आता उठविला आहे.

## ( ४ ) राष्ट्रीय सभेचा वाद

पण हे जाहीरपत्र प्रसिद्ध होण्यापूर्वीच इतर रीतीने टिळकानी जाहीरपणे सभांतून वगैरे भाग घेण्यास प्रारंभ केला होता. व सरकारनेंहि टिळकाशिवाय इतर लोकाशी सामोपचाराचे बोलणे सहानुभूती मिळविण्याकरिता सुरू केले होते. ता. १८ ऑगष्टच्यापूर्वीच पुणे सार्वजनिक सभेने युद्धाच्या कामी ब्रिटिश साम्राज्यास राजनिष्ठापूर्वक सहाय्य करण्यास आम्ही तयार आहोत अशी तार सरकाराकडे केली. ता. १९ रोजी पुणे जिल्ह्याचे कलेक्टर मि. मॉटफर्ड यानी युद्धविषयक कोणत्या बातम्या छापाव्या कोणत्या छापू नयेत म्हणजे सरकारास मदत होईल अशाविषयी खुल्या मनाने पुढाऱ्यांशी वाटाघाट केली. ता. २५ ऑगष्टच्या केसरीत गणेश उत्सवामध्ये टिळकांचे गीतेवर प्रवचन झाले ता. २६ रोजी करंदीकर यांच्या व्याख्यान्याचे दिवशी आणि ता. २८ रोजी शिवरामपंत परांजपे यांच्या व्याख्यानाचे दिवशी टिळकानी अध्यक्षस्थान स्वीकारून व्याख्याने दिली. सप्टेंबर ता. १९ पासून चार दिवस गीतेवर टिळकांची प्रवचने झाली. व अशा रीतीने सुटकेपासून सुमारे दोन महिन्यांचे आंत टिळक सार्वजनिक कार्यात प्रविष्ट झाले. या पुढे काही दिवस युद्धाशिवाय वर्तमानपत्राना दुसरा विषय नव्हता. केसरीत प्रथम युद्धानुरोधाने जुन्या ऐतिहासिक प्रसंगावर व नंतर हिंदुस्थान व लष्करी शिक्षण या विषयावर लेखमाला सुरू झाली. कारण युद्धाचा फायदा घेणें आणि लष्करी शिक्षण इकडे चालू करणे इष्ट आहे या गोष्टी सरकारच्या मनावर बिंबविण्याला हा सहजच योग्य प्रसंग होता. या सुमारास सर व्हॅलेन्टाईन चिरोल हे विलायतेतील लोकांना असे सांगू लागले की ज्याअर्थी जुन्या इंग्रजी राज्यपद्धतीचे गुण गाऊन टिळकासारखे लोकहि राजनिष्ठा प्रगट करू लागले आहेत त्याअर्थी आहे ही राज्यपद्धति पुढेहि चालण्यास हरकत नाही तीत फारशी सुधारणा करावयास नको. पण ज्या पत्रांत टिळकांनी इंग्रजी राज्याचे गुण घेतले त्याच पत्रांत टिळकांनी आम्ही आयरीश लोकाप्रमाणे हिंदुस्थानाला स्वराज्य मागणारे आहो व त्याची खटपट

करणारे आहो हे जे लिहिले ते मात्र चिरोलसाहेबानी अजीबात गाळले. नोव्हेंबर डिसेंबर महिन्यांत पुणे येथे एक राजद्रोहाचा खटला झाला त्यांत सुर्वे देसाई व सुमंत असे गृहस्थ सांपडले. पैकी सुमंत यानी काही राजद्रोहात्मक वाङ्मय छापण्याचा इतर दोघाशी कट केला असा त्यांच्यावर आरोप होता. सुर्वे यांच्याजवळ बॉम्ब करण्याची कांही द्रव्ये व 'फॉर्म्युला' ही सापडली. या तिघानाही शिक्षा झाल्या. परंतु पूर्वीप्रमाणे या कटाचा आरोप चिघळविण्याचा पोलिसाकडून प्रयत्न झाला नाही. ऑगस्टपासून पुढे टिळक आपल्या गीतारहस्य ग्रंथाच्या खटपटीला लागले. त्यासंबंधाची हकीकत पुढे गीतारहस्य प्रकरणांत येईलच. पण हा त्यांचा उद्योग सुरू असताच आक्टोबर नोव्हेंबरात राष्ट्रीय सभेसंबंधी पुढे काय करावयाचे या प्रश्नाची वाटाघाट टिळक व त्यांच्या पक्षाची मंडळी तसेच परप्रांतांतील कांही मंडळी यांच्या दरम्यान सुरू झाली.

ता. ५ जानेवारीच्या केसरीत टिळकानी मद्रास कॉंग्रेसवर लेख लिहिला त्यात समेटाला खरी अडचण काय होती हे विशद करून सांगितले. उभयपक्षाच्या ध्येयात फरक नाही. प्रतिज्ञा पत्रकावर सह्या करण्यालाहि काही लोक तयार झाले. पण खरी अडचण मुंबईच्या पुढाऱ्याच्या मनातच होती. 'घोडे अडते मुंबईस; त्याला कोणी लगाम घालणारा भेटल्याखेरीज ते असेच उधळत अडत लाथा मारीत राहणार.' मुंबईकरांचे हे धोरण देशात किती मान्य होते या गोष्टीचे प्रत्यंतर म्हणजे मद्रास सभेतील सव्वासहाशे डेलिगेटापैकी बाहेर प्रांतातून फक्त १२५ आले होते. आणि त्यातलेहि शंभर मुंबई व बंगाल्यात वाटले गेले होते. स्वतः बेझन्टबाईनीच म्हणून दाखविले की ही कॉंग्रेस सर्व पक्षाची नसून फक्त एका पक्षाचीच मजलीस आहे. ही दुःस्थिति स्वतः कॉंग्रेसच्या नजरेला येऊन समेटाचा प्रश्न सोडविण्याकरता प्रत्येक प्रांताचे तीन तीन लोक घालून एक कमिटी नेमण्यात आली. व पुढील साली मुंबईस राष्ट्रीय सभा भरेल त्यापूर्वी हा प्रश्न सुटावा अशी इच्छा व्यक्त करण्यात आली. आळतेकर व उपासनी हे दोघे मद्रासच्या सभेला गेले होते त्याना विषयनियामक कमिटीत मुद्दाम घेण्यात आले म्हणून या प्रश्नाला जास्त नेट लागला. मद्रासच्या सभेहून लोक व वर्तमानपत्रकर्ते आपापल्या गावी गेल्यावर समेटाचा प्रश्न कसा फसला याविषयी सहजच चर्चा सुरू झाली. १२ जानेवारीच्या अंकात अमृतबझार पत्रिकेने खालीलप्रमाणे लिहिले, 'टिळक राष्ट्रीय सभा पुढे मागे कबज्यात घेतील म्हणूनच समेट मोडण्यात आला. मुंबईकडील एका मवाळ पुढाऱ्याने मद्रासच्या स्वागतमंडळाला एक 'गुप्त' स्वरूपाचे पत्र लिहिले. पण ते विषयनियामक कमिटीत प्रगट करणे भाग पडले. त्या पत्रात असे लिहिले होते की टिळकानी "सरकारावर बहिष्कार" घालण्याचा आपला उद्देश प्रगट केला असून ते राष्ट्रीय सभेत शिरतील तर आयरिश लोकांचे अडवणुकीचे मार्ग पुढे आणतील. हे ऐकल्याबरोबर बेझन्टबाईनी टिळकाना तार करून विचारले की, हे काय आहे? टिळकानी तावडतोब उत्तरी कळविले की ही गोष्ट

खोटी आहे. पण टिळकांचे उत्तर येण्यापूर्वीच समेट मोडून लोक मोकळे झाले. मागाहून टिळकावर केलेल्या आरोपाबद्दल त्यांची माफी मागण्यात आली. हा आरोप सभेचे अध्यक्ष भूपेंद्रबाबू यानीच केला व माफीहि त्यानीच मागितली. भूपेंद्रबाबू हे समेटाला मनातून अनुकूल होते ही गोष्ट मोतीलाल घोस यांजकडून वरचेवर कळत असे. पण याची वार्ता लागताच दिनशा वाच्छा यानी सुरेंद्र व भूपेंद्र याना अपमानास्पद तार पाठवून तुम्ही नेमस्तपक्षाचा विश्वासघात करीत आहा असे लिहिले. आणि फेरोजशहा मेथा यानी भूपेंद्रबाबूना अशाच अर्थाचे जे एक पत्र पाठविल्याचे पुढे प्रसिद्ध झाले त्यावरूनहि खरे पाणी मुंबईसच मुरत होते हीच गोष्ट सिद्ध झाली. मद्रासेस समेट घडला नाही तर पुढच्या साली काँग्रेस कलकत्त्याला बोलावून तेथे तो घडवून आणू असे भूपेंद्रबाबू कोठे बोलल्याचे कळताच मुंबईकरानी हट्टाने पुढची सभा मुंबईसच मागून घेतली. गोपाळराव गोखले हे यावेळी आजारी असल्याने मद्रासेस जाऊ शकले नाहीत. पण समेट मोडण्याचा दोप त्यांच्याकडेहि पर्यायाने येत होता. बेझन्टबाई पुण्यास आल्या तेव्हा गोखले यानी एक मसुदा तयार करून त्यांच्याहाती दिला तो टिळकानी व बंगाल्यातील राष्ट्रीयपक्षाने मान्य केला होता. पण ता. १४।१५ डिसेंबरच्या सुमारास गोखल्यानीच भूपेंद्रबाबूस पत्र पाठवून टिळक सरकारवर बहिष्कार घालणारे आहेत असे कळविले. केसरीने आव्हान केले असताहि ते पत्र जसेच्या तसे गोखल्यानी प्रसिद्ध केले नाही. भूपेंद्रबाबूंची त्या पत्रावरून काय समजूत झाली हे मात्र त्यांच्या माफीवरून सिद्ध होते. गोखल्यांचे अस्सल पत्र प्रसिद्ध न करता ज्ञानप्रकाश वगैरे पत्रानी टिळकांच्या भाषणातील काही उतारे छापले पण ते १९०७ सालाइतके जुने होते. बरे, १९०७ सालची टिळकांची मते समेटाचा मसुदा लिहून देण्यापूर्वीहि गोखल्याना माहीत होती. शिवाय बंगाल्यातील बहिष्काराला त्या प्रांतापुरता स्वतः गोखल्यानी दुजोरा दिला होता आणि १९०८ सालच्या एका व्याख्यानात निःशस्त्र प्रतिकारात मालावरील बहिष्कारापासून कर न देण्यापर्यंतच्या सर्व गोष्टींचा समावेश होतो असे स्वतः गोखल्यानीच म्हटले होते. या सर्व गौडबंगालाचा खुलासा मूळचे पत्र प्रसिद्ध करण्याने झाला असता; पण ते न करिता सुबराव यांच्याशी एका खासगी संभाषणात टिळक बहिष्काराविषयी बोलले होते असे गोखले यांचे तर्फे प्रसिद्ध करण्यात आले. पण सुबराव यानी टिळकांच्या भाषणाचा सारांश हाताने लिहून काढून दुसऱ्याच दिवशी टिळक व केळकर याना वाचून दाखविला होता. या टिपणात एक लिहून सुबराव हे गोखल्यांच्याजवळ टिळकांसंबंधाने दुसरेच काही बोलले असे समजण्याचा एकच मार्ग शिल्लक उरतो किंवा दुसरा मार्ग म्हणजे सुबराव बोलावयाचे तेच बोलले पण गोखले वेगळे समजले.

ता. १६ फेब्रुवारीच्या अंकात टिळकानी आपल्या सहीने या वादाच्या विषयावर केसरीत एक पत्र लिहिले. त्यात त्यानी असे लिहिले की, "सुबराव व मी यांचे बोलणे झाले ते मुंबईस जाऊन मेथा वाच्छाशी चर्चा करून निराश होऊन

परत आल्यावरच झाले. भूपेंद्रबाबू याना पाठविलेले पत्र लोकाना दाखविण्यासारखे नव्हते म्हणून दुसरे एक पत्र वाचून दाखविण्याकरिता पाठवा असे भूपेंद्र यानी गोखल्याना लिहिले आणि ते त्यानी पाठविलेहि. पण दुसरे पत्र पोचण्यापूर्वीच पहिले उघडकीस येऊन सर्व घोटाळा झाला होता. अर्थात् ते पत्र काय होते हे गोखल्यानी प्रसिद्ध केले पाहिजे." पण ते त्यानी प्रसिद्ध केले नाही. नंतर बेझंटबाईनीं 'न्यू इंडिया' पत्रात आपल्याकडून म्हणून एक खुलासा केला. त्यात त्यानी असे म्हटले होते की, सुब्बराव व टिळक याच्या भाषणात टिळक असे म्हणाले की नेमस्त व जहाल यांचे ध्येय एकच असले तरी मार्ग वेगळे आहेत. आणि आम्ही राष्ट्रीयसभेत आल्यास बहुमत मिळवून राष्ट्रीय सभेकडून आमच्या मार्गाना मंजुरी मिळवू. यामुळे सर्व परिस्थिति बदलून समेट बिघडला. पण सरकारशीं सहकारिता करण्यास मी तयार आहे असे शब्द त्यानी ३० ऑगष्ट १९१४ च्या जाहीरनाम्यात प्रत्यक्ष लिहिले होते. सुब्बराव याशी झालेल्या तोंडी भाषणातील एखादे वाक्य सुब्बरावानी गोखले याना सांगावे व त्याकरिता त्यानी टिळकाना जबाबदार धरावे पण स्वतःच्या सहीवर जे लेखी विधान टिळकानी प्रसिद्ध केले त्यावर मात्र त्यानी विश्वास ठेवू नये हे आश्चर्य होय. स्वतः बेझंटबाईशी टिळकांची संभाषणे झाली होती त्यात सरकारावर बहिष्कार घालण्याचे विधान त्यानी केले नव्हते. बरे राष्ट्रीय सभेत बहुमत मिळवू या विधानाला हरकत घेण्यासारखेंहि काही नव्हते. कारण सभा संयुक्त असली तरी तीत प्रत्येक पक्ष आपल्या बाजूला बहुमत मिळविण्याचा प्रयत्न करीतच असतो.

बेझंटबाईच्या या खुलाशाचा आधार घेऊन गोखले यानी आपल्या पत्रात मुख्य मुद्दा टाळला. त्यानी इतर खुलासा केला त्याचा सारांश असा:--" सुब्बराव टिळकांच्याकडून मजकडे येताच त्यानी पहिले शब्द हे उच्चारले की टिळकाशी समेट करणे अशक्य आहे. ते राष्ट्रीय सभेत आल्यास फिरून पूर्वीचे वाद उपस्थित होतील. शिवाय ते आणखी असे म्हणाले कीं आम्ही समेटाची जी कलमे पत्करीत आहोत तो फक्त पहिला हप्ता आहे. जाहीर सभानी निवडण्याचा अधिकार आम्हाला हवा. आणि तो आज न मिळाला तर आम्ही उद्या तरी मिळवू. नेमस्तांचे धोरण विरोधमिश्रित सहकारितेचे आहे. आमचे धोरण केवळ विरोधाचे आहे. लहान सहान व थोड्या जागा सरकारने दिल्याने आमचे समाधान होणार नाही. गोखल्यानी रॉयलकमिशनवर दोन वर्षे घालविली पण त्यापासून आम्हाला सिव्हिल सर्व्हिसमध्यें थोड्याशा अधिक जागा मिळणार इतकेच. आमची मागणी साम्राज्यान्तर्गत स्वराज्याची पण स्वराज्याचीच आहे. आम्ही मजूरपक्षाकडून एखादे बिल पार्लमेंटात आणू आणि त्यावर सर्व शक्ति एकवटूं. आयरिश लोकानी कायदेशीर विरोधाच्या बळावर तीस वर्षांत स्वराज्य मिळविले तशीच कायदेशीर अडवणूक आह्माला करावी लागेल. आह्मी राष्ट्रीय सभेत शिरल्यानंतरहि आमचे ह्मणणे काँग्रेसने मान्य न केले तर आह्मी एखादा

वेगळा संघ काढू.' तात्पर्य सुब्बराव यांच्या ह्मणण्याप्रमाणे टिळकांचा कार्यक्रम जुना १९०७ चाच होता. हा कार्यक्रम मला माहीत नव्हता असे नाही. पण मी समजत होतो की तो त्यावेळेपुरताच असेल. राष्ट्रीय पक्षातील निरनिराळ्या लोकाशी माझे बोलणे झाले त्यावरून माझी अशी समजूत झाली होती की जुने मार्ग टाकाऊ व हल्लींचे कॉंग्रेसचे धोरण हेच योग्य असे त्याना वाटत असावे. टिळकानी ऑगस्टमधील आपल्या जाहीर पत्रांत हीच गोष्ट लिहिली होती. पण सुब्बरावानी टिळकांचे संभाषण ह्मणून जे सांगितले त्याने एकदम डोक्यात दगड पडल्यासारखे झाले. ह्मणून घटना दुरुस्तीच्या सूचनेला मी प्रथम संमति दिली होती ती परत घेतली आणि सुब्बराव व बेझंटबाई याना तसे कळविले. मी जे गुप्तपत्र ह्मणून भूपेंद्रबाबूंना पाठविले ह्मणतात त्यात ह्याच गोष्टी लिहिल्या होत्या. ते पत्र इतर काही लोकानाहि मी दाखविले होते. त्यावर 'गुप्त' अशी सूचना लिहिली ह्याचा अर्थ ते वर्तमानपत्रात छापले जाऊ नये इतकाच होता. मी मद्रासला गेलो असतो तर हा खुलासा समक्षच केला असता. शिवाय मी पत्र लिहिण्यापूर्वी विजापूरकराना दाखविले होते. १९ डिसेंबर रोजीं समेटाच्या विषयावर माझे व टिळकांचे बोलणे झाले. त्यात मी त्याना स्पष्ट सांगितले होते की समेटाला संमति देणे आता मला वरील कारणामुळे शक्य नाही व तुह्मी राष्ट्रीय सभेबाहेर राहाल तरच बरे.

"टिळकांची तक्रार अशी की सुब्बराव यानी त्यांच्या भाषणाचे जे लेखी टिप्पण केले ते मी आधारभूत मानावयास पाहिजे होते. संभाषणाच्या त्यांच्या तोंडी रिपोर्टावर मी विसंबणे योग्य नव्हते. पण हे टिप्पण माझ्या हाती पुढे एक आठवड्याने आले. माझे पत्र त्याच्या आधीचे आहे. शिवाय ते हाती असते तरी काय झाले असते ? बोलून चालून ते टिप्पण. त्रोटक सारांश. शिवाय टिळकानी त्यात दुरुस्ती केलेली. प्रत्यक्ष संभाषण बराच वेळ झालेले. सुब्बरावानी तोंडी सांगितल्या अशा काही गोष्टी त्या टिप्पणात नव्हत्या. ते कसेहि असले तरी 'आमच्या पक्षाच्या इष्ट मार्गांना बहुमताने संमति मिळवू' हे त्यांचे म्हणणे शिल्लकच राहते. व त्यांचे मार्ग १९०६-१९०७ चे हे उघड आहे. त्या चळवळीत टिळक कॉंग्रेसला 'भिक्षांदेही' करणारी सभा असे ह्मणत. कॉंग्रेसच्या पुढाऱ्याना स्तुतिपाठक म्हणत. आणि अडवणूक व सार्वत्रिक बहिष्कार हीच त्यांची तेव्हां मुख्य साधने होती. 'सरकारावर बहिष्कार' हे शब्द माझे नाहीत व भूपेंद्र बाबूंचेहि नाहीत. ते इतर लोकानी उच्चारले असतील. त्यावरून बाईनी तार केली व टिळकानी त्याला उत्तर पाठविले. आणि भूपेंद्रबाबूनी जी माफी मागितली तिचा अर्थ इतकाच की खाजगी पत्रातील गोष्टी लोकांपुढे त्यानी आणू दिल्या याबद्दल त्याना खेद झाला. टिळक एवढेच ह्मणून राहाते की हल्ली सरकारावर मी बहिष्कार घालणारा नाही तर ते ठीक होते. पण पूर्वीहि केव्हा मी बहिष्कार घाला असे ह्मटले नव्हते असेहि टिळक लिहितात तेव्हा जुन्या गोष्टींची विस्मृति त्याना पडली इतकेच मी ह्मणतो. 'नव्या पक्षाची मते' या

विषयावर त्यानी कलकत्त्यास १९०७ साली भाषण केले, तसेच २५ जून १९०७ रोजी शिवाजी उत्सवात भाषण केले, यावरून त्यांचीं मते उघडच दिसतात. मूळ पत्र प्रसिद्ध करा असे टिळक आग्रहाने म्हणतात. त्यावर मी इतकेच म्हणतो की ते पत्र स्वतः टिळकाना किंवा त्यांचा कोणी विश्वासू मनुष्य येईल त्याला दाखवायला मी तयार आहे. आणि ते वाचल्यावरहि जर प्रसिद्ध करण्याचा आग्रह टिळक धरतील तर तें मी वर्तमानपत्राकडे पाठविण्याला तयार आहे."

या शेवटल्या खुलाशावर टिळकांचे म्हणणे असे की "ते पत्र पहावयाला मी जात नाही किंवा माझा मनुष्यहि पाठवीत नाही. गोखल्यांनी स्वतः ते जसे भूपेंद्रबाबूकडे पाठविले तसेच ते स्वतः होऊन प्रसिद्ध करावे. मी त्यात कशाला?" वास्तविक तिऱ्हाइत असे म्हणणार की गोखले टिळकाना ते दाखविण्याला व त्यानंतर प्रसिद्ध करण्यालाहि जर तयार, तर खुलाशाऐवजी किंवा खुलाशाबरोबर ते प्रसिद्धच करते तर काय बिघडते? व दुसरा कोणी तिऱ्हाइत असे म्हणणार की पत्र आपण होऊन प्रथम प्रसिद्ध न करण्याची गोखल्यांची कारणे बरोबर असोत वा नसोत, पत्र दाखवितो म्हटल्यावर टिळकानी तरी स्वतः ते पाहण्याला किंवा ते पाहण्यास कोणी आपला मनुष्य पाठविण्याला काय हरकत होती? पण खरा प्रकार असा दिसतो की ते पत्र जसेच्या तसे प्रसिद्ध होणे दोघानाहि सारखेच अनिष्ट असावे! पुष्कळ वेळा कोर्टात असा प्रकार घडतो की दोन्ही पक्षकार एखाद्या विशिष्ट साक्षीदारावर दस्तऐवजावर भर दिल्याचे दाखवितात आणि समन्स काढून तो साक्षीदार किंवा दस्तऐवज कोर्टात आणवितातहि. पण कोणीहि आपल्यातर्फे त्या साक्षीदाराची साक्ष घेत नाही. किंवा तो दस्तऐवज आपल्यातर्फे पुराव्यात दाखल करीत नाहीत. पण तोंडाने मात्र दोघेहि त्याकडे बोट दाखवून म्हणत असतात 'त्यांत काय ते आहे.'

वैद्याने तिखट मना केलेला मनुष्य समोर मिरची टांगून जेवतो म्हणतात त्यातलाच हा प्रकार झाला. पण हे सर्व सोडून देऊ. आमच्या मते खरा मुद्दा असा की 'मी हल्ली सरकारावर बहिष्कार घालणारा नाहीअसे टिळक म्हणते तर ते एक असो मला चालले असते' असे जर गोखले खुलाशात लिहितात, आणि टिळकानी आगस्टच्या जाहीरपत्रकात केलेले ते विधान स्पष्ट आणि ताजे असे होते, तर समेटाच्या कामापुरते ते पुरे होते. 'मी केव्हाच बहिष्काराचे समर्थन केले नाही' हे टिळकांचे वाक्य घेऊन जुने आधार देऊन ते खोडीत बसण्यात काय अर्थ? १९०७-०८ साली आपण काय बोललो हे टिळक विसरले असतील तर त्याना त्याची आठवण कोणी करून द्यावयाची! टिळक काय हे गोखल्याना माहीत व गोखले काय हे टिळकाना माहीत! कोणी कोणाचा स्वभाव बदलू शकत नव्हता. प्रश्न इतकाच होता की समेटाचा जो प्रयत्न चालला होता व इतर प्रांतातील नेमस्त लोकहि त्याला जो पाठिंबा देत होते ते, काही असले तरी राष्ट्रीय सभा फिरून संयुक्त व्हावी याच मुद्द्यावर. टिळक पुढे जन्मभर कोणते धोरण स्वीकारतील याची हमी ~~त्यांच्यापासून~~ हा पाठिंबा देणाऱ्यानी मागितली नव्हती किंवा ते तशी

हमी देतील अशी त्यांची अपेक्षाहि असणें शक्य नाहीं. आणि अशी हमी द्याल तरच आम्ही समेट करू असा जर कोणाच्या म्हणण्याचा अर्थ आहे असा टिळकांचा समज झाला असता तर ःभटाचे बोलणे त्यानी तेव्हाच धुडकावून लावले असते. गोखले हे समेट करणार हाते तो एकाच्या टिळकांवर व्यक्तिशः उपकार करण्याकरिता नव्हे. तर एकंदरीने राष्ट्राचे व राष्ट्रीय सभेचे हित कशात आहे हे पाहूनच. तसेच 'I have never advocated boycott of Govrnment' या तारेतील शब्दांचा अर्थ ' In my conversation with Subrao ' असे शब्द गृहीत धरूनच करावयास पाहिजे होता. कारण प्रश्न आताचा व या पुढचा इतक्यापुरताच असल्यामुळे 'मी पूर्वी केव्हा काहीच केले नाही,' असे सांगण्याच्या भानगडीत टिळक का पडतील? शिवाय " आजहि माझे स्नेही लोक म्युनिसिपालिट्यातून लोकलबोर्डातून कायदे कौन्सिलातून काम करीत आहेत " हे सहकार-पसंतीदर्शक शब्द त्याच तारेत पुढे लिहिले होते ते जमेस का धरावयाचे नाहीत? तात्पर्य सुबराव यांच्या बोलण्याचा काहीहि परिणाम गोखले यांच्या मनावर झाला असला तरी मेथा वाच्छा वगैरे मंडळी आपल्याला नावे ठेवतील या एक प्रकारच्या नेतृनिष्ठेनेच त्यानी या समेटाच्या भानगडीतून पाय मागे घेतला असावा. व ता. १६ चे पत्रावरून स्वतः टिळकांचीहि अशीच कल्पना होती असें दिसते. टिळक व सुबराव यांचे हे भाषण निमित्तप्राय असावे. विजापूरकरानी प्रसिद्ध केल्याप्रमाणे सुबराव व टिळक यांच्या संभाषणात गोखल्यांचे हेतू डळमळण्यासारखे काही विशेष होते असे म्हणवत नाही. असो या सर्व वादाची हकीकत व आपली बाजू टिळकानी ता० ९ फेब्रुवारीच्या केसरीत "चोराच्या उलट्या बोंबा" या अग्रलेखांत दिली असल्यामुळें सदर अग्रलेख जसाचा तसाच आम्ही या भागाच्या परिशिष्टांत दिला आहे.

## ( ५ ) गोपाळराव गोखले यांचा मृत्यु

या वादामुळे बरीच मोठी खपली निघाली. पण असे वाद पूर्वीहि पुष्कळ झाले होते आणि टिळक व गोखले यांचे शब्दयुद्ध हो काही नवीन गोष्ट नव्हती. मात्र या वादानंतर लवकरच जी एक गोष्ट दुर्दैवाने घडून आली तिच्यामुळे पूर्वीच्या कोणत्याहि वादापेक्षा लोकांच्या मनात या वादाची आठवण अधिक राहिली. ही गोष्ट म्हणजे गोखले यांचा मृत्यू होय. ही दुःखकारक गोष्ट या वादानंतर अवघ्या एक दोन आठवड्यात घडून आली. याला अनुलक्षून कित्येकानी या मृत्यूचे खापर टिळकांच्या डोक्यावर फोडण्याचा प्रयत्न केला. कारण कर्मधर्म संयोगाने अशी गोष्ट घडली की ९ फेब्रुवारीच्या केसरीत या वादावर जो भला पाच कॉलमचा लेख टिळकानी लिहिला त्याच्या समारोपात खालील शब्द आले होते. "गोखले काय टिळक काय दोघांच्याहि गोवऱ्या आता बहुतेक ओंकारेश्वरावर गेल्या आहेत असे म्हणण्यास हरकत नाही. टिळक कॉंग्रेसमध्ये आले तर ते ती

कबजात घेतील या म्हणण्यात काही हशील नाही. काँग्रेस राष्ट्रीय आहे. ती टिळकांची नव्हे किंवा गोखल्यांचीहि नव्हे. काँग्रेसचे धोरण काय असावे हे काँग्रेसने ठरवावयाचे आहे. अमुक एका व्यक्तीने नाही." यातील 'ओंकारेश्वरावर गोवऱ्या गेल्या' हे शब्द टिळकानी जे लिहिले ते गोखले यांच्या समीप आलेल्या मृत्यूला उद्देशून लिहिले असे काहींचे म्हणणे. काहींचे म्हणणे त्या शब्दांवरून गोखले मरावे अशी टिळकाची इच्छा असल्याचे ध्वनित होते. आणि काहींचे म्हणणे टिळकांच्या मनात यापैकी काही नसले तरी ते विषारी शब्द गोखल्यांच्या जिव्हारी लागले म्हणून त्यांचे आयुष्य आणखी काही काळ लांबावयाचे ते न लांबता ते शब्द मनाला लावून घेतल्यामुळे गोखले वारले. पण हे सर्व बोलणे बायकीथाटाचे असे आम्ही समजतो. आणि त्यात गोखल्यांच्या मृत्यूच्या हळहळीपेक्षां टिळकांच्या द्वेषाचेच प्रतिबिंब अधिक दिसते. टिळकांच्या अपशब्दानी जर गोखले मरावयाचे तर ते यापूर्वी कितिदा तरी मरावयास पाहिजे होते. कारण टिळक त्याना टाकून लिहित, अपशब्द लिहित, असे जरी म्हटले तरी एकमेकाना एकमेकांची ओळख फार दिवसांची होती. गोखल्यांचे मन नाजुक असले तरी टिळकांची निंदा सोसण्याइतके ते सवयीने तरी खंबीर व टणक झाले होते.

बरे टिळकांचा वरील लेख सगळा वाचून कोणीहि सांगावे की, असा खरा जिव्हारी लागणारा एक शब्द तरी त्यात कोणता आहे? गोवऱ्या ओंकारेश्वरी गेल्या हे टिळकानी त्यांच्या एकट्यापुरते म्हटले नव्हते. स्वतःलाहि उद्देशून ते म्हटले होते. आणि ४९ वर्षांच्या गोखल्याना ते लागतील तर अठ्ठावन वर्षांच्या टिळकाना ते अधिकच यथार्थतेने लागावेत. बोलाफुलाची गाठ किंवा काकतालीय न्याय किंवा निव्वळ योगायोग असेच या शब्दाना उद्देशून कोणीहि समंजस मनुष्य म्हणेल. आणि खरोखर पाहिले तर टिळकांची जी त्या शब्दापुढील दोन वाक्ये आम्ही दिली आहेत ती लक्षात घेतली तर आज कोण मरणार उद्या कोण मरणार याची चिकित्सा त्याना खरी करावयाची नसून, व्यक्ति ही नश्वर आहे राष्ट्रीय सभेसारखी संस्था ही चिरकाल टिकणारी आहे इतकाच विरोध त्याना या ठिकाणी दाखवावयाचा होता. 'नदीवरच्या गोवऱ्या' टिळकानी आवेशाच्या बोलण्यात काढल्या पण साध्या किंवा विनोदी बोलण्यात ते शब्द कोणी वापरीत नाही असे नाही. आमच्या एका मित्राला उद्देशून दुसऱ्या एकाने सरळ मनाने असे शब्द परवा भर सभेत उच्चारले तेव्हा त्या मित्राने त्यावर अशी विनोदी टीका केली. तो म्हणाला "जिवंतपणीच माझ्या गोवऱ्या नदीवर जाऊन पडलेल्या बऱ्या. कारण मग आयत्या वेळी गोवऱ्या येण्याला उशीर लागतो. आणि नदीच्या पात्रात पाण्याच्या काठी उगीच बराच वेळ कुडकुडत बसावे लागते. त्याऐवजी शेकोटीची आधीच तयारी झालेली बरी!" तात्पर्य टिळकांच्या लेखात ते शब्द आले म्हणून गोखले मरावे या बुद्धीने किंवा ते शब्द वाचून गोखल्यांचे मरण

ओढवेल असे माहीत असता त्यान ते मुद्दाम लिहिले असे ज्याने मनात किंवा जनात म्हणेल तो स्वतःच हीन भावनेचा मनुष्य असला पाहिजे यात शंका नाही.

शुक्रवार ता. १९ फेब्रुवारी रोजी रात्री गोपाळराव गोखले याना मृत्यु आला. त्यांची प्रकृति अलीकडे बरेच दिवस खालावली होती. काळजाच्या एका विकाराने ते आजारी असत व त्यांचे हे दुखणे दिवसेंदिवस वाढत चालले होते. काळजाचा विकार हा दोन चार वर्षांचा जुना असून विलायतच्या एका प्रवासात जहाजावरील एका दाराचा धक्का छातीला लागून तो अधिकच वाढला होता. त्यातच परिश्रम करण्याची त्याना अनिवार हौस असल्यामुळे आणि ते विश्रांति अशी थोडी घेत असल्यामुळे पुढे पुढे त्याना रात्री झोप येत नसे. आणि आली तरी फार वेळ टिकत नसे. म्हणून त्यानी सोसायटीतल्या एखाद्या गृहस्थाला अवेळीच उठवून आणून त्याच्याशी गोष्टी बोलत बसावे किंवा काही खेळ काढून खेळत बसावे आणि अशाने रात्र घालवावी. अशा रीतीने पळापळाने अंतकाळ जवळ येत आहे हे गोखल्याना दिसत होते. पण त्याला त्यांचा किंवा त्यांच्या डॉक्टराचा काही इलाजच नव्हता. काळजाचा विकार मनुष्याला केव्हा दगा देईल याचा नेम नसतो. तरी पण ते इतक्यात जातील असे कोणास वाटले नाही. शेवटी शेवटी त्यानी कामाचा हात थोडा आखडला होता व डॉक्टर लोक सक्त पहारा ठेवून त्याना कोणाशी फार बोलू देत नव्हते. पण त्यांच्या प्राणाला ओहोटी लागली ती लागलीच. आणि इतके दिवस ते जगले हे तरी काम करण्याच्या हौसेनेच जगले असेहि म्हणता येईल. मरणसमयी गोखल्यांचे वय अवघे ४९ वर्षांचे होते. एका दृष्टीने ते आगरकर, आपटे वगैरे समव्यवसायांपेक्षा अधिक जगले परंतु हे काही तरीच समाधान होय. टिळकांसारखे त्याना साठ पासष्ट वर्षे आयुष्य लाभते तर त्यांच्या हातून आणखी किती तरी काम झाले असते. पण जेवढे आयुष्य त्याना लाभले त्यातच त्यानी इतर अनेक लोकांपेक्षा फार अधिक काम करून दाखविले. म्हणून टिळकानी केसरीतील त्याच्या मृत्यूलेखावर ‘ मुहूर्तं ज्वलितं श्रेयो न च धूमायितं चिरं ’ असे जे अवतरण लिहिले तेच खरे.

गोपाळराव गोखले हे एका गरीब कुळात जन्मले. कागल येथील त्यांच्या वडिल भावाने त्यांचे एकंदर शिक्षण केले आणि अल्पवयातच ते बी. ए. झाले. पण स्वार्थत्यागाची वृत्ति मनात असल्यामुळे टिळकांच्या उज्ज्वल उदाहरणाने मोहून त्यांच्याच बोलावण्यावरून ते न्यू इंग्लिश स्कूलला येऊन मिळाले व लाईफ मेंबर झाले. पुढे त्यांचे व टिळकांचे ग्रह जमले नाहीत ही गोष्ट वेगळी. शिक्षकाचे काम थोडे दिवस केल्यावर त्यांची बुद्धिमत्ता, इंग्रजी लिहिण्या बोलण्याची हातोटी, कोणत्याहि विषयाचा अभ्यास करण्याची इच्छा आणि मर्मग्राहकता व सर्वांत विशेष म्हटले म्हणजे विनयशीलता हे त्यांचे गुण पाहून माधवराव रानड्यांनी त्याना निवडून आपल्या आवडत्या शिष्यवर्गात सामील केले. आणि तेव्हांपासून त्यानी रानड्यांच्या ठिकाणी जी गुरुनिष्ठा ठेविली ती यावज्जन्म. आणि

या गुरुनिष्ठेचे फळहि त्याना तसेच मिळाले. कारण 'आपणासारिखे करिती तात्काळ' ही म्हण या ठिकाणी खरी ठरली. गोखले यांचा बी. ए.च्या परिक्षेचा विषय गणित असला तरी इंग्रजी भाषेच्या आवडीने त्यानी तिचा परिश्रमाने अभ्यास करून ती चांगली हस्तगत केली. स्मरणशक्ति खूप कमावलेली असल्याने त्यांचे इंग्रजी भाषेचे पाठांतर फार चांगले होते. पण पुढे हळू हळू इंग्रजी हा शिक्षणाचा विषय सोडून देऊन त्यानी इतिहास व अर्थशास्त्र घेतले आणि शिक्षकाचे काम सोडून देईपर्यंत त्यानी त्या विषयातील आपली प्रवीणता जशी वाढवली त्याप्रमाणे आपल्या उत्कृष्ट व्याख्यानानी शिष्यांचेहि कल्याण केले. हे दोन विषय त्याना सार्वजनिक आयुष्याच्या प्रवेशद्वारासारखे उपयोगी पडले. १८८७ पासून रानड्यांनी त्यांचा सार्वजनिक सभेत प्रवेश करविला. आणि सीतारामपंत चिपळूणकरानंतर ते सभेचे चिटणीस व त्रैमासिकाचे संपादक झाले. या सुमारास आगरकराबरोबर त्यानी ' सुधारक ' पत्र काढले पण पुढे लवकरच त्यानी त्याचा संबंध सोडला. टिळक त्यांहून नऊ वर्षांनी वडील तथापि दोघांचेहि सार्वजनिक चरित्र बरोबरच सुरू झाले व प्रथम बरीच कामे उभयतानी भागीदारीने केली. एका बाजूने टिळक हे चिटणीस निवडून द्यावे तर दुसऱ्या बाजूने गोखले. पण थोड्याच दिवसानी त्यांची जोडी फुटली आणि दोघानीहि दोन मार्ग आक्रमिले.

सन १८९२ किंवा १८९३ साली मुंबईस एका सभेत लष्करी खर्चाच्या विषयावर गोखल्यांचे मुख्य वक्ते म्हणून भाषण झाले. अध्यक्ष मेथा व उपवक्ते वाच्छा हे होते. पण आपल्या वक्तृत्वाने व विषयप्रतिपादनाच्या शैलीने गोखल्यानी दोघांवरहि ताण केली आणि हे पाहून मेथा व वाच्छा या दोघांच्याहि चेहेऱ्यावर गोखल्यांविषयींच्या कौतुकाचे तेज चमकत होते हे सर्वांनी पाहिले. यावेळी गोखले अवघे सव्वीस किंवा सत्तावीस वर्षांचे असावे. सार्वजनिक कामांत त्यांचे पाऊल जे एकदा पुढे पडले ते कधीच मागे आले नाही. १८९६ साली हिंदुस्थानतर्फे वेल्बी कमिशनपुढे त्याना साक्षीदार म्हणून पाठविण्यात आले आणि तेथे झालेली त्यांची प्रश्नोत्तरे पाहिली म्हणजे कोणालाहि त्यांच्या बुद्धिमत्तेबद्दल अभिमान वाटल. १८९९ साली ते मुंबईकायदेकौन्सिलात शिरले पण ते क्षेत्र त्यांच्या कर्तृत्वाला अपुरे असे तेव्हाच दिसून आले. १९०२-०३ साली सर फेरोजशहा मेथा यानी वरिष्ठ कौन्सिलातील आपली जागा खाली करून त्याना दिली. तेथपासून सतत अकरा बारा वर्षे ते तेथे होते पण त्यांची जागा घ्यावी असे दुसऱ्या कोणाला वाटेना व द्यावी असे कोणास म्हणवेना. कौन्सिलातील त्यांची भाषणे वाचली म्हणजे ती माहितीने पूर्ण भरलेली व अत्यंत परिणामकारक अशी सहज दिसतात. शिवाय त्यांची वाणी मृदु मोहक असल्यामुळे आणि त्यांच्या बोलण्यात सच्चेपणा व कळकळ ही मूर्तिमंत प्रगट होत असल्याने त्यांची छाप तज्ज्ञ व निष्णात अशा अनुभविक व हुशार अधिकाऱ्यांवरहि पडे. त्यांच्या भाषणात मुख्य गुण म्हटले म्हणजे भाषण लहान असो मोठे असा त्यात प्रमेय व अनुमान हीं एखाद्या सुंदर इमारतीप्रमाणे

प्रमाणबद्ध असत. आधार व आकडे पाहून पारखून घेतलेले असावयाचे विषयांतर कोठेंहि नसावयाचे. शब्द मेजके रेखीव तोलीव असे असावयाचे. प्रत्येक वाक्यागणिक उद्दिष्टाचे पाऊल पुढें पडत असावयाचे. आणि या सर्वांवर प्रांजलपणा व मृदुलपणा ही बारीक हाताने पसरलेली असावयाची. पण उलट त्यांच्या भाषणात विनोद सहसा कोठे आढळावयाचा नाही. ज्याप्रमाणे डॉ. रासबिहारी घोष वगैरेंच्या भाषणात अभिजात वाङ्मयाचें संदर्भ व रुचिर ध्वनि पदोपदी उमटलेले दिसतात तसे यांच्या भाषणात आढळत नसत. वक्तृत्वाची जी एक ठरीव कल्पना आहे त्या दृष्टीने गोखल्याना कदाचित् वक्तेहि म्हणता येणार नाही. पण मन वळविणे किंवा दुसऱ्यांना आपलेसे करणें हा जो वक्तृत्वाचा हेतू व परिणाम तो सिद्ध करण्यात इतर नामांकित वक्त्यापेक्षाहि गोखल्यांचा हातखंडा असे. याचे कारण एकच कीं त्यात प्रसाद प्रांजलपणा बुद्धिमत्ता व कळकळ ही खेचून भरलेली असत. यातच त्यांचा वर्ण व बाह्यरूप यांची भर पडे. व त्याहिपेक्षा खरा गुण म्हटला म्हणजे त्यांच्या भाषणातच काय पण ज्यांना एकदा गुरुजन किंवा नेते त्यानी मानले त्यांच्या विषयीच काय पण समोरच्या प्रेक्षकाविषयींहि त्यांची विनयबुद्धि प्रगट होई. त्यांच्या भाषणांत आवेश असला तरी अपशब्द नसे आणि मर्मज्ञपणा असला तरी कुचाळी नसे. हे जे त्यांचे गुण सभापांडित्यात तेच खाजगी संभाषणातहि दिसून येत. यामुळे नेमस्त पक्षाकडून परदेशी पाठविण्याला जर कोणी एकच मनुष्य योग्य असेल तर ते गोखले असे त्या पक्षाने कायमचे ठरवून टाकले होतें आणि ते सार्वजनिक कार्याला दिवसभर वाहिलेले व पडेल ते काम अंगावर घेण्याला तत्पर असे असल्यामुळे इतर धंदेवाईक वकिल सॉलिसिटर व्यापारी कारखानदार शाळुमुत्सद्दी व पर्यंकपंडित याना त्यांच्यापुढे हारच खावी लागे.

पण इतके गुण असूनहि त्यांच्या ठिकाणी होती तशी उज्ज्वल देशभक्ति, कर्तव्यनिष्ठा व स्वार्थत्यागबुद्धि नसती तर त्या गुणाचे तेज जनतेवर पडले नसते. त्यांच्या प्रतिपक्षाना देखील हे त्यांचे दुहेरी गुण मान्य होते. पक्षाभिमानामुळे टिळकांचे गुण उघडपणे मान्य करण्याला नेमस्त हे खळखळ करीत व त्यांची जीभ किंवा लेखणी होईल तितके अंग चोरी. तोच प्रकार गोखल्यांच्या संबंधाने राष्ट्रीयपक्षाचाहि होत असे. आणि दुर्दैवानें जन्मभर या दोन पक्षांच्या मूर्धाभिषिक्त पुढाऱ्यांचे धावते युद्ध चालू राहिल्यामुळे आणि परस्परानी परस्परांविषयी मर्यादेबाहेर अनादर दाखविल्यामुळे अनुयायांच्या वर्तनात अनादराला अप्रीति व द्वेष यांचेहि स्वरूप आले होते. पुष्कळाना असे वाटे की हे दोन पुढारी एका बाजूला राहून एकच धुरा मानेवर घेऊन काम करतील तर काय बहार होईल! पण अशी अपेक्षा करणे म्हणजे सूर्यचंद्र एकाच वेळी आभाळात राहून सारखेच प्रकाशमान व्हावे अशी अपेक्षा करण्यासारखेच व्यर्थ होते. एका क्षितिजाच्या दोन टोकावर राहूनच त्यानी आपापले काम आपापल्या निम्म्या भागापुरते करावे असाच ईश्वरी संकेत होता. आता ते दोघेहि कालवश झाल्यानेच त्यांची नावे

जनतेच्या मुखात एकत्र नांदू शकतात. त्यांच्यातील वाद दुष्ट स्वप्नाप्रमाणे लोक आनंदानें विसरले. व राजकारणी महाराष्ट्राची स्मृति जोंपर्यंत कायम राहील तोंपर्यंत हे दोन राष्ट्रपुरुष एकदम सारखेच डोळ्यापुढे आल्याशिवाय राहणार नाहीत.

टिळकाप्रमाणे गोखल्यांच्याहि स्वभावात व्यंगे नव्हती असे नाही. ते तापट नसले तरी त्रासिक होते. त्यांचा स्वभाव थोडा हावळा व चिरचिरा होता. वेळ आली असता कोणाला टाकून बोलणार नाहीत किंवा त्याचा पाणउताराहि करणार नाहीत असे नव्हते. टिळकांनी जरी त्यांची निंदा केली तशी त्यानीही टिळकांची करावयाला सोडले नाही. टिळकांची एक प्रकारची तर त्यांची दुसऱ्या प्रकारची. पुण्याच्या दुखवट्याच्या सभेत एका वक्त्याने केलेले त्यांचे वर्णन येथें दिले असतां अप्रस्तुत होणार नाहीं. " ॲरिस्टॉटल याच्या व्याख्येप्रमाणे गोखल्यांनी अवगुण व गुणातिरेक या दोहोमधल्या सुवर्णबिंदुचा बरोबर वेध केला होता. त्यांच्या अंगी धारिष्ट नव्हते पण धैर्य होते. तीव्र मतभेद पात्रता होती पण भांडखोरपणा नव्हता. शब्दांत गोडी किंवा मवाळी होती पण तोंडदेखलेपणा किंवा तोंडपुजेपणा नव्हता. त्यांचा शब्दस्पर्श मृदु पण तत्त्वाला ते कठोर होते. त्यानी हातात मखमलीचे हातमोजे घातलेसे वाटले तरी आंत वळलेली मूठ लोखंडी किंवा पोलादी असे. ते सुविनीत असत पण भिऊन वागत नसत. " ता. २३ फेब्रुवारीच्या केसरीत टिळकानीं अग्रलेख लिहून गोखले यांचे जे गुणवर्णन केलें त्यातील एकदोन उतारे येथें देऊन हें गुणवर्णन संपवू. " एका गरीब ब्राह्मणाच्या मुलानें अभ्यास करून परीक्षा पास झाल्यावर थोड्याच वर्षांत हत्ती घोडे संपत्ति सत्ता किंवा अशी दुसरी बाह्य साधनें जवळ नसता सर्व देशात आपलें नांव आबालवृद्धांचे तोंडी ठेवून जावे हे कांही लहानसान काम नव्हे. गोखल्यांच्या अंगी अनेक गुण होते. पण मुख्य गुण म्हटला म्हणजे निर्लोभ अंतःकरणानें वेळींच देशकार्याला वाहून घेणे हा होय. तरुणपणीं संसार यथास्थित करून मंदावलेल्या कायिम व मानसिक शक्ती इतर कर्तव्याच्या अभावी लोकोपयोगाला वाहणारे पुरुष आढळल्यास त्यांच्याबद्दल विशेषशी आदरबुद्धी मनांत उत्पन्न होत नाहीं. पण इंद्रियशक्ती शाबूद आहेत स्वार्थासाठीं उद्योग करण्यास शरीर समर्थ आहे वार्धक्य अजून दूर आहे आणि संसारांतील सुखाचें स्वरूप अद्याप मनोहर असून तिकडे चित्ताची प्रवृत्ति होणें साहजिक आहे अशावेळीं, आणि विशेषेंकरून या दिशेनें गेले असतां आपणांस यश मिळण्याचा संभव इतरापेक्षां काकणभर अधिक आहे अशी मनास खात्री वाटत असताहि या सर्व मनोहर देखाव्यावरून दृष्टी मागे ओढून यथाशक्ति आपल्यास देशकार्याला वाहून घेणे त्यांत आलेली संकटे सोसण्यास कबूल असणे किंबहुना त्यांतच आनंद मानून त्यासाठीं सतत परिश्रम करण्यास तयार होणे याला एक प्रकारचा बळकट मनोनिग्रह लागतो. आणि तो मनोनिग्रह ज्याने दाखविला व नुसता दाखविला नव्हे तर आमरणांत कायम ठेवला तोच पुरुष धन्य होय. मनुष्य कोणत्या बुद्धीनें प्रवृत्त

होतो हे लक्षांत ठेवूनच प्रत्येकाची किंमत करावी लागते. त्यांचा स्वभाव सौम्य असल्यामुळें हातीं घेतलेले काम सौम्य उपायानीच पार पाडण्याकडे त्यांची प्रवृत्ती असे आणि आमच्यासारख्या कित्येक लोकांस हे सौम्य उपचार अनाठायी आहेत असे वाटे. पण पथ्य आणि उपचार यांच्या तीव्रा तीव्रतेसंबंधाने दोन वैद्यामध्यें जरी मतभेद झाला तरी वैद्य या नात्याने गोपाळरावजींची जी योग्यता होती ती आम्हासहि मान्य आहे."

गोखले वारले त्यावेळी टिळक गीतारहस्य ग्रंथ तयार करण्याकरिता सिंहगडास जाऊन राहिले होते. मृत्यूची वार्ता कळताच मंडळानी त्याना मुद्दाम वाहन पाठवून पुण्यास आणविले. दोनप्रहरी स्मशानयात्रेचा मोठा समारंभ झाला. तेव्हा टिळकानी भाषण करून विद्यार्थ्यास उपदेश केला की "बाबानो गोखल्यांच्या बद्दल नुसती हळहळ वाटून उपयोग नाही. त्यांचे उदाहरण तुमच्या डोळ्यापुढे आहेच व या पिढीच्या विद्यार्थ्यातून गोखल्यासारखा एक तरी निर्माण होऊन त्याची जागा घेईल तर ही हळहळ वाटल्याचा काही उपयोग." टिळकांचा गोखल्याच्यावरील मृत्युलेख आणि स्मशानातील भाषण ही पाहून काही भोळे लोक म्हणू लागले "कायहो? गोखल्यांच्या विषयी जर टिळकांचे मत इतके चांगले होते तर जन्मभर त्याना त्यानी नावे का ठेविली व त्याच्याशी का भाडले?" दुसरे म्हणाले "जन्मभर नावे ठेवली व भांडले तर मृत्युनंतर तरी असे स्तुतिपाठ गाण्याचे काय कारण? वाईट मनुष्य काय मेल्याने चागला होतो?" आणि दुसरे काही म्हणाले "टिळकानी गोखल्यांविषयी मृत्युनंतर जे लिहिले व स्मशानात ते जे बोलले ते मुळी खरे मनचे नव्हतेच." पण चवथाहि एक वर्ग होता व तो म्हणाला "या तिघानाहि काही कळत नाही. मनुष्य तत्त्वाकरिता भाडत असतो. व भांडण हे मतभेदाचे काहीसे विकृत स्वरूप आहे. यत्किंचितही विकार मनात येऊ न देता मतभेद प्रगट करणे ही गोष्ट कोणासहि साधत नाही. टिळक टाकून व स्पष्ट बोलत. गोखले वेगळ्या पद्धतीने बोलणारे होते म्हणून ते फक्त तोंडातल्या तोंडात व तोंड वाईट करून म्हणत 'या टिळकाविषयी जितके कमी बोलावे तितके बरे.' पण व्यक्तिस्वार्थ नसला म्हणजे तत्त्वाकरिता आवेशाने भांडले झगडले म्हणून काय झाले? प्रतिपक्षी मृत्यु पावला तर वैर हे जसे मरणान्त तसेच त्याच्याशी भांडण हेहि मरणान्तच. अर्थात् मरणानंतर त्याच्या गुणावगुणाचा आढावा घेण्याचेच काम उरते. आणि या आढाव्यात अवगुणांपेक्षा गुणांचीच बाकी फार मोठी रहाते म्हणून त्याची योग्य ती स्तुतीहि करावयाची आणि तेव्हा मात्र मागे घ्यावयाचे नाही."

## (६) राष्ट्रीय पक्षाची परिषद

गोखले यांच्या मरणानंतर संयुक्त राष्ट्रीय सभेचा वाद काही दिवस थांबला. परंतु या कामात झालेला बखेडा लक्षात घेऊन त्यावर भर विशेष न देता व त्यावर

अवलंबून न राहता आपल्या पक्षाचे स्वतंत्र कार्य करण्याला प्रारंभ करावा असे टिळकानी ठरविले. व हे स्वतंत्र कार्य चालविल्याने संयुक्त राष्ट्रीय सभा होण्याला मदतच होईल असे त्याना वाटले. समेटाचा प्रयत्न ताबडतोब यशस्वी होण्याचे चिन्ह नव्हते तरी त्यामुळे स्वतंत्र राष्ट्रीय सभा भरविण्याची कल्पना टिळकाना पसंत पडली नाही. आणि पुढे मागे ती गोष्ट अनिर्वाह्य ठरणारच असली तर ती सिद्ध करण्याला आपल्या पक्षाची अधिक संघटना करणे योग्य आहे या दृष्टीने प्रथम आपल्या इलाख्यापुरता प्रयत्न करून पाहण्याकरिता त्यानी राष्ट्रीय पक्षाची प्रांतिक परिषद भरविण्याचे ठरविले. आदल्या वर्षी सातारा येथे टिळक मंडालेस असता अशाच उद्देशाने राष्ट्रीय पक्षाची प्रांतिक परिषद भरविण्याचा प्रयत्न यशस्वी झाला होता साताऱ्यानंतरची सभा नगर येथे भरविण्याचे चितळे व बाळासाहेब देशपांडे यानी कबूल केले होते. साताऱ्यास जशी पाठक व करंदीकर यांची जोडी त्याचप्रमाणे नगरास चितळे व देशपांडे याची जोडी होती. पण मध्यंतरी बाळासाहेब देशपांडे हे मृत्यू पावल्यामुळे सभा नगरास भरविणे शक्य नव्हते. यामुळे ती बेळगावास भरवावी असा प्रथम विचार होता. पण बेळगावास प्लेग झाला. म्हणून सभा पुण्यासच भरवावी असे ठरविण्यात आले. मे ८–९ व १० या तारखा निश्चित करण्यात आल्या. समेटासंबंधाने टिळकांचे मत काय होते हे पूर्वी आलेच आहे. त्यावरून पाहता ते स्वतंत्र राष्ट्रीय सभा भरविण्याच्या विरुद्ध होते आणि समेटाची शक्यता व इष्टता राष्ट्रीय पक्षातील काही प्रमुख गृहस्थाना अजून पटत नव्हती तरी टिळकाना मात्र ती पूर्णपणे पटली होती. याचे प्रत्यंतर हेच की टिळकांच्या संमतीने परिषदेच्या चिटणिसानी जे जाहीरपत्रक काढले त्यात सातारा सभेच्या तत्त्वावरच पुण्याचीहि परिषद भरविण्यात येणार असे लिहिले होते.ते तत्व असे की कॉंग्रेसच्या प्रतिज्ञापत्रिकेवर जरी कोणी प्रत्यक्ष सही केली नसली तरी परिषदेस येणाऱ्या प्रतिनिधीना ते प्रतिज्ञापत्रक मान्य आहे असेच समजून चालण्यात येईल. “ हे कलम ज्याना मान्य असेल तेच परिषदेचे प्रतिनिधी होऊ शकतील इतर होऊ शकणार नाहीत. ” या जाहीरपत्रकात असेहि लिहिले होते की साताऱ्याप्रमाणे येथेहि अधिकारी मंडळी परिषदेशी सहानुभूति दाखवून तिचे काम पार पाडण्यास मदत करतील अशी आशा आहे. यावरून टिळक सरकारावर बहिष्कार घालणार आहेत किंवा घालणारे आहेत अशा समजुतीवर मद्रासच्या कॉंग्रेसमध्ये नेमस्तांकडून समेटाला विरोध करण्यात आला होता तो वाद व ती समजूत किती व्यर्थ होती हे अप्रत्यक्ष रीतीने सिद्ध झाले.

ता. २० एप्रिल रोजीं ‘सार्वजनिक सभे’त जाहीर सभा भरून परिषदेचे स्वागतमंडळ बनविण्यात आले. स्वागतमंडळाचे अध्यक्ष आण्णासाहेब पटवर्धन हे नेमले गेले. शेवटी “लोकमतानुसार डेलिगेट निवडणे ही पूर्वपरंपरा असून पुढेहि ते चालावे इतकाच प्रयत्न आहे व ही मागणी मान्य झाली असतां आम्ही कॉंग्रेसची सर्व घटना मान्य करू व कॉंग्रेसला जाऊ” असे टिळकानी सांगून महाराष्ट्रा-

तील लोकाना परिषदेला येण्याची विनंति केली. पुण्यास परिषद भरणार ही गोष्ट जात्याच उत्साहवर्धक होती. शिवाय टिळक कारागृहातून सुटून आल्यामुळे त्यांच्या भेटीचा समक्ष लाभ घ्यावा अशी पुष्कळाना सहजच इच्छा. राष्ट्रीय पक्षाने पुनः काम हाती घेतले. त्या कामाला मार्गदर्शक होणारे टिळक स्वतः हजर. आणि उपक्रम राष्ट्रीय पक्षाकडून असला तरी उद्देश काँग्रेसमध्ये समेट घडवून आणण्याचाच आहे. या अनेक गोष्टीमुळे परिषद यशस्वी होणार अशी सर्वांना आशा वाटू लागली व ती पुढे सफलहि झाली. परिषदेचे अध्यक्ष म्हणून बॅ. बॅपटिस्टा यांची निवडणूक केली व ती त्यानी मान्य केली. याच सुमारास प्रिव्ही कौन्सिलमध्ये ताई महाराजांच्या खटल्याचा निकाल अखेर टिळकाना अनुकूल असा झाला ही बातमी आल्यामुळे उत्साहाच्या दुधात आनंदाची साखर पडली. पुणे शहरात व लष्करात जाहीर सभा भरून प्रतिनिधींची निवड करण्यात आली. इतर ठिकाणीहि अशाच सभा भरून निवडणुकी होऊ लागल्या. परिषद ता. ८ रोजी सकाळी किर्लोस्कर नाटकगृहांत सुरू झाली. स्वागताध्यक्ष अण्णासाहेब पटवर्धन यांचे भाषण झाल्यावर बॅ. बॅपटिस्टा यांची निवडणूक होऊन त्यानी मोठे वक्तृत्वपूर्ण भाषण केले. प्रारंभी सहजच त्यानी टिळक सुटून आल्याचा उल्लेख केला. ते म्हणाले "पूर्वी ग्रीस वगैरे देशात राजकीय पुढाऱ्याना हद्दपारी घडे. पण देशावर एखादे संकट आले म्हणजे त्यानाच परत बोलावून त्यांच्या पुढारीपणाने संकटांचा परिहार करून घेत. आज स्वराज्यविहीन हिंदुस्थानाला तर कायमचे संकट आहे. पण युद्धामुळे सरकारावरहि संकट आले आहे. अशा वेळी टिळकांसारखे पुढारी बंधमुक्त होऊन आले हा सर्वांनाच लाभ होय." नंतर त्यानी ताई महाराज प्रकरणी हायकोर्टातील चंदावरकर यांच्या निकालावर टीका करून टिळकाना शीलभ्रष्ट करण्यासारखे आरोप आणले गेले ते प्रिव्ही कौन्सिलने धुऊन टाकले याबद्दल टिळकांचे अभिनंदन केले. नंतर महायुद्धाचा उल्लेख करून याप्रसंगी विलायतेत चळवळ करावी स्वराज्याची एखादी योजना बनवावी आणि होमरूलच्या नावाने मागणी करावी असे त्यानी सुचविले. समेटासंबंधाने ते असे म्हणाले की, "मवाळजहाल हा भेद आपण विसरला पाहिजे. सर्वच आपापल्या परी नॅशनॅलिस्ट म्हणजे देशाभिमानी आहेत. मवाळ म्हटला की तो गवळ्याच्या दुधाप्रमाणे बेचव आणि जहाल म्हटला म्हणजे हातात कोलीत घेऊन नाचणारा अत्याचारी असतो ही समजूत टाकून द्यावी." परिषदेत पहिला ठराव महायुद्धासंबंधाचा होता. त्यात दोस्तराष्ट्राना यश चिंतिले होते. हा ठराव टिळकानी मांडला. ते म्हणाले युद्धातील उभय पक्ष ईश्वर हा या कामी आपल्या बाजूचा आहे असे म्हणून त्याला आपणाकडे खेचीत असल्यामुळे कोणीकडे जावे याविषयी ईश्वरालाहि अडचण पडली असेल. पण कोणतेहि राष्ट्र कितीहि लहान असले तरी त्याच्या स्वातंत्र्याचे रक्षण व्हावे असे जो म्हणत असेल तोच खरा सत्पक्ष व तिकडेच ईश्वर जाईल. म्हणून

स्वार्थाच्या दृष्टीनेहि इंग्रजांचा जय होणे आम्हाला श्रेयस्कर. कारण त्यांच्यापासूनच स्वराज्य मिळण्याची आम्हाला आशा."

गोखले याच्या मृत्यूसंबंधाचा दुसरा ठरावहि टिळकानीच माडला. ते म्हणाले 'गोखले यांच्यासारख्या तरुण मनुष्याच्या मृत्यूसंबंधी दुखवट्याचा ठराव माडण्याचे काम माझ्यासारख्या त्याच्याहून वडील माणसाकडे यावे याचे वाईट वाटते.' याचा उघडच अर्थ असा की मी आधी व नंतर गोखले मृत्यू पावणे योग्य होते. या एका वाक्यावरूनच गोखलेटिळकांच्या गोवऱ्या नदीवर गेल्या आहेत या गोखल्यांच्या मृत्यूपूर्वी लिहिलेल्या टिळकांच्या वाक्याचा अर्थ खरोखर कसा घ्यावयाचा हे कळून येण्यासारखे आहे ही गोष्ट जाता जाता सांगितली पाहिजे. 'मी सर्व बहिष्कारवादी नाही कारण माझे लोक स्थानिक स्वराज्यात व कायदेकौन्सिलात काम करीत असून त्याला माझी संमति आहे.' हे जे वाक्य टिळकानी बेझन्ट बाईना तारेने समेटाच्या वादात कळविले त्याचे स्वारस्य व्यक्त करणारा असाहि एक ठराव या सभेत झाला. केळकर हे मुंबई कौन्सिलच्या निवडणुकीस पूर्वी उभे राहिले असता मुंबई सरकाराने त्यांची उमेदवारी निष्कारण रद्द केली तरी त्या गोष्टीचा निषेध करून मुंबई सरकारने केळकरांवर मारलेला अपात्रतेचा शिक्का काढून टाकावा असा तो ठराव होता. टिळक हे जर खरोखरी सरकारावर बहिष्कार घालणारे असते तर असा ठराव या राष्ट्रीय पक्षाच्या परिषदेत कोणी सुचविला नसता हे उघड आहे. शेवटी पुढील परिषद बेळगावास भरावी अशा विषयी बेळवी यानी निमंत्रण दिले. अशा रीतीने ही परिषद उत्तमरीतीने पार पडली. स्वागतसभेचे सभासद ४०० झाले होते. ९६० प्रतिनिधी आले फी भरून तिकीट काढून एक हजार प्रेक्षक आले. यावरून परिषद भरविण्याच्या या उपक्रमाला लोकांची किती मदत होती हे सहजच दिसून येईल. १९०९ ते १९१४ सालापर्यंत भरलेल्या कोणत्याही नेमस्त कांग्रेसला इतका समाज नसेल! परिषदेच्या या यशाचा परिणाम इतर प्रांतांतील राष्ट्रीय पक्षावर तर झालाच पण नेमस्तांवरहि झाला. कन्व्हेन्शनच्या शिक्क्याशिवाय प्रांतिक परिषदेचे नाणे खरे ठरणार नाही या समजुतीने मुंबई प्रा. कां कमिटीने आपली टांकसाळ बंद ठेविली तरी जनतेचे अडत नाही ही गोष्ट सिद्ध झाली. आणि राष्ट्रीय पक्षाला कांग्रेसमध्ये येण्याला घटनेत काही तरी अधिक सोयी तुम्ही कराव्या हेच आता अपरिहार्य होय अशीहि गर्भित सूचना पुण्याच्या परिषदेच्या यशात होती. इतकेच नव्हे तर समेटाचा पुढेहि प्रयत्न व्हावा याकरिता परिषदेत टिळक बॅपटिस्टा व बेळवी यांची एक कमीटीहि नेमण्यात आली. टिळकानी केसरीत लिहिले की 'प्रांतिक सभा राष्ट्रीय सभेपासून भिन्न राहू इच्छिते असे आता कोणी अनुमान करील तर ते चुकीचे आहे.'

राष्ट्रीय पक्षाच्या परिषदेशी स्पर्धा करावी म्हणून नेमस्तानीहि आपली परिषद भरविण्याचे ठरविले. पण कन्व्हेन्शनवाले व राष्ट्रीय पक्षाचे लोक यांचे प्रमाण बहुधा प्रत्येक ठिकाणी किती असते हे नेमस्ताना बेळगाव शहरात लवकरच दिसून

आले. तेथील डि. कॉं. कमिटीने एका वकिलाच दिवाणखान्यात बेळगाव शह-रच्या नागरिकांची जाहीर सभा भरविण्याचे ठरवून 'तुमची छाती असेल तर या जाहीर सभेस या ' असे राष्ट्रीय पक्षाला आव्हान केले. लोकाना ही थट्टा वाटली तरी सहज म्हणून शेदीडशे लोक सभेस गेले. ७६ कन्व्हेन्शनवाले अवघे ८।९ होते. अर्थात् अध्यक्षाच्या निवडणुकीपासूनच विरोधाला सुरवात झाली. शेवटी छत्रे वकील यानी कबूल केले की 'जाहीर सभा बोलाविली ही आमची चूक झाली. ज्याना कन्व्हेन्शनची घटना मान्य असेल त्यान च हे आमंत्रण द्याव-यास पाहिजे होते.' शेवटी हा सर्व मजकूर सभेच्या वृत्तांतात लिहून ठेवून वाचून दाखविला तेव्हा बाकीचे सर्व लोक उठून गेले व कन्व्हेन्शनवाले तेवढे शिल्लक राहिले. त्यानी भरविलेली ही सभा पुण्यास जी नेमस्ताची प्रतिस्पर्धी प्रां. परिषद लवकरच भरणार होती तिला डेलिगेट निवडण्याकरिता होती. ही परिषद ता. १० जुलै रोजी पुण्यास भरली व ११ व्या तारखेला समाप्त झाली. या प्रां. सभेबद्दल नेमस्तांकडून २–३ महिने खटपट चालू होती. सभेस गव्हर्नरसाहेब त्यांची पत्नी व कौन्सिलर्स हे काही वेळ आले होते. या सभेला प्रेक्षकसमुदाय फार थोडा होता. प्रतिनिधीहि थोडे होते. स्वागतकमिटीच्या अध्यक्षानी अखेर म्हटले की 'आमचा पक्ष अल्पसंख्याक असला तरी महत्वाचा आहे.' या परिषदेला नेमस्तानी १५ वी असे नाव दिले. पण नव्या घटनेखालची ती पहिलीच प्रांतिक सभा होती. पुण्यांत झालेल्या या दोन परिषदामुळे समेट आता होत नाही असे लोक सहजच बोलू लागले. या नेमस्तांच्या परिषदेत राजकीय टीकेचे विषय फारच थोडे घेतले गेले. शिवाय राष्ट्रीयांच्या सभेला निमंत्रण पाठविले असता कलेक्टर साहेब आले नाहीत व दुसऱ्या सभेला स्वतः गव्हर्नरसाहेब आले यावरूनहि लोकानी काय अनुमान बांधावयाचे ते बांधले.

## ( ७ ) होमरुल लीगची स्थापना

पुण्याच्या परिषदेंत बॅ. बॅपटिस्टा यानी होमरूल हे आपले ध्येय करून त्याची मागणी करावी असे म्हटले होते व त्याकरिता एक वेगळा संघ आपण स्थापावा असे त्यांचे व टिळक यांचे बोलणे त्यापूर्वीच सुरू होते. कॉंग्रेसचा वाद सुरू असो वा नसो संयुक्त राष्ट्रीय सभा होवो वा न होवो. पण राष्ट्रीय पक्षाला संघटनात्मक असे चळवळीचे जे काहीतरी एक साधन असावे ते केवळ प्रांतिक नसावे आणि स्वराज्याची मागणी हाच त्याचा उद्देश असावा अशा सूचना होत्या. पूर्वी सुबाराव यांच्या बरोबर १९१४ साली मद्रासच्या कॉंग्रेसपूर्वी पुण्यास टिळकांचे जे संभाषण झाले त्यात 'आम्ही जरूर तर आमचा एखादा लीग काढू व होमरूलची मागणी करीत राहू आणि एखादे स्वराज्यविषयक बिल पार्लमेंट-मध्ये आणवू' असे टिळक म्हणाले होते हे पूर्वी आलेच आहे. तात्पर्य लीगचा हा विचार आज ८–१० महिने सुरू होता. तथापि लीग प्रत्यक्ष काढला गेला नव्हता.

होमरूल आणि साम्राज्यांतर्गत स्वराज्य यांत वस्तुतः फारसा भेद नाही. पण होमरूल हा शब्द सुटसुटीत असून तो उच्चारल्याबरोबर आयर्लंडचा इतिहास माहीत असणाराना तिकडे झालेल्या एका मोठ्या चळवळीची आठवण होते व त्याच्या कायदेशीरपणासंबंधाने शंका उरत नाही म्हणून 'होमरूल' या नावाने स्वराज्याची चळवळ करावी अशी कल्पना होती. पण बेझन्टबाईंनी त्यांच्या प्रवृत्तिपर स्वभावाप्रमाणे आणि एकतंत्रीपणामुळे मनात येताच ती गोष्ट करूनहि टाकली! व ता. २५ सप्टेंबर १९१५ च्या न्यू इंडिया पत्रात बाईंनी आपल्या स्वराज्यसंघाची उद्देशपत्रिका प्रसिद्ध केली. त्यात असे लिहिले होते की "आमचा हा लीग राष्ट्रीय सभा कॉ. कमिटी या संस्थाना पुरवणीदाखल असून लीगचा हेतू कॉंग्रेसच्या प्रतिज्ञापत्रकाला धरून लोकाना राजकीय शिक्षण देणे हा आहे. याच्या शाखा हिंदुस्थानात व इंग्लन्डात देखील काढल्या जातील. १९०६ साली दादाभाई नौरोजी यानी हिंदुस्थानाकरिता स्वराज्याची मागणी केली व त्यानीच या लीगचे अध्यक्षस्थान स्वीकारण्याचे कबूल केले आहे आहे. शिवाय हिंदुस्थानातील शाखेचे अध्यक्ष सर सुब्रह्मण्यम् अय्यर व विलायतेतील शाखेचे अध्यक्ष सर वुइलियम वेडरबर्न असे अध्यक्षहि आम्हास लाभले आहेत. या लीगने कॉंग्रेसला कोणत्याहि तऱ्हेने बाध येणार नाही. असा लीग स्थापण्याची गरज युद्ध संपून गेल्यापेक्षा ते चालू आहे तोंवरच अधिक आहे."

अशा रीतीने बाईंनी होमरूल लीग काढून अघाडी मारली इतकेच नव्हे तर कॉंग्रेसचे दोन जुने अध्यक्ष काबीज केले. यामुळे लीग आणि कॉंग्रेस यांचा विरोध नाही ही गोष्ट सहजच सिद्ध झाली. पण उद्देशपत्रिकेतील भाषेवरून बाईंनीहि हिंदुस्थानातील कॉंग्रेसच्या आणि विलायतेतील ब्रि. कमिटीच्या कार्यपद्धतीवर शिंतोडा कसा न कळत उडविला होता हे दिसून येईलच. आणि असा शिंतोडा न उडवून भागेल तरी किती दिवस? नेमस्तानी राष्ट्रीय सभेचे नाव ताब्यात ठेवून इतर बऱ्याच पक्षाना बाहेर ठेवले पण स्वतः मात्र लोकशिक्षणाचे काम सहा वर्षात काहीच केले नाही. टिळकांप्रमाणे बाईहि स्पष्ट बोलत आणि नेमस्त पक्ष काही काम करीत नाही ही गोष्ट त्यानाहि मान्य होती.

टिळकानी केसरीतून बाईच्या या नव्या संघाच्या कल्पनेला पाठिंबा दिला. सरकार जसे अमुक इतक्या शतकात स्वराज्य देऊं असे निश्चित सांगत नाही त्याचप्रमाणे आम्हीहि अमुक इतक्या काळाच्या आधी स्वराज्य मागणार नाही असाहि कोठें करार केलेला नाही. अर्थात् ते किती लवकर मागावे एवढाच नेमस्त व जहाल यांच्यात फरक राहणार. पण एवढ्याकरिता स्वराज्य काही वेळ आधी मागणाऱ्या राष्ट्रीयाना जहाल हे मुत्सद्देगिरीस पारखे झालेले किंवा देशाचे अनहित करण्याला उठलेले असे म्हणणे बरोबर होणार नाही. दादाभाईंनी मद्रासच्या होमरूल लीगचे अध्यक्षस्थान स्वीकारले ही बातमी वाचताच मद्रासच्या व मुंबईच्या नेमस्ताना विषाद वाटला व ते त्याना निवृत्त करण्याच्या खटपटीला

लागले. त्यामुळे ता. २७ सप्टेंबरच्या क्रॉनिकलमध्ये दादाभाई यानी पत्र पाठवून असे कळविले की 'मी लीगचा अध्यक्ष होण्याचे कबूल केले असे प्रसिद्ध झाले आहे ते काही गैरसमजाने झाले असावे.' त्यावर बाईनी दादाभाईना तार करून त्याच्या व आपल्या दरम्यान जे संभाषण झाले त्याची त्याना आठवण दिली. तेव्हां दादाभाईनी न्यू इंडियाचा अंक वाचून फिरून क्रॉनिकलला पत्र लिहून कळविले की 'कांही शर्तीवर मी लीगचा अध्यक्ष होण्याचे कबूल केले ही गोष्ट खरी आहे.' अशा रीतीने बाईवरील आक्षेप उडून तो स्वतः दादाभाईवर आला. पण दादाभाईनी योग्य ती दुरुस्ती केली होती यामुळे त्यांच्याकडून क्रॉनिकलला पत्र लिहविणारांनी कांही तरी मध्येच गडबडगुंडा केला असावा हे अनुमान सहजच सिद्ध झाले. आणि नेमस्त लोक सभेटाचा बिघाड करणार त्याप्रमाणे लीगच्या चळवळीलाहि विरोध करणार असे दिसून आले. नेमस्तांनी टिळकांवरचे शस्त्र आतां बाईवर धरले. कांही दिवसापूर्वी थिऑसफीच्या कारभारासंबंधी एक जाहीर वाद उपस्थित झाला होता. त्याचा उल्लेख करून 'बाई महत्त्वाकांक्षी आहेत चंचलबुद्धीच्या आहेत मनांत येईल ते एकदम करतात' असे अवांतर गैर-लागू आक्षेप घेण्यास त्यानी सुरवात केली. तसेच मुंबईच्या गुजराथी पत्राने असा प्रश्न उपस्थित केला की कॉंग्रेस व होमरूल लीग यांचे संबंध वेळीच न ठरविले तर पुढे घोटाळा होईल. ही सगळी दिशाभूल होती. पण सर्वच प्रांतांतील नेमस्तांना हे प्रश्न सुचले नाहींत. बाई कलकत्त्यास गेल्या तेव्हां त्यांनी 'होमरूल लीग' या विषयावरच भूपेंद्र बाबू यांच्या अध्यक्षतेखाली व्याख्यान दिले. अलाहाबादचा 'लीडर' 'अभ्युदय' लखनौचा 'ॲडव्होकेट' नागपूरचा 'हितवाद' इत्यादि नेमस्त पत्रानीहि होमरूल लीगच्या तत्त्वांचे समर्थन केले. बाई कलकत्त्याहून परत येतांना मुंबईस उतरल्या तेव्हां त्यानी असे सांगितले कीं एका मुंबई शहराखेरीज बाकीच्या ठिकाणी हा वाद फारसा नाही. शिवाय त्यानीं मुंबईस दादाभाईना समक्ष भेटून दादाभाईची अध्यक्षपदाला पुनः संमति मिळविली. मद्रास कॉंग्रेस कमिटीने तर लीग संबंधाने कांही सूचनाहि केल्या आणि मध्यप्रांतांतील नेमस्तांनी तुमच्या लीगला आमची कांही हरकत नाहीं असें सांगितले.

यानंतर राष्ट्रीय सभेच्या संघटनाला आणखी एका दिशेने मदत झाली. १९१५ सालची कॉंग्रेस मुंबईस सत्यप्रसन्न सिंह यांच्या अध्यक्षतेखाली भरण्याचे ठरले होते. त्यावेळी मस्लिमलीगची सभाहि मुंबईस भरवावी अशी कल्पना निघाली. पूर्वी एकदा ही सभा कॉंग्रेसच्याच वेळी अलाहाबाद येथें भरली होती. पण सामान्यतः कॉंग्रेसचा मुक्काम चुकवून दुसऱ्या ठिकाणी ती भरवावी असे मुसलमानाचे धोरण असे. मस्लिम लीगमध्यें असलेले बॅ० जीनासारखे काही चांगल्या अर्थाचे उभयान्वयी लोक मुसलमान संघाला कॉंग्रेसच्या जवळ जवळ आणू पाहात होते. आणि दोन्ही सभांचे राजकीय धोरण जवळ जवळ एक असल्यामुळें हा द्विधाभाव टाकून द्यावा असे त्यातील सुज्ञ पुढाऱ्याना वाटणे स्वाभाविक होते. याचवेळी

सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटीचे अध्यक्ष ना. शास्त्री यानी कोइमतूर येतील एका व्याख्यानात सागितले की हिंदी लोक स्वराज्याला अपात्र आहेत असा भ्रम आपल्यातीलच काही लोक माजवितात. अर्थात् हा टोला प्रतिनिविष्ट नेमस्ताना होता. सर कृष्ण गोविंद गुप्त व सर विलियम वेडरबर्न यानीहि याच वेळी उभयताच्या सहीनें एक लेख प्रसिद्ध करून युद्धानंतर काय सुधारणा मागाव्या या विषयी सूचना केल्या होत्या. अशा रीतीनें मुंबईकर नेमस्ताच्या भोंवती हळुहळु चौफेर वेढा पडत चालला. यामुळे मुंबईस भरणाऱ्या कॉंग्रेसचा रंग कसा काय खुलतो हें पाहण्याकडे सर्वांचे डोळे लागले.

## सर फेरोजशहा मेथा

पण या सुमारास त्या सभेवर एक संकट आलें तें म्हणजे सर फेरोजशहा मेथा यांचा मृत्यु हे होय. सर फेरोजशाहा यांचे थोडक्यात वर्णन करावयाचे तर आम्ही असें म्हणूं कीं त्यांच्या इतका दणदणीत पुढारी मुंबई शहराला आजवर लाभला नव्हता. त्यांचें वय मरणसमयीं सुमारे सत्तर वर्षांचे होतें. पण त्यापूर्वी सतत चाळीस पंचेचाळीस वर्षे त्यानी देशसेवा केली होती. त्यांचा जन्म १८४५ सालीं झाला. मेथा यानी विद्यार्थीदशेंत दाखविलेली बुद्धिमत्ता पाहून सर अलेक्झांडर ग्रँट हे त्यांच्यावर खुष झाले आणि त्यानी याना विलायतेस जाण्याला मदत केली. १८६८सालीं मेथा हे बॅरिस्टर होऊन परत आले. विलायतेत असताच त्यानी काही निबंध लिहून काही व्याख्याने देऊन आपल्या कामगिरीला सुरवात केली होती व तेंच काम त्यानी इकडेहि सुरू केलें. प्रारंभीच काही खटल्यात त्याना चांगले यश आल्यामुळे बॅरिस्टर म्हणून त्यांची चांगली प्रसिद्धी झाली आणि कोल्हापूर प्रकरणात आगरकर व टिळक यांच्यातर्फे त्यानाच वकीलपत्र देण्यात आले होते. वकिलीच्या धंद्यात पुढे त्याना गुजराथ काठेवाडमधील संस्थानिकांचा आश्रय लाभला आणि पैसेहि भरपूर मिळू लागले. यामुळे आणि जात्या थोडेसे आळशी असल्यामुळे हळू हळू ते मिजाशी बनले. पण काही नियमित वेळ सार्वजनिक कार्याकडे देण्याची पद्धति त्यानी चालू ठेवल्यामुळे ते केव्हाहि पुढारीपणात मागे पडले नाहीत. लॉर्ड रिपन यांच्या कारकीर्दीत स्थानिक स्वराज्याची प्रगति झाली तेव्हा बदरुद्दिन तय्यबजी व तेलंग यांच्याबरोबर त्या प्रगतीचो लाट उचलून धरण्याला त्यानी बरीच खटपट केली. पण ही नुसती वरची खटपट नसून मेथा याना स्थानिक स्वराज्याची खरी आवड होती यामुळे ते मुंबई म्युनिसिपालिटीत लवकरच शिरले आणि तेथील धुरीणत्व त्यानी आजन्म आपणाकडे टिकविले. नावाचा अध्यक्ष कोणीहि असो पण केव्हा विरोधी चळवळीची तर केव्हा अधिकाऱ्यानी उपस्थित केलेल्या योजनेची सूत्रे त्यांच्या हाती येत असत. शिवाय त्यांच्या अंगी एककल्लीपणा नसल्याने त्यांचे सहाय्य आपणास मिळावे असे सर्व पक्षाना वाटे आणि ते तारतम्य पाहून तें सहाय्य देतहि. १९०६ साली म्युनिसिपालिटीतील काही सभासदानी त्यांच्या वतनदारीविरुद्ध मोठा

गवगवा केला पण त्यांत मेथा हेच यशस्वी झाले. कायदेकौन्सिलात मुंबई म्युनिसिपालिटीला एक प्रतिनिधि निवडण्याचा हक्क मिळाला तेव्हापासून अनेक वर्षे त्या जागेवर त्यांच्याशिवाय दुसऱ्या कोणाची निवड झाली नाही. पण हे वर्चस्व मिळण्याला त्यांचा एक गुण विशेष कारणीभूत झाला तो हा की, कॉरपोरेशनमधील सभाना नियमितपणे हजर राहून काम करण्याविषयी त्यानी दक्षता ठेवली. आणि या सभांच्या दिवशी लाभदायक अशी वकीलपत्रे आली तरी ती ते नाकारीत व आठवड्यातील हे दिवस रोजनिशीत प्रायः मोकळे राखून ठेवीत. वरिष्ठ कायदेकौन्सिलात निवडणुकीचा अधिकार मिळाला तेव्हा प्रथम त्यांचीच निवडणूक झाली. आणि पुढेहि अनेक वर्षे ते निवडले जात. पण गोपाळराव गोखले याना पुढे करून त्यानी तरुण पिढीविषयी गुणग्राहकता दाखविली. कायदे कौन्सिलात लोकपक्षाला बहुमत नसल्याकारणाने मेथा सारख्यानाही टीका करण्यावरच आपले कर्तव्य व हौस भागवून घ्यावी लागे. पण ही टीका करण्यात त्यानी जो बाणेदारपणा व धीटपणा दाखविला तो वाखाणण्यासारखा होता. सरकारी सेक्रेटरी, मेंबर वगैरे लोक त्यांचे टीकेला नेहमी भीत असत. कारण ते कोणावर तुटून पडले म्हणजे त्याची काही बाकी ठेवीत नसत. राजकारणात तात्त्विकदृष्ट्या ते नेमस्त असत पण स्वाभिमानाची गोष्ट आली म्हणजे ते जहालाहून जहाल होत. वरिष्ठातल्या वरिष्ठ युरोपियनाना ते बरोबरीच्या नात्याने वागवीत आणि वेळ पडली असता त्याना ते तोडून टाकीत. त्यांच्या तात्त्विक नेमस्तपणावरून अधिकाऱ्याना असे वाटे की स्वराज्य पक्ष व नवीन मताचे लोक यांचेविरुद्ध मोहीम करण्याला मेथा हे आपणास मदत करतील. आणि त्यानी ही मोहीम केली ही गोष्टहि खोटी नाही. पण ‘मला वाटेल ते मी करीन, माझ्या लोकाना मी बोलेन परंतु या कामात तुमचे माझे संगनमत होणे शक्य नाही, किती केले तरी ते लोक माझे आहेत आणि तुम्ही लोक तरी काय मोठे गुणवान आहात’ ! असे ते अधिकाऱ्याना बजावीत. या त्यांच्या वृत्तीमुळे लॉर्ड सिडनहॅमचा व त्यांचा उघड बेबनाव झाला होता. मुंबई युनिव्हर्सिटी मध्येहि त्यानी बरेच काम केले. आणि सरकारने तेलंग चंदावरकर भांडारकर यांच्याप्रमाणे त्याना जरी कधी व्हाईस चॅन्सेलरची जागा दिली नाही तरी म्युनिसिपालिटी प्रमाणे युनिव्हर्सिटीतहि ते पुढारी म्हणूनच गाजत असत. तेथेहि अधिकाऱ्यांचा व त्याचा खटका उडे. राष्ट्रीय सभेचे ते प्रारंभीच्या वर्षातच अध्यक्ष होऊन गेले. आणि सुमारे वीस बावीस वर्षे कांग्रेसची सूत्रे मुंबईस त्यांच्याकडूनच हलविली जात. इतर प्रांतात त्यांच्या बरोबरीचे पुढारी प्रायः नव्हते व जे होते तेहि त्याना दबून वागत. मुंबई शहराची अघाडी राजकारणात ठेवण्याचे पुष्कळसे श्रेय मेथा यांच्याकडेच आहे. गोखले याना ते एखाद्या शिष्याप्रमाणे किंवा मुलाप्रमाणे वागवीत. पण राजकीय विषयाच्या अभ्यासात परिश्रमात आणि विशेषतः स्वार्थत्यागात त्यांची मजल आपल्यापुढे पुष्कळच आहे हे ते ओळखून

असत आणि त्याबद्दल गोखल्याना ते बहुमानहि देत. टिळक हे गोखल्यांच्यापेक्षा वडील असले तरी मेथांपेक्षा बारावर्षांनी लहान यामुळे त्यानाहि मेथा हे तरुण-पिढीच्या माणसाप्रमाणे वागवीत. मेथांचे व टिळकांचे केव्हाहि फारसे बनले नाही याचे कारण त्या उभयतांचा संबंध म्हणजे लोखंड गारगोटीच्या संयोगासारखा असे. दोघेहि टणक मानी हट्टी. तथापि प्रतिपक्षातील झाले तरी टिळकांची योग्यता ते जाणून होते. राष्ट्रीय सभेत ते हळूहळू मागे पडण्याचे खरे कारण असे की टिळकांचीच काय पण गोखल्यांचीहि झडप पुढे पुढे त्याना झेपेनाशी झाली. वर्षातून एकवेळ जमून राजकारणाचा आढावा घ्यावा समालोचन करावे ही त्यांची राष्ट्रीय सभेची कल्पना गोखले यानाहि मान्य नव्हती. तसेच गोखले यानी राजकारणाचा मार्ग म्हणून घालून दिलेले स्वार्थत्यागाचे उदाहरण त्यांच्या बुद्धीला पटत नसे. पण तात्त्विक राजकीय मतांपेक्षाहि सामान्य लोकाना मेथा अप्रिय होण्याचे खरे कारण म्हटले म्हणजे सामान्य जनतेपासून नेहमी तुटक व अलिप्त राहणे हा त्यांचा अवगुण होय. आधी मुंबई शहरात बारमास वस्ती. सुट्टी मिळाली की थंड हवेत राहण्यास नित्य जात. यामुळे त्याना भेटणे हे देखील सामान्य मनुष्याला मोठे मुष्किलीचे होई. आणि त्यातूनहि त्यांचा दरारा विशेष यामुळे त्यांची भेट घेणे म्हणजे आधी डोंगर तुडवीत जावा आणि शेवटी वाघाची गाट पडावी असे होई! आपल्या वकिलीच्या खोलीत रोज तासभर संध्याकाळी बसून त्या वेळात आपली हस्तक मंडळी बरोबर घेऊन त्याना सल्लामसलत द्यावी त्याना कामाला पिटाळावे व आपल्या आज्ञा त्यांच्या उद्योगाने अंमलात आणाव्या याशिवाय अधिक घासाघीस त्याना सोसत नसे. पण अशा रीतीने राजकारण व्हावे तसे सिद्ध होत नाही. पुढे पुढे तर त्यानी राष्ट्रीय सभेला जाण्याचेच टाकून दिले आणि एखाद्या बिकट प्रसंगी हजर राहण्याविषयी गळ घालून जेव्हा त्यांची आराधना करावी तेव्हा ते हजर राहावयाचे. त्यांची व्यवस्था ठेवणे हा कोठल्याहि स्वागतमंडळाला एक मोठा पेचच असे. पण पुढारी होण्याला जी बुद्धिमत्ता लागते ती असून शिवाय जे काही बाह्यस्वरूपाचे गुण लागतात तेहि त्यांच्या ठिकाणी होते. पाहताच रुबाबदार दिसणारा मनुष्य त्यांच्यासारखा हजार पाचशेतहि मिळणार नाही. एकाच राजकीय मताचे असताहि गोखले हे जितके सौम्य वाटत तितकेच मेथा हे उग्र वाटत. त्यांची उंची, विशाल भालप्रदेश, उन्नत नासिका, भरदार मिशा, ऐटदार कल्ले उंची पोषाखाची ढब उठण्याबसण्याबोलण्यातला ताठरपणा भाषेतील जोर ठासून बोलण्याची ऐट आणि या सर्वांना शोभणारा एखाद्या खोल दरीतून झालेल्या भुभुःकारासारखा आवाज या सर्वांची छाप स्वकीय परकीय कोणावरहि पडे. थोडक्यात थट्टा करून प्रतिपक्षाला पातळ करून टाकण्याची विद्याहि त्यांच्याजवळ असे. येवढेच काय पण प्रसंगविशेषी मिस्किलपणाने कोणाकडे डोळे मिचकावून कोणाला शाबासकीने मोठेपणा देऊन कोणाला तात्पुरती ममता दाखवून जवळ बोलावून अशा रीतीनेहि ते आपले कार्य साधीत. त्याना पाहणाऱ्या प्रत्येकाला हा

'पुरुषसिंह' आहे असेच त्यांचे वर्णन करावेसे वाटे. पण वरचे पुष्कळसे गुण असूनहि ते लोकाना अप्रिय होण्याला कारण त्यांचा मानी स्वभाव. जो त्यांचा गुण साहेब लोकाशी वागताना परिणामकारक होई तोच स्वकीयाशी वागताना अप्रीति उत्पन्न करी. टिळकानी त्यांच्यासंबंधाने असे म्हटले आहे की त्यांचा हा बेसुमार आढ्यताखोर ताठरपणा व मानधन स्वभाव यांचा अतिरेक होत असला तरी या गोष्टी आम्हा लोकांच्या स्वभावात इतक्या कमी आहेत कीं त्यांच्या अवगुणाची गणना कदाचित् गुणातहि करावी लागेल. मुंबईतील 'पंच' हा त्यांचे चित्र काढताना नेहमी सिंहाची आयाळ लावून काढी. आणि लिओ म्हणजे सिंह आणि फेरोजशाहा मेथा हे शब्द जवळ जवळ समानार्थक ठरले होते.

## (९) मुंबईची राष्ट्रीयसभा

मुंबईस भरणाऱ्या सभेच्या तोंडीच फेरोजशाहा वारले ही मुंबईकरांची मोठीच हानी झाली. मुंबईच्या कॉंग्रेसला टिळकानी यावे अशी सूचना कित्येक नेमस्त पत्रे करू लागली. त्याला टिळकानी उत्तर दिले की "समोरचा मोठा दरवाजा लावून घेता आणि माडीवर चढून मग घरात या असे म्हणता हे तुमचे कोण ऐकेल? मद्रासेस ज्या सूचना करण्यात आल्या त्यांचा विचार व निर्णय सभेच्या आधी दहा बारा दिवस झाला तरीहि आम्ही येऊ. राष्ट्रीय संस्थेला जर सर्वांची गरज असेल तर तिने नियमाचे दास्य झुगारून द्यावे आणि आपल्या भोवतालचा खंदक भरून काढावा किंवा त्यावर सोयीचा पूल टाकावा." सुदैवाने यापूर्वी काही दिवस नागपूर प्रांतात उभयपक्षाच्या लोकानी मिळून प्रांतिक परिषद भरविली होती आणि राष्ट्रीय पक्षाच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिज्ञापत्रक मान्य करणाऱ्या लोकाना जाहीरसभामार्फत निवडून येण्याला मोकळीक ठेवली होती. अर्थात् प्रांतिक परिषदातून जी गोष्ट होते ती घडवून आणण्याला राष्ट्रीय सभेने खळखळ का करावी असा टिळकांचा सवाल होता.

टिळकांचे हे म्हणणे साताऱ्यास नेमलेल्या समेट कमिटीने स्पष्टपणाने लोकापुढे मांडून कॉंग्रेसकडे व इतर प्रांताकडे पाठविले होते. तसेच पुण्यातील नेमस्त मंडळीनीहि अशी सूचना पाठविली होती कीं जाहीरसभानी निवडलेल्या प्रतिनिधींनी कॉंग्रेसला यंदा यावे व ते आत आल्यास त्यानी व कन्व्हेन्शन वाल्यानी मिळून समेटाच्या प्रश्नाचा निकाल लावावा. पण मुंबईकरानी तिचाहि अव्हेर केला. उलट पुणेकराना त्यानी असा खलिता पाठविला की कॉंग्रेस कमिटीच्या सभासदाशिवाय इतर कोणासहि प्रतिनिधी निवडता येणार नाही. या खलित्याविरुद्ध पुणेकरानी तक्रार करावयाला पाहिजे होती ती केली नाही. पण नगर व सातारा येथील कमिट्यानी ती केली. शेवटी मुंबईकराभोवती सर्व प्रांतांतील समेटवाल्यांचा वेढा इतका जबरदस्त झाला की कॉंग्रेसमध्ये एकट्या मुंबईकरांखेरीज समेटाला कोणी विरुद्ध नाही असे उघड दिसून पडले. यामुळे घटनेत

दुरुस्ती झाली ती अशी की प्रतिनिधि निवडावयाचे ते कोणत्याहि नोंदलेल्या सभेचे सभासदच पाहिजेत असे नाही, आणि १९१५ पूर्वी दोन वर्षे अस्तित्वात असलेल्या संस्थांना पंधरापर्यंत प्रतिनिधि स्वतंत्रपणे आपल्या हक्काने निवडून देता यावे. पण अलीकडील दोन वर्षांत अस्तित्वात येणाऱ्या किंवा यापुढे बनणाऱ्या संस्थांचे काय? असा प्रश्न निघाला तेव्हा जबाबदार पुढाऱ्यांनी असे सांगितले की घटनेप्रमाणे कोणत्याहि नव्या संस्थेने नोंदून घेण्याविषयी कॉंग्रेस कमिट्याकडे कळविले असता त्याना या कमिट्यानी नोंदून घेतलेच पाहिजे. अशा रीतीने उभयपक्षी थोडथोडी देवघेव होऊन राष्ट्रीय पक्षाच्या निम्याअधिक तक्रारी दूर झाल्या. आणि त्या देखील परस्पर नेमस्तांकडूनच. कारण मुंबईच्या सभेलाहि राष्ट्रीय पक्षाचे लोक गेलेले नव्हते. सभेचे वातावरण एकंदरीने उत्साहजनक असल्यामुळे सभेतील ठरावहि सत्यप्रसन्न सिंह यांच्या इच्छेपलीकडे प्रगतीपर झाले. अध्यक्ष सिंह हे पुरे नेमस्त असल्यामुळे त्यांचे भाषण बऱ्याचशा नेमस्तांनाहि न आवडण्याइतके फिके झाले. शिवाय बेझंटबाईंनी स्वराज्यावरील मुख्य ठरावाला एक उपसूचना आणली होती ती त्यानी आपल्या अधिकारात नामंजूर केली. बाईंची सूचना अशी होती की 'हिंदुस्थानाला वसाहतीसारखे स्वराज्य देण्याची व तदनुसार स्वराज्ययोजना करण्याची वेळ आता आली आहे' असे प्रास्ताविक शब्द स्वराज्यविषयक ठरावाच्या प्रारंभी घालावे. ही सूचना बेकायदेशीर ठरविण्याचे कारण असे सांगण्यात आले की होमरूल हे ध्येय असले तरी कॉंग्रेसच्या उद्देशात ते बसत नाही. पण यामुळे स्वतः बाई निराश झाल्या नाहीत व इतर होमरूलवालेहि निराश झाले नाहीत.

---

# परिशिष्ट १

## [ १९१४-१९१५ मधील निवडक पत्रे ]

### ( १ ) अश्विनीकुमार दत्त यांचे केळकराना पत्र

शेवणी सि. पी. १५ फेब्रुवारी १९१४

तुमच्या पत्रावरून टिळक लवकरच सुटणार असे दिसत. त्याना कैद झाल्याला किती तरी वर्षे झाली ! म्हणून ते सुखरूप परत यावेत अशी प्रार्थना आहे. याहि खेपेस तुरुंगांतून सुटून आल्यावर एखादा ग्रंथ जो जगात अमर राहील असा ते निर्माण करतील अशी मला फार आशा आहे. ना. गोखले यांची तब्येत कशी आहे तेहि कळवावे.

### ( २ ) हरि गणेश फाटक यांचे केळकराना पत्र

फोंडा गोवा ४ मार्च १९१४

आमच्या कॉलेजचे डायरेक्टर व प्रोफेसर यांचे फोटो तुम्हाला नजर म्हणून पाठवीत आहे. तुमच्याविषयी असणाऱ्या अत्यंत खोल आदरबुद्धीची ती खूण म्हणून पाठवीत आहे. महाराष्ट्र वाचकवर्गाला जिव्हाळ्याच्या राजकीय विषयावर शिक्षण देण्याची जी सेवा तुम्ही केली त्याबद्दल तुमचे गुण घ्यावे तितके थोडे आहेत. हल्ली दडपशाही व शिक्षासत्र यांचा धूमधडाका सुरू आहे. अशा वेळी तुम्ही नसता तर केसरीपुढे मोठा बिकट प्रश्न येऊन पडला असता. तुमच्यामुळेच केसरी प्रेस-अॅक्टाच्या जाळ्यांतून बचावला. महाराष्ट्राला ही गोष्ट कबूल केली पाहिजे. तुमच्यावर कामकाजाचा ताण फार पडला यात शंका नाही व आमच्या राष्ट्रीयपक्षाच्या मंडळीपैकी तुम्ही म्हणूनच तो सोसला व त्यांतून यश मिळवून बाहेर पडला. आतां टिळक लवकरच सुटतील आणि तसे झाले म्हणजे हा ताण तुमचा थोडासा तरी कमी होईल व तुम्हाला थोडी विश्रांति मिळेल. तुमच्या स्वार्थत्यागपूर्वक परिश्रमाने अशी विश्रांति घेण्याचा हक्कच तुम्ही मिळविला आहे.

### ( ३ ) सत्येंद्र बोस यांचे केळकराना पत्र

कलकत्ता १० मार्च १९१४

साताऱ्याच्या सभेनंतर मी सुब्बराव याना लिहिले व समेट करण्याबद्दल तुमच्या सूचना काय आहेत त्या पाठवा असे त्यानी मला लिहिले आहे. साताऱ्या सभेने घटनेतील प्रतिज्ञालेख मान्य करणाऱ्या लोकांना जाहीर सभानी निवडले तरी घ्यावे असे ठरविले आहे. एकंदर राष्ट्रीयपक्ष ही सूचना मान्य करील काय ! बाबू मोतिलाल घोस हे ह्मणतात की १९०६ च्या कॉंग्रेसचे सर्व ठराव

पुनः प्रस्थापित करून घेण्यात मी मदत करतो. सातारच्या सभेचा ठराव ठीक आहे. बंगालचे लोक समेटाला विरुद्ध नाहीत व प्रत्येक सभेला व परिषदेला उभयपक्षाचे लोक हजर राहतात. मग समेट का घडून येऊ नये ?

**(४) कार्ल ब्रेशहॉफ यांचे केळकराना पत्र**

ब्रॉट्झबरी ३० एप्रिल १९१४

टिळकांच्या खटल्याच्या पुस्तकाची एक प्रत आणखी पाठवा. टिळकांच्या खटल्यावर 'न्यूएज' वर्तमानपत्रात मी लिहिलेला लेख तुम्ही वाचलाच आहे. शिवाय टिळक सुटण्याच्या सुमारास आणखी एक लेख त्या पत्रात लिहिण्याची माझी इच्छा आहे.

**(५) मुंजे यांचे केळकराना पत्र**

नागपूर ता. २१ जून १९१४

टिळक सुटून आल्याची तार येथे पोचताच शहरात एकच खळबळ उडाली. लोकानी पेढे वाटले आपली घरें शृंगारली सर्व शहरभर उत्साह दिसून येत होता. सायंकाळी व्यंकटेश नाटकगृहाच्या पाठीमागील मैदानांत सुमारे पाच हजार लोकांची सभा भरली. त्यांत सर्व पक्षाचे जातीचे व धंद्याचे लहानथोर लोक हजर होते. सन्मान्य वकील नीळकंठराव उधोजी हे अध्यक्ष असून अभिनंदनाचा ठराव पुढें मांडताना त्याना गहिवरून आले. स्वतः मी ( डॉ. मुंजे ) अळेकर भवानी शंकर वकील यानी ठरावावर भाषणे केली. अशा वृद्धावस्थेमध्ये मधुमेहासारख्या रोगाने शरीर जर्जर झाले असता तुरुंगाच्या हालअपेष्टा सोसण्याचे सामर्थ्य परमेश्वराने त्यास दिले तसेच या पुढेहि त्यास आयुरारोग्य द्यावें अशी परमेश्वराची प्रार्थना करण्यात आली. पटांगणाच्या मध्यभागी देवळाच्या शिखरावर सर्वास दिसेल अशा ठिकाणी टिळकांची मोठी तसबीर लावली होती. त्यावर सर्वांनी मंत्रपुष्प अक्षता व फुलें याची वृष्टी केली. सर्वंट ऑफ इंडिया सोसायटीचे द्रवीड यानी अध्यक्षांचे आभार मानल्यानंतर सर्वास साखर वाटण्यात आली व " टिळक महाराज की जय " अशा जयजयकारात सभा बरखास्त झाली.

**(६) मॉडफर्ड कलेक्टर यांचे टिळकाना पत्र**

पुणे २६ ऑगस्ट १९१४

तुम्ही आपल्या गणपतीबरोबर मिरवणुकीत जाणार आहात असे समजते. हल्लीच्या प्रसंगी तुम्ही तसे करू नये अशी सरकारची इच्छा आहे. पण तुम्ही तसे करीत नाही असे कळवाल तर मॅजिस्ट्रेटच्या नात्याने मी हुकूम काढीत नाही.

**टि. ांचे उत्तर**

हल्लीच्या प्रसंगाकरितां म्हणूनच सरकार म्हणत असेल तर मी यंदा मिरवणुकीत जाणार नाही. पण तेहि विशेष परिस्थिति आहे म्हणता म्हणून. पण हे यंदा पुरतेच असे निश्चित समजा. पुढे ते माझ्यावर बंधनकारक नाही.

**( ७ ) कॅ० बसू यांचे केळकराना पत्र**

अलाहाबाद ७ ऑक्टोबर १९१४

टिळकांची प्रकृति बरी आहे असे वाचून आनंद झाला. पुढील पत्रात त्याना माझे नमस्कार लिहा. त्यांचे 'ओरायन' व 'वेदकालीन आर्यवस्ती' या पुस्तकांच्या नवीन आवृत्त्या केव्हा निघणार आहेत? 'Sacred Books of the Hindoo's' या नावाची एक ग्रंथमाला आह्मी काढण्याचा विचार केला आहे. तरी तीत हे दोन ग्रंथ घेता आले तर मला फार बरे वाटेल. तुम्ही अलाहाबादेस का येत नाही? 'हिंदी वाङ्मय इयर बुक' काढण्याच्या बाबतीत तुह्मी मदत केली त्याबद्दल फार आभारी आहे.

**( ८ ) बी. टी. अंकलेसरीया यांचे टिळकाना पत्र**

मुंबई ता. २६ आक्टोबर १९१४

अवेस्ता ग्रंथातील दोन नावे 'आरोनावा आणि सावरिहा' या शब्दावर मी एक लेख लिहित आहे. उत्तर दिशेकडील दोन नक्षत्रपुंज ज्यांना ॲन्ड्रोमीडा व कॅसिओपियस असें म्हणतात त्यांचीच ही नावे असावीत असा माझा तर्क आहे. तरी वैदिक वाङ्मयात किंवा वैदिकोत्तर वाङ्मयात खालील नक्षत्राना काही प्रति नावे आढळतात की काय कृपा करून कळवा. ती नक्षत्रे ही:—१ सेफियस २ ॲन्ड्रोमिडा ३ कॅसिओपिया ४ पर्सियस् ५ पिगॅसस् ६ सीटस्. माझ्यामतें वैदिक तृतआप्त्य ज्याला आवेस्तामध्ये थ्रेतानो आथ्वयानॉइस् असे म्हणतात तेच पर्सियस् असावे. सीटस् म्हणजेच वैदिक अहिमृत्र व आवेस्तांतील अझिदहाक. कॅसिओपिया हीच अरुंधती. तेच आवेस्तांतील सावरीहा. किफियस् हेच वैदिक यमवैवस्वत इ. इ. माझा लेख तयार झाला म्हणजे तुमचेकडे तो पाठवीन. मुंबईत काही संस्कृत पंडिताना ही माहिती मी विचारली पण त्यांच्याकडून ती मिळाली नाही म्हणून तुम्हाला तसदी दिली आहे.

**( ९ ) साने यांचे केळकराना पत्र**

बार्शी १५ नोव्हेंबर १९१४

नगरास चितळे याना सातार्‍यास नेमलेल्या कमिटीचे काम पुढे ढकलावे अशाविषयी मी लिहिले आहे. ही कमिटी अद्याप काही करीत नाही असा इंदुप्रकाशाने दोष दिला आहे. तो आपण का घ्यावा? ना. गोखले आतां पुण्यास

आले असतील तरी खटपट करण्याची हीच वेळ आहे. स्वतः तुम्ही या कमिटीत नाही तरी साताऱ्यास समेटाचा प्रश्न पुढे आणण्याची मुख्य खटपट तुम्हीच केली. तशीच आतां टिळक व गोखले या उभयतांचे स्नेही म्हणून तुम्ही खटपट कराल तर तिला यश येण्याचा संभव आहे.

**( १० ) आळतेकर यांचे केळकराना पत्र**

कऱ्हाड १६ नोव्हेंबर १९१४

संयुक्त राष्ट्रीय सभेसंबंधाने माझ्या सूचना ऑल इंडियाकाँग्रेस कमिटी-कडे चेअरमन ( सर सुब्रह्मण्य अय्यर ) यानी पाठविल्याच आहेत. आता त्यांची उत्तेर आली म्हणजे राष्ट्रीय पक्षातील प्रमुख लोकानी एकत्र जमून आपला विचार ठरवावा असे वाटते. टिळक मोतिलाल घोस व तुम्ही मिळून खास राष्ट्रीय-पक्षाचे म्हणणे काय असेल ते निश्चित ठरवून मांडावे. टिळकांनी या कामात लक्ष घालावे असे नेमस्तानांहि वाटत असावे असे दिसते. बेझंटबाईची इच्छा टिळ-कानी काँग्रेसला हजर राहून समेट घडवून आणावा अशी आहे.

**( ११ ) बाबू मोतिलाल घोस यांचे केळकराना पत्र**

देवघर २० नोव्हेंबर १९१४

मी हल्ली देवघर येथे आलो आहे हे तुम्हाला टिळकांनीं सांगितलेच असेल. अळतेकर यांनी सर सुब्रह्मण्य अय्यर याना पत्र पाठविले ते पाठवावयास नको होते. सर सुब्रह्मण्य यांचे आक्षेप काय आहेत हे माझ्या लक्ष्यात नाही. पण हल्लीच्या काँग्रेसकमिट्यांचा अधिकार जाईल अशी भीति त्याना कदाचित् वाटत असावी. पण त्याला उपाय आहे तो असा की जाहीरसभा बोलवावयाच्या त्या हल्लीच्या काँग्रेसकमिट्यानी बोलवाव्या किंवा नव्या क्रीडवर सह्या केलेल्या लोकानी बोल-वाव्या. असे केले म्हणजे झाले. तरी यासंबंधाने तुमचे मत कळवा. भूपेंद्रनाथ मला लिहितात की मोहरमच्या आठवड्यात कलकत्ता किंवा अलाहाबाद येथे बेझं-टबाईना बोलावून लहानशी खासगी सभा भरवूं.

**( १२ ) एन् सुबराव यांचे केळकराना पत्र**

मद्रास २२ नोव्हेंबर १९१४

जाहीर सभानी प्रतिनिधी निवडण्याचे बाबतीत एक टिपण करून मी या सोबत तुमच्याकडे पाठवीत आहे. तुमच्या दुसऱ्या मुद्यासंबंधाने अद्यापि पूर्ण विचार केला नाही. पण समक्ष गाठ पडली असता त्याचा निकाल अधिक चांगला लावता येईल या हेतूने बेझंटबाई तिकडे जात आहेत. त्यांच्याबरोबर मीहि जावे म्हणतो. पाहावे काय घडेल ते. काँग्रेसच्या घटनेवरील टिप्पण मात्र न विसरता प्रसिद्ध करावे.

### ( १३ ) बळवंतराव देशपांडे यांचे केळकराना पत्र

अहमदनगर

येथे दक्षिण आफ्रिकेतील चळवळीकरिता वर्गणी गोळा करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहो व तो सर्व पक्ष मिळून करीत आहो. असे काम केल्याने जुने भेदभाव सहजच लोपून जातात. पुण्यातील लोक सुज्ञ असून त्यानीहि हे भेदभाव नाहीसे करण्याची खटपट करावी व सर्वांनी मिळून एक विचाराने सरकाराशी झगडावे. गोखले यांच्या मागण्या असाव्या तितक्या मोठ्या नाहीत हे खरे पण त्यांचा आधार घेऊन उद्योगप्रियतेने सार्वजनिक कार्य कसे काय करावे याविषयी लोकाना बोध करण्याला त्यात पुष्कळ जागा आहे.

### ( १४ ) बाबू मोतिलाल घोस यांचे केळकराना पत्र

कलकत्ता २६ नोव्हेंबर १९१४

या चंडाळानी मला देवघरहून ओढून आणलेच. काल सभा झाली व त्यात काय झाले हे आजच्या पत्रिकेच्या अग्रलेखात दिलेच आहे. या अग्रलेखावरून असे दिसेल की कलकत्त्यातील उभय पक्षाच्या पुढाऱ्यानी सहविचार करून खालील ठराव केले (१) काँग्रेसबाहेर असलेल्या लोकानी प्रतिज्ञालेखावर तात्पुरती सही करावी व इतर सर्व घटनाहि तात्पुरती मान्य करावी. आणि मग सर्वांनी मिळून एक कमिटी नेमून जी काय घटना ठरेल ती सभेपुढे मांडून मंजूर करून घ्यावी. प्रतिज्ञा लेखावर तात्पुरत्या सह्या देण्यास तयार झाल्यावर यंदा देखील जाहीर सभेने निवडलेल्या प्रतिनिधीना सभेत घ्यावे.

### ( १५ ) आळतेकर यांचे टिळकाना पत्र

कऱ्हाड २ डिसेंबर १९१४

मी सर सुब्रह्मण्य अय्यर याना असे लिहिले आहे की ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या सभासदाना सर्क्युलर पाठवूनच अभिप्राय मागवावे. बंगाल व संयुक्तप्रांत हे जाहीर सभाना अधिकार देण्याला अनुकूल दिसतात. खुद्द मद्रास येथील लोकानीहि आपले मत किंचित् या दिशेने बदलले आहे. म्हणून अभिप्राय मागविले असता मुंबईचे लोक प्रतिकूल असताहि आपल्या म्हणण्याप्रमाणे होईल.

### ( १६ ) बळवंतराव अनगळ यांचे केळकराना पत्र

उमरावती ६ डिसेंबर १९१४

मी मानभाव मंडळीना तुमच्याकडे पाठविले त्यांचे काम तुम्ही घेतले हे पाहून बरे वाटले. आम्ही येथून कमिशनपुढे विचारण्याकरिता काही प्रश्न तयार

करून पाठविलेच आहेत. तथापि सुचतील ते आणखी तुम्हीहि विचारावे. गोस्वामी लोकानी वर्गण्या जमवून दाव्याला जोर आणला आहे. मॅजिस्ट्रेट खिस्ती आहे. निकाल त्यांच्याविरुद्ध झाला तरी इकडे मानभाव लोकांचे प्रस्थहि बरेच आहे. एकंदरीने मला असे वाटते की टिळक व डॉ. भांडारकर यांच्या मध्यस्थीने हा तंटा तोडण्याचा काही प्रयत्न तुम्ही कराल तर फार चांगले होईल.

### ( १७ ) मोतिलाल घोस यांचे टिळकाना पत्र

कलकत्ता २१ डिसेंबर १९१४

मी कलकत्त्यास आलो तो आता देवघरला परत जात नाही. भूपेंद्र बोस यांच्याशी बोललो. आमचा विचार असा आहे की केळकर मुंजे खापर्डे याना येथे सल्लामसलती करिता बोलवावे. बंगाल्यात दोन पक्षातील भेद फार तीव्र नाही. गोखल्यानी संमति दिली तर बेझंटबाई आपले मत वदलतील. आम्ही इकडचे लोक हवे तसे निवडून येऊ शकू व समेटाला राष्ट्रीयसभेत मदत करू.

### ( १८ ) विजापूरकर यांचे टिळकाना पत्र

थोडक्यावर लग्न मोडल्यासारखे होत आहे म्हणून सभा बोलाविण्यास तयार होणाऱ्या मंडळींनी आर्टिकल कबूल करावे असे मला वाटते. प्रवेशानंतर व्यवस्थित प्रयत्न करून सर्व काही करता येईल. फेरोजशहा मेथा हे त्याना वाटाघाटीत वगळले म्हणून रागावलेले दिसतात. त्यांचा गड सर करण्याच्या तीन पायऱ्या गोपाळराव गोखल्यानी सुचविल्या त्या अशा. गोखल्यानी सुचविले त्यावर येथील मंडळींचे ऐकमत्य झाल्यावर नरसोपंतानी सर फेरोजशहा यांजकडे जावे म्हणजे त्याना तिकडचा कोणीतरी येऊन आपला मान राखल्यासारखा वाटेल. दुसरी पायरी ही की सुब्बराव पंतलु यानी येथे ठरेल तेच मुंबईस बोलावे. तिसरी पायरी गोपाळरावानीहि त्यांच्याशी बोलून खटपट करावी व आपले स्वच्छ मत कळवावे. इतके झाल्यावर फेरोजशहा हट्ट धरणार नाहीत असे गोखले याना वाटते. फेरोजशहा मद्रासेस येणार नाहीत. वाच्छाहि नाहीत. अशा स्थितीत प्रकृतीमुळे जाऊ नये असे वाटले तरी जाऊन खटपट करू. मग जड जाणार नाही. गोपाळरावांच्या मनात समेट व्हावे असे आहे. नड मात्र ती. तिला उपाय तेवढेच दिसतात. तुमच्या 'सांकशनाने' सभा भरवून येऊ. पुढे हा समेट करा असे थोडक्यात म्हणणे असावे. बाईची मध्यस्थी मला स्वतःलाच आवडली नाही.

### ( १९ ) ना. गोखले यांचे केळकराना पत्र

पुणें. १० फेब्रुवारी १९१५

कॉंग्रेस समेटासंबंधाने मला एखादे जाहीरपत्रक काढून आपले म्हणणे लोकाना कळविणे अपरिहार्य झाले आहे. म्हणून असे जाहीरपत्रक काढले आहे.

त्याच्या दोन प्रती तुमच्याकडे पाठवीत आहे. एक मराठ्यासाठी व एक केसरी करता. तरी हे पत्रक मराठ्यात ..र्व्या सर्व छापल्यास मी आभारी होईन. तसेच केसरीने मजवर गेल्या अंकात ... कर आरोप केले आहेत म्हणून त्या पत्रकाचे समग्र भाषांतर केसरीतहि छापाल अशी मला आशा आहे.

### ( २० ) सोमण यांचे टिळकांना पत्र

सातारा ता. २० एप्रिल १९१५.

साताऱ्यास पूर्वी भरले तसे कॉन्फरन्स दुसरे कोठे तरी भरावे अशी अनेक मंडळींची इच्छा आहे. त्याला आमची पूर्ण मदत मिळेल.

### ( २१ ) . गो. कुलकर्णी यांचे टिळकांना पत्र

कोल्हापूर २६ मे १९१५

काही शंकेसंबंधाने ः पले मत प्रमाण समजून त्याप्रमाणे तजवीज करणेची आहे म्हणून तसदी देत आहे याबद्दल माफी मागतो. शुक्ल यजुर्वेदी देशस्थामध्ये मूळ पुरुषापासून तृतीयपुरुष म्हणजे मुलाचा मुलगा आणि चतुर्थ कन्या म्हणजे मुलीच्या मुलीची मुलगी यांचा विवाह करण्यास शास्त्राची काही हरकत आहे काय ? याबद्दल निर्णय आपलेकडून समजल्यास फार उपकार होणार आहेत. हा विवाहसंबंध ठरविला असता येथील यजुर्वेदी भिक्षुकांनी भानगडी चालविल्या आहेत तरी याबद्दल आपलेकडून शास्त्रार्थ लिहून येईल त्याप्रमाणे करण्याचे आम्ही ठरविले आहे. म्हणजे येथील मंडळींची तोंडे बंद होतील.

### ( २२ ) श्रीशंकराचार्यांचें टिळकांना आज्ञापत्र

नसीराबाद २ जून १९१५

स्वारी कामगार गोविंद रामचंद्र याजबरोबर आपसातील दावा संपविण्याविषयी व दोघांनी कसे वागावे याविषयी तुम्ही पाठविलेला लेख पाहिला. मूळ दावा मांडावयास नको होता हे खरे. पण आता त्याचा काय उपयोग ? त्यावेळी आम्हास नुकताच उपदेश देऊन संस्थानास अधिकारी शिष्य केले. व इकडची हकीगत व सांप्रदाय काहीच माहीत नव्हते. म्हणून या आश्रमात वादी प्रतिवादी म्हणवून घेण्याचा प्रसंग आला आहे. पूर्वी दाजीसाहेब खरे व करंदीकर वकील यांनी दावा लावण्याविषयी अनुकूल अभिप्राय दिला. लोकहि म्हणतात की शिष्य केला तरी गुरुचे अधिकार नष्ट होत नाहीत. दुसरा शिष्य करता येतो व धर्माविरुद्ध वागणाऱ्या शिष्यास कमी करता येते. दावा दाखल होऊन लोकात असा बोभाटा झालाच आहे की शंकराचार्यांची भाऊबंदकी कोर्टात चालू आहे आणि आता वादी प्रतिवादी एक होऊन दावा काढून घेतला असता संकेश्वर मठ द्रव्या-

करिता करवीर मठाशी एक होऊन भ्रष्ट झाला असा दुसरा बोभाटा होणार हे दिसत आहे. तथापि आपण लोकमान्य असून जगात आपली कीर्ति व प्रौढता आहे त्या अर्थी आपण कराल ते जगमान्य होईल म्हणून आपल्या सांगण्याप्रमाणे दावा काढून घेण्यास आम्ही तयार आहो. पण या मठाची मान्यता कमी होऊ नये याकरिता प्रतिवादी यानी करवीरचे उत्पन्न घ्यावे व ब्रिटिश इलाख्यातील संस्थानाकडील उत्पन्न आमचेकडे असावे म्हणजे तंटा उरला नाही. व आपण घडवून आणाल तर घडणार आहे. वाटेल तर ते देऊन आणखी थोडे इकडचे द्यावे. पण त्यांचा आमचा संसर्ग तोडावा. कारण त्या मठाकडून जे कर्म झाले ते लोकास मान्य आहेसे दिसत नाही. तसेच प्रतिवादीनी पळशे ब्राह्मणाच्या घरी भोजन केले याबद्दल तंटा अजून सुरू आहे. कोल्हापूरचेच लोक वेदोक्त केल्यामुळे त्या मठाला भ्रष्ट म्हणतात. अशा स्थितीत त्यांच्याशी आपसात समजूत केली तर हा मठहि भ्रष्ट होईल. त्यापेक्षा दावा काढून घ्यावा. सर्व उत्पन्न त्या मठाला द्यावे आणि भिक्षा व मान्यता कायम राहिली तरी पुरे. त्या मठाशी संगनमतच करावयास सांगाल तर सांगाल तो शिष्य करून देतो आणि आम्ही काशीस जातो. मग तो शिष्य काय हवे ते करो आमच्यावर अपेश नाही. तात्पर्य आम्हास संसर्ग न बाधेल अशी वाटेल ती तोड सांगा. आपण धार्मिक आहात लोकोद्धाराकरिता आपण अवतारी पुरुष आहा अशी आमची पूर्ण समजूत आहे. हा मठ धर्मस्थितीत राहिल्याने आपणास मोठे पुण्य लागणारे असून आपली कीर्ति होणार आहे. या बाजूने पाहून थोडीशी खटपट कराल तर या स्थितीमध्ये धार्मिक संस्थेस आश्रय दिल्यासारखे होणार आहे.

### ( २३ ) बेळवी यांचे केळकराना पत्र

बेळगाव १७ जून १९१५

टिळक सिंहगडाहून परत आले काय ? माझ्या मनात असे आले आहे की सर फेरोजशहा मेथा याना एकवार लिहावे आणि टिळक मी व बॅपटिस्टा यांची गाठ घेतात का विचारावे. त्याना भेटल्यावर मग जिल्हा सभेची घटना निश्चयात्मक करू. मद्रास येथे समेटकमिटी नेमली त्यावर इतर प्रांतातील लोकांच्या नेमणुकी अद्यापि झाल्या की नाही ? असल्यास कोण कोण निवडले ? आमच्या ठरावाची एकेक प्रत त्या सर्वांना पाठवावी असे वाटते. इकडे पहावे तो लोकाना आम्ही आणि कन्व्हेन्शनवाले यांच्यात काय फरक आहे हेच अजून त्याना नीटसे उमगत नाही. आणि अशा गैरसमजुतीने ते जिल्हा कॉ. कमिट्या बनवीत असतात. तरी भेदातील मर्म खरे काय आहे हे लोकांच्या लक्षात येण्यासाठी तुम्ही केसरीत एक लेख लिहावा असे वाटते. कारण कित्येक लोकाना या कमिट्या या लोकाना आपले सभासद करून घेण्याचे नाकारतात.

### ( २४ ) ग. ∴ नवरे यांचे केळकराना पत्र

मुंबई २९ जून १९१५

आमचे शेटजी अमृतलाल यांच्या चिरंजीवानी टिळकाना एक पत्र लिहिले आहे. त्यातील मुख्य मुद्दा असा की गीतारहस्याचे गुजराथीत भाषांतर होऊन गुजराथी वाचकाना मिळावे. व त्याकरिता जरूर लागल्यास आपण खर्चहि करू. सदरहू चिरंजीव हे टिळकासंबंधाने अत्यंत भक्ति बाळगणारे आहेत. त्यांचेच स्नेहाने आपणास पूर्वी कळविलेले व्रत म्हणजे टिळक परत येईपर्यंत विडा न खाणे हे पाळिले होते.

### ( २५ ) टिळकांचे जिना याना पत्र

पुणे २१ जुलै १९१५

गेल्या आठवड्यात तुमचे आमचे बोलणे झाले. त्यावरून तुम्हाला कळवितो की काँग्रेस घटनेचे पहिले कलम मान्य करण्याला व ते पाळण्याला मी व माझी स्नेही मंडळी तयार आहेत. आमचे मतच त्या कलमाहून वेगळे नाही. व १९०६ साली काँग्रेसमध्ये तशा अर्थाचा ठराव आला त्याला आम्ही मत दिले होते व त्या पलीकडे यत्किंचितहि आमचा राजकीय कार्यक्रम जाणारा नाही. तसेच काँग्रेसचे काम नीट चालण्यास त्याला नियम पाहिजेत हीहि गोष्ट आम्हाला मान्य आहे. आमच्या मताचा काही लोक विपर्यास करतात. स्थिति अशी आहे की या इलाख्यातील काँग्रेसचे काम सर्व्हन्ट ऑफ इंडिया सोसायटी व मुंबई प्रां. कमिटी यांच्या हाती आहे. व नियम असे केले आहेत की त्याना नको ते लोक ते निवडून देणार नाहीत व नको त्या संस्था जोडून घेणार नाहीत. आम्हाला पाहिजे ते हे की कोणत्याही संस्थेने आम्हाला जोडून घ्या म्हटले म्हणजे मग प्रां. काँ. कमिटीला नाही म्हणण्याचा अधिकारच असता कामा नये. व त्याहिपेक्षा अधिक चांगली योजना म्हणजे जाहीर सभाना निवडणुकीचा हक्क द्यावा. त्याना वाटते की आम्ही बहुमताचा गहजब करू. पण नियमातच असे आहे की एखाद्या प्रांतातून प्रतिनिधी वाटेल तितके आले तरी काँग्रेसमध्ये मते प्रांतवार घ्यावी व प्रत्येक प्रांताच्या मताला अमुक इतके गुणांक आहेत असे समजावे. आमच्याविरुद्ध बहुमत असेल तर ते आम्ही मान्य करू व ते आमच्या बाजूला मिळण्याची खटपट करू व वाट पाहू. पण भांडून राष्ट्रीय सभा सोडून जाणार नाही. दुसऱ्या बाजूच्या लोकात सहिष्णुता मुळीच नाही व आम्ही आपली सर्व स्वतंत्रता घालवावी असे त्यांचे मत आहे. हा अर्थ मनात ठेवून तोंडाने म्हणतात की घटनेचा खरा उद्देश राष्ट्रीय पक्षाला मान्य नाही. जणू काय घटनेचा खरा उद्देश हे लोक म्हणतील तोच. मी हे मुद्दाम लिहून तुम्हाला कळवीत आहे. कारण त्यामुळे जो कोणाचा गैरसमज तिकडे असेल तो याने दूर होईल.

### (२६) कॅप्टन बसू यांचे केळकराना पत्र

अलाहाबाद २३ जुलै १९१५

माझा 'लिटररी इयर--बुक' हा ग्रंथ छापत आहे. तो एक महिन्यात तयार होईल. यानंतर 'एन्सायक्लोपीडिया इंडिका' या नावाचा ग्रंथ काढण्याचा माझा विचार आहे. हा संदर्भ-ग्रंथ फारच उपयुक्त होईल. तुम्हाला ज्या विषयात विशेष गोडी लागते त्यावर लहानसे लेख लिहून तुम्ही पाठवाल का ? यासोबत काही प्रासिद्धीपत्रके पाठवीत आहे. ती तुमच्या स्नेहीमंडळीपैकी निरनिराळ्या विषयात निष्णात असलेल्या लोकाना द्या. टिळकानाही लेख लिहिण्याविषयी विनंति करा. ते वेदकालनिर्णयावर लेख लिहितील काय ?

### (२७) अळेकर यांचे केळकराना पत्र

नागपूर १३ सप्टेंबर १९१५

आम्ही इकडे संयुक्त परिषदेची खटपट चालविल्याचे तुम्ही ऐकलेच असेल. रा. ब. मुधोळकरानी येथील प्रमुख पुढाऱ्याना पत्रे लिहून परिषद कॉंग्रेसच्या घटनेप्रमाणे भरावी असे सुचविले. हे समजताच आम्हीहि खटपट केली. यामुळे एकपक्षीय सभा करणे बरे नव्हे असे त्यानी उलट लिहिले. आता मुधोळकर पुनः असे सुचविणार आहेत की, परिषद दोन्ही पक्षाची मिळून भरवावी पण प्रतिनिधीनी कॉंग्रेसच्या प्रतिज्ञालेखाला मान्यता द्यावी. तरी याबद्दल टिळकांचा व तुमचा अभिप्राय काय तो कळवावा. मुधोळकरानी टाईम्स ऑफ इंडियात पत्रे लिहिली त्याकडे तुम्ही लक्ष देऊन पत्रातून काही लिहिले नाही हे चांगले झाले.

### ( २८ ) बेझन्टबाईंचे टिळकाना पत्र

तुमचे घरी ठरल्याप्रमाणे गोखल्यांच्या सूचनेवरून विषयनियामक मंडळापुढे मी उपसूचना आणावयाचे ठरविले. इतक्यात गोखले यांचा तोंडी निरोप आला की, टिळकानी केसरीत अपमानास्पद लेख लिहिला आहे म्हणून उपसूचना आणू नका. पण मी त्यामुळे उपसूचना परत घेतली नाही. त्यामुळे ते मजवर प्रथम फार रागावले. तुमचा लेख मी पाहिला नाही. पण गोखल्याना तो फार लागला होता असे दिसले. तरी गोखल्यानी शेवटी मी उपसूचना परत घेण्याचा आग्रह सोडला.

### ( २९ ) लंडन सॉलिसिटरचे दाजीसाहेब खरे याना पत्र

२९ आक्टोबर १९१५

टाईम्स पत्राचे सॉलिसिटर मि. सोम्स हे आम्हाला येऊन भेटले. ते म्हणाले 'पुस्तक प्रसिद्ध केल्यानंतर ताईमहाराज प्रकरणात प्रिव्ही कौन्सिलने

टिळकासारखा निकाल दिला. तरी त्याचा उल्लेख करून एक छापील चिठ्ठी चिरोलच्या पुस्तकात घालण्याला आम्ही तयार आहोत. तसेच किरकोळ चुकाची दुरुस्ती सुचवाल तर तीहि घालू. पण माफी मागणे किंवा दंड म्हणून धमार्थ देणगी देणे या गोष्टी आम्ही मुळीच करणार नाही.' त्यावर आम्ही आमचे बॅ. स्पेन्स यांचा विचार घेतला. त्यांच्या मते माफी देत नाहीत तर एकदम फिर्यादच करावी. आमच्यामते आपली बाजू बळकट आहे म्हणून कैफियत देण्याच्या वेळी प्रतिपक्षाचे डोळे उघडतील. अमुक बॅरिस्टर दिला तमुक बॅरिस्टर दिला अशी नावे तिकडे प्रसिद्ध होतात तरी असे न व्हावे.

**( ३० ) बेझन्टबाई यांची केळकराना तार**

मुंबई २६ डिसेंबर १९१५

माझी उपसूचना मंजूर झाली. कॉंग्रेस कमिटीने ती मान्य केली. आता सर्वांना मार्ग खुला झाला.

---

# परिशिष्ट २

## चोराच्या उलट्या बोंबा!

कॉंग्रेसमधील समेटाचे बोलणे का मोडले, याबद्दल अमृतबझार-पत्रिकाकारानी आपल्या प्रत्यक्ष माहितीवरून दिलेली हकीकत केसरी पत्रात प्रसिद्ध झाल्यापासून येथील ना. गोखले यांच्या छायेतील मंडळीस व पत्रकारास क्रोधाची वैषम्याची, मत्सराची व दुसऱ्याचा घात करण्याची गर्मी उसळी येऊन त्यानी आपले पूर्वीचे खेळ पुनः सुरू केले आहेत. वास्तविक म्हटले म्हणजे हा तंटा ना. गोपाळ कृष्ण गोखले व रा. टिळक यामधला आहे, व तो दोघाचाच चालला असता तर त्यात काही निदान असभ्यपणाचा तरी भाग आला नसता. पण ना. गोखल्याऐवजीं गोपाळ कृष्णाच्या खेळगड्यानी तो आपल्या हातात घेतल्यामुळे अर्थातच त्यात खेडवळाची ग्राम्यता उत्पन्न झाली असून आपण काय बोलतो व त्याचा कायदेशीर परिणाम काय होईल अथवा त्याला सत्याचा आधार कितपत ठेवावा याचाहि या सर्वटास अदमास राहिलेला नाही. खोटे उतारे, खोटा कोटिक्रम, अश्लीलता आणि जाणूनबुजून केलेला विपर्यास त्यांच्या प्रतिपादनात इतका भरला आहे की त्याबद्दल कोणासहि किळस येणे स्वाभाविक आहे. अशा

तऱ्हेचे किळसवाणे लेख ना. गोखले यास स्वतः पसंत असतील की नाही किंवा त्यांच्या हल्लीच्या अस्वास्थ्यतेत या प्रकारच्या लेखाना त्यानी मंजुरी तरी दिली असेल की नाही याची शंकाच आहे. पण 'शिष्यापराधे गुरोर्दंडः' या न्यायाने सर्वेटाकरिता ना. गोपाळराव गोखले यासहि त्याचे प्रायश्चित भोगावे लागल्यास त्यात काही नवल नाही. आमच्या मते या वादाचा जितका जास्त खल होईल तितके अधिक काळेच बाहेर पडेल. पण तसे असले तरी या वादात खरें काय? हे लोकास कळविणे आता जरूर असल्यामुळे या विषयावर नाइलाजास्तव पुनः अग्रलेख लिहिण्याचे आज आम्ही योजिले आहे आणि हे प्रवाहपतित कर्तव्य करीत असता त्यात कोणास दुखवावे लागल्यास त्याची जबाबदारी आमच्यावर येत नाही एवढेच आमचे पहिले सांगणे आहे.

## समेटाचा पूर्वरंग

आता प्रथम समेट कसा मोडला याची थोडी खरी हकीकत सांगतों. समेटाचे बोलणे यंदा प्रथम राष्ट्रीय पक्षाच्या बाजूने नव्हे तर बिझांटबाईच्या उद्योगाने सुरू झालेले आहे. या बाई समेटाचे बोलणे करण्याकरिता पुण्यास येणार असे रा. टिळक यास त्यानी लिहिल्यावर रा. टिळक यानी पत्रद्वारे ठिकठिकाणच्या पुढारी राष्ट्रीय लोकांचा सल्ला घेतला व काहीस पुण्यासहि बोलावून घेतले अशाकरिता की बिझांटबाईस सर्वांच्या एकमताने काही तरी निश्चित जबाब देता यावा व त्याप्रमाणे सर्वांचे एकमत होऊन समेट कोणत्या शर्तीवर व्हावा तेहि बिझांटबाई पुण्यास येण्यापूर्वीच ठरविण्यात आले होते. मवाळांच्या कंपूत राजाचा हुकुम ज्याप्रमाणे सर्व सर्वंट्स शिरसा मान्य करितात तशी राष्ट्रीय पक्षाची स्थिति नसून राष्ट्रीय पक्षात कोणताहि निर्णय सर्वांच्या विचारानेच करावा लागतो ही गोष्ट ज्यास माहीत असेल त्याला रा. टिळकानी स्वीकारलेल्या मार्गाचे किंचितहि आश्चर्य वाटणार नाही. असो याप्रमाणे बिझांटबाईस काय सांगावयाचे ते निश्चित झाल्यावर पुढे काही अनिवार्य कारणामुळे मिसेस बिझांटबाई उशीराने म्हणजे २९ नवंबर रोजी पुण्यास यावयाच्या होत्या त्या ७ डिसेंबर रोजी पुण्यास आल्या व त्या वेळी मंडळींचे काय मत होते ते छापून त्यास देण्यात आले व तेच पुढे मराठा पत्रात प्रसिद्ध केले आहे. मद्रासच्या काँग्रेसपुढे कॉन्स्टिटयूशनची दुरुस्ती करण्यासाठी बाई जो ठराव आणणार होत्या त्याचा मसुदा ना. गोखले यानी तयार केला होता असे आता प्रसिद्ध झाले आहे तेव्हा ना. गोखले हे या दुरुस्तीस एवढा वेळपर्यंत अनुकूल होते असे म्हणण्यास हरकत नाही. रा. टिळकानी त्याबद्दल आपली अनुमति पूर्वीच प्रसिद्ध केली होती आणि बंगाल्यातील राष्ट्रीय पक्षहि त्याला कबूल होता. सारांश काँग्रेस सभेचे अध्यक्ष भूपेंद्रनाथ बाबू अमृतबझार पत्रिकेचे संपादक मोतिलाल बाबू यास मुद्दाम बरोबर घेऊन कलकत्त्याहून निघेपर्यंत जिकडे तिकडे सर्व यथास्थित असून यंदा समेट होणार, असे सर्वास

वाटत होते आणि तसे वाटणे काही विनाकारण किंवा गैरहि नव्हते. आता विघ्न कसे आले ते पाहा.

## गुप्तविघ्न

ज्या ना. गोखल्यानी कॉन्स्टिटयूशनमधील दुरुस्तीच्या ठरावाचा मसुदा बिझांटबाईस करून दिला होता त्याच नामदार गोखल्यानी ता. १४–१५ डिसेंबरच्या सुमारास एक '**गुप्त पत्र**' भूपेंद्रनाथ बसू यास लिहिले. यात समेट मोडण्याचे कारण असे दाखविले होते कीं रा. टिळक हे "सरकारला बहिष्कार घालणारे" व "आयरिश लोकाचे मार्ग स्वीकारणारे" आहेत, असे त्यानीच सुबारावास सांगितले असल्यामुळे त्यांच्याशी 'समेट' करणे योग्य नाही !' या पत्रात दुसराहि कांही नालस्तीचा मजकूर असावा असे वाटते. कारण ते पत्र सब्जेक्ट कमिटीपुढे ठेवण्यास योग्य नाही, असे भूपेंद्रनाथ बसू यास वाटून त्यानी याऐवजी लोकास दाखवावयास दुसरे पत्र पाठवा, असे ना. गोखल्यांना कळविले व त्याप्रमाणे लेखणी सावरून ना. गोखल्यानी दुसरे पत्रहि पाठविले, या गोष्टी आता जाहीर झाल्या आहेत ना. गोखल्यानी हे पत्र पाठविले इतकेच नव्हे तर, समेटाबद्दलचे बोलणे सब्जेक्ट कमिटीत हाणून पाडण्यासाठी येथून आपल्या शिष्यांपैकी काही मंडळीस डेलिगेट म्हणून मद्रासेसहि पाठविले होते. सब्जेक्ट कमिटीत हा विषय जेव्हा प्रथम आला तेव्हा समेटास बहुतेक मंडळी अनुकूल होती. पण ना. गोखल्याच्या पत्रातील विचार भूपेंद्र बाबूंनी जेव्हा सब्जेक्ट कमिटीस कळविले तेव्हा सब्जेक्ट कमिटीत सर्वांची अशी समज झाली की रा. टिळक हे "सरकारला बहिष्कार टाकणारे" म्हणजे " Boycott of Government " करणारे आहेत. बिझांटबाईची हीच समजूत झाली होती, म्हणून त्यानी रा. टिळक याजपासून याबद्दल तारेने खुलासा मागविला; आणि "मी सरकारला बहिष्कार टाकावा असे कधीच म्हटले नाही, राष्ट्रीय पक्षाचे प्रमुख लोक म्युनिसिपालिट्यातून वगैरे कामे करीत आहेत." असा जेव्हा रा. टिळकानी तारेने जबाब दिला तेव्हा बिझांटबाईनी ती तार दुसरे दिवशी सब्जेक्ट कमिटीत वाचून दाखविली. तार वाचून दाखविल्यानंतर ना. भूपेंद्रनाथ बसू यानी ना. गोखल्यांच्या पत्राच्या आधारे रा. टिळकावर केलेला आरोप प्रसिद्धपणे परत घेऊन दोनतीनदां त्याबद्दल सब्जेक्ट–कमिटीत उघड दिलगिरी प्रगट केली. पण गुप्त पत्राचा जो गुप्त परिणाम झाला होता तो कायमच राहिला, आणि समेटाचे बोलणे अजिबात रद्द होण्याऐवजी कमिटी नेमून कालावधीवर ढकलण्यात आले. याप्रमाणे खरी हकीकत आहे. व त्यात कोणी सप्रमाण एखादी चूक दाखविल्यास आम्हास वाईट न वाटतां उलट समाधानच होईल. पण आम्ही जी चौकशी केली आहे तीवरून हे समाधान आम्हास केव्हा तरी मिळेल अशी आम्हास आशा नाही. समेटाचे बोलणे मोडण्यास गोखल्यांच्या गुप्त पत्रापासून सुरुवात झालेली आहे ही गोष्ट

निर्विवाद आहे. तत्पूर्वी सर्व कांही सुरळीत चाललें होते. पण ना. गोखल्यांच्या गुप्त पत्राचा त्यावर बिब्बा पडल्यावर सर्व काही चिघळले अशी स्थिति आहे. हे गुप्त पत्र साधार का निराधार होते हा स्वतंत्र प्रश्न आहे व ना. गोखले किंवा भूपेंद्रनाथ बसू यापैकी कोणी तरी ते पत्र अस्सलबरहुकूम सर्व प्रसिद्ध करीपर्यंत या प्रश्नाचा समाधानकारक निकाल होणे शक्य नाही. समेटाचे सर्व बोलणे जर उघड उघड मोकळ्या मनाने चाललेले होते तर ना. गोखले याना **गुप्तपत्राचा** हा घाणेरडा मार्ग स्वीकारण्याचे कारण काय? ते आम्हास समजत नाही. आणि यासाठीच अमृतबझार पत्रिकेने त्याला **गुप्तघात** हे नाव दिले आहे. ना. गोखले यांच्या हातून घाईने ही **गुप्त**पणाची चूक झाली असेल नाही कोणी म्हणावे? पण चूक झाली असल्यास किंवा गुप्तात एखादी **गुप्ति** नसल्यास, गोखल्याच्या बच्चयानी किंवा त्यानी नाही तर खुद्द ना. गोखल्यानी ते पत्र प्रांजलपणे अस्सलबरहुकूम प्रसिद्ध करून हा घाणेरडा तंटा मिटवावा हेच आमच्या मते सभ्यपणाचे लक्षण होय. **गुप्त** पत्र **गुप्त** पेटीत ठेवून कुली लोकांच्या अंगावर सोडणे किंवा सुटलेली संथपणाने पाहणे योग्य नाही. "Boycott of Government" हे शब्द आपल्या पत्रात नाहीत असे ना. गोखले म्हणतात. ठीक आहे. पण दुसरे याच आशयाचे शब्द त्यात नाहीत ना? असे जेव्हा गोखल्यास विचारण्यात आले तेव्हा तुम्हीच उलट 'सरकारचा बहिष्कार' याचा अर्थ काय करिता ते सांगा म्हणजे मी उत्तर देतो असे गोखले म्हणतात. पण ही कारकुनी न समजण्याइतके इतर लोक मूर्ख नाहीत. पत्र लिहिले गोखल्यानी आणि त्यामुळे—केवळ त्याचमुळे—सब्जेक्ट कमिटीतील लोकांची किंबहुना बिझांटबाईची व भूपेंद्रनाथांचीहि टिळक "**सरकारला बहिष्कार**" टाकणारे आहेत अशी समजूत झाली. ही समजूत खोटी आहे असे कळल्याबरोबर भूपेंद्रनाथ बाबूनी आपले शब्द सभ्यपणाने परत घेऊन माफी मागितली. पण ना. गोखले हे शब्द किंवा यासदृश शब्द पत्रात होते की नाहीत सांगत नाहीत व पत्रहि प्रसिद्ध करीत नाहीत. इतकेच नव्हे तर आपल्या बगलबच्चयाकडून रा. टिळकावर शिव्यांचा भडिमार करवीत आहेत! याला सभ्यपणा म्हणावयाचा गरीबपणा म्हणावयाचा की दुसरे काही नाव द्यावयाचे याचा वाचकानीच विचार करावा. आमचे तर असे मत आहे की हे पत्र अधिकाधिक दाबून ठेवून त्यातील शब्दाचे किंवा विचाराचे मनसोक्त समर्थन करण्याचा जितका जितका अधिक प्रयत्न होईल तितके तितके लोकांचे मन त्याबद्दल अधिकच साशंक होत जाईल. गोपाळकृष्णाच्या खेळगड्यानी ही गोष्ट विशेषतः लक्षात ठेविली पाहिजे. उगाच कॉलमच्या कॉलम खरडून लेखणीस शीण देण्यात काही हशील नाही. यापेक्षा

## गोखल्यांचे पत्र पाहिल्याने प्रसिद्ध करा

त्यात रा. टिळकावर केलेले आरोप खरे असतील तर ते आनंदाने कबूल करतील. ताक मागावयास येऊन भांडे लपविण्यात काही हशील नाही. भांडे

दाखवा. तोंपर्यंत तुमचा पक्ष कच्चा, गुप्तघाताचा आणि उत्तर देण्यासहि अयोग्य आहे, असे कोणाहि समंजस मनुष्याचे मत झाल्यास त्यात 'केसरीगीते' कडे काही दोष नाही. ना. गोखल्यांचे पत्र अद्याप प्रसिद्ध झालेले नाही. परंतु मौज अशी की, त्याचे समर्थन करताना 'टिळक सरकारास बहिष्कार टाकणारे आहेत' हे सिद्ध करण्यास रा. टिळकांच्या एका भाषणाचा उल्लेख ज्ञानप्रकाशाने केला आहे! पण आपण काय करतो हे या लेखकाच्या ध्यानात आले नाही. 'टिळक सरकाराला बहिष्कार घालणारे आहेत' हे सिद्ध कशासाठी करावयाचे? ना. गोखल्यांच्या पत्रातील मजकूर सिद्ध करण्याकरिता. तर मग ना. गोखल्यांच्या पत्रात (Boycott of Government) हे शब्द होते म्हणावयाचे. आणि गोखले म्हणतात की, हे शब्द नव्हते. तेव्हा यापैकी खरा कोण? लिहिणारा का समर्थन करणारा? आम्हाला काही याचा निकाल होत नाही. करिता आपापसातील ही झटापट गुरु-शिष्यानीच सोडवून दाखवावी, अशी त्यास आमची विनंति आहे रा. टिळकावर आरोप सिद्ध करण्याकरिता ज्ञानप्रकाशकार १९०७ साली झालेल्या रा. टिळकांच्या एका भाषणाचा उल्लेख करितात. पण याच भाषणाचा कलकत्त्याच्या दुसऱ्या पत्रातून दुसऱ्या प्रकारचे रिपोर्ट आलेले आहेत, अर्थात् हा एकच रिपोर्ट विश्वसनीय मानिता येत नाही, या गोष्टीवर ज्ञानाचा प्रकाश न पडता अज्ञानाच्या अंधकारात ती गडप झालेली आहे. पण यावर दुसरे उत्तर असे आहे की, हे उतारे यापूर्वी गोखल्यास ठाऊक होते की नाही? असले तर दोन वर्षापूर्वीच समेटाचे बोलणे त्यानी का केले? रा. टिळक नव्हते म्हणून केले असे उत्तर कोणी देईल तर रा. टिळक आल्यावरही पुनः कॉन्स्टिटयूशनमध्ये दुरुस्ती करण्याच्या ठरावाचा मसुदा बिझांटबाईस त्यानी का करून दिला? यावर त्यांच्या एका इतिहासज्ञ मित्राने अशी कोटि लढविली आहे की, टिळकास शिक्षा झाल्यामुळे त्यांची मते बदलली असतील अशी गोखल्यांची समजूत होती. पण या महामूर्खाला असे कळले नाही की, पूर्ण विचारांती शास्त्रीयरीत्या बनलेली मनुष्याची मते बदलण्यास तुरुंग हे कधीच कारण होत नाही. निदान टिळक आणि गोखले यांचा आज पुष्कळ वर्षांचा जो परस्परांचा संबंध आहे त्यावरून त्यास तरी ही गोष्ट कळावयास पाहिजे होती हे निर्विवाद आहे. पण करतात काय? समेटाचे बोलणे स्वतः उपस्थित करून काही कारणामुळे ते बदलण्याची वेळ आली तेव्हा मतात बदलाबदल झाल्याच्या जबाबदारीचे गाठोडे दिले सुब्बारावांच्या खुंटीस अडकवून आणि झाले मोकळे! दुसरे काय? ज्ञानप्रकाशकारानी टिळकांच्या भाषणाचा जो उल्लेख केला आहे त्यास आणखी असे उत्तर आहे की हे भाषण कलकत्त्यास वंगभगाची चळवळ जारीने चालू असता विलायती मालाचा बहिष्कार व स्वदेशी हे निःशस्त्रप्रतिकाराचे उपाय लोक अमलात आणीत असता केलेले आहे आणि टिळक या वेळी जे काही बोलले ते निःशस्त्रप्रतिकारास उद्देशून असून या निःशस्त्रप्रतिकारात मालाच्या बहिष्कारापासून कर न देण्यापर्यंत सर्व गोष्टींचा समावेश होतो

असे स्वतः ना. गोखल्यानीच स्पष्ट कबूल केले आहे. निःशस्त्रप्रतिकार हा सरकारापाशी रुसवा आहे; " सरकारचा " बहिष्कार नव्हे. रुसवा केला तरी सरकारापासूनच हक्क मागून घेण्याचे असल्यामुळे तो कायदेशीर आहे आणि ' सरकारचा ' बहिष्कार तसा होत नाही. टिळक यानीच नव्हे तर बाबू सुरेंद्रनाथ किंवा बाबू भूपेंद्रनाथ यानी किंवा इतर बंगाली पुढाऱ्यानी त्या वेळी अशाच प्रकारची किंबहुना याहून कडक भाषणें बंगाल्यात केलेली आहेत. तथापि हे गृहस्थ कॉंग्रेसमध्ये येण्यास अपात्र आहेत असे कोणी म्हटले नाही व म्हणतहि नाही. मुलगा ज्याप्रमाणे बापाशी हट्ट करतो त्याप्रमाणे प्रसंगविशेषी सरकाराशी हट्ट किंवा रुसवा करणे निराळे, आणि सदासर्वदा सरकारला बहिष्कार टाकणे निराळे. प्रसंगोपात्त पहिला मार्ग स्वीकारावा लागतो ही गोष्ट टिळकानी अनेक ठिकाणी सांगितली आहे परंतु दुसरा मार्ग त्यानी कधीहि प्रतिपादिला नाही किंबहुना तो वेडेपणाचा आहे असे म्हटले तरी चालेल. पण हे सूक्ष्म भेद डोके एकीकडे तर लेखणी एकीकडे अशी जेथे स्थिति आहे तेथील लेखणीहाक्यांच्या लक्षात कसे येणार ? टिळकाना कोणीकडून तरी मारावयाचे, आणि ते सरकारच्या विरुद्ध आहेत असे जाहीर केले म्हणजे आयतीच त्यांची वाट लागेल, यापेक्षा यांचा दुसरा काही विचार नसतो. पण या सद्गृहस्थास आमचे एवढेच सांगणे आहे की, आता हा धंदा पुरे झाला किंबहुना त्यातील बीज सरकारासहि समजले आहे तेव्हा आता बऱ्या गोष्टीने मुद्यावर या कसे ? गोखल्यांच्या गुप्त पत्राने समेट बिघडला हे निर्विवाद आहे. मग तुमच्या गुरूच्या पेटीत तुम्हास ते पत्र सापडल्यास प्रसिद्ध करा आणि स्नान करून मोकळे व्हा म्हणजे झाले.

गोखल्यांच्या पत्रामुळें 'टिळक' सरकारचा बहिष्कार करणार आहेत अशी सब्जेक्ट कमिटीत समजूत झाली ही गोष्ट निःसंशय आहे. आता त्याच्या समर्थनार्थ टिळक सुब्बराव यांचे संभाषण पुराव्यास म्हणून ज्ञानाचे खंदक पुढे आणतात त्यातील तथ्य काय ते पाहू. टिळक आणि सुब्बाराव यांचे मोकळ्या मनाने दोन चार तास संभाषण झाले ही गोष्ट कोणासहि नाकबूल नाही. हे संभाषण झाल्यावर त्यातील मुद्याबद्दल गैरसमज होऊ नये म्हणून सुब्बाराव यानी त्या रात्री व दुसऱ्या दिवशी त्यातील मुद्याच्या गोष्टी हाताने लिहून काढल्या, व या टिळकांच्या पहाण्यातहि आल्या नसत्या. पण दुसऱ्या दिवशी सकाळी त्यास पूर्वी न कळविता टिळक त्यांच्या परत भेटीस गेले. तेव्हा बरोबर रा. केळकरहि होते. तेव्हा सुब्बारावानी आपल्या हाते लिहिलेला हा लेख टिळकास वाचून दाखविला आणि त्यात काही सुधारणा हवी असल्यास सांगा असे विचारले तेव्हा रा. टिळकानी तो लेख सुब्बारावास पुनः वाचावयास सांगितला व सुब्बाराव तो वाचीत असता त्यात दोन चार ठिकाणी शब्दाचा भेद करण्यास सांगितला. नंतर त्याप्रमाणे सुब्बारावानी आपल्या हाताने काही शोध घातले आणि टिळकानी हा लेख आता चालेल असे सांगितले. चालेल असे म्हणण्याचे कारण असे की एक तर सुब्बा-

राव यास सुचविलेले सर्वच शोध त्यानी दाखल केले असे नाही. ते तसे केले असते तर या लेखाचे स्वरूप वेगळे झाले असते. दुसरे असे की तुमचे म्हणणे तुम्हीच लिहून द्या असे सुब्बाराव यानी सागितले असते व ते टिळकांचे टिळकानीच लिहून दिले असते तर त्याचे स्वरूप याहून आणखी निराळे झाले असते. असो. नंतर सुब्बाराव तो लेख मद्रासेस घेऊन गेले. त्यांच्या कडून आलेल्या लेखाच्या नकलेचा तरजुमा खाली दिला आहे.

## टिळक-सुब्बाराव संभाषण

ना. सुब्बाराव यानी आपल्या आपण लिहिलेल्या व टिळकांच्या सूचनेवरून स्वहस्तानेच दुरुस्त केलेल्या इंग्रजी मजकुराचे भाषांतर खाली दिले आहे.

सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी.

पुणे ता. ९ डिसेंबर १९१४

" नॅशनॅलिस्ट पक्ष म्हणजे ज्याना जहाल पक्ष असे नाव देण्यात येते तो राष्ट्रीय सभेतलाच एक पक्ष आहे. फक्त त्यातल्या त्यात तो अघाडीचा किंवा इतराच्या मानाने किंचित पुढे पाऊल टाकणारा असा पक्ष आहे. पण त्याचे धोरण सामान्यतः सरकाराविरुद्ध सनदशीरपणाने तक्रार करण्याचे असते; व ज्याना कॉन्स्टिटयूशनॅलिस्ट म्हणतात त्या मवाळांचे धोरण सामान्यतः सरकारच्या बाजूला राहण्याचे असते. दोघाचे ध्येय एकच म्हणजे साम्राज्यान्तर्गत स्वराज्य मिळविणे हेच आहे. हे ध्येय मिळविण्याच्या रीतीतला हा जो फरक तोच दोहो-पक्षातला फरक.

" राष्ट्रीय पक्षाचे लोक राष्ट्रीय सभेत जाण्यास मनाने तयार आहेत व होते. पण या सभेची घटना, विशेषतः प्रतिनिधि निवडण्यासंबंधाचे नियम आपला अपमान होईल अशा रीतीने बनविले गेले आहेत असे त्याना वाटते. हल्लीच्या कॉंग्रेस कमिटीच्या द्वारे आत येण्याची त्यांची इच्छा नाही. कोणास आत घ्यावे अगर न घ्यावे यासंबंधाचे वाटतील तर नियम करण्यात यावे पण ज्याला ताळ ना तंत्र अशा अनियंत्रित रीतीने हा माणूस अमकातमका किंवा असातसा आहे म्हणून आम्ही त्याला आत घेऊ अगर घेणार नाही असल्या अरेरावीला राष्ट्रीय पक्षाची हरकत आहे व याचकरिता आपल्या संस्थाना प्रांतिक कॉंग्रेस कमिटीकडून अधिकारपत्र मागण्याची त्यांची इच्छा नाही. जर स्वतंत्र व पृथक् असे मतदारसंघ ( अर्थात् कान्स्टिटयूशनचे नं० १ चे कलम मान्य कर-तील असेच संघ ) निर्माण करण्यात येतील व त्याना केवळ वरील कलम मान्य केल्यामुळे आपल्याआपण व इतर कोणाकडे याचना न करिता आपल्या सभा किंवा आपण बोलावलेल्या जाहीरसभा यातून प्रतिनिधि निवडण्याचा हक्क मिळेल तर राष्ट्रीयसभेत जाण्याची त्यांची इच्छा आहे.

" हे घडून आल्यास जरूर तर पूर्वीप्रमाणे निवडणुकीचा मार्ग याहून अधिक खुला करण्याची खटपट करण्याचा त्यांचा इरादा आहे. तसेंच आपल्या काम करण्याच्या रीतीसंबंधाने लोकमत जागृत करून व शक्य तर खुद्द राष्ट्रीयसभेत बहुमत मिळण्याची खटपट करून सदर सभेकडून या रीतीस संमति मिळविण्याचाहि त्यांचा इरादा आहे. राष्ट्रीय सभेतील बहुमताच्या निकालाने आपण बांधले गेलो आहो ही गोष्ट त्यास आज मान्य आहे व पूर्वीहि होती. हे बहुमत त्यास प्रतिकूल असेल तर आपल्या बाजूला लोकमत वळेपर्यंत ते थांबतील; बहुमतवाल्याशी भांडण करून राष्ट्रीय सभा सोडून जाण्याचा त्यांचा विचार नाही.

" वर सांगितल्याप्रमाणे स्वतंत्र मतदारसंघ निर्माण न होतील तर राष्ट्रीय सभेबाहेर राहावे व कदाचित् स्वतःचा राष्ट्रीय संघ स्वतःच्या धोरणानुरूप बनवून राष्ट्रीय सभेशी संबंध न ठेवता आपले काम करीत जावे हेच त्यास अधिक बरे वाटेल. "

दोन मनुष्ये आपापसात जे काय ठरले त्याबद्दल गैरसमज राहू नये म्हणून शब्दानी पांढऱ्यावर काळे करून जेव्हा व्यक्त करतात तेव्हा त्यातील मजकुराबद्दल अमक्याच्या इतर बोलण्यावरून माझी तमकी समजूत झाली असे सांगत बसणे खर्वस्वी असभ्यपणाचे व अन्यायाचे आहे व हा नियम केवळ लौकिकांतच चालतो असे नव्हे तर कायद्यातहि स्वीकारलेला आहे म्हणून अशा प्रसंगी सुब्बारावांच्या बोलण्यावरून माझी अशी समजूत झाली असे बोलणाऱ्या किंवा लिहिणाऱ्या गृहस्थास ' अशी समजूत होणारे तुम्ही मूर्ख आहां ' यापेक्षा काहीएक उत्तर नाही. तोंडातोंडी कितीहि बोलणे झाले तरी कागद करावयाचा तो कशासाठी? पुढे गैरसमज होऊ नये म्हणून. आणि तो कागद बाजूला ठेवावयाचा, आणि कित्येक तासपर्यंत झालेल्या भाषणातील कोणास– किंबहुना खुद्द संभाषण करणारास आठवत असलेले शब्द आपल्या समजुतीच्या समर्थनार्थ पुढे आणावयाचे हा संभावितपणा नव्हे, आचरटपणा होय; आणि एवढी साधी गोष्ट ज्याना कळत नाही त्यानी वादविवादात पडू नये हे चांगले. सुब्बारावाचे आणि टिळकांचे अखेर काय ठरले ते वर प्रसिद्ध केलेला मूळ लेखाचा तरजुमा वाचला म्हणजे वाचकास सहज कळून येईल. हातचे कंकण आरशात बघण्याचे काही कारण नाही. राहता राहता बिझांटबाई आणि टिळक यांचे दरम्यान तारेने जो व्यवहार झाला तेवढाच शिल्लक राहिला. या बाबतीत ज्ञानप्रकाशकारानी निवळ खोटी बातमी प्रसिद्ध केली आहे. मिसेस बिझांटबाईनी टिळकांस जी तार केली ती खाली लिहिल्याप्रमाणे होती:—

Moved amendment. Debate adjourned. It is said by opponents you favour boycott of Government. I say you do not. Wire which is truth. ( Reply prepaid ).

रा. टिळक यानी या तारेस जे उत्तर पाठविले तेः—

I have never advoca ɔd Boyc ott of Government. Prominent Nationalists have and are serving in Municipalities and Legislative Councils and I have fully supported their action both privately and publicly.

या तारांवरून टिळक "Boycott of Government" करणारे म्हणजे सरकारला बहिष्कार घालणारे आहेत अशी गोखल्यांच्या पत्राने सब्जेक्ट कमिटीत व खुद्द बिझांटबाईचीहि समजूत झालेली होती हे व्यक्त आहे. पण गोखल्यांच्या पत्राने बिझांटबाईची व भूपेंद्रबाबूचीहि अशी समजूत झाली ही गोष्ट ज्ञानप्रकाशकारास कबूल करावयाची नसल्यामुळे त्यानी बिझांटबाईच्या तारेतील of Government (सरकारचा) हे शब्द शिताफीनें गाळून टाकून Boycott (बहिष्कार) असा नुसता शब्दच कायम ठेविला आहे. वादाचा प्रश्न सरकारच्या बहिष्काराबद्दलचा आहे नुसत्या बहिष्काराबद्दलचा नव्हे हें लक्षात आणले म्हणजे of Government ( सरकारचा ) हे शब्द वगळण्यात गोखल्यांच्या शिष्यानी लुच्चेगिरी नसली तरी अक्षम्य चुकी किंवा मूर्खपणा केला आहे असें दिसून येईल. तसेच टिळकानी बिझांटबाईस जे उत्तर पाठविले ते प्रसिद्ध करताना Personally हे शब्द आपल्याच पदरचे घुसडले असून पुढील भाग म्हणजे राष्ट्रीय पक्षातील लोक म्युनिसिपालिट्या व कायदेकौन्सिलात कामे करीत होते व आहेत असा जो आपल्या म्हणण्याच्या दृढीकरणार्थ दाखवलेला पुरावा तोहि वगळलेला आहे. अर्धवट संभाषणातील तुटक शब्द सांगणे किंवा एकमेकामधील झालेल्या पत्रव्यवहारातील किंवा तारातील महत्वाचे शब्द वगळून त्या प्रसिद्ध करणे या गर्ह्य युक्त्या करण्यास जे मागेपुढे पाहात नाहीत त्यांच्या लेखावर किती विश्वास ठेवावा किंवा त्यांच्या म्हणण्यास किती मान द्यावा हे वाचकानीच ठरविले पाहिजे.

## समारोप

सरतेशेवटी आमचे एवढे सांगणे आहे की हा वाद यापुढे अशा तऱ्हेने चालविण्यात काही अर्थ नाही. राष्ट्रीय पक्षातील लोकास मवाळांच्या कॉंग्रेस कॉंग्रेसांत घ्या अगर घेऊ नका पण त्यासाठी गुप्त लेखाचे किंवा कृत्याचे उपाय योजू नका किंवा राष्ट्रीय पक्षातील लोक जे उघड उघड बोलतात त्याचा विपर्यास करून सरकारचा गैरसमज करू नका. गोखले काय आणि टिळक काय दोघांच्याही गोवऱ्या आता बहुतेक ओंकारेश्वरावर गेल्या आहेत असे म्हणण्यास हरकत नाही. टिळक कॉंग्रेसमध्ये आले तर ती कबजात घेतील या म्हणण्यात काही हाशील नाही. कॉंग्रेस राष्ट्रीय आहे टिळकांची नव्हे किंवा गोखल्यांचीहि नव्हे. कॉंग्रेसचे धोरण काय असावे हे कॉंग्रेसने ठरवावयाचे आहे अमुक एका व्यक्तीने नाही. म्हणून कॉंग्रेसमधल्या प्रत्येक मनुष्यास आपली मते कॉंग्रेसपुढे ठेवण्याचा व त्यांच्या बहुमताने निर्णय करून घेण्याचा हक्क आहे आणि ही मते

जोंपर्यंत कायदेशीर आणि सनदशीर असतील तोंपर्यंत ती कोणीहि सभेपुढे आणल्यास आणि सभेने वादविवादाअंती ती ग्राह्य आहेत असे ठरविल्यास 'हा मनुष्य भयंकर आहे! हा कॉंग्रेस काबीज करील' असे म्हणणे किंवा भीति बाळगणे म्हणजे हिंदुस्थानातील हजारो शहाण्या लोकास मूर्ख ठरवून आपल्याच नेमस्तपणाचा व शहाणपणाचा टेंभा मिरवण्यासारखे आहे. ज्याना हा मार्ग स्वीकारावयाचा असेल त्यानी तो खुशाल स्वीकारावा. परंतु एवढे पक्के लक्षात ठेवावे की कॉंग्रेसचे याने पोषण न होता घात मात्र होईल. राष्ट्रीय पक्षास ही गोष्ट करावयाची नाही म्हणूनच त्याने खुलासेवार व मोकळेपणाने आपली काय मते आहेत ती जाहीर करून कॉंग्रेसमध्ये गेल्यानंतर रीतसर कायदेशीर आणि बहुमताचा निर्बंध पाळून आपला उद्योग चालू ठेवण्याचा संकल्प मवाळास कळविला आहे. मुंबईच्या लोकास राष्ट्रीय पक्ष नको असला तरी सध्या राष्ट्रीय सभेत असलेल्या सर्व हिंदुस्थानातील लोकास तो नकोसा झालेला नाही म्हणून मुंबईच्या मवाळ पुढाऱ्यानी या बाबतीत आग्रह धरू नये निदान राष्ट्रीय पक्ष सरकारला बहिष्कार टाकणारा आहे इत्यादि खोटेनाटे आरोप आणि तेहि गुप्तपणाने त्यानी करू नयेत हे चागले. तुह्माला पळवत नसले तर पळू नका पण लोकांचे पाय का ओढता? राष्ट्रीय पक्षाचे हेतु मवाळांच्या हेतूइतकेच सद्बुद्धीचे आणि देशहिताचे आहेत हे त्यास कळू नये इतके काही ते मूर्ख नाहीत. पण भित्रेपणाने म्हणा अभिमानाने म्हणा मत्सराने म्हणा किंवा स्वतःच्या हातातच कॉंग्रेसचा एकमुखी रुद्राक्ष राहावा अशा बुद्धीने म्हणा किंवा अखेर या राजकीय बाबतीत एकमेकात दुही झाल्यामुळे सरकारास कसे फावते हे नीट लक्षात न आल्यामुळे म्हणा राष्ट्रीय पक्षास हाणून पाडण्याचे आमच्या इलाख्यातील मवाळांचे उद्योग चालू असतात. हे उद्योग ज्या दिवशी संपतील तो सुदिन म्हणावयाचा!

(केसरी ता. ९ फेब्रुआरी १९१५)

# भाग २ रा

[ सन १९१६ ]

## ( १ ) अनुकूलतेची भरती

१९१५ च्या डिसेंबर महिन्याच्या प्रारंभापासूनच केसरीत हिंदी स्वराज्य-संघावर अग्रलेख लिहिण्याला सुरवात झाली होती. व सर्व डिसेंबर महिनाभर ही लेख-माला चालू होती. या लेखमालेत साधारणतः कोणत्या विचाराचे प्रतिपादन करण्यात आले असेल याची वाचकाना कल्पना असल्यामुळे आणि पुढे हिंदी स्वराज्यसंघाच्या हकिकतीत हा थोडा भाग येणार असल्यामुळे त्याविषयी माहिती देऊन आम्ही येथे जागा अडवीत नाही. पण १९१६ च्या प्रारंभापासून आपल्या तक्रारी बहुतेक दूर झाल्यामुळे राष्ट्रीय सभेत तर जावयाचेच पण त्याबरोबर इकडे होमरूलची चळवळ देखील चालू ठेवावयाची असे सजोड धोरण टिळकानी ठरविले. मुंबईचा ठराव एकच पण तीन्ही पक्षाना तो जवळ जवळ सारखाच मान्य झाला. नेमस्त म्हणाले " पुढच्या वर्षापर्यंत आता राष्ट्रीय सभेत होमरूल लीगचे नाव ऐकू येणार नाही. जवळ जवळ प्रतिज्ञापत्रकाचे शब्द घेऊनच स्वराज्याचा ठराव रचला गेला. बेझंटबाईची उपसूचना नामंजूर झाली. स्वराज्याची योजना करण्याकरिता ऑल इंडिया काँग्रेस कमिटीला हुकूम दिलेला आहे तथापि तिजकडून ती घटना लौकर तयार होण्याची आशाच नको. " इकडे बेझंटबाई मनात म्हणाल्या की " माझी उपसूचना फेटाळली पण स्वराज्यविषयक योजना करण्याचा हुकूम झाला. आता मी ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या मागे लागून आपले काम करून घेईन. " अँग्लो-इंडियन पत्रे म्हणोत की 'बाईच्या होमरूल लीगच्या होडीवरचे निशाण नेमस्तानी काढून टाकले.' पण ते निशाण मी आता त्यांच्या जहाजावरच फडकवावयास लावीन. प्रांतानिहाय काँग्रेस कमिट्या स्थापण्याची आज्ञा झाली आहे. अर्थात् तिचा फायदा त्यातल्यात्यात जे अधिक उद्योगप्रिय असतील त्यानाच मिळेल." बाईच्या उपसूचनेत हिंदी लोक स्वराज्यास लायक झाले असल्याविषयी जो मुद्दा होता तो लोकाना विशेष चित्ताकर्षक वाटला व त्याची चर्चा यापुढे सुरू झाली. निदान आपल्याच लोकानी आपणाला अपात्र ठरवू नये. अँग्लो-इंडियन ते काम करीतच आहेत. या मुद्दयाला उद्देशून ता. १८ जानेवारी १९१६ च्या अंकात केसरीने लिहिले की 'स्वदेशाच्या स्तुतीत न्यायबुद्धि असण्यापेक्षाहि आत्मप्रीति अधिक प्रबळ पाहिजे. आणि सगळ्या जगभर हेच दिसून येते. पण आमच्यातील हिंदी लोकच आपण मनुष्य कोटीत नसून अतिमानुष कोटीत आहोत असा बहाणा करतात. आणि न्यायाशिवाय दुसरी दृष्टीच ते ओळखीत नाहीत. व्यवहारामध्ये सरकारी न्यायाधीशसुद्धा सरकारी काम

संपले म्हणजे आपला पोषाख उतरून ठेवतो व इतर व्यवहारात तो आपला न्यायाधीशपणा विसरून जातो. पण स्वराज्याला हिंदुस्थान अपात्र ठरविणाऱ्या आमच्या कित्येक नेमस्त न्यायमूर्तीना आपली तांबडी झूल आणि शुभ्र अजागलस्तन केव्हाहि उतरून ठेवताच येत नाही. जुन्या पौराणिक नाटकमंडळीतील राक्षस पार्टी नटाप्रमाणे नाटक संपले तरी त्या पोषाखावरील त्यांचे प्रेम संपत नाही. आमच्या न्यायनिष्ठ न्यायमूर्तींना आईबाप या नावाचा विसर पडून घरीदारीसुद्धा ते वादी प्रतिवादी या भाषेतच बहुधा त्यांच्याशी बोलत असावेत. पण त्यांच्या लक्षात हे येत नाही की, सगळेच हिंदी लोक जर स्वतः हिंदुस्थानचा न्याय करण्याला न्यायाधीश होऊन बसू लागले तर तुमच्या त्या हिंदुस्थानला वकील तरी कोण मिळावा? न्यायकोर्टातसुद्धा खुनी कज्ज्यात आरोपीला वकील नसेल तर सरकार आपल्या खर्चाने वकील देते. किंवा न्यायाधीश कोर्टातल्याच एखाद्या वकीलाला तू याचे वकीलपत्र घेऊन काम चालीव असे सांगतो. आणि आरोपीला योग्य न्याय मिळावा म्हणून अवश्य असेल तेथे स्वतःच त्याची वकिली करतो. पण हिंदुस्थान इतक्या शिकंदर कमनशिबाचा आरोपी म्हटला पाहिजे की त्याला स्वराज्योपभोगाविषयीं पूर्ण अपात्रतेच्या गुन्ह्याकरिता फाशी देण्यासाठी काळी टोपी चढवून सर्व परकी मुत्सद्दी व वावदूक तयार झाले असता त्याचा बचाव करण्याला स्वतः हिंदी मुत्सद्यांना वकील म्हणून उभे राहण्याला लाज वाटावी व शिष्टाईचे पीठ सोडून त्यानीच न्यायपीठावर जाऊन बसण्याची हाव धरावी. मात्र त्याना स्वतःला व्यक्तिशः देण्याला वाटेल तितका मोठा अधिकार सरकाराने पुढे केला तर त्याला ते स्वतः मात्र पात्र ठरतात! पंचतंत्रातील गोष्टीत वाघाच्या बच्च्याला चुकून आपले रूप पाण्यात पहावयास सापडल्याने आपण वाघच आहो असे प्रत्याभिज्ञान त्याला झाले. पण हिंदी लोकाना खरे रूप पाहण्याला निश्चळ पाणीच मिळत नाही. आणि प्रत्येक नवा परीक्षक येतो तो स्वार्थाने 'तूं वाघ नाहीस' असेच सागतो. सर सत्येंद्रसिंह यानी आपल्या भाषणात हिंदुस्थानची स्थिती पोलादी काटेरी पिंजऱ्यांत बांधून टाकलेल्या पायमोडक्या पोपटाप्रमाणे झाली आहे असें वर्णन केलें. पण त्याचे दार उघडून दुसरा कोणी देत नाही, अध्यक्षासारखे लोक हे दुःख सोशीत पिंजऱ्यातच बसले पाहिजे असे सांगतात, आणि आमच्यातलेच काही लोक परतंत्रतेचा अनुवाद करतात. रवींद्रनाथ टागोर यांच्या एका कवितेत दोन पोपटांचे संभाषण दिले आहे. स्वैरसंचार करणारा पोपट बंदिवान पोपटाला म्हणतो,

कारागत तूं कसे पसरिसी पंख पंजरागारी!

बंदिवान पोपट उलट त्यालाच विचारतो

अतल गगन हे पद ठेविसि तूं कैसे शून्याधारी!'

असो. मुंबईच्या कॉंग्रेसनंतर नेमस्तापैकींच काही गृहस्थ म्हणजे चिंतामणी गोविंदराघव अय्यर व नागपूरचे पंडित हे पुण्यास आले व त्यात त्यांनी किर्लोस्कर

थिएटरात टिळकांच्या अध्यक्षतेखाली जी व्याख्याने दिली होमरूल लीगच्या तत्त्वाना अनुसरून असेच भाषण केले. आणि आम्ही कॉंग्रेसच्या घटनेची सुधारणा केली आहे आता तुम्ही येऊन आह्मांला मिळा ह्मणजे तुह्मी आह्मी मिळून पुढील कार्य करू असे सांगितले.

बेझांटबाई मुंबईस फक्त उपसूचना करून थांबल्या नाहीत. लवकरच How India wrought for Freedom या नावाचे एक पुस्तक राजकीय शिक्षण देण्याकरिता व स्वराज्याची चळवळ करण्याकरिता त्यानी काढले. त्यांत पूर्वीपासून हिंदुस्थानातील राजकारणाचा इतिहास व आकड्यामुद्यानिशी हकीगत दिली होती. इंडियन रिव्ह्यूच्या जानेवारीच्या अंकात श्रीनिवास शास्त्री यानी असे लिहिले की स्वराज्याला हिंदी लोक आज पात्र नाहीत असा जो आम्हाला प्रश्न विचारला जातो त्याला सर सत्येंद्रसिंह यानी आपल्या भाषणांत मुंबईस उत्तर द्यावयास पाहिजे होते. आणि पूर्वीप्रमाणे मोघम आश्वासने न देता वाटेल तर पंचवीस ह्मणा तीस ह्मणा पण काही ठरीव मुदतीत हिंदुस्थानाला स्वराज्य देऊ असे सरकारने आश्वासन द्यावे अशी मागणी कॉंग्रेसच्या अध्यक्षाने करावयास पाहिजे होती. अशा रीतीने होमरूल लीगच्या चळवळीची प्रस्तावना राष्ट्रीय पक्षाप्रमाणे नेमस्त पक्षातले लोकहि करू लागले होते.

## ( २ ) बेळगावची प्रांतिक परिषद

टिळकांनी १९१६ सालच्या प्रारंभापासून जे सजोड धोरण स्वीकारल्याचे पूर्वी सांगितले त्याचा अंमल करण्याचा उद्योग त्यांनी आता सुरू केला. कॉंग्रेसमधील प्रवेश आणि महाराष्ट्र होमरूल लीगची स्थापना हे दोन विषय चर्चेला काढण्याला एप्रिलात बेळगाव येथे भरणारी प्रांतिक परिषद ही योग्य संधि आहे असे त्यांनी ठरविले. परिषदेच्या तारखा २७, २८, २९ एप्रिल या ठरविण्यात आल्या. फेब्रुवारीच्या १५ व्या तारखेस बेळगावच्या पुढाऱ्यानी परिषदेची जाहीरपत्रके काढण्याची सुरवात केली. स्वागतमंडळ बनवून बेळवी यांना त्याचे अध्यक्ष निवडले आणि विषयाची पूर्वसूचना दिली त्यात कॉंग्रेसच्या घटनेतील दुरुस्ती आणि होमरूल हे विषय प्रामुख्याने घातले.

बेळगावच्या परिषदेंत राष्ट्रीयपक्षाने राष्ट्रीय सभेत शिरण्याचा ठराव केला. त्याबरोबर चळवळीला एक नवेच तोंड लागले. १९०८ पासून १९१५ पर्यंत हा पक्ष राष्ट्रीयसभेला पराङ्मुख झाला होता. पैकी पहिली सहा वर्षे टिळक तुरुंगांत असल्यामुळें त्यांच्या पश्चात राष्ट्रीय सभेत शिरावे का नाही हें धोरण ठरविण्याची जबाबदारी घेण्याची छाती राष्ट्रीय पक्षाची झाली नाही. मध्यन्तरी सातारा येथे राष्ट्रीय पक्षाची सभा भरली तींत या धोरणाचा प्रश्न फारच वादग्रस्त ठरला. पण तेथेहि "उभय पक्षाची तडजोड व्हावी, समेटाचा प्रयत्न व्हावा" इतक्या बेताचेच ठराव पुढे आला होता. राष्ट्रीय सभेत शिरावे असा प्रत्यक्ष ठराव नव्हता. टिळक

तुरुंगांतून सुटून आल्यावर त्यानाहि हे कोडे येऊन पडलेच. ते असे की राष्ट्रीय सभेच्या ज्या घटनेला सुरतेस व त्यानंतर राष्ट्रीय पक्षाने हरकत घेतली ती बहुधा तशीच अमलांत होती. अर्थात पूर्वी जी गोष्ट वर्ज मानली तिचा स्वीकार करणे हे विसंगत ठरते. टिळकांच्या पश्चात त्यांच्या पक्षाचे लोक कोणतीहि तडजोड करून राष्ट्रीय सभेत शिरते तर टिळकांचे काम सोपे झाले असते. पण असे होण्याऐवजी काही प्रमुख लोक अशा अढीचे धोरण धरून बसले होते की वाटेल ते झाले तरी या राष्ट्रीय सभेत म्हणून शिरावयाचे नाही. आणि पुष्कळांनी मनांत अशी आशाहि बाळगिली होती की त्यांच्या पुढारीपणाखाली आपण दुसरी राष्ट्रीय सभा काढू. अशी वेगळी सभा काढण्याची कल्पना टिळकांच्या तुरुंग-वासाच्या पहिल्या वर्षीच निघाली होती. पण तिला सरकारने परवानगीच दिली नाही. आणि त्यापुढे संबध ५ वर्षे फिरून त्या बाजूचा कोणी प्रयत्नहि केला नाही. पण या दोन अडचणीच्या अगदी उलट अशी ही एक अडचण टिळकांना भासत होती ती ही की राष्ट्रीय सभेत न शिरता आपण बाहेर राहिलो तर दुफळी होते. आणि वेगळी राष्ट्रीय सभा स्थापवयाची म्हटली तर लोकांचे पाठबळ मिळावे तितके न मिळाल्याने तो प्रयत्न अगदीच दास्यास्पद होणार. म्हणून त्यांनी प्रथम आपले मनुष्यबल अजमावण्याकरिता स्वतंत्र प्रांतिक सभा भरविली होती व त्यांत यश आले होते. पण याच बळाचा उपयोग राष्ट्रीयसभेत घुसून केला तर अधिक श्रेयस्कर असे वाटून त्यानीं तो प्रश्न आपल्या पक्षाच्या परिषदे-पुढे ठेवण्याचे ठरविले.

एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात पुण्यास एक अपूर्व जाहीर सभा झाली. लॉर्ड हार्डिंज हे स्वदेशाला जाण्याला निघाले होते आणि हिंदुस्थानातील त्यांची कामगिरी एकंदरीने इतकी चांगली झाली होती की त्याविषयी कोणत्याहि पक्षाचा मतभेद नव्हता. म्हणून पुणे जिल्ह्याच्या व नागरिकांच्या तर्फे त्यांजकडे मानपत्र पाठविण्याबद्दल सभा भरवावी असे ठरून ती ता. २९ मार्च रोजी थिएटरात भर-विण्यात आली. अध्यक्षस्थानी डॉ. अण्णासाहेब पटवर्धन हे होते. जिल्ह्यातील अनेक तालुक्यातून संदेश आले होते. मुख्य ठराव कृष्णाजीपंत खाडिलकर यानी मांडला त्यात ‘ संकटाना न जुमानता लॉर्ड हार्डिंज यानी हिंदी लोकांच्या आकांक्षा-बद्दल जी सहानुभूति दाखविली व त्यांच्या उन्नतीविषयी जी खटपट केली तीज-बद्दल ही सभा कृतज्ञता व्यक्त करिते ’ असा होता. ठराव मांडताना खाडिलकर यानी लॉर्ड हार्डिंज यांच्या कारकीर्दीचे समालोचन करून त्यांच्या व्यक्तिविषयक गुणांचे आणि हिंदुस्थानाविषयी प्रगट केलेल्या सहानुभूतीचे अभिनंदन केले. या ठरावाला टिळकानी पुष्टि दिली व सांगितले कीं लॉर्ड रिपन यांच्यानंतर तीस वर्षानी असा प्रगतिपर व्हाईसरॉय हिंदुस्थानाला लाभला नाही. लॉर्ड कर्झन यानी ज्या आकांक्षा अशक्य कोटीतल्या ठरविल्या त्याच लॉर्ड हार्डिंज यानी न्याय्य व योग्य आहेत असे कबूल केले. इंग्रजी राज्यपद्धतीचा वरवंटा पूर्वीप्रमाणेच हिंदु-

स्थानावर फिरत न ठेवता हिंदी जनतेच्या अंगचे गुण प्रगट होण्याला सवड मिळेल अशा धोरणाने राज्यकारभारात सुधारणा केल्या पाहिजेत ही गोष्ट त्यानी मान्य केली. या सभेवरून दो गोष्टी दिसून आल्या त्या या कीं टिळक हे सरकारावर बहिष्कार घालण्याला तयार झालेले नव्हते. तसा त्यांचा इरादा नव्हता. आणि इंग्रज अधिकारी झाला म्हणून त्याचे गुण घेऊच नयेत अशी शपथ टिळकानी वाहिलेली नव्हती. राष्ट्रीय पक्षामध्ये ध्येयासंबंधी नेमस्तापेक्षा अधिक उतावळेपणा असला तरी विवेकशीलता नव्हतीच असे नाही.

ता. २९ एप्रिल रोजी बेळगाव येथे अठरावी प्रांतिक परिषद भरली. पूर्वी जाहीर केल्यापेक्षा ही सभा दोन दिवस पुढे ढकलण्यात आली होती. सभेचे अध्यक्षस्थान दादासाहेब खापर्डे याना देण्यात आले होते. त्यांचे व टिळकांचे स्वागत सातारा स्टेशनपासून बेळगाव पर्यंत एकसारखे सुरू होते. स्टेशनावर स्वागत समारंभ फार मोठा झाला. जैन लिंगायत इनामदार व्यापारी सर्व प्रकारचे लोक आले होते. स्वागताध्यक्ष बेळवी यानी प्रारंभी वीस वर्षांपूर्वी १८९५ साली वाच्छा यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या प्रांतिक परिषदेची आठवण करून दिली. आणि फेरोजशहा मेथा व गोखले यांच्या संबंधी आदरपूर्वक दुःखोद्गार काढले. अध्यक्ष दादासाहेब खापर्डे हे भाषणात म्हणाले की युद्धात प्रत्यक्ष विजय सरकारच्या हाती पडेपर्यंत राजकीय वादाचे प्रश्न पुढे आणूं नयेत असे कित्येक म्हणतात. पण ती चूक आहे. हक्काना आताच जपले पाहिजे. इंग्लंड यापूर्वीच वसाहतीशी कानगोष्टी करूं लागले आहे मग आम्हालाच तेवढे का विचारीत नाही ! स्वराज्याची मागणी करणे कायदेशीर आहे असे आमच्या एका कमिटीने ठरविले. आणि मग मुंबई महाराष्ट्र वऱ्हाड याच्या पुरता एक होमरूल लीग प्रारंभी स्थापावा असेहि डिसेंबरात ठरले आहे. समेटासंबंधाने खापर्डे म्हणाले की राष्ट्रीय सभेच्या इतिहासांत हळुहळू स्थित्यंतरे होत आली. प्रथम म्हणत प्रांतानिहायच चळवळ करावी. मग ह्यूम यांच्या सल्ल्यावरून सर्व हिंदुस्थानची मिळून ती करावी असे ठरले. मग प्रश्न निघाला की काँग्रेसने ठराव करावे पण त्यांचा अंमल करू नये. १९०५ साली बनारस येथील राष्ट्रीय सभेत प्रगतिपर असे अनेक ठराव लोकानी पुढे आणले पण वतनदार अधिकाऱ्याच्या दडपणामुळे बहुमताला गप्प बसावे लागले. हे ठराव १९०६ साली कलकत्त्यास पास झाले. पण नागपुरास ते पुनः कायम होतील असे पाहून सभा तेथून काढून सुरतेस नेण्यात आली. पण तेथे मोठी फूट पडली. तेथपासून काँग्रेसला नेमस्तपक्षाच्या क्लबाचे स्वरूप आले आहे. पण ते बदलण्याचा प्रयत्न हळुहळू होत आहे व मुंबईस त्याला थोडे यशहि आले. मवाळ व जहाल ही नावे कोणी घेतली कोणी दिली ती चूक की बरोबर कसेहि असले तरी जो तो पक्ष आपला स्वभाव बदलू शकत नाही पण निरनिराळ्या स्वभावाच्याहि पक्षाना एकत्र जमून राष्ट्रकार्य करता येईल.

या बेळगावच्या परिषदेच्या वेळी जी एक गोष्ट आजवर दबून दबून असलेली

प्रथम प्रगट झाली ती म्हटली म्हणजे ब्राह्मणेतरांची चळवळ. ब्राह्मणेतर वादाला प्रगट स्वरूप रा. ब. अरताळ बेळगाव जिल्ह्यातील लिंगायत जातीचे डेप्युटी कलेक्टर यानी आणिले. सरकार पक्षाचे म्हणून टिळकविरोधी आणि लिंगायत म्हणून ब्राह्मणविरोधी अशा दोन भूमिका त्यांच्यामध्ये एकवटलेल्या होत्या. म्हणून त्याना पुढे करून थोड्याशा जैन लिंगायत लोकानी ' ही ब्राह्मणाची सभा ' आहे असे म्हणून प्रांतिक परिषदेचा निषेध करण्याकरिता एक वेगळी सभा भरविली पण तिला अर्थात फार थोडे लोक आले आणि त्याचा तो बेत फसला. कारण खुद्द प्रां. परिषदेलाच ३० जैन ५० लिंगायत व पंधरा मुसलमान प्रतिनिधी आले होते व इतर वर्गांचे ब्राह्मणेतरहि पुष्कळच होते. टिळकांच्या मिरवणुकीला एका लिंगायत सावकारानेच आपली गाडी दिली होती. यानंतर ब्राह्मणेतर चळवळ विशेष जोराने सुरु झाली व तिचा उल्लेख पुढे थोडा येणारच आहे. तथापि या चळवळीचे हे प्रथमदर्शन म्हणून येथे तिच्याविषयी उल्लेख केला आहे.

## ( ३ ) समेटाचा वाद

असो परिषदेत अनेक ठराव मंजूर झाले. त्यांत एक ठराव लष्करातील जागांविषयी व स्वसंसेवका विषयी एक राजकीय कैद्याना मुक्त करण्याविषयी एक होमरूलची योजना तावडतोब तयार करण्याविषयी एक स्वदेशी उद्योगधंद्याविषयी-असे निरनिराळे होते. पण समेटाचा ठराव हा महत्त्वाचा असून त्यात असे ह्मटले होते की टिळक बेळवी बॅप्टिस्टा यांच्या कमिटीने केलेला रिपोर्ट परिषदेला मान्य आहे आणि " स्वदेशाच्या हिताकडे दूरवर दृष्टी देता आणि सध्याची परिस्थिति पाहता दोन्ही पक्षामध्ये समेट होणे इष्ट आहे. म्हणून मुंबईस कॉंग्रेसने घटनेत केलेली दुरुस्ती पूर्ण समाधानकारक नसली तरी ती मान्य करावी आणि राष्ट्रीय सभेत जाऊन अधिक वाटाघाट व खटपट करावयाची. तिजकरिता टिळक खापर्डे बॅप्टिस्टा केळकर बेळवी इतक्या लोकांची कमिटी नेमावी. " या ठरावाला महत्त्वाचा ह्मणण्याचे कारण असे की १९१४ साली सातारा येथे राष्ट्रीय पक्षातल्याच लोकात जशी रणे माजली तशीच ती नागपुरासहि माजली होती. सातारची सभा टिळक मंडाले येथे असताना भरलेली म्हणून तेथे समेटाविरुद्ध असणाऱ्या लोकाना असे सहजच म्हणता आले की या विषयावरील टिळकांची मते कळण्याला मार्ग नाही म्हणून आम्ही काही एखादी गोष्ट करून त्याच्या मार्गात उद्या अडचण उत्पन्न करून ठेवणे बरोबर नाही. हे दिसण्यात ठीक होते. पण सुरतेच्या फुटीनंतर व कन्व्हेन्शनच्या स्थापनेनंतर स्वतः टिळकांनीच समेट होण्याकरिता कमिट्या नेमल्या परिषदेतून ठराव करविले. यावरून एकी करण्याला अनुकूल असे त्यांचे मत स्पष्ट दिसून आले होते ते केवळ तुरुंगात गेल्यामुळे बदलले असे मानण्याचे कारण नव्हते. पण समेटाला अनुकूल असे जे लोक बोलतील त्याना आपल्यातील मवाळ आणि प्रतिकूल बोलतील त्याना आपल्यातील जहाल असे म्हणण्याची रीत काही

लोकाकडून पाडण्यात आली होती. सातान्यास जमलेले लोक बरोबरीचे म्हणून त्यांना उघड विरोध करता आला नागपूरासहि असेच झाले.

हल्लीच्या असहकारितेच्या वादात असा एक प्रश्न निघतोच की नाही की टिळक असते तर त्यानी गांधीचे मत स्वीकारले असते की त्याला विरोध केला असता? पण टिळक हे वारलेलेच असल्यामुळे त्यांचे मत असे असते असे उलट सुलट कोणीहि बोलले तरी त्याला खोडून काढण्याला मार्गच उरलेला नाही. टिळकांचा गांधींच्या तत्त्वाना विरोध झाला असता असे म्हणणारा मरणकालपर्यंतच्या त्यांच्या मताचा उल्लेख आधारभूत म्हणून दाखवूं शकतो. तरी प्रश्न शिल्लक उरतोच की ते त्यांचे मत १९२० सालच्या प्रारंभीचे होते पण इतक्या घालमेली मध्यंतरी झाल्यानंतर त्यांचे मत कसे झाले असते? आणि मग याला मात्र उत्तर देण्याला साधन नाही. कारण टिळकाना कोणाला विचारता येत नाही व त्याना कोणाला सांगता येत नाही. ढवळलेल्या पाण्यात कोळी आपले जाळे टाकून आंधळे झालेले मासे सहज पकडतो असे म्हणतात. त्याप्रमाणे सहकारिता असहकारिता या वादाने लोकमत मूळापासून ढवळून निघालेले पाहून 'प्लँचेटवाल्यानी' थोडासा हंगाम साधण्याचा प्रयत्न केला. आणि एकदोन ठिकाणी असे प्रसिद्ध झाले की केळकरानी असहकारितेला विरोध चालविला याबद्दल टिळक क्रोधाने लाल झाले असून ते केळकराना खाऊ की गिळू असे म्हणत आहेत. पण प्लँचेटची विद्या ही दुतर्फी असते हे त्या बिचान्याना काय माहीत? या टिळकांच्या दिव्यसंदेशाना उलटे उत्तर मिळविण्याला केळकरांच्या स्नेह्याना प्लँचेट चालविण्याचे कारण पडले नाही. कारण त्यावर त्यांचा विश्वास नसून वादातील बाजू परतविण्याकरिताहि त्यानी त्याला स्पर्श केला नाही. पण प्लँचेटवर विश्वास असणान्या लोकात हाच प्रश्न विचारणारे अनेक निघाल्यामुळे कित्येकाना उलटीहि उत्तरे मिळाली! बिचारे टिळक काय? परलोकविद्यासंपन्न लोकांचे ते इतके बंदे होऊन राहिले आहेत की हाकेसरशी ते इतर माहात्म्यांच्या संगतीत गोष्टी बोलत असले तरी धावून मुंबईतील एखाद्या चाळीच्या खोलीत अवतीर्ण होतात. पण त्यांच्या ठिकाणी पक्षपात नसल्यामुळे ते दुतर्फी माणसांच्या बोलण्यावरून येऊन एकाजवळ होय म्हणतात एकाजवळ नाही म्हणतात. मिळून टिळकांच्या निंदकानी जिवंतपणी त्यांच्यावर लपंडावीचे उडवाउडवीचे विसंगत बोलण्याचे या बोटावरची थुंकी त्या बोटावर नेण्याचे आरोप चालविले होते त्यांच्या समर्थनाला अशा रीतीने आणखी पुरावा मिळाला! आणि जुनी जी म्हण की 'जित्याची खोड मेल्याशिवाय नाही' ती बदलून जित्याची खोड मेल्यावरहि जात नाही अशी नवीन म्हण बनविण्यासारखी झाली.

पण आता हा वाद जगाच्या अंतापर्यंत राहणार त्याला इलाज नाही. सांगण्याचा मुद्दा हा की टिळक मंडालेस असता ते परलोकात असल्याप्रमाणेच अगम्य यामुळे हल्लीसारखाच एक वाद तेव्हा निघाला होता. आणि दुर्दैवाने तेव्हा प्लँचेटची विद्या इतकी फैलावली नव्हती. आणि कोणाला ती तेव्हा येत असली तरी त्याने

या कामी ती उपयोगात आणली नाही. कारण एक तर प्लँचेट मृत आत्म्याशीच बोलू शकते कारकी आत्मा निर्जीव आणि प्लँचेटची फळीहि निर्जीव. ती जिवंत-मनुष्याच्या आत्म्याशी कशी बोलेल ? 'सर्वः सगंधेषु विश्वसति' असे कवीने म्हटले आहे. विषमात होणारा तो व्यवहार नव्हे. बरे एखाद्याचे प्लँचेट चाललेच असते तर टिळक सुटून आल्यानंतर त्याला खोटे ठरविण्याचा संभव म्हणून त्या भानगडीत कोण कशाला पडेल ? पण समेटाला विरोध करणाऱ्या काही लोकानी "हो हो टिळक आज समेटाला विरुद्ध आहेत असे आम्ही सांगतो" असे आत्मविश्वासाने सांगितले. पूर्वी सांगितल्याप्रमाणे साताऱ्यासहि तो ठराव झालाच होता पण आता विरोधी लोकावर मोठीच बाजू कोसळली. कारण स्वतः टिळक मूर्तिमंत उभे राहून म्हणू लागले की समेट करणे अवश्य आहे तेव्हा त्याना मोठेच कोडे येऊन पडले. पण तत्त्वापुढे टिळकांनाहि आम्ही मोठे मानीत नाही असे म्हणून एकदा या हालचालीत कोठे तरी एक लढाई दिलीच पाहिजे असे म्हणून बेळगावास खासगी चर्चेत काही लोकानी त्यांच्या तोंडावर कसून विरोध केला.

राष्ट्रीयसभेत आपण गेलो असता काय घडून येणार आहे आणि आपल्या होमरूलच्या चळवळीच्या दृष्टीनेहि ते उपयुक्त कसे आहे हे टिळकानी परोपरीने भविष्याच्या रूपाने चित्रासारखे रंगवून सांगितले. पण प्रतिभेच्या दृष्टीने म्हणजे न दिसणाऱ्या गोष्टी पाहण्याच्या दृष्टीने अधिक सरस असेहि लोक तेथे असता त्यांच्या डोळ्यावर रूढ अशा पूर्वग्रहांची झांपड पडली. वाद बराच विकोपाला गेला. १९०७ साली टिळकाना राजकारण कळत नाही असे म्हणण्याची पुण्यानाशकाकडे जी एक टुम निघाली होती तिचा क्षणभर पुनर्जन्म झाला. आणि समेट करावयाला जाता आपसातच बिघाड व फूट पडते की काय अशी भीति वाटू लागली. पण समेटाला विरोध करणाऱ्या मध्येहि दोन वर्ग होते. एक टिळकांवर व त्यांच्या तारतम्य बुद्धीवर पूर्ण निष्ठा ठेवणारा, आणि दुसरा त्यांच्यासंबंधाने आदरबुद्धि असली तरी 'त्यांचे कोठे तरी चुकते आहे. हा घडा अजून थोडा कोठे तरी कच्चा आहे' असे म्हणून स्वतःच्या पक्केपणाची घमेंड बाळगिणारा यामुळे युक्तिवाद व्हावयाचा तितका झाल्यावर निर्णयाच्या वेळी निष्ठा व संशययुक्त आदर यांच्यातच लढाई जुंपली आणि शेवटी निष्ठावंतानी जय मिळविला. पण टिळकांच्या पेक्षाहि सातारच्या सभेत ज्यांच्यावर हल्ला झाला होता त्यांचाच तो जय विशेष होय. टिळक बॅपटिस्टा बेळवी यांच्या कमिटीने आपला रिपोर्ट ता. १९ एप्रिल १९१६ रोजी प्रसिद्ध केला व त्यालाच या परिषदेत दुजोरा मिळाला. पुढे या सालच्या कॉंग्रेसमध्ये प्रविष्ट होऊन राष्ट्रीय पक्षाने जमेल त्याप्रमाणे घटनेत आणखी दुरुस्त्या करून घेतल्या. पण एकदा तो जाऊन राष्ट्रीय सभेला प्रत्यक्ष मिळाल्यावर समेटाचा वाद अर्थातच राहिला नाही म्हणून त्या रिपोर्टातील तपशील येथे सांगत नाही. असो. समेटाच्या ठरावात "स्वदेशाच्या हिताकडे दूरवर दृष्टि देता व सध्याची

परिस्थिति पाहता समेट होणे इष्ट आहे" हे जे शब्द ठरावात आल्याचे वर दिले आहे त्याचे स्वारस्य या वादावरून कळून येईल.

## (४) समेटाचे शहाणपण

बेळगांवास चर्चा झाली तिच्याविषयी गंगाधरराव देशपांडे यानी आपल्या आठवणीत खालीलप्रमाणें लिहिले आहे. "बेळगावच्या परिषदेपूर्वीच समेटाची वाटाघाट करण्याकरितां टिळकानी काही मंडळीना पुण्यास बोलाविले होते. वाड्यांत सकाळपासून वाटाघाट चालू होती. वाद जोरात चालला. टिळक काही वेळ वादांत भाग घेत व काही वेळ उठून आपल्या माडीवर जाऊन बसत. मला वादाचा कंटाळा आला म्हणून मी त्यांच्या माडीवर जाऊन विचारले, विनाकारण काथ्याकूट का? आपल्या मनांत काय आहे ते स्पष्ट सांगा. असल्या प्रसंगी माझ्या समजुतीप्रमाणे आमची वैयक्तिक मते बाजूला सारून आपल्याच बुद्धीला शरण जाणें योग्य आहे. अशा वेळी पुढाऱ्याचे मत हेच तत्त्व असे समजणाऱ्यापैकी मी आहे. टिळक म्हणाले, 'सर्वानाच असे कोठे वाटते? म्हणून खल झालेला बरा. पण माझ्या मनात क्रीडवर सही करून कॉंग्रेसमध्ये जावे असे आहे. कॉंग्रेसच्या बाहेर राहून काही एक काम झाले नाही.' मी त्याना इतकेच सांगितले की, बेळगांव जिल्ह्याचे मत तुमच्याच बाजूचे आहे असे समजा. बाकी तुम्ही सांभाळा. यावरून टिळकाना आपल्या पक्षातील काही लोकाची समजूत घालण्याला किती जिकीर पडली असेल हे दिसून येईल."

बेळगाव परिषदेत स्वीकारलेल्या धोरणा संबंधाने गंगाधरराव देशपांडे यांचा अनुभव वर दिलाच आहे. पण डॉ. मुंजे यानी या बाबतीत अधिक खुलासेवार लिहिले आहे. ते लिहितात की "क्रीडवर सही करून कॉंग्रेसमध्ये शिरणे ही गोष्ट माझ्या बुद्धीला मुळीच पटत नाही आणि परशुरामाचा व श्रीकृष्णाचा पराभव त्यांचा अवतार संपल्यामुळें जसा झाला तसा कॉंग्रेसमध्ये तुम्ही शिरल्याने तुमचा होणार असे मी जवळ जवळ स्पष्टपणे टिळकांना सांगितले. तरी पण मी असेच म्हणालो की तुम्ही माझ्यापेक्षा अनंत पटीने शहाणे आहा आणि तुमच्या शहाणपणावर माझा पूर्णपणे विश्वास आहे. अर्थात ही श्रद्धेच्या परिक्षेची वेळ आहे म्हणून मी तुमच्या विरुद्ध जाणार नाही. अकल्याण व्हावयाचे असेल तर तुमची आज्ञा पाळून होवो. पण तुम्ही मात्र ही चूक करीत आहा. तेव्हा टिळक मला म्हणाले ' यावेळेस हेच करणे शहाणपणाचे आहे हे तुमच्या लवकरच प्रत्ययाला येईल. ' तिसऱ्या दिवशी टाइम्सने असे लिहिले की, समेटाच्या ठरावाने टिळकानी कॉंग्रेस काबीज केली. तेव्हा माझे डोळे उघडले."

बेळगाव येथील समेटाच्या वादाविषयी गंगाधरराव देशपांडे व डॉ. मुंजे यांच्याप्रमाणेच डॉ. भट यानीहि आपली आठवण सांगितली आहे. ते लिहितात

" ज्या दिवशी हा समेटाचा ठराव यावयाचा होता त्याचे आदले रात्री राष्ट्रीय पक्षातील कट्टरानी एक आपापसात सभा भरविली. मते घेणे चालले तेव्हा एक वृद्ध पुणेरी गृहस्थ मी विरोधी आहे या अर्थी ' I am opposite' असे ओरडला. तेव्हा हशा पिकला. अखेर मते मोजता समेटाच्या विरुद्ध बहुमत पडले. पण भरसभेत समक्ष टिळकाना विरोध करावा कोणी हे ठरेना. मांजराच्या गळ्यात घाट बांधावी हे खरे, पण कोणी बांधावी ? टिळकाना ही गोष्ट कळली तेव्हां दुसऱ्या दिवशी ठराव पुढे मांडताना टिळकानी प्रत्येकाला हडसून खडसून विचारले. आणि विरोध करावयाचा असेल तर 'आता पुढे या' असे म्हणून एकेकाला पाचारण केले. पण त्यांच्या विरुद्ध जाण्याची कोणाचीहि छाती झाली नाही. आणि कोणी संक्षेपाने तर कोणी पाल्हाळाने समेटाला संमतीच दिली ! अशा रीतीने समेटाचे और्ध्वदेहिक करण्याला आलेली मंडळी त्याचा वाढदिवस साजरा करून गेली."

श्रीनिवास सेटलूर यानीहि आपल्या एका आठवणीत असेच लिहिले आहे. "गोखल्याच्या अखेरच्या दिवसात मी त्यांना भेटावयाला गेलो. तेव्हा ते मला म्हणाले वेझंटबाईच्या मार्फत समेटाच्या अटी मी भूपेंद्रनाथ बसू यांचेकडे पाठविल्या आहेत त्या पहा. टिळकांकडे जा. त्यांच्या पक्षात तुम्हाला मानतात. तरी त्या पक्षातील लोक त्या स्वीकारतील असे घडवून आणा पाहू ! त्यानी अटी दाखविल्या व त्या मी पाहिल्या. ते म्हणाले " या अटी सयुक्तिक आहेत की नाहीत ?" मी म्हणालो " या अटी सयुक्तिक आहेत व टिळक त्यातील कोणत्याहि अमान्य करणार नाहीत. " त्यावर गोखले म्हणाले " तुम्ही बोलला हे ऐकून मला फार बरे वाटले. माझी खात्री आहे की या अटी व बंधने स्वीकारूनहि थोड्याच वर्षात टिळक राष्ट्रीय सभा काबीज करतील. " नंतर थोडा वेळ विचार केल्यासारखे दाखवून गोखले म्हणाले " टिळकानी या अटी मान्य केल्या तर आम्हीहि त्या सर्व इमानाने पाळल्या पाहिजेत. कारण टिळकानी आपल्या बाजूला बहुमत मिळविले तर देश त्यांच्या बाजूला आहे असाच त्याचा अर्थ होईल. "

## ( ५ ) होमरूलची चळवळ व दडपशाही

स्वराज्यसंघ स्थापन करण्याचे दुसरे कार्य होते त्याकरिता ता. २८ एप्रिल रोजी बेळगावास संघाची सभा झाली. तीत प्रथमच असा ठराव झाला की, प्रांतिक परिषद व होमरूललीग यांचा अर्थाअर्थी कोणताहि संबंध नाही असे मानावे. पूर्वी डिसेंबर ता. २३, २४ रोजी पुण्यास जी पंधरा लोकाची कमिटी नेमली होती तिची बैठक होऊन लीगच्या सभासदांची नावें करण्याचे काम सुद्धा सुरू झाले. आणि बॅप्टिस्टा हे अध्यक्ष, केळकर हे चिटणीस, गोखले हे दुय्यम चिटणीस, सभासदाची प्रवेश फी दोन रुपये, वार्षिक फी एक रुपया अशी घटना ठरून होमरूल बिल तयार करावे व विलायतेत लोकमत जागृत करण्याची खटपट

करावी असाहि ठराव झाला. तेथून लीगच्या कामाला रीतसर सुरवात झाली. ता. १ मे रोजी या संघाच्या विद्यमाने टिळकांचे पहिले व्याख्यान झाले. आणि यानंतर असा प्रघातच पडून गेला की जेथे जेथे मोठ्या महाराष्ट्रांत व कर्नाटकात जिल्हा तालुका सभा भरतील तेथे तेथे त्याच्याच बरोबर स्वराज्य संघातील लोकांचीहि सभा भरावी आणि सभासद वर्गण्या वगैरे मिळविण्याचे काम करावे.

पुढील महिन्यात बेझेन्टबाई पुण्यास आल्या तेव्हा ता. २२ मे रोजी क्रीडाभुवनात सार्वजनिक सभेमार्फत टिळक अध्यक्ष असता बाईंचे व्याख्यान करविण्यात आले. त्यात त्यानी सांगितले की लोखंड तापलेले असताच ते ठोकून घ्यावे असा उपदेश विलायतेतील मंत्रिमंडळापैकी बोनर लॉ यानी वसाहतीच्या लोकाना केला, तोच आपणालाहि समजून हिंदी लोकानी कार्य केले पाहिजे. टिळकानी सांगितले की लहान सहान मागण्या करण्याचे दिवस गेले. म्हणून आता होमरूल मागण्यालाच आपण प्रारंभ केला पाहिजे.

पण होमरूल लीगची चळवळ सुरू झालेली पाहताच अधिकारी जागे झाले आणि त्यानीहि उलटी चळवळ सुरू केली. प्रेस–अॅक्टाप्रमाणे राष्ट्रीय पक्षाच्या काही वर्तमानपत्रांकडून यापूर्वीच जामीन घेण्यात आला होता. तो आता इतर पत्रांचा घेण्याला सुरवात झाली. नागपूर येथील ‘ महाराष्ट्र ’ पत्राचा जामीन मागण्यात आला व त्यामुळे त्याचा एक अंकहि बंद पडला. ता. २२ मे रोजी इकडे पुण्यास बेझंटबाईंचे व्याख्यान झाले त्याचदिवशी त्यांच्या ‘न्यू-इंडिया’ पत्राच्या छापखान्याचा जामीन घेण्याचा हुकूम निघाला. तो बाई ता. २६ रोजी मद्रासेस परत जाताच त्यांच्यावर बजाविण्यात आला. हुकुमात जामिनकी थोडी म्हणजे दोन हजारांची मागण्यात आली होती व ती भरण्याला दोन आठवड्यांची मुदतहि दिली होती. या हुकुमाविरुद्ध मद्रासेस चळवळ सुरू झाली. ऑल इंडिया काँग्रेस कमिटीकडे ज्या स्वराज्ययोजनेचा विचार करण्याचे काम खुद्द काँग्रेसने सोपविले होते त्याचीच मागणी न्यूइंडिया पत्र करीत असता त्याकडून जामीन का घेण्यात आला? अशी पृच्छा होमरूलच्या चळवळीत सामील नसलेल्या लोकानीहि सुरू केली. दोन हजार रुपये हे बाईंच्या खिसगणतीत नव्हते. पण मुंबईहून त्यांना तार गेली की जामीनाची रक्कम शिवाय पाचशे रुपये आह्मी तुम्हास मुंबईहून पाठवितो. सर सुब्रह्मण्य अय्यर मद्रास हायकोर्टचे एकवेळचे चीफ जस्टिस यानी प्रेस–अॅक्टाच्या या धुमाकुळावर उघड टीका केली. सरकारने अशा रीतीने हात उचलला तरी चळवळीवर प्रत्यक्ष परिणाम काही झाला नाही. टिळक व बेझंटबाई यांची व्याख्याने अधिकाधिक सुरू झाली. मद्रासेकडे होमरूललीगचे जाळे अधिकाधिक पसरू लागले. ‘न्यू इंडिया’ पत्राकडे सहानुभूतीची व प्रतियोगी निषेधाची पत्रे इतकी जाऊ लागली की केसरीने लिहिल्याप्रमाणे त्यांची लांबी यार्डानी मोजण्याची राहिली नसून ती फर्लांगानी मोजिली पाहिजे! या जामिनकीचा व एकंदर सरकारी धोरणाचा इतर पक्षातील

लोकांनाहि विषाद वाटला. प्रेसॲक्ट मंजूर करून घेताना त्याचा उपयोग केवळ अत्याचारप्रवर्तक वर्तमानपत्रांवरच केला जाईल, असे वचन देण्यात आले होते त्याचा भंग झाला अशी हाकाटी सुरू झाली. श्रीनिवास शास्त्री यानी बेळगांवास व्याख्यान दिले त्यात त्यानी सभेटाचे अभिनंदन केले व सांगितले की, होमरूल-च्या पुरस्कर्त्यांची काही काही विधाने आह्माला मान्य नसली तरी, स्वतः कॉंग्रेस जोंपर्यंत आपल्या अजगरीवृत्तीचा त्याग करणार नाही तोंपर्यंत या चळवळीला नाव ठेवता येणार नाही. आणि या चळवळीतील दोष वर्ज्य करून गुण तेवढे घेऊन त्या मार्गाने चळवळ करण्याला राष्ट्रीय सभेला कोणी मना केले नाही.

ता. १ जुलै रोजी पुणे येथे मोठी जाहीरसभा भरून प्रेस–ॲक्ट रद्द करण्याविषयी मागणी करण्यात आली. प्रेस–ॲक्टाबरोबर इंडियन कन्सॉलिडेशन अमेंडमेंट बिल नावाचा एक खोडकर कायदा पुढे आला होता त्याचाहि निषेध करण्यात आला. सभेचे अध्यक्ष ना. कामत हे असून सभेत ना. परांजपे प्रो. लिमये भोपटकर शिवरामपंत परांजपे वगैरे सरमिसळ लोकांची भाषणे झाली. मुंबई-सहि अशा प्रकारची सभा सर दिनशा पेटीट यांचे अध्यक्षतेखाली झाली.

पण सरकार एवढ्यावरच थांबले नाही. युद्धामुळे सरकाराला तातडीचे उपाय योजण्याचे विशेष अधिकार देण्यात आले होते त्यांचा उपयोग सरकार अधिकाधिक करू लागले. 'न्यू इंडिया' पत्राचा जामीन घेतल्यावर बाईना मुंबई प्रांतात येण्याची मनाई करण्याचा हुकूम सुटला! आणि होमरूलच्या चळवळीमुळे अनेक प्रांतातील पुढारी एकमेकाना भेटी परत भेटी देऊ लागले याचा विषाद वाटून नव्या अधिकाराखाली त्याना प्रथम आपापल्या प्रांतात, मग आपापल्या गावी डांबून ठेवण्याचे धोरण सरकाराने स्वीकारले. याला उद्देशून टिळकांनी केसरीत लिहिले की, सरकारी हुकूम आम्ही पाळू किंवा न पाळू. पण तो शहाणपणाचा आहे की नाही याचा सर्व हिंदी जनतेने विचार करावयास पाहिजे. कर्मेंद्रिये हा हुकूम कदाचित पाळोत पण ज्ञानेंद्रिये त्याविरुद्ध आतून तक्रार करणारच. शांतता राखण्याकरता म्हणून हे उपाय योजण्यात येतात. पण सरकारला हे कळावे की युद्धाच्या दृष्टीने अहितकारक असे या चळवळीत काही नाही. युद्ध समाप्त झाल्या-वर स्थिरस्थावर होताना घडामोडी होतील त्यात हिंदुस्थानने स्वतःकरिता काय मागणी करावी इतकाच या चळवळीचा उद्देश आहे. आणि अशी मागणी कर-ण्याची आकांक्षा अशा उपायाने दडपून टाकू अशी जर सरकारची समजूत असेल तर ती मात्र खोटी आहे हे सरकारने ध्यानात ठेवावे. कर्मधर्मसंयोगाने याच वेळी आयर्लंडातहि होमरूलची चळवळ फिरून सुरू झाली होती. त्याच्या ध्वनीचे आघातहि इकडे उमटत होते. नाइंटिंथ सेंचरी मासिक पुस्तकात मद्रासचे बिशप व्हाईट हेड यानीहि एक लेख लिहून सरकाराला दोष दिला. त्यानी लिहिले की पूर्वी रशिया व जपानचे युद्ध झाले त्याचा संबंध हिंदुस्थानशी अर्थाअर्थी नसताहि त्याचा परिणाम जर हिंदी लोकाच्या आकांक्षेवर झाल्याचे आपण पाहिले, तर ज्या

युद्धात हिंदुस्थानचा प्रत्यक्ष संबंध आला त्याने तसा परिणाम न व्हावा अशी अपेक्षा करण्यात सरकारची चूक आहे. युद्ध चालू असता भावी योजनेच्या गोष्टी कोणी बोलू नयेत हे म्हणणे फुकट आहे. युद्ध झाले म्हणूनच सरकारने आपले धोरण बदलले पाहिजे! पण सरकार अशा उपदेशाला थोडीच दाद देणार!

सप्टेंबर महिन्यात म्हणजे पहिला जामीन घेतल्यापासून तीन महिन्याच्या आंतच 'न्यू इंडिया'कडून घेतलेल्या पहिल्या जामिनाची रक्कम मद्रास सरकारने जप्त केली. 'कॉमनवील' पत्राकडूनहि पाच हजारांचा जामीन मागितला. अशा रीतीने पंधरा-हजार रुपयांची जामीनकी भरण्याचा प्रसंग बेझन्टबाईवर आला. व याला बरोबर प्रतिक्रिया म्हणून लखनौ येथे भरणाऱ्या कॉंग्रेसच्या स्वागतमंडळाने बाईंचेच नाव कॉंग्रेसच्या अध्यक्षपदासाठी सुचविले. बाईंनी मद्रासेपुरता स्वराज्यसंघ पूर्वीच काढला होता. पण १९१५ च्या डिसेंबरात कॉंग्रेसच्या पूर्वी मुंबईस खाजगी सभा भरली तीत त्यानी असे आश्वासन दिले होते की, होमरूलच्या चळवळीचे कार्य स्वतः कॉंग्रेस कोणत्याना कोणत्या रूपाने करील तर मी आपल्या संघाचा फैलाव हिंदुस्थानात करणार नाही. पण त्या बाजूने निराशा झाल्यामुळे वचनमुक्त होऊन ता. २७ ऑगस्ट रोजी बाईंनी जाहीरनामा काढला की, ता. १ सप्टेंबरपासून सर्वत्र माझ्या अनुयायानी लीगच्या शाखा काढाव्या. ता. ३ सप्टेंबर रोजी मद्रासेस सभा भरली त्यात असे जाहीर करण्यात आले की स्वराज्यसंघ ही संस्था आह्मी आता निश्चितपणे काढली. सी.पी. रामस्वामी अय्यर यानी असा ठराव मांडला की, आपला संघ मद्रासेतील प्रां. कॉं. कमिटीला जोडून घेतला जावा. बाईंचे धोरण कॉंग्रेसला धरूनच लीगचे काम चालवावे असे प्रथमपासून सुसंगत होते. तेच अजून कायम होते व त्याप्रमाणेच ही योजना होती आणि ती योग्यच होती. मुंबईच्या कॉंग्रेसमध्ये असा ठराव होऊन राहिला होता की ज्या जुन्या अगर नव्या संस्था कॉंग्रेसच्या पटात आपले नाव नोंदवून घेण्याचा अर्ज करतील त्यांना कॉं. कमिट्यानी अवश्य नोंदवून घेतलेच पाहिजे, आणि नोंदलेल्या एखाद्या संस्थेला पटावरून काढून टाकावे असे ऑ. इं. कॉं. कमिटीला वाटेल तर विशेष कारण दाखवून तसे करण्याला फक्त त्याच कमिटीला अधिकार राहील. मद्रासची कॉंग्रेस कमिटी बाईंना अनुकूल होतीच. पण कॉंग्रेसच्या घटनेचाहि असा आधार होता. यामुळे होमरूल लीगचे सोवळेभांडे अशा रीतीने अचानक कॉंग्रेसच्या दारातून आत पडले.

नेमस्त लोकाना टिळक बेझन्ट बाई सारख्या उपद्यापी लोकाना कॉंग्रेसपासून दूर हात दोन हातावर ठेवावे असे नेहमी वाटत होते. पण या घटनेमुळे त्यांचाहि इलाज नाहीसा झाला. बाईंची कल्पना कॉंग्रेसशी निकट संबंध ठेवण्याची मुळात अशा प्रकारची होती की, सायकलवर बसून जाणारे दोन स्नेही मिळून रस्त्याने जाऊ लागले म्हणजे एक पाय मारीत असता दुसऱ्याने आपले पाय थांबवून सोबत्याच्या खांद्यावर नुसता हात ठेवला तरी त्याची गाडी दुसऱ्या

गाडीच्या गतीमुळे चालती राहते. आणि पुढे दुसरा दमला तर त्याने आपले पाय हालविण्याचे बंद ठेवावे, पहिल्याच्या खांद्यावर हात टेकावा आणि पहिल्या खेद्याने पाय मारण्यास सुरुवात करावी. दोघानीहि एकदम पाय मारले तर दोन्ही गाड्या अधिक वेगाने चालू लागतील. आणि एकाचे पाय थांबले तरी दुसऱ्याच्या शक्तीने दोन्ही गाड्या थोड्या कमी वेगाने पण चालूच राहतील. या योजनेत फार मार्मिकपणा होता. आणि त्याप्रमाणे बाई व काँग्रेस यांच्या संस्थांनी एकमेकांच्या खांद्यावर हात ठेवलेच होते. अर्थात काँग्रेसचे पाय थांबले तर लीगचे पाय जोराने मारून दोन्ही गाड्या पुढे चालत्या असे बाईंना वाटे. तिसरा ठराव पुढे मांडला त्यांत असे होते की, टिळकांच्या संघाचे व बाईंच्या संघाचे उद्देश एकच असल्यामुळे उभयतांचे सहकारित्व असावे. दोघानीहि आपापल्या परीने पण एकच काम करावे. शेवटी बाई भाषण करताना म्हणाल्या ' आत्माहुतीची ज्वाला स्वर्गापर्यंत पोचल्याशिवाय दैवी अशिर्वाद खाली उतरत नसतो. '

आपल्या पत्राची पहिली जामिनकी रद्द करणाऱ्या हुकुमाविरुद्ध बाईंनी हायकोर्टाकडे अपील दाखल केले. त्याची सुनावणी चीफ जस्टिस व न्या. आयलिंग आणि शेषगिरी अय्यर याजपुढे ४ सप्टेंबर अखेर झाली. सरकारतर्फे ॲडव्होकेट जनरल श्रीनिवास अय्यंगार हे काम चालवीत होते. बाईतर्फे स्वतः बाईच काम चालवीत होत्या व त्याना गोविंदराज मुदलीयार व दादासाहेब करंदीकर हे मदत करीत होते. या सुनावणीत काही मनोरंजक भाषणे व प्रश्नोत्तरे झाली. पण ती विस्तारभयास्तव आम्ही देत नाही. या अपिलाबरोबर दुसराहि एक अर्ज बाईंनी केला होता. तो चार्टर आक्टाप्रमाणे होता. त्यातील काम सी. पी. रामस्वामी अय्यर हे चालवीत होते. पहिले अपील हे प्रेस ॲक्टाप्रमाणे होते व त्या कायद्याच्या शब्दावरूनच त्याचा निकाल व्हावयाचा होता. पण ' कॉमरेड ' पत्राच्या जामिनकीच्या अपिलात सर लॉरेन्स जेन्किन्स यानी ठरविल्याप्रमाणे जर कायद्याचे शब्द व्यापक असून त्यांतून बचाव नाही असे ठरेल तर प्रेस ॲक्ट हाच मुळी चार्टर ॲक्टाविरुद्ध आहे, म्हणजे प्रेस ॲक्ट हा बेकायदेशीर आहे असे ठरवून घेण्याकरिता हा दुसरा अर्ज केला होता. प्रेस ॲक्टाप्रमाणे आपल्याला जो अधिकार नाही असे हायकोर्टाचे म्हणणे असे तो अधिकार त्याना आहे असे प्रस्थापित करण्याच्या हेतूने हा दुसरा अर्ज दिला होता. पण अखेर दोन्ही अर्जातील निकाल बाईंच्या विरुद्ध झाला. पण तो निकाल देताना सर लॉरेन्स जेन्किन्स यांजप्रमाणे मद्रासच्या न्यायमूर्तीनीहि ' हा कायदा वाईट आहे, पण त्याला आमचा इलाज नाही ' असे खेदोद्गार काढले. देशाच्या कोठल्या तरी एखाद्या कोपऱ्यात अत्याचार होत होते याचे निमित्त घेऊन प्रेस ॲक्ट केला. आणि तोच आता अत्याचार थांबले तरी सामान्य व कायदेशीर राजकीय चळवळीलाहि लागू लागला हे पाहून ना. मुधोळकर वगैरे लोक आपण त्याच्या मंजुरीला संमति दिली याविषयी पश्चात्ताप पावून उघडपणे टीका करू लागले. पण त्या पश्चात्तापाचा आता उपयोग

काय ? ईश्वर विष निर्माण करतो त्याबरोबरच त्याचा उताराहि निर्माण करून ठेवतो अशी समजूत आहे. त्याप्रमाणे प्रेस ॲक्टातील पहिली जामीनकी मागण्याच्या हुकुमाच्या विषाला ते सौम्य म्हणून उतारा ठेवला नसला तरी ती जामीनकी रद्द करण्याच्या जालीम विषावर उतारा ठेवला आहे असे त्यावेळी सरकारतर्फे सांगण्यात आले होते. पण गफलत होऊन शेवटी असे आढळले की विषमात्र अवतरले आणि त्याच्याबरोबर जो उतारा म्हणून पाठविण्यांत आला तो ईश्वरी पोस्टात कोठे गडप झाला. किंवा खाली येऊन पोचला असला तरी त्याच्यात विष उतरविण्याचा गुण नाही असे अनुभवाला आले. यानंतर एकच गोष्ट बेझन्टबाईविरुद्ध करण्याची राहिली होती ती म्हणजे डिफेन्स ॲक्टाप्रमाणे त्याना एका जागी डांबून ठेवणे. पण त्या गोष्टीला अद्यापि थोडा अवकाश होता.

## ( ६ ) वाढदिवसाचा समारंभ

बेझंटबाईंची ही हकीकत झाली. आता टिळकांसंबंधाने पाहू. टिळक बेळगाव परिषदेहून सातारा येथील सत्कार घेऊन पुण्यास आले व नंतर उन्हाळ्यात नेहमीप्रमाणे सिंहगडास जाऊन थंड हवेकरिता काही दिवस राहिले. खापर्डेहि सिंहगडासच होते. दोघे मिळून जूनमध्ये खाली आले व दोघानीहि शिवाजी-उत्सवात भाग घेतला. नंतर महिना पंधरा दिवस थोडी स्वस्थता होती तीत टिळकानी केसरीत काही लेख लिहिले. याशिवाय गीतारहस्यासंबंधी वादविवाद चालूच होते. याच सुमारास टिळकांच्यासंबंधाचे खरे लोकमत व्यक्त करणारी एक चळवळ आणि त्याच्याचबरोबर टिळकाना पायबंद घालून त्याना न्यायकोर्टात खेचणारी सरकारी चळवळ अशा दोन्ही एकदम सुरू झाल्या. आणि एकीची समाप्ति ज्या दिवशी त्याच दिवशी दुसरीचे स्वरूप प्रगट झाले. पहिली चळवळ टिळकांचा ६१ वा वाढदिवस मोठ्या थाटाने साजरा करण्याची आणि दुसरी त्यांच्यावरील तिसऱ्या राजद्रोहाच्या खटल्याची. दोन्ही चळवळी प्रथम गुप्त स्वरूपातच चालू होत्या. सरकारची चळवळ गुप्त रूपाने चालावयाची हे ठीकच होते. पण दुसरी चळवळ गुप्तपणे चालण्यालाहि विशेष कारण होते व ते काय हे खालील हकीगतीवरून कळून येईल.

सन १९१६ सालची आषाढ व० ६ म्हणजे ता. २० जुलै या दिवशी टिळकांच्या वयाला ६० वर्षे पूर्ण होत होती. अर्थात त्यांचा ६१ वा वाढदिवस हा विशेष महत्त्वाचा असा त्यांच्या इष्टमित्रानी मानल्यास नवल नाही. सामान्यतः कोणाच्याहि वयाची ६० वर्षे पुरी होणे हे एका दृष्टीने त्याचे भाग्यच समजतात. इतर गोष्टी सोडून दिल्या तरी नुसते आयुष्य लाभणे हे देखील चांगल्या नशिबाचेच लक्षण असते. षष्ठ्यब्दि हा एक हिंदुधर्मात धार्मिक विधी मानिला असून इतर संस्कारसमारंभाप्रमाणे ६१ व्या वाढदिवशी होमहवन अन्नसंतर्पण वगैरे धर्माचार पाळावे असे शास्त्रात सांगितले आहे. सामान्यतः इतर धार्मिक आचार

पाळणारा मनुष्य हा आचारहि पाळतो. आता या विधीचा समारंभ लहान किंवा मोठा होणे म्हणजे कमी किंवा अधिक खर्चाचा होणे हे त्या मनुष्याच्या योग्यते-वर ऐपतीवर व उत्साहावर अवलंबून असते. इतर धर्मांतहि निरनिराळ्या काळी हे समारंभ करतात. रौप्य ज्युबिली सुवर्ण ज्युबिली रत्न ज्युबिली असे त्याचे क्रम मानलेले आहेत. म्हणजे मनुष्य व्यक्ति किंवा संस्था ही चाळीस वर्षे जगली म्हणजे तिची रौप्य ज्युबिली पन्नास वर्षे जगली म्हणजे सुवर्ण ज्युबिली आणि साठ वर्षे जगली म्हणजे रत्न ज्युबिली होते. युरोपियन लोक आपल्या लग्नाची अशा निरनिराळ्या प्रकारची ज्युबिली करीत असतात. अशा समारंभात व्यक्तीचा स्वतःचा तर आनंद असतोच पण इष्टमित्रांच्या सहानुभूतीने तो अनेकगुणित होतो.

टिळक हे जरी जुन्या पद्धतीने श्रावणी व श्राद्धपक्ष हे विधि नियमाने करीत तरी अवांतर विधी व घरगुती समारंभ यांचा त्यांना कंटाळा असे. लग्नकार्या-शिवाय त्यांच्या घरी केव्हा वाद्ये वाजलेली कोणी ऐकिली नाहीत. गणेशउत्स-वात मात्र गणपतीपुढे चौघडा वाजे. या त्यांच्या वृत्तीमुळे त्यांनी स्वतः होऊन आपल्या ६१ व्या वाढदिवसाचा समारंभ तर राहोच पण धार्मिक विधीहि केला असता की नाही कोणास ठाऊक? आदल्या दिवशी घरी उपाध्या येऊन खण-पटीस बसता व भाचे धोंडोपंत हे त्या आग्रहाला दुजोरा देते तर "घे उरकून पण माझा वेळ मोडू नको" इतके बोलून त्यांनी परवानगी दिली असती. पण टिळक ६० वर्षे जगले ही गोष्ट व्यक्तिशः त्यांनाच महत्वाची व भाग्याची होती असे नाही तर त्यांच्याहिपेक्षां इतरांना ती अधिक महत्वाची वाटत होती. टिळक मंडाले येथे तुरुंगात असताच कृष्णशास्त्री कवडे वगैरे काही मंडळींनी खाजगी रीतीने त्यांचा वार्षिक जन्मदिवस एखाद्याच्या घरी जवळची चार मित्रमंडळी बोलावून कर-ण्याचा प्रघात ठेविला होता. अर्थात त्यांना या ६१ व्या जन्मदिवसाचा समारंभ जाहीररीतीने करावा अशी कल्पना सुचली. सर्वांनाच ती सारखी पसंत होती. यामुळे त्या दिवसाच्या आधी सुमारे तीन आठवडे हा समारंभ कसा करावा याची योजना करण्याकरिता सार्वजनिक सभेत खाजगीरीतीने मंडळी बोलावण्यात आली. सुमारे ४०।५० लोक हजर होते. प्रश्न निघाला तेव्हा अनेकांनी अनेक प्रकार सुच-विले. ओला कोरडा दानधर्म मंत्रजागर पुराण—कीर्तन मेजवानी सभा मान-पत्र अहेर व रात्रौ शहरातील निरनिराळ्या देवळांतून दीपोत्सव इतके प्रकार सुच-विले गेले. यातले काही अखेर स्वीकारण्यात आले असते. पण तेथे एका गृह-स्थाने असा प्रश्न उपस्थित केला की असल्या साध्या गोष्टी करण्यात विशेष स्वारस्य ते काय? "हा समारंभ खाजगी अभिनंदनापेक्षा सार्वजनिक अभिनंदनाचाच अधिक आहे. शिवाय सरकारात रीतीप्रमाणे पोलिसाकडून त्याचा रिपोर्ट जाईल आणि जाहीर सभा भरवून फार तर एखादे शेलापागोटे व रुप्याच्या करंड्यात मानपत्र दिले इतकेच सरकारच्या कानावर जाईल. पण या प्रसंगी लोक टिळकांना खरोखर किती प्रेमाने मानतात याचे खरे गमक त्यांच्याकरिता ते काय स्वार्थ-

त्याग करावयाला तयार आहेत हेंच होय. टिळकांकरिता स्वार्थत्याग करावयाचा म्हणून आपल्या पायाने त्यांच्याबरोबर कोणी तुरुंगापर्यंत गेला आणि म्हणाला की त्यांच्याबरोबर मलाहि तुरुंगात ठेवा तर कोणी त्यास आंत घेणार नाही. त्यांच्या प्रेमाखातर व यांच्या प्रतिपक्षाच्या रागाखातर कोणी तामसी अत्याचाराला प्रवृत्त झाले असतील. पण ती गोष्ट सर्वसंमत होऊ शकत नाही. त्यांच्या तुरुंगवासात कित्येक लोकानी देवावर अभिषेक ठेवले. नैमित्तिक उपवास केले. आवडते पदार्थ खाण्याचे टाकले. जपाची अनुष्ठानें केली. या गोष्टी काही खोट्या नाहीत. पण सरकारापर्यंत त्यांची वर्दी गेलेली नाही. करणारे त्या केवळ आपल्या समाधानाकरिता करीत. व काही लोक तर सात्विक भावनेने किंवा भीतीने त्या केल्या असे बाहेर कोणास कळूंहि देत नसत. पण आता एक प्रसंग सहज असा आला म्हणून लोकाना त्यांच्याकरिता सर्वांत सोपा नसला तरी सर्वांत डोळ्यात अधिक भरणारा व सरकारची खात्री पटविणारा आणि आपल्या चळवळीच्या दृष्टीने उपयोगी पडणारा असा एक प्रकार मला सुचतो तो मी सुचवितो. तो कराल तर पाहा. आणि तो जर न कराल तर बाकीचे उपचार व समारंभ मी व्यर्थ समजेन." तेव्हा मंडळीने विचारले की असा प्रकार कोणता? तेव्हा या गृहस्थाने सांगितले की "टिळकांच्या नावाने काही तरी इष्टांक म्हणून एक लक्ष रुपयांची थैली महाराष्ट्र–कर्नाटकात जमवावी आणि अहेर म्हणून ती या वाढदिवसाच्या समारंभात टिळकांना अर्पण करावी. हल्ली होमरूलची चळवळ टिळकानी सुरू केली आहे. विलायतच्या चळवळीचेहि ते बोलतात. व्याख्यानाचे दौरे वगैरे खर्चाच्या गोष्टी निघणारच. हा सर्व पैसा टिळक खाजगीतून म्हणजे अर्थात केसरीच्या उत्पन्नातून आजवर करीत आले व वेळ पडल्यास ते या पुढेहि करतील. आपण होऊन ते कोणाकडे मदत मागणार नाहीत आणि मागितल्याशिवाय कोण कोणाला देणार? शिवाय आपल्या पक्षात अशा धनिक व्यक्ती कितीशा आहेत की जे झाकल्या मुठीने टिळकांना राष्ट्रीय कार्याला पैसे देतील? स्वराज्य-संघ काढला पण त्याची फी दोन रुपये व एक रुपाया. त्याचे सभासद जमणार किती व त्यांची वर्गणी येणार किती? अशा संघाची वर्गणी म्हणजे गायीच्या आचळातून दूध काढावयाचे आणि तेहि आणखी दूध काढण्याकरिता तिच्या आचळाना लावूनच संपावयाचे. म्हणून तुम्ही आम्ही सर्व मिळून एक लक्ष रुपये जमवून जर या प्रसंगी टिळकाना देता आले तर ते चळवळीला उपयोगी पडतील. अशी रक्कम आपल्या या दरिद्री प्रांतात कोणा एका मनुष्याकरिता आजवर जमली नाही हे पाहून टिळकांची लोकोत्तरता व टिळकांकरिता खिशात हात घालून द्रव्य देण्याची बुद्धी ही सरकारला दिसून येईल. तसेच टिळकाना अनुयायांचे पाठबळ आहे खरेच असे वाटून सरकारला थोडा वचकहि बसेल. आणि ही कल्पना आपण खऱ्या मनाने सुचवीत आहो हे लोकाना पटविण्याकरिता मी

स्वत: एक हजार रुपये देतो" असेहि त्याने सांगितले. या सूचनेमुळे सर्वच रंग बदलला.

पुष्कळाना कल्पना पटली आणि उत्साहवर्धक वाटली. काही थोड्याना तिचे वैपर्म्यहि वाटले. आणि ही नसत्या भुदंडाची गोष्ट कशाला? पैसा आहे कोठे? व जमणार कसा? अशी कुजबुज त्यांच्यात सुरु झाली. पण अशी माणसे थोडी व त्यातूनहि नुसती कानात कुजबुजणारी असल्याने इतरांचा विरस झाला नाही. आता ज्याना ही कल्पना आवडली त्यानाहि खऱ्या मनाने एक मोटी अडचण वाटली ती ही की समारंभाला अवघे तीन आठवडे उरले तेव्हा या लहानशा अवधीत ही गोष्ट पार पडणार कशी? खाजगी रीतीने प्रयत्न करावा तर पत्रे मनुष्ये पाठवून किती पाठविणार? शिवाय पुष्कळ लोक असे वगळले जाणार की त्यांची इच्छा असूनहि बातमी न कळल्यामुळे त्याना या कामी भाग घेता येणार नाही. बरे खाजगी रीतीने जमेल तितकी वर्गणी जमवून जी थोडी जमली तेवढी देऊन मग समारंभानंतर यादी व वसुली चालू ठेवणे यात स्वारस्य उरत नाही. याला मुदतबंदी व वेळेचे टिपण ही ओघानेच प्राप्त होतात. जो काय बार उडवावयाचा असेल तो त्या एकाच दिवशी उडाला पाहिजे. वर्गणीची ही कल्पना जाहीर केली तर काम अधिक सोपे जाईल आणि सर्व लोकाना ती गोष्ट कळेल. पण त्यातच अडचण ही की जाहीर मागणी करावयाची तर अंदाजी आकडा एक लक्षाचा म्हणून कळविला पाहिजे आणि तो जर जमला नाही तर तोंडची फुकट वाफ दवडली आणि आपले व टिळकांचे व्यर्थ हासे करून घेतले असे होणार. त्यापेक्षा काहीच न केलेले बरे. शेवटी अधिक विचार करता असे ठरले की एक लाख रुपये हाच इष्टांक धरावा. प्रथम पुणे शहरातील मित्रमंडळींनी आपले आकडे भरून आपल्या योग्यतेप्रमाणे वर्गणी जमवावी. आणि तो आकडा शोभेसा जमला म्हणजे मग इतर ठिकाणच्या मित्र-मंडळींना मागण्याला आधार व अधिकार आला. एकदमच जाहीर विनंती कर-ण्याची कल्पना नापसंत ठरली. आणि बसल्या बैठकीला शुभ प्रारंभ म्हणून किती वर्गणी जमते ते पाहावे आणि मग इतर गोष्टींचा विचार करावा. म्हणून लगेच यादी करण्याला सुरवात झाली. जागच्या जागी सुमारे सहा किंवा सात हजाराचे आकडे पडले. असे पाहून मंडळींनी ठरविले की आता आपण खाजगी रीतीनेच शहरात इतरां-कडे व बाहेरगावीहि या कल्पनेची परिस्फुटता करून उद्योग करण्याला हरकत नाही. समजा लाखाऐवजी पन्नास हजार रुपयेच जमले तरी आयत्यावेळची म्हणून ही रक्कम देण्याला काही थोडी नाही. संकल्पाप्रमाणे एक लक्ष रुपये जमले तर उत्कृष्टच. आणि पंचवीस तीस हजार रुपये जमण्यालाहि कठीण आहे असे दिसले तर मग कल्पनाच टाकून द्यावी व आपल्या हातून होत नाही असे म्हणून समा-रंभाची इतर एखादी कल्पना अंमलात आणावी. पण दैवयोगाने या कल्पनेला क्षणाक्षणानी पुष्टीच मिळाली. लगेच दुसरे दिवसापासून पत्रे निरोप व मनुष्ये धाडण्यास सुरवात झाली. सुमारे पंधरा दिवसात मुंबई शहर वऱ्हाड नागपूर कर्नाटक या भागातून जी वर्तमाने आली त्यावरून कल्पना फुकट जात नाही असा

धीर आला. आणि शेवटच्या थोड्या दिवसात वर्गणीच्या कामाला जोर यावा म्हणून मग समारंभाच्या आधी ( समारंभ इंग्रजी तारखेप्रमाणे २३ जुलैला योजला होता) सुमारे सात दिवस अण्णासाहेब पटवर्धन दादासाहेब खापर्डे दादासाहेब करंदीकर अण्णासाहेब नेने गंगाधरराव देशपांडे डॉ. मुंजे व शंकरराव देव इतक्यांच्या सहीने विनंतीपत्र काढून ते ता. १८ जुलैच्या केसरीत प्रसिद्ध केले. तथापि या जाहीरपत्रकातहि जमेल ती सर्व रक्कम एकत्र करून देण्याचे ठरविले आहे इतकेच मोघम लिहिले होते. एक लक्षाचा आकडा घातला नव्हता. वर काही वेळापूर्वी खाजगी स्वरूपाची चाललेली चळवळ म्हणून सांगितली ती हीच. व ती खाजगी रूपानेच का चालविण्यात आली हे सांगितलेच. या चळवळीच्या आगेमागे जन्मास आलेली व तिच्याच बरोबर वाट चालू लागलेली सरकारी चळवळ म्हणजे टिळकांवर खटला करण्याची. तीहि गुप्तच चालणे स्वाभाविक होय. तिची कारणे सर्वांना ठाऊकच असतात.

ठरल्याप्रमाणे ता. २३ रोजी हा समारंभ व्हावयाचा. त्याकरिता वर्गणी देणारे असोत वा नसोत बाहेर गावच्या टिळकांच्या शेकडो मित्रमंडळीना पत्रे पाठवून पुण्यास समारंभाला पाचारण केले होते. व त्याप्रमाणे लोक आदले दिवसापासून येऊ लागले होते. ता. २३ रोजी सकाळी होमहवन रुद्राभिषेक वगैरे झाला. घरी धर्मविधी देवळातून अनुष्ठाने या गोष्टीहि झाल्या. वेदपठन झाले. भिक्षादान व इस्पितळातील रोग्याना मदत व गावातील काही संस्थाना लहानसान देणग्या दिल्या गेल्या. रात्री कीर्तन झाले. मुख्य समारंभ सायंकाळी टिळकांच्या वाड्यात झाला. हजारो लोक जमले होते. पटांगण तर भरूनच गेले पण छापखान्याच्या पत्र्यावरहि लोक चढून बसले. मुंबईचे स्वयंसेवक मुद्दाम आले होते त्यानी सभेची व्यवस्था फार चांगली ठेविली होती. टिळक मित्रमंडळी शिवाय मनमोहनदास रामजी डॉ. चंदुलाल देसाई गोविंदजी वसनजी मलबारी मर्चंट वगैरे इतर लोकहि आले होते. सभेचे अध्यक्षस्थान अण्णासाहेब पटवर्धन यांच्याकडे देण्यात आले. नंतर ठिकठिकाणची अभिनंदनपर पत्रे तारा यांची लांबलचक यादी वाचून झाल्यावर शिवरामशास्त्री गोरे यानी संस्कृत मानपत्र अर्पण केले. बेळवी यानी इंग्रजी मानपत्र वाचून दाखविले. त्यानंतर डॉ. नरहर शिवराम परांजपे यानी मराठी मानपत्र वाचून दाखविले ते असे:—

## लो० बाळ गंगाधर टिळक!

"ईश्वरकृपेने आपणास ६० वर्षे संपून ६१ वे वर्ष लागले याबद्दल आपले अभिनंदन करण्यासाठी आम्ही आपली महाराष्ट्रातील ठिकठिकाणची मित्रमंडळी आज येथे जमलो आहो. आपली भेट झाल्याने आम्हाला अंतःकरणपूर्वक आनंद होत आहे.

"महाराष्ट्राची गेली ३०।३५ वर्षे अत्यंत महत्त्वाची अशी असून या अवधी-

तील इतिहासांत आपण विशेष महत्त्वाची कामगिरी केलेली आहे. न्यू इंग्लिश स्कूलचे संस्थापक डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे उत्पादक फर्ग्युसन कॉलेजातील प्रोफेसर नामांकित ग्रंथकार केसरी व मराठा पत्रांचे संपादक राष्ट्रीय सभेचे सभासद कायदेकौन्सिलचे सदस्य व राष्ट्रीय चळवळीचे आद्यप्रवर्तक इत्यादि नात्यानी आपण जी लोकसेवा केली ती अमूल्य आहे. त्याचप्रमाणे सदाचरण स्वार्थत्याग मनोधैर्य इत्यादि टळक अशा नैतिक गुणानी आपण या राष्ट्रातील लोकाना केवळ आदर्शभूत झालेले आहा.

"आपण अंगिकारलेले लोकसेवेचे व्रत खरोखर फार कठीण किंबहुना खडतर होते. आपणावर आलेल्या संकटांकडे मागे वळून पाहिले असता कोणाचीहि छाती दडपून जाईल; पण त्या सर्व संकटाना आपण नेटाने तोंड कसे दिले संकटनिवारणार्थ दीर्घप्रयत्न करून आपण किल्यकातून सुयश मिळवून कसे उत्तीर्ण झाला व ज्या किल्यकातून सुटका होणे अशक्य झाले ती आपण शांत मनाने व धैर्याने कशी सोसली हे ध्यानात आणिले म्हणजे फार कौतुक वाटते.

"आपल्या इकडील सुशिक्षित समाजातील व्यक्तींचे आयुर्दायमान दुर्दैवाने मोठे असत नाही. या गोष्टीच्या सामान्य कारणात वर दर्शविलेल्या विशेष कारणांची भर पडलेली असल्यामुळे आपला ६१ वा जन्मदिवस उगवलेला पहावयास सापडला ही ईश्वराची स्वतः आपणावर व त्याचप्रमाणे महाराष्ट्रावरहि विशेष कृपा समजली पाहिजे. आणि त्याच्या कृपेने आपणास चिरायुरारोग्य लाभो आणि आपल्या हातून आणखीहि लोकसेवा घडो अशी आमची प्रार्थना आहे.

"आपल्या ६१ व्या जन्मदिवशी आपले अभिनंदन आम्ही रिक्त हस्ताने कसे करावे ? आपण जन्मभर स्वार्थत्यागपूर्वक केलेली लोकसेवा लक्षात घेता आपणास जितक्या किंमतीचा आहेर नजर करावा तितका वास्तविक थोडाच होणार आहे. तथापि 'फूल नाही तर फुलाची पाकळी' या न्यायाने आम्ही या मानपत्रासोबत सादर केलेली लहानशी रक्कम आपण स्वीकारावी अशी आमची आग्रहपूर्वक विनंति आहे. ही रक्कम अवघ्या दोनतीन आठवड्यात थोड्याशा व्यक्तीकडून आत्मस्फूर्तीने जमलेली आहे. महाराष्ट्रातील पुष्कळ लोकाना या समारंभाची बातमी वेळेवर न मिळाल्यामुळे त्याना त्यात अंशभागी होता आले नाही. तथापि काही थोड्या लोकाकडून तरी योग्य वेळी उपक्रम होऊन आजचा दिवस साजरा झाला ही बातमी ऐकून त्याना समाधान झाल्याशिवाय राहणार नाही.

"राष्ट्राकरिता काम करणारे आपणासारखे लोक स्वार्थनिरपेक्ष असतात यामुळे त्यांचे अनृणी होणे हे काम कठीण होऊन बसते. तथापि राष्ट्रानेहि स्वार्थत्यागपूर्वक राष्ट्रनायकांची सेवा करण्यास तयार होणे हे जे त्याचे कर्तव्य आहे ते त्याजकडून बजावले न जाईल तर त्याजवर कृतघ्नपणाचा दोष येईल, म्हणून आम्हास या दोषातून मुक्त करण्याकरिता तरी आपण या आहेराचा स्वीकार करावा अशी विनंति आहे."

**आपले स्नेहांकित**

नंतर ना. दाजीसाहेब खरे म्हणाले की ज्या टिळकांचा यशोदुंदुभी सर्व हिंदुस्थानभर गाजतो आहे. त्यांचा छळ होणे अटकाव होणे साहजिक आहे. युरोपातील चळवळीचा इतिहास हेच सांगतो. टिळकांचा उद्योग व त्यांचे धैर्य पाहून कौतुक वाटते व ते माझे परमस्नेही म्हणून तर विशेषच आनंद होतो. दादासाहेब करंदीकर यानी भाषण करताना, सुख व दुःख ही बळवंतरावानी समान मानलेली आहेत त्यांचे आचरण गीतारहस्याला धरूनच आहे असे सांगितले. काशिनाथ शास्त्री लेले म्हणाले की आम्ही वैदिक लोक अशी प्रार्थना करणार की आमच्या प्रत्येकाच्या आयुष्यापैकी निदान एकेक दिवस घेऊन तो ईश्वराने टिळकाना द्यावा. गंगाधरराव देशपांडे म्हणाले की टिळक अमर नसले तरी टिळकवृत्ती टिळकतत्त्व ही अजरामर आहेत. संकटाना न जुमानता शक्तिसर्वस्व खर्चून कार्य करणे याचेच नाव टिळकतत्त्व. अशीच इतर अनेक भाषणे झाल्यावर व्यक्तिशः अनेक लोकानी आपल्या आवडीच्या लहानसान वस्तू टिळकाना नजर केल्या. नंतर केळकर यानी असे जाहीर केले की "आहेराचा आकडा या क्षणाला ८५ हजारावर गेला आहे व काही रकमा आज वाट चालत असून उद्या सकाळी हाती येतील. शिवाय त्यातूनहि किरकोळ काही कमी पडले तर ते पुरे झालेच म्हणून समजा असे बसलेल्या मंडळीपैकी दहा पाचानी सांगून टाकले आहे. आणि अशा रीतीने संकल्पाप्रमाणे एक लक्ष रुपयाचा अहेर जमला असे प्रसिद्ध करण्याला चालकानी मला आज्ञा दिली आहे." शेवटी टिळकांनी सद्गदित अंतःकरणाने सर्वांचे आभार मानले. ते म्हणाले, "माझ्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त आपण मला जे मानपत्र दिले व आहेर केला त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे असे म्हटले तर माझा आशय व्यक्त करण्यास ते शब्द फार अपुरे आहेत हे मी जाणतो. पण आनंदादि विकारांची भाषा नेहमीच उद्गाररूपी म्हणजे अत्यल्प शब्दानी व्यक्त होणारी असते हे लक्षात बाळगून वरील उद्गारात जो काही अपुरेपणा आहे तो आपण आपल्या थोर मनाने पुरा करून घ्यावा अशी माझी आपणास अंतःकरणपूर्वक विनंति आहे. आणि मला अशी खात्री आहे की आहेर थोडा थोडा म्हणताहि तो जसा अनेक हजार रकमेपर्यंत गेला त्याचप्रमाणे माझे आभारप्रदर्शक थोडे उद्गारहि आपण उदार अंतःकरणाने वाढवून घ्याल. आजपर्यंत मला आपले अनेक प्रकारे साहाय्य झालेले आहे व त्याचा उतराई मी कसा व्हावे या चिंतेत असताच माझ्यावर उपकारांचे आज हे दुसरे ओझे आपण लादले आहे. जणु काय आपल्या ऋणातून मी कधीच सुटू नये अशी आपली इच्छा आहे! ही इच्छा लोभाची प्रेमाची व कळकळीची आहे याबद्दल मला बिलकुल शंका नाही. पण ओझे प्रेमाचे असले म्हणजे ते काही हलके होते असे नाही. म्हणून ते ओझे उचलून आपल्या उपकारातून मुक्त होण्यास आपल्या सर्वांच्या आशीर्वादाने मला परमेश्वर शक्ती देवो एवढेच त्याच्यापाशी मागणे आहे.

" मानपत्र व आहेर यापैकी मानपत्राचा स्वीकार करण्यास संकोच वाटत असला तरी औपचारिक रीतीने का होईना मी त्याचा स्वीकार करितो. पण आहेराची गोष्ट तशी नाही. आज आपण मला दिलेली ही रक्कम घेऊन मी काय करणार हे मला कळत नाही. मला स्वतःसाठी ती नको आहे. आणि स्वतःसाठी म्हणून ही रक्कम मी घेणे मला वाजवीहि दिसत नाही. तेव्हा मी या रकमेचा ट्रस्टी या नात्याने कायदेशीर व मला योग्य वाटेल त्या राष्ट्रीय कामाकडे खर्च करण्याकरिता आपण ती माझ्या स्वाधीन करीत आहा अशाच भावनेने ती स्वीकारतो. ती माझी नाही अर्थात् ती ' विश्वासाची ठेव ' म्हणून माझ्या हवाली केली आहे असे मी समजतो आणि मी आपणास असे आश्वासन देतो की वरील रकमेत माझे स्वतःचे काही तरी तुळशीपत्र घालून तिचा विनियोग करण्याचे आपण माझ्याकडे सोपविलेले काम माझ्याकडून होईल तितक्या कसोशीने व वर निर्दिष्ट केलेल्या प्रकारच्या कामाकडेच करीन. यासंबंधाचे कागदपत्र व नियम वगैरे पुढे करण्यात येतीलच. मी ज्या शर्तींवर ही रक्कम घेत आहे तिजमुळे आपली काहीशी निराशा होईल. पण अशा वेळी माझ्या मनाकडे लक्ष देऊन आपण मला माफी करावी अशी माझी आपणास विनंति आहे.

" साठ वर्षे पुरी होऊन पुढच्या आयुष्यक्रमाकडे दृष्टि देऊ लागले म्हणजे मनुष्याचे मन साशंक झाल्याशिवाय राहत नाही. निदान माझे तरी तसे झाले आहे. मागील आयुष्यापैकी चांगल्या दिवसापेक्षा संकटाचेच दिवस अशा वेळी डोळ्यापुढे उभे राहतात; आणि शारीरिक शक्ति क्षीण होत चालल्यामुळे संकटातून पार पडण्याची उमेदहि थोडी कमी होत जाते. तथापि मला अशी आशा आहे की परीक्षेच्या या कठीण प्रसंगीहि पूर्वीप्रमाणेच आपली सहानुभूति मला मिळून माझ्या हातून जे काही थोडेबहुत लोककार्य झाले असेल त्यात भर घालण्यापुरते धैर्य व आयुष्य परमेश्वरकृपेने मला लाभेल. कारण असल्या कामात संकटे ही यावयाचीच.

" आपण माझ्याविषयी मानपत्रात जे प्रेमादर उद्गार काढले आहेत ते पाहून मला " परगुणपरमाणून् पर्वतीकृत्य नित्यं निजहृदि विकसंतः संति संतः कियंतः " या भर्तृहरीच्या वचनाची आठवण होते. त्या आपल्या उद्गारामुळे माझ्या मोठेपणापेक्षा आपली उदारवृत्ति अधिक व्यक्त होते असे मी समजतो. पण माझी आपणास येवढीच प्रार्थना आहे की माझ्यासारख्या माणसाने केलेल्या यःकश्चित् कामगिरीने आपण तृप्त होऊ नका. आज आपणा सर्वांपुढे जे राष्ट्रकार्य आहे ते इतके मोठे इतके व्यापक आणि इतके जरूरीचे आहे की त्याला आपण सर्वांनी माझ्यापेक्षा कितीतरी पट अधिक निश्चयाने आणि स्फूर्तीने लागले पाहिजे. ते दिनावधीवर टाकून चालावयाचे नाही. आपली मातृभूमि आपणा सर्वांस या उद्योगास लागण्याबद्दल आव्हान करीत आहे. आणि मला वाटत नाही की तिचे पुत्र या आव्हानाचा अव्हेर करतील! तथापि माझे कर्तव्य म्हणून मी

आपणास शेवटी एवढीच विनंति करीत आहे की मातृभूमीच्या या आव्हानाकडे लक्ष देऊन कोणताहि भेदभाव मनात न ठेवता आपण सर्व ' राष्ट्रदेव ' होऊ या. येथे चढाओढ नाही मत्सर नाही मानापमान नाही व संकटाची भीति धरूनहि उपयोग नाही. कार्य सिद्धीस नेण्यास परमेश्वर समर्थ आहे. आपण जे काम करितो त्याचे फळ आज ना उद्या आजच्या नाही तर पुढच्या पिढीस मिळालेच पाहिजे ते निश्चित होय. म्हणून कशाचीहि अपेक्षा न धरता आपण सर्वांनीच या राष्ट्रीय उद्योगास लागले पाहिजे. ईश्वर करो आणि ही प्रेरणा आपल्या सर्वांच्या मनात जागृत होऊन माझ्या डोळ्यादेखत मला तिचे अल्प तरी फळ पाहावयास सांपडो एवढीच माझी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे."

ही एक लक्ष रुपयांची वर्गणी इतक्या थोड्या मुदतीत व या कानाचे त्या कानाला न लागता कशी जमली याचे स्वकीयाना व परकीयानाहि आश्चर्य वाटले. पण योगायोगामुळे हा प्रकार अकल्पित व आश्चर्यकारक असाच घडला. केसरीत या वर्गणीसंबंधाने जे आंकडे प्रसिद्ध झाले त्यावरून ही गोष्ट अकल्पित म्हणण्यास हरकत नाही. कारण असला हा अनुभव पहिलाच होता. अहेराची मूळ कल्पना ३० जून रोजी रात्री निघाली आणि २३ जुलै रोजी रात्री ८७३३६ इतके रुपये प्रत्यक्ष वसूल झाले. पुण्याबाहेर जसजसे दूर जावे तसतशी वर्गणी जमविण्याला अवधी कमीच पडली. आणि कित्येकाना तर १८ जुलैच्या केसरीचा अंक हाती पडल्यावर ही बातमी कळली असे त्यांची पत्रे व तारा यावरून समजून आले. कित्येक देणग्या तारेच्या मानिऑर्डरने आल्या. आलेली रक्कम दररोज बँकेत भरण्याची व्यवस्था केली होती व पहिली एक हजाराची रक्कम ता. ४ जुलै रोजी जमा करण्यात आली. शेवटल्या सहा दिवसांचा खजिनदारानी हिशेब सांगितला तो असाः—ता. १८ पाच हजार ता. १९ दहा हजार ता. २० पाच हजार ता. २१ आठ हजार ता. २२ दोन हजार व ता. २३ सुमारे पन्नास हजार. रविवारी तर रुपये मोजून घेण्यास फुरसत नाही असा काही काळ गेला. बेरजा करण्याचे श्रम फुकट जात. कारण बेरीज करीत असताच कोठून तरी रक्कम येई. सभेत आंकडा जाहीर होत असता असताच जाहीर करणाराच्या हातात एकाने ७०० रुपयांचे पाकीट आणून दिले.

पण सुख व दुःख ही परस्परानुबंधी व परस्परानुगामी असावी असाच ईश्वरी संकेत असतो. हस्तनक्षत्रातील पावसाप्रमाणे निम्मे आभाळ निर्मळ निळे भोर आणि निम्यात ढग विजा व गडगडाट. पावसाच्या सरीतून ऊन पाहावे उन्हाच्या प्रकाशात पाऊस पाहावा. अशीच ईश्वरी संमिश्र योजना आहे. समारंभाच्या सभेत बोलणाऱ्या गृहस्थांच्या तोंडून आनंदाच्या वृत्तीला धीरवृत्तीचे स्वरूप देण्या सारखा टिळकांवरील संकटे व त्यांचे धैर्य याचा उल्लेख किंवा ध्वनी मधून मधून येत होता. तेव्हा हे लोक टिळकांचे सांत्वन करीत आहेत की अभिनंदन करीत आहेत? असेहि अपरिचित मनुष्याला वाटले असते. पण हे लोक भविष्यवादी

नव्हते तर केवळ अनुभववादीच होते. कारण कर्मधर्मसंयोगाने सरकाराने टिळकांवरील खटल्याची जी तयारी चालविली होती तिची परिपूर्तता होऊन समारंभाच्या दिवशीच बरोबर सकाळी टिळकांवर बेळगाव व नगर येथील भाषणाबद्दल खटला भरून जामीन मागितल्याची नोटीस त्यांच्यावर बजावण्यात आली. आदल्या दिवशी याची गुणगुण निघाली होती. पण ती टिळकांच्या कानापुरतीच होती. काही व्याख्यानांची भाषांतरे होत आहेत असेहि कळले होते. पण खटल्यापर्यंत मजल येईल असा कोणाचाच अजमास नव्हता. अर्थात् रविवारी वाड्यात मित्रमंडळीच्या गर्दीत उत्सवसमारंभ सुरू असता पोलीस सुपरिंडेन्डन्ट साहेबांचे दर्शन म्हणजे तो एक आश्चर्यकारक व अशुभदर्शकप्रसंगच होय! वास्तविक पोलिसानी खरे म्हटले तर त्या दिवशी ही नोटीस बजावण्याचे कारण नव्हते. मॅजिस्ट्रेटचे बोलावणे २८ तारखेचे होते. ता. २४ किंवा २५ रोजी नोटीस बजाविली असती तर त्यात काही बिघडण्यासारखे नव्हते. नोटीस शनिवारी तरी बजवावयाची किंवा सोमवारी तरी बजवावयाची हे सरळ होते. रविवारचा दिवस बोलून चालून सुट्टीचा. त्या दिवशी 'शाबाथ' मानून पोलिससाहेबानी विश्रांती घेतली असती तर त्याना कोणी नावहि ठेविले नसते. पण टिळकांच्या घरी हा एक चमत्कार लोकानी आरंभिला तेव्हा विरोधी बुद्धीने आपल्याहि एका चमत्काराची भर त्यात घालून रंगाचा बेरंग करण्याची मौज पाहण्याची बुद्धी पोलीसाना झाली असावी. आता खराच अद्भुत रस अवतरावयाचा तर नोटिशी ऐवजी पकड वारंटच हवे होते. मग खरी बहार! इकडे परगावचे पाहुणे जमलेले आहेत टिळक षष्ठाब्दीच्या अभिषेकाला बसले आहेत बाहेर चौघडा वाजत आहे कचेरीत वर्गणीचे रुपये मोजून देण्याघेण्याची गर्दी उडाली आहे इतक्यात पोलिसानी वारंट घेऊन यावयाचे व टिळकांना कद नेसलेले उठवून पकडून घेऊन जावयाचे! जुन्या काळची रीत जवळ जवळ अशीच होती. कारण खटला म्हणजे घाला आणि घाला हा जितका अवचित घातला जातो तितका तो घाला खरा. पण तसा प्रकार मुळातच यावेळी नव्हता. पकड वारंटाचे दोन खटले पूर्वी होऊन गेले होते. सक्तमजुरी काळे पाणी सगळे प्रकार होऊन गेले होते. टिळकांचे वय ६० वर्षांचे झाल्यामुळे आता त्याना खुनशी सरकार झाले तरी प्रत्यक्ष तुरुंगात घालील ही गोष्ट कल्पनातीत होती. कारण काही वयानंतर लष्करी नोकरीची जशी माफी तशीच या वयात टिळकांनी काहीहि केले असते तरी त्याना प्रत्यक्ष तुरुंगात घालणे अशक्य होते. काळे पाण्यावरून परत येऊनहि फारसे दिवस झाले नव्हते अवघी दोनच वर्षे झाली होती. अशा रीतीने केवळ वयोमानानेहि पाहता काही काही बाबतीत टिळक माफीच्या सदरात येऊन पडले होते असे म्हणण्यास हरकत नाही. शिवाय सरकारच्या दृष्टीने झाले तरी टिळकानी येऊन जाऊन जो काय घोर गुन्हा केला तो होमरूल लीगच्या विषयावर चार दोन कमी अधिक ठासलेली कमी अधिक कडक कमी अधिक थट्टेची टीकात्मक व्याख्याने दिली.

यापरता अधिक उठाव घेण्याइतके मुळातच अधिष्ठान नव्हते. तेव्हा सरकारानेहि जे काय केले ते जामीन घेण्याचीच नोटीस काढिली. पण कसेहि असले तरी ते संकटच. लहानसे झाले तरी ते संकटच. पण लोकांपेक्षा टिळकांच्या दृष्टीने उद्वेग कारक असले तर आपण उभारलेल्या चळवळीला पायबंद कदाचित येणार हेच खरे संकट होते. केसरीने म्हटल्याप्रमाणे उतारवयातील वाढदिवस म्हणजे सुखाच्या कोंदणात बसविलेले ते दुःखच होय. पण सुख व दुःख ही दोन्ही समान पाहण्याची टिळकांची प्रवृत्ति असल्यामुळे चौकट व आतले चित्र ही दोन्ही मिळून एकच चित्र होय असे त्यानी मानले. त्यांच्यातील सुज्ञमंडळींनीहि त्याहून अधिक महत्त्व या प्रसंगाला दिले नाही. आणि जसे काही संकट आलेच नाही अशा खुल्या दिलाने आणि एकंदरीत आनंदी वृत्तीने समारंभ पार पाडला.

## ( ७ ) राजद्रोहाचा तिसरा खटला

एका वीस वर्षांचे आत टिळकावर राजद्रोहाचे तीन खटले झाले. पहिला १८९७ साली. त्याचे वर्णन या चरित्रग्रंथाच्या पहिल्या खंडात आले आहे. दुसरा १९०८ साली. त्याचा समग्र वृत्तांत प्रस्तुत खंडाच्या एका प्रकरणात आहे. तिसरा खटला १९१६ साली झाला. दुसऱ्या खटल्यातील सहा वर्षांची शिक्षा भोगून टिळक परत आल्याला यावेळी अवघी दोनच वर्षे झाली होती. यावरून टिळकावर राजद्रोहाचे खटले करण्यास सरकारला कंटाळा आला नव्हता हे उघड आहे. पण ज्या उद्गारामुळे सरकारला राजद्रोहाचे खटले करण्याची इच्छा होते असले उद्गार भाषणातून किंवा लेखातून काढण्याला टिळकानांहि कंटाळा नव्हता ही गोष्ट मात्र विशेष लक्षात ठेवण्यासारखी आहे.

सरकारला कंटाळा नसतो याचे कारण तीच ती गोष्ट करण्याचा प्रसंग एकाच अधिकाऱ्याला येत नाही. १८९७चा खटला लॉर्ड सँडहर्स्ट यांच्या कारकीर्दीत झाला. १९०८ च्या खटल्याच्या वेळी सर जॉर्ज सिडन हॅम क्लार्क हे गव्हर्नर होऊन आले होते. १९१६ साली खटला झाला तो लॉर्ड विलिंगडन यांच्या गव्हर्नरीत. दर वेळी नव्या गव्हर्नराचा नवा दम. प्रत्येकाचे सल्लागार वेगळे. खटला चालविणारे वकील बॅरिस्टर वेगळे. न्यायमूर्ति वेगळ्या. तुरुंगाचे अधिकारी व तुरुंगाच्या जागा वेगळ्या. राजद्रोहाचे कलमच काय ते जुने. पण तेहि पहिल्या व दुसऱ्या खटल्याचे मध्यंतरी सरकारने बदलून हवे तसे करून घेतलेच होते. पैशाचा तर प्रश्नच नाही! तात्पर्य टिळकावर राजद्रोहाचे खटले नवे नवे पुनः पुनः करण्याचा कंटाळा येण्याचे सरकारला काय कारण?

उलट टिळकांची स्थिति कशी होती पहा. राजद्रोहाचा खटला म्हणजे ते एक संकटच. आणि एकाच माणसाने तीच ती संकटे पुनः पुनः सोसावयाची म्हणजे त्याला सहजच कंटाळा येणार. किंबहुना कंटाळा हा शब्द या कामी अपु-

राच पडतो. कारण राजद्रोहाचा खटला होणे ही गोष्ट काही नुसत्या परिश्रमाला कारण नसते. तर त्यात शरिराने पैशाने व मनाने कष्ट सोसावे लागतात व हानि होते. हे कष्ट ही हानि एकच मनुष्य वरचेवर कसा किती सोशील ? १८९७ च्या खटल्यामुळे टिळकांच्या प्रकृतीवर फार परिणाम झाला. तुरुंगातून ते जिवंत बाहेर येत नाहीत असेच पहाणारास वाटे. १९०८ च्या खटल्यात शिक्षा प्रत्यक्ष काळे पाण्याची झाली. पुढे ती साधी करण्यात येऊन टिळकाना चांगले वागविण्यात आले हे वेगळे. पण तिसरा खटला होऊन शिक्षा झाली तर अशी सवलतहि कदाचित् मिळणार नाही ! टिळकाना राजद्रोहाची संवय लागली. त्याना ते एक व्यसनच जडले ! तेव्हा अशा मनुष्याला दया कोठवर दाखवावी ? जातील तुरुंगात मरून तर जातील असेंहि सरकारला का न वाटावे ? १८९७ च्या खटल्याच्या वेळी प्रथम टिळकाना कर्ज काढावे लागले. मागाहून एक मोठा फंड जमला व बाहेरचे बारिस्टर काम चालवायला आले ! १९०८ च्या खटल्यात टिळकानी स्वतः खटला चालविण्याचे [illegible] एक कारण बॅरिस्टर देण्याइतका पैसा त्यांच्याजवळ नव्हता आणि खटल्याला स्वरूप भयंकर आल्याने जाहीर फंड उभारण्याची सोय नव्हती ! दुसरीहि कारणे होती पण पैशाची वाण हे एक मुख्य होते हे अंतःस्थिति माहीत असणाराना ठाऊक आहे. १८९७ च्या खटल्याच्या वेळी टिळक तरुण उमेदीच्या वयात होते. १९०८ साली त्यांची पन्नाशी उलटून गेली असून उतारवयाचे परिणाम त्यांच्या शरीरावर दिसूहि लागले होते. आणि मंडालेहून परत आल्यावर त्यांची गणना वृद्धांत झाली. 'गीताभाष्य लिहिलेत कुटुंबहि पूर्वीच वारले आता संन्यास घ्याना' असे काही संन्यासमार्गी स्नेह्यानी त्यांना खरोखर म्हटले देखील ! तात्पर्य नवे संकट सोसण्याची टिळकांची यावेळी फारशी पात्रता नव्हती.

अशा सर्व गोष्टी प्रतिकूळ असता व जुन्या दोन खटल्यांचे अनुभव चांगले आठवणीत असता दुसऱ्या खटल्याच्या शिक्षेतून सुटून आल्यावर अवघ्या एक-दीड वर्षातच त्यानी पुनः सरकारला एका नव्या खटल्याची तयारी करून दिली ही गोष्ट आश्चर्यकारक नव्हे काय ? पण टिळकांची लोकोत्तरता ती हीच. पुनः खटला होण्याचा संभवच नाही अशी त्याना कोणी खात्री पटविली होती ? आणि पुनः शिक्षा झाली तर जुन्या सवलती मिळतील किंवा आपले शरीर ती शिक्षा निभावून नेईल असे टिळकांना खरोखर वाटण्यासारखे नव्हते. पण 'प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति' हे गीतावचन टिळकांच्या विषयी या कामी निर्णयात्मक ठरले. परिणाम माहीत असले तरी कर्तव्य करण्याला भ्यावयाचे नाही हाच टिळकांच्या प्रकृतीचा धर्म. यामुळे संधि सांपडताच त्यानी पुनः राजकीय लोकशिक्षणाला सुरवात केली आणि संधि सांपडताच पुनः सरकारने त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरला.

पण पूर्वीच्या दोन खटल्यापेक्षा या वेळी एकंदरीने स्थिति थोडी निराळी आणि किंचित अनुकूल आहे असे टिळकानी खटला भरला गेल्यावर तर ताडलेच.

पण त्या पूर्वी खटल्याला कारणीभूत होणारी व्याख्याने व इतर व्याख्याने देताना व चळवळी करितानाहि टिळकांनी ते थोडे बन्त हरले होते हीहि गोष्ट काही खोटी नाही. राजद्रोहाचा कायदा फार व्यापक आहे ही गोष्ट टिळकांच्या ध्यानात होती. तथापि कायद्याचे हे स्वरूप लक्षात बाळगूनच आपण नेहमी लिहितो व बोलतो असा त्याना आत्मविश्वास असे. मी करितो ती एक प्रकारे तारेवरील कसरत असते. पण जगून वाचून जिंकावयाचे तर अशी कसरत केल्याशिवाय भागत नाही. कायद्याची सीमा सिद्धविली पाहिजे पण संभाळलीहि पाहिजे. रागाने व आवेशाने तर लिहिलेच पाहिजे पण शक्य तेथवर कायद्यात न सापडेल अशा बेतानेच लिहिले पाहिजे. खेळात तडफ दाखविली पाहिजेच पण गाभळून गेल्यावर किंवा मार खाल्यावर खेळ बिघडतो व हरलाहि जातो ही गोष्ट ते आपल्या सहायक संपादक-वर्गाला नेहमी परोपरीने समजावून सांगत. येवढेच नव्हे तर एखादे वेळी एखाद्याने मोठा रसभरित आवेशयुक्त व वाचकाना खूप खमंग वाटून वाहवा होण्यासारखा लेख लिहिला तर ते त्याची अंतस्थपणें वाहवा करीत, मनातून त्याच्या आवेशाचा गुण घेत, पण त्याला वळण लावण्याकरिता त्याच्या तोंडावर त्याला नावे ठेवीत आणि त्याचे दोष त्याच्या कानावर जावे म्हणून त्याच्या पश्चात् त्याच्या स्नेही मित्राजवळ गुणदोषमिश्रित अशी त्याच्यावर टीका करीत. स्वतः टिळकांच्या लेखाविषयी कोणालाहि केव्हांहि असाच अभिप्राय द्यावा लागे ते लिहिताना बोलताना राजद्रोहाचा कायदा ते मनात जागता वागवीत. डॉक्टर लोक तोंडाने रोग्याशी व परिचारकाशी बोलत असता त्यांचा हात नाडीवर असतो व ते तिचे ठोकेहि कदाचित मोजीत असतात. तोच प्रकार वक्ते टिळक व संपादक टिळक यांचा असे. त्यांच्यावरील तीनहि खटल्यात स्वतः त्यांचे असे जे लेख होते ते कायद्याच्या मर्यादेत होते हे सर्वांना मान्य आहे. आणि पहिल्या दोन खटल्यासंबंधाने त्यांचे असे निश्चित मत होते की त्या खटल्याला खरे कारण त्यांचे किंवा इतरांचेहि लेख नसून महाराष्ट्रात व बाहेर झालेले राजकारणाच्या प्रकरणातले खून हेच होय. १९१४ साली हे खुनाचे वातावरण शिल्लक उरले नव्हते. आणि वातावरण नसता नुसत्या आग्रहाने किंवा तत्त्वप्रेमाने कोणाला भरीला घालावे असा टिळकांचा स्वभाव नसल्याने त्यानी स्वतःच अत्याचारनिषेधक जाहीरनामा प्रसिद्ध केला होता. महायुद्ध सुरू झाल्यामुळे केवळ युद्धविघातक नव्हे असा राजकारणी उपदेश कोणी कितीहि केला तरी तो यावेळी चालण्यासारखा आहे असे टिळकानी ओळखले होते. पण या वेळी जी चळवळ होईल ती अवश्यमेव नेहमीहून काही वेगळ्या स्वरूपाची होईल असे कोणालाहि उघड दिसत होते. युरोपात चिरडून टाकलेल्या चिमुकल्या मित्रराष्ट्रांची कड घेऊन इंग्लंडने स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाचे निशाण उभारले होते. कोणी कोणाच्या राज्यात राहावे किंवा स्वतःच्या राज्यातहि कोणत्या प्रकारची राज्य-घटना चालू करावी या विषयी हरएक राष्ट्राला स्वतंत्रता असावी या तत्त्वाचा

बहाणा त्यांतील मायावी मुत्सद्यांनी सुरू केला होता. आणि कोणताहि मंत्र हा स्वतः तो जपणारावर उलटविता येतो यामुळे तीच भाषा सरकारविरुद्ध हिंदी लोक बोलू लागले तेव्हा ती त्याना निमूटपणे ऐकून घ्यावी लागली. किंबहुना हिंदी राष्ट्राच्या राजकीय आकांक्षेच्या पुराने वाहवून नासाडी करू नये म्हणून ती वाहण्याला बंदिस्त कालवा खणून त्यात तो पूर डांबून टाकण्याच्या उद्देशाने सरकारने आपण होऊन पुढाऱ्याना म्हणण्यास सुरवात केली होती की, "युद्धात हिंदुस्थानाने इंग्लंडला फार मदत केली तेव्हा आता जनतेला अधिक राजकीय हक्क देणे हे कृतज्ञबुद्धीला उचित असेच आहे. तर आता कोणकोणत्या सुधारणा हव्या त्यांचे टाचण करण्याला सुरवात करा. वेळ दवडू नका." दुसरे पक्षी लोकानाहि असे वाटे की "ही काही तरी मिळण्याची वेळ आहे. अशा वेळी स्वातंत्र्यादि राजकीय उपपत्ति व तात्विक हक्क वादाला पुढे काढण्यापेक्षा जराशी मोठीच का होईना पण विधायक व मूर्तस्वरूपाची मागणी करावी." "तुमच्या राज्यात राहू इच्छितो म्हणूनच तर तुम्हाला युद्धात मदत केली. मग मागणी कितीहि मोठी मागितली तरी ती राजद्रोहात्मक होऊ शकत नाही हे निर्विवाद आहे" असे सरकाराला सहज म्हणता येण्यासारखे होते. आणि सरकारहि पेचांत सांपडले असून लोकाना खूप ठेवण्याच्या विचारात होते यामुळे बारीक सारीक शिव्याशाप किंवा चिमटे वक्त्यानी किंवा लेखकानी घेतले तर त्याकडे कानाडोळा करण्याकडे सरकारचीहि प्रवृत्ति होती. होमरूलची तपशीलवार घटना वेगवेगळ्या प्रकारची असली तरी होमरूलची मागणी राजद्रोहात्मक नव्हे हे निश्चित झाल्यावर, अत्याचाराविरुद्ध उघड उपदेश झाल्यावर, आणि युद्धात सरकारला मदत करू नका असे म्हणण्याऐवजी मदत करा असे उघड स्वार्थीपणाने म्हणत असता मी कितीहि आवेशयुक्त व निंदात्मक बोललो तरी ते यावेळी पचलेच पाहिजे अशी टिळकानी मनाशी गाठ घातली होती. वेर खटला झालाच तरी माझे वय आता साठ वर्षांचे झालेले तेव्हा शिक्षा झाली तरी सरकार काही काळ्या पाण्यावर पाठवीत नाही किंवा सक्तमजुरी देत नाही हे खास. मग दुबळ्या शरीराची व वार्धक्याची कीव करण्याकरिता आवेशाला गवसणी घालण्याचे किंवा म्यान करण्याचे काय कारण असे टिळकानी मनाला विचारले असल्यास ते योग्यच होते. शिवाय केसरीची सांपत्तिक स्थिति १८९७ किंवा १९०८ या सालापेक्षा पुष्कळ बरी होती. तेव्हा खटला झाला तरी तो लढण्याला हाताशी थोडेबहुत साधन होते. या सर्व विचारसरणीमुळे या चळवळीत बहुधा खटला होणारच नाही, आणि झालाच तर तो आपण जिंकू असा टिळकांचा भरवसा होता. पैकी त्यांचे पहिले अनुमान बाधित झाले. पण दुसरे अबाधित ठरले.

होमरूलच्या नव्या चळवळीचा पूर्ववृत्तांत मागे दिलाच आहे. १९१६ सालचा खटला हा चळवळीतला मध्यमेरू होय. तेव्हा त्याचा वृत्तांत कसा घडला हे आता पाहू. होमरूल लीग ऊर्फ स्वराज्यसंघ स्थापन झाल्यावर पहिले काम टिळकानी

घेतले ते व्याख्यानांची मोहीम. या मोहिमेला त्यानीच बेळगावास ता. १ मे रोजी प्रारंभ केला. नंतर संघाचे चिटणीस केळकर यांनी पुणे येथे ता. २६ सप्टंबर रोजी किर्लोस्कर थिएटरात होमरूल या विषयावर इंग्रजीत निबंध वाचला. अध्यक्षस्थानी बॅरिस्टर बॅपटिस्टा हे होते. व्याख्याने काही एका पद्धतीने व्हावी कोणी भलते सलते बोलू नये असे ठरल्यामुळे केळकरानंतर फक्त बॅपटिस्टा यांचेच भाषण होऊन सभा विसर्जन करण्यात आली. पण याप्रसंगी सरकारी रिपोर्टरांकरिता लिहून दोन तीन खुर्च्या अधिक ठेवा अशी केळकराना पोलिसाकडून विनंति करण्यात आली. कारण विचारता त्यानी असे सांगितले की या व्याख्यानमालेची व्याख्याने संपूर्ण टिपून घेण्याकरिता स्वतः गव्हर्नरच्या कौंसिलाचे लघुलेखक पाठविण्यात येणार आहेत. त्यावर केळकर म्हणाले "होमरूलच्या चळवळीला हा विशेषच मान म्हणावयाचा की पोलीस रिपोर्टरानी काम भागत नाही. खुद्द गव्हर्नरसाहेबांचे रिपोर्टर यावे लागतात. पण आनंदाची गोष्ट ही की पूर्वी आमच्या भाषणांचे मोडके तोडके रिपोर्ट सारांशरूपाने वर पाठविले जात. आपली व्याख्याने ज्याना उद्देशून दिली जातात त्यानीच ती स्वतः आपल्या कानानी ऐकावी अशी आमची फार इच्छा. पण आमची व्याख्याने ऐकण्याला गव्हर्नर व कौन्सिलर यानी समक्ष येण्याचा मान आम्हाला पूर्वी कधी मिळाला नाही तो आता अप्रत्यक्ष तरी मिळणार म्हणावयाचा ! कारण रिपोर्टर संपूर्ण भाषणाचे साग्र रिपोर्ट पाठविणार ते कौन्सिलर व कदाचित् गव्हर्नरसाहेबहि स्वतः वाचणार. कसेहि असो. आमच्या कार्याचा जय आहे खरा."

## बेळगांव येथील व्याख्यान

बेळगावास मे महिन्यात होमरूल लीगची सभा झाल्यावर इतिहास संशोधक मंडळामार्फत सभा भरविण्यात आली. पुण्यास हे मंडळ नुकतेच स्थापन करण्यात आलेले होते. त्याच्या प्रसाराचे काम सुरू झाल्याने बेळगावास जमलेल्या मंडळीकरिता ही सभा मुद्दाम बोलाविण्यात आली होती. सभेत मंडळाचे हेतू वगैरे सांगण्यात येऊन जुन्या इतिहासाचे संशोधन करण्याविषयी कळकळीची विनंति करण्यात आली. ही सभा संपताच त्याच जागी सायंकाळी ६ ते ७॥ पर्यंत टिळकांचे होमरूलवर पहिले व्याख्यान झाले. प्रथम नामदार बेळवी यानी दादासाहेब खापर्डे यानी अध्यक्षस्थान स्वीकारावे अशी सूचना केली. त्याला मासूर वकील यानी अनुमोदन दिले. दादासाहेब खापर्डे म्हणाले "आज स्वराज्यासारखा विषय व त्यावर व्याख्यान देण्याला टिळकांसारखा वक्ता हा मोठा योग सुदैवाने आला आहे. स्वराज्यसंघाची स्थापनाहि आजच झाली आहे. टिळकांचे भाषण ऐकून आपण त्यांचे ह्या चळवळीतील शिपाई बनावे आणि चळवळ पुढे चालवावी. कोणत्याहि विषयाचा मनुष्य जसजसा विचार करू लागतो तसतसा तो तद्रूप बनतो. भृङ्ग नावाच्या किड्याला स्वतःची संतति नसते. परंतु तो बाहेरचे जीव धरून आणून ठेवतो. आणि त्यांच्याकडे नित्य पाहतो व त्यांचे लक्ष आपणाकडे वेधून

घेतो. अशा रीतीनें ते जीवच भूषणमय होऊन जातात. टिळकांचीही गोष्ट तशीच आहे. ”

नंतर टिळकांनी व्याख्यान देण्याला सुरवात केली. ते म्हणाले “ ह्या चार दोन दिवसांत ज्या विषयाची आपण चर्चा केली आणि ज्याकरिता हा नवा संघ स्थापिला त्याविषयींच मी दोन शब्द सांगणार आहे. स्वराज्य म्हणजे काय याविषयीं पुष्कळांना अज्ञान असतें. कित्येकांना ते खरें कळूनहि त्याचा ते विपर्यास करितात. कित्येकांना ती गोष्टच मुळीं नको असते. म्हणून ‘ स्वराज्य ’ हे काय त्याची मागणी कशी करावी आणि कां करावी हे पाहिले पाहिजे. हा प्रश्न केवळ माझ्याच उद्योगानें उत्पन्न झाला आहे असें नाही. स्वराज्याची कल्पना फार जुनी आहे. देशांत राज्य आहे पण ते ‘स्व’ नाही म्हणूनच हा उद्योग. राज्य कितपत चांगले कितपत वाईट हा प्रश्न नाही. राज्य परकीयांचें आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. जुनें हिंदुराज्य मोडून इंग्रजी राज्य कां व कसे बनले हे मी आज सांगत नाही. विलायतेंत बादशहा आहे पण तो नांवाचा आहे. तिकडील तरतरीत सुशिक्षित लोक येऊन राज्य करितात व आपल्या बुद्धीप्रमाणें ते राज्याची व्यवस्था चांगली करितात. देशांत आज अराजक खास नाही. सरकार आहे आणि ते पाहिजेच आहे. अराजक म्हणजे काय हे आपल्या जुन्या इतिहासावरून माहितीच आहे. अर्थात राजसत्तेचे दोन विभाग असतात. एक सल्लागार मंडळ व एक कार्यकारी मंडळ. इंग्रजी राष्ट्राच्या मदतीनें सहानुभूतीनें त्यांच्या देखरेखीखाली आम्हास आपलें कल्याण करून घ्यावयाचें आहे ही गोष्ट खरी. पण ज्याच्या साहाय्यानें ही गोष्ट घडावयाची आहे ते सरकार अव्यक्तच आहे. परब्रह्माहून माया जशी निराळी तसेंच अव्यक्त सरकारपासून व्यक्त सरकार हे वेगळें असतें. आणि ते व्यक्त सरकार वेळोवेळी पालटतें. ‘ स्वराज्य ’ हा शब्द ह्या व्यक्त सरकारला उद्देशून आम्ही योजितो. स्वराज्याचा प्रश्न म्हणजे राज्यकारभाराचा प्रश्न होय. अव्यक्त सरकार आम्ही बदलूं इच्छीत नाही. पण व्यक्त सरकार बदलावें असें आमचें म्हणणें आहे. आज जे कारभार करितात त्यांच्याहून वेगळ्या लोकांच्या हातीं वेगळ्या पद्धतीनें कारभार दिला असता तो लाभदायक होईल अशी समजूत. स्वतः राजा प्रजेच्या अनहिताची गोष्ट कोणतीच करूं शकत नाही असा इंग्रजी राजनीतीचा सिद्धांत आहे. इंग्लंडांतहि प्रधानमंडळ बदलत असते. पार्लमेंटांतील पक्ष परस्पर भांडतात व प्रधानमंडळ बदलतात. राजाला कोणतेही प्रधानमंडळ सारखेंच असतें. तो निर्गुण परब्रह्मस्वरूप आहे. मोठ्या मोठ्या प्रसंगी देवासारखी त्याची मिरवणूक निघते व लोकनिष्ठा व्यक्त होते. पण प्रत्यक्ष कारभार करणारे वेगळेच असतात. हा कारभार ह्या देशांत स्टेट सेक्रेटरीपासून पाटलापर्यंतच्या अधिकारी मालकाच्या हातीं आहे. अर्थात अधिकारी सैन्यातला एक शिपाई बदलावा व दुसरा नेमावा असें म्हटलें असतां राजद्रोह नाही. तसेंच हा कलेक्टर नको व्हाइसरॉय नको स्टेट सेक्रेटरी नको असें म्हटलें तरीही तो राजद्रोह

नव्हे. बंगालच्या चळवळीत फुल्लरसाहेब गव्हर्नर नको अशी लोकानी मागणी केली व शेवटी त्यानी राजीनामा दिला. तुम्ही कॉंग्रेस कॉन्फरन्स वगैरेमध्ये आपल्या तक्रारी सांगता गाऱ्हाणी गा आक्षेपांच्या याद्याच्या याद्या मांडता पण ती दूर होण्याला ज्याच्या हाती सत्ता ाला अर्ज करावा लागतो. पण ही गाऱ्हाणी दूर करण्याची सत्ता आमची आम्हाला का असू नये ? भूक लागली म्हणजे मूल रडते पण आई ते स्वतः न उमजून त्याला दुसराच काही उपचार करू लागते. पण मुलाला खरे काय होते ते त्याचे त्यालाच कळणार ! मुलासारखे आम्ही प्रजाजन दुबळे झालो आहो. पण प्रौढ झालो आहो म्हणून आमच्या गोष्टी आम्हाला कळतात. घरची व्यवस्था मनाप्रमाणे व्हावी असे वाटू लागते. अधिकाराची ही गोष्ट अशी की काही नियमानेच काम करावे लागते. तथापि तोच अधिकारी आमच्या तंत्राने वागणारा व दुसऱ्याच्या हाताने वागणारा ह्यात पुष्कळ भेद आहे. परकी अधिकारी घमेंडखोर असतात. प्रजेच्या दुःखाचा स्वतः त्याना अनुभव नसतो. म्हणून हा अधिकारीवर्ग बदलावा हे प्राप्त. तसे झाल्याशिवाय आम्ही मागावे ते त्यानी नाही म्हणावे. आम्ही सांगावे त्याहून वेगळ्या रीतीने त्यानी करावे हे संपणार नाही. अधिकार मागतानाही आम्ही त्यांची आमची संयुक्त जबाबदारी असावी असेच म्हणतो. मुलगा बापाजवळ हौसेची जिन्नस मागतो. बाप नाही म्हणतो. त्यावेळी त्याला मुळीच कळत नाही व वाईट वाटते. पण त्याच्याहि हाती अधिकार दिला तर त्याला ती हौसेची जिन्नस घेऊ नये तिला किंमत अधिक पडते हे कळेल. ही दृष्टि प्रत्येक खात्याला लावली म्हणजे झाले. अधिकार अधिक चांगला कसा बजवावा हे त्याचे त्यालाच कळले पाहिजे व बाप मुलगा यांच्यामध्ये असा विरोध दिसतो. म्हणून कायद्याने मुलगा सज्ञान होण्याची मर्यादा घालून ठरविली आहे. पण राजनीतीच्या कायद्यात अशी मर्यादा कोण घालतो ? अशी मर्यादा घालून घेण्याचे आमचे प्रयत्न आहेत. ह्या चळवळीचे नाव होमरूलची चळवळ. गोष्ट साधी आहे. म्हणून तिचा कोणी विपर्यास करू नये. पुन्हा सांगतो की आमची तक्रार राजा बादशहाबद्दल नाही. तो देववंद्यच आहे. मधल्या देवताविषयी आमची तक्रार आहे. कोणी म्हणतो हिंदी लोक आज स्वराज्याला पात्र नाहीत. पण नामदार सिंह चौबळ हे एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलर झाले ते लायक आहेतच की नाही ? बरे स्वतः त्यानी तरी आपणाला नालायक म्हणवून घेतले आहे काय ? मग ते अपात्र नाहीत तसे इतरहि अपात्र नाहीत. आम्ही पात्र का नाही ? शेक्सपिअरच्या नाटकात ज्यूने ख्रिस्त्याला जो प्रश्न विचारला तोच मी विचारतो. विलायतेतून गोरा करकरीत २१ वर्षांचा तरणाबांड येतो. आला की तो असिस्टंट कलेक्टर. ६० वर्षांचा मामलेदार असला तरी तो ह्याच्यावर. ह्याचे काम ह्याचा अनुभव सारा फुकट. त्याच्यापुढे ह्यानी उभे राहिले पाहिजे आणि पगार पाहिजे म्हणून हा उभा राहतो. आम्ही पात्रच नसतो तर राज्य कसे केले असते ? आज अराजक नाहीत तसे तेव्हाहि अराजक नव्हते. कृपा करा. थेट नाही असे स्पष्ट म्हणा. पण

पात्र नाही असे का म्हणता? तुम्ही आम्हाला अधिक शहाणे करण्याला आला हे खरं! पण किती दिवस शिकविणार? दोन पिढ्या का तीन पिढ्या का कालाच्या अंतापर्यंत? शिक्षकानें काही मुदतीत शिकवून मुलगा तयार केला नाही तर शिक्षकच नालायक ठरतो. आज देशी संस्थानात व्यवस्थित राज्यकारभार चालतो की नाही? अधिकार द्या व चांगले चालविले नाहीत तर काढून घ्या. बादशहाला सिव्हिल सर्व्हंटानी कारभार केला काय किंवा आमच्या वेळवीनी केला काय एकच. गोऱ्या नोकरांच्या जागी काळे नोकर इतकाच फरक. हे म्हणण्यात राजद्रोह नाही. पोलिस शिपायाचा द्रोह म्हणजे राजद्रोह नाही. पोलीस शिपाई मी राजा म्हणणार हे ठीक आहे. पण आम्ही ते कसे मान्य करणार? हीच गोष्ट सर्वात वरीष्ठ अधिकाऱ्यापर्यंत समजावी. जन्मभर आम्हाला सेवेत दिवस घालविण्याला लागले म्हणून काही गुण प्रगट दिसत नसतील. पण सेवा सोडून अधिकारीपणा आल्याशिवाय ते गुण तरी कसे दिसणार?

नुसते लखोट्यावर पत्ते लिहिण्याचे काम २५ वर्षे केले तरी आतल्या कागदावरचा मजकूर लिहिण्याला कसा येणार? हल्लीच्या राज्यव्यवस्थेत अधिकारविभागणी म्हणून काही आहे. पण ती अजूनहि जुन्या व्यापारी तत्त्वावर झालेली आहे. कंपनीचा राज्यकारभार म्हणजे केवळ एक प्रकारची मक्त्याची मामलत आहे. पुढे ही पद्धति चांगली नाही असे इंग्रजाना कळून आले. महाराणीनें आपले हाती अधिकार घेतले. कंपनी गेली. पार्लमेंट आले. पण अजून हिंदुस्तानात कर कोणते बसवावे किती खर्च करावे हे स्टेट सेक्रेटरी ठरवितो. तोच खरा धनी. आणि त्याच्या हाताखाली गव्हर्नरसुद्धा सर्व नोकर. राणीच्या जाहिरनाम्याप्रमाणे धोरण खरोखर अमलात आले नाही. जाहीरनामा फुकट गेला. आम्हाला तेव्हा शिक्षण असते तर जाहिरनाम्याचे वेळी आम्ही आमच्या प्रजेच्या हिताची व्यवस्था मागितली असती. तेव्हापासून दादाभाईसारखे आमचे पुढारी लोक ही मागणी करीत आले आहेत. पुढे कायदे कौंसिल झाले. म्युनिसिपालट्या झाल्या. तथापि भाषणे करण्यापलीकडे खरी सत्ता हाती आली नाही. एरवीची भाषणे वर्तमानपत्रातून येतात. कौंसिलातील भाषणे सरकारी गॅझेटात येतात इतकाच फरक! आम्ही अधिक अधिकाराची मागणी केली की म्हणतात 'हो तुम्ही तयार झाला की आम्ही बोटीत बसून विलायतेला निघालोच.' मुदतीवर मुदती सांगतात. 'आशां कालवर्तीं कुर्यात्' हे एक सूत्र आहे. त्याच्यामागून 'कालं विघ्नेन योजयेत्' हे दुसरे. याला धरूनच सर्व धोरण आहे. बोलता बोलता निमित्त सांगून विघ्न आणतात. ही कलागत करण्याची यांची राजनीति जुनीच आहे. पाच सहा मेंबर्स केले तरी खरा फायदा नाही. लोकांची खात्री होऊन चुकली आहे म्हणून ते म्हणतात 'जे काय अधिकार द्यावयाचे ते निखालस तोडून द्या.' आम्हाला अधिकार देतात ते कुंडीत झाड वाढविल्याप्रमाणे. पण मोठमोठ्या वृक्षांची बियाणी करावयाची तर बी पोत्यानेच ओतले पाहिजे. कुंड्यातली झाडे गोजिरवाणी दिसतात पण ती फार

नाजूक फार दिवस टिकणारी नव्हेत. देशात कर वसूल कोणते करावे जमेच्या मानाने खर्च किती करावा ह्या आमच्या हिताच्या गोष्टी आम्हाला का कळणार नाहीत ? लढाईवर पैसा किती खर्चावा हे बादशहा ठरवित नाही. मुख्य प्रधान ठरवितो. चूक झाली तर मुख्य प्रधान राजीनामा देतो. आणि त्याने राजीनामा द्यावा अशी मागणी करण्यात राजद्रोह होत नाही. होमरूल दिले म्हणजे इंग्रजांचे राज्य जाईल बुडेल असे नाही. ज्या ज्या दारातून आम्ही बाहेर जाऊ म्हणतो तेथे तेथे ब्यूरॉक्रसी उभी आहे. तिला धक्का देऊन आम्हाला बाहेर जाणे आहे. तिची अडवणूक आम्हाला नको. आम्हाला आडवावयाचे ते अडवून शिवाय हा पगारही भारी घेतो. आणि म्हणतो ' तुमच्याकरिता विलायतेतील थंड हवा सोडून इकडे आलो. ' पण बाबा इकडे आलास तो तुला बोलाविला आहे कोणी ? होमरूल हे हल्लीच्या पार्लमेंटरी कायद्यात दुरुस्ती करून घ्यावयाचे व मिळवावयाचे आहे. त्याकरिता आम्ही काही कोणा परक्या राष्ट्राला आमच्यावर या म्हणत नाही. तुमच्याकडे अर्ज करितो. तुमचे राज्य देशात स्थिर व्हावे असे वाटते म्हणून हिंदी लोकानी धैर्य व शौर्य दाखवून युद्धात तुम्हाला मदत केली आहे. असो. ह्या चळवळीकरिता आम्ही संघ स्थापिला आहे आणि त्याला आज नाही तर उद्या तरी फळ येईल. राजनिष्ठा व अराजनिष्ठा ह्यांतील भेद सांगितला तो लक्षात ठेवा. ही चळवळ महाराष्ट्रात सुरू झाली आहे. यश येणे ईश्वराच्या हाती आहे. माझ्या डोळयाला ते यश दिसणार नाही. पण कर्माला फळ आलेच पाहिजे. मनुष्य मोक्षाकरिता यत्न करितो. पण तो मोक्षहि त्याच्या डोळयादेखत त्याला मिळत नाही. तो मिळण्याला आधी मरावेच लागते. या बुद्धीने उद्योगाला प्रवृत्त व्हा. ''

## अहमदनगर येथील व्याख्याने

यानंतर त्याच महिन्यात अहमदनगर येथे जिल्हा परिषद भरली. परिषदेचे अध्यक्षस्थान केळकर यांना देण्यात आले होते. बेळगाव येथे होमरूल लीग कॉन्फरन्स भरली तेव्हाच या स्थानाची सुपारी केळकराना देण्यात आली होती. कारण नगरास भरणारी सभा नेहमीच्या जिल्हा सभेच्या स्वरूपाचीच होती तरी तेव्हा नव्या होमरूल लीगच्या चळवळीचे प्रतिबिंब त्या सभेत व बाहेरहि पाडण्याचा चालकांचा विचार होता. आणि केळकर हे होमरूल लीगचे चिटणीस असल्यामुळे त्यांना अध्यक्ष केल्याने हे दुतर्फी काम आपोआप साधणार होते. नगरास लोकमान्य टिळकांनी यावे अशी तेथील मंडळीची फार इच्छा होती. परंतु जिल्हा परिषदेचा मान हा त्यांना देण्याला फार अल्प. म्हणून तो मान केळकराना द्यावा व लोकमान्य टिळकांना स्वतंत्र निमंत्रण देऊन त्यांचा विशेष सत्कार करावा अशी योजना होती आणि ती तडीस गेली. अहमदनगर येथील जिल्हा परिषद तारिख ११ मे रोजी भरली होती. स्वागताध्यक्षाचे स्थान रा. ब.

चिपळूणकर यांना देण्यात आले होते. नगरात यावेळी एकी असून उत्साह पुष्कळ होता. आणि टिळकांनी नगरास भेट देण्याचे कबूल केल्यामुळे तो दुणावला होता. तारीख ३१ मे रोजी सकाळी टिळक केळकर व इतर मंडळी नगर स्टेशनवर पोचली तेथून शहरापर्यंत त्यांची मिरवणूक काढण्यात आली. शहरचे मुख्य रस्ते अडून गेले होते. आणि गर्दीत एकदोन लहानसे अपघातहि झाले. तेथील एक प्रमुख मारवाडी व्यापारी हे मिरवणूकीची व्यवस्था करीत असता एका स्वयंसैनिक घोडेस्वाराचा जबर धक्का त्यांना बसला होता म्हणून मिरवणूक संपताच टिळक केळकरांनी सदर गृहस्थांच्या घरी जाऊन त्यांच्या प्रकृतीची चौकशी समक्ष केली. परिषद वागडे थिएटरात भरली होती. सर्व पक्षांचे लोक हजर होते. लो. टिळकहि परिषद चालू असता हजर राहिले. परंतु त्यांची वेगळ्या वेळी दोन स्वतंत्र व्याख्याने व्हावयाची ठरल्यामुळे परिषदेत भाषण करण्याची विशेष तसदी त्यांना कोणी दिली नाही.

टिळकांचे व्याख्यान होण्यापूर्वी त्यांना शहरात अनेक ठिकाणी पानसुपाऱ्या झाल्या. नगरच्या व्यापाऱ्यांनी त्यात्यात्यात विशेष पुढाकार घेतला होता. आणि टिळकांचे व्याख्यान बाजारपेठेत व्हावे म्हणून तेथे त्यानी मुद्दाम मंडप घातला होता. व्याख्यानाला अतिशय गर्दी झाली होती. पहिले व्याख्यान तारीख ३१ मे रोजी सायंकाळी झाले. अध्यक्षस्थानी नगर येथील वृद्ध वकील व पुढारी चौकर हे होते. ही व्याख्याने टिपून घेण्याकरिता येथेहि सरकारी लघुलेखक हजर होते. टिळकानी स्वतः आपले रिपोर्टर ठेवले नव्हते. कारण व्याख्याने मराठीत व्हावयाची व मराठी लघुलेखक तेव्हा मिळत नव्हते. वर्तमानपत्रातून वगैरे टिळकांच्या व्याख्यानाचा सारांश प्रसिद्ध झाला. पण तो फारच त्रोटक होता. पहिल्या व्याख्यानापूर्वी टिळकाना मानपत्र देण्यात आले. परंतु त्याला वेगळे म्हणून उत्तर न देताना टिळकानी होमरूल ह्या विषयावरच मुख्यतः भाषण केले. व्याख्यानाचा सारांश स्थूलपणे असा होता:–"तुम्ही मला सन्मान देण्याकरिता बोलावून आणले व ती संधि साधून मी आपले कार्य तुमच्याकडून साधणार अशी विपरीत गोष्ट घडत आहे. पण या कार्यात माझ्या इतका तुमचाहि फायदा आहे. लोकाना हितावह अशा अनेक गोष्टी सांगता येतात. पण राजकीय दृष्ट्या जी तुमच्या हिताची गोष्ट तीच मी तुम्हाला मुख्यतः आज सांगणार आहे. घरच्या खाजगी गोष्टीतहि हिताच्या गैरहिताच्या अशा असतात. पण त्यांची चर्चा आपण घरी व खाजगी रीतीने तरी करितो. सार्वजनिक हिताची गोष्ट तशी नाही. तिची प्रसिद्धपणे चर्चा करावी लागते. या चर्चेत पहिला मुद्दा केव्हाहि असाच निघतो की, आपल्या हाती अशी कोणतीहि गोष्ट नसल्याने देशातील सर्व घडी बिघडली आहे. परदेशी वस्तु नको स्वदेशीच. पण दारू नकोशी वाटते. पण बंद करण्याची सत्ता नाही. ५०-५० वर्षांच्या विचाराने शाहाण्या हिंदी पुढाऱ्यानी हाच एक सिद्धान्त हुडकून काढला. यावर कोणी म्हणतात दारू बंद करण्याची सत्ता तुम्हाला नसेल पण

तुह्मी पिऊ नका म्हणजे झाले. फार तर लोकाना उपदेश करा. पण निवळ उपदेशानी बंदी कशी होणार ? पण ही बंदी सरकारला करिता येणारी आहे. मात्र ती गोष्ट त्यांच्या मनात आली ाहिजे. तीच गोष्ट दुष्काळी व्यवस्थेची. लोकाना व्यापार हा आमच्या हाती आहे असे वाटते. पण तेहि खोटे. आमचे व्यापारी म्हणजे परदेशी मालाचे अडते व दलाल. सरकार परकी म्हणून पदोपदी परक्यांचा नफा. पूर्वी मुसलमान राजे होते तेहि परकीच, पण हिंदुस्थानातले उद्योग धंदे वाढावे अशी तरी त्यांची इच्छा होती. परकी याचा अर्थ परक्या देशातून आलेले असा नाही. हिंदुस्थानच्या लोकांचे कल्याण व्हावे अशी खरी इच्छा धरतील ते कोणीहि परकी नव्हेत. निवळ धर्माने परकी तो परकी नव्हे. कोणाला वाटते जुने राज्य गेले त्याचे जागी हे नवे राज्य आले इतकेच; पण तसे नाही. प्रथम प्रथम इंग्रज उपकारकर्ते वाटले. पण पुढे ही दृष्टि बदलली. प्रथम अशी दृष्टि होती ह्याचे कारण असे की, लोकाना वाटे आम्हाला काय हवे हे सरकारला फक्त कळविण्याचा अवकाश, ते घडून येईल. आमचे मनोगत त्याना समजत नाही त्याला काय करावे ? पण सरकारला ही गोष्ट कळत असूनहि वळत नाही, ही गोष्ट पुढे पुढे वरील प्रकारच्या विचारसरणीच्या लोकानाहि मान्य झाली. सरकारला काहीहि सांगावयाला जा, त्याविरुद्ध उलट आपल्यासारखे असते तेवढेच ते बोलतात. दुसरे कोणी म्हणतात "कोणीहि राज्य स्वार्थाकरिता करतो. तो आपली सगळी भाकरी प्रजेला देईल तर राजा होईल तरी कशाला ? म्हणून त्यातील काय चतकोरभर देतील ती आनंदाने स्वीकारा आणि आभार माना."

पण मला हे मत मान्य नाही. सरकारने एवढे राज्य कसेहि मिळविले असो. राजे म्हणून त्यांचे काही एक कर्तव्य आहे. उद्यां सरकारने रस्ते न बांधले तर तुह्मी दोष द्याल की नाही ? आणि आह्मी कर देतो तो कशाला असे विचाराल की नाही ? पण रस्ते बांधून किंवा आगगाड्या तारायंत्र करूनहि सरकारचे कार्य पुरे होत नाही. काही काही गोष्टी सरकारने केल्या. किंबहुना त्या पूर्वीपेक्षा चांगल्या केल्या असेहि आह्मी म्हणतो. पण तक्रार आहे ती न केलेल्या गोष्टींची. त्या सांगावयाला गेला म्हणजे त्याना आपला अपमान केलासा वाटतो. पण खऱ्या प्रजावत्सल सरकारला असे वाटणार नाही. वाटेल तर सत्ता हाती ठेवा. तीत काही कमी पडूं देऊ नका.पण त्या सत्तेच्या पोटात आम्हाला भरपूर हातपाय का पसरूं देत नाही ? आम्हाला धनी चालतो पण कोठावळा चालत नाही. हे मधले कोठावळे गेले पाहिजेत व त्यांचे अधिकार लोकाना मिळाले पाहिजेत. स्वराज्य मिळविणे म्हणजे इंग्रज सरकार किंवा बादशाही सत्ता काढून टाकणे नव्हे. ते विचारे येथे येऊन सत्ता चालवितच नाहीत. हे मधले गृहस्थ मोठे शिकलेले हुशार आहेत. पण त्यांचे सारे लक्ष्य स्वदेशाकडे आहे. बादशहानी यांच्या कडची पूजा काढून आमचे कडे द्यावी असे आह्मी म्हणतो. कोणी म्हणेल हे पुजारी आणि बादशाहा एकाच वर्णाचे आहेत. पण आम्हाला प्रजा असे एकदां बादशहानी म्हटल्यावर आह्मी

काळे की गोरे हा भेद त्यानी मनात आणू नये. आह्मी 'स्वराज्य' मागतो ते 'स्थानिक स्वराज्य' नव्हे. वर बादशहा व इंग्रजी सत्ता कायम. पण बाकीची व्यवस्था करण्याचे अधिकार पूर्णपणे लोकांच्या हाती असणे हेच स्वराज्याचे लक्षण. इंग्रजांच्या जागी जर्मन यावे असे आम्ही इच्छित नाही म्हणूनच तर हिंदी वीर रणभूमीवर प्राण खर्ची घालीत आहेत. त्यांच्या रक्तापेक्षा राजनिष्ठेचा अधिक पुरावा कोणता द्यावा? शौर्याप्रमाणे विद्येनेहि आम्ही लोक कमी नाही. मग काळ्या गोऱ्यात भेद का? आमच्यातील काही काळे बडे अधिकारी होतात. पण चालू पद्धतीमुळे तेहि गोऱ्या सारखेच बनतात. म्हणून पद्धतिच बदलावी ही आमची मुख्य मागणी. चार दोन काळे गोऱ्यांच्या जागी नेमल्याने ती पुरी होणार नाही. पैसा पुष्कळ खर्च होतो पण तो अनाठायी. लोकशिक्षणाला पैसा नाही आणि कलेक्टरचा पगार मात्र २५०० रुपये! सगळ्या ब्रिटिश साम्राज्याची सूत्रे हलविणाऱ्या मुख्य प्रधानाला ५००० रुपये पगार आणि तो इकडे ज्या व्हायसरॉयला पाठवितो त्याला पगार २०,००० रुपये! जा आणि खा हे इंग्लंडचे हिंदुस्थानासंबंधाचे तत्त्व आहे. लोकांचे दुकान तुमच्या हाती चालवायला दिले तर मुनीमाला ५० ऐवजी १०० रुपये तुम्ही सहजच देणार. हे सर्व टळावे म्हणून लोकांच्या स्वाधीन सर्व अधिकार पाहिजेत. म्हणजे काटकसर होते योग्य खर्च होतो सर्व काही होते. दादाभाईंनी याचकरिता स्वराज्य मागितले. घोडा अडता कां? विड्याची पाने का सडली? असल्या अनेक प्रश्नाना एकच उत्तर 'न फिरविल्यामुळे.' तसेच राजकारणातीलहि उत्तर आहे. या फिरवाफिरवीत आम्हाला प्रथम थोडीबहुत सत्ता पण शेवटी पूर्ण सत्ता मिळाली पाहिजे. पाणी प्यावयाचे ते आपल्या विहिरीचे आपण काढून स्वतः प्यायले पाहिजे. परावलंबनात तरणोपाय नाही. सुदैवाने इंग्रजांची दृष्टि थोडि बदलली आहे. त्यांना दिसू लागले की हिंदुस्तानातील ३० कोटि लोक केव्हाना केव्हा तरी आपले राज्य घेतील. म्हणून आपण त्यांना हत्यारे काढून घेऊन दास्यात ठेवतो ते बरोबर नाही. ह्या बदललेल्या बुद्धीचा फायदा घ्या. युद्धामुळे ही संधि मिळाली अशी पुन्हा येणार नाही. आमच्या मागणीने अखेर कोणाचे नुकसान नाही. नुकसान अधिकाऱ्यांचे तेवढेच. म्हणून ते आमच्या पूर्वजाना मूर्ख ठरवू पाहतात. नाना फडणीस मूर्ख मलिकंबर मूर्ख आणि आजची आम्ही तर काय पोरेच. पण ५० वर्षे राज्य करून आम्हाला शहाणे केले नाही तर दोष कोणाचा? सगळ्या जनतेला मूर्ख म्हणणे हे उलट अधिकाऱ्यांच्या नालायकीचे लक्षण आहे. कामाची संधि न देता नालायक म्हटले तर कोण ऐकतो? पण आपणहि आता जोराने बोलून मागणी केली पाहिजे. त्रास होईल तो सोसला पाहिजे. सर्वांनी एक झाले पाहिजे. मागणी पदरात पडल्याखेरीज संतोष राहणार नाही असे जगाला दाखविले पाहिजे. निश्चयाखेरीज काम नाही. मागणी पुरी होईपर्यंत चळवळ बंद करू नका. आम्ही मेलो तरी पोरेबाळे चळवळ चालवितील. या चळवळीत श्रीमंतानी पैशाने, बुद्धिवंतानी सल्लामसलतीने साहाय केले पाहिजे. अजून आम्ही

कच्चा दिलाचेच आहो. साहेब बोलला म्हणजे आम्ही हो हो म्हणतो. आणि घरी येऊन हसतो. पण घरी त्याला हसून उपयोग काय ? तेथे त्याच्या तोंडावरच हसले पाहिजे. मी सांगतो हे सर्व धंद्याच्या लोकांकरिता सर्व धंद्याच्या लोकांकरिता आहे. स्वातंत्र्यसत्तेचे औषध सर्वांना हवे असते व मानवतेहि. कारणानी परकी अधिकाऱ्यांची सत्ता आली. कारणानी ती घालविली पाहिजे. नुकताच बेळगावाला आम्ही स्वराज्यसंघ स्थापला. राष्ट्रीय सभेपुढे हा प्रश्न आहेच. पण प्रान्ता प्रान्तानीहि ही चळवळ केली पाहिजे."

या एका व्याख्यानाने नगरच्या श्रोतृवृंदाचे समाधान झाले नाही. म्हणून दुसरे दिवशी जुन्या कापड बाजारांत दुसरे व्याख्यान टिळकांचे झाले. फिरून चौकर वकील यानीच अध्यक्षस्थान स्वीकारले होते. ह्या दुसऱ्या व्याख्यानाचा सारांश खाली दिल्याप्रमाणेः—

"आम्ही स्वराज्य मागतो यात सर्व काही येते. माझा नातु सोन्याच्या ताटात जेवलेला मी पाहावा असा वर एका प्रसिद्ध गोष्टीतील म्हाताऱ्याने मागितला तशीच आमची मागणी सर्वसमावेशक आहे. एक स्वराज्य नाही म्हणजे काही नाही. एकेक हाती घेऊन सर्व सुधारणा आपल्या आपण केल्या तरी त्याचा उपयोग नाही. कोणतीहि एक सुधारणा पूर्णावस्थेला गेली तरी तिने काय होईल? या सर्व सुधारणा फलप्रद व्हावयाच्या तर स्वराज्याचे अधिकार पाहिजेत. स्वराज्याची गाडी भलत्या रुळावर नेऊन ठेवावी म्हणून वेगवेगळ्या सुधारणांचे स्तोम माजविण्यात येते. इतर देशांत हे इतके स्पष्ट करून सांगावेहि लागत नाही. इतिहासामध्ये ज्योतिषाप्रमाणे योग असतात. पूर्वजांच्या कर्तबगारीचे कौतुक करिता पण त्यांच्या गुणाला सत्तेचे पाठबळ होते. स्वातंत्र्यानेच गुण उदयाला येतात. मनाच्या हलकेपणाने आज सगळ्या राष्ट्राला ग्रासले आहे. होमरूलच्या चळवळीलाहि काही प्रतिष्ठित लोक हरकत घेतात हे दुर्दैव होय. चिल्लर सुधारणानी स्वराज्य मिळेल अशी माझी खात्री पूर्वी झाली नाही आणि उरलेल्या थोड्या आयुष्यात होणार नाही. स्वराज्य ही गुरुकिल्ली आहे. स्वराज्याची जी मागणी आम्ही करतो तिला परकी राजा वावडा नाही. इंग्लंडात नांवाला स्वदेशी राजा असता प्रजेला सर्व अधिकार मिळालेले आहेत. तसेच आम्हालाहि हवेत. फारतर आमचा राजा परकी असेल. त्याचे राजेपण आम्ही कायम ठेऊ. पण राजाची तक्रारच नाही. आहे ती मधल्या कोठावळ्याची हे पुन्हा सांगतो. तो मधला निघाल्याशिवाय आम्ही नामर्दांचे मर्द होणार नाही. आज शिते खायला मिळतात पण कावळ्यालाहि कधी खाण्याची वाण पडत नाही. नुसते खाणे जगणे व मरणे यात पुरुषार्थ नाही. मुख्य सत्तेपैकी थोडातरी अंश ताब्यात घ्या. परिषदेचे अध्यक्ष केळकर यानी सांगितल्याप्रमाणे सत्तेचा थोडा अंश असला तरी त्यात पूर्ण मुखत्यारी मिळावी. आम्ही माणसे व इतर पशुपक्षी यात भेद काय ? आज नुसते एक दारूचे दुकान बंद करावयाचे तर त्याच्या उत्पन्नाच्या इतक्या रुपयांचे

कागद खालवर पत्रव्यवहारात खर्ची घालावे लागतात. हे अधिकार आम्ही कोणा-एका व्यक्तीकरिता मागत नाही. सगळ्या जनतेकरिता मागतो. सगळी जनता नाला-यक व सगळे अधिकारी तेवढे शहाणे! ते करतील तितकेच बरोबर! अधिक करा म्हटले 'नाही.' वेगळ्यारीतीने करा म्हटले 'नाही.' पण अधिकाऱ्यांना तरी काय बोल? आमच्या लोकाना तरी हे अजून कोठे पटले आहे? पिंजऱ्या बाहेरचा पक्षी जर म्हणाला की "अरे बाहेर मोकळी हवा मिळते, हवे ते खाद्य मिळते, हवे तसे हिंडायला मिळते किती मौज आहे?" तर त्याला अजून पिंजऱ्यातला पक्षी म्हणतो "हे सगळे खरे. पण मोकळ्या हवेत मला येथल्यासारखी सोन्याची काठी बसण्याला कशी मिळणार?" १०० वर्षांच्या पारतंत्र्याने आम्ही पिंजऱ्यातल्या पोपटा-सारखे झाले आहो. परकी सत्ता चांगली ही काही आम्हा लोकांची स्वाभाविक भावना नाही. आम्ही आपल्या पूर्वजांचे वंशज तर त्यांच्यासारखे होऊ अशा आकांक्षेने पूर्वोद्धारणेचा उद्योग केला पाहिजे. आमचे सरदार पूर्वजांची वतने खातात आणि साहेबांची स्तुति करतात! तुमचे आजे सरदार होते मग तुमच्या अंगातले वडिलार्जित गुण गेले कोठे? सरदारकीची धमक राहिली पण जुने ब्राह्मण चंद्राला ग्रहण लागले म्हणजे थोडसे दान तरी करीत होते. तितका स्वार्थत्यागहि करण्याला आम्ही तयार नाही. हिंदुमुसलमान हा भेदभाव शिकविणाराचीहि भर यातच पडली आहे. बरे हिंदु व मुसलमान एक झाले तर तिसऱ्या कोणाची तरी हरकत ते दाखविणारच! एकूण 'त्रयाणां धूर्तानाम्' ह्या गोष्टीतल्याप्रमाणे आमची फसवणूक चालू आहे. आधी ज्ञान नाही. ज्ञान असले तर निश्चय नाही. निश्चय असला तर धैर्य नाही. टिळकांच्या व्याख्यानाला गेला होता काय? असा साहेबाने प्रश्न विचारला तर असे म्हणणारे लोक निघतात की 'होय गेलो होतो. पण लांब बसलो होतो. सगळे काही नीटसे ऐकू आले नाही.' आणि मग साहेबाच्या मागे सर्व काही खरे सांगतील! टिळकांच्या व्याख्यानाला गेलो होतो असे म्हणण्याचेच काय पण आम्हाला स्वराज्य पाहिजे असे म्हणण्याचेहि धैर्य अंगी पाहिजे. स्वातंत्र्याची देवता मोठी चाणाक्ष आहे आणि ती तोंडाने लपविले तरी मनातले हुडकून काढते. पण मनातील तोंडाने स्वत: बोललेले तिला खपत नाही. भूताना भ्यायले नाही तरच मांत्रिकाना सिद्धी मिळते. 'अंधारातून गेल्याशिवाय उजेड कसा दिसणार?' ही इंग्रजी म्हण लक्षात ठेवा. सामान्य लोक समजतात की अंधारातून बाहेर पडतो तेव्हाच सूर्य उगवतो. पण तुम्हाला प्रयत्नाशिवाय फळ पाहिजे. कधी ईश्वर फुकटाफुकटी यश देत नाही. आणि त्याने चुकून फुकटाफुकटी ते पाठविले तर तुम्ही त्याला ते परतहि करावयाचे इतकी यशाची तुम्हाला भीति! आज सुदैवाने संधि आली आहे. आणि इतर लोकांप्रमाणे आम्हीहि केवळ प्रजेचेच हक्क मागू तर ते चालेलहि. पण तुम्ही लोक असे आहा की एरवी खूप जागे. पण चोर घरात शिरण्याचे वेळी मात्र निजलेले. प्रजेचे हक्क मागण्यात आम्ही कोणत्याहि खात्याचा दु:स्वास करीत नाही. स्वराज्य मिळाले तर आम्हालाहि ही संघ-

टित घडी हवीच आहे. विविध खाती ताब्यात घेऊन कारभार करणे याचेच नाव स्वराज्य. आम्हाला पोलिसखातेच काय? गुप्त पोलिसखातेहि पाहिजे. नाना फडणीसाचे वेळी गुप्त पोलिसखाते होतेच. गुप्त पोलिसांच्या बातम्यावरच नानाने एलफिस्टन साहेबाचे दारूगोळा भरलेले मेणे वाटात अडवून चातुर्याने त्याला कुंठित केले अशी गोष्ट सांगतात. पण आज गुप्त पोलिसखाते तेवढे आहे. नानांच्या वेळची सत्ता मात्र नाही. पेशवाई बुडाली तेव्हा व्यक्तिशः बाजीरावाची अंदाधुंदि मिटली म्हणून बरे वाटले. लोकानी दूध पाहिले पण त्याचेमागून येणारा बडगा कोठे पाहिला होता? तो मागाहून हळूहळू प्रगट झाला. बाजीरावशाहीला कंटाळलेल्या आणि इंग्रजांचे स्वागत केलेल्या सरदारांची इनामदारांची तरी पुढे वाट काय झाली? आणि इतके सगळे करून वरती हे म्हणावयाला तयार की स्वदेशातली थंड हवा टाकून ह्या उष्ण हवेत तुमच्याकरता आलो. बरे जी देशी राज्ये उरली त्यात तरी कारभार आम्हीच करतो की नाही? आणि तोहि चांगला करतो की नाही? मग खालसा मुलखातच आम्हाला नालायकीचा असा कोणता रोग जडला? बडोद्यास देशी राजा राहून देशी लोकच सर्व कामे करतात. आणि तो राजाही काही स्वतंत्र नाही. पुण्यास पेशवाई शिल्लक उरती व पेशवे गायकवाडाप्रमाणे परतंत्र असते तरी पुण्याचा कारभार तुम्ही आम्ही केलाच असता की नाही? निझामच्या राज्यात कारभार कोण करतो? कदाचित पेशव्या ऐवजी आह्मी एखादा निवडलेला अध्यक्ष राजासारखा मानू. आम्हाला स्वराज्य दिले तरी त्यासकट जाऊन आह्मी फ्रान्सला जर्मनीला जाऊन मिळत नाही. फ्रान्स जर्मनी चालेल तर इंग्लंड तरी का नको? स्वार्थाच्यादृष्टीने परकी कोणी हवेतच तर इंग्रजच बरे. आज इंग्रजाची थोडि बहुत भूक तरी खाऊन भागली आहे. उद्या फ्रेंच किंवा जर्मन घेतले तरी त्याची भूक अगदी ताजी असणार. त्यांच्या भुकेपुढे आह्मी किती टिकू? स्वराज्ययोजनेचा हा नकाशा तुमच्या डोळ्याला दिसत नसेल तर तुमच्या डोळ्यानाच विकार झाला असे समजा. आज कायदेमंडळे आहेत पण तो पोरखेळ आहे. शिते टाकून भुते झुंजवावयाची ती जागा आहे. कौन्सिले आहेत पण अधिकारी त्याला जबाबदार कोठे आहेत? कोणी म्हणतात हे सर्व खरे पण चळवळ करून तरी काय मिळणार? त्याला उत्तर हेच की चळवळीत हिंमत नसेल तर मिळणार नाही. हिंमत धरून उद्योग केला तर १०–२० वर्षांनी तरी मिळेल. आह्मी मातीच्या गोळ्याला देवपण देणारे लोक, आम्हाला निषेधाने चळवळ यशस्वी का करता येऊ नये? अशा गोष्टी पूर्वी घडल्या आहेत मग आजच का न घडतील? विश्वासापाठी देव उभा आहे. या उद्योगात कोणी थोडे दिले तर ते घेऊ नका असे माझे म्हणणे नाही. दिले ते घ्या व अधिक मागा पण उद्योग सोडू नका. १०० रुपयाचे माझे येणे त्यांतले १० दिले तरी ते मी घेणार व फिरून ९० मागणार. आणि १० घेतांनाहि वाटेल तर तुझा आभारी असेहि म्हणणार. कोणी पडलेला कागद उचलून हातात दिला तरी आह्मी आभार मानतो. मग

शंभरातले १० दिले तर अर्थात आभार मानणे ही मनुष्यवृत्तीच आहे. ती सुटत नाही व सोडूहि नका. पण महत्त्वाकांक्षा हीहि मनोवृत्तीच आहे. त्या एका मनोवृत्तीच्या पायाकडे सर्व मनोवृत्ती वाकविल्या पाहिजेत. याच उद्देशाने आह्मी स्वराज्यसंघ काढला आहे.

"आताच येथे केळकरानी माझे हातात कागद दिला त्यावरून मद्रासेस बेझंटबाईनी होमरूल लीग काढल्याचे लिहिले आहे. उद्या बंगाल्यातहि निघेल. उद्या कॉंग्रेस ही स्वतःचा असा होमरूल मागण्यापुरता स्वतंत्र संघ काढील. नाही कशावरून ? अधिकारसंक्रमणाचाच हा काल आहे. विलायतेत हाऊस ऑफ लॉर्डसचे अधिकार जाण्याची वेळ तशीच हिंदुस्तानात गोऱ्या अधिकाऱ्यांच्या हातून सत्ता जाण्याची वेळ का येऊ नये ? हळूहळू ती सर्व देशभर झाली पाहिजे. येथेच काय विलायतेतहि जाऊन आमचे हेतू सांगितले पाहिजेत. मागणी मागितली पाहिजे. हल्लीचा गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट दुरुस्त करण्याचे बिल आणले पाहिजे. पूर्वी १८५८ साली या कायद्याची एक दुरुस्ती झाली आज दुसरी. या योजनेत मवाळ जहाल सर्वांनी एक दिलाने सामील झाले पाहिजे. स्वराज्यसंघ तुमच्यापासून अधिक काय मागतो ? वार्षिक वर्गणी किती थोडी ठेविली आहे. १०–२० वर्षे द्यावी लागली तरी फार नाही. तुम्ही लोकानी संघाचे ध्येय उद्देशपत्रिका मान्य करावी आणि लहानशी वर्गणी द्यावी. बाकीची चळवळ तुमच्याकरिता इतर करण्याला सिद्ध आहेत. पोलिस विचारतील स्वराज्य संघाचे सभासद झाला काय ? त्याला स्पष्ट सांगा हो झालो. त्यात राजद्रोह नाही. खटला झाला तरी चालवावयाला वकील फुकट मिळतील. तुम्ही व्यापारी लोक गोरक्षणाकरिता वर्गणी बाजूला काढून ठेवताच तशी ह्या चळवळीकरताहि ठेवा. त्या धर्मदायाच्या आण्यापैकी एक पैसा अर्धा पैसा आमच्या चळवळीला तुह्मी का देऊ नये ? एक पावशेरभर दुध देणारी ती तेवढी तुमची गाय आणि 'हिंदुस्थान' ही गाय नव्हे वाटते ? स्वदेशरूपी पृथ्वी ही गायच आहे. मानवी गोपुत्र तिचे रक्षण करणार नाहीत तर त्याना बैल म्हणून घ्यावे लागेल ! आमच्या संघावर संकटे आली तर सोसण्याला आम्ही तयार आहोत व ती सोसलीही पाहिजेत."

या व्याख्यानाला ९। वाजता सुरवात झाली होती. टिळक शिणलेले होते तरी त्यानी दोन तास भाषण केले. लोक चित्रासारखे तटस्थ होते. टिळकांच्या कोट्या विनोद व खटके यानी मात्र ते मधून मधून हलविले जात. व्याख्यानाच्या शेवटी संगमनेरचे देशपांडे नगरचे चौकर कऱ्हाडचे अळतेकर इत्यादिकांची भाषणे होऊन व्याख्यान समारंभ संपले. आदल्या दिवशी नगरास स्वराज्यसंघाची कचेरी उघडण्यात आली असून सभासद मिळविण्याचे काम सुरू झाले होते. पण दोन दिवसाहून नगरास अधिक मुक्काम करण्याची सवड नसल्याने व जिल्हा परिषदेचे काम आवरल्यामुळे टिळक केळकर व इतर मंडळी तिसऱ्या दिवशी पुण्यास परत फिरली.

पुण्यास केळकरांचे व्याख्यान झाले त्या दिवसापासून स्पेशल रिपोर्टर पाठविण्यास सरकारने सुरवात केली असल्याचे वर सांगितलेच आहे. पण त्यापूर्वीच टिळकांचे भाषण समग्र उतरून घेण्याचे सरकारने ठरविले होते. आणि बेळगावास झालेल्या त्यांच्या भाषणाच्या वेळी सरकारी रिपोर्टर हजर होते तरी ती गोष्ट नेहमीच्यातलीच असे लोकाना वाटले. पण त्या भाषणाचा रिपोर्ट सरकारकडे गेल्यापासूनच टिळकांवर खटला करण्याचा विचार सरकारने सुरू केला असावा असे दिसते. तारीख २० जुलैपर्यंत सरकार ह्या गोष्टीचा विचार करीत होते. कोणी म्हणत गव्हर्नरसाहेबांच्या कौंसिलातहि याबद्दल दुमत होते. किंत्येकांच्या मते लॉर्ड वुइलिंगडन हे खटला करण्याच्या विरुद्ध होते कारण स्वराज्य देण्याचा जाहीरनामा बादशाहानी मर्यादित का होईना पण लवकर प्रसिद्ध करावा असा आग्रह त्यानी वरिष्ठ सरकारकडे धरला होता. कसेहि असो. तारीख २२ जुलै रोजी डेप्युटी इन्स्पेक्टर ऑफ पोलिस मि. गायडर यानी पुण्याचे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट मि. हॅच ह्यांच्यापुढे टिळकांविरुद्ध फिर्याद दाखल केली. तीत त्यानी असे लिहून दिले की टिळकांची बेळगाव व अहमदनगर येथे झालेली भाषणे कलम १२४ अ खाली येण्यासारखी म्हणून राजद्रोहात्मक आहेत. टिळकाना पूर्वी दोन वेळ राजद्रोहाची शिक्षा झाली आहे. तरी अशा प्रकारची भाषणे त्यानी हल्ली सुरू केली आहेत. आणि पुढेहि तशीच करीत राहतील अशी धास्ती आहे. म्हणून त्यांच्यावर खटला करून मोठा म्हणजे ५० हजारांचा तरी जामीन मागण्यात यावा. टिळक स्वतः संपन्न व वजनदार आहेत. त्यांचे स्नेहीहि सधन आहेत. वाढदिवसानिमित्त उद्या त्याना एक लक्ष रुपयांचा अहेर करण्यात येणार आहे. अर्थात् इतका मोठा जामीन त्यांच्याजवळ मागण्याला हरकत नाही. त्यावर मि. हॅच ह्यानी टिळकांवर त्याच दिवशी नोटिस काढली. तीत "एक वर्षपर्यंत चांगली वर्तणूक ठेऊन शांतता राखण्याची हमी म्हणून तुम्ही २० हजारांचा जातमुचलका आणि दहा दहा हजारांचे दोन जामीन का देऊ नयेत ? याचे कारण समक्ष येऊन कळवा" असा मजकूर होता. सुनावणीची पहिली तारीख २८ जुलै नेमली होती. म्हणून ती पुढे ढकलून घेण्याकरिता टिळकांच्यातर्फे अर्ज करण्यात आला. त्यावरून २ ऑगस्ट ही तारीख धरली. पण प्रत्यक्ष काम ७ ऑगस्ट रोजी सुरू झाले. कोर्टात स्वतः टिळक व त्यांच्यातर्फे बॅरिस्टर जिना एरूळकर बॅपटिस्टा तसेच करंदीकर बखले व काका पाटील वगैरे अनेक वकील मंडळी हजर होती. सरकारतर्फे बॅरिस्टर पटवर्धन व बिनींग काम चालवीत असून सरकारी वकील दावर व फिर्यादि गायडर त्यांच्या मदतीला होते.

प्रथम जिना ह्यानी विनंति केली की फिर्याद नक्की कोणत्या भाषणातील कोणत्या विधानाबद्दल आहे याचा स्पष्ट खुलासा सरकारी बॅरिस्टरानी करावा. तेव्हा बिनिंग ह्यानी निरनिराळी वाक्ये खुणा करून वाचून दाखविली. त्यात

एखादे वाक्य ‘ ब्रिटिश सरकारने हिंदुस्थानास कायमचे दास्यात ठेवले आहे ’ किंवा ‘ नामधारी साम्राज्यसत्तेशिवाय सर्व ब्रिटिश सत्ता शक्य तितक्या लवकर नाहीशी केली पाहिजे ’ असले दिसण्यात जहाल कडक असले तरी दुसरी काही अशी होती की त्यात राजद्रोह कसा हुडकावा याची नवी शाळाच काढावी लागेल. उदाहरणार्थ ‘व्हाइसरॉय व इतर अधिकारी याना जास्त पगार देण्याचे कारण एवढेच की तो परभारे हिंदुस्थानच्या तिजोरीतून मिळतो. अधिकारीवर्गाचा पहिला हेतू हा असतो की त्यांचा पगार बिनबोभाट मिळावा. सध्याची वेळ हिंदुस्थानास होमरूल मिळविण्याकरिता चळवळ करण्यास योग्य आहे’ इत्यादि वरील वाक्ये सांगून देऊन विनिंग यानी अशी तक्रार केली की एकंदरीने भाषणातून टिळकानी बादशहांची इच्छा व हिंदुस्थानातील प्रत्यक्ष राज्यव्यवस्था यांत मोठे अंतर दाखविले आहे. तत्वतः टिळकांची ही खरी होमरूलची चळवळ नाही. तर फक्त सरकारविरुद्ध द्वेषबुद्धि पसरविण्याकरिता ते भाषणे करीत असतात.

यानंतर सरकारी लघुलेखक त्र्यंबक भिकाजी दात्रे यांची साक्ष झाली. त्यानी आपल्या लघु लेखनाच्या वह्या कोर्टात हजर केल्या. नंतर ठाकूर या नावाचे ओरिएंटल ट्रान्सलेटरच्या कचेरीतील एक नोकर यांची साक्ष झाली. ह्यानी भाषांतर केले नव्हते पण तपासले होते. टिळकाना पूर्वी राजद्रोहाची शिक्षा झाल्याचा पुरावा दाखल करावा अशी विनंति विनिंग यानी केली. जिना ह्यानी त्याला हरकत घेतली. परंतु तो पुरावा मॅजिस्ट्रेट यानी दाखल करून घेतला.

तारीख ८ रोजी साक्षीदारांच्या उलट तपासण्या झाल्या. दात्रे ह्यांनी सांगितले की मी १००–१२० पर्यंत शब्द लघुलिपीत दर मिनीटाला उतरून घेऊ शकतो. साधारण माणसे ११० शब्द तरी मिनीटाला बोलतात. टिळक सावकाश बोलतात. त्यांचे शब्द ७०–९० असे पडतात. काही ठिकाणी रिपोर्टात खुणा केलेल्या आहेत. ‘राज’ व ‘राज्य’ या शब्दात मी लिहिताना भेद करीत नाही. ठाकूर यांची उलट तपासणी वास्तविक टिळक यानीच स्वतः करावयाची. कारण त्यात मराठी शब्दांच्या इंग्रजी भाषांतराचा प्रश्न येत होता. हायकोर्टपेक्षां पुण्याच्या कोर्टात ही गोष्ट अधिक सुलभ व सहज होती. पण १९०८ साली टिळक स्वतः खटला चालवीत होते आणि ह्या खटल्यात त्याना जिना सारख्या बॅरिस्टरांच्या तंत्राने चालावयाचे होते. पण एकंदरीने भाषांतरकाराच्या उलट तपासणीतून विशेष काही निष्पन्न होण्यास जागा नव्हती. ‘अडविणे’ ह्याचे भाषांतर ‘ Obstruct ’ असे करावे का Stop Impede Hinder असे करावे ? ‘ ब्युरॉक्रसीला धक्का देणे ’ ह्याचे भाषांतर कसे करावे ? ‘सरकार’ ह्या शब्दाचे भाषांतर Government का Bureaucracy ? घमेंड ह्याचे भाषांतर Conceit असे करावे का Over confidence असे करावे? धूर्त म्हणजे Rogue की Cunning? Slavery व Servility या शब्दात भेद आहे की नाही ? पशु म्हणजे Beast की Cattle ? ‘ सगळी रात्र जागून चोर येण्याच्या वेळी निजणे ’ ही म्हण आहे

की नाही ? किंवा सरकारला येथे चोर म्हटले आहे ? वगैरे प्रमाणे मुद्दे ह्या उलट तपासणीत होते.

तारीख ९ रोजी उलट तपासणी संपून टिळकांची जबानी घेण्यात आली. तीत त्यांनी सांगितले की 'स्वराज्य' किंवा 'होमरूल' ह्या विषयावर मी व्याख्याने दिली. भाषणाचा रिपोर्ट एकंदरीने सर्वसाधारण रीत्या बरोबर आहे. पण काही वाक्ये गळली आहेत व काही अपुरी आहेत. होमरूल समजावून देणे, लोकाना संघाचे सभासद व्हा म्हणून सांगणे हा माझ्या भाषणाचा उद्देश होता. होमरूल म्हणजे काय हे थोड्या शब्दांत स्पष्ट करून सांगता येणे शक्य नाही. आणि ते तसे नाही म्हणूनच इतके विस्तृत भाषण केलेले आहे. मला पूर्वी दोन वेळा राजद्रोहाबद्दल शिक्षा झाल्या ही गोष्ट खरी आहे. हल्लीच्या आरोपाबद्दल माझे सर्व म्हणणे माझे बॅरिस्टर मांडतील.

टिळकांच्या जबानीनंतर जिना यानी असे सांगितले की मला टिळकांच्या तर्फे म्हणून काही एक पुरावा द्यावयाचा नाही. तेव्हा सरकार तर्फेचे बॅरिस्टर बिनिंग ह्यानी आपले भाषण सुरू केले. ते म्हणाले " काही भाषांतर चुकले आहे असे म्हणण्याचा जिना यांचे उलट तपासणीवरून रोख दिसतो. पण स्वतः त्यानीच सुचविलेले इंग्रजी शब्द घेतले तरी फारसा फरक पडत नाही. 'Slavery' म्हणजे 'दास्य' ह्या शब्दावरून हिंदी प्रजा ही गुलामगिरीत आहे असे म्हणण्याचा टिळकांचा उद्देश उघड दिसतो. धूर्त ह्या शब्दाने टिळकांनी सरकारला असन्मान्य ठरविले. होमरूलचे ध्येय कायदेशीर असेल वा नसेल. पण टिळकांच्या भाषणांवरून सरकारविषयी अप्रीति द्वेष व तिरस्कार उत्पन्न होतो असे माझे म्हणणे. टिळकांना पूर्वी शिक्षा झाल्याचा पुरावा दाखलच आहे. यावरून त्यांना अशी भाषणे करण्याची संवयच लागून गेलेली दिसते. कितीही शिक्षा झाल्या तरी त्याची याना फिकीर वाटत नाही. म्हणून काहीतरी प्रतिबंधक उपाय केला पाहिजे. नाहीतर आणखी वाईट भाषणे करीत जातील. एखादा अधिकारी वाईट आहे हे म्हणणे सयुक्तिक. पण सगळेच कलेक्टर सगळेच कमिशनर वाईट म्हणणे म्हणजे काय ? टिळकांचा होमरूलचा किंवा स्वराज्याचा एखादा मसुदा पुढे आलेला नाही. टिळकांच्या भाषणांतील थट्टा विनोद कोट्या यांत वक्तृत्व दिसेल. पण त्यांत स्वराज्याची व्याख्या नाही. भाषणात त्यानी स्वराज्य म्हणजे काय असा प्रश्न उपस्थित केला पण त्याचे उत्तर मात्र समर्पक दिले नाही. अधिकारी घमेंडखोर स्वार्थी असे म्हटल्याने त्यांच्याविषयी अप्रीति उत्पन्न होत नाही काय ? ह्या राज्यात गोरा मनुष्य व टिळक ह्याना सारखाच हक्क आहे. ( ह्या विधानाला जिना ह्यानी हरकत घेतली आणि तसे नाही म्हणून सांगितले. ) टिळकांचे व्याख्यान मी ऐकले असते व मी हिंदी मनुष्य असतो तर त्यानी दिलेल्या खोट्या समजूती ऐकून माझ्याहि मनात सरकारविषयी अप्रीति उत्पन्न झाली असती. पसंतीबद्दल टिळकाना टाळ्या व नापसंतीबद्दल सरकारला 'शेम शेम' असा प्रकार भाषणातून सुरू होता

हे लक्षात ठेवा. स्टेट सेक्रेटरीला सरकारचे जावई म्हणण्याइतका काही तो अनियंत्रित नाही. बेळगावच्या भाषणापेक्षा नगरचे भाषण अधिक वाईट होते. ज्या वाक्याना लोकानी टाळ्या दिल्या त्याच वाक्यानी सरकारविषयी अप्रीति उत्पन्न झाली असे मी म्हणतो. गेल्या ५० वर्षात उद्योगधंद्याची भरभराट होत असता टिळक म्हणतात सरकारने ते बुडविले. सरकारी नोकरी करू नका असा टिळक उपदेश करितात. आज लोकाना पशुसारखे वागविले जाते म्हणजे काय? टिळकानी सी. आय. डी. विरुद्ध तोंडसुख घेतले आहे. टिळकांची चळवळ होमरूलची असो वा नसो. पण ते एखादि चळवळ करितात म्हणून त्याना कोर्टात खेचलेले आहे असे नाही तर त्यांचे भाषण राजद्रोहात्मक आहे म्हणून. आपला कारभार आपण चालविण्याचे ध्येय लोकापुढे ठेवण्यात चूक नाही. पण ते करिताना सरकारविरुद्ध द्वेष काय म्हणून पसरवावा? शेवटी विनिंग म्हणाले की टिळक हजर असता आपल्या भाषणाचा अधिक खुलासा स्वत: त्यानी करावयास पाहिजे होता. तसे न करिता त्यानी तो सर्व भार आपल्या बॅरिस्टरावर टाकला आहे. (यावर जिना म्हणाले "खुलाशाचे सर्व काम मजवर सोपवा असे मीच त्याना सांगितले होते.") विनिंग यांचे भाषण तारिख ९ चा काही भाग व तारिख १० चा काही भाग एवढ्यात संपले.

नंतर टिळकांच्या तर्फे बॅरिस्टर जिना यांचे भाषण सुरू झाले. ते म्हणाले "टिळकांच्या भाषणात अधिकारी वर्गावर टीका आहे. आणि मला आता भाषण करावयाचे ते अशा वर्गातील एकापुढेच होय. पण ही गोष्ट मॅजिस्ट्रेट लक्षात घेणार नाहीत व न्यायबुद्धीच ठेवतील अशी मला आशा आहे. लघुलेखकाना मुद्दाम पाठविले तेव्हा आपणाला कशाकरिता पाठविले तर टिळकाना शब्दात पकडावयाला पाठविले अशी त्यांची समजूत सहजच झाली असेल. आधी भाषण लघुलिपीत उतरून घेतले. आणि त्यानंतर त्याचे मराठीतून भाषांतर झाले. यामुळे मूळ टिळकांच्या अर्थाचा कितीतरी विपर्यास झाला असेल. लघुलेखकानी शब्द सोडले आहेत. भाषांतरात काही शब्द चुकले आहेत हे कबूल झाले आहे. राजद्रोहात्मक म्हणून एक शब्द येथला एक शब्द तेथला असे घेतले आहेत. संबंध भाषण लक्षात घेतले पाहिजे. आणि ते घेतले तरी द्वेष किंवा असंतोष उत्पन्न करण्याचा हेतू नसून कायदेशीर मार्गाने राज्य बदलून घेण्याचा टिळकाचा उद्देश स्पष्ट दिसतो. क्रि. प्रोसीजर कोड कलम १०८ या अन्वये जामीन मागण्याचा खटला भरला यावरूनच पुढील भाषण थांबविण्याचा सरकारचा उद्देश. तेव्हा झाल्या गेल्या गोष्टी म्हणून पूर्वीच्या शिक्षा लक्षात घेणे योग्य नाही. कदाचित पूर्वीचे भाषण राजद्रोहाचे होते असेच आपण समजा. तरीपण आजच्या व पुढच्या भाषणाचे धोरण टिळकांचे काय असेल याचाच मुख्य विचार कर्तव्य आहे. भाषणाची परिस्थिति लक्षात घेतली असता 'होमरूल' सारख्या चळवळीकरिता टिळक तीच ती गोष्ट वेगवेगळ्या रीतीने सांगत होते. आणि त्याना ती तशी सांगावी लागली याचे कारण हजारो

श्रोते जमलेले व पुष्कळसे त्यातले अज्ञानी. अशी गोष्ट सोपी करून सांगताना उदाहरणे व दाखले यावेच लागतात. पण हे दाखले व ही उदाहरणे शब्दशः कोणी घेत नाही. ब्रिटिश लोकाकडून ब्रिटिश अमलाखाली बादशहाची सत्ता कायम ठेऊन होमरूल मिळवावयाचे असे टिळकानी वारंवार बजाविले. त्यानी तक्रार केली ती फक्त अधिकारी वर्गासंबंधाने. सरकार हा शब्द मधून मधून आला तो सिव्हिल सर्व्हिसला उद्देशून आला होता. लोक अडाणी त्याना सिव्हिल सर्व्हिस म्हणजे काय हे कसे कळणार? सिव्हिल सर्व्हिस किंवा गुप्त पोलिस खाते म्हणजे काही सरकार नव्हे. १२४ अ कलमामधील सरकार ह्या शब्दात गुप्त पोलिस खात्याचा खचित समावेश होत नाही. राज्यकारभारावर टीका करावयाची तर खात्यांच्या कारभारावर व खात्यांच्या अधिकारावर टीका केलीच पाहिजे. गुप्त पोलिस खाते हेच जर उद्या सरकार ठरले तर त्या सरकारला नमस्कार असो! वाघ मारावयाचा झाला तरी सरकारची परवानगी लागते. पण ही स्थिति बदलली पाहिजे हे म्हणण्यात चूक कोणती? स्थित्यंतर व्हावे असे टिळक म्हणतात आणि तेहि हळूहळू आणि जे होणार तेहि पार्लमेंटामार्फत घडवून आणावयाचे असेच टिळक म्हणतात. पोलिसाना भिऊ नका या म्हणण्यात राजद्रोह नाही. बोलताना एखादा शब्द कडक बोलू नये किंवा कोणाच्याहि मर्मी लागू नये असे कसे होईल? ‘ त्रयाणां धूर्तानाम् ’ ही गोष्ट युनिव्हर्सिटी बिलाच्या वादात डॉ. भांडारकर साख्यानी उपयोगात आणली होती. ती सांगण्याचा टिळकांचा हेतू हा की काही लोक भ्रम उत्पन्न करितात दिशाभूल करितात तशी लोकानी करून घेऊ नये. अमुक दिवसानी स्वराज्य द्या अशी मागणी का करू नये? फिलिपाइन लोकाना अमेरिकेने अमुक दिवसात स्वराज्य देऊ असेच सांगितले होते. राणी सरकारचा जाहीरनामा बाजूला पडला आहे ही गोष्ट खोटी आहे काय? आपण हिंदुस्थानात परकी आहो ही गोष्ट लॉर्ड क्रोमर आस्क्विथ इत्यादिकानीहि कबूल केली आहे. आम्ही चांगली हवा सोडून वाईट हवेत येतो असे अधिकारी म्हणतात, तर तुम्ही का येता असा प्रश्न सहजच विचारावा लागतो. आणि ‘ हिंदी लोक अपात्र म्हणून आम्ही येतो ’ या उत्तराला देशी संस्थानांचे उदाहरण टिळकानी योग्य तेच दिले. गिरणीच्या कापडावर सरकार जकात बसविते यावरून व्यापारविषयक त्यांचे धोरण कसे आहे हे दिसत नाही काय? देव पाहिजे पुजारी नको ह्याचा अर्थ सिव्हिलिअन लोकाकडे सर्व सत्ता नसावी इतकाच. गोरे लोक गोरे म्हणून नकोत असे टिळकांचे म्हणणे नाही. राज्यपद्धतिच अशी आहे की तीत गोरे लोक येतात. म्हणून पद्धतीवर टीका तीच गोऱ्या अधिकाऱ्यांवर होते. आपण १४ व्या शतकात नाही तर १९ व्या शतकात आहो. म्हणून अधिकार मागतो असे टिळकांचे म्हणणे. तात्पर्य एखादे वाक्य एखादा शब्द घेऊन ‘हा पहा राजद्रोह’ असे म्हणत सुटणे योग्य नाही. ”

यात्रमाणे दोन्ही भाषणे होऊन थोडक्यात खटल्याचे काम संपले. खट-

त्याचा निकाल तारीख १२ ऑगस्ट रोजी मॅजिस्ट्रेट यानी सांगितला. निकालातील काही भाग त्यानी वाचून दाखविला. आणि शेवटी फिर्यादीने मागितल्याप्रमाणे पण थोडा कमी रकमेचा जामीन टिळकानी द्यावा असे सांगितले. शिवाय असे बजाविले की तुमच्यावर १२४ अ कलमाप्रमाणे ऐनजिनसी खटला न भरता म्हणजे प्रत्यक्ष शिक्षा देण्याचा खटला न भरता फक्त जामीन देण्याचा खटला भरला हे तुमचे भाग्य समजा! आणि तुम्ही हल्लीसारखी वर्तणूक ठेऊ नये अशी तुम्हाला व तुमच्या स्नेह्याना इषारत देण्याचा सरकारचा हेतू आहे.

खटल्याचा निकाल काय होणार ह्याची कल्पना होतीच. त्याप्रमाणे टिळकानी जामीन होणारे गृहस्थ हजर ठेविले होते. टिळकानी स्वतः वीस हजार रुपयांचा जातमुचलका लिहून दिला. मॅजिस्ट्रेट मि. हॅच यांच्या लेखी निकालात मुख्य मुद्दा असा होता की "टिळकानी सरकार ह्याचे दोन भाग करण्याचा प्रयत्न केला. ते असे की (१) लोकाना दिसणारे सरकार व (२) लोकाना न दिसणारे. सरकार आणि दिसणाऱ्या सरकारच्या हातून होणाऱ्या गैरव्यवस्थेची उदाहरणे दिली. परंतु ह्या भेदात काही अर्थ नाही. पिनल कोडात सरकार हा शब्द वापरला आहे. त्यात लोकाना दिसणारे सरकार म्हणजे अधिकारी यांचाच समावेश होतो. आणि प्रत्येक खात्यावर व खात्याच्या अधिकाऱ्यावर जी सरसकट टीका केली आहे ती द्वेष पसरविणारी म्हणून राजद्रोहात्मक आहे. स्ट्रॅची साहेबांच्या निकालातील एक उतारा घेऊन जिना यानी असे दाखविण्याचा प्रयत्न केला की कायद्याने प्रस्थापित झालेले सरकार व त्याची राज्यपद्धति ही वेगळी आणि अधिकारीवर्ग हा वेगळा. पण टिळकांच्या भाषणातील निरनिराळ्या उताऱ्यांवरून असा भेद काढल्याचे स्पष्ट नव्हते. १२४ अ कलमात टीकेला परवानगी आहे पण ती कशी नसावी हेहि सांगितले आहे. स्ट्रॅची साहेबांच्या निकालातच त्याचा खुलासा आहे. तेव्हापासून आतापर्यंत राजद्रोह म्हणजे काय हे सर्वाना ठाऊक आहे. म्हणून त्या विषयाची चर्चा करण्याचे कारण नाही. कलमात ज्या गोष्टी करू नये म्हणून आहे त्या सर्व टिळकानी केल्या आहेत. तात्पर्य, सगळे भाषण समग्र लक्षात घेऊन व निरनिराळ्या तुटक शब्दाना महत्त्व न देता संकलित रीतीने ह्या भाषणाचा काय अर्थ होतो असेच मी निर्विकार मनाने पाहिले आहे. आणि ह्यावरून मला असे वाटते की लोकानी उठावे जागृति व्हावी राज्यपद्धति बदलून घ्यावी असा टिळकांचा उपदेश असून अज्ञानी लोकाना भलभलत्या गोष्टी त्यानी खुलवून सांगितल्या आहेत. टिळकानी ब्युरॉक्रसी हा शब्द मधून मधून वापरला आहे. परंतु त्यांचा कटाक्ष व टीका केवळ अधिकारीवर्गावरच नसून एकंदर राज्यपद्धति व एकंदर अधिकारीवर्ग यांच्यावर मिळून आहे. मग सरकार ते बाकी काय उरले? टिळकानी हे भाषण केले इतकेच नव्हे तर आणखीहि पुढे अशी भाषणे करणार असे जाहीर केले आहे म्हणूनच हा जामीन घ्यावा लागत आहे."

पूर्वी राजद्रोहाचे दोन खटले टिळकांवर झाले असता त्यानी ही नवी

चळवळ सुरू केली आणि सरकारवर कडक टीका केली. त्यांत त्याना धोका किती आहे आणि किती नाही असे वाटत असावे याचा विचार पूर्वी केलाच आहे. सध्याच्या परिस्थितीत खटला होणार नाही हा त्यांचा अंदाज चुकला. पण खटला केला तरी त्याला उग्र स्वरूप राहणार नाही हा टिळकांचा अंदाज खरा ठरला. आणि केवळ जामीन घेण्याचा खटला जेव्हा भरण्यात आला तेव्हा अशा खटल्यासंबंधाची जी मुख्य भीति ती लोकांच्या मनातून गेली. जामीन घेतला असता व पुढे तो टिकला तर एक वर्षपर्यंत तरी टिळकांच्या तोंडाला कुलूप लागेल आणि नव्या उपस्थित केलेल्या चळवळीवर घाला पडेल अशी भीति मात्र लोकाना वाटली. कारण टिळकांच्या पासून जामीन घेतला म्हणजे ह्या चळवळीत पडणारे इतर लोक भाषणे करण्याचे थांबवतील असे कोणाला वाटले नव्हते. टिळकांचे वय लक्षात घेता टिळकांच्या पासून सरकारने नुसता जामीनच मागित-तला. पण इतर कोणावर ऐनजिनसी शिक्षेचे खटले न भरले जातील कशावरून? किंबहुना तसे खटले भरले जातील असेच दिसत होते. आता हा धोका सोसण्याला स्वराज्य संघातील इतर मंडळी तयार नव्हती असे नाही. तर खटला होऊन तो सरकारसारखा झाल्याने एकंदर चळवळीवर एकप्रकारे राजद्रोहाचा छाप पडतो व सामान्य लोक चळवळीत सामील होण्याला भिऊ लागतात. जामीन घेतला किंवा शिक्षा झाली यांत गुन्हेगाराच्या दृष्टीने फारसा फरक नाही. शिवाय शिक्षा एकवेळ पुरवते. कारण इतर नुकसान फारसे न झाल्यास वक्ता ती कशीही सोसतो. पण हजारो रुपयांचा जातमुचलका लिहून घेतला व जामीन दिला म्हणजे पैशाच्या नुकसानीचे जे बंधन उत्पन्न होते तेच एका दृष्टीने अधिक परिणामकारक व घातक ठरते. जामीन किती मागितला जावा ह्याला मर्यादा नाही. जातमुचकला रद्द झाला तर सगळे घरदार विकून कुटुं-बाचे कायमचे नुकसान होणार तेहि एकवेळ असो. पण कोणी बिचारे स्नेही म्हणून हमी देऊन जामीन उभे राहतात व त्यांच्यावर हजारो रुपयांच्या रकमा भरण्याची पाळी आली तर त्यांचे नुकसान कसे भरून द्यावे? आणि ते कोण किती भरून देणार? अशा रीतीने शिक्षेपेक्षा जामीन अधिक जाचक होतो. स्वराज्यसंघाचा सभासद होण्याला फार अडचण नव्हती. एखाद दुसरा रुपया वर्गणी म्हणून द्यावा व धिटाईने 'होय मी ह्या संघाचा सभासद आहे' म्हणून सांगावे. ही गोष्ट सोपी दिसते. पण संघाचे अधिकारी व पुढारी यांच्यावर राजद्रोहाचा छाप पडला म्ह-णून त्याने सर्व चळवळच्या चळवळ राजद्रोही ठरते आणि नुसता सभासद झाला तरी सरकार खटला करणार नाही कशावरून अशी भीति लोकांच्या मनात सहजच उत्पन्न होते. पण खटला प्रत्यक्ष होण्याची गोष्ट कशाला? टिळकावर खटला झाला तो जुलै महिन्यात. पण त्यापूर्वी नगरास काय प्रकार झाला हे लक्षात घेतले म्हणजे उपजत बुद्धीने शिकवावे त्याप्रमाणे टिळकानी सुरू केलेली ही चळवळ काही तरी विशेष

गंभीर स्वरूपाची होती म्हणून तिच्यात लोकहित पुष्कळसे असले तरी धोकाहि थोडासा होता अशी लोकांची समजूत होती हे सहज पाहावयास सापडले.

टिळकांच्या व्याख्यानाना हजारो लोक ऐकायला येत. हरिदासाने आपले पालुपद आळवावे त्याप्रमाणे टिळकांनी परोपरीने लोकांना स्वराज्य संघात सामील होण्याची विनंति केली. गावात स्वराज्य संघाची कचेरी उघडी ठेवली असून वाटेल त्याने एक रुपया भरून सही करून आपले नांव सभासद म्हणून नोंदवावे असे केळकरांनी जाहीर केले. तरी दोन दिवसात मिळून सुमारे १५ लोकावर सभासदांची संख्या गेली नाही! आपल्या पायाने उठून कचेरीत जा रुपया भरा सही करून ह्या एवढा खटाटोप तरी कोण करतो? शिवाय चळवळीत काय आहे व काय नाही ह्याची कल्पना कोणास बरोबर नसल्याने चळवळीला प्रत्यक्ष स्पर्श न करिता बाजूबाजूने दुरून लोक कौतुकाने तिजकडे पाहात. पुढे आणि डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटचा खटला झाल्यानंतर तर मग काही विचारावयासच नको. परंतु सुदैवाने हायकोर्टाने अपीलात टिळकाना दोषमुक्त करून सोडल्यामुळे ह्या सगळ्यांचा बचाव कसा निघाला हे कळून येईलच.

तारीख २३ ऑगस्ट रोजी हायकोर्टात न्यायमूर्ति बॅचलर व हीटन ह्यांच्या पुढे वरखले वकील यांनी टिळकांचा अपीलअर्ज गुदरला. आणि थोड्याशा वाद-विवादा नंतर अपील दाखल झाले. त्याची पक्की सुनावणी तारीख ८ नोव्हेंबर रोजी झाली. अपीलाचे काम बॅरिस्टर जिना बॅप्टिस्टा व एरूळकर हे चालवीत होते. प्रथम 'सरकार' व 'अप्रीति' ह्या शब्दांचा अर्थ काय त्याची चर्चा झाली. जिना ह्यांचे म्हणणे सरकार म्हणजे निरंतर चालणारी संस्था. त्यातील वरचेवर बदलणाऱ्या अधिकारी व्यक्तींचा समुदाय नव्हे. भाषणाच्या तात्पर्याविषयी फारशी चर्चा झाली नाही. हेतूसंबंधाने जिना ह्यानी सांगितले की सरकारतर्फे टिळकांचा हेतू द्वेषमूलक आहे हे सिद्ध झालेले नाही. व्याख्यानाच्या वेळी स्वराज्यसंघाची चळवळ सुरू झाली होती आणि स्वराज्यसंघ ही संस्था बेकायदेशीर नाही असे बिनिंग ह्यानीच सांगितले होते. टिळकांच्या भाषणात सरकारची स्तुतीहि आहे. द्वेषी मनुष्य अशी स्तुति काय म्हणून करील? राज्यपद्धति बदलू पाहणे हे काही द्वेषमूलक नव्हे. अधिकारी घमेंडखोर असतात ह्यासंबंधाने बॅचलरसाहेब म्हणाले "जोडा पायात घालणारालाच जोडा कोठे लागतो हे कळते" असा टिळकांचा अर्थ असेल तर तो बरोबर आहे. इंग्रजी म्हणहि तशीच आहे. 'त्रयाणां धूर्तानां' ह्या गोष्टीसारखी गोष्ट शेक्सपिअरच्या एका नाटकात आढळते असे बॅचलर साहेबानीच सुचविले. सरकारी व. जार्डिन म्हणाले 'पण तसे म्हणणे सभ्यतेला सोडून आहे.' गुलामगिरी ह्या शब्दाचा अर्थ 'हक्क नसणे' इतकाच होतोहि जिना यांचे म्हणणे कोर्टाने मान्य केले. तेव्हा बॅचलर साहेब म्हणाले होय 'हम तुमारा गुलाम नही है' असे वाक्य व्यवहारातहि येते. इसापनीतीच्या गोष्टीत शेवटी तात्पर्य दिलेले असते. त्या तात्पर्याचा अर्थ उद्देश रूप नसतो तर परिणाम दाखवि-

ण्याचा असतो. अर्थात राज्यपद्धतीचे दोष दाखवून अशी एखादी गोष्ट सांगणे यात द्वेषाचा उद्देश नसून अशा पद्धतीचे परिणाम काय होतात हे दाखविण्याचाच असतो ही गोष्ट न्यायमूर्तींना पटली. नंतर कौंसिलात ... सत्य नाही ह्या टीकेवर मॅजिस्ट्रेटनी हरकत घेतली. ह्या गोष्टीविषयी न्यायमूर्तींनी थोडे आश्चर्य प्रगट केले. तेव्हा सरकारतर्फे तो मुद्दा काढून घेण्यात आला. प्रजाजन येथे कोणी बोलाविले हा प्रश्न काही टिळकानीच प्रथम ... नव्हे ... पुष्कळ लोक वादात तसे म्हणतातच ही गोष्टहि पटली. श्रोतृवर्गात ... लोक पुष्कळ होते तेव्हा टिळकांचे हे भाषण ऐकून त्यांच्या मनावर ... परिणाम झाला असेल ह्याची चर्चा झाली. लोकाना पशुसारखे वागविण्यात येते ह्यासंबंधाची हरकत बॅरिस्टर जारडिन ह्यानी परत घेतली.

जिना ह्यांच्या भाषणानंतर ॲडव्होकेट जनरल जारडिन यानी उत्तर दिले. त्यांचे भाषण चालू असता खात्यावरील टीका ही सरकारावरील टीका होते की नाही ह्याविषयी कोर्ट व बॅरिस्टर ह्यांच्यामध्ये बरीच भवति न भवति झाली. सिव्हिलिअन कसा वागतो ह्याचे वर्णन टिळकानी केलेले जारडिन ह्यानी वाचून दाखविले. तेव्हा न्यायमूर्ति बॅचलर म्हणाले ही टीका कां रास्त नाही? तात्पर्य जारडिन यानी एकेक आक्षेप मांडावा आणि तो परस्पर न्यायमूर्तींनीच थोडाबहुत खोडून काढावा असाच प्रकार बहुधा सुरू होता. यामुळे बचावादाखल फारसे बोलण्याचे जिना ह्याना कारणच पडले नाही. त्यानी इतकेच सांगितले की भाषणामध्ये कोट्या येतात लोक हसतात टाळ्या वाजवितात ह्या गोष्टी चालावयाच्याच. ह्याचा विपरीत अर्थ कोणी करू नये. लेखाची गोष्ट वेगळी व भाषणाची गोष्ट वेगळी. आणि लोक हसतात व टाळ्या वाजवितात ह्यावरून बोलणाऱ्याची हटकून द्वेषबुद्धि असते असे म्हणणे गैर आहे. जामीन घेणे ही गोष्ट सोपी दिसते. पण गुन्हा हातून घडला आहे असा अभिप्राय पडल्याखेरीज जामीन मागता येत नाही. जामीन हा काही पोरखेळ नव्हे. मी सुमारे ४० वाक्ये काढून अशी दाखवीन की त्यावरून द्वेषाच्या उद्देशाचा हा आरोप सफशेल खोटा पडतो. तात्पर्य जिना ह्याना प्रत्युत्तर असे फार द्यावे लागले नाही. अशा रीतीने अपीलाची सुनावणी एकाच दिवसात संपली. आणि लगेच दुसऱ्या दिवशी ११॥ वाजता न्यायमूर्ति बॅचलर ह्यानी आपला निकाल सांगितला. न्यायमूर्ति शहा ह्यानीहि वेगळा निकाल लिहून आणला होता तोहि वाचून दाखविला. दोघाहि न्यायमूर्तींनी टिळक निर्दोषी आहेत असे ठरविल्यामुळे मॅजिस्ट्रेट यांचा हुकूम फिरून जामिनकी व मुचलका रद्द करण्यात आला.

## ( ८ ) हायकोर्टाचा निकाल

न्यायमूर्ति बॅचलर ह्यानी आपला निकाल दिला त्याचे तात्पर्य असे. "टिळकानी भाषण केले त्याचा सारांश व भाषांतर ह्याबद्दल वाद नाही. फिर्यादीची मुख्य

तक्रार भाषण कडक झाले अशी आहे. पण भाषणात कोठे कोठे कडक शब्दांची योजना झाली असली तरी एकंदर भाषण आक्षेपार्ह आहे असे म्हणता येत नाही. पूर्वी न्यायमूर्ति स्ट्रॅची ह्यानी 'Dis-affection' म्हणजे अप्रीति ह्या शब्दाचा अर्थ प्रीतीचा अभाव असा केला आहे. पण माझ्या मते तो अर्थ बरोबर नाही. प्रीति किंवा आवड नसणे म्हणजे द्रोहबुद्धि आहे असा अर्थ इंग्रजी भाषेचे मर्म जाणणारा कोणी म्हणणार नाही. स्ट्रॅची साहेबांचे हे मत पुढे फुल बेंचने खोडून काढलेलेच आहे. मनुष्याने मी राजद्रोही नाही किंवा राजनिष्ठ आहे असे वरचेवर म्हटले असता १२४ अ कलमाख्यालच्या आरोपाला उत्तर होऊ शकते की नाही असा एक प्रश्न आहे. माझ्या मते तसे होऊ शकत नाही. राजावर आपली निष्ठा आहे असे टिळकानी वारंवार म्हटले तरी समग्र भाषणावरून त्यांचा हेतू ठरविला पाहिजे. सिव्हिल सर्व्हिस म्हणजे सरकार नव्हे. म्हणून अधिकारी वर्गावरील टीका हा राजद्रोह नव्हे असा एक मुद्दा टिळकातर्फे मांडण्यात आला आहे. पण तोहि बरोबर नाही. सिव्हिल सर्व्हिस हेच राज्यकारभाराचे मुख्य साधन आणि तिच्याविरुद्ध द्वेष उत्पन्न झाला असल्यास तसे म्हणता येईल.

"पण ह्या दोन्ही मुद्यासंबंधाने इतकेच म्हणावयाचे की भाषण समग्र घेऊन विचार केला पाहिजे. स्वराज्य हवे असे म्हणण्यामध्ये टिळकांचा हेतू इतकाच दिसतो की प्रजेला राजकीय अधिकार अधिकाधिक मिळावयास पाहिजेत आणि इतकीच गोष्ट घेतली तर तीवरून राजद्रोह ठरत नाही. वाटेल त्या परिस्थितीत स्वराज्याची मागणी ही निर्दोष ठरेल किंवा तो गुन्हा होणार नाही असे मात्र मी म्हणत नाही. कारण स्वराज्य ह्या शब्दाचे अर्थ अनेक होऊ शकतात. पण टिळकाना कोणच्या पद्धतीने हे स्वराज्य मिळावयास पाहिजे हे त्यांचे त्यानीच स्पष्ट केले आहे. म्हणूनच ह्या गोष्टीबरोबर टिळकांच्या राजनिष्ठेची विधाने घेतली असता ती मायावीपणाची किंवा कृत्रिम असे मला म्हणता येत नाही. आता शब्दाचा परिणाम राजद्रोहकारक झाला तर तोहि गुन्हा होऊ शकतो. टिळकांच्या भाषणात असभ्यपणाचे व कडक असे उद्गार अनेक आहेत ही गोष्ट निर्विवाद होय. पण त्यावरून टिळकांचा स्वभाव रागीट आहे, त्याच्या अंगी सदभिरुची नाही एवढेच फार तर म्हणता येईल. मूळ विषय आक्षेपार्ह नाही असे एकदा ठरल्यावर भाषणाचा प्रत्यक्ष परिणाम काय झाला एवढेच पाहणे उरते. भाषणातील निवडक शब्द व वाक्ये काढून उभयपक्षातर्फे आमच्यापुढे मांडण्यात आली आहेत. पण मी ती टाकून देतो व एकंदर भाषण वाचून त्याचा निर्विकारपणे विचार करितो. आणि त्यातील युक्तिवाद लक्षात घेता मला असे वाटते की राज्यपद्धतिविषयी नापसंती प्रगट करण्याचा टिळकांचा उद्देश खचित होता. पण द्वेष उत्पन्न करण्याचा खचित नव्हता. टिळकानी मागितलेल्या मागण्या किंवा पुढे आणलेले आक्षेप किंवा केलेला युक्तिवाद राजकीय दृष्ट्या बरोबर नसेल. तो चुकीचा असेल. पण त्यामुळे कायद्याचे उल्लंघन झाले की नाही इतकेच मला पाहावयाचे. इंग्रज लोकांच्या अमलाखाली

इंग्रजी राष्ट्राच्या देखरेखीखाली त्यांच्या मदतीने त्याच्या सहानुभूतीने त्यांच्यातील उच्च भावनाना जागृत करून हल्लीचा कायदा बदलून आणि तो पार्लमेंटातून बदलून घेऊन (इतर राष्ट्राकडून नव्हे) पार्लमेंटला अर्ज करून टिळकाना आपले कार्य साधावयाचे आहे असे त्यांच्या भाषणात स्पष्ट दिसून येते. साम्राज्य राहो पण त्यातील सर्व भागांचा एकजीव झाल्याशिवाय ते स्थीर होणार नाही इतकेच टिळक म्हणतात. इतर वसाहतीतून जागृति झाली तशीच हिंदुस्थानातहि व्हावी इतकेच टिळकांचे म्हणणे. पण जागृति म्हणजे हाती तरवार घेणे असा अर्थ नव्हे. बेकायदेशीर अशीहि गोष्ट आपणाला करावयाची नाहीं ही टिळकांची विधाने मी नमुन्यादाखल असे समजतो. आणि ह्या विधानावरून पाहिले तर राजद्रोह किंवा बेकायदेशीरपणा टिळकांच्या मनात ह्यावेळी नव्हता असे म्हणावे लागते. देशी संस्थानातील कारभारावरून सिद्ध होणारी हिंदी लोकाची पात्रता गोऱ्या अधिकाऱ्यांचा भारी पगार गोऱ्या अधिकाऱ्यांचा परकीपणा त्यांचे लोकस्थितीविषयीचे अज्ञान इत्यादि विषयी टिळकानी विधाने केली आहेत ती बरोबर असोत चूक असोत. पण १२४अ कलमातील 'टीका' ह्या शब्दाखाली ती येतात. ती केवळ निंदात्मक अगर बदनामीकारक नव्हत.

"सरकारने काय केले हे न पाहता काय न केले हे सांगण्याचा टीकाकाराला अधिकार आहे असे टिळक म्हणतात आणि ते बरोबर आहे. दुर्दैवाने भाषणात असेच दोन तीन प्रसंग आहेत की त्या संबंधाने टिळकानी केलेली विधाने वाईट आहेत. बॅ. जिना ह्यानीहि फारसे त्याचे समर्थन केलेले दिसत नाही. आणि ती विधाने उद्धृत करून मी त्याना प्रसिद्धि देऊ इच्छित नाही. पण प्रश्न इतकाच की ह्या तुटक विधानावरून गुन्हा शाबीत होतो की काय? विधाने वाईट पण ज्या प्रकरणी ती केली ती आक्षेपाई नाहीत. निदान इतर जी रास्त विधाने टिळकानी केली त्यांचा परिणाम हटकून पुसून टाकण्याइतकी तरी वाईट खाचित नाहीत. ह्या सर्व कारणाकरिता मी मॅजिस्ट्रेट कोर्टाचा हुकूम फिरवितो."

न्यायमूर्ति शहा ह्यांच्या निकालात टिळकाना दोषमुक्त तर ठरविलेच आहे. पण न्यायमूर्ति बॅचलर ह्यांच्या निकालापेक्षा त्यांचा निकाल अधिक व्यापक व उदारबुद्धीचा आहे. ते म्हणतात—"स्वराज्य हा शब्द व स्वराज्य मागण्याचा विषय हे स्वतः आक्षेपार्ह नाहीत. ही गोष्ट सरकारतर्फे कबूल करण्यात आली आहे. अप्रीति शब्दाचा अर्थ स्ट्रॅची साहेबानी केला तो बरोबर नाही. आणि पुढे फुल बेंचच्या निकालात तो फिरवण्यातहि आला आहे. सरकार ह्या शब्दाच्या अर्थासंबंधाने वाद आहे. सरकार व सरकारी अधिकारी यात बॅ. जिना ह्यानी फरक दाखविला आहे. एकेक खाते किंवा अधिकारी वर्ग निरनिराळा घेतला तर सरकार म्हणता येणार नाही. आणि त्यांच्यावर केलेली टीकाहि सरकारावर केलेली टीका असे म्हणता येणार नाही. तथापि अशी पुष्कळ खाती व असा पुष्कळ अधिकारी वर्ग जमेस धरून त्याच्यावर केलेली टीका अशी होऊ शकेल की तो सरकारविषयी द्वेषबुद्धि उत्पन्न

करू शकेल. तात्पर्य हा प्रश्न तात्विक युक्तिवादाने सुटणारा नाही. विशिष्ट परिस्थितीत कोणाचा काय उद्देश होता हे पाहून निर्णय केला पाहिजे. केवळ एकच खाते घेऊन त्याच्यावरील टीका राजद्रोहात्मक असेल. उलट पुष्कळ खाती घेऊन त्यातील दोष दाखविले तरी तो एकंदरीने राजद्रोह होणार नाही. प्रस्तुत भाषणात टिळकानी राजाची निंदा केली असा आरोप नाही त्या अर्थी टिळकानी राजाविषयी काही चांगले उद्गार काढले तरी ते जमेस धरण्याचे कारण नाही. हिंदुस्थानात कायद्याने जी राजसत्ता प्रस्थापित झाली आहे तिची राजद्रोहात्मक निंदा झाली आहे किंवा काय इतकाच प्रश्न. मी ह्या प्रश्नाकडे टिळकांच्या एकंदर भाषणावरूनच पाहतो. ती समग्र वाचली असता त्यांचा स्वाभाविक परिणाम काय होईल इतकीच माझी दृष्टि आहे. मी ही सर्व भाषणे मुद्दाम लक्षपूर्वक वाचली. आणि त्यांचा समग्र विचार करणेच योग्य. म्हणून मी निरनिराळ्या वाक्यावर टीका करीत नाही. अशा प्रसंगी बोलणाराकडे थोडे झुकते माप द्यावे लागते असे विलायतेतील न्यायमूर्तिचेहि मत आहे. टीकात्मक भाषणाचा विचार करताना थोडा खुलेपणा थोडा ढिलेपणा ठेविला पाहिजे. ह्या दृष्टीने विचार करता टिळकांचा हेतू असा स्पष्ट दिसतो की हिंदुस्थानाला होमरूल मिळावे त्याविषयी लोकमत अनुकूल व्हावे व लोकानी स्वराज्यसघाला येऊन मिळावे. तसेच कोणत्याहि बेकायदेशीर मार्गाचा उपदेश टिळकानी केला नाही ही गोष्ट अगदी उघड आहे.

"हिंदुस्थान दास्यात आहे राज्याधिकारी परकी आहेत असली विधाने स्वतः आक्षेपकारक म्हणता येतील. पण सबंध भाषण वाचले ऐकले असता ह्या तुटक विधानांचा परिणाम फारसा विपरित होणे शक्य नाही. सरकारी वकिलाचे म्हणणे असे की टिळकांच्या भाषणामुळे त्यांच्यावर '१२४ अ' कलमाचा गुन्हा लागू न झाला असे मानले तरी क्रि. प्रो. कोड १०८ कलमाप्रमाणे या भाषणावरून जामीन घेता येईल. पण मला तसे वाटत नाही. भाषण राजद्रोहात्मक आहे इतकी गोष्ट प्रथम दाखविता आली पाहिजे. १०८ कलमात तसे स्पष्ट सांगितले आहे. इतर रीतीने १०८ कलमाचा उपयोग असेल व आहे. पण राजद्रोहाच्या आरोपासंबंधाने पाहता तो गुन्हा घडण्यासारखे कृत्य झाल्याचे प्रथम गृहीत धरावे तरच त्यासंबंधाने ह्या कलमाचा उपयोग करिता येतो."

हायकोर्टाने टिळकाना दोषमुक्त ठरवून जामिनकी रद्द केली याबद्दल यच्चयावत् वर्तमानपत्रानी टिळकांचे व हायकोर्टाचे सारखेच अभिनंदन केले. या आनंदोत्सवाची खरी समाप्ति टाइम्स ऑफ इंडियाने केली. "मॅजिस्ट्रेटचा निकाल होताच आम्ही घाईने जी टीका केली ती आता आम्ही सर्वस्वी परत घेतली" असे टाईम्सने जाहीर केले! बाहेरगावाहून आलेल्या अभिनंदनाच्या तारा व पत्रे यांचा ढीग पडला. व त्याबद्दल टिळकानी खासगी व जाहीर आभारप्रदर्शन केले. पण त्यांचे खरे लक्ष ह्या अभिनंदनाचे सुख सेवन करण्याकडे नसून या अनुकूल लाटेचा उपयोग

आपल्या कार्याला कसा करून घेता येईल याकडे होता. खटला ही एका अर्थाने इष्टापत्ति होती. पैकी आपत्ति गेली व इष्ट उरले. तेवढे पदरात कसे पाडून घ्यावे याचा विचार त्यांच्या मनात खळबळू लागला. सुटकेनंतरच्या केसरीतला अग्रलेख स्वतः टिळकांनीच लिहिला हे गुपित आम्ही त्यांच्या लेखांचा तिसरा खंड गतवर्षी काढला तेव्हा फोडलेच आहे. व आम्ही ते फोडले नसते तरी त्या अग्रलेखाचा नुसता मथळा वाचूनच हा लेख टिळकांचा असे कोणीहि निक्षून सांगितले असते. अग्रलेखाच्या मथळ्यात त्यांच्या मनातील खळबळीचे गमक नेहमी हटकून मिळे तसेच येथेहि घडले. हा मथळा 'टिळक सुटले पुढे काय?' असा प्रश्न–चिन्हांकित आहे. उद्गार चिन्ह व प्रश्न चिन्ह यातहि मनुष्याच्या भावनाच प्रगट होतात. उद्गार-चिन्ह हे निवृत्तीपर आहे. कारण दुःखाचा सुखाचा रागाचा लोभाचा आशेचा निराशेचा उपशम उद्गार हा असतो. त्यात पुढील कार्याची सूचना नसते. याच्या उलट वाचकाला हाक मारून उभे करून त्याच्या विचाराला जागृति देऊन पुढील काहीतरी प्रवृत्तीचा प्रसंग आहे अशी गुप्त सूचना प्रश्नचिन्ह करीत असते. या लहानशा सुटसुटीत मथळ्यात टिळक सुटले इतक्या पुरताच सुखाद्गार आहे. पण या सुटकेचा उपयोग 'लोकहो तुम्ही काय करून घेणार' असा टिळकानी टाकलेला प्रश्न पाहून टिळक आपल्या समोर उभे आहेत व त्याना काही तरी आश्वासनपर उत्तर दिले पाहिजे असे प्रत्येक वाचकाला त्यावेळी वाटल्याशिवाय राहिले नाही. टिळक म्हणतात "मी सुटलो ही माझ्या आयुष्यात महत्त्वाची गोष्ट. कारण पूर्वीच्या दोन्ही खटल्यात मला शिक्षाच झाली. मी कितीहि चळवळ्या असलो तरी आश्रममृगाप्रमाणे खरोखर निरुपद्रवी आहे हे न्यायकोर्टाने सरकारचा बाण परतवून यावेळी ठरविले. मृग पाहिला की धनुष्याला बाण जोडणे हा क्षत्रियाचा धर्मच होय. आणि दुष्यंताच्या तपोवनातील दोघा ऋषिकुमारानी पुढे येऊन हात वर करून बाण परतविल्याचा प्रकार एकदाच घडला. पण सगळ्या हरिणाना रहावयाला अशी सुरक्षित तपोवने कोठून मिळणार? आणि त्याच्याकरिता असे ऋषिकुमार तरी आयत्या वेळी कोठून धावून येणार?" अर्थात् राजद्रोहाची मृगया म्हटली म्हणजे सरकाराने बाण मारावा हा त्यांचा धर्म आणि तो लागून पडावे हा लोकांचा धर्म. पण टिळक म्हणतात "हा विचार आपण आता टाकून देऊ आणि मुद्द्याकडे वळू. हायकोर्टाच्या ठरावाचा परिणाम प्रत्यक्षपणे माझ्यावरील पाशबंध काढून घेण्याचा दिसला तरी तो फार व्यापक व महत्त्वाचा आहे. अधिकारी वर्गाचे दोष दाखवून टीका करणे हा पर्यायाने राजद्रोह होतो अशी समजूत अधिकाऱ्यानी आपली व लोकांची करून ठेवली होती. व ती या निकालाने जरी मोळा आणे दूर झाली नाही तरी सरकारच्या बाबतीत 'प्रीतीचा अभाव' असणे म्हणजे काही राजद्रोह नव्हे हे तरी कोर्टाने निश्चित ठरविले. पण हा बोध अधिकारी घेवोत वा न घेवोत. आपण काय करावयाचे? सुटका झाली. आनंद वाटला. पेढे खाल्ले. मनुष्यस्वभावाप्रमाणे क्षणभर उत्सव केला. पण नोकरशाहीचे जे दोष

दाखविले ते निघून जाणार कसे? आणि आपली राजकीय प्रगति होणार कशी? ती आमच्या प्रयत्नाशिवाय नाही. अर्थात् तो प्रयत्न सर्वच्या सर्व उरलाच आहे. हायकोर्टाच्या निकालाचा उपयोग इतकाच की वाटेतील भीति आता गेली. आळशी लोकांची सबब गेली. टिळक व बेझंटबाई हे बंधमुक्त झाले तरी ते काही राष्ट्राच्या जन्माला पुरले नाहीत. मानीव भीति किंवा विघ्न मार्गातून दूर होण्याला आम्ही निमित्त झालो पण खरा उद्योग तुमचा तुम्हीच केला पाहिजे." टिळक म्हणत,त, सर्वांनीच आता स्वराज्यसंघाचे सभासद झाले पाहिजे येवढेच, केसरीचे तुम्हास आग्रहपूर्वक मागणे आहे आणि तुम्ही 'तथास्तु' केव्हां म्हणता याची तो मोठ्या उत्सुकतेने वाट पहात आहे!

## (९) खटल्यानंतरची चळवळ

टिळकापासून सरकारने जामीन घेतला तरी चळवळ थांबू शकत नव्हती व थांबविण्याचा टिळकांचा व इतरांचा विचार नव्हता. म्हणून या निकालाविरुद्ध दाखल केलेल्या अपिलाचा निकाल होण्यापूर्वीच स्वराज्यविषयक व्याख्यानमाला सुरू करण्याचे ठरले. त्यात फक्त सावधगिरी एवढीच ठेवण्यात आली की तोंडी केलेल्या भाषणांचा विपर्यास होऊ शकतो व खरे खोटे ठरवीत बसण्याची पाळी येते ती न यावी म्हणून, व्याख्याने तर द्यावयाची पण होता होईतो विचारपूर्वक व बंदिस्त द्यावयाची असेहि ठरले. व या व्याख्यानमालेला पुण्यातच ता. २४ सप्टेंबर रोजी सुरवात झाली. पहिले व्याख्यान संघाचे चिटणीस केळकर यानी किर्लोस्कर थिएटरात बॅ. बॅपटिस्टा यांच्या अध्यक्षतेखाली दिले. हेतू हा की संघाचे मुख्य अधिकारी अध्यक्ष व चिटणीस यानीच हा उपक्रम केला म्हणजे इतरानाहि ही व्याख्यानमाला मार्गदर्शक व आश्वासनपर होईल. दुसरे व्याख्यान स्वराज्यसंघ या विषयावर ता. १ ऑक्टोबर रोजी दादासाहेब करंदीकर यांचे व्हावयाचे. पण ते मद्रासेस गेल्यामुळे त्यानी लिहून पाठविले ते खाडिलकर यांचे अध्यक्षतेखाली गोखले यानी वाचून दाखविले.

तिकडे मद्रासच्या बाजूला बेझन्टबाईंचीहि व्याख्याने सुरूच होती. निरनिराळ्या प्रांतातील नेमस्तपक्षानेहि यावेळी थोडीबहुत मदतच केली असे म्हणण्यास हरकत नाही. कलकत्त्यास शशांकजीवनराय यानी बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांचे अध्यक्षतेखाली स्वराज्य या विषयावरच व्याख्यान दिले. सुरेंद्रबाबूनी स्पष्ट शब्दात सांगितले की काँग्रेसवाल्यांच्या शब्दानी बोलावयाचे तर स्वराज्य आणि बेझन्टबाईंच्या शब्दानी बोलावयाचे तर होमरूल यांची प्राप्ती हिंदुस्थानाला युद्धानंतर झालीच पाहिजे. ता. ८ आक्टोबर रोजी सं. प्रांताची परिषद गोरखपूर येथे भरली तीत अध्यक्ष या नात्याने चिंतामणी यानीहि हिंदुस्थानावर इंग्लंडबरोबर वसाहतीचेहि अधिराज्य होऊ पाहत आहे ते आम्हाला खपणार नाही, स्वराज्याची पात्रता हिंदुस्थानात आहे, म्हणून स्वराज्याची मागणी सर्वस्वी योग्य आहे असे सांगितले. फिरून महा-

राष्ट्र स्वराज्यसंघातर्फे तिसरे व्याख्यान ता. ८ आक्टोबर रोजी रामचंद्र गणेश प्रधान यांचे केळकर यांचे अध्यक्षतेखाली झाले आणि चवथे व्याख्यान ता. १५ आक्टोबर रोजी पुण्यासच नगरचे वकील हरी केशव पटवर्धन यांचे झाले. अशा रीतीने या जामीनकीच्या खटल्याने आता कोणी बधत नाही ही गोष्ट सिद्ध करण्याचा पद्धतशीर प्रयत्न सुरू झाला व तो यशस्वी ठरला. यापुढेहि एक पाऊल टाकून संघाचे अध्यक्ष बॅ. बॅपटिस्टा यानी स्वराज्यघटनेचा एक मसुदा तयार करून तो प्रसिद्ध केला. त्याला उद्देशून केसरीने लिहिले की स्वराज्याची मागणी हे लोक करतात पण जबाबदार रीतीने विधायक घटना बनवून स्वराज्य कसे हवे ते सांगावे ते सांगत नाहीत अशी काही नेमस्त लोकांची नेहमी तक्रार असते तिला बॅ. बॅपटिस्टा यानी प्रत्यक्ष उत्तर दिले.

ता. २१ आक्टोबर रोजी अहमदाबाद येथे मुंबई प्रां. परिषद भरली ती अर्थातच उभय पक्षांची झाली. या परिषदेचे अध्यक्ष बॅ. जिना हे होते. त्यानी आपल्या भाषणात असे सांगितले की आजवर चाललेले राज्याचे धोरण सरकारने यापुढे पूर्णपणे बदलले पाहिजे. बॅ. जिना हे त्यातल्यात्यात मुंबईच्या नेमस्त कंपूपैकी असल्यामुळे त्यानी भाषण थोडे जपूनच केले आणि त्यांच्या बोलण्यात आवेश असला तरी मुद्यात तो तितकासा नव्हता. ना. गोखले यानी आपल्या मृत्यूपूर्वी एक सुधारणांची योजना केली होती तिचा स्पष्ट उल्लेख न करिता जिनानी तिचा अनुवाद केला. आणि वरिष्ठ कौन्सिलातील १९ सभासदानी सर शंकरन नायर यांच्या सूचनेवरून जो एक खलिता विलायत सरकारकडे पाठविला होता त्याच्या अनुरोधाने ते बोलले. पण सर्व नेमस्तांची हीच मनोवृत्ती नव्हती म्हणून ना. श्रीनिवास शास्त्री यानी आग्रा येथे ता. १४ आक्टोबर रोजी व्याख्यान दिले. त्यात ते असे म्हणाले की यापुढे सरकारच्या नुसत्या आश्वासनानी आमचे समाधान न होता आम्ही होमरूलकरताच प्रयत्न करणार. जिना यानी थोडी चूकहि केली ती अशी की त्यानी आपला आधार म्हणून गोखले यांची योजना घेतली होती. पण ती केवळ टाचणवजा असून खाजगी रीतीने सर आगाखान यांच्याशी झालेल्या चर्चेत त्याना सांगितली होती. ही योजना आगाखान यांच्या संग्रही असून पुढे त्यानी ती गोखले यांचे राजकीय मृत्युपत्र अशा नावाने प्रसिद्ध केली. अर्थात् ही योजना व जिना यानी रेखाटलेली योजना याच्यात तंतोतंत साम्य पाहून लोकानी जिना यांच्यावर उघड आक्षेप आणला की जिना यानी गोखल्यांचे नाव छपवून योजना आपली म्हणून पुढे काढिली यात त्यानी चोरी केली. पण जिना यांचे दुसरेहि एक चुकले ते असे की गोखल्यांची योजना दोन वर्षांची शिळी होती व त्यानंतर आतापर्यंत बरीच खदलाबदल होऊन लोकांच्या आकांक्षेची मजल पुढे गेली होती. १९ नामदार सभासदानी योजना लिहून पाठविली तिला महत्त्व इतकेच होते की विलायतेत ज्याना जबाबदार म्हणतील अशा लोकानी ती केली होती. पण या १९ तले बहुतेक लोक नेमस्त होते. ना. पटेल हेहि त्यात एक होते.

पण त्यावेळी ते नेमस्तातच मोडत होते. अजून ते राष्ट्रीय पक्षात यावयाचेच होते. ते यावेळी नेमस्त असल्याचा पुरावा हाच की पुणे येथे भरलेल्या प्रां० परिषदेला त्यानी अध्यक्ष व्हावे अशी विनंति टिळकामार्फत केळकरानी जाऊन त्याजकडे समक्ष केली होती. पण काँग्रेसमध्ये सामील नसलेल्यांची ही सभा असे म्हणून त्यानी ते आमंत्रण नाकारले. एरवी ते हा मान सुखासुखी दवडते ना! पण या पुढेहि काही दिवस ते नेमस्तच होते. कारण नारायणराव चंदावरकर समर्थ वगैरेंनी जी सुधारणांची योजना लिहून प्रसिद्ध केली तिच्यावर त्यांची एक सही होती.

नोव्हेंबर महिन्यात काँग्रेसकमिटीने आपला सुधारणांचा मसुदा तयार केला. आणि मुस्लिमलीगनेहि आपला मसुदा तयार केला. बॅ. बॅपटिस्टा यानी महाराष्ट्र होमरूल लीगच्या तर्फे आपला मसुदा पूर्वीच केला होता आणि अशा रीतीने तीन मसुदे लखनौ येथील राष्ट्रीय सभेपुढे विचाराकरिता जाऊन पडले. लंडन काँग्रेस कमिटीतर्फे सर कृष्ण गोविंद गुप्त यांची लखनौ काँग्रेसला प्रतिनिधी म्हणून निवड झाली. ते नोव्हेंबरच्या अखेरीला मुंबईस आले तेव्हा त्यानीहि आपल्या भाषणात सांगितले की होमरूलसंबंधाने यापुढे विलायतेत खूप जोराची चळवळ झाली पाहिजे. अशा रीतीने लखनौच्या राष्ट्रीयसभेच्या सुमाराला लोकमताचे एकीकरण होमरूलवर होऊ लागले होते. जिना यानी अहमदाबादेस म्हटल्याप्रमाणे आता "मवाळ व जहाल हा फरक नष्ट झाला आहे आपण सर्व नॅशनॅलिस्टच झालो" हे विधान जवळजवळ खरे होऊ पाहू लागले. या सर्व गोष्टींना उद्देशून केसरीने ता. ५ डिसेंबरच्या अंकात या वाढत्या ऐक्यभावनेचे अभिनंदन केले. या गोष्टीचा कदाचित् सगळ्यात खात्रीलायक पुरावा म्हटला म्हणजे ता. १० डिसेंबर रोजी मुंबईस ना. गोकुळदास पारेख यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई व मद्रास होमरूल लीगच्या शाखामार्फत ॲडव्होकेट सेटलूर यांचे 'हिंदी-स्वराज्य' या विषयावर व्याख्यान झाले व शेवटी पारेख यानी समारोपात असे सांगितले की होमरूलच्या बाबतीत व्याख्याते व मी यांचे एकच मत आहे. व याहि-पेक्षा आणखी पुरावा म्हणजे मुंबई प्रांतिक काँग्रेसकमिटीने टिळकाना ऑल इंडिया काँग्रेस कमिटीत सभासद निवडले!

ता. १७ डिसेंबर रोजी टिळकांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक सभेच्या तर्फे लखनौच्या काँग्रेसला जाणाऱ्या प्रतिनिधींची निवडणूक झाली. सार्वजनिक सभा ही कोणत्याहि काँग्रेस कमिटीला जोडून न घेता स्वतंत्र राहिली होती. आणि अशा संस्थाना मतदारांचा हक्क मिळावा अशी राष्ट्रीय पक्षाची मागणी असून ती मुंबईच्या ठरावाने मान्य झाल्यामुळे पुणे शहराला स्वतंत्र रीतीने प्रतिनिधी निवडून पाठविण्याचा मार्ग मोकळा झाला होता. मुंबई इलाख्यात इतरहि काही जुन्या व स्वतंत्र राहिलेल्या संस्था असून त्यांचीहि अडचण अशीच निघून गेली होती. यामुळे सभेटाचा वाद पूर्णपणे मिटला व यापुढे गाडी पुनः रूळावर चालू झाली. अशा रीतीने होमरूल निदान त्यातील महत्त्वाचा भाग सुधारणांच्या रूपाने एकदम

मागावा येथपर्यंत मजल येऊन ठेपली. तथापि ध्येय एकच ठरले तरी ते मिळविण्याचे मार्गात फरक राहणारच व तो थोडा राहिलाहि. आणि अजूनहि तो वाद मिटला होता असे म्हणता येत नाही. तथापि काँग्रेसच्या इतिहासात हा एक नवा टप्पा आला. आणि काँग्रेसची सायकल जरी जड बुडाची असली तरी तिच्याबरोबर पण अधिक जलदीने चालणाऱ्या स्वराज्यसंघानी काँग्रेसला येथपर्यंत ओढून आणले. निष्ठांच्या शब्दानी बोलावयाचे तर काँग्रेस ही स्थितिनिष्ठ होती व स्वराज्यसंघ हे प्रगतिनिष्ठ होते. एका चिकित्सक बुद्धीच्या बालशिक्षणपंडिताने असे लिहिलेले आहे की "जे तान्हे मूल भल्या मोठ्या पर्वतासमोर उभे केले असता भीत नाही ते एखादी मुंगी देखील चालत जवळ आली तर भिते." त्याप्रमाणे सरकारकडून सुधारणा मिळवावयाच्या तर स्थितिनिष्ठेपेक्षा गतिनिष्ठा हीच अधिक फलप्रद असे म्हणता येते आणि काँग्रेसवाल्यानाहि हे तत्व हळुहळू पटत चालले होते. पण या वेळेस ब्राह्मणेतर संघाने स्थितिनिष्ठांची बाजू राखली म्हणावयाची. कारण हिंदुस्थानातील जातिभेद मोडेपर्यंत तो स्वराज्याला पात्र असे मानता येणार नाही म्हणून आह्माला स्वराज्य नको असे ब्रीदवाक्य लिहून त्याने आपले निशाण उभे केले!

सरकारचीहि बुद्धि पालटली नव्हती हे टिळकांवर झालेल्या खटल्यावरून आणि प्रेस–ॲक्टाच्या जुलमावरून उघड दिसून येत होते. पण याशिवाय जिल्हानिहाय अधिकाऱ्यानी जे वर्तन ठेवले होते त्यावरून ते अधिकच ढळढळीतपणे नजरेला येत होते. याचे एक उदाहरण नोव्हेंबरमध्ये या साली टिळक हुबळी गदग इकडे गेले तेव्हा घडून आले. पुणे येथील डेक्कन बँकेचे लिक्विडेटर यांच्या विनंतीवरून गदग येथील गिरणीच्या बाबतीत शेठ मनमोहनदास याना घेऊन टिळक गदग येथे गेले. टिळकांचा सत्कार करावा असे गदग येथील नागरिकांना वाटून त्यानी एका मोठ्या खुल्या जागेत टिळकाना पानसुपारी करण्याचे योजिले. याच सुमारास धारवाड जिल्ह्याचे अ. पोलिस सुपरिंटेंडेंट ओगॉरमन हे कलेक्टर मि. टर्नर यासह गदगेस गेले होते. त्याना या पानसुपारीची बातमी लागली व तिला प्रतिबंध करण्याचे त्यानी योजिले. सभा बंद करणार अशी वदंता दोनप्रहरपासून असल्यामुळे सभेचे चालक निमंत्रण द्यायला गेले तेव्हा टिळकानी त्याना सांगितले की वदंता अशी अशी आहे. पण मी तयार आहे. तरी तुमचे तुम्ही पाहा. अखेर सभा तर ठरलीच. पण टिळक व मनमोहनदास कॉटनमार्केटची पानसुपारी घेऊन सभेच्या जागी जाऊन पोचले तो असे दिसून आले की अधिकारी पोलिसपार्टी घेऊन सभेच्या जागी आले होते व त्यानी हजारो माणसे बाहेर हाकून लाविली असून प्लॅटफॉर्महि विस्कळित झाला होता. याचे मर्म टिळकानी ओळखले. पण लोकाना सांगितले की मंडळीना बोलवा व प्लॅटफॉर्म जुळवून मांडा. इतक्यात ओगॉरमन हे पुढे होऊन त्यानी डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांच्या सहीची पोलिस ॲक्टाच्या ४२ व्या कलमाखाली काढलेली नोटीस टिळकांच्या हातात दिली. त्यात लिहिले होते की "म्युनिसिपल हद्दीत रस्त्यात अगर लोकास दिसतील अशा ठिकाणी टिळ

कानी चिथावणीचे कोणतेहि भाषण करू नये." टिळकानी नोटीस पाहून ती खिशात घातली व त्यानी ओगॉरमन याना सांगितले की "नोटिशीत माझ्या स्वतःवर काय बंधन घातले आहे ते मी जाणतो. पण तुम्ही लोकाना जबरीने बाहेर घालविले आणि आत येऊ देत नाही याचे कारण काय ?" तेव्हा अधिकारी म्हणाले की "आम्हाला तोंडी हुकूम आहे." टिळक म्हणाले "नुसती पानसुपारी देणे घेणे व आभार मानणे याना ही नोटीस लागू नाही. तरी तशी नवी नोटीस तुम्हाला द्याव-याची असली तर द्या." तेव्हा डेप्युटी कलेक्टर हे काय करू म्हणून विचारण्याला डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटकडे जाऊन परत आले व म्हणू लागले की "तुमच्या भाषणात आभारप्रदर्शनापलीकडे काही येता कामा नये आणि सर्व समारंभ पाच मिनिटात उरकला पाहिजे." त्यावर टिळक म्हणाले "दूर उभे असलेले लोक परत येऊन बस-ण्यासच पाच मिनिटे लागतील. तेव्हा अधिकारी म्हणाले " लोक येऊन बसल्या-पासून पाच मिनिटे मोजू." मग धारवाडचे वकील अलूर यानी टिळकाना हाय-कोर्टाने सोडले या गोष्टीचा उल्लेख करून टिळकांचे अभिनंदन करून पानसुपारी दिली आणि टिळकानीहि दोनतीन मिनिटे भाषण करून आभार मानले आणि स्वराज्याची मागणी ही कायदेशीर ठरली आहे तरी ते लोकानी मागावे असे सांगून भाषण आटपले. ' श्लोकार्धेन प्रवक्ष्यामि यदुक्तं ग्रंथकोटिभिः ' या वाक्याची आठवण टिळकाना व लोकाना या वेळी झाली असल्यास नवल नाही. अवघ्या पाच मिनिटात सगळे " नवल वर्तले." गदग येथील दोन देवळात त्या दिवशी लोकानी शिग्रेरे पाजळली. त्याला अर्थातच सरकारची मनाई नव्हती ! त्याना स्टेशनावर परत पोचविण्याच्या वेळीहि हजारो लोकांची गर्दी झाली होती.

गदगहून टिळक हुबळीला आले. त्याच्या आधीच गदग येथील हुकूम हुबळीस आला होता. पण येथे कदाचित पाच मिनिटांची मुदत हुकमाबरोबर आली नव्हती त्यामुळे हुबळीकरानी योजिलेले पानसुपारीचे कार्य निर्विघ्नपणे पार पडले. हुबळीचे सत्पु-रुष श्रीसिद्धारूढ सभेस हजर होते. तवीव वकील यानी हुबळीकरातर्फे मानपत्र वाचून दाखविले. उत्तर देताना टिळकानी सांगितले की आता मनु पालटत चालला आहे तरी सगळे स्वराज्यवादी बना. लगेच तेथल्या तेथे होमरूल लीगची शाखा स्थापन करण्यात आली व पानसुपारी फोटो वगैरे सर्व कामे तडीस गेली. हुबळीहून टिळक धारवाड येथे आले. गदग येथील वार्ता येथे पूर्वीच आली असल्याकारणाने तेथील पानसुपारीचा समारंभ लोकानी खासगी आवारात केला होता. पण यानंतर टिळ-कांची मिरवणूक लोकानी काढली आणि अशा रीतीने धारवाड जिल्ह्यातील हा छोटा दौरा थोडक्यात उरकण्यात आला. धारवाडहून येताना वाटेत बेळगावकरानी मध्येच टिळकाना उतरवून घेतले. ता. २२ नोव्हेंबर रोजी एका खासगी जागेत पानसुपारीची व्यवस्था केली होती. तेथेहि टिळकांचे थोडे भाषण झाले. दुसरे दिवशी टिळक पुण्यास परत आले.

## (१०) लखनौची राष्ट्रीय सभा

बेळगावच्या परिषदेमध्ये राष्ट्रीय पक्षाने राष्ट्रीय सभेत शिरण्याचे ठरविल्या-बरोबर लखनौच्या सभेला जाण्याचा अपूर्व उत्साह सर्व लोकात प्रगट झाला. लखनौच्या राष्ट्रीय सभेला जितके प्रातिनिधिक स्वरूप होते इतके कोणत्याहि राष्ट्रीय सभेला पूर्वी आले नव्हते व आता तर ते येतच नाही ही गोष्ट कबूल करणे प्राप्त आहे. कोणी आला कोणी गेला तरी राष्ट्रीय सभा गेली ४२ वर्षे सतत चालू राहिली आहे. या अवधीत तिला हजर असलेल्या प्रतिनिधींच्या दृष्टीने पाहता दोन चार प्रकार दृष्टीस पडतात. प्रथम काही वेळ प्रातिनिधिक स्वरूपाचा पण लहानसा समुदाय. त्यात हिंदु मुसलमान ख्रिस्ती अँग्लोइंडियन युरोपिअन इतक्या सर्वांचा समावेश होता. यानंतरच्या काळात प्रतिनिधींची संख्या वाढली पण हळुहळू मुसलमानांची संख्या कमी झाली. कारण सर सय्यद अहमद यानी केवळ शिक्षणाचा कार्यक्रम आपल्या समाजापुढे उचलून धरला व राष्ट्रीय सभेसारख्या राजकीय संस्थेत मुसलमान सामील झाले तर त्यांचे नुकसान होण्याचा संभव आहे ही गोष्ट परोपरीने शिकविली. तिसऱ्या कालावधीत मुसलमान बाहेरच राहिले पण आत उरलेल्या समाजात जहाल व मवाळ असे दोन पक्ष उत्पन्न होऊन त्या कलहाचा कडेलोट सुरतेस झाला. नंतरच्या ६–७ वर्षांत राष्ट्रीय सभा इतकी रोडावली की मुसलमान तर नाहीतच पण राष्ट्रीय पक्षहि नव्हता. आणि राष्ट्रीय सभेचे सर्वांत निकृष्ट स्वरूप पाहावयाचे तर १९१३ साली बांकीपूर येथे रा. ब. मुधोळकर यांच्या अध्यक्षतेखाली जी सभा भरली त्या वेळी तिला आले होते. यानंतरचा काळ म्हटला म्हणजे लखनौ पासून दिल्ली अमृतसरच्या सभा पर्यंतचा. या अवधीत फिरून मुसलमान राष्ट्रीय पक्ष व नेमस्त पक्ष हे सर्व एकवटलेले होते. नंतर कलकत्त्याच्या जादा सभेपासून राष्ट्रीय सभेच्या जमावाला खूप जोर आला. मुसलमानांचा भरणा पूर्वीपेक्षा पुष्कळ अधिक या अवधीत झाला. पण दुसऱ्या बाजूला नेमस्त व परदेशीय असे कोणीहि राष्ट्रीय सभेत उरले नाहीत. आता फिरून राष्ट्रीय सभेतील संघटनेची चळवळ सुरू झालेली असून नेमस्त व राष्ट्रीय व सहकारी सर्व पक्ष एकत्र होऊं पाहात आहेत. परंतु त्याच्या उलट मुसलमान लोक त्यातून हळुहळु हटत जात आहेत. या दृष्टीने पाहता राष्ट्रीय सभेचा ओघ एखाद्या नदीच्या ओघाप्रमाणे भासतो. प्रथम तिचे स्वरूप लहान होते. परंतु एखाद्या मोठ्या नदीप्रमाणे तिचे पाणी खांडी पडण्याइतकें कधीहि आटलेले नाही. केव्हा केव्हा मधून मधून पूर यावा त्याप्रमाणे तिचे स्वरूप भरदार असे झाले. तर केव्हा केव्हा कडक उन्हाळ्यातील प्रवाहाप्रमाणे तिचे स्वरूप अगदी सूक्ष्म झाले. पण या ४२ वर्षांच्या अवधीत राष्ट्रीय सभेला खरे प्रातिनिधिक स्वरूप लखनौ येथील सभेच्या वेळीच होते असे म्हटले असता फारशी चूक होणार नाही.

बेळगावच्या परिषदेनंतर आपला पक्ष राष्ट्रीय सभेत ६–७ वर्षांनी प्रथमच जाणार म्हणून टिळकानी आपल्या पक्षाचे जितके अधिक लोक सभेला जातील तितके नेण्याचा करून प्रयत्न केला. यामुळे एकंदर महाराष्ट्रांतून या सभेला सुमारे चार पाचशे प्रतिनिधि गेले. याच वेळी स्पेशल आगगाड्या काढून राष्ट्रीय सभेला जाण्याची कल्पना निघाली. ती सिद्ध करण्याचे पुष्कळसे श्रेय मुंबईतील डॉ. साठे प्रभृतीना दिले पाहिजे. लोक आपल्या परीने जाणारच पण संघटनात्मक प्रयत्न न केला तर ते ठराविक एक दोन दिवशी आगगाडीत गर्दी करून फक्त आपली गैरसोय करणार. म्हणून अलिकडे पलिकडे एखादा दिवस वर्ज्य करून एकाच दिवशी पुष्कळानी निघावयाचे असे ठरविल्यास एका स्पेशल आगगाडीच्या ट्रेनची भरती होते ही गोष्ट लक्षात आणून डॉ. साठे यानी रेल्वे अधिकाऱ्याकडे खटपट करून स्पेशल ट्रेन काढण्याचे ठरविले. केवळ होमरूलर व टिळकांचे अनुयायी असे २००–३०० लोक सहज जावयास निघतील अशा समजूतीने ही स्पेशल ट्रेन काढण्यात आली. म्हणून हिला होमरूल स्पेशल हे नाव यथार्थपणे देता आले. लखनौला जाण्याकरिता स्पेशल ट्रेन निघणार असे प्रसिद्ध होतांच पुणे मुंबई वऱ्हाड नागपूर व महाराष्ट्रातील इतर शहरे येथून भडाभड तारा व पत्रे पाठवून लोकानी आपली जागा राखून ठेवण्याविषयी मुंबई नॅशनल यूनीअनकडे कळविले. आणि गर्दी इतकी झाली की ट्रेन निघण्याच्या आधी दोन दिवस बहुतेक सगळ्या जागा भरून गेल्या !

टिळक व इतर काही मंडळी मुंबईस आधी एकदोन दिवस गेली होती. तारीख २३ डिसेंबर रोजी व्यवस्थापकानी कोणी कोठे बसावयाचे यासंबंधाने ठरवून प्रत्येक डब्यावर लोकांच्या नावच्या चिठ्या लावून टाकल्या होत्या. रात्री ८॥ च्या सुमाराला ही गाडी मुद्दाम वेगळ्या प्लॅटफॉर्मवर आणून ठेवण्यात आली. आणि टिळकप्रभृति मंडळी गाडीत जाऊन बसण्याच्या वेळी स्टेशनवर इतकी गर्दी लोटली की ती हटवून गाडीत जाऊन बसणाऱ्या लोकाना वाट मिळण्याला मुंबईच्या स्वयंसेवक मंडळीला फारच श्रम घ्यावे लागले. स्पेशल ट्रेन निघण्याची कल्पना नवीन असल्यामुळे कोणत्याहि अशा नवीन कल्पनेप्रमाणे सर्व लोकात तिने मोठे कौतुक उत्पन्न केले. आणि होमरूलर मंडळीचा भरणा पुष्कळ होतो इतकेच नव्हे तर तिच्यात संघटनाहि विशेष होऊ शकते याचेच हे लक्षण असे लोक म्हणू लागले. टिळकांच्या डब्यात फुलांच्या हारांचे भारे येऊन पडलेच होते. पण त्यांच्या डब्याला ते बाहेरूनहि लटकविण्यात आल्यामुळे या स्पेशल ट्रेनला एक प्रकारे विजयोत्सवाचे स्वरूप आले होते. स्पेशल ट्रेनचे वेळापत्रक आधीच वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झाल्यामुळे मुंबईपासून लखनौपर्यंतच्या लोकाना आगाऊ सूचना सहजच मिळाली. आणि टिळक सात वर्षांनी विशेषतः सहा वर्षांच्या तुरुंगवासातून जगून वाचून येऊन राष्ट्रीय सभेला निघाले म्हणून त्याना भेटण्याकरिता व त्यांचे दर्शन घेण्याकरिता वाटेतील मोठमोठ्या बहुतेक स्टेशनवर लोकानी

सत्काराची तयारी करून ठेवलेली होती. त्याचा परिणाम एक मात्र असा झाला की आगगाडींतील मंडळीना रात्री स्वस्थपणे झोप मिळावी ती मिळाली नाही. बहुधा प्रत्येक स्टेशनवर गाडी पोचताच तेथे जमलेला मोठा समाज जयजयकार करून गाडीतून टिळकप्रभृति मंडळीना खाली उतरून घेऊन त्याना पानसुपारी देई. पण गाडीतल्या मंडळीची तक्रार कोण ऐकणार? कारण स्टेशनवर जमलेल्या लोकांचीहि तशीच झोपमोड झाली होती. गांवोगावच्या लोकांनी त्या दिवशी रात्र अशी मानलीच नाही. वाटेत मनमाड भुसावळ अशा सांध्याच्या जागी या स्पेशल गाडीतून जाणारे त्या त्या भागातील होमरूलर येऊन मिळाले. कल्याणास बापुसाहेब फडके चाळीसगावास नामदार उपासनी व काझीसाहेब भुसावळेस गोगटे वकील इत्यादिकानी टिळकांचा सत्कार केला. भुसावळ स्टेशनवर होमरूल लीगचे निशाण आगगाडीवर चढविण्यात आले. हरदा येथे दोन प्रहरी साडेबारा वाजता गाडी पोचण्याची असल्यामुळे पाहुणे मंडळीना भोजन घालण्याची योजना स्थानिक पुढाऱ्यानी केली. गाडीतून उतरून जेवण करून फिरून आगगाडीत बसण्याइतकाच वेळ अधिकाऱ्यानी वेळापत्रकात ठेवला होता. तथापि जेवणाच्या गर्दीत पानसुपारी व व्याख्याने यांच्या गर्दीची भर पडली होती. यामुळे हा ठराविक दीड तासाचा वेळ पुरला नाही. स्वयंसेवक लोक पंक्ती वाढून हातात वाढणी घेऊन सज्ज राहिले होते. पाहुण्यानीहि जसे ज्याला बनेल त्या प्रमाणाने कोणी थंड पाण्याने कोणी ऊन पाण्याने आंघोळ करून जेवण उरकून घेतले. पण अशा ह्या तातडीच्या भोजनप्रसंगीहि हौशी लोकानी श्लोक किंवा पदे म्हणण्यास कमी केले नाही. भोजनोत्तर पानसुपारी होण्याच्या ठिकाणी गांवचे लोक आधीच सभा भरवून बसले होते. त्या ठिकाणी मंडळी जाताच टिळकादि पाहुण्यांच्या सत्काराची व आभारप्रदर्शनाची भाषणे थोडथोडी सूत्ररूपाने होऊन सर्व मंडळी धावत परत येऊन आगगाडीत आपल्या जागी बसली. वेळापत्रकातील वेळ चुकण्याला म्हणजे लांबण्याला येथून थोडा प्रारंभ झाला. आधी साडेदहा वाजता खांडव्यास न्याहारी झाली होती. आणि त्यानंतर १२ वाजता हे चमचमीत जेवण मिळाले. अशा रीतीने प्रवासात होणारी उपासमार लोकांची यावेळी भरून निघाली. डॉ. साल्पेकर यानी जिलबी तोंडलीभात वगैरे पक्वान्नेहि केली होती. आणि मंडळीला संकोच काय तो आगगाडीच्या टाइमटेबलामुळे होईल तितकाच होता. पाहुण्यांचे आवाहन व विसर्जन मंगल वाद्यांत होऊन सुमारे २॥ वाजता गाडी पुढे निघाली. दोन प्रहरी चार वाजता हुशंगाबादचे गावी लोकानी मसाल्याच्या केशरी दुधाचे हंडे तयार ठेवले होते. त्यांचाहि समाचार घेण्यात आला. भोपाळला गाडी रात्री साडेआठ वाजता पोचली. वास्तविक भोपाळ हे मुसलमानी व मागासलेल्या संस्थानी राज्यातील एक. तेथे सरकारी कटाक्ष विशेष. हिंदु पुढाऱ्याबद्दल आदर नाही. अशी स्थिति असताहि तेथे गावच्या लोकानी जो सत्कार समारंभ केला तो त्या मानाने फारच अपूर्व वाटला. स्टेशनवर सुमारे ५००

मुसलमान लोक हजर होते. प्लॅटफार्मवर बैठकी पसरून दिल्या होत्या. फळफळावळ दूध चहा सर्वच तयारी होती. पण सत्काराकरिता जमलेल्या लोकातून वाट काढून पाहुण्याना फराळाकरिता मांडलेल्या टेबलापर्यंत जाऊन तेथे खाऊन पिऊन परत गाडीत येऊन बसण्याचीच मोटी मुष्कील झाली. अशा रीतीने दिवसभर खाण्या-पिण्याची व्यवस्था चांगली झाल्याने कोणालाहि आपल्या बरोबरचा डबा सोड-ण्याची पाळी आली नाही. उलट सत्काराच्या पदार्थांचा योग्य परामर्ष घेण्याची पंचाइत पडली.

भोपाळनंतर वाटेत भिलसा बिना ललितपूर झांशी ऐठ ओराय या स्टेशना-वर पानसुपाऱ्या झाल्या. दिवस थंडीचे असताहि बहुधा प्रत्येक स्टेशनवर लोकांची गर्दी होऊन राहिलेली होती. आणि अनोळखी लोकहि टिळकांचा डबा हुडकून काढून त्याना खाली उतरून पानसुपारी घेण्याला आग्रह करीत. कारण असा सत्कार करण्याला ओळख लागत नाही. आणि ओळखीचा मनुष्य असला तरच त्याच्याकरिता उतरण्याची तसदी घ्यावयाची असा टिळकांचाहि स्वभाव नव्हता. एखाद्या स्टेशनवर गाडी थोडा वेळ थांबली किंवा लोकाना टिळकांचा डबा नेमका सापडला नाही किंवा इतर डब्यातील लोकातच टिळक बसले आहेत अशी समजूत होऊन सत्काराचा भर भलत्याच डब्यावर पडला व गाडी सुटल्या-मुळे लोकाची तारांबळ झाली तरच टिळक या दगदगीतून सुटत. नाहीतर टिळ-काना उठून अंगात ओव्हर कोट डोक्याला टोपी घालून खाली उतरावेच लागे. आणि सत्कार व आभारप्रदर्शन हे दोन्ही समारंभ चार दोन मिनिटात उरकावे लागत. अपरात्री दोन ते चारच्या दरम्यान फारशी मोटी स्टेशने आली नाहीत. एखाद्या लहान ठिकाणी गाडी उभी राहिली तर लोक नुसते नमस्कार करून व मागे पुढे खेपा घालून टिळकांचा सत्कार करण्याची आपली हौस भागवून घेत.

तारिख २४ चा दिवस अशा थाटामाटाच्या प्रवासात गेल्यावर ता. २५ रोजी सकाळी गाडी कानपूर येथे पोचली. तिची ठरलेली वेळ ७–७॥ वाजता होती. तथापि तिला अडीच तीन तास उशीर झाला. कानपुरास ही वेळ सोईची असल्यामुळे सत्कारसमारंभ व्यवस्थित झाला. स्पेशल ट्रेनने लखनौ स्टेशन ११॥ वाजता गाठले. गाडी पोचताच लोकांची उताविळी गोंगाट जयशब्द यांची गर्दी कशी झाली असेल याची कल्पना सहज करिता येईल. गाडीला अडीच तीन तास उशीर झाल्यामुळे बरेच लोक निराश होऊन परत गेले होते. बाहेर आगा-शीत पोलिस व स्वयंसेवक यानी मिरवणुकीची व्यवस्था केली होती. सर्वजण मो-टारीत बसल्यावर लोकानी पाहिले की टिळक आता चटदिशी निघून जातील. मिरवणुकीला अवसर सापडणार नाही. म्हणून त्यातल्या त्यात जे अधिक आग्रही व हौशी होते त्यानी मोटारीला गराडा घातला व मोटार हलू देत नाही असे सांगितले. व्यवस्थापक व पोलिस हे मोटारीच्या ड्रायव्हरला गाडी चालू करा असे ओरओर-डून सांगत होते. आणि तेहि बिचारे आपल्याकडून होईल तितक्या जोराने गाडी

काढण्याची शिकस्त करीत होते. सर्कशीत एखादवेळी एकटा मनुष्य मोटार थांबविण्याचा प्रयोग करून दाखवितो मग येथे जमलेल्या शेकडो लोकाना तो प्रयोग करणे फारच सोपे होते. इतक्यात एका कल्पक मनुष्याने कोणाला न कळता चाकू घेऊन मोटारच्या फुगीर रबराच्या धावा कापल्या. तेव्हा मोटार थबकून खालीच बसली. ती पुढे चालणे अशक्य झाले. तेव्हा या इष्ट आपत्तीला सर्वानाच वश व्हावे लागले. रबरी धावा कापणाऱ्या गुन्हेगाराला शिक्षा न होता उलट त्याचा जयजयकार करण्यात आला. नंतर एक मोठी गाडी पुढे आणून तिचे घोडे सोडण्यात आले. आणि टिळकानी तीत बसवून त्यांची मिरवणूक स्वस्थपणे काढण्यात आली. स्टेशनवरून चारबाग अमिनाबाद वगैरे भागातून ही मिरवणूक चालली. वाटेत पानसुपाऱ्या होतच होत्या निम्मा वाटेत पं. मदन मोहन मालवीय हे टिळकाना सामोरे आले. आणि उभयपक्षी सत्कारसमारंभ होऊन पंडित मदनमोहन मालवीय याना गाडीत घेऊन मिरवणूक बाजारातून छेदीलाल यांच्या धर्मशाळेकडे पोचली. या गोष्टीला सुमारे १॥–२ वाजले. धर्मशाळेच्या गच्चीवर उभे राहून टिळकानी नमस्कारपूर्वक लोकांचे आभार मानले व ‘ तुम्हा भाग्यवान लोकांच्या या शहरी होमरूलचा झेंडा उद्या राष्ट्रीय सभेपुढे फडकणार ’ अशा अर्थाचे थोडक्यात उत्साही भाषण करून प्रचंड जनसमुदायाला रजा दिली.

धर्मशाळेतील व्यवस्था व्यवस्थापकानी आपल्याकडून फार चांगली केली होती. परंतु थंडीचे दिवस पाहुण्यांची गर्दी जागेचा संकोच यामुळे पुष्कळशा सोई ज्याला त्याला आपल्या आपण करून घ्याव्या लागल्या. टिळकांच्या दिमतीला दिलेली जागा त्यातल्या त्यात चांगली पण तीहि लहानच. दर्शनास येणाऱ्या लोकांची अखंड रीघ. यामुळे इतक्या परिश्रमानंतर बाजूला जाऊन निवांतपणे असे पडण्याची टिळकाना सोय नव्हती. थंडीचे दिवस. सर्वांना पाणी ऊन मिळण्याची अडचण. स्वयंपाक वगैरेला सुमारे ३ वाजल्यानंतर सुरवात झाली. आणि संध्याकाळपर्यंत कोणीकडून तरी स्नान उरकून मिळतील ते चार दाेस घास घेऊन बिछान्याकरिता जागा आखून सामान व्यवस्थित लावून देता देता पुरेवाट झाली. आदले दिवशी भोगलेल्या चैनीचा वचपा या एका दिवसातील हालानी निघाला! पण दुसऱ्या दिवसापासून घडी सरासरी बसली.

लखनौ येथील राष्ट्रीय सभेचा मंडप प्रशस्त असून उत्तम रीतीने शृंगारलेला होता. पण त्या सर्व शृंगारात खरी शोभा म्हटली म्हणजे स्वराज्याची मागणी निरनिराळ्या शब्दानी व्यक्त करणाऱ्या रंगीत कागदाच्या अक्षराच्या पाट्या चहूकडे झळकत होत्या ही होय. जिकडे तिकडे ‘संहतिःकार्यसाधिका’ आणि ‘स्वराज्याची तहान सुराज्याने भागणे शक्य नाही’ ही वाक्ये कॉंग्रेसच्या मंडपात व बाहेर चोहोंकडे झळकत होती. एकी ही खरोखर नको कोणाला? जे नेमस्त लोक कॉंग्रेस घटनेचे दार काही एका हट्टाने रुंद उघडण्याचे नाकारीत होते त्यानाहि बाहेर राहिलेले लोक लखनौ येथे आत आलेले पाहून आनंद झाला नसेल असे मानणे ही सैतानी

कल्पना होय. टिळक मंडालेहून सुटून जगून वाचून पुनः राष्ट्रीय सभेत आलेले दिसले हे पाहून त्या सगळ्याच समाजाला आनंद व कौतुक वाटले असले पाहिजे. सुरतेची आठवण दुःखदायक असली तरी काळाने बुजत नाही अशी आठवण कोणती असते? शिवाय नमस्तानाहि टिळकानी थोडेस असे म्हणण्याला जागा करून दिलीच होती की नाही की "सार्वजनिक सभेकडून निवडून या की आणखी कोणीकडून या. पण प्रतिज्ञालेखावर शेवटी सही केलीतच की नाही? स्वातंत्र्यवादी मुद्दा राष्ट्रीय सभेत असावेत असे म्हणता म्हणता त्याना बाहेर ठेवून साम्राज्यान्तर्गत स्वराज्य पत्करून काँग्रेसच्या आश्रयाला अखेर आलातच! घटनेत आता पुढे काय दुरुस्त्या कराल त्या पाहू. पण आम्ही तयार केलेले नियम मानल्याचे तुम्ही कबूल केलेच की नाही? आम्ही काही कधी तुमच्या राष्ट्रीयपक्षाच्या परिषदाना आलो नाही. तुमची घटना अशी करा तशी करा म्हणून तोंडे वेगाडली नाहीत तुमच्या पुढाऱ्याकडे जाऊन पायपिटी केली नाही. यावरूनच सत्पक्ष कोणाचा तो दिसून आला. आणि आमचा सत्पक्ष होता म्हणूनच हट्ट नव्हता तर शुद्ध सत्याग्रह होता." ही कित्येकांच्या मनची भाषा टिळकाना मनाने एकू येत नसेल असे नाही. कित्येकांच्या चेहऱ्यावरहि ती थोडीशी उमटलेली त्याना दिसली असेल. आणि उलट तिला काय उत्तर द्यावयाचे तेहि त्यानी मनाने कदाचित दिले असेल. पण ती वेळ असल्या सूक्ष्म विचारानी मानापमानाचे देणे घेणे फेडण्याची नव्हती. झाल्या गोष्टीत कोणीहि कोणाचा केवळ व्यक्तिशः दुःस्वास केला होता असे नाही. मतभेद होते ते प्रामाणिकपणाचे होते. पण सर्वच पक्ष आता एकप्रकार वरच्या वाऱ्याला लागलेले असल्यामुळे सर्वांच्या मनाची वृत्ति व्यक्तिनिरपेक्ष आणि उच्च भावनाकडे वळली होती.

राजकीय मतभेदामुळे प्रथम वाद नंतर औदासिन्य शेवटी विद्वेष अशा परंपरेने हळुहळू वैर निर्माण झाले. सुरतेच्या बखेड्याला इतर कारणे काय वाटली ती झालेली असोत पण प्रामाणिक राजकीय मतातील तीव्र मतभेद हे प्रमुख कारण नव्हते असे कोणासच म्हणता यावयाचे नाही. कारण या बखेड्यात स्नेहीस्नेही किंबहुना भाऊ भाऊ अशी मंडळी वाटली गेलेली पुष्कळाना माहीत आहेत. सुरतचा बखेडा ही काय एका अर्ध्या तासाची गोष्ट होती. पण त्या पूर्वी व त्यानंतर काही वर्षेपर्यंत जो वाद माजला होता तो खऱ्या तात्त्विक मतभेदाशिवाय कसा चालू शकता? हा वाद काही सभा जिंकून पंडितगिरीची पदवी अथवा अजिंक्यपत्र मिळविण्याकरिता नव्हता किंवा सार्वजनिक नाटकातले ते एखादे सोंग नव्हते. ज्या वादाने डोकी फुटली रक्ते सांडली घरे उजाड झाली कुटुंबे उध्वस्त झाली मित्रांचे शत्रु झाले त्या वादाच्या मुळाशी राजकीय तत्त्वांचे सिद्धात बरेचसे होते ही गोष्ट राजशास्त्राची चिकित्सा करणाऱ्याला नाकबूल करता यावयाची नाही. या परिणामाविषयी जितके दुःख वाटते तितकेच कारणाविषयी कौतुक वाटते. अशा रीतीने मतभेद हा तत्वाचा असल्याने त्या तत्वालाच निराळी

दिशा लागल्यामुळे जुने भेद लोपून जावे निदान नवे भेद उत्पन्न होईपर्यंत तरी एकी राहावी ही गोष्ट सर्वसंमत झाली. म्हणूनच लखनौ येथे सर्व पक्षांचे लोक पुनः एकत्र जमा झाले. हिंदी राजकारणाच्या खेतीत जहालमवाळांच्या भांडणाच्या तीक्ष्ण नांगराने जमीन पूर्वीच उकरली आणि मध्ये चर पाडून माती दोबाजूला गेली. पण महायुद्धाने उत्पन्न झालेल्या आशेच्या कुळवाने दोहो अंगची माती चरात टाकून फिरून ते बुजविले.

स्वागताध्यक्ष जगत् नारायण यानी आपल्या भाषणात बाहेर राहिलेले जहाल व मुसलमान हे दोघेहि कॉंग्रेसमध्ये आल्याबद्दल अभिनंदन केले. बाबू अंबिकाचरण मुजुमदार यानी अध्यक्ष म्हणून भाषण करताना म्हटले की '१९०७ साली सुरत येथे फ्रेंचांच्या प्राचीन बागेत ज्या कॉंग्रेसची दुफळी झाली ती आज नऊ वर्षांनी लखनौच्या केसरबागेत पुनः जोडली गेली ही आनंदाची गोष्ट होय.' पुढे आणखी एक मार्मिक वाक्य ते बोलले ते असे. " यापुढे वृद्धानी तरुणाना झिडकारू नये आणि तरुणानी वृद्धांचा उपमर्द करू नये. दूरदृष्टि पोक्त विचार सावधगिरी हे गुण खरे पण त्यांचा अतिरेक झाला म्हणजे त्यांचे पर्यवसान भागूबाईपणात व नैतिक अधःपातात होते. उलटपक्षी उत्साह जोम हे गुण प्रशंसनीय आहेत खरे पण उतावीळपणाच्या भरात संस्थेचा चुराडा होत असतो. म्हणून एकमेकांचे दोष काढीत न बसता, ज्या पुढाऱ्यानी आजपर्यंत विजय मिळविला नसला तरी चिकाटीने व विश्वासघात न करिता झगडा चालू ठेवला त्यांच्या पाठोपाठ आपण जाऊया. या दृष्टीने सुरतेच्या बखेड्यानंतर आज नऊ वर्षांनी लखनौस आमच्यामध्ये परत आलेले माझे मित्र टिळक यांचे मी आनंदाने अन्तःकरणपूर्वक स्वागत करितो. तेहि आपल्यातलेच आहेत यास्तव त्यांचा आमचा कधीहि वियोग न होवो. " सुरतेनंतर जी कॉंग्रेस भरली तिच्या अध्यक्षानी असे म्हटले की जे आमच्यात नाहीत ते आमचे नव्हतेच. आणि आता लखनौच्या अध्यक्षानी तेहि आपल्यातलेच आहेत असे म्हटले. हे पाहिले म्हणजे एखादी तापट आई रागावली असता मुलाला मेल्या म्हणते आणि फिरून प्रेमाने त्यालाच चिरंजीव म्हणून लिहिते या घरगुती प्रसंगाची आठवण झाल्याशिवाय रहात नाही.

प्रथम दोन दिवस विषयनियामक मंडळात ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीने केलेली व मुस्लिम लीगने कलेली अशा सुधारणांच्या योजना एकत्र घेऊन कलमवार वाचून निष्कर्षरूप एक नवी योजना सर्वानुमते मंजूर झाली. या योजनेला पुढे बरेच दिवस " कॉंग्रेस–लीग–स्कीम " या नावाने प्रसिद्धी आली. ही योजना ठरावाच्या रूपाने तिसऱ्या दिवशीच्या सभेत बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यानी मांडली. या ठरावाची प्रस्तावना विशेष लक्षात ठेवण्यासारखी आहे. कारण तीत स्वराज्याच्या पात्रापात्रतेच्या वादाला कायमची मूठमाती दिली आहे. या प्रस्तावनेसह ठरावाचा अर्थ असा की "आमचा देश पूर्वी स्वराज्याला पारखा नव्हता आजहि

तो त्याला पात्र आहे. तथापि आम्ही आज मागत आहो इतक्या तरी सुधारणा राज्यकारभारात झाल्या पाहिजेत. म्हणजे आम्ही त्या स्वराज्याचा पहिला हप्ता म्हणून स्वीकारण्यास तयार आहो." म्हणून लखनौच्या कॉंग्रेसने स्वराज्याचे निशाण रोवले असे सर्वांनी म्हटले. यासंबंधाने केसरीने लिहिले ते असे:—

"शुक्रवार ता. २९ डिसेंबर १९१६ हा दिवस हिंदी राष्ट्राच्या इतिहासात—निदान ब्रिटिश रियासतीच्या इतिहासात—सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखा उगवला ह्याविषयी शंका नाही. कारण त्या दिवशी आम्ही वर म्हटल्याप्रमाणे हिंदी स्वराज्याचे निशाण लखनौ येथे गोमती नदीच्या तीरावर रोवले गेले! जुन्या काळचे ऐतिहासिक प्रसंग आठवून व केवळ कल्पनेने त्यांचे भडक रंगाचे चित्र बनवून अद्‌भुत रस आळवीत बसणारे कवी पुष्कळ भेटतात किंवा भविष्यवादाची चटक लागलेली असल्यामुळे पुढे कधी काळी येणाऱ्या सुवर्णयुगाचाच अद्‌भुतपणा ज्याना पटू शकतो असेहि लोक आढळून येतात. पण वर्तमानकाळी किंबहुना प्रत्यक्ष डोळ्यापुढे घडणाऱ्या गोष्टींचा अद्‌भुतपणा पटून त्याचे स्वारस्य घेण्याला जी सहृदयता लागते ती काही विशेष व दुर्मिळच होय. असली लोकोत्तर रसिकता ज्या थोड्या लोकाना ईश्वराने दिली असेल त्यानाच लखनौ येथील राष्ट्रीय सभेच्या मंडपात स्वराज्याच्या मागणीविषयी जो ठराव गेल्या शुक्रवारी मंजूर करण्यात आला त्याचे महत्त्व कळून येईल. चालू राजकारण डोळ्याने प्रत्यक्ष दिसते म्हणून ते काही रुक्ष किंवा कमी अद्‌भुत खास नव्हे. आणि इतिहास झाला तरी त्यातील कोणताहि अद्‌भुत प्रसंग हा कोणत्या ना कोणत्या तरी वेळी 'चालू राजकारणच' होता की नाही? शुक्रवारचा ठराव म्हणजे हिंदुस्थानच्या राष्ट्रीय आकांक्षेने केलेला मुकुटधारणविधीच होय! या समारंभाला तिची सर्व प्रजा आपापला नजराणा घेऊन हजर होती. हिंदुस्थानातील असा एकहि वर्ग नसेल की ज्याचे प्रतिनिधी या समारंभास आले नव्हते. जातिभेद मतवैचित्र्य व्यक्तिद्वेष वगैरे राष्ट्रीय—कार्योच्छेदक पिशाचानीहि गोमतीच्या प्रवाहात गती घेतली व नवीन शुभ देह धारण करून मंगळ आशीर्वादच दिला. ब्रिटिश रियासतीचा इतिहासकार झाला तरी तो उद्या याहून दुसरे काय म्हणणार? आपले राजकीय हृद्गत हुडकून काढण्याला व त्याला समर्पक अशा शब्दांचे रूप देण्याला राष्ट्राला पाच पन्नास वर्षे लागली खरी. पण ते हृद्गत त्याचे त्याला आता खरे कळून आले आणि गेल्या शुक्रवारी सर्व राष्ट्राने एकमुखाने त्याचा एवढा मोठा उच्चार केला की त्याचा आवाज सर्व जगभर पसरला. अर्थात् त्याचा विसर त्याला स्वतःला ह्यापुढे पडणे शक्यच नाही व त्याच्या हातून यापुढे जो जो म्हणून उद्योग होणार तो तो ते हृद्गत सफळ होण्याकरिताच होईल यात शंका नाही.

"एखादे काठोकापडाचे निशाण किंवा जरीपटका प्रतिपक्षी प्रबळ झाला असता त्याला काढून टाकता येतो किंवा हस्तगत करून पायाखाली तुडविता येतो. पण हिंदी राष्ट्राने स्वराज्याची मागणी करून रोवलेले हे अपूर्व निशाण आता

त्याचा कोणताही प्रतिपक्षी काढून टाकण्यास समर्थ होणार नाही. सरकार आजपर्यंत हिंदी लोकातील दुफळीमुळे स्वराज्यवाद्याची कीव करीत असे पण आता ह्या कामी निराश्रित म्हणून स्वतः सरकारचीच कोव आम्हाला यापुढें करावी लागणार! राष्ट्रीय सभेच्या जन्मापासून हिंदुमुसलमानामध्ये फूट पडण्यास सुरुवात झाली व गेल्या दहा वर्षांत खुद्द हिंदू लोकामध्येहि त्यातल्या त्यात अधिक नेमस्त असणाऱ्या लोकास हाती धरून फूट पाडण्याचा प्रयत्न अनेक व्यक्तींनी बरेच दिवसपर्यंत यशस्वी रीतीने केला. पण काळच उलटला म्हणजे उलट्याचे सुलट होण्यास वेळ लागत नाही व तीच गोष्ट हिंदु मुसलमान आणि नेमस्त–जहाल हे दोन मोठे पक्षभेद अवघ्या ४।५ वर्षांत नाहीसे होण्याच्या कामीहि दिसून आली. हिंदु-मुसलमानांचे वैर एका अर्थाने अनेक शतकांचे असे म्हणण्यास हरकत नाही आणि मवाळ-जहाल हा भेद जरी अगदी अलीकडचा तरी पक्षभेदाच्या दृष्टीने पाहता तो हिंदुमुसलमानांच्या वैराइतकाच किंबहुना अधिक घातक होऊन राहिला होता हे काही खोटे नाही. पण हे पक्षभेद उगवत्या राष्ट्रीय बुद्धीच्या तेजामुळे वितळून गेले. शेवटल्या मुसलमान नबाबाच्या राजधानीत मुसलमान व हिंदु विद्वान आणि राइस एकाच सभापीठावर बसून त्यानी प्रत्यक्ष स्वराज्याची तावडतोब मागणी केली त्याअर्थी ब्युराक्रसीची सद्दी आता संपली असे तिने खास समजावे हा इशारा आम्ही बेलाशक देऊ शकतो. राष्ट्रात दुफळी माजवू इच्छिणाऱ्या अँग्लोइंडियन शकुनीना अशिक्षित किंवा अस्पृश्यवर्गाकडे धाव घेण्याशिवाय आता गत्यंतर उरले नाही पण हे त्यांचे आधारस्थानही त्याना फार दिवस लाभण्याचा संभव नाही. कारण सर्वच लोकाना आता हे निश्चित कळू लागले आहे की हिंदी लोकापैकी कोणत्याहि वर्गाच्या हाती सत्ता आल्यास ती एका दृष्टीने आपल्याच हाती आल्यासारखी आहे. अशी बुद्धी खरोखरच उदित झाली असती तर कायदे-कौन्सिल वगैरेतून आपल्या प्रतिनिधींचे प्रमाण काय राहावे याविषयी खाजगी करारमदार करून घेऊन का होईना पण–स्वराज्याचे अधिकार एकंदरीने हिंदी लोकांच्या हाती यावे, ब्युरॉक्रसीच्या हाती यापुढे ते राहू नयेत, अशा मागणीस मुसलमान लोक हिंदी लोकाना कधीहि मिलाफी झाले नसते. अमेरिकन प्रेसिडेंट आब्राहाम लिंकन ह्यांचे एक असे वचन प्रसिद्ध आहे की 'या जगात सर्व माणसाना काही थोडा वेळ किंवा काही थोडया माणसाना सर्व वेळ फसविता येणे शक्य आहे. पण जगात असा कोणीहि बिलंदर भोंदू असू शकतच नाही की जो सर्व लोकाना सर्व काळ फसवीत राहील.' ब्युरॉक्रसी ही भोंदू आहे असे आम्ही मुळीच म्हणत नाही. ती आपले कर्तव्य तेच करीत आहे. तरी स्वराज्याचे अधिकार देण्याच्या बाबतीत त्यांच्या हातून न कळत का होईना पण एकाची सबब दुसऱ्यास सांगून दोघानाहि अधिकारविरहित ठेवण्याचे प्रयत्न आजवर होत होते. पण एकच सबब सांगून तात्पुरते निरुत्तर केलेल्या दोघांची गाठ केव्हा तरी पडून खुलासा झाला म्हणजे खरा प्रकार उघडकीस आल्याशिवाय कसा रहाणार!

म्हणून 'अधिकाराच्या जागा वाटेल तर हिंदूना द्या वाटेल तर मुसलमानांना द्या पण आमच्यापैकी कोणाला तरी द्या. मात्र तुम्ही यापुढे त्या आपल्या हाती ठेवून घेऊ नका' असे ब्युरॉक्रसीला सांगण्याची स्पष्ट तयारी दोघांचीहि झालेली आज दिसत आहे. राष्ट्रीय भावनेचे खरे बीज काय ते ह्यातच आहे. व हे बीज हिंदुस्थानच्या भूमीत आता पुरते रुजले गेले ह्याविषयी सरकारासहि फारशी शंका उरेल असे आम्हाला वाटत नाही."

राष्ट्रीय सभेने ही मागणी सरकारपुढे रीतसर मांडण्याची काही व्यवस्था स्वतःची अशी केली नाही. कल्पना अशी होती की आता पुढे निरनिराळे लोक विलायतेस जाऊन तेथे या मागणीचा पुरस्कार करतील. काँग्रेसने स्वतःच शिष्टमंडळ पाठवावे किंवा याच कामाकरिता चार माणसे नेमून देऊन त्यांच्या खर्चाची तजवीज करावी अशी जी सूचना पुढे आली ती घटनेत बसत नाही हे कारण लावून ती निकालात काढण्यात आली. इतर लोक आपल्या इच्छेने आपल्या खर्चाने जातील व चळवळ करतील सवरतील ही गोष्ट निराळी. हुकूमनामा कोर्टाचा पण तो बजावण्याचे काम मात्र कोर्टाचे नाही अशातला हा प्रकार झाला! तथापि एक गोष्ट काँग्रेसने चांगली केली ती ही की सर्वसाधारणपणे आपल्या पोटकमिट्याना होमरूल संघाना व देशातील अनेक राजकीय सभाना ही चळवळ करण्याचे निमंत्रण केले. हातात काँग्रेसचा जाहीरनामा दिला व ज्याला शक्य असेल त्याने तो या देशात परदेशात वाचून दाखवावा समजून सांगावा व त्याचा अंमल करण्याचा प्रयत्न करावा असा वटहुकूम सुटला होता. लखनौच्या या वरील ठरावात होमरूल संघाचा निर्देश करावा की नाही असा प्रश्न थोडासा निघालाच व कित्येकानी आढेवेढे घेतलेच. याचे थोडेसे कारण असे की बाईचा स्वराज्यसंघ जसा काँग्रेसला जोडून घेण्यात आला होता तसा टिळकांचा संघ जोडून घेण्यात आला नव्हता ही आढेवेढे घेणाऱ्यांच्या मनातली गोष्ट होती. पण देशातल्या सर्वच संस्थाना चळवळ करण्याविषयी हे आमंत्रण दिलेले असल्यामुळे टिळकांचा संघ काँग्रेसला जोडून घेतलेला नसला तरी त्याला वगळून पंक्तिप्रपंच करण्यासारखे बारकाईचे शब्द तरी कोठले आणणार? शिवाय तेथे सर्वांच्या मनात ही जाणीव दिसत होती की गेल्या वर्षात होमरूलवाल्यानीच या कामी पुष्कळ चळवळ केलेली आहे. असो. लखनौ येथे होऊ घातलेली एकी पाहून लगेच लॉर्ड सिडनहॅम यानी तिकडील पत्रातून इशारा दिला की 'हिंदुस्थानात धोका आहे सांभाळा!'

जाता जाता लखनौ येथील विषयनियामकमंडळ निवडण्याचे वेळी जो एक लहानशी गोष्ट घडली तिचा उल्लेख करितो. ही निवडणूक महत्त्वाची असते हे सर्वांना ठाऊकच आहे. हे जाणून निवडणुकीच्या सभेत टिळकपक्षाच्या लोकानी चलाखी दाखवून प्रथम जाऊन पुढच्या सोईच्या जागा घेतल्या. यामुळे इतराना मागे गर्दीत उभे राहावे लागले. प्रत्येक पक्षाने आपापली एक याद करून आणली होती. त्याप्रमाणे या मंडळीनी मुंबई इलाख्याकरिता पंधरा नावे सुचविली. पण

तीत दुसऱ्या पक्षाचे सात लोक घातले होते सगळीच आपली मंडळी भरली नव्हती. तरी या यादीची तक्रार गांधी यांच्याकडे आदल्या रात्री गेली. तेव्हा ते छेदिलालच्या धर्मशाळेत आले. तेथे त्यांचे व केळकर यांचे बराच वेळ सर्व लोकादेखत भाषण होऊन एक याद ठरली. ती गांधीना मान्य झाली. तेव्हा ते म्हणाले की ही याद मी दुसऱ्या पक्षास दाखवितो व ते कबूल असल्यास तुह्मा-कडे परत येऊन कळवीन. पण त्याप्रमाणे ते रात्री किंवा दुसऱ्या दिवशी आले नाहीत यावरून ती मान्य झाली नाही असे दिसून आल्यावरून पूर्वीची आपली यादी आपण मांडावी मग होईल ते होईल असे ठरले. आदल्या रात्री गांधी म्हणाले होते की " मंडळी मला म्हणताहेत की त्रयस्थ म्हणून तुम्ही निवडणुकीच्या सभेचे अध्यक्ष व्हा." तेव्हा केळकर म्हणाले "टिळक अध्यक्ष झाले म्हणून तरी भीति कसली ? तथापि आपण अध्यक्ष झाला तरी आमची हरकत नाही." पण सभेच्या वेळी गांधी येऊ शकले नाहीत. आणि एका बाजूने गोकुळदास पारेख यांचे नाव व दुसऱ्या बाजूने टिळक यांचे नाव सुचविण्यात आल्यावर टिळकानाच बहुमत मिळाले. गांधी यांचे नाव कोणत्याच पक्षाने केलेल्या यादीत नव्हते पण ते आयत्या वेळी सुचविले गेले व टिळक पक्षातील मते मिळूनच ते शेवटी निवडून आले. ही निवडणूक होमरूलर लोकाना घ्यावे की वगळावे या तत्त्वावर झाली इतके सांगितले म्हणजे वादाचे बीज लक्षात येईल.

लखनौ येथील सभेचे अधिवेशन संपल्यावर तारीख ३० डिसेंबर रोजी सायंकाळी ब्रह्मविद्या मंडपात 'स्वराज्यसंघ परिषद' भरली. सुमारे १००० स्वरा-ज्यवादी लोक सभेला हजर होते. अध्यक्षस्थानी बेझंटबाई होत्या. प्रारंभी त्यांचे भाषण झाल्यावर त्यांच्या सूचनेवरून टिळकानीहि भाषण केले. ते म्हणाले "लखनौ येथील सभेत मुख्य दोन गोष्टी घडल्या. स्वराज्याची मागणी निश्चित झाली ही एक व दुसरी गोष्ट म्हटली म्हणजे हिंदुमुसलमानांची एकी होऊन उभय पक्षानी मिळून तिची मागणी निश्चित केली. पण ती गोष्ट अवश्यक होती. एखाद्या भानगडीच्या मुकदम्यात पक्षकार चांगल्या वकिलाची मदत मिळविण्याकरिता दाव्याच्या मिळ-कतीतील बराचसा भाग वकिलाला देण्याचे कबूल करितो त्याप्रमाणे स्वराज्याच्या मागणीत मुसलमान बंधु सामील व्हावे म्हणूनच त्याना ह्या विशेष सवलती दिल्या आहेत. ते बरोबर असो की चूक असो. पण त्यांच्या सहायाशिवाय स्वराज्याच्या मागणीचे गाडे चालू लागणार नाही. मुसलमानाना सवलती जास्त मिळतील तर त्या मानाने स्वराज्यसिद्धीची त्यांची जबाबदारी वाढेल. युद्ध तिरंगी असले म्हणजे कोणच्यातरी दोन पक्षानी एक झाल्याशिवाय तिसऱ्याचा मोड होत नाही. इंग्रजांच्या हातून सत्ता हिसकावून घ्यावयाची तर रसोखेचीच्या खेळात आमच्या-बरोबर मुसलमानानीहि हातभार लावला पाहिजे. इकडे दुसऱ्या टोकाला इंग्रज व नोकरशाही अशी राहतात तरी ते काही कमी बलवान नाहीत. म्हणून दोन पक्ष एकत्र मिळाले तरी आम्हाला विशेष जोराचा प्रयत्न केला पाहिजे. प्रत्येकाने खण-

खणीत आवाजाने आपल्या तोंडाने स्वराज्याची मागणी करणे हा ह्या प्रयत्नाचा प्रारंभ होय. माझ्या घरात मी कारभार करणार असे म्हणण्याला कोणालाहि भिण्याचे कारण नाही. "

टिळकांच्या भाषणानंतर बेझंटबाईंचे अनुयायी जिवराजदास अरुंडेल सी. पी. रामस्वामी अय्यर इत्यादिकानी स्वराज्यसंघाच्या कार्याची माहिती सांगितली व बऱ्याच उशीरा सभा समाप्त झाली. पण याशिवाय खाजगी भेटी बैठका चर्चा सभा समारंभ व्याख्याने वगैरे सुमारे चार दिवस चालू होती. टिळकांचा मुक्काम तारिख ३१ डिसेंबर पर्यंत लखनौस पडला. राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष बाबू अंबिका चरण मुजुमदार यांच्या पासून खाली सर्व दर्जाचे जातीचे व धर्माचे लोक टिळकांच्या भेटीला येऊन गेले. छेदीलालच्या धर्मशाळेपासून राष्ट्रीय सभेच्या मंडपापर्यंत टिळक जात येत त्यालाहि एकप्रकारे मिरवणुकीचे स्वरूप येत असे. मंडपात सभा चालली असताना बाहेर गारठ्यात येऊन लोकांच्या भेटीकरिता टिळकाना उभे राहावे लागे. व आलेल्या लोकांची गांठ पडावी म्हणून हप्त्याहप्त्याने दर्शन देऊन देऊन त्यांची मोकळीक स्वयंसेवकाना करावी लागे. याच दिवसात हिंदु सभेची परिषद भरली होती. ह्या सभेच्या निमंत्रणावरून टिळक गेले व तेथेहि त्यानी भाषण केले. आज हिंदुसभेला जे संघटित स्वरूप आहे ते स्वरूप त्या वेळी नव्हते. शिवाय मुसलमानाना सवलती देवविल्याबद्दल हिंदुसभा टिळकांवर रागावलेली होती !

# परिशिष्ट

## १९१६ सालामधील निवडक पत्रे

### (१) डॉ मुंजे यांची केळकराना तार

नागपूर ता. ३ जानेवारी १९१६

कॉंग्रेसचा समेट मान्य नाही. तथापि आपण ठरवाल त्याबाहेर आम्ही नाही.

### (२) खापर्डे यांचे टिळकाना पत्र

अकोला १ एप्रिल १९१६

काल खाडिलकर येऊन त्यानी मला आपले पत्र दिले. मला मोठाच मान देण्याचे तुम्ही योजिले आहे. व तेहि अगदी अकल्पित. म्हणून तो स्वीकारावा की नाही याबद्दल क्षणभर मन गोंधळले. कारण माझे दोष मला माहीत आहेत. तरी पण मी येण्याचे कबूल करतो. येथील व नागपूरच्या मित्रमंडळीना तुमच्या पत्रातील विचार कळविले व तुमचे काय विचार असतील ते उघडपणे मांडण्याच्या तयारीने चला असेहि मी त्याना सांगितले.

### (३) बेळवी यांचे केळकराना पत्र

बेळगाव २२ एप्रिल १९१६

आमची परिषदेची तयारी जोरात चालू आहे. परंतु अधिकारी वर्गाची प्रतिकूलता आहे असे पाहून प्रतिपक्षानीहि थोडी उचल केलेली दिसते. जैन लोकानी या सभेवर बहिष्कार घालावा असे ठरविण्याकरिता एका बंगल्यात सभा झाली. पण दुसरे सुज्ञ जैन सभेला गेले. त्यांचा हेतू अशा सूचनेला विरोध करण्याचा होता आणि हे लोक जाऊन पाहतात तो तेथे निमंत्रण करणारापैकी दोघे व स्वतः लठ्ठे इतकीच मंडळी होती. अशा रीतीने या विरोधकांची फजीति झाली. काही लिंगायत लोकाकडूनहि असाच विरोध होणार आहे. दोन पक्षांचा समेट होणार हे तिसऱ्या पक्षाला मानवत नाही इतकेच. अधिकाऱ्यानी गुप्त सर्क्युलर काढल्यामुळे सरकारी नोकर भाडे घेऊनहि आपल्या जागा घरे देत नाहीत. बेळगावास होमरूल लीगची स्थापना होण्याचा विचार आहे पण ती आता इतक्यातच झाली पाहिजे काय? तथापि रेव्हिन्यू कमिशनर याना मी आश्वासनपूर्वक कळविले आहे की सर्व काम रीतसर राजनिष्ठपणे व कायदेशीरपणे होईल. कदाचित् प्रेक्षक लोक विशेष गडबड करावयाचे म्हणून त्यांची तिकिटे अगदी आयत्या वेळी काढण्याची ठरविली आहेत.

### (४) नटेशराव द्रविड यांचे केळकरास पत्र

नागपूर ३ मे १९१६

सुरत येथील तंटा व फाटाफूट यानंतर आज मी हे पहिलेच पत्र तुम्हाला लिहित आहे. या आपसातील कलहाविषयी तुम्हा आम्हाला किती वाईट वाटते हे ईश्वरालाच माहीत. बेळगावास तुम्ही मंडळींनी जो एकीचा ठराव केला त्याबद्दल तुमचे व त्याहूनहि आमचे अभिनंदन करावेसे वाटते. हा सलोखा ठेवण्याचे काम करण्याला तुम्हाला आहे याहून अधिक बळ मिळावे अशी माझी प्रार्थना आहे. गोखले मरण पावण्यापूर्वीच हे घडून येते तर अधिक चांगले झाले असते. पण उशीरा झाले तरी ते हवेच होते. आता पूर्वीप्रमाणे दोन्ही पक्षानी मिळून काम करावे अशी मला फार उमेद आहे. ती व्यर्थ ठरेल काय? कोणी कडून तरी सर्व प्रामाणिक मतांची माणसे एकत्र जमावीत व त्यानी होईल ते कार्य करावे. आग लागो या पक्षभेदाला! मी पुण्यास लवकरच येईन व तुमची गाठ घेईन.

### (५) ग. कृ. चितळे यांचे केळकरास पत्र

ता. ६ मे १९१६

महाराष्ट्रातील उभय पक्षात सलोखा व्हावयास पाहिजे होता तो घडवून आणण्यात तुम्ही मदत केली याबद्दल तुमचे आभार मानले पाहिजेत. हे घडून येण्याला तुम्हाला किती प्रयत्न पडले असतील याची मला कल्पना आहे. या पुढील खटपट आपण लौकरच केली पाहिजे म्हणजे जिल्हासभा व प्रांतिक परिषदा भरतील त्या राष्ट्रीय सभेच्या नियमान्वये भरविल्या जाव्या. कारण तुम्ही आम्ही सर्वांनीच हे नियम आता मान्य केले आहेत. तरी आपला विचार कळवावा. जमत असेल तर येथे उभयपक्षांच्या पुढाऱ्याना बोलावण्याचा विचार आहे."

### (६) ग. कृ. चितळे यांचे केळकराना पत्र

अहमदनगर ता. २० मे १९१६

काल स्वागतमंडळाची सभा झाली व तिने सर्वानुमते अध्यक्षाच्या जागीं तुमची निवडणूक केली हे कळविण्यास मला आनंद वाटतो. हे जोखमीचे काम तुम्ही नाही म्हणणार नाही अशी मला आशा आहे. तुम्हाला अलिकडे पुष्कळ श्रम झाले आहेत. तरीपण तुमची विश्रांति घेण्याची वेळ अजून पुढेच आहे. चौकर वकील यानी आमच्या बळवंतराव टिळकाना नगरास येण्याचे आमंत्रण दिले आहे व ते स्वीकारून तुम्ही दोघे मिळून येणार असे घडवून आणाल तर मी तुमचे फार आभार मानीन. जिल्हा परिषदेत विषय मोजके असावेत प्रमाणाबाहेर असू नयेत ही तुमची सूचना मला मान्य आहे.

### (७) चौकर यांचे केळकराना पत्र

अहमदनगर ता. २३ मे १९१६

परवा जिल्हा परिषदेच्या स्वागतमंडळाची सभा भरली त्यात आपणाला सर्वानुमते अध्यक्ष निवडले हे कळविण्यास आनंद वाटतो. त्याबरोबरच लोकसमाजाच्या विनंतीवरून टिळक याना सन्मान्य पाहुणे म्हणून निमंत्रण करण्याचाहि सर्वानुमते ठराव झाला. ते आमंत्रण रीतीप्रमाणे जाईलच. पण आपणास अगत्याची विनंति की टिळकाना नगरास आपणाबरोबर आपण आणलेच पाहिजे व आणतो असे तावडतोब उत्तरी लिहिले पाहिजे. ते आल्याने मोठेच कार्य होणार आहे. बाळासाहेब देशपांडे यांचे मृत्यूने येथील सार्वजनिक चळवळीचे काम अगदी बंद पडले आहे. त्याला पुनः जीवन मिळून ते फोफावणार आहे. नाहीतर अजिबात नष्ट होण्याचा प्रसंग गुदरणार आहे. तरी टिळकाना वरील गोष्ट तावडतोब कळवून ते सिंहगडास असले तर तेथून त्यांचे अनुमोदन आणवून मला कळवावे. जास्त काय लिहू ? मी सर्वाना कबूल केले आहे की टिळकाना मी येथे घेऊन येईन. तेव्हा ती मंडळी माझे भरंवशावर बसली आहेत.

### (८) मिसेस बेझंट यांचे केळकराना पत्र

मद्रास १८ जून १९१६

वि. वि. आपल्या दोनहि संघांचे उद्देश एकच आहेत आणि आपण उभयताहि सहकारितेने काम करणार आहो. तेव्हा ज्याची जशी आवड असेल तसे त्याने ह्या अगर त्या संघाचे काम करावे. एकाच गृहस्थाने जर दोनहि संघांचे काम केले तर त्यावरून त्यांचा अभिन्नभाव अधिकच स्पष्ट होईल.

### (९) बॅप्टिस्टा यांचे गोखले यास पत्र

मुंबई ८ जुलै १९१६

माझ्यामते आपल्या संघाच्या विद्यमाने होमरूलवर व्याख्याने करवावी. केळकरांचे लेक्चर १३ ऑगस्टला होईल तर मी अध्यक्ष होण्याला येऊ शकेन. या व्याख्यानात कोणीहि राजद्रोहात्मक बोलणार नाहीच. पण कोण काय बोलणार याच्यावर केळकरानी थोडी नजर ठेवलेली बरी. सरकार होमरूलच्या चळवळीतून राजद्रोह सिद्ध करू पाहणार की काय असा प्रश्न आहे. त्यातून राजद्रोह निघाला तर अर्थातच चळवळ थांबेल. पण आपणांचा बरोबर बिनचूक रिपोर्ट सरकाराकडे जावा हे बरे याकरिता कलेक्टर किंवा सेक्रेटरी याना लिहून तुम्ही आपले विश्वासू लघुलेखक पाठवाल तर बरे अशी आपणच त्याना विनंती का करू नये ? तसे झाले म्हणजे सरकारचा विचार काय आहे हे एकदा कळेल तरी.

**( १० ) टी. आर. कृष्णाचार्य यांचे टिळकांना पत्र**

मद्रास २० सप्टेंबर १९१६

माझे पूर्वज पुष्कळ काळापूर्वी पुणे प्रांताकडे होते. त्यांचे नांव टोण-पेकर. भोसले राजवंशाबरोबर ते तंजावरास आले. त्यावेळेपासून इकडेच राहतात. त्या वंशातला मी मध्वमतानुयायी ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण आहे. माझ्या गावाहून कुंभकोणास आलो तेथे इंग्रजी संस्कृत शिकलो. मग वेदग्रंथसंग्रह केला. इतर मतांच्या ग्रंथाप्रमाणे माध्ववेदांतग्रंथ सुलभ करावे अशी इच्छा. त्याप्रमाणे अनेक वेदग्रंथ छापले. महाभारताचे पाठ इकडचे तिकडचे पाहून संशोधून छापले. अनेक व्याख्यानसहित रामायण छापले. महाभारताची अनुक्रमणिका मोठ्या श्रमाने तयार करून छापली. अशा रीतीने सर्व पैसा पुस्तकात गुंतून गेला. कोणाला जुगारीचा नाद तसा मला ग्रंथप्रसिद्धीचा!

( इतका मजकूर संस्कृतात लिहून पुढे मराठीत लिहितात )

आताच एक भागवतमूलक पुस्तक एक छापिले. यापुस्तकामध्ये श्रीधर स्वामी यांचे व्याख्यानाप्रमाणे मूलपाठ धरिले आहे. मतत्रयानुसार इंग्रजी तर्जमा करून छापास आरंभ केले आहे. आजे रोजी हे दोने पुस्तक आपल पाहाणेस पाठविलो आहे. माझे पुस्तक सगळे एग सेट्टास सुमार दोनशे चाळीस रुपये होत आहेत. त्यापैकी शंभर तरी सेट आता कोणी खरेदी करून उपकार न करतील तर माझा एवढा मोठा धंदा व्यर्थ होणेचा संभव आहे.

**( ११ ) मोतिलाल घोस यांचे टिळकांना पत्र**

कलकत्ता ४ डिसेंबर १९१६

या तुमच्या राष्ट्रीय सभेच्या भांडणात मला म्हाताऱ्याला पडून काय करावयाचे? मी त्यात पडतो तो केवळ तुमच्याकरिता. कॉंग्रेस तुम्हाला बाहेर टेवील तर मला तिच्याशी काहीच कर्तव्य नाही. तुम्हा सर्व लोकांना रा. सभेला येथून प्रतिनिधी म्हणून आम्ही निवडू शकतो. पण तुम्ही म्हणता की ते ठीक दिसत नाही. हे तुमचे म्हणणे बरोबर आहे असे मलाहि वाटते. तुमच्या सूचना व घटनेच्या १८ व्या कलमाचा तुम्ही केलेला अर्थ मी भूपेंद्रबाबूंना दाखवितो. सुरेंद्र-बाबूंशी बोलण्यात मात्र अर्थ नाही. ते सर्वस्वी मेथा व गोखले यांच्या मताचे आहेत. बेझंटबाईंना मी काल पत्र लिहिले. ते त्या मद्रासेहून पुण्यास निघण्यापूर्वी पोचावे. यंदा पुरती प्रतिनिधींची निवडणूक जुन्या पद्धतीने मान्य करावयाची झाल्यास ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीला अधिकार आहे असे तुम्ही लिहिले. ते व तुमचा मसुदा मी बाईंकडे पाठविला आहे. मेथा व वाच्छा यांना संयुक्त राष्ट्रीय सभा मुळीच नको. गोखल्यांना मनातून हवी पण ते त्या दोघांना भितात तेव्हा बेझंटबाईंनी करूनच काही झाले तर होईल. सर सुब्रह्मण्य अय्यर थोडे वळलेले दिसतात. बाईंशी काय वाटाघाट पुण्यास होईल ते कळवा. त्यानंतर कलकत्त्यास येण्याचा त्यांचा विचार दिसतो. तसे झाले तर उत्तमच.

# भाग ३ रा

## [ १९१७ ते १९१८ ]

## ( १ ) लखनौ काँग्रेसनंतरचा दौरा

होमरूल स्पेशल लखनौपर्यंत जावयाची होती. म्हणून टिळकाना जाताना कानपुरास मुक्काम करिता आला नाही तो त्याना येताना करावा लागला. तारिख १ जानेवारी रोजी लखनौहून निघण्याचा व कानपुरास मुक्काम करण्याचा बेत नक्की पण अवचित ठरला. कानपूरची मंडळी टिळकाना घेऊन जाण्याकरिता छेदिलालच्या धर्मशाळेत धरणेच घेऊन बसलेली होती. आणि होता होता बेत एकदाचा ठरला. तो ठरताच या मंडळीनी कानपूरला तारा केल्या. पहिल्या तारा पोचून त्यामागून टिळक पोचण्यास अवघा २–३ तासांचा अवकाश होता. पण तेवढ्यातल्या तेवढ्यात कानपूरच्या लोकानी रस्ते व बाजार शृंगारून टाकला. एका स्वयंसेवकाने गळ्यात ताशा अडकविला व सर्व शहरभर तो तोंडाने दौंडी पिटीत धावत गेला. टिळक कानपूर स्टेशनवर सकाळी ११ वाजता पोचले. अर्थात स्टेशनवर खूपच गर्दी झाली होती व रीतीप्रमाणे गाडीचे घोडे सोडून मोठी मिरवणूक निघाली. वाटेत आर्त्या धुपार्त्या पानसुपाऱ्या होतच होत्या. मिरवणूकीचे विसर्जन रेल बाजारातील शेट संतोषचंद यांचे बंगल्यावर झाले. कारण तेथेच टिळकांच्या मुक्कामाची जागा ठरलेली होती. सायंकाळी ५॥ वाजता परेड ग्राऊंडवर उघड्या जागी व्याख्यानाची योजना केली होती. मध्यभागी एक मोठे व्यासपीठ उभारले होते. टिळकांच्या बरोबरची काही मंडळी दादासाहेब करंदीकर नामदार बेळवी वगैरे टिळकांच्या आधी सभेला गेली. तो चमत्कार असा झाला की दादासाहेब करंदीकर यांच्या डोक्यावरचे दक्षिणी पागोटे पाहून हेच टिळक आले असे समजून त्यानी करंदीकरांच्या पाया पडण्याला सुरवात केली. दादासाहेब तोंडाने व हाताने ‘ अहो मी टिळक नव्हे ’ असे सांगण्याची पराकाष्ठा करीत होते. पण त्या गर्दीत त्यांचे कोण ऐकतो ? आणि पाठोपाठ जेव्हा टिळक आले व त्यांच्याबरोबर कानपूरची पुढारी मंडळी आली तेव्हाच दादासाहेब करंदीकरांच्या वरचा टिळक असल्याचा मिथ्या आरोप निघून गेला व पाया पडून घेण्याची त्यांची दगदग वाचली. त्यावेळी ना. बेळवी त्याना हळूच म्हणाले “ पहा या उत्तर हिंदुस्थानात पागोटे घालण्याचा अधिकार फक्त टिळकाना दिला आहे. त्या अधिकाराचे तुम्ही अतिक्रमण केलेत म्हणून ही तुम्हाला सन्मानाची शिक्षा सोसावी लागली. यापुढे तरी सावधगिरी ठेवा. ”

टिळक व दादासाहेब खापर्डे सभेत आल्यावर रायबहादूर विश्वंभरनाथ यांची अध्यक्षाचे जागी योजना झाली. हे गृहस्थ बरेच वृद्ध असून वायव्य प्रांता-

पैकी ते एक अत्यंत सन्माननीय असे पुढारी होते. प्रारंभी टिळकाना दिलेले संस्कृत भाषेतील मानपत्र वाचून दाखवून अर्पण करण्यात आले. नंतर टिळकानी इंग्रजीत भाषण केले. ही भाषा न समजणारे हजारो लोक श्रोतृवृंदात होते. पण स्वतः टिळकच बोलत आहेत व त्यांचाच आवाज आपण ऐकत आहो एवढ्या समाधानांत गर्क होऊन ते तासभर अगदी निमूटपणे बसले होते. टिळक आपल्या भाषणात म्हणाले "राष्ट्रीय सभेच्या ३० वर्षांच्या अनुभवाने आपण स्वराज्य मागण्याला शिकलो. ही मागणी मनाने व अनुभवाने श्रेष्ठ अशा पुरुषानी निश्चित केली आहे. हिंदी लोक स्वराज्याला पात्र नाहीत असे आक्षेप घेतात. पण ते स्वराज्याची मागणी करण्याला पात्र आहेत ही गोष्ट येथील प्रचंड जनसमूहावरूनच सिद्ध होत नाही काय? हिंदु समाजाला शास्त्रातील चातुर्वर्ण्य मान्य आहे पण ती अनुवंशीक नाही. गुण व कर्म यांच्या योगानेच ते सिद्ध होतात. पण इंग्रजी राज्यामुळे हे चातुर्वर्ण्यहि नष्ट झाले. कारण देशात क्षत्रिय कर्मच शिल्लक उरले नाही. क्षत्रिय कर्माप्रमाणे वैश्यकर्महि राज्यकर्त्यांनी आपणाकडेच घेतले आहे. ब्राह्मणानी सुद्धा बुद्धीचा अभिमान टाकला पाहिजे. कारण वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या जागेवर परदेशी लोकच सरकार आणते. अशा रीतीने हिंदुस्थानातील मनुष्ये शिल्लक राहिली. पण गुणकर्माचा लोप सरकारमुळे झाला. स्वराज्याची मागणीहि गुणकर्मविशिष्ट चातुर्वर्ण्याच्या परिस्थितीपैकीच एक मागणी होय. आम्हाला साम्राज्यात मुले म्हणून राहता आले तरच आम्हाला साम्राज्य पाहिजे. आम्हाला साम्राज्याचे नोकर भारवाहक असे राहावयाचे नाही. मेंढ्याच्या कळपात वाढलेल्या वाघाच्या पिल्लाला पाण्यात प्रतिबिंब दिसताच आपल्या स्वरूपाची ओळख पटली. हिंदी लोकानाहि वसाहतीचे साम्राज्य पाहून आपले खरे स्वरूप कळून येऊ लागले आहे. जपानी लोकहि आशियाखंडात राहणारेच होत. त्याना स्वराज्य असावे आणि आम्हाला का नसावे? शेवटी ज्या लोकाना इतर काही प्रयत्न करिता येत नसेल त्यानी निदान स्वराज्यप्राप्तीकरिता ईश्वराजवळ प्रार्थना करीत जावे" असा उपदेश करून टिळकानी आपले भाषण संपविले.

तारिख २ रोजी कानपुराहून बाकीची मंडळी परत दक्षिणेत आली. पण टिळक दादासाहेब खापर्डे वासुदेवराव जोशी एवढेच कलकत्त्याकडे निघून गेले. कलकत्त्यास जाण्याचे कारण अमृत बझारपत्रिकेचे संपादक मोतीलाल घोष यांचे निमंत्रण होय. मोतीलाल बाबू अतिशय वृद्ध झालेले असून त्याना लखनौ येथील राष्ट्रीय सभेस येता आले नाही. टिळक सुटून आल्यानंतर मोतीबाबूनी लिहिलेल्या प्रत्येक पत्रात "मी आता वृद्ध झालो. मरणाचे दारी बसलो आहे. तुमची आमची यापुढे भेट होणे कठीण दिसते" या मजकुराचे पालुपद असावयाचेच. पण टिळक थट्टेने म्हणत "हा म्हातारा आज अनेक वर्षे असेच म्हणत आला आहे. तो इतक्यात खचित मरत नाही. त्याची प्रकृति खारकेसारखी आहे" लखनौ येथे मोतीबाबूंची गाठ सहजासहजी पडेल असे म्हणून कलकत्त्यास

जाण्याचा प्रसंग त्याचे आधी टिळकानी टाळला होता. पण मोतीबाबू जेव्हा लखनौस आले नाहीत असे पाहिले तेव्हा टिळकानी कलकत्त्यास जाण्याचा निश्चय केला. कलकत्त्यास टिळकांचा मुक्काम मोतीबाबूंच्या घरीच होता. टिळक दिसताच मोतीबाबूंनी कडकडून कसे आलिंगन दिले असेल याची परिचित लोकाना कल्पना येईल. सहा सात वर्षांच्या गोष्टी त्या बोलता बोलून संपणाऱ्या नव्हत्या. पण टिळकाना या प्रसंगी कलकत्त्यास फार दिवस राहता आले नाही. तारीख ५ रोजी कलकत्ता येथील महाराष्ट्रक्लबाची पानसुपारी घेऊन ते नागपूरकडे परत निघाले. आणि स्टेशनवर जमलेल्या मंडळीना मी पुन्हा येथे येईन असे आश्वासन देऊन टिळकाना आपली सुटका करून घ्यावी लागली. वाटेत एक दोन स्टेशन-वर सत्कारसमारंभ मोठा झाला. तारीख ६ रोजी दुपारी ते नागपुरास पोंचले. मोटारी व घोड्याच्या गाड्या तयार होत्या. मिरवणूक बिसापूरेतून इतवारीच्या वाटेने—वरून नारायणराव वैद्य वकील व स्वराज्यसंघ शाखेचे चिटणीस यांच्या घरापर्यंत आल्यावर थांबली. दोन प्रहरचे स्नान भोजन तेथेच झाल्यावर संध्या-काळचा मुक्काम श्रीगोपाळरावसाहेब बुटी यांच्या वाड्यात झाला. पुढे दोन दिवस नागपूर शहर सिताबर्डी व सतारी या तिन्ही ठिकाणी अनेक खाजगी गृहस्थांच्या घरी व सार्वजनिक संस्थातर्फे पानसुपाऱ्या झाल्या. त्यापैकी महार मंडळी कोष्टी मंडळी, सोन्या चांदीचे व्यापारी वगैरेंच्या पानसुपाऱ्या विशेष स्मरणीय होत्या. रविवारी सायंकाळी चिटणीस पार्कमध्ये जाहीर सभा झाली. सभेला सर बिपिन कृष्ण बोस डॉ. गौर रा. ब. पंडित नामदार दिक्षीत वगैरे नेमस्त व स्वतंत्र पक्षाची मंडळीहि आली होती. मजूर गिरणीवाले यांची तर खूपच गर्दी लोटली होती. अध्यक्षस्थानी डॉ. गौर यांची योजना झाल्यावर कवि ताम्हणकर यानी स्वतः केलेली काही पदे म्हणून दाखविली. टिळकानी आपल्या भाषणात सांगि-तले की "दगडाला देवपण देणे यात पुजाऱ्याची उदार भावना असते. पण दग-डाला काही एक मर्यादेपर्यंत देव म्हणावे लागते. 'यान्ति देवव्रता देवान्' हे दगडी देवाला उद्देशून म्हटलेले नाही. अर्थात् स्वतःच दगड बनावयाचे नसेल तर मुख्य कार्यावर दृष्टि ठेवा. आज दहा वर्षात नागपूरमध्ये फारच फरक पडला आहे. पूर्वी एकी नव्हती ती आज उदित झाली आहे. हिंदुमुसलमान एकमुखाने स्वराज्याची मागणी करितात हे पाहून अँग्लो इंडिअन वर्तमानपत्रांचे धाबे दणा-णले आहे. लॉर्ड सिडनहॅम सारख्यानी पुढे येऊन स्वकीयाना स्पष्ट इशाराहि दिला की राणीचा जाहीरनामा फुकट आहे. बादशाही आश्वासने फोल आहेत. दिले एवढे पुष्कळ झाले. आता आणखी मागू नका असे सरकारने एकदम हिंदी लोकाना सांगून टाकावे. पण उलट तुम्हालाहि अशी चळवळ करण्याला तयार झाले पाहिजे. पण चळवळ म्हणजे काही व्यापार नाही किंवा पुराणपठण नाही. त्याकरिता कष्ट करण्याला तयार झाले पाहिजे. परमेश्वर हा प्रयत्नान्ती असतो याचान्ती नसतो." दुसरे दिवशी मोरोपंत अभ्यंकर यांचे घरी टिळकाना थाटाची

मेजवानी झाली व तेथूनच मंडळी स्टेशनवर गेली. कर्मधर्मसंयोगाने टिळक जाणार त्याच गाडीला चीफ सेक्रेटरी नामदार स्लोकॉक आले होते. त्याना टिळकांच्याकरिता जमलेल्या गर्दीमधून स्टेशनाच्या बाहेर पडणेहि मुष्किलीचे झाले. आणि टिळकांच्या सत्काराचा हा समारंभ उभे राहून डोळ्यानी पाहण्याची आपत्ति त्यावर आली. दादासाहेब खापर्डे नागपुरासच मागे राहिले. आणि श्री. माधवरावजी अणे व अण्णासाहेब बापट हे त्याना घेऊन यवतमाळकडे रवाना झाले. ठिकठिकाणी वाटेतील स्टेशनवर पानसुपाऱ्या होतच होत्या. तारीख ८ रोजी सायंकाळी टिळक धामणगांव स्टेशनला पोचले. यवतमाळकडे टिळकांची १०–१२ वर्षानी ही दुसरी फेरी होती. धामणगावच्या व्यापारी मंडळीनी काही वेळ ठेऊन घेऊन सत्कार केल्यावर टिळक यवतमाळकडे निघाले. गावच्या शिवेपाशी हजारो लोकानी मोटारीला अडविले. तेथेहि जवळच्या भिकाजीपंत शेवडे यांच्या कपाशीच्या कारखान्यात धूळभेटीचा समारंभ झाल्यावर रात्र पडल्यावर दुतर्फा चिरागणातून मिरवणूक गावात गेली. पौर्णिमा असताहि लोकानी दिपोत्सवाची हौस पुरवून घेतली. यवतमाळ येथे टिळकांचा मुक्काम त्यांचे लहानपणचे स्नेही अण्णासाहेब बापट वकील यांचे बंगल्यावर होता. दुसरे दिवशी दोन प्रहरी इजारदार ॲसोसिएशनच्या दिवाणखान्यात व जिल्हासभेच्या दिवाणखान्यात पानसुपाऱ्या झाल्या. वकील लोकांच्या कारकूनानीहि एक वेगळीच पानसुपारी केली. सायंकाळी गणपतिमंदिराच्या समोरील पटांगणात व्याख्यान झाले. कमानी झेंडे माळा वगैरेनी मैदान शृंगारलेले होते. अध्यक्षस्थानी अण्णासाहेब बापट यांची योजना झाल्यावर सोनेगे शाईने लिहिलेले मानपत्र वाचून दाखविण्यात आले.

यवतमाळहून कारंजाच्या मार्गाने टिळक अकोल्याकडे गेले. वाटेत लाडखेड बोरी दारव्हा वगैरे ठिकाणी सत्कार झाला. दारव्हेकरानी गाडी थांबण्याच्या वेळेतच मानपत्राचा समारंभ उरकून घेतला. कारंजाच्या स्टेशनावर हजारो लोक जमले होते. घुड व दहिहंडेकर वगैरे पुढाऱ्यानी समारंभाकरिता फारच मेहनत घेतली. आणि हा सर्व समारंभ अवघ्या ५–१० मिनिटांच्या मुक्कामाकरिता. रेल्वे स्टेशनचा प्लॅटफॉर्म हा काही व्याख्यानाचा प्लॅटफॉर्म नव्हे. तरीपण त्या नात्याने त्याचा उपयोग करणे टिळकाना भाग पडले. पण व्याख्यानात आगगाडीच्या उपमा टिळकाना सहजच सुचल्या. ते म्हणाले "मुंबईचे तिकिट काढले म्हणजे ज्याप्रमाणे मधल्या सर्व स्टेशनांचे तिकिट काढल्यासारखेच होते त्याप्रमाणे स्वराज्याचे तिकिट काढले म्हणजे दरम्यानच्या सर्व राजकीय मागण्यांची स्टेशने गाठल्याचे श्रेय येते." नंतर विलेगाव व किनखेड यावरून टिळक सायंकाळी मूर्तिजापूर येथे आले. येथे मंडळीनी पालखीची तयारी ठेवली होती. पण टिळकानी ती गोष्ट मना केल्यामुळे इतर ठिकाणाप्रमाणे मिरवणूक निघाली. स्वराज्याची मागणी योग्य का हे व्याख्यानात सांगताना टिळक म्हणाले "आजवर खिडक्यातून

घरात शिरण्याचे प्रयत्न आम्ही केले. पण प्रत्येक खिडकीला काच. तेव्हा १०–२० खिडक्या फोडण्याचा खटाटोप करण्यापेक्षा एकदम दरवाजावरच हल्ला केलेला बरा. पाने तोडून झाड कबजात येत नसते. त्याचा बुंधा काढावा लागतो. व वेळी मुळ्यानाहि हात घालावा लागतो." अकोलेकरांचा उत्साह तरी अवर्णनीयच. स्टेशनवर अण्णासाहेब महाजनी रा. ब. दामले वगैरे परपक्षातील मंडळीहि सत्काराला हजर होती. बरोबर महाजनींना घेऊन टिळक गाडीत बसून किटसनच्या दिव्यांच्या रांकेतून मुक्कामाला पोचले. अकोल्यास पाण्याची ओरड. पण वनवासात दूधभात मिळावा त्याप्रमाणे या मुक्कामात टिळकाना तेथील बोटिंग-क्लबच्या होडीतून फिरावयास मिळाले. टिळक डेक्कन कॉलेजमध्ये होते तेव्हा बोटिंग क्लबची चैन नव्हती. फक्त पोहण्याला नदी होती. ही गोष्ट आटवून टिळक म्हणाले "माझ्या वेळी कॉलेजात बोटिंग क्लब असता तर आज मी तुमच्यावरोबर वल्ही मारून दाखविली असती." येथील मुक्कामात तेलाचे कारखाने गिरण्या वगैरे पाहून झाल्यावर तारीख १२ रोजी अकोला येथील वकील व दादासाहेब खापर्ड्यांचे जिवलग स्नेही व्यंकटराव देसाई यांचे घरी पानसुपारी झाली. 'होमरूल लीग' करिता लोकानी दोन अडीचशे रुपये वर्गणी दिली. सायंकाळी शेट रामरतन यांची पानसुपारी घेतल्यावर टिळक आगगाडीत चढले. आणि आगगाडीत निलंब मलकापूर वगैरे स्टेशनवर मंडळींच्या गाठी घेऊन पुण्याकडे परत आले. टिळक अकोल्याला यापूर्वी १९०८ साली म्हणजे सुरतेच्या राष्ट्रीय सभेनंतर गेले होते. त्या गोष्टीची आठवण होऊन त्यानी या खेपेस अकोल्याच्या लोकाना असे सांगितले की "सुरतेस उत्पन्न झालेला गैरसमज सर्वांचाहि आता निघून गेला. फक्त सरकारचा मात्र गैरसमज अजून गेला नाही त्यामुळे सहा वर्षांत तुमची गाठ घेता आली नाही. सरकार देखील स्वराज्य देऊ म्हणते. ती मागणीहि आता कायदेशीर ठरली आहे. पण सरकारचे म्हणणे असे 'स्वराज्य मागा. पण मागताना भाषा मात्र मोजकी वापरली पाहिजे.' मनुष्याला फळ खावयाला द्यावयाचे. पण बजावावयाचे की दातहि न लावता फळ खा. शेक्सपिअरच्या 'मर्चंट ऑफ व्हेनिस' नाटकातील न्यायमूर्तीनी शायलॉकला कराराप्रमाणे एक अच्छेरभर मास त्याच्या कर्जदाराच्या काळजातील देऊ केले. पण सांगितले की 'कराराने मास देण्याची शपत होती रक्त देण्याची नव्हती. तेव्हा रक्ताचा एकहि थेंब न सांडता आपले मास काढून घ्या.' याच रीतीने आम्ही सरकारचे मन दुखवेल असा एकहि शब्द न बोलता स्वराज्य मागावयाचे. अकोल्याच्या मुक्कामात तारीख १२ रोजी एकाने सयमक वर्णन केल्याप्रमाणे सोवळे सरकारी नोकर व कोवळे शाळेतील विद्यार्थी यांचेकरिता जोगळेकर यांच्या मळ्यात टिळकांचे गीतारहस्यावर प्रवचन झाले. त्यात त्यानी मुख्य विषय हा सांगितला की ज्ञान्याने आपली कसोटी व्यवहार करून दाखविली पाहिजे. नुसत्या ज्ञानाच्या बडबडीने त्याची परिक्षा पास होत नाही. ते म्हणाले "चाकू

*उत्तम कोणता ? नुसते लोणी कापले तर तो कनिष्ठ. पेन्सिल करील तर तो मध्यम व पैसा तोडील तर तो उत्तम. ज्ञानाचेहि असेच आहे "* नागपूर वऱ्हाड प्रांतातील या दौऱ्याला उद्देशून नागपूरच्या महाराष्ट्र पत्राने असे लिहिले की " टिळकांच्या शब्दाकरिता काय वाटेल ते करू असे म्हणणारे व त्याप्रमाणे खरोखर करतील असे लोक आमच्या ह्या प्रांतात खचित सांपडतील. " तुरुंगातून सुटून आल्यावर या प्रांताला टिळकानी भेट देऊन राजकारण गीताधर्म शिकविला व त्यामुळे ताम्हणकर कवीने म्हटल्याप्रमाणे " कर्मयोग शिकवाया की हा स्वयें कृष्ण आला । रामदास की पुन्हा पातला असा भास झाला. "

ता. २८ जानेवारी रोजी टिळकांच्या वाड्यांत स्वराज्यसंघाची सभा भरली. तीत तोपर्यंतच्या कामाचा अहवाल वाचून दाखविला. त्यावरून असे दिसून आले की या संघाच्या सहा शाखा स्थापन झाल्या. तीनहजाराहून अधिक सभासद झाले आणि वर्गणी व देणगी मिळून सुमारे सात हजारांची रक्कम जमली. पुढील काम करण्याकरिता प्रचारक नेमावे व अर्ज तयार करवून विलायतेस संघाचे शिष्टमंडळ पाठविण्याकरिता आणखी वर्गणी गोळा करावी असेहि ठरले. ता. २९ रोजी टिळकांच्या अध्यक्षतेखाली किर्लोस्कर थिएटरात माधवरावजी अणे यांचे व्याख्यान झाले. तीत त्यानी सांगितले की "दर दहा वर्षांनी आपल्या आकांक्षेचे पाऊल पुढे पडत आहे व त्याप्रमाणे उद्योगहि वाढत आहे. साम्राज्याच्या गर्भाशयात समाविष्ट झालेल्या वसाहती बाहेर पडून खेळू बागडू लागल्या आहेत. तसेच आपणहि करावे असे हिंदुस्थानाला वाटू लागले आहे. पूर्वी बळीराजाने विश्वजित यज्ञ करून दानाचा संकल्प सोडला तेव्हा बटु वामन त्रिपादभूमि मागण्याकरिता तेथे गेला. त्याप्रमाणे क्षात्रदीक्षा घेऊन आरंभिलेल्या युद्धाचा यज्ञ संपवून इंग्लंड हे दानाला सिद्ध होईल तेव्हा हिंदुस्थानच्या बटुवामनानेहि त्रिपादभूमि मागण्याकरिता उपस्थित झाले पाहिजे. त्या दानप्रसंगी शुक्राचार्य आडवे आले. तेव्हा त्यांची जी गत झाली तशीच मॅस्टन मॅरिस कटॉस व इतर लोक आमच्या आड येत आहेत त्यांचीहि होईल. बळीने वामनाला त्रिपादभूमि देताना पाताळातील आपल्या राज्याचे रक्षण करण्याचे अभिवचन त्यांजकडून घेतले त्याप्रमाणे आम्हाला स्वराज्य मिळेल तर आम्हीहि साम्राज्याचे रक्षण करण्यास तयार आहो अशी जामिनकी आमच्या पुरती देऊ. "

तिकडे मद्रासेस बेझंटबाईना सरकारचा विरोध वाढत होता. त्याना मुंबई इलाख्यात येण्याची बंदी झाली होती. तशीच मध्यप्रांतातहि जाण्याची झाली. त्यांचे शिष्य वाडिया यांच्याहि भाषणाला मनाई झाली. तेव्हा त्यानी आपले भाषण छापून प्रसिद्ध करण्याचे ठरविले. पण त्यालाहि मनाई झाली.

१९१७ च्या फेब्रुवारी महिन्यात टिळकांचे एक परमस्नेही पुण्याचे डॉ. अण्णासाहेब पटवर्धन हे वारले. त्यांची लोकप्रियता अलोट असल्याकारणाने त्यांच्या स्मशानयात्रेचा समारंभ अपूर्व झाला. व त्यांच्या भक्तांनी मुठानदीच्या

पात्रात दहनभूमीवर त्यांच्या समाधीदाखल एक देऊळ उभारले व त्यांचा वार्षिक पुण्यतिथीचा समारंभ पुण्यास दरसाल होत असतो. अण्णासाहेब पटवर्धनांचे चरित्र अनेक दृष्टीनी बोधप्रद आहे. या चरित्राचा प्रारंभ तेजस्वी प्रवृत्तिमार्गात आणि शेवट निवृत्तिमार्गात झाला. पूर्ववयांत हाती घेतलेले अचाट उद्योग फसल्यामुळे ते निराश झाले. निराशेचे परिणाम जगात सर्वांवर सारखेच होत नाहीत. कित्येकांच्या मनोरचनेत दैववादित्व हे कमानीतील मुख्य म्हणजे चावीच्या दगडाप्रमाणे गुंतलेले असते आणि त्याला धक्का बसल्याबरोबर त्यांचा प्रवृत्तिमार्ग ढासळून कोसळून पडतो आणि ते निवृत्तिमार्गी बनतात. पुढेहि त्यानी देशभक्ति व राजकारणाची चौकशी कायम ठेवली होती. परंतु प्रत्यक्ष उद्योगात ते पडत नसत. धार्मिक कर्मकांड त्यानी पुढे स्वीकारल्यामुळे राजकारणाचे कर्मकांड त्याना झेपेनासे झाले. म्हणून ते राजकीय पुढारी बनले नाहीत. कर्मकांड अप्रिय वाटल्यामुळे अस्सल परमार्थ ज्ञानी देखील लोकांच्या समजुतीने पण अन्यायाने नास्तिकांच्या सदरात ढकलले जातात. त्याचप्रमाणे अस्सल स्वदेशाभिमानी लोकहि राजकीय कर्मकांड अप्रिय झाल्यामुळे कर्त्या मुत्सद्यांच्या सदरातून वगळले जातात. धार्मिक आचारात अदृश्य झालेली स्वदेशभक्ति आणि देशभक्तीच्या नित्यउपासनाविधीत अदृश्य झालेली धर्मश्रद्धा या दोन्ही गोष्टी सूक्ष्मभेदी प्रेक्षकाला मात्र दिसतात. दैवगतीचा बांध आडवा आल्यामुळे अण्णासाहेबांचे चरित्र अपेक्षेहून फार वेगळे झाले. घाटमाथ्यावर पुष्कळ ठिकाणे अशी दाखविता येतात की जेथे एका अंगुलीच्या अंतराने पडलेले निम्मे पाणी शेवटी पूर्वसमुद्राला तर निम्मे शेवटी पश्चिमसमुद्राला जाऊन मिळालेले असते. क्रियात्मक राजकारण व क्रियात्मक परमार्थ यांचीहि गोष्ट अशीच आहे. अण्णासाहेबांच्या विषयी टिळक असे म्हणत की हा या काळचा पुरुष नव्हेच. जुना ऐतिहासिक काळच त्याना योग्य होता. हिंदुस्थान हे इंग्लंड असते तर माधवराव रानडे हे ग्लॅडस्टन होऊ शकते हे जितके खरे आहे तितकेच ही दुसरी गोष्ट खरी आहे की पुणे जुन्या काळचे पॅरिस असते तर अण्णासाहेब पटवर्धन हे कार्डिनल रिचल्यो झाले असते. किंवा पुणे जर जुने विजयनगर असते तर अण्णासाहेब विद्यारण्य किंवा माधवाचार्य झाले असते.

## ( २ ) लष्कर भरतीचा उपदेश

१९१७ च्या फेब्रुवारी महिन्यात ता. १७ रोजी पुण्यास एक विशेष ध्यानात ठेवण्यासारखी जाहीर सभा भरली. हिंदी लोकाना स्वयंसैनिक होण्याचे हक्क दिल्याबद्दल सरकारचे अभिनंदन करणे हा सभेचा हेतू होता. प्रि. रघुनाथराव परांजपे यांना अध्यक्ष नेमले होते. ते प्रास्ताविक भाषणात म्हणाले "अँग्लो इंडियन युरोपिअन नेटिव्ह ख्रिश्चन पारशी आणि निजामशाहीतील वऱ्हाड याना स्वयंसैनिक होण्याचे हक्क होते. हिंदु लोक मात्र त्यातून वगळले गेले होते. हिंदु लोकाना अलीकडे लष्करी शिक्षण मिळत नसले तरी त्यांचे क्षात्रतेज शिल्लक आहे. युद्धावरून ही गोष्ट

कळून आली आहे की अमुकच जात शिपायीपणाला योग्य या म्हणण्यात अर्थ नाही. सर्व हिंदी लोकाना लष्करी शिक्षण मिळेल तर साम्राज्यांतर्गत हिंदुस्थानाकडे डोळा उघडून बघण्याची कोणाची छाती होणार नाही. हल्ली हे द्वार सरकारने मोकळे केले आहे तेव्हा हिंदी तरुणानीहि त्याचा फायदा अवश्य घ्यावा." मुख्य ठराव मांडताना टिळक म्हणाले की "राष्ट्रीय सभा सुरू झाल्यापासून आपण ही मागणी एकसारखी करू लागलो आहो. हिंदुस्थानावर परचक्र आले तर जपानची मदत घेण्याला इंग्लंड तयार पण हिंदुस्थानच्या लोकाना शिकवून तयार करून त्यांचे सैन्य सिद्ध करण्यास इंग्लंड तयार नाही. ता. २१ फेब्रुवारी रोजी कायद्यात दुरुस्ती होऊन हिंदी लोकाना हा नवा हक्क मिळणार आहे. म्हणून हिंदी तरुणानी या संधीचा फायदा अवश्य घ्यावा. स्वराज्याचे हक्क मागण्याला आम्ही तयार होताना लष्करी देशसेवेचा हक्कहि आपण मागून घेण्याला व बजावण्याला तयार असले पाहिजे. स्वयंसैनिक होण्याविषयी फारशा अटी आपण प्रथम घालून चालणार नाहीत. अशा कामी म्हणजे लष्करी शिक्षण संपादन करण्यात हिंदी तरुणांचे काही दिवस गेले तरी ते फुकट गेले असे मानू नये. आम्ही आपल्या इच्छेने स्वयंसैनिक न झालो आणि उद्या सरकारने सक्तीचा कायदा केला तर आम्ही लष्करात दाखल होऊच की नाही ? आज युद्धापुरते हे हक्क दिले तरी पुढेहि ते कायम होणे हे आमच्यावरच अवलंबून आहे. महाराष्ट्र कर्नाटकात वीस हजार स्वयंसैनिक मिळण्याला अडचण पडू नये." या ठरावाला अनुमोदन देताना शिवरामपंत परांजपे म्हणाले की "लोकांची हत्यारे काढून घेण्याची दृष्टी बदलून ती पुनः काही आमच्या हाती देऊन युद्धकला शिकविण्याचे सरकारने मनात आणले आहे. इतर काही गोष्टी असल्या तरी कोणत्याहि प्रकारचे किल्मिष मनात न धरता मातृभूमीच्या संरक्षणार्थ सैनिक होण्याचे पवित्र कर्तव्य आपण पार पाडले पाहिजे." हीच गोष्ट लोकांच्या मनावर आणखीहि पटविण्याकरिता स्वतः टिळकानी ता. २७ फेब्रुवारीच्या केसरीत मुद्दाम एक अग्रलेख लिहिला. त्याचे अवतरण असे होते.

> यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वारमपावृतम्
> सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभंते युद्धमीदृशम्

या लेखात ते म्हणतात "परतंत्र हिंदुस्थानातहि युद्धाने जागृति झाली आहे. बंडाच्या भितीमुळे सरकारने आजवर हिंदी लोक लष्करी शिक्षणातून वगळले. पण सरकार दुसऱ्यावर नेहमीच भिस्त किती ठेवणार ? म्हणून हिंदुस्थानचे रक्षण हिंदी लोकाकडूनच करवावे अशी बुद्धी कालाच्या ओघाने का होईना सरकाराला झाली आहे. लष्करी अधिकाराला जागा मिळत नाहीत म्हणून सैन्यात शिरण्याला हुरूप वाटत नाही हे खरे. पण यामुळे कर्तव्यपराङ्मुख होणे योग्य नाही. हा दोष सुधारण्याकरिता आम्ही सरकाराकडे मागणी करण्याला तयार

आहो. पण रुसून बसण्याची मात्र ही वेळ नव्हे. सुशिक्षित वर्गाने अडून बसू नये कारण आपल्या आकांक्षा आज नाही उद्या पूर्ण होतील. सर्व गोष्टी एकदम मनासारख्या होत नसतात. लष्करात आपण शिरलो तर या जागा अधिक हक्काने मागता येतील. देशाचे संरक्षण करण्याला जर आपण तयार नाही तर स्वराज्याच्या नुसत्या गप्पा ठोकून काय उपयोग ? सरकारला आज सैन्याची जरूरी आहे हे खरे पण हे उघडलेले दार त्याना पुढेहि मोकळे ठेवावेच लागेल."

टिळक अशा रीतीने लोकाना उपदेश करीत असता सरकार मात्र त्याना अधिकाधिक प्रतिबंध घालीत होते. टिळक हालचाल करू लागले असे पाहून बेझन्टबाईप्रमाणे त्याना पंजाबात जाण्याची बंदी करण्यात आली. लखनौच्या राष्ट्रीय सभेनंतर टिळकानी जे दौरे काढले त्याचा सरकारला विषाद वाटला. ता. १३ फेब्रुवारी रोजी डिफेन्स ऑफ इंडिया अॅक्टाखाली हुकूम काढून पंजाब सरकारने असे जाहीर केले की "पुण्याचे चित्पावन ब्राह्मण टिळक यांचा पंजाबात येण्याचा आणि सार्वजनिक सुरक्षिततेस धोका येईल अशा रीतीने वागण्याचा इरादा आहे असे समजते. तरी त्यानी पंजाबात पाऊल टेवू नये. तसे केल्यास तीन वर्षांची कैद व दंड याना ते पात्र होतील." वास्तविक पंजाबात जाण्याचे हल्ली टिळकाना कारण नव्हते किंवा उद्देशहि नव्हता. पण कर्मधर्मसंयोगाने ज्या दिवशी सैन्यात शिरण्याचा उपदेश ते लोकाना जाहीर सभेत करीत होते त्याच दिवशी अशा प्रकारची नोटीस त्याना लावण्यात आली ! या गोष्टीने सरकारचे किती हसू झाले असेल हे सांगावयास नकोच. पुढच्याच आठवड्यात दिल्लीला जाण्याची मनाई टिळकाना करण्यात आली. त्यात नंतर टिळक दिल्लीस येऊन गेले अशी खोटीच गोष्ट लिहिली होती. शिवाय असे हुकुमावर हुकूम काढल्याने सैन्यात शिरण्याचा जो उपदेश टिळक करीत होते त्यावर थंड पाणी ओतल्यासारखे होणार होते. पण सरकार गोंधळून गेले होते आणि त्याच्या कृतीत काही मेळ राहिला नव्हता. इकडे लष्करभरतीचा जुलूम अधिकाऱ्यानी सुरू केला होता. त्यामुळे लोक असंतुष्ट होत होते. आणि इकडे टिळक आपण होऊन लोकाना खुषीने लष्करात शिरा असेसांगत होते. त्यांच्यावर नोटिसा बजावण्यात येत होत्या. पण टिळकानी हे काम थांबविले नाही. ता. २ मार्च रोजी मुंबईस शांतारामाच्या चाळीच्या पटांगणात फार मोठी सभा भरली तिला टिळक गेले व अध्यक्ष झाले. सभेत गांधी यांचा सैन्यात शिरण्याविषयीचा संदेश वाचून दाखविण्यात आला. पूर्वीच्या आठवड्यात कौन्सिलात लष्करी शिक्षणाचे बिल निघाले तेव्हा भारत सेनापतीनी मोठेसे उत्तेजनपर भाषण केले नव्हते. "तथापि थोडी मिळालेली संधी आपण दवडू नये लष्करात राबावे लागते. तरी त्यात व्यक्तीचे व राष्ट्राचे हितच आहे. लष्करी शिक्षण घेतलेले लोक राष्ट्रात वावरू लागतील तर सरकारच्या मनावर त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. होमरूल व लष्करी अधिकाराच्या जागा पुढे तरी मिळाव्या अशी आकांक्षा असेल तर आजच सैन्यात शिरा" असे टिळकानी सांगि-

तले. सभेत मनमोहनदास रामजी खाडिलकर हॉर्निमन वगैरे लोकांची याच अर्थाची भाषणे झाली. खाडिलकर हे म्हणाले की रणांगणावर घालिवलेला काळ अंत:करणाची निर्मलता उत्पन्न करतो. तेव्हा होमरूलवाल्यानी समाजसुधारकानी व धार्मिकसांप्रदायिकानीहि सैन्यात शिरावे. मनमोहनदास व टिळक या दोघानीहि आपल्या भाषणात आपला एकेक मुलगा आपण लष्करात पाठविण्यास तयार आहो असे सांगितल्याने लोकास विशेष उत्साह वाटला.

सभेच्या शेवटी व नंतर मिळून ८०० लोकांनी आपली नांवे नोंदविली त्यात पुष्कळ पदवीधरहि होते. आणि काही कॉलेजानी आपल्या स्वतंत्र कंपन्या उभारण्याचे ठरविले. पण मौज ही की ज्या खाडिलकरानी मुंबईच्या सभेत उत्साह-पर व उत्तेजनपर भाषण केले तेच बेळगावास या कामाकरिता गेले असता कले-क्टरसाहेबानी स्टेशनावर उतरताच तुम्ही चिथावर्णीचे भाषण करू नये अशा टरीव अर्थाचा मनाई हुकूम दिला. पण त्याहून मौज ही की ठरलेली सभा होऊन खाडिलकराऐवजी त्यांच्यादेखत त्याना बोलावयाचे होते ते सर्व गंगाधरराव देश-पांडे बोलले. याच अर्थाची व्याख्याने तिकडे सुरेंद्रनाथ बानर्जी मोतिलाल घोष शिवस्वामी अय्यर नटेसन कस्तुरीरंग अय्यंगार निळकंटराव उधोजी डॉ. मुंजे नारायणराव वैद्य वगैरेनी अनेक प्रांतात अनेकानी केली. त्यांच्यावर कोणीच नोटीस बजाविली नाही. खरोखर खाडिलकर यांच्यावरहि बजावण्याचे खरोखर कारण नव्हते. पण धारवाडास ज्या हुकुमाची फजीति झाली तो हुकूम कसा तरी जागृत ठेवावा आणि आपली अब्रू जाऊ देऊ नये या हेतूनेच अधिकाऱ्यानी ठराविक शब्दांचा हुकूम जागृत ठेवला होता. पण तसे म्हणावे तर खाडिलकर याना धारवाड येथे बोलू दिले. याचे तात्पर्य इतकेच की सरकारचे ठराव व धोरण असे काही नव्हते. पण काहीतरी अनिष्ट घडत आहे म्हणून दडपशाहीची हालचाल ठेवली पाहिजे अशा समजुतीने अधिकारी लोक मनास येईल तसे वागत होते. याचा कदाचित एक खुलासा कॅपिटल पत्रात आला होता. या पत्रात असे लिहिले होते की स्वराज्यसंघवादि लोक लष्करात शिरणार ते चांगल्या हेतूने नाही म्हणून त्याना दाखल करून घेऊ नये. पण यानेहि खरोखर खरा खुलासा होत नव्हता. कारण वर दिलेल्या नावात होमरूलर असे कित्येक होतेच. शिवाय जो मनुष्य लष्करात जाऊन सामील होणार त्याच्या डोक्यावर होमरूलर अशी चिठ्ठी थोडीच चिकटविलेली असणार? होमरूलर ही काही जात नाही किंवा लांबी रुंदी व उंची मोजण्याचे ते कोष्टक नाही. ती एक फक्त भावना आहे. तो एक स्वभाव आहे. ती एक वृत्ती आहे. तेव्हा ती कोठे असेल नसेल हे कळून येणार नाही. असो. लष्करी शिक्षणाच्या या चळवळीबरोबरच बॉयस्काउटच्या स्थापनेचा प्रश्नहि कायदे कौन्सिलात निघाला होता.

## ( ३ ) कर्नाटकातील दौरा

टिळक लखनौच्या कॉंग्रेसनंतर मुद्दाम कलकत्त्याला जाऊन दुखणाईत मोतीबाबूंची भेट घेऊन आले. पण पुन्हा अवघ्या चार महिन्यातच त्याना दुसऱ्यांदा कलकत्त्यास जावे लागले. तारिख ४ एप्रिल १९१७ रोजी कलकत्ता येथे ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची सभा भरविण्यात आली होती. कमिटीने विलायतेस डेप्युटेशन पाठविण्याचे ठरविले. शिवाय असेहि ठरविले की लखनौ येथे मंजूर झालेल्या योजनेच्या अनुरोधानेच त्यातील लोकानी खटपट करावी. मन मानेल त्याप्रमाणे बोलू नये. हे झाले खरे. पण डेप्यूटेशन मधील लोकांची नावे काही अशी योजिली होती की त्यातील काही गृहस्थ जाणे अशक्य होते.ही सभा संपून टिळक परत आले. ते पुण्यास न उतरता परस्पर तारिख १२ रोजी चिकोडी येथे भरलेल्या बेळगाव जिल्ह्याच्या सभेकरिता गेले. सकाळी गावच्या वेशीपासून ठराविक रीतीने मिरवणूक झाल्यावर सायंकाळी पाच वाजता सभेला सुरवात झाली. येथील समारंभाचे पुढारीपण कै. सखारामपंत कुळकर्णी वकील याजकडे होते. सभेचे अध्यक्षस्थान दादासाहेब करंदीकर यास देण्यात आले होते. सभेचे काम दोन दिवस चालले. शेवटी टिळक सभेला आल्याबद्दल गंगाधरराव देशपांडे यानी टिळकांचे मोठ्या प्रेमळपणाने आभार मानले. उत्तरादाखल केलेल्या भाषणात टिळकानी जनतेला उद्देशून प्रवृत्ति व निवृत्ति यातील भेदाचे विवेचन केले. टिळक म्हणाले "प्रवृत्ति हाच खरा मनुष्यधर्म होय. आपल्या समाजात नुसतीच निवृत्ति असती तर महाराष्ट्र निर्माण झाले नसते. ज्याना काही करिता येत नाही व केले तर डोके आपटण्याची भीति ज्याना वाटते तेच निवृत्तीचा मार्ग स्वीकारतात. मी प्रवृत्तिपर होतो म्हणूनच तुम्ही बोलावल्याबरोबर येथे आलो. आणि म्हणूनच तुम्ही माझे आभार मानता ही चूक करिता असेच मी तुम्हाला सांगतो." तारीख १३ एप्रिल रोजी जिल्हा सभा निमित्त जमलेल्या समाजाचा फायदा घेऊन बेळगाव जिल्ह्यातील एक मराठा जातीचे पुढारी गृहस्थ बळवंतराव माने यानी मराठा शिक्षण परिषद भरविली होती. मराठा समाजाला टिळकांचे विचार ऐकवावे म्हणून त्यानी हा योग आणला होता.

आपल्या भाषणात टिळकानी सांगितले की "मी शिक्षणाचे कार्य करण्यापासूनच सार्वजनिक कार्याला प्रारंभ केला होता. देशात शिक्षणाचा प्रसार सार्वत्रिक करणे हे सरकारचे काम आहे. लोक करून ते किती करणार? शिक्षण दिले तर लोक हक्क मागू लागतील अशी सरकारला भीति! पण आम्ही उघडच सांगतो की आम्हाला हक्क मागावयाला शिकावयाचे आहे म्हणूनच शिक्षण द्या. माझ्या हाती उद्या स्वराज्य आले तर मी पहिल्याने शिक्षण सक्तीचे व मोफत करीन. जुन्या काळी शिक्षण सरकार देत नव्हते. तेव्हा साधुसंतानी राष्ट्राला शिक्षण देण्याचे काम केले. आता या शिकविणाराना भगवद्भक्त मानतात. आजच्या सामाजिक शिक्षकाना देशभक्त म्हणतात इतकाच फरक. शिक्षण द्यावयाचे ते न देऊन वरती

शिक्षण नाही म्हणून स्वराज्य नाही अशी उलटी सबब सरकार सांगते. तेव्हा शेवटी उपाय हाच की शिक्षणाची सक्ती पाहिजे असेल तर आपण सरकारावर सक्ती करण्याची ताकद अंगी आणली पाहिजे." तारीख १४ रोजी रात्री रा. रामचंद्र धोंडो कुळकर्णी यानी आपल्या शेतात रयतवर्गातर्फे पानसुपारी केली. तिकडे जाताना वाटेत श्रीरामलिंगाच्या देवळात प्रसाद देण्याकरिता टिळकाना नेण्यात आले. कारण या रामलिंगावर चिकोडीच्या लोकानी टिळक तुरुंगातून सुटावे म्हणून सतत अनुष्ठान चालविले होते त्याची आज परिसमाप्ति होती.

पानसुपारी झाल्यावर टिळकानी भाषणात सांगितले की "ही पानसुपारी गरीब रयतेतर्फे आहे असे म्हणता याचा मला अर्थच कळत नाही. रयत गरीब व श्रीमंत दोन्ही सारखीच. श्रीमंत रयत लोक युद्धाच्या कामी सरकारला पैसा देण्याला सज्ज झाली. तर गरीब रयत युद्धावर जाण्याला तयार झाली. मुंबईस मी व्याख्यान दिले ८०० लोकानी युद्धावर जाण्याची आपली तयारी दाखविली. सरकार म्हणत होते १००० लोक युद्धावर जाण्याला द्या. आणि एकटा मी हे ८०० लोक देण्याला तयार झालो. पण पैसे दिले माणसे दिली तरी सरकार मात्र अजून हक्क देण्याला तयार नाही. पण सरकारला हे कळले पाहिजे की 'चित्त दिले तरच वित्त मिळेल.' पण चित्ताच्या आधी सरकारला वित्त दिलेत तरी त्यांच्या पेटीत नुसती पिशवी टाकू नका. तर त्या पिशवीला चिठी जोडून त्यात लिहा की आम्ही हे स्वराज्याच्या उपायाना देतो आहो." याच रात्री ११ वाजता टिळकांच्या अध्यक्षतेखाली पुण्याचे शिवरामपंत परांजपे यांचे व्याख्यान झाले. समारोपाच्या वेळी टिळक म्हणाले "तुमच्या बेळगावास स्वराज्यावर पहिले व्याख्यान दिले. त्याने माझ्यावर तोहमत आली. म्हणून तुमच्या ह्या जिल्ह्यात स्वराज्यावर व्याख्यान देण्याची मोठी भीति वाटते. पण अशी संकटे येणारच. म्हणून लोकांच्या मनातील भीति प्रथम घालविली पाहिजे. बेळगावास दिलेल्या व्याख्यानामुळे मजवर खटला झाला. त्याचा परिणाम मी समजतो की आज होमरूल लीगला ६००० सभासद मिळाले. पण अजून यातील लोक गुप्त पोलिसाला भितात. पण भीति का? गुप्त पोलिस हे जसे गव्हर्नरसाहेबांची पाठ राखतात तशी तुमची राखतात असे का समजत नाही? भिण्याची वेळ गेली. आता न भिण्याची आली आहे. आम्ही तर आता स्वराज्याची मागणी इंग्लंडला नेऊन भिडविणार आहोत. पूर्वी मीहि डेप्युटेशन पाठविण्याच्या विरुद्ध होतो. पण आज पाठविण्याला तयार झालो तो तरी का? भीक मागण्याकरिता नव्हे, तर विलायतेत युद्धामुळे लोक खडबडून जागे झाले आहेत. आमचे डेप्युटेशन जाऊन सांगणार की हिंदुस्थानाला स्वराज्य देण्यात तुमचा फायदा आहे. हिंदुस्थानला परतंत्र ठेवण्यात ब्रिटिश सरकारचा किती तोटा झाला हे सांगण्याला आमचे डेप्युटेशन जाणार. १० वर्षापूर्वी होमरूलची मागणी कोणाला सुचली असती? पण कालाने सर्वानाच भरंवसा उत्पन्न होतो. म्हणून मी म्हणतो ६००० सभासद झाले हेहि थोडेच. लखनौ येथे हिंदुमुसलमानांची एकी झाल्यापासून आणखी एक प्रश्न सुटला आहे.

नामदार गोखले याना विलायतेत लोक विचारीत 'ते सारे खरे पण What about Mahommedans?' आज तोहि प्रश्न उरला नाही. म्हणून इकडे हिंदुस्थानातून व तिकडे विलायतेतून असे इंग्रजावर दुहेरी दडपण पडले तर तुम्ही म्हणता त्यासारखे होऊन जाईल."

तारिख १४ रोजी दोन प्रहरी नामदार बेळवी यांच्या अध्यक्षतेखाली स्वराज्य संघाची म्हणून सभा झाली. तीत भाषण करिताना टिळक म्हणाले "आमच्या लीगला नुसते ५००० रुपये हवे असते तर ते कोणी एकऱ्यानेहि दिले असते. पण मला तसे नको होते. एकेक रुपया देणारे ५००० लोक मला हवे आहेत. त्यात हातात लेखणी धरणाऱ्या लोकाबरोबर हातात नांगर धरणारे लोकहि पाहिजेत. उद्योग केला तर लोक ह्या संघाचे सभासद होऊ शकतील. 'पाचामुखी परमेश्वर' ही म्हण आहे. आणि एक वेळ पाच एकत्र जमल्याने जर त्यांच्या तोंडातून परमेश्वर बोलू शकतो तर एक हजार लोक सभासद होऊन स्वराज्य मागू लागले तर त्यांच्या तोंडून परमेश्वर तावडतोब बोलेल की नाही? पंढरीच्या वारीला दरवर्षी लाखो लोक जातातच की नाहीं? व चार चार आणे कर देतातच की नाही? हा पंढरीचा वारकरी मी पंढरीस मेलो तर मुक्ति मिळाली असे समजतो. तसेच स्वराज्य मागण्यात मृत्यु आला तर देशाला मुक्ति मिळेल असे तुम्ही लोक का समजत नाही?"

चिकोडी येथील असा हा विविध प्रकारचा कार्यक्रम संपल्यावर टिळकाना निपाणीस नेण्यात आले. निपाणी हे सत्यशोधकांचे घर अशी त्याची ख्याती. पण ती टिळकांच्या भेटीमुळे बदलली. अवघ्या २४ तासात निपाणी गावाने सर्व तयारी केली. चिकोडीहून निपाणीस जाताना वाटेत खेडी एकवटून पानसुपाऱ्या होत होत्या. रस्त्यांच्या बाजूला घोंगड्या हातरून व किटसनचे दिवे लावून मंडळी वाट पाहात बसली होती. ठिकठिकाणी केळी चुरमुऱ्याचे लाडू व गुऱ्हाळातील गुळाची साय हे पदार्थ लोकाना वाटण्यात येत होते. निपाणीच्या बाजूचा भाग उसाच्या पिकाकरिता प्रसिद्ध होता. गुऱ्हाळातील मेवा देणे हा मोठा सत्कार मानला जातो. मिरवणूक व्यंकटेशाच्या देवळाला पोचेपर्यंत मध्यरात्र उलटून गेली होती. दुसरे दिवशी सकाळी टिळकांच्या अध्यक्षतेखाली खाडिलकरांचे व्याख्यान करण्यात आले. समारोपादाखल बोलताना टिळक म्हणाले "मला हल्ली महात्मा भगवान म्हणण्याचे खूळ लोकानी काढले आहे. पण त्याला माझी हरकत आहे. माझ्या अंगचा मोठेपणा मला इतकाच कळतो की मला जे कळते ते तुम्हाला सागण्याला मी विशेष प्रकारे प्रवृत्त झालो. मनुष्य व पुस्तक दोघातहि ज्ञान भरलेले असते. पण पुस्तक आपण होऊन उठून कोणाकडे जात नाही. मनुष्य जातो व सांगतो. मी मला कळते ते तुम्हाला सांगतो तसेच तुम्हाला जे कळते ते तुम्ही लोकाना सांगा. कळते ते सांगणे हे ज्याला सुचते तोच ज्ञानी. तुम्हाला सांगावयाला आज सुचते ते म्हणजे निपाणीची जुनी आठवण

होते. निपाणीकर देसाई होते तेव्हा या मुलखातून पेशव्यांच्या लष्करभरती-करिता १०००० सैन्य वेळेस बाहेर पडत असे. आपले घोडे व आपल्या दशम्या घेऊन लोक सैन्याला जाऊन मिळत. पण आज तीच गोष्ट उलटी झाली आहे. आपणाला रंगरूट म्हणून धरून नेतील या भीतीने लष्करी अधिकारी दिसला की लोक पळून जातात. ही गोष्ट अशी का होते हे आमच्या सरकारला कळले पाहिजे. सरकारने आम्हाला इतके परतंत्र करून ठेवले आहे की निपाणीला उत्तम तंबाकू पिकत असता चिरूट इजिप्त देशातून यावा लागतो. पण या सर्व गोष्टी सरकारला लोकानी निर्भीडपणे सांगितल्या पाहिजेत." व्याख्यानाच्या शेवटी स्वराज्य संघाला ५०० रुपयांची देणगी जाहीर करण्यात आली. नंतर परत जाताना गुजरांच्या वसतीत जाऊन चंद्रप्रभु महाराजांचे दर्शन घेऊन टिळक चिक्कोडी परत आले. जैन यतिबरोबर संभाषण करिताना टिळकानी सांगितले की "तुमच्या मंदिरात५२ तीर्थंकर असतात त्याप्रमाणे या देशात ३०० कोटी तिर्थङ्कार उत्पन्न झाले पाहिजेत. तुम्हा व्यापारी लोकाना धर्माची सवय आहे. पण राष्ट्रीय धर्माचे पालन-पोषण तुम्ही केले पाहिजे." अशा रीतीने निपाणी येथील कार्यक्रम संपून टिळक व इतर मंडळी पुन्हा चिकोडीला परत आली.

## (४) स्वराज्य संघाचा वाढदिवस

स्वराज्यसंघाच्या पहिल्या वाढदिवसाच्या निमित्ताने महाराष्ट्र व कर्नाटक यामध्ये चळवळ सुरू झाली व नवीन वर्गणीदार करणे वर्गण्या मिळविणे ही कामेहि सुरू झाली. संघाची पहिली वार्षिक सभा नाशिक येथे ता. १७।१८ मे या दिवशी भरविण्याचे ठरले. कारण त्या सुमारास नाशिक येथे प्रांतिक परिषद भरण्याचे ठरले होते. पुण्यास दोन वर्षांपूर्वी १७ की १५ हा वाद निघाला होता. अर्थात नाशिकाला १७ की १९ हा वाद निघावा हे गणिताच्या दृष्टीने बरोबर होते. पण हा वाद फारसा जाचक होण्याचा संभव नव्हता. याचे कारण परिषदेचे काम जरी राष्ट्रीय पक्षाच्या हाती होते तरी परिषदेचे अध्यक्षस्थान श्रीनिवासशास्त्री याना देण्यात येणार होते. ठरल्याप्रमाणे परिषद ता. १७ मे रोजी सुरू झाली. स्वागताध्यक्ष पाटणकर यानी सांगितले की आम्ही नाशिककर या वादात पडू इच्छित नाही. प्रां. कमिटीने १७ वी म्हणा असे ठरविले आहे. आपणास वाटेल तर आपण १९ वी म्हणा. पण कोणीकडून तरी परिषद पार पाडा म्हणजे झाले. अध्यक्ष ना. शास्त्री यांचे भाषण हे होमरूलवर एक समर्पक व सणसणीत व्याख्यानच होते. याहून अधिक सांगण्याचे कारण नाही. परिषदेतील ६ वा ठराव स्वराज्य या विषयावरील बॅ. बॅपटिस्टा स्वराज्यसंघाचे अध्यक्ष यानी मांडिला. टिळकांचेहि या विषयावर भाषण झाले. नंतर ता. १७ मे रोजी हिंदी स्वराज्य-संघाचे पहिले वार्षिक संमेलन मंडपातच झाले. बॅ. बॅपटिस्टा यानी एकदीड वर्षाच्या कामाचे समालोचन केले. ते म्हणाले, 'होमरूल या शब्दासंबंधाने नावे

ठेवणारा मला एकहि इंग्रज भेटला नाही. पण आमच्यातीलच काही लोक त्याला नावे ठेवतात व त्याला काही अनिष्ट आठवणी चिकटून राहिल्या आहेत असे म्हणतात हे आश्चर्य होय. फ्रेंच राज्यक्रांतीची आठवण होते म्हणून नैसर्गिक हक्क स्वतंत्रता समानता या गोष्टी कोणी टाकून दिल्या आहेत काय? होमरूल हा शब्द वापरतो तो केवळ स्वराज्यघटनेची जुनी एक कल्पना सुचण्याकरिता. रक्तपाताची आठवण व्हावी म्हणून नव्हे. स्वराज्य म्हटले की स्वातंत्र्याची आठवण होते म्हणून नको! होमरूल म्हटला की बहिष्काराची आठवण होते म्हणून नको! मग आम्ही म्हणावे तरी काय? आमची चळवळ कायदेशीर सनदशीर ठरली आहे एवढे पुरे नाही काय? शंभर वर्षांपूर्वी हिंदुस्थानाला स्वराज्य द्यावयाचे तर कसे द्यावे याची कल्पनाहि आली नसती. पण या अवधीतील अनुभवाने ती कल्पना आता येते. साम्राज्य हे एखाद्या बारीक बंधनाने बांधलेले वसाहतीचे व इंग्लंडचे 'फेडरेशन' झाले आहे. त्यातच हिंदुस्थान सामील व्हावा आणि वसाहती-वसाहतीत जसे फेडरेशन झाले आहे तसे हिंदुस्थानातील प्रांतात व्हावे." यानंतर चिटणीसानी संघाच्या कामाचा अहवाल सांगितला. त्यावरून असे दिसते की तेव्हापर्यंत १४२१८ सभासद नोंदले होते. त्यात शे. ४२ ब्राह्मण व ४३ ब्राह्मणेतर असे असून ३०९ सभासद मुसलमान ११ पारशी व ६७ स्त्रियाहि होत्या. नऊ हजार रुपये सभासदांची फी व सहा हजार रुपये देणग्या मिळाल्या होत्या. मध्यवर्ती कचेरीतून सुमारे पाच हजार आवक व पाच हजार जावक इतका पत्रव्यवहार झाला. अनेक जिल्ह्यातून व्याख्यानमाला चालू होत्या. संघाने ६ मराठी व दोन इंग्रजी पुस्तके प्रसिद्ध केली. त्याच्या ७५ हजार प्रतीपैकी ४७ हजार खपून गेल्या होत्या. त्यात टिळकांच्या ज्या व्याख्यानावर खटला झाला त्यांच्या तीन हजार प्रती खपल्या आणि त्यांची गुजराथी व कानडी भाषांतरे छापण्याची योजना झाली. स्वतः बेझंटबाई व इतर काही प्रमुख होमरूलवाले महाराष्ट्र संघाचे सभासद झाले. उलट टिळक हे बाईच्या संघाचे सभासद झाले. अशा रीतीने दोन्ही संघांची चांगली सहकारिता होती.

यानंतर शाखांचे अहवालहि वाचून दाखविण्यात आले. तसेच संघाच्या कार्याला वर्गणी मिळविण्याकरिता शंभर रुपये देणाऱ्या लोकांचा तहाहयात सभासदांचा एक नवीन वर्ग काढण्यात आला. शेवटी समारोपादाखल टिळक म्हणाले "लखनौच्या काँग्रेसला होमरूलर लोक पुष्कळ आले म्हणून तेथे तरी स्वराज्याचा ठराव मंजूर होण्यास जोर आला. काँग्रेस आपल्या ठरावाची अंमलबजावणी स्वतः कोणत्याहि रीतीने करीत नाही. बरे ते न झाले आणि आम्हाला काँग्रेसने ममत्वाने वागविले तर आमचे कामहि त्यांचेच आहे. पुढील सालात ५० हजार सभासद व तितकेच रुपये मिळविले पाहिजेत. इंग्लंडातहि काम पुष्कळ करावयाचे आहे. वसाहतींच्या बरोबरीने बसू म्हणतो पण वसाहतींची संघटना व स्वार्थत्याग आम-

च्याजवळ कोठे आहे ? विलायतेत आपली एकदोन माणसे कायमची ठेविली पाहिजेत. त्याला खर्च बराच येणार. त्याची व्यवस्था झाली पाहिजे. मद्रासचा संघ व हा संघ मनाने एक आहेत. घटनेने एक नसण्याचे कारण भाषाभिन्नता. स्वराज्य-संघ स्थापन झाल्याबरोबर त्याने सामाजिक औद्योगिक कार्ये हाती घ्यावी असे काही लोक म्हणू लागले. पण असली विविध कामे करणे हे संघाचे ध्येय नाही. व ते त्याला शक्यहि नाही. प्रचारकानी निर्भयपणे मतप्रसार करणे आणि लोकानीहि आम्हास स्वराज्य हवे एवढेच म्हणून सभासद होणे इतकीच जबाबदारी आहे. अडाणी मनुष्याला घरचा किंवा गावचा व्यवहार जितका कळतो तितका कळला तरी आमच्या कामाला तो पुरे आहे."

इकडे सरकारचा उलट प्रयत्न म्हणजे त्यानी हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागात संस्थानिकांची भुते उठविली. मद्रासकडे कोलगोंडे व कुरुपम् या संस्थानाचे राजे उत्तर हिंदुस्थानात राजा खुशाल पाल सिंग वगैरे लोक होते. मुंबई-इलाख्यात कोल्हापूरच्या महाराजानी हे काम आपल्याकडे घेतले होते. पण राजे व संस्थानिक लोक हे जाहीर रीतीने लोकापुढे येऊन सभा भरवून होमरूलच्या विरुद्ध चळवळ करतील हे शक्य नव्हते. ते करण्यास ते प्रवृत्त झाले असते तर त्यांचा मोठेपणा कोणी शिल्लक ठेवला नसता. म्हणून त्यांचे काम चळवळ्या लोकाना चिमटे घेणे व त्याहिपेक्षा म्हटले म्हणजे मिशीला पीळ भरून सरकारला फुकटचा धीर देणे एवढेच होते. इकडे संस्थानिक आतून अशी कारवाई करीत होते व तिकडे मुख्य प्रधान लॉईड जॉर्ज हे स्वयंनिर्णयाचे तत्त्व जोराजोराने प्रतिपादित होते आणि वसाहतींचा उल्लेख करिताना त्यांच्या बरोबर हिंदुस्थानच्या नावाचाहि उल्लेख करीत होते.

मे अखेर हिंदुस्थानसरकारने एक ठराव प्रसिद्ध करून असे म्हटले की भारत संरक्षक सैन्याची योजना सफल झाली नाही याचा दोष लोकांच्या पुढाऱ्यावर आहे. हा ठराव म्हणजे दुःखावर डागणीच होय. कारण आधीच या सैन्याच्या योजनेचे नियम सदोष. पुढाऱ्याशी अधिकाऱ्यांची सहकारिता नाही. मागितली तरी मिळेना. मदत करू का म्हटले तरी नको म्हणत. लष्करी नोकरीतील वरिष्ठ जागा तर राहोतच पण उत्साहवर्धक असा एक शब्दही नाही. आणि ज्यानी या कामाला लोकाना स्फूर्ति दिली त्यांच्यावर डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्टाचा सररास प्रयोग करण्यात आला. अशी वस्तुस्थिती असता वरती लोकानाच दोष दिला हे सरकारचे सौजन्य वाखाणण्यासारखे होते ! पण त्यातील एकंदर मर्म असे की सैन्यात भरती झाली तर हवी पण ती राजकीय दृष्टीच्या लोकाकडून किंवा अशा दृष्टीच्या लोकांची व्हावयाला नको. मग सरकाराला इतर दुसरे लोक हवे होते ते अधिकाऱ्यांच्या जुलमाने मिळतच होते ! सर्व तालुक्यांचे अधिकारी व सर्व संस्थानिक यांच्यावर सैन्यभरतीची जशी काही वर्गणीच बसविली होती. जाणता मनुष्य शिपाई नको. त्याला फक्त सुदृढ अंग व जवळ भरपूर अज्ञान इतके असले म्हणजे झाले.

याच सुमारास उटकमंड येथे मद्रास कौन्सिलची बैठक झाली तीत गव्हर्नर लॉर्ड पेंटलन्ड यानी भाषण केले त्यावरून दडपशाही वाढणार असे दिसून आले. त्यात ते म्हणाले "हिंदी लोकांचे साध्या सुधारणानी समाधान न होता ते जबाबदारीचे स्वराज्य व तेहि ताबडतोबीने मागू लागले आहेत. आणि हे तर देणे शक्य नाही. ज्या सुधारणा युद्धानंतर इंग्लंड देईल त्या होमरूलपेक्षा अर्थातच कमी असतील. हे माहीत असून होमरूल मागण्याची चळवळ लोकानी चालविल्याचा परिणाम असा होईल की सरकार व लोक यामध्ये मतभेद गैरसमज व कदाचित घासाघीस आणि मारामारीहि होईल. या सर्वांची जबाबदारी चळवळ करणारावर आहे. सावधगिरीचा इशारा ते मानीत नाहीत. खोट्या आशा बाळगिल्याने फसवणूक व निराशा होते. चळवळ करणारांची मते प्रामाणिक असतील. पण त्यांच्या व्याख्यानानी अधिकाऱ्यांची निंदा होते व कायदा मोडण्याची लोकात प्रवृत्ति होते. म्हणून आम्ही योग्य दिसतील ते उपाय योजू. त्यात लोकानी आम्हाला मदत करावी." १९०८ साली टिळकावर खटला झाला त्यापूर्वी लॉर्ड सिडेनहॅम यानी कौन्सिलात असेच भाषण केले होते व लॉर्ड पेंटलन्ड यांच्या भाषणावरून बेझन्टबाईना अटक होणार असा लोकांचा तर्क झाला.

## (५) बेझंटबाईना अटक

हिंदुस्थानला असे वागवून तिकडे आयरिश होमरूलचा प्रश्न मात्र प्रधानमंडळाने आपण होऊन पुढे काढला होता. पण त्याचे कारण मागाहून असे समजले की अमेरिकन मुत्सद्दी मि. टॅफ्ट यानी इंग्लंडला असे बजावले की आयर्लंडची व इंग्लंडची भानगड मिटल्याखेरीज अमेरिकन लोकाकडून इंग्लंडला युद्धात मनःपूर्वक मदत होणार नाही. ही गोष्ट स्वाभाविक होती. कारण आयरिश लोक देशांतर करून अमेरिकेत जाऊन राहिले होते. व ते कायमचे अमेरिकन झाले तरी आपल्या मातृभूमीवर लक्ष ठेवीत होते. पण हिंदुस्थान हीच हिंदुस्थानची मातृभूमी व वसाहतहि. तेव्हा त्याला बाहेरून कोठून व कशी मदत मिळणार ? पण बाहेरून मदत नाही याच कारणाकरिता आतल्या लोकानीच अधिक खटपट करणे प्राप्त होते. म्हणून काँग्रेसने यात पुढाकार घ्यावा अशी लोकांची अपेक्षा होती. पण काँग्रेसवाल्या पुढाऱ्याना आवडती व बिनहरकत वाटणारी अशी जी गोष्ट म्हणजे विलायतेला डेप्युटेशन पाठविणे ती देखील त्यांच्या हातून घडून येईना. लॉर्ड पेंटलन्ड यांच्या भाषणाचा निषेध कॉं. कमिट्याकडून होणे जरूर होते तोहि झाला नाही. मद्रासेत मात्र बरीच खळबळ उडाली. सर सुब्रह्मण्यम् अय्यर यानी ताबडतोब असे प्रसिद्ध केले की मी हायकोर्ट जज्ज होतो पण त्याहि पूर्वी काँग्रेसभक्त होतो. मला राजकारणातील जबाबदारी कळते. आणि मी पेंटलन्ड साहेबांच्या भाषणाला उत्तर म्हणून प्रसिद्ध

करतो की मी होमरूल मागण्याचे समर्थन करणार त्याबद्दल त्यानी काय ती शिक्षा करावी.

हे झाल्याबरोबर याच अर्थाची शेकडो पत्रे प्रसिद्ध होऊन "होय आम्हीहि होमरूल मागतो आम्हावर काय खटला करावयाचा तो करा" असे लोक सरकारला आव्हान देऊ लागले. लवकरच बेझंटबाई अरुंडेल व वाडिया यांच्यावर नोटीस बजावण्यात आली की सरकारने सांगितलेल्या ४१५ ठिकाणापैकी एखादे पसंत करून "तेथेच यापुढे तुम्ही राहिले पाहिजे. आणि यापुढे तुम्ही कोणतीहि चळवळ करता कामा नये. म्हणजे सभेला जाऊ नये बोलू नये सभा भरवू नये जुने छापू नये नवे लिहू नये." ही नोटीस मान्य करण्याचे बाईनी ठरविले. पण मी होमरूलची मागणी सोडणार नाही असेहि त्यानी सांगितले. सर्व लोकाना संदेश म्हणून एक पत्र प्रसिद्ध करून त्या गव्हर्नरसाहेबांच्या भेटीला गेल्या आणि नंतर उटकमंड येथे जाऊन राहिल्या. यापूर्वी सरकारने या चळवळीत न पडण्याविषयी विद्यार्थीवर्गाला रिस्ले सक्युंलराची आठवण करून ताकीद दिली. वर्तमानपत्रावर प्रेस अॅक्ट चालू केला होता. पोलिस अॅक्टाप्रमाणे व्याख्यानाना बंदी करण्यात येऊ लागली होती. टिळकांवर पिनलकोडप्रमाणे खटला केला तो फुकट गेला पण डिफेन्स ऑफ इंडिया अॅक्टाचा अमल करणे ही सोयीची गोष्ट होती. म्हणून त्यानी त्या मार्गाने प्रयत्न सुरू केला आणि बेझन्टबाईनाही अशी अटक केली. अर्थात ही वेळ अशी होती की होमरूलवाले तर संकटातच होते पण बाहेरच्या लोकानी त्यांची बाजू उचलून धरून सरकारास दटवावयास पाहिजे होते. म्हणून टिळकानी लोकाना यावेळी अशी प्रार्थना केली की आपसातील इतर सर्व वाद यावेळी विसरून होमरूलचे समर्थन करण्याच्या मार्गाला त्यानी लागावे. बाई व लॉर्ड पेंटलन्ड याजमध्ये झालेले संभाषण पुढे प्रसिद्धहि झाले. तीत बाई म्हणाल्या की 'माझ्यावर आरोप काय तो तरी सांगा व माझा खुलासा घ्या.' त्यावर गव्हर्नरसाहेब म्हणाले 'मी या वादात पडू इच्छित नाही. तुम्हाला युद्ध संपेपर्यंत विलायतेस जावयाचे असेल तर परवानगी देतो पण येथे तुम्ही चळवळ बंद केली पाहिजे.' बाईनी लखनौचा ठराव काढून त्याना दाखविला. ते म्हणाले 'तो मी यापूर्वी वाचला नव्हता. तरी पण तुमच्या सर्व चळवळी सरकारने बंद करण्याचे ठरविले आहे. तुमचे अमुक कृत्य कायदेशीर व अमुक बेकायदेशीर असे सरकारला पृथःकरण करता येत नाही.' तेव्हा बाई म्हणाल्या की 'तुम्ही चर्चा करू इच्छित नाही तर मीहि हे संभाषण यापुढे चालवू इच्छित नाही' असे म्हणून त्या निघून गेल्या.

या अविचारी कृत्याचा परिणाम मुलट न होता उलटच झाला. कारण स्वराज्यवादाचा सत्याग्रह ही एक नवीनच चळवळ निघाली. मद्रासेकडे त्याचप्रमाणे हिंदुस्थानातील निरनिराळ्या भागात लोक भराभर पुढे येऊन सभा भरवून निषेध तर करूच लागले. पण लॉर्ड पेंटलन्ड यानी जे करू नये म्हणून सांगितले तेच करण्याला प्रवृत्त झाले. आणि स्वराज्यसंघाच्या प्रतिज्ञापत्रकावर भराभर

सह्या होऊ लागल्या. बमनजी शेट यानी एक लाख रुपये चळवळीकरिता देऊ केले. नेमस्तांपैकी सुरेंद्रनाथ जिना भूर्ग्री हे मी स्वराज्यवादी आहे असे म्हणू व लिहून देऊ लागले. आणि महाराष्ट्र स्वराज्यसंघाकडे सर्व जिल्ह्यातून खालील पत्रक सह्या करून दसरी दाखल ठेवण्यासाठी येऊ लागले. ते पत्रक असे: —

"१९१६ साली लखनौ येथील राष्ट्रीय सभेत झालेल्या ठरावान्वये जी स्वराज्य योजनेची मागणी निश्चित झाली व जिला आम्ही होमरूल असे म्हणतो त्या मागणीचा पुरस्कार आम्ही आजवर करीत आलो त्याप्रमाणे पुढेहि करीत राहू. लॉर्ड पेंटलन्ड यांच्या ता. २४ मेच्या भाषणाचा आम्ही निषेध करतो. वर सांगितलेल्या प्रकारच्या स्वराज्याची मागणी सरकारने बेकायदेशीर ठरविली तरी आम्ही स्वराज्यवादापासून पराङ्मुख होणार नाही. व या कृत्याचे जे परिणाम होतील ते भोगू असे आपणास कळवितो." हे उत्तर रोखठोक होते व मुद्देसूद होते. आणि आम्हाला योग्य दिसतील ते उपाय योजू ही जी धमकी तिला आव्हान होते. अलाहाबादचे चिंतामणी यानी स्वतः स्वराज्यसंघाचे सभासद होऊन सर्व काँग्रेस भक्तानाहि तसे करण्याला विनंति केली. त्यात त्यानी लिहिले की "तुम्ही असा प्रश्न कराल की आम्ही काँग्रेसचे अनुयायी आहो. आणि काँग्रेसने स्वराज्याचा प्रश्न हाती घेतलाच आहे मग स्वराज्यसंघाचे सभासद होण्यातच अधिक श्रेय काय आहे? त्यावर माझे उत्तर असे की होय अधिक श्रेय आहे. सरकारचे दाखवायाचे दात वेगळे व खावयाचे वेगळे आहेत. अगदी खोलात जाऊन पाहिले तर अगदी अल्पसंतुष्ट काँग्रेस भक्त आणि अत्यंत महत्त्वाकांक्षी होमरूलर या उभयतांचाहि सरकाराला मनातून सारखाच तिटकारा आहे. परंतु रणनीतीस अनुसरून सरकार प्रथम एकट्या होमरूल लीगवर घाला घालू पाहत आहे. अशा वेळी स्वराज्यवाद्यानी मी काँग्रेसवाला पण मी होमरूलर नव्हे असा भेद मनात ठेवल्यास इतिहासाची पुनरावृत्ती होईल व १९०६ ते १९०९ पर्यंत जे घडले ते घडेल. प्रथम जात्यातले व नंतर सुपातले भरडले जातील. त्यांचा आमचा भेद असला तरी तो फारच सूक्ष्म आहे. अशा वेळीहि जो मनुष्य होमरूल लीगचा सभासद होणार नाही त्याला दुरून नमस्कार असो!"

## (६) सत्याग्रहाच्या चळवळीचा प्रारंभ

इकडे स्वराज्याची चळवळ चालू असताच गांधींची सत्याग्रहाची नवीन चळवळ सुरू होती. बहार प्रांतातील चंपारण्य जिल्ह्यात निळीची लागवड करणारे गोरे मळेवाले व त्यांचे मजूर यामध्ये बरेच दिवस तंटा होता. सरकारने गुलामगिरी बंद केली खरी. पण दिव्याखाली अंधेर या न्यायाने हिंदुस्थानात व इतरत्र साम्राज्यात मुदतबंदीची मजूर पद्धति चालूच होती. अर्थात् या संबंधाने चौकशी करण्याकरिता बहार प्रांतातील पुढाऱ्यानी तिकडे येण्याविषयी गांधीना विनंति केली. त्याप्रमाणे कलकत्त्याहून ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे काम संप-

वून परत येताना ते मोतीहारीस गेले. दुसऱ्याच दिवशी डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटने त्यांच्यावर १४४ कलमाखाली नोटीस बजावली आणि सार्वजनिक शांततेचा भंग व धंगाधोपा होण्याचा संभव असल्याने तुम्ही ताबडतोब चंपारण्यातून चालते व्हा म्हणून हुकूम केला. यावर गांधींनी स्पष्ट जबाब दिला की "माझेवरील सार्वजनिक जबाबदारी मी ओळखतो. मला येथून निघून जाता येईलसे वाटत नाही. तुम्हाला काय करावयाचे असेल ते वेलाशक करा." दुसरे दिवशी मॅजिस्ट्रेटपुढे त्याना उभे करण्यात आले. तेव्हा त्यानी सांगितले की "दंगाधोपा करून चळवळ करावी असा येथे येण्यात माझा बिलकूल उद्देश नाही. राजकीय कामापेक्षाहि हे एक भूतदयेचे व सार्वजनिक काम आहे असे मी मानतो. केवळ परिस्थितीचा अभ्यास करण्याकरिता व शक्य तर मळेवाले व मजूर या दोघानाहि हा प्रश्न सोडवण्यास मदत करावी म्हणून मी येथे आलो आहे. व हे जर सरकारला पसंत नसेल तर त्यानी मला वाटल्यास जबरीने उचलून दूर पाठवावे. युक्तायुक्तांच्या शृंगापत्तीत सरकारी हुकूम मानण्यापेक्षा मी आपल्या सद्सद्विवेकबुद्धीलाच अधिक मानतो."

गांधी यांच्या या जबाबामुळे पुढे काय करावे हे मॅजिस्ट्रेटासहि कोडे पडले व गांधींची चौकशी तहकूब करून बहार सरकारचे मत घेण्याचे त्याने ठरवले. घटास घट भेटलेला पहाताच बहार सरकारने ताळ्यावर येऊन नोटीस रद्द करावी असा हुकूम दिला. अर्थात् अँग्लो इंडिअन मळेवाल्यांचे पित्त अगदी खवळून गेले. व चौकशी करणे असल तर ती सरकारनेच करावी, निदान सरकारी व बिनसरकारी गृहस्थांची कमिटी नेमून तिने ती करावी पण एकट्या गांधींना ती करू देऊ नये म्हणून चळवळ सुरु केली. तसेच गांधींवर नाही नाही ते आरोप करण्यास सुरवात केली. कित्येकानी तर गांधी याना हद्दपार करावे नाहीतर आम्ही सरकारास न जुमानता पाहिजे ते करू अशा उघड धमक्या पायोनिअर सारख्या पत्रातून देण्यास सुरवात केली. केसरीने यावर म्हटले "यावरून बहार प्रांतात सरकारचे राज्य नसून मळेवाल्यांचे राज्य आहे असे स्पष्ट म्हणावे लागते." अखेर या नाजुक परिस्थितीतून सुटण्याकरिता कमिशन नेमणे एवढा एकच राजमार्ग आहे असे सरकारास दिसून आले. व त्याप्रमाणे जून महिन्यात कमिशन नेमले जाऊन त्यामध्ये गांधींनाहि घेण्यात आले. बिचाऱ्या मजूरांच्यातर्फे गांधी हे एकटेच सभासद कमिशनमध्ये होते. तथापि कमिशनच्या चौकशीत हिंदी मजूरांच्या हालअपेष्टांचा इतका भरभक्कम साक्षीपुरावा कमिशनपुढे आला की "या बाबतीत चौकशीच व्हावयास पाहिजे होती" अशी उघड कबुली कमिशनने दिली व अशा रीतीने गांधींच्या सत्याग्रहाचा विजय झाला.

इकडे बेझंटबाईनाहि अटक केल्यामुळे स्वराज्यवादी लोक सत्याग्रहाकडे वळले होते. व यामुळे मुंबई काँग्रेस कमिटीने सत्याग्रहाचे तत्त्व मान्य करून मान्यतेचा शेरा द्यावयाचा की नाही असा एक नाजुक प्रश्न उपस्थित केला होता. वास्तविक सत्याग्रहास नुसती शिफारसवजा मान्यता देऊन हा प्रश्न कमिटीला

निकालात काढता आला असता. कारण सत्याग्रह करणार तो जो तो आपल्या जबाबदारीवर करणार. पण कित्येक वावदूकानी वेड पांघरून 'सत्याग्रह' हा काय पदार्थ आहे, त्याची व्याख्या काय, त्याची व्याप्ति किती वगैरे बहाणा करण्यास सुरवात केली. आणि कित्येक बहादूरानी 'सत्याग्रह ऊर्फ निःशस्त्र प्रतिकार' बेसनदशीर व बेकायदेशीर आहे असा स्पष्ट शब्दानी ठराव मांडला. पण अखेर अप्रिय गोष्ट लांबणीवर टाकण्यास पोटकमिटी नेमावयाची ही ठराविक क्लृप्ति अंगिकारण्यात येऊन प्रश्नाचा निकाल करण्यापेक्षा प्रश्नाच्या निकालाचे काम निकालात काढण्यात आले! केसरीने लिहिले "सत्याग्रह हा काही अंशी निवळ प्रतिक्रियेच्या स्वरूपाचा असतो व अंगी मार्मिकपणा नसलेल्या लोकाना तो निवळ करनकऱ्याचा वसा असेहि वाटण्याचा संभव आहे. पण अमुक करा किंवा अमुक करू नका असा हुकूम काढण्यात सरकार जेव्हा सत्य व न्याय यांची पायमल्ली करते तेव्हा कर म्हटले ते न करणे व करू नको म्हटले ते करणे यास करनकऱ्याच्या वशाचे स्वरूप सकृद्दर्शनी आले तरी तेच वस्तुतः सत्यप्रियतेचे किंवा न्यायप्रियतेचे लक्षण मानले पाहिजे. हा प्रश्न कॉंग्रेस किंवा तिची पोटमंडळे याना कायमचा अंगाबाहेर टाकता येणे शक्य नाही. बहिष्कार राष्ट्रीय शिक्षण स्वराज्य वगैरे दिसण्यात जहाल दिसणाऱ्या वादांचा इतिहास अशाच प्रकारचा आहे. व जे ठराव राष्ट्रीय सभेकडून मंजूर करून घेण्यास पूर्वी राष्ट्रीय पक्षास रणे माजवावी लागली तेच आज इतक्या सुलभ रीतीने मंजूर होऊन जात आहेत की त्यांचाच उच्चार आपण करीत आहो की नाही हे उच्चार करणारांच्या ध्यानीहि येत नसेल! ज्या गोष्टींचा उच्चार कित्येकांच्या तोंडातून काढण्याला पूर्वी शेंडी धरून संथा देण्याची जिकीर करावी लागली त्याच गोष्टी आता ते बोलक्या पोपटाप्रमाणे आवडीने बोलू लागले आहेत. यावरून जी गोष्ट पूर्वी राष्ट्रीय सभेच्या ध्येयाची झाली तीच आता राष्ट्रीय सभेच्या कार्यकारी साधनांची होणार आहे हे लक्षात ठेवावे."

तारीख १२ ऑगस्ट रोजी पुन्हा मुंबई प्रांतिक कमिटीची बैठक झाली. मॉंटेग्यू इकडे येणार म्हणून देशात शांततेचे वातावरण कसेहि करून निर्माण करावे असा नेमस्तांचा तगादा चाललाच होता. यामुळे अखेर तडजोड होऊन म. गांधी टिळक व चंदावरकर या तिघानी मिळून पसंत केलेला ठराव जवळ जवळ तसाच मंजूर करण्यात आला व अशा रीतीने सत्याग्रहास मुंबई प्रां. कमिटीची अखेर मान्यता मिळाली.

## (७) विलायतेतील चळवळीची प्रस्तावना

ऑ. इं. कॉं. कमिटीने कॉंग्रेसचे डेप्युटेशन विलायतेस पाठविण्याची योजना केली होती तिचा काहीच उपयोग झाला नाही. ज्याना नेमले ते जाईनात. जे जाऊ इच्छित त्याना नेमीनात. ज्याना नेमले व ज्यानी जाण्याचे कबूल केले

त्यांचे पाऊल निघेना. अशी स्थिती झाली. पण या कामातहि होमरूललीगनेच आघाडी मारली. टिळकांच्या स्वराज्यसंघाने बॅ. बॅपटिस्टा व बेझन्टबाईच्या संघाने बॅ. अय्यर याना विलायतेस पाठविण्याचे ठरविले व त्याप्रमाणे ते ता. १४ जुलै रोजी मुंबईहून रवानाहि झाले. यानी विलायतेत कोणती योजना पुढे मांडावी हा प्रश्नच होता. प्रत्येक लीगची वेगळी योजना होतीच. पण कॉंग्रेसने आपली व मुस्लीम लीगची अशा दोन जमा धरून एक नवी तयार केली होती. आता संघाने स्वतःच्या खर्चाने डेप्युटेशन पाठविल्याने त्याला आपली आवडती योजना पुढे ढकलता आली असती. परंतु यात स्पर्धा कसली? म्हणून टिळकानी असे ठरविले की बॅपटिस्टा यानी झाले तरी कॉंग्रेसचीच योजना पुढे मांडून तिचा प्रसार करावा. चालू चळवळीचा किती परिणाम झाला याचे एक गमक असे की सर नारायण चंदावरकर यानीहि टाईम्स ऑफ इंडिया पत्रात बेझन्टबाईना केली अशी अटक करणे बिनमनदशीर आहे असे मत प्रतिपादन केले. ' या अटकबंदीला कायद्याचा आधार असला तरी कायद्याला सनदेचा आधार नाही' हा त्यांचा मुख्य मुद्दा होता. त्यांचे असेहि म्हणणे होते 'की सरकार आपल्या म्हणून जर काही योजना मांडीत नाही तर लोकानी आपल्या योजना पुढे मांडल्या तर त्यात काय चूक? सरकारला आपली योजना पुढे मांडण्याला अडचण असेल. अवकाश असेल. पण लोकाना जर तशी अडचण नाही व मनाने ते उत्सुक झाले असतील तर त्यानी आपली योजना पुढे का मांडू नये? निराशा झाली तर त्यांची त्याना.' पण ही नुसत्या चंदावरकरांचीच विचारसरणी नसून काही अँग्लो इंडियन पत्रकर्ते देखील तसेच म्हणू लागले होते. त्यांचे म्हणणे तपशीलवार योजना सरकारजवळ नसेल तर नसो. पण सर्वसामान्य आश्वासनपर असा जाहीरनामा काढण्याला त्याना कोणती हरकत? एवढेच काय पण कोणी असेहि म्हणतात की लॉर्ड विलिंग्डन यानी देखील एखादा बादशाही जाहीरनामा प्रसिद्ध होण्याविषयी आतून विलायत सरकारकडे टुमणे लाविले होते.

बेझंटबाईना अटक झाली त्या प्रसंगी विलायतेहून कायदेपंडितांचे अभिप्राय बाईनी आणविले होते. व त्यांच्या आधाराने विलायतेतील हायकोर्टाकडे बंधमुक्ततेचा स्पेशल अर्ज करण्याचा बाईचा विचार होता. परंतु विलायतच्या कोर्टाला यात हात घालण्याचा अधिकार आहे की नाही हा मोठाच प्रश्न होता. एका अर्थी तो होता याचे कारण स्वतः स्टेटसेक्रेटरी विलायतेत राहतो व लोकाना कैदेत ठेवण्याच्या कामी त्याची सहकारिता आहे. बंदीतील लोकाना सोडा असा अर्ज केला असता तो नाही म्हणाला. जॉर्ज बादशहांच्या अंमलातील सर्व मुलुखात हेबियस कॉर्पस कायद्याप्रमाणे बंधमुक्ततेचा हुकूम करण्याचा अधिकार विलायतेतील कोर्टाना मूळ होता. पण १८६१ च्या कायद्याने तो हक्क मर्यादित करण्यात आला. पण तो वसाहती पुरता. पण हिंदुस्थान ही वसाहत नव्हे. या बाबतीत पुराव्याचा बोजा सरकारावर पडण्यासारखा आहे. हिंदुस्थानातील को-

टांना असा हुकूम काढण्याचा अधिकार असला तरी १९१५ च्या डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्टाने तो अधिकार काढून घेतला आहे. सबब विलायतेतील कोर्टांना तो अधिकार राहतो. हिंदुस्थानातील कोर्टांना तो अधिकार उरला असता तर मग विलायती कोर्टांना तो राहिला नसता. १९१५ च्या कायद्याप्रमाणे अटक झाली पण त्या कायद्यातील कलम ३ हे कायद्याच्या मूळ तत्वाला धरून नाही. आणि विलायतच्या कोर्टांनी तसे मानल्यास मग कैदेत टाकलेल्या माणसाच्या कृत्यासंबंधाने विचार करण्याचे कारण रहात नाही. इत्यादि कारणावरून अर्ज चालू शकतो असा कायदेपंडितानी अभिप्राय दिला होता.

जुलै महिन्याच्या शेवटल्या आठवड्यात ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी व मुस्लिमलीग यांची मिळून सभा मुंबईस झाली. या सभेत मुंबईच्या नेमस्तावर त्यांच्या इतिहासात दुसऱ्यांदा बाजू परतली. कमिटीने मंजूर केलेल्या खलित्यात अटकबंदीचा निषेध केला होता. अलिबंधूना सोडावे असे लिहिले होते. ध्येयाच्या चळवळीकरिता कायद्याने लोकाना द्वार मोकळे ठेवले पाहिजे असे लिहिले होते. आणि विशेष हे की दोन्ही स्वराज्यसंघानी आजवर ज्या चळवळी केल्या त्या कॉंग्रेसच्या ठरावाला धरूनच आहेत असे स्पष्ट लिहिले. यापूर्वीच मॉंटेग्यूसाहेबांची नेमणूक स्टेट सेक्रेटरीच्या जागी झाली होती व त्यानी मेसापोटेमियातील कारभारावर सडकून टीका केली होती. यामुळे आशा वाटू लागली होती की ते हिंदुस्थानच्या बाबतीत काही तरी करणार. याचवेळी असा एक प्रश्न निघाला की तुम्ही खलिता हव्या त्या भाषेने लिहा पण तो झिडकारला गेला तर आपला राग व्यक्त करण्याकरिता तुम्ही आम्ही काय करावे ? कित्येक लोकांची सूचना होती की पूर्वी दक्षिण आफ्रिकेत व नुकतेच बिहार प्रांतातील चंपारण्यात मजुरांच्या स्थितीची चौकशी करण्याकरिता गांधी यानी ज्या सत्याग्रहाचा अवलंब केला त्याचीच शिफारस सर्व हिंदुस्थानला एकदम करावी. पण अखेर ही सूचना प्रत्येक कॉंग्रेस कमिटीकडे विचाराकरिता पाठविली. अशा रीतीने खलिता रवाना झाला. पण ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीला त्याच्या पाठोपाठ आपले शिष्टमंडळ विलायतेस पाठविण्यासंबंधाने लोकाना काही कळविता आले नाही. इकडे बेझंटबाई अटकेत राहिल्या होत्या त्याना अर्थात् इतर काही उपद्रव नव्हता. पण चळवळ्या मनुष्याला काही न करिता गप्प बैस असे सांगणे व गप्प बसविण्याला लावणे ही शिक्षाच आहे. शरीरस्वास्थ्याच्या दृष्टीने बाई व त्यांचे सहचारी हे स्वास्थ्यामध्ये होते पण तेथेहि बारीक सारीक गोष्टीत सरकारचा व अधिकाऱ्यांचा थोडा खटका उडेच. बाईनी उटकमंड येथे आपल्या घराजवळ एक स्वराज्याचे म्हणून निशाण उभारले होते. पण ते पाडून टाकावे असा सरकारी हुकूम झाला. दादाभाई वारले तेव्हा त्यांच्या मुलीला बाईनी दुःखप्रदर्शक तार पाठवली. त्यावरहि सरकारने आक्षेप घेतला की 'तुम्ही आमच्या परवानगीशिवाय तारा किंवा पत्रव्यवहार करू नये असे असता ही गोष्ट तुम्ही का केली ?' विलायतेत प्रधानमंडळाने

असे जाहीर केले होते की 'थिऑसफी व राजकारण मला वेगळी करता येत नाहीत असे विधान बाईनी केले होते ते खोटे होते म्हणून बाईना ते खोडून काढण्याकरिता विलायतेस तार करावयाची होती. याकरिता ती तार व पैसे त्यानी अधिकाऱ्याकडे पाठविले. पण ते त्यानी परत केले व त्यांची तार पाठविली नाही. तेव्हा या विषयावरील पत्रव्यवहार प्रसिद्ध करण्याचा बाईनी आग्रह धरिला त्याची मद्रासमरकारला चीड आली.'

याला उत्तर देण्याला लोकाजवळ एक साधन होते ते बाईची निवडणूक पुढील कॉंग्रेसच्या अध्यक्षाच्या जागी करणे. मुंबई प्रांतिक कॉंग्रेस कमिटीने बाईचीच निवडणूक केली. इतरहि दोन तीन नावे होती. गांधी जिना महमदाबादचे राजे वगैरे. हा प्रश्न निकालात निघण्याला अजून थोडा अवकाश होता. पण दरम्यान एक महत्वाची गोष्ट घडली तिने लोकांच्या विचाराना एक नवीनच दिशा लावली.

## ( ८ ) भारत मंत्र्यांचा जाहीरनामा

ता. २० ऑगष्ट १९१७ रोजी भारतमंत्री मि. मॉंटेग्यू यानी असा जाहीरनामा प्रसिद्ध केला की "हिंदुस्थानाला जबाबदारीचे स्वराज्य देऊन साम्राज्यातील एक भागीदार करणे हे ब्रिटिश सरकारचे धोरण असून हिंदुस्थान सरकारलाहि ते पूर्णपणे मान्य आहे. या दिशेने महत्वाच्या सुधारणा होतील तितक्या लवकर पण पायरी पायरीने अंमलात कशा आणाव्या याविषयी हिंदुस्थानसरकारशी व लोकाशी वाटाघाट करणे जरूर आहे. म्हणून व्हाईसरॉयसाहेबांच्या निमंत्रणावरून मी सर्वांचे म्हणणे ऐकून घेण्याकरिता हिंदुस्थानास येतो. काही झाले तरी हिंदुस्थानची अंतिम जबाबदारी सरकारवरच राहील. म्हणून सुधारणांची हप्तेबंदी ही कशी असावी हेहि सरकारच ठरवील. तथापि या सर्व विषयावर सर्वांना आपले म्हणणे पुढे मांडण्याची संधि देण्यात येईल व जो निर्णय ठरेल तो प्रधानमंडळाच्या परवानगीने पार्लमेंटपुढे मांडण्यात येईल." कॉंग्रेसच्या दृष्टीने बोलावयाचे तर पर्वत उठून महमदाकडे जाईना म्हणून स्वतः महमदच उठून पर्वताकडे गेला. दुसरे असे की जी गोष्ट तोंडाने उच्चारण्याला हिंदी लोकाना प्रतिबंध होत होता ती राजरोसपणे त्याना भारतमंत्र्यापुढे मांडता येणार. प्रश्न इतकाच उरला की मॉंटेग्यूसाहेब हिंदुस्थानात आल्यावर ते आपल्या मनाप्रमाणे वागण्याला कितपत मोकळे राहतील? कारण पूर्वी लार्ड हार्डिंज यानी एकदा असे उद्गार काढले होते की 'या गुप्त पोलिसांच्या त्रासापासून मला कोणी वाचवील काय?' तसेच स्टेट सेक्रेटरीच्या मागे लचांड लागावयाचे. त्यांचा कार्यक्रम येथील नोकरशाही ठरविणार. आणि ते स्वतः विचक्षण असल्यामुळे मूर्खधूर्त-न्याय न लागला तरी अस्वल-दरवेशी-न्याय लागू पडावयाचा! ह्मणजे राजेरजवाडे थोर लोक अशानी त्याना वेढून थाटमाटात व पाहुणचारात किंवा शिकारीत त्यांचा वेळ घेतला म्हणजे त्यांचे मुख्य काम बाजूला राहील. आणि त्यांचा दरबार खुला न

राहिला तर विपरीत लोकांचे म्हणणे तेवढे त्यांच्या कानी जावयाचे. पण सुदैवाने ही भीति खरी ठरली नाही.

ऑगस्ट महिन्यात मद्रास येथे जादा प्रांतिक परिषद भरून बेझंटबाईच्या सुटकेविषयी ठराव झाले आणि हलीसारखे जुलमी हुकूम आणखी यापुढे कोणावर निघाले तर ते न जुमानता सत्याग्रह करावा असा ठराव झाला. पण यापुढे तसा प्रसंग फारसा आलाच नाही. नाही होय म्हणता म्हणता बेझंटबाई काँग्रेसच्या अध्यक्ष निवडल्या गेल्या. नऊ प्रांतिक काँग्रेस कमिट्यापैकी त्याना आठानी निवडून दिले. बाईच्या प्रतिपक्षीयानी स्वागतमंडळाच्या सभेत शेवटची लढाई दिली. पण तीत त्यांचा मोड झाला. ज्या व्यक्तीला सरकार छळते त्याला बहुमान देणे हा तरी एक प्रकारचा सत्याग्रहच होय. आता निवडणूक झाल्यावरहि वेळेवर बाईना बंधमुक्त न केले तर काय करावे हा प्रश्न उरला. पण आयत्या वेळी त्याचे पाहता येईल असे ठरले.

## (९) इतस्ततः

टिळक स्वराज्यसंघाने बॅपटिस्टा याना विलायतेस पाठविले ते विलायतेस सुखरूप पोचल्याची तार सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात आली. सुखरूप म्हणण्याचे कारण असे की समुद्रावर जहाजाना अजून अपघात होत होते. मॉंटेग्यूसाहेब इकडे येणार मग बॅपटिस्टा तिकडे जाऊन काय करणार असा प्रश्न कित्येकानी काढला. पण ते निघण्याच्या आधी मॉंटेग्यू इकडे येण्याची वार्ता नव्हती. आणि कदाचित् असती तरीहि त्याना तिकडे पाठविण्यात आलेच असते. कारण ही चळवळ दुतर्फी चालविणे फायद्याचेच होते. येऊन जाऊन आपले म्हणणेच मांडावयाचे तर ते स्टेट सेक्रेटरी प्रमाणे विलायतेतील लोकापुढे त्याच वेळी मांडलेले अधिक चांगले व त्याप्रमाणे बॅपटिस्टा विलायतेस गेल्यापासून त्यांचे काम सुरूहि झाले.

ता. १७ सप्टेंबर रोजी दादासाहेब करंदीकर याना साठ वर्षे संपून एकसष्टावे लागले त्या निमित्ताने टिळक व इतर मंडळी साताऱ्यास गेली व त्या रात्री टिळकांचे स्वराज्य या विषयावर व्याख्यान झाले. वाटेत वाई व लिंब या गावाना भेट देऊन परत येताच ते भडोच येथील निमंत्रणावरून तिकडे गेले. भडोच येथे हरिभाई अमीन यानी होमरूल लीगची शाखा काढली होती व त्यानीच हे निमंत्रण दिले होते. दोन प्रहरी मानपत्र समर्पण झाल्यावर संध्याकाळी सभा एवढी मोटी झाली की चारपाच ठिकाणी वेगवेगळे वक्ते उभे करून भाषणे करवावी लागली.

ता. १७ सप्टेंबर रोजी मद्रास सरकारने बेझंटबाई यांची मुक्तता केली. त्या परत मद्रासेस येताना वाटभर त्यांचा सत्कार एकसारखा होत होता. सर्व हिंदुस्थानभर चोहोकडे अभिनंदनाच्या सभा झाल्या व ५ ऑक्टोबर रोजी बाईचा एकाहत्तरावा वाढदिवस मोठ्या थाटाने सर्वत्र पाळण्यात आला. बाईप्रमाणे अली-

बंधू यांचीहि सुटका व्हावयास पाहिजे होती. त्याकरिता ता. ३ ऑक्टोबर रोजी मुंबईस मोठी जाहीर सभा भरली. अध्यक्ष भुलाभाई देसाई हे होते. मुख्य ठरावावर भाषण करताना टिळक म्हणाले "अलीबंधूवर जे आरोप आहेत ते सरकारने शाबीत केलेले नाहीत किंवा त्यावर त्यांचे म्हणणे ऐकून घेतलेले नाही. आणि इकडे मुसलमान लोकाना राजनिष्ठ म्हणावयाचे पण त्यांच्या पुढाऱ्याना कैदेत ठेवावयाचे यात काय अर्थ ?" मुंबईच्या सभेप्रमाणे दिल्लीपासून मद्रासपर्यंत याच विषयावर सर्वत्र सभा झाल्या. याच वेळी मुंबईस टिळक असता स्वराज्याच्या मागणीचा म्हणून सर्व लोकाकडून एक रीतसर अर्ज करावा असे ठरले. पुढारी हे कोणी नव्हत तर जनता हीच काय ती मुख्य अशी विलायतेतील काही लोकांची समजूत असते ती दूर करण्याकरिता आणि सह्या घेण्याच्या निमित्ताने होमरूलचे शिक्षण पसरविण्याकरिता ही योजना होती. हा अर्ज तयार होऊन स्वराज्यसंघाच्या अनेक शाखाकडे पाठविण्यात आला व त्यांजवर सह्या होऊ लागल्या. कलकत्ता येथील स्वागतमंडळातील भांडणे मिटून बेझंटबाईची अध्यक्ष म्हणून नेमणूक कायम झाली. ऑल इंडिया काँग्रेस कमिटी व मुस्लिमलीग यांच्या सभामध्ये गांधी यानी तयार केलेला अर्जाचा मसुदा मंजूर झाला व त्याहि अर्जावर सर्व देशभर सह्या घेण्याचे कार्य सुरू झाले. ता. ७ ऑक्टोबर रोजी भरलेल्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या सभेला टिळक व बेझंटबाई दोघेहि हजर होते. हा अपूर्व योग आल्याने अलाहाबादेस केवढ्या थाटाने मिरवणुकी निघाल्या सभा भरल्या व सत्कारसमारंभ करण्यात आले याची कल्पना कोणासहि करता येईल. टिळकांची अलाहाबादेस दोन व्याख्याने झाली तशीच बाईचीहि झाली. अलाहाबादेहून परत येताच पंढरपूरचे निमंत्रण टिळकांची वाट पहातच होते. ता. २० ऑक्टोबर रोजी पंढरपुरास सोलापूर जिल्ह्याची पहिली जिल्हा सभा भरली. तिचे अध्यक्षस्थान केळकर याना देण्यात आले होते. ही सभा होताच पाठोपाठ टिळक पंढरपुरास आले. जिल्हा सभेला जमलेली सर्व मंडळी त्यांच्याकरिता वाट पहात बसलीच होती. या एका गावात तीनशे कमानी त्यांच्या सत्काराकरिता उभारल्या होत्या. नव्या पेठेत त्यांचे व्याख्यान झाल्यावर दुसऱ्या दिवशी सोलापूर जिल्हा स्वराज्यसंघाने आपलीहि परिषद भरविली. प्रत्येक सभा किंवा परिषद हा टिळकांच्या भाषणाना एक एक नवा प्रसंग सहजच असे. यामुळे स्थानिक लोक मुद्दाम अशा रीतीने वेगवेगळ्या सभा भरवीत.

ता. २७ रोजी पुण्यास ज्योतिष संमेलन भरविण्यात आले. बाहेर गावाहून सुमारे पन्नास साठ ज्योतिषी आले होते. स्वागताध्यक्ष प्रो. नाईक यानी १९०४ च्या परिषदेची आठवण करून देऊन त्यात जे उणे राहिले ते येथे पुरे करावे आणि पंचागाची सुधारणा करण्याचे काम शिल्लक ठेवू नये अशी सभेला विनंती केली. त्यांच्या मते हिंदु पंचांगपद्धतीत कालगणना तिथ्यात्मक सौरचांद्र आहे आणि स्थलमापन नक्षत्राश्रित आहे म्हणून नक्षत्रे आणि तिथिगणना कायम ठेवली म्हणजे

आपले ज्योतिर्गणित स्वतंत्र राहते. या सभेचे अध्यक्षस्थान टिळकांना देण्यात आले होते. त्यानी आपल्या भाषणात या शास्त्राचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास थोडक्यात सांगून "जुन्या ज्योतिषाना नवी दृष्टि लाभल्यामुळे पंचागसंशोधन आता अवश्य वाटू लागले आहे, दृक्प्रत्ययाची अपेक्षा सर्वानाच पटू लागली आहे, आपले ज्योतिषी लोकहि दुर्बिणी व वेधशाळा यांचे महत्त्व ओळखू लागले आहेत, तरी मुंबईच्या सभेपुढे आणखी एक पाऊल आपण टाकावे" अशी त्यानी विनंती केली. पुढे दोन दिवस खाजगी सभा भरून मोठ्या बहुमताने निर्णय करण्यात आला तो असा की शक १८४० च्या आरंभी अयनांश २३ घ्यावे व वेधशाळा निघाल्यावर प्रत्यक्ष वेधानुरूप घ्यावे. सौर वर्षमान सूर्यसिद्धांताप्रमाणे पण वेधाप्रमाणे बीजसंस्कार दिलेले, आणि आरंभस्थान निरयण राशी चक्राच्या आरंभी निःशर रेवती भोगतारा हे घ्यावे. या ठरावाला सायनवादी व केवळ ग्रहलाघववादी विरुद्ध होते, परंतु वरील निकाल मोठ्या बहुमताला मान्य होऊन तो ता. २९ रोजी सर्व सभेला जाहीर करण्यात आला. आणि पुढील काम करण्याकरिता एक पंचागमंडळ नेमण्यात आले. ग्वाल्हेरचे महाराज माधवराव शिंदे यानी उज्जयिनी येथे वेधशाळा स्थापन करण्याचे मान्य करून पंचागशोधनसभेला आश्रय दिला ही आनंददायक गोष्टहि लोकाना या सभेतच कळविण्यात आली.

पुढील आठवड्यात टिळक गुजराथेत गोध्रा येथील प्रांतिक परिषदेला पाहुणे म्हणून गेले. परिषदेला सुमारे पंधराशे प्रतिनिधी व दहा हजारावर प्रेक्षक होते. परिषदेचे अध्यक्षस्थान गांधी याना देण्यात आले होते. त्यांच्या भाषणात मुख्य रोख देशाने स्वतः स्वराज्य मिळविण्याकरिता काय केले पाहिजे यावर होता. म्हणून आरोग्यरक्षण गोरक्षण अस्पृश्यतानिवारण स्वदेशी चळवळ स्त्रीशिक्षण व मातृभाषेची अभिवृद्धि इतक्या गोष्टींची त्यानी शिफारस केली. परिषदेनंतर गांधी यांच्या अध्यक्षतेखाली स्वराज्यसंघाची सभा झाली. गोध्रा परिषदेला दादासाहेब खापर्डे यानाहि मुद्दाम निमंत्रण करण्यात आले होते व त्यानी गुजराथी भाषेत भाषण करून दहा वर्षापूर्वीची सुरत येथील कामगिरी—म्हणजे मराठा गृहस्थाने गुजराथी लोकाना त्यांच्या मातृभाषेतून आपले मनोगत समजून सांगण्याची कामगिरी—पुनः एकवार केली.

ता. १७ नोव्हेंबर रोजी मॉंटेग्यूसाहेबानी शिष्टमंडळांच्या भेटी घेण्याचे काम सुरू केले. तेव्हा त्याप्रमाणे होमरूल लीगनेहि आपले शिष्टमंडळ पाठविण्याचे ठरविले. पुणे व मद्रास दोन्ही लीगनी वेगवेगळी मंडळे बनविली. पुणे संघातर्फे टिळक खापर्डे करंदीकर केळकर बेळवी गंगाधरराव देशपांडे डॉ. मुंजे निळकंठराव उधोजी साठे वेलकर व बेदरकर इतक्या लोकांची योजना झाली. ता. २३ रोजी ही मंडळी मुंबईहून निघाली ती शनिवारी ता. २४ रोजी रात्री दिल्लीस पोचली. गर्दी इतकी झाली होती की डब्यातून सामानासह बाहेर पड-

ण्यास अर्धा तास लागला. तेथून मोठी मिरवणूक निघून टिळकाना लक्ष्मीनारायण धर्मशाळेत पोचविण्यात आले. सोमवारी ता. २६ रोजी दोनप्रहरी रीतीप्रमाणे शिष्टमंडळांची भेट झाली. त्याच दिवशी काँग्रेस मुस्लिम–लीग यांच्या शिष्टमंडळांच्याहि भेटी झाल्या. यामुळे कलकत्ता व मद्रास इकडील मंडळीहि आली होती. त्याच दिवशी माँटेग्यू साहेबानी बेझंटबाईची व दुसरे दिवशी टिळकांची व्यक्तिशः भेट घेतली. काँग्रेसतर्फे शिष्टमंडळाचा अर्ज बाबू सुरेंद्रनाथ यानी सादर केला. दिल्लीस हे काम सुमारे दोन आठवडे चालून ता. २९ रोजी माँटेग्यू हे कलकत्त्याकडे रवाना झाले. टिळक परत येताना वाटेत त्यांचा दौरा अनेक ठिकाणी ठरविण्यात आला होता. त्याप्रमाणे तो पार पडला. विलायतेत बॅपटिस्टा हे जे काम करीत होते त्यांच्या व बेझंटबाई यांच्या विलायतेतील मंडळीच्या प्रयत्नाने लॅन्सबरी यानी आश्वासनपर असा संदेश हिंदुस्थानाकडे धाडला. त्यात मजूर-पक्षाची सर्वस्वी मदत हिंदुस्थानाला या प्रसंगी होईल असे कळविले होते. ता. २४ ऑक्टोबरच्या पत्रात बॅपटिस्टा यानी लिहिले की "लॅन्सबरी यांच्यासह मी सहा ठिकाणी जाऊन व्याख्याने दिली व हल्ल येथील मोठ्या मजूर परिषदेपुढे मी लीगचा स्वतंत्र प्रतिनिधी म्हणून जाणार आहे."

ता. २६ डिसेंबर रोजी कलकत्ता येथे ३२ वी राष्ट्रीय सभा भरली. सुमारे पाच हजार प्रतिनिधी जमले होते. बाबु वैकुंठनाथ सेन यानी वर्षातील राजकीय चळवळीचा आढावा घेतला व त्यानंतर बेझंटबाईनीहि स्वतंत्र समालोचन करून आपला उज्ज्वल संदेश सांगितला. याच वर्षात ब्राह्मणेतर चळवळ विशेष सुरू झाली होती. म्हणून मद्रासच्या ब्राह्मणेतराकडून व पंचम लोकाकडून स्वराज्याच्या मागणीला अनुकूल असा संदेश काँग्रेसकडे आला होता ही गोष्ट महत्त्वाची होय. शिवाय सुमारे बारा लक्ष सह्यांचा अर्ज माँटेग्यू साहेबाकडे परस्पर पाठविण्यात आला होता. सभेत विलायतेस डेप्यूटेशन पाठविण्याचे ठरून त्याची अंमलबजावणी करण्याचे काम ऑल इंडिया काँग्रेस कमिटीकडे सोपविण्यात आले. तसेच मजूर परिषदेला बॅ. बॅपटिस्टा याना हिंदी राष्ट्राचे प्रतिनिधी म्हणून व मि. पोलॉक याना दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांचे प्रतिनिधी म्हणून पाठवावे असाहि ठराव मंजूर झाला.

ता. २२ रोजी माँटेग्यूसाहेब मुंबईस येऊन दाखल झाले होते. तेथे मुंबई कौन्सिलाचे सभासद अंजुमान–इ–इस्लाम डेक्कन सभा इनामदार वर्ग हिंदी–खिस्ती-मंडळ रयत असोसिएशन कामगार हितवर्धकसभा लिंगायतसभा सार्वजनिकसभा अस्पृश्य वर्ग व्यापारी संघ प्रेसिडेन्सी असोसिएशन पारशी समाज गुजराथचे सरदार व जैन समाज इतक्या लोकांची शिष्टमंडळे त्याना भेटली व अनेक खाजगी भेटीहि झाल्या. माँटेग्यू साहेबाकडे अखेरपर्यंत एकंदर ११० शिष्टमंडळे गेली व त्यानी ३३० गृहस्थांच्या भेटी घेतल्या. या ११० अर्जापैकी ३५ काँग्रेसच्या मागणीला पूर्णपणे पाठिंबा देणारे होते. २७ नी काँग्रेसची मागणी मागून शिवाय

त्यात आपलीहि काही भर घातली होती. २४ अर्जात काही विशिष्ट संस्थाकरिता किंवा जातीकरिता वेगळ्या मागण्या केल्या होत्या पण काँग्रेसच्या मागणीला त्यांची प्रतिकूलता नव्हती. फक्त २४ अर्जात सुधारणांच्या योजनेला विरोध होता. या पैकी ४ अर्ज अँग्लो इंडियन रहिवाशांचे व ५ अँग्लो इंडियन व्यापारी मंडळाचे होते. तसेच ५ मागसलेल्या वर्गाचे व काही मद्रास इलाख्यातील मुसलमानांचे होते. यातील काही संस्था मॉंटेग्यू साहेब येणार म्हणून मुद्दाम नव्याच तात्पुरत्या बनविण्यात आल्या होत्या !

## ( १० ) टिळकांचा मोठा दौरा

ता. २६ जानेवारी रोजी लोणावळे येथे बॅ. मुकुंदराव जयकर यांचे अध्यक्षतेखाली पुणे जिल्हासभा भरली. त्यानी आपल्या भाषणात सर्व सामान्य राजकीय प्रश्नाबरोबर मुंबई इलाखा व पुणे जिल्हा यातील स्थितीचे विशेष समालोचन केले. बॅ. जयकर हे मुंबई येथील नागरिक खरे, परंतु पुणे जिल्ह्याशीहि त्यांचा संबंध असून या सभेच्या प्रसंगाने त्यानी महाराष्ट्रातील राजकारणात प्रथमच प्रवेश केला. या परिषदेला टिळक हजर असून तेथे त्यांची व्याख्याने झाली व त्यानंतर ते लवकरच वऱ्हाड नागपुराकडील आपल्या मोठ्या सुप्रसिद्ध दौऱ्यावर निघाले.

या दौऱ्याचा कार्यक्रम सांगण्यापूर्वी प्रस्तावनेदाखल त्याचे थोडेसे वर्णन आगाऊच दिले असता ते वाचकाना आवडेल असे वाटते. आणि सुदैवाने उमरावतीचे टिळक भक्त यानी केलेले या दौऱ्याचे एक सुंदर वर्णन उपलब्ध असल्यामुळे तेच सारांश रूपाने येथे देतो. बाबासाहेब खापर्डे हे टिळकांच्या वऱ्हाडातील दौऱ्यात बरोबर व्यवस्थेला होते. ते लिहितात:---"रात्री ११ नंतर व दोन प्रहरी १–२ तास एवढा वेळ खेरीज करून मी टिळकांच्या सान्निध असे व या काळात टिळकहि मोटारीतून प्रवास करीत असत किंवा व्यासपीठावर उभे राहून बोलत असत. आणि या सर्व काळात त्यांच्या भोवती इतकी गर्दी असे की त्या अवधीतील कोणत्याहि प्रसंगाचे चित्र काढावयाचे तर आधी चिकार गर्दी काढावी लागेल व मग त्यात टिळक कोठे आहेत हे हुडकून काढावे लागेल. अशा गर्दीतून टिळकाना काढून नेणे आणणे ही मोठी काळजीची व जिकिरीची गोष्ट होई. टिळकाना मधुमेहाची व्यथा असल्याने लोकानी गर्दी करू नये अशी सूचना लिहिलेली हस्तपत्रके वाटली जात असत. पण त्यांचा फारसा उपयोग होत नसे. टिळकाना कष्ट पडावे किंवा इजा व्हावी अशी इच्छा कोण करणार ? पण आपण गर्दी करितो याचा परिणाम तसा होतो हे त्यांच्या ध्यानात येत नसे. केवळ मोठ्या गावांच्या ठिकाणीच अशी गर्दी होत असे असे नाही. तर प्रवासात वाटेवरहि प्रत्यक्ष मुक्काम नसला तरी गाव भेटेल तेथे मोटार थांबवून उभ्या उभ्या तरी मुक्काम करावा लागे. आणि तेव्हा तर मोटारीभोवती इतका गराडा पडे की यातून आता पुढे मोटार कशी न्यावी ही पंचाईत वाटे. दिवसा रात्री वेळी अवेळी मोटारीच्या वाटेवर लोक वाट

पाहात बसत. गीतांजलीचा कर्ता स्वतःचे वर्णन करतो ते या मार्गप्रतीक्षा करणाऱ्या प्रेक्षकाना लागू पडते. " सकाळ गेली दुपार गेली तरी मी वाटेवरच्या भिकाऱ्यासारखा बसलोच आहे. गवतावर बसून मी वाटेकडे डोळे लावले. पण वेळ ओसरत चालला. आणि देवा तुझ्या गाडीच्या चाकाचा शब्दहि अजून ऐकू येत नाही ! '

"मोटार थांबली म्हणजे जणू काय टिळकांचा देह आणि मोटार ही एकच मानून मोटारीच्या सापडल त्या अंगाला स्पर्श करून टिळकांच्याच पायाला हात लागला अशा भावनेने ते तो आपल्या कपाळाला लावीत. आमची विनंति कदाचित लोकाना खोटी वाटेल म्हणून स्वतः टिळक गयावया करून लोकाना सांगत की खरोखरच माझा पाय दुखतो आहे व हे सांगतात ते काही खोटे नाही. असे म्हणून त्यानी पाय पुढे करून त्यावरील जखमेची पट्टी दाखवावी. पण त्यानेहि काम भागत नसे. तेव्हा पायापेक्षा हाताचे दर्शन अधिक चांगले अशी एक नवी टूम योजून आम्ही ती लोकाना पटविण्याचा प्रयत्न करू लागलो. पण दर्शनाच्या बाबतीत हात आणि पाय यातील फरक लोकाना जुना माहीत तोच सांगून त्यानी आम्हाला मोडून काढावे. आडमार्गाला दिवे नसत तेव्हा त्याऐवजी पाल्यापाचोळ्याचे ढीग रचून मोटार येताच कोणी ते पेटवून देत मग काय उजेडच उजेड ! टिळक स्वराज्याच्या चळवळीकरिता हिंडत आहेत व लोक त्याकरिता वर्गणी गोळा करीत आहेत या माहितीमुळे, रस्त्याजवळ असलेल्या गावाकडे थोडी वाकडी वाट करून टिळकानी यावे म्हणून कोणी म्हणत ' आपल्या चळवळीला वर्गणी द्यावयाची आहे गावात चलाल तर देऊं.' पण व्यवस्थापक मंडळी अशा आयत्या वेळच्या सूचना मोडून काढीत.

"या दौऱ्यामध्ये टिळकांवरील लोकप्रियतेचे आक्षेप व त्यांचा खरा परिहार यांचा उमज पडण्यासारखा होता. लोकप्रियतेचे सोंग कोणी आणून येत नाही व जेथे खरी लोकप्रियता नाही तेथे प्रयत्नाने रचलेले समारंभ फिके पडतात. पण टिळकांच्या दौऱ्यात कोणी पत्र धाडले नाही कोणी निरोप पाठविला नाही. ते अमुक वेळी येतील किंवा न येतील याची पुरी माहिती नसताही केवळ जमल्यास दर्शन घ्यावे असे म्हणून नुसत्या वदंतेवर लोक जमत. ही लोकप्रियता खरी अकृत्रिम कशी न मानावी ? व अशा अकृत्रिम प्रेमाचा आनंद टिळकानीहि का मानू नये ? टिळकांच्या मागे देश धावतो या लाक्षणिक म्हणीचे थोडे तरी प्रत्यक्ष गमक त्यांच्या दौऱ्यात कोणासहि पाहावयास मिळाले असते. ज्याच्या डोक्यावर कष्टाच्या धुळीचे कण नित्य पडतात त्याच्या डोक्यावर फुलाच्या पाकळ्या केव्हा केव्हा पडून त्यानी ते कण झाडून टाकल्यास त्यात काय वावगे ? दौऱ्याचे श्रम होत असूनहि टिळक व्याख्यानाला उभे राहिले म्हणजे श्रमाकडे न पाहता व्याख्यान देत. ते इतके की टिळकांचे वय ६४–६५ पर्यंत आहे त्याना मधुमेहाची व्यथा आहे आणि अलीकडे त्यांची प्रकृति बरी नाही असे कोणी म्हटले तर व्याख्यान

ऐकणारे लोक त्यालाच वेडे म्हणत. निदान तो अर्थवाद असे ठरवीत. व्याख्यान संपून घरी गेल्यावर त्याना खरोखरीच शीण किती येतो हे कोण पाहणार? वाशिमहून कारंजा हा प्रवास १२५ मैलांचा तो एका दिवसात उरकावा लागला. सकाळी १०॥ वाजता आगेमागे दोन व्याख्याने पुसद येथे झाली. पैकी दुसरे नदीच्या तापलेल्या वाळवंटात दोन प्रहरी १२। पासून -॥- वाजेपर्यंत म्हणजे अर्धातास झाले. फिरून ३–३॥ ला मोटारी निघाल्या त्या कारंज्यास रात्री ९ वाजता पोहोचल्या. वाटभर श्रमाने टिळक झोपेच्या गुंगीतच पडले होते. रात्री व्याख्यान देण्याचे टिळकांच्या जिवावर आले तेव्हा त्यानी मंडपात नुसते येऊन जावे, एवढेच नव्हे तर दुसरे दिवशी सभा वगैरे काही व्हावयाची नाही मंडपात व्याख्याने इतरांचीच होतील, असे हडसून खडसून ठरले असता टिळकाना व्याख्यानाला उभे राहावे लागले व ते ५५ मिनिटे बोलले. दुसरे दिवशी गावचे लोक विनोदाने त्याना म्हणाले " आपणच करार मोडलात. आपणच बोलू लागलात त्याला आम्ही काय करावे ? "

"व्याख्याने ऐकण्याला आनंद होत असला तरी टिळकाना श्रम होतात याची जाणीव सुज्ञ लोकाना अगदीच नव्हती असे नाही. पण त्याना असा मोह पडे की टिळकाना थोडे श्रम होतील खरे पण आम्हा दूर गावच्या लोकाना तरी असा प्रसंग कधी लाभणार? व्याख्यानात बोलण्याचे श्रम म्हणून एरव्हीच्या वेळात जवळचे लोक वादाचा विषयच मुद्दाम टाळीत. पण एखादा विचार सुचला म्हणजे टिळक आपण होऊनच बोलणे काढीत. खामगावाहून जळगावास जाताना प्रेमसुखराय राठी नावाचे गृहस्थ निरोप देण्याकरिता आले. त्यांची ओळख करून दिल्यावर मोटार चालू झाली. तेव्हा टिळक म्हणाले " काल तुम्ही लोकानी अनेक नावावर कोट्या केल्या. या गृहस्थाचे नाव मात्र त्यातून वगळले गेले. राठी हा राष्ट्रीय शब्दाचा अपभ्रंश होय." अशी प्रस्तावना करून राष्ट्रावरून राष्ट्रधर्म राष्ट्र-धर्मावरून धर्म धर्मावरून संस्कृति संस्कृतिवरून परिस्थिती असे विषय निघून धर्माच्या परकीयानी केलेल्या व्याख्या इकडील तत्त्ववेत्त्यानी केलेल्या व्याख्या वगैरेची उजळणी झाली. असेच एकदा मोटारीत बुद्धी व स्फूर्ती यासंबंधी सहज चर्चा निघाली. त्यावरहि टिळकांचे धावते प्रवचन बराच वेळ चालू राहिले. व त्यानी आपला असा सिद्धांत सांगितला की विवेचक बुद्धी व स्फूर्ति ही एकाच मनुष्यात नांदू शकतात. राममोहनरायसारखे लोक हे जितके तार्किक तितकेच श्रद्धाळू व भावनामय असत. पण त्यानी काढलेल्या ब्रह्मसमाजाचा मूळ पाया स्फूर्तीपेक्षा बुद्धीवर अधिक आणि बंगाली लोक तर जात्या भावनाप्रधान म्हणून बंगाल्यात ब्राह्मधर्म फारसा रुजला नाही असे टिळक म्हणाले. एकदा दंतकथेच्या उगमावर अशीच चर्चा झाली. एक ठिकाणी एक मुसलमान गृहस्थ टिळकाना भेटून हार घालून चार शब्द बोलून परत गेला. तेव्हा खापर्डे म्हणतात मी थट्टेने

म्हणाले "आता हा चावडीत जाऊन लोकाना सव्वा हात खोट्या गोष्टी सांगेल." त्याचे काल्पनिक भाषण मी बोलून दाखविले. तेव्हा दंतकथाहि अशाच निर्माण होतात हा सिद्धांत टिळकानी समजावून सांगितला. वऱ्हाडच्या दौऱ्यातच अकोट येथे व्याख्यानात ब्युरॉक्रसीचे वर्णन करता करता 'नोकरशाही' हा शब्द मनात सहज बनून टिळकांच्या तोंडी आला. तात्पर्य "या दौऱ्यात नुसता मैलोगणती प्रवास झाला नसून बुद्धीला उद्‌बोधक असे अनेक प्रसंग घडले."

खापर्ड्यांनी मार्मिकपणे वर्णन केलेला हा दौरा १९१८च्या फेब्रुवारी ता.५पासून २० पर्यंत सुरू होता. इतक्या थोड्या अवधीत फार मोठा प्रवास करावयाचा म्हणून मुक्काम ठरविण्याकरिता वामनराव जोशी यानी जिल्ह्याजिल्ह्याचे नकाशेहि बरोबर पुण्यास आणले होते व त्यावरून कार्यक्रम ठरविण्यात आला. रोज प्रवास ३।४ तासाहून अधिक नाही व व्याख्यान एकाहून अधिक नाही अशा अटी टिळकानी घातल्या पण त्या पाळल्या गेल्या नाहीत. दौरा ठरविण्याकरिता पुण्यास पुढारी गेले असे ऐकताच वऱ्हाड नागपूर भागातील शेकडो गावानी तारा व पत्रे पाठवून आपल्या गावी मुक्काम ठरविण्याचा आग्रह केला. एका गावच्या पुढाऱ्याने असे लिहिले की, "या दौऱ्यात आमचा गाव तुम्ही गाळला तर तो जाळला असे आम्ही म्हणू." पण पंधरा दिवसात किती गावे घ्यावयाची व किती मुक्काम करावयाचे याची मर्यादा दुस्तर होती. ती सांभाळून कार्यक्रम आपल्याकडून ठाकठीक करून मंडळी पुढील तजविजीला निघून गेली. लोकाना आगाऊ सूचना असावी म्हणून मंगळवार ता. ५ ला रात्री मुंबईहून कलकत्ता मेलने निघाल्यापासून गुरुवार ता. २१ रोजी पुण्यास परत येण्याकरिता मध्यरात्री भंडाऱ्याहून निघेपर्यंत गावोगावचा कार्यक्रम छापून त्याच्या हजारो प्रती ठिकठिकाणी पाठविण्यात आल्या. कोठेहि कार्यक्रम लांबवू नये टिळकाना त्रास देऊ नये ठरल्याबाहेर कार्यक्रमाचा आग्रह करू नये अशी सूचना व विनंति छापील हस्तपत्रकात केली होती. शिवाय ती न पोचतील अशा गावच्या लोकाना माहिती व्हावी म्हणून आदल्या केसरीत मुद्दाम स्फुट लिहून लोकानी कसे वागावे याविषयी संपादकानी सूचना दिल्या होत्या.

दौऱ्याला असा प्रत्यक्ष प्रारंभ खामगावापासून झाला. पण खरा प्रारंभ आधी मुंबईपासूनच झाला. कारण ४ तारखेला सायंकाळी कोळशाच्या व्यापाऱ्यानी टिळकाना पानसुपारी केली व शेट मुरारजी यानी ५७११ रुपयांची थैली टिळकाना नजर केली. या समारंभाला म० गांधीहि हजर होते. खांडव्यास वयोवृद्ध पुढारी हरिदास चतर्जी यांच्या अध्यक्षतेखाली सभा व व्याख्यान झाले. १८९२ साली स्वामी विवेकानंदांच्या सत्काराला खांडव्यास मोठी सभा भरली होती त्याची फिरून लोकाना आठवण झाली. येथील व्याख्यान टिळकानी मोडक्या तोडक्या हिंदीतच दिले. कारण व्यवस्थापकानी छापील कार्यक्रमात आगाऊच तसे लिहून टिळकावर मात केली होती. ता. ६ रोजी दोन अडीच तासामध्ये

वाटेतल्या वाटेत बऱ्हाणपुरचा कार्यक्रम झाला. नंतर भुसावळेवरून रात्री १२ वाजता मंडळी मलकापुरास जाऊन पोहोचली. तेथील वकील पिंपळीकर याजकडे मुक्काम होता. ता. ७ रोजी सकाळी शेट राधाकिसन यांच्या मळ्यामध्ये सभा झाली. मलकापुरकरानी चार हजार रुपयांची थैली अर्पण केली. ता. ७ रोजी आगगाडी सुटून मोटारचा प्रवास सुरू झाला. एकंदर चार मोटारी बरोबर होत्या. पैकी आघाडीच्या मोटारीतून वामनराव जोशी दवंडे बल्लाळ वगैरे मंडळी पुढच्या मुक्कामाला जाऊन आगाऊ व्यवस्था करीत. मलकापुराहून पहिला मुक्काम बुलढाण्यास झाला. आण्णासाहेब पिंप्रीकर वकील यांचे घरी तळ पडला. सायंकाळी व्याख्यान झाले. बापट वकील हे अध्यक्ष होते. शेवटी सौ० जानकीबाई कानीटकर यानी भगिनी मंडळाच्या स्वराज्यसंघाच्या अधिकारी म्हणून जमविलेली वर्गणी टिळकापुढे ठेविली. बुलढाण्यानंतर चिखली येथील मुक्काम झाला. नंतर खामगाव आले. तेथे मानपत्र समारंभ होऊन चांदे वकील यानी ६७०० रुपयांची थैली नजर केली. तसेच कोणी जोगळेकर भटजीनी आपली ५०० रुपयांची विम्याची पॉलिसी स्वराज्यसंघाला दिली!

ता. ९ रोजी खामगावाहून दौरा नांदुरा येथे गेला. शे० नथमलजी हे सभेचे अध्यक्ष होते. काळेले वकील यानी नांदुऱ्यातर्फे एक हजार रुपये दिले. याच्या पुढील मुक्काम जळगाव जामोद येथे पडला. वाटेत नदीच्या वाळवंटात अडचण होती ती आसपासचे लोक येऊन त्यानी दूर केली. येथील मुक्काम पांडुरंग दिनानाथ पुंडलीक याचे घरी होता. येथेहि पांच हजार रुपयांची थैली देण्यात आली. जळगाव येथील व्याख्यान संपून टिळक मंडपातूनच निघाले ते रात्री शेगावास गेले. वाटेत एका नदीवर एका चांभाराने कनवटीचे दोन रुपये काढून टिळकांच्या हातावर ठेवले व नदीपार जाण्याच्या व्यवस्थेकरिता गाडी उभी राहिली तेव्हा सहजच त्याने टिळकाशी १०।५ मिनिटे बोलण्याचा आनंद सेवन केला! शेगावापासून तेल्हाऱ्याचा मार्ग बराच त्रासदायक होता. मोर्णा व पूर्णा या दोन नद्या वाटेत लागतात. पैकी पूर्णेवर लोकानी शेकडो वाळूची पोती टाकून त्यावर फळ्या पत्रे हंतरून मोटारीकरिता लष्करी थाटाचा पूलच बनविला होता. दोन प्रहरी ११ वाजता मंडळी तेल्हारा येथे पोहोचली व लगेच तेथे व्याख्यान झाले. तेल्हाऱ्यातर्फे १७०० रु. व भगिनी समाजातर्फे सुशिलाबाई जोशी यानी ३०० रु. अशा देणग्या स्वराज्यसंघाला दिल्या. ता. १० रोजी सायंकाळी ४ वाजता टिळक अकोट येथे पोहोचले. तेथील समारंभ विशेष थाटाचा झाला. व गावकऱ्यानी स्त्रीपुरुषातर्फे सुमारे ४८०० रुपयांची थैली दिली.

ता. ११ रोजी अकोटहून टिळक निघाले ते दुपारी १०॥ वाजता अकोल्यास पोहोचले. रा. ब. महाजनी यांच्या बंगल्यावर मुक्काम झाला. व्याख्यानानंतर वासुदेवराव चिपळूणकर यानी ४३०० रु. ची थैली दिली. दोन प्रहरी तीन वाजता मंडळी वाशीमकडे निघाली. छोटे महाजनी दाते वकील वगैरे मंडळी

वेगळ्या मोटारी करून वाशीमपर्यंत पोहोचविण्याला गेली होती. वाशीम येथे पोहोचताच सभेची तयारी होती. येथेहि मानपत्रसमारंभ व्याख्यान वगैरे झाल्यावर रा. दिघे यानी ३५०० रु ची थैली दिली. एका सुवासिनीने सोमवतीच्या म्हणून १०८ चवल्या दिल्या. ता. १२ रोजी सकाळी वाशीमहून निघून पुसद येथे ११ वाजता पोहोचले. पूर्वी सांगितलेले तापलेल्या वाळवंटातील व्याख्यान येथेच झाले. संध्याकाळचा मुक्काम कारजे येथे झाला. हा गाव श्रीमंतांचा असल्यामुळे तेथील थाटहि विशेष श्रीमंतीचा होता. व्याख्यानानंतर गांवकऱ्यानी तीन हजारांची थैली दिली.

ता. १३ रोजी सकाळी दहा वाजता टिळक मूर्तिजापूर येथे पोहोचले. येथेहि उन्हाच्या वेळीच व्याख्यान झाले. येथेहि सुमारे दोन अडीच हजारांची थैली नजर करण्यात आली. येथे एक संस्कृतज्ञ पंडित भेटले. त्यानी संस्कृतात भाषण केले व संस्कृत कवितांहि अर्पण केल्या. यानंतर पुलगावचा प्रवास आगगाडीने झाला. येथे नागपूरची मंडळीहि सामोरी आली होती. येथेहि ७०० रु. ची थैली गावकऱ्यानी दिली. पण विशेष आश्चर्य हे की शिवाप्पा नावाच्या एका लिंगायत गृहस्थाने स्वराज्य चळवळीला देवाचा प्रसाद म्हणून आपल्या गळ्यातील रुप्याचे लिंग काढून दिले! तेथून ता. १४ रोजी छोट्या गाडीने सर्व मंडळी आर्वी येथे पोहोचली. येथे मुक्काम चिपळूणकर वकील यांजकडे होता. पुण्यातील सुप्रसिद्ध सिताराम हरी चिपळूणकर यांचे हे चिरंजीव. येथे स्त्रियांतर्फे एक व पुरुषांतर्फे एक अशी दोन मानपत्रे देण्यात आली. शेवटी सात हजारांची थैली व शिवाय स्त्री मंडळामार्फत ६०० रु. देण्यात आले. आर्वीहून परत पुनः पुलगावास रात्री विश्रांतीला येऊन दुसरे दिवशी सकाळी ८॥ वाजता सर्व मंडळी वर्ध्यास पोहोचली. तेथून दोन प्रहरी बारा वाजता वरोडा येथे जाऊन जेवणखाण करून तिसरे प्रहरी टिळक हे चांदा येथे पोहोचले. रात्री गंगाधरराव देशपांडे यांचे अध्यक्षतेखाली सभा झाली. म्यु. प्रेसिडेन्ट चेंडके वकील यानी मानपत्र व सहा हजारांची थैली अर्पण केली.

दुसरे दिवशी चांदा जिल्हा परिषदेचे काम सुरू होते तेथे काही वेळ घालवून टिळक वणी येथे गेले. येथील कार्यक्रमात पुढारीपण बापूजी अणे यांजकडे होते. कारण हा त्यांचा मूळ गाव. येथेहि तीन हजारांची थैली अर्पण करण्यात आली. वणीहून टिळक पांढरकवडा येथे गेले. येथेहि दोनप्रहरी बारा वाजताच व्याख्यान देण्याचा प्रसंग पडला. प्रथम केळापूर तालुक्यातील नागरिकांतर्फे मानपत्र दिल्यावर गद्रे वकील यानी ३७०० रु. ची थैली अर्पण केली. पांढरकवडा या गावी दुसरे बाजीराव पळ काढीत असता गेले होते असे नमूद आहे. अर्थात् हा विनोदाचा विषय असल्यामुळे स्वराज्य घालविण्याला निघालेले बाजीराव व मिळविण्याला निघालेले टिळक या दोहोंची तुलना भाषणातून झाली! स्वराज्य हेच दोघांच्या धावपळीचे कारण. पण एकाचे स्वराज्य जाण्याच्या पंथाला लागले

होते व दुसऱ्याचे स्वराज्य येण्याच्या मार्गाला लागले आहे अशी मार्मिक कोटी एकाने केली. पांढरकवड्याहून फिरून वणीच्या मार्गाने टिळक वरोडा येथे सायंकाळी सहा वाजता पोहोचले. येथे हौशी लोकानी मोटारी बाजूला सारून उघड्या बैलांच्या रथातून मिरवणूक काढिली. येथेहि मुकुंदराव पाटील ऑनररी मॅजिस्ट्रेट यांच्या हस्ते मानपत्र व २५०० रु. ची थैली देण्यात आली. चांदा वणीकडे जाताना टिळक वर्ध्यावरून गेले. परंतु खुद्द वर्धा येथील समारंभ ता. १८ रोजी ठरला होता. चांदा येथील सभा संपवून गंगाधरराव देशपांडे वर्धा येथे बरोबरच्या मंडळीत समाविष्ट झाले. तेथे मोठ्या चौकात व्याख्यान झाले. व त्यानंतर अत्रे वकील यानी ५१०० रु. ची थैली दिली.

वर्धा येथे बरोबरच्या मंडळीची पांगापांग झाली. खाडीलकर मुंबईस गेले. गोखले याना काही कामाकरिता कलकत्त्यास पाठविण्यात आले. वामनराव जोशी व गंगाधरराव देशपांडे हे उमरावतीस गेले. व टिळकाना नागपुरकर मंडळीच्या स्वाधीन करण्यात आले. वर्ध्यानंतर जवळच शिंदी येथे पुढचा मुक्काम झाला. दुसरे दिवशी सकाळी शिंदी हिंगणी सेलू वगैरे अनेक गावातर्फे मिळून मानपत्र देण्यात आल्यावर २७६० रु. ची थैली अर्पण करण्यात आली. शिंदीहून टिळक निघाले ते नागपूरास १०॥ वाजता पोहोचले. नागपूर येथे उमरेड व काटोल येथील पुढारी मंडळी आली व आयत्या वेळचे हे आमंत्रण स्वीकारून टिळक उमरेड येथे दोन वाजता पोहोचले. तेथेहि मानपत्र व व्याख्यान समारंभ होऊन १६००-१७०० रु. ची वर्गणी स्वराज्यसंघाला देण्यात आली. हा समारंभ उरकून टिळक परत नागपूरास संध्याकाळी सात वाजता आले. शहरात यावेळी प्लेग असल्यामुळे माधवराव पाध्ये वकील यांच्या बंगल्याच्या मैदानात व्याख्यानाची व्यवस्था केली होती. कवि ताम्हनकर यानी स्वागतार्थ पद्ये म्हटल्यावर टिळकांचे व्याख्यान झाले व नागपुरकरातर्फे ९ हजारांची थैली देण्यात आली. त्याच रात्री टिळक काटोल येथे गेले. तेथे पोहोचण्यास अपरात्र झाली. म्हणून दुसरे दिवशी सकाळी व्याख्यानाचा समारंभ झाला व १४०० रुपये रोख देऊन स्वराज्यसंघाचे १४ तहाहयात सभासद झाल्याचे जाहीर करण्यात आले. परत येताना मोहपा येथे घाईघाईने मानपत्र व थैली देण्याचा समारंभ झाल्यावर टिळक नागपुरास जाऊन तेथून रात्री भंडाऱ्याला गेले. पूर्वी जो कार्यक्रम छापून प्रसिद्ध केला होता त्या वेळी टिळकाना पोहोचता आले नाही. आणि कोणास काहीच माहीत नसल्याने कोणी सामोरे आले नाही इतकेच नव्हे तर मोटारीला गोखले वकिलांचे घर हुडकीत जावे लागले! एवढ्या मोठ्या दौऱ्यात हा एक मोठा गमतीचा अपवाद घडला. रात्री ११ नंतर सर्व कार्यक्रमाची रचना. या मुक्कामातील आणखी एक मौज अशी की रात्री नाटकगृहात नाटक सुरू झाले होते. पण अवचित टिळक आल्याची बातमी कळताच प्रेक्षकानी नाटकाला रामराम ठोकला आणि थिएटर ओस पडून नाटक थांबवावे लागले. दुसरे दिवशी सकाळी आठ वाजता जिल्हा परिषदेच्या

मंडपात टिळकांचे व्याख्यान होऊन डेप्युटेशन फंडाकरिता ४५०० ची देणगी देण्यात आली. ता. २१ रोजी दोन प्रहरी टिळक भंडाऱ्याहून नागपुरास आले व तेथे त्यानी एक दिवस स्वस्थपणे मुक्काम केला.

दौऱ्याच्या या शेवटल्या २–३ दिवसात कार्यक्रमाची थोडी घालमेल झाली. याचे कारण असे की टिळकाना ता. २३ रोजी दिल्ली येथे जाऊन ऑ. इं. कॉं. कमिटीच्या सभेला हजर राहावयाचे होते. या सभेत कॉंग्रेसतर्फे विलायतेला शिष्ट-मंडळ पाठविण्याची वाटाघाट होणार होती. पण दिल्ली येथे टिळकाना जाण्याची यापूर्वी सरकारी हुकुमाने मनाई झाली होती ती मनाई अमलात असताच मॉंटेग्यू साहेबानी दिल्ली येथे अनेक शिष्टमंडळांच्या भेटी घेतल्या. तेव्हा दिल्ली येथे जाण्याला त्याना तात्पुरती परवानगी मिळाली होती. अशीच परवानगी फिरून मिळावी म्हणून त्यानी दिल्लीच्या कमिशनरला तार केली होती. पण त्याचे उत्तर ‘ नाही ’ असे आले. ते टिळकाना नागपुरास पहिल्या खेपेस मिळाले. यानंतर फिरून त्यानी दुसरी तार हिंदुस्थानसरकारच्या होम मेंबरला व व्हाईसराय याना केली. उत्त-राची वाट पाहण्यात टिळकाना एक दिवस मोडावा लागला. म्हणून त्यात हे आयत्या वेळचे काही कार्यक्रम घेण्यात आले आणि थोडीशी घालमेलहि झाली. अखेर अपिलाच्या तारेचेहि उत्तर ‘नाही’ असेच आले. तेव्हा ता. २२ रोजी टिळक दुपारी नागपुराहून भलत्ने निघाले. सायंकाळी ४॥ वाजता धामणगावास मुक्काम झाला. तेथेहि सभा वगैरे होऊन हजार दोन हजारांची वर्गणी देण्यात आली. रात्री धामणगावाहून टिळक निघाले ते सकाळी दहा वाजता वरणगाव येथे आले. हाहि कार्यक्रम आयत्या वेळी ठरविलेला होता. येथेहि भर दोन प्रहरी उन्हात सभा करावी लागली. कारण लोकाना १०–१२ तासहि आगाऊ वर्दी मिळाली नाही. वरणगावाहून टिळक ४॥ वाजता निघाले ते भुसावळेस ५। वाजता आले. लगेच ६ वाजता सभा झाली. सभेच्या शेवटी शे. भगवानदास यानी तीन हजा-रांची थैली अर्पण केली. नंतर भोजन वगैरे उरकून टिळक आगगाडीत बसले ते २४ रोजी सकाळी मुंबईस पोहोचले व अशा रीतीने वऱ्हाड नागपुराकडील हा अपूर्व उत्साहाचा दौरा समाप्त झाला.

वऱ्हाड नागपूरच्या दौऱ्यात स्वराज्याच्या मागणीबरोबर लष्कर भरतीच्या प्रश्नावरहि टिळक ओघाने बोलत असत. या बाबतीत सरकाराने टिळकांच्या प्रय-त्नाना साहाय्य न करता उलट विरोध कसा केला याविषयी खऱ्या प्रकाराचे वर्णन पूर्वी दिलेच आहे. पण या प्रकारावर टिळक आपल्या भाषणातून जी टीका करीत तिचे सरकारला वैषम्य वाटले. या वैषम्याची परिस्फुटता या दौऱ्यात झाली. यव-तमाळचे डे० कमिशनर मि. चॅपमन यानी स्थानिक स्वराज्यसंघाला लिहून कळ-विले की “ टिळकांचे काही उद्गार सैन्य भरतीला उत्तेजन देणारे असे नसतात. म्हणून पुढे सभा भरवावयाच्या तर त्यात उत्साहभंग करणारी अशी भाषा सरकार बोलू देणार नाही. एखाद्या वक्त्याला आपण सैन्य भरतीला प्रत्यक्ष उत्तेजन द्यावे

असे वाटत नसेल तर त्याने त्या विषयावर मुळीच न बोलावे हे बरे. मध्यप्रांत सरकारच्या हुकुमावरून ही गोष्ट मी तुम्हाला कळवीत आहे." पण हा उलटा न्याय नव्हे काय? कारण टिळकानी पूर्वीच्या पुणे मुंबई येथील भाषणात व लेखात असे स्पष्ट उद्गार काढले होते की "सवड असता जो भारतरक्षक सैन्यात जाण्याला तयार होणार नाही तो खरा स्वराज्यभक्तच नव्हे असे मी म्हणेन. तुम्ही सैन्यात गेला नाही तर स्वराज्याची चळवळ निरुपयोगी म्हणून मी सोडून देईन." आणि स्वतः आपल्या मुलाला सैन्यात पाठविण्यास ते तयार झाले होते. असा पूर्वीचा इतिहास असता जर टिळकांची भाषणे लष्कर भरतीच्या उत्साहाचा भंग करणारी खरोखर होती असे सरकाराने मानले तर त्याचे इंगित काय असावे याचे अनुमान कोणालाहि करिता येईल.

पण टिळक हे लष्कर भरतीला विरोधी असे ठरवून ते कारण लावून टिळकाना दिल्लीस जाण्याची मनाई पूर्वीच करण्यात आली होती. व आता मध्यप्रांताच्या सरकारचाहि तोच इरादा होता. अकोल्याच्या अधिकाऱ्यानीहि यवतमाळ प्रमाणेच लेखी पत्र पाठविले व त्यात टिळकांच्या भाषणातील म्हणून काही उतारे दिले होते. पण जे इसम खरोखर इच्छा नसता अप्रत्यक्ष जुलमाने जबरीने जात असत त्याना उद्देशूनच त्यांचे शब्द होते. जो आपल्या इच्छेने जाईन म्हणतो त्याचा निरुत्साह करावयाचा! कारण राजकारणाने त्याचे मन दूषित झालेले आहे! आणि ज्याला राजकारण किंवा महायुद्ध यांची मुळीच माहिती नाही अशा लोकाना हातात बंदूक देऊन उभे करावयाचे किंवा लष्करच्या भाकरी भाजावयास लावावयाचे! यात स्वारस्य काय? अकोल्याच्या डे० कमिशनरने असेंहि लिहिले की टिळकांच्या या भाषणाबद्दल त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला न केला तरी राष्ट्ररक्षणकानूच्या २३ व्या कलमाखाली ती भाषणे येतील हे ध्यानात ठेवावे. पण या कायद्याने राष्ट्ररक्षणापेक्षा राष्ट्रभक्षणच अधिक होऊ पाहात होते. हा आक्षेप पूर्वीच टिळकाना माहीत होता. त्यावर त्यानी मार्च महिन्याच्या प्रारंभी पुण्यास बेझन्ट बाईची व्याख्याने झाली त्यावेळी एका प्रसंगी उत्तरहि दिले होते. त्यात त्यानी असे म्हटले होते की "या आक्षेपाना उत्तर म्हणून मी एकदाच सर्व स्वराज्यवादी लोकाकरिता प्रसिद्धपणे असे सांगून टाकतो की आम्ही सैन्यभरतीला पूर्ण अनुकूल आहो. साम्राज्य संरक्षणास सहाय्य करण्यालाहि आम्ही तयार आहो. ११।१६ रुपयाकरिता आम्ही कोणी सैन्यात जातो असे नाही तर या उच्च हेतूनेच. पण स्वराज्याकरिता या गोष्टी होणार म्हणून सरकारने ती दिशा व काही आशा दाखविली तर एकट्या महाराष्ट्रातहि २५ हजार सैनिक उभे राहतील!"

मॉंटेग्यू साहेबाकडे होमरूलचा अर्ज दाखल केल्यावर इकडे त्यासंबंधाने विशेष काही करण्याचे राहिले नव्हते व जे काही उरले सुरले राहिले होते ते इकडील लोक करीतच होते. मॉंटेग्यू यानी तरी स्वतः अर्ज व भेटी घेण्यापलीकडे निश्चित काही केले नव्हते. हे अर्ज व शिष्टमंडळांच्या कैफियतींचे भारे घेऊन

विलायतेस गेल्यावर मगच त्यांचा विचार त्याना कर्तव्य होता. अर्थात् यापुढील कार्यक्षेत्र विलायतेतच उपस्थित होणार या भावनेने टिळकानी विलायतेस जाण्याचे पक्के ठरविले. विलायतेहून बॅ. बॅप्टिस्टा यांचे अभिप्राय कसे येत होते व तगादा कसा होता हे पुढे दिलेल्या त्यांच्या काही पत्रावरून दिसून येईलच. चिरोल खटल्यात साक्षी पुराव्याकरिता इकडे कमिशन पाठविण्यात आले होते व त्यापुढील पुरावा दाखल करण्याचे उभय पक्षी काम संपले होते. कोंकण वऱ्हाड नागपूर कर्नाटक वगैरे अनेक भागातील दौरेहि आटोपले होते. इतर शेकडो ठिकाणची निमंत्रणे होती पण त्या त्या भागात जावयाचे म्हटले तर टिळकाना एक वर्षहि आणखी पुरले नसते. पण यापूर्वीच अनेक लोक स्वराज्यसंघाचे तहाहयात सभासद झाले होते. त्यानी वर्गण्या व देणग्या पाठविल्या होत्या व अर्जावर सह्याहि केल्या होत्या. यामुळे स्वतःपुरते इकडील काम येथेच थांबवून टिळकानी विलायतेस जाण्याचे ठरविले. कारण पासपोर्टहि आता मिळाले होते.

सोलापूर येथे ता. १९ मार्च रोजी जाऊन टिळक परत आले. तेथे त्यांची व्याख्याने होऊन ९ हजारांची थैली अर्पण करण्यात आली. नंतर पुण्याहून निघण्यापूर्वी ता. २१ मार्च रोजी रेमार्केटात मोठी जाहीर सभा भरली. शे. किकाभाई मोतीवाले हे अध्यक्ष होते. मुख्य ठराव शिवरामपंत परांजपे यानी मांडला. तो मांडताना परांजपे यानी सांगितले की " हिंदुस्थानाला स्वराज्य मिळू नये म्हणून विलायतेत मोठी चळवळ सुरू आहे. पेनशनरापासून विद्यार्थ्यापर्यंत अनेक इंग्रज लोक या चळवळीत सामील झाले आहेत पण इकडे या वर्गावर सरकारने आपली करडी नजर ठेवून त्याना चळवळीत पडण्याची बंदी केली आहे. लॉर्ड सिडेनहॅम हे आता निवळ पेन्शनर आहेत. तरी पण त्यानी युद्धाला मदत म्हणून नव्हे तर विरोधी चळवळीकरिता लाखो रुपयांचा फंड जमविला आहे. पण सुदैवाने प्रधानमंडळ व इकडील अधिकारी मंडळ याना हिंदुस्थानास काही थोडे तरी हक्क द्यावे असे वाटू लागले आहे. तरी तारतम्य भावाने त्यांचे समर्थन करून विलायतेतील लोकमत जागृत करण्याकरिता आपण इकडून शिष्टमंडळे पाठविली पाहिजेत. " नंतर पुणेकरातर्फे अकरा हजार तीनशे रुपयांची थैली मानपत्र व पोषाख टिळकाना देण्यात आला. उत्तर देताना टिळक म्हणाले " रिकामा न्हावी कुडाला तुंबड्या लावी " या म्हणीप्रमाणे लॉर्ड सिडेनहॅमसारखे लोक सुखासुखी आमच्या विरुद्ध चळवळ करीत आहेत. आणि आपण इतके दुःखात असता गप्प बसावे काय ? पण विलायतेतील लोकमत थोडे बहुत आम्हाला अनुकूल होत चालले आहे हे तिकडील सभा व परिषदा यांच्या ठरावावरून दिसून येत आहे. म्हणून काही थोडी खटपट करण्याकरिता शिष्टमंडळे जात आहेत. तथापि तिकडे व इकडे मनोमन साक्ष ठेवून चळवळीचा ध्वनी प्रतिध्वनी सारखा चालू राहिला पाहिजे. वीण्याच्या तारेचा ध्वनी घुमविण्याला तंबोऱ्याच्या भोपळ्याचे जसे सहाय्य होते तसे इकडील लोकमताने आम्हाला तिकडे पाठिंबा दिला पाहिजे. नंतर ता. २२

रोजी बंडगार्डनजवळ खंडवानी मॅन्शन येथे पुणे व लष्कर येथील अनेक वर्गातर्फे पानसुपारी व वनोपहार यांचा समारंभ फारच थाटाचा करण्यात आला होता. सदर प्रसंगी नेमस्तपक्षातर्फे हरी नारायण आपटे वगैरे अनेक गृहस्थ हजर असून आपटे यानी टिळकाना आदरपूर्वक निरोप दिला. ता. २३ मार्च रोजी सार्वजनिक सभेतर्फे असाच निरोप देण्याचा समारंभ झाला व पेठेनिहायहि पानसुपाऱ्या झाल्या. यापूर्वी दादासाहेब खापर्डे हेहि टिळकाबरोबर जाण्याकरिता पुण्यास आले होते. त्यांचे स्वागत करून त्यानाहि निरोप देण्यात आला.

शनिवार ता. २३ रोजी रात्री दहा वाजता शिष्टमंडळ पुण्याहून निघाले तेव्हा टिळकांच्या वाड्यापासून रास्ता पेठेपर्यंत लोकानी कमानी व तोरणे उभारली होती. आठ वाजल्यापासून रस्त्यात लोकांची दाटी झाली होती. मिरवणुकीबरोबर १००।२०० दिवे होते. तो सर्व दिवस व रात्री गाडीत पाय ठेवीपर्यंतचा वेळ टिळकांचा अतिशय धांदलीचा गेला. अडली उरली कामे निकालात निघाली. कोणाला शिफारशीची पत्रे चिठ्या चपाट्या द्यावयाच्या त्या देऊन झाल्या. मुलासंबधाची व्यवस्था झाली. ताईमहाराज प्रकरणाचा सर्व निकाल लागून गेल्यामुळे श्रीजगन्नाथमहाराज यांच्या हातात त्यांची बहुतेक सर्व इस्टेट आली होती. "या प्रकरणात आपणाकडून जो खर्च करण्यात आला होता त्याच्या परत फेडीची काही व्यवस्था मजकडून करवून घ्या" असे जगन्नाथमहाराजानी आग्रहपूर्वक व विनंतिपूर्वक सांगितल्यावरून ताईमहाराज प्रकरणातील वकील गोपाळ मोरेश्वर पटवर्धन व हायकोर्ट वकील जगन्नाथ रघुनाथ घारपुरे या दोघाकडे एक निवाड पत्र तयार करण्याचे काम टिळकानी जगन्नाथमहाजाना सांगितले होते. त्यांचीहि बैठक याच दिवशी होऊन उभयतानी एकंदर हिशेबाचा आढावा घेऊन उरल्या बाकीला लवादी निकालाचे स्वरूप देऊन तो टिळकासमक्ष जगन्नाथमहाराज यांचे स्वाधीन केला. शिलकी उरलेले कागदपत्र व पत्रव्यवहार यांची व्यवस्था करण्यात बराच वेळ गेला. अशा रीतीने सगळे काम गर्दीने संपवून टिळक व खापर्डे गाडीत येऊन बसले. या मंडळीकरिता राखून ठेवलेले डबे स्टेशनावर गर्दी होऊ नये म्हणून रस्त्यालगतच्या एका सायडिंगवर आणून ठेवले होते. तेथपर्यंत मिरवणुकीची गर्दी आली व तीतूनच टिळकानी कसाबसा डब्यात पाय ठेवला.

मुंबईस पोचल्यापासून कार्यमालिकेला सुरवात झाली. सकाळी ते अस्पृश्यता निवारक परिषदेला गेले. दोन प्रहरी तीन वाजता मारवाडी विद्यालयात शे० गोविंद लालजी यांचे अध्यक्षतेखाली केवळ मारवाडी समाजाची सभा झाली व पंधरा हजारांची थैली दिली. वर्ध्याचे शे० जमनलाल बजाज यानी स्वयंसेवक होऊन सभेची सर्व व्यवस्था ठेविली होती. ता. २५ रोजी रात्री एल्फिन्स्टन रोडवर सुमारे ४० गिरण्यातील कामगारानी पानसुपारी केली. लॉर्ड सिडेनहॅम यांच्या कारकीर्दीत टिळकाना शिक्षा होऊन मजूर वर्गानी अलोट सहानुभूति व्यक्त केली होती. तेच लॉर्ड सिडेनहॅम आज विलायतेत विरोध करीत आहेत आणि

त्याला काही प्रतिकार करण्याकरिता टिळक जात आहेत ही मर्माची गोष्ट अध्यक्ष गंगाधरराव देशपांडे यानी सांगितली ती त्याना अतिशय पटली. सोळा हजार मजुरानी प्रत्येकी एकएक आणा देऊन एक हजार रुपयांची थैली तयार केली होती ती टिळकाना अर्पण करण्यात आली. सोमवार ता. २६ रोजी आण्णासाहेब नेने यांचे घरी पैसाफंडातर्फे सत्कार झाला. सायंकाळी सात वाजता शे० मुरारजी गोकुळदास यांच्या चायना बागेत बमनजी यानी टिळकाना उपहारसमारंभाला बोलाविले होते. रात्री दहा वाजता दाणे बंदरावर सभा झाली. या सभेत जागच्या जागी वर्गणी जमविण्याकरिता हॉर्निमन यानी आपली टोपी फिरविली. त्यात १५०० रुपये पडले. व कार्यक्रमाच्या छापील पत्रकावर टिळकांची सही घेऊन एका कल्पक गृहस्थाने त्याचा लिलाव केला त्यात पाचशे रुपये मिळाले. चायना बागेत स्त्रियांचीहि वेगळी सभा भरविण्यात आली. शेवटी शांतारामाच्या चाळीत सर्व नागरिकातर्फे म्हणून सभा झाली तिला बॅ. जिना हे अध्यक्ष होते.

ता. २६ रोजी रात्री चौपाटीवर फ्रेंच पुलाजवळ मुद्दाम उभारलेल्या मांडवात हिंदी स्वराज्यसंघाची मोठी परिषद भरली होती. ७–८शे प्रतिनिधी आले होते. मुंबईचे होमरूलर म्हणून मनमोहनदास यानी स्वागत केले. परिषदेला सहानुभूति दर्शविणाऱ्या १४०० तारा व ६१७ पत्रे आली होती. स्वराज्यसंघाचा अहवाल वाचून दाखविण्यात आला त्यावरून असे दिसून आले की एकंदर सभासद ३३८५४ पटावर होते. शंभर रुपये देऊन झालेले तहाहयात सभासद ६४१ होते. मुख्य शाखा पुणे मुंबई वऱ्हाड मध्यप्रांत व बंगाल या ठिकाणी होत्या. संघाने सहा इंग्रजी पुस्तके व १३ मराठी पुस्तके छापली. दोन्ही मिळून सुमारे दीड लाख प्रती छापल्या वाटल्या किंवा विकल्या. संघातर्फे ४३५ जाहीर व्याख्याने झाली. त्यात टिळकानी ८८ दिली होती. वऱ्हाड नागपूरच्या दौऱ्यात सोळा दिवसात रेल्वेने एक हजार व मोटारीने एक हजार मिळून दोन हजार मैलांचा टिळकांचा प्रवास होऊन त्यानी त्या अवधीत ३२ व्याख्याने दिली. कॉंग्रेसच्या दिवशी बेझन्टबाईंचा संदेश सर्व शाखामार्फत गावोगाव वाचून दाखविण्यात आला व मॉंटेग्यूकडील अर्जावर महाराष्ट्रातील दोन लक्ष सह्या घेण्यात आल्या. सालगुदस्त संघाजवळ १३१३२ रु. शिल्लक होती. चालू सालात ता. २० मार्चपर्यंत तहाहयात सभासदांची वर्गणी १०२९३ रु. इतर सभासदांची वर्गणी १३७७९ देणगी १३२८२ पुस्तकविक्री २२६३ दौऱ्यातील डेप्युटेशन फंडाला मदत ११७००० रुपये व मुंबईत शेवटच्या दोन दिवसात जमा झालेली रकम रु. ४८००० असा हिशेब सांगण्यात आला. पैकी बॅपटिस्टा यांच्या सफरीकरता २३ हजार रु. खर्च झाला. छपाईकरिता पांचहजार प्रवास खर्च चार हजार हे वजा जाता सदर तारखेला संघाजवळ १ लक्ष ८२ हजार ९५७ रुपये शिल्लक राहिली असे जाहीर करण्यात आले. नंतर शाखानिहाय संघाचे रिपोर्ट वाचण्यात आले. शिष्टमंडळाला निरोप देण्याचा

ठराव मंजूर झाल्यावर विपिनचंद्रपाल खापर्डे व टिळक यानी भाषणे केली. टिळकांचे भाषण विस्तृत व भावनापूर्ण असे झाले. आणि आरंभिलेले कार्य ही एक प्रकारे 'ईश्वरी प्रेरणा'च वाटत असल्याने या कार्यात आपणास यश येईल अशी आशा प्रगट करून त्यानी परिषदेची रजा घेतली.

शेवटी (बुधवारी) ता. २७ रोजी सकाळी वैदिक मंडळीनी ठाकुरद्वारचे देवळात टिळकाना आशीर्वाद दिला. दोन प्रहरी मुळजी जेठा मार्केटात मनमोहनदास रामजी यांचे विद्यमाने व्यापाऱ्यानी पानसुपारी व पंधरा हजार रुपये दिले. सायंकाळी डॉक्टर वर्गाची पानसुपारी होऊन चायना बागेत शिष्टमंडळाचे फोटो काढण्यात आले. तेथून सर्व मंडळी मिरवणुकीत सामील होऊन बोरीबंदर स्टेशनावर गेली. व्यवस्था अशी केली होती की बोरीबंदराहून स्पेशल ट्रेनने शिष्टमंडळ कल्याणापर्यंत जावे व तेथे तासभर थांबून मागून येणाऱ्या मद्रास मेलने पुढे जावे. त्याप्रमाणे प्रवासाला सुरवात झाली. टिळक व शिष्टमंडळाचे लोक कोलंबोपर्यंत गेले पण तेथे पासपोर्ट रद्द झाल्या कारणाने त्याना परत यावे लागले ही गोष्ट प्रसिद्धच आहे. या दरम्यानच्या हकीकतीचे एक विस्तृत पत्र केळकर यानी केसरीला पाठविले होते तेच या खाली दिले आहे व त्यावरून या छोट्या व निष्फळ सफरीची थोडक्यात कल्पना येईल.

## (११) कोलंबोची सफर

" 'मनसा चिंतितं कार्यं दैवमन्यद्विचिंतयेत्' या म्हणीचा अनुभव पावलोपावली मनुष्याला येत असतोच. पण स्वराज्यसंघाच्या शिष्टमंडळाला तिचा काल जो अनुभव आला तो मात्र आश्चर्याने थक्क करून सोडणारा होता. आज सकाळी मी लिहीत बसलो आहे यावेळी टिळकप्रभृति डेप्युटेशनची मंडळी कोलंबोच्या बंदरात जाऊन आगबोटीत बसण्याच्या धांदलीत असावयाची. पण दैवाची लीला अशी की याच वेळी विलायतेस जाण्याची तयारी न करिता त्यानी परत हिंदुस्थानाकडे जाण्याच्या तयारीस लागावे! ही बातमी वाचून केसरीचे हजारो वाचक डोळे चोळचोळून आपण स्वप्नात आहो की जागे आहो असा विचार करू लागतील. पण सरकाराने लोकाना अशा रीतीने आश्चर्यचकित करून सोडण्यासारखे खेळ आजवर अनेक केले. त्यातलाच हाहि एक आहे व आणखी असे किती खेळ आपणा लोकास पाहावयाचे आहेत न कळे!

"असो. विलायतेस हिंदी स्वराज्यसंघामार्फत शिष्टमंडळ पाठविण्याचा बेत नक्की करून त्याची साधनसामुग्री जुळविण्यास प्रारंभ झाल्यापासूनची हकीकत केसरीतून वेळोवेळी प्रसिद्ध झालीच आहे. मुंबईहून निघणाऱ्या एखाद्या आगबोटीत जागा मिळाली तर पहावी अशा हेतूने केलेले सर्व प्रयत्न निष्फळ झाल्यावर कोलंबो येथे येऊन आगबोटीवर बसण्याचा बेत करावा लागला व त्याप्रमाणे मुंबईहून सामानासुमानाची सर्व तयारी करून आम्ही सर्व मंडळी ता. २७ रोजी

निघालो. वाटेत विजापूर येथील मंडळीकडून लो. टिळक यास फार दिवसांचे निमंत्रण होते म्हणून तेथे अर्धा दिवस मुक्काम करून मद्रासेस ता. ३० रोजी येऊन पोचलो. मद्रासेस एक दिवस विश्रांति हवीच होती. शिवाय मिसेस बेझंट यानी अड्यार येथे वाटेत उतरण्याचे टिळकाकडून पुण्यास अभिवचन घेतले होते. यामुळे मद्रासेस दीड दिवस मुक्काम पडला. या मुक्कामात मद्रास शहरातील सर्व जातींच्या व सर्व पक्षांच्या पुढाऱ्याकडून टिळकांचा सन्मान उत्तम प्रकारे करण्यात आला व डेप्युटेशनला अतिशय प्रेमपूर्वक निरोप देण्यात आला. मद्रास इलाख्यातील पुढारी व सुशिक्षित लोकांचे मत टिळकासंबंधाने व डेप्युटेशनच्या कामासंबंधाने काय आहे हे मद्रास येथील प्रचंड जाहीर सभेत मद्रासेतील सर्व प्रमुख राजकीय व इतर सार्वजनिक संस्थानी मिळून जे संयुक्त मानपत्र दिले आणि विशेषतः सर सुब्रह्मण्य अय्यर यानी जे भाषण केले त्यावरून कळून येण्यासारखे आहेच. मद्रासेहून निघाल्यावर पुढे कोलंबोपर्यंत वाटेत कोठेहि मुक्काम करावयाचा नाही असे ठरले होते. तथापि वाटेतील लहानमोठ्या अनेक स्टेशनावरून टिळकांचा अतिशय थाटाने सत्कार करण्यात आला. तंजावर त्रिचनापल्ली मदुरा वगैरे ठिकाणी जो थाट व उत्साह आणि समारंभात जो व्यवस्थितपणा दिसून आला तो अपूर्व होता. लहानसान स्टेशनावर गाडी उभी रहात नाही तथापि गावोगावच्या लोकानी रात्री दोन दोन तीन तीन वाजता टिळकाना पहाण्याची संधि मिळणे शक्य नसता किंवा आपला आवाज त्यांच्या झोपेत त्यांच्या कानी जाण्याचीहि आशा नसता स्टेशनावरील प्लॅटफॉर्मवरूनच काय पण रस्त्याच्या बाजूलाहि उभे राहून 'टिळकमहाराजकी जय' अशी आरोळी मारून त्यांचा सत्कार करण्याची आपली हौस कशी तरी फेडून घेतली.

"कोलंबो येथेहि हिंदी व सिंहली मंडळीनी टिळकांचे व डेप्युटेशनचे थाटाने स्वागत केले. टिळक व पाल या दोघांची दोन व्याख्याने झाली. पहिल्या व्याख्यानास सर अरुणाचलं सीलोन येथील पहिल्या प्रतीचे नागरिक व दुसऱ्या व्याख्यानास मि. डिमेल सी. बी. ई. कोलंबो येथील एक पुढारी हे अध्यक्ष होते. उपवनोपहारप्रसंगी कोलंबो येथील कमीत कमी दीड हजार प्रमुख स्त्रीपुरुष हजर होते. टिळकांच्या व पालबाबूंच्या व्याख्यानास सुमारे दीड–दोन हजार रुपये जमले ते तेथील माजी लोकप्रिय गव्हर्नर सर अँडरसन यांच्या स्मारकास देण्यात आले. डेप्युटेशनकरिता मंडळीनी स्वतंत्र फंड काढण्यास सुरुवात केली असून पाचपाचशेचे काही आकडे पडले आहेत.

"ता. २ व ३ हे दिवस डेप्युटेशनच्या मंडळीस व त्यांचा सत्कार करणाऱ्या कोलंबो येथील नागरिकास मोठ्या गर्दीचे गेले. मुंबईस सामानसुमान बरेच खरेदी झाले होते; तथापि काही खरेदी व्हावयाचे राहिलेच होते ते होऊन बांधाबांध जोराने सुरू झाली. इतक्यात ता. ३ रोजी विलायतच्या सफरीची अनपेक्षित रीतीने डळमळ होण्याची सुरवात झाली. पी. अँड ओ. ची आगबोट

मिळत नाही असे पंधरा दिवस पाहून आम्ही प्रथम बी. बी. लाइनर कंपनीच्या लँकेशायर नामक बोटीने कोलंबोहून जाण्याचे ठरविले. पण ता. ३ ला या बोटीने जाण्याच्या ऐवजी ता. ५ रोजी जपानी कंपनीच्या इयोमारू नामक बोटीने गेल्यास मंडळीची सोय प्रवासाच्या दृष्टीने अधिक होईल असे मुंबईस एका तज्ज्ञ व अनुभविक गृहस्थाने फारच आग्रहाने सांगितल्यावरून जपानी बोटीने जाण्याचे आम्ही मुक्रर केले होते. कोलंबोस ही जपानी बोट ता. ५ रोजी यावयाची असा अदमास होता. त्याप्रमाणे आम्ही व आमचे एजंट थॉमस कुक कंपनीचे लोक बोटीची वाट पहात होतो. ता. ३ रोजी सायंकाळी मी येथील कलोनियल सेक्रेटरीकडे पासपोर्ट मंजुरीकरिता गेलो. आम्हास मुंबईस पासपोर्ट मिळाले होते. व ते सर्व हिंदुस्थानात चालले असते. पण सिलोन ही क्राऊन कॉलनी. येथील सरकार वेगळे असल्याने आमच्या पासपोर्टावर येथील सरकारचा मंजुरीचा स्वतंत्र शेरा हवा होता व तो सदर सेक्रेटरींनी तावडतोब करूनहि दिला. पासपोर्ट घेऊन मी तसाच थॉमस कुक कंपनीकडे गेलो व तिकिटे काढली काय म्हणून विचारले तो त्यानी सांगितले की ‘ तुमची जपानी बोट आहे कुठे ? ती उद्या कोलंबोस याव-याची होती खरी पण आता पहातो तो नुकतेच तिने जपान सोडले असून ता. २३ पर्यंत ती कोलंबोस येत नाही ! ’ हे ऐकून मला काय वाटले असेल ?

“आणखी २० दिवस कोलंबोस पाहुणचार खात पडून राहण्याची कल्पना दुःसह होती. पाहुणचार फार गोड होता. येथील मंडळींच्या सहवासात महिनेच्या महिने घालविले तरी कंटाळा येणे शक्य नव्हते. पण २० दिवस व्यर्थ कसे घालवावयाचे ! विलायतचे कामहि पुढे ढकलले जाणार ! आधीच बोटीवर ४५ दिवस लागणार त्यात या २० दिवसांची आणखी भर ! पण जपानी बोटीवरून जाण्याचे ठरण्यापूर्वी ज्या लँकेशायर बोटीवरून जाण्याचे आम्ही प्रथम मुंबईस ठरविले होते तिची आठवण मला होती. ती याच सुमारास कोलंबोस येणार होती. अर्थात् ‘ इयोमारू ’ मिळत नाही तर ‘ लँकेशायर ’ का होईना ? तिच्यावर जागा मिळवून द्या म्हणजे झाले असे मी थॉमस कुकच्या एजंटास सांगितले व त्यानी तावडतोब टेलिफोन करून माहिती मिळवून “ होय सात जागा तुम्हाला दिल्या आहेत ” असे उत्तर आम्हास जागच्या जागी मिळवून दिले ! यामुळे एका पांच मिनिटांचे आंत विलायतेस जाण्याच्या निराशेचे दुःख व फिरून निराशेच्या जागी आशा उत्पन्न झाल्याचे सुख मला अनुभवावयास सांपडले ! व ज्या लँकेशायर बोटीचा आम्ही जाणूनबुजून पूर्वी अव्हेर केला तिनेच आम्हास आयत्या वेळी हात द्यावा हा योगायोग विलक्षण खरा असे म्हणून मी घरी परतलो. दैवलीलेच्या या लहानशा धक्क्याने आमची प्रवासाची हुरूप फिरून ताजी झाली व सामानसुमानाची उरली सुरली तयारी पुरी करण्यास डेप्युटेशनच्या मंडळींनी आरंभ केला.

“ता. ४ रोजी सकाळी पालबाबूंचे व्याख्यान झाले. दोनप्रहरी जेवणानंतर येथील हिंदी मित्रमंडळीच्या आग्रहावरून फोटो घेण्याचे काम सुरू होऊन

डेप्युटेशनचा फोटो काढून झाला. सामानसुमान पुरे बांधले जाऊन त्यावर बोटींची तिकिटे डकविण्यास सुरवात झाली. लँकेशायर बोट दोन तासानी बंदरात येणार अशी बातमी आली. टिळकानी अखेरच्या जरूरीच्या चिठ्याचपाठ्यावर सह्या करून दिल्या. दारात गाड्या व मोटारी उभ्या होत्या. त्यात बसून आता फक्त उपवनोपहारसमारंभास जावयाचे व परत येताच तसेच थॉमस कुकच्या मनुष्याचे स्वाधीन सामान करावयाचे इतकेच काय ते काम उरले. इतक्यात पालबाबूंच्या पासपोर्टवर मंजुरीचा शेरा घेण्याचा उरला होता त्याकरिता रा. गोखले हे कलोनियल सेक्रेटरीच्या ऑफिसात गेले होते ते बातमी घेऊन धांवत सांगत आले की "पालबाबूंचा पासपोर्ट सेक्रेटरीनी ठेऊन घेतला. तो तर ते परत देत नाहीतच. पण बाकी सर्वांचे पासपोर्टहि रद्द करण्याचा हुकूम तारेने आलेला असून काल मंजूर करून दिलेले सर्व पासपोर्टहि परत आणून स्वाधीन करा असे सेक्रेटरी म्हणतात!" प्रथम याचा अर्थच आम्हास कळेना. तेव्हा टिळक-प्रभृति आम्ही सर्व मंडळी तावडतोब सेक्रेटरीच्या भेटीस गेलो. पण त्यानी सांगितले की 'दिल्लीहून एक व मद्रासेहून एक अशा दोन सरकारी हुकमाच्या तारा नुकत्याच आल्या असून त्याअन्वये तुम्हा सर्वांचे पासपोर्ट रद्द करण्यात आले आहेत. तुम्हापैकी टिळक व केळकर यास मी आताच पत्रे रवाना करवीत होतो तो तुम्हीच सर्वच आला बरे झाले.' हे ऐकून आमची स्थिति अत्यंत चमत्कारीक झाली. आम्ही कोणी न जातो तर ही पत्रे आम्हास आज सकाळी म्हणजे बोटीवर जाण्यास निघण्याच्या क्षणी हाती पडली असती. किंबहुना तसेहि झाले नसते! कारण लँकेशायर बोट काल सायंकाळीच कोलंबोस येऊन दाखल झालेली असून आज सकाळी आठ वाजताच ती निघणार होती. अर्थात् सामान तर पुढे बोटीवर आधीच गेले असते व पत्रे हाती पडावयाच्या आधीच आम्ही बोटीच्या धक्यावर जाऊन पोचणे संभवनीय होते. पण पत्रांची व आमची चुकामूक झाल्याने बोट सांपडणे मात्र शक्य नव्हते. कारण कलोनियल सेक्रेटरीनी आम्हास असे सांगितले की 'तुम्हास पत्रे न पोचती तरी सुद्धा बोटीवर चढताना तुमचे पासपोर्ट काढून घेऊन तुम्हास बोटीवर चढण्यास प्रतिबंध करावयाचा असे आमच्या सरकारने ठरविले होते.'

"आता पुढे काय? कोलंबो येथील अधिकाऱ्याचे हाती काहीच नव्हते. आमचे हाती दिलेल्या पत्रातील मजकुरावरून पाहता खुद्द विलायतसरकारच्या हुकमावरून आम्हास ही बंदी करण्यात आली आहे असे दिसले. अर्थात दिल्लीसरकार तरी या बाबतीत काय करू शकेल हाही प्रश्नच होता. तथापि एक वेळ व्हाईसरायसाहेबाकडे तारानी अर्ज करून पहावे असे ठरवून स्वतः टिळक व खापर्डे यांच्या नावची एकेक व डेप्युटेशनच्या तर्फे माझ्या नावची एक अशा तीन तारा पाठविण्याचे ठरले. पण आमच्या तारा तरी कोण पाठवू देणार? तारेची खुंटीहि सरकारच्याच हाती. त्यातहि आम्ही परस्वाधीनच. गेल्या पंधरा दिवसात 'टिळक व

डेप्युटशेनची मंडळी कोलंबोस कधीतरी येणार सोयी काय पाहिजेत' वगैरे मजकुराच्या पाठविलेल्या सर्व तारा येथील सेन्सारने दडपून ठेवल्या होत्या व आम्ही स्टेशनावर अमक्या दिवशी येणार ही बातमी आमच्या कोलंबो येथील स्नेहीमंडळीस अखेर पर्यंत प्रत्यक्ष अशी मिळू दिली नाही हा अनुभव ताजा होताच. तेव्हा टिळकानी सेक्रेटरीस विनंति केली की आम्ही व्हॉइसराय त स्टेटसेक्रेटरी यांच्या तारा लिहून देतो व पैसे देतो. पण तारा तुम्ही पाठवाल तर पोचतील. तेव्हा सेक्रेटरी म्हणाले की तारा मला पाठविता येणार नाहीत. पण मी 'सेन्सारला' सांगून तुमच्या या ताराना प्रतिबंध होऊ नये असे मात्र करतो. अखेर सेक्रेटरीच्या हपिसातच बसून तारा लिहिल्या व पाठविल्या व तारांच्या उत्तराची वाट पहात मंडळी घरी येऊन बसली. डेप्यूटेशन ता. ५ रोजी जाणार अशा समजुतीने बाहेरगावाहून तारा व पत्रे येतच होती. हिंदुस्थानातील लोक डेप्यूटेशन आगबोटीत बसून निघाल्याच्या तारेची वाट पहात बसले होते. अशा वेळी "डेप्यूटेशन जावयाचे थांबले सरकाराकडून डेप्यूटेशनला प्रतिबंध झाला. दिलेले पासपोर्ट परत मागितले. डेप्यूटेशनची मंडळी परत हिंदुस्थानाकडे निघणार" अशी तार प्रसिद्ध करण्याची वेळ यावी हा कोण विलक्षण योगायोग! पण सरकारच्या लहरी व मनस्वी स्वभावाने तो आणला खरा.

"व्हाइसरॉयसाहेबांच्या तारेतच बंदीचा हुकूम विलायतसरकाराकडून आल्याचा मजकूर असल्यामुळे व्हाइसरॉयसाहेबास केलेल्या तारांचा फारसा उपयोग होण्याची आशा कोणासच फारशी नव्हती. 'आमच्या हाती या बाबतीत काही नाही' असे मोघम उत्तरच बहुधा व्हाइसरॉयसाहेबाकडून येईल असे वाटून व हिंदुस्थानाकडे परत फिरावे लागणार असे वाटून आमच्यापैकी काही मंडळीनी सिलोनची जुनी राजधानी कँडी हे शहर पहाण्यास दोनप्रहरी निघण्याचे ठरविले; व रा. गोखले हे आदल्या दिवशी कलोनियल सेक्रेटरीस कबूल केल्याप्रमाणे सर्व पासपोर्ट त्यांच्या स्वाधीन करण्याकरिता सेक्रेटरीयट हॉलमध्ये गेले. त्यानी पासपोर्ट परत केले त्यावरील मंजुरीचे शेरे खोडले जाणार इतक्यात फिरून एक आशेची लाट उठली. व्हाइसरॉयसाहेबाकडून कोलंबोसरकारास अशी तार येऊन धडकली की "टिळक व डेप्युटेशनची मंडळी यांच्या तारा पोचल्याप्रमाणे टिळकाना व त्यांच्या बरोबरच्या मंडळीला परवानगी देण्याचा प्रश्न मी विलायतसरकारकडे तारेने धाडला आहे. दरम्यान तूर्त तुम्ही वाटेल तर असे करावे–हल्ली जी बोट केपला –दक्षिण आफ्रिकेच्या दक्षिण टोकाच्या केप ऑफ गुड होपला–केप कॉलोनीला जात आहे तिजवरून टिळक वगैरेना हवे तर जाऊ द्या. पण ही परवानगी फक्त केपपर्यंतची देता येईल. मात्र दरम्यान विलायतसरकारने जर आपला पूर्वीचा हुकूम फिरविला नाही तर त्याना केपहून परत यावे लागेल. हे त्यास तुम्ही स्पष्ट बजवावे व हे त्यास सर्वस्वी कबूल असेल तर त्यास बोटीवर जाऊ द्यावे."

"वरील प्रकारची माहिती घेऊन रा. गोखले हे घरी आले तेव्हा सर्व मंडळीच्या आशेस फिरून थोडी धुगधुगी आली. केपपर्यंत जाऊ देतात तर तेथपर्यंत तरी जाऊ मग पुढे काय होईल ते पाहता येईल असे सर्वानुमते टिळकानी ठरविले व केपपर्यंत जाण्याच्या परवानगीसंबंधाची मंजुरी फिरून सर्व पासपोर्टवर मांडून घेण्याकरिता रा. करंदीकर मी व गोखले कलोनियल सेक्रेटरीकडे गेलो. पासपोर्टवर केपपर्यंत जाण्याची मंजुरी तर लिहून द्याच पण शिवाय व्हाइसरॉयसाहेबास आणखी एक तार आम्ही करीत आहो तीहि कालच्यासारखी तुम्ही आजहि 'सनसॉर' कडून पुढे जाऊ द्या असे मी त्यास सांगितले. येथे हे सांगणे जरूर आहे की व्हाइसरॉयसाहेबानी शर्तीची परवानगी दिली असे सकृद्दर्शनी दिसले खरे. पण त्यात केपपर्यंत जाण्याची परवानगी द्या असे शब्द वास्तविक विनाकारण पडले होते व त्या शब्दामुळेच ती शर्तीची परवानगीहि फुकट गेली. टिळकानी व्हाइसरॉयसाहेबास केलेल्या तारेत केपचा उल्लेख मुळीच नव्हता. पण इतर रिपोर्ट सरकाराकडे पूर्वी गेले त्यात व वर्तमानपत्रातूनहि आम्ही केप–मार्गाने जाणार असा उल्लेख होता. तोच अर्थात् व्हाइसरॉयसाहेबांच्या लक्षात राहिलेला असून नुसते 'जाऊ द्या' असे लिहिण्याच्या ऐवजी 'केपपर्यंत जाऊ द्या' असे लिहिले गेले पण त्याने आमचा मात्र केवढा घोटाळा झाला पहा! आम्ही केपकडून गेलो काय किंवा सुएझकडून गेलो काय आम्हास व सरकारास दोनहि सारखीच होती. केपकडून जाणाऱ्या बोटीस वीस दिवसांचा उशीर म्हणूनच सुएझकडून जाणाऱ्या बोटीवर आयत्या वेळी जागा मिळविली व व्हाइसरॉयसाहेबांच्या तारेत केपचा उल्लेख होण्याचे साधारणतः काही कारणहि नव्हते. कारण त्यांची शर्त मान्य करावयाची म्हटली तरी आम्ही केपला अडकून पडावयाचे ते सुएझला अडकून पडलो असतो. दोनहि प्रवासमार्ग सुरू आहेत व दोनहि ठिकाणी आम्हास सरकारला अडकवून ठेवता येणे शक्य असल्यामुळे दोनहि मार्गांची फलश्रुति एकच होती. पण नाही. दैवयोग उलटा व्हावयाचा म्हणजे तो असाच! व्हाइसरॉय आपणाकडून परवानगी देऊन आमची सोय काढण्याकरिता धाडलेल्या तारेत सहज 'केपमार्गे' असे शब्द घालतात पण आमची आदल्याच दिवशी बदललेली बोट प्रायः केपमार्गे जाणारी असताहि या खेपेस ती सुएझमार्गे जावयास निघते!

"'केपपर्यंत' हे शब्द वास्तविक निरर्थक आहेत ते सहजासहजी अर्थवादादाखल चुकून पडले आहेत. आम्ही व्हाइसरॉयसाहेबांची शर्त मान्य केल्यास आम्ही केपकडून गेलो काय किंवा सुएझकडून गेलो काय त्याना दोनहि सारखीच आहेत म्हणून आपण निवळ शब्दावर फारसे जाऊ नका. तारेचा खरा हेतु म्हणजे आम्हास परवानगी देण्याचा व्हाइसरॉयसाहेबांचा खरा हेतु आपण लक्षात आणा. बोट बंदरात आहे. सामान धक्क्यावर आहे. तिकिटे आमच्या हाती आहेत. थोडासा सारासार विचार चालवून परवानगी देण्याचे तुमच्या हाती आहे. तेव्हा कृपा करून

आम्हास बोटीवर जाण्याची परवानगी द्या. वाटेल तो करारनामा व्हाइसरॉयसाहे-बांच्या तारेप्रमाणे आम्ही तुम्हास लिहून देतो" असे कलोनिअल सेक्रेटरीस मी समजावून सांगितले. ते त्यास पटलेहि. ते म्हणाले-" यापुढे तार जाऊन व्हाइस-रॉयसाहेबाकडून आणखी तीन चार तासात उत्तर येणे शक्य नाही. म्हणून मीच आमच्या गव्हर्नरसाहेबांच्या कानावर हा मजकूर टेलिफोनने घालतो व तुम्हास परवानगी देता आली तर पहातो." या आश्वासनाने आम्हास खरोखर फिरून आशा उत्पन्न झाली. कारण कलोनिअल सेक्रेटरीकडे तीन-चार वेळा जाण्याचा प्रसंग आला व त्या त्या वेळी ते आमच्याशी सभ्यपणाने व भलेपणाने वागले होते. सुमारे तीन वाजता त्यांचे उत्तर मिळणार होते!

"झालेली हकीकत टिळकांना सांगण्याकरिता आम्ही परत घरी आलो तो इकडे व्हाइसरॉयसाहेबाकडून टिळकांना पहिल्या तारेला उत्तरादाखल तार येऊन राहिली होती. या तारेत शर्तीच्या परवानगीचाच मजकूर होता व 'केपपर्यंत' असे शब्दहि होते. जास्त शब्द होते ते मात्र असे की हल्ली विलायतसरकारने डेप्युटेशनला बंदी केली त्याचे कारण बहुधा हेच असावे की 'विलायतेत विचार व उद्योग जो कोणताहि व्हावयाचा तो फक्त युद्ध जोराने कसे चालू ठेवावे यापुरताच होणे इष्ट आहे. तथापि तुमचे प्रकरण मी विलायतसरकाराकडे विचाराकरिता पाठवीत आहे."

"ही तार घेऊन आम्ही फिरून तीन वाजता सेक्रेटरीसाहेबाकडे गेलो. तो सेक्रेटरीसाहेबानी सांगितले की "टेलिफोन करून गव्हर्नरसाहेबास विचारले. पण 'केपपर्यंत' असे शब्द आहेत त्या अर्थी इतर मार्गाने आम्हास परवानगी देता येत नाही! मात्र आपली तार व्हाइसरॉयसाहेबाकडे पाठविण्याची मी कालच्या-सारखी सवलत देतो" अशा रीतीने सर्व उपाय खुंटल्याने व्हाइसरॉयसाहेबास आणखी एक तार रवाना करून आम्ही निराश होऊन घरी परत आलो.

"या वेळी ४॥-५ वाजले होते. 'लँकेशायर' बोट बंदरात उभी असून बरोबर सात वाजता सुटणार होती. पुढील तास दीड तासात उत्तर येणार कसे? आले तरी पासपोर्टवर लेखी मंजुरी लिहिली जावयाची कशी? आमची उत्कंठा व निराशा पाहून सेक्रेटरीनी रा. करंदीकर यांस सहानुभूतिपूर्वक असे सांगितले की तुम्हा मंडळीखातर मी आज पाचाचे ऐवजी सहा वाजेपर्यंत हपिसात रहातो व उत्तर अनुकूल आल्यास एका क्षणात मंजुरी लिहून देऊन मोकळे करतो. बरे, हे झाले तरी आमची सर्व मंडळी व सामान पडले दोन मैलावर. ते आयत्या वेळी बोटीवर कसे चढणार? याकरिता पन्नास रुपये खर्चून आम्ही थॉमस कुक कंपनीकडून एका स्पेशल लॉच (पडाव) वर धक्क्यावरील आमचे इतर सामान चढवून खलाशी तयार राहण्याची व्यवस्थाहि करविली व अगदी अखेरपर्यंत

तारेची वाट पाहिली. पण तार आली नाही! रात्री बोट ठरल्याप्रमाणे बंदरांतून निघून गेली. आम्ही मात्र हताश होऊन घरी परत आलो.

"आज व्हाइसरॉयसाहेबाकडे टिळकानी सविस्तर हकीकतीची आणखी एक तार पाठविली असून "शर्त घालूनहि का होईना पण वाटेल त्या बोटीची व वाटेल त्या मार्गाने जाण्याची सर्वसाधारण अशी परवानगी द्या" अशी तारेत विनंति केलेली आहे. झालेली सर्व हकीकत वर्तमानपत्राकडे त्रोटक रीतीने तारेने कळविली आहेच. पण सेनसॉर कोणती तार पाठवितात कोणती अडकवून ठेवतात कोणी सांगावे? याकरिता ही कच्ची हकीकत केसरीतून प्रसिद्ध होऊन सर्व मित्रमंडळीस कळावी याकरिता पाठवीत आहे. पुढे हकीकत घडेल तीहि अशीच कळवीन."

टिळकांचे पासपोर्ट रद्द केल्याची बातमी मुंबईस कळताच मुंबईकरानी ताबडतोब जिना यांचे अध्यक्षतेखाली निषेधप्रदर्शक सभा भरविली. तसेच सर्व हिंदुस्थानभर वर्तमानपत्रानी या बंदीचा निषेध केला. विलायतेतहि निषेधाची चळवळ झाली. ता. १३ एप्रिल रोजी इंग्लंडातील होमरूल लीगने निषेधपर ठराव करून तो मि. लॅन्सबरी यांच्या सहीने मजूरपक्षाच्या सगळ्या शाखाकडे पाठविला. व त्याबरोबर असेहि कळविले की नॉटिंगहॅम येथे मजूरपक्षाने हिंदी होमरूलचे समर्थन करण्याचा ठराव केला आहे त्याचा चोहोकडे फैलाव करून मदत द्यावी. पार्लमेंटमध्ये याबद्दल प्रश्नोत्तरे झाली. एकट्या टिळकांचाच हा प्रश्न नव्हता. कारण मिसेस नायडू याना असाच प्रतिबंध झाला. जॉर्ज जोसेफ याना जिब्राल्टरला उतरून घेतले व पुढे जाऊ दिले नाही असे बरेच प्रकार एकदम झाले. पण बॅपटिस्टा याना ही गोष्ट बऱ्याचीच झाली असे वाटले. कारण त्यांच्यामते हल्लीची वेळ विलायतेत जाऊन हिंदी लोकानी आपले म्हणणे मांडण्याला फारशी अनुकूल नव्हती. त्यानी जमल्यास निघणे थांबवा अशी तार करण्याचा विचारहि केला होता. पण इतर मंडळी न आली तरी टिळकानी एकट्यानी यावे असे लॅन्सबरी वगैरेंचे म्हणणे होते. हॉर्निमन यानी अशी कोटी केली होती की जॉन दि बॅपटिस्ट याच्या मागून खाइस्ट अवतरला तसे जोसेफ बॅपटिस्टाच्या मागोमाग टिळक इंग्लंडात अवतीर्ण होणारच. ता. २९ एप्रिल १९१८ रोजी मि. बॅपटिस्टा यानी एक जंगी खलिता पुण्यास पाठविला. त्यात त्याना विलायतेतील परिस्थिती जशी दिसली तशी खुलासेवार लिहिली आहे. तसेच ता. १२ जूनच्या पत्रात ते लिहितात. " खाली लिहिलेल्या चार गोष्टी झाल्याच पाहिजेत.

१ टिळक हे कॉंग्रेसचे अध्यक्ष निवडले गेले पाहिजेत.

२ ब्रि० मजूरपक्षाच्या सारखा हिंदुस्थानात एक मजूरपक्ष स्थापला पाहिजे.

३ विलायतेतील मजूर पक्षाला निवडणुकीच्या प्रसंगी पैशाची काही मदत केली पाहिजे.

४ ब्रि. कॉ. कमिटी व इंडिया पत्र हे कॉंग्रेसचे मुख बनविले पाहिजे."

पण टॉमस कुक कंपनीकडे शोध करता असे कळले की नोव्हेंबरपर्यंत टपालच्या बोटीत एकट्या टिळकानाहि जागा मिळणार नाही. कोलंबोहून केप ऑफ

गुड होप वरून जपानी बोटीने कोणी जाण्यास तयार असल्यास कळवावे. पण बॅ. बॅपटिस्टा यांच्या पंचांगातहि टिळकाना निघण्याला अजून मुहूर्त सापडत नव्हता.

## (१२) युद्धपरिषदा

एप्रिल महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात हिंदुस्थानसरकारने दोन खलिते प्रसिद्ध केले. पहिल्यात टिळक व इतर शिष्टमंडळे यांचे पासपोर्ट रद्द का केले याचे समर्थन होते. पण ते लंगडे लुले असेच होते. युद्ध निकराला आले असून ही वेळ विलायतेत होमरूलची चर्चा करण्याला अनिष्ट आहे म्हणून यावेळी शिष्टमंडळाला जाऊ देत नाही असा रोख होता. पण याच वेळी विलायतेत आयरिश होमरूलची खटपट आतून बाहेरून सुरू होती ही गोष्ट बिचाऱ्या हिंदी लोकाना काय माहीत? नव्या पार्लमेंटात सक्तीच्या लष्कर भरतीच्या बिलावर वाद चालू असता डिलन यानी हा प्रश्न उपस्थित केला होता. व त्याला लॉईड जॉर्ज यानी उत्तर दिले होते की "आयर्लंन्डला आधी होमरूल देऊ व मगच हा कायदा त्याला लावू." सरकारच्या दुसऱ्या खलित्यात दिल्ली येथे वॉरकॉन्फरन्स भरविण्यात येईल असे जाहीर केले होते. त्याप्रमाणे ता. २७ रोजी दिल्ली येथे ही परिषद भरविण्यात आली. प्रत्येक प्रांतातून प्रतिनिधी प्रांतिक सरकारच्या विद्यमाने बोलावण्यात आले होते. पण टिळकाना या सभेला आमंत्रण नव्हते. प्रथम व्हाईसरॉय यानी बादशहाकडून आलेला संदेश वाचून दाखविला. नंतर मनुष्यबळाची व युद्धसाधनांची तरतूद करण्याकरिता अशा दोन कमिट्या नेमण्यात आल्या.

या परिषदेच्याच दिवशी पुण्यास किर्लोस्कर नाटक गृहात फार मोठ्या प्रमाणावर नागरिकांची जाहीर सभा भरविण्यात आली. ह. ना. आपटे अध्यक्ष होते. त्यानी सांगितले की आम्हाला या परिषदेला प्रतिनिधी निवडून पाठविण्यास सांगितले असते तर आम्ही टिळकानाच पाठविले असते! मुख्य ठरावात असे लिहिले होते की हिंदुस्थानाला राज्याधिकार देण्याला सुरवात करा म्हणजे आमची सहकारिता ठेविलेलीच आहे. महाराष्ट्राच्या लोकापुरते बोलावयाचे तर त्यानी नादिरशहाच्या वेळी सरहद्दीचे रक्षण दिल्लीच्या बादशहाकरिता केले होते. मग तसले काही कार्य ते आजहि करणार नाहीत काय? पण स्वराज्याची गीता सांगितल्याशिवाय लोकाना स्फूर्ती कशी येणार? अशा अर्थाचे वेगळ्या शब्दानी लिहिलेले एक पत्र टिळक बेझन्टबाई जिना पटेल वगैरे लोकानी सह्या केलेले याच वेळी प्रसिद्ध करण्यात आले होते. दिल्लीच्या वॉर कॉन्फरन्समध्ये युद्धास मदत करण्याबरोबर उलट बाजूच्या सहकारितेचा प्रश्न निघाला. तेव्हा व्हाईसरायसाहेबानी एकदमच सांगून टाकले की ज्यांचे म्हणणे ऐकून घ्यावयाचे होते त्यांचे पूर्वीच ऐकून घेतले आहे व त्याचे उत्तर योग्य वेळी लोकाना मिळेलच. वॉर कान्फरन्सच्या कमिटीमध्ये गांधी होते. त्यानी सांगितले की टिळक बेझन्टबाई अलीबंधू अशा लोकाना तुम्ही येथे बोलावले नाहीत तर तुम्हाला देशात मनुष्यबळ कसे कोण देणार? अर्थात ही चर्चा

व्यर्थ होय. असे म्हणून ते उठून गेले. पण यानंतर त्यांची व व्हाईसरायसाहेबांची बराच वेळ मुलाखत झाली. त्यानंतर गांधी फिरून कमिटीला येऊन बसले. शिपायांचे पगार लष्करी जागा यासंबधी चर्चा झाल्यावर कोणी स्वराज्याचा ठराव पुढे आणला. तेव्हा तो या कमिटीच्या कार्यात येऊ शकत नाही म्हणून फेटाळण्यात आला. यानंतर 'फिरून कॉन्फरन्समध्ये मी तो ठराव आणणार' अशी खापर्डे यानी नोटीस दिली. पण त्यालाहि अर्धचंद्र देण्यात आला. यानंतर सरकारला हवे ते बाकीचे ठराव मंजूर झाले. पण त्यांची अंमलबजावणी होण्याला लोकपक्षाकडून कितपत मदत होणार होती हे दिसतच होते!

टिळक लष्करभरतीविरुद्ध बोलतात हा जसा त्यांच्यावर आरोप तसाच बेझंटबाई व रामस्वामी अय्यर याना जर्मनीने पैसे चारले आहेत असा एक उडता आरोप आणण्यात आला होता. विशेषतः ही गप्प अमेरिकेत उघडपणे उठविली गेली होती. म्हणून बाईनी सर सुब्रह्मण्यम् अय्यर याजकडून प्रे. विल्सन यांचे नावे एक पत्र लिहविले. त्यात हिंदुस्थानात लष्करभरती न होण्याची खरी कारणे लिहिली होती. या पत्राचा परिणाम अमेरिकेत चांगला झाला. हे पत्र ता. २४ जून १९१७ रोजी लिहिले होते. त्याची अमेरिकेत बरीच चर्चा झाली. बाईंचे एक थिऑसॉफिकल स्नेही हॉचनर म्हणून अमेरिकेत होते त्यानी थेट प्रे. विल्सन यांची गाठ घेतली व त्यामुळे प्रकरण नेटाला लागले. आणि रूझवेल्ट ब्रायन वगैरे लोकानी लक्ष घातल्यामुळे कर्नल हौस हे विलायतेस गेले व त्यानी बाईंची सुटका करविली असे सांगतात!

ता. ३ मे रोजी मुंबईस ऑ. इं. कॉ. कमिटीची सभा भरली होती. तीत काही पुढाऱ्याना दिल्लीस निमंत्रण केले नव्हते याचा निषेध करून खापर्डे यानी व्हाईसरॉयसाहेबाकडे पाठविलेल्या स्वराज्यविषयक ठरावाला संमति देण्यात आली. तसेच विलायतेहून बॅपटिस्टा यानी सुचविल्याप्रमाणे पुढील राष्ट्रीय सभेला मजूरपक्षाच्या प्रतिनिधींना आमंत्रण द्यावे असे ठरले. या सभेला गांधी हजर होते. या सुमारास म्हणजे ता. २३ मे च्या मुंबई टाइम्समध्ये एका गृहस्थाने गीतेतील श्लोक देऊन असे म्हटले की "गीतेत युद्धाला प्रवृत्त करण्याचा उपदेश आहे. पण स्वराज्यवादी आधी करार करून शर्ती ठरवून मग सैन्यात जाणार!" ही कोटी बाष्कळ होती. तिला केसरीत एका 'गीतापाठी' गृहस्थाने खरपूस उत्तर दिले. तो म्हणतोः कृष्णाने अर्जुनाला युद्धाला उभा करण्यापूर्वी स्वर्ग किंवा पृथ्वी या दोहोपैकी एक तरी निश्चित दिले होते. मेलास तर स्वर्ग मिळेल आणि युद्ध जिंकलेस तर पृथ्वीचे राज्य मिळेल असे सांगितले होते. पण इंग्रज आम्हाला आज असे म्हणत आहेत की 'तूं मेलास तर तुला स्वर्गप्राप्ती होईल. आणि हे युद्ध जिंकले तर आम्हीच पृथ्वीचे राज्य करू.' या बाबतीत स्वराज्यवादी व अधिकारीवर्ग यांची तुलना करून गीतापाठी याने जे कोष्टक दिले ते फार मार्मिक असल्यामुळे आम्ही ते येथे देतो.

स्वराज्यवादी व ब्युरोक्रॅटस् यांच्या गुणदोषांची तुलना

| स्वराज्यवादी | ब्यूरोक्रॅटस् | शेरा |
|---|---|---|
| स्वराज्य मिळविण्याचा सरळ मार्ग म्हणून आम्ही साम्राज्यास बिनशर्त मदत करणार. | स्वातंत्र्याचे भोक्ते व चहाते म्हणून बिनशर्त स्वराज्य देणार. | बिनशर्त मदत करणारे म. गांधीसारखे स्वराज्यवादी आपल्यात आहेत पण बिनशर्त स्वराज्य देतो म्हणणारा एकहि ब्युरोक्रॅट अस्तित्वात असेल असे वाटत नाही. |
| साम्राज्याला बिनशर्त मदत करण्याची आमची इच्छा आहे पण आमच्यात शक्ती व उत्साह उत्पन्न होण्याला आम्हाला आधी स्वराज्य द्या म्हणजे त्या योगाने साम्राज्याचे रक्षण वेळीच होईल. | स्वराज्य देण्याची आमची इच्छा आहे पण साम्राज्यांतर्गत स्वराज्य देण्याला साम्राज्य तर टिकले पाहिजे ना? यास्तव आधी मदत करा मग स्वराज्य देऊ. | या वर्गात स्वराज्यवादी व ब्युरोक्रॅटस् या उभयतांची इच्छा व मागणी प्रामाणिक असली तरी मदत करण्यापूर्वी स्वराज्य देणे जसे जरूरच आहे तसे काही स्वराज्य देण्यापूर्वीच मदत करणे अपरिहार्य नाही. आज ब्रिटिश साम्राज्य स्वराज्य देऊ शकेल कारण ते त्यांच्या स्वाधीनचे आहे. पण मदत करण्याचे औत्सुक्य स्वराज्याविना उत्पन्न करणे स्वराज्यवाद्यांना अशक्य आहे. सारांश स्वराज्यवादी आपला मार्ग सुलभ होण्याकरिता प्रथम स्वराज्य मागतात. पण ब्युरोक्रॅटांना ते प्रथम न देण्याला स्वार्थाशिवाय काहीच सबब नाही. |
| स्वराज्य द्या म्हणजे आम्ही मदत करू. | मदत करा म्हणजे मग स्वराज्य देऊ. | या वर्गातले स्वराज्यवादी व ब्यूरोक्रॅट्स दोघेहि अट घालणारे आहेत. परंतु या उभयतात अधिक दोषास्पद कोण ते पाहू. पहिली गोष्ट ही की बऱ्याच स्वराज्यवाद्यांचा भरणा पहिल्या व दुसऱ्या वर्गातच असून तिसऱ्या वर्गात बाकीचे स्वराज्यवादी येतात. परंतु ब्यूरोक्रॅटांचा बहुतेक भरणा या वर्गातच येईल. शिवाय मुख्य भेद हा आहे की स्वराज्य दिल्यानंतर आम्ही |

मदत न केली तर ती चोपून घेण्याची सत्ता अधिकाऱ्यात रहाणारच. पण ब्यूरॉक्रसीने पाटीमागून स्वराज्य दिले नाही तर आम्ही काय करणार ? आजपर्यंत वचनभंग होत गेल्याने स्वराज्यवाद्यांची ही शंका स्वाभाविक आहे.

'स्वराज्य दिले तरी मदत करणार नाही' अशा स्वराज्यवाद्यांचा चवथ्या वर्गात समावेश करावयाचा. परंतु असले 'सिनफेनर्स' हिंदुस्थानात अस्तित्वात नाहीतच. परंतु ब्यूरोक्रॅटात मात्र 'काही झाले तरी स्वराज्य देऊच नये' असे म्हणणारे सिडनहॅमी कंपूचे अनुयायी किती तरी आहेत. बाह्यतः बोलताना ते केव्हा तरी कसे तरी स्वराज्य देऊ असे सांगतात. परंतु पांचशे वर्षांनी स्वराज्य देतो म्हणणे हे कधीच स्वराज्य देत नाही म्हणण्यासारखेच आहे.

दिल्ली वॉरकान्फरन्सचे कार्य पुढे ढकलण्याकरिता ता. १० जून रोजी मुंबईस टाऊन हॉलमध्ये सभा भरली होती. सभेला ठराविक गण आले होते. ठराविक पोटमंडळे नेमली गेली. आणि ठराविक भाषणे झाली. निरनिराळ्या संस्थानिकाना आपली कर्तबगारी दाखविण्याला अर्थात् ही योग्य संधी होती. आणि कोल्हापुर संस्थानात सर्वाहून अधिक चांगले काम झाले असा उल्लेख करण्यात आला! दिल्ली परिषदेला टिळकाना निमंत्रण नव्हते ही चूक लॉर्ड वुइलिंगडन यानी दुरुस्त केली आणि ते व इतर काही स्वराज्यवादी लोक याना निमंत्रणे झाली. पण दिल्लीसारखाच येथेहि प्रकार घडला. दिल्लीस खापर्ड्यांचा ठराव पुढेच येऊ दिला नाही हे पाहून टिळक वगैरे मंडळींनी 'आम्हास भाषणे करावयाची आहेत' असे लिहून आगाऊच कळविले होते. टिळकांच्या सांगण्यावरून केळकर यानी लॉर्ड वुइलिंग्डन यांच्या प्रायव्हेट सेक्रेटरीशी पत्रव्यवहार केला होता. ता. ३० मेच्या पत्रात केळकरानी लिहिले होते की "सभेचा कार्यक्रम पाठवा. ठरीव वक्त्याखेरीज इतर कोणास बोलण्याची परवानगी आहे की नाही आणि दिल्ली परिषदेत झालेल्या ठरावाना कोणी उपसूचना आणली तर आणण्याची परवानगी देणार की नाही?" त्याला प्रायव्हेट सेक्रेटरी मि. क्रेरर यानी उत्तर पाठवून कळविले की "कार्यक्रम तयार झाल्यावर पाठवू आणि ठराविक भाषणे झाल्यावर जाहीर चर्चेत कोणाला बोलावयाचे असल्यास परवानगी देऊ. ठराव काय होणार हे आम्ही ठरवू. उपसूचना आणण्याला परवानगी देण्यात येणार नाही. तथापि चर्चेमध्ये जी भाषणे होतील त्यांचा सरकार योग्य तो विचार करील." हे कळल्यामुळे टिळकानी उपसूचना पाठविल्या नाहीत. पण तोच विषय भाषणात आणण्याचे त्यानी व इतर कित्येकानी आधी ठरवून ठेवले. जाहीर चर्चा सुरू झाल्यावर टिळकाना भाषण करण्यास बोलावले. ते म्हणाले की "उपसूचना आणण्यास परवानगी नाही म्हणून मी ती आणली नाही. तथापि लोकांचे म्हणणे काय आहे हे आम्ही सांगतो. प्रथम आम्ही असे सांगतो की हिंदुस्थानावर आज नाही उद्या स्वारी झाली तर आम्ही हिंदी लोक प्रतिकारार्थ आपले देहहि खर्ची घालू. पण स्वराज्य व स्वदेशसंरक्षण यांची साखळी आम्हाला तोडता येत नाही." हे वाक्य उच्चारताच गव्हर्नर साहेबानी टिळकांचे भाषण थांबविले व म्हणाले की या सभेत राजकारणाची चर्चा मी करू देणार नाही. त्यावर टिळक म्हणाले "अशा परिस्थितीत परिषद सोडून जाण्याशिवाय कोणाहि स्वाभिमानी मनुष्याला दुसरा मार्ग नाही! म्हणून मी निघून जातो" असे म्हणून ते उठून गेले. यानंतर केळकराना बोलण्याविषयी निमंत्रण केले. ते म्हणाले "आमच्या राजनिष्ठेविषयी सरकारास शंका असण्याचे कारण नाही. हिंदुस्थानात मनुष्यबळ कसे जमवावे याविषयी माझ्या काही सूचना आहेत त्या मी पुढे करीनच. पण आम्ही लोकाना सैन्यात शिरण्याचा उपदेश करावयास निघालो तर आम्हास त्याना असे दाखविता आले पाहिजे की सरकार तुमचा राजकीय दर्जा वाढविण्यासाठी मनापासून प्रयत्न करीत आहे."

इतके बोलताच लॉर्ड वुइलिंग्डन उठून म्हणाले की मी या भाषणात राजकीय चर्चा करू देणार नाही. केळकर म्हणाले माझे भाषण आणखी थोडे ऐका व मग निर्णय करा. परंतु मला तसे करता येत नाही असे गव्हर्नरसाहेबानी सांगताच केळकर हेहि उठून गेले व त्यांच्या मागोमाग हॉर्निमन जमनादास बमनजी हेहि उठून गेले. नंतर इतर वक्त्यांची भाषणे झाली. त्यात बॅ. जिना यानी वकिली पद्धतीने बोलता बोलता होमरूलर लोकांचे म्हणणे मधून मधून घुसडून दिले. त्यावर अध्यक्ष म्हणाले जी गोष्ट माझ्या हातची नाही ती येथे बोलून काय उपयोग ? तेव्हा जिना म्हणाले हा तोंड बांधून बुक्क्यांचा मार आहे. नंतर दादासाहेब करंदीकर यांचे भाषण झाले. ते म्हणाले मीहि होमरूलर आहे आणि मीहि असेच सांगतो की स्वराज्य दिल्याखेरीज युद्धाकरिता मनुष्यबळ द्रव्यबळ यांची लोकाकडून हंमेन मदत मिळणार नाही. सर्व भाषणे संपल्यावर गव्हर्नरसाहेब म्हणाले " या कार्याला एकदिलाने मदत होईल अशी मला आशा होती ती सफल झाली नाही. होमरूलर लोकांच्या राजनिष्ठेविषयी मी संशय घेत नाही" तेव्हा जिना मध्येच म्हणाले ' तुमचे भाषण काढून पाहा म्हणजे कळेल. ' तेव्हा जिना याना कारमायकेल साहेबानी व इतरानी बसा बसा म्हणून गोंगाट केला.

शेवटी गव्हर्नरसाहेबानी आपले भाषण कसे तरी संपविले. नंतर दुसरे दिवशी टिळक जमनादास बमनजी हॉर्निमन व केळकर यानी आपण सभेतून उठून का आलो याचा खुलासा प्रसिद्ध केला. तसेच हॉर्निमन जमनादास वगैरे काही लोकानी यापुढे लॉर्ड विलिंग्डन अध्यक्ष असतील अशा सभेला आम्ही हजर राहणार नाही असे जाहीर केले. आणि त्यानी व इतर काही लोकानी युद्धास मदत करणाऱ्या कमिट्यातून आपली नावे काढून घेतली. ता. १६ रोजी मुंबईस स्वराज्यदिनोत्सव करण्यात आला. त्या निमित्ताने शांतारामाच्या चाळीत मोठी सभा भरविण्यात आली. गांधी हे अध्यक्ष होते. ते म्हणाले "लॉर्ड वुइलिंग्डन यांच्या वर्तनाचा मी निषेध करतो. केळकर याना पूर्वी आश्वासन मिळाल्याप्रमाणेच टिळक वगैरे गृहस्थ सभेला जाऊन भाषण करणार होते. तेव्हा त्याना मध्येच प्रतिबंध करण्यात आला ही गोष्ट अश्लाघ्य व अनुदार आहे. टिळकांचा असा उपमर्द केल्याने साम्राज्याच्या कार्याला अपायच आहे. " जिना हेहि म्हणाले की "लोकांची मदत घ्यावी अशी सरकारची खरी इच्छा आहे कोठे ? टिळकानी लष्कर भरतीचे पुष्कळ प्रयत्न केले पण ते अशा कारणानीच फसले." टिळक म्हणाले " सरकार आम्हाला अप्रामाणिक म्हणते पण त्यांच्या अप्रामाणिकपणाबद्दल मजजवळहि पुष्कळ पुरावा आहे. देशावरील बंधने अधिक वाढवून घेण्याकरिता सरकारास कोण मदत करील ? लष्करात वरिष्ठ जागा देण्याचे सरकार कबूल करील तर मी पांच हजार लोकांची भरती करीन. व तसे मजकडून न होईल तर कमी पडतील त्या माणसागणिक मी शंभर रुपये दंड देईन. आणि याची जामिनकी म्हणून मी गांधींच्याजवळ पन्नास हजार रुपये ठेवण्याला तयार आहे."

पुढील केसरीत टिळकानी लॉर्ड वुइलिंग्डन यांच्या अत्याचारावर स्वतः एक अग्रलेख लिहिला व त्यांच्या भर्तृहरीने नेहमीप्रमाणे योग्य असेच अवतरण याहि वेळी त्याना सुचविले.

मय्यप्यास्था न चेत् ते त्वयि मम सुतराम्
एष राजन् गतोस्मि ।

वामन पंडितानीहि असेच लिहिले आहे:—

" न गणसि मज जातो तुच्छ मानोनि तूतें "

या एका ओळींत टिळकांच्या एकंदर धोरणाचे सार आहे. मध्यप्रांतातहि असाच प्रकार जवळ जवळ झाला. पण तो पत्रव्यवहारावर थांबला. डॉ. मुंजे व मि. स्लोकॉक यांची मुलाखत झाली. त्यासंबधी एक प्रेसनोट सरकारने काढली. तीत गैरसमज होण्यासारखा काही मजकूर होता. तेव्हा मुंजे यानी आपले सर्व म्हणणे लेखी कळविले. त्यात त्यानी असे दर्शविले की मनोभावाने आमच्याशी वागाल तर सैन्यभरतीला मुळीच पंचाईत पडणार नाही. शिवाय लष्करभरती कशी उत्तम करता येईल याविषयी त्यानी विधायक सूचनाहि पाठविल्या. तेव्हा त्या सर्व मजकुरासह सरकाराला फिरून नवी प्रेसनोट काढावी लागली !

पुढच्या आठवड्यात मॉंटेग्यू चेम्सफर्ड यांच्या सहीचा सुधारणांच्या योजनेचा सविस्तर मसुदा प्रसिद्ध झाला व सरकार नवे अधिकार काय देणार याची साधारण कल्पना आली. त्यावरहि टिळकानी ' उजाडले पण सूर्य कोठे आहे ? ' आणि ' जनाब देहली तो बहोत दूर है ' व ' कबूल वा नाकबूल ' असे तीन अग्रलेख लिहिले. त्यांचा निष्कर्ष असा होता की या सुधारणा अपुऱ्या म्हणून नाकबूल तर केल्याच पाहिजेत. पण त्या नाकबूल करण्याचीहि एक रीती आहे. ती रीत अशी की सर्वस्वी नाकबूली न देता आम्हाला अधिक काय पाहिजे हे सुचवून नाकबुली दिली पाहिजे. निर्भीड व संमिश्र असे दोन दुसरे पक्ष आहेत त्यांचा जादा राष्ट्रीय सभा विचार करील. केसरीचे मत सर्वस्वी नाकबूल असे असले तरी टिळकानी लिहिले की " कॉंग्रेस करील तेच आम्हीहि मान्य करू. मग ती निर्भीडपणे काहीच नको असे म्हणो किंवा संमिश्र पक्षाच्या मताप्रमाणे अधिक काय पाहिजे ते सुचवो. त्यात सार्वजनिक दृष्ट्या काही हानी नाही. कारण कॉंग्रेससारख्या राष्ट्रीय सभेत सर्व गोष्टी एकाच्याच कलाप्रमाणे होत नसतात. "

पण कॉंग्रेसमध्ये काय ठरावे याच्या चर्चेत मदत करण्याला टिळक तोपर्यंत हिंदुस्थानात राहतील की नाही याची शंका उत्पन्न होऊ लागली होती. कारण चिरोल खटल्याकरिता पासपोर्ट मिळविण्याची खटपट टिळकांची सुरू होती. व त्याप्रमाणे जुलै महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात त्याना 'विलायतेत कोणतीहि राजकीय चळवळ करावयाची नाही ' या अटीवर वकील व एक दोघे सोबती घेऊन जाण्याला सरकाराकडून परवानगी देण्यात आली. या परवानगीचा उपयोग कसा करावयाचा केव्हा करावयाचा याचा विचार टिळक करीत होते इतक्यात ता. ३१

जुलै रोजी मुंबई सरकारचे सेक्रेटरी यांच्या सहीने एक हुकूम निघाला. त्यात प्रथम टिळकांच्या भाषणातील लष्कर भरतीसंबंधाचे काही उद्गार म्हणून उतारे दिले होते. त्यात पुण्यास ता. २२ जून रोजी टिळकानी केलेल्या भाषणाचा एक उतारा होता. तो देऊन 'डिफेन्स ऑफ कन्सॉलिडेशन अॅक्ट'प्रमाणे सरकारने असा हुकूम काढला की यापुढे "ज्या जिल्ह्यात तुम्हाला भाषण करावयाचे असेल त्या जिल्ह्याच्या डि. मॅजिस्ट्रेटची व मुंबईस पोलिस कमिशनरची आगाऊ परवानगी घेतल्याशिवाय तुम्हाला जाहीर भाषण करण्याची मनाई केली आहे." पण याच्या आधीच मुंबई येथे मॉटेग्यूचेम्सफर्ड रिपोर्टाचा विचार करण्याकरिता कॉंग्रेसची जादा बैठक करण्याचे ठरले होते त्याला उद्देशून हुकुमात इतकी सोडवणूक करून ठेवली होती की "या जादा बैठकीत सुधारणांच्या योजनेसंबंधी ठराव आल्यास त्यावर बोलण्याला मात्र टिळकाना हरकत नाही."

सरकारी हुकुमात ज्या भाषणाचा उल्लेख केला होता त्यात मुख्य मुद्दा इतकाच आहे की लोक सैन्यात जाण्याला तयार होतील पण देशाला त्यापासून काही उपयोग होण्याची आशा असेल तर! अर्थात् देशात जर नेहमी परतंत्रपणानेच वागावे लागणार तर त्या देशाचे रक्षण केले काय न केले काय? ही विचारसरणी वैतागाचीच होती हे उघड आहे. कारण इंग्रजी राज्याचे जे फायदे आहेत तितक्या पुरते ते टिळकाना मान्य असल्याचे १९१६ सालच्या ऑगष्टमध्येच त्यानी जाहीर केले होते. पण घासाघीस करून त्यातल्यात्यात काही अधिक अधिकार अधिक लष्करी जागा मिळतात की काय इतकेच टिळकाना पहावयाचे होते. म्हणून या हुकुमानंतर असोसिएटेड प्रेसच्या प्रतिनिधीने टिळकांची मुलाखत घेतली तीत त्यानी आपण खरोखर काय बोललो हे काढून दाखविले. आणि मुंबईच्या सभेत जाहीर केल्याप्रमाणे लष्कर भरतीच्या जामीनकीबद्दल पन्नास हजार रुपयांच्या ठेवीच्या पावत्या त्यानी गांधीकडे पाठविल्या होत्या ते पत्र व गांधींचे उत्तर हीहि त्या प्रतिनिधीला दाखविली. या पत्रात त्यानी आपली अट स्पष्ट लिहिली आहे. "हिंदुस्थानातून जे रिक्रूट सैन्यात दाखल करण्यात येतील त्याना लष्करी कॉलेजात शिक्षण घेण्यास परीक्षा देण्यास व अधिकाराच्या जागा मिळण्यास युरोपियनांच्या जोडीनेच समान संधी मिळावी आणि वरिष्ठ जागा व कमिशने उघड चढाओढीने मिळण्याचा मार्ग खुला व्हावा."

या अटीत काही विशेष वावगे होते असे कोणीहि म्हणणार नाही. कारण या दृष्टीनेच नेमस्त सुधारणावादीहि आजपर्यंत प्रयत्न करीत आले आहेत. पण या भाषणबंदीमुळे तरी सरकारला रिक्रूट भरतीत काय फायदा झाला? कारण पुढे लवकरच गांधीनी टाइम्स ऑफ इंडियाला पत्र लिहिले त्यात ते म्हणतात "मुंबई सरकारने टिळकांच्या व्याख्यानाला बंदी केली यामुळे माझ्या रिक्रूटींगच्या कामाला हरकत येत आहे यास्तव ती सरकारने दूर करावी!"

## ( १३ ) मुंबईची जादा काँग्रेस

मॉंटेग्यू चेम्सफर्ड रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यापासून नेमस्त व होमरूलर यांच्यात पुनः वाद सुरू झाला. आणि त्यानी ऑक्टोबर महिन्यात मुंबईस आपली वेगळी परिषद भरविण्याचे ठरविले. इकडे जादा काँग्रेसची बैठकहि मुंबईस ता. २८ ऑगष्टपासून भरविण्याचे ठरले. अर्थात् आधी जादा काँग्रेस भरणार व मग नेमस्तांची परिषद भरणार तेव्हा आधी जादा काँग्रेसला जावे की नाही हा प्रश्न त्याना येऊन पडला. प्रथम असे वाटले की सर्व नेमस्त पक्षचा पक्ष आता काँग्रेसच्या बाहेर पडतो. पण तसे झाले नाही. वास्तविक काँग्रेसमधून बाहेर पडण्याला त्याना इतक्यात काहीच कारण झाले नव्हते. पण पूर्वी शास्त्री व चिंतामणी यासारखे जे लोक होमरूलचे समर्थन करीत होते त्यानीहि काँग्रेसला जावयाचे नाही असे ठरविले. ठरल्याप्रमाणे सभेला ता. २८ रोजी प्रारंभ व्हावयाचा. पण आदले दिवशी पं. मदनमोहन यानी आपण नेमस्त पक्षाशी तडजोड करून पाहणार आहो म्हणून एक दिवसाची मुदत द्यावी अशी विनंति केली. म्हणून पुष्कळसा विरोध असताहि स्वागतमंडळाने ती गोष्ट मान्य केली. पण दुसरा दिवस उजाडताच वाच्छा यानी वर्तमानपत्रातून असे प्रसिद्ध केले की 'पंडितजींना तडजोडीविषयी मी काहीच आश्वासन दिले नव्हते. ते तडजोडीची गोष्ट उगीच बोलतात. काँग्रेस पक्षाशी आमचे एकमत होणे अशक्य आहे. आणि आमची वेगळी परिषद भरविण्याचा निश्चय कायम आहे.' तात्पर्य पंडितजी तोंडघशी पडले आणि हजारो प्रतिनिधीना एक दिवस विनाकारण ताटकळत बसावे लागले.

सभेला प्रत्यक्ष सुरवात ता. २९ रोजीं एक वाजता झाली. स्वागताध्यक्ष विठ्ठलभाई पटेल हे होते. आता मात्र ते हळूहळू राष्ट्रीय पक्षाकडे झुकू लागले होते. त्यानी आपल्या भाषणात फटकून वागणाऱ्या नेमस्त लोकावर टीका केली. जादा सभेचे अध्यक्षस्थान बॅ. हसन इमाम याना देण्यात आले होते. त्यानीहि आपल्या भाषणात असा उपदेश केला की लोकानी आपल्या मागण्या चर्चा करून ठरवाव्या आणि त्या जोराने व निश्चयाने मागत राहावे. दुसरे दिवशी सभेला ३॥ वाजता सुरवात झाली. एका ठरावावर बेझन्टबाईंचे भाषण झाले. फिरून विषयनियामक कमिटी बसली ती त्या दिवशी व दुसरे दिवशी चालली. व शेवटी तिसरे दिवशी सुधारणांची योजना निश्चित ठरून तो ठराव पं० मदनमोहन यानी मांडला. लल्लूभाई सामळदास यानी आपल्या भाषणात सांगितले की काँग्रेसमध्ये नेमस्ताना अपमानास्पद रीतीने वागविण्यात येईल अशी भीति वाटत होती पण तसे काही घडले नाही. पण विषय नि० मंडळाच्या सभेत व्यक्तिशः अनेक खटके उडाले ही गोष्ट खरी. सभेला मुंबईचे व पुण्याचे नेमस्त पक्षाचे काही काही लोक हजर राहिले होते. त्या सर्वांतर्फेच ही कबूली होती. डॉ. रासबिहारी घोस यानीहि सभेला सहानुभूतीची तार पाठविली होती. एकंदर विचार करता राष्ट्रीय सभेने

कुशलतेने मार्ग काढला. तो असा की मूळ आधार म्हणून मॉंटेग्यू–चेम्सफर्ड रिपोर्टाचाच घेतला. तथापि स्वराज्याच्या लायखी संबंधाने कॉंग्रेसने लखनौच्या सभेतील सुरेंद्रनाथ यानी मांडलेल्या ठरावाची प्रस्तावना घेऊन हिंदी राष्ट्र आजहि स्वराज्यास लायख आहे असे विधान केले. इतर बाबीत निरनिराळ्या दुरुस्त्या केल्या. या मुख्य ठरावावर टिळक पाल बेझन्टबाई वगैरेंची भाषणे झाली. रौलेट कमिटीच्या रिपोर्टाचा निषेध करण्यात आला व शेवटी विलायतेस शिष्टमंडळ पाठविण्याकरिता कमिटी नेमण्यात आली. मुंबईस मॉस्लेम लीगची सभा याच सुमारास झाली तिनेहि अशाच अर्थाचे ठराव केले.

अशा रीतीने मुंबईची राष्ट्रीय सभा उलगडल्यावर पुणे सार्वजनिक सभेमार्फत केळकर यानी कार्याध्यक्ष म्हणून मुंबईस आलेल्या काही प्रमुख गृहस्थाना पुण्यास येण्याबद्दल विनंति केली. त्याप्रमाणे बाबू मोतिलाल घोस चक्रवर्ती चित्तरंजनदास बिपिनचंद्र पाल व. लहिरी वसंतकुमार घोस चिदंबरं पिले कृष्णस्वामी शर्मा वगैरे लोक पुण्यास आले. बंगालची ही टिळकांच्या विशेष प्रेमाची मंडळी. व त्यातूनहि मोतिलाल घोस दास पाल वगैरे लोक प्रसिद्ध. यामुळे त्यांच्या भेटीला पुण्यातील अनेक लोक येऊन गेले. आणि ता. ३ व ४ सप्टेंबर रोजी गायकवाड वाड्याच्या पटागणात त्यांची व्याख्याने झाली. सभाना अध्यक्ष अर्थात् टिळकच होते. पण त्याना भाषणबंदीचा हुकूम असल्यामुळे मूकाध्यक्ष व्हावे लागले! असा प्रकार अपूर्व म्हणून लोकाना मोठी मौज वाटली. स्वतः टिळकहि हा प्रकार मोठ्या मौजेने व विनोदाने निभावून नेत होते. कारण बोलून बोलावयाचे नाही न बोलून बोलावयाचे असा प्रकार त्याना करावा लागत होता. तेव्हा दुय्यम अध्यक्ष म्हणून केळकराना अध्यक्षाचे काम करावे लागले व त्यानीच निरनिराळ्या पाहुण्यांची ओळख करून दिली. पहिले दिवशी चक्रवर्ती व दास यांची भाषणे झाली व पाल हेहि थोडे बोलले. दुसरे दिवशी पुनः सभा भरून कृष्णस्वामी शर्मा महादेव अय्यर चिदंबरं पिले वसंतकुमार घोस व फिरून बिपिनचंद्र पाल अशी भाषणे झाली. शेवटी बाबू मोतिलाल घोस यांचे भाषण झाले. ते आधीच वृद्ध त्यातून आजारी. केवळ अस्थिपंजर उरलेला. त्यांच्या शब्दानी बोलावयाचे तर ते आज कैक वर्षे मरू घातलेले! अर्थात् त्यानी मोठे भाषण असे केले नाही. पण महाराष्ट्रीयांचा एवढा मोठा समाज पाहून व गहिंवरून त्यानी तरुण पिढीला आशिर्वाद दिला आणि असे सांगितले की सार्वजनिक काका न्या. रानडे नामजोशी यांच्यापासून पुणेकरांचा व माझा ऋणानुबंध आहे. व टिळक हे तर माझे धाकटे बंधु असेच मी नेहमी मानीत आलो आहे. सायंकाळी सार्वजनिक सभेत टिळकांच्या मोठ्या तसबिरीचा अनावरण समारंभ झाला. त्यावेळीहि मोतिबाबूनी असेच लहानसे भाषण केले. त्या प्रसंगी चक्रवर्ती म्हणाले "टिळकाना पाहून कलकत्त्याच्या एका सभेची मला आठवण झाली. त्या सभेत टिळक अवचित आल्याबरोबर हजारो लोक एकदम उठून उभे राहिले व त्यानी टिळ-

कांच्या नावाचा जयघोष केला. हे पाहून न्या. सर जॉन वुड्रोफ सभेला हजर होते ते मला म्हणाले 'असे स्वागत होण्याकरिता मी आपली सर ही पदवीसुद्धा टाकून देण्याला तयार होईन.' शेवटी सभेतर्फे मंडळीना उपहार देण्यात आला व दुसरे दिवशी सर्व मंडळी आपापल्या गावी गेली.

## (१४) विलायतेस प्रयाण

अशा रीतीने राष्ट्रीय सभेनेहि सुधारणाविषयी आपली योजना निश्चित केल्यामुळे टिळकाना विलायतेस जाण्याला आता मोकळीक मिळाली. या खेपेला टिळकानी कोणताहि समारंभ कोणास करू दिला नाही. आणि एकदम उठून एखाद्या जवळच्या गावाला गेल्याप्रमाणे ते ता. १९ सप्टेंबर रोजी निघून गेले. त्यांच्या बरोबर वकील म्हणून दादासाहेब करंदीकर स्नेही म्हणून वासुदेवराव जोशी आणि परिचारक म्हणून गणपतराव नामजोशी असे गेले. बॅ. बॅपटिस्टा हे आगाऊच विलायतेत असल्यामुळे त्यांच्या उतरण्यावगैरेची व्यवस्था झालेलीच होती. ऑक्टोबर महिन्यात दिल्ली येथील कॉंग्रेसच्या अध्यक्षाच्या निवडणुकीचे काम सुरू झाले. त्यात अकरा कमिट्याकडून टिळकांची शिफारस करण्यात आल्यावरून स्वागत सभेने त्यांची नेमणूक एकमताने करून त्याना त्याप्रमाणे पोर्टसय्यद येथे तार पाठविली. अर्थात् न खात्या देवालाच हा नैवेद्य म्हणावयाचा! कारण चिरोल-केसकरिता ते विलायतेस गेलेले असून केवळ कॉंग्रेसचे अध्यक्ष होण्याकरिता दीड-महिन्यात परत येणे अशक्य होते. पण लोकानाहि टिळकांची निवडणूक एकदा तरी केल्याशिवाय समाधान वाटत नव्हते. वास्तविक आदल्या वर्षीच त्यांची या जागेवर निवडणूक व्हावयाची. पण बेझंटबाईना अटक झाली होती व त्याचा निषेध म्हणून त्यांचीच निवडणूक करणे राष्ट्रीयदृष्ट्या इष्ट होते. आणि टिळकानी त्या निवडणुकीला आपण होऊन मदत केली होती. पण निवडणुकीचा प्रसंग यावा आणि तो काही कारणाने न लाभावा अशी गोष्ट टिळकासंबंधाने पूर्वीहि अनेक वेळा घडली होती. म्हणून हा अनुभव कोणाला नवासा वाटला नाही. टिळकानी स्वागत मंडळाला उलट तार करून आभारपूर्वक नकार दिला. पण त्यांच्या या नाकारलेल्या मानाचा त्याना विलायतेत आपल्या कामी एक प्रकारे उपयोग होण्यासारखा होता. तो असा की प्रत्यक्ष नसले तरी नियोजित अध्यक्ष म्हणून त्याना राष्ट्रीय सभेतर्फे बोलण्याचालण्याला एक प्रकारची सवड होऊन राहिली.

मॉंटेग्यूसाहेब येऊन गेले. सुधारणा संबधी त्यांचा रिपोर्ट झाला. राष्ट्रीय सभेने जादा बैठकीत त्यावर आपले मत प्रगट केले. शिष्टमंडळाची आघाडी विलायतेस जाऊन भिडली. आणि मुख्य राष्ट्रीय सभा दिल्लीस लौकरच भरावयाची होती. यामुळे देशात किंचित् स्थिरस्थावर झाले होते. तिकडे विलायतेतहि तहाच्या वाटाघाटी सुरू असून तेथे काय हालचाली होतात हे समक्ष पाहण्याला व त्या संधीत काय करिता येईल ते करण्याला टिळक ता. ३० ऑक्टोबर रोजी विलायतेस

पोचले होते. नोव्हेंबरच्या प्रारंभी प्राथमिक तह झाला. यामुळे इकडे हिंदुस्थानातहि अभिनंदने वगैरे रीतीप्रमाणे होत होती. इतक्यात लॉर्ड विलिंग्डन हे विलायतेस जाण्यास निघाले तेव्हा रीतीप्रमाणे त्यांच्या स्मारकाची चळवळहि सुरू झाली. यातहि पूर्वीचाच अनुभव आला. जाहीर रीतीने सभा भरवून स्मारकाची सूचना मंजूर करून घेणे चालकाना अवश्य वाटले. म्हणून पोलिस रेल्वे व इतर निमसरकारी खाती यांची मदत घेऊन सभा पार पाडण्याचे पुष्कळ प्रयत्न झाले. प्रथम स्मारकवाल्यानी मताधिक्याचा मोठा आव घातला. पण जिना हॉर्निमन व मुंबईचे होमरूलर यानी स्मारकाला विशेष जोराचा विरोध केला. व शेवटी मुंबईच्या टाऊन हॉलमध्ये स्मारकसभा भरण्याचे ठरले. सभा नागरिकांच्या विनंतिवरून शेरीफ यानी बोलाविली होती म्हणून ती थोडीशी त्यांच्या हाती होती. तथापि सभा जाहीर म्हणून बॅ. जिना यानी दोन हजार लोकांच्या सह्यांचा अर्ज शेरीफकडे पाठविला. आणि विरुद्ध बाजूच्या लोकाना बोलण्यास परवानगी दिली पाहिजे व मते मोजण्याची नीट व्यवस्था झाली पाहिजे असे आगाऊ विरोधी पक्षाकडून कळविण्यात आले. पण शेवटी गोष्ट वर्दळीवर आलीच. दंगा होणार म्हणून पोलिस बंदोबस्त आदल्या दिवसापासून ठेवला होता. प्रत्येक पक्षाचा असा प्रयत्न होता की सभेला आधी जाऊन शक्य तितक्या जागा अडवावयाच्या. सकाळी दहा वाजताच जिना वगैरे मंडळी सभेला गेली तो स्मारकपक्षाने निम्मी अधिक जागा अडविलेली दिसून आली. सकाळपासून संध्याकाळपर्यंत जागा अडवून ठिय्या देऊन बसणे हे काम जिकीरीचे होते. तथापि आतल्या लोकाना खाण्यापिण्यास पुरविण्याची व्यवस्था बाहेरच्यानी केली. स्मारकवाल्यानी दिनशा वाच्छा यांची अध्यक्षस्थानी निवडणूक करण्याचा ठराव पुढे आणला. हॉर्निमन यानी उपसूचना मांडली. पण ती न जुमानता वाच्छा हे खुर्चीवर जाऊन बसले. इतक्यात जिना हे प्लॅटफॉर्मवर जाऊन बोलण्याचा प्रयत्न करू लागले. त्याबरोबर सभेत दंगल सुरू झाली. हे पाहून पोलिस लोक आत शिरले व टाऊन हॉल खाली करा असे सर्वाना सांगू लागले. जिना यानी सांगितले की 'सभा बरखास्त होईपर्यंत आम्ही येथून हलणार नाही.' शेवटी पोलिसानी सभा बंद करण्याचा हुकूम दिला आणि सभा मोडता मोडताना थोडीशी मारामारी झाली. काही पार्शानी आपल्या जातीचा राग जिना यांच्यावर या वेळी काढून त्याना ढकलून दिले आणि ठोसे लगावले. परंतु होमरूलर लोकानी त्यांचे संरक्षण केले. अशा रीतीने मार देत व मार घेत दोन्ही पक्ष बाहेर पडून सभा मोडली आणि स्मारकवाल्यांचा हेतू फुकट गेला !

## (१५) दिल्लीची राष्ट्रीय सभा

डिसेंबर अखेर दिल्ली येथें पंडित मदनमोहन यांच्या अध्यक्षतेखाली तेहतिसावी राष्ट्रीय सभा भरली व विशेष कोणत्याहि प्रकारची भानगड न होता ती

पार पडली. जादा काँग्रेसचाच ठराव मंजूर करण्यात आला. त्यात मॉंटेग्यू–चेम्स-फर्ड सुधारणा या असमाधानकारक व निराशाजनक आहेत असेच म्हटले होते. स्वराज्याचे संपूर्ण हक्क पंधरा वर्षांत द्यावे असे म्हटले होते. शिवाय प्रांतिक स्वातंत्र्य द्यावे अशीहि उपसूचना मंजूर झाली. या सभेला ना. शास्त्री हे हजर राहिले होते. त्यानी ठरावातील असमाधानकारक व निराशाजनक या शब्दाना हरकत घेतली. स्वतः बाईनी 'सर्व प्रांताना स्वातंत्र्य द्यावे' हे शब्द मतैक्य होण्याकरिता गाळावे असे सुचविले. पण त्यानी असमाधानकारक व निराशाजनक हे शब्द फारच सौम्य आहेत असे सांगितले! शेवटी शास्त्री यांची उपसूचना नामंजूर झाली पण बेझंटबाई यांची मान्य झाली! यानंतर 'काँग्रेसने शिष्टमंडळ नेमल्यास त्याला पासपोर्ट देण्याची व्यवस्था करण्यात येईल' असे सरकारी पत्र सभेला वाचून दाखविण्यांत आले.

दिल्लीच्या राष्ट्रीय सभेवर जहालपणाचा आरोप आणण्यास नेमस्त व अँग्लो इंडियन यांच्याकडून सुरवात झाली. पण या सभेपासून नेमस्तपक्षाने बहुतेक आपले अंग काँग्रेस मधून काढून घेतल्यामुळे सभेतील वाद थांबून तो बाहेर बाहेर व वर्तमानपत्रातून सुरू झाला. रौलेट कमिटीचा निषेध केला म्हणून अँग्लो–इंडियन रागावले व राजनिष्ठेची परंपरा सोडून सुधारणांची एकदम मोठी मागणी केली म्हणून नेमस्त रागावले. पण दडपशाहीची नवी हत्यारे तयार करून सरकार ती पाजळू लागल्यामुळे फिरून नेमस्त व जहाल याना एकमनाने विचार करण्याचा एक प्रसंग आला. तो म्हणजे रौलेट बिल हा. याला क्रिमिनल लॉ अमेंड-मेंट बिल भाग १ व भाग २ अशी नावे आहेत.

पहिल्या बिलाने राजद्रोही मजकुराची पत्रके आपल्या जवळ बाळगणे हा गुन्हा ठरविला. विशिष्ट आरोपासंबंधाने चौकशीचे व पुराव्याचे काही नियम बद-लले. आणि शिक्षा भोगून झाल्यावरहि बंधमुक्त कैद्याना कोठे राहावे काय करावे वगैरे बाबतीत दोन वर्षांपर्यंत जामीन घेण्याचा अधिकार कोर्टांना असावा असेहि एक कलम होते. दुसऱ्या बिलात विशिष्ट गुन्ह्यांची चौकशी विशिष्ट रीतीने व्हावी आणि अशा चौकशीत आरोपींच्या नेहमीच्या सवलती कोणकोणत्या काढून घेण्यात याव्यात हा मुख्य विषय होता. या दोन्ही बिलांचा मिळून निष्कर्ष असा की केवळ आरोप ठेवून चौकशी केल्याशिवाय कोणाला तुरुंगात टाकले असे तर वरकरणी म्हणता येऊ नये, पण साक्षीपुरावा नाही वकील नाही अपील नाही अशी स्थिति जवळ जवळ उत्पन्न करण्यात येऊन वाटेल त्याचा वहिम घेऊन त्याला तुरुंगात टाकावे मोठी शिक्षा द्यावी व सुटल्यावरहि जायबंदी करावा! ही बिले पुढे आल्याबरोबर सुधारणासंबंधीचा वाद क्षणभर बाजूला पडला. आणि नेमस्त व जहाल याना काळजी उत्पन्न होऊन ते दोघेहि एका बैठकीवर येऊन सहविचार करू लागले. चोहोंकडे सभा भरल्या आणि वरिष्ठ कायदेकौन्सिल हे लौकरच सरकार व लोकपक्ष यांच्या विरोधाचे रणक्षेत्र होणार असे दिसून आले.

# परिशिष्ट

## [ १९१७ व १९१८ सालामधील निवडक पत्रे ]

### ( १ ) श्रीनिवास शास्त्री यांचे केळकरास पत्र

मद्रास १ फेब्रुवारी १९१७

मी थोडा आजारी असल्यामुळे पुण्याकडे थोडासा उशीरा येणार आहे. समर्थ याजकडून पत्र आले त्यात तुमच्या अंदाजाप्रमाणेच आहे. तुम्ही व मुंबईची मित्रमंडळी यांच्या कृपेमुळे मला परिषदेच्या अध्यक्षपदाचा मान मिळत आहे. फेब्रुवारी मार्चमध्ये मी बहुधा दिल्लीस असेन. मुंबईची मुस्लीम लीग आपणाशी सहकारिता करील काय ? पुणे व लखनौ येथे तुमचे आमचे बोलणे झाले तेव्हा ती सहकारिता करील असा आमचा अंदाज होता. किंबहुना अशा हेतूनेच टिळकानी आपला टाईप केलला मेमोरॅन्डम् मूळ तयार केला व तोच वाच्छा व मुंबई प्रां. कॉ. कमिटीच्या सभासदानी मान्य केला. कार्यकारी मंडळात कॉंग्रेस व मुस्लीमलीग या दोहो संस्थांचे प्रतिनिधी आले व त्यानी मिळून काम केले तर हिंदुमुसलमानांचे ऐक्य झाले हे खरे असे लोकाना वाटेल.

### ( २ ) नटेशराव द्रवीड यांचे केळकराना पत्र

दिल्ली ११–२–१७

शास्त्री यानी तुमचे पत्र दाखविले. मला किती आनंद झाला म्हणून सांगू ! यापुढेहि आपणात असाच सलोखा राहील तर किती चांगले होईल ! त्यांचे माझे बोलणे झाले त्यात असे ठरले होते की राष्ट्रीय पक्ष एकमताने त्यास बोलावील तरच त्यानी जावे. इतर कित्येक गोष्टीवर तुमचा सल्ला व मदत पाहिजे. मी माझ्या बाजूने मदत करण्यास तयार आहे व तुम्हीहि आहाच. १९०५।०६ साली तुम्ही आम्ही मिळून खटपट केली ती फुकट गेली. सर्वांनी मिळूनच हे काम केल्याशिवाय होणे नाही. कोणत्याहि एकाच पक्षाचे हित साधावे अशी माझी इच्छा नाही. उभय पक्षाना मिळून करता येण्यासारखे काम उभयतानी मिळून करावे.

### ( ३ ) माधवराव सप्रे यांचे केळकराना पत्र

रायपूर २२–२–१९१७

महात्मा टिळक यांचे एक चरित्र हिंदीत लिहावे असा विचार आहे. तरी स्वतःची किंवा दुकानदाराकडून त्यांच्या चरित्रासंबधाने मिळतील तितकी छापील पुस्तके वगैरे पाठवावी. तुमच्या काही पुस्तकांची भाषांतरेहि मला करावयाची आहेत तरी तीहि सर्व पाठवावीत.

### ( ४ ) मुंडले यांचे टिळकाना पत्र

इस्लामपूर १२ मार्च १९१७

जुनी दडपशाही व तिचे परिणाम आपणास विदित आहेतच. व नवीहि पुनः सुरू होणार असा रंग दिसतो. तरी पुढे ही चळवळ कशी चालवावी याचा आपण काही विचार केला आहे काय ? होमरूललीगची चळवळ जोरात आली म्हणजे सरकार पुनः तुम्हाला बाजूस काढून नेईल. मग पुढे तिची वाट काय व्हावयाची ? मला वाटते की नव्या चळवळीत पहिला हल्ला तुम्ही आपणावर घेऊ नये व नवीन माणसे पुढे आणून नवी घटना करावी. तीन किंवा चार माणसांच्या हाती सर्व योजना द्यावी व कोणती चळवळ उघड करावी कोणती करू नये याची दिशा त्यानी दाखवावी. तुम्ही या घटनेचे अध्यक्ष व केळकर हे एक सभासद व चिटणीस असावेत. इतर प्रांतातील एक दोन माणसे घ्यावी. पोलिस लोक चिडवून आमच्या तापट लोकाना गोत्यात आणतात. तरी हे टाळण्याविषयी लोकाना समजून सांगितले पाहिजे. जेथे प्रतिकार करणे अपरिहार्य होईल तेथे मध्यवर्ती मंडळाने पुढे होऊन तो करावा. प्रत्यक्ष चळवळीत न पडता शांत मनाने बसून खोल विचार करणाऱ्यांचाहि एक वर्ग या घटनेत असावा व त्याच्या दिमतीला ग्रंथसंग्रह भरपूर असावा. तरी याविषयी मंडळी जमवून आपण अवश्य विचार करावा असे मला वाटते. सुचले ते लिहिले आहे.

### ( ५ ) वि. मो. महाजनी यांचे टिळकाना पत्र

अकोला ३ मार्च १९१७

अभंगाचे नोटबूक पूर्वी आपणाकडे दिले ते परत पाठवावे व आपला अभिप्राय कळवावा. एकाचे म्हणणे असे की हे अभंग छापताना विषयवार द्यावे. दुसरे म्हणतात तसे केल्याने वाचकास कंटाळा येईल. विषयवार रचना न केली तर गोंधळ होणार. एक म्हणतात एका बाजूला अभंग व दुसऱ्या बाजूला भाषांतर असे छापावे. पण याला खर्च बराच येतो. म्हणून दुसऱ्याचे म्हणणे मूळ अभंग न देता नुसता अभंगार्थच द्यावा. पण असे केल्याने वाचकास आवडणार नाही असेहि आहे. तरी आपला अभिप्राय यथावकाश जरूर कळवावा.

### ( ६ ) श्री. शास्त्री यांचे केळकराना पत्र

मद्रास १७ एप्रिल १९१७

मी जोखमीचे काम पत्करले आहे. अजून काय विषय घ्यावे याचा विचार केलेला नाही. पुण्यास येताच लष्करभरतीसंबंधाने मी एक व्याख्यान देणार आहे. अद्याप आपली तरुण पिढी या कामी मागे घेत आहे. तरी तुमचा मनमोकळा

सल्ला आणि भरपूर मदत यांची अपेक्षा आहे. कॉंग्रेस व होमरूललीग यांचे मिळून मंडळ नेमावे ही तुमची कल्पना अंमलात येईल तर बरे होईल.

### ( ७ ) वि. ग. केतकर यांचे केळकराना पत्र

नाशिक २० एप्रिल १९१७

शास्त्री यांचे अध्यक्षस्थान स्वीकारल्याचे पत्र आले आहे. परिषदेला क्रमांक कितवा द्यावा हा वाद डोकावत आहे. पण अजून जोर करीत नाही. शास्त्री लिहितात की मला मराठी भाषा समजत नाही तर मी वक्त्याना बोलावणे किंवा भाषणावर नजर ठेवणे वगैरे गोष्टी कशा करू? याकरिता अध्यक्षाना मदत करण्याकरिता तुम्हाला उपाध्यक्ष म्हणून निवडावे अशी सूचना मंडळीत निघाली आहे. अशा गोष्टीला जुना दाखला नाही. पण आयत्या वेळी बनेल ते करू.

### ( ८ ) बॅपटिस्टा यांचे केळकराना पत्र

मुंबई २ मे १९१७

मी नाशिकच्या प्रां. परिषदेला हजर राहणार आहे. यापुढे माझी सूचना अशी आहे की होमरूललीगचे अध्यक्ष टिळकानी व्हावे नाहीतर तुम्ही व्हावे. कामाचा सर्व भर तुम्हा दोघावरच पडतो. मग हा मान देखील तुम्हालाच का असू नये? मधुमेहाचे औषध टिळकानी पाठवितो असे लिहिले पण ते अजून मिळाले नाही.

### ( ९ ) राजाराम भट्ट लले यांचे टिळकास पत्र

बनारस ७ मे १९१७

आम्ही तीस पसतीस वर्षापासून कलाबतु घरी तयार करतो. त्या संबंधाची साधने घरीच तयार केली आहेत. अलीकडे पंधरा वर्षे परदेशी कलाबतु फार येऊ लागल्यामुळे इकडील धंदा बुडत चालला. प्रथम कमीत कमी दहा हजार भांडवल नवीन घालावे लागेल. याबद्दल पैसाफंड कमिटीला अर्ज केला आहे. तरी आपणहि शिफारस व मदत करावी.

### ( १० ) ग. रा. मराठे यांचे टिळकाना पत्र

वसई ३ जून १९१७

माझ्या यंत्राची हस्तलिखित चोपडी वसईस परत पाठवावी. एका लग्नसमारंभात वऱ्हाडी कोण व यजमान कोण हे ओळखण्याला एका कल्पक गृहस्थाने वाटेत दगड ठेवल्याची गोष्ट आपणास माहीत असेलच. मीहि आपले यंत्र घेऊन अनेक प्रदर्शने व परिषदा हिंडलो व तेथे वाटेत ठेवलेल्या दगडासारखा यजमान हुडकून काढण्याचा उपयोग त्या यंत्राचा मला झाला. मोठमोठे लोक मी पोटाच्या

धंद्याकरिता नेलेली मेणाची चित्रे पाहून जात. यंत्राकडे कोणी पाहिले नाही. हल्ली ईश्वराच्या इच्छेने महायुद्धाची संधि आली आहे. अशा वेळी माझे हे यंत्र घरोघर चालू लागेल तर फार उपयोग होईल. घरबसल्या बायकानाहि आठ आणे मजूरी मिळेल. आमच्या घरचे या यंत्रावर आजवर पाचपन्नास हजार रुपये खर्च झाले आहेत. तरी हे यंत्र घेऊन ते थोडक्यात विकून कोणी त्याचा प्रसार करील तर पाहा.

### ( ११ ) बेझन्टबाईंचे केळकराना पत्र

मद्रास ७ जून १९१७

दडपशाहीचा पाय पुढे आहे. येथील गव्हर्नरांचे भाषण सिमला येथून हुकूम आल्याप्रमाणे झाले. त्याप्रमाणे इतर ठिकाणीहि भाषणे होतील. प्रथम मला अटक होईल मग इतराना. पुढील आठवड्यातच ही गोष्ट घडून येईल. कदाचित त्याच्या आधीहि. या गोष्टीची उघड चर्चाहि करू नये व सभा भरवू नयेत असाहि हुकूम निघण्याचा संभव आहे. हेतू हा की इकडील चळवळ विलायतेस कळू नये. अशा रीतीची मुस्कटदाबी झाली तर सर्व संपलेच म्हणावयाचे.

### ( १२ ) विद्यार्थी गोविंद यांचे टिळकाना पत्र

सागर ११ जून १९१७

येथील प्रायश्चित्त प्रकरण अद्यापि शांत झाले नाही. शुद्ध पक्षाची मंडळी शंकराचार्यांकडे धाव घेत आहे. बनारस येथे येऊन गेलेले शिवगंगा मठाचे आचार्य हे विरुद्ध निकाल देणार असे ऐकतो. भारतधर्म महामंडळ आम्हाला अनुकूल असून ते मंडळ आचार्यांचा निकाल मानणार नाही असे दिसते. तरी पूर्वी पत्रात लिहिल्या मुद्यावर आपण एखादी लहानशी शास्त्रव्यवस्था बांधून पाठविण्याची कृपा कराल तर बरे. नाही तर कोर्टात रुपये खर्च होतील व एक दोन बळी पडतील.

### ( १३ ) वामनराव मुकादम यांचे टिळकाना पत्र

गोध्रा १९ जून १९१७

आपणास त्रास द्यावयाचे जिवावर येते पण काय करणार ? आमची गुजराथ राजकारणात अजून मागे आहे. म्हणून परिषद भरवीत आहोत. गुजराथेची अशी वेगळी परिषद भरविण्याला आम्हाला मुंबईकर हरकत करीत आहेत. पण सिंध आपली वेगळी परिषद भरवितो तशी गुजराथेलाहि का असू नये ? मी मुंबईस समर्थ याना फिरून लिहीत आहे. तरी या बाबतीत आपणहि आम्हाला मदत करावी.

**( १४ ) सर सुब्रम्हण्यम् अय्यर याचे टिळकांस पत्र**

मद्रास १९ जुलै १९१७

आमच्या होमरूललीगच्यातर्फे कुलपाच्या निशाणीचे हे जयचिन्ह मी तुम्हाला पाठवीत आहे. या आपल्या देशाकरिता ज्याना ज्याना म्हणून तुरुंगवास घडला त्याना त्याना हे नजर करण्याचा आमचा विचार आहे. कुलपाखाली तुरुंगाचे दरवाजे कोरले आहेत व गजात F. I. ही अक्षरे गुंतविली आहेत. त्याचा अर्थ " Fellowship of the Interned. " सामान्य पदके आम्ही पितळेची केली आहेत. पण तुमचे हे पदक मुद्दाम सोन्याचे करून पाठविले आहे. कारण तुमची योग्यता तशीच अनन्यसामान्य आहे. निस्वार्थाने तुरुंगवास सोसलेल्या लोकांचा असा सन्मान व्हावा हे जनतेला प्रियच आहे. आणि हे जयचिन्ह साधे असले तरी ते स्पृहणीय अशा बहुमानाचे आहे असेच ते स्वीकारणाराला वाटेल यात शंका नाही.

**( १५ ) बिपिनपाल यांचे टिळकाना पत्र**

कलकत्ता १८ सप्टेंबर १९१७

सुरेंद्र व भुपेंद्र यानी बेझंटबाई अध्यक्ष होऊ नयेत अशी खटपट चालविली आहे. प्रांतिक कॉं. कमिटीच्या सभेत गोधळ झाला तो तुम्ही ऐकलाच असाल. ते लोक सभा सोडून गेल्यामुळे वैकुंठनाथ सेन यांच्या जागी रवींद्रनाथ टागोर यांची नेमणूक केली. यंदाची कॉंग्रेस कलकत्त्यास व्हावी अध्यक्ष बेझंटबाई असाव्या व स्वागताध्यक्ष रवींद्रबाबू असावे असे इकडील लोकमत जोरदार आहे. पण येथून कॉंग्रेसच हलवावी असा प्रतिपक्षाचा डाव आहे. तरी ऑ. इं. कॉं. कमिटीच्या सभेत आम्हाला तुमची सर्वस्वी मदत पाहिजे. दास चक्रवर्ती हिरेंद्रबाबू व मी इतक्यानी तुम्हाला भेटण्याला तिकडे जावे असेहि ठरत आहे.

**( १६ ) मोतिलाल घोस यांचे टिळकाना पत्र**

कलकत्ता सप्टेंबर १९१७

कॉंग्रेसची जागा बदलण्याचे घाटत आहे असे ऐकतो हे काय ? तुम्ही आम्ही सर्वांनी मिळून याला विरोध केला पाहिजे. महाराष्ट्र व वऱ्हाड नागपूर येथील ऑ. इं. कॉं. कमिटीच्या सभासदाना भेटणे जरूर असेल तर केळकराना पाठवा. मी आमचाहि एक गृहस्थ बरोबर देईन.

**( १७ ) प्रो जगदीशचंद्र बोस यांचे टिळकास पत्र**

कलकत्ता

तुम्हाला भेटण्याची व माझी शास्त्रसंशोधक संस्था तुम्हाला दाखविण्याची इच्छा फार दिवसांची होती. ती पुरी होण्याचा आता योग दिसतो. तरी

येत्या शुक्रवारी इन्स्टीटयूट पाहावयाला यावे अशी विनंति करीत आहे. त्या दिवशी मी एक व्याख्यानहि ठेवलेले आहे.

### ( १८ ) सुब्रह्मण्य अय्या यांचे टिळकांना पत्र

म्हैसूर १ फेब्रुआरी १९१८

आपले गीताभाष्य मराठी जाणणाऱ्या एका मित्राची मदत घेऊन वाचीत असतो. हल्ली मला गीतेची एक प्रत मिळाली आहे. तीत सव्वीस अध्याय असून गोभिलकृत गीतार्थसंग्रह त्यात आहे. सर सुब्रह्मण्य अय्यर यानी त्याला प्रस्तावना लिहिली आहे. हिंदुस्थानामध्ये एक ज्योतिष विद्यापीठ स्थापावे अशी माझी इच्छा आहे. आपल्या ज्योतिषाना भौतिक साधने कमी होती. तथापि ज्योतिष-संहिता वाचल्यावरून त्यांच्या कामगिरीबद्दल अभिमान वाटतो. हल्लीचे ज्योतिषी भविष्ये वर्तवितात ती प्रायः खोटी ठरतात. तरी देखील अनेकांचा या विद्येवर विश्वास आहे. तुम्ही ही विद्या चांगली जाणता. तरी या माझ्या कार्यांत साहाय्य करावे अशी विनंति आहे.

### ( १९ ) रेवा संस्थान सेक्रेटरींचे टिळकांना पत्र

रेवा ५ मे १९१८

उत्तर हिंदुस्थानात हिंदु सौरपद्धतीचे वर्ष व पंचांग सुरू करण्याचा दरबारचा विचार आहे. हिंदी व इंग्रजी भाषेत यावर लिहिलेले एक योजनापत्रक आपणाकडे पाठवीत आहे. आपला अभिप्राय विचारावा अशी आज्ञा झाल्यावरून लिहीत आहे तरी अभिप्राय कळवावा.

### ( २० ) के. सितारामराव यांचे टिळकांना पत्र

मच्छलीपट्टण ७ मे १९१८

आपण आंध्र देशात येणार असे आंध्रपत्रिकेत वाचले व फार आनंद झाला. इकडे येण्याचे आपण पूर्वी अभिवचन दिलेच होते. आपण इकडे येणार ही बातमी वाचून एकंदर आंध्र देश आनंदित होईल. आंध्र देश हा कॉंग्रेसच्या कारभाराकरिता स्वतंत्र प्रांत मानावा की नाही असा वाद निघाला तेव्हा आपण आमची पाठ राखली याबद्दल आम्ही कृतज्ञ आहो. मद्रास येथे आंध्र समाजाने आपणाला मानपत्र दिले तेव्हा उत्तर देताना आपण सांगितले की महाराष्ट्रीय राजानी शेजारच्या आंध्र राज्यपद्धतीतील तपशीलाच्या अनेक गोष्टी उपयोगात आणल्या होत्या. हे ऐकूनहि कृतज्ञता वाटली. १९१४ साली आपली सुटका झाली तेव्हा आपणाला मी तार पाठविली होती. इकडची होमरूललीग संस्था आपली वाट पहात आहे.

(२१) बमनजी यांचे केळकराना पत्र.

मुंबई ३० मे १९१८

तुम्ही कॉन्फरन्सला याल तेव्हा टिळकाविषयी हकीकत कळेलच. सर रवींद्रनाथ टागोर यांच्याकडून टिळकानी पाठविलेले पन्नास हजार रुपये परत आले. पण त्यानी माझे दहा हजार रुपये परत पाठविले नाहीत. कारण अमेरिकेला अजून जाण्याचा त्यांचा विचार असावा. त्यांची मुलगी वारली तेव्हा आता त्याना कदाचित जाता येईल. टिळकाना विचारा की त्यांची रक्कम कोणाकडे द्यावयाची? यापुढे नोटांच्या रूपाने रकमा ठेवू नका. खणखणीत रुपाया पाहिजे. राजपुतान्यात शंभराची नोट ९८ ला विकू लागले आहेत!

(२२) एम्. के आचार्य यांचे केळकराना पत्र

दिल्ली १२ जून १९१८

दिल्लीचे लोक टिळकानीच अध्यक्ष झाले पाहिजे असे म्हणतात. कारण एक तर त्यांची योग्यता. शिवाय त्यांचे पासपोर्ट रद्द केले. दिल्लीला येण्याची मनाई केली वगैरे कारणे विशेष आहेत. टिळकांचे नाव पुढे आल्यावर इतर कोणाचेहि यशस्वी होणार नाही. टिळकावरील मनाईचा हुकूम कायम राहिला तर आम्ही त्यांचे जागी खापर्डे याना डेप्युटी नेमू. बेझन्टबाईच्या ऐवजी सर सुब्रह्मण्यम् याना डे० प्रेसिडेन्ट नेमण्याच्या कल्पनेचा दाखला आहेच. यंदाची कॉंग्रेस विशेष महत्त्वाची आहे. तरी अध्यक्षहि विशेष महत्त्वाचाच हवा.

(२३) जिनराजदास यांचे केळकराना पत्र

मद्रास २६ जून १९१८

तुमची तार पोचली. अय्यर भेटल्यानंतर तिचे उत्तर पाठवितो. त्याना काल रोजी त्यांचा पासपोर्ट मिळाला तो मार्सेलीसवरून न जाता बे ऑफ बिस्केवरून जाण्याचा आहे. कदाचित जमल्यास तो बदलून मार्सेलीसकडून जाण्याचा पासपोर्ट ते मिळवितील.

(२४) पोलाक यांचे बॅप्टिस्टा याना पत्र

लंडन ११ सप्टेंबर १९१८

राष्ट्रीय पक्षाच्या मागण्या १९१६ व १९१७ सालच्या कॉंग्रेसच्या ठरावाखाली बसतात. म्हणून त्या मागण्याना फाजील बेसुमार असे कोणी म्हणू नये असे तुमचे म्हणणे. पण स्वतः कॉंग्रेसनेच पंधरा वर्षात संपूर्ण स्वराज्य मिळावे असा ठराव केला तो अतिरेकच नव्हे काय? टिळक किंवा बेझन्टबाई या हिंदुस्थानच्या पुढारी ठरल्या तर फूट होणारच. टळणार नाही. मी स्वतः सर दिनशा

वाच्छा सुरेंद्रनाथ यांचे पुढारीपण जसे मानीत नाही तसेच टिळक व बेझन्टबाई यांचेहि मानीत नाही.

### (२५) सी. पी. रामस्वामी अय्यर यांचे केळकराना पत्र

मद्रास ३ ऑक्टोबर १९१८

मला व हसन इमाम याना व्हाईसरॉयसाहेबानी काय सांगितले हे वर्तमानपत्रातील तारावरून तुम्हाला कळलेच असेल. मला हे प्रत्यक्ष माहीत आहे की शिष्टमंडळाला निघण्याला परवानगी देण्याबद्दल व्हाईसराय यानी लॉईड जॉर्ज याना तारा केल्या होत्या. पण त्यांच्याकडून उत्तर आले की आमच्या हातातील काम संपले म्हणजे मग शिष्टमंडळाना येऊ देऊ. व्हाईसराय यानी असे स्पष्ट सांगितले की बिल पार्लमेंट पुढे येण्याच्या आधी दोन महिने तरी पासपोर्ट देऊ. सरकारला पंक्तिप्रपंच करण्याला जागा राहू नये याकरिता होमरूल लीगचे प्रतिनिधी हे कॉंग्रेसचेहि प्रतिनिधी असावे अशी शिष्टमंडळे बनविण्याची योजना करू या.

### (२६) केळकरांचे टिळकास पत्र

पुणे २२ ऑक्टोबर १९१८

इन्फ्ल्युएन्झा आता थोडा कमी आहे. मित्रमंडळी खुशाल आहेत. राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदाकरिता तीन नावे पुढे आली आहेत. नेहरू टागोर व विजयराघव. टागोर बाबू मागे पाय घेत आहेत. तरी त्यांची समक्ष गाठ घेऊन काय ते कळवावे असे मी दासबाबू याना लिहिले आहे. विजयराघवाबद्दल मद्रासेकडेच दुमत आहे. आपण नेहरूना पसंत करता पण दिल्ली स्वागत मंडळाला मिळाले तर रवींद्रबाबूच हवेत. स्वागत मंडळात ठरावासंबंधाने मतभेद आहेत. स्वा० मंडळात आपल्या मताचे लोक आहेत त्याना पक्के करण्याकरिता मी इकडून कोणी कदाचित पाठवीन. नागपूरास नारायणराव वैद्यांचे अपील दासबाबूनी फार चांगले चालविले. अजून निकाल लागला नाही. आमच्या पासपोर्टस् संबंधाने सरकार अजून काही दाद देत नाही. फ्रँचाईझ कमिटी मुंबईस डिसेंबरात येत आहे. त्याकरिता लीगतर्फे मी टिपण करीत आहे.

### (२७) कॅ. बेनन यांचे केळकराना पत्र

कुलू-पंजाब २२ ऑक्टोबर १९१८

टिळक विलायतेस निघण्यापूर्वी त्यांचे मला पत्र आले होते. ते तिकडे गेल्यामुळे त्यांच्या सांगण्यावरून तुम्हाला लिहित आहे. गेल्या जूनमध्ये जेलम येथे गरवाली ब्राह्मण शिपायांची कत्तल झाली. ती मोठी संशयास्पद असून कौन्सिलात शर्मा यानी सेनापतीना त्यासंबंधी प्रश्न विचारले आहेत. तरी या संबं-

धाची माहिती टिळकाना लिहून ती तिकडे सांगण्याविषयी सुचवा. मेसापोटेमिया-मधील गोंधळ हे जसे मॉंटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणाना एक निमित्त झाले तसेच वरील कत्तलहि जबाबदारीचे अधिकार मागण्याचे निमित्त करता येईल.

### ( २८ ) खापर्डे यांचे केळकराना पत्र

उमरावती २६ ऑक्टोबर १९१८

टिळकांच्या जागी कोणाला निवडता असे मला विचारण्यात आले आहे. बाईनी पंडितजींचे नाव सुचविले आहे. पण मी रवींद्र टागोर मोतिलाल नेहरू आणि मोतीलाल घोस या क्रमाने नावे सुचविली आहेत. विजयराघवाचारियर हेहि चांगले गृहस्थ आहेत. त्यांचे व बाईंचे बरे नाही असे दिसते. कसेहि असो. पंडितजी एकदा अध्यक्ष झाले आहेत. फिरून त्यानाच का नेमा ?

### ( २९ ) बेझन्टबाईंचे केळकराना पत्र

मद्रास ४ नोव्हेंबर १९१८

सर रवींद्रनाथ टागोर अध्यक्ष होण्याला मिळते तर गोष्ट सर्वोत्कृष्ट झाली असती. मी खूप खटपट केली. पण ती फुकट गेली. ते म्हणतात नुसती गर्दी पाहिली की मला कसेसेच होऊ लागते. मला ते नको. मदन मोहन निवडले गेले किंवा न गेले तरी ते आपल्या बाजूला राहतील. इतरांचीच भीति वाटते. तेव्हा आपल्या मताची छाप पडत चालली आहे हे उघड आहे. आम्ही आपली मते भीति व भीडमुरवत न धरता बोलून दाखवितो. नेमस्त आडपडद्याने बोलतात. बिल मंजूर होईपर्यंत एकविचारानेच वागले पाहिजे. मतवैचित्र्याला त्यानंतर जागा आहेच.

### ( ३० ) बापूजी अणे यांचे केळकरास पत्र

यवतमाळ २४ नोव्हेंबर १९१८

होम मेंबर यानी कौन्सिलात सांगितले की टिळक विलायतेस गेल्यावर त्यांची भाषणबंदी उठेल. ते वाचून आनंद झाला. तुम्हाला पासपोर्ट मिळण्याचीहि आशा यावरून दिसते. नारायणराव वैद्य दोषमुक्त होऊन सुटले. त्यांचे अभिनंदन करण्याकरिता त्याना यवतमाळास बोलाविले आहे. त्यांचा खटला आपला असे समजून होमरूल लीगने त्यांची काही तजवीज केली पाहिजे. शांतता परिषदेकडे आपले प्रतिनिधी म्हणून टिळकांना पाठविण्याची खटपट आपण केली पाहिजे. सरकार त्याना नेमणार नाही पण त्यांच्यामागे लोकमत किती आहे हे तरी दिसून येईल. सरकारने मतदारसंघ ठरवावा मग लोक टिळकानाच निवडून देतात हे दिसून येईल. अशा प्रकारचे ठराव जाहीर सभातून करण्याला मी प्रारंभ केला आहे.

### ( ३१ ) टिळकांचे केळकरांना पत्र

लंडन २८ नोव्हेंबर १९१८

ब्रिटिश काँग्रेस कमिटी संबंधाचा रिपोर्ट या सोबत पाठविला आहे. स्वागत मंडळाच्या द्वारे तो राष्ट्रीय सभेपुढे ठेवण्यात येईल. त्याचा नीट विचार विषय नियामक मंडळात करावा. ही कमिटी व इंडिया हे पत्र राष्ट्रीय सभेला सोडून देऊन जवळ जवळ सरकारी मताचा अनुवाद करू लागली आहेत. नेमस्ताना राग येईल म्हणून आम्ही रिपोर्टात सौम्य भाषा मुद्दाम वापरली आहे. पण खरे बोलावयाचे तर स्थिति लिहिली याहून फार वाईट आहे. रिपोर्टावर कस्तुरी रंग अयंगार आणि वसुमति पत्राचे संपादक घोष बाबू यांच्याही सह्या आहेत ही गोष्ट ध्यानात ठेवा. या दोघाना हिंदुस्थानातील वर्तमानपत्रांचे प्रतिनिधि म्हणून सरकाराने इकडे पाठविले होते. त्यांचेही विचार आमच्यासारखेच आहेत. अर्थात् ब्रिटिश कमिटीला तूर्त पैसे पाठविणे श्रेयस्कर नाही. लॉईड जॉर्ज मुख्य प्रधान यांच्याशी माझा पत्रव्यवहार झाला त्याची प्रत पाठविली आहे. तिकडून पैसे येण्याची फार जरुरी आहे. कारण जवळच्या शिलकेपैकी २००० पौंड लेबर पक्षाच्या निवडणुकीच्या कामाकरिता मी दिले. दिल्लीच्या सभेत काय होते ते खुलासेवार कळवा.

### ( ३२ ) सरला देवी यांचे केळकरास पत्र

लाहोर ३० नोव्हेंबर १९१८

टिळकांची मुंबईस गाठ पडली तेव्हा त्यानी मला विचारले की, तुम्ही विलायतेस राजकीय विषयावर व्याख्याने द्यावयास जाल का? पूर्वी स्त्रियाना पासपोर्ट देत नव्हते. आता देऊ लागले आहेत असे समजते. हे ऐकून पूर्वी टिळकानी विचारल्याची आठवण झाली. व असे वाटते की जमले तर जावेहि. येथे निष्क्रिय बसून राहण्यापेक्षा तो उद्योग बरा.

### ( ३३ ) सत्यमूर्तींचे केळकरांना पत्र

मद्रास ६ डिसेंबर १९१८

एम्. के. आचार्य हे कलकत्त्यास गेले आहेत. तेथून ते बंकिपुरला जातील. आपण पुष्कळ लोक मिळून दिल्लीला गेले पाहिजे. मुंबई स्पेशल काँग्रेसच्या ठरावाच्या मागे जाण्याचा काही लोकांचा विचार दिसतो. काँग्रेसचे प्रतिज्ञापत्रक बदलून घेतले पाहिजे. सरकारी जाहीरनाम्यात जर 'जबाबदारीचे स्वराज्य' असे शब्द आहेत तर काँग्रेसच्या उद्देशात 'हळुहळू सुधारणा' असे शब्द का असावेत ?

## ( ३४ ) पोलॉक यांचे केळकराना पत्र

मुंबईस स्पेशल काँग्रेसमध्ये सुधारणावर बहिष्कार घालण्यात येणार म्हणतात हे खरे का? तसे न होईल तर बरे. या योजनेत पुष्कळ दोष आहेत. परंतु त्यांचे तत्त्व बरोबर आहे असे येथील लोक म्हणतात. शिवाय इकडील स्थिति काय आहे हेहि लक्षात आणा. असे एकहि घर नाही की ज्यातील मनुष्य युद्धात पडला नाही. अशा वेळी तुमच्या कामात लक्ष घालतो कोण? तरी पण मॉंटेग्यूला प्रधानमंडळाने हिंदुस्थानात धाडले व ते व चेम्सफर्ड यानी रिपोर्ट केला. अशा रीतीने लिबरल कॉन्झरवेटिव्ह यांचे एकमत तिकडे व इकडे झाल्यामुळे आहे हे ठीक आहे अशा समजुतीने इकडील लोक योजनेला पाठिंबा देतील. तरीहि लॉर्ड कर्झन व सिडनहॅम यांचे विरुद्ध दिशेचे प्रयत्न होणार. म्हणून तिकडील शिष्टमंडळे येऊन त्यानी तिकडची खरी हकिकत सांगितली पाहिजे. बेझंटबाईची निवडणूक व टिळकांच्या भाषणाचे इकडे येणारे रिपोर्ट यानी आमच्या स्नेही मंडळीना थोडी भीतीच वाटू लागली आहे. येथील काँग्रेस कमिटीने काही करावे तर तिची येथील स्थिति फार वाईट आहे. तुमचे कोणी लोक इकडे पूर्वी आले नाहीत आणि जे आले ते म्हणजे सर सिंह बसू प्रभाशंकर पट्टणी अफताब अहमदखान. यांच्याविषयी हिंदुस्थानात लोक प्रतिकूल आहेत असे दर्शविले जाते. यांत लाभ कोणता? आयर्लंडातील घोटाळ्याने लॉईड जॉर्ज हे गांगरून गेले आहेत म्हणून हिंदुस्थानातलाहि घोटाळा पाहिला म्हणजे ते म्हणतील की हा आणखी त्रास नको. तात्पर्य मुंबईच्या सभेत जर काही भलता प्रकार झाला तर इंग्लंडात जे तुमचे आज स्नेही आहेत त्यानाहि तुम्ही गमावून बसाल.

## ( ३५ ) केळकरांचे टिळकाना पत्र

मुंबई ७ डिसेंबर १९१८

तुमची तार पोचली. आमची कोणाचीहि पत्रे तुम्हास मिळाली नाहीत हे वाचून आश्चर्य वाटले. कदाचित् सरकारी सेन्सॉरशिप यापुढे कमी व्हावी. उमरावतीला लीगच्या वर्किंग कमिटीची बैठक आहे. तिकडे आम्ही जात आहो. पाच हजार पौंड बँकेतून दुसरीकडे ठेवण्याबद्दल माझी तार पोचलीच असेल. येथल्या जाहीर सभानी काँग्रेसच्या डेप्युटेशनवर व पीस कॉन्फरन्सवर तुमची निवडणूक केली आहे. शिवाय काँग्रेसने अध्यक्षाचे जागी तुमची निवडणूक केलीच आहे. तेव्हा कोणत्याहि तऱ्हेने तेथे तुम्हाला अडचण येणार नाही.

पं. मालवीय यानाच यंदा अध्यक्ष करण्याचे ठरले. नेमस्तांची परिषद नुकतीच भरली होती. तिनेहि मुंबईच्या स्पेशल काँग्रेससारखेच ठराव पास केले आहेत. पण ठरावांचे भाषेमध्ये थोडा नाराजीचा व मतभेदाचा ध्वनि उमटतो.

कदाचित कॉंग्रेसला हजर राहून ठराव दुरुस्त करून घेण्याचा प्रयत्न होईल. पण ते शक्य दिसत नाही.

तुमच्या तिकडल्या हालचालीविषयी काहीच वार्ता कळत नाही. बहुधा अनेक सार्वजनिक कामामध्ये तुमचा सर्व वेळ जात असेल. या आणीबाणीच्या वेळी तुम्ही विलायतेस जाण्याचे जे साहस केले त्याचे सार्थक झाले. तुमच्या कामगिरीला अगदी सोन्यासारखी संधि सापडली.

तुम्हाला कोणती वर्तमानपत्रे मिळतात काही समजत नाही. काही विशिष्ट पत्रे बहुधा सेन्सारच्या तावडीतून सुटत नसतील.

### ( ३६ ) दादासाहेब खापर्डे यांचे टिळकाना पत्र

अमरावती ३१ आक्टोबर १९१८

केळकरांची निवडणूक पुणे म्युनिसिपालिटीच्या अध्यक्षाचे जागी झाली हे वाचून आनंद झाला. यामुळे आता कौन्सिलात शिरण्यासंबंधाने त्यांच्यावर जी बंदी होती ती सहजच निघून जाईल. तसे झाल्यास मला एक मोठा सहकारी व साह्यकारी मिळेल. दिल्ली येथील कॉंग्रेसकरिता अध्यक्ष म्हणून तुमची निवडणूक सर्वानुमते झाली. पण तुम्ही आता येथे नाही तेव्हा तुमच्या जागी कोण बसवावा याची वाटाघाट व चळवळ सुरू आहे. बेझंटबाईंनी मदनमोहन यांचे नाव सुचविले आहे. मी रवींद्रनाथ टागोर किंवा मोतीलाल घोष यांचे नाव सुचविले आहे. फ्रॅन्च्याइज कमिटीचे काम सुरू झाले आहे. त्यावर सुरेंद्रनाथ सप्रू शास्त्री वगैरे लोक आहेत. पण कॉंग्रेसचा कोणीच नाही. यामुळे जुन्या गटांच्या गळ्यातच मतदारी पुन्हा पडते की काय नकळे! मी नागपूर येथे या कमिटीपुढे साक्षीला जाणार आहे. नंतर कॉंग्रेसला जाईन. त्यानंतर सवड असल्यास विलायतेलाहि येईन.

### ( ३७ ) खापर्डे यांचे टिळकाना पत्र

अमरावती २० आक्टोबर १९१८

तुम्ही मुंबईहून गेल्या २३ तारखेला विलायतेस निघाला. तेव्हा मुंबईस येऊन भेटावे असे मनात होते. पण माझ्या नावावर कौन्सिलात काही ठराव वगैरे होते म्हणून येता आले नाही. सर वुइल्यम व्हिन्सेट यानी कौन्सिलात सांगितले की "फ्रॅन्चाइज कमिट्यांचे काम संपेपर्यंत कोणास पासपोर्ट देत नाही. नंतर देऊ" म्हणून मी केळकर पाल वगैरेना तूर्त तिकडे निघता येत नाही.

माझ्या ठरावावरून इकडे हत्यारांच्या नियमासंबंधाने एक कमिटी नेमण्यात आली आहे. प्रेस ॲक्टासंबंधाने माझा ठराव फसला. खुद्द आमची पार्टी अशी लहान आहे. इतरांची मदत केव्हा मिळते केव्हा मिळत नाही. कौन्सिलची मुदत वाढणार होती पण वाढत नाही म्हणतात.

### (३८) नारायणराव वैद्य यांचे टिळकांना पत्र

नागपूर २८ नोव्हेंबर १९१८

तारीख ६ नोव्हेंबर रोजी सकाळी जबलपूर तुरुंगातून मी बाहेर पडलो. लगेच आपल्या दर्शनाला पुण्यास जावे असा संकल्प होता. पण विलायतेस गेला अशी बातमी समजली. तुरुंगात असता विशेषेकरून शिक्षासुनावणीच्या अगोदरच्या काळात डोक्यात नाना तऱ्हेचे विचार येत असत व त्यामुळे मन उद्विग्न होत असे. परंतु गीतारहस्याच्या वाचनाने खरोखरीच समाधान होत असे. त्या दीड पावणे दोन महिन्याच्या अवधीत मी गीतारहस्य दोनदा वाचले.

### (३९) बी पी. वाडिया यांचे टिळकांना पत्र

मद्रास २५ नोव्हेंबर १९१८

आपला हा एका परकी ख्रिस्ती देशात पहिलाच हिंवाळा आहे. शेक्सपिअरने म्हटल्याप्रमाणे तो निराशेचा हिंवाळा किंवा असमाधानाचा हिंवाळा होणार नाही अशी आशा आहे. आपले योजलेले महदुदार कार्य सिद्धीस जाऊन आपण मायभूमीला लवकर परत यावे अशी प्रार्थना आहे. या देशात आपली कामगिरी दिवसेंदिवस अधिकाधिक व्हावयाची आहे. आपल्या वियोगाने इकडे होमरूल व त्याचे पुरस्कर्ते यांची मने उत्कंठित झाली आहेत. आपल्या स्वार्थत्यागाबद्दल आपला जितका बहुमान करावा तितका थोडाच आहे. आणि त्याचे फल म्हणून आपणाला 'होमरूल' लवकर मिळावे अशी प्रार्थना आहे.

### (४०) जे. डब्ल्यू. थॉमस यांचे टिळकांना पत्र

इंडिया ऑफिस लंडन ८ नोव्हेंबर १९१८

पत्रावरील चुकलेल्या पत्त्यामुळे आपले पत्र हाती येण्याला अवधी लागली. बॅरिस्टर कोलास्कर आपल्याबद्दल लिहितात ते वाचून फारच संतोष झाला. आपण विद्वान पंडित या नात्याने आजवर जी कामगिरी केली तिला धरूनच आपली येथील योजना आहे यात शंका नाही. ज्यानी ज्यानी म्हणून तुमचे लेख व ग्रंथ वाचले आहेत त्याना हे कळून चुकले आहे की तुम्ही जुन्या संस्कृतीच्या अनेक विषयात फार लक्ष घालता व तुम्ही काढलेले सिद्धांत नवे व स्वतंत्र बुद्धीचे दर्शक आहेत. भांडारकर स्मारक प्रबंधावलीत तुम्ही लिहिलेले लेख मी वाचले ते फारच मनोरंजक आहेत. त्यात तुम्ही खाल्डियातील वेद व भारतीय वेद यातील शब्दसादृश्य दाखविले ते मोठे चित्ताकर्षक असल्याने मी तो निबंध फिरून वाचणार आहे. लंडन येथील रॉयल एशियाटिक सोसायटीत येऊन वाचनव्यवसाय करण्याला किंवा तेथील सभाना हजर राहण्यास तुम्हास काहीच अडचण पडणार नाही. इतर संस्थासंबंधाने तुम्हाला माहिती हवी ती मी समक्ष भेटीत देईन. इंडिया ऑफिसच्या ग्रंथसंग्रहालयातील साधनानी तुमच्या विद्याविषयक कामाला जी कोणती मदत करिता येण्यासारखी असेल ती मी आनंदाने करीन.

# भाग ४ था

## चिरोल प्रकरण

### ( १ ) प्रस्तावना

प्रस्तुत ग्रंथाच्या पूर्वखंडाच्या तिसऱ्या भागातील ताई महाराज प्रकरणाची हकीकत वाचकानी वाचलीच असेल. या दुसऱ्या खंडातहि अशाच एका मोठ्या प्रकरणाची हकीकत आम्हास द्यावयाची आहे. ही दोन्ही प्रकरणे टिळकाना गंडांतरेच ठरली. पैकी एकातून टिळक अखेर यशस्वी होऊन बाहेर पडले व दुसऱ्या प्रकरणात त्यांच्या पदरी अपयश आले. अशाच रीतीने या दोन प्रकरणात इतर काही भेदस्थळे आहेत त्यांचाहि उल्लेख करणे जरूर आहे. ताई महाराज प्रकरण हे टिळकांवर अनिच्छेने कोसळले होते. चिरोल प्रकरण हे त्यानी आपल्या इच्छेने आपल्या अंगावर घेतले होते. एखादा मनुष्य उतारावर उभा असता वरून एखादा भरलेला गाडा त्याच्या अंगावर घसरावा व तो थोपवून धरता धरता हात पाय मोडून घेऊन इजा होऊन का होईना पण त्याला बाजूला सरून आपला जीव बचावता यावा, आणि मग आपला प्राण घेणारा गाडाच स्वतः कोलमडून पडला मोडला त्याची हाडेनहाडे खिळखिळी झाली असे पाहण्याचे सुख व समाधान त्याला लाभावे असा प्रकार ताई महाराज प्रकरणाचा झाला. पण दुसरा एखादा मनुष्य वीरश्रीच्या हट्टाने किंवा फाजील आत्मविश्वासाने डोंगराच्या अंगावर चढून जाऊन त्याच्या डोक्यावर पाय देईन अशी महत्त्वाकांक्षा धरतो, पण त्या प्रयत्नात दमून जातो घसरून खाली पडतो आणि डोंगराला काही इजा न होता मनुष्याचेच आंग ठेचाळून रक्त निघते तशी स्थिति टिळकांची या चिरोल प्रकरणी झाली. ताई महाराज प्रकरण हे खाजगी स्वरूपाचे होते म्हणून त्यात जसा टिळकाना स्वतः प्रथम सगळा खर्च करावा लागला तसाच चिरोल प्रकरणातहि त्याना प्रथम सगळा खर्च स्वतः करावा लागला. आणि खटला बुडाला तेव्हा घरावर तुळशीपत्रच ठेऊन बाहेर पडण्याची वेळ होती. ह्या खटल्याचे स्वरूप सार्वजनिक आहे असे लोकानी जाणून ते वेळेवर टिळकांच्या मदतीला धावले ही गोष्ट वेगळी. दोन्ही प्रकरणात ब्रिटिश न्यायदेवतेशीच टिळकांचा संबंध होता. पैकी पहिल्या प्रकरणात प्रथम अपयश आले तरी पुढे यश आले असे पाहून याहि प्रकरणात तसेच यश येईल अशा समजुतीने टिळकानी पुढे पाऊल टाकले. पण ब्रिटिश न्यायदेवता झाली तरी ती स्त्री–स्वभावानुरूप चंचल असते, तिजवर डोळे मिटून विसंबता येत नाही अशी कबूली टिळकाना द्यावी लागली. ताई महाराज प्रकरणी जितके परिश्रम टिळकाना करावे लागले तितके मात्र या दुसऱ्या प्रकरणात सुदैवाने करावे लागले नाहीत. तसेच चिरोल प्रकरणी अपयश आले तरी त्या अपयशाचा परिणाम त्यांच्यावर मुळीच झाला नाही. चिरोलसाहेबांच्या अमुक एका

विधानानी आपली बेअब्रू झाली असे टिळकांचे म्हणणे होते आणि ज्यूरीने असा निकाल दिला की त्या विधानानी तुमची बेअब्रू झाली हे म्हणणे समर्थनीय नाही. दोन्ही प्रकरणात टिळकाना उलट तपासणीचे दिव्य करावे लागले. पण या उलट तपासणीपुरते पाहिले असता त्यातून ते शीरसलामत पार पडले असेच ती वाचून कोणीहि म्हणेल!

टिळकांचा प्रतिपक्षी चिरोलसाहेब यांचे नाव प्रसिद्धच आहे. लंडन टाईम्स पत्र हा विलायतेतील कॉन्झर्व्हेटिव्ह किंवा प्रतिगामी राजकीय मताचा किल्लेकोट आणि इंग्लंडने सगळ्या जगावर साम्राज्य करावे हे त्याचे परराष्ट्रीय धोरण. या पत्राच्या परराष्ट्रीय खात्याचे एक चालक चिरोलसाहेब हे होते. त्यांचे मुख्य काम परदेशात हिंडून व अधिकृत बातमीदार म्हणून टाईम्सला परराष्ट्रीय राजकारणासंबंधी लेख लिहावयाचे. साम्राज्यवादी टाईम्सच्या धोरणात मुख्य भाग राष्ट्रीय चळवळी करणाऱ्या स्वातंत्र्येच्छु समाजाची निंदा करणे हा होय. आणि बंगालच्या फाळणीनंतर जी प्रचंड राष्ट्रीय चळवळ हिंदुस्थानात झाली तिचे समालोचन करून बातमीपत्रे पाठविण्याकरिता चिरोलसाहेबाना इकडे पाठविण्यात आले होते. वास्तविक चिरोलसाहेबाना एकहि देशी भाषा बोलता येत नव्हती. आणि इतर वर्तमान पत्रांच्या बातमीदारांच्या रीतीप्रमाणे हे समाजात शिरून निरनिराळ्या मतांच्या लोकांच्या गाठी घेऊन बातमीपत्रे लिहावी तशी लिहीत नसत. त्यांचा भर मुख्यतः सेक्रेटरियट मधील कागदपत्रांचे रेकार्ड पोलिसांचे रिपोर्ट व प्रमुख अधिकाऱ्याशी मारलेल्या शिळोप्याच्या गप्पा यावर असे. त्यातूनहि प्रस्तुतच्या खेपेत त्याना एक मोठेच घबाड लाधले होते. ते म्हणजे कोल्हापुरचे छत्रपती महाराज. हिंदुस्थानातील सर्व असंतोषाचे मूळ पुण्याच्या एका 'बामणा'त आहे हे त्यांचे मुंबई सरकारचे आणि करवीरच्या छत्रपतींचे अनुमान जुळल्यामुळे त्यानी या खेपेस लिहिलेल्या बातमीपत्राकरिता मुख्यतः मुंबई सरकारच्या पोलिटिकल खात्याचा आश्रय केला, पण त्याहीपेक्षा त्याना मोठा आधार कोल्हापूर दरबारचे नोकर भास्करराव जाधव प्रो. डोंगरे आणि दिवाण सबनीस यांचा मिळाला. मुख्य काम टिळक व केसरी यांच्याविरुद्ध तिखटमीठ लावून हकीकती सांगावयाच्या व जितके वाईट अप्रामाणिक हेतू टिळकांवर लादता येतील तितके लादावयाचे हे होते. अर्थात् भाडोत्री सरकारी नोकराकडून हे काम होण्यासारखे नव्हते येथे "जातीचेच पाहिजे" होते. व हे काम जाधवराव व डोंगरे यानी स्वतःच्या घरचे समजून केले. कोल्हापूर दरबाराने व मुंबई सरकाराने पुण्यामुंबईतील लोकाकडून केसरी मराठ्याच्या वर्षवार फायली मिळविल्या व त्यातील शेलके उतारे काढून त्यांची इंग्रजी भाषांतरे करून चिरोल साहेबाना दिली. खासगी भेटीत टिळकांचे हेतू समजावून सांगितले. त्यांच्या चळवळीवर द्वेषदृष्टीचा प्रकाश पाडला. आणि अशा रीतीने चिरोल साहेबांच्या ग्रंथाची म्हणजे प्रारंभी टाईम्सला लिहिलेल्या बातमीपत्रांची पूर्वतयारी

करून दिली. पुढे टिळकानी फिर्याद केल्यावर मुंबई सरकारचे पोलिटिकल खाते आणि डोंगरे व जाधवराव याना चिरोल साहेबातर्फे साक्षी देऊन पूर्वी केलेले काम निस्तरावे लागले. न निस्तरून सांगतात कोणाला? कारण जाधवराव व डोंगरे यानी करवीर सरकारच्या उदार आश्रयाने चिरोलसाहेबांच्या पुस्तकाचे भाषांतर करून छापविले होते. आणि टिळकांची फिर्याद चिरोलसाहेबावर शेकली असती तर ती पुढे त्यांच्यावरहि शेकल्याशिवाय राहती ना! म्हणून हे पुढचे 'श्राद्ध सव्याप सव्य' वाचविण्याकरिता याना 'आधी बाप दाखवा'वा लागला. असो.

टाईम्स चिरोल व त्यांचे सहाय्यक या सर्वांचा संबंध या प्रकरणात येत असल्यामुळे त्यांच्याविषयी हा प्रास्ताविक उल्लेख केला आहे. परंतु आणखी मुद्याच्या एकदोन गोष्टी सांगणे जरूर आहे त्या सांगतो. टाईम्सपत्राचे धोरण कोणते हे वर सांगितलेच आहे. पण हे धोरण त्याच्या अंगाशी पूर्वी अनेकदा आलेले होते. पार्नेल केसमध्ये बनावट पत्रे टाईम्सने छापली व ती बनावट ठरल्यावर त्याला खाली पहावे लागले. त्याचे बातमीदार चिरोलसाहेब यांचीहि वृत्ति अत्यंत उद्दामपणाची असून तिजबद्दल त्याना हिंदुस्थानात पूर्वी एकवेळ अद्दलहि घडली होती. तिचा प्रकार असा:—

दिल्ली दरबाराची हकीगत बातमीदार म्हणून लिहून पाठविण्याला चिरोल-साहेब विलायतेहून १९०३ साली इकडे आले होते. ते प्रवास करीत असता गाडी साहरणपूर स्टेशनावर थांबली. त्या दिवसात प्लेगतपासणीचे ते एक ठाणे होते. आणि डॉक्टर लोकाना सर्व प्रवाशांची तपासणी करण्याचा हुकूम होता. इतर प्रवाशांची तपासणी करता करता हिंदी डॉक्टर चिरोल साहेबांच्या डब्याशी आला आणि तुम्ही कोठून आला असे विचारून नाडी पाहण्यासाठी त्याने चिरोलसाहेबांच्या अंगाला स्पर्श केला. साहेबमजकुराना ही गोष्ट न खपून ते डॉक्टरसाहेबाना ठोसे चढवू लागले. जवळचा पोलिस मध्ये पडला व त्याने हे डॉक्टर आहेत असे सांगितले. तेव्हा चिरोलसाहेबानी आपल्या नावाची कार्ड काढून त्याला दिली आणि 'थांब तुझा आता रिपोर्ट करतो' अशी उलट डॉक्टरालाच धमकी दिली. पुढे डॉक्टराने फिर्याद केल्यावरून चिरोलसाहेबाना समन्स लागून कोर्टात हजर राह-ण्याची पाळी आली. चिरोलसाहेबानी हे संकट टळण्याकरिता लॉर्ड कर्झनसाहे-बाना मध्यस्थी करण्याची विनंति केली. पण तीही फुकट जाऊन त्यानी कोर्टात फिर्यादीची लेखी माफी मागितली! चिरोलसाहेब हे त्यावेळी इतके प्रख्यातीला आलेले नव्हते. पण पुढे त्यानी आपले लेखांचे पराक्रम केले तेव्हा सात आठ वर्षापूर्वी झालेली ही गोष्ट पुष्कळांच्या स्मरणातून गेली होती!

ताईमहाराज प्रकरणात टिळकानी कसे वागावयास पाहिजे होते याविषयी कित्येक लोकाकडून कसे आक्षेप घेण्यात येत होते हे त्या प्रकरणात आम्ही नमूद केलेच आहे. तो वाद अखेर टिळकानी जिंकला. तरीहि काही आक्षेप घेणारे उरलेच. मग चिरोल केससारख्या प्रकरणात टिळक कोर्टात गेले याबद्दल आक्षेप

घेणारे लोक प्रारंभी तर होतेच व निकाल टिळकांविरुद्ध झाल्यावर त्या लोकांची संख्या वाढली यात आश्चर्य नाही. आमच्या माहितीप्रमाणे दाजीसाहेब खरे यानी ही फिर्याद तुम्ही विलायतेत लावू नका असा सल्ला टिळकाना दिला होता. पण टिळकानी तो मानला नाही. याचे कारण टिळकांची दृष्टि खरे यांच्याहून थोडी वेगळी होती. अब्रनुकसानीची निरनिराळी वाक्ये हे निरनिराळे मुद्दे म्हणून कोर्टाने काढले तर निदान एक दोन मुद्यावर आणि तेहि मुख्य मुद्यावर आपल्यासारखा निकाल होईल अशी टिळकाना आशा वाटत होती. ही त्यांची अपेक्षा न्या. डार्लिंग यानी फसविली व सगळे मुद्दे एकवट करून ज्यूरीकडून एकेरी निकाल मागितला! पण दुसरी गोष्ट अशी की ताईमहाराज प्रकरणात प्रिव्हि कौन्सिलने मुंबई हायकोर्टाचा ठराव फिरविला या गोष्टीने टिळकाना सहजच आशा उत्पन्न झाली की चिरोल प्रकरणातहि आपणाला जय का न मिळावा? डार्लिंगसारखा न्यायाधीश भेटेलच अशी कल्पना त्याना असण्याचे कारण नव्हते. इंग्रज सरकाराविरुद्ध टिळक कितीहि लिहित बोलत असले तरी इंग्लंडातील इंग्रज हा व्यक्तिशः मोठा चांगला असतो अशी त्यांची समजूत होती. आणि 'हेच या शहाण्याचे वेडेपण' असे म्हणून या उदार मताबद्दल त्यांची थट्टा करणारे व टर उडविणारेहि काही लोक त्यांच्या मित्रमंडळीत होते. पण एकदा मनाने एखादी गोष्ट घेतली म्हणजे मग त्या बाजूनेच सर्व काही दिसू लागते. राजकीय स्वरूपाच्या खटल्यात न्याय मिळत नसेल. पण हा तर दिवाणी खासगी दावा. ज्यूरीला टिळक काय माहीत? आणि असले तरी ते कीर्तिमान अशीच त्यांची समजूत असावी. चिरोलसाहेबाबद्दल ज्यूरीचा अनुकूल पूर्वग्रह असण्याचे काहीच कारण नाही. फिर्याद खासगी बेअब्रूची असल्यामुळे सरकारचा प्रेप विलायती ज्यूरीपर्यंत पोचणार नाही. अशी समजूत टिळकानी आपल्या मनाशी केली होती.

## ( २ ) पूर्व तयारी

ता. १४ ऑक्टोबर स. १९१६ च्या पत्रात टिळक सॉलिसिटर याना लिहितात "माझ्या साक्षीबद्दल मी तुम्हास पूर्वी कळविलेच आहे. मी स्वतः विलायतेस येऊन ज्यूरीपुढे हजर राहणार. येथे माझी साक्ष व्हावी अशी इच्छा नाही. आणि मी स्वतः आल्यावर माझ्याकरिता कमिशन कशाला? चिरोलसाहेबाना बचाव करण्याचे माझ्या दृष्टीने काहीच साधन नाही. आपण काढलेल्या सहा मुद्यावर त्याना प्रत्यक्ष व तोंडी असा पुरावा काय मिळणार? संभावित साक्षीदार कोणी येईल असे वाटत नाही. कारण त्याला काही तरी खरे किंवा खोटे सांगण्याला यावे लागणार. एखादा कोणी हलका मनुष्य आला तर उलट तपासणीत त्याची फजीती होईल. खुनासारख्या बाबतीत माझा संबंध पोचतो असा कोणता पुरावा त्यांच्याजवळ असणार? असता तर तो पुढे आल्याशिवाय कसा राहता? येऊन जाऊन त्यांची भिस्त केसरी मराठा वगैरे पत्रांचे अंक

दाखल करण्यावर. या पत्रातील लेखानी अस्वस्थतेचे वातावरण निर्माण केले आणि त्या वातावरणामुळे खून झाले असे चिरोलसाहेब दाखवू पाहणार! पण हा शुद्ध दूरान्वय होय. कमिशन आल्याने एक तऱ्हेची अडचण मात्र होईल. ती अशी की लागू गैरलागू याविषयी हरकत आम्ही घेऊ पण हुजत घालावी लागणार. आणि कमिशनर म्हणेल की फक्त पुरावा दाखल करून घेण्याचे काम माझे. ग्राह्या-ग्राह्य ते कोर्ट पाहील. मी तुम्हाला ६०० पौंड पूर्वीच पाठविले आहेत. कमिशन निघालेच तर तुमचा कोणी प्रतिनिधी येण्याची गरज आहे की नाही हें मी अजून ठरविले नाही." वरील उताऱ्यावरून टिळकांची खटल्याविषयी कल्पना काय होती हे कळून येईल. पण या बाबतीत जसा त्यांचा अदमास चुकला तसा खर्च किती लागेल याहि बाबतीत तो चुकला. कमिशन नेमले जाणार नाही आणि स्वतः टिळक ज्यूरीपुढे जाऊन हजर झाले म्हणजे नुसते वर्तमानपत्रांचे अंक दाखल करणे इतकेच काम उरेल अशी त्यांची समजूत असावी. पण ती चुकीची ठरली. प्रिव्हि कौन्सिलकडे अपिले जातात त्यावरून विलायतच्या खर्चाचा अंदाज कोणी सांगितला असेल. पण हे काम अपिलाचे नसून अव्वल मुकदम्याचे पुराव्याचे कमिशनचे असे होते. टिळकांच्या मुंबईच्या सॉलिसिटरनी कमिशनच्या खर्चाचा अंदाज सुमारे सहा हजार रुपये इतकाच केला होता. तात्पर्य फार तर पाऊण लाख रुपयेपर्यंत एकंदर तयारी ठेवली म्हणजे खर्चाचे कलम भागेल असे टिळकाना वाटत होते. पण अशा खटल्याचा अनुभव कोणालाच नसल्याने हिशेब चुकला आणि प्रत्यक्ष खर्च तीन लक्ष आला!

चिरोलसाहेबांच्या पुस्तकातून बेअब्रुकारक म्हणून टिळकानी सुमारे तीस वाक्ये निवडून काढली होती. ती अर्थात सर्व सारख्याच दर्जाची नव्हती. काहीत बेअब्रु उघड तर काहीत ती प्रछन्न होती. काहीत स्पष्टोक्ती तर काहीत व्यंग्यार्थ होता. काहीत अत्याचारासारख्या गुन्ह्याशी टिळकांचा संबंध जोडण्यात आला होता तर काहीत त्यांच्या खासगी चारित्र्यावर अप्रामाणिकपणाच्या आरोपाचे शिंतोडे उडविले होते. पुढे चिरोल साहेबांच्या बॅरिस्टरानी मधून मधून टिळकाना असे विचारलेच की "अहो हे पाहिलेत का पुस्तकातील वाक्य? यात तुम्हाला नावे ठेविली आहेत. पण तुम्ही त्याच्याविषयी तक्रार केली नाहीत व त्याविषयी मुद्दा काढविला नाहीत. तर मग असेच समजावयाचे काय की तुम्ही वगळलेल्या या व अशा वाक्यातून जी तुमची निंदा करण्यात आली आहे ती तुम्हाला मान्य आहे? तिच्याविषयी तुमची काही तक्रार नाही?" पण कोणती वाक्ये घ्यावी हे ठरविणे एक प्रकारे कठीणच होते. कारण फार घेतली तर ते जसे बाधक तसेच थोडी घेतली तर तेहि बाधक होणार होते. म्हणून टिळकानी मध्यम मार्ग स्वीकारला.

टिळकांच्यातर्फे त्यांचे सॉलिसिटर डौनर जॉनसन यानी ता. १ आक्टोबर १९१५ रोजी चिरोलसाहेबाना फिर्यादीची नोटीस दिली. तीत असे लिहिले

आहे की "तुमच्या पुस्तकात टिळकाना बदनामीकारक असा मजकूर आला आहे. त्यातील जो भाग खरा किंवा जी टीका रीतीची असेल तिच्याबद्दल त्यांचे काही म्हणणे नाही. पण त्यातील अनेक विधाने खोटी आहेत. म्हणून त्यासंबंधाची टीका निराधार आहे. टिळक तुरुंगात असल्याकारणाने त्याना या पुस्तकाचा प्रतिकार यापूर्वी करता आला नाही. म्हणूनच ही नोटीस देण्याला इतका उशीर *झाला." यानंतर सॉलिसिटर यानी ५।६ सदराखाली* पुस्तकातील बेअब्रुकारक विधाने निर्दिष्ट केली आहेत व पुढे असे लिहिले आहे की "तुमच्याविरुद्ध फिर्याद करावी लागली तर त्यात नुकसानभरपाईदाखल स्वतःकरिता रकम मिळवावी असा टिळकांचा हेतू नाही. तर फक्त त्यांच्यावर आणलेल्या बेअब्रुकारक विधानांचे व त्यामुळे उत्पन्न होणाऱ्या प्रतिकूल लोकमताचे परिमार्जन करावे इतकाच आहे. तरी तुम्ही खाली लिहिलेल्या गोष्टी मान्य करण्यास तयार आहा की नाही कळवावे.

१. उपरिनिर्दिष्ट विधाने परत घ्यावी व ती केल्याबद्दल आम्ही सांगू त्या रीतीने टिळकांची माफी मागावी व आम्ही सांगू त्या वर्तमानपत्रात ती छापावी.

२. वरील विधानांच्या दुरुस्त्या व माफी ही त्यात लक्षात येण्यासारख्या जागी घातल्याशिवाय पुस्तकाची विक्री यापुढे करू नये.

३. तुमच्या आमच्या विचारे ठरेल ती रक्कम तुम्ही इंडियन वॉररिलीफ फंडाला द्यावी.

तुमचे पुस्तक छापून प्रसिद्ध होऊन बरेच दिवस झाले. म्हणून टिळक हे तुम्हाला मुदत देण्याला तयार आहेत. पण तीन आठवड्यांच्या आंत तुम्ही समाधानकारक उत्तर न दिले तर आम्ही लंडन येथील न्यायकोर्टात रीतसर फिर्याद मांडू.

यावर चिरोल साहेबांच्या सॉलिसिटरनी समाधानकारक उत्तर न दिल्याने टिळकांच्या सॉलिसिटरनी ता. २७ आक्टोबर १९१६ रोजी समन्स मागितले. व ता. १४ नव्हेंबर रोजी फिर्याद दाखल केली. त्यावर ता. ३ मार्च १९१६ रोजी कैफियत दाखल झाली. पुढे बरेच दिवसपर्यंत उभयपक्षांच्या सॉलिसिटर्समध्ये उलट सुलट लेखी प्रश्न विचारले गेले. पुराव्यात दाखल करण्याच्या कागदासंबंधाची माहिती व प्रत्यक्ष कागदपत्रेहि एकमेकास देण्यात आले. या कामाला बरेच दिवस लागले. कारण भाषांतराचे कागद पुष्कळ होते. वर निर्दिष्ट केलेल्या सवालपट्ट्या व कागद पाहणे दाखविणे यांचा हेतू असा असतो की एकमेकांच्या कबुल्यानी जितके मुद्दे उडून जातील तितके जावे आणि कबुल्यानी उडून न जाणारे असे जितके मुद्दे उरतील तितक्याच गोष्टी पुराव्याने कोर्टात प्रत्यक्ष शाबित व्हाव्या. टिळकाना चिरोल साहेबाकडून आलेली सवालपट्टी फिर्याद दाखल झाल्यापासून सुमारे दीड वर्षाने बजावण्यात आली. त्याला टिळकांची उत्तरे लवकरच गेली. तथापि इकडे पुराव्यासाठी कमिशन येऊन परत जाऊन सर्व कागदपत्र छापून झाल्यानंतर कोर्टाच्या सोयीप्रमाणे तारीख लागली त्याला १९१९ साल उजाडले.

चिरोल यांच्या तर्फे टिळकाना जी सवालपत्री काढण्यात आली तिजमध्ये अत्याचारासंबंधाने टिळकांच्या अंगी गुन्ह्याचा संपर्क व संसर्ग लावण्याच्या हेतूने जे प्रश्न विचारण्यात आले होते व त्यांची जी उत्तरे टिळकानी लेखी दिली ती याखाली दिली आहेत.

प्र०—१९०५ किंवा १९०७ साली कोल्हापूर येथे शिवाजी क्लबाच्या सभाना तुम्ही हजर होता की नाही? उ०—या शिवाजी क्लबाच्या सभाना मी कधीहि हजर नव्हतो.

प्र०—कोल्हापूरच्या प्रसादे व पाध्ये या नावांच्या मनुष्याना कोल्हापुरास १९०७ साली मे जूनच्या सुमारास शिक्षा झाली होती की नाही? आणि त्यांचा व तुमचा एकत्र फोटो काढलेला आहे की नाही? उ०:—माझी व प्रसादे आणि पाध्ये यांची ओळख नाही. आणि त्याना शिक्षा झाली की नाही हेहि मला माहीत नाही. इतर अनेक मंडळीसह माझे शेकडो ठिकाणी फोटो काढण्यात आलेले आहेत. त्यापैकी एकाद्यात प्रसादे व पाध्ये असतील की नाही हे मी कसे सांगू? अशा प्रकारचा फोटो मला अद्याप कोणी दाखविलेला नाही.

प्र०—विजापूरकर याना कोल्हापूर येथे १९०९ साली शिक्षा झाली होती की नाही? आणि त्यांचा व तुमचा एकत्र फोटो काढलेला आहे की नाही? तसेच त्यांचा व तुमचा स्नेह होता की नाही? उ०—विजापूरकरांचा व माझा चांगला परिचय आहे. त्यांचा व माझा एकाद्या ठिकाणी एकत्र फोटो काढलेला असेल. तो दाखविल्यास मी नक्की सांगेन. १९०९ साली मी मंडाले येथे होतो व त्यासाली त्याना शिक्षा झाली होती असे मी १९१४ साली परत आल्यावर ऐकिले.

प्र०—बी. जी. मोडक याला १९११ साली कोल्हापुरास व १९०९ साली मुंबईस शिक्षा झाली की नाही? त्यांचा व तुमचा एकत्र फोटो काढलेला आहे की नाही? उ०—मोडकांची माहिती आहे. एकत्र फोटो काढल्याचे लक्षात नाही. दाखविल्यास सांगू शकेन. त्याना शिक्षा झाली हेहि मी १९१४ साली सुटून आल्यावर ऐकिले.

प्र०—सावरकर भट वगैरे मंडळी नाशिक येथील मित्रमेळ्याचे १९०५ साली सभासद होते की नाही? १९०९ साली त्याना शिक्षा झाल्या की नाही? १९०६ साली तुम्ही नाशिकास गेला तेव्हा त्या मेळ्यापुढे काही व्याख्याने दिली की नाही? व या लोकाशी संबंध ठेविला की नाही? उ०—१९०६ साली मी नाशिकास गणपतीउत्सवाकरिता गेलो होतो व तेथे हिंदु मुसलमान समाजापुढे व्याख्याने दिली. मित्रमेळ्याकडे पानसुपारीला गेलो होतो. व्याख्यानाकरिता नाही. त्यावेळी सावरकर भट यापैकी कोणासहि शिक्षा झाली नव्हती. अमुकच लोक मित्रमेळ्याचे सभासद होते अगर नव्हते हे मला नक्की सांगता येणार नाही. त्याना शिक्षा झाल्याचे मी १९१४ साली ऐकिले. नाशिकास मी मित्रमेळ्याला

भेट दिली तेव्हा त्याना मी सदुपदेशाचा बोध केला व कायदेशीर रीतीने वागण्याबद्दल निक्षून सांगितले. यापलीकडे त्यांचा माझा अधिक संबंध नव्हता.

सवाल जवाब व कागदतपासणी उलटसुलट झाल्यावर पुराव्याकरिता कमिशन इकडे आले. कमिशनचे काम मि. खंडाळावाला यांच्यापुढे मुंबई हायकोर्टात चालू होते. टिळकातर्फे करंदीकर बखले वगैरे काम चालवीत होते. चिरोलसाहेबानी बिनिंग हे बॅरिस्टर दिले होते. या साक्षी गुप्तपणे व्हाव्या की प्रसिद्धपणे व्हाव्या याची चर्चा होऊन कमिशनरने त्या गुप्तपणे व्हाव्या असा निकाल दिला. फक्त पक्षकार वकिल व त्यांचे कारकून इतक्यानाच हजर राहण्याची परवानगी देण्यात आली. प्रथम प्रतिवादीतर्फे त्रेचाळीस साक्षीदार तपासण्यात येऊन चारशे त्रेचाळीस निशाणींचे कागद दाखल करण्यात आले. त्यानंतर वादी टिळक यांच्यातर्फे अठरा साक्षीदार तपासण्यात येऊन एकशे एकोणचाळीस निशाणीचे कागद दाखल करण्यात आले. स्थूलमानाने सांगावयाचे तर प्रतिवादीचे साक्षीदारात केसरी काळ राष्ट्रमत या पत्रातील उताऱ्यांचे भाषांतर, कोल्हापूर येथील टिळकांची व्याख्यानें टिळकांचे फोटो कोल्हापूर हद्दीतील घडलेले खरे खोटे राजकीय गुन्हे खुनाचे कट दरवडे यासंबंधाचे कागदपत्र दाखल करणारे लोक, नाशिक प्रकरणातील जॅक्सनच्या खुनासंबंधाने कबुल्या जाबजबाब वगैरे कागद दाखल करणारे लोक, आणि चाफेकर बंधूंचे कबुलीजबाब वगैरे पुण्यातील प्रकरणासंबंधी कागद दाखल करणारे लोक असे होते. तसेच नाशिक प्रकरणातील कटाची हकिकत सांगणारा गणू वैद्य भास्करराव जाधव ( कोल्हापूरचे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट ) त्यांचे बंधू गोविंदराव जाधव आणि कोल्हापूर येथील माजी एज्युकेशनल इन्स्पेक्टर प्रो. डोंगरे असे मुख्य साक्षीदार होते. पण याशिवाय काळ पत्रासंबंधाने शिवराम महादेव परांजपे केसरी–मराठा संबंधाने केळकर आणि काही लोकांच्या ओळखीसंबंधाने टिळकांचे कारकून यशवंतराव कुलकर्णी इत्यादि लोकांच्याहि साक्षी झाल्या. टिळकातर्फे साक्षी झाल्या त्यात गोरक्षणसंबंधी कागदपत्र ज्ञानप्रकाश टाइम्स ऑफ इंडिया सुधारक हिंदुपंच या पत्रांचे अंक दाखल करणारे लोक, चिरोल साहेबाना सरकारची मदत कशा प्रकारची होत आहे हे दाखविणारे अधिकारी, काही मराठी पुस्तके दाखल करणारे लोक, टाईम्स पत्राने टिळकांची मागितलेली माफी शाबीत करणारा अंक दाखल करणारा टाईम्सचा नोकर, कोल्हापूरच्या महाराजानी छापविलेली काही गुप्त पुस्तके दाखल करणारे नगरचे मिशनरी छापखानेवाले इत्यादि होते. कमिशनच्या कामाला ता. ११ जुलै रोजी सुरवात झाली व ता. २९ ऑगस्ट रोजी कमिशनचे काम संपले.

## ( ३ ) कमिशनपुढील पुरावा

कमिशनपुढे पुरावा झाला त्यातील काही भाग खाली दिला आहे.

**भास्करराव जाधव** हे कोल्हापूर येथे १९०६ ते १९१० पर्यंत डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट होते. त्यांच्या साक्षीचा सारांश असाः—

या साक्षीत निशाणी ३६०–६१–६२ व ६३ या व इतर काही लेखांची भाषांतरे या खटल्याकरिता मीच तयार करून दिली. निशाणी ११ चे मि. बोवेन यांच्या सांगण्यावरून भाषांतर केले. बोवेन हे मला कागद देत व त्यांच्या नकला मी करीत असे. निशाणी ११ ही मात्र मला कोल्हापुरकडूनच मिळाली व हा महत्त्वाचा दस्तऐवज असल्यामुळे मी स्वतः तो कोल्हापुराहून घेऊन गेलो. चिरोल साहेब कोल्हापुरास आले तेव्हा दिवाण सबनीस यानी मला त्याना भेटावयास सांगितले. चिरोलसाहेबानी मला या खटल्यात मदत करण्यासंबंधी विचारले व मी त्यास कबूल केले. चिरोल साहेबाना मदत करीत असताहि मला माझा पगार व भत्ता नेहमीप्रमाणे मिळत होता. मी इतर कामेहि करीत होतो.

**प्रो० डोंगरे** हे करंदीकर यांच्या उलट तपासणीत म्हणालेः—मला रावबहादूर ही पदवी १९१३ साली मिळाली. ती मिळण्याला सरकारची मी मोठीशी सेवा केली आहे असे नाही. लॉर्ड सिडेनहॅम यांच्या भाषणाची भाषांतरे मी केली आहेत. कोल्हापूर सरकारने या पुस्तकाचे कामी द्रव्यसाहाय्य केले. मी रावबहादूर होण्यापूर्वी चिरोल यांच्या पुस्तकाचे भाषांतर माझ्याकडून झाले. मी शाळाखात्यातील अधिकारी असलो तरी शाळाखात्यासंबंधी अगर अस्पृश्य वर्गासंबंधी एकादे पुस्तक मी अजून लिहिले नाही. चिरोलसाहेबांच्या पुस्तकाचे भाषांतर करण्याला सुरवात केल्यापासून अवघ्या चार महिन्यात ते मी छापून प्रसिद्धहि केले. या पुस्तकाच्या ३०० प्रति कोल्हापूर सरकारने विकत घेतल्या. कोल्हापूर दरबार व त्यांचे अनेक संस्थानाधिपति मित्र यांनी मदत केल्यामुळे पुस्तकाचा खर्च भरून आला. पण इतकेहि करून २००० पैकी एक हजार प्रति शिल्लक राहिल्या व फायदा कार्डीचाहि झाला नाही. भाषांतराचे काम मी प्रो. लठ्ठे व जाधव वगैरेनी केले. परंतु त्याची सर्व जबाबदारी एकट्या माझेवरच आहे. प्रस्तावनेत स्वतःचा मी बहुवचनी उल्लेख केला आहे पण ते केवळ सवईने. टिळकांचा उल्लेख मी पुस्तकात एकवचनी केला आहे. मी स्वतः चिरोल साहेबाकडून भाषांतर केल्यानंतर अगर ते प्रसिद्ध करण्यापूर्वी परवानगी विचारली नाही. कदाचित लठ्ठे यानी परवानगी मिळविली असेल पण अशा कामी परवानगीचे इतके महत्त्वच आहे असे आम्हाला वाटले नाही. चिरोल साहेब १९१६ च्या सुमारास कोल्हापूरला आले होते त्यावेळी माझ्या भाषांतराबद्दल मी त्याना बोललो नाही. त्याना ते परस्पर समजले असेल. या भेटीत साक्ष देण्याबद्दल चिरोल साहेबानी मला विचारिले व मी त्यास कबूल केले. मार्च १९१६ पासून सुमारे ७–८ महिने मी त्यास मदत करीत आहे व या सर्व मुदतीत मला कोल्हापूर दरबाराकडून वेतन मिळत आहे. खटल्याकरिता लागणारे उतारे मी काढले व स्वदेशी स्वराज्य शिवाजी उत्सव व राजद्रोही चळवळ या संबंधीच्या टिपणी

तयार केल्या. चिरोल साहेबांच्या सांगण्यावरून मी त्याना मदत केली. त्यांच्यावर जे संकट आहे ते माझ्यावरहि आहे असे मला वाटत नाही. कारण नुसत्या भाषांतराने मी टिळकांची बेअब्रू काय करणार? माझे भाषांतर अस्सलाहून ठिकठिकाणी वेगळे व बरेच स्वैर आहे हे मी कबूल करतो. तसेच मुळात कित्येक ठिकाणी त्याला आधार नाही. टिळकांचे चित्र मी भडक रीतीने काढले असल्याचा संभव आहे. मूळ इंग्रजी पुस्तकांत लजपतराय बिपिनचंद्रपाल महादेव गोविंद रानडे यांच्या पाठीमागे मिस्टर असे बहुवचनी उपपद आहे. तथापि अमक्याचा उल्लेख एकवचनी अमक्याचा बहुवचनी मी भाषांतरात का केला याचे कारण मला सांगता येणार नाही.

प्र० हे पहा डोंगरे थोडा वेळ लागला तरी घ्या. परंतु या ६०० पानांत टिळकांचा तुम्ही बहुवचनाने एकदा तरी कोठे उल्लेख केला असल्यास काढून दाखवा. उ०— मला असे करण्याची इच्छा नाही.

प्र० तुमच्या भाषांतराचे पहिले पान काढा. चिरोल साहेबांची प्रत्यक्ष भीष्माशी तुम्ही तुलना केली आहे. याचा अर्थ काय तो सांगाल काय? उ०— भीष्म हा आजन्म ब्रह्मचारी असून एक शूर सेनापति होता.

प्र० अर्थात् युद्धाखेरीज इतर केव्हाहि त्याने कोणावर हात टाकला नसेल? उ० ते मला काही माहीत नाही. पण प्रस्तावनेत मी चिरोल साहेबांचा उल्लेख महानुभाव अगर महात्मा असा केला आहे.

प्र० विनाकारण अत्याचार करून मागाहून क्षमा मागण्याची पाळी येणारालाहि तुम्ही महात्माच म्हणाल काय? चिरोल साहेबावरच हिंदुस्थानात १९०३ साली असा अतिप्रसंग केल्याबद्दल माफी मागण्याची पाळी आली होती हे तुमच्या स्मरणात नाहीसे दिसते. उ०— तुम्ही म्हणता त्या प्रसंगाबद्दल मला माहिती नाही.

वेदोक्ताबद्दल डोंगरे यानी कबूल केले की वेदोक्त प्रकरणात व्यक्तिशः छत्रपतीसरकारविरुद्ध टिळकानी लिहिल्याचे मला दाखविता येणार नाही. किंबहुना शिवाजीच्या वंशजांना वेदोक्ताचा अधिकारच आहे असे टिळक म्हणत होते असे मला वाटते.

**जॉन वुइल्यम केंबल** सेक्रेटरी मिशन प्रेस मुंबई—यांची साक्ष झाली. १९१३ सालापूर्वी यांच्या संस्थेचा एक छापखाना कोल्हापुरला होता. कोल्हापूरच्या छत्रपती सरकारची गुप्त पत्रे यांच्याच छापखान्यात छापविली गेली. हे सर्व काम डोंगरे यांचे मार्फत होऊन कीर्द खतावणी व ऑर्डर बुक् यामध्ये डोंगरे यांच्या नांवाची नोंद व कामाचा आकार आहे. याबद्दलच्या कोर्टापुढे असलेल्या नकला खऱ्या असल्याचे केंबल यानी आपल्या साक्षीत सांगितले.

**रघुनाथ व्यंकटेश गोसावी** हे नाशिकचे खटल्यात होते. त्यांच्या साक्षीचा सारांश असा — मित्रमेळ्याचा हेतु प्रथमतः आर्थिक व धार्मिक उन्नति करण्याचा होता. पण मागाहून हेतूमध्ये परिवर्तन होऊन सरकारचा सशस्त्र प्रति-

कार होण्याचे ठरले. या फेरबदलाच्या सूचना १९०६ पासूनच येत होत्या. त्यानंतर पैसे उभारणे हत्यारे जमा करणे वगैरे ठरवून १९०८ मध्ये मित्रमेळ्याचे क्रांतिकारक कटात रूपांतर झाले. १९०६ साली मित्रमेळ्याने नाशिक येथे टिळकाना पानसुपारीस बोलाविले होते. काही वक्त्यानी भाषणे केली व उत्तरादाखल टिळकहि बोलले.

प्र०—टिळकानी त्याना त्यांचे मार्ग चूक असल्याबद्दल उपदेश केला काय? उ०—नुसता उपदेशच नव्हे कानउघाडणीहि केली व न्याय्य आणि कायदेशीर मार्गानेच चळवळ करण्याबद्दल सांगितले. खासगी गुप्त सभेतहि त्यानी तेच सांगितले. या एका पानसुपारीच्या प्रसंगाखेरीज टिळकानी मित्रमेळ्याला कधीहि भेट दिली नाही. मित्रमेळ्याशी त्यांचा कसलाच संबंध नव्हता.

**धनाप्पा सिद्धराम अप्पा वाळवे** हे व्यापारी असून नाशिकच्या कटात होते. त्यांच्या साक्षीचा सारांश असा:—मित्रमेळ्याचा सभासद होऊन स्वदेशी कापड व साखर मी वापरू लागलो. काळ व विहारी ही पत्रे मी वाचीत होतो. केसरीची भाषा भारदस्त म्हणून आम्हाला समजत नसे. १९०६ च्या गणपति उत्सवापूर्वी मित्रमेळ्याचा मी सभासद नव्हतो.

प्र०—टिळकांची व मित्रमेळ्याच्या सभासदांची गुप्त मुलाखत झाली तेव्हा तुम्ही हजर होता काय? (या सूचक प्रश्नाला करंदीकर हरकत घेतात.) उ०—या गुप्त सभेची मला माहिती नाही. परंतु इतके नक्की सांगता येईल की मित्रमेळ्याचे हेतु त्याची कृत्ये व हालचाली यांच्याशी टिळकांचा कोणताहि संबंध नव्हता.

**गणेश बळवंत वैद्य**—यास नाशिकच्या खटल्यात काळेपाण्याची शिक्षा झाली होती. पण तो माफीचा साक्षीदार झाल्याने त्याची सुटका झाली. वैद्य याने जी साक्ष दिली तिचा सारांश असा:—

आमच्या गुप्त संस्थेला एकादे नाव असे नव्हते. पण देशाला स्वराज्य मिळविण्याचा प्रयत्न करण्याची एक शपथ होती. बॉंबचे साहित्य त्याकरिता आम्ही जमा केले होते. एक सोन्याचा दागिना मला मिळाला तो मी विकून त्याचे पैसे केले. इतर अशा रीतीने मिळणाऱ्या दागिन्यांची आम्ही अशीच वासलात लाऊन त्या पैशाने बॉंब वगैरे साहित्य जमा करीत होतो. पुण्यास आल्यावर मला ब्रह्मगिरीबुवा भेटले.

प्र०—नाशीकप्रमाणेच पुण्याला एकादी गुप्त संस्था होती काय? उ०—होय.

**उलट तपासणी**—प्र०—टिळकाना या तुमच्या संस्थेविषयी काहीच माहिती नव्हती म्हणता? उ०—नव्हती. आमच्या हालचाली प्रवास गुप्त भेटी व बॉंब वगैरे साहित्याची जमवाजमव गैरकायदेशीर रीतीने पैसे उभारणे यापैकी एकाहि गोष्टीशी टिळकांचा काडीमात्र संबंध नव्हता.

**लॉरेन्स रॉबर्टसन** मुंबई सरकारच्या न्यायखात्याचे सेक्रेटरी यानी आपल्या साक्षीत सरकारने चिरोलला जी मदत केली त्याबद्दल सांगितले. त्याचा सारांश असा—

कागदपत्र दाखविण्यासंबंधाने टिळकानी सरकारला ४ ऑगस्ट १९१७ च्या पत्रात विचारले. पण त्यासंबंधी सरकारने मनाशी निश्चित धोरण ठरविले आहे. टिळकांचे २२ एप्रिलचे पत्र कौंसिलपुढे आता विचाराकरिता ठेवण्यात आले असेल. मी टिळकाना पाठविलेल्या पत्रात "मला असे कळविण्यास सांगितले आहे" असे मी लिहिले त्याचा अर्थ मी काय लिहावे याबद्दल मला कौंसिलचे लेखी हुकूम होते. हे हुकूम मी येथे दाखविण्याला तयार नाही. चिरोलच्या सॉलिसिटर्सनी कागदपत्राची पहाणी करण्याबद्दल विनंति केली. हे आमच्याकडून टिळकाना कळविले गेले नाही. ही बाब कौंसिलपुढे गेली होती. (यावर बिनिंग साहेबानी या व अशा सर्व प्रश्नाना हरकत घेतली.) माझी व चिरोल साहेबांची ओळख आहे. ही केस चालू असता सरकारने त्याना कागदपत्र पाहाण्याची परवानगी दिली होती.

प्र० चिरोल यांच्या सॉलिसिटर्सच्या पत्राला उद्देशून तुम्ही एका पत्रात म्हणता की 'साक्षीदाराची गाठ घालून त्यांच्याशी आमचा संबंध घडवून आणा. या वाक्याचे स्पष्टीकरण कराल काय? उ०—तुमची इच्छा असेल तर करीन. (यावर चिरोल व सरकार याजमधील गुप्त रीतीने झालेला पत्रव्यवहार कोर्टात उघडकीस आणता येत नाही अशी जोराची हरकत बिनिंग यानी घेतली. व सांगितले की वाटेल तर सील करून हा गुप्त पत्रव्यवहार प्रीव्हि कौन्सिलकडे पाठवा. ते निकाल देतील. पण टिळकाना हा पत्रव्यवहार दाखविण्याला आम्ही तयार नाही.)

रॉबर्टसन यानी असे सांगितले की नाशिक केस खेरीज इतर साक्षीदारांच्याकडेहि संधान लावण्याला पोलिस अधिकाऱ्याना सरकारने सांगितले होते. तसेच चिरोल साहेबांच्या वतीने म्हणून हिंदुस्थानाबाहेरील सेल्बी जाइल्स व प्रायर या साहेबानाहि सरकारने साक्ष देण्यासंबंधी विचारले. यांची व इतरांची नावे कोणी सुचवली ते विचारू नका. अशा गोष्टी उघडकीस न आणण्याचा आम्हाला कायद्याने हक्क आहे. फक्त ही तीन नावे सांगण्याबद्दलच मला सरकारची परवानगी होती.

प्र०—सरकारने या खटल्यासंबंधी पुरावा गोळा करण्याकरिता ठिकठिकाणच्या कलेक्टराना लिहिले होते काय? तसेच शाळांचे हेडमास्तर डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन याहि लोकाना चिरोल साहेबांचे मुखत्यार (एजंट) म्हणून सरकारने लिहिले काय? (या प्रश्नाना बिनिंग साहेबानी हरकत घेतली.) उ०—होय. अलबत. माझ्या समजुतीप्रमाणे सरकारने चिरोल साहेबांचे मुखत्यार अगर एजंट अशाच नात्याने या कामी वर्तन केले. दुय्यम अधिकाऱ्यांच्या खर्चाबद्दल बजेटमध्ये खास व्यवस्था नव्हती. तरी मॉंटगॉमरी व त्यांचा कारकून

हे तीन महिने येथें मुंबईस स्पेशल ड्यूटीवर होते त्यांचा व चिरोलच्या सॉलि-सिटर्सचा पत्रव्यवहार चाले. मॉंटगॉमरी साहेबांची नेमणूक चिरोल अगर त्यांचे सॉलिसिटर यांच्या सांगण्यावरून केली नव्हती. हिंदुस्थानसरकारने सांगितल्यामुळे ती केली. टिळक मागतात त्या पोलिस डायऱ्या सरकारजवळ नाहीत. सरकारच्या हुकमावरून त्यांचा नाश करण्यात आला आहे. पोलीसने संग्रह करून जमविलेले टिळकांचे सार्वजनिक चरित्र मजजवळ आहे. सरकारने ते छापले आहे.

**शिवराम महादेव परांजपे** यांच्या साक्षीचा सारांश असाः—ज्याला तुम्ही जहालपक्ष असे म्हणता ते नाव मला संमत नाही. मी त्याला स्वदेशी पक्ष असे म्हणेन. मी केसरीचा नियमित वाचक अगर वर्गणीदार नाही.

प्र०—स्वराज्य ह्या शब्दाने ब्रिटिश अधिकाऱ्यांचा अभाव असे तुम्ही समजता काय ? उ०—असेच केवळ नाही. गव्हर्नर अगर लेफ्टनंट गव्हर्नर असे अधिकारी त्यात असू शकतील. तथापि टिळकांची व माझी राजकीय मते हटकून जुळतील असे नाही.

प्र०—पण मुख्य मुख्य विषयासंबंधी तरी तुमची व त्यांची मते जुळत होती की नाही ? उ०—मी काहीच सांगून स्वतःला बांधून घेऊ इच्छित नाही. नाशिकच्या व्याख्यानास टिळक व मी दोघेहि हजर होतो. मी स्वदेशी व बहिष्काराची शपथ घेतली होती. स्वदेशी व बहिष्कार हे तुम्ही म्हणता त्याप्रमाणे मूळ टिळकानी काढलेले नाहीत. स्वदेशी ही कल्पना सार्वजनिक काकानी काढली. आणि बहिष्कार हा वंगभंगातून निर्माण झाला.

उलटतपासणीत परांजपे यानी सांगितले की काळ पत्राच्या फाइली मी कोगजे पोलिस ऑफिसर यांस दिल्या. त्याना त्या चिरोल खटल्याकरिता पाहिजे होत्या. पोलिस ऑफिसर या नात्यानेच मागत असाल तर फाइली घेऊन जा असे मी त्यास म्हटले व त्यावर पावती लिहून देऊन कोगजे फाइली घेऊन गेले. टिळकांचा अगर केसरीचा माझ्या काळ पत्राशी कोणत्याहि रीतीचा संबंध नाही. टिळकानी स्वतः माझ्या पत्रात काही लिहिले नाही. अगर प्रसिद्धीकरिता पाठविले नाही. तसेच मलाहि काही लिहावयास सांगितले नाही. मग ते त्यांच्या पत्रात असो अगर माझ्या पत्रात असो. काळ पत्र हे टिळकांचे मुखपत्र आहे या म्हणण्यात काडीचाहि सत्यांश नाही.

प्र०—ज्या हेतूने अगर उद्दिष्टाने जे तत्त्व केसरी प्रतिपादन करीत होता त्याचाच फैलाव काळाने केला नाही काय ? उ०—नाही. माझे पत्र अगदी स्वतंत्र होते. केसरी व काळ यानी संगनमताने अगर साहचर्याने कोणतीच गोष्ट कधीहि केली नाही.

**नरसिंह चिंतामण केळकर** यानी सांगितले की टिळकाना पकडल्यानंतर ता. १९ सप्टेंबर १८९७ रोजी मराठा पत्राचा संपादक म्हणून मी डिक्लेरेशन केले.

प्र०—ज्यावेळी हे काम तुम्ही अंगावर घेतलेत त्यावेळी टिळकांचे व तुमचे विचार जमत असतीलच ? उ०–माझी मते मी स्वतः विचार करून ठरविलेली असत. सर्वसाधारण रीतीने माझे विचार त्यांच्याशी जुळत असत.

प्र०—टिळकांच्या शिक्षेनंतर पत्राचे धोरण त्यांच्याप्रमाणेच तुम्ही ठेवले असेल ? उ०—पत्राचे धोरण योग्य व इष्ट वाटले तसे मी ठेविले. मला योग्य वाटेल ते धोरण मी स्वीकारले. अमुकच धोरण ठेवा असे टिळकानी मला केव्हाच सांगितले नव्हते.

**यशवंत गणेश कुळकर्णी** ( टिळकांचे कारकून ) यानी आपल्या साक्षीत सांगितले की नाशिकच्या खटल्यातील ब्रह्मगिरीबोवाना मी ओळखतो.

प्र० ब्रह्मगिरीबोवा हे टिळकांचे मित्र होते काय ? ( टिळकांच्या वकिलानी या सूचक प्रश्नाला हरकत घेतली. पण कोर्टाने त्याला परवानगी दिली. ) उ० -नावाने ते टिळकाना माहीत होते व नुसत्या नावाची ओळखदेख असणाऱ्याला मित्र म्हणता येईल तर खुशाल म्हणा. अशी नावाची ओळखदेख असलेली टिळकांच्या माहितीची हजारो माणसे पुण्यात आहेत !

### टिळकांचे मुंबईसरकारचे सेक्रेटरी रॉबर्टसन यास पत्र

पुणे २२–४–१९१७

चिरोल यांचे विरुद्ध मी लावलेल्या फिर्यादीत प्रतिवादीने कमिशन मागून घेतले आहे व हिंदुस्थानातील साक्षीदार तपासण्याकरिता कमिशनचे काम मुंबईस चालणार आहे.

मला खात्रीलायक बातमीवरून असे समजते की नाशिकच्या खटल्यात ज्या साक्षीदारानी साक्षी दिल्या त्यांच्यावर पुणे मुंबई व नाशिक येथील अधिकारी अयोग्य वजन पाडून सदर साक्षीदाराना मथवण्याचा प्रयत्न करीत आहेत. खाजगी खटल्यात पोलिसने अशा तऱ्हेने लुडबुड करणे हे सर्वस्वी अयोग्य होय. म्हणून सरकारी अधिकाऱ्यास असे करण्यास प्रतिबंध व्हावा. सरकार काही या खटल्यात पक्षकार नाही व सरकारी अधिकाऱ्यानी अशा रीतीने चिरोलला मदत केली तर तो सत्तेचा निवळ दुरुपयोग होईल.

### टिळकांचे रॉबर्टसन यास पत्र

पुणे २४ मे १९१७

चिरोलच्या सॉलिसिटर्सनी सरकारची मदत खासगी तऱ्हेने का मागावी ? त्यानी न्यायकोर्टाच्या द्वारेच ती मिळविणे रास्त होय. ज्या कागदपत्राच्या नकला चिरोल यास दिल्या त्याच तुम्ही मला देणार पण तेवढ्यानेच माझे काम कसे होणार ? वादाचे जे मुद्दे खटल्यात उपस्थित झाले आहेत त्याबद्दल जे कागदपत्र असतील त्या सर्वांची तपासणी करण्याची मला परवानगी मिळावी.

## रॉबर्टसन यांचे टिळकाना उत्तर

पुणे २ जुलै १९१७

तुम्ही म्हणता तशी सरकारी दप्तराची सर्वसाधारण तपासणी करण्याची परवानगी कोणालाहि देता येणार नाही. नाशिकच्या खटल्यात ज्यानी सरकारतर्फे साक्षी दिल्या त्या तशाच आताहि देण्यास ती मंडळी तयार आहेत काय इतकेच पोलिस अधिकाऱ्यानी पाहिले आहे. पण ज्या अर्थी तुम्ही याला हरकत घेता त्या अर्थी फक्त साक्षीदाराचे नावगाव पत्ता इतक्यांचीच माहिती यापुढे द्यावयाची असे सरकारने ठरविले आहे.

## टिळकांचे रॉबर्टसन यास पत्र

पुणे ५ जुलै १९१७

सरकारी दप्तराची सर्वसाधारण तपासणी ( अर्थात वादाच्या मुद्याबद्दलहि ) करता येणार नाही असे तुम्ही लिहिता म्हणून खालील विशिष्ट कागदपत्रांचीच मागणी करीत आहे.

( १ ) दामोदर चाफेकर याचे आत्मचरित्र व ब्रुइनसाहेबापाशी त्याने वेळोवेळी दिलेल्या जबान्या.

( २ ) नाशिकच्या खुनानंतर दोन तीन महिन्यातील पोलिस अधिकाऱ्यांच्या डायऱ्या.

( ३ ) नाशिक येथे १९०६ च्या गणपती उत्सवात मी गेलो असता माझ्या हालचालीसंबधाने रिपोर्ट असलेल्या पोलीस डायऱ्या.

( ४ ) १८९० ते १८९७ व १९०५ ते १९१० मधील वार्षिक अहवाल.

( ५ ) १८८८ ते १९०० या सालातील गोरक्षण मंडळयासंबंधी पोलिस रिपोर्ट.

( ६ ) चिरोल याना दाखविलेले सर्व कागदपत्र.

( ७ ) पोलीसच्या संग्रही असलेले माझे सार्वजनिक चरित्र.

( ८ ) पुणे व नाशिक येथे झालेल्या खुनानंतर तीन महिन्यांच्या आत पोलीसानी पाठविलेल्या बातम्यांचे अहवाल.

( ९ ) १९०१ १९०५ व १९०७ यामधील कोल्हापूरमध्ये माझ्या घडलेल्या हालचालींचे रिपोर्ट.

निदान इतक्या कागदपत्रांची पहाणी करण्याची परवानगी मिळावी.

### रॉबर्टसन यांचे टिळकाना उत्तर

पुणे २८ जुलै १९१७

फक्त चिरोल यास दाखविलेल्या कागदांच्या नकला नेण्याची अगर पहाणी करण्याची तुम्हास परवागी देता येईल. पण तुमच्या पत्रात तुम्ही मागता ते सर्व कागदपत्र गुप्त असल्या कारणाने ते पाहण्याची परवानगी तुम्हास देता येत नाही.

### टिळकांचे रॉबर्टसन यास पत्र

पुणे ४ ऑगस्ट १९१७

मी मागितलेले कागदपत्र दाखविता येणार नाहीत कारण ते गुप्त आहेत असे तुम्ही लिहिता. पण तुमची हरकत योग्य वा अयोग्य हे ठरविण्याचा अधिकार न्यायकोर्टाचा आहे. तथापि मला एक गोष्ट कळली तर बरे होईल. आपण गुप्त म्हणता ते कागदपत्र सेक्रेटरी ऑफ स्टेटकडे पाठवावे अगर ते सीलबंद करून कमिशनरकडे पाठवावे. तुमच्या वरील 'गुप्त'पणाच्या हरकतीबद्दल हे कागद पत्र लंडन कोर्टमध्ये गेले म्हणजे प्रीव्ही कौन्सिल काय ते ठरवील. सरकारच्या या हरकतीबद्दल मी कायदेशीर रीतीने भांडणार आहे. म्हणून मंगळवारी कोर्टात हजर राहून कोर्टापुढे तुमचे म्हणणे तुम्हास मांडावे लागेल. रीतसर समन्स तुम्हास येईलच.

### टिळकांचे रॉबर्टसन यास पत्र

२३ ऑगस्ट १९१७

सरकार व चिरोलचे सालिसिटर यामधील झालेला पत्रव्यहार दाखविण्यास तुम्ही हरकत घेता त्याबद्दल मी भांडणार आहे. म्हणून हे कागदपत्र तुम्हास कोर्टात आणावे लागतील. कारण हरकत घेण्याचा अधिकार तुमचा नाही कोर्टाचा आहे.

### रॉबर्टसन यांचे टिळकाना उत्तर

२४ ऑगस्ट १९१७

तुमचे ४ ऑगस्टचे पत्र पोचले. त्याचे उत्तर असे की तुम्ही म्हणता ती अनंत कान्हेरे याची साक्ष सरकारचे संग्रही नाही.

---

कमिशन पुढील कागदपत्र विलायतेस गेले. त्यानंतर टिळकांचे सॉलिसिटर यांनी त्याना खालील प्रमाणे पत्र लिहून या पुराव्या संबंधी आपला अभिप्राय कळविला. ते पत्र असेः—

### सॉलिसिटर डाउनर जॉन्सन यांचे टिळकाना पत्र

लंडन २९ ऑक्टोबर १९१७

तुम्ही जो पत्रव्यवहार मिळवू शकला त्यावरून सरकारने चिरोलसाहेबांच्या सॉलिसीटर्सना फार मदत केली असे उघड दिसते. सरकारी अधिकाऱ्यानाहि ती गोष्ट नाकबूल करता आली नाही. नाशिक प्रकरणातील चिरोल यांच्यातर्फेचे दोन्ही साक्षीदार फुकट गेलेले दिसतात. कारण तुमचा व नाशिक क्लबच्या लोकांचा संबध नव्हता हे त्यावरून स्पष्ट होते. खटला नाताळच्या पूर्वी निघत नाही आणि फेब्रुआरी अखेपर्यंत लांबवून घेताहि येईल. खटला निघण्यापूर्वी काही दिवस तरी तुम्ही येथे आले पाहिजे. कारण तुमची साक्ष होणारच व त्यातील मुद्दे काय असावे हे तुमच्याशी वाटाघाट करूनच ठरविले पाहिजे. खर्चाबद्दल रक्कम कोर्टात लवकरच गुदरावी लागेल. त्याविषयी प्रतिवादीकडून तगादा होईलसे दिसते. आम्ही हरकत घेऊच व म्हणूच की सरकारच्या मदतीने प्रतिवादीला पुरावा मिळाला म्हणून खर्च फारसा पडला नसेल. तरी पण कोर्ट आमची तक्रार मानीलच असा भरंवसा नाही. प्रतिवादीच्या खर्चाशिवाय आपल्या खर्चाची तजवीजहि झाली पाहिजे. बॅरिस्टर लोकांचा खर्च पुष्कळच येईल. नक्की आकडा तारेनेहि कदाचित् कळवू म्हणून रकम तयार ठेवावी. सर जॉन सायमन यानी लष्करी खात्यासंबधाने काही कामगिरी पत्करल्यामुळे ते तरी आपणाला मिळतील की नाही याची शंका वाटू लागली आहे. सर एडवर्ड कार्सन व मि. ड्यूक हे दोघेहि आपल्या हातचे गेलेच. आता हे तिसरेहि जातात की काय पहावे. बॅरिस्टर वर्गातील लोक हल्ली इतके कमी झाले आहेत की एखादा चांगला मिळणे मुष्किलीचे होऊन बसले आहे. होलमन ग्रेगरी यांचेहि नाव आमच्या डोळ्यापुढे आहे. ते प्रमुख बॅरिस्टरापैकीच आहेत. तथापि आपले दुय्यम बॅरिस्टर मि. स्पेन्स याना विचारल्याशिवाय काहीच नक्की नाही असे समजा.

## (४) विलायतेतील सुनावणी

टिळकांच्या फिर्यादीच्या सुनावणीला तारिख २९ जानेवारी १९१९ रोजी सुरवात झाली. न्यायाधिकारी डार्लिंग साहेब होते. पण विलायतेत दिवाणी दावे देखील ज्यूरीपुढेच चालत असल्याकारणाने याहि प्रकरणी ज्यूरी नेमण्यात आली होती. खटल्याच्या महत्त्वामुळे ज्यूरी साधी नसून स्पेशल म्हणजे वरच्या प्रतीच्या लोकांची होती. टिळकातर्फे नेक नामदार सर जॉन सायमन व स्पेन्स हे बॅरिस्टर्स व डौनर जॉनसन हे सॉलिसिटर होते. प्रतिवादीतर्फे सर एडवर्ड कार्सन सर एलिस ह्यूम वुइल्यमस व यूस्टेस हिल्स् हे बॅरिस्टर्स असून सोम्स एडवर्ड व जोन्स हे सालिसिटर्स होते.

## सरजॉन सायमन यांचे भाषण

प्रथम बॅ. स्पेन्स ह्यानी फिर्याद वाचून दाखविली. नंतर ह्या प्रकरणाचे महत्त्व ज्यूरीच्या लक्षात यावे म्हणून सर जॉन सायमन ह्यानी विस्तृत भाषण करून सांगितले. ते म्हणाले:–" ही फिर्याद अब्रूनुकसानीची आहे. उभयपक्षी यात किती कागदपत्रे दाखल झाली आहेत हे त्या पलिकडच्या बाकावर ज्या प्रचंड राशी मांडण्यात आल्या आहेत त्यावरून दिसून येईल. हे सगळे कागद वाचण्याला आपणाला वेळ नाही व कारणहि नाही. प्रतिवादीने त्यातील बहुतेक आपला पुरावा म्हणून दाखल केला आहे. त्यात पुष्कळसे वर्तमानपत्रातील उतारे आहेत. त्यापैकी काही वर्तमानपत्राशी टिळकांचा संबंध होता. काहीशी नव्हता. ज्या पुस्तकावर फिर्याद झाली आहे त्यातील काही लेख 'लंडन टाइम्स' पत्रात प्रसिद्ध झाले होते.

" फिर्यादीविषयी थोडी माहिती सगतो. टिळक हे उच्च जातीतील ब्राह्मण आहेत. ह्या जातीने हिंदुस्थानच्या इतिहासात मोठा कार्यभाग केला होता. टिळकांची माहिती इकडे आपणाला फारशी असणार नाही हे उघडच आहे. आपणाला आपलें काम. हिंदुस्थानच्या गोष्टीत तुम्ही लक्ष किती घालणार ? टिळकांचे वय आज ६२ वर्षांचे आहे. हिंदुस्थानच्या मानाने त्याना वृद्धच म्हणावे लागेल. पुष्कळ वर्षे ह्यानी सार्वजनिक कार्य केले आहे. काही लोक त्याना चळवळे म्हणतात. अधिकाऱ्याना 'हा मोठा उपद्रव आहे' असे वाटण्यासारखी चळवळ त्यानी केली आहे. पण ती केवळ लोकहिताच्या दृष्टीने. त्यांचे इतिहासाचे ज्ञान फार खोल आहे. स्वतः त्यानी शिक्षणाचे कार्य फार मोठे केले आहे. प्लेगच्या दिवसात त्यानी फार मोठी लोकसेवा केली. हिंदुस्थानातील लोक वरिष्ठ प्रकारचे राजकीय अधिकार मागू लागले आहेत. आणि मॉंटेग्यू चेम्सफर्ड ह्यानी एक योजनाहि पुढे आणली आहे. फिर्यादीने फिर्यादीत मांडलेल्या तक्रारी आपणाला अर्थातच अपरिचित स्वरूपाच्या असणार. उदाहरणार्थ गोरक्षणाच्या चळवळीसंबंधाने चिरोल साहेबानी लिहिलेले लेख. हिंदुस्थानातील लोक गाईला पवित्र मानतात. दुसरा विषय तालमेच्या आखाड्यांचा. तिसरा विषय धाकदपडशाने पैसे उकळण्याचा. चवथा विषय ताई महाराज प्रकरणाचा. पांचवा रँड व आयर्स्ट ह्यांच्या खुनाचा. सहावा जॅकसन साहेबांच्या खुनाचा. ह्या सहाहि विषयांवर लिहिताना टिळकांची बेअब्रू करण्यात आली आहे. आणि ती बेअब्रू होय किंवा नव्हे हेच ज्यूरीला ठरवावयाचे आहे.

"टिळकानी हिंदुमुसलमानांच्या दंग्याचा फायदा घेऊन गोरक्षणाची चळवळ पुढे ढकलली व गोरक्षण सभा काढली असे प्रतिवादीने लिहिले आहे. या चळवळीत टिळकानी मोठमोठ्या सभा भरविल्या. सभातून दंगे केले असेहि म्हणण्यात आले आहे. ह्या सर्व गोष्टी मुसलमानाना राग आणण्याकरिता केल्या असे प्रतिवादी लिहितो. पण टिळकाना ही गोष्ट नाकबूल होती. मुंबईस दंगे झाले त्याची

कच्ची हकीकत मी पुराव्यात आणू इच्छितो. परंतु त्या कामी हिंदूंचा दोष नव्हता असे टिळकांचे म्हणणे आहे. इतर पुष्कळ लोकांचेहि तसेच म्हणणे होते. कसेहि असो. ह्या दंग्याना टिळक किंवा गोरक्षणी सभा मूळ कारणीभूत झालेली नव्हती. टिळकांची दोन वर्तमानपत्रे होती. एकाचे नांव केसरी व दुसऱ्याचे नांव मराठा. 'केसरी' ह्या मराठी शब्दाचा अर्थ सिंह असा आहे.

कार्सन—इंग्रजाला जसे जॉन बुल (बैल) म्हणतात तसाच हा टिळकांचा सिंह. 'मराठा' पत्र इंग्रजीत चालते. आणि त्याचा संपादक हा इंग्रजी भाषा मोठी शुद्ध लिहितो.

डार्लिंग—टिळक कोण आहेत हे तुम्ही सांगितले आहे. चिरोल कोण आहेत हेहि सांगाना ? मला त्यांचे फक्त नाव माहित आहे. ज्यूरीला तर तेहि माहीत नसेल.

सायमन—चिरोल हे मोठे लेखक आहेत. ते टाइम्स पत्रात लिहितात. त्यांची काही पुस्तकेहि प्रसिद्ध आहेत.

डार्लिंग— पण चिरोलसाहेबांचा व हिंदुस्थानचा संबध काय ?

सायमन—ते ह्या पुस्तकाचे कर्ते आहेत इतकेच मला माहीत आहे. ते मोठे असतील पण त्यांची मला अधिक माहिती नाही. ( मराठी पत्रातील उतारे वाचून दाखवून दंग्यांचा पूर्वापर वृत्तान्त थोडासा सांगितला ) हिंदुमुसलमानांच्या दंग्याला कारणीभूत कोण ह्याविषयी लोक व सरकार यांच्यात वाद चालू आहे. ह्यासंबधाने पोलिस कमिशनरचा रिपोर्ट टिळकानी दाखल केला आहे. ह्या रिपोर्टावरून प्रतिवादीने टिळकाविषयी केलेले विधान बरोबर नव्हते असे ठरत आहे. गोरक्षण मंडळ्या टिळकानी मूळ काढल्या नसता त्या त्यानी काढल्या व त्याच दंग्याना कारणीभूत झाल्या हे म्हणणे बेअब्रुकारक होते. दुसरा मुद्दा असा की टिळकानी नातू बंधूंच्या साहायाने आखाडे काढले काय ? याबद्दलहि प्रतिवादीने भलतेच काही लिहिले आहे. पण मी पुढे असे दाखविणार आहे की धर्माच्या बाबतीत नातू ह्यांचे व टिळकांचे पटत नव्हते. टिळकानी एखादा आखाडा काढला असेल पण तो इंग्रजी राज्य उलथून पाडण्याकरिता असे कोणाला कसे म्हणता येईल ? मराठे लोक हे जातीने तालीमबाज आहेत. त्याना तालमेला आखाडे लागतातच. ( येथे सायमन ह्यानी केसरीतील टिळकांच्या एका भाषणाचा रिपोर्ट वाचून दाखविला ).

डार्लिंग—ह्या भाषणावरून विद्यार्थ्यांच्या शिक्षणात तालिमबाजीचा समावेश केल्याचा टिळकाना मोटा अभिमान वाटतो असे दिसून येत नाही काय ? आमच्या ईटन व हॅरो येथील शाळातून असा उपदेश केला पाहिजे.

सायमन—अगदी बरोबर. पण हे सर्व हिंदुस्थानातून इंग्रजाना हाकलून देण्याकरिता असे म्हणणे हीच बेअब्रू !

कार्सन—तुम्ही दर्शविता तेवढी ती हलकी गोष्ट नाही.

सायमन—ह्या मुद्यावर कागदपत्र तर तुम्ही खूप देऊ केले आहेत. मग त्यावरून त्यातून काय निघेल ते पाहू! असो. टिळकांच्या वर्तमानपत्रातून उत्सवाचे समर्थन केले आहे. गणपति हा हिंदूंचा मोठा देव. शिवाजी हा त्यांच्या इतिहासातील मोठा पुरुष. क्राम्वेल हा इकडे ज्यावेळी पहिल्या चार्लस राजाचा शिरच्छेद करीत होता त्याचवेळी तिकडे शिवाजी झाला. शिवाजी व अफझुलखान ह्यांच्याबद्दल प्रतिवादीने बरेच लिहिले आहे. पण इकडे आपली रिकामटेकडी शाळेतील मुले चार्लस राजाचा वध क्रॉम्वेलने केला तो बरोबर की चूक ह्याचा जसा रिकाम्या वेळी वाद घालीत असतात तशाच प्रकारचे शिवाजी व अफझुलखान ह्या संबंधाचे लेख टिळकांच्या दोनहि व इतर वर्तमानपत्रातून आलेले आहेत. लॉर्ड रे सारखे इंग्रज लोक ह्या वादात लक्ष घालीत. मग टिळकानी ह्या विषयाची विशेष चर्चा केली असल्यास काय नवल? माझे म्हणणे इतकेच की शिवाजी व गणपति उत्सव केले तरी तेवढ्यामुळे दंगेखोर व राजद्रोहि असले आक्षेप टिळकांच्यावर कोणासहि लादता येत नाहीत. शिवाजीस्मारकाकरिता सरकारनेहि वर्गणी दिली होती. तिसरा मुद्दा लोकापासून पैसा उकळण्याचा. टिळकांचे स्वतःचे पत्र आहे व इतर कित्येक पत्राशी त्यांचा संबंध होता ही गोष्ट खरी. त्यातून निरनिराळ्या वर्गण्या प्रसिद्ध होत हेहि खरे. पण त्या राष्ट्रीयशाळा वगैरे संस्थाकरिता होत्या. पण कडक लेख लिहून अगर तसे लेख लिहिण्याची धमकी घालून टिळकानी कोणाकडून पैसे उकळले असे म्हणणे ही बेअब्रु होय. स्वराज्याच्या तिजोरीत दरवडेखोर पैसे आणून भरीत असे विधान प्रतिवादीने केले आहे ते तरी अत्यन्त बेअब्रुकारक होय. प्रतिवादीला याबद्दल नीट पुरावा द्यावा लागेल. चवथा मुद्दा ताईमहाराज प्रकरणाचा होय. तो समजण्याला तुम्हाला बराच त्रास पडेल. बऱ्याच भानगडीचा असा तो खटला होता. (ह्या ठिकाणी ताई महाराज दत्तक प्रकरणासंबंधाने सर सायमन ह्यानी पुष्कळशी हकीगत सांगितली आणि ती प्रिव्ही कौंसिलच्या निकालापर्यंत आणून भिडविली.)

डार्लिंग— प्रिव्ही कौंसिलमध्ये टिळकासारखा निकाल झाला काय?

सायमन—होय. इतकेच नव्हे तर खालच्या कोर्टाची टीका सर्वस्वी गैर होती असेच प्रिव्ही कौंसिलाने ठरविले.

कार्सन- पण ही सगळी हकीकत हे पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतरची नव्हे काय?

सायमन - होय. पण माझा मुद्दाच हा की सर्वस्वी निरपराधी मनुष्याला हा इतका त्रास सोसावा लागला व फौजदारी खटलाहि करून घ्यावा लागला.

डार्लिंग—दिवाणी फौजदारी खटल्यात प्रथम प्रथम टिळकांच्या विरुद्ध निकाल झाला. पण दोन्ही प्रकरणातील शेवटचा निकाल टिळकाना अनुकूल असा झाला असेच की नाही?

सायमन—होय बरोबर. मात्र दोहोतील निकाल निरनिराळ्या वेळी झालेला आहे.

डार्लिंग—न्यायमूर्ति चंदावरकर हे जातीने हिंदु आहेत काय?

सायमन—होय. माझा मुद्दा असा आहे की चिरोलसाहेबानी लेखांचे पुस्तक बनविताना तोपर्यंत घडलेल्या सर्व गोष्टींची चौकशी करावी तितकी केली नाही. टिळक फौजदारी खटला होऊन १९०४ मध्ये सुटलेले होते आणि पुस्तक १९१० साली लिहिले गेले. एवढ्या अवधीत प्रतिवादीला सर्व गोष्टी कळावयाला पाहिजे होत्या. आणि टिळकावरील फौजदारी खटल्याचा उल्लेख करावयास नको होता. चंदावरकरांचा निकाल टिळकाविरुद्ध गेला त्याला प्रतिवादीने फार महत्त्व दिले आहे. पण टिळक स्वतःच्या फायद्याकरिता हे काम करीत नव्हते. ट्रस्टी म्हणून करीत होते. असे असता चंदावरकरांच्या निकालाने टिळकांच्या चारित्र्याला धक्का बसला असे प्रतिवादीने विनाकारण लिहिले आहे. टिळक हे राजकीय दृष्ट्या नावडते असतील. पण त्यांच्या खाजगी वर्तनावर असे शिंतोडे का उडवावे? टिळकांच्या जागी चिरोलसाहेब असते तर त्यानी असे केले नसते काय? प्रतिवादीचे अज्ञान म्हणा किंवा द्वेषबुद्धि म्हणा त्यांच्या हातून असा प्रमाद झाला आहे. टिळकानी सरकारला उपद्रव दिला त्याबद्दल त्यानी दोन वेळ तुरुंगवास भोगला आहे. पण त्यामुळे त्याना खाजगी रीतीने नावे ठेवावी हे काय? रँड व आयर्स्ट ह्यांच्या खुनाकरिता टिळकाना व्यक्तिशः कोणीच जबाबदार धरलेले नाही. ह्या बाबतीत चिरोलसाहेबानी अगदी ताळ सोडून लिहिले आहे. ह्या बाबतीत स्वतः कार्सन साहेबावर कसे दोषारोप झाले व त्याचा डिफेन्स त्यानी कसा दिला होता हे ध्यानात आणावयाला सांगतो. हिंदुस्थानात आरोपीना विशेषतः खुनी आरोपीना अनेक प्रकारचे प्रश्न विचारीत असतात. त्यांची लांबलचक जबानी घेतात. मग ते काय वाटेल ते बरळत सुटतात. आणि वडाची साल पिंपळाला लावून जॅकसनच्या खटल्यातील आरोपींनी सांगितलेली गोष्ट चिरोल साहेबासारखे रँड व आयर्स्ट ह्यांच्या खुनाला जोडतात. चिरोल साहेबानी असे भासविले आहे की कान्हेरे याला फाशीची शिक्षा व टिळकाना मात्र काही वर्षांची सजा हा अन्याय झाला! का तर टिळक हे पुण्याचा खून व नाशिकचा खून ह्या दोहोबद्दल जबाबदार आहेत!

डार्लिंग—पण जॅकसनचा खून केला त्यानी जे म्हटले तसेच रँडसाहेबांच्या खुनी माणसानीहि म्हटले आहे?

सायमन—नाही तसे त्यानी म्हटले नाही. टिळकांवर फक्त राजद्रोहाचा खटला झाला. आणि खुनाच्या खटल्यात टिळकाचा काही संबंध नव्हता असे खुद्द सरकारी वकिलाने म्हटले होते. राजद्रोह वेगळा आणि खून वेगळा. शिवाय राजद्रोह ह्या शब्दाचा अर्थ स्ट्रॅची साहेबानी केला त्याच्यासंबंधानेहि मला काही म्हणता येईल. आपल्या इकडे इंग्लंड आयर्लंडातहि अशा प्रकारचे खटले झालेले आहेत.

खून झाला म्हणून राजद्रोहाला आळा घालणे हे सरकारला जरूरीचे वाटले असेल. नाही असे मी म्हणत नाही.

( ह्या ठिकाणी कागदपत्राची पुस्तके ज्यूरीला वाचण्याकरिता देण्यात आली. )

डार्लिंग—पण तुम्ही जी वाक्ये वाचता त्यातील काहीबद्दल तुम्ही मुळात तक्रार केलेली दिसत नाही ?

सायमन—होय. कदाचित तक्रार करण्यासारखी काही वाक्ये असताना ती फिर्यादीत घातली नसतील. म्हणून बाकीच्या बद्दलची तक्रार शिल्लक राहात नाही असे नाही. ज्या गोष्टींचा संबंध नाही त्या गोष्टींचा संबंध प्रतिवादीने जोडला असे मी म्हणतो. आणि तो संबंध खरा कसा हे प्रतिवादीने दाखविले पाहिजे. राजद्रोह हा केवढा मोठा गुन्हा समजावा ह्याबद्दल मोठमोठ्या लोकांतहि मतभेद आहेत. इकडे आपल्या देशात आज शांतता आहे म्हणून राजद्रोह हा भयंकर गुन्हा वाटेल. पण हिंदुस्थानात अस्वस्थता असल्यामुळे राजद्रोहाला तसे भयंकर स्वरूप येत नाही. शिवाय रँडसाहेबाच्या खुनापूर्वी काय काय गोष्टी घडत होत्या, प्लेगचा त्रास व प्लेगच्या अव्यवस्थेचा जुलूम किती असह्य झाला होता इत्यादि गोष्टी आपण पाहिल्या पाहिजेत. ह्या प्लेगच्या बाबतीत लोकाना किती त्रास झाला हे ह्या कागदात नमूद आहेच. आणि त्यामुळे लोकांची मने किती बिथरली असतील ह्याची कल्पना येऊ शकेल. अशा वेळीहि टिळकानी लोकाना प्लेगप्रतिबंधक उपाय चालू देणे लोकाच्या फायद्याचे आहे असेच सांगितले होते. पण सोजीर लोकानी घरात शिरणे स्त्रियांचा अपमान होणे ह्या गोष्टी प्लेगच्या व्यवस्थेत येतातच असे नाही. अशा गोष्टी मुंबईस कराव्या लागल्या नाहींत मग त्या पुण्यास का केल्या ? तरीपण आपले इकडे ज्या गोष्टी लोक सोसणार नाहीत त्या गोष्टी पुण्यास लोकानी निमूटपणे सोसल्या आहेत. कायद्याचे बंधन सोसले पाहिजे असेच टिळकानी सांगितले होते. सार्वजनिक सभेच्या अर्जात सगळ्या गोष्टी व्यवस्थितपणे सांगितलेल्या आहेत. ( ह्या ठिकाणी सार्वजनिक सभेत कोण होते व हिंदुप्रमाणे मुसलमान होते की नाही वगैरे अवांतर गोष्टींची चर्चा झाली. ) टिळकानी प्लेग म्हणजे काय त्याचे स्वरूप कसे असते प्लेगप्रतिबंधक उपाय कोणता वगैरे गोष्टींची चर्चा आपल्या पत्रातून लोकांच्या माहितीकरिता सांगोपांग केली आहे. ती वाचली तर असे दिसून येईल की केवळ असंतोष उत्पन्न करणे एवढाच टिळकांचा हेतू नव्हता. टिळक हे चळवळे असले तरी सच्चे होते. प्रसंगविशेषी लोकानी कसे वागावे हे ते जाणत व सांगत. टिळकानी प्लेग इस्पितळ काढून लोकांची सोय केली होती. तात्पर्य ह्या वेळच्या केसरी मराठा पत्रातील एकंदर लेखावरून टिळकांचे विवेचक धोरण दिसून येते.

कार्सन—पण रँड साहेबासंबंधाने लिहिताना 'बाईच्या लोकाना शिक्षा दिलेले हे रँड साहेब' असे म्हटले होते ?

सायमन—खरी गोष्ट होती तीच सांगितली.

डार्लिंग—ते असो. सायमन साहेबांचे म्हणणे इतकेच की टिळक लिहित होते ते जपून सावधगिरीने लिहित होते.

सायमन—होय तोच माझा मुद्दा आहे. पण अशाच वेळी लोकाना उपदेश करिताना त्याबरोबर प्लेग व्यवस्थेत काय अव्यवस्था आहे हे दाखविणे टिळकाना जरूर होते. गोरे सोजीर लोक तपासणीवर घातले ह्याचे तुम्हा आम्हाला काही वाटत नसेल. पण त्यांच्याऐवजी हिंदी शिपाई त्या कामाला लावले असते तर अधिक बरे झाले असते. लोकांची सहकारिता प्लेगच्या व्यवस्थेत संपादावयाची तर त्यांच्या विश्वासाची माणसे कामावर लावली पाहिजेत. सोजीर लोकांच्या हातून किती तरी चुका घडल्या आणि ह्याविषयी उघड तक्रार करणे हेहि काही गैर-वाजवी म्हणता येणार नाही. लोकांचे दुःख काय होते हे अधिकाऱ्यांना कळत नव्हते. म्हणूनच त्यांना साहेबापर्यंत जाऊन शिष्टमंडळाच्या द्वारे तक्रारी सांगाव्या लागल्या. ह्या शिष्टमंडळात प्रतिष्ठित लोक होते. त्यानी रँड साहेबाना अनेक सूचना केल्या. खाजगी स्वयंसेवक नेमून त्यांच्याकडून तपासणी करावी असे सुच-विले. लोकांच्या मालमत्तेचे रक्षण करण्याचा मार्ग त्यानी सुचविला. ही सर्व विधा-यक कामगिरी होती. यात चळवळ नव्हती. राजकारण नव्हते. तर फक्त लोक-हिताची दृष्टि होती. ( येथे सार्वजनिक सभेचा अर्ज करण्याचा हक्क सरकारने पुढे काढून घेतला या संबंधाची बरीच चर्चा झाली. पण वास्तविक तो ह्या खटल्या-तील मुद्दा नव्हता. ) एका लेखात हल्लीच्या व्यवस्थेपेक्षा मोंगलाई बरी असे लिहिले आहे हे अतिशयोक्तीच्या झोकाचे तर खरेंच पण त्यालाहि कारण होते.

डार्लिंग—हिंदुस्थानात मोंगलाई राज्य कोणी सुरू केले ?

सायमन—बाबर बादशाहाने केले असे म्हणतात.

डार्लिंग—ते राज्य फार जुलमी होते नाही ?

सायमन—होय ह्यात शंका नाही.

कार्सन—मोंगलाई हा शब्द नेहमी जुलमी व अनियंत्रित राज्याला लावतात.

डार्लिंग—इंग्रजी राज्याची कशाशी तुलना केली आहे हे ज्यूरीला कळावे म्हणूनच हा मुद्दा मी पुढे आणला.

सायमन—गव्हर्नर साहेब एक बोलतात व अधिकारी दुसरे करितात ह्या गोष्टीची वर्तमानपत्रानी तक्रार केली आहे. लोक सक्तीने मरत आहेत. पुढे संकटे काय येतील ह्याची चिंता त्याना लागून राहिली आहे. तेव्हा केवळ गोड भाषेच्या हुकमाने किंवा सहानुभूतीने काम भागावयाचे नाही तर सरकारने याहून अधिक लक्ष घातले पाहिजे. आणि खालचे अधिकारी कसे काम करतात हे गव्ह-र्नरसारख्यानी पाहिले पाहिजे इतकेच टिळकानी लिहिले आहे.

डार्लिंग—शेवटचे वाक्य पहा. त्यात असे म्हटले आहे की हा प्लेग लव-कर न थांबला तर प्लेगच्या उपद्रवापेक्षा सोजीर लोकांचा उपद्रवच आम्हाला अधिक जाचक होईल. आणि हे सगळे कर्ज म्युनिसिपालटीवर लादले तर १०-

१२ वर्षे पर्यंत तिला पैशाची तंगी सोसावी लागेल. हेच ह्या लेखाचे तात्पर्य आहे.

*सायमन*—*होय. अगदी बरोबर.* रँडसाहेबांसंबंधाने पत्रातून तक्रारी केल्या *गेल्या आहेत ही गोष्ट खरी आहे.*

डार्लिंग—पण एका वाक्यात असेहि आहे की सोजीर काही चूक करतील असे रँड साहेबाना मुळीच वाटत नाही.

सायमन—होय तीहि गोष्ट खरी आहे. सेग्रीगेशन कँपात पुष्कळ लोक नेऊन घातले पाहिजेत. ह्या गोष्टीला अनुलक्षून एकाने लिहिले आहे की पूर्वी राक्षसाला जसे ठराविक बळी द्यावेच लागत तशीच गोष्ट घडते. ह्या उपमेचा अर्थ सहजच लक्षात येईल. रँडसाहेबापेक्षा अधिक सहानुभूतीचे अधिकारी नेमण्यात आले असते तर व्यवस्था कमी दुःखद झाली असती असे म्हटले आहे.

डार्लिंग—असल्या लेखाना राजद्रोहात्मक म्हटले जात होते काय ?

सायमन—होय. टिळकावरील राजद्रोहाच्या खटल्यात असले काही लेखहि पुढे आणण्यात आले होते.

कार्सन— पण ह्याच्याहि पुढचा लेख वाचाना ! त्यात काय म्हटले आहे ?

सायमन—होय. त्यात एक पौराणिक दाखला दिला आहे. पृथ्वी दुःख-ग्रस्त झाली म्हणजे ती ईश्वराला शरण जाते. तसे पुणे हे लॉर्ड सँडहर्स्ट ह्याना शरण गेले. पण कित्येक वेळा ईश्वर झोपी जातो तसेच लॉर्ड सँडहर्स्ट हे झोपी गेले आहेत असे म्हटले आहे.

डार्लिंग—रँडचा खून कधी झाला ?

सायमन—२२ जून रोजी.

डार्लिंग—आणि आता हे वाचलेले लेख कधी प्रसिद्ध झाले ?

सायमन—२७ एप्रिल रोजी.

डार्लिंग—ह्या लेखात असे म्हटले नव्हते काय की रँडशाही अशीच फार दिवस चालायची असेल तर लोक कितीही गरीब असले तरी ते हा उपद्रव एक-सारखा सोसणार नाहीत ? आणि हे लिहिल्यावर दोन महिन्यानी रँडसाहेबांचा खून झाला !

सायमन—गोष्ट खरी. पण म्हणून टिळक हे खुनाला जबाबदार आहेत असले विधान प्रतिवादीने करावे की काय हेच मी ज्यूरीला विचारणार आहे. ( ह्या ठिकाणी १८९७ सालच्या खटल्यात उलट सुलट दाखल झालेल्या काही लेखांची चर्चा झाली. ) एका वाक्यात असे म्हटले आहे की रात्री सोजीरानी लोकावर छापा घातला तरी भ्यालेल्या लोकाना अधिक भीति कशी वाटेल हे रँड साहेबाना समजत नव्हते. पण मी म्हणतो कधी होणारी नाही अशीच गोष्ट घडली. डॉ. ब्लॅनी सारख्यानी टाइम्स ऑफ इंडिया पत्रात काय लिहिले आहे तेहि पाहण्यासारखे आहे. हे डॉक्टर होते व इंग्रज होते. त्यांच्या लिहिण्यावरून प्लेगची व्यवस्था किती वादग्रस्त आहे हे कळून येईल.

ह्यानंतर गणपति व शिवाजी उत्सवासंबंधाने काही लेख वाचण्यात आले.

सायमन—आपल्याकडेहि अजून पहिल्या चार्लस राजाचा शिरच्छेद झाला त्यासंबंधाने लोक चार्लसला माळा घालतात निशाणे मिरवितात.

डार्लिंग—पण ज्याला इकडे माळा घालतात त्याचा शिरच्छेद झाला होता. आणि हिंदुस्थानात व महाराष्ट्रात ज्याचा उत्सव करीत होते त्याने आपल्या प्रतिपक्षाचा शिरच्छेद केला हे खरे नव्हे काय ?

सायमन—होय. पण क्रॉम्वेलचाहि असाच उत्सव करितात. तेव्हा वाटेल तर तीहि उपमा घ्यावी. उत्सव करणे ह्या गोष्टीचे सादृश्य कायमच राहाते. ह्या उत्सवात निरनिराळी भाषणे झाल्याचा रिपोर्ट छापिला आहे. पण ती पाहिली असता एखादा इतिहासाचा प्रोफेसर ऐतिहासिक चर्चा करीत असावा इतकेच वाटते. त्यात राजद्रोहाचा काहीहि संबंध दिसत नाही.

डार्लिंग—पण त्या चर्चेचे तात्पर्य भानूनी काय सांगितले आहे ? शिवाजीच्या वेळच्या हकिगती सांगितल्या पण त्या आजच्या काळाला लागू केल्या असे होत नाही काय ?

सायमन—पण प्रत्यक्ष टिळक काय बोलले हे आपण पाहिले पाहिजे. उत्सवाचा समारोप करिताना टिळक म्हणाले की "आपण शिवाजीविरुद्ध अफझुलखान ह्या वादात कोणतीहि व्यावहारिक स्वरूपाची चर्चा करीत नाही. जुन्या काळच्या मोठ्या लोकांच्या कृतीची चर्चा तात्त्विक ऐतिहासिक व नीतिदृष्ट्या आपण करीत आहो. मोठ्या माणसांचें उदाहरण लहानाना घेता येत नाही. ऋषीचे कूळ कोणी पाहू नये."

डार्लिंग—ही सगळी चर्चा जुन्या काळाच्यासंबंधानेच होती काय ?

सायमन—१८९७ च्या खटल्यात टिळकानी ही गोष्ट सांगताना 'अहो तो सगळा भूतकाळ होता' असे व्याकरणदृष्ट्या प्रतिपादिले होते. रँडच्या खुनानंतर टिळकानी लेख लिहिले. त्यात त्या कृत्याविषयी अतिशय कळकळीने निषेध प्रदर्शित केलेला आहे. तथापि अखेर टिळकांवर खटला करण्यात आलाच.

डार्लिंग—मला असे वाटते की ऐतिहासिक चर्चेकरिता टिळकांवर खटला झाला नव्हता. तर मुसलमानांच्या जागी इंग्रज आले आणि मुसलमानाना पूर्वी जसे वागविले तसे इंग्रजाना वागवावे असे सांगण्याचा टिळकांचा उद्देश सरकारला वाटला म्हणून खटला केला. आणि न्यायाधीशालाहि तसे वाटले म्हणून त्याना शिक्षा दिली.

सायमन—होय. तसेहि असेल. पण प्रत्यक्ष बोलल्याबद्दल टिळकाना शिक्षा झाली नसून काही विशेष प्रकारचा मजकूर छापल्याबद्दल शिक्षा झाली हेहि लक्षात घेतले पाहिजे.

## दिवस दुसरा-(३० जानेवारी १९१९)

या दिवशी सर जॉन सायमन यानी आपले भाषण पुढे सुरू केले. बेअव्र्च्या फिर्यादीतील बहुतेक मुख्य मुद्यांचे विवरण मी आतापर्यंत केलेच आहे. आता शिवाजीचे उद्गार हा जो दुसरा लेख केसरीत छापला गेल्याबद्दलहि *शिक्षा झाली तो मी वाचून दाखवितो.*

डार्लिंग—मूळ लेखाचे भाषांतरात काही विकृत स्वरूप झाले असेल. मुळीच नाही असे नाही. पण शिवाजीच्या उद्गारात काही शब्द वापरले आहेत आणि त्यापैकी एकाचा अर्थ 'राज्यातील करवसुली' असा होत नाही काय ?

सायमन—अशा गोष्टी चुकूनहि होतात. स्वतः मीच एकदा पार्लमेंटमध्ये एका कराविषयी बोलत असता असे म्हटले होते की कर देणाऱ्या रयतेचा पैसा fisc मध्ये येतो. माझा अर्थ fisc म्हणजे तिजोरी असा होता. पण दुसरे दिवशी पाहातो तो सरकारी रिपोर्टराने माझ्या भाषणाचा रिपोर्ट दिला त्यात fisc ह्याच्या ऐवजी *fist* असा शब्द घातला आहे. पण तेवढ्याने किती तरी फरक झाला होता.

डार्लिंग—पण पार्लमेंटचे लोक हे अशा किरकोळ चुकानी भलता समज करून घेणार नाहीत. ( या ठिकाणी रायगड येथील छत्रीच्या वर्गणीसंबंधाचा लेख वाचून दाखविण्यात आला. )

सायमन—असल्या साध्या निरुपद्रवी लेखाकरिता टिळकाना राजद्रोही ठरविण्यात आले. कदाचित मुंबईच्या ज्यूरीने दिलेला आभिप्राय बरोबर होता असेच आपण म्हणू. पण रँडसाहेबांच्या खुनाला उत्तेजन देणारा तो लेख होता असे म्हणणे गैर आहे. ती केवळ ऐतिहासिक चर्चा होती. शिवाय ते किंवा हे लेख मधून मधून पत्रातून एकसारखे येत होते. वाद चालू होता. तथापि टिळक लोकाना सांगत होते की आरोग्यसंवर्धन व प्लेगप्रतिबंधक असे जे उपाय आधुनिक शास्त्रानी ठरविले आहेत ते आपण अमलात आणले पाहिजेत. तात्पर्य ऐतिहासिक चर्चा काहीहि चालली असली तरी व्यवहारात टिळक काय उपदेश करीत होते हे आपणाला पाहिले पाहिजे.

( ह्यानंतर रँड व आयर्स्ट ह्यांच्या खुनाची हकीगत दिलेले लेख वाचून दाखविण्यात आले. तसेच टाइम्स ऑफ इंडिया पत्राने काय टीका केली त्याला केसरी व इतर पत्रानी काय उत्तरे दिली वगैरेचे लेखहि वाचून दाखविण्यात आले.)

सायमन— हे सर्व वाचले तरी टिळकाना दोष देण्यासारखे लिहिलेले त्यात काहीच नाही. गुन्हेगार सापडावा त्याची चौकशी व्हावी त्याला शिक्षा व्हावी हे सर्व टिळक म्हणतच होते. तथापि त्याचबरोबर पुण्यातील ब्राह्मणांचा कट आहे असे अनुमान कोणी काढणे बरोबर नाही हेहि ते सांगत होते.

डार्लिंग—हे प्रकरण पुरे करण्याकरिता मी इतकेच विचारतो की शेवटी कोणी गुन्हेगार सापडला की नाही?

सायमन—होय पुढे एक मनुष्य सापडला. त्याचे नाव खाडिलकर असे होते.

कार्सन—नव्हे नव्हे. त्याचे नाव चाफेकर असे होते.

सायमन—कोणीहि असो. तो सापडल्यावर त्याच्यावर खटला झाला. त्याला शिक्षा झाली. सर्व काही झाले आणि ते यथायोग्य झाले. तो ब्राह्मण होता हेहि खरे. पण आयर्लंडात जितके आयरिश लोक असतील तितकेच हिंदुस्थानात ब्राह्मण असतील.

डार्लिंग—नाही नाही अधिक असतील.

सायमन—कदाचित असतील. माझ्याजवळ काही आकडे नाहीत. पण मला एवढे दाखवावयाचे की ब्राह्मणासारख्या एका जातीतील एखाद्या व्यक्तीने असले कृत्य केले म्हणून त्या सगळ्या जातीचे त्यात अंग होते हे म्हणणे गैर-वाजवी होईल.

कार्सन—पण मी तरी तसे कोठे म्हणतो ?

सायमन—टिळक वर्तमानपत्रातून अगदीच निरपवाद लेख लिहितात किंवा त्यानी राजद्रोहाचे उद्गार नेहमीच टाळले होते असे मी तुम्हाला म्हणत नाही. क्वचित खटले होऊन शिक्षाहि झाल्या आहेत. पण राजकीय राजद्रोह व खुनासारखे अत्याचार ह्या गोष्टी अगदी वेगळ्या आहेत हे कार्सन सुद्धा कबूल करतील. चिरोल साहेबानी गैर केले ते हेच की ह्या शिक्षाचा फायदा घेऊन टिळकाना खुनाचे चिथावणीला नेऊन भिडविले. जॅकसन ह्यांचा खून १९०९ साली झाला. पण तो नाशिकास झाला तो गाव टिळकांचा नव्हे. टिळक त्यावेळी तुरुंगात होते. १९०६ साली म्हणजे खुनापूर्वी तीन वर्षे टिळक नाशकास तीन दिवस होते. टिळकांना ही ६ वर्षांची शिक्षा झाली ती आपण कदाचित त्यांच्या गुणामुळे योग्य झाली असे म्हणा. पण ह्या काळात घडलेल्या गोष्टीत त्यांचे अंग होते किंवा त्यांच्या वजनाने किंवा त्यांच्या उपदेशामुळे ह्या गोष्टी घडून आल्या हे म्हणणे योग्य होणार नाही. तरी पण जॅकसनच्या खुनाची जबाबदारी चिरोल साहेब टिळका-वरच लादतात.

डार्लिंग—पण कान्हेरे यानी मॅजिस्ट्रेट पुढील जबानीत काय सांगितले ?

सायमन—केसरी राष्ट्रमत काळ ही पत्रे वाचून माझ्या मनावर परिणाम झाला असे तो म्हणाला हे खरे. पण केसरी टिळकांचे पत्र असले तरी टिळक कोठे होते ? असे असता चिरोल साहेब लिहितात की जॅकसनचा खून खरोखर कान्हेरे याने केला नाही तर टिळकांनीच केला. पण नाशकातील त्या वेळच्या वातावरणाशी हजारो मैल दूर असलेल्या टिळकांचा काय संबंध ?

डार्लिंग—पण चिरोल साहेब तरी इतकेच म्हणतात की कान्हेरे व टिळक ह्यांचा प्रत्यक्ष परिचय किंवा संबंध नव्हता तर टिळकांच्या पत्राने बरेच दिवस पर्यंत सतत जो विषवृक्ष हळुहळू वाढविला त्याचे हे फल होय.

सायमन—होय. चिरोल साहेबानी तसेहि म्हटले होते खरे. पण हिंदुस्थानात आरोपीच्या जबाबाची तऱ्हा काही वेगळीच आहे. प्रश्न एक दोनच असावयाचे व त्याच्या उत्तरादाखल लांबलचक कित्येक परस्परविरोधी विधाने करण्यात येतात. अशा गोष्टीना परवानगी मिळते व त्या करविल्या जातात हेच आश्चर्य होय. कान्हेरे याने तीन पत्रांची नावे घेतली. पण राष्ट्रमत निघाले त्यावेळी दुसऱ्या राजद्रोहाच्या खटल्याकरिता टिळकांना अटकच करण्यात आली होती. स्वतः टिळकानी राष्ट्रमताचा एक अंकहि कधी पाहिला नाही. हे पत्र ज्या कंपनीच्या मालकीचे तिची मूळ स्थापना करण्यापुरताच टिळकांचा संबंध होता. तसेच काळ पत्र हे टिळकांचे म्हणणे हा नुसता मूर्खपणाच आहे. काळपत्राची मते केसरीच्या पुढे जाणारी होती असे चिरोल साहेबानीच म्हटले आहे. त्याचा टिळकाशी काहीच संबंध नव्हता. स्वतः टिळकांच्या केसरी पत्रातहि सगळा मजकूर ते लिहित नाहीत. पण ते त्याचे पत्र म्हणून सर्व जबाबदारी त्यानाच घ्यावी लागते. आणि १९०८ ते १९१४ पर्यंत तर स्वतःच्या केसरीशीहि टिळकांचा काही संबंध नव्हता. जॅकसनचा खून केला तो मूर्ख कोवळ्या अशा अगदी थोड्या मोजक्या लोकानी! तेव्हा आता ज्यूरीने असा विचार करावा की जॅकसनचा खून व टिळक यांचा जो संबंध चिरोल साहेबानी जोडून दिला आहे तो कितपत योग्य आहे? उलट पाहिले तर असाहि पुरावा आहे की १९०६ साली टिळक नाशकास गेले तेव्हा त्यानी बेकायदेशीर प्रवृत्तीच्या तरुण लोकाना शहाणपणाचा उपदेश केला आणि सनदशीर मार्गच स्वीकारा असे सांगितले. टिळकांचा नाशकाशी संबंध होता तो हा असा होता. ज्वलज्जहाल लोकाना असा उपदेश करण्याला ते कधी भ्याले नाहीत. रँडच्या खुनानंतर लोकाना काळीमा आणणारी ही गोष्ट होय असेच टिळकानी लिहिले होते. असो. ह्या सहा मुद्यासंबंधाने आपणाला विचार करावयाचा आहे. आता मी टिळकांना साक्षीच्या पिंजऱ्यात बोलावतो. सर एडवर्ड कार्सन हे त्याची उलट तपासणी करणार तेव्हा टिळकांना ते एक मोठे दीव्यच करावयाचे आहे.

कार्सन—पण आपली उलट तपासणीहि काही कमी कडक नसते.

सायमन—छे छे! चिरोलसाहेब साक्षीला येतील तेव्हा त्यांचा अनुभव वेगळा होईल.

## (५) टिळकांची सरतपासणी

यानंतर टिळकांची सर तपासणी बॅ. स्पेन्स ह्यानी घेतली. त्यातील पहिला बराच भाग मामुली स्वरूपाचा होता. जबानीमध्ये शिक्षण विद्याभ्यास न्यू इंग्लिश स्कूल फर्ग्युसन कॉलेज केसरी व मराठा पत्रे त्यांची मालकी यासंबंधानेच ते प्रश्न होते. त्यातील मुद्याचा भाग इतकाच होता की टिळकावरील खट-

त्याच्या वेळी म्हणजे १९०८--९ साली खून वगैरे झाले त्यावेळी केसरीचा खप १५ पासून २० हजारापर्यंत व मराठ्याचा खप १००० पासून १५०० पर्यंत होता.

प्र०—केसरीतील म्हणून या ठिकाणी काही लेख आले आहेत, पण त्यातील काही इतरानीच लिहिलेले आहेत ना? उ०—होय. त्यातील काही लोक बाहेर गावाहून पत्रव्यवहार करणारे आहेत.

प्र०—राष्ट्रीय सभेशी तुमचा संबंध होता काय? उ०—मी प्रायः दर वर्षीच राष्ट्रीय सभेला जात असे.

प्र०—तुम्ही म्युनिसिपालिटी व कायदे कौंसिल यांचे सभासद होता काय? उ०—होय.

प्र०—१८९७ सालामध्ये दंग्याबद्दल तुम्ही केसरीत काय मत प्रतिपादिले?

कार्सन—हे पुराव्यात कसे कोठे येईल?

सायमन—त्यासंबंधाने कागदपत्र पुराव्यात आहेतच पण तोंडाने थोडक्यात उत्तर मिळते म्हणून.

कार्सन—टिळकांच्या मतांचा पुरावा लेखात आहे आणि ते लेख येथे आहेत. मग टिळकांच्या तोंडी मताचा काय उपयोग? लोकाशी संबंध आला तो त्यांच्या लेखी मताचा. म्हणून त्या लेखांचा काय परिणाम झाला असेल हे आपणास पाहावयाचे.

डार्लिंग—मला वाटते कार्सनसाहेबांची हरकत बरोबर आहे.

कार्सन—पण मी हरकत वाटेल तर घेत नाही. त्यानी वाटेल ते विचारावे मी त्याबद्दल उलट तपासणी करीन.

प्र०—दंग्यासंबंधाने तुम्ही लेखात काय मत दिले? उ०—गोरक्षणाच्या चळवळीमुळे दंगे झाले हे सरकारचे मत मी खोडून काढले. आणि वाद्याच्या बाबतीत अधिकाऱ्यानी जे नियम केले त्यामुळे दंगे झाले असे माझे मत मी दिले होते.

प्र०—स्वतः तुम्ही एखादी गोरक्षण मंडळी काढली होती काय? उ०—नाही.

प्र०—यापूर्वी अशा मंडळ्या निघाल्या होत्या काय? उ०—ह्यापूर्वी ५० वर्षांपासून.

प्र०—तुम्ही अशा मंडळीचे सभासद होता काय? उ०—नाही. मी फक्त त्याना साहाय्य करितो. मी त्याना कधी नियमित वर्गणी दिलेली नाही. १८९७ साली मुख्य दोन मंडळ्या होत्या. आणि त्यांच्या काही शाखा होत्या. शाखा निरनिराळ्या प्रांतात होत्या.

प्र०—गोरक्षण मंडळाचा उद्देश काय?

डार्लिंग—हे काय विचारता? गाईचे रक्षण करण्याचा.

प्र०—तुमच्यात गाईचे महत्त्व मानतात काय? उ०—धर्माच्या संसाराच्या व शेतीच्या दृष्टीने मानतो. हिंदु प्रायः शाकाहारी असतात. मुसलमान नसतात.

प्र०—गोरक्षणाचा हेतू मुसलमानाना चिथावण्याचा असतो काय? उ०—*नसतो आणि तसा परिणाम झाला नाही.*

प्र०—गोरक्षणाच्या चळवळीत तुम्ही पुढे जाउ नका असे उदारमतवादी लोक तुम्हाला म्हणत काय? उ०—कधीच नाही. चिरोल साहेबांच्या त्या वाक्याचा अर्थच मला कळला नाही. स्वतः मीहि उदारमतवादीच (Liberal Hindu) आहे. पुण्यास सभा झाली तिचा गोरक्षणाशी संबंध नव्हता तर हिंदु-मुसलमानांच्या दंग्याशी होता.

प्र०—तम्हाला काय करू नका असे ते म्हणत? उ०—त्यांचे म्हणणे असे की दंगे झाले आहेत होत आहेत तरी त्यांची चर्चा सपाटून करू नका.

डार्लिंग—लोक नको म्हणत असता तुम्ही सभा भरविल्या?

सायमन—होय. पण सभा गोरक्षणासंबंधी नव्हत्या.

प्र० सभेत काय ठरले? उ०—सलोख्याची पंचायत नेमावी. त्यानी चालिगीती काय आहेत त्या पाहाव्या व अधिकाऱ्याना त्याप्रमाणे योग्य सल्ला-मसलत द्यावी.

(येथ या सभेची केसरीतील हकिगत दाखल करण्यात आली).

प्र०—पुण्यास किती मुसलमान आहेत? उ०—शेकडा १० मुसलमान व ९० हिंदू.

कार्सन—सभेचे अध्यक्ष कोण होते?

स्पेन्स—बाळासाहेब नातु.

प्र०—सभेला किती लोक होते? उ०—पाच पासून सहा हजार.

डार्लिंग—मग ही सभा बहुधा मैदानातच असेल. उ०—मैदानावर मंडपहि होता. (ह्यानंतर सभेतील ठराव वाचून दाखल करण्यात आले.)

प्र०—स्वतः तुम्ही भाषण केले त्यात काय म्हणाला? उ०—हिंदुमुसलमानानी स्नेहभावाने राहावे असे म्हटले आणि तसाच शक्य तितका प्रयत्न करीत होतो.

प्र०—नातु हे कोण होते? उ०—दोघेहि ब्राह्मण इनामदार व सरदार.

प्र०—त्यांचा तुमचा वाद कशाबद्दल झाला? उ०—मजवर ग्रामण्य घातल्याबद्दल वाद दोन वर्षे चालू होता. आणि त्यामुळे काही बेबनाव झाला होता.

प्र०—ग्रामण्याचा निकाल काय झाला? उ०—धार्मिक न्यायकोर्टाने आम्हावर प्रायःश्चित्त लादले.

प्र०—ह्या धर्माच्या न्यायकोर्टात कोण होते? उ०—दोन शास्त्री. इटालीतील पोप जसे धर्माधिकारी नेमतो तसे.

डार्लिंग—वा! मग ही धर्माची न्यायसभा मोठी छान असली पाहिजे!

प्र०—मग तुम्हाला बहिष्कृत केल्यापासून त्रास झाला असेल? उ०—नाही. शास्त्री लोकाना बहिष्काराचे अधिकार नाहीत अशी तक्रार मी केली.

प्र०—प्रायःश्चित्ताची किंमत किती होती? उ०—आठ आणे किंवा चार आणे.

डार्लिंग—चहाची किंमत बहुधा तितकीच असेल.

प्र०—स्वतः तुम्ही आखाडा घातला आहे काय? उ०—मी स्वतः घातला नाही किंवा कोणत्याही आखाड्यात सभासद किंवा वर्गणीदार नव्हतो.

प्र०—यावेळी तुम्ही काही वर्गण्या गोळा करीत होता काय? उ०—त्या शिवाजी स्मारकाकरिता होत्या. आमच्या राजकीय मतप्रसाराकरिता नव्हत्या.

प्र०—पैसाफंड हा कशाकरिता? उ०—उद्योगधंद्याच्या वाढीकरिता. त्या फंडाची सभा रजिस्टर झालेली होती. तिला राजकीय स्वरूप काहीच नव्हते.

प्र०—आणखी काही वर्गण्या जमविता? उ०—होय. १९०६ पासून राष्ट्रीय शिक्षणाकरिता वर्गण्या जमवितो.

प्र०—त्या वर्गण्या बळजबरीने जमविता काय? उ०—हे अगदी खोटे. धमकी दपटशहा वगैरे काहीच नाही. लोक प्रेमाने देतात व त्या घेतल्या जातात.

प्र०—तुमच्या पत्रात ज्यांच्यावर टीका होती त्यांच्याकडे तुम्ही कधी वर्गण्या मागता काय? उ०—मुळीच नाही व ते देतहि नाहीत. टीकेचा व वर्गण्यांचा काही संबंध नसतो. टीका सामाजिक किंवा राष्ट्रीय असते. ( ह्यानंतर ताई महाराज प्रकरणासंबंधाने स्पेन्स ह्यानी टिळकांकडून प्रश्नोत्तराने माहिती काढून घेतली. त्यात दत्तविधान दिवाणी फौजदारी खटले त्यावरची अपिले शिक्षा व दोषमुक्तता वगैरे हकिगती होत्या. )

प्र०—या प्रकरणात तुम्ही ट्रस्टी म्हणून काम करीत होता? उ०—होय. माझा व्यक्तिशः पैशाचा काही संबंध नव्हता.

डार्लिंग—त्याचा ह्या बेअब्रूच्या खटल्यात काय संबंध?

स्पेन्स—टिळकांच्या अंगी सामान्य माणसाचाहि प्रामाणिकपणा नव्हता असे प्रतिवादीने लिहिले ह्याच.

कार्सन—पण ती टीका न्यायमूर्ति चंदावरकर यांच्या निकालाला अनुसरून होती.

डार्लिंग—सर्व लोक जाहीरपणे जी गोष्ट बोलत आहेत ती चिरोल साहेबानी लिहिली. प्रत्यक्ष पैशाची चोरी न केली म्हणजे झाले नाही. खऱ्या प्रामाणिकपणाला त्याहून अधिक गोष्टी लागतात. अप्रामाणिकपणाचा केवळ पैशाशी संबंध नसतो.

प्र०—अप्रामाणिकपणाबद्दल तुमच्यावर केव्हा खटला झाला काय? उ०—नाही. ( येथे प्रिव्ही कौन्सिलचा निकाल दाखल करण्यात आला. )

डार्लिंग—चिरोल साहेबांचा लेख चंदावरकरांच्या निकालासंबंधी आहे. प्रिव्ही कौन्सिलसंबंधी नाही.

स्पेन्स—पण चंदावरकरांच्या निकालाचे प्रिव्हीकौन्सिलात काय झाले हे सांगावयाला नको काय ?

डार्लिंग—पण तो आम्हाला माहित आहे. तुम्ही तो खटला प्रिव्हीकौन्सिलात जिंकला. पण चिरोल साहेबानी लेख लिहिला तेव्हा प्रिव्हीकौन्सिलचा निकाल झाला नव्हता हे खरे ना ?

स्पेन्स—पण टिळकांच्या ज्या चारित्र्याविषयी चिरोल साहेबानी लिहिले त्या चारित्र्याशी प्रिव्हीकौन्सिलचा संबंध येतो म्हणून.

प्र०—गणपतिउत्सव हा काय आहे ? उ०—धार्मिक व सामाजिक उत्सव आहे.

ह्या संबंधाने पुढे झालेल्या प्रश्नोत्तरात टिळक म्हणाले "नातूंची मदत घेऊन मी हा उत्सव सार्वजनिक केला हे खरे नाही. तो ७ व्या शतकाइतका जुना आहे. ३०–४० वर्षे अलीकडे तो मागे पडला म्हणूनच तो पुढे आणला. तीही गोष्ट प्रथम लोकानीच केली. त्यात त्यानी एक मंडळ नेमले. त्यात मला एक सभासद नेमले. मी मिरवणुकीत जात असे. मेळ्याची पदे ऐकली आहेत. गणपति बरोबर शिवाजीचीहि पदे म्हणतात. इतर ठिकाणाप्रमाणे माझ्याहि घरी उत्सव होई. पदे अनेक विषयावर असत. पदे तपासून पसंत–नापसंत हे कोणी ठरवीत नव्हते. वाटेल तेथे वाटेल ती पदे म्हटली जात. मुलाना पट्ट्याचे हात वगैरे शिकविण्याचे बाबतीत मी विशेष पुढाकार घेतला नव्हता. मुलाना कवाईत शिकवून सरकारला देशातून घालवून द्यावे असा माझा हेतू होता हा आरोप चिरोल साहेबानी मजवर केला तो अगदी खोटा आहे. ही गोष्ट त्यानी केवळ आपल्या कल्पनेतून काढली आहे. देशी उद्योगधंदे निकृष्ट स्थितीत आले आहेत म्हणूनच स्वदेशीची चळवळ सुरू झालेली होती. ( यानंतर शिवाजीउत्सव शिवाजी व अफझुलखान यांच्या संबंधाने काही प्रश्नोत्तरे झाली. )

प्र०—शिवाजी व अफझुलखान यांच्या वादात तुमचे म्हणणे तेच हिंदुपक्षाचे म्हणणे होते ? उ—होय.

प्र—मग चिरोल साहेबांचे पुस्तक वाचून तुमचे मत चूक होते असे तुम्हाला वाटत नाही काय ? उ०—मुळीच नाही. चिरोल साहेबांच्याहि वरचे ह्या विषयातले अधिकारी इतिहासज्ञ किंकेड साहेब हे त्यापैकी एक होते. त्यांचे पुस्तक यंदा प्रसिद्ध झाले आहे. शिवाजीने अफझुलखानाचा विश्वासघाताने खून केला हे ते मुळीच म्हणत नाहीत.

डार्लिंग—विश्वासघात ह्या शब्दात एवढे काय पाप आहे ?

उ०—शिवाजीला तो शब्द लावण्यात पाप आहे.

डार्लिंग—पण हे प्रकरण फार जुने. आता ते उकरून का काढावे ?

उ०—ज्यांचा आपण उत्सव करितो त्यांचेवरील आक्षेपाचे निरसनहि आम्हाला करावे लागते.

प्र०—शिवाजी उत्सवातून तुम्हाला राजद्रोह उत्पन्न करावयाचा होता काय? उ०—तसा मुळीच नव्हता. तेव्हा तसे कोणी म्हणालेहि नाही.

प्र०—असे कोणी म्हणाला तर ते खोटे? उ०—निखालस खोटे.

प्र०—शिवाजी हा ब्राह्मण होता काय? उ०—नाही.

प्र०—तुम्ही स्वराज्याची मागणी केली काय? आणि पूर्ण स्वातंत्र मागितले काय? उ०—साम्राज्यात असलेले स्वराज्य आम्ही मागत होतो.

प्र०—युद्ध करून राज्य मिळवावे असे तुमचे मत आहे काय? उ०—नाही आम्ही फक्त अधिक हक्क मागत होतो. साम्राज्यातून फुटून जावे असे म्हणत नव्हतो.

प्र०—तुम्ही कधी गुप्त मंडळात होता काय? किंवा काढली काय? उ०—नव्हतो व कधी काढणारहि नव्हतो.

प्र०—प्लेग प्रथम कोठे सुरू झाला?

डार्लिंग—हे साद्यन्त विचारीत बसणार की काय!

सायमन—प्लेगचा संबंध फक्त रँडसाहेबांच्या खूनापुरता आहे.

डार्लिंग—रँडचा खून का झाला येवढेच त्याना विचाराना? मात्र हा प्रश्न थोडा अवघड आहे खराच.

सायमन—प्लेगच्या दिवसात टिळकानी लोकाकरिता काय काय केले हे कळले म्हणजे आपण सुचविलेल्या प्रश्नावरहि प्रकाश पडेल. म्हणूनच ती हकीगत विचारावयाची.

डार्लिंग—पण त्यांच्या लेखावरून ते दिसत नव्हते काय? निदान लेखात नसेल तेवढेच तरी विचारा!

प्र०—पुण्यास प्लेग केव्हा सुरू झाला? उ०—मुंबईनंतर एका महिन्याने.

प्र०—मुंबईस कोणते उपाय योजिले?

कार्सन—ह्या प्रश्नाना मी हरकत घेतो.

डार्लिंग—प्लेग आला तेव्हा तुम्ही स्वतः मुंबईत होता काय?

उ०—नव्हतो.

डार्लिंग—मग मुंबईतील हकीगत ते काय सांगणार?

कार्सन—मुंबईची गोष्ट वेगळी व पुण्याची गोष्ट वेगळी होती.

डार्लिंग—वादाचा मुद्दा असा आहे की ते उपाय पुण्यास अमलात आणले असते तर त्रास झाला नसता. (त्यानंतर पुण्यातील म्युनिसिपालिटी सेग्रिगेशन कँप प्लेग इस्पितळ सेग्रिगेशन कँपातील अडचणी तेथे लोकाना मदत देण्याची झालेली खाजगी व्यवस्था सोजीर लोकांची तपासणी त्याचबरोबर तपासणीला जाण्याचे टिळकानी सोडून दिले ह्याची कारणे ह्या बाबतीत रँडसाहेबाकडे केलेला अर्ज त्याचे परीक्षण वगैरे गोष्टीविषयी प्रश्नोत्तरे झाली).

प्र०—रँडसाहेबांच्या खुनाची बातमी तुम्हाला केव्हा कळली? उ०—दुसरे दिवशी सकाळी.

प्र०—केसरीत त्यासंबंधाने आलेले लेख तुम्ही लिहिले काय? आणि त्या वेळचे तुमचे मत हेच तुमचे मत आहे काय? उ०—होय.

प्र०—रँडचा खून कोणी केला असावा ह्याविषयी तुम्हाला कल्पना होती काय? उ०—मुळीच नव्हती. १८९७ साली मला शिक्षा झाल्यानंतर पोलिसाना गुन्हेगार सापडला.

प्र०—या गुन्हेगारानीच तुमच्या देखत शिवाजी उत्सवातील श्लोक म्हटले काय? खुनापूर्वीच्या शिवाजी उत्सवात चाफेकरानी काही पद्ये म्हटली काय? उ०—नाही.

प्र०—ह्या चाफेकराची तुम्हाला पूर्वी माहिती होती काय? उ०—नाही.

प्र०—तुमच्यावरील खटल्यात तुमचा व खुनाचा संबंध जोडण्यासारखा काही पुरावा आणला होता काय? उ०—नाही. पुरावा देता येत नाही असेच अॅडव्होकेट जनरल यानी म्हटले व न्यायमूर्तीनीहि जूरीला सांगितले.

प्र०—न्यायमूर्तीनी ज्यूरीला खटला समजावून देताना प्लेगसंबंधाने तुमच्या कामागिरीची प्रशंसा केली काय? उ०—होय.

प्र०—आणि शिक्षा कमी देण्याला ते एक कारण म्हणून सांगितले काय? उ०—होय.

प्र०—आधी सुटलो तर चांगली वर्तणूक ठेवीन असे तुम्ही लिहून दिले होते काय आणि ते तुम्ही मोडले काय? उ०—असे लिहून दिले नव्हते व ते मोडलेहि नाही. मला अटी घातल्या त्या वेगळ्या होत्या. सुटकेसंबंधाने मिरवणुकींत भाग घेऊं नये इतकीच अट होती व ती मी पाळली. दुसरी अट पुन्हा राजद्रोहाचा गुन्हा केल्यास शिल्लक असलेली सहा महिन्यांची शिक्षा भोगण्याची होती. तीहि मी भोगली. म्हणजे तीही अट पाळली.

डार्लिंग—सहा वर्षांच्या शिक्षेच्या मुदतीत तुम्हाला काही सूट मिळाली नव्हती काय? उ०—नाही.

प्र०—तुम्हाला अटक केव्हा झाली? उ०—जुलै १९०८ मध्ये.

प्र०—सुटका केव्हा झाली? उ०—जून १९१४ मध्ये.

प्र०—दरम्यान तुम्हाला बाहेरील काही हकीगत कळत होती काय? उ०—कशी कळणार? एकही वर्तमानपत्र मला ह्या मुदतीत मिळालेले नाही.

प्र०—तुमच्या वर्तमानपत्रात तरी काय लिहावे याविषयी तुम्हाला सल्ला मसलत देण्याला सवड होती काय? उ०—नाही.

प्र०—नाशकास तुम्ही केव्हा गेला? उ०—१९०६ साली.

प्र०—त्या साली तुम्हाला मित्रमेळ्याने पानसुपारीला बोलाविले होते काय? उ०—होय.

प्र०—तेथे काय घडले ?

कार्सन—ह्या प्रश्नाला माझी हरकत आहे.

सायमन—एखाद्या गुन्ह्याबद्दल एखाद्याला तुम्ही जबाबदार धरता तर तेथे त्यानी काय केले काय घडले हे न सांगितले तर कसे होईल ?

प्र०—टिळक तुम्ही तेथे अत्याचाराना उत्तेजन दिले काय ? उ०—नाही.

कार्सन—साक्षीदाराला प्रश्न धडकावून विचारला म्हणून त्यानी तसे उत्तर दिले.

सायमन—अत्याचाराना अनुकूल किंवा प्रतिकूल यापैकी काही तुम्ही वर्तन केले काय ?

उ०—अत्याचाराविरुद्ध उपदेश केला आणि केवळ सनदशीर मार्गाने व शिक्षण प्रसाराने आपले काम करण्यास सांगितले.

प्र०—त्यानंतर पुन्हा केव्हा तरी नाशकास गेला काय ? उ०—नाही.

प्र०—कान्हेरे यांचे तुम्ही नाव तरी ऐकले होते काय ? उ०—नाही.

प्र०—गुप्तमंडळ्यांची तुम्हाला काही माहिती होती काय ? उ०—मी हिंदुस्थानातच नव्हतो.

प्र०—चिरोल साहेबानी तुम्हाला खुनाकरिता जबाबदार धरले आहे ते बरोबर आहे काय ? उ०—साफ चूक आहे.

**सर एडवर्ड कार्सन ह्यानी केलेली टिळकांची उलट तपासणी.**

प्र०—ही फिर्याद मांडण्याला सॉलिसिटरला तुम्ही कधी सांगितले ? उ०—१९१५ सालच्या आक्टोबर महिन्यात.

प्र०—तुम्ही हिंदुस्थानात फिर्याद का केली नाही ? उ०—मला येथे फिर्याद करणे बरे वाटले म्हणून !

प्र०—विलायतच्या लोकाना तुमची माहिती नाही व त्याचा फायदा घेण्याकरिता येथे फिर्याद केली असे नव्हे काय ? उ०—नाही. चिरोल साहेबांचे पुस्तक सगळ्या साम्राज्यात वाचतात. म्हणून इंग्लंडातील कोर्टाचा निकाल मिळाला असता तो साम्राज्यभर जाहीर होईल म्हणून.

प्र०—तुम्हाला असे वाटे काय की युरोपात किंवा सर्व साम्राज्यात लोक तुम्हाला ओळखतात ? उ०—तसे मी म्हणत नाही.

प्र०—हिंदुस्थानात तुम्ही याबद्दल काही केले नाही ? उ०—तेथे कशाकरिता करावयाचे ? तेथे खरा प्रकार सर्वांना माहितच आहे.

प्र०—न्यायमूर्ति दावर हे शिक्षा सांगताना तुमच्याबद्दल काय बोलले हे तुम्हाला माहित आहे काय ? उ०—होय. न्यायमूर्तींना जसे बोलावेसे वाटले तसे ते बोलले. (येथे कार्सनसाहेबानी न्या. दावर यांचे समग्र भाषण ज्यूरीला वाचून दाखविले.)

प्र०—हे उद्गार हिंदुस्थानांतील लोकाना पुरे माहित होते म्हणून तुम्ही तेथे फिर्याद केली नाही ? उ०—असे नाही.

प्र०—न्या. दावर यांच्या उद्गारापेक्षा कडक असे काही शब्द चिरोल साहेबांच्या पुस्तकात तुम्ही काढून शकाल काय? उ०—होय. जॅकसनच्या खुनाशी त्यानी जोडलेला माझा संबंध.

प्र०—एखाद्याने अत्याचाराला उत्तेजनकारक भाषण केले तर त्याला अत्याचाराबद्दल जबाबदार मानावे की नाही? उ०—होय. तशी भाषणे एखाद्याने केली असे खरे ठरले तर!

प्र०—खून व खुनाची चिथावणी ह्यात फरक होतो काय? उ०—तसेच म्हणाल तर फरक आहे.

प्र०—यांत अधिक वाईट कोणते? उ०—ते मी नक्की कसे सांगू? परिस्थितीप्रमाणे ठरवावे.

प्र०—देशी राज्याखाली लोक असतात तरी ते अधिक सुखी असतात असे तुम्ही लिहिले काय? उ०—होय. ते स्वराज्याखाली असते तर अधिक सुखी असते.

प्र०—ब्रिटिश राज्यकर्त्यांना तुम्ही राक्षस म्हणता काय? उ०—नाही.

प्र०—परकी म्हणता काय? उ०—होय.

प्र०—इंग्रजाना चळवळीने हाकलून देता येईल आणि ब्राह्मणाच्या हातात सत्ता येईल असे तुमचे मत होते काय? उ०—नाही.

प्र०—बाँब ही एक जादू आहे तो एक ताईत आहे असे तुम्ही लिहिले काय? उ०—शब्द बरोबर आहेत पण त्याचा अर्थ वेगळा केला पाहिजे?

प्र०—स्वराज्य ह्याचा अर्थ स्वातंत्र्य असा करिता काय? उ०—साम्राज्यांतर्गत स्वराज्य असा करावयाचा.

प्र०—गोरे लोक काढून लावावयाचे काय? उ०—नाही.

प्र०—चिरोलच्या पुस्तकाचे भाषांतर मराठीत झाले होते काय? उ०—होय.

प्र०—त्याच्यावर तुम्ही फिर्याद केली नाही काय? उ०—नाही.

प्र०—कान्हेरे ह्यांचा जबाब तुम्ही वाचला आहे काय? उ०—होय.

प्र०—त्याने म्हटल्याप्रमाणे म्हणजे हिंदुस्थानात न्याय मिळत नव्हता असे आरोपी म्हणाला तसे तुम्ही लिहित होता काय? उ०—वरचेवर नाही. एखादे वेळी लिहिले असेल. युरोपिअन व नेटिव्ह असा विरोध आला म्हणजे न्याय मिळणे कठीण असते असे माझे मत आहे.

प्र०—मुसलमानाना पक्षपात होतो असे तुम्ही लिहिले काय? उ०—दंग्याच्या बाबतीत अधिकारी पक्षपाती असतात असे मी लिहिले आहे.

प्र०—साहेबांच्या जुलमाची उदाहरणे तुम्ही दर आठवड्यास देत होता काय? उ०—दर आठवड्यास नाही. नजरेला येत तेव्हा देई.

प्र०—काळ पत्राचे परांजपे हे तुमचे शिष्य होते काय? उ०—माझ्या वेळी शाळेत एक विद्यार्थी होते. त्यांचा वर्ग मी शिकविला असेन. व्यक्तिशः त्याना शिकविले असे नाही.

प्र०—परांजपे ह्याना शिक्षा झाली तेव्हां तुम्ही एकत्र राहात होता काय? उ०—एकाच खानावळीत होतो.

प्र०—परांजपे यांच्यावर खटला झाला तेव्हां परांजपे जामीनावर खुले होते काय? उ०—नाही.

प्र०—तुम्हाला पकडले त्यावेळी तुम्ही व ते एकत्र बसला होता काय? उ०—होय.

प्र०—त्यांच्या खटल्यात तुम्ही त्यांच्या बचावाला मदत करीत होता काय? उ०—थोडीबहुत करीत होतो.

प्र०—ते तुमचे स्नेही होते? उ०—पुष्कळ होते त्यातील ते एक होते.

प्र०—त्यानाहि राजद्रोहाबद्दल शिक्षा झाली होती? उ०—माझ्यापूर्वी सुमारे १५ दिवस.

प्र०—त्यांचे व तुमचे लेख एकाच स्वरूपाचे होते काय? उ०—दोन्ही लेखां-वर राजद्रोहाकरिता खटला झाला म्हणून त्याना वाटेल तर एका स्वरूपाचे म्हणा.

प्र०—तुम्ही परांजपे ह्याना काय मदत केली? उ०—पैसे व बॅरिस्टर पाहून देणे ह्यासंबंधाने केली.

प्र०—परांजप्यांचे लेख बॉंबच्या अत्याचारासंबंधाने असता तुम्ही त्याना मदत केली? उ०—गुन्हा कशाचाहि असला तरी स्नेही व आप्त बचावाला मदत करतातच.

प्र०—तुम्ही अशा माणसाशी संगत ठेविली काय? उ०—त्यांच्या लेखाचा आणि माझ्या संगतीचा स्नेहाचा काय संबंध?

प्र०—त्याना शिक्षा झाल्यामुळे तुमच्या स्नेहात अंतर पडले की नाही? उ०—शिक्षेमुळे स्नेहात अंतर पडण्याचे काय कारण?

प्र०—त्यांच्या लेखाबद्दल तुमचे काय मत? उ०—लेख कडक होते. पण अत्याचाराना उत्तेजन देणारे होते असे वाटले नाही.

प्र०—मग कडक म्हणजे काय? उ०—विचारसरणी जरा कडक.

डार्लिंग—परांजप्यांच्या वर्गात टिळक Science शिकवीत होते ते कसले हे विचारा!

कार्सन—कसले Science?

उ०—पदार्थविज्ञान ज्योतिष व यंत्रशास्त्र.

प्र०—रसायन शास्त्र ? उ०—नाही.

प्र०—पिकरिक ॲसिड ? उ०—तो विषय मलाहि माहित नाही.

प्र०—पिकरिक ॲसिडचा उपयोग काय हे तुम्हाला माहित आहे काय ?

उ०—वर्तमानपत्रातून वाचला होता.

प्र०—परांजपे व तुम्ही नाशकास केव्हा एकत्र होता काय ? ( मजकूर वाचून दाखविल्यावर ) उ०—होय.

प्र०—तुमच्या समक्ष विलायती कापडाची तेथे होळी केली ? उ०—होय.

प्र०—सर्व देशभर होळ्या केल्या काय ? उ०—नाही.

डार्लिंग—टिळक व परांजपे यांच्या नाशकाच्या मुक्कामाच्या वर्णनात 'काली' हा शब्द आला आहे ती काली म्हणजे काय ?

उ०—काली ही शंकराची पत्नी.

प्र०—दोन्ही विध्वंसाच्या देवता ना ? उ०—होय.

कार्सन—एक विध्वंसाचा राजा व दुसरी विध्वंसाची राणी !

## दिवस तिसरा—( ३१ जानेवारी १९१९ )

प्र०—मॅझिनीचे एक चरित्र त्याच्या कर्त्याने तुम्हाला व परांजप्याना मिळून अर्पण केले होते काय ? उ०—होय.

प्र०—तुम्ही केसरीचे संपादक असता त्या ग्रंथाचे परीक्षण तुम्ही केसरीत केले होते ? उ०—होय. केसरीत परीक्षण आलेले आहे. पण ते मी लिहिलेले नाही. ते छापून झाल्यावर मी पाहिले.

प्र०—लाला लजपतराय ह्यांची व तुमची ओळख होती काय ? उ०—होय.

प्र०—त्याना हद्दपार केले होते काय ? उ०—होय.

प्र०—कशाकरितां ? उ०—राजद्रोहाकरिता.

प्र०—लोकमान्य म्हणजे काय ? उ०—लोक ज्याला मान देतात तो.

प्र०—सावरकरानी हे पुस्तक तुम्हाला अर्पण केले काय ?

सायमन—प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय टिळकाना काय सांगता येईल ?

डार्लिंग—पुस्तकावर दोघा सावरकरांची नावे आहेत.

प्र०—ह्या दोघा बंधूंची माहिती तुम्हाला होती काय ? उ०—थोडीशी होती.

प्र०—त्याना काळ्या पाण्याची शिक्षा झाली काय ? उ०—झाली असे मला सुटून आल्यावर समजले.

प्र०—मॅझिनीचे पुस्तक वाचून कान्हेरे याला खून करावासा वाटला काय ? उ०—ते खरे की खोटे मी कसे सांगू ?

कार्सन—मी ह्या पुस्तकातील वाचून दाखवितो तो भाग ऐका.

सायमन—माझी ह्याला हरकत आहे. वाटेल त्या पुस्तकातील भाग वाचून दाखवून काय उपयोग ?

कार्सन—ह्या पुस्तकाची शिफारस केसरीच्या वाचकाना टिळकानी केली म्हणून. ते पुस्तक वाचले असे कान्हेरे सांगतो म्हणून ! व हे पुस्तक त्याना अर्पण केले आहे म्हणून !

डार्लिंग—पण म्हणून काय झाले ? परवानगीने व परवानगीशिवाय अशी पुष्कळ पुस्तके कोणी कोणाला अर्पण करितात. पुस्तक अर्पण केले म्हणजे पुस्तकातील विचार ज्याला ते अर्पण केले त्याचे होते असे होत नाही अशी टिळकांची तक्रार आहे त्याचे काय ?

कार्सन—पण त्यानी त्याची शिफारस केली होती.

डार्लिंग—पण मला वाटते हा तुमचा प्रश्न मर्यादेच्या बाहेर जातो. तुम्ही हा विचारू नये.

प्र०—बॉंब गोळ्यावर लेख लिहिण्याच्या आधी तुम्ही हे पुस्तक वाचले होते काय ? उ०—या पुस्तकाचा काय संबंध व जरूरी तरी ? मॅझिनीचे इंग्रजी चरित्र मी पूर्वी कधी वाचले होते. शिवाय बॉंब गोळ्यावरचे लेख स्वतः मी लिहिले नव्हते.

प्र०—ह्या पुस्तकावर केसरीने टीका केली होती काय ? उ०—माझ्या स्मरणात नाही.

डार्लिंग—तुमच्या चालू प्रश्नातील किती विचारू द्यावे किती न द्यावे हे थोडे भानगडीचे आहे. उ०—मी भानगड न होऊ देता खुलासा करितो. दोन्ही सावरकर बंधूंना तुम्ही बेकायदेशीर मार्गांनी जाऊ नका असाच उपदेश मी करीत होतो.

प्र०—मग ते भयंकर लोक होते हे तुम्हाला माहित होते ? उ०—भयंकरच नव्हे पण तापट होते.

प्र०—आणि बेकायदा वर्तन करण्याचाहि संभव ? उ०—होय.

प्र०—'बंगाली बंधूनो भले केले' असे तुम्ही १९०८ साली लिहिले आहे. तर 'भले' म्हणजे काय ? उ०—स्वदेशी चळवळ हाती घेतली हे.

प्र०—'बंगाली लोकानी राजद्रोहाचे गुन्हे केले,' हे भले केले काय ? उ०—तसे नव्हे. खोटे खटले त्यांच्यावर झाले असता त्यानी धैर्याने आपला बचाव केला हे. कारण पूर्वी त्याना लोक भ्याड व भित्रे म्हणत असत.

प्र०—रावण म्हणजे काय ? उ०—तो एक अनार्य राक्षस होता.

प्र०—राम हा कोण ? उ०—तो एक आर्यन देवाचा अवतार होता.

प्र०—एखाद्याला कायदा चांगला वाटला नाही तर त्याने तो मोडावा की नाही ? उ०—मोडावा. पण शिक्षा निमुटपणे सोसावी. ह्याचेच नाव **Passive resistance.**

प्र०—*गोरे अधिकारी म्हणजे सरकार असेच नव्हे काय ? उ०—त्यात मी भेद करितो.*

प्र०—पण सरकार म्हटले म्हणजे त्यांचे अधिकारी असणारच ? मग सरकार व अधिकारी यात काय भेद ? उ०—भेद अलबत आहे. का नाही ? एका घरात अनेक खोल्या असतात. म्हणून काही एक एक खोली म्हणजे घर नव्हे !

डार्लिंग—बंगाली लोकाना तुम्ही वानरे किंवा माकडे म्हटले काय ?

प्र०—त्याना माकडे म्हटले नाही. पण वानरानी पूर्वी रामायणात पराक्रम केला त्याचा मात्र मी दाखला दिला होता.

प्र०—गोरे अधिकारी गरीब बिचाऱ्या लोकाना पायाखाली तुडवितात असे तुम्ही लिहिले काय ? उ०—होय.

प्र०—हिंदुस्थानचे स्वराज्य तुम्ही मागितले काय ? उ०—हिंदुस्थानचे नाही ब्रिटिश साम्राज्यातले.

प्र०—पंजाबात तुरुंगात गेलेल्या लोकांची स्तुति तुम्ही केली काय ? उ०—होय.

कार्सन—आता ह्या लेखाकडे पाहा.

सायमन—त्याना काळातले लेख दाखविता तसा टाइम्सही दाखवा. दोहोशी ह्यांचा संबंध तितकाच. ( येथे काळ पत्रातील काही लेख खुणा करून न्या. डार्लिंग ह्यानी टिळकाना आपल्याशी वाचावयास दिले ).

प्र०—ते वाचून सांगा. पिंडीदास दिनानाथ ह्याना शिक्षा झाली होती की नाही?

सायमन—त्याला माझी हरकत आहे.

प्र०—आता सायमनसाहेब आणखी काय काय सोंगे आणणार कोणास ठाऊक ?

सायमन—अहो उगीच रागावण्यात काय अर्थ ?

कार्सन—मी रागावलेलो नाही व तसे म्हणण्याचा तुम्हाला अधिकार नाही.

डार्लिंग—पण तुम्ही दोघे मला उद्देशून बोलणार की एकमेकाना ?

सायमन—मी हरकत घेईन तेव्हा ह्यानी गप्प बसले पाहिजे.

कार्सन—होय मी गप्प बसतच होतो.

डार्लिंग—तर मग आता फिरून गप्प बसा पाहू.

सायमन—माझे म्हणणे इतकेच होते की ज्यूरीला ऐकू जाईल अशा रीतीने उपहासाचे शब्द एका वकिलाने दुसऱ्या वकिलाला बोलू नये.

डार्लिंग—पण बुवा मी तरी काही ते शब्द ऐकले नाहीत !

कार्सन—बरे यापुढे मी तुम्हाला आमचे नेक नामदार स्नेही असे म्हणत जाईन मग तरी झाले ना ?

प्र०—पंजाबातील काही लोकानी राजनिष्ठेचा जाहीरनामा काढला त्यामुळे पंजाबची अब्रू गेली असे तुम्ही म्हटले ? उ०—लोकाना शब्दशः पसंत नसता अशा गोष्टी लिहवून अधिकारी जाहीरनामा काढवितात आणि काही भले लोक

त्यावर सह्या करण्याला तयार होतात आणि हे सगळे अधिकाऱ्यांची कारवाई असते म्हणून घडते.

प्र०—तुम्ही राजनिष्ठ आहा की नाही ? उ०—बादशहा व साम्राज्य ह्यांच्या संबंधाने मी राजनिष्ठ आहे.

प्र०—मग त्यानी सह्या केल्या त्यात काय चुकले ? उ०—अधिकाऱ्यांच्या कारवाईला बळी पडले म्हणून ! मनांत नसलेल्या गोष्टीवर सह्या करणे ह्यात काय अर्थ ?

प्र०—मग काय त्यानी अराजनिष्ठ व्हावयाचे ? उ०—जुलमाला प्रतिकार करावयाचा.

प्र०—सरकारच्या जुलुमाला ? उ०—नाही अधिकाऱ्यांच्या जुलुमाला.

प्र०—कसेहि असले तरी तो राजनिष्ठेचाच जाहीरनामा ना ? उ०—जुलूम होत असता तो होत नाही असे दाखविण्याकरिताच तो जाहीरनामा काढला म्हणून वाईट ! हिंदुस्थानात अशा वेळी असे जाहीरनामे काढणे योग्य नव्हते.

प्र०—तुम्ही स्वतः असे कधी करणार नाही काय ? उ०—मी असे कधी केले नाही व मला ते आवडतहि नाही.

प्र०—पण अराजनिष्ठेबद्दल तुम्हाला दोनदा शिक्षा झाली आहे ? उ०—कोर्टाने शिक्षा दिली म्हणून मी काय खरा गुन्हेगार की काय ?

प्र०—'लोकानी स्वराज्याचे हक्क मिळविण्याकरिता जिवाचीहि परवा केली नाही.' या लेखाला तुमची संमति होती काय ? उ०—होय. निःशस्त्र प्रतिकाराने ही गोष्ट केली तर त्याला माझी संमति होती.

प्र०—लोकानी कायदा मोडला तरी तुम्ही असे म्हणणार काय ? उ०—असे केल्याशिवाय वाईट कायदा रद्द होऊ शकत नाही.

प्र०—ह्या एका खटल्यात पाल यानी पुरावा देण्याचे नाकारले. त्यावेळी तुम्ही त्याना बरे म्हटले की नाही ? उ०—तो खटला सार्वजनिक स्वरूपाचा होता म्हणून मी तसे म्हटले.

प्र०—मग कोणत्याही सार्वजनिक खटल्यात पुरावा देऊ नये असे तुमचे म्हणणे की नाही ? उ०—हे ज्याचे त्यानेच ठरवावयाचे असते.

प्र०—ह्या खटल्यात तुम्ही ती गोष्ट पसंत केली काय ? उ०—होय. त्यास तशीच कारणे होती म्हणून.

प्र०—साक्षीदाराने खोटे सांगितले तरी चालेल ? उ०—त्यानी वाटेल तर गप्प बसावे व त्याचा परिणाम सोसावा.

डार्लिंग—पॅस्कल ह्याच्या सुप्रसिद्ध पत्रात एकच गोष्ट अनेक रीतीनी कशी करिता येते हे दाखविले आहे !

प्र०—हे वाचून पुण्यातील लोकावर काय परिणाम होईल ? उ०—पुण्याचा यात काय संबंध ?

प्र०—अधिकाऱ्यांचा हुकूम जुमानू नये ज्यूरी व जज्ज यांचा निकाल मानू नये अशी तुमची शिकवण होती काय ? उ०—नाही.

प्र०—वर्तमान पत्रात लेख लिहिणाराचे नाव सांगू नये असे तुमचे मत होते काय ? उ०—होय. टाईम्स पत्रानेहि एक वेळ तसे केले होते.

प्र०—काळ्या लोकाना न्याय मिळत नाही असे तुम्ही म्हटले काय ? उ०—काळ्या गोऱ्यांच्या वादात काळ्याना न्याय मिळत नाही असे माझे मत होते. गोऱ्याला ५० रुपये दंड होतो. त्याच गोष्टीकरिता काळ्याला सहा महिन्यांची शिक्षा होते हे मी दाखविले आहे.

प्र०—न्यायदानाविरुद्ध तक्रारी करणे म्हणजे लोकाना अधिकाऱ्याविरुद्ध चिथावणे होते की नाही ? उ०—नाही. तसे होते म्हटले तर कोणत्याहि न्यायाविरुद्ध तक्रार करणेच गैर होईल.

डार्लिंग- पण टाईम्सकारानी नकार अंगिकारला तरी शेवटी तार दाखल केलीच की नाही ?

प्र०— किंग्जफर्ड मॅजिस्ट्रेटला तुम्ही नावे ठेविली त्यावेळी बॉंब उडत होते की नाही ? आणि ते उडण्यात धोका होता की नाही ? उ०—तिकडील वर्तमान पत्रावरून तसे दिसत होते.

प्र०—बॉंबचा धोका तुम्हाला कळत होता की नाही ? उ०—सर्वानाच कळत होता.

प्र०—पण तुम्ही मोठे बुद्धिवान आहा ? उ०—माझ्यासारखे बुद्धिवान हिंदुस्थानात शेकडो आहेत.

प्र०— तुमच्यावर ह्या बाबतीत मोठी जबाबदारी होती की नाही ? उ०—होय.

प्र०—बॉंबगोळ्याच्या गुन्हेगाराची तुम्ही स्तुति केली नाही काय ? उ०—नाही. मी या लेखात निरनिराळ्या गुन्हेगारांची तुलना करीत होतो.

प्र०—'बॉंबगोळ्याचे रहस्य' या लेखाबद्दल तुम्ही जबाबदार आहात की नाही ? उ०—संपादक म्हणून मी जबाबदार आहे. पण तो लेख मी लिहिलेला नाही. अराजकाचा सिद्धांत काय असतो एवढेच त्यात सांगितले होते.

प्र०—रँडसाहेबाना तुम्ही नावे ठेविली ? उ०—होय. मी त्यांच्यावर टीका करीत होतो व त्याच वेळी त्याना मदतहि करीत होतो.

प्र०—रँडसाहेब दुर्मुखलेले होते नाही ? उ०—होय मला ते तसे दिसत.

प्र०—प्लेगच्या व्यवस्थेत त्यानी जुलूम केला म्हणून त्यांचा खून झाला असेच तुमचे मत ना ? उ०—होय.

प्र०—बरे, बंगालची फाळणी म्हणजे काय? उ०—एका राष्ट्राची दोन शकले करणे.

प्र०—ह्या फाळणीमुळे बॉंब निर्माण झाले काय? उ०—होय. फाळणीच्या तक्रारीमुळे.

प्र०—आणि तक्रारी होत्या म्हणून बॉम्ब योग्य होते? उ०—बॉम्ब हा तक्रारीचा परिणाम. पण झाले ते योग्य असे मात्र नव्हे.

प्र०—सैन्य आणि आरमार यांचेशी लढणे म्हणजे काय? उ०—युद्ध बंड असा त्याचा अर्थ होईल.

प्र०—भौतिक शास्त्राने सैन्याला जी सत्ता येते तिचा नाश बॉम्बगोळ्याने करिता येतो याचा अर्थ काय? उ०—एकाच शास्त्राचे ज्ञान दुसऱ्यालाहि असले म्हणजे ते त्याचे त्याजवर उलट चालविता येते हाच त्याचा अर्थ.

प्र०—सोजीर लोक घरात शिरले व बायकांची बेअब्रू केली तर त्यांचेवर बॉम्ब फेकावे? उ०—सामान्य राज्यव्यवस्थेशी त्याचा संबंध नाही. राष्ट्राराष्ट्राच्या युद्धासंबंधाने ते लिहिलेले होते. इंग्रजी वर्तमानपत्रातहि असल्या गोष्टी दिल्या आहेत.

प्र०—खून झाला म्हणूनच तक्रारी मिटल्या आणि प्लेग व्यवस्थेत फरक पडले? उ०—नाही. व्यवस्थेत फरक झाले ते पुढे कमिशन नेमल्याने.

प्र०—रँडचा खून हे अराजकाचे कृत्य म्हणावयाचे काय? उ०—होय.

प्र०—मग अराजक कृत्य करून राज्य मिळवावे असे तुमचे मत? उ०—नाही. अशा गोष्टींचा उपदेश मी केव्हाच केला नाही.

डार्लिंग—खून झाल्यापासून या गोष्टी थांबल्या. याचा अर्थ खुनामुळे असा की नाही?

उ०—तेव्हापासून याचा अर्थ कार्यकारण भावाचा नाही. तेव्हापासून हे शब्द फक्त कालदर्शक आहेत.

प्र०—अधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्याला खून एवढाच उपाय आहे काय? उ०—त्या लिहिण्याचा तसा अर्थ नाही.

प्र०—इंग्रजी वर्तमानपत्राना तुम्ही Blaggards हे विशेषण लाविले आहे की नाही? उ०—होय. पण तो त्यांचा त्यानाच परत आहेर केला.

प्र०—असले वृथा दोषारोप इंग्रजी पत्रे करितात काय? उ०—होय. खुद्द टाईम्स ऑफ इंडियाने मजवर १८९७ साली केला होता.

प्र०—टाइम्स पत्रावर तुम्ही इलाज केला होता काय? उ०—ह्या प्रसंगी असला इलाज करण्याकरिता मी मुंबईस गेलो होतो. पण मला त्याच दिवशी पकडण्यात आले.

प्र०—मागाहूनहि इलाज केला नाहीत? उ०—तुरुंगात कसा करू? सुटून आल्यावर केला.

प्र०—तुमच्यावरील टीका १८९७ त आणि इलाज १८९९ त ? उ०—पण इलाज केला तो १८९७ तील लेखाकरिता आणि फिरून त्यानी तसाच लेख लिहिला होता म्हणून.

प्र०—टाइम्सनी मागितलेली माफी तुमचेजवळ आहे काय ? उ०—होय.

प्र०—बॉंबबद्दल सरकार जबाबदार आहे असे तुम्ही म्हटले काय ? उ०—जुलुमामुळे लोक निराश होतात आणि निराशेमुळे बॉंब होतात असे म्हटले आहे.

प्र०—इंग्रजसरकार लष्करी सत्तेने मदांध झाले म्हणून बॉंब पुढे आले असे तुम्ही म्हटले काय ? उ०—होय. तो स्वाभाविक परिणाम झाला असे म्हटले.

सायमन—टाइम्सने टिळकांची मागितलेली माफी ही येथे आहे.

कार्सन—त्या प्रकरणात तुम्हाला येथे शिरावयाचे आहे काय ?

सायमन—मघाशी तिचा उल्लेख आला होता म्हणून मी ती हजर केली.

प्र०—'देशाचे दुर्दैव' हा लेख पहा. गोऱ्या अधिकाऱ्यांच्या जुलुमामुळे आणि दुराग्रहामुळे बॉंब होतात असे तुम्ही लोकास शिकविले काय ?उ०—ते माझे मत मी सांगितले. लोकास तसे करण्यास शिकविले नाही.

प्र०—तुम्ही बॉंबगोळ्याची संभावना केली ? समर्थन केले ? उ०—समर्थन केले नाही. झाली दिसली गोष्ट सांगितली. एकामागून एक गोष्टी घडत आल्या त्याच मी सांगितल्या.

प्र०—रशियात हिंदुस्थानापेक्षा बॉंब उडविण्याला कमी सबब होती असे तुम्ही सांगितले काय ? उ०—मी इतकेच दर्शविले की हिंदुस्थानात परकी राज्य तसे आहे. रशियात त्या देशातील लोकांची सत्ता आहे पण अनियंत्रित आहे इतकेच. निरनिराळ्या देशात निरनिराळ्या परिस्थितीत अत्याचार कसे झाले याची कार्यकारणमीमांसा मी या लेखात सांगितली होती. त्यात राज्यकर्त्यांनी बोध घेण्याची जशी मी सूचना केली तशीच अत्याचारी लोकानाहि पण त्यांच्या कृत्याच्या परिणामाचा बोध घेण्याची सूचना केली होती.

प्र०—जुलमी सरकाराविषयी तुम्ही लिहिलेत त्यात इंग्रजी राज्याचा समावेश होतो काय ? उ०—सगळ्याच जुलमी राज्यांचा समावेश होतो. परंतु कोणाचा उल्लेख विशेष अभिप्रेत आहे हे परिस्थितीवरून ओळखावयाचे असते. ब्रिटिश अधिकारी जेव्हा तशी सत्ता गाजवित असतील तेव्हा त्यानाहि तो लागू म्हणता येईल. मागची पुढची वाक्ये पाहिली म्हणजे कळून येते. लोकासंबंधी लिहिताना मी आयरिश लोकांचेहि उदाहरण दिले आहे.

कार्सन—ते असो म्हणा. येथे काही आम्ही आयरिश राष्ट्राचा न्याय करावयास बसलो नाही.

प्र०—बंगालच्या फाळणीमुळे बॉंब उडाले काय ? उ०—होय. तुमच्या आयर्लंड आलस्टरमध्ये झाले तसेच इकडे झाले.

प्र०—अलस्टरबद्दल तुम्ही बोलू नका. अलस्टर आपली काळजी घेण्यास समर्थ आहे. असल्या व्यक्तिविषयक गोष्टी पुढे काढून तुम्हाला काही फायदा मिळेल असे वाटते काय? उ०—मी व्यक्तिविषयक बोलत नाही. पण जे लेख तुम्ही वाचले त्यात आयर्लंडचे नाव आहे म्हणून मी ते सांगितले.

प्र०—अत्याचार म्हणजे काय? उ०—त्यात बॉंबहि येतात इतर गोष्टीहि येतात.

प्र०—निःशस्त्रप्रतिकारात बॉंब येतात काय? उ०—नाही.

प्र०—बंगाली लोकाना अराजक म्हटले ते खोटे काय? उ०—सर्व समाजाबद्दल लिहिले म्हणून ते तेवढे खोटे.

प्र०—बॉंब फेकणे हा देशाभिमानाचा फक्त अतिरेक असेच तुमचे म्हणणे काय? उ०—नाही.

प्र०—देशाभिमानाचा अतिरेक झाला की नाही हे कोण ठरविणार? उ०—राष्ट्र ठरवते.

प्र०—बंगाली लोक अराजक नाहीत पण त्यानी फक्त अराजकांची साधने उपयोगात आणली इतकाच फरक असे तुम्ही लिहिले. पण त्यात फरक नाही काय? उ०—नाही.

डार्लिंग—खरेच फरक नाही! म्हणजे सुरी तीच. तिने खाण्याचे पदार्थ कापायचे की गळे कापायचे! इतकाच फरक की नाही?

प्र०—जॅकसनचा खून करणारे लोक तरुण होते की प्रौढ होते? उ०—त्यांची वये मला माहित नाहीत. त्यातील एक पदवीधर होता.

प्र०—ते सर्व तुमच्या जातीचेच होते की काय? उ०—मला माहीत नाही. काही असतील.

प्र०—तुम्ही चित्पावन जातीचे पुढारी नाही काय? उ०—असलो तर निरनिराळ्या जातींचा असेन. एकस्या चित्पावनांचा नव्हे.

प्र०—ते सगळे ब्राह्मणच नव्हते काय? उ०—माहीत नाही. पण ब्राह्मणावर असा कटाक्ष रोखणे हे सडक्या मेंदूचे लक्षण होय!

प्र०—पण हे शब्द न्या. दावर ह्यानी तुमच्याबद्दल वापरले आहेत? उ०—एखादा शब्द न्यायमूर्तींनी वापरला असला म्हणजे तो चूक असू नये की काय? सवड असती तर तेथेच योग्य उत्तर दिले असते.

डार्लिंग—झाले. तीच गोष्ट १०० वेळा आली. आता हा मुद्दा पुरे झाला नाही काय?

प्र०—इंग्रज हे मोंगलासारखेच आहेत असे तुम्ही लिहिले काय? उ०—होय.

प्र०—मोंगल हे जुलमी राजे होते? उ०—होय.

प्र०—ब्रिटिश राज्य म्हणजे सरकारच की नाही? उ०—होय.

प्र०—त्यात एक किंवा अनेक अधिकारी आहेत असा अर्थ होतो काय ? उ०—नाही.

प्र०—बाँबला ज्ञानाचे स्वरूप अधिक असते ह्याचा अर्थ काय ? उ०—मूर्त स्वरूप दाखवून देता येते. ज्ञान दाखवून देता येत नाही.

प्र०—म्हणजे ते अदृश्य असते असेच ना ? उ०—होय.

प्र०—बाँबला ज्ञान म्हणणे म्हणजे ती शिकविण्याची गोष्ट असेच की नाही? उ०—तसा त्याचा अर्थ होत नाही.

डार्लिंग—एकंदर अर्थ असा दिसतो की बाँब ही वस्तु हुडकून काढण्याला कठीण. मोठ्या कारखान्यात तयार झालेल्या वस्तुसारखी ती नाही.

प्र०—बाँब करणे सोपे आहे ? उ०—होय. फारच सोपे. त्याला फार पैसे लागत नाहीत. श्रम लागत नाहीत. हुडकून काढण्याला तो कठीण असतो.

प्र०—म्हणजे काय ? उ०—म्हणजे तो देशातून नाहीसा करायला कठीण.

प्र०—म्हणजे काय ? उ०—म्हणजे सरकारने अधिक काळजी घेतली पाहिजे.

प्र०—हे तुम्ही सरकारच्या हिताकरिता म्हणून लिहिले काय ? उ०—लोकांच्या हिताकरिता म्हणून लिहिले व सरकारला असे असे आहे म्हणून असे असे करा असा उपदेश केला. बाँब हे रोगाचे लक्षण आहे असे मी सांगितले. झाडाला वरवर उपचार करून भागत नाही. त्याच्या मुळाशी उपचार करावा लागतो हे सांगण्याचा माझा हेतू.

प्र०—सरकारला बाँबविरुद्ध इलाज करिता येणार नाहीत असे तुमचे मत होते काय ? उ०—इलाज करिता येईल. पण त्याबरोबरच लोकामध्ये संतोष निर्माण न केला तर तो इलाज करणे अवघड इतकेच मला सांगावयाचे होते.

प्र०—सरकारने नमावे नाही तर बाँब घ्यावे याहून दुसरा उपाय तुम्ही काही सुचविला काय ? उ०—होय. इतर अनेक उपाय आहेत. स्फोटक द्रव्याचा कायदा हा एक इलाज. पण त्याबरोबरच लोकांचे दुःख निवारण करणे हा दुसरा.

प्र०—म्हणजे सरकारने पडते घ्यावे असेच की नाही ? उ०—नेहमी पडते घ्यावे असेहि नाही. सरकार प्रबल व शक्तिवान् आहे पण सरकारने प्रजेचा संतोषहि राखला पाहिजे.

प्र०—पण स्वराज्य देऊं नये असे सरकारला वाटले तर ? उ०—ती त्यांची चूक होईल. लोक व सरकार यांचे वैमनस्य होईल.

प्र०—म्हणजे बाँब उडत राहतील ? उ०—बाँब उडत राहतील असा अर्थ नाही. असंतोष मात्र पसरत राहील येवढे खरे.

प्र०—हिंदुस्थानात किती जाती आहेत ? उ०—सुमारे २०० असतील.

प्र०—ह्यातील कोणाला स्वराज्य द्यावयाचे ? उ०—सगळ्या जातीना मिळून.

प्र०—सगळ्या जातींचे एकमत झाले म्हणजे बॉंब उडणार नाहीत ? उ०—सगळ्या जाती एक झाल्या तथापि अनियंत्रित जुलुम होईल तरीही बॉंब उडत राहतीलच.

प्र०—एकाद्या कोणाचा असंतोष झाला म्हणजे त्याने बेलाशक बॉंब फेकावे काय ? उ०—सगळ्या राष्ट्राच्या असंतोषाची गोष्ट आम्ही बोलतो.

प्र०—मग व्यक्तिशः कोणाला बॉंब फेकण्याचा अधिकार आहे की नाही ? उ०—व्यक्तिकरिता कोणालाहि बॉंब फेंकण्याचा अधिकार नाही.

प्र०—सुराज्य झाले म्हणजे आमचे भागले असे म्हणणारा एखादा वर्ग हिंदुस्थानात होता की नाही ? उ०—हो आहे. नसायला काय झाले ?

प्र०—त्याना इंग्रजी राज्य हे दास्य न वाटेल तर त्यानी स्वराज्य का मागावे ? उ०—दास्य हा शब्द बरोबर नाही. गुलामगिरी असा मूळच्या शब्दाचा अर्थ नाही.

प्र०—राजद्रोहात्मक भाषणामुळे बॉंब होऊ लागले असे कित्येक लोक म्हणत की नाही ? उ०—होय. तसे काही म्हणत.

सायमन—पण त्याचे कारण असे की टिळकानीच केव्हा एखादे वेळी तसे लिहिले होते असे नाही. हे नित्यच सुरू होते.

डार्लिंग—अनेकदा म्हटले तरी खरा अर्थ काय हाच प्रश्न आहे.

प्र०—न्या. दावर तुमच्या संबंधाने बोलले ते ह्या लेखाना उद्देशून ना ? उ०—होय.

कार्सन—मी आता टिळकाना 'राष्ट्रमत' 'काळ' व 'केसरी' ह्यातील लेखासंबंधी विचारणार आहे. तरी ते प्रश्न मला विचारता येतील का नाही या विषयी कोर्टाने मला निकाल द्यावा. राष्ट्रमत काळ व केसरी या सर्वांचा कट होता असे माझे म्हणणे.

डार्लिंग—तसे करिता येणार नाही. कट होता हे आधी सिद्ध केलेत तर त्या कटाला अनुसरून ही तीन पत्रे एकमताने लिहित होती हे तुम्हाला दाखविता येईल. पण अजून तसे सिद्ध झालेले नाही.

कार्सन—पण ही तीन पत्रे एकंदरीने टिळकांचेच मत प्रतिपादन करणारी होती की नाही हे अखेर ज्यूरी ठरविणार आहे.

डार्लिंग—पण आधी पुरावा होईल तर मग त्याविषयी ज्यूरी ठरविणार. म्हणून मला त्या दोन पत्रातील उतारे वाचून प्रश्न विचारण्याची तुम्हाला परनगी देता येत नाही.

स्पेन्स—मी थोडेसे ह्यात बोलू का ?

डार्लिंग—आधीच निकाल तुमच्यातर्फे दिला तरी बोलणारच का ?

स्पेन्स—मला इतकेच म्हणावयाचे होते की कैफियतीत किंवा कमिशनपुढे पुरावा घेतला त्यात प्रतिवादीने ह्या कटासंबंधाने एक अक्षरहि काढले नव्हते.

डार्लिंग—होय. पुरावा दाखल करिताना ती गोष्ट करावयाला पाहिजे होती.

स्पेन्स—म्हणून माझे म्हणणे असे की ज्यूरीच्या कानावर असे निराधार खोटे उद्गार जाऊ देऊ नयेत.

कार्सन—पण माझे म्हणणे कोर्ट ऐकून घेईल की नाही ?

डार्लिंग—तक्रार मी ऐकली आहे व मी निकालहि दिला आहे.

कार्सन—ठीक. आणि मीही तो आदरपूर्वक स्वीकारला आहे.

प्र० तुमच्यावर अगदी प्रथम एक बेअब्रूचा खटला झाला होता ? उ०—होय.

प्र० त्यात कोणी एका कारभाऱ्याने धन्याला विष घातल्याचा आरोप तुम्ही केला होता काय ? उ०—नाही. त्याला वेड लावण्याचा व त्यामुळे त्याने विष घेण्याचा प्रयत्न करण्याचा तो आरोप होता.

प्र०—ह्या खटल्यात तुम्हाला शिक्षा झाली ? उ०—होय चार महिन्यांची झाली.

प्र० फिरून थोडे मागे जाऊन विचारतो. न्या. दावर ह्यांच्या निकालावर तुम्ही अपील केले काय? उ०—होय. प्रथम हायकोर्टाकडे नंतर प्रिव्ही कौंसिलकडे.

डार्लिंग दोन्ही कोर्टांनी तुमच्याविरुद्ध निकाल दिला ?

उ०—होय. तसेच होते.

प्र० १८९७ साली तुमच्यावर खटला झाला त्यावेळी तुमच्यावर राजद्रोहाचा आरोप होताना ? उ०—होय.

डार्लिंग—ह्या खटल्यात ज्यूरी होती काय ?

उ०—होय.

प्र०—त्यात सगळे युरोपिअन होते काय ? उ०—सहा युरोपिअन होते तीन हिंदी होते. सहांनी माझ्याविरुद्ध निकाल दिला. तिघांनी माझ्यातर्फे दिला. हिंदुस्थानातील कायद्याप्रमाणे कोर्टाला बहुमताचा निकाल मान्य करिता येतो. [ येथे कोर्टातील लोक मोठ्याने हसले. ]

कार्सन—कोर्टाच्या मागील बाजूचे लोक हसले ते टिळकांचे पक्षपाती असावेत. पण हसणे हा संभावितपणा नव्हे व प्रश्नोत्तरात काही हसण्यासारखे नव्हतेहि.

डार्लिंग—एकदा मी ताकीद दिली आहे. पुन्हा तसे घडले तर लोकाना कोर्टातून घालवून द्यावे लागेल.

प्र०—१८९७त पुण्यात प्लेग फार होता ? उ०—होय.

प्र० प्लेगच्या बंदोबस्ताकरिता सरकारने गोरे शिपाई कामावर नेमले ? उ०—होय. पण तसे करणे अवश्य नव्हते असे माझे मत होते.

प्र०—पण तुम्ही काही सरकार नव्हता ? उ०—होय ते तर उघड आहे.

प्र०—अशा स्थितीत लोकांचा मनःक्षोभ करू नये अशी जबाबदारी तुमच्यावर नव्हती काय ? उ०—मी मनःक्षोभ केला नाही. उलट त्यांच्याबरोबर जाऊन

*तपासणीला मदत केली आणि प्लेगइस्पितळ काढले. स्वतः माझ्यावर जबाबदारी* काही नव्हती. तरी मी कामहि करीत होतो व मदतहि करीत होतो.

प्र०—तेव्हा दुष्काळहि होता? उ०—होय.

प्र०—त्यावेळी लोकाना तुम्ही चिथावले की नाही? उ०—नाही. सारावसुलीचे काही सरकारी नियम होते. ते लोकांच्या हिताचे असतात. सरकारने ते मराठीत प्रसिद्ध केले नाहीत म्हणून मी केले.

प्र०—मग तुम्ही फक्त नियम प्रसिद्ध करावयाचे होते? उ०—पूर्वीच्या अंकात ते म्हटलेच होते.

प्र०—मग 'वारांगनेव नृपनीति' असे म्हणण्याचे काय कारण? उ०—सरकारी धोरणाला ती संस्कृत उपमा साजली म्हणून दिली.

प्र०—पण ते शब्द संभावितपणाचे नव्हते? उ०—भाषांतरात तसे दिसते. पण मूळ संस्कृत तसे वाटत नाही. शाळातूनहि ते वाक्य शिकविले जात होते.

प्र०—सरकार एक बोलून एक करिते असे तुमचे म्हणणे? उ०—होय त्यानी पुष्कळ वेळा तसे केलेच होते.

प्र०—आणि हे इंग्रज लोकाबद्दल तुम्ही म्हणता? उ०—इंग्लंडातील इंग्रजाबद्दल म्हणत नाही. हिंदुस्थानातील इंग्रजाबद्दल म्हणतो.

प्र०—दुष्काळाला इंग्रज हे कारण असे तुम्ही म्हटले काय? उ०—नाही.

प्र०—मी फिरून ते विचारतो. उ०—मी फिरून नाही म्हणतो.

प्र०—रँड साहेबानी वाईच्या लोकाना शिक्षा अन्यायाने केली काय? उ०—होय.

प्र०—आणि हेच ते गृहस्थ असे तुम्ही पुण्याच्या लोकाना सांगितले? उ०—खरे सांगायला चोरी कसली?

प्र०—रँड साहेब दयामाया दाखविणारे नव्हते असे तुम्ही लिहिले? उ०—ते लोकमत धाब्यावर बसवून स्वतःच्या मनचेच करीत हे प्रसिद्ध होते.

प्र०—एखादी गोष्ट चूक असली तरीहि रँडसाहेब करीत? उ०—होय. आपल्याच म्हणण्याप्रमाणे ते करीत. ते अंमलदार होते आणि चांगलेच 'अंमलदार' होते.

प्र०—तुह्मी प्रत्येक गव्हर्नरला शिव्या देता काय? उ०—गव्हर्नर कोणी का असेना? प्रायः लोकाना अप्रिय व जुलुमाची गोष्ट घडली म्हणजे मी त्यावर टीका करितो.

प्र०—जुलुमाचे कृत्य ह्याचा अर्थ काय? उ०—लोकांच्या इच्छेविरुद्ध कृत्य. मला वर्तमानपत्रात लोकांचे मत मांडावयाचे असते.

प्र०—दरवडेखोराला पोलिसानी प्रतिबंध केला तर त्यानी लोकांच्या इच्छेविरुद्ध कृत्य केले असे म्हणावयाचे काय? उ०—असले कृत्य लोकांच्या इच्छेविरुद्ध मुळी असतच नाही.

प्र०—इंग्रज हिंदुस्थानाला निरंतर ताबेदारीत ठेवतात काय? उ०—होय. तसे दिसते आणि तसे म्हणणे बरोबरहि आहे.

प्र०—अर्जदार लोकांचे हाल झाले असे तुम्ही लिहिले काय? उ०—होय. तसे लिहिले होते.

प्र० तुम्ही अशा गोष्टी स्वतः पाहिल्या काय? उ०—मी स्वतः सगळ्या गोष्टी कशा पाहणार? अर्जदार लोकाना त्रास झाला सारावसुली कडक झाली ह्या गोष्टी प्रसिद्धच होत्या.

प्र०—आणि असे लोकाना सांगितल्याने ते बिथरणार नाहीत काय? उ०—लोकाना सरकारपासून मदत काय मिळते न मिळते हे सांगणे प्राप्तच आहे.

प्र०—पण ही गोष्ट लहान नव्हती जोखमीची होती? उ०—नसली म्हणून काय झाले? आहे ते जगापुढे मांडलेच पाहिजे.

प्र०—दुष्काळी कारभारात सरकारचा कट होता असे तुम्ही म्हटले ते कशा-वरून? उ०—फॅमिन कोडात काही गोष्टी स्पष्ट लिहिलेल्या असता गव्हर्नर साहेबांच्या सगळ्या कौंसिलाने एकमताने त्याला विरोधी वर्तन केले म्हणून तो शब्द घातला.

सायमन—दुष्काळातील खटल्यांचा तुम्ही उल्लेख केला. पण पुढे वाचलेत म्हणजे निरपराधी लोकावर खटले झाले होते हे दिसून येईल.

डार्लिंग—थोडक्यातच आहे. वाचून टाका.

प्र०—शिक्षा करण्यासारख्या नसता मॅजिस्ट्रेटनी त्या केल्या असे तुमचे म्हणणे? उ०—होय. मी मॅजिस्ट्रेटपुढे तक्रारीच्या वेळी हजर होतो. मॅजिस्ट्रेटनी सरकारची बाजू संभाळण्याचा आणि आरोपीला दोषी ठरविण्याचा हरप्रयत्न केला पण तो साधला नाही.

## दिवस चवथा—( १२ फेब्रुवारी १९१९ )

डार्लिंग—आज एक ज्यूरर आजारी आहे. तो येऊ शकत नाही. तुम्हाला ११ चालतील काय?

कार्सन व स्पेन्स—होय.

डार्लिंग—ठीक आहे. तर मग उलट तपासणी पुढे चालू द्या.

प्र०—पेन्सिलने ह्या लेखावर मी खुणा केल्या आहेत. त्यासंबंधाने तुम्ही फिर्या-दीत तक्रार केली नाही? उ०—फिर्यादीत केली नाही. पण त्याला माझी हरकत आहे.

प्र०—ज्या ओळी तक्रार न करिता तुम्ही सोडल्या त्या तुम्हाला मान्य आहेत? उ०—मान्य नाहीत. वकिलाच्या हातून त्या सुटल्या असतील.

प्र०—वकिलाना त्या सोडाव्याशा वाटल्या असतील? उ०—असेच काही नाही.

प्र०—'अत्याचाराचे उद्गार शिवाजीच्या तोंडी घातलेले लेख टिळकानी छापले' अशा त्या ओळी आहेत त्याबद्दल तुम्ही फिर्याद केलेली नाही? उ०—नाही.

प्र०—खुनी चाफेकर आणि तुम्ही यांचेमध्ये फक्त प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित केला गेला नाही असे लिहिले आहे ते खरे काय? उ०—ते शब्द तर खरेच आहेत. पण त्या शब्दातून लिहिणाराला जो इतर ध्वनि उमटवावयाचा होता तो खरा नाही.

प्र०—प्लेगची तपासणी हा सोर्जरांचा जुलूम असे तुम्ही वारंवार लिहिले नाही काय? उ०—होय.

प्र०—चाफेकरानी तेच म्हटले होते? उ०—असेल. जे होते तेच त्यानी म्हटले.

प्र०—जुलुमाच्या म्हणून हकिगती लिहिल्या त्या खऱ्या होत्या काय?

उ०—होय.

प्र०—रँड साहेबानी जुलूम केला असे तुमचे म्हणणे आहे काय? उ०—होय.

प्र०—तुम्ही वर्तमानपत्रात लिहिलेले सिद्धान्त वाचून मी खुनाला प्रवृत्त झालो असे चाफेकरानी म्हटल्याचे चिरोल साहेबानी लिहिले त्याबद्दल तुम्हाला किती नुकसान भरपाई पाहिजे. उ०—त्यानी तसे मुळी म्हटलेच नाही.

डार्लिंग—टिळक म्हणतात मी लिहिले ते माझे सिद्धान्त नव्हेत तर घडलेल्या हकिगती.

प्र०—पोलिस जुलूम करितात असे तुम्ही लिहिले काय? उ०—ज्या प्रकरणात ते लिहिले त्यात ते केले होते.

प्र०—कोणते जुलूम? उ०—खोटा पुरावा तयार करणे.

प्र०—पण तुम्ही न्यायाधीश होता की काय? उ०—मी न्यायाधीश नव्हतो. पण खटला चालू असताना हजर होतो. आणि पुरावा खोटा म्हणून न्यायाधीशाने आरोपीला त्या कामात सोडले.

प्र०—प्लेगच्या अस्वस्थतेच्या वेळी असे लिहिणे बरे काय? उ०—हे प्लेगच्या वेळी लिहिलेलेच नाही. भलते भलत्यालाच लावता?

प्र०—प्लेग नसताना लोकाना घरातून बाहेर काढीत असे तुमचे म्हणणे काय? उ०—प्लेग होताच. पण प्लेग असताना लोकाना घरातून बाहेर कसे काढावे यात फरक होताच की नाही? अधिकाऱ्यानी अधिक दयाबुद्धीने वागावयाला पाहिजे होते.

डार्लिंग—मला वाटते असा एक एक लेख घेऊन त्याचा अर्थ तसाच ना असे तुम्ही किती वेळ विचारीत बसणार? लेख वाचून दाखविले म्हणजे त्यावरून

चिरोल साहेबानी काढलेली अनुमाने बरोबर आहेत की नाही हे ज्यूरीला स्वतःच ठरविता येईल.

प्र०—सभा व विनंत्या ह्याना तुम्ही पोरखेळ म्हटले आहेना? उ०—होय. जेव्हा त्यांचा उपयोग नाही तेव्हा ते पोरखेळच.

प्र०— पण या पलीकडे काय करावयाला हवे होते? उ०—निःशस्त्र प्रतिकार.

प्र०—म्हणजे काय? उ०—स्वतः दुःख सोसून प्रतिकार करणे.

प्र०—स्वतः दुःख सोसण्याने प्रतिकार कसा होतो? उ०—धार्मिक भावनेने आपण दुःख सोसले म्हणजे इतरावर त्याचाहि परिणाम होतो असे धर्मग्रंथात सांगितले आहे.

प्र०—'दासानुदास' ह्या सहीने एक पत्र छापले आहे. दासानुदास ह्याचा अर्थ पायाखाली तुडविला गेलेला असा नाही काय? उ०—'your obedient servant' यात जितक्या अर्थाने खरा विनय घ्यावयाचा तितकाच 'दासपणा' 'दासानुदास' ह्या शब्दातून काढावयाचा. your obedient servant ह्याचेच ते मराठी आहे.

डार्लिंग सर एडवर्ड कार्सन तुम्ही स्वतः पार्लमेंटला कधी एखादा अर्ज पाठविला काय?

कार्सन— कधीच नाही. त्या अर्जाकडे कोणी ढुंकूनहि पाहात नाही.

डार्लिंग—अशा अर्जाच्या शेवटी "Your petitioners will ever pray" असे असते. पण त्याप्रमाणे ते नेहमी प्रार्थना करीत बसतात काय?

कार्सन—आपण म्हणता ते खरे आहे.

प्र०—केसरीतील पत्रव्यवहारातली मते तुम्हाला मान्य असतात की नाही? उ०— केव्हा असतात केव्हा नसतात. त्याचा अनुवाद केला तरच ती संमत समजावयाची असा नियम आहे.

प्र०—लोकांच्या तक्रारी खोट्या नव्हत्या काय? उ०—रँड साहेबांच्या टेबलावरील बुकात ४०० तक्रारी नोंदलेल्या मी पाहिल्या त्या सगळ्याच खोट्या होत्या की काय?

प्र०—लोकाना दंड करून खजिना भरता येईल अशी टीका तुम्ही केली ती का? उ०—ती विनोदी टीका होती. थट्टा होती.

प्र०—तुम्ही थट्टा केली असे ज्यूरीला सागता काय? उ०—होय सांगतो.

प्र०—प्लेगने दूषित वस्तू जाळाव्या की नाही? उ०—होय. पण वाटेल ती वस्तु?

प्र०—चापेकर व कान्हेरे दोघेहि चित्पावन होते? उ०—होय.

प्र०—मुसलमान अत्याचार करितात हिंदु करीत नाहीत असे तुम्ही म्हटले काय? उ०—होय. ते कधीच अत्याचार करीत नाहीत.

प्र०—रँड साहेबापेक्षा क्रॉफर्ड साहेब चांगला असे तुम्ही लिहिले ? उ०—होय. कारण क्रॉफर्ड साहेब लांच घेई पण निदान लांच घेऊन लोकांचे काम करी.

प्र०—रँडसाहेब गावातून हिंडत फिरत नव्हते काय ? उ०—होय. ते हिंडत फिरत व पाहात. पण ते आपले धोरण बदलीत नसत.

प्र०—त्याना करता आले तितके त्यानी केले की नाही ? उ०—पण तितकेहि करून लोकावर जुलूम झाला तर झाला म्हणू नये काय ?

प्र०—मग तर काय त्यानी तुमचेच ऐकावयाचे ? उ०—माझे नाही. पण लोकांचे ऐकले पाहिजे होते.

प्र०—कोणत्यातरी अधिकाऱ्याबद्दल तुम्ही चांगले लिहिले आहे काय ? उ०—जेव्हा चांगले करतात तेव्हा चांगले लिहितो. पार्लमेंटात जसा तुमचा ठराविक विरोधी पक्ष असतो अशीच आमची वर्तमानपत्रे हिंदुस्थानातहि आहेत. म्हणून त्यांच्याकडे प्रायः टीकेचेच काम येते. त्याला काय करावे ?

डार्लिंग०—तुम्ही येथे आणलेल्या केसरीच्या अंकातून अधिकाऱ्याबद्दल एखादा तरी स्तुतीचा शब्द काढून दाखवाल काय ?

उ०—त्याला थोडे हुडकावे लागेल.

डार्लिंग—तुम्हाला चांगला वाटलेल्या एखाद्या चांगल्या अधिकाऱ्याचे स्मरणाने नाव घ्या पाहू ?

उ०—लॉर्ड रे.

प्र०—पण लॉर्ड रे काही प्लेगच्या वेळी नव्हते ? उ०—मला वाटले तुम्ही सर्वसामान्य विचारले. प्लेगच्या वेळी कोणीही चांगला अधिकारी नव्हता असे माझे मत आहे.

प्र०—लोकाना दुःख झाले तरी रँड साहेबाना त्याची परवा नव्हती काय ? उ०—त्याना वाटे की असे दुःख होणे स्वाभाविकच आहे.

प्र०—पण असल्या तुमच्या भाषणाने कोणास चिथावणी मिळणारी नव्हती काय ? होय. समजा तुमच्या मनात रँड साहेबाचा खून व्हावा असे आहे तर तसे घडून यावयाला तुम्ही कसे लिहाल ? उ०—तसेच मनात येईल तेव्हा सुचेल तसे लिहीन. पण लिहिले तेव्हा काही मनात नव्हते खास ! खून झाला तो जुलुमामुळे झाला. जुलूम सोसावा लागल्यामुळे झाला. कोणी तो चवाठ्यावर आणल्यामुळे झाला नाही.

प्र०—तुमच्या तक्रारी खऱ्या कशावरून ? उ०—प्लेग कमिशनच्या रिपोर्टात त्यांचा उल्लेख आहे.

प्र०—प्लेग झाला नसता लोकाना इस्पितळात नेत हे खरे आहे काय ? उ०—रोगाच्या संशयावरून नेत हे खरे. पण रोग असलेले व नसलेले आणि रोग झालेले व न झालेले एकाच इमारतीत ठेवीत.

डार्लिंग—रँड साहेबांचा खून झाला या गोष्टीचे तुम्हाला आश्चर्य वाटले काय?

उ०—त्यांच्या कृत्यामुळे ती गोष्ट घडली असे मला वाटले.

प्र०—लोकाना त्रास व्हावा म्हणून रँड साहेबांची नेमणूक केली असे तुम्ही सुचविले हे दुष्टपणाचे नव्हे काय? उ०—लोकाना तसे वाटण्याजोगे होते.

प्र०—का ? उ०—लोकाना रँड साहेबाविषयी माहिती होती म्हणून.

प्र०—स्वतः तुम्हाला तसे वाटले काय ? उ०—नाही. पण सामान्य लोकाना काय कसे वाटले हे कोणी सांगावे ?

प्र०—प्लेगव्यवस्था न केली असती तर प्लेग कसा जाणार होता ? उ०—व्यवस्था हवीच होती. पण कित्येक वेळा लोकाना असे वाटे की प्लेगने मेलो तरी बरे. पण प्लेगव्यवस्थेचे हे दुःख नको.

प्र०—आता शिवाजीकडे वळू. शिवाजीपासून बोध काय घ्यावयाचा ? शत्रूला मारण्याचा ? उ०—नाही. स्वाभिमान स्वावलंबन उद्योगशीलता देशाभिमान वगैरेचा.

प्र०—प्लेगच्या जुलुमाला उद्देशून हे लिहिले ? उ०—नाही. तो उत्सव-प्रसंगच होता. त्यावर्षी त्या दोन्ही गोष्टी एकाच वेळी आल्या.

प्र०—शिवाजीचा पुन्हा अवतार व्हावा असे तुम्ही लिहिले ? उ०—शिवाजी सारख्या देशाभिमानी विभूती पुन्हा निपजाव्या असे सर्वच म्हणतात.

प्र०—शिवाजीने सर्वांत चांगली गोष्ट कोणती केली ? उ०—हिंदुपदपाद-शाही स्थापली.

प्र०—ती अफझुलखानाला मारून ? उ०—त्यांच्या कारकीर्दीतले ते फक्त एक कृत्य होते.

प्र०—अफझुलखानाचा वध केला नसता तर राज्य स्थापले गेले नसते काय ? उ०—काय झाले नसते आणि काय झाले असते हे मी कसे सांगू ?

प्र०—दुष्काळी पीडेला उद्देशून शिवाजीविषयी लिहिले काय ? उ०—नाही. तेव्हाहि दुष्काळाच्या दिवसात शिवाजी उत्सव आला होता.

प्र०—बाहेरगावचे लोक मुंबईत आल्याने त्याना दुःस्थिति येते असे तुम्ही लिहिले काय ? उ०—रस्किन यानेहि आधुनिक सुधारणेबद्दल लिहिताना तसे म्हटले आहे.

प्र०—तुम्ही मोठे विद्वान व बुद्धिवान आहा असे लोक म्हणतात. उ०—ते मी काय सांगू ?

प्र०—लोकाना चिथावण्याकरिता हे सर्व तुम्ही लिहिले असेच की नाही? उ०—तक्रारी जगजाहीर करण्याकरिता तसे लिहिले. बंडच करावयाला सांगावयाचे असते तर तसे स्पष्ट लिहिले असते.

प्र०—सुशिक्षित लोक प्लेगात गाव सोडून गेले याबद्दल तक्रारी केल्या होत्या? उ०—होय. त्यानी गावात राहून लोकांचे दुःख निवारण करण्याला उपाय योजिले पाहिजे होते असे माझे मत होते.

डार्लिंग—सर एडवर्ड कार्सन! मी तुम्हाला पुन्हा विचारतो की असला खुलासा घेत बसण्यात काय अर्थ? ज्यूरी योग्य ते अनुमान काढीलच.

प्र०—दरबाराच्या प्रसंगी राजेलोकाना नीट वागविले नाही असे तुम्ही लिहिले? उ०—होय. वर्तमानपत्रातून तसा काही मजकूर आला होता.

प्र०—शिवाजी उत्सवाला राजकीय स्वरूप नव्हते काय? उ०—नव्हते.

प्र०—मोठ्या माणसाना सामान्य नियम लागत नाहीत असे तुम्ही म्हटले? उ०—होय. गीतेत तसेच सांगितले आहे.

प्र०—*ती गोष्ट खुनाला लागू करावयाची काय? उ०—गीतेतल्या सारख्या मोठ्या युद्धाला ती गोष्ट लागू होईल खुनाला नाही.*

प्र०—तुम्ही रँड साहेबाविरुद्ध लिहिले ह्याचे तुम्हाला वाईट वाटत नाही काय? उ०—खुनापुरते वाईट वाटते. पण प्लेगच्या जुलमाबद्दल लिहिले त्याचे वाईट वाटत नाही.

प्र०—प्रो०गोखले तुम्हाला ठाऊक होते काय? उ०—होय.

प्र०—सोजीरानी बायकावर जुलूम केला असे म्हटल्याबद्दल त्यानी माफी मागितली होती काय? उ०—होय.

प्र०—त्याबद्दल तुम्ही त्याना नावे ठेविली काय? उ०—आपल्या माफीच्या पत्रात त्यानी विनाकारण नसता मजकूर घातला होता म्हणून.

प्र०—कर्नल क्रे याना प्लेगची व्यवस्था चांगली केल्याबद्दल पानसुपाऱ्या केल्या की नाही? उ०—होय. त्यांची व्यवस्था लोकप्रिय झाली म्हणून केल्या.

## दिवस पाचवा-( १३ फेब्रुवारी १९१९ )

प्र०—स्टॅची साहेबानी १८९७ च्या खटल्यात तुम्हाला दोष दिला की नाही? उ०—होय.

प्र०—शिक्षेतून मुदतीपूर्वी सुटताना तुम्ही मी वाचून दाखवितो त्या दोन अटी लिहून दिल्या की नाही?

डार्लिंग—इकडे ज्याला Tioket of leave म्हणतात तशावर टिळकाना तेव्हा सोडले होते असे दिसते.

प्र०—सुटकेनंतर तुमची व जाईल्स साहेबांची गांठ पडली होती काय? उ०—होय.

प्र०—तुम्ही काही कामाकरिता त्यांजकडे गेला होता काय? उ०—माझ्या एका स्नेह्याने पूर्वी मराठी कोश तयार केला होता. त्याला सरकार मदत देणार होते. ती द्याल काय म्हणून विचारावयाला गेलो होतो.

प्र०—त्यावेळी केसरीच्या धोरणाचा विषय निघाला होता काय? उ०—होय.

प्र०—आणि तुम्ही तेव्हा त्याना असे म्हणाला की केवळ सनदशीर चळवळ करून काही उपयोग नाही. उ०—तसे म्हटल्याचे मला आठवत नाही. निःशस्त्र प्रतिकाराची जोड नेहमीच्या चळवळीला केव्हा केव्हा द्यावी लागते असे मी म्हटले असेन.

प्र०—ह्या इंग्रज लोकाशी युक्तिवाद करून काही फळ नाही असे तुम्ही म्हणाला काय? उ०—नाही.

प्र०—चांगल्या इंग्रजी राज्यापेक्षा वाईट देशी राज्य पुरवेल असे तुम्ही म्हणाला काय? उ०—स्वराज्याची तहान सुराज्याने भागत नाही असे म्हणतातच.

प्र०—तुम्ही काही परदेशी मालाच्या होळ्या केल्या? उ०—ज्या वस्तू इकडे मिळत असता लोक वापरतात अशांच्या.

प्र०— ह्या होळ्यांचा हेतू काय होता? उ०—देशी उद्योगधंद्याकडे प्रवृत्ती व्हावी हा.

प्र०—केसरीला आपण इंग्रजी कागद वापरणार नाही तर जर्मन ऑस्ट्रिअन वापरू इतर कोणताहि वापरू असे तुम्ही लिहिले काय? उ०—माझ्या वर्तमानपत्राला इंग्रजी कागद हवा तसा मिळत नाही. म्हणून त्या कागदावर केसरी कधी छापिलाच जात नाही. पूर्वीपासून मी जर्मन ऑस्ट्रिअन कागदच वापरीत होतो.

प्र०—स्वदेशी चळवळीला राजकीय स्वरूप कोणी दिले? उ०—प्रथम बंगाल्यात दिले गेले.

प्र०—तुम्ही ती चळवळ उचलून का धरली? उ०—राष्ट्राची गाऱ्हाणी सरकारच्या नजरेला आणण्याचा तो एक उपाय म्हणून कॉंग्रेसच्या पुढाऱ्यानी ठरविले होते.

प्र० –स्वदेशी चळवळीत लोक शपथा घेत होते काय? उ०—होय.

प्र०—नाशकास शिवाजी उत्सवात स्वदेशी चळवळ मिसळलेली नव्हती काय? उ०—ह्या उत्सवात ते लोक फक्त स्वदेशी साखर खात असे दिसते.

प्र०—भवानी ही शिवाजीची देवता होती काय? उ०—होय.

प्र०—तिच्या गळयात नरकपालांची माळ असते काय? उ०—तिचे असे स्वरूप वर्णिले आहे खरे.

प्र०—बंगाल्यातील शिवाजी उत्सवात बहिष्काराचा विषय घातला होता काय? उ०—होय. पुष्कळ ठिकाणी एकात दुसऱ्याची मिसळ झाली होती हे मला माहित आहे.

प्र०—'विचाराने स्वदेशी' म्हणजे काय? उ०—सर्व तऱ्हेने स्वदेशी.

डार्लिंग—मी त्याचा अर्थ सांगतो. सोमवारी तेवढी स्वदेशी साखर खावी आणि एरवी परदेशी खावी असे नाही. ते व्रतच स्वदेशी म्हटले की कायमचे स्वदेशी.

प्र०—परदेशी कल्पना म्हणजे काय? इंग्रजीच काय? उ०—नव्हे ज्यानी ज्यानी म्हणून राष्ट्राची वाढ खुंटते त्या.

प्र०—हिंदुस्थानातून यच्चयावत् परदेशी असेल ते गेले म्हणजे बाकी काय राहिले? उ०—त्याचे येथे कशाला? येथे इतकेच आहे की आमच्या कल्पना सर्व इंग्रजमय होऊन चालल्या आहेत त्या न व्हाव्या.

प्र०—स्वदेशी व्रत न पाळणाराला मृत्यूचे प्रायश्चित्त सांगितले होते काय? उ०—नाही. व्रत हे पवित्र असते व ते मोडले तर ईश्वराचा कोप होतो इतकाच त्याचा अर्थ.

प्र०—तुम्ही स्वतः स्वदेशी व्रत घेतले होते काय? उ०—होते.

प्र०—तुम्ही विलायतेत साखर खाल्ली तर हा तुमचा खटला बुडण्याची शिक्षा ईश्वर तुम्हाला करील असे तुम्हाला वाटते काय? उ०—हे विचारण्यात तुम्ही फारच वहावत चालला आहात!

प्र०—विलायतेतील कोर्टाचा कायदा हा परदेशी कायदा म्हणून तो तुमच्या व्रताला बाधक होत नाही काय? उ०—कायद्याला कोणी परकी म्हणत नाही.

प्र०—सर जॉन सायमन हे तरी स्वदेशी वकील कोठे आहेत? उ०—स्वदेशी व्रतात कोर्ट व कायदा असल्या गोष्टी येत नाहीत. संसारातील गोष्टी येतात.

प्र०—स्वदेशी चळवळीत काही अत्याचार झाले होते की नाही? उ०—बंगाल्यात काही झाले होते.

प्र०—ते थांबविण्याचे प्रयत्न तुम्ही केले की नाही? उ०—बंगाल्यातील अत्याचार मी कसे थांबविणार?

प्र०—पैसाफंडाचा उपयोग राजकीय होत होता की नाही? उ०—नाही. त्याचे स्वयंसेवक वेगळे होते.

प्र०—विद्यार्थ्यांना तुम्ही राजकीय चळवळीत घालीत होता की नाही? उ०—त्यानी व्याख्यानाना जाऊ नये ह्या नियमांचा मी निषेध करीत होतो.

प्र०—तळेगावच्या शाळेला तुम्ही मदत केली की नाही? उ०—होय.

प्र०—ती समितीच्या कायद्याखाली बंद केली? उ०—होय.

प्र०—त्या शाळेचे चालक विजापूरकर याना शिक्षा झाली काय? उ०—होय.

प्र०—रा. वि. म. भट याना नाशिकच्या खटल्यात शिक्षा झाली असता तुम्ही त्याना केसरी कचेरीत ठेवले काय? उ०—होय. त्याना मी कचेरीतील काही काम दिले होते.

प्र०—ते तुमच्या नोकरीत अजून आहेत काय? उ०—मी इकडे येईपर्यंत तरी होते.

प्र०—असे अर्धवट का सांगता? लाजता का? उ०—राजद्रोहाची शिक्षा झालेले लोक तुमच्या पार्लमेंटातहि बसतात. मला लाजण्याचे हो काय कारण?

प्र०—सावरकराना तुम्ही विलायतेला पाठविले काय? उ०—त्यांच्या कॉलेजच्या प्रिन्सिपालकडून सर्टिफिकेट मिळाले होते. त्यावर मी शिफारस केली होती. (या ठिकाणी सावरकरासंबंधीची सर्व हकीगत वाचून दाखवून 'असे मी ऐकले आहे' असे अनेक प्रश्नाना उत्तरादाखल टिळकाकडून वदवून घेतले.)

प्र०—नाशिकच्या एका सभेत दारू पिणारांची धिंड काढावी असा ठराव झाला होता काय? उ० होय.

डार्लिंग—मला वाटते गळ्याला बाटली बांधून धिंड काढत असतील. पण याची प्रचीति पाहावयाची असली तर अमेरिकेत जावयाला पाहिजे.

## दिवस सहावा–(१४ फेब्रुवारी १९१९)

### (७) सर जॉन सायमन यानी केलेली टिळकांची फेरतपासणी

ह्या दिवशी सर जॉन सायमन यानी टिळकांची फेरतपासणी केली. प्रथम त्यानी ग्लोब व टाइम्स ऑफ इंडिया पत्रानी टिळकांची माफी मागितली ह्या संबंधाचा मजकूर त्यांचेकडून काढून घेतला.

प्र०—टाइम्स ऑफ इंडिया हे पत्र सर्व हिंदुस्थानभर वाचले जाते ना? उ०—होय. ते स्वतःला हिंदुस्थानातले प्रमुख पत्र असे म्हणवून घेते.

प्र०—चापेकर यानी आपल्या सगळ्या जबानीत कोठे तरी तुमचे नाव घेतले होते काय? उ० नाही.

प्र०—मुझफर नगर म्हणजे जेथे बॉबचे अत्याचार झाले ती जागा पुण्यापासून किती लांब आहे? उ०—सुमारे १२०० मैल तरी असेल.

प्र०—बंगाल्यात केसरी कोणी तरी वाचतो काय? उ०—मुळीच नाही.

प्र०—१९१० पर्यंत महाराष्ट्रात बॉबचे अत्याचार झाले होते काय? उ०—नाही. (१९१० पर्यंत म्हणजे चिरोल साहेबानी हे पुस्तक लिहिले तोंपर्यंत.) येथे सर सायमन ह्यानी टिळकानी अत्याचाराचा निषेध केलेले उतारे वाचून

दाखविले ते केसरीतील होते व मी किंवा इतरानी ते लिहिले होते असे टिळका-कडून काढून घेतले.

प्र०—तुम्ही स्वराज्याचे अधिकार मागत होता? उ०—होय.

कार्सन—तुम्ही सुधारणांची योजना पुराव्यात दाखल करणार असाल तर ती मला पाहून प्रश्न विचारावे लागतील.

डार्लिंग—ते काहीच करू नका. आपले हे राजकीय सुधारणांचे कमिशन नव्हे. आणि ज्यूरीला स्वराज्याच्या योजनेवर रिपोर्ट करावयाचा नाही.

प्र०—युद्धाच्या वेळी तुम्ही राजनिष्ठेसंबंधाचे उद्गार काढले होते की नाही? उ०—होय.

डार्लिंग—पण त्याचा काय उपयोग? पूर्वीच्या दोन शिक्षा राजद्रोहाच्या कोठे जाणार? शिक्षा भोगून झाल्यावर मग राजनिष्ठेचे उद्गार निघाले की नाही?

कार्सन—शिवाय ते उद्गार हे पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतरचे होते.

सायमन—१९१८ मध्ये टिळकांचे विचार कशा प्रकारचे होते ह्यासंबंधाने प्रश्न आले होते म्हणून हा प्रश्न मला विचारावयाचा आहे.

डार्लिंग—त्याला १९१४ तील उद्गार काय उपयोग? उद्गाराना गुरुत्वाकर्ष-णाचा कायदा लागतो की काय, की १४ चे उद्गार १८ पर्यंत खाली ओढता यावे? शिक्षा भोगून आल्यावर मनुष्य पश्चात्तापाने आपले विचार बदलीत असतो तसे तेव्हा झाले असेल?

कार्सन—मनुष्याने प्रत्यक्ष काय केले याकरिता त्याचा इनसाफ होत असतो. अमुक गोष्ट मला मान्य नाही तमुक मान्य नाही अशी साक्षीदाराची उत्तरे घेऊन उपयोग काय? मनुष्य चोरी करील व मागाहून म्हणेल की बायबलात चोरी करू नये असे सांगितले आहे.

सायमन—पण कार्सन यानी त्याना सर्वसाधारण प्रश्न विचारला होता की 'तुम्ही बादशहासंबंधाने राजनिष्ठ आहा की नाही?' म्हणून फेर तपासणीत मला हा प्रश्न विचारावा लागत आहे.

डार्लिंग—ठीक आहे. तो प्रश्न मी विचारू देतो.

प्र०—तुम्ही तुरुंगातून येईपर्यंत तुम्हाला चिरोल साहेबांच्या पुस्तकाची माहिती नव्हती? उ०—नव्हती. (येथे टिळकानी १९१४ मध्ये युद्धासंबंधाने एक पत्र मराठ्यात आपल्या सहीवर प्रसिद्ध केले ते दाखल करण्यात आले.)

प्र०—फाळणीसंबंधाने लिहिलेले तुमचे लेख बंगाल्यात कोणी वाचले असतील काय? उ०—नाही.

प्र०—बंगाल्यातील स्वदेशी चळवळ तुम्ही सुरू केली काय? उ०—नाही.

प्र०—त्या चळवळीत बॉबचा उपयोग होता काय? तिला राजकीय स्वरूप होते काय? उ०—नाही. ती फक्त औद्योगिक चळवळ होती.

डार्लिंग—जशी कॉबडेन क्लबची एक चळवळ तशा प्रकारची ही.

सायमन—कॉबडेन क्लब हा आपली चळवळ राजद्रोहात्मक मानीत नव्हता.

डार्लिंग—अलीकडे राजद्रोहात्मक काय आहे व काय नाही हे ठरविणे मुष्किलीचे झाले आहे.

प्र०—सावरकरांची व तुमची भेट एकंदर किती वेळा झाली असेल ? उ०—साऱ्या जन्मात तीन चार वेळा.

प्र०—ताईमहाराज प्रकरणात तुमचा द्रव्यदृष्टीने काही फायदा होता काय ? उ०—नव्हता.

डार्लिंग—पैशाच्या आशेने इतकाच अप्रामाणिकपणाचा अर्थ नसतो.

सायमन—म्हणजे उदाहरणार्थ असेच की नाही की एखादा न्यायाधीश अप्रामाणिक आहे असे म्हटले म्हणजे तो लांच घेतो असाच अर्थ नव्हे तर खटला जितका निःपक्षपातीपणाने चालवावयाला पाहिजे तितका चालवत नाही.

डार्लिंग—तुमचे म्हणणे बरोबर आहे. अप्रामाणिकपणाचे प्रकार अनेक असतात. उलट पक्षी लॉर्ड बेकन हा खटला प्रामाणिकपणे चालवीत असे पण लांच घेत असे.

*कार्सन—निकालासंबंधाने तुमचे म्हणणे असे काय की चिरोल यानी ह्याच्या त्या सर्व गोष्टी निकालात दिल्या नाहीत ?*

उ०—होय. पुराव्याबद्दल त्यानी काहीच म्हटले नव्हते. खालच्या कोर्टाने आमचे हेतू प्रामाणिक आहेत असे स्वच्छ लिहिले असता त्याचा उल्लेखहि चंदावरकरानी केला नाही. खालच्या कोर्टाने आमचे हेतू प्रामाणिक होते असे म्हटले होते.

प्र०—१९१४ मध्ये सर्व फौजदारी फिर्यादीतून तुमची मुक्तता झाल्यावर तशा प्रकारचा कोणताहि आरोप तुमच्यावर चिरोल साहेबांचे पुस्तक प्रसिद्ध होईपर्यंत आला होता काय ? उ०—नव्हता.

डार्लिंग—प्रिव्ही कौन्सिल झाले तरी चूक करीत नाही काय ? त्याच्यावर अपील नाही इतकेच ! एकाद्या खटल्यात सहा न्यायाधीश बसले आणि त्यातील चारांचे एकमत झाले तर बाकीच्या दोघाना इतर निकाल देतील तो निमूटपणे ऐकावा लागतो. खाली चंदावरकरानी टिळकाना नावे ठेविली. वर प्रिव्ही कौन्सिलच्या काही न्यायाधीशांचा चंदावरकराशी मतभेद झाला इतकेच. चंदावरकरानीहि टिळकाना पैसे खाल्ल्याचे म्हटले नव्हते. तर अल्पवयी विधवेला जो दत्तक नको होता तो आपले वजन घालून घ्यावयाला लावला इतकेच.

सायमन—पण तसे करणे हे परिस्थिति म्हणून कर्तव्यच होते.

डार्लिंग—दोन मोठे कायदेपंडित झाले म्हणून विधवेला दत्तक अमुकच आवडेल हे ठरविणे त्याना पंचायतीचे नव्हे काय ? पण सोडून द्या की तो मुद्दा. ताईमहाराज ही व्यक्ति ह्या खटल्यात महत्त्वाची नाही.

प्र०—तुम्ही ही फिर्याद करण्यापूर्वी सॉलिसिटरचा सल्ला घेतला होता काय?

उ०—होय. (ह्या ठिकाणी टिळकांच्या सालिसिटरानी चिरोल व मॅकमिलन कंपनी ह्याना पाठविलेले पत्र दाखल करण्यात आले.)

कार्सन—मलाहि एक कागद येथेच दाखल करू द्या. (१९१८ साली युद्धाच्या कायद्याखाली टिळकाना बंदी करण्यात आली होती त्या संबंधाचा.)

कार्सन—यात उल्लेखिलेले भाषण हे १९१४ सालच्या भाषणाहून वेगळे होते की नाही?

उ०—मला वेगळेसे वाटत नाही.

प्र०—ह्या मनाईच्या हुकमावर तुम्ही लॉर्ड वुइलिंगडन ह्याना पत्र लिहिले होते काय? उ०—नाही. या ठिकाणी टिळकांची फेरतपासणी संपली. आणि त्यांच्या बॅरिस्टरानी फिर्यादीतर्फे सर्व पुरावा संपला असे कोर्टास कळविले.

## (८) कार्सन साहेबांचे भाषण

नंतर सर एडवर्ड कार्सन यानी प्रतिवादी चिरोल यांच्यातर्फे आपली बाजू मांडण्याला प्रारंभ केला. ते म्हणाले "चिरोलसाहेब हे लंडन टाइम्सचे एक प्रवासी बातमीदार म्हणून प्रसिद्ध आहेत. हिंदुस्थानातील परिस्थिति पाहण्याकरिता टाइम्सने त्याना पाठविले. हिंदी विषयावर ते तज्ज्ञ असे गणले जातात. ते हिंदुस्थानात कधी फार दिवस राहिले नाहीत. टिळकांचा व त्यांचा द्वेष असण्याचे कारणच नाही. हिंदुस्थानाविषयी सहानुभूति बाळगणाऱ्या मोर्लेसाहेबाना या लेखांचे पुस्तक अर्पण केले आहे. त्याला सर ऑलफ्रेड लायल यासारख्या तज्ज्ञाने प्रस्तावना लिहिली आहे. पुस्तकातील कोणत्याहि विधानाबद्दल त्याना खेद होत नाही. त्याना माफी मागून मोकळे व्हावयाचे असते तर ती गोष्ट त्यानी पूर्वीच केली असती. असल्या खटल्याला तोंड देणे हे किती तरी खर्चाचे काम आहे! तो खर्च आणि ते श्रम लहानशी माफी मागून त्याना वाचविता आले असते. उलट टिळक इतक्या दूरवर मुद्दाम आले ते का हे ज्यूरीच्या लक्षात आलेच असेल. तुमच्याकडून बेअब्रू साफ होऊन वर पैसे मिळतील म्हणून ते येथे आले. टिळकांची विद्वत्ता व तिकडील त्यांची मान्यता कोणीहि नाकबूल करीत नाही. आणि १८९३ पासून १९१८ पर्यंत त्यानी सरकारच्या प्रत्येक अडचणीचा फायदा घेऊन स्वराज्यविषयक आपल्या कल्पना उगवून घेण्याचा प्रयत्न केला. तिकडे ही फिर्याद ते आणते तर त्याना लभ्यांश नव्हता. आज तीन दिवस चाललेल्या उलट तपासणीत काय काय गोष्टी बाहेर पडल्या हे आपण पाहिलेच. त्याना वाटले असेल विलायतेतील हवा थंड लोकांची मने थंड म्हणून जहाल अशा आपल्या उद्गाराना येथे सौम्य स्वरूप सहजच आणून दाखविता येईल. राजद्रोहकारक भाषा सतत सुरू असता तिचा परिणाम खुनात होत नाही या म्हणण्यात काय अर्थ? वीस वर्षांपूर्वी मुंबई टाइम्सने माफी मागितली ती आता पुढे आणून काय फायदा? टिळकाना अशी

काय अब्रू लागून गेली आहे की त्यांची चिरोलसाहेबांच्या अशा लिहिण्याने बेअब्रू होईल? जन्मभर त्यानी इंग्रजांची बदनामीच केली आहे. दुसरे काय केले? आणि अशा इंग्रजांकडून नुकसानभरपाई मागण्याला ते येथे आले आहेत. इंग्रज सरकार म्हणजे इंग्रजी अधिकारी नव्हेत असला सूक्ष्म भेद येथे त्यानी सांगितला आहे तो कोण मानणार?" [या ठिकाणी रँड साहेबांच्या खुनाची सर्व हकीगत कार्सन साहेबानी ज्यूरीला सांगितली आणि फिर्यादीतले या संबंधाच्या मुद्याचे शब्द घेऊन त्याचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर चाफेकर बंधूंच्या सर्वच्या सर्व जबान्या वाचून दाखविल्या व पूर्वी ज्या लेखावरून उलट तपासणी केली ते लेख पुन्हा वाचून दाखवून शिवाजी उत्सव व त्यातील व्याख्याने यांचे वर्णन व त्यावर टीका केली आणि म्हणाले] "अशा सर्व गोष्टी असता हे टिळक तुमच्यापुढे म्हणतात की 'हा मी टिळक बडा ब्राह्मण पंडित प्रोफेसर संपादक गोब्राह्मणांचा कैवारी पशुतुल्य आचरण करणाऱ्या इंग्रजांचा वैरी मी तुम्हांला सांगतो की विशेष परिस्थितीत खून झाले तरी त्याला खून म्हणू नये!' अशा मनुष्याचे वर्णन चिरोल साहेबानी अशा रीतीने केले यात काय गुन्हा झाला? सरकारहि त्यांच्याशी सदयपणानेच वागले. त्यानी त्यांची शिक्षा कमी केली. तरीपण ते बाहेर येताच बेकायदेशीरपणाचा उपदेश लोकाना करण्याला तयारच! हिंदुस्थानातील इंग्रजी राज्य कसे चालले आहे याविषयी मी चर्चा करीत नाही. टिळकांच्या अंगी देशाभिमान असेल ही गोष्टच मी हवी तरी घेऊन चालतो. मी असेच म्हणतो की ह्याकरिता खून करावा असे वाटत असेल तर त्यानी तसा स्पष्ट उपदेश करावा आणि त्याचा परिणाम भोगावा. पण चोर तो चोर आणि शिरजोर! अशी टिळकांची स्थिति आहे. त्यानी मात्र खुनाना उत्तेजन येण्यासारखे वाटेल ते लिहावे बोलावे. पण तशा प्रकारचे ते बोलतात लिहितात असे जर कोणी म्हणाला तर मात्र ती 'माझी बेअब्रू झाली' असे म्हणून हे ओरडत उठणार?" [या ठिकाणी १९०८ च्या खटल्याचा मुद्दा घेऊन कार्सन साहेबानी दावर यांच्यापुढे शिक्षा झालेले लेख सविस्तर वाचून दाखविले. आणि टिळकाना उद्देशून दावर यानी जे उद्गार काढले त्यावर यानी विशेष जोर दिला. त्यानंतर कान्हेऱ्याच्या व इतरांच्या जबान्या वाचून दाखविल्या आणि म्हणाले की] "अशा मनुष्याबद्दल चिरोल साहेबानी असे लिहिले नसते तर त्याना आपले काम योग्य रीतीने करिता आले नाही असेच कोणीहि म्हणाले असते."

## दिवस सातवा–(१७ फेब्रुवारी १९१९)

या दिवशी कार्सन यानी आपले भाषण पुढे चालू केले. "हिंदुस्थानातून इंग्रजाना हाकलून देण्याचा कट टिळक हे जन्मभर करीत होते असेच मी म्हणतो. आणि टिळकानी ओढून टाकलेल्या आगकाड्या गवतावर पडत नव्हत्या तर गच्च भरलेल्या दारूच्या कोठारावर पडत होत्या. इंग्रजाविरुद्ध द्वेष उत्पन्न कर-

ण्याची त्यानी काही बाकी ठेविली नाही. त्या कामी धर्म चालीरीती शिक्षण उत्सव समारंभ लेख व्याख्याने सभा वगैरे हरएक गोष्टींचा त्यानी उपयोग केला. ही टिळकांची मते प्रामाणिकपणाची असतील की नाही हाच आपणापुढे प्रश्न आहे. अशा मनुष्याचे वजन प्रथम पुण्यात त्यानंतर महाराष्ट्रात त्यानंतर हिंदुस्थानात पसरावे ही गोष्ट स्वाभाविक आहे. राष्ट्रीय सभेच्या द्वारे त्यांचा इतर पुढाऱ्याशी संबंध आला. टिळकानी राष्ट्रीय सभेत फारसे वक्तृत्व गाजविले नाही. त्याना ती देणगीही नव्हती. पण त्यांचा दुर्दम उद्योग दुसऱ्यावर वचक पाडण्याची त्यांची शैली व प्रत्येक साधनाचा योग्य उपयोग करून घेण्याचे त्यांचे कौशल्य या गुणानी त्यानी काँग्रेसच्या पुढाऱ्यावरहि वजन पाडले. बंगाल्यात कोणी केसरी वाचीत नसेल. पण त्यांच्याच प्रयत्नाने बंगाल्यात शिवाजी उत्सव सुरू झाला होता. आणि बिपिन पाल अरविंद घोस यासारखे पुढारी त्यांचे भक्त बनले होते. सुरेंद्रनाथ बानर्जी पुढे त्यांच्याशी भांडले पण त्यानीहि प्रथम टिळकांच्या नमुन्यावरूनच आपली चळवळ सुरू केली. कोणीहि त्यांच्या कर्तृत्वशक्तीबद्दल शंका घेत नाही. पण तिचा उपयोग काय केला हे ज्यूरीने पाहिले पाहिजे. अनेक जाती असणाऱ्या हिंदूत राज्य करणे ही किती कठीण गोष्ट होती! अशा काळात टिळकांचा उपद्रव किती झाला असेल याची कल्पना तुम्हाला करिता येईल. त्यांच्या शिकवणीने खून तर झालेच. पण त्याच्यापुढे मजल कशी गेली नाही हेच आश्चर्य! इंग्रजांचे हे सुराज्य नको, त्यांच्या जागी स्वदेशी अराजक पुरवले असेच त्यानी म्हटले आहे. असे हे टिळक तुमच्याकडून आपली अब्रू साफ करून घेऊन हिंदुस्थानाला परत जाऊन आपला जय मिरवणार! जितके म्हणून वाईट लोक त्या सर्वांना यांची आपली मदत. खुनाच्या चळवळीला ते आपली मदत करीत. खुनाच्या पुस्तकावर चांगला अभिप्राय देऊन ती पुढे आणीत. कोणावरहि खटला झाला तरी हे त्याला मदत करीत. कोणी वर्तमानपत्र काढले तरी त्यांचे बस्तान बसवून देण्याला हे तयारच. तात्पर्य प्रत्येक वाईट मनुष्याशी कोणत्याना कोणत्या तरी रीतीने यांचा संबंध होताच. बेअब्रूच्या म्हणून फिर्यादीत निरनिराळे सहा मुद्दे आणले. पण सर्वांचा परस्पराशी निकट संबंध आहे. म्हणून चिरोल साहेबांचे समग्र पुस्तक लक्षात घेऊनच विचार केला पाहिजे. मौज ही की पुस्तकातील एखाद दुसरी चिल्लर गोष्ट घेऊन ही गोष्ट खोटी आहे, हे लिहिण्याने माझी बेअब्रू झाली असा कांगावा ते करितात. पण समजा एखाद्या मनुष्यावर एकाच कोर्टात दोन आरोप आले पैकी त्याने आपल्या सासूचा खून केला ही गोष्ट सिद्ध झाली. पण त्याच कोर्टात त्याने आपल्या सासऱ्याच्या खिशातील तंबाकूची चिलीम चोरली असा आरोप त्याच्यावर आला आणि तो मात्र खोटा ठरला. तर पहिली गोष्ट विसरून जाऊन, दुसऱ्या गोष्टीने होणारी माझी बेअब्रू साफ करून मला नुकसान भरपाई द्या असे म्हणण्यासारखेच हे आहे. पाचशे पानाच्या पुस्तकात एखादे वाक्य चुकून पडले किंवा ते शाबीत करता न आले म्हणून काय झाले? टिळकानी लोकावर कोरडे

ओढून वर्गण्या जमविल्या ह्या विधानाला आक्षेप घेण्यात आला आहे. पण कोरडे ह्याचा अर्थ उघडच आहे. कारण स्वदेशीचा उपदेश करताना व पैसा फंडाला वर्गणी जमविताना लोकांच्या मनात भलते सलते भूत उत्पन्न करणे ह्याचेच नाव कोरडे ओढणे. लग्नकार्यात स्वदेची व्रत पाळले नाहीतर नवरी किंवा नवरा मरेल परिणाम अशुभ होतील असे सांगणे हा काय सरळ उपदेश झाला? हातात कोरडा घेऊन लोकांच्या पाठीवर तो ओढून वर्गण्या मिळविल्या असा त्याचा शब्दशः अर्थ घ्यावयाचा नाही. ते कोरडे वर्तमानपत्रातील लेखांचे होते.

सायमन--हा खुलासा माझे मित्र प्रथमच पुढे आणीत आहेत. तो त्यानी पूर्वी दिला नव्हता.

कार्सन--ह्या वर्गण्या टिळकानी आपल्या खिशात घातल्या असे कोणीच म्हटले नाही. त्या त्या कामाकडेच त्यांचा उपयोग झाला असेल. पण त्या मिळविल्या कशा इतकाच येथे प्रश्न आहे.

(या ठिकाणी कार्सनसाहेबानी काही लेख वाचून दाखविले. त्यावर सर सायमन ह्यानी हरकत घेतली की या जबानीतील हकिगतीच्या खरेपणाची शाबिती झाल्याशिवाय त्या पुराव्यात ग्राह्य धरू नयेत. निदान टिळकाना त्याची काही माहिती नसल्यामुळे स्वतः त्यांच्याविरुद्ध तरी तो पुरावा मानला जाऊ नये).

डार्लिंग--पण ह्या जबान्या कमिशनपुढे दाखल करण्यात आल्या आणि त्याना तुम्ही हरकत घेतली नव्हती.

सायमन--कमिशनपुढे हरकत घेतली असेल किंवा नसेल. पण येथे तो पुरावा दाखल करून घेताना हरकत खचित घेता येते.

डार्लिंग--ठीक आहे. त्याबद्दल पुढे पाहू.

कार्सन--इतकी प्रस्तावना करून मी आता चिरोल साहेबांची साक्ष घेतो.

## (९) चिरोल साहेबांची साक्ष

### यूस्टेस हिल्स याजकडून सरतपासणी

नंतर चिरोल साहेबांची साक्ष घेण्यात आली. दुय्यम बॅरिस्टर यूस्टेस हिल्स यानी त्यांची सर तपासणी केली. तीत चिरोल साहेबानी सांगितले की 'लंडन टाइम्सपत्राच्या परराष्ट्रीय खात्याचा मी चालक आहे. पब्लिक सर्व्हिस कमिशनवर स्टेट सेक्रेटरीनी माझी नेमणूक केली होती. कारण हिंदुस्थानच्या परिस्थितीचे मी संशोधन केले होते. पीस कॉन्फरन्सलाहि मला पाठविण्यात आले होते. १८९२ सालापासून मी टाइम्सचे काम करितो. मी जगभर प्रवास केला आहे. हिंदी राजकारणाचा मी विशेष अभ्यास केला आहे. लेख लिहिण्यापूर्वी मी पुणे मुंबई नाशिक कोल्हापूर वगैरे ठिकाणी जाऊन आलो. तेथे अनेक लोकाकडून मी माहिती मिळविली. राष्ट्रीय पक्षाच्या लोकानाहि मी भेटलो. महाराष्ट्रात चळवळीचा प्रारंभ दिसला म्हणून मी विशेष चौकशी केली आणि त्यावर

अनुमाने बांधली. नाशिकच्या खटल्यातील पुरावा जबान्या वगैरे मिळविल्या. त्यात टिळकांचा अनेक रीतीने संबंध आलेला दिसला.'

स्पेन्स—चिरोल साहेबाना मिळालेल्या जिनसा दाखल करण्यापूर्वी त्या कोणी हजर केल्या दिल्या ह्याचा पुरावा नको काय?

डार्लिंग—वा! अशा रीतीने हा खटला लांबणार असेल तर मला तो जन्मभर पुरून उरेल. माझ्यापेक्षा एखाद्या तरुण न्यायाधीशाची योजना होती तर बरे झाले असते.

*चिरोल—ही सर्व सामुग्री जमवून घेऊन आलो आणि मग लेख लिहिले. लॉर्ड मोर्ले हे उदारमतवादी आहेत. त्यानी माझे लेख वाचूनच त्याना हे पुस्तक अर्पण करण्याची परवानगी दिली. माझ्या टिपणांचा एक भाराच झाला होता. तो बहुतेक मी फाडून टाकला. माझ्या पुस्तकाचे मराठी भाषांतर झालेले आहे. पण त्याच्यावर टिळकानी फिर्याद केलेली नाही. टिळकाना मी पूर्वी पाहिले नव्हते. मुंबईस कमिशनचे काम चालले तेव्हा त्याना मी प्रथम पाहिले. ही फिर्याद करण्यापूर्वी एक वर्ष टिळकानी माझे पुस्तक वाचले होते. आणि त्याचा उल्लेखहि केला होता. फिर्याद केल्यानंतर एक वर्षाने राजनिष्ठेचा आपला जाहीरनामा त्यानी प्रसिद्ध केला. व्यक्तिशः त्यांचा माझा काहीच द्वेष नाही. आणि लिहिल्यापैकी एकही वाक्य मी परत घेण्याला तयार नाही.*

### सायमन याजकडून उलट तपासणी

यानंतर सर जॉन सायमन यानी चिरोल साहेबाची उलट तपासणी केली. त्यात चिरोल साहेब म्हणाले की "टाईम्स मधले लेख पुस्तक रूपाने छापण्यापूर्वी त्यात कोठे कोठे फरक केले आहेत. विशेष फरक असा ताई महाराज प्रकरणी केला आहे. हिंदुस्थानात मी पांच सहा महिने हिंडलो. तेव्हा उन्हाळा होता. मी कोल्हापूर महाराजाकडे उतरलो नव्हतो. एक दोन वेळा त्याना भेटलो. संस्थानात गेले म्हणजे राजाला भेटणे हा शिष्टाचारच आहे. कोल्हापुरास काही साधने मिळाली. बाळा महाराज हे कोल्हापूरकरांचे हस्तक होते. टिळकानी कोल्हापूरकरावर कडक टीका केली होती. पण ती ताई महाराज प्रकरणी नाही. पुस्तक लिहिताना चंदावरकरांच्या निकालाचा सारांश माझ्यापुढे होता. बातमी म्हणून तो टाइम्सकडून मजकडे आला. टिळकावर खोटा कागद करण्याचा खटला झाला होता.

सायमन—मी तुम्हाला सांगतो की ही गोष्ट खोटी आहे. पुन्हा उत्तर द्या.

डार्लिंग—तुमच्या प्रश्नाचा त्याना अर्थ कळला नसावा.

सायमन—त्या आरोपाकरिता त्यांचा इनसाफ कधीच झाला नाही. म्हणून तुम्ही म्हणता हे खरे नाही.

उ०—होय तुम्ही म्हणता ते खरे आहे.

प्र०—यावरून तुम्ही आपली माहिती कसोशीने मिळविली आहे हे दिसत नाही? उ०—होय. टिळकांच्यावर त्या बाबतीत खटला झाला नव्हता.

प्र०—खोट्या प्रतिज्ञेच्या खटल्यातून टिळक सुटले त्याला चंदावरकरांच्या निकालाने काही बाध आला नाही? उ०—होय. आला नाही.

प्र०—टिळकांच्या ह्या सुटकेला महत्त्व होते? उ०—होय.

प्र०—ह्या बाबतीत तुम्ही आपले मूळचे लेख बदलून लिहिले? उ०—होय.

प्र०—कोल्हापूरकर महाराजांचा व तुमचा पत्रव्यवहार होता? उ०—होय. महाराजांशी ह्या खटल्यासंबंधाने माझे काही बोलणे झाले नव्हते.

प्र०—महाराजांची काही पत्रे तुमच्याजवळ आहेत काय आणि ती हुडकून आणाल काय? उ०—होय. त्यात ह्या खटल्याविषयी त्यानी मला सहानुभूति दाखविली आहे.

प्र०—तुम्हाला मराठी थोडे तरी येते काय? उ०—नाही.

प्र०—१९१० पर्यंतच्या केसरीच्या लेखांचे तुम्ही इंग्रजी भाषांतर केले होते काय? उ०—मी स्वतः कोणाला त्या कामावर नेमले नव्हते.

डार्लिंग—भाषांतर हायकोर्टातले ट्रॅन्सलेटर करितात.

सायमन—लेख लिहिताना चिरोल साहेबाना केसरीतील लेख कितपत माहीत होते एवढेच मला विचारावयाचे आहे.

उ०—१९०७–१९०८ ह्या खटल्यातील लेखाखेरीज इतरही काही केसरीतील लेखांची भाषांतरे मी पाहिली होती. मला ती ली वार्नर वगैरेनी दिली होती.

प्र०—तुम्हाला ती सरकारी अधिकाऱ्याकडून मिळाली होती काय? उ०—अधिकारी असलेल्या लोकाकडून मिळाली होती. सरकारी रीतीने नव्हे. वर्तमान पत्रावरील रिपोर्ट मला पाहावयास मिळाले होते. अशा रीतीने मला मिळालेली साधने महत्त्वाची होती.

प्र०—खटल्यात हल्ली दाखल केलेले केसरीतील लेख पुस्तक लिहिताना तुम्हाला वाचावयाला मिळाले होते काय? उ०—बहुधा नसावे. तशा प्रकारचे लेख टिळक लिहितात इतके मला कळले होते.

प्र०—१८९७ च्या खटल्याचे कागद तुम्ही तपासले होते? उ०—होय.

प्र०—त्यात टिळकांचा खुनाशी संबंध जोडलेला तुम्ही पाहिला काय? उ०—नाही.

प्र०—चापेकराचे दोन निरनिराळे जबाब आहेत? उ०—होय.

प्र०—त्यापैकी एकातहि टिळकांचा उल्लेख नाही? उ०—नाही.

प्र०—एकातहि केसरीचा उल्लेख नाही ? उ०—नावाने नाही.

प्र०—तर कशाने आहे ? उ०—मजकुरावरून आहे.

प्र०—मग तुम्ही लिहिलेले शब्द बरोबर नाहीत ? उ०—ते चूक नाहीत.

प्र०—तुम्ही ह्या मुद्यावर पहिल्याने दिलेल्या कैफियतीत व दुसऱ्याने दिलेल्या कैफियतीत फरक आहे की नाही ? उ०—नाही.

प्र०—मग तांबड्या शाईचा काट कोठून आला ?

डार्लिंग—ते त्यांच्या वकिलाना माहित.

प्र०—टिळक हजर असता चाफेकराने श्लोक म्हटले असे पुस्तकात लिहिले नाही काय ? उ०—नाही.

प्र०—पुस्तक लिहिताना चाफेकराचे दोन जबाब तुमच्यापुढे होते काय? तुमच्या पुढच्या व त्या जबाबात श्लोक वगैरे म्हटल्याचा उल्लेख नाही ? उ०—नाही.

प्र०—मग तो उतारा तुम्हाला कोठे मिळाला ? उ०—ली वार्नर याजकडून मिळाला असेल ?

प्र०—चाफेकराने एक आत्मचरित्र लिहिलेले तुम्ही पाहिले होते काय ? उ०—त्यातील थोडा भाग ली वार्नर यानी मला दिला होता.

प्र०—मुंबई सरकारचे सेक्रेटरी रॉबर्टसन तुम्हाला या खटल्यात मदत करतात की नाही ? उ०—नाही. दुसरे एक अधिकारी मदत करितात.

प्र०—शेजारी असलेले मॉंटगामरी हेच काय ? उ०—होय.

प्र०—सरकारकडून प्रतिवादीला मदत मिळावी वादीला मिळू नये हे योग्य आहे काय ? उ०—नाही.

प्र०—ली वार्नर यांनी सरकारी कागदातील उतारे तुम्हाला दिले ते खाजगी रीतीने दिले ? उ०—होय.

प्र०—शिवाजी उत्सवाचा उपयोग टिळक राजकारणात करीत होते काय ? उ०—होय.

प्र०—मग अशा कार्याला सरकारने पाच हजार रुपये दिले ? उ०—शिवाजी ऐतिहासिक पुरूष म्हणून त्याच्या समाधीकरिता दिले. ते काही शिवाजी उत्सवाकरिता दिले नाहीत.

प्र०—समाधी संरक्षणाची चळवळ व उत्सव ही तुम्ही वेगळी मानता काय ? उ०—होय.

प्र०—आणि अशा चळवळीतील समाधी संरक्षणाला सरकारने पाच हजार रुपये दिले ? उ०—१९०७ साली दिले.

प्र०—कोणीहि राजनिष्ठ मनुष्य टिळकांच्या या चळवळीत संबंध ठेवीत नव्हता काय ? उ०—कोणीही ठेवणार नाही.

प्र०—कोल्हापूरचे महाराज हे राजनिष्ठ आहेत ? उ०—होय.

प्र०—महाराजानी समाधीला वर्गणी दिली ती सरकारने देण्यापूर्वी ? उ०—होय.

प्र०—आणि ती मागण्याकरिता टिळक शिष्टमंडळात गेले होते ? उ०—होय प्रथम काही दिवस हा उत्सव साळसूदपणे चालला होता. टिळकांच्या राजद्रोहाने समाधी दूषित होत नाही खास.

## दिवस आठवा—( ८ फेब्रुवारी १९१९. )

प्र०—कान्हेऱ्यानी दोन जबाब दिले नव्हते काय ? उ०—होय.

प्र०—जबाब प्रश्नोत्तराने घेतलेले आहेत ? उ०—होय.

प्र०—त्या दोहांत परस्पर विरुद्ध मजकूर नव्हता ? उ०—विशेष फरक होता असे वाटत नाही.

प्र०—एका जबाबात तो म्हणतो आमची मंडळी गुप्त नव्हती. दुसऱ्यात होती म्हणतो ? उ०—तसे असेल.

प्र०—कान्हेरे याचे गुप्तमंडळ स्थापित झाले तेव्हा टिळक मंडालेस होते ? उ०—होय.

प्र०—कोल्हापुरास शिवाजीचा वार्षिक उत्सव करितात की नाही ? उ०—धार्मिक उत्सव करितात.

प्र०—रथाची मिरवणूक काढतात की नाही ? उ०—बहुधा काढीत असतील.

प्र०—कोल्हापूरचे महाराज शिवाजीने अफझुलखानाला विश्वासघाताने मारले असे म्हणतात काय ? उ०—नाही आणि मीही त्याला विश्वासघातकी बदमाश म्हणत नाही. शिवाजी मोठा मनुष्य असाच आम्ही त्याला मानतो. पण टिळक त्याने खून केला म्हणून त्याला मोठा मानतात.

प्र०—पण शिवाजीने खरोखर विश्वासघात केला की नाही याबद्दल वादच आहे. उ०—होय.

प्र०—गोरक्षणाची चळवळ फार वर्षापासूनच आहे ? उ०—होय.

प्र०—गाय ही हिंदुसमाजाकडून पवित्र मानली जाते ? उ०—होय.

प्र०—आणि मुसलमान तिचा वध करितात. उ०—होय.

प्र०—पण त्याच्या धर्मात वध करावा असे सांगितलेले नाही ? उ०—नाही.

प्र०—म्हणजे हिंदु व मुसलमान यांच्या धर्मातील विरोध दुस्तर होता. उ०—पण टिळकानी पुण्यात तो प्रश्न उत्पन्न करण्यापूर्वी तो इतका दुस्तर नव्हता.

प्र०—पण त्यापूर्वी हिंदुमुसलमानात दंगे झाले होते ? उ०—होय. पण अधिकाऱ्यांच्या अडचणी तेव्हापासून वाढल्या खऱ्या.

यानंतर सर एडवर्ड कार्सन यानी चिरोल सोहबांची फेरतपासणी केली.

प्र०—तुम्ही शिवाजीच्या धार्मिक उत्सवाला कधी नांव ठेविली नाही ? उ०—नाही.

प्र०—तुम्ही टिळकासंबंधी लिहिले ते हिंदुस्थानातील सर्व परिस्थितीचा विचार करून लिहिले ? उ०—होय.

प्र०—आणि त्यावरून तुम्ही अनुमाने काढली ती बरोबर आहेत ? उ०—होय.

प्र०—कोल्हापूरकरावर तुम्ही एक स्वतंत्र भाग लिहिला होता ? उ०—होय.

प्र०—आणि त्यात लिहिल्याप्रमाणे टिळक व ब्राह्मण लोक त्यांच्याविरुद्ध आहेत हे तुम्हाला माहीत आहे ? उ०—होय.

प्र०—टिळकांचा शिवाजी उत्सव व महाराजांचा उत्सव हे एकाच स्वरूपाचे नव्हते ? उ०—मुळीच नव्हते.

प्र०—सरकारने काही कागद तुम्हाला दिले टिळकाना दिले नाहीत असे असेल पण तुम्ही त्याना देऊ नका असे सांगितले काय ? उ०—नाही.

## ( १० ) लॉर्ड सँडहर्स्ट यांची साक्ष

नंतर सर एलिस ह्यानी लॉर्ड सँडहर्स्ट यांची सर तपासणी केली.

प्रथम सर्व नामावळी व वंशाच्या बिरुदावळी वगैरेचे प्रश्न झाले. पुण्यास प्लेगच्या दिवसात काय व्यवस्था होती व टिळकानी काय केले त्यासंबंधाने त्यांची जबानी झाली. ते म्हणाले " लोकाना इस्पितळात नेणे दूषिताना किंवा संशयिताना वेगळ्या जागी ठेवणे घरतपासणी करणे वगैरे गोष्टी अवश्य होत्या. स्वतः मी पुण्यास त्या दिवसात गेलो. इस्पितळे तपासली. पुण्याच्या प्लेगकमिटीवर रँडसाहेब अनुभविक म्हणून अधिकारी नेमण्यात आले. ते मोठे धैर्यवान होते. "

सायमन—रँडसाहेबांच्या सद्गुणाचा पुरावा येथे ग्राह्य नाही. कैफियतीत त्याचा उल्लेख नाही.

सर एलिस—ज्याचा खून झाला तो मनुष्य कसा होता हे दाखविणे प्राप्तच आहे.

डार्लिंग—रँडसाहेबांची जी वर्णने केसरीतून आली होती ती खरी की खोटी हे पाहावयास नको काय ?

प्र०—तुमच्याकडे रोज रिपोर्ट येत होता ? उ०—होता. तपासणीचे काम योग्य रीतीने व्हावे म्हणून सोजीर लोकांची व्यवस्था केली होती. तपासणीतील काही तक्रारी खऱ्या असतील पण मुख्य खऱ्या नाहीत. मी प्रत्यक्ष सोजीराबरोबर

कोठे गेलो नाही. पण त्यानी काम चांगले केले असा रिपोर्ट आहे. रँडसाहेबांचे जे वर्णन वाचून दाखविण्यात आले ते खरे नाही. प्रोफेसर गोखल्यानी माझी माफी मागितली त्या पत्राची नक्कल मजजवळ आहे. ( या ठिकाणी ही नक्कल दाखल करून घ्यावी की नाही ह्याबद्दल पुष्कळच वाद झाला. शेवटी त्या पत्राचा पुरावा नाकारण्यात आला. ) सँडहर्स्ट साहेब पुढे म्हणाले—माझ्याच वेळी टिळकांच्यावर खटला झाला. आणि पुढे त्यांजकडून अटी घेऊन त्याना कमी शिक्षेवर सोडण्यात आले. मी फेब्रुआरी १९००मध्ये विलायतेस परत आलो. तोपर्यंत टिळकानी त्या अटी मोडल्या नव्हत्या.

## सर जॉन सायमन यांजकडून उलट तपासणी

प्र० तुम्ही नुसते गव्हर्नर नसून गव्हर्नर-इन-कौंसिल होता ? उ०—होय.

प्र० —प्लेग कमिशन तुमच्या कारकिर्दीत नेमले गेले काय ? उ०—होय.

प्र०—पण निकाल मात्र मागाहून आला ? उ०—होय.

डार्लिंग —ह्या खटल्याची गोष्ट तशीच होणारशी दिसते. माझ्या आयुष्यात पुरावा आणि माझ्या मृत्यूनंतर ज्यूरीचा निकाल !

प्र० घरांची तपासणी लोकाना अप्रिय नव्हती काय ? उ०—नव्हती.

प्र०—ह्या कामात लोकांची सहानुभूति अवश्य होती की नाही ? उ०—ते मात्र खरे.

प्र० —प्लेग पुरवला पण प्लेगव्यवस्था नको असे लोक म्हणत हे तुम्ही ऐकले होते काय ? उ०—लोकानी तसे म्हणणे स्वाभाविकच होते. पण त्याला दुसरीहि बाजू आहे.

डार्लिंग— मी एक गोष्ट सांगतो. लॉर्ड डिली ह्यानी असे लिहिले आहे की, त्याना संधिवात झाला तेव्हा त्याना कोणी एका औषधाची शिफारस केली. पण ते घेतल्यावर ते म्हणाले " मला हा रोग पुरवला पण औषध नको ! "

प्र० सर्व दर्जाच्या लोकाना सेग्रिगेशन कँपात एकत्र ठेवण्यात येत होते काय ? उ०—होय. ते युक्तच होते.

डार्लिंग— ह्या लोकसत्तेच्या वादाच्या दिवसात लहान थोर हा दर्जा विसरलाच पाहिजे.

प्र०—पण कित्येक लोकाना विनाकारण ह्या सेग्रिगेशन कँपात राहावे लागले असेल ? उ०—तेहि शक्य आहे.

प्र०—सगळ्या प्लेगच्या दिवसात पुण्याला तुम्ही दोनदा गेला ? उ०—होय. टिळकानी ह्या कामी लोकसेवा केली ती रँडची साहेबानीहि मान्य केली आहे. तिची किंमत मी कमी करू इच्छित नाही.

प्र०—तुमच्याजवळ ह्या बाबतीत टिळकानी पत्रव्यवहार केला की नाही? उ०—केला असेल पण समक्ष भेट झाल्याचे स्मरत नाही. दुष्काळी वगैरे कामेहि त्याच वेळी चालू होती.

### सर एडवर्ड कार्सन याजकडून फेरतपासणी

प्र०—ह्या दोन आपत्तीमुळे लोकांमध्ये क्षोभ झाला त्याचा फायदा टिळकानी घेतला की नाही? उ०—होय.

प्र०—तुमचे अधिकारी व सोजीर लोक ह्यानी एकंदरीने फार चांगले काम केले असे तुमचे म्हणणे होते की नाही? उ०—होय.

## (११) सर चार्लस लॅंब यांची साक्ष

ह्यानंतर सर चार्लस लॅंब यांची साक्ष झाली. त्यानी सरतपासणीत सांगितले की "मी प्लेग कमिटीचा अध्यक्ष होईपर्यंत माझ्याकडे तक्रारी येत नव्हत्या. ह्या दिवसातील केसरी मराठा पत्रातील लेख मी पहात होतो."

### सर जॉन सायमन याजकडून उलट तपासणी

प्र०—त्यावेळी मुंबई इलाख्यात पुष्कळ वर्तमानपत्रे होती? उ०—होय.

प्र०—पुष्कळ पत्रातून केसरी मराठ्यातल्या सारखे लेख येत होते? उ०—काहीतून येत असतील.

प्र०—अतिशयोक्तीची किंवा आक्षेपकारक वर्णने इतरांच्या पत्रातून आली असतील? उ०—होय. पण टिळकांच्या दोन पत्रातून विशेष येत होती.

प्र०—रॅंडसाहेबानंतर दुसऱ्या प्लेगच्या वेळी अशा तक्रारी कमी होत्या? उ०—मला तशी बरोबर तुलना करिता येणार नाही. दुसऱ्या प्लेगच्या वेळी मी तेथे नव्हतो.

प्र०—हळू हळू प्लेगव्यवस्थेचा कडकपणा कमी करण्यात आला की नाही? उ०—सांगता येत नाही. पण दुसरी प्लेग कमिटी नेमल्यानंतर तसे घडले असेल.

प्र०—तुम्ही नवीन व्यवस्था केली ती लोकाना अधिक बरी वाटली की नाही? उ०—मला तशी तुलना करिता येत नाही.

### कार्सन याजकडून फेरतपासणी

प्र०—प्लेगचे मान कमी झाल्यामुळे व्यवस्था ढिली केली असेल? उ०—होय. तसेच असावे.

प्र०—तुम्ही जे भाषण केले व ज्यावर टिळकानी टीका केली ते भाषण सरकारी हुकमावरून केले असेल? उ०—होय. पण ते लिहिले मी.

## ( १२ ) सर एडवर्ड जाइल्स यांची साक्ष

नंतर सर एडवर्ड जाइल्स ह्यांची साक्ष झाली. त्यानी सरतपासणीत सांगितले की " सर्व इलाख्याचा मी शिक्षणाधिकारी होतो. वर्तमानपत्रातील उतारे मजकडे येत. ते मी वाचीत असे. मीहि गावात जाऊन प्लेगची व्यवस्था कशी होते हे पाहिले आहे. सोजीर लोकांची वागणूक फारच ममताळूपणाची होती. ती कशी होती ह्याचे मी वर्णनच करू शकत नाही ! अत्याचार घडले असते तर ते माझ्या कानावर आले असते. शिक्षणाधिकारी म्हणून मलाहि प्लेग वगैरे गोष्टीत लक्ष घालावे लागत असे. शाळातून राजकीय चळवळीचा प्रवेश झाला होता. त्याकरिता मी डेक्कन एज्युकेशन सोसायटीला शिक्षाहि केली. शिवराम महादेव परांजपे हे एका कॉलेजात प्रोफेसर होते. त्याना व दुसऱ्या एका प्रोफेसराला कॉलेजातून काढावे लागले. टिळक तुरुंगातून सुटून आल्यावर मला भेटले होते. त्यांचे संस्कृत हस्तलिखितासंबंधाने माझ्याकडे काही काम होते. ते आणि मी दोघेहि बसून बोलत होतो. मला वाटले टिळक आता राजकारण सोडून देऊन विद्याव्यासंगात पडणार असतील. भेटीचे काम झाल्यावर इतर गोष्टी निघाल्या. त्यात राजकारणाने शाळा बिघडल्याचा मुद्दा निघाला होता. "

सायमन —प्रश्न विचारल्याशिवाय साक्षीदार उगाच लांबलचक गोष्टी कशा सांगत आहे हे कोर्टाने पाहिलेच असेल !

डार्लिंग—सगळ्या सिव्हिल सर्व्हिसच्या लोकाना अधिक बोलण्याची संवयच असते !

प्र०—तुमच्या व टिळकांच्या भाषणात काय निघाले ? उ०—त्यांचे खरे मत चळवळीबद्दल काय होते हे मी काढून घेत होतो.

त्यांच्या मनाला अनेक कप्पे व दालने होती असे मला वाटते. काही वेळानंतर टिळक आवेशात येऊन बोलू लागले. [ या ठिकाणी कोर्टातील काही लोक हसले. तेव्हा जाइल्स साहेब म्हणाले ' माझ्या बोलण्याने लोकांची करमणूक होत आहे ह्याबद्दल मला आनंद वाटतो' ].

प्र०—पण चळवळीबद्दल ते काय म्हणाले ? उ०—टिळक म्हणाले ' हल्लीच्या पद्धतीने चळवळ केली तर फुकट. सरकारच्या मनाला धक्का अधिक बसेल अशी अधिक कडक चळवळ झाली पाहिजे. '

### सर सायमन याजकडून उलट तपासणी

प्र०—पण ही सगळी गोष्ट २० वर्षांपूर्वीची जुनी ? उ०—होय.

यानंतर कमिशनपुढे घडलेल्या पुराव्याविषयी चर्चा सुरू झाली. आणि काही कागद दाखल केल्यावर कोर्टाचे काम संपले.

## दिवस नववा ( १९ फेब्रुवारी १९१९ )

फिरून या दिवशी मुंबईस कमिशनपुढे घडलेल्या निरनिराळ्या लोकांच्या जबान्या प्रतिवादीतर्फे वाचून व चर्चा होऊन दाखल करण्यात आल्या. परंतु निरनिराळ्या लोकांच्या निशाण्या लोकांची नावे त्यातील ग्राह्य अग्राह्य मजकूर वगैरे अनेक किचकट मुद्दे त्यात येणार असल्यामुळे त्याचा तपशील आम्ही येथे देत नाही. प्रतिवादीतर्फे कशा प्रकारचे कागद दाखल करण्यात आले याची कल्पना टिळकांच्या जबानीवरून वाचकास आली असेलच. पूर्वी एके ठिकाणी आल्याप्रमाणे ह्या पुराव्याच्या कागदाच्या भाऱ्यानी कोर्टातील एक सबंध बाक अडून गेले होते. या चर्चेत २–२॥ तास गेल्यावर न्यायमूर्ति डार्लिंग ह्यानी असा निकाल दिला की केवळ कायद्याच्या अनुरोधाने अमुक एका मुद्यावर वादीतर्फे निकाल द्यावा आणि तो मुद्दा बाजूला काढून टाकावा असे मला ज्यूरीला सांगता येत नाही. सहा मुद्यावर वादीने आक्षेप घेतले आहेत. सहा मुद्यावर प्रतिवादीतर्फे आपल्या समर्थनार्थ पुरावा देण्यात आला आहे. यामुळे सहाहि मुद्यांचा निकाल पुरावा लक्षात घेऊन ज्यूरीने अखेर देण्याचा आहे. आता सर एडवर्ड कार्सन ह्यानी ज्यूरीला उद्देशून काय सांगावयाचे ते सांगावे. तेव्हा सर एडवर्ड कार्सन यानी समारोपाच्या भाषणाला सुरवात केली.

## ( १३ ) सर एडवर्ड कार्सन यांचा समारोप

ते म्हणाले "खटला संपत आला याचा मला आनंद होतो. ज्यूरीतील लोकाना असे वाटले असेल की आम्ही खटला उगाच लांबवतो. पण खरोखर तसे नाही. खटला महत्त्वाचा व बराच भानगडीचा आहे. ताईमहाराज प्रकरणासंबंधाने प्रथम इतकेच सांगतो की ते सर्वस्वी खाजगी प्रकरण आहे. त्यात टिळकांच्या राजकारणाचा संबंध नाही. या मुद्याला एका तऱ्हेने टिळकानी उगीचच विशेष महत्त्व दिले आहे. या प्रकरणात फौजदारी व दिवाणी दोहोतील अखेरचे निकाल आपल्यातर्फे झाले आहेत व असे असता आपल्यावर चिरोल साहेबानी व्यर्थ टीका केली असे टिळकांचे म्हणणे. पण हे पुस्तक १९१० साली प्रसिद्ध झाले. त्यानंतर यातील काही निकाल झाले असले तरी काही आधी झाले आहेत. ह्या पुस्तकाच्या आधी न्यायमूर्ति चंदावरकर यानी खालील कोर्टाचा हुकूम अमान्य करून तो फिरविला होता. आणि त्यावरून असे उघड दिसते की ताई महाराजासारख्या अल्पवयी स्त्रीला एका दूरच्या गावी नेऊन टिळकानी आपले वजन खर्चून दत्तविधान करविले. पूर्वीच्या खटल्यात टिळकावर आलेल्या अनेक आरोपांचा चिरोल साहेबानी उल्लेख केला आहे. त्यात केवळ कायद्याच्या दृष्टीने गैर अशी विधाने चुकून झाली असतील. पण ते काही मी व माझे मित्र यासारखे कायदे-

पंडित नाहीत. आरोपांचा उल्लेख केला तसा त्यानी दोषमुक्ततेचाहि उल्लेख केला आहे. तेव्हा त्यात बेअब्रूकारक असे काय घडले ? न्या. चंदावरकरांचा निकाल सारांशरूपाने दिला तो बरोबर दिला की नाही आणि त्यावरून त्यानी केलेली विधाने रास्त होती की नव्हती हेच दोन प्रश्न ज्यूरीपुढे आहेत.

डार्लिंग --शिवाय या विषयाला सार्वजनिक महत्त्व होते की नाही व त्यामुळे चिरोल साहेबानी केलेली चर्चा सार्वजनिक हिताच्या दृष्टीने केली आहे की नाही हाहि प्रश्न राहतोच.

कार्सन १८९७ साली टाइम्सने टिळकांची माफी मागितली. पण तिचा या प्रकरणी टिळकाना काही उपयोग होणार नाही. वर्तमानपत्रे पुष्कळ वेळा पैशाच्या दृष्टीने चालविली जातात. हजारो रुपये खर्चण्यापेक्षा माफी मागितलेली बरी असे टाइम्सला वाटले असेल. शिवाय ग्लोब पत्रातील नुसते उतारे आपण घेतले स्वतःचे म्हणून काहीच लिहिले नव्हते म्हणून माफी मागून टाकून मोकळे व्हावे आणि दगदग वाचवावी असेच टाइम्सला वाटले असेल. खुनाच्या चळवळीचे उत्पादक टिळक होते किंवा त्या चळवळीची व्यवस्था त्यांचेकडे होती असे आम्ही कोठेच म्हटले नाही. आणि तसे असते तर टिळक फाशी जाते हे काय सांगावयाला पाहिजे ? बेअब्रूची फिर्याद करण्याला टिळक जगले ह्याचाच अर्थ टिळक खुनी चळवळीत सामील नव्हते. आमचे म्हणणे इतकेच की, टिळकानी अशा गोष्टीचे जे समर्थन म्हणून केले ते बरोबर नव्हते. कोणाचा हेतू चांगला असेल. म्हणून काय झाले ? परिणाम पहावे लागतात. आणि त्या पुस्तकात मुख्यतः परिणाम लक्षात घेऊनच लिहिले आहे. ग्लोब पत्राने वाह्यात विधाने केली असतील म्हणून माफी मागावी लागली असेल. त्याचे मला काय ? ह्या पुस्तकातील विधाने जपून साधार केली आहेत म्हणून आम्ही माफी मागितली नाही. टिळकानी राजद्रोहाच्या दोन मोहिमा केल्या. एकाच्या शेवटी रँडसाहेबांचा खून झाला. दुसऱ्याच्या शेवटी जॅकसनसाहेबांचा खून झाला. ह्या दोन्ही चळवळीत त्यानी लोकांच्या कानावर विषारी विचारांचा सारखा वर्षाव चालू ठेवला होता. पहिल्यात मुसलमानांचा द्वेष प्लेग व्यवस्थेबद्दलचा क्षोभ दुष्काळाची आपत्ति वगैरे प्रसंग आले होते. रँडचा खून झाला तो वाईट असे त्यानी लिहिले पण तो त्यानी सकारण होता असे प्रतिपादिले. आणि सुटून आल्यावरहि त्यांची मनोवृत्ति कशी होती हे जाइल्स साहेबानी सांगितलेच आहे. दुसऱ्या चळवळीत त्यानी बंगालच्या फाळणीचा फायदा घेतला आणि बाँबगोळ्याचे त्यानी समर्थन केले. याहि प्रसंगी त्यानी सरकारच्या अडचणीचा फायदा घेतला. प्रत्येक राष्ट्रात पाहता चळवळे लोक अशाच गोष्टी करीत आले आहेत. पण मी आपणाला असे विचारतो की अशा एखाद्या चळवळ्या मनुष्याने किरकोळ विधानानी बेअब्रू झाली असा कांगावा करून, नुकसान भरपाई कोर्टात मागितल्याचे उदाहरण आपणाला माहीत आहे

काय ? टिळकांची नुकसान भरपाई योग्य रीतीने ज्याने होईल इतके हलके नाणे जगात आहे असे वाटत नाही ? आपण त्यांच्यातर्फे निकाल देऊन जगाला असे जाहीर करणार काय की टिळकांचे मार्ग बरोबर होते ? टिळकांची अब्रू हिंदुस्थानात किती आहे हे तिकडील एखाद्या कोर्टात ही फिर्याद झाली असती तर त्याना कळून आले असते. आमच्या इकडेहि एखादा मोठा मनुष्य बेअब्रूची फिर्याद करतो. पण त्याचा सगळा जन्म सामान्य रीतीने प्रतिष्ठेने गेलेला असतो. आणि एखाद्या विधानाने त्याच्या अब्रूला जखम होण्यासारखी असते म्हणून. टिळकांच्या अंगावर अशा रीतीने जखम होण्याला जागाच शिल्लक नाही. टिळकांची वर्णने वाचली तर लोकाना असे वाटेल की हिंदुस्थानात वरपासून खालपर्यंत खरा न्याय मिळण्याला कोठे जागाच शिल्लक नव्हती. म्हणे मी गोरक्षणाची चळवळ स्वतः सुरू केली नाही. पण म्हणून काय झाले ? त्या चळवळीचा फायदा घेऊन मुसलमान व सरकार यांच्याविरुद्ध द्वेष उत्पन्न केलाच की नाही ? सरकार मुसलमानाना पक्षपात करते असे लोकाना सांगून टिळकानी दोघांच्याविरुद्ध द्वेष पसरविला व दंगे झाले त्याचे कारणहि तेच. आपल्या देशात नाही का काही वर्तमानपत्रे असे करीत ? प्रथम एखाद्या गोष्टीबद्दल आपणच खोट्या अफवा उठवाव्या व मग फिरून लिहावे की निरनिराळ्या अफवा ऐकून लोक बेदील झाले आहेत. त्यातलाच हा प्रकार ! स्वदेशी चळवळीचीहि तीच गोष्ट. प्लेगचे उपाय अप्रिय होते म्हणतांत ! पण त्या अप्रियतेचा फायदा टिळकानी घेतला इतकेच ह्या पुस्तकात म्हटले आहे. त्यानी लिहिले यापेक्षा अधिक कडक लेख लिहिणे शक्य तरी होते काय ?

## दिवस दहावा–( २० फेब्रुआरी १९१९ ).

गोखल्यांबद्दल इतर काही असो पण चुकीबद्दल माफी मागण्याची तरी त्यांच्या अंगी संभाविती होती. टिळकांचे लेख वाचून त्यांची बुद्धिमत्ता विचारशक्ति यांचे कौतुक वाटते. पण वाईट इतकेच वाटते की त्याचा त्यानी देशाच्या हिताकडे उपयोग केला नाही. दिवाणी कोर्टात प्रथम टिळकाविरुद्ध झालेला दावा प्रिव्ही कौंसिलने अखेर त्याना बहाल केला. पण १८९७ व १९०८ साली ज्या त्याना शिक्षा झाल्या त्यावर अपील होऊन प्रिव्हि कौन्सिलने खालचा निकाल फिरविला नाही. टिळक तुरुंगात गेल्यावर जे झाले ते सर्व परस्पर झाले. त्याकरिता त्याना जबाबदार धरू नका असे सायमन साहेब म्हणतात. पण तसे म्हणून कसे चालेल ? विषवृक्ष लाविला म्हणजे मूळापासून फळापर्यंत एकच झाड ! असो. माझे भाषण फार लांबले त्यामुळे तुम्हाला फार त्रास झाला असेल हे मी जाणतो. पण टिळकानी हिंदुस्तानात फिर्याद मांडली असती म्हणजे सर्वांचाच हा त्रास चुकला असता. तुमच्या पुढे आलेल्या लेखात धर्मकृत्य उत्सव वेद समारंभ वगैरे अनेक अशा गोष्टी आल्या की ज्याची तुम्हाला काहीच माहिती

नाही. पण फिर्यादच येथे झाल्यावर तुम्ही आम्ही काय करणार? हे सगळे लेख वाचून टिळकातर्फे निकाल द्यावा असे तुम्हाला वाटले तर तो खुशाल द्या. खरा तो न्याय कोणाच्याहि पदरात टाकलाच पाहिजे. पण ह्या खटल्याला सार्वजनिक स्वरूप आहे आणि ते महत्त्वाचे आहे हे विसरू नका. कारण तुमच्याकडून अनुकूल निकाल मिळाला म्हणजे तो घेऊन हे हिंदुस्थानात जाऊन लोकाना सांगणार की मी असे बोललो असे लिहिले तरी विलायतेतील ज्यूरीने माझी अब्रू साफ करून दिलीच की नाही? फिरून तसे बोलायला लिहायला मला कोणाच्या देवाची भीति! हिंदुस्थानात गोरे अधिकारी आपले कठीण काम करीत असतात ब्रिटिश सरकार शांतता राखीत असते ह्या सर्वांना तुमच्या अनुकूल निकालाची किती अडचण होईल ही गोष्ट लक्षात ठेवा. मधून मधून राजनिष्ठादर्शक शब्द टिळकांच्या लेखात येतात. पण त्याना भुलून जाऊ नका. पूर्वी ज्याना राक्षस म्हटले त्याच इंग्रजाना १९१४ साली आपल्या कामापुरते टिळकानी स्वातंत्र्यप्रिय इंग्रज असे विशेषण द्यावे हे सरळच आहे. १९१४ सालच्या जाहीरनाम्यात काय पण टिळकाना राजनिष्ठेचा कढ आला होता! जाहीरनाम्यात 'God save the King' एवढेच त्यानी म्हणावयाचे ठेवले होते. पण युद्ध सुरू झाल्यानंतर फिरून त्यांचे वर्तन कसे झाले? तात्पर्य हा सर्व मायावीपणाचा खेळ आहे! १८९३ पासून १९१८ पर्यंतचे टिळकांचे एकंदर चरित्र लक्षात आणा आणि काय द्यावयाचा तो निकाल द्या."

## (१४) सर जॉन सायमन यांचा समारोप

यानंतर सर जॉन सायमन ह्यानी अखेरचे भाषण केले. ते म्हणाले "तुम्हाला श्रम पडले ह्याबद्दल कार्सन साहेबांप्रमाणे मीहि तुमची माफी मागतो. त्यानी तुम्हाला प्रथम एक वेळ सांगितले की "मी बोलून चालून वकील! मी अनुमानाने सर्व विधाने करितो. माझ्या स्वतःचा विश्वास अमुक म्हणून मी तुम्हाला सांगत नाही. वकीलाला निष्ठा कसली?" माझेहि उलट तसेच आहे. मीहि ह्या ठिकाणी वकील म्हणूनच आलो आहे. आपल्या अशीलाची मते किंवा कृत्य ही स्वतःची मते किंवा कृत्य अशी भावना ठेऊन कोणीहि त्याचे समर्थन करीत नसतो. जज्ज काय ज्यूरी काय वकील काय पुराव्याच्या रूपाने पुढे येईल तेवढ्या पुरतेच त्यानी बोलावयाचे. टिळकानी केसरी मराठ्यात इंग्रज सरकाराविरुद्ध लिहिलेले सर्वच लेख इतके कडक तापट निरर्गल लिहिणे हे योग्य होते की नाही असाहि प्रश्न नाही. ज्याच्याविषयी आपल्या मनात प्रेम नाही सहानुभूति नाही किंबहुना अप्रिती किंवा द्वेष आहे अशा मनुष्यालाहि ज्यूरीतील लोकाना नाइलाजाने का होईना पण न्याय द्यावा लागतो. तसेच आपण येथेहि करू. कार्सन साहेबानी शेकडो नावे वाईट वाईट लोकांची म्हणून घेतली. त्यांच्या दुष्कृत्यांचा पाढा वाचला व ते टिळकाशी आणून त्याना भिडविण्याचा प्रयत्न केला. पण ती

सर्व नावे आपणाला विसरली पाहिजेत. तसेच शिवाजीने अफझुलखानाला मारले की नाही किंवा प्रो. गोखल्यानी मागितली तशी माफी मागावयाला पाहिजे होती की नाही हाहि प्रश्न तुमच्यापुढे नाही. चिरोल साहेबांच्या पुस्तकात केलेली विधाने बरोबर आहेत की नाही इतकाच प्रश्न आहे. आतापर्यंत दोन वेळा टिळकाना राजद्रोहाची शिक्षा झाली. ती होवो. चिरोल साहेबांचे त्यांच्या विषयींचे मत कितीहि वाईट असो. पण पुस्तकात लिहिले ते बरोबर की चूक ? व सार्वजनिक हितसंबंध लावून मला टीका करण्याचा अधिकार पोचतो असे चिरोलसाहेबानी कैफियतीत म्हटले आहे तो हक्क त्यानाः कितपत पोचतो ? त्यातील काही गोष्टी सामान्य असल्या तरी फारच वाईट आहेत. सामान्य प्रामाणिकपणाहि टिळकांच्या अंगी नाही असे म्हटलेले ते कसे सोसून घेतील ? शिक्षा देणाऱ्या जज्जानी किंवा सरकारी वकिलानी ज्या गोष्टी टिळकांच्या अंगी लावल्या नाहीत अशा गोष्टी चिरोलसाहेबानी त्यांच्या अंगाला चिकटवल्या आहेत. टिळकांची योग्यताहि चिरोलसाहेबानी लक्षात घेतली नव्हती. सामान्य मनुष्य दोन वेळा कायदे मंडळाचा सभासद कसा निवडून येईल ? जो खुनासारख्या कृत्याना उत्तेजन देईल त्याच्यावर लोकांची निष्ठा कशी बसेल ? ज्या सँडहर्स्टसाहेबानी टिळकाविरुद्ध साक्ष दिली त्यानीच आपल्या हाताने त्यांची नामदारी कायम केली होती. या अनेक लेखातील प्रत्येक शब्द बरोबर आहे असे म्हणण्यासारखा मी अधम नाही. पुराणातील वगैरे उदाहरणे दिल्यावरून कार्सनसाहेबानी टिळकाविषयी फारच कलुषित मन करून दिले आहे. पण दाखले हे पटणारेच घ्यावे लागतात. समजा मी असे म्हटले की, मी कार्सन यांच्यानंतर व न्या. डार्लिंग यांच्यापूर्वी, म्हणजे या दोघांच्या दरम्यान, भाषण करीत आहे म्हणून ही गोष्ट सांगताना मीहि 'I am betwoon tho devil and tho doop sea' असे म्हटले तर मी या दोघावर कोणत्याहि प्रकारचे शिंतोडे उडवितो असे कोणी म्हणणार नाही. रँडसाहेबांचा खून झाला त्याला केसरीतील लेखांचा संबंध याना जोडता आला. कारण प्लेगच्या संबंधात रँडसाहेबांचे नाव वरचेवर येत होते. पण जॅकसनसाहेबांचा खून झाला तर त्यांचे नाव केसरीत कधीतरी आले होते काय ? बरे कोठे पुणे कोठे नाशिक ! या सर्व गोष्टी काय चिरोलसाहेबाना माहित नव्हत्या? बरे. मुलानी गुन्हा केला म्हणजे आपल्या गुन्ह्याला ती दुसऱ्या कोणाचे तरी कारण लावतात ही रीतच आहे. आपल्या देशात असेच घडत नाही काय? तू चोरी का केलीस असे विचारले म्हणजे सांगतात 'सिनेमातील चित्रे पाहिली आणि आणामाल्यातील कादंबऱ्या वाचल्या त्यामुळे चोरीची कल्पना सुचली.' जबान्या घेताना याच मुलानी एकदा एक एकदा भलते असे वाटेल ते सांगितले आहे. चिरोलसारख्या सूक्ष्म दृष्टीच्या मनुष्याला ही गोष्ट उमजल्याशिवाय राहिली नसेल. कित्येक सन्मान्य लोकहि टिळकांच्या लेखाना नावे खचित ठेवतील. तरी पण चिरोलसाहेबानी ज्या गोष्टी

घडल्याबद्दल लिहिले आहे ह्या सर्व खऱ्या असतील असे ते कधीहि म्हणणार नाहीत.

## दिवस अकरावा-( २१ फेब्रूआरी १९१९ )

" आज बहुधा हा खटला संपावा अशा बेतानेच मी माझे भाषण आवरते घेणार आहे. ह्या खटल्याच्या चतुःसीमेबाहेर अनेक गोष्टी आम्हाला महत्त्वाच्या अशा असतील. आणि आपले साम्राज्य टिकावे अशीहि तुम्हा आम्हाला काळजी वाटत असेल. तथापि यावेळी तुमचे काम पुढे आलेल्या प्रकरणात न्याय देण्याचे आहे. टिळक हे एका उच्च जातीतील गृहस्थ आहेत. त्यांच्या राष्ट्राने ऐतिहासिक लौकिक मिळविला आहे. अशा मनुष्याच्या बेअब्रूचा प्रश्न असता सूक्ष्मदृष्टीनेच पाहिले पाहिजे. पहिला बेअब्रूचा मुद्दा गोरक्षण हिंदुमुसलमान वगैरे संबंधाचा आहे. येथे टिळकानी धर्माच्या भावनेने गोरक्षणाचा व हिंदुधर्माचा पुरस्कार केला नाही म्हणणे निवळ बेअब्रूकारक आहे. तुमच्या लिव्हरपूल शहरात प्राटेस्टंट व रोमन कॅथॉलिक हे एकत्र रहात असले आणि एखाद्याने प्रॉटेस्टंट धर्माचा उद्योग आरंभिला व एखादी संस्था काढली तर ती कॅथॉलिक लोकांचा अपमान करण्याकरिता काढली असे कोणी म्हणेल काय ? टिळकांच्यावर नसते आरोप लादले हीच बेअब्रू. पण गोरक्षणासारख्या संस्था टिकळानी स्वतः काढल्याहि नाहीत. मनात धर्मबुद्धि नसता धर्मबुद्धीचे सोंग घेऊन इतर हेतू साधले असे आरोप करणे हेच बेअब्रूकारक आहे.

शिवाजीउत्सवासंबंधाने तीच गोष्ट. जे लेख तुम्हापुढे प्रतिवादीतर्फे आले त्यात ऐतिहासिक विवेचन किती आहे हे पाहिलेच असेल. शिवाजी म्हणजे आधुनिक कालातील एक विभूति. त्याने एक मोठे राज्य स्थापले. त्याचा उत्सव करू नये तर कोणाचा ? गणपति उत्सवाचीहि तीच गोष्ट. सर्वांनी टिळकावर निरनिराळे आक्षेप घेतले त्याना या लेखातच टिळकानी उत्तर दिले आहे. या धर्मातील काही गोष्टी मुसलमानाना आवडत नसतील. पण असा कोणता धर्म आहे की ज्यातील सर्व गोष्टी दुसऱ्या धर्माला आवडतात ? पण म्हणून दुसऱ्या धर्मातील लोक दुखावतील ह्या सबबीवर आपल्या धर्माची निष्ठा कोणी सोडली आहे काय ? दंगे झाले असे दाखविण्यात आले. पण दंग्यांचे मूळ कसे असते हे आपणाला ह्या देशात माहित नाही काय ? दोन हाताशिवाय टाळी वाजत नाही. सरकारने दंग्यानंतर ठराव प्रसिद्ध केला त्यात दोन्ही बाजू दिल्या आहेत. सरकारचा हा ठराव चिरोल साहेबाना कसा मिळाला नाही ? आणि बाकीचे कागद तेवढे कसे मिळाले ? गोरक्षणाची चळवळ हेच काही दंग्याचे मूळ नव्हे असा अभिप्राय खुद्द गव्हर्नरानी दिला आहे. आता बेअब्रूचा दुसरा मुद्दा घेऊ. तो आखाडे तालीम वगैरेसंबंधाचा. या बाबतीत नातूबंधूंचा व टिळकांचा नसता संबंध जोडला आहे. आणि का ? तर नातूबंधूना १८९७ साली कैदेत टाकले होते

म्हणून. टिळकानी स्वतः आखाडे काढले नव्हते. व त्याना मदत केली ती वाईट हेतूने केली यासंबंधी प्रत्यक्ष पुरावा आलेला नाही. इकडे चिरोल साहेब टिळकाना मोठे बुद्धिवान म्हणतात. आणि त्यांच्यावरच पोरांच्या आधारावर इंग्रजी राज्य उलथून पाडण्याच्या प्रयत्नांचा ते आरोप करितात ही गोष्ट किती भलेपणाची आहे ? चिरोल साहेबासारख्या चिकित्सकाला असली गोष्ट पटावी हे आश्चर्य आहे. पैलवान तालीमबाज हे लोक हिंदुस्थानातील समाजाचे एक प्रकारचे कायमचे अंगच होते. त्यातूनहि नातूनी टिळकावर ग्रामण्य केले ही गोष्ट शाबित असता त्यांच्या मदतीने टिळकानी आखाडे वगैरे काढले असे चिरोल साहेब म्हणतात! एका सभेचे अध्यक्ष नातु होते व तेथे टिळकानी ठराव मांडला एवढ्यावरून त्यांचा संबंध कितीसा असू शकतो ? आता तिसरा मुद्दा घेऊ. काय म्हणे टिळकानी कोरडे ओढून चळवळीला पैसे काढले ! टिळकांचे काही लेख वाईट असतील. मी म्हणतो एखाद्या चांगल्या वकीलानेहि त्याचे समर्थन करण्यास उभे राहू नये असेहि असतील. पण म्हणून त्यामुळे चिरोल साहेबाना त्यांच्या संबंधाने इतर काय वाटेल ते आणि वाटेल तितके लिहिण्याला मोफत सनद मिळाली असे होते की काय? 'कोरडे' हा शब्द जरी अक्षरशः घ्यावयाचा नाही तरी ह्या शब्दातून निघणारा ध्वनि बेअब्रूकारक आहे. पार्लमेंटात कोणी फ्रीट्रेडर असतो. कोणी टॅरिफ रिफॉर्मर असतो. जो तो आपले मत मांडताना दुसऱ्यावर काय कमी कोरडे ओढतो ? म्हणून ते आपल्या पक्षाकरिता या कोरड्याच्या मदतीने जबरीखाली वर्गण्या गोळा करितात असे म्हणता येईल काय ? एखाद्या वाईट माणसानेहि बेअब्रूची फिर्याद केली तरी तिचे समर्थन करण्याला उभे राहिल्यावर तो असा तसा वाईट आहे असे नुसते म्हणून भागत नाही. तर तुम्ही जे शब्द बोलता ते शब्द शाबीत करावे लागतात. स्वदेशीचे व्रत व ते न पाळल्याबद्दल होणारी शिक्षा असल्या गोष्टी मोठ्या वाईट व अद्भुत आहेत असे तुम्हाला वाटेल. पण अशा गोष्टी आपापल्यापरीने प्रत्येक देशात असतातच. चुडेमंगळसूत्र हेहि स्वदेशी असावे नाहीतर लग्नाचे परिणाम अशुभ होतील असे केसरीत कोणी लिहिले ते मात्र दूषणार्ह ! पण तुमच्या ह्या देशात कितीतरी अशा स्त्रिया आढळतात की मे महिन्यात अगर शुक्रवारी लग्नविधि करणे हे त्याना अशुभकारक वाटते? आयर्लंडात स्वदेशी वस्त्र न वापरता लग्न लागले तर बायकाना जन्मभर वाइट वाटते की नाही ? तात्पर्य ह्या ज्याच्या त्याच्या भावनेच्या गोष्टी आहेत. त्याला अद्भुत म्हणून दुसऱ्याने नावे ठेऊन काय उपयोग ? बरे टिळकानी हे सर्व केले ते स्वदेशाचे हित व्हावे अशाच हेतूने की नाही ? बंगालची चळवळ घेतली तरी काय दिसते ? तिच्यात कोणकोणत्या गोष्टी घडल्या हे अगदी कार्सन साहेबानी समजावून सांगितले. आणि फिरून म्हणण्याला ते तयारच की फाळणी म्हणजे येऊन जाऊन काय ? एका प्रांताचे राज्यव्यवस्थेकरिता दोन भाग केले इतकेच ! पण एका राष्ट्राची दोन राष्ट्रे करणे ही किती दुःखाची व रागाची गोष्ट असते हे

इकडेहि आपल्याला माहित नाही असे नाही. स्वदेशी चळवळ सुरू झाली ती फाळणीच्या चळवळीत. ती टिळकानी मूळ उत्पन्न केली नाही. फाळणी केलेल्या बंगालच्या लोकांच्या भावना काय असतील त्या तुम्हा आम्हाला येथे काय कळणार?

डार्लिंग—पण स्वदेशी ही स्वराज्य मिळविण्याची एक पायरी असे टिळक म्हणत असल्याचा पुष्कळ पुरावा पुढे आला आहे. स्वराज्य म्हणजे पूर्ण स्वातंत्र्य आणि ते मिळविण्याच्या प्रयत्नात जर्मन व फ्रेंच माल लोकानी घेतला तरी चालेल पण इंग्रजांचा घेऊ नये असे टिळकानी लोकाना सांगितले?

सायमन—ते असेल. पण स्वदेशी ही फाळणीच्या गोष्टीतून निघाली एवढेच मी सांगितले. ही फाळणी अखेर बादशाहांना रद्द करावी लागली. स्वदेशीचे लेख हे ह्या फाळणीच्या काळातीलच आहेत हे लक्षात ठेवा. स्वराज्य म्हणजे स्वातंत्र्य असे नाही तर साम्राज्यातील स्वराज्य ही गोष्ट पुढे आलेली आहे. लेखात व टिळकांच्या जबानीतहि आहे. कोणत्याहि ठिकाणी मोठ्या चळवळीतून लहान सहान अत्याचार असे होतातच, की त्यांचा अर्थाअर्थी त्या चळवळीशी काही संबंध दाखविता येत नाही आणि नसतोहि. आजच युरोपात काय झाले आहे पहा! शांतता प्रस्थापित करण्याकरिता म्हणून लोक जमले व त्यांचा जीव घेण्याचा प्रयत्न झाला. समजा याला उद्देशून एखाद्या फ्रेंच वर्तमानपत्राने असे लिहिले की ही 'गोष्ट होणार हे ठरलेलेच होते. तुम्ही लोकावर हल्ले केले तर लोक सूड घेतल्याशिवाय कसे राहतील?' तर तुम्ही त्या दंग्याबद्दल त्या वर्तमानपत्राला जबाबदार धराल काय? याहून अधिक निकटसंबंध येतो असे म्हणावयाचे असेल तर तो शाबीतच करावा लागेल. यानंतर आपण ताई महाराजांच्या खटल्याचा मुद्दा घेऊ. चिरोल साहेबानी सांगितले आहे की आपण हिंदुस्थानातील असंतोषाचे मर्म हुडकून काढण्याकरिता गेलो. अर्थात रँड साहेबांचा खून इत्यादिकासारख्या गोष्टी त्या पुस्तकात आल्या तर ते एक असो. पण टिळकानी आपल्या ताब्यातील एका स्त्रीला फसविले आणि सामान्य प्रामाणिकपणाहि दाखविला नाही असल्या व्यक्तिविषयक गोष्टींचा उल्लेख अशा मोठ्या पुस्तकात यावा काय? उद्या आयर्लंडातील अशांततेची मीमांसा करण्याकरिता कोणी गेला आणि एखाद्या आयरिश गृहस्थाच्या खाजगी गोष्टींचे उणे त्याने काढले, स्थूल राजकारण सोडून एखाद्या व्यक्तीला अप्रामाणिक म्हटले, तर ते कसे दिसेल? ताईमहाराज खटल्यासंबंधाने लिहिताना सर्व कच्ची हकीकत न देता चिरोल साहेबानी चंदावरकरांच्या निकालाचा उल्लेख केला आहे. पण नुसत्या न्यायाधीशाच्या निकालात खटल्याची सर्व हकीकत येऊ शकत नाही. म्हणून खटल्याची हकीकत देताना जर चूक झाली तर त्या चुकीचे समर्थन करण्याकरिता न्यायमूर्तीच्या निकालाकडे बोट दाखविता येत नाही असे हाऊस ऑफ लॉर्डसने इकडेहि ठरविले आहे. टिळकांच्या जागी तुम्ही असता तर तशा परिस्थितीत त्यानी आपले वजन खर्च केले तसे करावे लागते की नाही हे कळून आले

असते! प्रश्न इतकाच की असे करण्यात प्रामाणिकपणा होता की नाही? अधिकाऱ्यानी टिळकावर फौजदारी खटले केले. त्यातून ते दोषमुक्त झाले. तरी 'तुमच्यावर खटला झाला होता की नाही' असेच तुम्ही म्हणत राहणार की काय? पण चिरोल साहेबानी टिळकाबद्दल अशा गोष्टी लिहिण्याचे कारण हेच की सार्वजनिक दृष्ट्या टिळकाबद्दल त्यांच्या मनात विद्वेष उत्पन्न झाला होता. ह्या मुद्यावर प्रतिवादीला काहीच समर्थन करता आलेले नाही. म्हणून टिळकातर्फे तुम्हाला निकाल करावा लागेल. आणि तसे न केले तर काय परिणाम होईल पहा! चिरोल साहेब म्हणणार "मी टिळकांचे सार्वजनिक चरित्र इतके दूषणार्ह ठरविले की त्यांच्यासंबंधाने मी काय वाटेल ते खाजगी स्वरूपाचे लिहिले तरी ब्रिटिश ज्यूरीने माझ्यासारखा निकाल दिला!" पण ब्रिटिश ज्यूरीच्या शीलाला झोंबणारी अशी ही गोष्ट नाही काय?

इतका वेळ पहिले चार मुद्दे झाले. यापुढे आता जॅकसन साहेबांच्या व रँडसाहेबांच्या खुनाचे मुद्दे एकत्र घेतो. वास्तविक एका खुनाशी कोणाचा संबंध जोडता आला तरी त्यामुळे दुसऱ्याहि एका खुनाशी त्यांचा संबंध पोचतो हे म्हणणे बेकायदेशीर ठरते. तथापि दोन्ही एकत्र घेण्यात मला हरकत वाटत नाही. कारण दोन्ही आरोपात काहीच तथ्य नाही. कारण चिरोलसाहेबानी जॅकसनच्या खुनासंबंधाने लिहिताना ती रँडच्या खुनाची आवृत्ति असे म्हटले आहे. रँडखुनासंबंधाने कार्सनसाहेबानी किती तोंड सोडले होते ते आपण पाहिलेच असेल. पण टिळकांचा एकंदर दर्जा, प्लेगसारख्या दिवसात त्यानी केलेली लोकहिताची कामे, आणि त्याकरिता हायकोर्टानेहि शिक्षा देताना त्यांची केलेली वाखाणणी वगैरे गोष्टी तुम्ही लक्षात घेतल्या म्हणजे, त्यांच्या हातून रँड साहेबावर टीका झाली तरी तिचा खरा उद्देश काय होता हे लक्षात येईल. अशा कडक टीकेला कारणे किती सबळ होती हेहि लक्षात आणा. अशी कारणे दिसून आल्याशिवाय इंग्रज सिव्हिलिअन व सोजीर लोक यांच्यावर टिळकानी केलेल्या टीकेचे समर्थन मी कसे करीन? लष्करी अधिकारी खुनशीपणाने वागत नव्हते. पण ज्याना प्लेग झालेला नाही अशा लोकाना सेग्रिगेशन कँपात नेणे हे त्यांचे कृत्य लोकाना कितपत आवडेल! आणि राग आला म्हणजे मनुष्य अतिशयोक्ति करीतच असतो. शिवाय अशा प्रकारच्या लेखात दोन प्रकारचा विचारप्रवाह असतो. एका दृष्टीने प्लेगच्या अधिकाऱ्यावर टीका करीत असता दुसऱ्या दृष्टीने प्लेग हटावा म्हणून योग्य उपायांची सक्ति आपण सोसली पाहिजे असाच लोकाना ते उपदेश करीत. चाफेकरांचे दोन जबाब पाहिले तर त्यात त्यानी केव्हाहि टिळकांच्या नावाचा उल्लेखहि केला नाही किंवा केसरी मराठ्याचे नावहि घेतले नाही. असे असताना टिळकाना उद्देशून ह्या पुस्तकात कसे लिहिले आहे हे तुम्ही पाहिलेच असेल. ( ह्या ठिकाणी चाफेकरांचे जबाब ज्यूरीला वाचून दाखविण्यात आले. ) ह्या जबाबात काय काय

असंबद्ध विधाने केली आहेत. ह्याचा विचार तुम्हीच करा. खुनी लोक पकडले म्हणजे ते काय वाटेल ते बोलत सुटतात. चाफेकर काहीहि बोलो. पण त्याचा टिळकाशी संबंध येत नाही इतकेच मला दाखवावयाचे आहे. बरे चाफेकराचे आत्मचरित्र पाहावयाला द्या अशी टिळकानी विनंति केली ती मान्य करण्यात आली नाही. आणि चिरोल साहेबाना मात्र सरकारने ते कागद दाखविले! १९०८ च्या खटल्याचेंहि असेच आहे. ज्यूरीला लेख राजद्रोही वाटले टिळकाना शिक्षा झाली ह्या सर्व गोष्टी असोत. परंतु त्या लेखामुळे बंगाल्यात बॉंब झाले किंवा त्यानंतर झाले असते ह्या म्हणण्याला काही आधार नाही. आणि चिरोल साहेबानी असे निराधार लिहिले म्हणूनच टिळकांचा दावा तुम्ही दिला पाहिजे. जॅकसनच्या खुनाच्या वेळी टिळक तुरुंगात होते एवढ्यावरून तरी टिळकांचा त्या खुनाशी काही संबंध पोचत नाही एवढेच मी म्हटल्याचे कार्सन साहेब तुम्हाला भासवितात. पण तसे नव्हे. जॅकसन साहेबासंबंधाने केसरीत कधीहि प्रतिकूल विधान आलेले नाही.

उलट नाशिकच्या मुलाना टिळकानी सदुपदेश केल्याचा पुरावा झाला आहे. वर्तमानपत्रातील लेखावरून जॅकसनला मारण्याची कल्पना सुचली असे कान्हेरेहि म्हणत नाही. कर्वे नांवाच्या एका मित्राच्या सांगण्यावरून आपण हे केले असे तो स्पष्ट म्हणतो. उलट जॅकसन साहेबाला मी विनाकारण मारले असा खेदच तो प्रदर्शित करतो. ह्या खेदाचे कारण असे की जुलमाचे प्रकार वर्तमानपत्रात वाचून राग आला. पण जॅकसन साहेबाचा खून करणे हा काही त्याच्या प्रतिकाराचा उपाय नव्हता. तात्पर्य हे सहा मुद्दे असे आहेत. नुकसान भरपाई संबंधाने माझे म्हणणे असे की तुमच्या निकालाकडे ब्रिटिश साम्राज्यातील पुष्कळ लोकांचे डोळे लागून राहिले आहेत. कारण ब्रिटिश ज्यूरीकडून न्याय निःपक्षपातीपणाने मिळतो अशी त्यांची समजूत आहे. काही लोक ब्रिटिश न्यायदेवतेला नावे ठेवणारेहि आहेत. अशा लोकांची विचारसरणी चूक आहे. कारण इंग्लंडात कोणीहि कोटलाहि मनुष्य कोणत्याहि जातीचा व धर्माचा असो तो न्याय मागेल तर तो त्याला अवश्य मिळतो अशी ही आपली संस्था आहे. टिळक पैशाच्या रूपाने नुकसान भरपाई मागत असले तरी खरोखर त्याना पैसे नकोत. तुमचा निकाल पाहिजे. चिरोल साहेबानी माफी मागून एखाद्या हिंदी फंडाला वर्गणी दिली असती तर त्यांचे नुकसान भरून पावले असते. पण तसे न करिता त्यानी जबानीत असे सांगितले की मी एकहि शब्द परत घेत नाही. तेव्हा नुकसान भरपाई करून देणे प्राप्तच. तरीपण ही नुकसान भरपाई पैशाच्या दृष्टीने माफक असली तरीहि आमचे काही म्हणणे नाही. टिळकांवर आलेल्या दोषारोपाचे निराकरण व्हावे इतकाच त्यांचा हेतू आहे.

## ( १५ ) न्या० डार्लिंग यांचा समारोप

यानंतर डार्लिंग साहेबानी ज्यूरीला खटला समजावून सांगितला. ते म्हणाले "हा खटला बेअब्रूचा आहे. अब्रू ही कोणालाही आपल्या मुलाइतकी किंबहुना अधिक प्रिय असते. एखादा वाईट मनुष्य असला व त्याच्यासंबंधाने खोटी विधाने केली तरी ती त्याची बेअब्रू होय. वाईट मनुष्यालाहि अब्रू असते. आता टिळकांच्या अब्रूसंबंधाने पहिली गोष्ट ही की त्याना दोन वेळा राजद्रोहाची शिक्षा झाली आहे. आणि मला कोणी राजद्रोही म्हटले तरी माझी बेअब्रू झाली अशी तक्रार मी करणार नाही असे स्वतः टिळकानीच सांगितले आहे. पण राजद्रोह हा काही गुन्हा लहान नाही. Treason च्या खालोखाल तो वाईट गुन्हा होय. Treason म्हणजे राजाविरुद्ध बेइमानी करणे किंवा हत्यार उचलणे. Treason मध्ये राजद्रोही मनुष्याने प्रत्यक्ष काही कृत्य केले असे दाखवावे लागते. पण हिंदुस्थानात म्हणजे जेथे अस्वस्थतेचा बुजबुजाट झाला आहे तेथे बॉंब पडले हे राजद्रोहाचेच प्रत्यक्ष फल असे म्हणावयास काय हरकत ? बेअब्रूची म्हणून जी वाक्ये पुढे आणली आहेत ती सर्व सारख्या वजनाची नाहीत. सर जॉन सायमन ह्यानी तुम्हाला बजाविले आहे की वादी तुमच्या देशातील नाही, तरी पण तुम्ही न्याय देण्याचे धैर्य दाखविले पाहिजे. पण मी म्हणतो इंग्रजाची रीतच अशी की तो केवळ आपल्या मित्रालाहि अन्याय करील पण परकीयाला केव्हाहि करणार नाही. इंग्रजासारख्या उदार हृदयाच्या लोकांचे हेच ब्रीद आहे. असो. बेअब्रूचे सहा वेगळे मुद्दे करू म्हटले तरी त्यात अर्थ नाही. सहा वेगवेगळे म्हटले काय किंवा एक म्हटला काय तात्पर्य एकच. बेअब्रू ह्या शब्दाचा अर्थ स्पष्ट करून सांगावयाचे कारणच नाही. आणि खरोखर चिरोल साहेबांच्या लेखानी टिळकांची बेअब्रू झाली की नाही हे तुमचे तुम्हीच ठरवावयाचे आहे. हा अधिकार ज्यूरीला १८ व्या शतकात मिळाला. कारण न्यायाधीश लोक इतर लोकांच्या इतका व्यापक विचार करीत नसत. ज्यूरी ही लोकांची प्रतिनिधि. म्हणून जसे लोकमत तसे ज्यूरीचे मत असले पाहिजे. कारण लोकातूनच ज्यूरी निवडली जाते. आक्षेप घेतलेल्यापैकी काही उतारे बेअब्रूकारक नाहीत, तरी काही उतारे आक्षेप घेता येतील असे खचित आहेत. पण पुरावा देऊन प्रतिवादीला बाजू परतविता येऊ शकते. तरीपण १०० तील ९९ गोष्टी शाबीत केल्या व एक शाबीत करिता आली नाही तरी फिर्याद लागू होते. म्हणून प्रतिवादीने पुराव्याने बाजू परतविली की नाही व शाबीत न केलेले एखादे विधान उरते की काय हे तुम्ही ठरवा. पण प्रतिवादीचा दुसरा मुद्दा असा आहे की जे लिहिले ते सर्व सार्वजनिक महत्त्वाच्या विषयांची चर्चा करण्याच्या बुद्धीने लिहिले. टिळकांची बेअब्रू करण्याची बुद्धि त्यात नव्हती. कायद्याच्या दृष्टीने मी असे म्हणतो की चिरोल साहेबांचे लिहिणे सार्वजनिक महत्त्वाचे. पण केलेली टीका रास्त

होती की नाही हे ठरविणे तुमचे काम आहे. एकवेळ रागाने टीका केली म्हणून ती गैर आहे असे ठरत नाही. कोणत्याहि वादाला दोन बाजू असतात. कारण असेहि होऊ शकते की अगदी कडाक्याने वाद झाला तर तिऱ्हाईत असेहि म्हणू शकेल 'हे भांडले पण दोघेहि रास्तपणाचेच बोलले.' एकाच पुस्तकावर निरनिराळ्या वर्तमानपत्रांचे अभिप्राय येतात. असे असताहि दोघाही टीकाकारानी केवळ सरळ मनाने टीका केली असे देखील असू शकेल. अर्थात पुस्तकावर कोणी अभिप्राय वाईट दिला म्हणून बेअब्रूची फिर्याद होऊ शकत नाही. टीकाकाराचा हेतू काय होता हे पहावे लागते. एखाद्या चित्राला बरे वाईट म्हणण्याचीहि गोष्ट अशीच आहे. टीका बरोबर की चूक ह्यापेक्षा सुबुद्धीची की दुष्ट बुद्धीची हे पहावे लागते. खटल्यासंबंधाने सामान्यतः रिपोर्ट किंवा सारांश एकंदरीने बरोबर असला म्हणजे भागते. रिपोर्ट वाचून लोकांची कल्पना होईल त्याविरुद्धच कदाचित खटल्याचा निकाल होतो. पण तो रिपोर्ट छापणाराचे नशीब खटल्यातील निकालावर अवलंबून नसून त्याने दिलेली हकीकत बरोबर होती की नाही इतकेच पाहून निकाल द्यावयाचा असतो. प्रिव्ही कौंसिलाने टिळकाना अखेर खरे ठरविले म्हणून, चंदावरकरांच्या निकालाचा सारांश चिरोल साहेबानी जर बरोबर दिला असेल तर, त्यांच्यावर फिर्याद लागू शकत नाही. हिंदुमुसलमान यांचे संबंध लक्षात घेता जे लेख तुमच्यापुढे वाचून दाखविण्यात आले त्यावरून चिरोल साहेबाचे लिहिणे बरोबर होते की नाही ते ठरवा. टिळकानी पुस्तकातील वाक्ये उडत उडत घेतली आहेत. त्यांच्यावर दोषारोप करणारी काही वाक्ये बेअब्रूकारक नाहीत हे म्हणणे गैर नाही. असे का? तर वगळलेली कित्येक वाक्येहि आक्षेप घेतलेल्या कित्येक वाक्यापेक्षा अधिक बोचणारी आहेत. विद्यार्थ्यासंबंधाने काय काय घडले हे तुम्ही वाचलेच. असे असता टिळक स्वतः प्रत्येक शाळेत गेले व आपल्या हाताने हस्तपत्रके वाटली हे शाबीत झाले नाही. म्हणून त्यानी मुलाना चिथावले हे म्हणणे बेअब्रूकारक होते काय? कोणताहि मतप्रसार कसा होत असतो हे तुम्हाला माहितच आहे. जर्मनीने अमेरिकेत व बोल्शेव्हिक लोकानी रशियात मतप्रसार कसा केला हे मी काय सांगावयास पाहिजे? शिवाजी–गणपति उत्सव कित्येक लोकाना आवडत नव्हते ही गोष्ट खरी. पण इतर पुष्कळाना ते आवडत होते. कोल्हापूरच्या महाराजांचे व ह्यांचे बनत नव्हते म्हणून ते त्याविरुद्ध असतील. शिवाजी उत्सवाचा हेतू कीर्ति गाण्याचा. मग महाराजाना ह्या उत्सवात भाग घेण्यास हरकत नव्हती. स्वदेशीच्या बाबतीत प्रत्येक देशात व्यापार खुला असावा की संरक्षित असावा असा वाद असतो हेच खरे. पण खुला व्यापार असावा म्हणणारे लोक परदेशी वस्तूंची होळी करतात काय? फ्रान्स जर्मनी अमेरिका येथून आलेल्या वस्तूंच्या होळ्या आपल्या देशात कधी झाल्या काय? पण टिळकांचा कटाक्ष फक्त विलायती वस्तूवरच होता. स्वराज्य याचा अर्थ साम्राज्यातील स्वराज्य असा टिळकानी सांगितला खरा. पण

त्यांच्या सर्व लेखातून केवळ हाच अर्थ प्रस्थापित होत नाही. अर्थात टिळकानी आपल्या साक्षीत तसे सांगितले म्हणून तेवढ्यावर विश्वास कसा ठेवावा? येथे फिर्याद जिंकावयाची म्हणून त्यानी तसे सांगितले असेल. मोंगलांच्या इतके सैन्य इंग्रजांचे हिंदुस्थानात नाही हे लोकाना सांगण्यात टिळकांचा काय हेतू असावा? कारण मोंगलांचे इतके मोटे सैन्य असता मराठ्यानी स्वराज्य स्थापिले असा इतिहास आहे. आखाड्याचा उपयोग केवळ क्रिकेटच्या क्लबाप्रमाणे टिळकाना करावयाचा होता की इतर काही कामाकरिता हे तुमचे तुम्हीच ठरवा. लोकावर कोरडे ओढून वर्गण्या जमविल्या ह्या गोष्टीचा खुलासा चिरोलसाहेबानी केला. तो सर जॉन सायमनसारख्या कुशल वकिलालाहि उलटविता आला नाही. टिळकानी नाशिकच्या मुलाना सदुपदेश केला खरा. पण तो तात्पुरता असे दिसते. टिळकांच्यावर खोट्या साक्षीचा आरोप शाबीत झाला म्हणून इतर आरोप काढून घेण्यात आले. पण पुढे त्या खटल्यातील शिक्षा रद्द झाली. त्यामुळे इतर आरोप चौकशीला पाठविले नव्हते असे ठरते काय? प्रिव्हि कौंसिलने टिळकांचा पुरावा मान्य केला हे खरे. पण हिंदुस्थानात खोटी साक्ष देण्याचा कट करून साक्षीदार मथून साक्ष देतात ही गोष्ट प्रसिद्धच आहे. चंदावरकरानी त्या पुराव्यावर भरंवसा ठेवला नाही. निदान हे पुस्तक प्रसिद्ध होईपर्यंत तरी ती स्थिति कायम होती. तात्पर्य या प्रकरणासंबंधाने चिरोल साहेबानी लिहिले ते बदनामीकारक नव्हते असे मला वाटते. पण तुम्ही काय ते ठरवा. मनुष्याचा प्रामाणिकपणा पैशाखेरीज इतरहि रीतीने पाहता येतो असे चिरोल साहेबानी म्हटले आणि ते बरोबर आहे. Honesty and Probity असे दोन शब्दहि वेगवेगळे आहेत. सोजीर व लष्करी अधिकारी याना राक्षसाची उपमा दिली आहे. उपमेच्या अर्थानेच तो शब्द घ्यावयाचा हे म्हणणे गैर आहे. कारण इंग्रज सरकारच्या लष्करात प्रत्यक्ष राक्षसाना अधिकारी नेमलेले नाही! पण नुसत्या उपमेवरून तरी काय सिद्ध होते? आणि सोजीराना राक्षसाची उपमा देणारा गृहस्थ तुमच्याकडून येथे नुकसानीची भरपाई मागत आहे! प्लेगच्या तक्रारी प्लेग कमिशनच्या रिपोर्टाने खऱ्या ठरविल्या असे टिळकानी सांगितले. पण तो रिपोर्ट हा येथेच आहे. व सर जॉन सायमन ह्यानाहि तो उल्लेख त्यात काढून दाखविता आला नाही. या मानीव जुलमाचे वर्णन टिळकांच्या पत्रात वरचेवर येई. ह्याचा स्वाभाविक परिणाम काय व्हावयाचा तो झाला असे चिरोल साहेबानी म्हटले यात काय चुकले? पण अशा लिहिण्याने बदनामी झाली की नाही हे तुम्हीच ठरवावयाचे आहे. टिळकांचा खुनाशी संबंध जोडता आला नाही हे खरे. पण त्यांची जबाबदारी इसापनीतीतील गोष्टीवरून ठरते. त्यातील एका गोष्टीत असे लिहिले आहे की शत्रूच्या सैन्याने प्रतिपक्षाच्या तुतारीवाल्याला पकडले. तेव्हा तो म्हणाला "मला का मारता? माझ्या हातात तरवार नाही फक्त तुतारी आहे. मी कोणालाहि मारले

नाही." त्यावर सैनिक म्हणाला "अरे तुझी तुतारी ही तरवारीपेक्षाहि अधिक वाईट ! कारण तू तुतारी वाजवून आमच्या शत्रूना हुरूप आणली नसतीस तर ते आमच्यावर तुटून पडले नसते." तोच न्याय येथे लागू करण्यासारखा आहे. रँडसाहेबानी घटकाभर समजा जुलूम तरी केला होता. पण जॅकसन साहेबानी काय केले होते? 'काळ व राष्ट्रमत' ह्या वर्तमानपत्रांचा केसरीबरोबर कान्हेरे याने उल्लेख केला होता. पैकी 'काळ' व 'राष्ट्रमत' ही दोन पत्रे प्रत्यक्ष टिळकांची नव्हती तरी त्या पत्राशी व त्यांच्या संपादकाशी त्यांचा मोठा स्नेहसंबंध होता ह्याचा पुरावा आला आहे. अर्थात त्या दोन पत्रानाहि ती टिळकांची असे पर्यायाने म्हटले यात काय चूक? कान्हेरे फाशी गेला व टिळकाना फक्त राजद्रोहाची शिक्षा झाली. यावरून सर जॉन सायमन हे फरक दाखवू इच्छितात. बरोबरच आहे. प्रत्यक्ष खुनाचा खटला करण्याला जो पुरावा लागतो तो सरकारपाशी नव्हता. मग ते खुनाचा खटला कसा भरणार? पण खुनाच्या साथीदारीचे प्रकार निरनिराळे असतात. 'ऑलिव्हर ट्विस्ट' नामक कादंबरीत 'फेगन' नावाच्या मनुष्याने चौर्यकर्म शिकविण्याची शाळा काढल्याची गोष्ट आहे ती तुम्ही जाणताच. फेगन याचा एक शिष्य फेनियन याने प्रत्यक्ष चोरी केली खरी. आणि त्याला चोरीबद्दल शिक्षा झाली. पण त्याच्या गुरूलाहि ती शिक्षा व्हावयाला नको होती काय? टिळक हे खुनी लोकांचे तुतारीवाले होते. अर्थात त्यांच्या हाती तुतारीच होती. तरवार नव्हती. आणि चिरोल साहेबानीहि जवळजवळ तसेच म्हटले आहे. पण मी बोललो हे माझे मत झाले हो. तुम्हाला काय वाटेल ते ठरवावयाला तुम्ही मुखत्यार आहा. कान्हेऱ्याच्या खटल्यात तुम्हीच न्याय देण्याला बसला असता व त्याचा जबाब तुम्ही वाचला असता तर तुम्ही काय अनुमान काढले असते? असो.

बेअब्रूचे हे असे मुद्दे आहेत. पुढे आलेल्या लेखांचा अर्थ ठरविणे हे काम तुमचे आहे. तसेच पुस्तकातील विषय सार्वजनिक महत्त्वाचा आहे की नाही व त्यात केलेली टीका रास्त आहे की नाही हे तुमचे तुम्हीच ठरवावे. अशा रीतीने हा खटला आता बहुतेक संपला. सायमन साहेबानी ह्या खटल्याकडे साम्राज्यातील लोकांचे लक्ष आहे असे सांगितले आणि ते खरेहि आहे. मीहि तेच म्हणतो. कारण परिणामाच्या दृष्टीने पाहता इतका महत्त्वाचा खटला आजवर माझेपुढे आला नव्हता. तुम्ही खोटा निकाल किंवा मनाला न पटणारा निकाल द्यावा असे कोणीहि म्हणणार नाही. पण टिळकांच्या तर्फे निकाल देण्याला लागणारे धैर्य अंगी आणा असे सायमन साहेब तुम्हाला सांगतात! याचा अर्थ प्रतिकूल निकाल देण्याला लागणारे धैर्य तुमच्या अंगी नाही! पण हे खरे आहे काय? कारण तुम्हाला टिळकाना जसा न्याय द्यावयास पाहिजे तसाच ब्रिटिश लोकानाहि तो द्यावयाला पाहिजे. तात्पर्य तुमच्या अंगी धैर्य हवे पण ते आपले कर्तव्य बरोबर बजावण्याचे हवे. आपले कर्तव्य टाळून खुशामत करणे याला धैर्य म्हणत नाहीत. सायमन साहेबानी फ्रान्समध्ये शांतता परिषदेच्या वेळी टळलेल्या अत्याचारांचा नुक-

ताच उल्लेख केला व त्याची जबाबदारी फ्रेंच वर्तमानपत्रावर येत नाही असे सांगितले. पण क्लेमेंसोच्या बाबतीत निरनिराळ्या माणसांचा त्याच्याशी खाजगी द्वेष होता असे तरी सिद्ध झाले आहे काय ? उलट वर्तमानपत्रातल्या लेखावरूनच अशा गोष्टी घडतात हे दिसून आलेले आहे. ह्या खटल्यात नाशिकच्या मुलानी मॅझिनीचे चरित्र वाचल्याचे आलेच आहे. पण मॅझिनी हा चळवळ्या होता. प्रजासत्ताक राज्य स्थापणारा बंडखोर होता. आणि त्याने इटालीतील ऑस्ट्रियन लोकांची सत्ता उलथून पाडली. मॅझिनीला जॅकसनसाहेबांचे नाव माहिती नव्हते. पण मॅझिनीचे पुस्तक वाचून काय विचार सुचत असतील ह्याचा विचार करा. इतके झाल्यावर आता नुकसान भरपाईच्या रकमेचा विचार ! पण ह्या ठिकाणी टिळक दावर यांचा संवाद व दावर यानी टिळकाना उद्देशून केलेले शेवटचे भाषण लक्षात आणा. आणि हे तर खुद्द टिळकांच्या देशातील गृहस्थ. चंदावरकर यांचा निकाल फिरला असेल पण दावर यांचा निकाल फिरला काय ? निमूटपणे सहा वर्षे टिळकाना शिक्षा सोसावी लागली. मग अशा मनुष्याला भरून देण्यासारखी अब्रू किती हे तुम्ही ठरवा. १९१४ साली लष्कर भरती होऊ नये म्हणून टिळकानी खटपट केली. आणि असले भाषण थांबवावे म्हणून सरकारने त्याना बंदी केली. आणि हे केव्हा ? तर आम्ही इकडे आपले प्राण खर्ची घालीत होतो आणि पुरुषचसे काय पण बायका सुद्धा काडतुसे करण्याच्या कामावर लागल्या होत्या तेव्हा ! आणि या युद्धातील इंग्लंडचा वैरी जो जर्मनी त्याच्या वस्तु वाटेल तर घ्या पण विलायती घेऊ नका असा टिळकानी उपदेश केला होता. चिरोल साहेबांच्या पुस्तकातील काही वाक्ये अशी आहेत की त्याबद्दल बेअब्रूची फिर्याद करिता येईल. पण त्या बरोबर हेहि लक्षात ठेवा की चिरोलसाहेबांच्यातर्फे त्या दोषांचा परिहार होण्यासारखा पुरावा आला आहे. तात्पर्य बेअब्रूकारक विधाने केली आणि त्यांचा परिहार झाला नाही असे तुम्हाला अखेर वाटले तर तुम्ही वादीचा दावा देववा. आणि मग नुकसानीची रक्कम किती द्यावी हेहि तुम्ही ठरवा. मात्र सहा मुद्दे मिळून एकच मुद्दा समजा. "

स्पेन्स—पण सायमन साहेबानी हे सहा मुद्दे एकत्र केले नव्हते. आणि करा म्हणून आपणाला विनंति केली नव्हती.

डार्लिंग—पण त्यानी तसे केले नसले म्हणून काय झाले ? मी सहा मुद्यांचा एकच मुद्दा समजतो.

स्पेन्स—पण सहा मुद्यांचा एक मठ्ठा करू नये असा मी आपणाला अर्ज करितो.

डार्लिंग—तो अर्ज मी नामंजूर करितो.

टिळकानी नुकसानभरपाई मागितली. परंतु आपले नुकसान पैशाने किती झाले हे सिद्ध केले नाही. असे नुकसान शाबीत झाले तरी त्याला 'स्पेशल' असे म्हणतात. विशेष प्रकारचे नुकसान नसल्याकारणाने टिळकाना चिरोलसाहेबावर

फौजदारी फिर्याद करता आली असती. आणि मग अशा खटल्यात सहा मिळून एकच मुद्दा झाला नसता काय? अर्थात् दोषी किंवा निर्दोषी ह्या एका शब्दाने त्या खटल्याचा निकाल झाला असता. म्हणून मी या सर्व मुद्यावर तुमचा निकाल काय असेल तो एकच मागतो. आणि पुस्तकात लिहिलेले योग्य की अयोग्य हे सर्व लक्षात घेऊन काय तो एकच निकाल द्या. तुमचा निकाल प्रतिवादीतर्फे असला तर प्रश्नच नाही. पण तुमचा निकाल वादीतर्फे असला तर नुकसान भरपाई किती द्यावयाची हेहि तुम्ही ठरवा. समोर असल्यापैकी वाटेल ते कागदपत्र घेऊन तुम्ही पलीकडच्या दालनात जाऊन विचार करा. आणि अजूनहि माझी काही मदत पाहिजे असेल तर ती मागा मी आनंदाने देण्याला तयार आहे."

न्या. डार्लिंग यांचे हे भाषण झाल्यावर ज्यूरीतील गृहस्थ ५ वाजून ५० मिनिटानी आपल्या खोलीत गेले आणि ६ वाजून १७ मिनिटानी बाहेर आले. त्याना पहिला प्रश्न हा करण्यात आला की 'तुम्ही सर्वांनी एकमताने निकाल ठरविला आहे काय?' त्यावर फोरमनने उत्तर दिले. 'होय.'

डार्लिंग—तुमचा निकाल कोणातर्फे आहे?

उ०—प्रतिवादीतर्फे.

कार्सन—निकाल आमच्यासारखा झाला तेव्हा आमचा खर्चहि देववावा.

डार्लिंग—स्पेशल ज्यूरी कोणी मागितली?

कार्सन—वादीने.

डार्लिंग—ठीक आहे.

शेवटी ज्यूरीला उद्देशून न्यायमूर्तींनी फिरून एक प्रश्न विचारला. 'ह्या खटल्यात चिरोलसाहेबाबरोबर मॅकमिलन कंपनी हीहि प्रतिवादी आहे. तेव्हा तुमचा निकाल त्यांच्याहि बाजूचा असे समजावयाचे काय?' त्यावर ज्यूरीने 'होय' असे उत्तर दिल्यावर खटल्याचे काम समाप्त झाले.

## ( १६ ) साक्षीपुराव्याचे पृथक्करण

या भागाचे आरंभी मुंबईस कमिशनपुढे झालेल्या साक्षीदारांच्या तोंडी पुराव्यापैकी निवडक भाग दिला आहेच. यापैकी काही साक्षीदार नाशिक येथील खुनाच्या खटल्यात शिक्षा झालेले होते. पण त्यापैकी एकानेहि या खुनाच्या किंवा इतर कटाशी टिळकांचा संबंध होता असे म्हटले नाही. चिरोल साहेबाना या साक्षीदारांपासून काही मिळेल अशी बरीच आशा होती. पण ती सफळ न झाल्या कारणाने त्याना निराशेनेच विलायतेला परत जावे लागले होते. तसेच मुंबईच्या कमिशनमध्ये टिळकांचे वकील दादासाहेब करंदीकर यानी वेळोवेळी हरकत घेतली असताहि अनेक जबान्या न्यायनिवाडे व खटल्याच्या हकीकती दाखल करण्यात आल्या व या सर्व निशाण्या मांडून पुराव्यात ग्राह्य मानल्या गेल्या. म्हणून त्यात ह्या खटल्याच्या दृष्टीने टिळकांचा वस्तुतः किती संबंध होता व

वादाचे म्हणून जे मुद्दे कोर्टाने ठरवले होते त्या दृष्टीने त्या किती गैरलागू होत्या याचे येथे थोडेसे दिग्दर्शन करण्याचे योजिले आहे.

चिरोल साहेबांचा पहिला आरोप असा की टिळकानी हिंदुमुसलमानात वितुष्ट उत्पन्न करण्याकरिता गोरक्षण मंडळ्या स्थापल्या व स्थापून तसा त्यांचा 'उपयोग' केला. पण अशी कोणतीहि संस्था टिळकानी स्थापल्याचे चिरोल साहेबाना दाखवता आले नाही. १८९३–९४ साली हिंदुस्थानात जे ठिकठिकाणी हिंदुमुसलमानांचे दंगे झाले त्याबद्दल सरकार व सरकारचे धोरण यावर टीका असलेले केसरीमराठ्याचे बरेच अंक पुराव्यात दाखल झाले होते. पण वर्तमानपत्रकार या दृष्टीने टीका करणे वेगळे आणि हिंदुमुसलमानामध्ये वितुष्ट आणण्याकरिता टिळकानी गोरक्षणाच्या संस्था स्थापणे वेगळे. शिवाय हिंदुस्थानातील इतर अनेक वर्तमानपत्रकर्त्यांनीहि अशीच टीका केली होती. त्याचप्रमाणे त्या वेळच्या कौंसिलच्या सभासदानी व ना. गोखले यानी सार्वजनिक सभेतर्फे सरकारास जो अर्ज पाठवला होता त्यामध्येहि केसरी सारखेच मत प्रगट करून सरकारास दोष दिला होता. निशाणी ३१५ हा १८९३च्या हिंदुमुसलमानांच्या दंग्याचे वेळी पोलिस कमिशनर व्हिन्सेंट यानी केलेला रिपोर्ट आहे. यात दंग्याचे कारण म्हणून त्यानी असे मत दिले आहे की गोरक्षण संस्थामुळेच हे दंगे झाले व १६ कलमात ते असे लिहितात. "मुंबईतल्या दंग्याला विशेषतः 'गुजराथी' या वर्तमानपत्रामुळेच प्रोत्साहन मिळाले. पण या निशाणीत टिळकांचे नाव नाही व दंग्याशी टिळकांचा संबंध असल्याचा उल्लेखहि नाही.

निशाणी ३१७—गणपती उत्सवातील निरनिराळी पदे—या पदाशी टिळकांचा प्रत्यक्ष संबंध काहीच दाखविता आला नाही व नव्हताहि.

निशाणी ३१८—मुसलमानांचा सरकारास अर्ज—यात पुण्याच्या ब्राह्मणानी गणपती उत्सव सुरू करून मुसलमानांच्या मोहरमच्या उत्सवाची थट्टा आरंभली आहे असे लिहिले आहे. फार तर हे व्यक्तिशः काही मुसलमानांचे मत म्हणता येईल. चिरोल साहेबाना हवा तसा टिळकांच्या हेतूचा पुरावा त्यात नाही.

निशाणी ६—केळकर यांचे १८९७त केलेले मराठा पत्राचे डिक्लेरेशन. केळकर यांच्या या प्रतिज्ञालेखावरूनच चिरोल यानी मराठ्याचे जे अंक दाखल केले ते 'टिळकां'चे हेतू दाखविण्याच्या दृष्टीने गैरलागू ठरतात. डिक्लेरेशन याचा अर्थ जबाबदारी घेतल्याची कबुली. व ही कबुली सरकार दरबारी दुसऱ्या एकाच्या नावाने दाखल असता ती टिळकांचीच आहे असे प्रतिपादन करणे व्यर्थ आहे.

निशाणी ३२५—काळकर्ते शिवराम महादेव परांजपे यांस राजद्रोहाच्या खटल्याबद्दल शिक्षा झाल्याची कोर्टाच्या हुकमाची नक्कल. शिवरामपंत परांजपे यांचा व टिळकांचा खाजगी स्नेहसंबंध असेल. पण त्यांची मते काही काही बाबतीत दोन ध्रुवाइतकी एकमेकापासून लांब होती. काळपत्राशी टिळकांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष काडीइतकाहि संबंध नव्हता असे त्यानी आपल्या साक्षीतच सांगितले

होते. शिवाय मित्रत्वाच्या साहचर्याने एकाची गुन्हेगारी दुसऱ्यावर कशी येते ? किंवा एकाच्या सर्व कृत्यास दुसऱ्याची संमति होती असे कसे मानता येईल ? काळपत्राचेहि अनेक अंक निशाण्या म्हणून पुराव्यात दाखल होते. पण ते टिळकांच्या संबंधाने सर्वस्वी गैरलागू होते.

निशाणी ३३१—यात सावरकरांच्या ' मॅझिनीचे चरित्र ' या पुस्तकावर काळकर्त्यांनी दिलेला अभिप्राय आहे. यात या पुस्तकाची तोंडभर स्तुति असली व तिला ' भगवद्गीता ' असेहि विशेषण दिलेले असले तरी टिळकांच्या खटल्याशी अगर आरोपाशी या अंकाचा काहीच संबंध नव्हता.

निशाणी ३३२—हे सावरकरांच्या मॅझिनीच्या पुस्तकातील अर्पणपत्रिकेचे दर्शनी पान होते. यात ' लोकमान्य टिळक व लोकमान्य परांजपे यास हे पुस्तक अर्पण केले आहे ' असे लिहिले होते. इतकाच या पुस्तकाशी टिळकांचा संबंध ! याच निशाणीत सावरकरांची ३२ पानांची प्रस्तावनाहि दाखल झाली आहे. सावरकरांचे पुस्तक हा फार तर सावरकरांच्या हेतूचा पुरावा होईल. टिळकांच्या हेतूचा म्हणून तो पुरावा म्हणणे गैरलागू होय.

निशाणी ३४६—धनाप्पा सिद्धरामअप्पा वाळवे यानी प्रसिद्ध केलेले सन १९०७ मधील टिळक व परांजपे यांच्या व्याख्यानाचे पुस्तक. सदर वाळवे याना नाशिकच्या खटल्यात शिक्षा झाली होती. त्यानी टिळकांच्या व्याख्यानाचे पुस्तक छापून काढले इतकाच टिळकांच्या नावाशी त्यांचा संबंध !

निशाणी ३४९—नाशिकच्या खटल्यातील भावे या आरोपीच्या घरी झालेल्या झडतीचा पंचनामा. यात लाल–बाल–पाल यांचा एकत्र फोटो भावे यानी ठेवला होता. इतकाच १९१० सालच्या कटाशी ( टिळक त्यावेळी तुरुंगात होते ) किंवा भावे यांच्याशी टिळकांचा संबंध !

निशाणी ३६०–३६२–३६४—या कोल्हापुरातील गुन्ह्यासंबंधाच्या आहेत. पैकी निशाणी ३६० पाध्ये व प्रसादे याना घरफोडीच्या आरोपाबद्दल कोर्टाने शिक्षा दिली त्या हुकमाची नक्कल ( १९०६ ).

निशाणी ३६२—दामू जोशी प्रसादे व गुळवणी यास कोल्हापूर येथे घरफोडी व चोरी या आरोपाबद्दल शिक्षा झाली याबद्दलची कोर्टाच्या हुकमाची नक्कल.

निशाणी ३६४—शेणोलीकर अंबापकर व गोखले याना रासायनिक द्रव्ये चोरल्याबद्दल शिक्षा झाल्याची नक्कल. यातील पाध्ये प्रसादे हे लोक टिळकांचे बरोबर काढलेल्या एका फोटोत आढळले इतकाच त्यांचा संबंध !

निशाणी ३६६—दामू जोशी व इतर सात आरोपी यांजवर १९०९ साली कोल्हापुरात जाहिराती चिकटवून लोकास बॉबची कृति शिकवली या आरोपावरून खटला झाला त्यातील हा निकाल आहे. त्यात टिळकांच्या नावाचा उल्लेख इतकाच की वडेगेकर या नावाच्या आरोपीच्या घरी टिळकांचा एक फोटो साप-

डला ! त्याबरोबर एक विनंतिपत्रहि सापडले. या विनंतिपत्रात असे लिहिले होते की टिळकाना ६ वर्षांची शिक्षा झाल्या कारणाने सर्व लोकानी दोन महिने सुतक धरावे. तसेच दुसरेहि एक हस्तपत्रक सापडले होते. त्यात टिळकाना शिक्षा देणाऱ्या दावरचा सूड घ्या व त्याला नाहीसा करा असे लिहिले होते. टिळक मंडालेस असता झालेल्या गुन्ह्याच्या खटल्यात टिळकांचा उल्लेख आल्यावरून हा फोटो व हे पत्रक पुराव्यात दाखल झाले !

निशाणी ३६८—दामू जोशी याचेवरील खटल्याच्या निकालाचे जजमेंट. दामू जोशी याला कर्नल फेरिस याचा खून करण्याचा कट केल्याच्या आरोपावरून पकडण्यात आले. प्रथमतः अशाच प्रकारच्या एकदोन खटल्यात तो सांपडला असता त्याचेवर दोष शाबीत झाला नाही. त्याचा कबुलीजबाब गैरलागू व पुराव्यात अग्राह्य ठरला. आणि पिस्तुल घेऊन कर्नल फेरिस यांचे बंगाल्यावर दामू जोशी हा गेला असा पुरावा पुढे आला होता तरी ' प्रयत्न ' या शब्दाची जी कायदेशीर व्याख्या आहे त्यात जोशी याचा गुन्हा येऊ शकला नाही. त्यामुळे किंकेड साहेबानी त्यास दोषमुक्त करून सोडून दिले. दामू हा दोन अडीच महिने पोलिस पहाऱ्यात होता व त्याने दोन तीन जबान्याहि दिल्या. दिलवर व घाटगे या पोलिस अधिकाऱ्यांच्या जाचामुळे त्याने लांबलचक जबानी दिली. त्यात ' टिळकानी एक बॉंब तयार केला होता तो मी लकडी पुलाचे पाठीमागे नदीकाठी उडविला त्याचा मोठा आवाज झाला. ' असे वर्णन केले आहे ! ' महाराष्ट्रातील पुढाऱ्याच्या सल्ल्याने बॉंबचा एक मोठा कारखाना काढण्यात यावयाचा होता ! कर्झन यांचा दिल्लीदरबारचे वेळी खून करावयाचा होता. शिवरामपंत परांजपे यांचेकडून मला पैसे मिळाले. टिळकानाहि ही खून करण्याची गोष्ट ठाऊक होती. कर्नल फेरीस याचा खून कोल्हापुरास आक्कासाहेब महाराज यांचे लग्नमंडपात करावयाचा होता. ' असल्या अनेक विचित्र हकीगती या जबानीत असून महाराष्ट्रातील लहानथोर पुढाऱ्यांची व निदान शंभर दीडशे प्रसिद्ध व्यक्तींची नांवे या जबानीत दामू याने गोवली आहेत ! पण ती खरी असल्याचा यत्किंचितहि पुरावा सरकारास खरोखरीच मिळता तर सरकारने टिळकाना व इतराना काही निमित्त ठेवून फासावर चढविले असते अगर हद्दपारच केले असते ! टिळकांचे व सरकारचे हाडवैर लक्षात घेता ही गोष्ट त्यानी खात्रीने केली असती इतकेच नव्हे तर भाल्यावर टिळकांचे शिर रोवून ते राजधानीत मिरविले असते. कमी केले नसते ! पण बोलक्या पढतमूर्खाला त्याचा बोलकेपणाच बाधतो त्याप्रमाणे दामू जोशी याची साक्षच त्याच्या वाचाळतेने खोटी ठरविली ! खुद्द किंकेडसाहेबानीच आपल्या निकालात दामू हा वाचाळ बढाईखोर थापाड्या आहे असे म्हटले आहे. दामू जोशी याच्या साक्षीत अगर जबानीच्या भारुडात खऱ्या खोट्या गोष्टींची बेसुमार भेसळ असल्याकारणाने कोर्टाने त्याच्या इतर गुणावरून फक्त ती त्याच्या एकट्याच्या विरुद्ध ग्राह्य मानली. व

कोल्हापूर सरकारने फेरिस साहेबांचा खून करण्याचा कट केल्याचा आरोप त्याच्यावर ठेऊन त्यास सात वर्षे सक्तमजुरीची शिक्षा ठोठाऊन तुरुंगात डांबून टाकले. पण टिळक वगैरे इतर पांच पन्नास पुढाऱ्यांचा क्रांतिकारक कटाशी संबंध असल्याचे ठरविणारी जी जबानी त्याने दिली ती खोटी पाडण्याचे साधनहि आम्हास सुदैवाने उपलब्ध झाले आहे. पोलिस पाहऱ्यात दामू जोशी यास गैर-कायदा दोन अडीच महिने ठेवण्यात आले असून खोटी जबानी देण्याबद्दल त्याचेवर नाना प्रकारचे जुलूम होत होते. अशा वेळी त्याने बेळगावजवळच्या वड-गावचा खटला चालू असता काका पाटील वकील यास एक गुप्त पत्र पाठविले ते पुढे उघडकीसहि आले. ते असे—

दामू जोशी याने तुरुंगातून पाठविलेले गुप्त पत्र

कोल्हापूर ता. २७ जून १९०९

"मी आज ११ महिने कच्च्या तुरुंगात आहे. त्याहूनहि अलीकडे तीन-चार महिने पोलीसचे अटकेत मॅजिस्ट्रेटचे हुकमावाचून आहे. मला अटकेत का ठेवले आहे समजत नाही. माझेवर कज्जा असलेस तो चालविता येत नाही. येथील मॅजिस्ट्रेट लोक अगर दुसरे ऑफिसर दाद घेत नाहीत. मला ब्रिटिश पोलिसचे ताब्यात ठेवले आहे. व त्यांचा सारखा त्रास सोसावा लागत आहे. हे जे पत्र धाडीत आहे त्याचे कारण येवढेच की मला पोलिसचे ताब्यातून काढ-णेची आपलेकडून काही व्यवस्था करावी. मला असे समजविण्यात आले आहे की 'तू—( म्हणजे मी ) लो० टिळक गंगाधरराव देशपांडे गणपतराव मोडक कृष्णराव खाडिलकर हणमंतराव देशपांडे अशा बड्या लोकावर ( विरुद्ध ) साक्षी आम्ही सांगू त्याप्रमाणे दे. खोटी साक्ष देण्यास तयार जाहले पाहिजे. नाहीतर आतापर्यंत हाल केले ते काहीच नाहीत. यापुढे तुला हालहाल करून ठार मारू व जाळून अगर पुरून टाकू व पळून गेलास म्हणून हूल उठवू व घरचीहि इस्टेट फरारी झालास म्हणून जप्त करून बायकापोराना भिकेला लावू. तुला जो आज-पर्यंत अटकेत ठेवला आहे त्याचे कारण तू जरी कज्ज्यातून सुटला आहेस तरी तुझे विरुद्ध अपील केले आहे. त्यात पुष्कळ शिक्षा द्यायला लावू. तुझेवर गुन्हा शाबीत नाही तरी महाराजाना सांगू म्हणजे महाराज कोठपर्यंत तसे करीत नाही पाहू. व शिक्षा दिलेवर तुरुंगात विष घालून मारून टाकणेची व्यवस्था करू. डॉक्टर लोक आमचेच आहेत. ते आमचेबाहेर जाणार नाहीत. काही तरी रोगाने मेलास असा त्यांचा अभिप्राय घेऊ अगर निकाल न करिता असेच कुचं-बून कुचंबून मारू. नाहीतर खोटी साक्ष देणेस तयार हो.' असे सारखे माझे पाठीस लागले आहेत. त्यांचा त्रास चुकविणेसाठी साक्ष देतो असे बोललो आहे. तेव्हा मला लौकर पोलिसचे ताब्यातून काढविण्याची व्यवस्था जाहलेस मजवरचा तो प्रसंग चुकणार आहे. मी खोटी साक्ष देत नाहीच. मग मरण येवो. तुरुंगात

जावो अगर काही होवो. आता जास्त लिहीत नाही. भेटीअंती समक्ष जास्त खुलासा करीन. मी वरती लोकांची नावे लिहिली आहेत त्यांचेवर व इतरहि लोकावर खोटे खटले करणार आहेत. दहशत बसवावी हाच हेतू आहे. माझ्या खेरीज इतरहि काही लोकास खोटी साक्ष देवविण्याची खटपट चालू आहे म्हणून आगाऊ कळविले आहे."

या पत्रावरून दामूने पूर्वी सांगितलेली जबानी दिली ती पोलिसाच्या जाचावरून व पोलिसाने सांगितली तशी दिली असे उघड ठरते. दामूच्या जबानीत खरे खोटे काय निवडावयाचे हा न्यायाधीशासहि मोठा प्रश्नच पडला असेल. अखेर दामूच्या इतर साथीदारांच्या खटल्यात दामु याच्या कृत्याबद्दल जो प्रत्यक्ष पुरावा पुढे आला तेवढा ग्राह्य ठरून दामू जोशी याची तुरुंगात रवानगी झाली.

नागपूरकर व मोडक यांचेवरहि फेरिससाहेबांच्या खुनाचा कट केल्याचा आरोप होऊन खटला झाला होता. त्याच्या जजमेंटमध्ये न्यायमूर्ति क्लेमंट्स यानी दामु जोशी याचे शब्दचित्र काढले आहे. ते म्हणतात "या खटल्यात दामू हा प्रत्यक्ष आरोपी म्हणून येथे हजर नसला तरी या कटातील मध्यवर्ति व मुख्य व्यक्ति तोच आहे. दामू हा तरुण असून पहिलवान आहे. त्याचे शील अगर बुद्धि ही दोन्हीही सामान्यच आहेत. तो वाटेल तितका बेसुमार व अविचारी मात्र आहे. त्याला व्यक्तिशः स्वतःची म्हणून काही बुद्धि अगर निश्चय नाही. दुसऱ्याच्या बुद्धीच्या तावडीत सापडून त्याने दुसऱ्याचे हातातील शस्त्र मात्र व्हावे. तो बोलभाट असून पोलिससमोर देखील आपल्या शूरपणाची कृत्ये मोठी रंगवून फुशारकीने सांगत असतो." दामू जोशी याची जबानी वाचूनहि वाचकाचा वरीलप्रमाणेच ग्रह होतो. आणि अशी खात्री होते की या माणसाला महाराष्ट्रीय पुढाऱ्यानी आपल्या विश्वासात घ्यावा इतके काही ते सर्वच मूर्ख नव्हते! आमच्याकडील फौजदारी जबान्या घेण्याची पद्धत म्हणजे अशी की पोलिस अधिकाऱ्याने नुसते सूतोवाच म्हणावयाचे आणि नंतर आरोपीच्या तोंडून महाभारताएवढे भारुड वदवावयाचे! कार्सनसाहेब या सर्व जबान्या वाचून दाखवीत असता सायमन साहेब आश्चर्याने म्हणाले "तुमच्या हिंदुस्थानात चालते तरी काय? एक जबानी काढावी तर त्यात हवे ते येते!"

असो. शिक्षा झाल्यावर एक दोन वर्षानी दामू हा तुरुंगातून नाहीसा झाला! कोणी म्हणत तो फरारी झाला कोणी म्हणत कोल्हापूरच्या महाराजानी गुप्तपणाने त्याला जगातून नाहीसा केला. पण अखेर पुनः पंधरा वर्षानी त्याचा तपास लागून १९२७ साली त्यास पकडून कोल्हापूरास नेले. या खटल्यातहि त्याने फिरून जबानी दिली! ती पूर्वीपेक्षाहि आश्चर्यजनक आहे! त्यात त्याने असे सांगितले की "पागे व फरनँडिस या पोलिस अधिकाऱ्यांच्या सहाय्याने प्रत्यक्ष शाहु महाराजानीच मला पळून जाण्यास संधि दिली!" आणि ती कशाकरिता? तर छत्रपति महाराजांविरुद्ध कर्नल वुडहाऊस हा सरकारकडे लिहून कळवीत होता

म्हणून त्याचा दामूचे हातून परस्पर खून करविण्याकरिता ! ! १९२७ च्या या नव्या खटल्यात दामु जबानी देताना म्हणतोः—

"संध्याकाळी सुमारे ५–५॥ वाजता युरोपियन ड्रेस केलेला एक इसम अर्धा एक तास मजबरोबर इंग्लिश लोकांची स्तुति करीत होता. परंतु मी त्याला काही बोललो नाही. रात्री एका लहानशा कोठडीत मला कोंडून ठेवले व दोन शिपाई व फासेपारधी माझ्या पहाऱ्यावर ठेवले. सकाळी उजाडल्यानंतर ७ वाजता कुरणाजवळ एक शेड बांधली आहे तेथे मला नेले. ९ वाजण्याच्या सुमारास पागे एकटे आले व शिपायास काढून टाकले. माझ्यावर खोटेनाटे आरोप घेतले होते त्याबद्दल कळकळीचे भाषण त्यानी केले. झाली ती गोष्ट झाली. आता सुटावयाची संधि आली आहे. आता जर महाराजांचे काम करशील तर तुला मी सोडण्याची तजवीज करतो असे म्हणाले. मी म्हणालो माझ्याकडून होण्यासारखे असल्यास सांगा. ते मी करीन. ते म्हणाले, कर्नल वुडहाऊससाहेब महाराजाविरुद्ध वर लिहीत असतात व आम्ही जे करू त्याला व्यत्यय आणतात तर त्यांचा काटा काढावयाचा आहे. ज्याप्रमाणे जाधवराव वगैरे लोकाना हाकून लावता येते त्याप्रमाणे या लोकाना हाकून लावता येत नाही. कारण हे ब्रिटिश गव्हर्मेंटचे नोकर आहेत. म्हणून यांचा कायमचा काटा काढावयाचा आहे. तर तू हे काम कर म्हणून त्यानी सांगितले. त्यावेळी मी पुष्कळ आढेवेढे घेतले. त्याना सांगितले की पोरकटपणा करून किंवा खोटेनाटे आरोप ठेवून २० वर्षांची शिक्षा दिली आणि जर मी खून केला तर फाशी द्या म्हणजे झाले. त्यावेळेस त्यानी फरन्यांडीसचे उदाहरण देऊन मला सांगितले की कर्नल रेसाहेब पोलिटिकल एजंट यांना फरन्यांडीसनी विष घातले होते. त्या बाबतीत त्याना आरोपी करून त्यांच्यावर केसही चालली होती. परंतु त्याना महाराज सरकारचा पाठिंबा असल्याकारणाने त्याना सोडून देऊन हल्ली पोलिस सुपरिंटेंडंट बनविले आहे. हे पहा ज्या बाजूला महाराज व आम्ही आहो त्या बाजूला तुला भिण्याचे काही कारण नाही. याउप्पर तूं जर न ऐकशील तर हे मराठी राज्य आहे व ज्याप्रमाणे अबूबकर व काका मास्तर यांची दोघांची प्रेते बाहेर काढली त्याप्रमाणे तुझेहि प्रेत बाहेर काढू हे लक्षात ठेव. संस्थानमध्ये आम्ही काहीही केले तरी आमचे कोण काय करणार ! त्यानंतर मला सोडा मी ही गोष्ट करीन असे त्याना कबूल केले. त्यावेळेस ते म्हणाले असे जर तुला सोडले तर महाराज सरकारवर दोष येईल. तर असे आम्ही तुला सोडत नाही. तुला पळून जाण्याची तजवीज करून देऊ." पुढे तो पळून गेलाहि !

तात्पर्य दामूच्या निरनिराळ्या जबान्या म्हणजे 'परब्रह्म' आहे ! त्यात खरे खोटे काय व कसे निवडावे ? दामूच्या जबानीवरून टिळकांचा कोल्हापूरच्या शिवाजीक्लबाशी व पर्यायाने खुनाशी संबंध जोडावयाचा तर दामूच्या दुसऱ्या जबानीवरून खुद्द कोल्हापूरच्या महाराजांवरच अशा प्रकारचा आरोप करावा लागेल. या जबान्यातील हकीगती जर सरकारने टिळकाविरुद्ध ग्राह्य मानल्या नाहीत तर

कोल्हापूरच्या खटल्यांचे निवाडे व क्रांतिकारकांची रसभरित वर्णने ज्यूरीपुढे मांडून ज्यूरीने टिळकाविरुद्ध निकाल देणे हा वस्तुस्थितीचा विपर्यासच नव्हे तर अनर्थ होय !

टिळकांच्या घरी बॉंब सापडल्याची गोष्ट कदाचित सरकारास शाबीत करता आली नसेल. पण " आखाडे स्थापण करण्यास त्यानी उत्तेजन दिले. बंडवाल्या लोकाना या आखाड्यातून शारीरिक शिक्षण देऊन त्यांच्याकडून चोऱ्या व दरवडे घालावयाचे व स्वराज्याच्या चळवळीला पैसे जमा करावयाचे असा टिळकांचा हेतू होता " असा चिरोलसाहेबांचा आरोप होता. व याला पुरावा दाखल केला तो काय तर केसरीमराठ्याचे उतारे !

कधी एके काळी एका तालीमशाळेत टिळकांचे हस्ते बक्षीससमारंभ झाला होता व त्याची हकीकत केसरीत आली होती. पण हे आखाडे टिळकानी स्थापन केले होते व दरवडे घालण्याचा त्यांचा उद्देश होता हे त्याने सिद्ध कसे होणार ? कोल्हापूरचा शिवाजी क्लब व नाशिकचा मित्रमेळा या गुप्त संस्थातून दरवडे घालण्याचे प्रयत्न होत असत असे मानले तरी या दोन्ही संस्थाशी टिळकांचा काडीइतकाहि संबंध नव्हता. शिवाजी क्लबला तर त्यानी कधी भेटहि दिली नाही. आणि नाशिकच्या मित्रमेळ्याने त्याना गणपतीउत्सवात पानसुपारीस बोलावले असताना अत्याचारी धोरणापासून परावृत्त होण्याबद्दल त्यानी निक्षून सांगितले होते. उदाहरणार्थ ता. २४ ऑगष्ट १९०६ मधील नाशिकच्या हकीगतीसंबंधी हिंदुपंचातील उताराच टिळकानी पुराव्यात दाखल केला होता तो असाः—"शनवारी दुपारी टिळकांची व मित्रमेळ्याच्या पोरकटपणे वागणाऱ्या पुढाऱ्यांची सुमारे तास दोन तास खाजगी गुप्त मुलाखत झाली. मित्रमेळ्याची पद्ये त्यानी दिलेले मानपत्र वगैरे सर्वच दीडशहाणेपणाचा प्रकार असल्याने मी त्या संबंधी काहीच लिहू इच्छित नाही. ही बेफाम तरुण मुले केव्हा तरी मानेला गळफास लाऊन घेतील आणि नाशिकच्या पुढाऱ्याना मान खाली घालण्याचा प्रसंग येईल अशी माझी त्यांचे वर्तणुकीवरून बालंबाल खात्री झाली आहे. टिळकानी त्यांचे वर्तन व आत्यंतिक निष्ठा यांची भाषणात स्तुती केली. परंतु त्याच भाषणात सदर तरुणांच्या वाह्यात वर्तनाबद्दल त्यांची खरपूस हजेरी घेतली. या गुप्त मुलाखतीत जे अंजन मिळाले त्याने तरी मित्रमेळ्याचे डोळे उघडतील तर बरे होईल !"

शिवाजी क्लबापैकी घरफोडीबद्दल ज्याना शिक्षा झाली होती अशा लोकांचा व टिळकांचा एकत्र काढलेला फोटो चिरोलतर्फे पुराव्यात दाखल करण्यात आला होता. पण शिवाजी क्लबात टिळक गेले असताना मुळी हा फोटो घेतलेलाच नव्हता. १९०५ साली ताई महाराज केस निमित्त टिळक कोल्हापुरला गेले होते. तेथे गोडबोले कॉंट्रक्टर या सद्गृहस्थाचे घरी पानसुपारी निमित्त ते गेले असता तेथे जमलेल्या सर्व मंडळीचा ग्रुप फोटो काढण्यात आला. यात अनेक मंडळी अशीहि होती की त्यांचे तोंड देखील टिळकानी कधी पाहिले नसेल. शिवाजी

क्लबच्या सभासदांचा व टिळकांचा असा खास एकत्र फोटो दाखविता आला असता तरीहि एकत्र फोटो काढलेला होता एवढीच गोष्ट त्याने फार तर सिद्ध झाली असती. लोकानी दरवडे घालण्याला टिळकांची सहानुभूति होती याचा प्रत्यक्ष पुरावा चिरोल साहेबाना काडीइतकाहि मिळाला नाही व त्याना तो देता येणेहि शक्य नव्हते.

श्रीमंत व धनिक लोकांवर दरवडे घालून व चोऱ्यामाऱ्या करून पैसे जमा करावयाचे असा उद्योग कोल्हापूरच्या शिवाजी–क्लबच्या काही मंडळीत व नाशीकच्या मित्रमेळयात चालू असला तरी व दामू जोशी त्यात सामील असला तरी त्याच्या अनेक साथीदार क्रांतिकारकानाहि ही गोष्ट मान्य नव्हती ! व त्याचा ते निषेध करीत. कारण क्रांतिकारक वेगळा व दरोडेखोर वेगळा. मग टिळका-सारख्या लोकास ती कशी मान्य झाली असती ? या लोकांचे हे वाममार्गाचे उद्योग कर्णोपकर्णी टिळकांच्या कानावर येत असतील. पण त्यांच्यासमोर ही गोष्ट कोणी बोलता तर त्यानी ती ऐकूनहि घेतली नसती इतकेच नव्हे तर ती बोलणाराला आपल्या समोरून हाकून लावले असते ! कृष्णाजी दामोदर लिमये हा मनुष्य कोल्हापूरच्या शिवाजी क्लबापैकी असून जळजळीत क्रांतिकारक होता. त्याचे जबानीमध्ये टिळकांचा उल्लेख आला आहे व त्यावरून इतर जहाल उपदेशक व क्रांतीवाले लोक यांच्यात व टिळकांच्या उपदेशात काडीचेहि साम्य कसे नव्हते हे दिसून येते. तो उतारा असा:—

" मी दामू जोशी यास ओळखतो. आम्ही शिवाजी क्लबमध्ये भेटत असू. १९०४–५ साली झालेले रुसोजपानी युद्ध आम्ही मोठ्या उत्कंठेने वाचीत होतो. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरिता असाच प्रयत्न व्हावा अशी आमची दोघां-चीहि इच्छा असल्याकारणाने आमची दाट मैत्री झाली. पुढल्या वर्षी क्रांतिकारक कामाकरिता पैसे जमविण्याचे हेतूने दामू व त्याचे काही मित्र यानी चोऱ्या व घरफोडी केल्या. अशा कामी श्रीमंत लोक सुखासुखी पैसे देणार नाहीत तर त्याना लुबाडले पाहिजे अशी त्याची कल्पना होती. ते म्हणत शिवाजीनेहि लुटालूट केली. पण शिवाजी स्वदेशबांधवावर हात टाकीत नसे हे त्यांच्या कधी लक्षात आले नाही ! शिवाजी क्लबात आमचे वादविवाद होत. केसरी काळ व राष्ट्रमत ही जहालपक्षाची पत्रे आम्ही वाचीत असू. क्रांतिकारक चळवळीवरच माझा विश्वास आहे. तथापि देशात खरे बंडवाले कोणीच नाहीत असे मला वाटते ! हत्यारे वगैरे जमा करण्याला पैसे लागतात हे खरे. तथापि चोऱ्या करून आपल्याच देश-बांधवाना लुबाडण्याच्या मी सर्वस्वी विरुद्ध होतो.

" दामू प्रथम १८९९ साली फरारी झाला. इकडे त्याचे साथीदार कोल्हा-पुरात पकडले गेले. दामू गेला तो नेपाळात कुळकर्णी यांजकडे जाऊन राहिला व कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचे बरोबर परत आला. खाडिलकर यांचे दामू-वर बरेच वजन असे व तोहि खाडिलकराना चहात असे. दामू १९०६ मध्ये

चोरीच्या आरोपावरून पकडला गेला. तेव्हा मी पुण्यास गेलो. तेथे कुलकर्णी भेटले. नेपाळ येथे संस्थानच्या दिवाणाच्या मदतीने क्रांतिकारक चळवळी संबंधाने काय काय चालले आहे ते त्यानी मला सांगितले. परदेशात विद्यार्थी पाठवावे व जर्मनीतून इकडे दारुगोळा बंदुका आणाव्या अशी काही खटपट चालली होती. पुढे दामू दोषमुक्त होऊन सुटला. पुण्यास त्याची माझी गांठ पडली. त्यात त्याने सांगितले की गणपतराव मोडकाने मला ( दामूला ) सांगितल्यावरून कर्नल फेरिस यास मारावयाचे ठरविले. तू ही गोष्ट करू नये म्हणून मी त्यास निक्षून सांगितले. पण त्याने सांगितले मी मोडकाला वचन दिले आहे.

" यानंतर नाशीकला मी नोकरीस लागलो असता सावरकरबंधूंची ओळख होऊन त्यांच्या गुप्त संस्थेचा मी सभासद झालो. त्यांच्या देशभक्तीबद्दल माझी बोलण्याची इच्छा नाही. पण त्या एकेकात बढाईखोरीच फार! बाष्कळपणाने हवी तेवढी त्यानी बडबड करावी पण स्वतः एकहि गोष्ट करावयास ते तयार नव्हते. बाबा सावरकर नेहेमी मॅझिनी व इटली यासंबंधाने बोलत असे. पण मी म्हणे इटलीला समुद्राने परदेशांतून हत्यारे आणता आली. हिंदुस्थानला इंग्रज दर्याचे बादशहा असता हे शक्य नाही. १८५७ सालाप्रमाणे बंड करावे असा सावरकर दातार वगैरेंचा बेत होता. व शिवराम महादेव परांजपे यांची त्याला संमति होती. पण टिळकाना यांचे मार्ग मुळीच पसंत नव्हते व त्यानी असे बजावले की अशा अविचारानी देशाला तुम्ही संकटात आणाल! अजून बंडाची वेळ आलेली नाही. सावरकराला टिळकांचा उपदेश पटला नाही व त्याने परांजप्यांच्या मार्गाचीच स्तुति केली!

" १९०८ च्या मे मध्ये मी नाशीकहून मुंबईस गेलो. तेथे माझी व दामूची गांठ पडली. मी त्यास विचारले 'कर्नल फेरीस यास अद्याप का मारले नाही?' तो म्हणाला प्रयत्न केला पण तो फसला. अफगाणिस्थानचे अमीराकडून खाडिलकराना गुप्त बातमी कळली होती (!) तीहि त्याने मला सांगितली! अफगाणिस्थानचा अमीर हिंदुस्थानवर स्वारी करण्याच्या विचारात आहे अशा वेळीं तुम्ही खून करून हिंदुस्थानांतहि अस्वस्थता आहे असे त्याच्या नजरेस आणून दिले पाहिजे असे खाडिलकरांच्या बोलण्यात आले!

" नाशीकच्या मंडळीचा कोल्हापूरच्या महाराजावरहि कटाक्ष होता व महाराजानी गंगाधरराव देशपांडे यांचे घरी स्फोटक द्रव्यांचे काही साहित्य व वाङ्मय वाममार्गाने टाकून त्याना अडकविण्याचाहि यत्न केला होता. जॅक्सन याचा खून करावयाचे ठरल्यावर भट यानी खून करू नका म्हणून विरोध केला इतरानी ते ऐकिले नाही. असो. हिंदुस्थानात खऱ्या हाडाचे अराजकच नाहीत. क्रांतिकारक जहाल भाषणे करणारात ढोंगीपणा मात्र हवा तेवढा भरला आहे. देशात बंडाची खरी तयारी नसताना कृपा करून त्यानी तरुणाना या मार्गाला प्रवृत्त तरी करू नये. संस्था काढून क्रांतिकारक लोक मिळत नसतात. हे कार्य

ज्याने त्याने गुप्तपणाने करावयाचे असते. आपला कार्यभाग होताच या जगातून आत्महत्या करून क्रांतिकारकाने नाहीसे व्हावयास पाहिजे ! ”

ही जबानी देखील वर सांगितल्या प्रकारची आहे. या जबानीत त्याने टिळकाना मोकळे करून इतर कित्येक सद्गृहस्थांची नावे घेतली ! यामुळे टिळकापुरती ही जबानी चिरोल खटल्यात टिळकाना अनुकूल व चिरोलना प्रतिकूल होती. तथापि या जबान्या म्हणजे त्या क्षणी चौकशीवर असलेल्या पोलिस अंमलदारांच्या मनाचे ते प्रतिबिंब असे. जबानी देणार हा मेणाचा गोळा. खरा चित्रकार जबानी पढविणारा पोलिस ! लिमये याची जबानी घेणाऱ्या अधिकाऱ्याची कित्येक व्यक्तीवर विशेष अवकृपा असावी असे उघड दिसते !

निशाणी ३७०—विजापूरकर जोशीराव वामन मल्हार जोशी यांच्यावर विश्ववृत्त मासिकात एक लेख प्रसिद्ध केला त्या खटल्यातील जजमेंट. आरोप राजद्रोहाचा असून लेखाने कोल्हापूरचे महाराजांचा खून करावा असे ध्वनित केले होते असा होता. वास्तविक “ वैदिक मंत्रांचे सामर्थ्य ” हा लेख कडक असला तरी महाराजांच्या खुनाची चिथावणी करण्याचा आरोप ओढून ताणून त्याला आणून चिकटविला होता. पण या निशाणीचा टिळकाशी संबंध इतकाच की एका ग्रुप फोटोमध्ये टिळक व विजापूरकर हे होते !

निशाणी ३८४—अनंत कान्हेरे याची जबानी. वास्तविक ही जबानी पुराव्यात गैरलागू होती. कारण टिळक १९०८ साली तुरुंगात गेले व जॅक्सनचा खून १९०९ साली झाला. दुसरे असे की ही जबानी पुराव्यात ग्राह्य धरण्याला टिळक कान्हेरे यासमोर हजर असता त्याने ती दिली असती तरच ती टिळकाविरुद्ध कायद्याने मानली असती. कान्हेरे याची जबानी विस्तृत असल्यामुळे समग्र देता येत नाही. पण सावरकरांचे मॅझिनीचे चरित्र वाचून माझे मन तयार झाले असे त्याने स्वच्छ म्हटले आहे. ‘ जुलुमाची पुष्कळ उदाहरणे मी वाचली ’ असे सांगताना जरी त्याने केसरीचे नाव घेतले असले तरी काळ व राष्ट्रमत यांचीही नावे त्याबरोबरच त्याने घेतली आहेत हे लक्षात ठेवले पाहिजे. अनंत कान्हेरे याच्या साक्षीतील काही भाग येथे देत आहो. तो असा—

“ गणूच्या खोलीत गेल्यावर मी त्यास विचारिले की जॅकसन् दयाळू माणूस आहे असे सर्व म्हणतात. यावर तो म्हणाला ‘ आमच्यातील मुख्य व्यक्ती येथे नाही. सर्वजण त्याच्या पश्चात काम करीत असतात. तुला वाटल्यास मदतनीस माग. परंतु आमच्यातील कोणीहि हे काम करावयास तयार नाही म्हणून तुला मदतनीस मिळेल की नाही याची शंका आहे. ’ मी गणूला म्हणालो ‘ तुम्ही विनाकारण जॅकसन्ला का मारिता ? टिळकाना शिक्षा दिली त्या दावरला का मारीत नाही ? मला तुम्ही पाठवा म्हणजे मी त्याच्या मुलाला ठार मारून येतो. दावरला मुलाच्या मृत्यूचे दुःख झाले म्हणजे टिळकांच्या हद्दपारीने लोक किती हळहळत असतील याची त्याला कल्पना येईल.’

"यावर गणू गोंधळून म्हणाला 'मला तसे काहीच सांगता येत नाही.'

"नाशीकहून औरंगाबादला परत गेल्यानंतर तीन चार दिवसानी मी दाजीला पत्र लिहिले. त्यांत कळविले की 'एकस्याने खून करण्यास माझी तयारी आहे पण जॅकसन्चा खून व्हावा अशी माझी इच्छा नाही. दुसऱ्या कोणाला मारण्याचे काम सांगत असल्यास माझी तयारी आहे. हे पत्र गणूला दाखवूं नये.' या पत्राला मला नाशीकहून ताबडतोब उत्तर मिळाले की 'ठीक आहे' तुझ्या इच्छे-प्रमाणे आम्ही करावयास तयार आहों.' मला आतां दाखविले ते हेच पत्र होय.

प्र०—जॅकसन्ची अगर त्याच्या जुलुमाची तुला काय माहिती आहे? उ०—मला स्वतःला काहीच माहिती नाही.

प्र०—कर्वे याने तुला सांगितले म्हणून वाटेल तो बरा वाईट साहेब मार-ण्यास तू तयार होशील? उ०—होय. कारण कर्वे याजवर माझा विश्वास आहे. निदान कर्वे हा माझ्यापेक्षा जास्त शिकलेला आहे.

प्र०—साहेब लोकाना मारण्याची कल्पना तुझ्या डोक्यात प्रथम कशी आली? उ०—आमच्या लोकाना साहेबापासून न्याय मिळत नाही असे मला दिसून आले. जुलुमाची पुष्कळ उदाहरणे मी 'केसरी' 'राष्ट्रमत' 'काळ' वगैरे इतर वर्तमानपत्रातून वाचली आहेत. साहेब लोकाना मारूनच आम्हास न्याय मिळेल असे मला वाटते. मला स्वतःला अगर जवळच्या कोणास अन्याय झाला नाही. मे. जॅकसन याना मारल्याबद्दल मला आता वाईट वाटते. एका चांगल्या माणसाला मी विनाकारण मारिले."

निशाणी ३८७–टिळकाना १८९७ साली राजद्रोहाबद्दल शिक्षा झाल्याचा दाखला. आपणास शिक्षा झाली हे टिळकाना अमान्य नव्हते. पण ही निशाणी ग्राह्य मानली तरी रँडच्या खुनाशी टिळकांच्या लेखांचा संबंध असल्याबद्दलचे चिरोल यांचे अनुमान चूक होते. कारण १८९७ सालच्या खटल्यात सरकारी ॲडव्होकेट जनरल व खुद्द न्यायाधीश यानीहि असे स्पष्ट म्हटले होते की टिळ-कांचा व लेखांचा व खुनाचा संबंध होता असे आम्ही अप्रत्यक्ष रीतीनेहि ध्वनित करू इच्छित नाही!

आता दामोदर हरी चाफेकर याची जबानी पाहू.

"टिळकांची वर्तमानपत्रे वाचून माझे मन खुनाला प्रवृत्त झाले" असे दामोदर याने आपल्या जबानीत कबूल केले असे विधान चिरोल यानी आपल्या पुस्तकात लिहिले म्हणून टिळकानी दामोदर याची जबानीच दाखल केली! त्यात असे वाक्य कोठेच नाही. म्हणून चिरोल याना आपली कैफियत दुरुस्त करावी लागली. "लोकांच्या हिताकरिता मी रँड याला मारले" अशी चिरोल यानी दुरुस्ती केली. प्रत्येक अराजकाला असेच वाटते व तसे चाफेकर यासहि वाटत असेल. पण या जबानीने टिळकांचा संबंध काहीच सिद्ध होत नाही.

रँडच्या खुनात प्रत्यक्ष टिळकांचा हात होता असे चिरोल यानी म्हटले नाही. का? तर त्याना तसे उघड म्हणताच आले नाही! पण त्यानी म्हटले आहे ते अशा झोकात म्हटले आहे की टिळकांचा रँडच्या खुनाशी संबंध खातीने असावा. तो सिद्ध झाला नाही ही गोष्ट निराळी!

निशाणी ३९३–१९०८ साली टिळकांच्या हातचे खटल्यात दाखल झालेले स्फोटक द्रव्याची यादी लिहिलेले पोष्ट कार्ड. पण १९०८ साली न्या. दावर यानीच त्याबद्दल टिळकांचा खुलासा मान्य करून या कार्डाला तुम्ही मुळीच महत्त्व देऊ नका असे ज्यूरीस सांगितले होते.

निशाणी ३९७–नाशीक केसमध्ये ३८ आरोपीवर झालेले जजमेंट. नाशीकच्या खटल्याशी टिळकांचा संबंध नव्हताच. पण ३८ आरोपीपैकी विष्णु महादेव भट याना पुढे टिळकानी केसरी ऑफिसमध्ये ठेवले इतकाच टिळकांचा या निशाणीशी संबंध. भट यांचे बद्दल टिळकानी कॉर्सन यास बिनतोड उत्तर दिलेले खटल्याच्या हकीगतीत आले आहेच.

## ( १७ ) चिरोल साहेबांची मुलाखत

चिरोल खटल्याचा निकाल लागताच टिळकांच्या अनेक शत्रूनी चिरोल साहेबाना अभिनंदनाचे संदेश पाठविले. कित्येक वर्तमानपत्रानी आपले बातमीदार पाठवून त्यांच्या मुलाखती घेतल्या. पैकी ऑब्झर्वर ( observer ) पत्राच्या बातमीदाराला चिरोलसाहेबानी मुलाखत देताना जे उद्गार प्रगट केले ते नमुनेदार होते म्हणून त्यातील काही खाली देतो.

"खटला जिंकल्याबद्दल मला अर्थातच फार समाधान वाटत आहे. खटला चालणार विलायतेत व त्याचा सर्व पुरावा गोळा करावयाचा हिंदुस्थानात या अडचणीमुळे मला सतत चार वर्षे खर्च सोसावा लागला व श्रम पडले. युद्ध चालू असल्यामुळे टपाल व तारखाते यांचे काम दिरंगाईने चालू होते म्हणून साधी गोष्टही निकालात काढण्याला चार चार महिने लागत. मी वर्तमानपत्रात लिहिण्याचा धंदा आज किती तरी वर्षे करीत आहे. या अवधीत मला अडवून खडसावून जाब विचारणारे दोनच धीट गृहस्थ आढळले. पैकी एक टिळक आणि दुसरे जर्मन बादशहा कैसर विलियम. ही दोन नावे मी एका वाक्यात उच्चारतो याचे कित्येकाना मोठे आश्चर्य वाटेल. पण खरोखरच ती दोन नावे एकत्र उच्चारण्याला योग्य आहेत. १९१० साली माझ्या नव्या ग्रंथाची साधने जुळविण्याकरिता मी हिंदुस्थानात गेलो. त्यावेळी मला हे पूर्ण कळून चुकले होते की, जर्मन बादशहाच्या महत्त्वाकांक्षेमुळे पुढेमागे लवकरच त्याचे ब्रिटिश साम्राज्याशी युद्ध जुंपणार. आणि मौज ही की, हिंदुस्थानातील क्रांतिकारक चळवळीचे जे संशोधन मी केले त्यात मला असे आढळून आले की, हिंदुस्थानातील जहाल वर्तमानपत्रातून असा एकसारखा ध्वनि निघत होता की, इंग्लंडचे व कोणातरी एका मोठ्या युरोपियन राष्ट्राचे युद्ध

जुंपणार आहे आणि बंड करण्याला हिंदी लोकानी तीच संधि साधावी. या जहाल लोकांची प्रथम अशी कल्पना होती की रशियाशी इंग्लंडचे युद्ध जुंपेल. पण मागाहून ते जर्मनीशी जुंपेल असा त्यांचा अंदाज होऊ लागला. आणि केसरीने तर असे म्हणण्याचा प्रघात ठेवला होता की १८५७ साली झाले ते बंड नसून स्वातंत्र्याकरिता एक प्रकारचे युद्ध होते. ते फसले म्हणून लोक त्याला बंड म्हणतात इतकेच काय ते! जर्मन बादशहाला कदाचित् ही गोष्ट माहित असावी. म्हणून काही जहाल लोकापर्यंत प्रेष पोचवून युद्धाच्या पहिल्या दोन वर्षात लहान मोठे दंगेधोपे विशेष हेतूने त्याने करविले. आणि या सुमारास टिळकहि उघड बोलून दाखवीत की "उद्या जर्मनीने किंवा टर्कीने हिंदुस्थानावर स्वारी करून देश जिंकून घेतला तरी आमचे त्यात काय गेले? आहे ते राज्य काय अधिक चांगले आहे?" माझ्या पुस्तकानंतर नऊ वर्षांनी रौलट कमिशनने हिंदुस्थानातील क्रांतिकारक चळवळीचे समालोचन प्रसिद्ध केले त्यात जवळजवळ संबंध एक भाग टिळकांच्या उपद्यापाचे वर्णन करण्यात खर्ची घातला आहे. माझ्या खटल्याकरिता मला जो पुरावा गोळा करावा लागला तो रौलट कमिटीला फारच उपयोगी पडला. तो पुरावा गोळा करण्याकरिता मला सुमारे २००० पौंड खर्च आला. पुराव्याच्या त्या मोठ्या दोन पुस्तकात टिळकांच्या वीस पंचवीस वर्षांच्या क्रांतिकारक चळवळीचा इतिहास नमूद झालेला आहे. वाईट इतकेच वाटते की टिळकाना काळे पाण्यावर पाठविल्यावरहि ती चळवळ थांबली नाही. पुराव्याची ही दोन मोठी पुस्तके आता मी ब्रिटिश पार्लमेंटच्या ग्रंथालयाला नजर करणार आहे. कारण हिंदुस्थानात मुद्रणस्वातंत्र्य किती बोकाळले आहे हे त्यावरून पार्लमेंटच्या सभासदाना सहज कळून येईल. मॉंटेग्यू–चेम्सफर्ड–सुधारणानी नेमस्त व मवाळ लोकाना जहालापासून वेगळे करण्यात यश संपादिले आहे. तरी पण अजून राष्ट्रीय सभेसारखी सभा ठराव करतेच की, शांतता परिषदेकडे हिंदुस्थानाने एक शिष्टमंडळ पाठवावे व त्यात टिळक हेही एक असावेत! पण या खटल्यावरून तरी सरकार अजून सावध होईल अशी मला आशा वाटते." या शेवटल्या उद्गारावरून चिरोल साहेबांच्या मनात काय जळत होते याची अतज्ञ माणसाला कल्पना येणार नाही. पण खरी गोष्ट अशी होती की मॉंटेग्यू साहेबानी टिळकांची भेट घेतली आणि शिष्टमंडळाबरोबर त्याना आपणापुढे येऊ दिले याबद्दल चिरोलसाहेब व त्यांच्या विचाराचे इतर अनेक साहेबलोक मनातून नाराज झाले होते. सरकार टिळकाना एकीकडे आपला शत्रू असे प्रसिद्धपणे म्हणते काय! व दुसरीकडे स्वतः स्टेटसेक्रेटरी टिळकांची भेट घेतात काय व त्यांच्याशी स्वराज्याची वाटाघाट करतात काय! कोण ही असंगति! पण मॉंटेग्यू साहेब ज्या हेतूने हिंदुस्थानात आले होते त्याच्या दृष्टीने त्याना मुलाखतीतून कोणत्याही राजकीय पक्षाला वगळता येत नव्हते. शिवाय व्यक्तिशः टिळकांची योग्यता व महत्त्व

यांची त्याना पुरी जाणीव होती. मात्र टिळक चिरोलकेस हरल्यामुळे एक गोष्ट मात्र घडून आली ती ही की पार्लमेंटरी कमिटीने इतर शिष्टमंळाबरोबर टिळकाना आपल्यापुढे साक्षीला बोलाविले परंतु त्यांची उलट तपासणी केली नाही व अशा रीतीने त्यांच्याविषयीची आपली नाराजी प्रगट केली. वास्तविक हा प्रकार पोरकटपणाचाच दिसला. कारण टिळकाशी कमिटीला चर्चाच करावयाची नव्हती तर त्याना साक्षीलाच येऊ नका असे का म्हटले नाही ? मॉंटेग्यूसाहेब हे या कमिटीचे एक सभासद होते व ते टिळकांची उलट तपासणी करिते. पण कमिटीत लॉर्ड सिडनहॅम सारखे इतर लोक असल्यामुळे त्यांचे काही चालले नसावे.

## ( १८ ) खटल्याबद्दल तिऱ्हाइताचे मत

असो. चिरोल खटल्यातील पुरावा जबान्या कशा झाल्या याविषयी एका प्रेक्षकाचे मत खालील पत्रव्यवहारावरून दिसून येईल.

### एडगर वालेस यांचे बॅपटिस्टाना पत्र

लंडन २७ जानेवारी १९१९

चिरोल खटल्याची तारीख २९ जानेवारी ही लागली आहे. या खटल्याबद्दल येथल्या वर्तमान पत्रातून दोन्ही बाजूंचा पाठपुरावा करण्यात येणार असा रंग दिसतो. अशा वेळी टिळकांची हरकत नसेल तर टिळकांच्याबद्दल व्यक्तिशः गौरवपर असे संपादकीय लेख व या खटल्यात ज्या प्रकारचा साक्षीपुरावा पुढे आला आहे त्याबद्दल येथल्या लोकांचे सहीनिशी लेख छापावे असे मला वाटते. खटला चालू असला तरी टिळक व त्यानी केलेली एकंदर राजकीय चळवळ याबद्दल लेख लिहिण्याला आम्हास काहीच हरकत दिसत नाही. खटल्यासंबंधी तुम्हीहि एखादे खास आर्टिकल लिहून पाठवाल काय ?

### एडगर वालेस यांचे बॅपटिस्टाना पत्र

लंडन २ फेब्रुवारी १९१९

चिरोल केसचे काम उत्कृष्ट चालले आहे व टिळकानी साक्षहि चांगल्या प्रकारे दिली. एक पै देखील नुकसान भरपाई दाखल टिळकाना मिळू नये अशी प्रतिपक्षाची तर कसून खटपट चाललेली असते. कार्सन साहेबांचा आविर्भाव असा असतो की कोणाला वाटावे हा सर्वशक्तिमान व सर्वज्ञ परमेश्वराचाच अवतार आहे. या त्यांच्या वागणुकीने त्यांच्याबद्दल तिटकारा उत्पन्न होतो. अल्स्टरचा उल्लेख निघताच त्यांची व टिळकांची जी चकमक झाली त्यातहि हा आविर्भाव दिसून आलाच !

टिळक हे हिंदुस्थानचे व कार्सनसाहेब हे आयर्लंडचे अनभिषिक्त राजे यामुळे या दोघांचे हे वादयुद्ध हिंदुस्थानच्या इतिहासात चिरस्मरणीय होऊन राहील यात शंका नाही. तुम्ही सायमन साहेबाना एक गोष्ट मात्र विशेष बजावून सांगा. त्यानी आपल्या ज्यूरीपुढील भाषणात असे सांगितले पाहिजे की आपणास नुकसान भरपाई किती मिळावी यास टिळक महत्त्व देत नाहीत. नैतिक विजयाच्या दृष्टीनेच टिळक या खटल्याकडे पाहतात. आणि तुम्ही टिळकांच्यातर्फे निकाल देऊन एक शिलिंग जरी नुकसान भरपाईची रक्कम ठरवली तरी ती त्याना चालेल.

कार्सन साहेबानी तर कोर्टात फार्सच केला. कार्सन साहेबाना साक्षीदाराने उलथून पाडले आणि मग त्याबद्दल त्यानी शिरा ताणावयास सुरवात केली हे मी टिळकांच्याच खटल्यात पहिल्यानदा पाहिले. ' घरात खोल्या असतात पण खोली म्हणजे घर नव्हे ' हे जे सरकार व नोकरशाही यांच्याबद्दल टिळकानी उदाहरण दिले ते मोठे समर्पक व मार्मिक होते.

दुसरी एक विशेष गोष्ट तुम्हाला कळवावयाची ती ही की तुमचे स्नेही व तुमच्या पक्षातील इतर लोक कोर्टात खटला ऐकावयाला येतात ते पुष्कळ वेळा एखाद्या गमतीच्या प्रसंगी मोठ्याने हासतात व आपले मत प्रदर्शित करतात. १९०८ साली टिळकाना शिक्षा झाली तेव्हा गोऱ्या ज्यूरीने त्याना दोषी ठरवले व काळ्या ज्यूरीने ते निर्दोषी आहेत असा निकाल दिला हे वाक्य उच्चारताच कोर्टात तुमच्या मंडळीमध्ये हशा पिकला असे होऊ नये. कारण अशा मतप्रदर्शनाने येथील ज्यूरीचा टिळकांच्या खटल्याबद्दल वाईट ग्रह होण्याचा संभव आहे.

**एडगर वालेस यांचे बॅपटिस्टाना पत्र**

लंडन २३ फेब्रुवारी १९१९

तुम्ही अपील करावे असे सायमन सांगतील असे मला वाटत नाही. कारण या खटल्याच्या आरंभापासूनच येथल्या ज्यूरीने आपला ग्रह कसा दूषित करून घेतला होता हे तुम्ही पाहिलेच! मुख्यतः सरकार व इंडिया ऑफिस याविरुद्धच टिळकांचे या खटल्यात भांडण होते. आणि चिरोलला आपला खटला तयार करण्यात या दोघानीहि उघडपणे मदत केली हे कोर्टामध्ये बाहेर आलेच आहे. खटल्याच्या निकालासंबंधाने लंडन 'टाइम्स'ने दोन अग्रलेख लिहिले आहेत. आणि ' आब्झर्व्हर ' पत्रात खटल्याच्या निकालाबद्दल चिरोल साहेबांची मुलाखतहि प्रसिद्ध झाली आहे. या सर्वांवरून टिळकांचे नाव काळे करून त्यानी आरंभलेली विलायतेतील होमरूलची चळवळ उलथून पाडावी असा सरकारचा कावा आहे हे उघड दिसते. तुम्ही पासपोर्ट मागितले होते ह्यासंबंधी काय झाले!

## ( १९ ) वकील व त्यांची मते

पार्नेल प्रकरण व चिरोल प्रकरण यात अनेक दृष्टीनी साम्य आहे. पण विरोधाचाहि एक मोठा मुद्दा आहे. पार्नेल कमिशनमध्ये मुख्यतः राजकीय मुद्यावरच वाद होता आणि पार्नेल प्रभृति लोकानी अत्याचाराना सहानुभूति दाखविली असा त्यांच्यावर आरोप होता. टिळकांवरहि सरकारचा आरोप तोच होता. कमिशनपुढे पार्नेल प्रभृति लोक बोलून चालून आरोपीसारखे होते. चिरोल प्रकरणात टिळक हे मूळ फिर्यादी असले तरी उलटतपासणीचे वेळी ते जवळ जवळ आरोपीसारखेच होते. तथापि पार्नेलचे वकील सर चार्लस रसेल आणि टिळकांचे वकील सर जॉन सायमन या दोहोमध्ये जमीन अस्मानाची तफावत होती. सर चार्लस रसेल यानी पार्नेल प्रभृति लोकाशी तादात्म्य होण्याइतकी सहानुभूति ठेवली होती. उलट सर जॉन सायमन यानी अशी दक्षता ठेवली की व्यक्तिशः टिळकांशी आपली सहानुभूति काडीइतकीहि दिसू नये. असून दिसू नये असे नव्हे तर मुळातच नव्हती. अप्रिय अस्पृश्य किंवा भयंकर पदार्थ कोणी जसा दुरून चिमट्याने उचलतो त्याप्रमाणे सर जॉन सायमन यानी टिळकांच्या प्रकरणाला वकीलपत्राच्या चिमट्याने दुरून स्पर्श केला होता. त्याना भीति अशी वाटे की वकील या नात्याने आपण टिळकाविषयी एखादा शब्द चुकून अनुकूल बोललो आणि त्याचा अर्थ लोक भलताच समजले म्हणजे सर जॉन सायमन यांची टिळकाविषयी सहानुभूति आहे असा कोणाचा चुकून समज होईल. व तसा झाला तर ती आपत्तिच होय असे त्याना वाटे. 'तुमचा माझा हा संबंध केवळ धंद्याचा फक्त बाजारी असाच आहे' हे टिळकाना बजावण्याचे सायमन साहेबांच्या मनात प्रथमपासूनच होते. पण त्याला प्रसंग आला नव्हता. तो त्यांच्या सुदैवाने दादासाहेब करंदीकर यानी उपस्थित केला. मुकदम्याची चर्चा करण्याकरिता टिळकांचे बॅरिस्टर सॉलिसीटर वकील पक्षकार हे सर्व एके दिवशी एकत्र बसले असता टिळक व चिरोल यांच्या साक्षीविषयी प्रश्न निघाला तेव्हा करंदीकर यानी टिळक किंवा चिरोल याना विचारण्याकरिता एक प्रश्न सुचविला. ते म्हणाले हा प्रश्न विचारण्यासारखा आहे असे मला वाटते. तेव्हा सायमन म्हणाले तो प्रश्न मुख्य मुद्याना धरून फारसा आहे असे मला वाटत नाही. त्यावर करंदीकर सहज बोलून गेले की 'पण तो कदाचित आम्हाला हिंदुस्थानात उपयोगी पडेल.' हे शब्द ऐकताच सायमन साहेब एकदम उसळले व करंदीकरावर रागावून म्हणाले "मला तुमच्या हिंदुस्थानाशी काय करावयाचे आहे? ज्या गोष्टीचा मला अंदेशा वाटत होता तीच तुम्ही होऊन बोलून दाखविली बरे झाले. मी तुम्हाला एकदाच सांगून टाकतो की केवळ टिळकांचा वकील याहून या खटल्यात माझा काडीइतकाहि अधिक संबंध आहे असे समजू नका. केवळ वकिलीच्या नात्याने मी उभा राहणार आहे. आणि टिळकांच्या बाजूचे मी काही बोललो तर राजकारणाच्या दृष्टीने

त्यांच्या कृत्याविषयी किंवा लेखाविषयी मी सहानुभूति दाखवीन असे बिलकुल समजू नका." या प्रसंगाला अनुलक्षून पुढे दिलेले टिळकांचे सर जॉन सायमन याना पत्र व त्यानी टिळकाना दिलेले उत्तर ही वाचावी म्हणजे त्यांचे खरे मर्म वाचकांच्या लक्षात येईल. खटल्याचा निकाल झाल्यावर सर जॉन सायमन यांचे आभार मानण्याकरिता टिळकानी त्याना एक पत्र ता. ५ मार्च १९१९ रोजी लिहिले. त्यात ते लिहितात "आपण माझे काम फार लक्ष लावून मेहनतीने केले याबद्दल मी आपला ऋणी आहे. दुसरा कोणी असता तरी अधिक काय करता? आपण केवळ वकील या नात्याने मजकरिता उभे राहिलात. आपल्या व माझ्या राजकीय मतात ऐक्य नाही. आपण ही गोष्ट कोर्टापुढे सांगितली व मलाहि ती पटलेली आहे. आपली इच्छा अशी असल्याचे कळते की या खटल्याची हकीकत देताना आपण प्रधानमंडळात होता किंवा प्रिव्हीकौन्सिलर आहात या गोष्टींचा उल्लेख होऊ नये. ठीक आहे. माझ्या हाती ही गोष्ट आहे तोपर्यंत तसा उल्लेख होणार नाही हे निश्चित समजा." त्यावर सर जॉन सायमन यानी टिळकाना खालीलप्रमाणे उत्तर पाठविले.

लंडन ६ मार्च १९१९

"तुम्ही जे खाजगी पत्र मला पाठविले ते मिळाले व तशाच मनोभावनेने मी हे उत्तर लिहीत आहे. तुम्ही ही केस हरलात तथापि वकील या नात्याने मी जी खटपट केली तिजविषयी तुम्ही समाधान व्यक्त केलेत हे पाहून मला बरे वाटले. तुमचा खटला माझे हातात आला तेव्हा तो यशस्वी करण्यास बऱ्याच अडचणी येणार हे मला दिसून आलेच होते. व म्हणून शक्य तितक्या काळजीपूर्वक मी तुमचे काम केले. वकील या नात्याने जरी मी तुमची केस चालवली तरी त्याचा माझ्या स्वतःच्या राजकीय मताशी काहीहि संबंध नाही असेच तुम्ही मानता हे वाचून मला बरे वाटले. व जितक्या विश्वासाने तुम्ही ही गोष्ट मला कळवली तितक्याच विश्वासाने मी तिचा अंगिकार करतो.

"या खटल्याच्या निकालाने व्यक्तिशः तुमची व तुमच्या मित्रमंडळीची मोठी निराशा झाली असेल. पण एकंदरीने ह्याचा परिणाम सनदशीर मार्गावरच हिंदुस्थानची प्रगति चालावी असा झाल्यास ते काही वाईट नाही. मॉटेग्यू आणि व्हाइसरॉय यानी ज्या सुधारणा नुकत्याच सुचविल्या आहेत त्यांचे अभिनंदन करून सर्व पक्षाच्या व मताच्या लोकानी त्या स्वीकारण्यास पुढे यावे अशाच त्या आहेत."

या पत्रव्यवहारासंबंधी दोन शब्द लिहिणे अवश्य आहे. वास्तविक सर जॉन सायमन यानी टिळकाना तुमचा माझा संबंध अमुकच आहे असे बजावणे गैर होते. सर जॉन सायमन हे कोण आहेत ही गोष्ट टिळकानीच जाहीर केल्यामुळे प्रसिद्ध होणार असे थोडेच होते! ज्याला सायमन साहेबांचे नांव ऐकून माहित त्याला

ती गोष्टहि माहित असणारच. टिळकानी त्याना बॅरिस्टर नेमले ते आपल्या धंद्यात निष्णात म्हणूनच. कारण सर एडवर्ड कार्सन म्हणजे ज्यानी शेवटी चिरोल साहेबांचे वकीलपत्र घेतले ते लाभल्यास त्याना वकीलपत्र द्यावे असाहि टिळकांच्या सॉलिसीटरचा बेत होता ही गोष्ट त्यावेळच्या पत्रव्यवहारावरून दिसून येतच आहे. बरे सायमन साहेबांची भावना इतकी नाजूक होती तर त्यानी अशा राजद्रोही मनुष्याचे वकीलपत्र घ्यावयाचे नव्हते. त्याना खासगी भीड थोडीच कोणी घातली होती! त्यानी फीचे पैसे भरपूर घ्यावयाचे तेवढे घेतले. त्यांतूनहि टिळकानी सायमन साहेबांचा दर्जा जाहीर केला असता तरी त्यांच्या ब्रीदाला काय बट्टा लागला असता? किंवा त्याना कोणी नांवे ठेवली असती? टिळकांच्या पहिल्या खटल्याच्या अपिलात मि. ॲस्क्विथ हे टिळकांचे बॅरिस्टर होते व ते त्यावेळीहि प्रधानमंडळात समाविष्ट होण्याइतक्या दर्जाचे होते. पण त्यानी टिळकाजवळ अशा प्रकारचे विचार प्रगट केले नाहीत. येऊन जाऊन सायमन साहेबाना टिळकांच्या राजकीय चरित्राबद्दल आदर नसेल. पण तुम्ही तो आदर मला दाखवा असे म्हणण्याला टिळक त्यांच्याकडे गेले नव्हते. सायमन साहेबांची तरी राजकीय मते सर्वानाच कोठे पसंत होती? त्यांच्या मतांच्या एककल्लीपणामुळेच त्यांना प्रधानमंडळ सोडावे लागले. महायुद्धाला मनातून ते प्रतिकूल म्हणून प्रधानमंडळाला आवडले नाहीत आणि लोकानी त्याना देशद्रोही म्हणण्यापर्यंत पाळी आली. अशा मनुष्याने टिळकाना मुद्दाम म्हणावे की 'माझ्या राजकीय मतांचा किंवा दर्जाचा उल्लेख तुम्ही करू नका' हा अतिप्रसंग होय व संभावितपणाहि नाही. अड्डयावरचा गडी हमाली देऊन बोलावून आणावा व त्याने म्हणावे 'मी तुमची हमाली करीन पण माझ्या आडनावाचा उच्चार करू नका, का तर माझ्या कुळाला बट्टा लागतो' असे म्हणण्यासारखेच हे नव्हते काय? वास्तविक स्वाभिमानी टिळकानी सायमन साहेबाना आपल्या स्वभावाप्रमाणे खरमरीत उत्तर लिहून झाडलेहि असते. पण कोणी तरी संभावित राहिले पाहिजे म्हणून टिळकानी संभावितीचा कमीपणा आपणाकडे घेतला आणि वरील प्रमाणे मऊ शब्दाने उत्तर लिहिले. 'ज्या येई लघुता न अन्य सदनी ऐसा न कोणीचही' हीच म्हण खरी.

टिळकानी सर जॉन सायमन याना लिहिलेले आभारप्रदर्शक पत्र वर दिले आहे त्याच्या जोडीला पार्नेल यानी सर चार्लस रसेल याना अशाच प्रसंगी लिहिलेले आभार प्रदर्शनाचे पत्र वाचण्यासारखे आहे म्हणून ते खाली देतो. व ती दोन्ही एकत्र वाचली असता त्यातील फरकाचे मर्म कळून येईल.

पार्नेलचे सर चार्लस रसेल यास पत्रः—"कमिशनचे काम फार दिवस चालले. कंटाळवाणे झाले. तरी एकंदरीने माझे हित व आमचा मुकदमा या बाबतीत तुम्ही जी निष्ठापूर्वक मेहनत केली त्याकरिता तुमचे व अस्क्विथ साहेबांचे मी कृतज्ञतापूर्वक आभार मानतो. आमचे हेतु आमची कृत्ये व आयरिश इतिहासातील एका कठिण प्रसंगी ज्या चळवळीत आम्ही समरस झालो होतो ती चळवळ या

सर्वांचे जे तुम्ही उत्कृष्ट व भूषणास्पद समर्थन केले ते आमच्या हृदयात अखंड राहील व त्याबद्दल आम्हाला आपल्याबद्दल ममता व कौतुक वाटते."

## ( २० ) कार्सन साहेबांचे शब्दचित्र

कोणच्याहि खटल्यात हवा तसा वकील मिळणे ही महत्त्वाची गोष्ट असते. जसा पुरावा चांगला लागतो तसा वकीलहि चांगला लागतो. टिळकांच्या तर्फे बॅरिस्टर पसंत करिताना काय अनुभव आला हे वर सांगितलेच आहे. आता प्रतिवादीच्या वकीलाकडे पाहू. चिरोल साहेबाना सर एडवर्ड कार्सन हे वकील मिळाले ही गोष्ट त्यांच्यातर्फे पुष्कळच फायद्याची झाली. कारण त्यांचे मनच लोकपक्षाविरुद्ध होते. आणि लोकपक्षाला पाण्यात पाहणारा राजकारणातील पुराणमतवादी व सरकारपक्षाचा वाली असा वकील मिळाल्यास तो जितका समरसपणाने चिरोल साहेबांची बाजू मांडील किंवा टिळकांविरुद्ध हल्ले चढवील तितका दुसरा चढविणार नाही. ह्या दृष्टीने कार्सन साहेबांचे नाव चिरोल साहेबांच्या सालिसिटराना सुचले असल्यास व कार्सन साहेबानी तो खटला हौसेने घेतला असल्यास नवल नाही. कार्सन साहेब हे आयरिश होमरूल चळवळीचे कट्टयातील कट्टे शत्रु. आणि आयर्लंडला आता होमरूल मिळणार असे जेव्हा एक दोन प्रसंग आले तेव्हा यानी जवळ जवळ उघडपणे बंडाचे निशाण उभारले. आणि 'आम्ही युद्ध करू पण आयरिश लोकांच्या राज्याखाली जाणार नाही' अशी प्रधानमंडळाला ताकिद दिली. पण ह्या गृहस्थाचे वर्णन आम्ही देण्यापेक्षा एखाद्या तिऱ्हाइताच्या शब्दानीच दिलेले बरे. कारण चिरोल साहेबांचे वकील म्हणून कार्सन साहेबाविषयी आमचे मत कलुषित असण्याचा संभव उघड आहे हे आम्हीहि कबूल करितो. सुदैवाने कार्सन साहेबांचे एक वर्णन एका प्रसिद्ध इंग्रज लेखकाने केलेले नुकतेच आमच्या पाहण्यात आले आहे. म्हणून त्याचाच थोडासा अनुवाद येथे करितो. A. G. Gardiner हे 'डेली न्यूज' पत्राचे एक माजी संपादक होत. विलायतेतील अत्यंत नामांकित वर्तमानपत्रकारापैकी ते एक असून चरित्र लेखकात तर ते अग्रगण्य मानले जातात. त्यानी १९१६ साली Pillars of Society ह्या नावाचे पुस्तक प्रसिद्ध केले. त्यात काही प्रसिद्ध पुरुषांची वर्णने दिली आहेत. त्यात कार्सन साहेबांचेहि दिले आहे. त्याचा सारांश असा:—

" पुराणकाळी सुष्ट व दुष्ट देवता असत. त्याचप्रमाणे ऐतिहासिक कालातहि सुष्ट व दुष्ट अशा दोन्ही प्रकारच्या विभूति होऊन गेल्या. कार्सन ही एक त्यातलीच विभूति होय. त्याना ऐतिहासिक पुरुष असेहि म्हणता येईल. ते नसते तर बंडखोर अल्स्टर प्रांताला कोणीहि विचारले नसते. आणि होमरूलच्या युद्धात हा वीर जगप्रसिद्ध झाला. मात्र ही प्रसिद्धी चांगल्या स्वरूपाची नाही ! तरी पण त्यांचे शौर्य व धैर्य ही कोणासहि कबूल केली पाहिजेत. पडता पक्ष त्यानी उच-

लला म्हणून त्यांचे धैर्य आणखी विशेष. कार्सन हे आवेशाचे मूर्तिमंत पुतळे होते. पण त्यांच्यांत देशभक्ति होती असे मात्र म्हणता येत नाही. कारण त्याना देश असा नाही. फक्त त्यानी एक विशिष्ट पक्ष उचलला होता. त्यानी पक्ष बदलला नाही असेहि नाही. आणि ह्या पक्ष बदलण्याबद्दल लोकानी दोषारोप केले तेव्हा ते खोटे बोलले हे कागदोपत्री सिद्ध झाले आहे. आयरिश देशभक्ताना स्वातंत्र्य तर नाहीच पण सरसकट तुरुंग दाखवूं अशी लॉर्ड सॅलिसबरी यानी प्रतिज्ञा केली. त्यावेळी ते कार्य करण्याला कार्सन साहेब पुढे सरसावले. आणि इतर अनेक बुभुक्षित आयरिश स्त्री पुरुषांप्रमाणे त्यानी प्रधानमंडळाकडून फायदा करून घेतला. त्यांचा आवेश असा की भाषण करिताना त्यांच्या डोळ्यातून अश्रुहि येत. आणि या आवेशात सरकारी सत्तेला विरोध करून बंड करण्याचा धाक ते उघड घालू शकत.

"जगात चांगली बाजू अशी त्याना दिसतच नव्हती. गांवढळ मनुष्याच्या आंगचे गुण त्यांच्यामध्ये होते. उदात्त ध्येय कसे असते हे त्याना माहितच नव्हते. त्यांच्यापुढे एखादा कवि नेऊन बसविला तर त्याची जिव्हाच बंद होईल. त्यांच्याकडे पाहिले म्हणजे हा मनुष्य क्रूर रानटी असावा असा भास होतो आणि वाटते की स्वतः वध केलेल्या मनुष्यांच्या नर-कपालांची माळ हा घरी विसरून आला आहे इतकेच. नाटकात एखाद्या अतिदुष्ट मनुष्याचे पात्र घालावयाचे झाल्यास त्याची भूमिका घेण्याला यांच्या सारखा मनुष्य मिळणार नाही. ज्याला हा लाभेल त्याच्या शत्रूचे वाटोळे व्हावयाचेच. वकिलातील हे एक धेंडच होते. मऊ न्यायाधीश मिळाला म्हणजे मग हा अगदी सौम्य. पण याने कोर्टापुढे येऊन साधी हरकत घेतली तरी आभाळात गडगडल्याचा भास होतो. न्यायाधीश थोडा टणक मिळाला म्हणजे मग याहीपेक्षा त्यांचे उग्र स्वरूप दिसून येते. ज्यूरीला जरब देण्यात यांचा हातखंडा आहे. खटल्यात राजकारणाचा उपयोग कसा कुशलतेने करावा प्रतिपक्षाला दुष्ट हेतू कसे चिकटवावे हे ह्यांच्यापासून शिकावे. यांची उलट तपासणी सुरू झाली म्हणजे साक्षीदाराला पिंजऱ्यातून पळून जावेसे वाटते. राजकीय विषयावर भाषण करिताना इतकी द्वाड जात दुसरी कोणची आढळत नाही. भाषणात कोठे चुकूनहि उदार विचार किंवा रम्य विनोद आढळावयाचाच नाही. जाते भरडावे तसे सगळे भाषण कठोर व टणक. तरी पण त्याना एक प्रकारची लोकप्रियता लाभली. ज्याच्या रोमरोमातून भांडखोरपणाचा धूर निघत असतो असेच लोक नेहमी पार्लमेंटाला प्रिय होतात. सरकारच्या जोरावर आयर्लंडला यानी जित राष्ट्राप्रमाणे छळले आहे. अधिकाराच्या वरिष्ठ जागा स्नेह्याना मिळवून द्यावयाच्या. पोलिसांचा व न्यायकोर्टाचा उपयोग हातातल्या काठीप्रमाणे लोकाना सडकावयाला करावयाचा. सुदैवाने हा काल निघून गेला. आणि आयर्लंडात स्वातंत्र्यसूर्य उगवू घातला आहे. पण ह्या प्रकाशाकडे पाठ करून अजून हे गृहस्थ असेच उभे आहेत. अवतार खरा पण दुष्टपणाचा! रात्र संपली तरी यांच्या अंगावर

अजून काळोखच. आयर्लंडची करुणकहाणी संपली तरी तिची आठवण हवी असेल तर कोणीहि यांच्याकडे पहावे !"

केसरीच्या लंडनच्या बातमीदाराने कार्सन साहेबासंबंधी ता. १७ जुलै १९१९ च्या बातमीपत्रात खालीलप्रमाणे लिहिले होते:—

"ता. १२ जुलै रोजी बेलफास्ट येथे अल्स्टरवाल्यानी एक प्रचंड सभा भरविली होती व तीत कार्सनसाहेबानी आयरिश क्याथोलिकांना मनसोक्त शिव्या देऊन बंड करण्याची धमकी घातली. सुमारे सवादोनशे वर्षांपूर्वी बॉइन नदीच्या काठी प्रॉटेस्टंट इंग्रजी सैन्याने क्याथोलिक आयरिश बंडवाल्यावर जो मोठा जय मिळविला त्याच्या स्मरणार्थ दरवर्षी या दिवशी अल्स्टरवाले अशीच सभा भरवीत असतात. शिवाजी व अफझुलखान यांच्या युद्धाविषयी खुली चर्चा करणे हिंदुस्थानात निषिद्ध आहे. पण संभाजीच्या मृत्यूच्या साली प्रॉटेस्टंट व क्याथोलिक यांच्या दरम्यान आयर्लंडात झालेल्या युद्धाची चर्चा इकडे खुशाल हवी तशी करिता येते. येवढेच नव्हे तर प्रॉटेस्टंट लोकांना क्यार्थॉलिक लोकांचा धर्मगुरु जो पोप त्याची प्रतिमा चवाठ्यावर जाळता येते. अशा अपमानामुळे मने चेतली न जाण्याइतके आयरिश लोक निगरगट्ट आहेत म्हणावे तर तसेहि नाही. कारण अत्याचारांची खाई आयर्लंडामध्ये रात्रंदिवस पेटलेलीच आहे. असे असता दारूने भरलेल्या तळघरात जळती मशाल टाकण्याच्या अपराधाबद्दल सर एडवर्ड कार्सन यांच्यावर सरकार खटला करीत नाही ! आणि याच कार्सनसाहेबानी टिळकांचा मुकदमा चालू असता चिरोलसाहेबांचे वकील या नात्याने टिळकावर कसकसे तोंड टाकले हे केसरीच्या वाचकास स्मरत असेलच. कार्सनसाहेबाना कायदा लागतो की नाही असा एका सभासदाने पार्लमेंटात प्रश्न केला. पण बोनर लॉ यानी त्याला केवळ धरसोडीचे उत्तर दिले !"

## ( २१ ) चिरोल प्रकरणातला खर्च

चिरोल प्रकरणी खर्चाविषयी टिळकांचा अंदाज चुकला हे मागे सांगितलेच आहे. त्याचा प्रकार असा.

१९१६ च्या जून महिन्यात टिळकानी प्रथम सॉलिसिटरना ६०० पौंड पाठविले व त्याबरोबर सॉलिसिटरनी नोटीस कशी द्यावी, कैफियतीला हरकती कोणत्या घ्याव्या, मुकदम्याचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे, चिरोलसाहेबाच्या बुकातील नक्की हरकत घेण्यासारखी विधाने कोणती, वगैरेसंबंधाने सुमारे शंभर पानांचे टिपणहि करून पाठविले.

पण फिर्याद दाखल झाल्याबरोबर पैशाच्या मागणीने आपले तोंड उघडण्याला प्रारंभ केला. पहिला दणका टिळकानी प्रतिवादीकरिता कोर्टखर्चाच्या

जामिनकीदाखल कोर्टात रुपये भरण्याचा. या बाबत प्रतिवादीकडून विलायतेतील खर्चाकरिता चार हजार व हिंदुस्थानात येणाऱ्या कमिशनकरिता ८०० मिळून एकंदर सुमारे पाच हजार पौंडाची मागणी करण्यात आली. टिळकांच्या सॉलिसिटरनी याला हरकत घेतली व रक्कम ठरविण्याची बरीच घासाघीस झाली.

कमिशन परतून गेल्यावर चिरोलसाहेबांच्या सॉलिसिटरने कोर्टाला अर्ज करून टिळकांकडून खर्चाच्या जामिनकीबद्दल आणखी रक्कम घ्यावी अशी मागणी केली. ही रक्कम कशी कशी वाढत गेली ती पाहा. सुरुवातीला सात आठशे पौंड ठेवावे लागले. नंतर १९१७ च्या मार्चमध्ये आणखी एकवीसशे पौंड ठेवावे लागले. मिळून तीन हजार पौंडांची रक्कम आधीच झाली होती. हीच रकम गैरवाजवी आहे अशी टिळकातर्फे तक्रार करण्यात आली. पण कोर्टाने ती अमान्य केली. यानंतर कमिशन निघण्याचा हुकूम झाला आणि ते परत आल्यावर वर सांगितलेली ही फिरून मागणी झाली. त्यात नुसते मुंबईचे सॉलिसिटर लिटल् आणि कंपनी यांचेच बिल ८६४३२ रुपयांचे दाखविले गेले. आणि कमिशनचे काम किती दिवस चालले होते म्हटले तर अवघे पंचवीस दिवस! हे ८६४३२ व चिरोलसाहेबानी पूर्वी वेळोवेळी खर्च केलेले ७००० पौंड हा तोपर्यंत प्रतिवादीचा खर्च झाला असे सॉलिसिटरने सांगितले. पण यापुढे आणखी खर्च होणारच होता. सॉलिसिटरचे म्हणणे असे की "प्रतिवादी व वादी या दोघांचा पुरावा पाहता तो दहावीस हजार फोलियो ( बंद ) इतका भरेल. इतक्या सर्वांचा विचार कोर्टापुढे होणार. इतके सर्व कागद प्रतिवादीच्या बॅरिस्टराना वाचावे लागणार. प्रतिवादीने तीन बॅरिस्टर दिले आहेत. त्यांची फी फार जबर आहे. ती सर्व मिळून पाच हजार पौंड होईल. शिवाय सॉलिसिटर यांची फी वेगळीच. तरी वादीने कोर्टात भरलेल्या तीन हजाराशिवाय आणखी दहा हजार पौंड त्याने अमानत ठेवण्याचा हुकूम व्हावा!"

या कज्जात टिळकांचे मुंबईतील सॉलिसिटर राघवय्या व नगीनदास हे होते. यानी टिळकाकडून शक्य तितकी कमीच फी घेतली. तथापि त्यांचे अखेर बिल आले ते पाच हजार रुपयांचे होते. मुंबईच्या नुसत्या भाषांतरकाराची फी जवळ जवळ तीन हजार झाली. यावरून विलायतच्या सॉलिसिटरची फी किती झाली असेल याचा अंदाज सहज करता येईल.

सर जॉन सायमन याना प्रथम कागदपत्र वाचण्याकरिता पंधराशे पौंड, दुय्यम बॅरिस्टरला कागद वाचण्याकरिता दहाशे पौंड, दोघांची कारकून फी सुमारे दोनशे पौंड, दोघाना एक वेळ भेटण्याची फी पसतीस पौंड, स्वतः सॉलिसीटर यांची कागदपत्राची फी दहाशे पन्नास पौंड, अशा रीतीने नुसत्या कागदपत्रांच्या धूळभेटीला सुमारे अडतीसशे पौंड खर्च आला. याशिवाय खटला चाले तेव्हा रोजचा खर्च सुमारे तीनशे पौंडांचा व्हावा असा अंदाज होता. विलायतेत ज्यूरीचा चहा-

पाण्याचा खर्चहि दोन्ही पक्षकार मिळून देतात असे दिसते. कारण टिळकाना तो दररोज बारा तेरा पौंडप्रमाणे द्यावा लागला. लघुलेखकाची हकिकत छापण्याचा रोजचा खर्च फीसुद्धा ७५ पौंड व किरकोळ १० पौंड अशा रीतीने  हा दिवस खटला चालण्याचा खर्च सुमारे ३६०० पौंड झाला. तरीहि सॉलिसाटर यानी लिहून कळविलेंच की 'आम्ही तुमच्याकरिता फार कसोशीने थोड्या खर्चात भागवीत आहो.' याशिवाय प्रतिवादीच्या खर्चाकरिता जामिनकीची रकम ठेवण्याचा तगादा लागला तो वेगळाच.

चिरोल केसकरिता विलायतेला निघताना टिळक जवळजवळ कफल्लक बनून निघाले होते. घरसुद्धा गहाण पडले होते. आणि केस हरल्यास किंबहुना केस तडीला नेण्यासहि लागण्याइतके पैशाचे बळ केसरीजवळ नव्हते. अर्थात खटला आपण हरलो तर काय करणार याचा विचार त्यांच्या मनात येऊन गेलाच असला पाहिजे. एका आठवणीत असे लिहिले आहे की "विलायतेस निघण्यापूर्वी विश्वासातील मंडळी जवळ घेऊन त्याना टिळक म्हणाले " खटला माझ्यासारखा झाला तर मला मिळणाऱ्या पैशाचे मी काय करणार हे सांगावयास नको. पण खटला अंगावर आला तर परत येताच मी एक वर्षाची हक्काची रजा केसरीकडून घेऊन माझे अपूर्ण राहिलेले ग्रन्थ पुरे करून त्यावर हजारो रुपये मिळवून त्यातून ऋणमुक्त होईन. माझ्या ग्रन्थांचा योगच असा असतो की ते अडचणीच्या वेळीच लिहून होतात. " पुढे खटला बुडाला असे इकडे कळल्यावरहि फंड सुरू करण्याला टिळकानी लिहिले नव्हते. पण केसरी किंवा टिळकांचा वाडा जप्तीत निघावा ही गोष्ट त्यांच्या अनुयायांच्या मनाला शिवेना. म्हणून टिळकांकडून संमतीचा नव्हे पण एखाद्या सूचनेचा शब्दहि येण्यापूर्वी केवळ स्वयंस्फूर्तीने अनुयायानी व मित्रानी फंड जमविण्यास सुरवात केली. लोकाना न विचारता खटल्याला हात घातला म्हणून त्याचा परिणामहि माझा मीच भोगला पाहिजे ही टिळकांची भावना योग्य व सात्त्विक होती. पण वस्तुतः या खटल्यात टिळकांची व्यक्तिशः कोणत्याहि तऱ्हेची बदनामी नव्हती. तर स्वतः पुढारी होऊन त्यानी चालविलेल्या एकंदर चळवळीचाच तो इनसाफ होता. आणि या चळवळीत आपण सर्वच भागीदार आहोत या भावनेने लोकानी फंड जमविला. प्रथम इकडे फंड जाहीर केला तेव्हा खर्चाची नक्की कल्पना टिळकांच्याकडून आली नव्हती. मित्रमंडळीनी विचारल्यास सालिसिटरकडून कळेल व मग ती कळवू असे ते लिहीत. म्हणून केवळ अंदाजी आकडा ठरवून फंडाला सुरवात झाली. तो लाख पन्नास हजारानी कमी पडला असता तरी टिळकाना काही वाटले नसते. आणि वर सांगितल्याप्रमाणे ग्रंथ लिहून व इतर रीतीने कर्ज अंगावर घेऊन त्यानी ते फेडले असते. पण फिर्यादीचा एकंदर खर्च भागविण्याइतका फंड प्रत्यक्ष जमल्यावर लोकानी तरी त्यातील काही शिल्लक ठेऊन व तितका बोजा टिळकावर लादून काय साधावयाचे होते ! या फंडापैकी व्यक्तिशः टिळकाना एक पैहि कोणी दिली नाही. व केसच्या

निकालानंतर जी खासगी रक्कम त्यांचेजवळ शिल्लक होती ती अडीअडचणीच्या वेळी केसरी व वाडा अवचित लिलावाला निघू नयेत याकरिता त्यानी दूरदृष्टीने शिल्लक ठेवलेली होती. आणि तीच शिल्लक त्यांची त्याना परत मिळाली याहून दुसरे काही नाही. हा फंड उभारल्याबद्दल त्याना व त्यांच्या अनुयायाना नावे ठेवणारे काही मूर्ख व दुष्ट लोक निघाले होते. पण त्याना आतील काहीच माहिती नव्हती. आणि "मुलाना पैसा शिल्लक ठेवण्याकरिता टिळकानी हा फंड उभारविला" या त्यांच्या विधानासारखे खोटे व अधमपणाचे विधान असूच शकणार नाही. पण असली विधाने कोणीहि समंजस मनुष्याने केलेली नाहीत. व वरच्या आक्षेपाप्रमाणे लोकाना जर खरोखरच वाटले असते तर एवढी रक्कम जमलीच नसती ! पण आक्षेपकानाहि स्वतः टिळकाना नावे ठेवण्याचे धैर्य नसल्यामुळे "लोक असे असे म्हणतात" असे म्हणून ते टिळकाना स्वतःच्या मनचेच लिहित होते. निंदक मनुष्याची ही एक नेहमीची युक्तिच असते. मनातून दुसऱ्याची निंदा करावयाची पण तोंडाने म्हणावयाचे की " काय लोक वाईट ! ते तुम्हाला असे असे म्हणतात." असे म्हटल्याने निंदा करणाराचे समाधान झाले व स्वतःवरची जबाबदारी टळली. या आक्षेपकापैकी कित्येक असे खमंग होते की ज्यानी जन्मभर लोकाना बुडविण्याशिवाय दुसरा धंदा केला नाही. घरभाड्याच्याहि फिर्यादी करून घेतल्या. आणि टिळकांचे निरपेक्ष निकटचे व स्नेही म्हणत म्हणत त्यानी केसरी कडील पैसे घेऊन कसे बुडविले याची साक्ष केसरीच्या वहीखात्यात केव्हाहि मिळणारी आहे. स्वतः या निंदकानी या संकटात टिळकाना मदत काय केली हे कोणी विचारले असता ते काय उत्तर देतील ? लोकांचे नाव सांगून टिळकाना लोभी म्हटले एवढी शहाजोग मदत केली खरी !

## ( २२ ) टिळकाविषयीं चिरोलचे अखेरचे मत

शेवटी चिरोल साहेबांचे टिळकाविषयी जे अखेरचे मत होते त्यासंबंधी एक उतारा देऊन हे प्रकरण संपवितो. चिरोल साहेबानी आपल्या पाहिल्या पुस्तकात टिळकाविषयी जसे लिहिले तसे त्यानी अलीकडे दोन तीन वर्षांपूर्वी प्रसिद्ध केलेल्या 'इंडिया' नामक पुस्तकात लिहिले नाही. त्या व या लिहिण्यात कोणालाहि फरक दिसून येतो. या नंतरच्या पुस्तकात चिरोल साहेबानी टिळकांचे वर्णन दिले आहे ते असेः—"टिळक हे पुण्याचे ब्राह्मण. जातीने चित्पावन. चित्पावन ब्राह्मण वर्ग हा ईश्वराचा मोठा लाडका असा हक्क तो वर्ग नेहमी सांगत असतो. पुराणमतवादी काय किंवा सुधारणावादी काय कोणतीही बाजू घेतली तरी हल्लीच्या काळी या चित्पावन जातीने जितके कर्तृत्ववान व शीलसंपन्न पुढारी निर्माण केले तितके इतर कोणत्याहि जातीने केले नाहीत. टिळक हे पुराणमतवादी वर्गापैकी होते. हल्लीच्या काळी त्यांच्या इतका लोकोत्तर पुरुष कोणीच झाला नाही. कदाचित् गांधी त्यांच्या बरो-

बरीला येतील. गांधींचा सौम्यपणा व विनय टिळकांच्या अंगी नव्हता. पण बुद्धिमत्ता व राजकारणातील मार्मिकपणा हा गुण गांधीपेक्षा टिळकांच्या अंगी फार अधिक प्रमाणाने होता. आपल्या धर्मावर त्यांचा अढळ व दुर्दम असा विश्वास होता. त्या विश्वासामुळे इतर धर्मांना ते तुच्छ मानीत. पुढाऱ्यांचे गुण त्यांच्या अंगी जन्मसिद्ध म्हणजे स्वयंभूच होते व एकदा युद्ध जुंपले म्हणजे ते त्यात कोणालाच दयामाया दाखवीत नसत. ब्राह्मण वर्ग क्षत्रियाहून श्रेष्ठ म्हणून त्यानी तरवारीने कधी युद्ध केले नाही. फक्त लेखणी व जिव्हा हीच त्यांची हत्यारे त्यानी वापरली. ते इंग्रजी भाषा चांगली लिहित व बोलत. स्वतःच्या खडबडीत पण जोरदार मराठी भाषेत तर ते कोणालाच हार जात नसत. ते उदयाला येण्याचे सुमारास रानडे चंदावरकर भांडारकर वगैरे प्रागतिकानी काढलेल्या प्रार्थना समाजाचे बस्तान बरेच बसले होते. पण टिळकांच्या दृष्टीने असले लोक सरकारच्या भोंवती गोंडा घोळणारे व इंग्रजी राज्याचे गुलाम होते. इंग्रजी राज्यावर हल्ला करण्यापूर्वी प्रथम या लोकाना चिरडून टाकले पाहिजे असे टिळकाना वाटे. म्हणून त्यांच्या विरुद्ध आपल्या वक्तृत्वाचा पहिला सपाटा टिळकानी सुरू केला. सतराव्या शतकातील आमच्या राऊंडहेड लोकाप्रमाणे टिळकांच्या भाषणात धार्मिक विचार व कल्पना यांची रेलचेल असे. वर्तमानपत्रे व सभा यातून टिळकांची गर्जना चालू होती. आणि अनुयायांच्या प्रचंड संख्येने व त्यांच्या धाकाने ते प्रतिपक्षाला दडपून व तुडवून टाकीत. संमतिवयाच्या बिलाविरुद्ध पुराणमतवादी लोकांचे मुख्य पुढारी म्हणून त्यानी मोहीम केली. सरकारने धर्मात नव्या कायद्याने हात घातल्याने लोकांचे पारलौकिक अकल्याण होईल असे म्हणून टिळकानी सरकारचा तीव्र निषेध केला. या त्यांच्या विचारसरणीने ब्राह्मणाप्रमाणे ब्राह्मणेतर देखील टिळकाना वश झाले. सरकारने कायदेमंडळात हे बिल मंजूर केले पण तो विजय नसून पराभव ठरला. कारण राष्ट्रात इतकी खळबळ झाली की पुन्हा असे न करण्याविषयी सरकारने कानाला खडा लावून घेतला! टिळकांचे वजन परप्रांतात वाढत होते तरी आपल्या प्रांतात आपले वजन कायम राहावे असेच त्यानी प्रयत्न ठेवले. मराठे जातीच्या चालीरीती व भावना यांची त्याना पूर्ण ओळख होती. आणि स्वतः श्रेष्ठ वर्णाचे म्हणून त्याना गणपती उत्सवासारख्या प्रसंगातून व शिवाजी उत्सवातून मुसलमान व इंग्रज सरकार यांचे विरुद्ध भावना जागृत करिता आल्या. युरोपातील राजकीय चळवळीचा अभ्यास करून त्यापासून बोध घेणे व त्यांचा उपयोग हिंदी राजकारणात करणे ही गोष्ट टिळकानीच प्रथम केली. १८९६ साली त्यानी दुष्काळाच्या प्रसंगी शेतकऱ्याना हाती धरून चळवळ केली ती आयर्लंडमधील

लँडलीगच्या चळवळीवरूनच सुचलेली होती. राजकीय चळवळीचे एक साधन म्हणून खुनाचा उपयोग करण्याचा पहिला पायंडा रँड साहेबांच्या खुनानेच घालण्यात आला. आणि पुढे या बीजाचा मोठा वृक्ष झाला. टिळक व हे खून यांचेमध्ये प्रत्यक्ष संबंध असल्याचे मात्र कोणास शाबित करिता आले नाही. सुधारकांची पीछेहाट झाली व तिचा परिणाम राष्ट्रीय सभेत दिसून आला. मध्यन्तरी टिळकावर खटला होऊन बॉबगोळयाचे रहस्य लोकाना पटविल्याबद्दल त्याना शिक्षा झाली. पण बाहेर येताच फिरून त्यानी स्वराज्याची चळवळ सुरू केली. आणि लखनौ येथे ते व बिझांटबाई यांची जोडी व्यासपीठावर आली तेव्हा ईश्वराचे अवतार प्रगट झाल्याप्रमाणे लोकानी त्याना उत्थापन व अभिवादन दिले!"

# भाग ५ वा.

## विलायतेतील हकीकत

### (१) प्रास्ताविक

टिळक ता. ३० आक्टोबर १९१८ रोजी विलायतेस पोचले व तेथून परत ता. ६ नवंबर १९१९ रोजी निघाले. अशा रीतीनें ते विलायतेस सुमारे १३ महिने होते. यापैकी पहिले १० महिने ते मैदाव्हेल या भागात हौले प्लेस नं. १०च्या घरात रहात होते. शेवटी तीन महिने ते बेजवॉटरच्या मोहोल्यात टॉलबट रोड नं. ६० च्या घरात राहिले होते. पहिल्या बिऱ्हाडी होते तोपर्यंत त्यानी मॅक्नल्टी या नावाचे तीन माणसांचे एक कुटुंबच्या कुटुंब नोकरीस ठेवले होते. त्यापैकी मिस्टर मॅकनल्टी हा बाहेर कामास जाई आणि त्यांची बायको व मुलगी ही टिळक व त्यांची मंडळी यांचे घरकाम व स्वयंपाक करीत. भात भाजी ही त्याना करता येतच असत. पण टिळकाना लागणाऱ्या पुऱ्या करण्यास त्याना शिकविण्यात आले होते. पाव बिस्किटे ही बाहेरचीच आणीत. पण पुडिंग वगैरे शाकाहारी पक्कान्ने विलायती पद्धतीची त्या करीत. ते पदार्थ हिंदुस्थानात असता खाण्यात न येणारे असे होते पण शुद्ध स्वच्छ व रुचकर असत. टॉलबटरोडवर राहावयास गेल्यावर तेथे एक कर्नाटकी ब्राह्मण आयताच मिळाला. तो मूळ कुचबिहारच्या राणी इंदिरा राजा यांच्या परिवारात विलायतेत गेला होता. त्याला याच सुमारास हिंदुस्थानात परत जाण्याला परवानगी मिळाली. त्यामुळे रिकाम्या आचाऱ्याला नोकरी आणि गरजू गृहस्थाला रिकामा नोकर असा योग जुळून आला. हा जातिवंत आचारी नसल्यामुळे स्वयंपाकाचे काम बिघडे. भात आमटीहि फारच सुमार करी. पण विलायतेच्या वनवासात पक्कान्ने न मिळाली तरी नुसता दूध भात काय थोडा झाला? स्वतः टिळकाना पुरीशिवाय दुसरे काही खावयाचेच नव्हते. पण इतराना ज्याच्या त्याच्या रुचीप्रमाणे उभय आहाराचे अनेकविध पदार्थ मिळण्यासारखे असल्यामुळे उपवास पडण्याचे कारण नव्हते. विलायतेच्या अनुभवावरून असे वाटते की तिकडे मांसाहार हा सोईचा व प्रकृतीला अधिक मानवणारा असला तरी वनस्पत्याहारावर मनुष्य जगणारच नाही असे नाही. विद्यार्थीस्थितीत जे लोक तिकडे असतात व ज्याना घरगुती खाणावळीत राहावे लागते त्याना तो आहार जिकीरीचा होतो हे खरे. कारण इतर सर्व पदार्थ मांसाहारी लोकाकरिता आणि काही पदार्थ मुद्दाम वनस्पत्याहाराकरिता रोज तयार करावे लागल्यास घरगुती खाणावळवाले कंटाळतात. पण हा प्रश्न खर्चाचा आहे. मनुष्य खर्च करण्याच्या स्थितीत असला, विशेषतः त्याला प्रवाशाप्रमाणे कामानिमित्त थोडेच दिवस विलायतेत राहावयाचे असले, तर वनस्पत्याहाराने त्याचे निभण्यासारखे आहे. स्वतः टिळकांची व त्यांच्याबरोबरच्या

काही लोकांची प्रकृती ते केवळ वनस्पत्याहारी असताहि उत्तम राहिली होती. दूध फळे पाव बिस्किटे लोणी साखर बटाटे व इतर भाज्या हे पदार्थ वाटेल तसे वाटतील तितके मिळतात. येऊन जाऊन तळलेले फोडणी दिलेले किंवा मसालेदार पदार्थ मिळत नाहीत. तात्पर्य खाण्यापिण्याच्या बाबतीत टिळकाना व इतराना काहीच अडचण पडली नाही.

टिळकाबरोबर गेलेल्या लोकापैकी वनस्पत्याहारी लोकांचीहि प्रकृती विलायतेत सुधारून आली. दादासाहेब करंदीकर हे वृद्ध असताहि तेथे स्नानसंध्या वगैरे सर्व कार्य यथासांग करीत. निषिद्ध आहाराला ते दुरूनहि शिवले नाहीत. तथापि व्यायाम व विलायतची थंड हवा यांच्या योगाने इकडे परत आल्यावर त्यांच्या गौरवर्ण गालावर गुलाब फुललेले लोकानी पाहिलेच असतील. टॉलबट रोडवरील ज्या घरात टिळक रहात होते त्याचे मालक शेट दीपचंद जव्हेरी हे सुरतचे रहिवासी व धर्माने जैन आहेत. ते जवाहिराचा व्यापार करण्याकरिता इंग्लंड व फ्रान्स या देशात पुष्कळ वर्षे जाऊन सहकुटुंब राहिलेले आहेत. ते पूर्णपणे शाकाहारी आहेत. त्यानी इकडून दोन आचारी तिकडे नेले होते. आणि त्यांच्या उपवनगृहात त्यानी आम्हाला दूधपाक साखरभातासुद्धा मेजवानी दिली. तात्पर्य विलायतेत इकडचा पदार्थ तयार करण्याची सर्व साधने मिळतात. जिन्नसहि चांगला तयार होतो. फक्त या विशेष सोईला खर्च येतो म्हणून विद्यार्थी वगैरे लोकाना तो झेपत नाही.

टिळक विलायतेत गेले होते तरी त्यांच्या दिनचर्येत काही विशेष फरक पडला नव्हता. ते नित्याप्रमाणे सहा सात वाजता निजून उठत. सर्व प्रातर्विधि देशी पद्धतीप्रमाणे करीत. फक्त विलायतेस गेल्यापासून विजार पाटलोण त्याना जी एकदा चिकटली ती परत येईपर्यंत सुटली नाही. धोतर नेसून हिंडणे फिरणे शक्यच नव्हते. बूट घालण्याचा कंटाळा परंतु तोहि त्याना नेहमी घालावा लागे. छानछोकीचा स्वभाव नसताहि दाढी वाढविली नसल्याने त्याना नित्य आपल्या हाताने श्मश्रु करावी लागे. पण ते वस्तरा झाकलेलाच वापरीत. कारण उघड्या वस्तऱ्याने श्मश्रु आपल्या हाताने करण्याची त्याना सवय नव्हती. शिवाय मधुमेहाची व्यथा असल्याकारणाने यत्किंचितहि कापणे जखम होणे हे त्याना घातुक होते. सकाळचा चहा वगैरे झाल्यावर ते नियमाने पाच चार मुख्य मुख्य वर्तमानपत्रे वाचीत व नंतर पत्रव्यवहार पहात. नामजोशी बरोबर होते त्याना टाईपरायटिंग येत असल्यामुळे ते पत्रांच्या प्रति करीत. टिळकानी तिकडचा वेगळा सेक्रेटरी ठेवला नव्हता. रोज भेटी परतभेटी यांचा कार्यक्रम भरपूर असे. व तीच थोडी जिकीरीची गोष्ट होई. एकतर चालताना पाय किंचित लटपटत. शिवाय कानाला ऐकूहि थोडे कमी येई. विलायतेतील रहदारी बोलावयासच नको. ऑम्नेबस क्षणभरच उभी रहावयाची. तितक्यात चढउतार करावा लागे. तथापि नामजोशासारखे दक्ष व खंबीर परिचारक असल्याने ही सर्व हालचाल

निभावून गेली. ट्रॅम ऑम्निबसचे अड्डे व ट्यूब गाड्यांची स्टेशने किंचित लांब लांब असतात यामुळे जरूर तेथे टॅक्सि करीत. पण टॅक्सीला खर्च फार यामुळे चार पावले अधिक चालूनहि जात. कोणालाहि भेटावयाला टिळक गेले तरी प्राय: नामजोशी हे बरोबर रहात.

टिळक तेरा महिने विलायतेत होते तरी आपल्या कामाशिवाय ते कोठेहि बाहेर गेले नाहीत. इमारती बागबगीचे चित्रसंग्रह प्राणिसंग्रह इत्यादि वस्तु किंवा इतिहासप्रसिद्ध स्थळे ही त्यानी मुद्दाम जाऊन कधीच पाहिली नाहीत. मग सिनेमा नाटकगृहे यांची गोष्टच बोलावयास नको! नाही म्हणावयाला डॉ० क्लार्क यांच्या निमंत्रणावरून ते तिकडची एक जत्रा पाहावयास गेले होते. मधून मधून ते पार्लमेंटच्या सभागृहाकडे जात. पण तेथेहि वादविवाद ऐकण्याला ते फारसे गेले नाहीत. रॉयल एशियाटिक सोसायटीत मात्र ते केव्हा केव्हा जात. तात्पर्य मुशाफर प्रवाशी यांच्या पद्धतीप्रमाणे त्यानी विलायत मुळीच 'पाहिली' नाही. लंडन सोडून बाहेर पांच चार शहराखेरीज कोठे गेले नाहीत व तेथे गेले तेहि व्याख्यानापुरते गेले. इंग्लंड सोडून बाहेर युरोपात अमेरिकेत जावे अशी त्यानाहि मनातून इच्छा होती. पण त्या दिवसात पासपोर्ट मिळण्याची पंचाईत. शिवाय शरीर दुर्बलता कानाला कमी ऐकू येणे या सर्व कारणाकरिता काम संपल्याबरोबर मिळाली ती आगबोट घेऊन टिळक हिंदुस्थानाला परत आले. व आगबोटहि जाता येता थेट विलायतची मिळाली यामुळे फ्रान्स वाटेवर तरी तेथेहि त्याना उतरता आले नाही.

लो. टिळकांचा इकडील वर्तनक्रम सर्व लोकांना परिचितच होता. कारण बाहेर कोठेहि चारचौघात मिसळून सर्वस्वी त्यांच्यापैकी एक असल्याप्रमाणेच ते वागत. प्रत्यक्ष त्यांच्या खाजगी घरीही ते असतील तेथपर्यंत सर्व तऱ्हेच्या लोकांचा सर्व काल प्रवेश असे. म्हणून त्याना प्रेक्षकापासून खाजगी असे काहीच राखून ठेविता येत नसे व तसे ठेवण्याची त्यांची फारशी इच्छाहि नसे. परंतु सुमारे चौदा महिने ते हिंदुस्थानाबाहेर म्हणजे विलायतेत होते त्यावेळचा त्यांचा वर्तनक्रम कसा असेल याविषयी लोकाना एक प्रकारचे कुतूहल वाटत असे.

टिळक विलायतेस गेले त्यावेळी पुष्कळाना अशी शंका वाटत असे की टिळकांची राहणी पूर्णपणे देशी पद्धतीची असल्यामुळे त्यांचे तिकडे पदोपदी नडेल. ते लोकाना हंसतील! लोक त्याना हसतील! मिळून त्यांच्या सफरीचा सगळा गोंधळ उडेल. पण अनुभवांती हा अंदाज सर्वस्वी फसला. टिळकांची रहाणी देशी रिवाजाची असली तरी युरोपिअन लोकांच्या रहाणीची त्याना ऐकून व वाचून फार सूक्ष्म माहिती होती. यामुळे त्यानी तिकडील लोकाविषयी उपहासबुद्धि दर्शविली नाही. तसेच आपण परक्या समाजात गेलो असता कसे वागावे ह्याचीहि त्याना पूर्ण जाणीव असल्याने त्यांचे इंग्लिश समाजातील वर्तन तिक-

डील शिष्टाचारास अनुसरून राहिले व ज्या गोष्टी देशी रिवाजाच्या त्या तशाच तिकडेही त्याना राखाव्या लागल्या. त्या लोकाना पटतील असाच त्यांचा आत्मविश्वास असे. सभ्यता ही केव्हाही व कोठेही झाले तरी शिष्टाचाराचा आत्मा आहे व देशादेशाच्या रितीभाती कितीही भिन्न भिन्न असल्या तरी सभ्यता म्हणून म्हणतात ती कोणच्याहि देशात एकाच स्वरूपात आढळते. नम्रता आदरबुद्धि लीनपणा सहिष्णुत्व मनाचा मोठेपणा काही मर्यादेपर्यंत वाईटहि चांगल्याच बुद्धीने झालेले आहे असे मानण्याची तयारी व साधारणतः शारीरिक स्वच्छतेविषयी अगत्य इतक्या सर्व गोष्टी मिळून सभ्यता बनते असे म्हणण्यास हरकत नाही. आणि या दृष्टीने इंग्लंड–फ्रान्सपासून तो चीन–जपानपर्यंत कोणच्याही देशात तुम्ही जा. तुम्हाला खरी सभ्यता व शिष्टाचार फारसे वेगवेगळ्या स्वरूपात दिसणार नाहीत. विदेशी मनुष्यांचा संबंध आला असता आत्मविश्वासाचे तत्त्वहि बरेच महत्त्वाचे ठरते. कारण एकाकरिता दुसरा आपला रीतरिवाज किंवा पोषाख बदलीत नाही. तरी पण आपला स्वतःचा पोषाख चांगला आहे त्याला नाव ठेवण्यासारखे काही नाही असा आत्मविश्वास मनुष्याच्या ठिकाणी असला तरच तो दुसऱ्याशी वागताना शरमिंधा होत नाही. आणि "माझे ते निदान माझ्यापुरते तरी बरोबर आहे" अशी स्थिर बुद्धि ज्याच्या मनात असते तोच मिथ्यानुकरणापासून अलिप्त राहतो. दुसऱ्याचे अनुकरण करण्यास जाऊन जो फसला त्याच्यासारखी फजिती मात्र दुसऱ्या कोणाची नाही.

टिळक विलायतेस गेले त्यापूर्वी काही दिवस बॅपटिस्टा हे तेथे डेप्युटेशनच्या कार्याकरिता गेले होते व त्यानी टिळकाकरिता घर भाड्याने घेऊन चालचलाऊ बिऱ्हाड सजवून ठेविले होते. त्यांचे पहिले वसतिस्थान स्वतंत्र असून त्यात सर्व सोयी होत्या. पण हिंदी मनुष्याला हिंदी रिवाजाने रहावयाचे असल्यास विलायतेतहि फारशा सोयी लागत नाहीत. साध्या राहणीचा फायदा मनुष्याला जगभर मिळतो.

हिंदुस्थानातल्याप्रमाणे लंडनमध्येही टिळक दोन वेळ चहा व दोन वेळ जेवण याशिवाय काहीही खात नसत. टिळकांच्या पोषाखाच्या दृष्टीने बूट व पाटलोण व लांब कोट एवढाच फरक विलायतेत पडला होता. उपरण्यास रजा मिळाली होती. पण शिरोभूषण पगडी ही मात्र डोक्यावर राहिली. बूट पाटलोण हे विलायतेत अपरिहार्यच आहेत. कोणच्याहि देशाचा पोषाख पुष्कळसा तेथील हवामानावरूनच बनलेला असतो. इंग्लंडात लोकरीचे स्टॉकिंग्ज व बूट न घालता ऐन उन्हाळ्यात भर दोन प्रहरी घरात काही वेळ बसता येईल. नाही असे नाही. पण मोकळ्या पायाने किंवा जोडा घालून उन्हाळ्यातहि सर्व दिवसभर वावरता येणार नाही. तीच गोष्ट पाटलोणीची. पाय चांगले लपेटणारे असे लांबलचक धोतर नेसून उन्हाळ्यात लंडनच्या रस्त्यातून फिरता येईल. पण तेथील हवा इतकी चंचल आहे की केव्हा गारठा पडेल याचा नेम नाही. व गारठ्याच्या हवेला विजार पाटलोणीसारखा बंदिस्त

कपडाच हवा. दक्षिणी पगडी व साहेबी टोपी यात अधिक कुरूप कोणते हा प्रश्नच आहे. पण "तुमची हेंगाडी टोपी जशी तुम्हाला वाईट वाटत नाही तशीच आमची पगडी आम्हाला" अशा आत्मविश्वासाने मान ताठ करून मनुष्य चालला तर लंडनच्या रस्त्यातहि त्याला कोणी सहसा हसणार नाही. नेकटाय वगैरे बाबींना टिळकांनी सर्वस्वी फाटा दिलेला होता. हवामान लक्षात घेता बूट पाटलोण या गोष्टी केवळ सोयीच्या म्हणता येतील, पण नेकटाय ही मात्र अनुकरणाच्या दास्यत्वाची पक्की खूण आहे. खुद्द विलायतेतहि नेकटाय न घालणारे असे धर्मोपदेशक वगैरे लोक असतात. त्यांचे पाहून नेकटाय न घालणारे टिळक हेही एक प्रीस्ट किंवा धर्मोपदेशक आहेत असे प्रेक्षक मानीत व हसत नसत.

घरच्या वागणुकीत टेबलावर जेवणे ही एक गोष्ट वगळली असता टिळकांच्या इकडच्या व तिकडच्या वागणुकीत काहीच फरक नव्हता. जेवताना ते जिंजर किंवा सोडा वॉटर घेत. पण हे पदार्थ ते इकडे हिंदुस्थानातहि केव्हा केव्हा घेत असल्यामुळे या बाबतीत फरक असा काहीच नव्हता.

इंग्लंडात बारा चौदा महिन्यात टिळकांनी काय काय काम केले हे पुढे दिसून येईलच. तूर्त मुद्दा वागणुकीसंबंधाचा आहे. इकडेहि गव्हर्नरपर्यंत लहान थोर दर्जाच्या युरोपिअन लोकांशी भेटण्याबोलण्याचा टिळकांना परिपाठ असल्यामुळे तिकडे इंग्रज लोकांशी वागताना टिळकांचे कोठेच अडले नाही. दिवाणखान्यात शिरताना आधी कोणी शिरावे मागून कोणी जावे, बाहेर पडताना आधी मागे कोण, असल्या सूक्ष्म रीतिरिवाजाकडे टिळकांनी जसे इकडे केव्हाहि लक्ष दिले नाही तसेच तिकडेहि. भेटणे बोलणे अर्थात् कामापुरते व कामहि ठराविक म्हणजे राजकीय विषयाचा वादविवाद करणे हे असल्यामुळे, आणि टिळकांचे बोलणे मुद्देसूद व कुशाग्रबुद्धि दिसून येणारे असल्यामुळे, परक्या मनुष्यावर त्यांची छाप तेव्हाच हटकून पडे व बुद्धीची छाप मनावर पडल्यानंतर किरकोळ गोष्टीकडे लक्ष देण्याला सभ्य मनुष्याला अवसरच मिळत नाही. शिवाय कारणाखेरीज या बारा चवदा महिन्यात ते कोणाकडे गेले आले नाहीत. कोरड्या शिष्टपणाच्या संभाषणात उगाच बोलून हवेत सोडण्यासारख्या पुष्कळ गोष्टी असतात. पण या दृष्टीने टिळकांचे विलायतेत एकाहि इंग्रजाशी भाषण झाले असेल असे वाटत नाही. टिळकांना उपहाराची व जेवणाची क्वचित् आमंत्रणे येत व या प्रसंगी इतर लोक जेवीत असता टिळकांना स्वतः एखाददुसरे फळ तोंडात उचलून टाकण्याखेरीज दुसरा उद्योग नसल्यामुळे रिकाम्या गप्पागोष्टी बोलण्याला जो वेळ होई त्याचा मात्र या कामी उपयोग होत असे. टिळकांना दूरचे न्याहळत नसे हे प्रसिद्ध आहे. पण इकडच्याप्रमाणे तिकडेहि या शारीरिक अदूर दृष्टीची वाण त्यांनी चाणाक्षपणाने भरून काढली होती. लंडनच्या नकाशाचा व लंडन गाईडचा त्यांनी एकप्रकारे अभ्यासच केला होता. यामुळे एकाद्या नवीन ठिकाणच्या पत्त्यासंबंधाने ते एखाद्या माहितगारासारखे वागत. पण लंडनचे रस्ते आगगाड्या वगैरे

इतक्या गोंधळून टाकण्यासारख्या आहेत की तेथे टिळकापेक्षाहि चाणाक्ष मनुष्य प्रथम गोंधळूनच जावयाचा. अंग कमकुवत झालेले पाय लटपटणारे अशी स्थिति असल्यामुळे कोणीतरी बरोबर घेतल्याशिवाय ते कधीहि बाहेरच पडत नसत. यामुळे टिळकांचा अंदाज कोठे चुकला तर तो सुधारून घेण्यास जोडीदार असे.

बारा चौदा महिने लंडनमध्ये राहून ते शहर इतके थोडे पाहिलेला मनुष्य टिळकाप्रमाणे दुसरा क्वचितच मिळेल. कामाशिवाय टिळक सहसा बाहेर पडत नसत व काम होताच घरी परत येत. सहज खेप टाकावयाची तर ती हेरल्ड पत्राच्या कचेरीकडे म्हणजे लॅन्सबरींना किंवा वृद्ध सोशियालिस्ट हाइंडमन याना भेटण्याकरिता. इंडिया ऑफीसच्या लायब्ररीत ते एक दोन वेळ गेले होते कारण तेथे संशोधक विद्वान गृहस्थ थॉमस हा लायब्ररिअन असे. ‘ग्रामं गच्छन् तृणं स्पृशति’ या न्यायाने सभाना किंवा आगाऊ मुलाखती ठरलेल्या गृहस्थांच्या भेटीला जाताना त्यानी जे लंडन पाहिले असेल तेवढेंच! निवृत्तिपर मनाला शरीराच्या दुर्बलतेची जोड मिळाल्यामुळे अमुक एक गोष्ट म्हणून आपण पहावयास जाऊ अशी उत्सुकता त्याना केव्हाच वाटली नाही. लौकिक मनुष्याच्या दृष्टीने टिळकांची विलायतची खेप बहुधा फुकटच गेली. पण टिळक ‘विलायते’ला गेलेच नव्हते. ते काही एक अवश्य कर्तव्य करण्याला गेले होते!

## (२) प्रवास

टिळकाना दुसऱ्या खेपेस पासपोर्ट मिळून ते विलायतेस निघाले त्या प्रसंगाचे प्रवासवर्णन टिळकांचे परिचारक व सोबती गणपतराव नामजोशी यानी टिळकांच्या आठवणीच्या दुसऱ्या खंडात दिले आहे तेच येथे देतो. याहून अधिक विश्वसनीय व सविस्तर वर्णन उपलब्ध नाही. नामजोशी लिहितातः—

“यापुढे सप्टेंबरमध्ये पासपोर्ट पुनः मिळाले व विलायतेस जावयाचे ठरले. याच सुमारास मुंबई पुण्यास इन्फ्ल्युएन्झा सुरू होता. ज्या दिवशी निघावयाचे त्या दिवशी आम्हा सर्वांना एकच काळजी वाटत होती ती ही की आम्ही बोटीवर धडपणी चढतो कसे व चढण्यापूर्वी आणखी कोणकोण आजारी पडेल. असो. शेवटी बोटीवर पाऊल तर टाकले. सर्वांच्या चेहऱ्यावर चिंताच दिसत होती. कारण दादा थकलेले. त्यांतून पाणबुड्यांचा मारा संपला नव्हता. शिवाय जशी पुण्यात तशीच सर्व युरोपभर इन्फ्ल्युएन्झाची साथ सुरू होतीच. बोटीवरची जागा आम्ही नक्की करून ठेविली होती व ती जागा चांगली मोक्यावरची गांठली होती. आम्ही बोटीवर चढलो तो सामानसुमानाचे मागे लागलो होतो. इतक्यात आमच्या केबिनमध्ये आपले एक सोटभैरव घुसलेले आढळले. अर्थातच तक्रार करून त्याना हुसकून देणे भाग पडले. यानंतर सामानाची व्यवस्था करण्यात व लांबून मुंबईची शोभा पाहण्यात आमचा सर्व वेळ गेला. एकदाचे मार्गाला लागलो म्हणून सर्वांनाच आनंद झाला. दादा व मी असे दोघे एका केबिनमध्ये

राहत होतो त्यामुळे थोडासा मनाला संकोच वाटत असे. आम्ही आपला देशी पेहरावच कायम ठेवला होता त्यामुळे, व शिवाय आपण होऊन कोणाजवळ बोलावयास जावयाचे नाही असे जवळ जवळ ठरल्यामुळे, आमच्याशी कोणी बोलावयास येत नसत. दादांची दिनचर्या कशी असे खात काय पीत काय वगैरे सर्व गोष्टी अवश्य सांगितल्या पाहिजेत. झोप जरी थोडी येत असली तरी अंथरुणावर स्वस्थ पडून विचार करीत राहावयाचे व अशातच रात्रीचे बारा तास घालवावयाचे. सकाळी चहा व एखाद दुसरे बिस्कीट. सरासरी १० वाजता जेवण म्हणजे गोविंदजी वसनजीनी मुद्दाम करून दिलेल्या मालापैकी कधी पुऱ्या कधी खाज्या कधी तारफेणी व दूध दही भाजी वगैरे पदार्थ व शिवाय लोणची. पाकसिद्धी आम्हीच करीत होतो. सामान मात्र बोटीवरून घेत असू. जरी आमच्या खाण्यात फळे जास्त असावी अशी अट आम्ही तिकिटे घेताना घातली होती तरी ती मिळण्यास थोडीफार अडचण पडली. परंतु द्रव्याच्या किल्लीने हात सढळ करीत असू. दादा कोणत्या कामाकरिता जात होते हे सर्व साहेब लोकाना माहीत होते. त्यामुळे कधीकाळी एखाददुसरा साहेब चार शब्द बोलत असे. त्यात हिंदू–मुसलमानांचे वितुष्ट अठरा–पगड जाति असल्याच गोष्टींचा समावेश असे.

"प्रथम काही दिवस आम्हाला एक बंगालीबाबू म्हणजे करमणुकीचा विषय होऊन बसला होता. बाबूमहाशय शिक्षणाकरिता विलायतेला निघाले होते. अर्थातच पहिले दिवशी त्यानी आपले मन विशेष खवळू दिले नाही. परंतु दुसरे दिवशी दोनचार वेळ जीव देण्यास निघाले. एडनवरून परत जातो म्हणून म्हणू लागले. डोके आपटीत रडत. अशा तऱ्हेने काही वेळ करमणूक म्हणून जरी वाटत होती तरी पुढे पुढे त्याचा त्रास होऊ लागला. दादानी त्याना उपदेश करून पाहिला. परंतु काही उपयोग नाही. शेवटी त्याना सर्वांनी स्पष्ट बजावले की आता जर गप्प राहिला नाहीत तर कॅप्टनकडे तक्रार करून कोंडून ठेवण्याचा प्रसंग येईल. तेव्हा जरा प्राणी शांत झाले. असो. अशा रीतीने पहिले तीनचार दिवस गेले. जसजसे एडन जवळ येत चालले तसतसे घरी पत्र लिहून आम्ही येथपर्यंत खुशाल आलो हे कळविण्यात व दुसऱ्या अनेक लहान मोठ्या गोष्टी कळविण्याकरिता लिहिण्यातच आमचा वेळ गेला. बंदरावर बोटीच्या डॉक्टरची तपासणी होते व त्या वेळी क्वारंटाईन वगैरेसंबंधी हुकूम सुटतात. या वेळेला आजार वगैरे काही नव्हता. परंतु इंडियन पॅसेंजर्सना फक्त उतरण्याची मनाई झाली व बाकीची सर्व मंडळी उतरली. अर्थातच सर्वांना वाईट वाटले. परंतु उपाय काय ? ह्यात काही तरी गुप्त हेतु होताच. त्याशिवाय दादाना एडनला उतरण्याला बंदी करण्याचे कारण काय ? असो. येथे कॉंग्रेसच्या अध्यक्षाचा मान दादाना मिळाल्याची तार मिळाली. आम्ही सुखरूप पोचल्याबद्दल आम्हीहि पुण्याला तार केली व इतर गप्पा मारण्यात वेळ घालविला. थोडेसे खाण्याचे पदार्थ घेतले व लगेच पुढील कार्यक्रम ठरविला. चिरोल–केसचे कागद काही

वाचावयाचे राहिले होते. तेव्हा त्याची वाटाघाट करण्याकरिता पुस्तके बाहेर काढून ठेविली. असो. या वेळेस मला लघुलेखन येत असते तर बरे झाले असते असे वाटू लागले. कारण पुष्कळसे संवाद टिपून ठेवण्यासारखे असत. एडन सोडल्यावर आमच्या धोतर नेसण्यासंबंधी पॅसेंजर लोकात कुरबुर सुरू झाली. दादाना पायाला संवय व्हावी म्हणून हळूहळू बूट घालण्यास सुरुवात करण्याचे ठरविले होते. तसेच त्यांचे कपडेहि नीट काढून साफ करून ठेविले होते. अशा वेळी त्या बोटीवरील चीफ एंजीनिअर मला विचारू लागले की 'टायलक साहेब नही है?' मी साहेबाना सांगितले की त्यांच्याजवळ इतके कपडे आहेत की कदाचित् तू तितके पाहिले नसतील. एडन सोडल्यापासून हळूहळू म्हणजे दिवसाचे निदान दोनतीन तास तरी पाटलोणी घालू लागलो.

"पोर्टसैदला गेलो. येथेहि आम्हाला उतरू दिले नाहीच. येथे आमचा मुक्काम तीनचार दिवस होता. असो. ह्या सुमाराला चिरोल-खटल्यातील पुस्तके पाहावयाची मला इच्छा झाली व त्यांत दादानी आपली स्वतःची संगतवार लिहिलेली त्रोटक हकीकत पाहावयास मिळाली. तसेच सावरकरबंधु यांच्या खटल्यासंबंधीहि काही कागद वाचावयास मिळाले. त्या वेळेस ते शिक्षेच्या अमानुष प्रकारासंबंधी जवळ जवळ आपणाशीच बोलू लागले! "केवळ राष्ट्राचे कल्याण व्हावे ह्या हेतूने प्रयत्न करीत असता जन्मठेपीची शिक्षा देण्यापेक्षा अशा माणसाला एकदम ठार मारून टाकला तर बरा. तुरुंगात आपले आयुष्य कंठीत असताना बिचाऱ्याला किती मानसिक यातना सोसाव्या लागत असतात."

"पोर्टसैदला तीनचार दिवस मुक्काम का होता व निघणार केव्हा हे आम्हाला कळलेच नाही. निघण्यापूर्वी बोटीवर एके दिवशी सकाळी नोटीस लागली की अमक्या अमक्यानी अमुक लाईफ बोटीशी आपल्या गळ्यात लाईफ बेल्ट अडकवून दुपारी चार वाजता हजर राहावे. व यदाकदाचित् जर बोटीला काही वाटेत दगाफटका झाला तर धोक्याची सूचना देताच सर्वांनी आपआपल्या नेमलेल्या जागी हजर राहावे. या वेळी दादांची व माझी ताटातूट होत असल्याने आम्हा दोघाना एकाच होडीत ठेवा असा कॅप्टनसाहेबाकडे अर्ज केला. परंतु एकदा लिहिलेले ते ब्रह्मवाक्य अशीच व्यवस्था असल्याने आमच्या अर्जाचा काहीच परिणाम झाला नाही. शेवटी दुपारी रंगीत तालीम झाली. त्या वेळेला उभ्या दोराच्या शिडीवरून दादाना तो गळ्यात पट्टा बांधलेला अशा वेळी एखाद्या तरुणासारखे भराभर उतरता-चढताना पाहून आम्हास तर अचंबाच वाटला. व या वेळेस कॅमेरा असता तर हिंदुस्थानातल्या लोकाना दादांचा फोटो खास दाखविता आला असता.

"आता आमचा सरंजाम वाढला. आमच्या मागेपुढे दोन पाणबुड्या एका बाजूला मॅन आफ वॉर. त्याच्यावर टेहळणी करण्याकरिता एक बलून. शिवाय चार-पांच विमाने. आणखी एक-दोन आगबोटी. अशा रीतीने आमचा सरंजाम

झाला. वरील सर्व आगबोटींना चित्रविचित्र तऱ्हेचे रंग दिलेले होते. शिवाय सर्वच बोटी जवळ जवळ अर्ध्या गतीने चालत होत्या व पुढे चाललेल्या टॉर्पेडो नागमोडी गतीने चालत. त्याशिवाय रात्रीच्या वेळी दिवा लागत नसे. त्याकरिता जेवणाचा तास बदललेला. सगळ्या विडी ओढणारांना सक्त ताकीद होती की रात्रीची विडी ओढावयाची झाल्यास आपआपल्या केबिनमध्ये जाऊन ओढावयाची. जसा ह्या सर्व वरच्या गोष्टींत पालट पडला तसा बोटीवर ठेवलेल्या पहाऱ्यात फरक पडला. उतारू लोकांतहि माणसे बोलावून त्यांच्यापैकी मागेपुढे पहारा ठेवला. उतारू लोकांच्या वर्तनातहि तसाच फेर पडला. सर्वांच्या तोंडावर काळजीची छटा दिसू लागली. जो तो आपला लाईफ बेल्ट आपल्याबरोबर बाळगू लागला व जरा खुट्ट झाले की लगेच दचकू लागला. तारांतून आम्ही अमुक ठिकाणी आहो किंवा अमुक दिवशी अमुक मुक्कामाला पोचू अशा प्रकारची बातमीहि द्यावयाची नसे. उतारू लोकांपैकी पुष्कळांना लढाईच्या बातम्या कळत. परंतु आम्हाला मात्र जेवढ्या बोर्डावर लागतील तेवढ्याच समजत. या वेळेस आम्ही जिब्राल्टरच्या बाजूने गेल्यामुळे आमचा मुक्काम जिब्राल्टराशिवाय कोठेहि झाला नाही. जिब्राल्टरला कोणालाच उतरू दिले नाही व तेथेहि फारसा मुक्काम झाला नाही. आता आम्ही खऱ्या वॉरझोनमध्ये शिरत होतो. तेव्हा तोफांची सरबत्ती कधी कधी कानावर पडत असे. इंग्लिश चानलमध्ये तर बोट जणु काय जीव टाकीत चालली आहे अशाप्रमाणे पळत होती. शेवटी टिलबरी डॉक्समध्ये जाऊन पोचलो. तेथे गेल्यावर थॉमस कुकच्या एका एजंटाकडून पत्र पोचले. त्यात आमच्याकरिता स्वतंत्र घराची व्यवस्था केली असल्याबद्दल उल्लेख असून त्यात पत्ता दिला होता. बोटीतून चालचलाऊ सामान घेऊन उतरलो होतो. तेथून थोडासा रेलगाडीने प्रवास करून फेनचर्च स्टेशनवर येऊन पोचलो. वाटेने गाडीचे सगळे पडदे खाली ओढून घेणे भाग पडले होते व सुमारे पांचच्या सुमारालाच काळोख झाला. बोटीत आमचा विचार चालला होता की उतरण्याची व्यवस्था काय करावयाची? ती अनायासेच पत्रामुळे जागा नक्की झाल्याने जितका आम्हास आनंद झाला त्यापेक्षा शतपट जास्त आम्ही घरी जाऊन पोचल्यावर झाला. घरी दादा उतरताच बॅपटिस्टासाहेबांनी खरोखरी त्यांच्या गळ्याला मिठीच घातली."

## ( ३ ) भाषणबंदी उठली

टिळकांना सरकारने पासपोर्ट दिला तो प्रथम फक्त चिरोल केसकरिता. ता. १८ जून १९१८ रोजी टिळकांनी खालीलप्रमाणे आपल्या सॉलिसिटरना पत्र लिहिले:—

"४५०० पौंडांची हुंडी कोलंबोहून ता. ४ एप्रिल रोजी पाठविली ती पोचली की नाही ते कळवा. मुंबईसरकाराने मला असे कळविले आहे की विलायतेत मी कोणत्याहि राजकीय चळवळीत न पडण्याचे वचन देईन तर केवळ

चिरोलकेसकरिता म्हणून ते मला पासपोर्ट देतील. माझ्या खटल्याकरिता ही अट मी मान्य करीन पण तीहि तक्रार करून विलायतेत गेल्यावर ही अट काढून टाकण्याबद्दल वॉर–कॅबिनेट कडे अर्ज करण्याला मला हरकत का असावी ? अशी अट मी कबूल करून गेलो तर प्रतिवादीचा वकील म्हणेल ‘ टिळक हे अनिष्ट चळवळ करणारे आहेत म्हणूनच त्याना असे बंधन घातले. ’ पण मी तक्रारीस मान्यता दिल्यावर त्याना असे म्हणता येणार नाही. ऑक्टोबरच्या पूर्वी केस निघेल अशी ठेवू नका. वरील धोरणाप्रमाणे वॉरकॅबिनेटकडे तुम्ही खटपट करून पहा.”

सॉलिसिटरनीही खटपट केली पण व्यर्थ ठरली. टिळक विलायतेस पोचल्यावर काही दिवसानी म्हणजे ता. ११ नोव्हेंबर रोजी टिळकांचे सॉलिसिटर यानी अंडर स्टेटसेक्रेटरी याजकडे अर्ज करून विनंती केली की “टिळक व करंदीकर हे आपल्या कामाकरिता पासपोर्टच्या काही शर्ती मान्य करण्यास तयार झाले पण आता त्या ढिल्या कराव्या. इतरांच्या बाबतीत अशी गोष्ट सरकाराने केलेली आहे. डॉ. नायर ॲन्टीहोमरूलर ब्राह्मणेतर हे प्रथम अशाच शर्ती कबूल करून पासपोर्ट घेऊन विलायतेस आले. पण नंतर त्यानी अर्ज केल्यावर त्यांच्यावरील बंधने काढण्यात आली.” पूर्वी नक्की याच मुद्यावर पार्लमेंटमध्ये प्रश्न विचारण्यात आला तेव्हा असे उत्तर देण्यात आले होते की “डॉ. नायर यांच्याप्रमाणे टिळक विलायतेत आल्यावर त्यानाहि अशा प्रकारचे अपील करण्यास संधि देण्यात येईल.” डॉ. नायर हे होमरूलला विरोध करणारे व टिळक होमरूलचे समर्थन करणारे. तेव्हा सरकारने दोघानाहि सारखेच वागविणे योग्य होते. अदमासाप्रमाणे या अर्जाचा लवकरच निकाल लागला व टिळकावरची बंदी उठविण्यात आली.

## ( ४ ) निवडक कागदपत्र

विलायतेला टिळक गेले ते चिरोल प्रकरण व सुधारणासंबंधी राजकीय चळवळ या दोन कामाकरिता गेले. पैकी पहिल्या कामाची म्हणजे चिरोल प्रकरणाची सविस्तर हकीकत आम्ही मागील भागात दिलीच आहे. आता दुसऱ्या कामासंबंधाची हकीकत सांगावयाची. पण ती आमच्या शब्दानी न सांगता पत्रव्यवहाराच्या अस्सल कागदपत्रांकडूनच ती सर्व वदविण्याचा आमचा विचार आहे. या कागदपत्रांत अनेक प्रकार आहेत. १ होमरूल लीगच्या कामासंबंधाने पुण्यास होमरूल कचेरीकडे वेळोवेळी आलेले अहवाल. २ टिळकानी पुण्यास धोंडोपंत विध्वंस याना पाठविलेली घरगुती पत्रे. ३ टिळकानी व्यक्तिशः इतर लोकाना पाठविलेली कामकाजाची पत्रे. ४ टिळकाना इतर लोकानी पाठविलेली या कालावधीतली पत्रे किंवा पत्रोत्तरे. ५ केसरीकडे आलेली बातमीपत्रे. या सर्व कागदपत्रापैकी निवडक व त्रोटक असे भाग घेऊन ते कालानुक्रमाने खाली दिले आहेत. त्यामुळे या बारा तेरा महिन्यातल्या टिळकांच्या हालचालींचे विचारांचे व कार्यांचे चित्र वाचकांच्या डोळ्यापुढे जसे उभे राहील तसे आमच्या

शब्दानी गोळाबेरीज हकीकत देऊन उभे राहील असे वाटत नाही. शिवाय हकीकत वाचून मग त्याच्या आधाराचा विचार करीत बसण्यापेक्षा प्र क्ष आधारच वाचकापुढे असले म्हणजे, साक्षीदाराच्या पिंजऱ्यात उभे राहिलेल्या माणसासारखी ज्याने त्याने आपली हकीकत आपल्या तोंडाने प्रतिज्ञेवर सांगितल्याप्रमाणे ती वाचकाना मनोरंजक व मनावर स्पष्ट ग्रह उमटविणारी होईल अशा समजुतीनेच तशी योजना केली आहे.

### ( १ ) टिळकांचे धोंडोपंतास पत्र

जिब्राल्टर २० आक्टोबर १९१८

आज सकाळी आम्ही सर्व येथपर्यंत सुखरूप आलो. प्रवास अपेक्षेपेक्षाहि चांगला झाला. कोणी आजारी वगैरे पडले नाहीत. नामजोशी हे करंदीकर यांचे साह्याने जेवणाखाणाची व्यवस्था नीट करीत असतात. त्यामुळे हिंदु पद्धतीचा आहार मिळण्यास अडचण पडत नाही.

पोर्ट सय्यदला आम्हास चार दिवस थांबावे लागले. पण त्याचा वचपा बादशाही थाटाने भरून निघाला. पोर्ट सय्यदपासून काही आरमारी अधिकारी जिब्राल्टरला जाणार होते. म्हणून त्यांच्या दिमतीला तीन 'ब्रेड' बोटी व तीन 'टारपेडो' बोटी दिल्या होत्या. व अनेक मोठी लढाऊ जहाजे दूर असून या सर्वांच्या मधून आमची आगबोट चालली होती. असा आमचा प्रवास सुखाचा झाला व सर्वांची प्रकृतिहि उत्तम आहे. सुमारे एक आठवड्यानें लंडनला पोहचू.

### ( २ ) लॅन्सबरी यांचे टिळकाना पत्र

लंडन १ नोव्हेंबर १९१८

अखेर तुम्ही इंग्लंडात येऊन पोहोचला. मी स्वतः आणि आमच्या हेरल्ड ऑफिसातील इतर सर्व मंडळी यांचा तुम्हाला नमस्कार. तुमच्या कामात तुम्हाला यश येवो अशी आमची प्रार्थना आहे. तुमची व माझी लवकरच गाठ पडेल व निदान खासगी रीतीने तरी तुम्ही आम्हाला तिकडची सर्व माहिती सांगू शकाल अशी आशा आहे. तसेच जाहीर रीतीने भाषण न करण्याचे जे बंधन तुमच्यावर आहे ते बंधन लवकरच निघून जाईल अशी मला आशा वाटते.

### ( ३ ) टिळकांचे लॉईड जॉर्ज याना पत्र

लंडन १३ नोव्हेंबर १९१८

इंडियन नॅशनल कॉंग्रेसच्यातर्फे अखिल हिंदी जनतेच्या करिता इंडियन होमरूललीगकरिता व मी व्यक्तिशः स्वतःकरता इंग्लंड व दोस्त राष्ट्रे यानी मिळविलेल्या यशाचे अभिनंदन करतो. मला अशी आशा व उमेद आहे की तुमच्या उदार व चतुर नेतृत्वाखाली तह होऊन सर्व राष्ट्राना शांतता प्रगति व बंधुभाव ही यापुढे लाभतील. बादशहा व महाराणी यानाहि आमचा हा राजनिष्ठापूर्वक संदेश आपण कळवावा.

### ( ४ ) टिळकांचे धोंडोपंताना पत्र

लंडन १३ नोव्हेंबर १९१८

आम्हाला येथे येऊन १५ दिवस झाले. अद्याप फारशी थंडी नाही. घराबाहेर उष्णतामान ४० डिग्री व आत सुमारे ५०–५५ डिग्री इतके असते. सिंहगडापेक्षा येथली हवा जास्त थंड आहे असे वाटत नाही. अद्याप केसची तारीख लागली नाही. सर जॉन सायमन यानी आमचे वकीलपत्र घेतले आहे. कार्सन हे विरुद्ध बाजूला आहेत. त्याना असे वाटते की " मी प्रधानमंडळात गेलो तर बयाणा म्हणून अशीलांच्याकडून घेतलेले सर्व फी–पैसे वगैरे रद्द होतील. "

आर्मिसटिसवर सह्या झाल्या म्हणून लंडनमध्ये मोठा उत्सव सुरू आहे. बिचाऱ्या हिंदुस्थानाला या प्रसंगी न विसरोत म्हणजे झाले.

वैद्य खटल्यातून निर्दोष सुटले आणि केळकर म्युनिसिपालटीचे अध्यक्ष निवडून आले हे वाचून फार आनंद वाटला.

### ( ५ ) शंकर सरण यांचे बॅपटिस्टा याना पत्र

ऑक्सफर्ड १७ नोव्हेंबर १९१८

आमच्या परिषदेला येण्याविषयी टिळकाना लिहिले आहेच. हेतु इतकाच की या देशातील सर्व हिंदी विद्यार्थी एकत्र जमतात तेव्हा त्यांची व टिळकांची स्वस्थपणे गाठ पडावी. त्यांच्या बरोबर करंदीकर केळकर वगैरे स्नेहीहि यावे. परिषदेच्या खर्चाबद्दलची जबाबदारी आम्ही पत्करिली आहे. ऑक्सफर्ड येथील मजलसीने टिळकाना आमंत्रण दिले काय ? तीन वर्षेपर्यंत असे घडले की मजलशीच्या अध्यक्षाच्या निवडणुकीला जो उभा राहिला त्याला इतर रीतीने पुष्कळ मते मिळण्यासारखी असता तो टिळकांचे स्वागत करू शकणार नाही असे म्हटल्यावरून त्याला विरोध झाला. यंदाच्या अध्यक्षाने टिळकांचे स्वागत करण्याची खूप तयारी केली होती पण त्याला इन्फ्लुएन्झा होऊन तो वारला. तथापि या टर्मला नाही तर पुढल्या टर्मला मजलसीकडून टिळकाना आमंत्रण जाईल अशी मला आशा आहे.

### ( ६ ) लेडी व्हिलियर्स यांचे टिळकाना पत्र

लंडन नोव्हेंबर १९१८

फ्रँचाइज कमिटीचे काम चालू आहे. स्त्रियाना मतदानाचा हक्क मिळणे योग्य आहे. स्त्रिया तो हक्क मागत आहेत. आणि त्यानी आपले शिष्टमंडळ मॉंटेग्यू साहेबाकडे पाठविले आहे. कॉंग्रेसकडेहि मागणी केली आहे. आणि कॉंग्रेस व मुस्लिमलीग दोघानीहि अनुकूल ठराव केले आहेत. कित्येक प्रांतातून त्याना ही मतदारी मिळाली आहे. 'दर माणशी मत' असे केव्हा होईल तेव्हा होवो. पण तूर्त

पुरुषाप्रमाणे स्त्रियानाहि त्यांच्या अधिकाराने मतदारी मिळावी अशी आमची खटपट आहे. तरी आम्हाला या कामी साहाय्य कराल अशी आशा आहे.

### ( ७ ) शंकर भरण यांचे टिळकाना पत्र

ऑक्सफर्ड ता. २४ नोव्हेंबर १९१८

आपला येथील खटला संपेपर्यंत आपण भाषण करीत नाही हे ठीकच आहे. म्हणून तूर्त आम्ही आपणाला त्रास देऊ इच्छित नाही. तरी आपण फक्त भेट देऊन जावे. या देशात आपण असता आपणाशिवाय आमची परिषद कशी भरावी ? सभेत कोठे हजर असता आणि निवडणुकीचे काम सुरू असता उमेद-वाराना हिंदुस्थानच्या वतीने प्रश्न विचारावे असे आपण आम्हाला सुचविले. त्याप्रमाणे आम्ही करीत आहो. पार्लमेंटातील ८।१० मेंबर्स गाठून त्यांच्या दिम-तीला एकेक हिंदी मनुष्य देऊन त्याना माहिती पुरवावी असे मनात येते. इकडे येऊन अभ्यास संपविलेल्या मुलानी या कामाकरिता काही दिवस का घालवू नयेत ? त्याना आठवड्याला ३।४ पौंड द्यावेत म्हणजे झाले. कॉंग्रेसने अशी योजना का करू नये ?

### ( ८ ) टिळकांचे केळकराना पत्र

लंडन २७ नोव्हेंबर १९१८

होमरूलच्या कामास सुरवात केली. कामाला बऱ्याच अडचणी आहेत. लेबर पक्षास सुमारे २००० पौंड दिले. त्यामुळे आणखी जास्त रकमेची जरूरी लागेल. सध्या येथे इलेक्शनची गडबड चालू आहे. तथापि आम्ही आमचे काम पुढे रेटीत आहो. माझ्या सॉलिसिटरकडून बादशहाना मी अर्ज केला. त्यामुळे सरकारने घातलेली माझ्या हालचालीवरील बंधने त्यानी दूर केली आहेत. कॉंग्रे-सचा रिपोर्ट व वर्तमानपत्रांचे उतारे रजिस्टरपत्राने पाठवा.

### ( ९ ) जगन्नाथ महाराजांचे टिळकाना पत्र

मुंबई ३० नोव्हेंबर १९१८.

आपण विलायतेला सुखरूप पोहोचला हे ऐकून अतिशय आनंद झाला. असेच सुखरूप व यशस्वी होऊन हिंदुस्थानाला परत यावे व आम्ही आपले स्वागत करावे अशी इच्छा आहे. कॅथीड्रल हायस्कूलमध्ये मला प्रवेश मिळाला. अभ्यास सुरू झाला. कॅडेट कोअरकरता मला एक बंदूक पाहिजे ती मी घेऊ का ? याकरिता केळकरांचे बरोबर जाऊन मी कलेक्टरला भेटणार आहे. आपण मला आखून दिलेल्या अंदाजाबाहेर माझा खर्च जात नाही. कारणपरत्वे गंगाधर-रावांचा सल्ला घेतो. आपण सांगितल्याप्रमाणे व्यायाम घेतो व ईश्वरध्यानहि करितो. आपण येथून गेला ही कल्पना मनात येऊन वरचेवर दुःख होते. कोण-

तीही गोष्ट मिळत नाहीशी झाली म्हणजे तिची किंमत कळून येते. तुमच्यावर प्रेम करणारा तुमचा मुलगा असा माझा हक्क आहे. आणि अज्ञानाने माझ्या हातून पूर्वी जे दोष घडले असतील त्याची तुम्ही मला क्षमा केली पाहिजे.

### ( १० ) डॉ. मुंजे यांचे टिळकांना पत्र

नागपूर ३ डिसेंबर १९१८.

नारायणराव वैद्य अपीलात सुटले हे आपण ऐकलेच असेल. मुख्य प्रधान बोनर लॉ आणि ॲस्क्विथ यानी असे जाहीर केले आहे की हिंदुस्थानाला दिलेली वचने विलायत सरकार पाळील. पण या जाहीरनाम्याचे खरे मर्म काय? आपणाला शांतता परिषदेकडे वकील म्हणून पाठवावे अशी खटपट इकडे सुरू आहे. आणि तद्दाची वाटाघाट होईल तेव्हा लंडन येथे कॉंग्रेसची बैठक करावी अशी जी सूचना पुढे आली आहे ती मला फार पसंत वाटते. प्रे. वुइलसन यांच्या मनावर या गोष्टीचा परिणाम विशेष होईल. कॉंग्रेसमधून निघून गेल्याबद्दल नेमस्ताना पश्चात्ताप होत असावा असे वाटते. नारायणराव वैद्यांचे अपील दासबाबूंनी फार चांगले चालविले व ते असे म्हणत होते की करंदीकर यानी उलट तपासणी फार चांगली केली.

### ( ११ ) हेंडरसन यांचे टिळकांना पत्र

लंडन ६ डिसेंबर १९११

आपण पाठविलेले दोन हजार पौंड पोचले त्याबद्दल पावती यासोबत पाठवीत आहे. आपल्या या उदार देणगीबद्दल आमची लेबर पार्टी आपली फार आभारी आहे. हिंदी लोकांच्या स्वराज्यविषयक ज्या आकांक्षा आहेत त्याना आमची सहानुभूति आहे हे मला आपणास सांगितले पाहिजेच असे नाही. आणि यापुढेहि आमच्या पक्षाच्या हातून आपणाला जी मदत करता येईल ती अवश्य करू.

### ( १२ ) कार्ल हीथ यांचे टिळकांना पत्र

लंडन ता. ९ डिसेंबर १९१८

आपण भेटावयाला आला तेव्हा मी बाहेर गेलो होतो याबद्दल वाईट वाटते. तद्दासंबंधाने नॅशनल कौंसिलने व्यवस्था चालविली आहे त्यात हिंदुस्थानची खास अशी काही व्यवस्था अजूनपर्यंत केलेली नाही. हिंदुस्थानचे अमूक म्हणणे म्हणून मांडण्यात आलेले नाही पण 'नॅशनल पीस कौंसिल'चा जनरल सेक्रेटरी म्हणून मी तुम्हाला असे कळवितो की स्वयंनिर्णयाचे तत्त्व हिंदुस्थानाला लावण्याविषयीची जी मागणी आहे ती योग्य असून या कौंसिलच्या सभासदांची त्याला पूर्ण सहानुभूति आहे. तुमचे नाव मी फार ऐकले आहे हे लिहावयासच नको. तुमची गाठ पडावी याविषयी मी उत्सुकतेने वाट पहात आहे.

### ( १३ ) सिडने वेब यांचे टिळकांना पत्र

लंडन ता. १० डिसेंबर १९१८

फेबिअन सोसायटीच्या सभा दर शुक्रवारी एसेक्स हॉलमध्ये भरतात. कोणी अशी सूचना केली की एका शुक्रवारी तुमचे सभेपुढे व्याख्यान व्हावे. या सूचनेचा आमच्या कमिटीनें मोठ्या उत्सुकतेने स्वीकार केला. तरी शुक्रवार ता. १४ फेब्रुवारी रोजी तुम्ही हे व्याख्यान द्याल काय ? त्या महिन्यातील ही आमची पहिलीच सभा आहे व या तारखा तुमच्या चिरोल खटल्यातील तारखांच्या आड येणार नाहीत अशी मला आशा आहे. तरी हे निमंत्रण स्वीकारल्याचे व ही तारीख सोईची असल्याचे कळवावे.

### ( १४ ) ए. सी. सरकार यांचे टिळकांना पत्र

लंडन ता. ११ डिसेंबर १९१८

येथील नॉर्थब्रुक सोसायटीतील क्लबाने अशी इच्छा मजकडे प्रकट केली आहे की त्या क्लबापुढे होमरूल या विषयावर आपले एक व्याख्यान व्हावे. भूपेंद्र बसू देवधर वगैरे लोकांची व्याख्याने नुकतीच झाली आहेत. आपल्यावरील भाषणबंदी नुकतीच निघाल्याचे ऐकून फार आनंद झाला व म्हणूनच ही विनंति करीत आहो.

### ( १५ ) हाइंडमन यांचे टिळकांना पत्र

लंडन ता. १२ डिसेंबर १९१८

तुम्ही जे निरनिराळे ठराव मजकडे पाठविले त्याबद्दल मी आभारी आहे. ह्यांचा मी अवश्य उपयोग करीन. हिंदुस्थानच्या बाबतीत माझे पूर्वीचे मत बदललेले नाही. आणि तुम्ही आता येथेच आहा तेव्हा या गोष्टींची प्रचिति तुम्हास येईलच. हिंदुस्थानसंबंधाने इंग्लंडच्या जुन्या धोरणात पूर्णपणे फरक झाल्याचे पाहण्याला तुम्ही आम्ही जगू अशी मला आशा आहे. चाळीस वर्षांपूर्वी सॅलस्बरी इडल्स्ली क्रॅनब्रुक स्टॅनहोप मॅलेट वगैरे लोकानी असाच प्रयत्न केला होता. पण १८८० च्या निवडणुकीपासून ते काम मागे पडले. या लोकानी योजलेल्या सुधारणांच्या मानाने मॉटेग्यू साहेबांच्या सुधारणा काहीच नाहीत असे मला वाटते.

### ( १६ ) टिळकांचे धोंडोपंतांना पत्र

लंडन ता. १८ डिसेंबर १९१८

आमची सर्वांची प्रकृति बरी आहे. येथली थंडी मला इतकी सोसेल अशी कल्पना नव्हती. येथे सूर्योदय सकाळी आठ वाजून पाच मिनिटानी होतो. व दुपारी तीन वाजून ४९ मिनिटानी मावळतो. सध्या आठ तासांचा दिवस व १६

तासांची रात्र आहे. घरात शेगड्या असल्याने उष्णतामान ५४° ते ५८° असते. पण बाहेर ३८° पासून ४०° पर्यंत असते. कदाचित ते ३२° पर्यंत म्हणजे शून्य उष्णतामानापर्यंत जाईल.

**( १७ ) पोलॉक यांचे मिस व्हिलियर्स याना पत्र**

लंडन २१ डिसेंबर १९१८

तुमच्या होमरूल लीगने हस्तपत्रक काढले ते पाहिले. एक गोष्ट तुम्हाला माहीत नाही असे दिसते ती ही की टिळकाना येथे कोणताहि प्रातिनिधिक स्वरूपाचा अधिकार नाही. ते येथे व्यक्तिशः आपल्या कामाला आले आहेत. त्याना राष्ट्रीय सभेच्या नावाने काही बोलण्याचा अधिकार नाही. येथे येऊन कोणत्याहि एका राजकीय पक्षाला हाताशी धरून काम करावे असे काँग्रेसने कोणास सांगितले नाही. काँग्रेसचा तसा ठराव नाही. टिळकाना काँग्रेसचे जुने ठराव घेऊन फारतर त्याप्रमाणे मतप्रसार करता येईल. टिळकांचे अधिकाराचे अतिक्रमण काँग्रेसच्या कानावर घातले पाहिजे. व तिने त्यांच्या कृत्याला संमति दिली तर हिंदुस्थानातील दोन्ही पक्षात एकी कधीहि होणार नाही. मला खासगी रीतीने असे कळले आहे की सुधारणाविरुद्ध येथे एक मोठा कट होऊ पाहात आहे. आणि त्याचा प्रतिकार करू पाहणाराना टिळकांच्या या धोरणाने फार अढथळा होईल. माझे हे पत्र लॅन्सबरी याना दाखवा. या गोष्टीसंबंधाने मी इंडिया पत्रात चर्चा करणार आहे. टिळकांच्या या धोरणाचा निषेध हिंदुस्थानातहि होईल अशी मला खात्री वाटते.

**( १८ ) हाइंडमन यांचे टिळकाना पत्र**

लंडन ता. २२ डिसेंबर १९१८

हिंदुस्थानाला स्वयंनिर्णयाचा हक्क जरूर असला पाहिजे. इतर राष्ट्राना तो असता हिंदुस्थानला तेवढा तो का नसावा ? तुम्ही या विषयावर योजून लिहिलेल्या पुस्तकाची टाइप केलेली प्रत मी पाहिली. माझ्या दृष्टीने ते फार चांगले आहे.

**( १९ ) जे. जी. निकोल यांचे टिळकाना पत्र**

ब्रॅडफर्ड ता. २३ डिसेंबर १९१८

तुम्ही ब्रॅडफर्डला केव्हा याल व होमरूलचा इकडील एक सभासद म्हणून तुमच्याशी माझे हस्तांदोलन केव्हा घडेल याची मी वाट पहात आहे. कॉटन एक्साइज ड्यूटी व मिठावरील कर या दोहोसंबंधाने मला तुमच्याकडून माहिती घेण्याची इच्छा आहे. अमेरिकेहून जो माल येतो त्यापैकी काही हिंदुस्थानाकडून आणता येण्यासारखा आहे. हल्ली वसाहतीतील अनेक लोक येथे आले

आहेत या गोष्टीचा आपणास फायदा घेता येईल. साम्राज्यात एक मोठी परस्पर साहायकारी संस्था काढावी अशा मताचा मी आहे. तरी या संबंधाने आपले विचार कळवावे. पुढील वर्ष हिंदुस्थानाला सुखकर जावो अशी माझी प्रार्थना आहे.

### ( २० ) लजपतराय यांचे टिळकाना पत्र

न्यूयॉर्क २६ डिसेंबर १९१८

हेन्री हॉचनर नावाचा एक गृहस्थ हल्ली इकडे आला आहे. त्याने सर सुब्रम्हण्य अय्यर यांच्याकडून अमेरिकन प्रेसिडेंटला एक पत्र आणले व प्रेसिडेंटने त्याप्रमाणे काही गोष्ट केली असे म्हणतात. पण ते खरे आहे असे वाटत नाही. त्या पत्रातील सारांश इकडील वर्तमान पत्रातून प्रसिद्ध झाला होता. पण हॉचनर याने बेझंटबाईला जी हकीकत कळविली तीत फार अतिशयोक्ति असावी. हॉचनर याची व माझी कधी गाठ पडली नाही. हा गृहस्थ फ्रान्सला जाण्याचे बोलत आहे. पण मला कशात काही तथ्य दिसत नाही.

### ( २१ ) इ. वॉलेस यांचे बॅपटिस्टा याना पत्र

लंडन ३० डिसेंबर १९१८

'दि केस फॉर इंडियन होमरूल' हे पुस्तक मी वाचले. ते फारच उत्कृष्ट रीतीने लिहिलेले आहे व त्यातील युक्तिवाद पटण्यासारखा आहे. त्यातील मतांचा प्रसार करण्याला मी मदत करीन. पण इकडील मतप्रसार हे फार खर्चाचे काम आहे. इकडे हिंदुस्थानच्या कामात कोणी लक्ष घालीत नाही. आणि इकडे तर जाहिरातीशिवाय व मतप्रसाराखेरीज काहीच काम होत नाही. एका वर्षाचा खर्च म्हणून विचारलात तर तो कमीत कमी ६००० पौंड लागेल. पण एकादा साधा स्टोअर किंवा नवीन छानछोकीचे दुकान हे घेतले तरी त्याचा जाहिरातीचा एक सालातील खर्च या रकमेच्या दसपटहि होतो हे ध्यानात ठेवा. त्यातल्या त्यात दुसरी अडचण अशी की इतका खर्च करूनहि अशी खबरदारी इकडे घ्यावी लागते की इकडच्या कोणीहि मतप्रसाराचे काम पत्करले तरी तो हिंदी राष्ट्राचा एजंट आहे असे लोकाना दिसता कामा नये. जणु काही स्वतंत्र परोपकारी बुद्धीने व स्वतंत्र साधनानी मतप्रसार सुरू आहे असा बाहणा झाला पाहिजे !

### ( २२ ) दादासाहेब खापर्डे यांचे टिळकाना पत्र

अमरावती ५ जानेवारी १९१९

दिल्लीहून काल परत आलो. होमरूल स्पेशल ट्रेनने डॉ. मुंजे यांच्याबरोबर दिल्लीकडे जाताना प्रवास केला. सर्व थाट पूर्वीप्रमाणेच होता. पण आगगाडीत

तुम्ही नव्हता. एवढेच गौण होते! लक्ष्मीनारायणाच्या धर्मशाळेतच फिरून उतरलो होतो. पंडित मदनमोहन यांच्या मिरवणुकीला सरकारने हरकत घेतली. विषयनियामक मंडळात ठरावाचे मसुदे झाले ते बेझंटबाईच्या सहविचारानेच झाले. एका ठरावात प्रांतिक स्वातंत्र्य मिळण्याला पूर्वी सहा वर्षे मुदत घातली होती तीहि आता काढून टाकण्यात आली. दुसरे दिवशी पंडितजींचे अध्यक्ष म्हणून भाषण झाले. पण मौज ही की तुमचे नाव एकदाहि कोठे त्यानी घेतले नाही. वास्तवीक तुम्ही नाकारलेल्या जागी ते अध्यक्ष होऊन बसले होते म्हणून या गोष्टीचा उल्लेख त्यानी करावयास पाहिजे होता. बेझंटबाईनी ठरावांच्या मसुद्याला बराच विरोध केला. दास व चक्रवर्ती हे आपल्या बाजूला होते. पंडितजींचे धोरण काहीच नव्हते. दिवसामागून दिवस लोटत होते. पण निकालात काहीच निघत नव्हते. असे सहा दिवस गेले. जिना काँग्रेस व मुस्लिमलीग या दोहोंना संभाळून चालत होते. पण विषयनियामक मंडळातील मुसलमान प्रतिनिधींनी जिना याना मधून मधून धोका दिला. शेवटी आमच्या बाजूला बहुमत मिळाले. बेझंटबाई फार रागावल्या. आणि दुसरे दिवशी मालवीयजींच्या घरी आम्हाला म्हणाल्या की तुम्ही टिळकांचे लोक माझा फार द्वेष करिता. त्या असेहि म्हणाल्या की टिळकाबरोबर मी कोणत्याहि शिष्टमंडळात जाणार नाही. पूर्वी मद्रासेस आपण गेलो तेव्हा त्यानी आपणाशी जे स्नेहाचे वर्तन ठेविले त्याशी हे सगळे विसंगत दिसले. 'प्रागतिक नेमस्त पक्ष' नावाचा एक पक्ष काढण्याचा त्यांचा विचार दिसतो. विलायतेतील परिषदाना प्रतिनिधि म्हणून प्रथम तुमचे एकट्याचेच नाव घातले होते. पण नंतर हसन इमाम यांचेहि नाव जोडण्यात आले. शिष्टमंडळ निवडण्याकरिता एक कमिटी नेमण्यात आली आहे. काँग्रेसचे पुढील वर्षाचे सेक्रेटरी नेमताना बराच गोंधळ झाला. म्हणून आम्ही पटेल व केळकर यांची नेमणूक केली. पण केळकराना डेप्युटेशन कमिटीचे काम, शिवाय स्वयंनिर्णयाचा अर्ज लिहिण्याचे काम, आणि खुद्द डेप्युटेशनबरोबर जाण्याचे काम आधीच दिलेले असल्यामुळे त्यानी आपणाला काँग्रेस सेक्रेटरीची जागा नको म्हणून सांगितले. तेव्हा त्यांच्या जागी पंडित गोकर्णनाथ मिश्र याना नेमिले. पंडितजींनी आपल्या पहिल्या भाषणात तुमचा मुळीच उल्लेख केला नाही याबद्दल काही लोक त्याना बोलले असावे असे वाटते. कारण पंडितजी यानी आपल्या शेवटच्या भाषणात तुमच्याबद्दल उल्लेख केला. पण तोहि असा तसाच. राष्ट्रीय सभेला पुष्कळ लोक आले होते. आणि ठरावाच्या दृष्टीने प्रगति दिसली. अनेक उपसूचना भर सभेत मांडण्यात आल्या व त्यावर वादविवाद चांगला झाला. विरोधी मतेहि लोकानी शांतपणे ऐकून घेतली. बेझंटबाईच्या उपसूचनेला अवघी चार मते मिळाली. काँग्रेसची एकंदर हकीकत थोडक्यात अशी आहे.

### ( २३ ) टिळकांचे केळकराना पत्र

लंडन ९ जान्युआरी १९१९

काही पत्रे व वर्तमानपत्रे मिळाली. अजून आमचे टपाल केव्हा केव्हा फोडूनच येते. एकदा चार हजार पौंड व एकदा पाच हजार पौंड पाठविलेत ते पोचले. होमरूल लीगच्या कामाचा अहवाल पाठविला आहे. कोर्टे ११ जान्युआरीला उघडतील. मग चिरोल केसची तारीख कोणती नेमतात ते कळेल. सर जॉन साहेबानी आमचे वकीलपत्र स्वीकारले आहे. पण समक्ष भेटून बोलणे चालणे अद्यापि व्हावयाचे आहे. मार्सेलवरून आता टपाल जाऊ येऊ लागले. तेव्हा यापुढे पत्रे लवकर मिळतील. येथे आम्ही जी हस्तपत्रके व लहान पुस्तके काढली त्यांच्या प्रती पाठविल्या आहेत. आम्ही मजकूर ठरविल्याप्रमाणे बॅपटिस्टा यानी लिहिला आहे. त्यात लंडन टाइम्सचे नाव नाही पण त्याच्या टीकेला उत्तर आहे. मनरो–डॉक्ट्रिनचा उल्लेख का केला याची कारणे तुम्हाला कळून येतीलच. दिल्ली येथील राष्ट्रीय सभेने शांतता परिषदेला पाठविण्याच्या शिष्टमंडळात माझी निवड केली हे एका अर्थी बरे झाले. त्यामुळे मि. पोलॉक यांचा मला जो येथे विरोध होत आहे त्याला परस्पर उत्तर मिळेल. हिवाळा आहे पण फारसा बाधत नाही.

### ( २४ ) कार्ले हीथ यांचे टिळकाना पत्र

लंडन ९ जानेवारी १९१९

स्वयंनिर्णयावर तुमच्याकडून आलेले पत्रक पावले. पण आमच्या कौंसिलाने असे ठरविले की हे पत्रक आम्ही परस्पर वाटू नये. तथापि असेहि ठरले की अंतरराष्ट्रीय परिषदेचा विचार करण्याकरिता जे कमिशन नेमण्यात आले आहे त्या कमिशनने या प्रश्नाचा विचार करावा अशी विनंति करावी. कौंसिलमध्ये त्याचा विचार झाल्यावर कौन्सिल स्वतःचे म्हणून एक पत्रक काढील. ही रीति अधिक उपयुक्त असून आपणाला पसंत पडेल अशी आशा आहे.

### ( २५ ) जोसेफिन रॅन्सम यांचे टिळकाना पत्र

लंडन ९ जानेवारी १९१९

स्वयंनिणर्याचे पत्रक पोहोचले. त्यातील विचारसरणी व मांडणी चांगली आहे. चित्रे मात्र आम्हाला आवडली नाहीत. ते पत्रक आम्ही वाटावे असे आपणास वाटत असेल तर दोनशे प्रती पाठवा. माझ्या पतीना निवडणुकीत अपयश आले पण त्याबद्दल त्याना काही वाईट वाटत नाही. ते लिबरल पक्षाचे उमेदवार म्हणून उभे होते. लेबरपक्षाचे म्हणून नव्हते. तुमच्या व्याख्यानाकरिता आम्ही सभा भरवावयाची असे ठरविले आहे. ता. २५ फेब्रुवारीला कॅक्स्टन हॉल मिळेल.

**( २६ ) जिलबर्ट क्लोज यांचे टिळकाना पत्र**

पॅरिस १४ जानेवारी १९१९.

प्रे. विल्सन याना आपण पाठविलेले पत्र मिळाले. त्यांची आठवण ठेवून त्याना तुम्ही लिहिले याबद्दल ते आभारी आहेत. त्यानी तुम्हाला आश्वासनपूर्वक असे कळविण्याविषयी मला सांगितले आहे की हिंदुस्थानाला स्वयंनिर्णयाचा हक्क मिळण्याच्या प्रश्नाचा विचार योग्य अधिकारी लवकरच करणार आहेत.

**( २७ ) टिळकांचे केळकराना पत्र**

लंडन १६ जानेवारी १९१९

येथील कामाचा पुढील अहवाल पाठविला आहे. ब्रि. कॉं. कमिटीने आम्हाला विरोध करून आमचे पाय मागे ओढू नयेत इतकी तरी काही खटपट कॉंग्रेसच्या अधिकाऱ्याकडे कराल की नाही ? काल मी एक तार प्रसिद्ध केली. तीत लिहिल्याप्रमाणे शांततापरिषदेकडे हिंदुस्थानच्या तक्रारी कॉंग्रेसकडून कळविण्याची काही व्यवस्था झाली तर पहा.

**( २८ ) केळकर यांचे बेझंटबाईना पत्र**

पुणे १७ जानेवारी १९१९

कॉंग्रेसमधील आपल्या दोन होमरूल पक्षाच्या मतात फारच सूक्ष्म भेद आहे. असे असता त्याचा वर्तमानपत्रातून विनाकारण गवगवा होतो. पण अजूनहि ही गोष्ट सुधारता येईल असे वाटते. आपण शिष्ट मंडळात गेला तर बहुधा पुढारीपणाचा मान आपणाकडेच येईल. शिवाय विलायतेत टिळक हे एकटेच असल्यामुळे ज्या लोकापासून आपणाला नेहमी उपसर्ग होतो असे वाटते ते लोक त्यांच्याबरोबर तेथे नाहीत. विलायतेत प्रधानमंडळात जसा किरकोळ मतभेद असतो तथापि सर्वजण मिळून एकच गोष्ट अंमलात आणतात त्याप्रमाणे प्रांतिक स्वातंत्र्याचे बाबतीत थोडथोडा मतभेद असला तरी इतर सर्व मागण्या आपण व टिळक याना एकमुखाने मांडता येतील. सुधारणेच्या योजनेसंबंधाने आपणच पूर्वी म्हणाला होता की त्या देण्याला इंग्लंडच्या योग्यतेच्या नाहीत व घेण्याला हिंदुस्थानच्या योग्यतेच्याहि नाहीत. त्याचीच मी आपणाला आठवण करून देतो. टिळकांचे व कॉंग्रेसचे मत झाले तरी सर्वस्वी जुळते असे कोठे आहे ? तथापि कोणत्याहि मतभेदात आपण थोडे मिळते घेण्याचा प्रयत्न केला तर मिळते घेता येते आणि मतभेदावर जोर दिला तर जमत नाही. माझे म्हणणे कदाचित् आपणाला पटणार नाही पण सुचले ते लिहिले आहे. गैरसमज होऊ देऊ नये. त्यातून आपण माझ्यापेक्षा दोन पिढ्यानी वडील आहा म्हणून मी केवळ सुचले आहे ते सादर केले असेच माना.

### ( २९ ) डी. एन्. बानर्जी यांचे टिळकाना पत्र

लंडन २० जानेवारी १९१९

डेलीमेलच्या संपादकाना भेटलो. त्यांचे आमचे पैशाचे ठरल्यास वर्तमान-पत्रात जागा राखून ठेविता येईल असे ते म्हणाले. मी या वाटाघाटीत तुमचे नाव सांगितले नाही. हिंदुस्थानासंबंधी काही माहिती पाठविली तर ती ते पत्रात घालतील पण ते हिंदुस्थानच्या बाजूने स्पष्टपणे लिहिणार नाहीत. मॅसिंगहॅम यांची व तुमची भेट व्हावी म्हणजे बरे असे त्यांचे सेक्रेटरी म्हणत होते. डेली न्यूज पत्राचे संपादक गार्डिनर यांच्या सेक्रेटरीचे तुमच्याबद्दल पत्र आले आहे. डेली क्रॉनिकलबद्दल मात्र विश्वास नाही. कारण ते लाइड जॉर्ज यांचे पत्र आहे. सुप्रसिद्ध लेखक एच्. जी. वेल्स यांचा मात्र काही उपयोग कदाचित् होईल.

### ( ३० ) एस आर. बम्मनजी यांचे टिळकाना पत्र.

भूमध्य समुद्र २४ जानेवारी १९१९

मी लंडनला एकदम येत नाही. प्रथम पॅरिसमध्ये ८।१० दिवस राहीन. तेथे शांतता परिषदेची मौज पहाण्याची इच्छा आहे. त्या कामी लॉर्ड सिंह आणि बिकानेरचे महाराज हे मदत करणार आहेत. तुमच्याकरिता तुपाचा डबा एक मजजवळ दिला आहे. तरी बोट धक्क्याला लागेल तेव्हा तो घेऊन जाण्यास सांगावे. आमच्या जहाजावर लेडी चेम्सफर्ड या आहेत. त्या विलायतेस निघाल्या आहेत. त्या मला म्हणाल्या तुम्ही लंडनला याल तेव्हा टिळकाना घेऊन आमच्याकडे चहा घेण्याला याल का ? मी त्याना होय म्हटले आहे. बाई फार हुषार आहे. सहानुभूति तर ठरलेलीच आहे !

### ( ३१ ) टिळकांचे गोखले याना पत्र

लंडन २३ जानेवारी १९१९

तुमची पत्रे पोचली. विलिंग्डन स्मारकाचा फजिता झाल्याचे वाचले. शेवटीं जिना याना आम्ही सुरतेस जे केले तेच करावे लागले. 'प्रारब्धस्यान्तग-मनम्' हे वचन जिनाना आता पटले म्हणावयाचे. सर सत्येंद्र प्रसन्न सिंह याना लॉर्ड केले आहे. नेमस्ताना एक नवे दालन खुले झाले म्हणावयाचे. काळा शेवटी गोऱ्यात शिरला असे 'सॅटरडे रिव्ह्यू' ने म्हटले आहे. स्वयंनिर्णयाचे सोवळे भांडे इकडून तिकडून कोणीकडून तरी शांततापरिषदेच्या द्वारातून आत टाकून द्यावे असा प्रयत्न सुरू आहे. हिंदुस्थानाला परिषदेत दोन खुर्च्या मिळाल्यां आहेत पण त्यांचा आम्हाला उपयोग नाही. कॉंग्रेस व होमरूल लीगचे अध्यक्ष यानीही परस्पर परिषदेला तारा करून पहाव्या. बॅपटिस्टा आता येथून निघणार. त्यानी इकडे अठरा महिने काढल्यावर त्याना आणखी राहा असे आम्हाला

म्हणता येत नाही. तिकडून पैसे मागविले ते मजूरपक्षाला देण्याकरिता. बॅप-टिस्टांच्या निवडणुकीला नाहीत. ”

## ( ३२ ) अहवाल लंडन

आम्ही येथे आक्टोबरात आलो व नोव्हेंबरात आमच्या कामाला सुरवात केली. तात्पुरता तह होऊन युद्ध थांबल्यामुळे इकडे आनंदाची लाट उसळली आहे. पण नव्या पार्लमेंटरी निवडणुकीहि उपस्थित झाल्या आहेत म्हणून या पुरात जाळे टाकून हाताला काही लागते का पाहिले. मजूरपक्षाचे शंभर तरी सभासद निवडून यावे असे वाटले पण अवघे त्रेसष्टच आले. युद्धाविरुद्ध ज्यानी लिहिले जे बोलले त्या सगळ्यांचा एकजात पराभव झाला! रॅम्से मॅकडोनाल्ड स्नोडन हेंडरसन लॅन्सबरी सगळे पडले! तथापि आम्हाला आज मदत मिळेल तर मजूरपक्षाचीच. निवडणुकांची संधि साधून आम्ही विलायतेत सुमारे दहा लक्ष हस्तपत्रके हिंदुस्थानासंबंधाची वाटली. बेझंटबाईच्या होमरूल लीगनेहि काम चांगले केले. काम नाही केले असे ब्रिटिश कॉंग्रेस कमिटीने! तेव्हा तिच्याविरुद्ध न ल्याहावे तर काय करावे? तिने आमचे काम करण्याऐवजी पोलॉक साहेबांचे मन वळविण्यात व त्यांच्याशी भांडण्यात आमचा वेळ खर्च घातला. पण आम्ही त्यांच्यावर थोडेंच अवलंबून होतो. आम्ही छापलेले पुस्तक व चित्र पाठविलेच आहे. हिंदुस्थानातील ३६ जाहीर सभातून शांततापरिषदेविषयी ठराव झाले ते इकडे आले. पॅरिसला जाण्याकरिता पासपोर्ट मागितले आहेत. मिळाले तर जाऊन खटपट करू. येथे सोन्याच्या किल्लीशिवाय वर्तमानपत्रांचे तोंड उघडत नाही. तथापि टिळक गांधी आणि हसन इमाम यांची निवड केल्याचे स्वतः टाईम्सनेच प्रसिद्ध केले आहे.

## ( ३३ ) टी. होल्डरनेस यांचे टिळकाना पत्र

लंडन इंडिया ऑफिस २८ जानेवारी १९१९

शांततापरिषदेला कोण प्रतिनिधि पाठवावयाचे हे आता ठरले आहे. तुम्हाला शांततापरिषदेला पाठवावे अशी तुमची यादी आली. परंतु तसे करता येत नाही. पासपोर्ट मागताना निदान प्रेक्षक म्हणून हजर रहावे अशी इच्छा तुम्ही व्यक्त केली पण तीहि सफल होणे शक्य नाही. म्हणून पासपोर्ट देता येत नाहीत.

## ( ३४ ) टिळकांचे पुण्यास पत्र

लंडन ३० जानेवारी १९१९

चिरोल केसमध्ये माझी जबानी चालू आहे. पॅरिसला जाण्याकरता पासपोर्ट मागितले होते पण ते मिळाले नाहीत.

### ( ३५ ) केळकर यांचे टिळकाना पत्र

पुणे ३१ जानेवारी १९१९

आपली तार पोहोचली. होमरूलच्या अध्यक्षाच्या जागेचा राजीनामा दिलेली बॅपटिस्टा यांची तार पोहोचली. दोघाना उत्तरादाखल दोन निरनिराळ्या तारा मी केल्या आहेत. त्याचे कारण आपल्या लक्षात येईलच. बॅपटिस्टा हे राजीनामा देणारच तर आपण लेबर परिषदेला जाणार ते होमरूल लीगचे अध्यक्ष या नात्यानेच का न जावे ? शिष्टमंडळाची निवडणूक सुरू आहे. दिल्ली येथे ता. ९ फेब्रुवारी रोजी अखेर निकाल लागेल. जिना मालवीय गांधी व मिसेस बेझंट याखेरीज बाकी बहुतेक प्रमुख कॉंग्रेसमेन शिष्टमंडळावर जाण्याला तयार आहेत. वरील लोक मात्र तयार नाहीत. याचे कारण ते म्हणतात ' एकदम प्रांतिक स्वायत्तता (प्रॉ० ऑटॉनमी) मागण्याला आम्ही तयार नाही.' बेझंटबाई या गोष्टीना पूर्वी तयार होत्या. आता मात्र नाहीत. १५ प्रतिनिधीना सरकारने पासपोर्ट देण्याचे ठरविले आहे. मी असे ऐकतो की मुंबई सरकारने प्रांतिक स्वातंत्र्य द्यावे अशी सूचना केली आहे. लॉर्ड विलिंग्डन यांच्या शिवाय इतर कोणी हे श्रेय घेतले नाही. फ्रँचाइज कमिटीपुढे साक्षीला मी जाणार आहे.

### ( ३६ ) टिळकांचे गोखले याना पत्र

लंडन ६ फेब्रुवारी १९१९

आमचा खटला फिरून फेब्रुवारीला सुरू होईल असे वाटते. झाल्या कामाचे लघुलेखकांचे छापील रिपोर्ट यासोबत पाठविले आहेत. हे पत्र पुण्यास पोचण्यापूर्वीच खटल्याचा निकाल होईल.

### ( ३७ ) एस. सी. टिले यांचे टिळकाना पत्र

फॉरिन ऑफिस लंडन ६ फेब्रुवारी १९१९

तुमचा अर्ज इंडिया ऑफिसकडे पाठविला आहे. पण तुम्ही मागितलेला पासपोर्ट देता येत नाही.

### ( ३८ ) केळकर यांचे टिळकाना पत्र

७ फेब्रुवारी १९१९

दिल्लीहून परत आलो. कॉंग्रेसचे शिष्टमंडळ पाठविण्यासंबंधाने व्यवस्था करावयाची होती म्हणून गेलो होतो. पंधरा लोकांची निवड केली आहे, पण प्रत्यक्ष कोण येथून पाय उचलतो हेच पाहावयाचे आहे. खापर्डे मी पटेल पाल जोसेफ नरसिंह अय्यर हे केव्हाहि निघण्याला तयार आहोत. पंधरा पॅसे-

जेस सरकारने दिले त्यातला एक माझे नावाचा आहे. तेव्हा आता मला निश्चितपणे लिहा आणि सांगा की मी तिकडे आलेच पाहिजे की काय ? किंवा पुनः पूर्वीप्रमाणे वर्तमानपत्रे घेऊन येथील उद्योग सुरू करू ? चिरोल केसचा निकाल लागल्याबरोबर ही गोष्ट आपणास निकालात काढावी लागेल. माझा आपणाला तेथे खरोखरच उपयोग असेल तर आपले लिहून आल्याबरोबर निघतो. पण नव्या परिस्थितीत मी येऊ नये असे वाटेल तर तसे बेलाशक लिहा. म्युनिसिपल प्रेसिडेंट या नात्याने माझे काम सुरू आहे. व कौंसिलच्या निवडणुकीतहि मी खास निवडून येईन. किंबहुना कोणी प्रतिस्पर्धीहि मला उभा राहणार नाही. पण मी आल्याने आपला तेथे अधिक उपयोग होईल असे असेल तर मी म्युनिसिपल प्रेसिडेंटशिपचाहि राजीनामा देऊन येतो. असे दुहेरी लिहिण्याचे कारण इतकेच की मला विलायतेस येण्याची हौस किंवा महत्त्वाकांक्षाहि नाही.

ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीमध्ये कॉंग्रेसची मॅंडेट ढिली करण्याचा प्रयत्न होत आहे. इतके करून तरी जिना विलायतेस जाणार की नाही कोणी सांगावे ? बेझंटबाईबद्दल बंगाल व मध्यप्रांत यामध्ये प्रतिकूल भावना दिसते. त्या स्वतः व रामस्वामी अय्यर याना त्यानी कॉंग्रेसचे सेक्रेटरी नेमून घेतल्यामुळे लोकाना बरे वाटले नाही. उलट आपण जसे बेझंटबाईशी जमवून घेता तसे इतर लोक घेत नाहीत. बेझंटबाईची प्रांतिक स्वातंत्र्याविषयीची उपसूचना दास व खापर्डे यानीही मान्य केली. पण सत्यमूर्ती आडवे आले. बरे दास किंवा विजयराघव हे बाईना विरोध करतात पण स्वतः विलायतेला जाण्याला तयार होत नाहीत. विजयराघव याना बाईचे वर्चस्व नको पण आमच्या होमरूललीगची शाखा काढा म्हटले तर तेहि करीत नाहीत. बरे बाईहि काही कमी नाहीत. शांतता परिषदेकडे प्रतिनिधि म्हणून बार्कीच्या बरोबर तुमचे नाव लोकानी सुचविले त्याला त्यानी विनाकारण हरकत घेतली. अशा रीतीने तीन शिष्टमंडळे जाणार. पण आता गांधीनी असे म्हणण्यास आरंभ केला आहे की विलायतेला शिष्टमंडळ पाठवूच नये. मी त्याना लिहिले आहे की नेमस्त लोकांचे शिष्टमंडळ जाणार तर कॉंग्रेसला आपली मते मांडण्याकरिता आपलेहि शिष्टमंडळ पाठविले पाहिजे. शिष्टमंडळाच्या निरनिराळ्या लोकाना पत्रे वगैरे रोज लिहावी लागत आहेत. कलकत्त्यास जाऊन दासबाबू शिष्टमंडळावर कोणाला पाठवितात व खर्चाला किती रक्कम देतात हे मी पाहणार आहे. कदाचित् त्याचकरिता मद्रासेसहि जावे लागेल. आमच्या व्याख्यानाचे दौरेहि सुरू आहेत. खाडिलकर व शिवरामपंत यानी वऱ्हाड नागपुराकडे जाण्याचे कबूल केले आहे. पण हे सर्व बेत चिरोल केसच्या निकालावर बरेचसे अवलंबून आहेत. आपण केस जिंकली तर चळवळीवर खर्चण्याला बरीच रक्कम मोकळी होईल. पण आपण केस हरलो तर मग खर्चाच्या दृष्टीनेहि कोणी जावे कोणी जाऊ नये हे पाहावे लागेल. गंगाधरराव देशपांडे हे दक्षिण भागाच्या कौन्सिल निवडणुकीकरिता उभे राहणार आहेत. वासूकाका जोशाना

सांगा की विलायतेत चित्रमयजगत् काढण्याचा तुमचा निश्चय ठरला असेल तर एडिटर येऊ घातला आहे ! जागा रिकामी ठेवा ! ”

### ( ३९ ) टिळकांचे पुण्यास पत्र

लंडन १३ फेब्रुवारी १९१९

केस चालू आहे. सध्या माझी उलट तपासणी सुरू असल्याने या आठवड्यात तुम्हास लिहिण्यास होत नाही.

### ( ४० ) एलिझाबेथ आर्नोल्ड यांचे टिळकाना पत्र

लंडन १४ फेब्रुवारी १९१९

बनारस येथील माझे बंधु सच्चिदानंद ब्रह्मचारी शर्मा यानी ब्रह्मसूत्राच्या प्रति पाठविल्या. तरी आपली गाठ घेण्याला एखादा दिवस ठरवून कळवावे. आपण एवढे वैदिक पंडित आहा म्हणून आपणाला त्रास देणे आहे. माझा भाऊ तत्त्वज्ञानात गढून गेला आहे आणि मी कविताकौमुदी आहे. आणि मी जेथे जाते तेथे गंगामाता माझ्या डोळ्यापुढे उभी असते. हिंदुस्थानासंबंधाने मी लिहिले ते पुस्तक लवकरच प्रसिद्ध होईल. हल्ली येथे युद्धासंबंधीचे काही काम मी पत्करिले आहे. त्याचे बरेच श्रम पडतात. ‘ रायटर्स क्लब ’ या पत्त्यावर मला पत्र पाठविले असता लवकर पोहोचेल.

### ( ४१ ) टिळकांचे पुण्यास पत्र

लंडन २० फेब्रुवारी १९१९

चिरोल केस चालू असल्यामुळे तुम्हा कोणासहि पत्र लिहिण्यास फावत नाही. आजचा दहावा दिवस व उद्या अकराव्या दिवशी केस संपणार. कोर्टाच्या प्रत्येक दिवसाचा खर्च सुमारे चारशे पौंड द्यावा लागत आहे. याशिवाय ब्रीफ वाचण्यास तीन हजार पौंड द्यावे लागले ते निराळेच. म्हणजे एकूण खर्च सुमारे सात हजार पाउंड व काही जास्त इतका होणार.

बॅपटिस्टा पुढल्याच आठवड्यात हिंदुस्थानात परत येत आहेत. त्यांचे बंदरावर चांगले स्वागत करा. होमरूललीगच्या खर्चाने हिंदुस्थानभर दौरा करण्यास त्याना सांगितले आहे.

### ( ४२ ) डॉ. हर्डीकर यांचे टिळकाना पत्र

न्यूयॉर्क २० फेब्रुवारी १९१९

आपले पत्र व रिपोर्ट मिळाले. आपण पाच हजार डॉलर पाठविले त्यानंतर हॉचनेर हे त्यातील अर्धेच हजार डॉलर मागण्याकरिता आले होते पण

आम्ही त्याना काही दिले नाही. होता होईतो ही रकम तशीच ठेवून आणखी रकम इतर रीतीने जुळवून खर्च भागवावा असा विचार आहे.

( ४३ ) टिळकांचे केळकराना पत्र

......खटल्याचे लिहिले. आता राजकीय बाबीविषयी थोडे लिहितो. येथे काय चालले आहे याची कल्पना तुम्हाला सहसा येणार नाही. पार्लमेंट लॉईड जॉर्ज यांच्या मुठीत आहे. मजूरपक्ष भिंतीवर धडक्या मारीत आहे. पण त्याचा फारसा उपयोग होत नाही. मॉंटेग्यू चेम्सफर्ड रिपोर्टाइतक्याहि सुधारणा पदरात पडण्याचा रंग नाही. सिलेक्ट कमिटीचे काम संपताच एकदम बिल प्रविष्ट होईल व झटपट पास होऊन जाईल. यावरून शिष्टमंडळ कसे असावे याची कल्पना येईल. पुष्कळ लोक येण्याने विशेष साधणार नाही. फुकट खर्च होईल. अगदी थोडे शेलके लोक आले तर बरे. इकडे व्याख्याने हवी पण ती हळूहळू सारखी पेरीत राहिले पाहिजे. थोड्या वेळात पुष्कळ देऊन फारसा उपयोग नाही. मला शांतता परिषदेकडे प्रतिनिधि म्हणून पाठविण्याचा ठराव पोचला. हा प्रश्न लीग ऑफ नेशन्सपुढे आणण्याचा प्रयत्न आहे. काय होईल पहावे. बेझंटबाई व कॉंग्रेस यांचा सलोखा होत नाहीसे दिसते. त्यांचे शिष्टमंडळ स्वतंत्र येणार तर येवो. पण त्यांचा व आपला येथे विरोध दिसू नये. मी त्याना एक सामोपचाराची तार पाठवीत आहे. शांतता परिषद वगैरेसंबंधाने आम्ही तुम्हाला कळवू ते कोणत्याहि रीतीने प्रसिद्ध करण्याचे नाही. ११ तारखेला पार्लमेंट उघडेल तेव्हा कोणाकडून तरी प्रथमच हिंदुस्थानच्या स्वयंनिर्णायक हक्काचा प्रश्न काढता आला तर पाहतो. पण शांतता परिषद संपण्यापूर्वीच पार्लमेंटला न डिवचलेले बरे. बमनजी हे लवकरच इकडे येतील. त्यांचा आम्हाला बराच उपयोग होईल असे वाटते. गेले तीन दिवस बर्फ एकसारखे पडत आहे. तथापि प्रकृति ठीक आहे.

( ४४ ) टिळकांचे केळकराना पत्र

येथील ब्रिटिश कॉंग्रेस कमिटी संबंधाने आमचे विचार दिल्ली येथील स्वागत मंडळाकडे व इतराकडे पाठविले आहेत. या कमिटीची उपयुक्तता काही राहिलेली नाही. उलट तिच्यापासून अपाय होऊ लागला आहे. ती सुधारेपर्यंत तिला पैसे पाठविण्यात अर्थ नाही. राष्ट्रीय सभेला अध्यक्ष कोण निवडावा या विषयी मी काहीच मत ठरविले नाही. सर रवींद्रनाथ टागोर ते स्थान सहसा स्वीकारणार नाहीत. विजयराघव किंवा नेहरु यापैकी कोणीही आपल्या कार्याला उपयोगी पडतील. मुंबईस झालेल्या ठरावाच्या मागे पाऊल जाता कामा नये. त्यामागे तुम्ही जाल तर सुधारणांची योजना आहे त्याहून चांगली करण्याचे आमचे येथील प्रयत्न फुकट जातील. मजूरपक्ष पूर्णपणे आमच्या बाजूला आहे. जमल्यास राष्ट्रीय सभेने एक ठराव करून शांतता परिषदेपुढे राष्ट्रीय सभेचे विचार मांड-

ण्याची लॉईड जॉर्ज याना विनंती करावी. राष्ट्रीय सभेचा प्रत्यक्ष संबंध शांतता परिषदेशी अधिकारी येऊ देणार नाहीत. या ठरावाच्या प्रती शांतता परिषदेच्या सर्व सभासदाना पाठवाव्यात. बेझंटबाईना या गोष्टीचा नीट विचार करावयास लिहा. मुंबईच्या ठरावाना अनुसरून यावेळी पार्लमेंटकडे अर्जाची भेंडोळी आली पाहिजेत. शिष्टमंडळाना मार्च किंवा मे पर्यंत इकडे येऊ देणार नाहीत. कारण शांतता परिषद त्यापूर्वी संपून जायला हवी ना ? आधी सर्व स्थिरस्थावर करतील आणि मग म्हणतील ठीक आहे आता या आणि आपले म्हणणे खुशाल सांगा !

**( ४५ ) एलिझाबेथ आर्नोल्ड यांचे टिळकाना पत्र**

लंडन ३ मार्च १९१९

तुमचे नाव बाळ गंगाधर आहे. म्हणून पूर्वी आजारीपणात मी गंगावर्णनाच्या ज्या कविता लिहिल्या त्या आपणाकडे पाठवीत आहे.

**( ४६ ) टिळकांचे केळकराना पत्र**

लंडन ६ मार्च १९१९

शिष्टमंडळ इकडे आल्याने मॅाटेग्यूच्या योजनेत सुधारणा होण्याचा संभव आहे. सोबत टाईम्सचा अंक पाठविला आहे तो पाहा म्हणजे कळेल. याविषयी नेमस्त लोकाना भीति वाटते ती खरी नाही. शिष्टमंडळ येणार ते वजनदार असावे. टाईम्समधील लेख वाचून बेझंटबाई तुमच्या बाजूला येऊन मिळतील असे वाटते. शिष्टमंडळे चार पाच असावी. उदाहरणार्थ ( १ ) सर रवींन्द्रनाथ टागोर व महमुदाबादचे राजेसाहेब—अगदी वरिष्ट वर्गात यांचा उपयोग होईल. ( २ ) दास व बॅपटिस्टा याना पार्लमेंटरी कमिटीपुढे साक्षी देण्याला घालू व व सुधारणांच्या बिलात उपसूचना मांडण्याला हे उपयोगी पडतील. ( ३ ) स्वतः तुम्ही व इतर काही लोक—हे आला म्हणजे आमचे सेक्रेटेरियट बनेल ( ४ ) बेझंटबाई—त्यांचा मजूरपक्षाकडे व स्त्रीवर्गात उपयोग होईल ( ५ ) खापर्डे मदनमोहन म्हणजे कायदेकौन्सिलचे सभासद हे सरकारी अधिकाऱ्याशी बोलण्याचालण्याला उपयोगी पडतील. याप्रमाणे माझी योजना आहे. तुम्ही आलेच पाहिजे. करंदीकर परत येईन असे सांगून गेले आहेत. शिष्टमंडळात तेहि असावे. बर्न कमिटीचे ठराव सोबत पाठविले आहेत. हेरल्डमध्ये माझ्या भाषणाचा सारांश आला आहे तो पाहा.

**( ४७ ) केळकर यांचे टिळकाना पत्र**

पुणे ७ मार्च १९१९

खटल्याचा निकाल प्रतिकूल झाल्याची तार पूर्वीच मिळाली. तो ऐकून पुष्कळ लोकांच्या मनाला धक्का बसला. परंतु कित्येक लोक असे होणार असे

घेऊनच चालले होते त्यामुळे त्याना काही विशेष आश्चर्य वाटले नाही. आपल्या खर्जाचा अंदाज ताबडतोब कळविण्याविषयी मी आपणाला तार पाठविली आहे. झाल्या गोष्टीचा विचार न करिता आपल्या पुढील कर्तव्याला लागावे असे लोकानी ठरविले आहे. तरी तपशीलवार तार पाठवा म्हणजे किती रकम किती हप्त्यानी पाठवावयाची त्याच्या अंदाजाने वर्गणी जमविण्याचे काम करिता येईल. आपली तार येण्यापूर्वी खर्चाचा अंदाज तीन लक्ष रुपये असा ठरवून त्या उद्योगाला मंडळी लागली आहेत. बॅपटिस्टा इकडे आल्यावर तिकडची सर्व हकीगत कळेल. रौलेट बिलाचा निकाल उद्या लागणार आहे.

### ( ४८ ) टिळकांचे केळकराना पत्र

लंडन १३ मार्च १९१९

या सोबत आठवड्याचा अहवाल पाठविला आहे. त्यातील काय छापावे काय छापू नये हे वाचून नीट ठरवा. चिरोलकेसमध्ये अपिल करावे की नाही यासंबंधी विचार बाबाच्या पत्रात लिहिले आहेत. दादासाहेब करंदीकर आज मनोरा बोटीने तिकडे परत निघाले. ते व बॅपटिस्टा यांच्याकडून तुम्हाला इकडची प्रत्यक्ष माहिती मिळेल. शिष्टमंडळाबरोबर तुम्ही आता होईल तितके करून लवकर या. मला मदत करण्याला येथे आता कोणी नाही.

### ( ४९ ) टिळकांचे धोंडोपंतास पत्र

लंडन १३ मार्च १९१९

चिरोलकेसमध्ये आम्ही हरलो. एकंदर वकिलांच्या सल्ल्याने अपील करू नये असे ठरले. ब्रिटिश न्यायाची परीक्षा पाहण्यात आम्हाला फार मोठा भुर्दंड पडला ! आता निष्कारण चांगला पैसा पाण्यात ओतण्यात अर्थ नाही. अपीलामध्ये तरी यशाची खात्री कोठे आहे ? आपला काळ बदलला आहे. आणि राजकीय मतापासून अलिप्त व स्वतंत्र असलेली ज्यूरी किंवा न्यायाधीश आपणाला येथे मिळेल असे वाटत नाही. माझी प्रकृति खरोखरच चांगली आहे. मुंबई सोडल्यापासून मी येथे एकहि दिवस आजारी पडलो नाही.

### ( ५० ) अहवाल

लंडन १३ मार्च १९१९

बॅपटिस्टा येथून २७ फेब्रुवारीला निघाले. करंदीकर आज निघतात. दोघेही इकडली सर्व हकीकत सांगतील. पोलॉक व त्यांचे धोरण यांच्यावर टिळक करंदीकर बॅपटिस्टा अयंगार आणि घोष या सर्वांच्या सहीवर मिळून टीका प्रसिद्ध झाली त्याला पोलॉक यानी हिंदुस्थानात उत्तर पाठविले आहे. त्यांचे म्हणणे कमिटीचा व इंडिया पत्राचा काँग्रेसशी काय संबंध ? मि. स्कर हे तिकडे गेले आहेत. ते काय योजून गेले हे कळत नाही. पण दोन्ही होमरूललीगांचा समेट घडवून आणा

असे मी त्याना सांगितले आहे. लॅन्सबरी हेहि बाईना लिहिणार आहेत. दिल्ली-काँग्रेसच्या ठरावाना धरून सर्व एकमुखाने बोललो तर चांगले होईल. अधिक मागितल्याने मुळात आहे तेहि मिळणार नाही ही भीति खरी नाही. लॉर्ड सिडेनहॅम यांचा उगीच बाऊ दाखवितात. पण परवा लॉर्ड सिंह बिकानेरचे महाराज व मॅांटेग्यू यानी त्याना झणझणीत उत्तर दिले आहे. लहान सहान सभातून टिळक व्याख्याने देऊ लागले आहेत. शिष्टमंडळे येतील त्यांची व्यवस्था डॉ. क्लार्क व लॅन्सबरी मिळून करणार आहेत. अमेरिकेत लाला लजपतराय यानी आमची हस्तपत्रके पुनः छापून अमेरिकन पार्लमेंटच्या सभासदात वाटली.

### (५१) मंडलिक यांचे नामजोशी याना पत्र

मुंबई १४ मार्च १९१९

रायगडावर उत्सव करण्याची परवानगी मिळाली आहे. ता. १ मे रोजी उत्सव करू. मुंजे चिंतामणराव वैद्य व मी गांधीजीना भेटण्यासाठी सकाळी गेलो. वैद्य म्हणाले पुढारी मंडळीची सभा बोलवावी. गांधीजी म्हणाले केवळ सत्याग्रहाच्या शपथपत्रिकेवर ज्यानी सह्या केल्या त्यांशिवाय इतर लोकांच्या सभा आपण बोलावणार नाही. त्यांचे म्हणणे हे की जो रागावल्याचे यत्किंचितहि चिन्ह दाखवितो तो खरा सत्याग्रहधर्मी नव्हे. वैद्य म्हणाले की तर मग आम्हाला प्रतिज्ञापत्रिकेवर सही करिता येणे कठिण आहे. मला असे दिसते की ज्यानी प्रतिज्ञापत्रकावर सह्या केल्या आहेत त्या सर्वांची परीक्षा गांधीजी पहाणार. याचा अर्थ पुष्कळाना तुरुंगात जावे लागणार. सुमारे एक आठवड्यात सत्याग्रहाची मोहीम सुरू होणारसे वाटते.

### (५२) हाइंडमन यांचे टिळकाना पत्र

लंडन १५ मार्च १९१९

आमच्या नॅशनल सोशियालिस्ट पार्टीमध्ये हिंदुस्थानातील सुधारणा व त्यासंबंधाची वाटाघाट केली. आम्हाला हिंदुस्थानात सुधारणा होणे इष्ट वाटते. गेली ३८ वर्षे आमचा पक्ष या दिशेने खटपट करीत आहे. हल्लीची राज्यव्यवस्था हिंदुस्थान व इंग्लंड या दोघानाहि वाईट आहे. आणि आमचा पक्ष ती व्यवस्था बदलण्याला व सुधारण्याला मदत करील. पण हल्ली ज्या मजूरपक्षाशी तुम्ही संबंध ठेवता त्यांच्याशी आम्हाला सहकारिता करिता येत नाही असे आम्ही सर्वानुमते ठरविले आहे. तसे करण्यापासून आमचे येथील वजन कमी होणार आहे. आणि त्यापासून हिंदुस्थानालाहि फायदा नाही. लॅन्सबरी स्कर वेजउड यांच्याशी नॅशनल सोशिआलिस्ट पार्टी ही संबंध ठेवू इच्छित नाही! यामुळे तुमच्या इच्छेप्रमाणे आमच्या पक्षापुढे तुमचे व्याख्यान करणे घडून येईल असे वाटत नाही.

### ( ५३ ) एलिझाबेथ आर्नोल्ड यांचे टिळकाना पत्र

लंडन १६ मार्च १९१९

आपले पत्र पावले. आपणाला येथे एखाद्या गोष्टीची गरज असेल व माहिती पाहिजे असेल तर मला लिहा. माझ्या वैदिक गुरूना माहिती पुरविणे हे माझे कर्तव्य आहे. माझे पुस्तक युरोपातील लोकाना आवडणार नाही. माझ्या पुस्तकातून हिंदी अंतःकरणाचा ध्वनि उमटलेला आहे. म्हणून हिंदुस्थानात त्याला वाचक मिळतील. माझ्या नित्य उपासना काही अंतरल्या. ' मत्कर्मकृत् मत्परमो मद्भक्तः संगवर्जितः ' हे वचन लक्षात आहे.

### ( ५४ ) अहवाल

लंडन २० मार्च १९१९

अपील करू नये असे निश्चित ठरले. पुढील महिन्यात टिळक चार पाच व्याख्याने देणार आहेत. आणि काँग्रेसच्या मागणीला दुजोरा देण्याकरिता पार्लेमेंटच्या काही सभासदांची एखादी कमिटी बनविता येते का हे पाहात आहो. येथील वर्तमानपत्रे आम्हाला अजून दाद देत नाहीत. युद्ध व तह यांचे विषय संपल्यावर आमच्याकडे लक्ष देतात का पाहू. ब्रिटिश काँग्रेस कमिटी किंचित् आपल्या बाजूला वळू लागली आहे. पण पॉलॉक साहेब मात्र दाद देत नाहीत. पाहून घेऊ.

### ( ५५ ) अहवाल

लंडन २६ मार्च १९१९

उद्या नॅशनल लिबरल क्लबात, २८ तारखेला पॉसिटिव्हिस्ट सोसायटीपुढे, ७ एप्रिलला एसेक्स हॉलमध्ये, ३ मेला ब्रिटन ॲन्ड इंडिया सोसायटीत आणि ९ मेला फेबियन सोसायटीत टिळक भाषणे करणार आहेत. सुधारणा संबंधाने एक तुलनात्मक हस्तपत्रक आम्ही तयार केले आहे. लॉर्ड चेम्सफर्ड राजीनामा देणार व ड्यूक ऑफ नॉर्दंबर्लंड तिकडे जाणार असे म्हणतात पण पक्के नव्हे.

### ( ५६ ) टिळकांचे केळकराना पत्र

लंडन २७ मार्च १९१९

बॅपटिस्टा यानी भेटून आपली मंडळी व बेझंटबाई यांच्यातील मतभेद दूर केला असेलच. आपले होमरूललीगचे शिष्टमंडळ लहानच पण वजनदार आणि एका जीवाभावाचे असले पाहिजे. जमले तर तुम्ही व बॅपटिस्टा दोघेही मिळूनच या. येथे तुम्हा दोघांची मला फार गरज आहे. माझे येथे तुपाच्या डब्यावाचून फार अडत आहे. तरी तो घेऊन या. बाबा याना मी लिहिले आहे की भावे यांजकडे गहाण ठेवलेल्या एक लक्षाच्या सरकारी प्रॉमिसरी नोटा शेकडा

७५ किंवा अधिक रक्कम येईल तर विकून टाका. त्या ७५ च्या भावाने घेतल्या आहेत तेव्हा निदान ७५ ला विकण्याला हरकत नाही. असे केल्याने भावे याना देण्याची व्याजाची रक्कम हलकी होईल. याखेरीज आणखी एक लक्ष रुपये जमवावे लागतील. रौलेट बिलाविरुद्ध तिकडे चाललेली तुमची चळवळ आम्ही इकडे नीट लक्षपूर्वक पहात आहोत. चिरोल केसचा निकाल आपल्याविरुद्ध झाला तथापि त्यामुळे आपले राजकारणातील आसन फारसे डळमळण्याची भीति नाही. म्हणून निकालाविरुद्ध अपील करण्याची कल्पना मी सोडून दिली आहे.

**( ५७ ) टिळकांचे धोंडोपंतास पत्र**

लंडन २७ मार्च १९१९

गव्हर्मेंट प्रॉ. नोटा शेकडा ७५ किंवा वर भाव येत असल्यास ताबडतोब विकून टाकाव्या. अपील करण्यात आता अर्थ नाही असे ठरले आहे. ज्युबिली फंडाचे आपले सर्व पैसे गेले इतकेच नव्हे तर चिरोलचा खर्च देण्याकरिता त्यात आणखीहि भर घालावी लागेल. पैशाची तोंडमिळवणी करणे कठीण आहे. पण मी तिकडे आल्यावर काही तरी व्यवस्था करीन. तूर्त नोटा विकून कर्जाचा बोजा हलका केला पाहिजे. विनाकारण रकमेचे व्याज वाढू देण्यात तरी काय फायदा ?

**( ५८ ) एडगर वॉलेस यांचे टिळकाना पत्र**

लंडन २ एप्रिल १९१९

तुमच्यासंबंधाने जे खरोखर येथील वर्तमानपत्रातून खुलासेवार लिहावयास पाहिजे ते कोणी लिहीत नाही. तुमच्याबद्दल इकडे कोणी लिहितील तर पक्षपातानेच लिहितील. काही तर तुमचे वैरी तुमच्या पक्षाचा द्वेष करणारे. पण तुमची खरी माहिती त्याना नाही. तुमचे खरे वर्णन लिहिले असते तर कोणी असे म्हटले असते की ' टिळक हे गृहस्थ अत्यंत सु-संस्कृत मनाचे आहेत. बोल्शेविझमचे ते कट्टे शत्रू आहेत. सर्व जगभर अंदाधुंदि सुरू असता स्वतःच्या देशाकरिता केवळ सनदशीर साधनानीच ते आज झगडत आहेत.' इकडे एखाद्या अँग्लो इंडियनला जर असे सांगितले की टिळकांच्या स्वराज्ययोजनेत शांतता कायदेकानू लष्करी व्यवस्था वरिष्ठ सरकारच्या हातीच रहावयाची आहेत आणि केवळ वसाहतीच्या पद्धतीचेच स्वराज्य ते मागत आहेत तर त्या गृहस्थाच्या तोंडाला फेस येतो ! आणि आपण सांगतो ते खरेच आहे अशी त्याची खात्री पटविण्याकरिता आणखी पुढे युक्तिवाद करावयास जावे तर त्याला अपस्माराचा झटका येईल की काय अशी भीति वाटू लागते ! तात्पर्य खरी वस्तुस्थिति लोकापुढे मांडण्याला आज पुष्कळ वाव आहे पण साधने नाहीत.

**( ५९ ) टिळकांचे धोंडोपंतास पत्र**

लंडन ३ एप्रिल १९१९

चिरोल केस आपल्यावर उलटली तथापि इतक्यातच येथून हालण्याचा माझा विचार नाही. डेप्युटेशन येण्याची मी वाट पाहात आहे. माझ्या प्रकृति-बद्दल काही काळजी करू नका. यापेक्षा कितीतरी वाईट दिवस आम्ही पाहिले आहेत आणि याचा जर माझ्यावर परिणाम झाला असता तर आज आहे असा मी राहिलोच नसतो !

एक दोन गोष्टी लिहावयास विसरलो. ( १ ) यशवंतराव याना बडोद्यास पाठवून कैफियत दाखल करावी. ( २ ) 'खाल्डियन राष्ट्रे व वेद' या माझ्या लेखाच्या १२ प्रती इकडे पाठवून द्याव्या. माझ्या खोलीत या प्रती आहेत.

**( ६० ) अहवाल**

लंडन ३ एप्रिल १९१९

रौलेट ॲक्ट पास झाल्याची बातमी आली आहे. आता हिंदुस्थानात काय होते पाहावे. एका हेरल्डखेरीज इतर वर्तमानपत्रे यावर काही लिहीत नाहीत. बसू यांचे सुधारणा बिलाला अनुकूल असे भाषण झाले. मिसेस चार्ल्स रॉबर्टस् या अध्यक्ष होत्या. उपवक्त्यात टिळकानी सुधारणा अपुऱ्या आहेत असे प्रतिपादन केले. आम्ही कर्नल वेजवूड स्पूर वगैरे लोकांची पार्लमेंटरी कमिटी केली तर प्रतिपक्षानी बेनेट व रीस या लोकाकडून कमिटी बनविली आहे. असा सवाल जबाब सुरू आहे.

**( ६१ ) अहवाल**

लंडन १० एप्रिल १९१९

ठरल्याप्रमाणे ता. ७ रोजी टिळकांचे व्याख्यान झाले. लॅन्सबरी रुदरफोर्ड वेजवूड यानी टिळकांच्या म्हणण्याला पुष्टि दिली. डॉ. क्लार्क हळूहळू आमच्या बाजूला येऊ लागले आहेत. शांतता परिषदेत भांडणे झाल्याची वदंता आहे. फिलिपाईन्स बेटांचा प्रश्न निघाला होता. प्रेसिडेंट विल्सन या बेटाना स्वातंत्र्य देऊ म्हणतात. मग हिंदुस्थानानेच काय केले?

**( ६२ ) टिळकांचे धोंडोपंतास पत्र**

लंडन १० एप्रिल १९१९

तुमचे पत्र व सुपारीचे पार्सल पोचले. केसच्या निकालाविरुद्ध आम्ही अपील करीत नाही. फंडाची रकम झालेला खर्च फेडण्याकडेच द्यावी लागेल. केसचा निकाल विरुद्ध लागला तरी त्याचा माझ्या प्रकृतीवर यत्किंचित्‌हि परि-णाम झाला नाही. तुम्ही मुळीच काळजी करू नका. त्यामुळे माझ्या कामामध्ये किंवा प्रकृतिमध्ये यत्किंचितहि बदल झाला नाही असे आपल्या सर्व मंडळीना कळवा. डेप्युटेशन येथे केव्हा येते याची मी वाट पाहात आहे.

( ६३ ) जॉन ॲटली यांचे टिळकाना पत्र

लंडन १५ एप्रिल १९१९

तुम्ही पाठविलेली पत्रके पोहोचली. न्यूझीलंडकडे मी एकदम जात आहे. त्यापूर्वी मी होमरूल लीगच्या कचेरीकडे जाईन व त्यांचेकडे काय वाङ्मय आहे ते पाहून घेईन. मी भावनेने होमरूलर आहे. पण आपण उभे रहातो ती भूमि खंबीर असावी अशा मताचा मी आहे. पुढील काही वर्षांत हिंदुस्थानकडे अनेकं लोकांचे लक्ष लागणार असे उघड दिसते. आणि न्यूझीलंडला मी परत गेलो म्हणजे नुसत्या सहानुभूतीचे उद्गार काढून स्वस्थ न बसता हिंदुस्थानाला काही प्रत्यक्ष मदत करिता येईल ती करीन म्हणतो. इकडल्याप्रमाणे बाहेर वसाहतीतहि हिंदुस्थानाबद्दल लोकांचा फार गैरसमज आहे. यश तावडतोब येईल असे नाही पण पुढे आल्याशिवाय रहाणार नाही.

( ६४ ) दादासाहेब करंदीकर यांचे टिळकाना पत्र

सातारा १७ एप्रिल १९१९

बॅपटिस्टा यांचा स्वागतसमारंभ फार चांगला झाला. इकडील सभातून मीहि तुमची व विलायतेची हकीकत थोडथोडी लोकाना सांगितली. शांतता परिषदेकडे लोकांचे डोळे लागले आहेत. प्रे. विल्सनच्या प्रत्येक शब्दाकडे लोकांचे लक्ष असते. रौलेट ॲक्टाविरुद्ध चळवळ चालू आहे. सत्याग्रहाच्या चळवळीपेक्षा ही चळवळ अधिक जोरात आहे. इकडे महर्गता अतिशय वाढली आहे व त्याचाहि परिणाम लोकांच्या मनावर होत आहे.

( ६५ ) अहवाल

लंडन १७ एप्रिल १९१९

हिंदुस्थानात दंगेधोपे झाले त्याच्या बातम्या आल्या आहेत. त्यानी मात्र इकडची पत्रे थोडी जागी झाल्यासारखी दिसतात. बातम्या भयंकर आहेत. पण त्या पुष्कळशा एकतर्फी आहेत. शांतता परिषदेतील भांडण मिटलेसे दिसते. हिंदुस्थानचा प्रश्न निघाला होता की नाही याची काही वार्ता कळत नाही. डॉ. क्लार्क यांच्याप्रमाणे डॉ. रुदरफोर्ड हेहि कमिटीत आता आमच्या बाजूचे बोलू लागले आहेत.

( ६६ ) एच. जी चॅन्सेलर यांचे टिळकाना पत्र

हील्सबरो २२ एप्रिल १९१९

तुमची पत्रके पावली. लिबरल पार्टीपुढे कोणत्या रीतीने तुमचे म्हणणे मांडण्याची संधि घडवून आणावी या विवंचनेत मी आहे. लंडनमध्ये ही व्यवस्था लिओनार्ड फ्रॅंकलीन याजकडे आहे. लिबरल लोकांच्या सभा मोठ्या नसतात.

पण लोक चांगले येतात. नॅशनल फेडरेशनची सभा कधी आहे कळत नाही. त्यांच्याकडे आधी टरावाचे मसुदे पाठवावे लागतील. पोलॉक व कॉटन हे मॉंटेग्यू चेम्सफर्ड योजनेला आधी गुंतून गेले नसतील तर तुम्हाला उपयोगी पडावे. काही झाले तरी सुधारणांचा हप्ता एकदम पुष्कळ मोठा मिळावा असे आम्हाला वाटते.

**( ६७ ) बॅपटिस्टा यांचे टिळकाना पत्र**

मुंबई २३ एप्रिल १९१९

अहमदनगर येथे प्रांतिक परिषद भरणार आहे तिचा अध्यक्ष म्हणून मी लवकरच तिकडे जात आहे. बेझंट बाईनी उलटी उडी मारिली. तिचा अर्थ आम्हाला कळत नाही. त्यांच्या महात्म्यानाच तो कळत असेल. याहून अधिक चांगली प्रेरणा त्यानी बाईना करावी अशी प्रार्थना आहे. स्कटसाहेब इकडे आले आहेत व ते एकदम बेझंटबाईच्या भेटीलाच गेले येथे थांबले नाहीत. काय हेतू आहे कळत नाही.

**( ६८ ) टी. होल्डरनेस यांचे टिळकाना पत्र**

इंडिया ऑफिस लंडन २९ एप्रिल १९१९

शांतता परिषदेला पाठविण्याकरिता तुम्ही अर्ज इकडे धाडला पण तो आम्हाला तिकडे पाठविता येत नाही.

**( ६९ ) टिळकांचे धोंडोपंतास पत्र**

लंडन १ मे १९१९

पर्स फंडापैकी काहीहि रक्कम येथे पाठवू नका किंवा होमरूल करिताहि माझ्या नावाने असे कोणतेच पैसे येऊ नयेत. रक्कम पाठवावयाची असल्यास केळकर याजबरोबर पाठवा पण ती सुद्धा त्यांचे नांवाने असावी माझे नावाने नको.

हिंदुस्थानातील परिस्थिति कठीण होत चालली आहे. पण त्याला इलाज नाही. सगळीकडेच असे होत आहे.

**( ७० ) मिसेस रॅनसम यांचे टिळकाना पत्र**

लंडन २ मे १९१९

तुमचे पत्र वाचून आम्ही काळजीत पडलो आहोत. तुमचे व्याख्यान ऐकण्याची लोकांची इच्छा. ती तुमचा निबंध दुसरा कोणी वाचून कशी भागेल? तुमच्या दाराशी टॅक्सी उभी करून सभेच्या जागी उतरून घेऊन तुम्हाला खुर्चीवर बसवून वर आणू. तुमच्या दुखावलेल्या पायाला कोणताहि त्रास पडणार नाही अशी व्यवस्था ठेवू. तुम्ही व्याख्यान देणार म्हणूनच पुष्कळ लोकानी

आमंत्रणे स्वीकारली आहेत. त्यांची निराशा न व्हावी. तुमचा पाय दुखत असता अशा स्थितीत तुम्ही येऊन व्याख्यान दिले हे लोकाना अधिकच बरे वाटेल.

### ( ७१ ) एडगर वॉलेस यांचे टिळकाना पत्र

लंडन ३ मे १९१९

हेरल्ड पत्राकरिता लिहिण्याचे लेख काही तयार केले आहेत. मी फ्रान्सला जाण्याचा परवाना मिळविला आहे. तेथे गेल्यावर बालफोर आणि जनरल स्मट्स यांच्या मुलाखती पॅरिस येथे घेईन आणि इकडे निघण्यापूर्वी कदाचित् तुम्हाला पत्र लिहीन.

### ( ७२ ) अहवाल

लंडन ८ मे १९१९

हाइडपार्कमध्ये ता. १ रोजी मजूरपक्षाची जंगी सभा झाली. तीत रौलेट ॲक्टाविरुद्ध ठराव मंजूर झाला. एक लाख तरी लोक असावेत. आठ ठिकाणी प्लॅटफॉर्म उभे केले होते. सुमारे दहा हजार हस्तपत्रके वाटली. त्यावर स्पूर स्माइली विलियम्स लॅन्सबरी वगैरे लोकांच्या सह्या होत्या. पडून टिळकांचा पाय मुरगळल्यामुळे ते सभेला जाऊ शकले नाहीत. पूर्ववत् चालू लागण्याला त्याना ८ दिवस लागतील. ३ मेच्या सभेलाहि खूप गर्दी झाली होती. हिंदी लोकापेक्षा इंग्रजच अधिक होते. पाय दुखल्यामुळे टिळकानी भाषण लिहून सभेत वाचण्याकरिता पाठविले होते पण मिसेस रॅनसम यांच्या आग्रहामुळे टिळकाना टॅक्सीत घालून नेले व वर उचलून नेऊन बसविले. तेव्हा टिळकानी तोंडीच भाषण केले. सर विलियम ड्यूक यानी पाच सहा दिवसापूर्वी याच जागी व्याख्यान दिले होते. त्याला उत्तर म्हणून टिळकांचे भाषण झाले. रौलेट ॲक्टावर आणखी एक दोन सभा होणार. समर्थ व के. सी. रॉय हे येथे आले आहेत. त्यानी मॅटेग्यू साहेबांची गाठ घेतली. केळकर पटेल वगैरे मंडळी मुंबईहून निघाल्याची तार आली.

### ( ७३ ) अलाइस हॉल सिंप्सन यांचे टिळकाना पत्र

लंडन १३ मे १९१९

कालच्या सभेनंतर तुम्हाला अनेक पत्रे येतील. मी राजकारणात भाग न घेणारी एक स्त्री आहे. फक्त तुमची एक हितचिंतक आहे म्हणून लिहिते. कालचे तुमचे भाषण फारच चांगले झाले असे मला वाटते. नेहमी इतरांच्या ठिकाणी जी मर्यादा रहात नाही ती तुमच्या भाषणात राहिली हाच त्यातील

विशेष गुण. चळवळ करिताना मनुष्याच्या मनात व्यक्तिशः काही काही विकार प्रबल नसावेत आणि तसे तुमचे मन विकारवश नाही असे दिसून आले. कदाचित तुम्ही ब्राह्मण म्हणून हा गुण तुमच्या अंगी आनुवंशिक व स्वाभाविकच असेल! तुम्हाला इतके दुःख भोगावे लागले असता त्याच्या प्रतिकारबुद्धीची छटा तुमच्या भाषणात आली नाही. तुम्ही दूरदर्शी आहा हेहि दिसून आले. म्हणून यापुढे माझ्या हातून तुमच्या देशाकरिता जे मला करिता येईल ते मी आनंदाने करीन. आमची संस्थाच मुळी पूर्व व पश्चिम या दोन दिशेकडील देशात स्नेह वृद्धिंगत करण्याकरिता आहे व मीहि एक उच्च ध्येयवादी आहे.

### ( ७४ ) टिळकांचे धोंडोपंतास पत्र

लंडन १५ मे १९१९

माझा दुखावलेला गुडघा सुधारत आहे. अगदी चांगले नाही तरी थोडे चालता येते. पण त्यामुळे माझे काम अडले नाही हे तुम्ही पाहताच. बाहेर जावयाचे असले तर घरातून नामजोशी यांच्या खांद्यावरून जाऊन टॅक्सीत बसतो. आणि व्याख्यानाला जातो. व एकदा खुर्चीवर बसलो की माझे काम सुरू होते. कारण माझ्या पायाला इजा असली तरी माझी जीभ शाबूतच आहे. प्रकृतीची कसलीही काळजी करू नका.

### ( ७५ ) मंडलीक यांचे नामजोशी याना पत्र

मुंबई १६ मे १९१९

सत्याग्रहाची चळवळ तूर्त बंद आहे. लोक म्हणतात की ' गांधींच्या प्रेमातील काही वजनदार लोक त्यांच्या हल्लीच्या धोरणावर नाखूष आहेत. ' कारण कळत नाही. उमर सोभानी हे नवीन स्वदेशी सभा काढू इच्छितात व महाराष्ट्रीय लोकांची मदत हवी म्हणतात. सय्यद हुसेन यांची व्याख्याने होणार आहेत. पण अशा भाषणानी लोकांची मने अधिक खवळतात म्हणून ती होऊ नयेत असा गांधी यानी अभिप्राय दिला आहे. गांधी यांचे आजचे धोरण तर सर्व चळवळ थांबविण्याचे आहे. पण लोकाना हे मान्य दिसत नाही. 'मुंबई क्रॉनिकल' तूर्त बंद झाला म्हणून 'यंग इंडिया' हे पत्र आठवड्यातून प्रथम दोन वेळ व नंतर दैनिक काढावे असा विचार चालू आहे. ललित बंधु हे लोकसेवक लवकरच काढू म्हणतात. आणि पुण्यास लोकसंग्रहहि पुढील महिन्यापासून निघणार आहे. दा. सा. यंदे यांच्यापासून राष्ट्रीय पक्षाकरिता ' इंदुप्रकाश ' विकत घ्यावा अशी डॉ. साठे यांची सूचना आहे. पण ते कितपत घडेल हे सांगवत नाही. ता. २६ एप्रिल रोजी हॉर्निमन याना उचलून हद्दपार केले. बेझंटबाईनी नवीन पक्ष बनविला पण त्यात थिआसफिस्ट लोकाशिवाय कोणीच जात नाही असे दिसते.

### ( ७६ ) नामजोशी यांचे धोंडोपंतास पत्र

लंडन २२ मे १९१९

गेल्या आठवडयात तुम्हा मंडळींची पत्रे आली नाहीत. हे असे कसे झाले ? टिळकाना आता थोडथोडे चालता येऊ लागले आहे. तरी पूर्वीप्रमाणे ते चालू लागण्यास १५ दिवस तरी लागतील. तथापि तुम्ही काळजी करण्याचे कारण नाही. केळकर लवकरच इकडे येणार. तेव्हा दादाना हल्लीसारखे अगदी एकल-कोंडे वाटणार नाही.

### ( ७७ ) एडगर वॅलेस यांचे टिळकाना पत्र

लंडन २३ मे १९१९

फ्रान्समध्ये दोन आठवडे खूप काम करून परत आलो. अधिकाऱ्याशिवाय इतर लोकांच्याहि तेथे गाठी घेतल्या. एका गृहस्थाकडून राजकीय विषयावर आगाखान यांच्याशी संभाषण करविले. मी जवळच होतो. पण मी कोण आहे हे मात्र त्याना कळू दिले नाही. क्लेमेन्सो याना तुम्ही पाठविलेले पत्र त्याना पोहोचले इतके मला पक्के कळले. पण ते हल्ली फ्रान्सच्या बाहेर कोणत्याहि गोष्टीत लक्ष घालीत नाहीत म्हणून आयर्लंड हिंदुस्थान स्वयंनिर्णय याविषयी ते काही बोलत नाहीत. लॉइड जॉर्ज याना मात्र मॅंटेग्यू साहेबानी पुढे आणलेल्या सुधारणा अंमलात आणण्याची आवश्यकता दिसते. म्हणून ते मॅंटेग्यू साहेबाना आधार देतील. पॅरीसमधील तुमच्या काही स्नेह्यानी लॉइड जार्ज यांची गाठ घेतली. ते म्हणतात संभाषणात आमचे समाधान झाले. पण मला त्याबद्दल शंका वाटते. कारण तुमच्या होमरूल लीगच्या कमिटीचा सगळा कार्यक्रम मंजूर होणार नाही. अफगाण प्रकरणामुळे हिंदी लोकाना थोडे खूप ठेवावे असे अधिकाऱ्यांच्या मनात येत आहे ही गोष्ट खरी. आगाखान यांचे बोलणे थोडे प्रतिगामी स्वरूपाचे दिसले. सुधारणा हव्या पण जहाल पक्ष काय करील कोणाला ठाऊक अशी त्याना शंका आली. प्रेसिडेंट विल्सन यांजकडे तुम्ही पत्रव्यवहार केला त्याचा काही सुपरिणाम झाला असे दिसते. पॅरिसमधील राजकीय पक्षातील लोकाना तुमची व तुमच्या कार्याची माहिती आहे असे दिसते. तात्पर्य मॅंटेग्यु बिल पुढे येण्याच्या सुमाराला मतप्रसार जोराने करावयास पाहिजे असे दिसते.

### ( ७८ ) एलिजाबेथ आर्नोल्ड यांचे टिळकाना पत्र

लंडन २४ मे १९१९

मी आपणाला पुढील आठवड्यात भेटावयाला येईन. आपला पाय दुखावला असे ऐकिले. ‘ धर्माबरोबर कर्म ’ उभे राहिले असे मी म्हणते. आपले तत्त्वाविवेचक संभाषण ऐकिले म्हणजे पहिला पर्जन्य पडल्याने पृथ्वीला बरे वाटते

तसे माझ्या मनाला वाटेल. आपण विलायतेत पुष्कळ दिवस रहावे अशी प्रार्थना आहे. ' हाथ जोड करके. '

(७९) अहवाल

लंडन २६ मे १९१९

केळकर वगैरे मंडळी येऊन पोचली. बंदरावर त्याना आणण्याकरिता आमची मंडळी गेली होती. मजूरपक्षाच्या परराष्ट्रीय कमिटीने टिळकाना बोलावून त्यांच्याशी चर्चा केली. कॉंग्रेसच्या मागणीला एकंदर मजूरपक्षाने संमति द्यावी असा प्रयत्न सुरू आहे. जूनच्या पहिल्या आठवड्यात मॉंटेग्यू बिल पुढे आणणार व मग सिलेक्ट कमिटी नेमणार. अनेक शिष्टमंडळांचे एकीकरण झाले तर फार चांगले होईल. दासबाबू येत नाहीत हे पाहून वाईट वाटते.

(८०) अहवाल

लंडन २९ मे १९१९

पटेल व केळकर यानी ब्रिटिश कॉंग्रेस कमिटीशी बोलणे सुरू केले आहे. बिलापूर्वी अगदी वेळेवर शिष्टमंडळ येऊन पोचले. रौलेट बिलाविरुद्ध आणखी एक सभा झाली. हॉलफर्ड नाईट वेजवूड मॅक्डोनाल्ड मॅक्नील यांची भाषणे झाली. त्यानी मॉंटेग्यू साहेबांचा समाचार घेतला. हे निषेधप्रदर्शन इंग्रजाकडूनच व्हावे असे ठरल्यामुळे हिंदी लोक बोलले नाहीत. मुसलमान लोकांचीहि एक सभा झाली पण ती तुर्कस्थानच्या फाळणीबद्दल. टिळक सभेला हजर होते. नॅशनल लिबरल क्लबात एका मिशनऱ्याने भाषण करून हिंदुस्थानात जातिभेद असल्यामुळे स्वराज्य देऊ नये असे सांगितले. पण सर जॉन रीस यानीच त्याचा परस्पर समाचार घेतला. कॉंग्रेसच्या शिष्टमंडळाजवळ पैसा नाही. आमच्या होमरूल लीगकडे मदत मागतात! पण "तुम्ही कॉंग्रेसच्या अधिकाऱ्याकडे लिहा पैसा मागवा नच आला तर आम्ही उसना देऊ" असे होमरूललीगने सांगितले.

(८१) बातमीपत्र

ता. २९ मे १९१९

राष्ट्रीय सभेने अधिक मागण्या मागितल्या तर त्यापासून मॉंटेग्यु साहेबांचे बिलाला धोका येईल आणि पुष्कळांच्या पाठीमागे लागून आयते मिळत होते ते थोडेहि गमावले अशी हिंदुस्थानची हास्यजनक स्थिति होईल हाच काय तो नेमस्तांचा राष्ट्रीय सभेच्या ठरावावर मुख्य आक्षेप आहे हा कितपत खरा आहे याचा लो. टिळकानी पूर्वीच अंदाज बांधला होता व आम्ही आल्यापासून कसून तलास काढला. त्यात असेच निष्पन्न झाले की केवळ बिलापेक्षा अधिक मागितल्याने बिलाला धोका येईल हे म्हणणे बिलकुल खरे नाही. मि. मॉंटेग्यु यानी मंत्रिपद

स्वीकारताना इतर मंत्रिमंडळीचे व मुख्य प्रधानांचे असे आश्वासन घेतले आहे की ' मी सुधारणांचे जे बिल आणीन ते तुम्ही मान्य केले पाहिजे. एरवी हिंदुस्थानच्या कारभाराची मी जबाबदारी पत्करणार नाही.' मॅटेग्युसाहेबांच्या पक्षाला हल्ली पार्लमेंटमध्ये भरभक्कम पाठबळ आहे व ते करतील ते आज होईल. अद्यापि संयुक्त मंत्रिमंडळाची पद्धत अंमलात असल्यामुळे विरोधी म्हणून जो पक्ष—Opposition--नावाला आहे तोहि स्नेहगर्भ असाच आहे. आज पार्लमेंटमध्ये तिसरा पक्ष असा मुळीच नाही. काही तिस्मारखान किंवा केवळ एकांडे शिलेदार आहेत ते रॅडिकल आहेत. रीस किंवा बेनेट ( टाइम्स ऑफ इंडियाचे माजी संपादक ) यासारखे कॉंझरव्हेटिव्ह आहेत पण त्यांच्या आंगी सामर्थ्य नाही. व रीससाहेबानी तर मॅटेग्यु साहेबांचा पक्ष अगदी उघड उघड स्वीकारला आहे. मजूर पक्षच काय तो मंत्रिमंडळाचा प्रतिपक्ष. पण तो तर म्हणतो हिंदुस्थान चतकोर भाकरी का मागतो ? सगळीच एकदम का मागत नाही ? त्याना हा हा म्हणून उलट आम्हालाच संभाळून धरावे लागते व हिंदुस्थानची स्थिति अशी आहे असे सांगून सर्व होमरूल एकदम मागणे शक्य नाही असे समजून सांगावे लागते. तात्पर्य राष्ट्रीय सभेची मागणी केल्यास बिलास धोका नाही एवढेच नव्हे तर डॉ. क्लार्क विनोदाने म्हणाले त्याप्रमाणे " लार्ड सिडेनहॅमच्या पक्षाला वाटेल त्याने जाऊन मिळावे. तुमच्या विरोधामुळे काही होत नाही. तुम्ही बिल हाणून पाडावयाचे म्हटले तरी पडणारे नाही. तुम्ही नको म्हणाला तरी मॅटेग्यु साहेबानी योजलेल्या सुधारणा तुमच्या गळयात बांधिल्याशिवाय ते सोडणार नाहीत ! " हल्ली पार्लमेंटची स्थितीच अशी काही आहे की प्रधानमंडळ म्हणेल ते होईल. मात्र ही स्थिति फार दिवस टिकणार नाही. "

### ( ८२ ) लॅन्सबरी यांचे टिळकाना पत्र

लंडन ३० मे १९१९

तुम्हाला भेटून कितीतरी दिवस झाले. गेले ६ आठवडे म्हणजे हेरल्ड हे दैनिक पत्र केल्यापासून मी नुसता कामाच्या भोवऱ्यात सापडलो होतो आणि पायावर उभा आहे की डोक्यावर उभा आहे हे कळत नव्हते. पार्लमेंट लवकरच सुटी घेणार. बहुतेक महत्त्वाचे काम संपले. पोलीस यूनियन बिलाकरिता काही लोक परत येतील. पण त्या थोड्या वेळात सभा करिता येणार नाही. बेझंटबाई व जॉन स्कर हे पुढील आठवड्यात येतील तेव्हा सर्व मिळून आपण काही तरी चांगले धोरण ठरवू. हेरल्डकरिता एखादा लेख पाठवाल काय ?

### ( ८३ ) अहवाल

लंडन ५ जून १९१९

पटेल अद्यापि आमचेकडेच आहेत. थोडे दिवसात नॅशनल लिबरल क्लबात जातील. ब्रिटिश कॉंग्रेस कमिटीचे मत विरुद्ध असेल तर तिने निदान गप्प

बसावे, असे सुचविण्यात आले आहे. बेझंटबाईच्या लीगने आमच्या लीगला चहाला बोलाविले होते. निरनिराळ्या डेप्युटेशनच्या लोकाना मॉटेग्यू यानी जेवणास बोलाविले होते. गुरुवारी बिल पुढे आणले. आज त्याचे दुसरे वाचन होत आहे. हाऊस ऑफ लॉर्ड्सने दुसरे वाचन केले तर सिलेक्ट कमिटी नेमली जाईल. सिडनहॅम साहेब बहुधा विरुद्ध बोलतील. टिळक व केळकर ३१ तारखेस केंब्रिज येथे होते. मजलीसची सभा झाली.

(८४) बातमीपत्र

लंडन ५ जून १९१९

टिळक कालच (ता. ४ जून रोजी) केंब्रिज येथे जाऊन आले. केंब्रिज येथे सुमारे ८०।९० हिंदी विद्यार्थी हिंदुस्थानच्या सर्व भागातून अभ्यासाकरिता आले आहेत. हिंदी मजलीस नावाची संस्था केंब्रीज येथे आज काही वर्षे अस्तित्वात असल्याचे केसरीचे वाचकास माहीत असेलच. या सभेत व्याख्याने वादविवाद मोकळ्या मनाने होतात. या सभेपुढे काल टिळकांचे व्याख्यान झाले. हिंदी विद्यार्थ्यांखेरीज काही थोडे युरोपियन विद्यार्थीहि मुद्दाम आले होते. देशाच्या सद्यःस्थितीचे वर्णन करून टिळकानी आपल्या तरुण श्रोत्यास असा रोखठोक प्रश्न केला की "तुम्ही उच्च प्रतीचे शिक्षण मिळवून व स्वतंत्रतेच्या हवेत पिकणारे विचार बरोबर घेऊन हिंदुस्थानात जाणार. पण केवळ स्वार्थसाधनपर न बसता देशकार्याला वाहून घ्यावयाचे असा निश्चय तुम्हापैकी कितीजणानी केला आहे?" याला उत्तरे देताना काही विद्यार्थ्यानी आपल्या पोरबुद्धीमुळे व अज्ञानामुळे बराच हंशा पिकविला. तथापि पुष्कळांच्या मनावर प्रश्नाचे खरे मर्म ठसून त्यानी आपण तुमच्या उपदेशाप्रमाणे खास वागणार आहो असे सांगितले. एका तरतरीत ब्राह्मण मुलाने त्याना आश्वासन दिले की मी सिव्हिल सर्विस परीक्षा पास होणार पण नोकरीत शिरणार नाही असा निश्चय तुमच्या उदाहरणावरून यापूर्वीच केला आहे. ईश्वर या मुलाला आपला निश्चय पाळण्यास सामर्थ्य देवो. कारण जाणूनबुजून स्वार्थत्याग कशाला म्हणतात याचे ते एक उदाहरण होईल. असो. लो० टिळक हे ऑक्सफर्ड येथील मजलसीच्या निमंत्रणावरून येत्या १५ तारखेस तेथे जातील.

(८५) अहवाल

लंडन १२ जून १९१९

ता. ११ जून १९१९ रोजी काँग्रेसचे शिष्टमंडळ मॉटेग्यू साहेबांच्या भेटीला गेले. लॉर्ड सिंह सर विलियम ड्यूक चार्लस रॉबर्टस हेहि तेथे होते. काँग्रेसची आज्ञा मॉटेग्यू साहेबांच्या योजनेत सुधारणा करावी व त्याहून अधिक मागावी अशी होती. मॉटेग्यू ह्याना याचे वैमनस्य वाटले. काँग्रेसची मागणी आपल्या

योजनेला धरून असेल तर पार्लमेंटमधील प्रतिगामी लोकांचा विरोध टळेल असे त्याना वाटत असावे. नेमस्त लोकानी त्यांच्या योजनेला मान्यता दिली होती. पण काँग्रेसचीहि मान्यता त्याना हवी होती असे दिसले व या मुलाखतीत शिष्ट-मंडळाचे मन वळविण्याचा थोडासा प्रयत्नहि झाला. ही मुलाखत सुमारे अर्धा तास चालू होती. त्यात खालीलप्रमाणे संभाषण झाले.

खापर्डे—एकंदर शिष्टमंडळात सात असामी आहेत पण अद्याप तीन गृहस्थ यावयाचे आहेत. दिवाण माधवराव पटेल केळकर व मी येवढेच आज आपल्या भेटीला आलो.

माँटेग्यू—राष्ट्रीय सभेचे ठराव मी वाचले. सुधारणा निराशाजनक व असमाधानकारक आहेत असे त्यात म्हटले आहे. पण त्यावर मी टीका करीत नाही. ती वक्तृत्वाची भाषा आहे. नक्की मुद्द्यासंबंधाने आपण बोलू.

दिवाण माधवराव—नुसत्या हल्लीच्या बिलावरून सुधारणांची कल्पना चांगलीशी येत नाही कारण नियम अद्यापि होणारच आहेत आणि त्यावर तर फार गोष्टी अवलंबून.

माँटेग्यू—पण ते तसे केव्हाहि होणारच. हिंदुस्थानसंबंधी पूर्वी वेळोवेळी कायदे झाले तेव्हाहि असेच घडले.

रॉबर्टस—हेच खरे आहे.

ड्यूक—नक्की नियम आताच सर्व कसे करता येतील ?

माँटेग्यू—तरी पण मी पहिल्या भाषणात सांगितलेच आहे की बिल अखेर पास होण्यापूर्वी नियमातील मुद्द्यांचे टिपण प्रसिद्ध होईल. शिवाय याविषयी सरकारचे काही खलिते प्रसिद्ध झालेच आहेत.

केळकर—पण अनेक मुद्द्यावर त्या खलित्यातच मतभेद दिसून येतो. म्हणून नियमासंबंधाने सरकारचे निश्चित धोरण काय आहे हे समजल्याशिवाय सिलेक्ट कमिटीपुढील साक्षीदाराना कोणत्या मुद्द्यावर कशी टीका करता येणार ?

दिवाण माधवराव—सिलेक्ट कमिटीपुढे स्त्रियांची मतदारी जातवार प्रतिनिधींची निवड वगैरे प्रश्न येऊ देणार की नाही ?

माँटेग्यू—फ्रँचाइझ कमिटीच्या काही सूचना मलाहि पसंत नाहीत. जातवार प्रतिनिधींचे तत्त्व मला स्वतःला मुळीच संमत नाही. पण हिंदी पुढाऱ्यानीच ते मान्य केले आहे त्याला आम्ही काय करावे ? पण एखाद्या साक्षीदाराला ते तत्त्व अमान्य असल्यास त्याने तो मुद्दा कमिटीपुढे खुशाल मांडावा. स्त्रियाना मतदारीचा हक्क द्यावा की नाही असल्या गोष्टी प्रत्यक्ष बिलात घालणे सोईचे नाही. कारण असल्या किरकोळ गोष्टीकरिता खुद्द कायदा बदलावा लागणार.

केळकर—पुष्कळशा नियमांचे धोरण आधी ठरलेलेच बरे. कारण मोर्ले-मिंटो-सुधारणा झाल्या त्यावेळी बिलात मजकूर थोडा होता व हिंदुस्थानसरकारने नियम केले ते लोकाना मान्य झाले नाहीत. दहा वर्षांपूर्वीचीच ही गोष्ट आहे.

लॉर्ड सिंह—पुष्कळ लोकाना असेच म्हणताना मीहि ऐकले आहे. माझ्या मते या तक्रारीत फारसा अर्थ नाही. स्वतः मीच ते नियम बहुतेक केले. मला कोणी नक्की उदाहरणे सांगेल तर बरे होईल.

पटेल—कौन्सिलात प्रश्न विचारणे व ठराव मांडणे यासंबंधाने ग्राह्याग्राह्य ठरविण्याचा फार मोठा अधिकार नियमानी सरकारास दिला आहे.

लॉर्ड सिंह—पण नियम कितीहि अघळपघळ केले तरी शेवटी या बाबतीत गव्हर्नर गव्हर्नर-जनरल याना निर्णयाधिकार द्यावाच लागतो.

खापर्डे—तसेच कौन्सिलच्या निवडणुकीला उभे राहणाऱ्या उमेदवाराना अपात्र ठरविण्याविषयी नियमानी सरकारास फारच मोठे अधिकार दिले आहेत. खुद्द केळकरांचेच उदाहरण आपल्या डोळ्यापुढे आहे.

लॉर्ड सिंह—ते खरे. पण तशी उदाहरणे फारच थोडी दाखविता येतील.

मॉटेग्यू—द्विदलराज्यपद्धति काँग्रेसला मान्य नाही तर वरिष्ठ सरकारच्या कारभारात ती काँग्रेसला कशी चालते? ती काँग्रेसने का मागितली?

खापर्डे:—द्विदलपद्धति राष्ट्रीय सभेला सर्वस्वी अमान्य होती असे म्हणता येत नाही. प्रथमपासून दिवाणी मुलकी खाती आणि लष्कर आरमार परराष्ट्रीय संबंध वगैरे खाती यात काँग्रेसने केव्हाही फरक मानला आहे. काँग्रेसचे म्हणणे इतकेच की द्विदलपद्धतीचे तत्त्व मान्य केले तरी हिंदुस्थानसरकारच्या कारभारात ती चालेल खाली नको. म्हणून ही आमची मागणी सुसंगत आहे.

मॉटेग्यू—पण तूर्त प्रांतिक स्वातंत्र्य देणे शक्य नाही. यात हिंदी लोक अपात्र असा अर्थ नाही. म्हणणारे काहीहि म्हणोत पण प्रांतिक कारभारात पूर्ण स्वातंत्र्य देण्यापूर्वी काही खात्यांचा अधिकार लोकानी जबाबदारीने चांगला चालवून दाखविला पाहिजे. एका बाजूला लॉर्ड सिडनहॅमसारखे लोक म्हणतात की प्रांतिक कारभारात देखील एक काडीचाहि अधिक अधिकार देऊ नये आणि काँग्रेस तर पूर्ण प्रांतिक स्वातंत्र्य मागते! मग आम्ही कोणाचे ऐकावे? म्हणून दोहोच्या मधलाच मार्ग स्वीकारला व द्विदल पद्धतीची योजना केली.

पटेल—याशिवाय तिसराहि एक मार्ग आहे तो असा की सुधारलेले पुढारलेले प्रांत पाहून त्यानाच तेवढे पूर्ण स्वातंत्र्य द्यावे. इतर प्रांताना देऊ नये. पण काँग्रेसचे असे म्हणणे नाही हेहि मी लगेच सांगून टाकतो. आपण तिसरा मार्ग नाही असे म्हणाला म्हणून सहज सुचला तो सुचविला.

मॉटेग्यू—द्विदल पद्धति अव्यवहार्य आहे असे दिवाणसाहेबानाहि वाटते की काय?

दिवाण माधवराव—होय. मलाहि ती पद्धति गैर वाटते. संस्थानाच्या कारभारात द्विदलपद्धति नाही आणि जातवार प्रतिनिधींची पद्धत न स्वीकारताहि सर्व जातींचा समावेश आमच्या कौन्सिलातून होऊ शकतो.

मॉंटेग्यू—पण देशी संस्थानाच्या कारभारात जबाबदारीचे तत्त्व कोठे आहे ?

केळकर—पण तुमच्या या योजनेत तरी ते कोठे आहे ? प्रधान हा गव्हर्नर नेमणार. आणि कौन्सिलने त्याच्याविरुद्ध निंदाव्यंजक ठराव मंजूर केला तरी गव्हर्नराने त्याला काढून टाकलाच पाहिजे असे कोठे आहे ?

मॉंटेग्यू—तुम्ही म्हणता ते बरोबर आहे. या दृष्टीने जबाबदारीची मर्यादा अधिक व्यापक करणे योग्यहि होईल. पण असले कलम प्रत्यक्ष कायद्यातच घातले तर त्याचा परिणाम काय होईल ? एखादा निंदाव्यंजक ठराव चुकून फसगगतीने मंजूर झाला तर प्रधान कामावरून दूरच होईल. पण इंग्लंडात तरी काय ? प्रधानमंडळ राजीनामा देईलच असे नाही. या बाबतीत लॉर्ड रोजबरी आणि मि. ॲस्क्विथ यांची अगदी परस्पर विरुद्ध अशी दोन उदाहरणे म्हणून दाखविता येतात. तात्पर्य पार्लमेंटातहि जबाबदारी ही अशीच आहे. अमुक पक्षातील प्रधान नेमला जावा आणि निंदेचा ठराव मंजूर होताच त्याने राजिनामा द्यावा ह्या गोष्टी हळूहळू कालांतराने कायद्याशिवाय रूढीने इकडल्याप्रमाणे हिंदुस्थानात आपोआप प्रस्थापित होतील.

केळकर—इंग्लंड आणि हिंदुस्थान यातील हे साम्य आपण दाखविलेत पण विरोध मात्र दाखविला नाहीत. इंग्लंडात व वसाहतीत प्रधानमंडळाने राजिनामा न दिला तर त्याचे काम एक दिवसहि पुढे चालणार नाही. पैशाची सर्व सत्ता लोकप्रतिनिधींच्याच हाती आहे. पण हिंदुस्थानात आज तसे नाही. तात्पर्य प्रधान हा मतदाराना किंवा कायदेकौंसिलला 'जबाबदार' नाही. प्रधान हे जर जबाबदार म्हणावयाचे तर गव्हर्नरचे एक्झिक्युटिव्ह कौंसिलर्सहि जबाबदार का म्हणू नयेत ?

मॉंटेग्यू—तोडून दिलेल्या खात्यात कायदेकौंसिलला पैशाअडक्याची सत्ता आहे म्हणून प्रधान जबाबदार ठरतो.

पटेल—पण समजा कौंसिलाने दिवाणाचा पगार नामंजूर केला आणि गव्हर्नराने आपल्या अधिकारात तो पुनः प्रविष्ट केला तर ? म्हणून दिवाण हा जबाबदार नाही हेच खरे.

लॉर्ड सिंह—शांतता व सुराज्य हे पाहिजे तर गव्हर्नराला तो अधिकार देणे प्राप्तच आहे.

मॉंटेग्यू—पण उद्या सर्व खाती सोपीव केली तरी शिक्षणमंत्री व पोलिसमंत्री हे पैशाकरिता भांडणार नाहीत कशावरून ?

यानंतर पुनः एकवार द्विदल पद्धतीची चर्चा झाली. शेवटी लॉर्ड सिंह म्हणाले " एकूण तात्पर्य हेच की नाही ? की एकीकडून लॉर्ड सिडनहॅम हे बिलाला विरोध करणार व दुसरीकडून तुम्ही ? दोघांचे हेतू वेगळे पण फलश्रुति एकच की नाही ? "

केळकर—लॉर्ड सिडनहॅम व आम्ही हे सारखेच असे म्हणणे बरोबर नाही. कारण त्याना तुमचे बिल मुळातच नको. आम्हाला बिल हवे पण थोडे सुधारून हवे. द्विदलपद्धति कॉंग्रेसनेहि मान्य केली आहे पण ती वरिष्ठ कारभारात लावावी खाली नको इतकेच काय ते आमचे म्हणणे. हेच लॉर्ड सिंह व्हाइसरायचे एक्झिक्युटिव्ह कौंसिलर होते आणि ते त्या कामाला योग्य ठरले. पण त्यांचेच खाते उद्या राखीव न ठेवता सोपीव केले तर त्या जबाबदारीला मात्र लॉर्ड सिंह हे एकदम अपात्र कसे ठरतात ?

शेवटी लॉर्ड सिंह यानी हळूच असे दर्शविले की काही म्हणा पण यंदा हे बिल निकालात न निघाले तर ते फिरून पुढच्या वर्षी आणावे लागेल. आणि अवघ्या एका वर्षात काय काय तरी उलथा पालथी होतात ! याचा अर्थ 'बिल असमाधानकारक असेल पण आहे तसे ते मान्य करा झाले.'

## ( ८६ ) अहवाल

लंडन १२ जून १९१९

बिलाचे दुसरे वाचन संपले. मूळ रिपोर्टपेक्षाहि बिलात दिवाणांच्या जबाबदारीचे मान कमी केले आहे. बिल जसे आहे तसेच जर नेमस्ताना मान्य तर त्यांचे शिष्टमंडळ आले तरी कशाला ? अर्थात् त्यांनाहि ते सुधारले पाहिजे असे म्हणावे लागणार. खापर्डे येऊन पोचले. बेझंटबाई आल्या. टिळक त्यांच्या स्वागतार्थ स्टेशनावर गेले होते. काल कॉंग्रेसचे शिष्टमंडळ मॉंटेग्यू साहेबांच्या भेटीला गेले होते. बोलण्यात बरे दिसले. कॉंग्रेसने आपले म्हणणे मांडण्याचा त्याना विशेष राग येईल असे वाटत नाही.

## ( ८७ ) डॉ. हर्डीकर यांचे टिळकाना पत्र

न्यूयॉर्क १३ जून १९१९

'इंडियन लेबर यूनियन ऑफ अमेरिका' या नावाची एक संस्था नुकतीच स्थापण्यात आली असून न्यूयॉर्कमधील हिंदुमुसलमान कामकऱ्यांची एकी झाली आहे. प्रत्येक रविवारी सभा भरते. रोज रात्रौ या लोकाना इंग्रजी शिकविण्याकरिता आमच्या कचेरीत वर्ग भरतो. सोबत पाठविलेल्या पत्रकाच्या दहा हजार प्रती काढिल्या आहेत. येथील कॉंग्रेसच्या प्रत्येक सभासदाला एकेक प्रत पाठवीत आहो. लंडनमध्ये हल्ली पुष्कळ हिंदी गृहस्थ आले आहेत असे समजते. तरी त्यापैकी इकडे कोणी येऊन जाणार नाहीत काय ? लालाजींची इच्छा पार्लमेंटरी कमिटीपुढे साक्ष देण्याची आहे. त्यानी तारा केल्या आहेत पण उत्तरे नाहीत.

## ( ८८ ) एच. मेसन यांचे टिळकाना पत्र

लंडन १६ जून १९१९

होरेशो बॉटमली यांचा 'पीपल्स लीग' हा दिवसेदिवस अधिक महत्त्व पावत आहे. त्याचा उद्देश ज्या देशात नोकरशाहीचा जुलूम माजला आहे त्यातील लोकाना स्वातंत्र्य मिळवून देण्याचा आहे. तरी आपल्या चळवळीसंबंधाची थोडक्यात हकीकत संगतवार मजकडे लिहून पाठवावी. स्वतः मी हिंदुस्थान व ब्रह्मदेश येथे पाच वर्षे होतो आणि राष्ट्रसंघाचे यश तो हिंदुस्थानला कसे वागवितो याच्यावरच अवलंबून आहे असे मला वाटते.

## ( ८९ ) अहवाल

लंडन १९ जून १९१९

तीन्ही शिष्टमंडळानी मिळून एकच मागणी करावी अशी खटपट जोराची सुरू आहे. ही गोष्ट बेझंटबाईना अर्धवट तरी पटली आहे. पटेल यांच्या लेखांचा शिरकाव 'इंडिया' पत्रात आता कोठे झाला. पण संपादक अजून दाद देत नाहीत. हे पत्र हाती न येईल तर दोनतीन महिन्यापुरते कॉंग्रेसचे म्हणून एक छोटेसे पत्र काढावे असा विचार आहे. टिळक व केळकर ऑक्सफर्ड येथे जाऊन आले. केंब्रिजप्रमाणेच तेथेहि भाषण झाले. ऑक्सफर्ड येथे यावेळी विद्यार्थी थोडे होते. यंदाचे हिंदी रॅंग्लर न्यू पूना कॉलेजचे शाहा हे आहेत. त्यांची गाठ पडली होती. सिलेक्ट कमिटीचे काम २६ जूनपासून सुरू होईल असे म्हणतात.

## ( ९० ) बातमीपत्र

लंडन १९ जून १९१९

पूर्वी ठरल्याप्रमाणे लो. टिळक मी व रा. जोशी गेल्या रविवारी ऑक्सफर्ड येथे गेलो होतो. दोन प्रहरी शहर व काही प्रमुख कॉलेजे पाहून झाल्यावर रात्री आठ वाजता ' मजलसी ' पुढे टिळकांचे व्याख्यान झाले. केंब्रिजप्रमाणे येथेहि त्यानी ' विद्यार्थ्यांचा भावी आयुष्यक्रम ' या विषयावर प्रथम सव्वा तास व मागून उत्तरादाखल भाषण केले. निरनिराळ्या प्रांतातील हिंदी विद्यार्थी, तसेच एक इंग्रज व एक अमेरिकन विद्यार्थी बोलले. केंब्रिजपेक्षा येथे अधिक जोराचा वाद झाला. सत्याग्रहाच्याहीपेक्षा खालच्या पायरीच्या सौम्यातील सौम्य अशा निवळ जनताधर्मापासून जालीमातील जालीमापर्यंत सर्व उपायांचे तात्त्विक समर्थन करणारा एकना एक विद्यार्थी होताच. पण विद्यार्थिदशेतील ध्येये कितीही उज्ज्वल असली तरी पुढे छोट्यामोठ्या संसारात पडलेल्या विद्यार्थ्यास येणाऱ्या प्रत्यक्ष अडचणी किती तरी दुस्तर असतात; याकरिता कोणत्याहि देशातील जनतेस त्या काळी पचेल व मानवेल असे, पण लोकमताच्या वरच्या एक पायरीचे,

ध्येय मनात ठेवून जेणेकरून ही एक पायरी जनता वर चढेल, आणि त्या मार्गाचा उघड अंगिकार करून ते ध्येय अमलात आणण्यास आपणास मदत करील व आपल्या पाठोपाठ येईल अशा रीतीने वागणे हे खरे शहाणपणाचे होय, असे जगाचा अनुभव व इतिहास मुत्सद्यांना शिकवतो ही गोष्ट टिळकांनी आपल्या तरुण श्रोत्यास नीट समजावून सांगितली. तात्त्विक विचारसरणीनेच ठरवावयास आपण बसलो तर ध्येये काय अनंत आहेत; पण कोणाहि देशभक्ताची तारीफ केवळ ध्येयावरून जग करीत नसून त्या ध्येयाकरिता तो स्वतः किती उद्योग व स्वार्थत्याग करितो यावरून करीत असते. देशाप्रीत्यर्थ म्हणून राजकीय, धार्मिक, सामाजिक, औद्योगिक यापैकी वाटेल ते ध्येय आपल्या स्वभावास व परिस्थितीस अनुकूल म्हणून मनुष्याने पत्करले तरी त्याचे श्रेय सारखेच आहे. पण आपल्या आवडत्या ध्येयाकरिता आपले आयुष्य खर्च करण्यास तयार होणे व आपल्या कार्यक्रमात प्राप्त होणारी दुःखे बिनतक्रार सोसणे यातच खरा पुरुषार्थ आहे, एरव्ही ध्येयाची कोरडी चर्चा करीत बसणे हा नुसता चावटपणा होय! आजची ध्येये व मार्ग कोणास चुकीचे वाटले तर त्याने नवीन शोधून काढावे. नव्या पिढीच्या यशस्वी उद्योगाने आपल्या ज्या चुका उघडकीस येतील त्या कबूल करण्यास जुन्या पिढीच्या पुढाऱ्यास केव्हाहि आनंदच वाटेल. एकाच आयुष्यक्रमात एक ध्येय सोडून दुसरे अधिक बरे वाटले तर तेहि पत्करण्यास हरकत नाही. मात्र तात्त्विक ध्येयाच्या वायफळ चिकित्सेने डोके न पिकविता, मध्यम वय प्रवेशाच्या वेळी योग्य वाटेल ते ध्येय पसंत करावे, आणि मग त्या ध्येयाकरिता जन्मभर स्वतःस वाहून घेऊन कोणत्याही उद्योगाचे फळ देशाला वाहीन असा निश्चय मनाशी करून विद्यार्थ्यांनी युनिव्हर्सिटीतून बाहेर पडावे. विशेषतः ऑक्सफर्ड–केंब्रिजसारख्या पहिल्या प्रतीच्या विद्यालयात ठेवून, हजारो रुपये खर्चून, ज्या विद्यार्थ्यास आईबापानी किंवा पालकानी उत्तमातले उत्तम शिक्षण दिले त्यांच्यावर ही जबाबदारी विशेष आहे; वगैरे गोष्टींचा उपदेश टिळकानी श्रोत्यास केला.

(९१) अहवाल

लंडन २६ जून १९१९

कमिटी पुढील साक्षीची तयारी सुरू आहे. शिष्टमंडळांची एकी होत नाही. लॅन्सबरी वेजवूड यानी सर्वांना एकत्र बोलावले होते. साफ साफ बोलणी झाली. टिळक व बेझंटबाई यांची खाजगी भेट झाली. बाई मजूर परिषदेला साऊथपोर्ट येथे जात आहेत. तेथे विषय संपाचा आहे. हिंदुस्थानात त्या संपाविरुद्ध बोलतात. तेव्हा साऊथपोर्ट येथे काय बोलतात ते पहावे. नेमस्तानी स्टेट सेक्रेटरीशी मिळून बिलाला संमति द्यावी अशाकरिता नॅशनल लिबरल क्लबमध्ये सभा झाली. पण मॉंटेग्यू व सिंह हे पॅरिसला गेल्यामुळे चार्लस रॉबर्ट्स यांचे

व्याख्यान झाले व छोटे कॉटन हे अध्यक्ष होते. सभेत बखेडा होईल म्हणून तिकिटे देऊनच लोकाना आत सोडले होते. पटेल व केळकर हे गेले होते. टिळकाकरिता तिकिट मागितले नाही व टिळक गेले नाहीत.

( ९२ ) अहवाल

लंडन २ जुलै १९१९

हाऊस ऑफ लॉर्ड्समध्ये लॉर्ड कर्झन यांचे सूचनेवरून बिलाची सिलेक्ट कमिटी नेमली गेली. कर्झनसाहेब अगदी औपचारिक बोलले. संडे अॅडल्टस् स्कूलमध्ये टिळकांचे ता. २७ रोजी भाषण झाले. पटेल यानी आपले ऑफिस ब्रिटिश कॉंग्रेस कमिटीच्या ऑफिसात अखेर नेऊन बसविले. सिलेक्ट कमिटीवर स्पूर हे एकटेच मजूरपक्षातर्फे आहेत. लॉर्ड सिडनहॅम हेहि आहेत. साऊथपोर्ट येथील सभेत राजकारणात संपांचा उपयोग करावा असे ठरले.

( ९३ ) बातमीपत्र

लंडन ३ जुलई १९१९

लंडनचा या आठवड्यातील मुख्य विषय म्हटला म्हणजे तह. जर्मनी तहावर सही करणार ही गोष्ट निश्चितप्राय होती. तथापि अखेरपर्यंत काय होते काय नाही याविषयी इंग्रजाना धागधुग वाटे. शेवटी शनिवारी दुपारी सव्वातीन वाजता तहावर सह्या झाल्याची बातमी येथे साडेतीन वाजता प्रसिद्ध झाली त्याबरोबर विजयोत्सव सुरू झाला. सरकारी बडा उत्सव अजून पुढे व्हावयाचाच आहे पण लोकानी छोटा उत्सव ताबडतोब उरकून घेतला. शहरचा मुख्य चव्हाटा ट्राफलगार स्क्वेअर या ठिकाणी हजारो रिकामटेकडे लोक पॅरिसहून बातमी येण्याची वाट पहात आगाऊच बसले होते. त्यांतच दुकाने कचेऱ्या बंद होऊन बाहेर पडलेल्या लोकांची भर पडली. गाड्या व मोटारी यांची वाहतुक अशक्यच झाली. चोहोकडे तोफाचे प्रचंड आवाज व त्यांतच फटाक्यांचे बार होऊ लागले. वर आकाशात विमाने घारीसारखी फिरू लागली. लहान मोठी निशाणे डोक्यातील टोप्यापासून तो उंच इमारतीच्या शिखरापर्यंत लागली. इतर सर्व बाजार बंद पडून निशाणांची खरेदी–विक्री हाच मुख्य व्यापार होऊन बसला. भररस्त्यावर स्त्रीपुरुष उड्या मारू लागले. एखाद्या जत्रेतल्याप्रमाणे नाच गाणे बजावणे खेळ तमाशे मद्यपान व भामटेगिरी याना ऊत आला. हौशी लोकांच्या थव्यानी राजवाडा वेढून गेला व राजाराणी सज्जात येऊन लोकाना दर्शन देऊ लागली. रात्री अनेक विमानानी हजारो फुटावरून लखलखीत दीपकिरण पाडून राजवाडा पुष्कळ वेळ पाजळून धरला होता. इंग्लंडच्या ऐहिक वैभवाचा कळस झाला असे चर्चिल साहेबानी नुकतेच बोलून दाखविले ते खरेच आहे. जगातल्या सांधीकोपऱ्यात लक्ष्मी अजून दडून बसली असेल तिला तेथून खेचून आपल्या देशात आणण्यास

या विजयाने इंग्रजाना मार्ग मोकळा झाला. हिंदुस्थानच्या वतीने बिकानेरच्या महाराजानी तहावर सही करून या बोडणात हात ओला करून घेतला. पण हिंद-देवीच्या कपाळावर स्वराज्याचा टिळा मात्र आताच लागण्याचे चिन्ह दिसत नाही! बारशाच्या समारंभात वांझोटीकडे पाळण्याला चार झोके देण्याचे काम येणे यात फारसे औचित्य नाही; पण श्रीमंताच्या घरचे सोन्याचे जड पाळणे हाल-वायाला गरीब शेजारणीहि उपयोगी पडतात! त्याना चोळीचा एक खण दिला म्हणजे पुरतो!

### (९४) निरंजन पाल यांचे टिळकाना पत्र

लंडन ४ जुलै १९१९

मी इतके दिवस तुम्हाला येऊन का भेटलो नाही याची अनेक कारणे आहेत. पण ती सांगत बसत नाही. आपण माझ्या वडिलांचे स्नेही म्हणून मला आश्रय देतच आहा. परंतु स्वावलंबन मला अधिक आवडते म्हणून मी त्या उद्योगात अधिक असतो. मला इंग्लंडच्या बाहेर जावयाचे होते पण पासपोर्ट मिळाला नाही. तरीहि मी अधिकाऱ्यांची नजर चुकवून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत होतो. पण ती गोष्ट उघडकीला आली व मला ग्रीमथ येथे तीन महिने अटकेत रहावे लागले. मी सिनेमा कंपनी संबंधाची एक योजना केली आहे. त्याचे भांड-वल मला हिंदुस्थानातून मिळेल तर हवे आहे. भरतभूमि पूर्वी कशी होती याची कल्पना इकडील लोकाना आणून देणे फार सोईचे व उचित आहे. बुद्ध-चरित्र सिनेमाच्या द्वारे दाखविले तर ते फार लोकप्रिय होईल असे लोक सांगतात. असा एखादा चित्रपट तयार करण्याला प्रथम खर्च ३०,००० पौंड येईल पण नफा एक लक्ष पौंड होईल असे म्हणतात. म्हणून अशा कामी परकी भांडवल-वाल्यांची मदत घेणे प्राप्त झाले तर सहजच वाईट वाटणार. अमेरिकन फिल्म-वाला थॉर्नटन हिंदुस्थानात जात आहे त्याचेबरोबर बुद्धचरित्र व रामायण यांचे संबंधाने काही चित्रपट तयार करावा म्हणून मीहि जाणार आहे. आपणाला ही सर्व हकीकत कळविणे हे माझे कर्तव्य समजून कळविली आहे आणि लवकरच समक्ष येऊन भेटतो.

### (९५) टिळकांचे धोंडोपंतास पत्र

लंडन ९ जुलै १९१९

नेने याजकडे प्रॉमिसरी नोटा होमरूललीगतर्फे ठेवण्यास द्याव्या. त्या आमच्या खाजगी नव्हत. मग कोणी ठेवल्या तरी चालतील. भावे यांचे सर्व पैसे द्यावे. प्रॉ. नोटी विकणे त्या पुढे भाव आल्यावर विकू. आताच विकण्याची जरूरी नाही. मला पूर्वी पाठवलेले दोन हजार पौंड मी होमरूलचे कामी खर्च करणार आहे. व काही रक्कम खर्च केलीहि आहे. करिता आता पुन्हा पर्स फंडापैकी

दोन हजार पौंड पाठवावे. हुंडणावळीचा फायदा होईल व रकमेचीहि जरूर पडणार आहे. विशेषतः चिरोलच्या खर्चाकरिता रक्कम भरावी लागेल. रक्कम केळकर यांचे नावे नॅशनल बँकेकडे पाठवावी. माझे नावे पाठवू नये. किंवा दुसऱ्या बँके कडेहि पाठवू नये. सोबत एक कान्फिडेन्शल सर्क्युलर पाठविले आहे ते खाडिलकर भट गोखले करंदीकर यास वाचण्यास द्यावे. ते दुसऱ्या कोणास दाखवू नये. फक्त वाचण्यास सांगावे व वाचून झाल्यावर आपले पाशी ठेवावे. नक्कल बाहेर जाऊ देऊ नये. तात्या केळकर यास ते येथे दाखविले आहे. व त्यांचेबरोबर वाटाघाटहि केली आहे. केसरी मराठ्याकरिता नवीन मशीन घेण्याचा उद्योग सुरू आहे. चौकशी करीत आहे.

### (९६) एलिझाबेथ आर्नोल्ड यांचे टिळकाना पत्र

लंडन १० जुलै १९१९

या आठवड्यात मला नवीन पाठ देण्याचा दिवस कोणता हे आपण कळविले नाही. मला सवड आहे. तरी कळवावे. मी महात्माजीकरिता प्रत तयार करीत असता माझ्या हातून काही हस्तदोष घडले त्याबद्दल मला फार वाईट वाटते. 'इष्टान् भोगान् हिं वो देवा दास्यन्ते यज्ञभाविताः' ही ओळ मी लिहीत आहे व लिहून आणून दाखवीन. महात्माजी इकडून गेल्यावर मला पाठ कोण देणार ही कल्पना मनात येऊन फार खेद वाटतो.

### (९७) अहवाल

लंडन १० जुलै १९१९

या आठवड्यात नॅशनल इं. असोसिएशनची चहापार्टी झाली. प्रसंग खाजगी स्वरूपाचा होता. पूर्वीच्या आठवड्यात बेझन्टबाई एडिंबरो व ग्लासगो येथे व्याख्याने देण्यास गेल्या होत्या त्या परत आल्या. आता तूर्त बाहेरगावी जाऊन व्याख्याने देण्याचे होत नाही. सिलेक्ट कमिटीला सुरवात लवकरच होईल. त्या करिता आम्ही सर्वजण कैफियतीची टांचणे तयार करीत आहोत. दिल्ली कॉंग्रेसच्या ठरावाप्रमाणे बादशहाना शिष्टमंडळाने येथे मानपत्र द्यावे असा विचार चालू आहे. पण परवानगीची नड बहुधा येईल. ता. २०–२२ रोजी तहाच्या नावाने मोठा उत्सव समारंभ होणार आहे. पार्लमेंटमध्ये अंतस्थ गडबडी सुरू आहेत. आणि नव्या निवडणुकी होण्याचे ठरले तर बिल पुढच्या वर्षावर जाईल म्हणून कमिटीचे काम ऑगष्टातच उरकून घेणार म्हणतात. लजपतराय यांचे अमेरिकेहून पत्र आले. त्यांचे काम बरे चालले आहे.

(९८) अहवाल

लंडन १५ जुलै १९१९

कमिटीपुढे मांडण्याच्या कैफियती तयार झाल्या. या आठवड्यातील सगळी चळवळ घरबैठीच झाली. कॉंग्रेस कैफियत विस्तृत आहे. परिशिष्टात दिल्ली कॉंग्रेसचे ठराव दिले आहेत. बेझन्टबाईंच्या कैफियतीत बिल कलमवार घेऊन कॉंग्रेस नेमस्त होमरूललीग वगैरेंचे त्यावरील म्हणणे तुलना पद्धतीने दिले आहे. आमच्या लीगच्या कैफियतीत कॉंग्रेसच्या योजनेला धरूनच पण एक वेगळी योजना दिली आहे. काल कमिटीचे काम सुरू झाले. सर जेम्स मेस्टन यांची साक्ष प्रथम झाली. आम्ही लघुलेखक नेमणार होतो पण सरकारी लघुलेखकानी घेतलेल्या रिपोर्टाची एक एक छापील प्रत दर दुसऱ्या दिवशी सकाळी प्रत्येक शिष्टमंडळाला देण्याचे सरकारने कबूल केले आहे. तेव्हा आमचे आयतेच काम झाले. तथापि पटेल व केळकर हे रोज कमिटीला हजर राहून टिपणे घेतील व केळकर त्यांचा सारांश इंडिया पत्राच्या अंकात देत जातील. प्रत्येक होमरूल लीगने एक साक्षीदार पाठवावा असे ठरले आहे. ब्रि. कॉं. कमिटीशी वाटाघाट केली तिला फळ आले. मि. पोलाक 'इंडिया' पत्राच्या संपादकाचा राजीनामा देणार व त्यांचे जागी केळकराना नेमणार. नेमस्त लोक स्वतःचे एक पत्र येथे काढावे म्हणतात. त्या कामाला पोलॉक आता रिकामेच आहेत! ता. १३ रोजी बेझन्टबाईनी लॅंगहॅम हॉटेलमध्ये एक भाषण केले. सामोपचाराचेच होते पण हिंदुस्थानात विरोध झाला याची त्याना आठवण आहे. म्हणून पंजाब प्रकरणात डेप्युटेशन पाठवू त्यात त्या आमच्या बरोबर जाण्यास तयार नाहीत. आपल्या हद्दपारीविरुद्ध प्रीव्हि कौंसिलकडे अपील करण्याचा हॉर्निमन यांचा विचार आहे. खापर्डे व दिवाणसाहेब निवडक लोकांच्या गाठी घेत असतात.

(९९) अहवाल

लंडन २४ जुलै १९१९

इंडिया पत्र आपल्या हाती आले. ब्रिटिश कमिटीच्या घटनेचा विचार सुरू आहे. कमिटीची तडफ जिरली. सिलेक्ट कमिटीची 'हकीकत' इंडिया पत्रात आढळेल. पंजाब प्रकरणात नेमस्तहि आम्हाबरोबर जाऊ इच्छित नाहीत असे आता समजते. प्रधानमंडळात खळबळ आहे. आयर्लंड व कोळशाच्या खाणी हे प्रश्न जोरावले आहेत. सिलेक्ट कमिटीने आपली प्रश्नावली तयार केली आहे. तिची उत्तरे भरून पाठवीत आहो.

(१००) बातमीपत्र

लंडन ३० जुलै १९१९

कॅप्टन ऑर्मसबी गोर यानी बेझंटबाईना शेवटी एक प्रश्न सहज म्हणून टाकला. ते म्हणाले " तुमच्या मागे कितीसे लोक आहेत ? तुमची होमरूल लीग

ही कोणती ? " या प्रश्नास बाईनी उत्तर दिले ते असे—" टिळकांचा स्वराज्य-संघ व माझा संघ मूळपासूनच वेगवेगळे होते. कारण आम्हा उभतांचा व्यक्तिशः द्वेष करणारांचा निरनिराळ्या संघात समावेश करिता यावा. मी हिंदी लोकांची स्थिति सुधारण्याची खटपट अनेक बाजूनी करिते. इतर लोक ही गोष्ट माझ्याइतकी करीत नाहीत. म्हणून व्यक्तिशः मला अनुसरणारे फार व म्हणून माझ्या चळवळीत माझे व्यक्तित्व दिसून येते. मद्रास–संघाची मी संस्थापक. पण गांधींच्या चळवळीमुळे मी अप्रिय झाले. मुंबईच्या रंगेल संघवाल्यानी मला शिष्टमंडळात न धाडण्याचे ठरविले व मला तर यावयाचे होते. म्हणून त्याकरिता मी माझा नवा संघ निर्माण केला.

## ( १०१ ) बातमीपत्र

लंडन १० जुलै १९१९

राष्ट्रीय सभेचे खास शिष्टमंडळ येथे येऊन तिच्या ठरावानुसार चळवळ करीत असता, तिच्या पैशाने चालविलेल्या 'इंडिया' वर्तमानपत्राने तिच्या ठरावाविरुद्ध व धोरणाविरुद्ध लिहीत असावे एवढेच नव्हे तर तिच्याविरुद्ध उठलेल्या नेमस्त शिष्टमंडळाचा उघड किंवा प्रच्छन्नपणाने पाठपुरावा करीत रहावे हा अप्रयोजकपणाचा कळस होय. किंबहुना इंडिया पत्राचे हे वर्तन पाहून ' मदीयेन भक्तपरिव्ययेन पारलौकिको भर्ता अन्विष्यते !' या मृच्छकटिकातील वाक्याचे स्मरण होते. असो. ब्रिटिश काँग्रेस कमिटीचे आम्हाशी वागण्याचे धोरण सामोपचाराचे आहे हे मी मागे लिहिलेच होते. व कमिटीच्या ऑफिसची जागाहि तिने आमच्या ऑफिसकरिता वापरण्यास दिली. यामुळे 'इंडिया'चे संपादक मि. पोलक यानी आम्हास असे कळविले की तुमच्यापैकी सहीनिशी कोणी लेख वेळेवर दिल्यास तो आपण 'इंडिया'त घालू. पण आपल्याच वर्तमानपत्रात आपण परक्याप्रमाणे लेख सहीवर द्यावा आणि संपादकानी त्यावर मालकीहक्काने टीका करावी ही गोष्ट हास्यास्पद वाटून आम्ही मि. पोलक यानी दिलेल्या सवलतीचा फारसा उपयोग केला नाही. शेवटी थोडे दिवस वाट पाहून आम्ही 'इंडिया' पत्राच्या स्थानिक चालक ( डायरेक्टर ) मंडळास पत्र लिहिले. तेव्हा त्यानी असा ठराव केला की ' इंडिया पत्राने दिल्ली येथील राष्ट्रीय सभेच्या ठरावानुसारच लिहिले पाहिजे. ' हा ठराव हाती येताच संपादकांच्या तब्येतीची चाचणी पहाण्याकरिता आम्ही काही मजकूर ताबडतोब मि. पोलक यांच्याकडे पाठविला पण त्याना तो पसंत पडला नाही. पण पोलाकसाहेब हे काही 'इंडिया' पत्राचे मालक नव्हते. त्याना डायरेक्टरांचा हुकूम अमान्य करण्याचा काय अधिकार ? अर्थात् त्याना केवळ आपलेच धोरण चालवावयाचे तर संपादकाच्या जागेचा राजीनामा देण्याखेरीज गत्यंतर नाही. व त्याप्रमाणे ते आपला राजीनामा डॉ. क्लार्क यांच्याकडे धाडणार

आहेत असे समजते. तसे झाल्यास डेप्युटेशनच्या मंडळीस इंडिया पत्र आपल्या हाती घेऊन चालवावे लागेल व त्यास आम्ही एका पायावर तयार आहो. कॉंग्रेसच्या सत्तेचे येऊन जाऊन एक वर्तमानपत्र. ते कोणत्याहि कारणाने हाती न राहिल्यास आम्हास तात्पुरते स्वतंत्र वर्तमानपत्र काढावे लागणार ! पण बहुधा हा प्रसंग 'इंडिया' च्या डायरेक्टर मंडळीच्या समजूतदारपणाने टळावा असे वाटते. पोलाकसाहेबानी सहा आठवडे तरी गोता देऊन घेतला. पुढे काय होते पहावे.

### ( १०२ ) माधवराव बोडस यांचे टिळकाना पत्र

मुंबई १९ जुलै १९१९

तुमच्या ६४ व्या वाढदिवसाबद्दल तुमचे अभिनंदन करतो. या व पुढच्या मेलबोटीने बहुधा तुमचेकडे खंडोगणती अभिनंदनाची पत्रे येथील. येथे तुमच्या अनुयायीगणानी तुमच्या नावाने भिक्षांदेही करण्याचा सपाटा चालविला आहे. यवतमाळच्या बाबा परांजप्यानी कसले तरी तुमचे एक भिकारडे चित्र छापून ते एक रुपयास विकण्याची क्लृप्ति काढली आहे. पैसे उकळण्याकरिता तुमच्या अनुयायानी जी देशभर धामधूम चालविली आहे त्याबद्दल इकडे लोक काय काय टीका करितात हे ऐकण्यास तुम्ही येथे नाही हे एका परीने बरे आहे. रामाने माकडांच्या सहाय्याने लंका जिंकण्याचा पराक्रम केला त्याप्रमाणे तुम्हाला वाटले असेल की या महामूर्ख व गाढव अनुयायाना हाताशी धरून आपण स्वराज्य हस्तगत करू. स्वराज्य तर दूरच आहे म्हणा. पण राष्ट्रीय पक्षाची अब्रू व कीर्ति या अनुयायानी धुळीस मिळविण्याचा तूर्त उद्योग चालविला आहे इतके मात्र खरे. गेल्या पाच वर्षांत मिसेस बेझंट गांधी व टिळक हे पुढारी उदयास आले. पण आता लोक म्हणतात त्यांच्यात काही जीव नाही. कारण बिझांट देशद्रोही ठरली. गांधींच्यात धैर्य नाही. आणि मुलाना काही तरी इष्टेट उरावी म्हणून तुम्ही हा दारोदार भीक मागण्याचा उद्योग आरंभला ! असे लोक बोलतात. यात तुमच्या आजपर्यंतच्या स्वार्थत्यागाची असेल नसेल ती कीर्ति मातीला मिळणारसे वाटते. लंकाविजयानंतर वानरसैन्याचे जू जसे रामचंद्राला झुगारून देता आले नाही तशीच स्थिति इकडे आल्यावर तुमचीहि होणार !

विलायतेत सर्व पक्षांची एकी होण्याचा योग नाही हे वाचून खेद वाटला. सकृद्दर्शनी असे दिसते की तिकडे परक्यांच्या समोर देखील येथील घरची पक्षभेदाची भांडणे तुम्ही विसरण्यास तयार नाही. नेमस्ताना काय हवे ते करू द्या. तुम्ही आपला स्वतंत्र कार्यक्रम का आखीत नाही ?

### ( १०३ ) टिळकांचे धोंडोपंतास पत्र

लंडन २४ जुलै १९१९

माझ्या प्रकृतिसंबंधी खोट्यानाट्या बातम्या उठल्या आहेत त्यावर मुळीच विश्वास ठेऊ नका. कोणी काय हेतूने या उठवल्या असतील कोणास ठाऊक ?

सध्याची आपली आर्थिक परिस्थिति फार धोक्याची झाली आहे म्हणून सावधगिरीने वागा.

### ( १०४ ) फिलिप स्नोडन यांचे केळकराना पत्र

लंडन २४ जुलै १९१९

कमिटीपुढे रॅम्से मॅक्डोनल्ड यानी साक्ष द्यावी म्हणून तुम्ही लिहिले या सूचनेबद्दल आभारी आहो. पण मॅक्डोनल्ड यांचे म्हणणे असे की मि. स्पूर यानी कमिटीच्या अध्यक्षाशी प्रथम बोलून नंतर त्याना विनंति करावी. स्पूर व अध्यक्ष यांचे बोलणे झाल्यावर आमच्या कौंसिलकडून मॅक्डोनाल्ड याना विनंति करू. या आठवड्यात मॅक्डोनल्ड हे बाहेरगावी जाणार आहेत हीहि एक अडचण आहेच.

### ( १०५ ) बातमीपत्र

लंडन २४ जुलै १९१९

या आठवड्यापासून ' इंडिया ' पत्र कॉंग्रेसच्या पक्षाचे झाले. आता त्याच्याविषयी पैशाची कायमची तरतूद व संपादकीय व्यवस्था लवकरच करावी लागेल. 'इंडिया'पत्राचा संपादक हिंदी असावा ही कल्पना जुनी बऱ्याच दिवसांची आहे. यापुढे तरी ती कल्पना फलद्रूप होते का पहावे. येथील ब्रिटिश कॉंग्रेस-कमिटी नियमबद्ध नाही. हे मी मागील पत्रात लिहिलेच होते. ही गोष्ट खुद्द ब्रिटिश कमिटीच्या लक्षात येऊन या आठवड्यात तिची घटना कशी असावी याविषयी डेप्युटेशनची पोटकमिटी व ब्रि. कॉं. कमिटीची पोटकमिटी यानी एकत्र बसून चर्चा केली असून लवकरच हा विषय कमिटीपुढे मांडण्यात येईल व तिच्या संमतीने घटना कायम झाल्यास त्याप्रमाणे येत्या डिसेंबरात राष्ट्रीय सभेपुढे ती घटना मंजूर करण्यास ठेवण्यात येईल. 'इंडिया' पत्रासंबंधाने मि. पोलाक यांच्या खटपटीने पुनः उलटे पालटे होते की काय असे वाटत होते. पण झाले हे अयोग्य झाले येवढे पत्राच्या रूपाने डायरेक्टरापुढे मांडून ते स्वस्थ बसले असे वाटते.

हिंदुस्थानात ' इंग्लिशमन ' पत्राने टिळकांच्या प्रकृतीसंबंधाने निराधार विपरीत बातमी पसरून फारच गोंधळ उडवून दिला असे दिसते. वास्तविक टिळक हिंडते फिरते असता व सभास जात असता येथील कोणा बातमीदाराने झाले तरी असली बातमी तिकडे कशी पाठवावी हे कळत नाही. टिळकांबरोबर डॉ. नायर यांच्या आजाराची जी बातमी त्याच बातमीदाराने पाठविली ती मात्र खरी होती. कारण डॉ. नायर काळजाच्या विकाराने बरेच आजारी होते व या आठवड्यात ते वारलेहि. त्यांचा परदेशात एकाएकी असा अंत झाला हे शोचनीय होय. असो. पण टिळकांच्या बातमीसंबंधाने यत्किंचितहि आधार नव्हता. अर्थात् ता. २४ जूनच्या केसरीतील या विषयावरील स्फुट वाचून सर्व मंडळीना खूप करमणूक झाली. टिळक हे कोणत्या ' ब्रॉडस्टेअर्स ' गावी मेंदूच्या विकाराने

आजारी होते याचा आम्ही कसून शोध चालविला आहे व शोध लागल्यास तुम्हास कळवू! 'ब्रॉडस्टेअर्स' या इंग्रजी शब्दाचा अर्थ रुंद जिना असा होतो. जिना रुंद असलेला तर अधिकच चांगला. त्यावरून पडण्याचे काय कारण ? या कार्यकारण विसंगतीच्या खुलाशाचा आमचा शोध चालू आहे.

### ( १०६ ) बर्नार्ड हॉटन यांचे टिळकाना पत्र

लंडन २८ जुलै १९१९

मी जॉइंट कमिटीपुढे साक्ष देण्याला तयार आहे. त्यात मला त्रास कसला व श्रम तरी कसले ? उलट तो मला सन्मानच वाटेल. हिंदुस्थानला जरूर ते राजकीय स्वातंत्र्य मिळताच प्रगतीच्या मार्गाने ते ताबडतोब पुढे जाईल आणि चालू सुधारणावरहि आपली छाप पाडल्याशिवाय राहणार नाही अशी माझी समजूत आहे. तूर्त दिवस वाईट आहेत खरे. हल्लीचे अधिकारी वाईट आहेत. तथापि इंडिया कौंसिलातील लोक त्यातल्यात्यात बरे आहेत म्हणून काही आशा वाटते.

### ( १०७ ) अहवाल

लंडन ३१ जुलै १९१९

सुरेंद्र बाबू रामस्वामी अय्यर बेझंटबाई यांच्या साक्षी झाल्या. कॉंग्रेसच्या मागणीशी आमचा मतभेद असलाच तर तो फार थोडा आहे असे तिघानीहि सांगितले. स्पूर यांच्या प्रश्नावरून सुरेंद्र बाबू म्हणाले की कलकत्ता कॉंग्रेसने सुचविल्याप्रमाणे स्वराज्यदानाला वेळेची काही तरी मर्यादा असावी. ब्रिटिश कमिटीची घटना तुम्ही आता प्रसिद्ध करण्यास हरकत नाही. बेझंटबाईची साक्ष होऊन त्या मोकळ्या झाल्यामुळे त्यानी आपली व्याख्यानमाला सुरू केली आहे. त्या आपापल्यातील वाद पुढे आणीत नाहीत आणि भाषणेहि फार परिणामकारक होतात. कॅक्स्टन हॉलमध्ये २९ जुलै रोजी पार्टी झाली. निरनिराळ्या वक्त्यानी भाषणे केली. त्याच दिवशी संध्याकाळी लेबर पार्टीच्या पार्लमेंटरी सभासदांची सभा झाली. टिळक खापर्डे पटेल यानी भाषणे केली. हाइंडमन यानी अध्यक्ष या नात्याने भाषण केले. दुसरे दिवशी अशीच एक सभा वेजवुड यांच्या निमंत्रणावरून भरली होती.

### ( १०८ ) टिळकांचे धोंडोपंतास पत्र

लंडन ३१ जुलै १९१९

मेंदूमधील रक्तस्रावाच्या विकाराने मी आजारी आहे अशी खोटी बातमी तुम्हाला कोणी कळविली कोणास ठाऊक ! मी कशानेहि आजारी नाही, फक्त डावा पाय थोडा दुखत आहे. बाकी माझी प्रकृति हिंदुस्थानातल्यापेक्षाहि चांगली आहे.

गोखले यास तार पाठविली आहे. यापुढे पर्सफंड जमा करण्याचे काम एकदम तहकूब करावे. विनाकारण आपला भार लोकावर का टाकावा ?

(१०९) बातमीपत्र

लंडन ३१ जुलै १९१९

हिंदी स्वराज्यसंघातर्फे साक्ष द्यावयाची ती टिळक देणार असून कमिटीच्या प्रश्नांची उत्तरे त्यानी कमिटीकडे रवाना केली आहेत. त्यांची साक्ष बहुधा येत्या आठवड्यात होईल. परवा सायंकाळी टिळकाना मॉंटेग्यूसाहेबानी इंडियाऑफिस-मध्ये भेटण्यास बोलाविले होते. उभयतांचे संभाषण अर्धा तास झाले. त्यात पंजा-बातील स्थिति सुधारणांचे बिल राष्ट्रीय सभेच्या मागण्या वगैरे विषय आले होते. अर्थात् कोण काय बोलले याची नक्की माहिती नाही. तथापि पंजाबसबंधाने पुढील आठवड्यापर्यंत काही तरी निश्चित सरकारी धोरण ठरून जाहीर होईल असा अदमास आहे. आणि पुढील आठवड्यात मॉंटेग्यूसाहेबाशी टिळकांची फिरून एक वेळ गाठ पडेल असेहि वाटते. चालू आठवड्यात आम्ही जुने घर सोडून दुसऱ्या एका बिऱ्हाडी राहावयास जात आहो. आमचा नवा पत्ता "नं. ६० टालबटरोड बेजवॉटर डब्ल्यू २" असा आहे.

(११०) अहवाल

लंडन ७ ऑगस्ट १९१९

आम्ही टॉलबट रोडमध्ये दीपचंद जव्हेरी यांचे घरी राहावयास गेलो. डॉ. वेलकर व प्रधान हे २६ ऑगष्टला निघणार म्हणतात. पण इकडे तर कमिटीचे काम तोंपर्यंत संपूनहि जाईल. मग ते एरवीच येत असतील तर कोणास ठाऊक! पटेल दिवाणसाहेब व टिळक यांच्या साक्षी वेगवेगळ्या वेळी झाल्या. दिवाण-साहेबानी प्रांतिक स्वातंत्र्याची मागणी करून देशी संस्थानातील कारभाराचा दाखला दिला. उलट तपासणीत दिवाणसाहेबापेक्षा पटेल अधिक टिकले. टिळ-कांची उलट तपासणी कमिटीने केली नाही. मिसेस नायडू यांचीहि उलट तपा-सणी केली नाही. पंजाब प्रकरणाची चौकशी करण्याकरिता कमिटी नेमण्याचा विचार स्टेट सेक्रेटरी करीत आहेत. कदाचित् पंजाबात शिक्षा झालेल्या लोकाना सरसकट माफी देतील असे म्हणतात. लेबरपार्टीने पार्लमेंटरी मेजवानी दिली. त्यांच्या आमच्या काही काही लोकानी भाषणे केली. ब्रि. कॉं. कमिटीच्या घटने-संबंधाने स्वतः डॉ. क्लार्क यानीच आता अनुकूल लेख इंडिया पत्रात लिहिला आहे तो पाहा. पर्सफंडाच्या वर्गण्या आता थांबवा. अमृतसरच्या रा. सभेचे अध्यक्ष कोणी व्हावे याच्याविषयी कारस्थाने सुरू आहेत. म्हणून सूचना दिली आहे. लक्षात ठेवा. स्वतः टिळकाबद्दल प्रश्नच नाही. कारण ते कदाचित राष्ट्रीय सभेपर्यंत परतहि जाऊ शकणार नाहीत.

(१११) बातमीपत्र

लंडन ७ आगष्ट १९१९

ह्यानंतर लो. टिळक यांची साक्ष झाली. यासंबंधाने थोडी प्रास्ताविक हकीकत सांगणे जरूर आहे. स्वराज्यसंघातर्फे साक्षी देण्यास राष्ट्रीय सभेच्या डेप्यु-

टेशनप्रमाणे संघाचेहि सर्व सभासद म्हणजे टिळक खापर्डे व केळकर तिघेहि तयार आहेत, तिघांच्याहि साक्षी घेण्यात याव्या, व तिघांच्या नावे कमिटीचे प्रश्न पाठविण्यात यावे, असे कमिटीच्या चिटणिसास कळविण्यात आले होते. पण दर डेप्युटेशनागणिक होता होईतो एकच साक्षीदार घ्यावयाचा असे कमिटीने ठरविले आहे. सबब एकाच गृहस्थाचे नाव द्या असे उलट लिहून आल्यावरून अर्थात् टिळक हेच संघाचे एक साक्षीदार असे चिटणिसास लिहून गेले. तेव्हा टिळकांची साक्ष घ्यावयाची की नाही हा प्रश्न कमिटीपुढे अध्यक्षानी मांडला. कमिटीतला वादविवाद अर्थात् गुप्त होता. पण अशाहि गुप्त खलबताचे अनुरणनात्मक ध्वनि भिंतीतून बाहेर पडत असतात. त्यावरून असे समजते की टिळकांची साक्षच घेऊ नये असे म्हणणारे बहुमत कमिटीत होते. तथापि ती का घेऊ नये या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मात्र या बहुमतवाल्यास सुचेना ! तेव्हा नाइलाज म्हणून टिळकांची साक्ष घेण्याचे ठरून टिळकाकडे प्रश्नांची यादी पाठविण्यात आली. व त्या प्रश्नांची उत्तरे टिळकानी लिहून पाठविली त्यावरून टिळकाना काल बुधवारी सकाळी साक्षीस बोलाविले. रीतीप्रमाणे अध्यक्षानी टिळकाना प्रश्नोत्तराखेरीज तुम्हाला आणखी काही सांगावयाचे असल्यास सांगा असे विचारल्यावरून त्यानी सुमारे दहा मुख्य मुद्यावर सुसंगत सुव्यवस्थितपणे अवांतर किंवा अधिक उणा एकहि शब्द न बोलता राष्ट्रीय सभेची स्वराज्ययोजना कमिटीस सांगितली. प्रश्नोत्तराचे टिपण जे त्यानी प्रथम पाठविले होते त्याला धरून पण त्याची सूत्ररूपाने एकवाक्यता करून टिळकानी कमिटीपुढे आपला खुलासा मांडला व तो लोकाना फारच पसंत पडला. यानंतर मधली सुट्टी झाली व फिरून कमिटी भरल्यावर टिळकांची उलटतपासणी पहावयास सांपडेल अशी लोक उत्सुकतेने वाट पहात होते. पण कमिटीच्या पोटातले पाय या वेळी बाहेर आले. तिने टिळकास साक्षीस बोलवावयाचे पण एकहि प्रश्न विचारावयाचा नाही असा आपणात निश्चय केलेला असल्यामुळे त्यांची साक्ष उलटतपासणी शिवायच संपली. लॉर्ड सिडनहॅमसाहेब तर आधीच उठून गेले होते !

टिळकाना उलट तपासणीत एकहि प्रश्न विचारावयाचा नाही याचा अर्थ त्यांच्यावर कमिटीची इतराजी हाच होय हे उघड आहे. व ही इतराजी का तर ती टिळकांच्या राजकीय मताकरिता. किंवा सरकारचा व त्यांचा जो अपूर्व ऋणानुबंध आहे त्याकरिता हेहि उघड आहे. पण ही गोष्ट घेऊन चालले तरी त्याना प्रश्न न विचारण्याचा जो पोरकटपणा कमिटीने केला त्याचे मात्र पुष्कळाना हसू आले. कमिटीचा टिळकावर राग होता तर तिने टिळकाना साक्षीसच बोलवावयाचे नव्हते. तसे करण्यास त्याना भाग पाडण्यास होमरूल लीगला साधन काय होते ? हा केवळ खुषीचा सौदा आहे. "टिळकाना नाकारता त्याअर्थी आम्ही आमच्या वतीने दुसरा कोणीच साक्षीदार पाठवीत नाही" असे फार तर लीगने उत्तर दिले असते. व जगाने झाली ही गोष्ट बरी अगर वाईट याचा न्याय

आपल्या ठिकाणी केला असता. पण तसे करण्याची कमिटीची छाती झाली नाही. बरे भलेपणा घेण्याकरिता किंवा सरळ सार्वजनिक बुद्धीने जर कमिटीने त्याना साक्षीला बोलावले तर रीतीप्रमाणे इतर साक्षीदारासारखे चार प्रश्न विचारावयास काय हरकत होती ? तसे केल्याने कमिटीस बट्टा लागण्याचा संभव नव्हता. पण साक्षीस तर बोलावले त्याना आपले म्हणणे सर्व मांडू दिले पण उलटसाक्षीपुरता त्यांच्याशी अबोला धरला. यात कमिटीने कोणते तत्त्व किंवा कार्य साधले हे कमिटीसच माहीत ! पण उलट प्रश्न न विचारले तरी होमरूल लीगचे काम झाले. अशा कमिट्या व त्यापुढील साक्षी याचा मुख्य उपयोग हाच असतो की ज्याला त्याला आपले म्हणणे जाहीर रीतीने मांडता यावे. आणि टिळक पटेल व माधवराव यांच्या साक्षी वाचल्या म्हणजे इंग्रज राष्ट्राचे पुढारी मुत्सद्यातले मुरब्बी अधिकाऱ्यातले अग्रगण्य अशांच्या समोर तोंडावर लोकपक्षाचे खरे खरे विचार स्पष्ट निर्भीड भाषेत मांडण्यात आले यात सर्व कार्यभाग आला. ज्याना अधिकाऱ्यांचे स्नेह जोडण्याला किंवा आपापले खासगी कावे साधण्याला येथे यावयाचे असेल त्यांची गोष्ट अर्थात् निराळी.

### ( ११२ ) हाइंडमन यांचे टिळकाना पत्र

हॅम्पस्टेड १२ आगस्ट १९१९

पार्लमेंट सभा भरण्याचे पूर्वी लंडनमध्ये एक टोलेजंग परिषद भरविण्याची खटपट आम्ही करीत आहो. तुम्हा डेप्युटेशनच्या लोकाना येथे येऊन भाषणे करिता येतील. काही खाजगी सभाहि एक दोन आठवड्यात बोलावतो. शांतता परिषद व लीग ऑफ नेशन्स यांच्याकडे जाऊन जे प्रयत्न तुम्ही केले त्यात तुम्हास यश आले नाही. तरी आता तुम्ही उघड उघड बोलावयास सुरवात केली पाहिजे. व हिंदुस्थानात किती भयंकर स्थिति आहे हे लोकास समजावून दिले पाहिजे. नुसत्या मॉंटेग्यू बिलाच्या चर्चेत लोकांचे लक्ष वेधण्यासारखे काही नाही. हिंदुस्थानातील अन्याय व छळ यावरच भर दिला पाहिजे.

### ( ११३ ) हाइंडमन यांचे खापर्डे याना पत्र

लंडन १२ आगस्ट १९१९

सोशालिस्टांच्या परिषदेला टिळकानी येण्यापासून फारसा फायदा नाही. वेळ भरपूर नाही आणि वर्तमानपत्रातून प्रसिद्धीहि फारशी मिळणार नाही. पण पार्लमेंट उघडण्यापूर्वी लंडनमध्ये एक भली मोठी सभा भरवून तेथे शिष्टमंडळाची भाषणे करविण्याचा आमचा विचार आहे. राष्ट्रसंघ शांतता परिषद इकडे केलेल्या प्रयत्नाना कितपत यश आले ते पाहताच. तरी आता माझा उपदेश ऐकत जा. आणि तोंडाचे कुलूप काढून मुत्सद्दीगिरी न करता अगदी मनास येईल ते स्पष्ट बोलत जा. काय ते तुमचे इंडिया बिल ? इकडे कोणाला ते कळणार आणि कोण त्याची पर्वा करतो ? हिंदुस्थानात सरकार अन्याय काय काय करते,

इंग्रज लोक निर्दयपणाने कसे वागतात, हे काही स्पष्ट सांगितलेत तर लोक नीट ऐकून घेतील व तुमचा उपयोग होईल.

### ( ११४ ) अहवाल

लंडन १४ आगस्ट १९१९

नेमस्तातर्फे दोनच साक्षीदार मान्य केले. पण त्या सर्व मंडळीना कमिटीपुढे बसलो असे म्हणता यावे म्हणून त्यांचे दोन भाग करून एकेका भागातील मंडळीने कमिटीपुढे हजर व्हावे पण त्यातील फक्त एकाने बोलावे असे ठरले आहे. समर्थ के. सी. रॉय पृथ्वीशचंद्र चिंतामणी असे मिळून प्रथम साक्षीला गेले. ब्राह्मणेतरातर्फे व्यंकट रेड्डी व रामरायनिंगार यानी साक्षी दिल्या. शिखातर्फेहि एकाची साक्ष झाली. इकडे साक्षी घेण्याचे काम चालू आहे पण तिकडे रिपोर्ट लिहिण्याचे काम सुरू आहे याचा अर्थ साक्षीना फारसे महत्त्व देणार नाहीत. जिना व सय्यद हुसेन यांच्या साक्षी काल झाल्या. पुढारलेल्या प्रांताना एकदम स्वातंत्र्य द्यावे असे मत त्यानी जोराने प्रतिपादिले. शास्त्री व रामचंद्रराव यांची एकत्र साक्ष झाली. बेझंटबाई केळकर व पटेल हे नियमाने कमिटीला हजर रहातात. दिवाण माधवराव यानीहि मॉंटेग्यू साहेबांची गाठ घेतली. प्रसंग सापडेल तेथे सत्यमूर्ती हे तारे तोडू लागले आहेत ! पंजाब प्रकरणात कॉंग्रेसचे डेप्युटेशन जात नाही. पण पटेल यानी खाजगी मुलाखतीत कॉंग्रेसचे म्हणणे मॉंटेग्यूसाहेबाना सांगितले. हाइन्डमन यानी जस्टिस पत्रात एक फार कडक लेख लिहिला आहे. पण हिंदी पत्राने तो छापला तर त्याच्यावर हटकून खटला होईल. सकलातवाला यांची भाषणे मधून मधून होतात. ते प्रत्यक्ष मजूरवर्गासंबंधाने विशेष बोलतात.

### ( ११५ ) टिळकांचे धोंडोपंतास पत्र

लंडन १४ ऑगस्ट १९१९

अण्णासाहेब देशपांडे यास शिवाजी स्मारकफंडाचे बाबतीत लिहिले आहे. पंजाबातील हद्दपाऱ्या व जप्तीचे सत्र कमी झाले हे वाचून थोडे समाधान वाटले. पण एवढ्याने काय होणार ? आम्हाला सार्वत्रिक माफी मिळावयास हवी. मॉंटेग्यू साहेबाना याबद्दल कळविले आहे. ते काय करितात पाहावे.

गांधी यांच्या एकंदर तिकडील चळवळीबद्दल समजले. पण त्यांच्या प्रत्यक्ष अडचणी काय आहेत हे कळल्याखेरीज त्यावर मला टीका करिता येत नाही. येथे उन्हाळा सुरू झाला. उष्णतामान ८२° ते ८५° असते. पण हवा दमट असल्याकारणाने हिंडून फिरून आल्यास मुंबई सारखाच अंगाला घाम येतो. उष्णतेचे मान कमालीचे चढले आहे असे येथील लोक म्हणतात !

## ( ११६ ) अहवाल

लंडन २१ आगष्ट १९१९

अँग्लोइंडियनातर्फे वेल्बी व स्टीव्हन यानी साक्ष दिली. अर्थात ते सुधारणाविरुद्ध बोलले. पण मॅटेग्यू साहेबानी त्यांची चांगली हजेरी घेतली. टाईम्सपत्राचे सर स्टॅन्ले रीड यानी वरिष्ठ कारभारात काही खाती सोपीव करावी असे सांगितले. भास्करराव जाधव यानी साक्ष देताना काँग्रेसच्या योजनेला पाठिंबा दिला. ब्रह्मी साक्षीदारानी हिंदुस्थानाबरोबरीने ब्रह्मदेशाला अधिकार मागितले. पार्लमेंट २२ आक्टोबरला भरणार म्हणून सिलेक्ट कमिटीला मध्ये काही दिवस सुट्टी मिळेल. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात किंवा आधी बिल पुढे येईल. प्रधानमंडळातील गडबड थांबलेली दिसते. यामुळे नोव्हेंबरातच बिल निकालात निघेल असे वाटते. पंजाब चौकशीकरिता कमिशन नेमणार पण तूर्त सरसकट माफी देत नाहीत असे बोलतात. टिळकानी मॅटेग्यू साहेबांची फिरून गाठ घेतली. डॉ. वेलकर आले. आमच्याकडेच आहेत. बिपिनपाल व डॉ. साठ्ये हेहि तिकडून निघाल्याचे समजले.

## ( ११७ ) अहवाल

लंडन २८ आगस्ट १९१९

सिलेक्ट कमिटीने या आठवड्यात काम केले आणि दोन आक्टोबरपर्यंत सुट्टी घेतली आहे. कित्येक युरोपियन साक्षीदारांच्या साक्षी या आठवड्यात झाल्या. हिंदी खिस्ती लोकाकरिता कोणी रे. भाभा व पाल यानी साक्षी दिल्या. मद्रास ब्राह्मणेतर व द्रवीडसंघ यांच्यातर्फेहि साक्षी झाल्या. सर वुइल्यम मायर आपले जुने फडणवीस यानी पाच वर्षांत वरिष्ठ कारभारात अधिकार विभागणी करावी असे सांगितले. हसन इमाम, बिपिन पाल रंगास्वामी सर शंकर नायर हे आले आहेत. नॉर्दॅम्टन् येथे सोशालिस्ट पार्टीची परिषद भरली. तेथे हाइन्डमन यानी हिंदुस्थानाला स्वातंत्र्य मिळावे असा ठराव मांडला. तो फक्त एक मत विरुद्ध पडून मंजूर झाला. हा ठराव केळकरानी तुम्हाकडे तारेने पाठविलाच आहे. बेझंटबाईनी लिव्हरपूलच्या आसपास सहा व्याख्याने दिली. टिळक ५ सप्टेंबर रोजी ग्लासगो येथे जाणार. वेल्सच्या दक्षिण भागातहि काही व्याख्याने ठरली आहेत.

## ( ११८ ) टिळकांचे धोंडोपंतास पत्र

लंडन २८ ऑगस्ट १९१९

मराठी मोनोटाइप करिता राणूजी व देवधरी टाईप यांच्या वळणाची अक्षरे यंत्रावर बसवता येतील की काय हे मी पहात आहे. माझे बरोबर येताना जावजी व सहदेव यांचे नमुने मी आणले होते. पण ते पान कोठे तरी हरवले. पण

मांडवकर यास तसे १०–१२ नमुने तयार करून तावडतोब पाठवून देण्यास सांगावे. मांडवकर याजजवळ त्याचे पंच व मेट्रिसा तयार आहेतच. तावडतोब पाठवा त्यांची फार जरूरी आहे.

## ( ११९ ) टिळकांचे धोंडोपंतास पत्र

लंडन ४ सप्टेंबर १९१९

केसरी छापण्यासंबंधाने तुमचे सविस्तर पत्र मिळाले. त्याबद्दल सर्व नीट व्यवस्था करितो. मी पाडलेल्या पायका टाइपाचा नमुना पाठवून द्या. तसेच प्रत्येक अक्षराचे एक दोन टाईप पाठवा. म्हणजे ते येथे दाखवण्यास ठीक पडेल. सहदेवाचे वळण जरा वाकडे आहे. करिता राणूचे टाईप पाठवल्यास बरे. टाइपाचे पार्सल लौकर पाठवण्याची तजवीज करावी.

## ( १२० ) अहवाल

लंडन ४ सप्टेंबर १९१९

नेमस्त शिष्टमंडळाने आपली कचेरी आता बंद केली असून त्यांचे काही लोक लवकरच तिकडे परत जातील असे म्हणतात. कॉंग्रेस शिष्टमंडळाच्या व्याख्यानांचा कार्यक्रम ठरला. त्याची हकीगत क्रमाने पाठवू. सुमारे एक महिन्याचा कार्यक्रम आखला आहे. सोयीप्रमाणे निरनिराळ्या लोकांचे गट करून जाऊ. एसेक्स हॉलमध्ये सय्यद हसन इमाम यांचे पंजाबातील अत्याचारावर फार चांगले भाषण झाल. नंतर हॉर्निमन पाल सकलातवाला लॅन्सबरी केनवर्दी वगैरे लोकांचीहि भाषणे झाली. चमनलाल यानी उपसूचना आणिली की पंजाब प्रकरण आपल्या मनासारखे निकालात निघेपर्यंत सुधारणावर बहिष्कार घालावा. सकलातवाला आणि सत्यमूर्ती यानी तिला दुजोरा दिला. पण टिळक व बॅ. डुबे व पारिख यानी त्याविरुद्ध भाषणे केली. उपसूचना नापास झाली. फारच थोड्या लोकानी तिच्या बाजूने मते दिली. सरोजिनी नायडू आणि इंडियन प्रेस असोसिएशन यानी निरनिराळ्या पार्ट्या दिल्या. या दुसऱ्या पार्टीला काही इंग्रज वर्तमानपत्रकर्ते आले होते. त्यानी भाषणात असे ध्वनित केले की हिंदुस्थानातच काय पण विलायतेतहि मतस्वातंत्र्यावर घाला पडत आहे. इकडे तो इतका उघड नसतो इतकेच. गुरुवारी मॉंटेग्यू साहेबानी निरनिराळ्या कमिट्यामार्फत प्रतिनिधींची मुलाखत घेतली. विषय पंजाबातील अत्याचारांचा होता. याविषयी सविस्तर हकीगत इंडिया पत्रात पहा. रॉयल एशियाटिक सोसायटीच्या इमारतीत ओरिएन्टल कॉंग्रेस भरली होती. टिळक प्रेक्षक म्हणून हजर होते. अध्यक्ष सर चार्लस लायल यानी हिंदुस्थानातील विद्वत्तेच्या प्रगतीविषयी प्रशंसापर उद्गार काढले.

( १२१ ) बातमीपत्र

लंडन ११ सप्टेंबर १९१९

या आठवड्यात सिलेक्ट कामिटी बंद असली तरी डेप्युटेशनांचे खासगी काम बरेच झाले. लो. टिळक गेल्या शुक्रवारी ग्लासगोकडे गेले ते दोन दिवसानी परत येतील. ग्लासगो येथे जाताच त्यांचे कामास सुरुवात झाली. शनिवारी ' युनियन ऑफ डेमोक्रॅटिक कंट्रोल ' या संस्थेच्या विद्यमाने सभा भरली होती. मि. विशार्ट यांच्या अध्यक्षतेखाली मि. बक्स्टन व रामसे मॅकडोनाल्ड यानी भाषणे केली. सभेचे पाहुणे म्हणून अध्यक्षानी टिळकांचे स्वागत केले व हिंदी लोकांच्या कार्यास या सभेचीच काय पण या संघाची निरंतर सहानुभूति मिळेल असे आश्वासन दिले. सोमवार ता. ८ रोजी ॲव्हेन्यू नामक नाटकगृहात इंडिपेंडंट लेबर पार्टीच्या विद्यमाने ' हिंदी राजकीय सुधारणा ' या विषयावर टिळकांचे स्वतंत्र व्याख्यान झाले. या सभेस शेंकडो लोक हजर होते. त्याच दिवशी सायंकाळी सेंट ॲंड्रयूज नामक शहरच्या मुख्य सभागृहात ट्रेड्स युनियन कॉंग्रेसची अत्यंत महत्वाची परिषद भरली होती. या परिषदेपुढे परिषदेबाहेरच्या वक्तयाची भाषणे झाली. त्यातील मुख्य भाषण टिळकाकडे होते. सभागृहातील पांचसहा हजार श्रोतृवृंदानी उत्थापनपूर्वक टिळकांचे जंगी स्वागत केले. टिळकानी थोडक्यात डेप्युटेशनचे हेतु परिषदेस सांगून तुमची सर्वांची सहानुभूति असेल तरच हे आमचे अवघड काम होईल अशी कळकळीची विनंति केली. नंतर परिषदेच्या खास कार्यक्रमास सुरुवात झाली. तथापि परिषदेपुढील विषयावर रामसे मॅकडोनाल्ड यांचे जे मुख्य भाषण झाले त्यात टिळकानी केलेल्या विनंतीस अनुलक्षून व लेबर पक्षास उद्देशून त्यानी मुद्दाम भाषण केले. ते म्हणाले की 'हिंदुस्थानात सरकारविरुद्ध लोकपक्षाची जी गाऱ्हाणी आहेत त्यांना जी दुःखे भोगावी लागत आहेत त्यांची प्रत्यक्ष देहमयमूर्ति म्हणजेच टिळक असे समजा व आज तेच स्वतः तुमच्यापुढे उभे आहेत व हिंदी लोकाना राजकीय स्वातंत्र्य मिळण्याविषयी जो झगडा सुरू आहे त्यात मदत करा अशी विनंति करीत आहेत तरी तुमच्या वतीने मी त्याना आश्वासन देतो की ही मदत स्वतंत्र मजूर पक्षाकडून त्याना अवश्य मिळेल. सोशिॲलिस्ट उर्फ समाजसत्तावादी लोकांचा पक्ष हा अमुक एका देशाचाच आहे असे नाही तर जगातील कोणत्याहि भागात न्याय स्वातंत्र्य लोकमत यांचाच अंमल चालू व्हावा अशाविषयी त्याचे प्रयत्न अव्याहत चालू असतात.' असो ही सभा झाल्यावर त्याच दिवशी रात्री ' ग्लासगो इंडियन यूनिअन ' नामक संस्थेच्या विद्यमाने इंग्रज स्कॉच व हिंदी अशा सर्व लोकाना मिळून ॲट–होम–पार्टी देण्यात आली होती. या ठिकाणी मजूर–पक्षाशिवाय इतर पंथाचेहि लोक होते. त्यांना उद्देशून टिळकानी सुमारे एक तासभर भाषण केले. रा. नामजोशी वगैरे इतर हिंदी गृहस्थांचीहि भाषणे झाली. ता. १० रोजी ' वुइमेन्स वर्कर्स ' नामक स्त्री संघाची सभा होती तेथेहि

टिळकानी लहानसे भाषण केले. नंतर त्या दिवशी टिळक एडिंबरोस निघून गेले. तेथे त्याना रात्री मेल हिल टेरेस येथे स्थानिक हिंदी लोकाकडून मेजवानी घ्यावयाची होती.

× × × ×

परवाच्या सभेत एक गोष्ट घडून आली ती ही की, लंडनमधील काही हिंदी लोकांच्या मते निषेधाची मजल शब्दापलीकडे जाऊन तिला सरकारावर निदान नवीन सुधारणावर बहिष्कार घालण्याच्या कृतीचे स्वरूप यावे. किंबहुना मि. सकलादवाला मि. सत्यमूर्ति मि. चमनलाल यानी अशा अर्थाची उपसूचना पुढे आणून तीवर वादविवादहि करविला. पण लो. टिळक व लंडनमधील कायमचे रहिवासी बॅरिस्टर डुबे व पारिख यानी या उपसूचनेविरुद्ध भाषणे केली व अखेर मोठ्या बहुमताने ही उपसूचना नामंजूर झाली. लोकांचे नागरिकत्वाचे मूलभूत हक्क नष्ट झाले तर सुधारणा आम्हाला कितपत अंगी लागणार ? याच दृष्टीने राष्ट्रीय सभेच्या डेप्युटेशनाच्या लेखी कैफियतीत लोकाना व्यक्तिस्वातंत्र्याची सनद आधी दिली पाहिजे अशी मागणी करण्यात आली आहे. तथापि उपसूचनेच्या स्वरूपाचा ठराव लंडनमध्ये न होता तो हिंदुस्थानात हिंदी लोकसमूहाच्या संमतीनेच झाला पाहिजे. लंडनमध्ये भाषणे किंवा ठराव करताना हिंदुस्थानातील लोकस्थितीचा विसर पडून उपयोगी नाही हा युक्तिवाद सभेतील बहुमतास पटला व सत्यमूर्तींची उपसूचना नामंजूर झाली. वास्तविक अशा प्रकारची उपसूचना आपल्यापैकीच एकाकडून आयत्या वेळी पुढे येणेच योग्य नव्हते. पण सत्यमूर्ति यांचा समावेश कॉंग्रेसच्या खास डेप्युटेशनमध्ये पंडित मदन मोहन यानी न केल्यामुळे ते केवळ व्यक्तिशः मनास वाटेल त्याप्रमाणे भाषणे करीत असतात. 'हिंदी' पत्रास सत्यमूर्ति यांची पत्रे एकतर्फी किंबहुना व्यक्तिविषयक मजकूराचीच अशी जातात याचे आश्चर्य पुष्कळास वाटते असे मला समजले आहे. पण या सर्वांच्या मुळाशी काय आहे याचा उल्लेख केव्हा तरी मला करावयाचा होता तो नाइलाजाने या प्रसंगी केला आहे. सत्यमूर्ति हे डेप्युटेशनमध्ये नाहीत हे लक्षात ठेवूनच त्यांची भाषणे व हालचाली यांचा वृत्तात वाचला पाहिजे.

## ( १२२ ) अहवाल

लंडन १८ सप्टेंबर १९१९

गेल्या दोन आठवड्यात मुख्य कार्यक्रम व्याख्यानांचाच झाला. कारण पार्लमेंटसंबंधी सर्व लोक बाहेर गावी गेले आहेत. व्याख्यात्यांचा एक गट वेल्स प्रांतात गेला. तिकडे ७।८ व्याख्याने झाली. मजूरसंघांचे केंद्र असतील अशी गावे पसंत केली होती. दोन व्याख्यानाना एक हजार श्रोतृसमुदाय असावा. सुधारणाबरोबर हिंदी मजूरांचा प्रश्नहि त्यात होता. व्याख्यात्याना आडवे तिडवे व अडाणी प्रश्न विचारीत. कारण त्याना हिंदुस्थानातील काहीच माहिती नसते.

या भागाकडे खापर्डे पाल बाबू चमणलाल मिश्र बोर्दोलाय व प्रधान असे गेले. दुसरा गट दिवाणसाहेब पटेल सरोजिनी नायडू यांचा. यानी बोर्नेमथ व सौथॅम्टन इकडे व्याख्याने दिली. इकडे श्रोतृवर्ग थोडा पण सुशिक्षित होता. सरोजिनीबाईंचे वक्तृत्व व खापर्ड्यांचा विनोद चांगलाच उपयोगी पडला. खापर्डे याना इंडियन मार्कट्वेन अशी पदवी मिळाली. तिसऱ्या भागात टिळक हे गेले आहेत. बरोबर डॉ. वेलकर आहेत. अमेरिकेहून पत्र आले. त्यात लिहिले आहे की इंडियन होमरूल लीगच्या अमेरिकन शाखेने आपला रीतसर वकील देऊन अमेरिकन कॉंग्रेसच्या परराष्ट्रीय कमिटीपुढे हिंदुस्थानचा स्वयंनिर्णयाचा हक्क मांडला. मॅलोन हे आमचे वकील होते. टिळकानी शांतता परिषदेकडे जी कैफियत पाठविली त्याच धर्तीवर लजपतराय यानी कैफियत तयार केली. तात्पर्य होमरूल लीगची कैफियत अमेरिकेतील सरकारी कागदपत्रात तरी दाखल झाली हे भाग्य. बेझंटबाई व त्यांची मंडळी उत्तर भागात व्याख्याने देत आहेत.

### ( १२३ ) टिळकांचे धोंडोपंताना पत्र

लंडन १८ सप्टेंबर १९१९

केसरीकरिता रोटरी माशिनच्या शोधात आहे. या मशिनने दर ताशी ६००० प्रति दोन्ही बाजूने छापून घड्या घालून बाहेर पडतील. आणि केसरीची ३२ हजार प्रत काढण्याचे काम सहा तासात हातावेगळे होईल. छापण्याकरिता कागदाच्या गुंडाळलेल्या गाठी आणि स्टिरीओ प्रेटी लागतील व हे काम आपल्याकडेहि होऊ शकेल. हे मशीन घेण्यास सुमारे १००० पौंड ( १० हजार रुपये ) लागतील. नवीन कोरे मशीन घ्यावयाचे तर पुष्कळच जास्त खर्च पडेल. कारण किंमती फार वाढल्या आहेत. कसेहि असले तरी पुढे १०–१५ वर्षेपर्यंत केसरी छापखान्याची उत्तम व्यवस्था करून टाकतो. त्याबद्दल काही काळजी करू नकोस.

### ( १२४ ) अहवाल

लंडन २५ सप्टेंबर १९१९

चालू आठवड्यातील व्याख्यानांच्या कार्यक्रमासंबंधाने सर्व माहिती इंडिया पत्रात दिली आहे. ब्रि. कमिटीकरिता सुचविलेली घटना तिने मान्य केली आहे. इंडिया पत्रातील एका विशेष लेखावरून राष्ट्रसंघापुढे हिंदुस्थानची कैफियत मांडण्याच्या कामी टिळकानी प्रथम स्वतंत्रपणे व नंतर कॉंग्रेसतर्फे काय खटपट केली याचा वृत्तांत दिला आहे. प्रे० विल्सन यानी राष्ट्रसंघ व हिंदुस्थान आयर्लंड इजिप्त यासारखीहि राष्ट्रे यांचा संबंध काय आहे व असावा याविषयी जाहीर विधाने केली. पण असली भाषणे किंचित नखाने खरवडली तर आत अप्रामाणिकपणा दिसून येतो. तरी पडत्या फळाप्रमाणे प्रगट उद्गारांचा फायदा हिंदुस्थानाने का घेऊ नये ! या मुद्याकडे राष्ट्रीय सभेने विशेष लक्ष दिले पाहिजे.

### ( १२५ ) टिळकांचे धोंडोपंताना पत्र

लंडन २५ सप्टेंबर १९१९

मराठी टाइपांच्या अक्षरांची फार जरूरी आहे. तावडतोब पाठवा. लिनो टाइप अगर मोनोटाइप या संबंधी त्यावाचून मला काही एक करिता येत नाही. कॉंग्रेसला अध्यक्ष होण्याबद्दल मला विचारतात पण पंजाबमधील मनाईहुकमाची अडचण आहे. पण पटेल म्हणतात की तो मनाई हुकूम रद्द करून घेता येईल. तसे झाल्यास तिकडे येण्याचा विचार करिता येईल. पण नक्की नाही. शके १८४१ चे पंचांग प्रसिद्ध करण्यात नुकसान आले की काय ? व असल्यास ते किती ते कळवावे. १८४२ चे पंचांग त्याचप्रमाणे प्रसिद्ध करावे. पं. रघुनाथ शास्त्री यांचे पत्र आले होते त्यास उत्तर पाठविले आहे.

### ( १२६ ) अहवाल

लंडन २ आक्टोबर १९१९

या आठवड्यात येथील प्रचंड संपाशिवाय दुसरी गोष्ट नाही. त्याचे वर्णन केळकर यानी केसरीकडे धाडलेल्या पत्रात सविस्तर केले आहे. सिलेक्ट कमिटीची सभा ता. ७ आक्टोबरपर्यंत ढकलली गेली. पटेल पाल नायडू यांचे व्याख्यान न्यूकॅसल येथे झाले. आणि ग्लासगो येथे २६ तारखेला होणार होते पण संपामुळे पुढील कार्यक्रम थांबवावा लागला.

### ( १२७ ) अहवाल

लंडन ८ आक्टोबर १९१९

या आठवड्यात टपालाची घालमेल झाली. कदाचित् एक आठवडा आमचे पत्र तुम्हाला उशीरा मिळेल. टिळक इतराबरोबर व्याख्यानाना बाहेर गेले नाहीत हे एका अर्थी बरे झाले. कारण काहीना संपामुळे ग्लासगोहून आयर्लंडात बेलफास्टला व तेथून समुद्रमार्गे लिव्हरपूलला यावे लागले. ब्रिटन ॲन्ड इंडिया सोसायटीच्या विद्यमाने बेझंटबाईनी एक सभा भरविली. स्वतः त्या अध्यक्ष होत्या. शास्त्री वाडीया वेजवुड व केळकर यांची भाषणे झाली. प्रत्यक्ष ठराव पुढे कोणता यावा याबद्दल मतभेद होता. पण अखेर मूळचा ठराव टिळकांच्या सुचनेवरून बदलून सर्वाना संमत असा ठराव करण्यात आला. या सभेच्या उत्तरभागात सामाजिक विषयावर व्याख्याने झाली. संप मोडला. सिलेक्ट कमिटीपुढे होल्डरनेस व ओड्वायर यांच्या साक्षी झाल्या. बेझंटबाईनी ‘ युनाइटेड इंडिया’ नांवाचे आपले एक वर्तमानपत्र काढले. नेमस्तांचे वेगळे पत्र निघाले नाही. पण बाईनी त्यांच्या लेखाना आपल्या पत्रात जागा दिली आहे. पहिल्या लेखात बाईनी कॉंग्रेसवर टीका केली. पण टिळकांच्याबद्दल फार चांगले लिहिले. कॉंग्रेस शिष्टमंडळात फूट आहे असे बाईनी लिहिले. केळकर यानी इंडिया पत्रात त्याला उत्तर दिले आहे ते वाचा व मराठ्यात छापा.

### ( १२८ ) अहवाल

लंडन १६ आक्टोबर १९१९

आगाखान सर शंकरन् नायर यांच्या साक्षी झाल्या. एकंदरीने काँग्रेस-तर्फेचेच लोक सर्वात अधिक आले आहेत म्हणून काँग्रेसतर्फे अधिक साक्षी घ्या असे पटेल यानी लिहिले. पण कमिटीने पूर्वीची पक्षपात बुद्धि कायम ठेविली. आगाखान यांची थोडी प्रगति झालेली दिसते. पूर्वी त्यानी गोखले यांचे राजकीय मृत्युपत्र प्रसिद्ध करून त्यातील सुधारणानी काम भागेल असे म्हटले होते. पण आता आपल्या साक्षीत त्यानी वरिष्ठ कारभारात अधिकारविभागणीचा हक्क सांगितला आहे. ते आणखीहि असे म्हणाले की होमरूलची भावना फार खोल गेलेली आहे. त्याना कोणी विचारले 'हे कशावरून?' तेव्हा ते म्हणाले 'मोठमोठे सरकारी अधिकारी दौऱ्यावर जातात नेमस्त पुढारी जातात आणि होमरूलरहि जातात. पण कोणाचे सत्कार व कोणाचे समारंभ कसे होतात हे लक्षात आणा म्हणजे समजेल.'

### ( १२९ ) टिळक यांचे गोखले यास पत्र

लंडन १६ आक्टोबर १९१९

नवीन वर्षात मला ४३०० पौंड मुंबईहून आले. त्याचा हिशेब शेवटल्या हिशोबात देऊ. हल्ली तक्ता पाठविला तो एका वर्षापुरता आहे. पंजाब अपील्स फंडाला दोन हजार रुपये मी येथे देतो.

### ( १३० ) अहवाल

लंडन २३ ऑक्टोबर १९१९

ठरल्याप्रमाणे हसन इमाम व पाल दौऱ्यावर गेले. केळकर वेलकर रंगास्वामी अयंगार हे बर्मिंगहॅम ब्रिस्टल टॉटन वेस्टन वगैरे गावाकडे गेले. हॉर्निमन व अयंगार हे कार्डिफकडे जाणार.

दौरा संपल्याबरोबर टिळक केळकर नामजोशी वेलकर वासुदेवराव जोशी हे ३० तारखेला 'इजिप्त' नामक बोटीने निघतील. पार्लमेंट २२ तारखेला उघडेल. इंडिया बिलाची पाळी डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात येईल.

### ( १३१ ) अहवाल

लंडन २९ ऑक्टोबर १९१९

आज पाठवीत आहे हाच येथील शेवटचा रिपोर्ट. आम्ही ता. ३० ऑक्टोबरलाच येथून निघावयाचे. पण निदान ३ नोव्हेंबर पर्यंत निघणे होत नाही. थंडी पडू लागली आहे. तेव्हा जितके लवकर निघता येईल तितके बरेच. बिलासंबंधाने काही काम अजून शिल्लक राहिले आहे. पण खापर्डे व पटेल हे मागे रहात आहेत ते अवश्य त्या गोष्टी करतील.

गेल्या शनिवारी आल्बर्ट हॉलमध्ये मोठी सभा होमरूलसंबंधाने झाली. बेझन्टबाईच्या मंडळींनी तिची मुख्यतः व्यवस्था केली होती. लॅन्सबरी अध्यक्ष होते. टिळकाना निमंत्रण केले होते. पण तेथे ठराव काय काय येणार हा प्रश्न होता. केवळ हल्लीच्या बिलाला पाठिंबा देणार असाल तर मी येत नाही असे टिळकानी कळविले. तेव्हा हिंदुस्थानाला स्वयंनिर्णयाचा हक्क असावा असा सर्व-समावेशक ठराव पुढे आणण्याचे आश्वासन मिळाले. तेव्हाच टिळक सभेला गेले. पण हॉर्निमन व चमनलाल यानी सभेला हजर राहून अगदी उलट्या अनपेक्षित दिशेने खेचले. त्यानी उपसूचना आणिली की हल्लीचे बिलच्या बिलच अजिबात रद्द करावे. पण सभेच्या मूळ उद्देशाला सोडून ही उपसूचना असल्यामुळे लान्स-बरी यानी ती पुढे आणूच दिली नाही. टिळकानी त्यांच्या निश्चित धोरणाप्रमाणे बिल असमाधानकारक म्हणून त्यावर टीका केली आणि उपसूचना अप्रयोजक म्हणून तिजवरहि त्यानी टीका केली. बेझन्टबाई समंजस. बिलासंबंधाने त्यांचे व टिळकांचे मत तंतोतंत जुळणारे नव्हते तथापि बिलातील दोष दाखवीत दाखवीत त्यानी त्याचे फक्त ओझरते समर्थन केले. पण मुख्य भर स्वयंनिर्णयावर दिला. टिळकांचे भाषण या सभेत फारच चांगले झाले. लॅन्सबरी वगैरेनी त्याची फार वाहवा केली. या आठवड्यात कॅक्स्टन हॉलमध्ये डॉ. क्लार्क यांचे अध्यक्षतेखाली ब्रि. कमिटीने सभा भरविली होती तीत शिष्टमंडळाच्या विलायतेतील कामाची प्रशंसा केली गेली. गुरुवारी मि. स्पूर यानी शिष्टमंडळाला फराळाला बोलाविले. यावेळी पार्लमेंटचे अनेक सभासद आले होते. सिलेक्ट कमिटी आपला रिपोर्ट लिहिण्यात गुंतली आहे. बिल दुसऱ्या वाचनाकरिता डिसेंबरात पुढे येईल. तेव्हा त्याला उपसूचना काय द्याव्या हे आम्ही ठरविले आहे.

येथून निघण्यापूर्वी होमरूल लीगतर्फे आम्ही सर्वांचे आभार मानले. विशे-षतः शे० दीपचंद जव्हेरी यानी आम्हाला फारच मदत केली. ते येथे जवाहि-राचा व्यापार अनेक वर्षे करीत असून त्यानी आपले सगळे घर आमच्या दिमतीला मोकळे करून दिले होते.

### ( १३२ ) बेनस्पूर यांचे टिळकाना पत्र

लंडन ३ नव्हेंबर १९१९

हिंदुस्थानचे इतके राजकीय पुढारी येथे आल्यामुळे त्यांना भेटून त्यांच्या तोंडून हिंदुस्थानातील लोकमतासंबंधाने अस्सल माहिती मिळविता आली या-बद्दल मला फारच आनंद होतो. तुमच्या सारख्या अनुभविक राजकारणी पुरु-षाला मी काय सांगणार ? पण आमचा निरोप हिंदुस्थानाला असा कळवा की आज प्रतिकूल चिन्हे दिसत असली तरी पुढे आशा बाळगण्यास जागा आहे. तिकडील अन्यायाची अधिकाधिक माहिती इकडील लोकाना होत असल्यामुळे तुमचे हित साधण्याकडे त्यांचे पाऊल अधिक पुढे पडेल. तुमचा स्वार्थत्याग

उदारपणाचा आहे व त्याचा मोबदला खाचित मिळेल. लवकरच साम्राज्यातील स्वराज्य भोगणाऱ्या इतर भागाप्रमाणेच हिंदुस्थानाला हक्क मिळतील अशी आम्हाला आशा आहे.

### ( १३३ ) लॅन्सबरी यांचे टिळकाना पत्र

लंडन ४ नोव्हेंबर १९१९

तुम्ही येथे होता त्या अवधीत तुमच्या बरोबर काम करण्याचा मान व आनंद ही दोन्ही मला लाभली याबद्दल आनंद वाटतो. तुमची निष्ठा खरोखर अपूर्व आहे. या देशातील तुमची चळवळ न थांबावी असे तुमचे प्रयत्न झालेले आहेत. आम्ही 'डेली हेरल्ड' पत्राची संपादक मंडळी व आमचा पक्ष हिंदुस्थानाकरिता होईल तितकी खटपट करू. केवळ राज्यमंडळे वेगळी म्हणून तुम्ही आम्ही वेगळे. बाह्योपाधी वेगळ्या म्हणूनहि वेगळे. पण अंतर्यामी तुम्ही आम्ही एक आहोत. मी हिंदुस्थानात केव्हा येईन तो येवो पण मी येईन तेव्हा हिंदुस्थान हे वसाहतीसारखे स्वतंत्र झालेले दिसावे अशी माझी इच्छा आहे.

### ( १३४ ) लॅन्सबरी यांचे बॅपटिस्टा याना पत्र

लंडन ४ नोव्हेंबर १९१९

××× स्वयंनिर्णयाकरिता डेली हेरल्ड हे पत्र नेहमी झगडत राहील. पण अत्याचाराचे धोरण त्याला मंजूर नाही. ×××

### ( १३५ ) वेजवुड यांचे टिळकाना पत्र

लंडन ६ नोव्हेंबर १९१९

विलायतेस शिष्टमंडळ आल्यामुळे उभयपक्षी निकट परिचय होण्याला फार मदत झाली. इकडे आता वर्णद्वेष हटत चालला आहे. व हिंदुस्थानातहि यापुढे फार दिवस गोऱ्या लोकांचा उन्मत्तपणा चालणार नाही. सुधारणांचे बिल अनुदार आहे. आणि त्यामुळे तुमच्यापेक्षा आमचेच थोडे अधिक नुकसान आहे असे मी म्हणतो. पण हिंदुस्थानाने त्याचा उपयोग करून चळवळ केली पाहिजे. त्यावर बहिष्कार घालणे हे घातक होईल. मजूर पक्षाच्या आधारावरहि राहणे फारसे शहाणपणाचे होणार नाही. उद्या मजूर पक्षाचे प्रधानमंडळ झाले तरीहि तेच. स्वतःच्या पक्षासंबंधाने मी तुम्हाला असे लिहिताना वाईट वाटते. पण या पक्षात झाले तरी ध्येयवादी असे लोक फार थोडे आहेत. ज्यात आमचा फारसा संबंध नाही त्यात आमच्याकडील मतदार फारसे लक्षच घालीत नाहीत. ध्येय वादीच असतात ते परक्यांच्या कामी लक्ष घालतात. किंवा इंग्लंडच्या लोकाना एक भीति तरी उत्पन्न झाली पाहिजे ! तुमच्या कौन्सिलानी यापुढे अस्पृश्य मागासलेल्या

लोकांचे हित ध्यानात बाळगले पाहिजे. त्या लोकाना कसे वागविले जाईल यावरच त्यांची इकडे परीक्षा होईल.

( १३६ ) हाइंडमन यांचे टिळकाना पत्र

लंडन ८ नोव्हेंबर १९१९

हातून होईल ती खटपट हिंदुस्थानाकरिता करीत असतो. हिंदुस्थानच्या नव्हे पण आमच्या देशाच्या परीक्षेचीच वेळ आहे. आज प्रत्यक्ष चिन्हे फार आशाजनक नसली तरी साम्राज्याविरुद्ध असलेल्या भावनेला हळूहळू भरती येत आहे. तुम्हीच काय पण आम्हा इंग्रज लोकानाहि शीड उभारून आता निघाले पाहिजे. आहोत असे राहून आमचेहि यापुढे चालणार नाही.

( १३७ ) हेंडरसन यांचे टिळकाना पत्र

लंडन २२ नोव्हेंबर १९१९

बिलाला उपसूचना आम्ही देणार आहोत. आमच्या पार्लमेंटरी पार्टीने तसे ठरविले आहे. फक्त जाणत्या लोकानीच बोलणे इष्ट म्हणून भाषणे करण्याचे काम निवडक माणसाकडे देऊ.

( १३८ ) खापर्डे यांचे टिळकाना पत्र

लंडन २५ नोव्हेंबर १९१९

सर विलियम वार्टन हे आजारातून उठले आहेत. पुढील महिन्याच्या ३ तारखेपर्यंत बिल ढकलले गेल्यामुळे ते काही उपसूचना मांडतील व सर्वावर आपल्यासारखे मत देतील. मॅकलम् स्कॉट तसेच करतील. दोघानाही उपसूचना समजावून दिल्या आहेत.

( १३९ ) पटेल यांची टिळकाना तार

लंडन १५ डिसेंबर १९१९

पार्लमेंटमधील आपल्या स्नेहीमंडळीनी चांगली मदत केली. बेझन्ट व शास्त्री यानी कॉंग्रेसच्या विरुद्ध येथे चळवळ केली नसती तर ही मदत अधिकच झाली असती. सुधारणाना अनुकूल अशा तारा इकडून प्रसिद्ध होतील त्याविषयी सावध राहा. इंदुलाल याज्ञिक हे कॉंग्रेसचे जॉईन्ट सेक्रेटरी व इंडियापत्राचे संपादक नेमता आले तर पहा. कॉंग्रेसचे ऑफिस मुंबईस येण्याची काही खटपट करा.

### ( १४० ) लाला लजपतराय यांचे टिळकाना पत्र

न्यूयॉर्क ( बिनतारखेचे )

तुमचे पत्र पावले. या देशातील काम असेच पुढे चालू ठेवावे हा तुमचा अभिप्राय बरोबर आहे. लंडनच्या खालोखाल आज न्यूयॉर्कला महत्त्व आहे. तुमच्या हाताखालील एखाद्या चांगल्या गृहस्थाला इकडे काम करण्यास पाठविल्यास बरे होईल. त्याचा खर्च भागविण्याची व्यवस्था येथे करिता येईल. मनुष्य पाहिजे तो अशाकरिता की तो स्वतंत्र बुद्धीचा व कुशल हवा. थोडासा तत्त्वनिष्ठहि पाहिजे. कामाला मिळेल ते साधन ओरबाडावयाचे ही पद्धत बरी नसते. जाहीर रीतीने आपण जी विधाने करितो ती व्यवस्थित असली पाहिजेत. त्यात अतिशयोक्ति नसावी. खर्च पुष्कळ लागतो खरा तथापि त्यातहि काटकसर करण्याची बुद्धि हवी. अशा मनुष्याच्या हाताखाली डॉ. हर्डीकर हे फार चांगले काम करतील. गेल्या पांच वर्षांच्या हद्दपारीने हिंदुस्थानला परत जावे असे मला फार वाटू लागले आहे. आणि संधि मिळताच मी जाण्याचा विचार केला आहे. कारण माझी प्रकृति आता येथे बरी नाही. तुम्ही पाठविलेल्या रकमेचा मी अगदी काटकसरीने उपयोग केला. तुमचे चार हजार डॉलर जवळ जवळ तसेच ठेविले आहेत व बहुतेक खर्चाची तजवीज परस्परच केली आहे. स्वतः तुम्हाला इकडे येता न आले तर केळकर किंवा दुसरे कोणीतरी गृहस्थ इकडे पाठवा. येथील काम पुढे चालू ठेविले पाहिजे कारण पुष्कळ परिश्रमाने व धोके सोसून आतापर्यंत ते चालविलेले आहे. बेझंटबाई इकडे येणार असे ऐकतो हे खरे काय ? माझे पुस्तक छापण्यास दिले आहे. हजार प्रतींचा खातरजमा देऊ शकत नाही पण पाचशे प्रति विकण्याची हमी घेऊ शकेन. कसेहि असले तरी पुस्तक लवकर बाहेर पडावे असे मला वाटते.

### ( १४१ ) लाला लजपतराय यांचे टिळकाना पत्र

न्यूयॉर्क ( बिनतारखेचे )

तुमचे पत्र सेन्सॉरने फोडून पाठविले. पण दुसरे पुडके फोडले नाही. तुमच्या पत्रकाला एक पान आणखी जोडून आम्ही त्याच्या ५००० प्रती काढून सर्व मोठमोठ्या लोकाना आणि वर्तमानपत्राना वाटणार आहो. आणखी लागतील असे वाटल्यास आणखी छापू. तेथील तुमच्या कामाचा अहवाल वाचून आनंद झाला. ब्रिटिश काँग्रेस कमिटीला व्यर्थ पोसले आहे. तो एक पांढरा हत्ती आहे. तितक्या पैशात अमेरिकेत कितीतरी काम झाले असते. तुम्ही पाठवलेल्या पैशापैकी आम्ही फक्त ५०० पौंड आतापर्यंत खर्चले. येथील आमची पद्धति अशी:—हिंदुस्थानासंबंधाची योग्य ती माहिती फक्त पत्रकातून द्यावी. उगाच इंग्रजसरकारवर हल्ला करणारी भाषा पत्रकातून योजू नये. कारण पत्रक वाचल्याबरोबर त्याविषयी ग्रह चांगला व्हावा.

## (५) विलायतेतील चळवळीचे समालोचन

वर दिलेल्या कागदपत्रांवरून टिळक विलायतेत गेल्यापासून परत येईपर्यंत तेथे त्यानी काय केले व त्यांच्यासंबंधाने काय घडले याची कल्पना वाचकाना आलीच असेल. पण या तुटक कागदपत्रावरून ध्यानात न येणाऱ्या विलायतेतील चळवळीच्या धोरणाविषयी काही गोष्टी थोडक्यात संकलित रीतीने खाली देऊन हे प्रकरण संपवितो.

टिळक विलायतेचा मुक्काम संपवून हिंदुस्थानात परत येण्याकरिता ता० ६ नोव्हेंबर १९१९ या दिवशी 'ईजिप्त' नामक बोटीवर बसले. त्या आधी तीन दिवस कॉंग्रेसच्या शिष्टमंडळाची सभा लंडन येथे ता. ३ नोव्हेंबर १९१९ रोजी भरली व त्याने अमृतसरच्या कॉंग्रेसकडे कामाचा अहवाल पाठविला. त्याचा सारांश असाः—

"शिष्टमंडळात प्रथम निवडलेले असे एकंदर सभासद म्हटले म्हणजे दिवाण माधवराव खापर्डे पटेल हसन इमाम केळकर बिपिन पाल व ए. रंगस्वामी अय्यंगार हे होते. टिळक हॉर्निमन व डॉ. मेहता हे मागाहून सामील करण्यात आले. व अगदी अखेर डॉ. साठ्ये व चेंचय्या हे समाविष्ट झाले. ब्रि. कॉं. कमिटीचे काम व इंडिया पत्राचे धोरण ही रा० सभेच्या धोरणाला मिळती करून घेण्याचे शिष्टमंडळाकडे पहिले काम होते. आम्ही येताच कमिटीशी बोलणे सुरू केले. 'इंडियापत्र' नेमस्त लोकांचे विचार पुढे मांडीत होते आणि हिंदुस्थानातील लोकमत लक्षात न घेता कमिटीने ८ जुलै १९१८ रोजी मॉंटेग्यू चेम्सफर्ड रिपोर्टाला पूर्ण संमति देऊन टाकली. त्यामुळे रा० सभेने ब्रि. कॉं० कमिटीला पैसे पाठविण्याचे थांबविले. ता. २६ फेब्रुवारी १९१९ रोजी खासगी रीतीने बोलणे झाले त्यात टिळकानी ब्रि. कमिटीला प्रश्न टाकला की दिल्ली येथील रा० सभेच्या ठरावांचे समर्थन तुमची कमिटी व तिचे मुखपत्र करणार की नाही! त्यावेळी तिकडून शिष्टमंडळ आले नव्हते. म्हणून डॉ. क्लार्क यानी असा गुळमुळीत जबाब दिला की ते मंडळ येईपर्यंत आम्ही फार तर तटस्थ वृत्ति ठेवू. यामुळे टिळकांची निराशा झाली व ते शिष्टमंडळाची उत्सुकतेने वाट पाहू लागले. आम्ही विलायतेस गेल्यावर कमिटीने प्रथम आमची व नंतर नेमस्तांच्या शिष्टमंडळाची गाठ घेतली. व तूर्त दोन्ही शिष्टमंडळाना कमिटीचे हपीस व लायब्ररी ही खुली ठेवावी असे ठरले. पटेल यानी आपल्या कामाला कमिटीची मदत मागितली तेव्हा डॉ. क्लार्क यानी उत्तर दिले की 'खुद्द रा० सभेतच ज्या अर्थी मतभेद झाला आहे त्याअर्थी ब्रि० कमिटीहि होता होईतो तटस्थ राहील व सर्व शिष्टमंडळांचा एक विचार करण्याची खटपट करील.' ता. १८ जून १९१९ रोजी कमिटीने नेमस्त शिष्टमंडळाची भेट घेतली तेव्हा सुरेंद्रनाथ बानर्जी यानी सांगितले की आम्ही मॉंटेग्यूसाहेबांच्या बिलाना संमति देणार. द्विदलराज्यपद्धति तूर्त आम्हाला चालेल आणि प्रांतिक

स्वातंत्र्याचा हट्ट तूर्त धरण्याचा आमचा विचार नाही. बेझन्टबाईनीहि जवळजवळ असेच सांगितले. त्यावरून या दोन शिष्टमंडळांची एकवाक्यता होणे शक्य नाही असे डॉ. क्लार्क यानी ठरविले. पण ब्रि० कमिटीतील हिंदी सभासदांचा कल काँग्रेस डेप्युटेशनकडे होता. तेव्हा शिष्टमंडळाने इंडिया पत्राला आपले धोरण काँग्रेसप्रमाणे राखण्याला स्पष्ट शब्दानी नोटीस दिली. इकडे इंडियापत्राच्या डायरेक्टरानी त्या पत्राने रा० सभेचेच धोरण स्वीकारले पाहिजे असे संपादकाला कळविले. नंतर कमिटीच्या सभेत बहुमताने इंडियापत्राच्या डायरेक्टर लोकांचा ठराव मान्य करण्यात आला व पत्राचे संपादक मि. पोलाक याना तो कळविण्यात आला. तेव्हा आपले काही चालत नाही असे पाहून पोलाक यानी आपल्या जागेचा राजीनामा दिला. यावेळी पोलाक यांच्या हाताखाली मिस् नॉरमॅन्टन या दुय्यम संपादकाचे काम करीत होत्या त्याना डायरेक्टरानी पोलाक यांचे जागी तात्पुरते नेमले व केळकर हे विलायतेत असेपर्यंत त्यानी इंडियापत्राच्या संपादकाचे काम करावे असेहि ठरविले. इंडिया हे पत्र स्वतंत्र असल्यामुळे, म्हणजे ब्रि. कमिटीच्या मालकीचे नसल्यामुळे, त्याची ही अशी व्यवस्था होऊ शकली. पण ब्रि० कमिटी स्वतःचे धोरण बदलीना. फक्त तिने प्रत्येक शिष्टमंडळातर्फे नेमलेला एक गृहस्थ कमिटीत सामील करून घेण्याचा ठराव केला. तेव्हा पटेल यानी कमिटीला लिहिले की ''तुम्हाला अशा रीतीने सर्वांशी सहकारिता करिता येत नाही. तुमची कमिटी ही रा० सभेचे एक उपांग आहे. म्हणून त्या सभेच्या धोरणाप्रमाणेच तुमच्या कमिटीने वागले पाहिजे. नाही तर कमिटीच्या लोकानी राजीनामे द्यावे. वास्तविक ब्रि० कमिटीला घटना अशी काहीच नव्हती. यामुळे तिला हवे तसे वागता येई. हे पाहून शिष्टमंडळाने कमिटीकरिता एक घटना तयार केली व ती कमिटीपुढे ठेविली. डॉ० रुदरफर्ड हे काँग्रेसच्या मताचे आधीपासूनच होते. व गोष्टी इतक्या थराला आलेल्या पाहून डॉ० क्लार्क हेहि मग वळले. नवीन घटनेप्रमाणे काँग्रेसच्या शिष्टमंडळाचा कमिटीत समावेश झाला व त्यामुळे कमिटीत काँग्रेसच्या बाजूचे बहुमत कायम झाले. तसेच यापुढे इंडिया पत्राचा संपादक हिंदी असावा त्याची नेमणूक काँग्रेसने करावी व त्याला सालीना ३५० पौंड पगार द्यावा असे ठरले. आणि इंडिया पत्राच्या कामात सल्लामसलत देण्याकरिता एक कमिटी नेमण्यात आली. कमिटीच्या हाती खर्चाची आगाऊ तजवीज असावी म्हणून काँग्रेसने सुरवातीलाच एकदा कमिटीला २५०० पौंड द्यावे तिने ते बँकेत ठेवून खर्च करावा आणि दरवर्षी काँग्रेसने तितकी नवी रक्कम पाठवीत जावी असेहि ठरले.

''शिष्टमंडळाचे हे फक्त एक काम झाले. पण आणखीहि तीन कामे त्याने केली. पहिले ब्रिटिश पार्लमेंटरी कमिटीपुढे साक्ष देणे. या कामी शिष्टमंडळापैकी प्रत्येक गृहस्थाची साक्ष घ्यावी असे आम्ही सरकारला लिहिले. पण सर्वांची न घेता पटेल व दिवाण माधवराव एवढ्यांचीच साक्ष घेऊ असे आम्हाला कळ-

विण्यात आले. याहून अधिक कोणाची साक्ष घेतली नाही. टिळकांचीहि साक्ष झाली पण ती त्यांच्या होमरूल लीगतर्फे झाली. याशिवाय शिष्टमंडळाने जाहीर सभा भरवून व्याख्याने देणे अधिकारी व पार्लमेंटचे सभासद यांच्या गाठी घेणे हीहि कामे केली. या सभाकरिता एकंदर ५०० पौंड खर्च आला. अधिक पैसा गांठी असता तर अधिक सभा करता आल्या असत्या. शिष्टमंडळ विलायतेस जाण्यापूर्वीहि टिळकानी होमरूल लीगतर्फे यातले बरेच काम आधी केले होते. व होमरूल लीगच्या पैशाचा उपयोग राष्ट्रीय सभेखातर व तिच्या नावानेहि करण्यात येत असे हा मोठाच फायदा झाला. टिळकानी लंडन इंडियन असोसिएशन ब्रिटन अॅन्ड इंडिया फेबियन सोसायटी नॅशनल लिबरलक्लब वगैरे संस्थातून चळवळ केल्यामुळे कॉंग्रेसच्या कामाची पूर्वतयारी होऊन राहिली होती. तसेच दिल्लीची रा० सभा व शिष्टमंडळाचे आगमन यांचे दरम्यान ३|४ महिने टिळकानी राष्ट्रीय सभेचे हेतू व सुधारणांची मागणी ही विलायतेतील लोकाना समजावून सांगण्याची खटपट चालविली होती. हाहि राष्ट्रीय सभेला फायदाच झाला.

"कॉंग्रेसच्या शिष्टमंडळाने विलायतेस येताच स्टेटसेक्रेटरीची भेट घेतली. व त्यांच्याशी काही खाजगी चर्चाहि झाली. मजूर पक्षाने पार्लमेंटच्या इमारतीत शिष्टमंडळाला एकदा मेजवानीला बोलाविले व फिरून एकदा उपहाराला बोलाविले. या प्रसंगी निरनिराळ्या अधिकाऱ्यांच्या गाठी पडून बराच विचारविनिमय करता आला. शिष्टमंडळाने होता होईतो विलायतेतील सर्व राजकीय पक्षाशी संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला. तथापि त्यांतल्यात्यात मजूरपक्षाशीच तो विशेष जडूं शकला. याचे कारण स्वराज्य व स्वातंत्र्य यांची या पक्षाला जन्मसिद्ध अभिरुचि आहे. लान्सबरी वेजवुड व स्पूर यांची मदत विशेष झाली. आणि स्पूर हे तर पार्लमेंटरी कमिटीचेच एक सभासद होते.

"विलायतच्या आपल्या मुक्कामात मंडळान रौलेट अॅक्ट पंजाबातील अत्याचार वगैरे बद्दलहि चळवळ केली. मतप्रसारार्थ टिळकानी शिष्टमंडळ येण्यापूर्वी स्वयंनिर्णयावर एक पत्रक लिहून त्याच्या हजारो प्रती लोकात वाटल्या होत्या. व त्याचा सर्व खर्च टिळकानीच केला होता. शिष्टमंडळ आल्यावर त्यानेहि आपली ५|४ पत्रके छापून वाटली. एकंदर प्रती सुमारे पन्नास हजार वाटल्या गेल्या. तसेच मुंबईच्या स्पेशल कॉंग्रेसच्या रिपोर्टाच्या एक हजार प्रती मोफत वाटण्यात आल्या."

यानंतर शिष्टमंडळाने विलायतेतील चळवळीचे काम पुढे कसे चालवावे याविषयी काही सूचना केल्या होत्या. पण त्यांचा तपशील देण्यात अर्थ नाही. कारण त्या अमलात येण्याला फारसा अवसरच मिळाला नाही. पुढच्याच साली असहकारिता सुरू झाली व त्याचा पहिला धक्का विलायतेतील चळवळीला बसला. ब्रि० कमिटी मोडली. इंडिया पत्र बंद पडले. आणि विलायतेत चळवळ करून सहानुभूति मिळविणे हे नव्या धर्मशास्त्राने पाप ठरविले!

अशा रीतीने एक काळ केवळ नेमस्त मते विलायतेत प्रसृत करण्याचा तर दुसरा काळ त्याच्या अगदी उलट म्हणजे विलायतेत मुळीच चळवळ न करण्याचा असा होऊन गेला. फक्त १९१९ चा हा मधला एक काळ असा येऊन गेला की त्यावेळी राष्ट्रीय सभेच्या नावाने व त्यांतल्या त्यात हिंदुस्थानात जी पुढारलेली जहाल पण राष्ट्रसंमत अशी मते असतील ती विलायतेत शिष्टमंडळाच्या तोंडून सांगितली गेली. कॉंग्रेसच्या शिष्टमंडळात टिळकांचा समावेश टिळकानी स्वतः हरकत घेतल्यामुळेच करण्यात आला नाही. त्याचे खरे कारण असे की टिळक हे सर्वांत मानाने वडील या दृष्टीने ते पुढारी बनून त्यांच्या नांवे मंडळाचा सर्व कारभार व पत्रव्यवहार चालणे हेंच रीतीचे ठरले असते पण काही नाही म्हटले तरी राजद्रोही म्हणून टिळकांचे नाव विलायतेत दूषित होऊन राहिले होते. टिळकाना पाहावे अशा इच्छेची माणसे देखील त्यांच्याकडे बुजऱ्या गुराप्रमाणे दुरून अंग चोरून तिरव्या डोळ्याने पाहात. आणि कारभार तर पडला पार्लमेंटरी अधिकाऱ्याशी. कॉंग्रेसच्या दरबारातहि बेझन्टबाईसारखे अनेक लोक असे होते की त्याना टिळकांच्या विशेष परिस्थितीमुळे कॉंग्रेसच्या शिष्टमंडळाचे पुढारीपण टिळकाकडे नसावे असे वाटे. टिळक शिष्टमंडळात नसावे असे म्हणण्याचे धैर्य कोणाचे होत नसे. पण ते त्यात असावे किंवा त्यानी त्यात पुढारपण घ्यावे असा प्रश्न निघाला असता हे लोक आडपडद्याने बोलून नकार देऊन ती सूचना मोडून काढीत. टिळकाना या सर्व गोष्टी माहीत होत्या. त्यांच्या मते सार्वजनिक हिताच्या दृष्टीने पाहता चिरोल केस आपणाविरुद्ध गेल्याने बरोबर म्हणा चूक म्हणा पण विलायतेतील लोकमत आपल्याविरुद्ध होऊन राहिलेले आहे तेव्हा आपला व्यक्तिदोष राष्ट्रकार्याला बाधू देणे योग्य नाही, त्यातल्या त्यात शिष्टमंडळाचे काम म्हणजे एक प्रकारे बारभाईची खेती, त्यात मतभेद हे असावयाचेच, तेव्हा अशा कामात पडण्यापेक्षा होमरूल लीगचा स्वतंत्र सुभा आपल्याला अनायासे मिळाला आहे त्यातच आपले काम स्वतंत्रपणे मनाला पटेल तसे करून घ्यावे. होमरूल लीगच्या शिष्टमंडळात मतभेद मुळीच नव्हता. निदान टिळक म्हणतील तसेच मनोभावाने वागणारे लोकच त्यात होते. होमरूल लीगची सर्व संघटनाच टिळकानी स्वतःच्या प्रयत्नानी केली होती. आणि लीगचे सगळे द्रव्यबळ त्याना म्हणून दौरे काढून एकवटता आले. अर्थात होमरूल लीगनेहि त्या सर्व पैशाचा विनियोग करण्याचा अधिकार आणि होमरूल लीगच्या नावाने विलायतेत जो कारभार करावयाचा त्याचा सर्व अधिकार मुद्दाम ठराव करून एकट्या टिळकांकडे सोपविला होता हेहि स्वाभाविकच झाले. बरे ज्या कॉंग्रेसच्या नावाने टिळक शिष्टमंडळात काम करणार त्या कॉंग्रेसचे अध्यक्षच त्याना आदल्या वर्षी निवडण्यात आले होते. तेव्हा मानसन्मानाच्या दृष्टीनेच पाहिले तर कॉंग्रेसच्या राज्यातील मान त्याना मिळावयाचा तो सर्व

मिळून चुकला होता. तात्पर्य या सर्व गोष्टींचा विचार करता टिळकानी स्वतःला कॉंग्रेसच्या शिष्टमंडळातून वगळले हे रीतीचेच झाले.

लीगचे प्रतिनिधि म्हणून त्यांचा मान झाला किंवा अपमान झाला तरी तो लीगपुरता. इतरांचा त्यात काही संबंध नाही. शिवाय एकाला दोन व्हावे त्याप्रमाणे टिळकाना पार्लमेंटरी कमिटीपुढे साक्ष देण्याला स्वतंत्र मार्ग मिळण्याचा तो मिळून पटेल वगैरे मंडळीनाहि पुढारीपणाने वावरण्याला मोकळीक झाली. कॉंग्रेसच्या शिष्टमंडळात अध्यक्ष किंवा पुढारी नेमण्याची पंचाईतच होती. दिवाण माधवराव हे वयाने वडील. परंतु त्यांच्याकडे यावेळी पुढारीपण देण्यासारखे त्यांचे वय नव्हते. ते वडील पण वृद्ध. चपळ कार्यक्षम नव्हते. बरे इतर कोणाला अध्यक्ष किंवा पुढारी नेमले तर त्याच्या ठिकाणी सर्वंकषता नाही. पटेलसारखे गृहस्थ पदोपदी त्याना चिमटे घेणार आणि बरोबरीच्या इतर लोकाना हेवा वाटणार. याकरिता राष्ट्रीय सभेने काय किंवा स्वतः शिष्टमंडळाने काय अध्यक्ष किंवा पुढारी असा कोणीच नेमला नाही. आणि विठ्ठलभाई पटेल हे कॉंग्रेसचे जनरल सेक्रेटरी म्हणून त्यांच्याच नावाने सर्व काम करण्यात आले.

पण ज्याला अंतस्थ माहिती आहे त्याला हे ठाऊक आहे, व पटेलहि हे कबूल करतील की, टिळकाना विचारल्याशिवाय पटेल इकडची काडी तिकडे करीत नसत. या शिष्टमंडळाचे बरेच सभासद आपल्या सोयीप्रमाणे एकामागून एक आले. अगदी प्रारंभी असे पटेल केळकर दिवाण माधवराव हेच गेले. आणि पटेल हे सर्वाधिकारी असल्यामुळे त्यानी जाताच आपल्या नावाने कामकाज सुरू केले. पण टिळक हे त्यांच्यापूर्वी बरेच दिवस विलायतेत होते व त्यानी वर दर्शविल्याप्रमाणे कॉंग्रेसच्या डेप्युटेशनचा मार्ग आधीच रचून बांधून साफ करून ठेविला होता. आणि तेथील सर्व मंडळीत पटेल हे जर कोणाचे ऐकतील तर टिळकांचे असेच परस्परांचे संबंध होते. शिवाय पैशाची सत्ताहि टिळकांच्याजवळ होती. कॉंग्रेसने शिष्टमंडळाच्या कामकाजाकरिता काही पैसे मंजूर केले होते पण ते थोडे होते. एकट्या पटेलशिवाय बाकीचे शिष्टमंडळाचे सभासद आपापल्या खर्चाने गेले होते. पण टिळकांच्या होमरूल लीगला भरपूर पैसा मिळाला असल्यामुळे लीगला आपल्या शिष्टमंडळाचा सर्व खर्च करता आला इतकेच नव्हे तर मजूर पक्षाला निवडणुकीच्या कामी मदत म्हणून तीस हजार रुपये टिळकाना एका रकमेने देता आले. आणि द्रव्यबळ हे कोणत्याहि चळवळीतील मुख्य बळ असल्यामुळे त्या बळाचा उपयोग टिळकाना पुष्कळच झाला. तात्पर्य, या वेळच्या विलायतेतील चळवळीत नाव कॉंग्रेसचे पण काम टिळक व पटेल यांचे अशीच खरी स्थिति होती.

यापूर्वी हिंदुस्थानातून विलायतेस वेळोवेळी शिष्टमंडळे गेली. काही हिंदी पुढारी, त्याना अनुकूल झाले व इष्ट वाटले तेव्हा, आपापल्या खर्चाने जाऊन त्यानी व्याख्याने वगैरे दिली. त्यानी केव्हा आपले नाव पुढे दामटले तर केव्हा कॉंग्रे-

सचे नाव पुढे केले आणि कॉंग्रेसनेहि त्यांचे आभार मानून गौरव केला. या सर्व गोष्टी झाल्या. तथापि १९१९ साली कॉंग्रेसच्या नावाने जसे व जितके काम झाले तितके पूर्वी झाले नव्हते आणि पुढे तर ते बंदच पडले. आता विलायतेतील चळवळीचा मूळ उगम नेमस्त पक्षाच्या द्वारेच झाला यात शंका नाही. बाबू उमेशचंद्र बानर्जी सुरेंद्रनाथ बानर्जी लालमोहन घोष यानी आपल्या वक्तृत्वाने हिंदी मुत्सद्यांना तिकडे प्रतिष्ठा मिळवून दिली होती. वऱ्हाडचे मुधोळकर हेहि जाऊन आले होते. मद्रासेकडील रंगानंद मुदलीयार डॉ. नायर परमेश्वरं पिल्ले वगैरे मंडळी जाऊन त्यानी काही कार्य केले होते. मुंबईचे चंदावरकर यानी तिकडे काही व्याख्याने दिली होती. फेरोजशाह मेथा मात्र या भानगडीत फारसे पडले नाहीत. वेलबी कमिशनच्या वेळी गोखले वाच्छा सुरेंद्रनाथ व सुब्रह्मण्यम् अय्यर यांचे शिष्टमंडळ जाऊन त्याने चांगले काम केले. विशेषतः ना. गोखले यांच्या तर, केवळ शिष्टाईकरिता म्हणून, विलायतेस चार खेपा झाल्या. व लिबरल मुत्सद्याना भेटून व व्याख्याने देऊन मुलाखती घेऊन जितके काही त्याना करता आले तितके त्यानी केले. आणि केले ते अर्थात पुष्कळच होते. लाला लजपतराय हेहि मधून मधून विलायतेस जात. त्यांचाहि उपयोग बराच झाला. आणि बेझन्टबाईविषयी तर बोलावयासच नको. कारण त्या दर एक दोन वर्षांनी विलायतेस जात व त्यांच्या प्रत्येक सफरीत त्यांच्या मताप्रमाणे व पद्धतीने हिंदुस्थानाला अधिक राजकीय हक्क मिळण्याबद्दल चळवळ होतच असे.

वरील इतर लोकापेक्षा बेझन्टबाईचे महत्त्व विलायतेत अधिक मानले जाई व मतप्रसाराला जी साधने लागतात ती त्यांच्या इतकी इतर कोणालाहि अनुकूल नव्हती. आधी त्या जातीने इंग्रज. सुप्रसिद्ध ब्रॅडलॉ साहेबांच्या बरोबरीने त्यानी मतस्वातंत्र्याची चळवळ ४०–४५ वर्षांपूर्वी केलेली. व तेव्हापासून त्यांचे नाव प्रसिद्धीला आलेले. वक्तृत्वात तर त्यांचा हातखंडा. विलायतेतीलहि प्रसिद्ध वक्त्यात त्यांची गणना. अनेक वर्तमानपत्राशी त्यांचा संबंध. आणि थिऑसॉफीच्या सांप्रदायात प्रत्यक्ष मिसळलेले किंवा दुरून त्याला सहानुभूति दाखविणारे व त्याची चहा करणारे भाविक सधन व वजनदार असेहि काही लोक बाईच्या पुठ्यात किंवा संग्रही नेहमी असावयाचे. यामुळे त्यातल्या त्यात एखाद्या मताबद्दल जर विलायतेत प्रसिद्धी मिळवावयाची असेल तर ते बेझन्टबाईना जितके सुलभ तितके इतर कोणालाहि ते नव्हते.

अशा रीतीने सर्वांनी विलायतेत यथाशक्ती चळवळ करण्याचे श्रेय पूर्वी संपादिले होते. पण याहि पेक्षा आणखी एक वेगळा वर्ग प्रामुख्याने सांगितला पाहिजे. तो म्हणजे दादाभाई ह्यूम वेडरबर्न कॉटन डिग्बी वगैरे आद्यांचा. दादाभाई हे हिंदी गृहस्थ असले तरी त्यांचा बहुतेक जन्म विलायतेत गेला व तोहि हिंदुस्थानच्या वतीने भांडण्यात. त्यांच्यापाशी लालमोहन घोस किंवा गोखले यांच्यासारखे मोहक वक्तृत्व नव्हते. फेरोजशाहसारखी रुबाबदारी नव्हती. वेडरबर्न

यांच्यासारखी श्रीमंती किंवा वरिष्ठवर्गात प्रवेश नव्हता. तथापि या सर्व गुणांची उणीव त्यानी आपल्या प्रामाणिकपणाने शीलाने परिश्रमाने अभ्यासाने आणि एकनिष्ठेने भरून काढिली होती. ह्यूमसाहेबानी राष्ट्रीय सभा इकडे स्थापन केली त्याप्रमाणे विलायतेत गेल्यावरहि हिंदुस्थानाकरिता खटपट केली. पण ते तिकडे गेले तेव्हाच वृद्ध झाले होते. आणि त्यांचा स्वभाव तापट बोलणे तुटस लिहिणे जहाल यामुळे त्यांचा धिम्या चळवळीला काही उपयोग झाला नाही. शिवाय हिंदी लोकांच्या आस्थेवाईकपणाविषयी त्यांची निराशा झाली होती यामुळे मधून मधून कडक शब्दांचे संदेश हिंदुस्थानाला पाठवून मद्दड हिंदी लोकांच्या पाठीवर जागृतीसाठी कोरडे ओढण्यापलीकडे त्यांच्या हातून फारसे काम झाले नाही. वेडरबर्न हे दादाभाईसारखेच सात्त्विक शांत. घरचे श्रीमंतहि. व समाजात वजनदार. तथापि त्यांच्या बुद्धिमत्तेचे किंवा वक्तृत्वाचे तेज त्यांच्या जात-भाईवर पडत नसे. म्हणून त्यांची खरी सेवा विलायती वर्तमानपत्रातून मधून मधून लेख लिहिण्यापुरतीच होई. सर हेनरी कॉटन हे पेन्शन घेतल्यावर तिकडे गेले आणि त्यापूर्वीहि त्यानी पुस्तके लिहून हिंदुस्थानची वकीली केली होती. पण विलायतेत त्याना वेडरबर्नइतकी मान्यता नव्हती. विलियम डिग्बी हे हिंदुस्थाना-करिता झगडणारे होते. पण ते निर्धन आणि समाजात त्याना वजन मुळीच नसे. काही लोक तर त्याना हिंदुस्थानचे पगारी वकील म्हणत. व काही अंशी ते खरेहि होते. तथापि दादाभाई व ही इतर मंडळी यानीच, लिबरलपक्षाच्या पंखा-खाली जाऊन का होईना, पण विलायतेतील चळवळीचा प्रारंभ केला. त्यांच्याच प्रयत्नाने इंडियन पार्लमेंटरी कमिटी स्थापन झाली व फॉसेटसारखे लोक हिंदु-स्थानच्या विषयात लक्ष घालू लागले. तथापि ब्रि० कॉं० कमिटी किंवा इंडियन पार्ले-मेंटरी कमिटी असली तरी हिंदी लोकच शक्य तितके विलायतेस जावे व त्यांच्या हातूनच चळवळीचे कार्य व्हावे अशी इंग्रज स्नेही मंडळींची अपेक्षा व इच्छा होती. आणि ती बरोबरच होती. त्याप्रमाणे प्रथम दादाभाई नौरोजी यानी व नंतर गोखले यानी ते काम सतत व पद्धतशीर केले. इतर लोकांचा उपयोग मधून मधून कसा झाला हे वर सांगितलेच आहे.

विलायतेतील या चळवळीला ह्यूम वेडरबर्न वगैरे लोकानी थोडीबहुत झीज सोसूनहि मदत केली. तथापि या चळवळीला पैसे हिंदुस्थानानेच पुरविणे योग्य होते व एकंदरीने पाहता तो बहुतेक पैसा राष्ट्रीय सभेनेच पुरविला. प्रथम १८९३ साली दादाभाई लाहोर कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून आले तेव्हा ब्रिटिश कमिटी आणि इंडिया वर्तमानपत्र यांच्याकरिता राष्ट्रीय सभेने दरसाल ६०००० रुपये विलायतेत पाठवावे असे ठरले. व त्याचा मोबदला म्हणून कमिटीने या पत्राच्या १०००० प्रतींपैकी काही तिकडे फुकट वाटाव्या व काही इकडे विक्रीला पाठवाव्या असे ठरले. हिंदुस्थानात इंडिया पत्राला दहा हजार वर्गणीदार मिळते तर सहा रुपये प्रमाणे ही ६०००० रुपयांची रक्कम सहज भरून निघती. सहा

वर्षांच्या अनुभवाने ही योजना निष्फळ आहे असे दिसून आले. इकडून जाण्याच्या रकमेपैकी सहा वर्षात एक लक्ष अठ्ठावीस हजार रुपये शिल्लक बाकी अंगावर राहिले. १९०१ साली तर ब्रिटिश कमिटीच्या कायम फंडातून सुमारे सहा सात हजार पौंड काढून भरावे लागले. हा कायम फंड हिंदुस्थानातच पण ह्यूम वेडरबर्न वगैरेंच्या प्रोत्साहनाने उभारण्यात आला होता. १९०२ साली ब्रिटिश कमिटीच्या देण्याची बाकी पूज्य करून दादाभाई नौरोजी यानी पुढील दोन वर्षांच्या खर्चाची हमी घेतली. व त्यानंतर राष्ट्रीय सभेच्या प्रतिनिधींच्या फीतून दरवर्षी परस्पर पैसे एकदोन रकमानी विलायतेत पाठविण्यात येऊ लागले. १८९४ पासून १९०३ पर्यंत दोन पासून तीन हजार पौंडापर्यंत रक्कम ब्रिटिश कमिटीच्या खर्चाकरिता दरसाल जात असे. १९०० साली मंजूर रक्कम साठ हजारावरून तीस हजारावर आली होती. पण दरसाल राष्ट्रीय सभा आपल्या ऐपतीप्रमाणे पैसे पाठवीत असे. १९०४ साली 'इंडिया' पत्र हे एका वेगळ्या कंपनीच्या मालकीचे केले. ते पत्र कमिटीच्या चळवळीकरिताच होते म्हणून कमिटीच्या हपिसाचा व लायब्ररीचा उपयोग इंडिया पत्राच्या संपादकाला व व्यवस्थापकाला होई. पण खर्चाच्या दृष्टीने ब्रिटिश कमिटी व हे वर्तमानपत्र यांची खाती वेगळी ठेवावी, तसेच काँग्रेसच्या स्वागतमंडळाने प्रतिनिधींच्या निम्म्या फीची रक्कम ब्रिटिश कमिटीच्या खर्चाला पाठवावी आणि इंडियापत्राचा खर्च त्याच्या कंपनीने भागवावा असे ठरले. पण या व्यवस्थेमुळे जमेचा अनिश्चितपणा टळला नाही. म्हणून १९१२ पासून वेगळी व्यवस्था करण्यात आली. ती अशी की काँग्रेसला पाठविता येईल तितका पैसा तिने पाठवावा व उरेल त्याची हमी काही हिंदी पुढाऱ्यानी घ्यावी. ही व्यवस्था १९१७ पर्यंतच चालू होती.

१९१७ पासून ही हमीदारी बंद पडली. १९१३ व १९१४ सालात राष्ट्रीय सभा अगदी संपुष्टात आली. यामुळे त्या साली फारच थोडी रक्कम विलायतेस पाठविता आली. पण १९१५ पासून ही रक्कम पुन्हा वाढली. याचे कारण राष्ट्रीयपक्ष टिळकांच्या प्रयत्नाने फिरून राष्ट्रीय सभेत समाविष्ट झाला. यामुळे व इतर कारणानी राष्ट्रीय सभेला लोक अधिकाधिक जाऊ लागले आणि फीची रक्कम वाढली. यामुळे १९१५ साली १६०० पौंड १९१६ साली १५०० पौड १९१७ साली १६०० पौंड व १९१८ साली २२०० पौंड अशी रक्कम विलायतेस गेली. अशा रीतीने विलायतेतील चळवळीचा खर्च होता होईल तो राष्ट्रीय सभेनेच भागविला. तथापि ही गोष्ट खरी की हिंदुस्थानातून पैसे पाठविण्याला केव्हा उशीर लागे व केव्हा तूट पडे त्यावेळी ब्रिटिश कमिटीतील लोकानी मधून मधून तात्पुरते आपल्या पदरचे पैसेहि पुढे करून खर्च भागविले व त्याबद्दल त्यांचे आभार मानलेच पाहिजेत. परदेशाकरिता इतके तरी कोण करतो ?

हिंदुस्थानात जोपर्यंत राष्ट्रीय सभेचे पुढारीपण नेमस्तांच्या हाती होते तोपर्यंत राष्ट्रीय सभेचे उपांग म्हणून ब्रिटिशकमिटीने जे काम केले त्यात मतभे-

दाला जागाच नव्हती. पण त्यानंतर हे ऐक्य टिकू शकले नाही. आणि बंगालच्या चळवळीपासून पुढे ब्रिटिशकमिटीच्या कामासंबंधाने इकडील लोकात दुमत होऊ लागले. ह्यूम वेडरबर्न दादाभाई कॉटन हे नेमस्त हिंदी पुढाऱ्यांचे स्नेही आणि जुन्या पिढीचे लोक. म्हणून राष्ट्रीय सभेत जहाल व मवाळ असा जेव्हा फरक पडू लागला तेव्हा या लोकांची सहानुभूति नेमस्तांकडे प्रगट होऊ लागली. सन १९०४ पर्यंत जहाल मवाळ हा भेद फारसा नव्हता. तोंपर्यंत टिळक हे वेडरबर्न कॉटन वगैरेना फार मानीत. पण पुढे नव्या मताना या जुन्या मित्राकडून पाठबळ मिळत नाही असे दिसून आल्यापासून टिळक ब्रिटिश कॉंग्रेस कमिटीबद्दल व इंडिया पत्राबद्दल तक्रार करू लागले. विलायतेतील सर्वच युरोपियन स्नेही नेमस्तांचे पक्षपाती होते असे नाही. उदाहरणार्थ हाइंडमन डॉ. रुदरफर्ड वगैरे लोक जहालांचेच कैवारी असत. पण राष्ट्रीय सभेत जशी जहाल व मवाळ यांची रणे पडली तशी विलायतेत ब्रिटिश कॉंग्रेस कमिटीत पडली नाहीत. याचे कारण हिंदुस्थानातील चळवळीची पद्धत वेगळी व विलायतेतील वेगळी.

दुसरेहि एक कारण असे की नेमस्त पुढारी हे स्वतः विलायतेस जाऊन व्याख्यानं देत आणि ब्रिटिश कमिटीशी संबंध जोडीत व वाढवीत. त्याप्रमाणे नव्या मताचे पुढारी म्हणजे टिळक अरविंद घोष चित्तरंजन दास या लोकानी या बाबतीत नेमस्त पुढाऱ्यांचे अनुकरण केले नाही. त्याना विलायतेत चळवळ नको होती असे नाही. पण इकडे हिंदुस्थानात चळवळीचा मूळ ध्वनि उत्पन्न करण्यात त्यांची सर्व शक्ति व द्रव्यसाधन खर्च पडत असल्यामुळे विलायतेत त्या ध्वनीचा प्रतिध्वनि उमटविण्याचे त्यांचे काम ढिले पडे. उलट नेमस्त पुढारी हे प्रायः असे समजत की मूळ ध्वनि उत्पन्न करावयाचा तो विलायतेतील लोकमतावर आणि त्याचा प्रतिध्वनि इकडे उमटवावयाचा. तिसरेही एक कारण असे की नवीन मताच्या पुढाऱ्याना विलायतेस जाऊन ती तिकडील लोकाना पटवून देणे ही साधी गोष्ट नव्हती. स्वदेशी बहिष्कार राष्ट्रीय शिक्षण राष्ट्रीय उत्सव निःशस्त्र प्रतिकार असहकारिता सत्याग्रह करबंदी व काही मर्यादेपुरता सशस्त्र प्रतिकार या नव्या कल्पना तात्त्विक दृष्ट्या सुशिक्षित इंग्रज लोकाना बुद्धिगम्य असल्या तरी आपल्या राष्ट्राविरुद्ध हिंदी राष्ट्राने अमलात आणावयाच्या ही गोष्ट त्याना कशी पटावी ?

राष्ट्रविशिष्ट किंवा नव्या कल्पनांचे केव्हांहि हे असेच आहे. गोवध आणि मिरवणुकीतील वाद्यवादन याकरिता आज हिंदुस्थानात रक्ताचे पूर वाहात आहेत. पण इंग्लंडात जाऊन यांचे मर्म इंग्रज लोकाना यथार्थपणे कोण समजावून देऊ शकेल ? बंगालच्या फाळणीने इकडे होमकुंड पेटविले. पण 'एका प्रांताचे दोन प्रांत केले' या कल्पनेत जहाल इंग्रजांची सिगारेट पेटण्याइतकीहि उष्णता नव्हती ! इंग्लंडात नॉन-कन्फॉर्मिस्ट लोक—शिक्षणविषयात सरकारशी भांडोत. पण सरकारची मदत न घेता सर्व शिक्षण आमूलाग्र खासगी प्रयत्नाने चालवावयाचे या कल्पनेत

हिंदी मनुष्याच्या मनाला जो तिढा पडतो तो इंग्रजांच्या मनाला पडणे शक्य नाही. बहिष्काराची ओळख इंग्रजाला आहे. पण अमेरिकेत आणि आयर्लंडात त्याचा उपयोग इंग्रजाविरुद्ध झाल्याने त्याच्याशी सद्भावनांचे साहचर्य आहे असे इंग्रंज मानीत नाहीत. कर न देण्याची चळवळ सतराव्या शतकात इंग्रजांच्या पूर्वजांनी केली. पण अलीकडील दोनतीन शतकात त्यांच्या घरी स्वराज्य असल्याने जुलूम केला तरी तो आपल्या प्रतिनिधींनी म्हणजे आपलाच आपल्यावर आहे, आणि चुका करणारे प्रधानमंडळ आपल्याला बदलून घेता येते, याविचाराने करबंदीपर्यंत त्यांच्या चळवळीची मजल जातच नाही. मताभिलाषी बायानी सत्याग्रह केला. पण हिंदुस्थानात तसले कारण नाही असेच इंग्रज मानतो. आणि ज्याच्या हाती जागते व खेळते स्वराज्य त्याला असहकारिता शब्दाचा अर्थ कसा कळणार ? कारण असहकारिता ही परक्या राज्यकर्त्यांशी करावयाची असते. म्हणून ती हिंदुस्थानात कळते. विलायतेत असहकारिता कळणे म्हणजे डाव्या हाताने उजव्याला व उजव्याने डाव्याला खाजवावयाचे नाही, हाताने तोंडात घास घालावयाचा नाही, आणि तोंडाने तो शरीराकरिता चावावयाचा नाही इतका विपरीतपणा इंग्रजाला असहकारितेंत वाटणार. निःशस्त्र प्रतिकार हे तर इंग्रज ढोंगच मानील. कारण ते त्याच्या बापजाद्याला कधीच माहीत नाही. सशस्त्र प्रतिकारात त्याचा पाय पुढे असतो. पण हिंदी लोकानी आपल्या जातभाईवर तो केलेला त्याला कसा खपेल ? स्वराज्यासंबंधाने त्याला स्वातंत्र्याची कल्पना चांगली आहे. पण स्वातंत्र्य हा पदार्थ त्याला आवडत असला तरी हिंदी लोकांना तो आवडतो असेच मुळी त्याला वाटत नाही. आणि त्याला तो आवडला तरी पचनी पडणार नाही तर त्याच्या अंगावर उलटेल असे त्याला वाटते. तात्पर्य विलायतेस जाऊन तेथील लोकापुढे आम्हाला वसाहतीसारखे काही तरी स्वराज्य पाहिजे असे आमच्या पुढाऱ्यांनी सांगितले तर तेथील लोकाना ते कळते व त्याचे कदाचित् कौतुकही त्याना वाटते. पण जी नवी साधने इकडील लोकांना सुचतात, आणि नवे तेज उत्पन्न करण्याकरिता ज्यांचा तात्पुरता तरी उपयोग इकडील पुढारी करून घेतात, ती साधने इंग्रजांची नव्हेत म्हणून त्याना पटत नाहीत ! साध्याची कल्पना त्यांची उचलली म्हणून पटते. पण साधनांपैकी अर्ज विनंती सभा व व्याख्याने यांच्याशिवाय इतर कोणतीहि साधने त्याना पटत नाहीत.

राष्ट्रीय पक्षातील नव्या पिढीच्या मार्गात ही अडचण मोठीच होती. आणि टिळक चित्तरंजनदास अरविंद घोस इत्यादि पुढारी चळवळीकरिता विलायतेत गेले नाहीत त्याचे हेहि एक विशेष कारण होय. विलायतेत इकडल्यापेक्षा जीभ थोडी अधिक सैल करून कोणी हिंदी गृहस्थ बोलला तरी चालते अशी इकडे समजूत आहे व ती काहीशी खरी आहे. विलायतेत अशा भाषणावर कोणी खटले करीत नाही. पण हिंदुस्थानात अधिकाऱ्यानी राजद्रोहाचा अर्थ फार विस्तृत आणि मतस्वातंत्र्याची मर्यादा फार संकुचित करून ठेवलेली आहे,

येवढ्यामुळेच विलायतेत राजकीय चळवळ किती व कशी करता येईल या विषयीचा सामान्य माणसाचा अंदाज भरमसाट असतो. निदान मजूर-पक्षासारखा नवा पक्ष जोरात येईपर्यंत तरी हा अंदाज चुकीचाच ठरणार होता. विलायतेतला पूर्वीचा जहालपक्ष म्हणजे लिबरल पक्ष किंवा रॅडि-कल पक्ष. पण हिंदुस्थानासंबंधी त्याची मते इकडील नेमस्तांच्या मतापलीकडे जात नव्हती. आणि इकडील नेमस्तानाहि आपणाकरिता उद्या कोणी काही करील तर हाच पक्ष करील म्हणून त्याला चिकटून बसावे असे सहजच वाटे. कारण स्वराज्याचा निदान पहिला कायदा तरी ब्रिटिश पार्लमेंटच्या हातूनच होणार असे आपल्यातील नेमस्तांचेच काय पण जहालांचेहि मत आहे. आयरिश बंडवाल्यानीहि खून पाडून शेवटी ब्रिटिश पार्लमेंटातील प्रधानमंडळाच्या द्वारेच हल्लीचे मर्यादित स्वातंत्र्य मिळविले. अर्थात् लिबरल किंवा रॅडिकल हाच पक्ष जोपर्यंत सर्वांत पुढारलेला व त्यातल्या त्यात अधिक उदारमतवादी असा होता तोपर्यंत त्यालाच धरून चिकटून राहणे हे नेमस्ताना स्वाभाविक होते.

पण हिंदुस्थानात जशी जहालानाहि मवाळ म्हणून घेण्याची पाळी आली तशीच इंग्लंडातील लिबरल–जहालाना मवाळ व पडे पहिलवान असे म्हणून घेण्याची पाळी आली. अर्थात् ही पाळी मजूरपक्षाने व त्यातल्या त्यात कम्युनिस्ट पक्षाने आणली. म्हणून हिंदुस्थानातील जहाल पक्षाच्या पुढाऱ्याना इकडे जसे एक पाऊल पुढे जावे असे वाटू लागले तसेच विलायतेतील चळवळीत देखील लिबरल पक्षाला धिःकारून मजूरपक्षाशी संबंध व संधान बांधणे त्याना योग्य वाटले. सुराला सूर आपोआपच भिडत असतो. इकडे नेमस्तानी साम्राज्यान्तर्गत स्वरा-ज्याची तार छेडावी व तिकडे विलायतेत लिबरल पक्षाने हिंदुस्थानातील सनद-शीर चळवळ करणाऱ्या, निदान मर्यादेत राहणाऱ्या, राजकीय पक्षाची स्तुति करावी हे जसे स्वाभाविक; तसेच इकडे स्वराज्य न मिळेल तर साम्राज्याचीहि गरज नाही असे म्हणणारा आणि सनदशीर चळवळीने भागत नसेल तर कायदा लाथाडणेहि योग्य ठरेल असे म्हणणारा पक्ष निघाला त्या बरोबर तिकडेहि संप वगैरे प्रतिकाराचे प्रकार प्रशस्त मानणारा वर्ग निघाला, आणि साम्राज्याच्या मद-तीने घरच्या जुलमी भांडवलवाल्या प्रधानमंडळाचे बळ वाढते ते सहन न होऊन साम्राज्य हे स्वतंत्रतेला विषासारखे आहे असे म्हणणारा मजूरपक्ष निघाला. अर्थात् एकाच्या सुराला दुसऱ्याचा सूर आपोआपच भिडला.

लिबरल पक्षाविषयी टिळकांची जुनी कृतज्ञता नष्ट झाली नव्हती. ह्यूम वेडरबर्न कॉटन वगैरे गृहस्थांची किंमत ते ओळखून होते. पण लॅन्सबरी वेजवूड स्पूर क्लाइन्स असल्या नव्या लोकांचे पाठबळ मिळण्याचे चिन्ह दिसू लागले, व त्यांचा पक्ष म्हणजे मजूर पक्ष हा उदयोन्मुख आहे असे विलायतेतील लोकहि म्हणू लागले, तेव्हा टिळकांच्या मनावरील कृतज्ञतेचा पाश ढिला पडून राष्ट्रीय स्वार्थाकरिता त्याना मजूर पक्षाच्या पुढाऱ्याशी नाते जोडावे असे सहजच

वाटू लागले. इकडे राष्ट्रीय सभेतच टिळकादिकांचे काही अखेरपर्यंत चालले नसते तर प्रश्नच नव्हता. पण १९१८ च्या सुमाराला नेमस्त लोक हळूहळू राष्ट्रीय सभेतून निघून गेले. राष्ट्रीय सभेच्या ठरावात चढता सूर लागू लागला. युद्धामुळे स्वराज्य व स्वयंनिर्णय यांची भाषा ग्राम्यतेतून संभावितपणात व नागरिकतेत आली. आणि प्रतिकाराचे पाऊल प्रत्यक्ष पुढे पडू लागल्याचे दिसू लागले. तेव्हा काँग्रेसच्या मताना विलायतेतहि पाठिंबा मिळावा अशी आकांक्षा उत्पन्न झाली. व ब्रिटिश काँग्रेस कमिटी व इंडिया पत्र ही जर राष्ट्रीय सभेची अंगे म्हणवितात व तिच्या पैशाने चालतात तर त्यानी राष्ट्रीय सभेची मतेच प्रतिपादिली पाहिजेत हे म्हणणे हक्काचे व न्यायाचे सहजच वाटू लागले.

पण ब्रिटिश काँग्रेस कमिटी ही नवे मत स्वीकारावयाला असमर्थ ठरली. आणि अंग व उपांग यातील हा मतभेद छपविण्याकरिता विलायतेतील कमिटीने असा नवाच डौल मांडला की "आम्ही विलायतेतील सल्लागार हेच विलायतेतील चळवळ कशी करावी हे ठरविण्याचे धनी व मुखत्यार आहोत. इकडे काय लिहावे काय बोलावे याचे ज्ञान काँग्रेसवाल्याना नाही व असणे शक्य नाही. म्हणून आमचा सल्ला काँग्रेसने विलायतेतील कामापुरता तरी मानला पाहिजे. इंग्रजाने सांगावे व हिंदी मनुष्याने ऐकावे ही परंपरा सनातन आहे ती येथेच कशी मोडेल ? ब्रिटिश पार्लमेंटकडून जर तुम्हाला राजकीय सुधारणा मिळवावयाच्या तर त्या पार्लमेंटकडून कशा मिळवाव्या यांचे ज्ञान आम्हाला जितके आहे तितके काँग्रेसला असणार नाही. तात्पर्य काँग्रेसचे नाव जोडून घेतल्यामुळे ब्रिटिश कमिटी ही जरी काँग्रेस घटनेचे एक उपांग असे कोणास दिसले तरी, मूळ काँग्रेसचीच स्फूर्ति आमच्या उत्पादकांकडून झालेली असल्यामुळे आम्ही मुख्य अंग व काँग्रेस हे उपांग असेहि म्हणणे शोभेल ! " पण हा युक्तिवाद कोण ऐकणार ? तिऱ्हाईताचे बोलणे आपल्याला पटले नाही तरी ते मुकाट्याने ऐकून घ्यावे लागते. पण द्रव्यसाधनाच्या दृष्टीने ब्रिटिश कमिटी व इंडिया पत्र ही पोष्य आणि काँग्रेस ही पोषक असा संबंध असल्यामुळे ब्रिटिश कमिटीचा हा युक्तिवाद सहज फिका पडू लागला. त्यातूनहि कमिटीचे मूळ उत्पादक ह्यूम वेडरबर्न हे निवर्तले. आणि त्यांची जागा घेणारे तितक्या जिव्हाळ्याचे लिबरल किंवा रॅडिकल पुढे येऊन लाभले नाहीत.

कमिटीतील विद्यमान इंग्रजापैकी डॉ. क्लार्क हे जहालांचे पक्षपाती. जुनेपुराणे दोस्त. त्याना ब्रिटिश कमिटी व काँग्रेस यांच्यासंबंधाचे मर्म पटून कमिटीने निदान तटस्थ राहावे येथपर्यंत आपल्या मनाला त्यानी मुरड घातली. पण इंडिया पत्राचे संपादक मि. पोलॉक हेच एकटे असमंजस ठरले. ज्यानी काँग्रेस सोडली अशा नेमस्त पुढाऱ्यांच्या बळावर ते इंडिया पत्राच्या द्वारे काँग्रेसवरच उलटून टीका करू लागले. यामुळे खरा विरोध उत्पन्न झाला व चकमक झडली. काँग्रेसचे शिष्टमंडळ काही एक निश्चित हुकूम घेऊन आलेले आहे व त्याप्रमाणेच ते मत-

प्रसार करणार हे माहित असल्याने ब्रिटिश कमिटीचे चेअरमन म्हणून डॉ. क्लार्क यानी पुढे पुढे शिष्टमंडळाला सर्व प्रकारे मदत केली. ब्रिटिश कमिटीचे ऑफिस लायब्ररी ही काँग्रेसच्या शिष्टमंडळाच्या पूर्णपणे स्वाधीन करण्यात आली. इंडिया पत्राच्या मदत–संपादकीण बाई मिस् नॉर्मेंटन यानी शिष्टमंडळाला कचेरीच्या कामाची मदत करावी असे ठरले. राहता एकच गणंग राहिला तो पोलॉकसाहेब ! त्या गणंगाची दाताखाली पूड होईना व मऊ जीभेने तो बाहेरहि निघेना. तेव्हा गणंग जसा शेवटी तोंडात करंगळी घालून बाहेर काढावा लागतो त्याप्रमाणे इंडिया पत्राला नवा संपादक नेमून पोलॉक साहेबांचा राजिनामा घ्यावा लागला ! काँग्रेसचा पगार घेत असता काँग्रेसच्या धोरणाविरुद्ध मजकूर इंडिया पत्रात लिहावयाचा असा आग्रह पोलॉक सारख्या स्वाभिमानी गृहस्थाने कसा धरला यांचे कोणालाहि आश्चर्य वाटण्यासारखेच होते.

ब्रिटिश कमिटीशी असा तंटा करण्यात कोणालाच मोठे सुख वाटत नव्हते. पण हा विरोध इतका दुस्तर झाला की शेवटी पोलाकसाहेबाना काढून टाकण्याचा वाईटपणा घेण्याशिवाय शिष्टमंडळाला गत्यंतर उरले नाही. कित्येकाना असा भ्रम आहे की टिळकानी विलायतेस जाऊन इंडिया पत्र बंद पाडले व ब्रि. काँग्रेस-कमेटी मोडून टाकली ! पण ही गोष्ट खोटी आहे. टिळकाना विलायतेत चळवळ चालावयाला हवी होती पण ती नव्या पक्षाच्या धोरणाने. विलायतेत चळवळ करण्याचे वावडे टिळकाना वाटत असते तर ते विलायतेस जातेच ना. हिंदुस्थानाला हवा तसा स्वराज्याचा कायदा प्रारंभी तरी ब्रि. पार्लमेंटकडून घेणेच प्राप्त ही गोष्ट टिळकाना मान्य होती. आणि काही लोक उल्कापातातील ताऱ्याप्रमाणे चमकून जाता जाता टिळकाना मवाळ म्हणून नावे ठेवीत तेव्हा ते हीच गोष्ट त्यांच्याविरुद्ध पुरावा म्हणून आणीत ! तसेच एकच गोष्ट पण ती विलायतेत व हिंदुस्थानात अशी दोन ठिकाणी थोड्या फरकाने व निराळ्या पद्धतीने मांडली पाहिजे ही गोष्टहि टिळकाना मान्य होती. किंबहुना ही गोष्ट त्यानी स्वतःच अमलात आणिली. म्हणून हिंदुस्थानातील त्यांची ऐकीव कीर्ति एक व येथील अनुभव निराळा म्हणून विलायतचे लोक केवळ या तुलनेने त्याना नेमस्त म्हणू लागले. पण नेमस्त हा शब्द तोच असला तरी गोखल्यांचे व टिळकांचे वर्णन त्यानी या एकाच शब्दाने कधीच केले नसते. उलट टिळक देखील हॉर्निमन चमनलाल यांच्या तुलनेने नेमस्त म्हणवून घेण्यास तयार झाले होते तरी त्यानी आपला मुद्दा कधीहि सोडला नव्हता. तो मुद्दा हा की 'मुंबई स्पेशल काँग्रेसने ज्या सुधारणांची मागणी केली किंवा शिष्टमंडळ पाठविताना त्याना ज्या मागणीचा आग्रह धरण्याची काँग्रेसने आज्ञा केली त्या मागणीला चिकटून राहणे' हे कर्तव्य होय.

एका बाजूला ही मागणी दिली करावी असे लिबरल पक्षाचे म्हणणे होते. बेझंटबाईहि तीच सवलत मिळेल तर काँग्रेसच्या शिष्टमंडळात येऊ असे म्हणत होत्या. जिनाहि तेच म्हणत होते. आणि दुसऱ्या बाजूस हॉर्निमन व चमनलाल

वगैरे लोक राष्ट्रीय सभेच्याहि पुढे जाऊन मागणी करावी असे म्हणणारे होते. पण टिळकानी या दोघांचाहि मार्ग न स्वीकारिता फक्त काँग्रेसचीच मागणी पुढे मांडावयाची असा निश्चय ठेविला होता. नक्की किमान म्हणून मागितले तरी ते सरकार देत नाही या दृष्टीने ते मागणे जहालच. उलट चमनलाल व हॉर्निमन हे निव्वळ ध्येयवादित्वाच्या दृष्टीने टिळकांच्या पुढे जाऊ शकतील हे संभवत नव्हते. पण मर्यादेची म्हणून रेघ कोठे तरी ओढावीच लागते. आणि त्यातल्या त्यात ती राष्ट्रीय सभेच्या मागणीला धरून ओढली तर हे हिंदुस्थानातील लोकमत व ही राष्ट्रीय सभेची स्पष्ट आज्ञा असे सांगून तिचे समर्थन तरी करता येईल. एवढ्याचकरिता टिळकानी ती मर्यादा म्हणून ठरविली होती. आणि ही मर्यादा सांभाळून विलायतेस तेव्हाच काय पण त्यापुढेहि जितकी चळवळ होईल तेवढी हवीच असे त्यांचे म्हणणे असे.

विलायतेहून टिळक परत येईपर्यंत ब्रि. काँ. कमिटी मोडली नाही. किंवा इंडिया पत्र बंद पडले नाही. एवढेच नव्हे तर काँग्रेस–शिष्टमंडळाच्या ज्या रिपोर्टाचा वर उल्लेख आम्ही केला आहे त्यातच विलायतेत पुढे चळवळ कशी चालू ठेवावी याविषयी विधायक सूचना केल्या आहेत. अमेरिकेत लजपतराय यानी केवळ हिंदुस्थानाला वाहिलेले मासिकपत्र सुरू केले होमरूललीगच्या शाखा काढल्या आणि अनेक ठिकाणी व्याख्याने देण्याची तजवीज केली याबद्दल रिपोर्टात लालाजींची स्तुती केली आहे. व त्यांचे उदाहरण देऊन विलायतेत देखील तशीच चळवळ झाली पाहिजे असे म्हटले आहे. "या पुढील निदान पाच वर्षे साम्राज्याच्या घटनेच्या इतिहासात फार महत्त्वाची ठरतील. राष्ट्रसंघ स्थापित झाला असून त्याच्यापुढे हिंदुस्थानाला स्वयंनिर्णयाचा आपला हक्क प्रस्थापित करावा लागेल. खुद्द इंग्लंडातहि बऱ्याच प्रकारची घडामोड होणार आहे. यामुळे विलायतेतील लोक साम्राज्यातील जितराष्ट्रांच्या तक्रारीकडे अधिक लक्ष देतील म्हणून स्वराज्याची चळवळ विलायतेपर्यंत नेऊन भिडविण्याला हीच उत्कृष्ट संधि आहे. अशी संधि पुनः येणार नाही. याकरिता हिंदुस्थानाबाहेर इंग्लंड अमेरिका युरोप या ठिकाणी सतत चळवळ चालू ठेवावी" अशी टिळकप्रभृति शिष्टमंडळाने शिफारस केली आहे. फक्त जुना इतिहास लक्षात घेऊन व पुढील कामाचा अंदाज बांधून त्यानी असे सुचविले की एक जुना अनुभवी व एक नवा तरतरीत असे दोन प्रमुख हिंदी गृहस्थ राष्ट्रीय सभेने वेळोवेळी नेमून ते ब्रि. काँ. कमिटीच्या जोडीने काम करण्याला पाठवावे. "मात्र त्या दोघाना राष्ट्रीय सभेच्या मताप्रमाणेच काम करण्याचा स्पष्ट हुकूम द्यावा. काँग्रेसने यावेळी शिष्टमंडळ पाठविले त्याचा अनुभव चांगलासा आला नाही. कारण त्यात आधी पुष्कळ लोक पाठविले आणि तेहि निरनिराळ्या स्वभावाचे व वृत्तीचे. असे दहा लोक दहा ठिकाणी व्याख्याने देण्याला गेले म्हणजे त्यांच्यात सहजच फरक पडतो. व राष्ट्रीय सभेचे म्हणणे

तरी खरे कोणते, हे की ते असा संशय लोकाना सहजच येतो. म्हणून एका वेळी मुख्य बोलणारा एकच व त्याला फक्त मदतनीस म्हणून दुसरा अशी जोडी पाठवावी. कोर्टात जसे एकाच पक्षकाराने वकीलपत्र दिलेले अनेक वकील असतात पण त्यातील श्रेष्ठ व प्रमुख तोच जबाबदारीने बोलत असतो व बाकीचे फक्त त्याला सुचवीत असतात त्याचप्रमाणे विलायतेतील हिंदुस्थानच्या वकिलातीचेहि व्हावे. अमेरिकेतहि जमल्यास अशीच वकिलात स्थापावी. ब्रि० कमिटी व इंडिया पत्र याकरिता हल्लीप्रमाणे सालीना ३०।४० हजार रुपये द्यावे. शिवाय आणखी ५०।६० हजार म्हणजे एकंदर सुमारे एक लक्ष रुपये सालीना खर्चण्याचा कॉंग्रेसने निश्चय करावा. ”

ही योजना सुचविण्यात टिळक सहीने नसले तरी कृतीने सामील होते. या योजनेचा पुढे काही उपयोग झाला नाही ही गोष्ट वेगळी. अमृतसरच्या राष्ट्रीय सभेपर्यंत ठीक चालले होते. त्या सभेनंतरहि इंडिया पत्र सुरू होते. इकडील हकीगती त्यात येत होत्या. कॉंग्रेसची मते प्रसृत करण्याचे काम त्याच्या द्वारे सुरू होते. पण पुढे इकडे असहकारितेचे वारे खेळू लागले. ज्या गांधीनी स्वतः पूर्वी विलायतेतील चळवळीला इतके महत्त्व दिले आणि विलायतेत राहून जातीने ती केली त्यानीच त्या चळवळीला बहिष्कार घातला. यामुळे ती चळवळ बंद पडली. कॉंग्रेसने पैसे पाठविण्याचे बंद केल्यावर इंग्रज लोक काय आपल्या खर्चाने कमिटी व पत्र चालविणार? त्यानी मनात आणले असते तरी ते झेपले नसते. उलट कॉंग्रेसजवळ या कामाला पुढे केव्हा पैसा नव्हता असेहि नाही. टिळक-स्वराज्य-फंडाची रक्कम एक कोटीपर्यंत जमली. त्यातील काही पैसा परदेशी चळवळीकरिता बाजूला ठेविला असता तर शिष्टमंडळाने १९१९ साली सुचविलेल्या योजनेप्रमाणे ही चळवळ अजून चालली असती. पण ते घडून आले नाही. उलट १९२० साली विठ्ठलभाई पटेल हे दुसऱ्याने आपले पूर्वीचे काम पुरे करण्याकरिता म्हणून विलायतेला गेले त्यावेळी टिळकानी त्याना पैशाची बरीच मदत केली ही गोष्ट प्रसिद्ध नसली तरी खरी आहे.

विलायतेतील चळवळीचा टिळकांपुरता हा इतिहास असा आहे. टिळकांच्या हाती पूर्वीपासून पैसा असता तर त्यानी हिंदुस्थानातल्या प्रमाणे परदेशच्या चळवळीकडेहि तो खर्च केला असता. त्यानी अमेरिकेत काम करणाऱ्या मंडळीना शक्य तेवढी पैशाची मदत वेळोवेळी केली. आणि एक रकमेने उचलून तीस हजार रुपये विलायतेतील मजूरपक्षाला दिले. यावरूनच हिंदुस्थानातील चळवळीला जोड म्हणून परदेशची चळवळहि टिळकाना अभिप्रेत होती हे स्पष्ट दिसून येईल. लाहोर कॉंग्रेसच्या आधी म्हणजे १८८९ साली ब्रॅडलॉ हे हिंदुस्थानात आले व राष्ट्रीय सभेला हजर राहिले तेव्हाच त्यांच्याशी टिळकानी या बाबतीत वाटाघाट केली होती. व पार्लमेंटमध्ये स्वराज्यविषयक बिल आणण्याचे जे काम हल्ली बेझंटबाईनी चालविले आहे त्याची पूर्वसूचना १८८९–९० सालाच्या सुमारासच झाली

होती. त्यावेळच्या बिलाची कलमे व या बिलाची कलमे ही अर्थात् वेगळी असणार. पण प्रयत्नाची दिशा एकच. या विषयावर विलियम डिग्बी व टिळक यांचा मधून मधून पत्रव्यवहार सुरू असे. आणि युद्धानंतर शिष्टमंडळे पाठविण्याची बोलवा सुरू झाली तेव्हा बॅ. बॅपटिस्टा याना विलायतेस पाठवून टिळकानीच तिकडील चळवळीला खरा प्रारंभ केला.

## ( ६ ) विलायतेतील मजूरपक्ष

विलायतेत टिळकानी अमुक एका दिशेने प्रयत्न करण्याची बाकी ठेवली नव्हती. अधिकाऱ्याना भेटण्याच्या रीतीने ते अधिकाऱ्याना भेटत. वर्तमानपत्राना मधून मधून कोणाकडून तरी लिहवीत. मजूरपक्षाशी त्यानी परिचय करून घेऊन डेली हेरल्ड पत्र आपलेसे केले होते. लॅन्सबरी व वेजवूड हे त्यांचे चहाते बनले होते. ब्रिटिश कॉंग्रेस कमिटीच्या ऑफिसचा व इंडिया पत्राचा उपयोग होईल तितका करण्याची खटपट त्यांची चालूच होती. पण पोलॉक साहेबानी त्याना बरेच दिवस दाद दिली नाही. कॉंग्रेसवर इंडिया पत्राने टीका करणे आणि पर्यायाने मॉंटेग्यूसाहेबांची मते हीच बरोबर असे प्रतिपादन करणे ही गोष्ट टिळकाना खपणारी नव्हती. व त्यावरून त्यांचा व पोलॉक साहेबांचा पत्रोपत्री खडाजंगी वाद झाला. इंडिया पत्राने आपली बाजू उचलून धरावी असे मॉंटेग्यूसाहेबाना वाटणे स्वाभाविक होते. कारण ते आपल्याकडून होईल तितके हिंदुस्थानचे हितच करीत होते. आणि पोलॉकसाहेबानी इंडिया ऑफिसच्या लोकाशी खासगी संबंध ठेवावा यात काही गैर नव्हते. पण हे सर्व स्वाभाविक असले तरी विलायतेत कॉंग्रेसची मते कोणी मांडावी याचे उत्तर पोलॉकसाहेबाना किंवा ब्रिटिश कमिटीला देता आले नाही. असो. शिष्टमंडळ विलायतेस जाईपर्यंत इंडिया पत्र हाती लागणे शक्य नाही असे ठरवून टिळकानी सेंट निहालसिंग यांचा उपयोग करून घेण्याची खटपट केली व त्याना लीगचे काम पगारी करता का असे विचारले. वर्तमानपत्रातील लेखक या नात्याने त्यांचा जम बरा बसला होता. ते लेखकहि चांगले होते. म्हणून होमरूल लीगचे काम करण्यास ते मिळविण्याचा प्रयत्न झाला. निहालसिंग यानी होय म्हटल्यावरून टिळकानी ता. २३ नोव्हेंबर रोजी त्याना लेखी अटी पाठविल्या. पण ' मी सर्व वेळ तुमचे काम करणार नाही. स्वतंत्रपणे करता येईल तेवढेच करीन ' असे त्यानी कळवल्यावरून टिळकानी त्यांचा नाद टाकला. होमरूललीगशी उघडपणे संबंध ठेवण्याला निहालसिंग हे तयार नव्हते असे दिसते. पैशाचेहि पटले नाही असे वाटते. निहालसिंग यांच्या स्वाधीन पंधराशे पौंड करावे आणि त्यात त्यानी शिष्टमंडळाच्या मुक्कामात प्रसिद्धी खात्याची सर्व व्यवस्था ठेवावी असे सुचविण्यात आले होते. पण अखेर काही जमले नाही असे दिसते. नंतर एडगर वॉलेस नावाच्या एका इंग्रज लेखकालाहि टिळकानी काही दिवस मतप्रसाराचे काम दिले होते.

टिळकानी लिबरल व रॅडिकल पक्ष मागे टाकून विलायतेतील मजूर पक्षाशी संबंध जोडण्याचा प्रयत्न केला हे मोघम विधान होय. पण हा मजूरपक्ष कोणता हे स्पष्ट करून सांगितले पाहिजे. कारण मजूरपक्षात देखील अनेक उपपक्ष आहेत. त्यात स्वतंत्र मजूरपक्ष अधिकारी मजूरपक्ष पार्लमेंटरी मजूरपक्ष क्रांतिकारक मजूरपक्ष व कम्युनिस्ट मजूरपक्ष असे भेद आहेत. पूर्वी सुरतेच्या राष्ट्रीय सभेनंतर घडलेल्या हकीगतीचे वर्णन देताना आम्ही असे म्हटले आहे की दोन परस्पर विरुद्ध टोंक सांधणारी अशी अनेक दुव्यांची साखळी कोणत्याहि समाजात एकत्र गाठलेली असते. मजूरपक्षाचीहि हीच स्थिति पूर्वी होती व आजहि आहे. त्यात त्या पक्षाच्या मानाने नरम गरम जहाल मवाळ असे भेद आहेतच. इतकेच नव्हे तर इकडील मवाळ जहालाप्रमाणे त्यांच्यातहि परस्पर स्पर्धा असतेच. आणि जो नवा मनुष्य या पक्षाशी म्हणून संबंध जोडावयाला जातो त्याला ही अडचण नेमकी येऊन पडते की या पक्षातील कोणाशी संबंध किती ठेऊ? हल्ली एका टोकाला श्रीमान् अमीर उमराव हे या पक्षात सामील झाले आहेत तर रक्तवर्ण रक्तातले किडे असे कम्युनिस्ट किंवा बोल्शेविक हे या पक्षाच्या दुसऱ्या टोकाला आहेत. दरम्यान सिडने वेब बर्नार्ड शॉ यांच्यासारखे बौद्धिक सोशियालिस्ट, वेजवूड स्पूर यांच्यासारखे पार्लमेंटरी सोशियालिस्ट, रॅम्से मॅक्डोनाल्ड फिलिप स्नोडन यांच्यासारखे स्वतंत्र विचाराचे आणि संप वगैरे उठावाचे उपाय योजण्याच्या विरुद्ध असणारे सोशियालिस्ट, लॅन्सबरीसारखे अशा उपायाना न भिणारे सोशियालिस्ट, स्माइली रॉबर्टस् यांच्यासारखे प्रत्यक्ष मजूरवर्गात वाढलेले आणि संप वगैरे निर्वाणीच्या उपायावर ज्यांची बहुतेक भिस्त असे सोशियालिस्ट, आणि त्याच्या पलीकडे मिसेस पॅंकहर्स्ट सकलातवाला यांच्यासारखे रशियाशी संबंध ठेवून त्याचे अनुकरण इंग्लंडात करू इच्छिणारे सोशियालिस्ट असे किती तरी आहेत. केवळ हिंदी मनुष्य म्हटला म्हणजे तेवढ्यावरून परदेशी मनुष्याला जसा त्याच्या विशिष्ट जातीचा बोध होत नाही त्याचप्रमाणे मजूरपक्षाचा मनुष्य किंवा सोशियालिस्ट म्हटला म्हणजे तेवढ्यावरून त्याच्या जातीचे किंवा गणगोत्राचे सविकल्पक ज्ञान आम्हालाहि होत नाही. नुसते नाना म्हटले म्हणजे पूर्वी इंग्रजाना फडणीस नाना किंवा बंडखोर नाना हा भेद कळत नसे त्याचप्रमाणे सोशियालिस्ट म्हटल्याने आम्हालाहि सूक्ष्म भेद कळत नाही. इकडे जेव्हा एखादा सोशियालिस्ट येतो तेव्हाहि तो मी अमुक उपपक्षाचा असे म्हणून येत नाही आणि आम्हीहि इतक्या खोलात जाऊन चौकशी करू इच्छित नाही. आम्हाला काय? सहानुभूति दाखविणारा एक इंग्रज अधिक झाला तितकेच सई. पण विलायतेत गेल्यावर अशा स्थूल विवेकाने चालत नाही. सूक्ष्मच विवेक करावा लागतो.

तसा प्रसंग येण्याला दादाभाईपासूनच सुरुवात झाली होती. दादाभाई ३०।४० वर्षे विलायतेस राहिले. हाइंडमनसारख्या लोकाशी त्यांचा संबंध आला. तथापि ते स्वतः पार्लमेंटमध्ये लिबरल म्हणूनच शिरले होते. मजूर पक्षांच्या

सभानाहि ते जात व ही गोष्ट कॉटन वगैरे लोकाना आवडत नव्हती. आणि त्यामुळे इकडच्या काही नेमस्तानाहि ती आवडत नव्हती अशी आमची समजूत आहे. पण दादाभाई हे जवळजवळ सर्वभेदातीत असण्याइतके इतके सात्त्विक होते. यामुळे ते आपल्या कामापुरता कोणाशीहि संबंध ठेवीत. मजूर पक्ष प्रबळ होण्याच्या काळी ते विलायतेहून इकडे परत आले होते. त्यांच्या नेमस्त अनुयायानी नंतर मजूर पक्षाशी संबंध ठेवलेला आढळत नाही. युद्धानंतरच मजूर पक्ष अधिक सरसावला. त्या सुमारास होमरूल लीगची चळवळ निघून टिळकानी बॅ. बॅपटिस्टा याना विलायतेस पाठविले. तेव्हा प्रत्यक्ष परिस्थिति पाहून बॅपटिस्टा याना असे दिसून आले की कॉन्झरव्हेटिव्ह पक्ष हा हिंदुस्थानाला वाढते राज्याधिकार देण्याचा विरुद्धच नेहमी राहणार. लिबरल व रॅडिकल पक्ष जवळजवळ अस्तंगत झाला. यापुढे मजूर पक्षच खरा उदयोन्मुख आहे. म्हणून होमरूल लीगने त्यांच्याशीच ऋणानुबंध जोडावा.

विलायतेहून बॅपटिस्टा यानी इकडे पन्नास पाऊणशे पत्रे पाठविली त्या बहुतेकात हीच कल्पना परोपरीने आळवून सांगितली आहे. टिळकानाहि दुरून तेच दिसत होते. आणि विरोधी पक्षातूनच पार्लमेंटमध्ये हिंदी राजकारणाचा समावेश झाला तर होऊ शकेल ही अटकळ त्यानी येथूनच बांधली होती. पुढे विलायतेस गेल्यावर तर सर्व प्रकार त्याना स्पष्टच दिसून आला. आणि त्यानी त्या पक्षाच्या आश्रयानेच आपली चळवळ केली. पण त्यातहि त्यानी नेहमीप्रमाणेच विवेक ठेवला होता. मजूर पक्षातील उपपक्षांची त्याना माहिती झाल्यावर होता होईल तो व त्यातल्यात्यात पार्लमेंटरी मजूर पक्षाशीच निकट संबंध ठेवणे हे अधिक श्रेयस्कर असे त्याना दिसून आले. केवळ एका कलाटणीत सर्व स्वराज्य मिळेल ही कल्पना त्यांच्या मनाला केव्हाहि शिवली नाही. आणि केव्हाहि मागच्या पुढे एकच पाऊल टाकावयाचे हे त्यांचे नेहमीचे धोरण असल्यामुळे—म्हणजे प्रथम स्वराज्यविषयक एखादे बिल विरोधी पक्षाकडून पार्लमेंटमध्ये घुसविणे हीच ती पहिली पुढची पायरी असे त्याना वाटत असल्यामुळे त्यातल्यात्यात जबाबदार व सामोपचारवादी असा जो उपपक्ष त्याच्याशी त्यानी आपले संबंध जोडले. या बाबतीत त्यांचे व बॅ. बॅपटिस्टा यांचे एकमत होते. बेझंटबाईहि मजूर पक्षाशी संबंध ठेवणाऱ्या असल्या तरी त्यातल्यात्यात पार्लमेंटरी मजूर पक्षाशीच संबंध ठेवीत. ही गोष्ट सकलातवाला यांच्यासारख्या जहाल मजूर पक्षीयांच्या लक्षात आली व त्याना त्याचा थोडासा हेवाहि वाटू लागला असे त्या वेळच्या पत्रव्यवहारावरून दिसून येते. उदाहरणार्थ खालील पत्र पहाः—

**सकलातवाला यांचे बॅपटिस्टा याना पत्र**

लंडन २३ जान्युआरी १९१८

" तुम्ही होमरूलर लोकानी स्वराज्याची जी घटना म्हणून तयार केली आहे ती इंग्लंडांतील हिंदी लोकाना आवडत नाही. तुम्ही येथे एकंदर हिंदी

जनतेचे नाव घेऊन जे काम करता व जे धोरण ठेविले आहे ते त्याना पसंत नाही. येथील हिंदी तरुणाना तुम्ही आपल्या विश्वासात घेत नाही. हल्ल येथील ट्रेड युनियन कॉन्फरन्सपुढे जे ठराव ठेवले ते असे तसेच होते. तुमच्या ठरावावरून हे उघड दिसून आले की आजचे व्यावहारिक राजकारण तुम्हाला कळत नाही व तुमचे धोरण साफ चुकीचे आहे. यापुढे तरी तुम्ही हा एकलकोंडेपणा सोडा. केवळ आपल्यापुरते पाहून समाधान न मानता स्वयंनिर्णयाचे खरे तत्त्व काय ते ओळखा. खरी लोकशाही हिंदुस्थानात प्रस्थापित करावयाची तर सगळी राजकारणाची मांडणी वेगळ्या पायावर करायला पाहिजे हे लक्षात आणा. आणि तुमच्या संकुचित धोरणामुळे या देशात हिंदुस्थानचे तुम्ही नुकसान करीत आहात हेहि नीट ध्यानात घ्या."

पण सकलातवाला यांचा बॅपटिस्टा यांच्यावर असा राग का झाला हे आता थोडक्यात पाहू. बॅपटिस्टा यानी हल्ल येथील मजूर परिषदेकडून जो ठराव पुढे आणविला त्याच्या पहिल्या भागात "हिंदुस्थानाला स्वयंनिर्णयाचा अधिकार ताबडतोब व सर्वकाळ मिळावा अशाविषयी मजूरपक्ष होईल तितका नेट धरून विलायत सरकारशी भांडेल व सामान्यतः होमरूलपक्षाचे धोरण या परिषदेला मान्य आहे" असा मजकूर होता. पण पुढे तपशिलात शिरून कॉंग्रेसची स्वराज्यविषयक मागणी कलमवारीने लिहिली होती. म्हणजे १ हिंदुस्थानची भाषावार प्रांतरचना करावी. २ अखिल भारतीय प्रश्न म्हणजे लष्कर आरमार परराष्ट्रीय संबंध वगैरे गोष्टी ब्रिटिश पार्लमेंटकडे राहाव्या पण पार्लमेंटने वसाहतीप्रमाणे त्या कारभारात हिंदुस्थानचे म्हणणे ऐकून घ्यावे. ३ जबाबदारीचे तत्त्व वरिष्ठ व प्रांतिक कारभारात प्रविष्ट व्हावे" इत्यादि इत्यादि. या ठरावाला सकलातवाला व इतर तेरा हिंदी गृहस्थ यानी विरोधदर्शक एक पत्र परिषदकडे पाठविले. त्यांचे म्हणणे असे की "याप्रमाणे हिंदुस्थानची राज्यघटना झाल्यास सुशिक्षित अभिजात व श्रीमान् अशा वर्गाकडेच राजकीय सत्ता राहील. या घटनेत हिंदुस्थानातील लोक वरिष्ठ वर्गाच्या दास्यात कायमचे राहतील अशीच योजना आहे. पण इंग्लंड व युरोप खंड यातील सोशियालिस्ट लोकानी जी तत्त्वे आज मान्य केली आहेत आणि ज्या तत्त्वाना अनुसरून हल्ल येथील परिषदेचे इतर ठराव होणार आहेत त्याशी होमरूल लीगचे हे धोरण विसंगत आहे. हे पत्र पाठविणाऱ्या आम्हा लोकांचे या परिषदेत कोणी ऐकणार नाही हे आम्ही जाणून आहोत. आणि हिंदुस्थानातहि नोकरशाहीच्या सत्तेखाली आम्हा लोकांची तीच स्थिति आहे. तरी परिषदेला आमची विनंती अशी की तिने या ठरावापैकी पहिला म्हणजे स्वयंनिर्णयाच्या अधिकाराचा तेवढा सर्वसामान्य ठराव मांडून पास करून घ्यावा. कारण तपशीलाच्या गोष्टी वादग्रस्त आहेत. तसे न झाले तर ब्रिटिश साम्राज्याला ज्या धनिक व भांडवलवाल्या लोकांचा मुख्य आधार आहे त्याच्या सत्तेला आपल्या या परिषदेने मान्यता दिली असे मनात नसताना घडेल. खऱ्या लोकशाहीचे धनी

म्हणजे जी सामान्य जनता तिचे आधी संघटन केले पाहिजे. ज्याना आधीच अधिकार मिळालेले आहेत अशा धनिक व श्रेष्ठ वर्गाचे अधिकार अधिक दृढ करणे हे काही या परिषदेचे काम नाही."

या पत्रावर सकलातवाला यांच्याशिवाय ज्या हिंदी लोकांच्या सह्या होत्या त्याची नावे खालील प्रमाणे:—मेथा अझम दत्त खान जव्हेरी मुकंदीलाल झमाल मिर्झा शंकर सरण भट भुंगारा खंबाटा व दुबाश. या गृहस्थापैकी सकलातवाला यांचे नाव प्रसिद्ध असून ते दोन वेळ पार्लमेंटमध्ये निवडूनहि आलेले आहेत. इतर तेरा गृहस्थांची नावेहि बहुधा कोणाच्या ऐकण्यात नाहीत. हे लोक आपापल्या परीने विलायतेत हिंदुस्थानासंबंधी चळवळ करीत असतील व सोशियालिस्ट पक्षात त्यानी आपली नावे दाखल केल्याचे दिसून येते. पण त्या पक्षात त्याना फारसे महत्त्व नव्हते अशी कबुली या पत्रातच दिलेली आहे. अर्थात बॅपटिस्टा यानी होमरूल लीग आणि काँग्रेस यांच्या मताचा अनुवाद करावा की अशा तेरा किरकोळ गृहस्थांचे म्हणणे मान्य करावे? याच अर्थाचे पत्र इंडो ब्रिटिश असोसिएशनचे सेक्रेटरी मि. फिलिप गी यानी ट्रेड यूनियन काँग्रेसच्या सभासदाना पाठविले होते. त्यात त्यानी असे लिहिले होते की "ज्याला होमरूल पक्ष म्हणतात त्यात ब्राह्मण वकील जमीनदार अशा लोकांचाच भरणा आहे. पैकी ब्राह्मण हे हिंदुस्थानात शेकडा आठ इतकेहि नाहीत. असे असता कनिष्ठ वर्गाला त्यानी दडपून ठेवले आहे. आणि ब्राह्मण हेच ब्रिटिश राज्यसत्ता उलथून टाकण्याच्या प्रयत्नात प्रमुख असतात. वरिष्ठ कायदेकौन्सिलच्या ज्या एकोणीस सभासदानी सुधारणांची मागणी प्रथम केली त्यात निम्मे वकील आहेत. त्यांचा धंदा लोकात तंटे वाढविण्याचा असतो. ते सावकार लोकाशी मिळून काम करतात व गरीब शेतकऱ्यांच्या जमिनी हिसकवून घेण्याला मदत करतात. अशा स्थितीत होमरूल देण्याने गरीब हिंदी जनतेवर जुलूम करणारा अभिजात वर्ग व दुसऱ्यांचे रक्त पिऊन जगणारे वकील यांच्या हाती मुख्य सत्ता दिल्यासारखे होईल. म्हणून मजूरपक्षाने होमरूलचा पुरस्कार करणे हे त्याच्या उच्च ध्येयाला विसंवादी होईल. होमरूलच्या हल्लीच्या योजनेने मुसलमानासारखे अल्पसंख्याक व अस्पृश्यासारखे पिढ्यान पिढ्या गांजलेले लोक यांच्या माथी दास्य कायमचे मारले जाईल. पुष्कळ भागात मुसलमानावर हिंदूनी हल्ले करून त्यांच्या स्त्रिया भ्रष्ट केल्या आहेत! अशा स्थितीत खरी लोकशाही कशी अवतरेल? खरे स्वराज्य प्रस्थापित व्हावयाचे तर ते हिंदुस्थानातील अधिकारीच करू जाणत व करू शकतील. कारण त्यांच्याच अंमलाखाली सामाजिक स्थिति हळूहळू बदलत चालली आहे. म्हणून मजूरपक्षाच्या या परिषदेने बॅपटिस्टा यानी सुचविलेला ठराव मान्य करू नये!" या पत्रावरून परस्पर विरुद्ध अशा दोन दिशानी होमरूल लीगच्या विरुद्ध प्रयत्न कसे चालले होते हे दिसून येईल. अखेर बॅपटिस्टा यांच्या ठरावापैकी पहिलाच भाग तेवढा परिषदेने मंजूर केला. इंडो ब्रिटिश असोसिएशनच्या लुडबुड्या सेक्रेटरीला ही

थप्पडच मिळाली. पण लुडबुडे लोक थपडीला भीत नसतात. इंडो ब्रिटिश असोसिएशन म्हणजे इकडल्या अँग्लो इंडियन लोकांचा संघ. त्याने बॅपटिस्टांच्या ठरावाला विरोध केला एवढ्यावरूनच ठरावाचे मर्म परिषदेच्या लक्षात यावयास पाहिजे होते.

असो. विलायतेत होमरूल लीगच्या मार्गात अशा अनेक प्रकारच्या अडचणी होत्या. "तुम्ही हिंदुस्थानचे खरे प्रतिनिधी नाही. हिंदी जनतेकरिता बोलण्याचा तुम्हाला अधिकार पोचत नाही" असे एकीकडून कॉन्झरवेटिव्ह पक्ष म्हणणार तर विलायतेतील जहाल मताचे बेजबाबदार हिंदी लोकहि तेच म्हणणार. पण या दोन्ही वर्गाच्या विरोधाला न जुमानता प्रथम बॅ. बॅपटिस्टा व नंतर टिळक याना आपला मार्ग या दोन डोंगरामधूनच काढावा लागला. व बेझंटबाईहि तेच धोरण नेहमी ठेवीत होत्या. राष्ट्रीय सभेत आज सामान्य जनतेचा जितका शिरकाव व्हावयास पाहिजे असेल तितका शिरकाव झाला नसेल. अजून वरिष्ठ व मध्यम वर्गाचे महत्त्व राष्ट्रीय सभेत असेल. तरी पण हिंदी जनतेच्यातर्फे बोलण्याचा अधिकार कॉंग्रेस व होमरूललीग अशा संस्थानाच आहे. सोशियालिस्ट लोकांच्या दृष्टीने जिला अस्सल लोकशाही म्हणता येईल तिच्या हाती कालांतराने राष्ट्रीय सभा जाईलहि. पण या सर्व गोष्टी क्रमाक्रमानेच घडून याव्या लागतात. म्हणून टिळकानी विलायतच्या मुक्कामात पार्लमेंटरी मजूर पक्षाशी संबंध ठेवला ही गोष्ट यथायोग्यच होती. विलायतेहून परत आल्यावर कॉंग्रेस डेमोक्रॅटिक नावाचा पक्ष स्थापन करून त्याच्यामार्फत कौन्सिलातील सत्ता मिळण्यासारखी असेल ती होमरूलर व कॉंग्रेसवाले यांच्याच हाती ठेवण्याचा टिळकानी प्रयत्न केला. पण गांधी यांच्या प्रयत्नाने व धोरणामुळे कनिष्ठ वर्ग जरी हळूहळू राजकारणात पुढे येत असला तरी गांधीनींदेखील अभिजात वर्ग धनिक लोक आणि भांडवलवाले यांचा संबंध सर्वस्वी तोडलेला नाही. स्वतः त्यानी किंवा त्यांचे धोरण संभाळणाऱ्या राष्ट्रीय सभेनेहि सोशियालिस्ट पक्षातील ज्वलज्जहाल लोकांची तत्त्वे अंगिकारलेली नाहीत.

विद्यमान कॉंग्रेसच्या आधारावर वरिष्ठ कायदे कौन्सिलात जे लोक शिरले व ज्यानी कॉंग्रेस पार्टी किंवा स्वराज्य पार्टी कौन्सिलात बनविली त्यानी तीन वर्षापूर्वी टाटांच्या पोलादी कारखान्याला सरकारकडून मदत देवविली. आणि यंदा गिरणीवाल्यानाहि त्यानीच मदत दिली. कॉंग्रेसचे धोरण अजून केवळ मजूरपक्षालाच उचलून धरण्याचे नाही. राजकीय चळवळीत धनिक व सुशिक्षित लोकाना अजून स्थान आहे व त्यांचा अजून उपयोग आहे. आणि त्यांच्याशी सहकारितेने तो उपयोग करून घ्यावा असेच आज १९२७ साली राष्ट्रीय सभेचे धोरण आहे. पण याहून आणखी मुद्द्याची एक गोष्ट येथे सांगितलीच पाहिजे ती ही की, ज्या सकालतवाल्यानी होमरूललीगला विलायतेत विरोध केला ते परवा हिंदुस्थानात येऊन गेले तरी कोणत्याहि कॉंग्रेस संस्थेने त्यांचे ऐकून आपल्या धोरणात बदल केलेला नाही. कॉंग्रेसला आज हिंदुस्थानातले गरीब लोक

जसे हवेत तसेच धनिकही हवेत. शेतकरी कुळांचा वर्ग जसा तिला हवा तसेच जमीनदार व इनामदारहि हवेत. आणि जसा मजूरवर्ग हवा तसाच भांडवल-वाल्यांचाहि वर्ग तिला हवा आहे. किंबहुना ह्यापैकी कोणत्याहि एका वर्गाला अधिक जवळचा व दुसऱ्या वर्गाला अधिक दूरचा असे न मानता जेथे जेथे त्यातील निरनिराळ्या वर्गांचा विरोध दिसून येईल तेथे तेथे केवळ न्यायबुद्धीने दोघां-च्याहि हिताचा होईल तितका मेळ घालावा दोघांचा मिलाफ करावा आणि दोघा-कडूनहि राष्ट्रीय कार्य करवून घ्यावे असेच धोरण राष्ट्रीय सभेने राखले आहे. दोन वर्षांपूर्वी विलायतेहून सकलातवाला यानी स्वराज्यपक्षाचे पुढारी पंडित मोतिलाल नेहरू याना लिहून विलायतेतील कॉंग्रेस पक्षाची वकिली आपल्या हाती द्यावी असा प्रयत्न केला होता. पण स्वराज्य पक्षाने त्यांचे म्हणणे न ऐकता त्याना हातभर दूरच ठेवले.

या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या असता आठ वर्षांपूर्वी टिळकानी विलायतेत ज्वल-जहाल सोशियालिस्ट लोकाशी वाजवीहून अधिक संबंध ठेवला नाही यात त्यानी वावगे केले असे कोणीहि म्हणणार नाही. विलायतेतल्या मजूरपक्षात आज देखील सकलातवाला यांचे धोरण सर्वमान्य नाही. आणि टिळक विलायतेत होते तेव्हा तर बोल्शेव्हिझमसंबंधाने नुकती चळवळ सुरू झाली होती. रशियातील मजूर-पक्षाशी पार्लमेंटरी मजूरपक्ष बंधुत्वाचे नाते जोडण्याला तयार नव्हता. आणि टिळ-काना तर पार्लमेंटरी मजूरपक्षाकडूनच आपले काम करवून घ्यावयाचे होते. म्हणून त्यानी सकलातवाल्यासारख्या लोकाशी व्यक्तिशः खासगी स्नेह ठेवला व त्यांच्या घरी आले गेले तरी कॉंग्रेसची मागणी हीनदीनपणाची व घातक असे ठरवून सकलातवाला यांच्या मतांचा स्वीकार त्यानी केला नाही ही गोष्ट सरळच झाली. पण या बाबतीत टिळकाना घरगुती त्रास सोसावा लागला नाही असे मात्र झाले नाही. होमरूललीगचे प्रतिनिधी राष्ट्रीय सभेचे नियोजित अध्यक्ष व तिच्या शिष्टमंडळा-तील एक प्रमुख गृहस्थ या नात्याने विलायतेत टिळकांची जबाबदारी काय होती हे न ओळखिता त्यांच्याच प्रभावळीतील काही लोकानी सकलातवाला मिसेस पँक-हर्स्ट यांच्या उज्ज्वल मताकडे पाहून हुरळून जाऊन टिळकाना जवळ जवळ मवाळात काढले. विलायतेत टिळकाना ज्या अनेक अडचणी सोसाव्या लागल्या त्यातलीच हीहि एक होती. आणि कॉंग्रेसने नेमून दिलेल्या मदतनिसानी किंवा खासगी दुय्यम प्रतीच्या सहकारी लोकानी पदोपदी अशा अडचणी आणाव्या यावरून आपल्या लोकात अद्यापि शिस्त फार कमी आहे ती आपणास अजून पुष्कळशी शिकावयाची आहे असे मनाला पटून त्याना फार खेद होई.

# परिशिष्ट ( १ )

## लो. टिळकांचा तह्परिषदेस अर्ज

दिल्लीच्या कॉंग्रेसने लो. टिळक महात्मा गांधी आणि सय्यद हसन इमाम यांची तहपरिषदेकरिता हिंदुस्थानचे प्रतिनिधि म्हणून निवडणूक केली. त्या ठरावास अनुसरून लो. टिळक यानी तहपरिषदेचे अध्यक्ष मशूर जॉर्ज क्लेमेंको याजकडे हिंदुस्थानच्या वतीने पुढील मजकुराचा अर्ज रवाना केला तो असा:—

१. तहपरिषदेने प्रसिद्ध केलेल्या नियमातील नियम नं. ११ स अनुसरून आणि दिल्ली-कॉंग्रेसच्या पुढे दिलेल्या ठरावाच्या आधारे मी अशी विनंति करतो की आपण हा अर्ज अनुकूल विचाराकरिता तहपरिषदेपुढे मांडावा.

२. तहाच्या अटी ठरविण्याकरिता जमलेल्या परिषदेने ' हिंदुस्थान हे एक विशिष्ट हितसंबंध असलेले युद्ध्यमान राष्ट्र असून ब्रिटिश साम्राज्याच्या वतीने जो प्रतिनिधिसमूह हजर राहील त्याच्याशिवाय हिंदुस्थानच्या वतीने दोन प्रतिनिधि तहपरिषदेत हजर राहावे ' असा ठराव केलेला ऐकून हिंदुस्थानास निर्भेळ आनंद झाला आहे. परंतु हल्ली हिंदुस्थानात जी अनियंत्रित राज्यपद्धति आहे त्या पद्धती-मुळे हिंदुस्थानच्या वतीने हिंदी राष्ट्राला जबाबदार असा मंत्री तहपरिषदेकरिता प्रतिनिधि म्हणून येऊ शकत नाही हे दुर्दैव होय. राजकीय दृष्ट्या हिंदुस्थानचे एक ' ब्रिटिश इंडिया ' व दुसरा ' नेटिव्ह संस्थाने ' असे दोन विभाग पडतात. यातील नेटिव्ह संस्थानांच्या वतीने हिंदुस्थानसरकारनेच बिकानेरच्या महाराजांची निवडणूक केली आणि ' ब्रिटिश इंडिया 'च्या तर्फे सर सत्य प्रसन्न ( आता लॉर्ड बनलेले ) सिंह यांची योजना केली. परंतु ही निवडणूक लोकमत न विचारता व लोकांची संमतिहि न घेता करण्यात आली आहे. यासंबंधी लोकमत काय आहे ते दिल्ली येथील कॉंग्रेसच्या अध्यक्षांच्या भाषणावरून दिसून येईल. अध्यक्ष म्हणाले ' हिंदी लोकांचे जे प्रतिनिधि कौंसिलात आहेत त्यांच्या शिफारशीस अनुसरून हिंदुस्थानसरकारने नेमलेला असा आमचा प्रतिनिधि तहपरिषदेत नाही ही खेदाची गोष्ट आहे. हा दोष दूर करण्याकरिता दिल्लीच्या कॉंग्रेसने मि. गांधी मि. सय्यद हुसेन व प्रस्तुत अर्जदार मि. टिळक या तिघांची प्रतिनिधि म्हणून निव-डणूक केली. '

तहपरिषदेत हिंदुस्थानच्या तर्फे वेगळा प्रतिनिधि घेण्याचा ठराव झालेला कळताच मी इंग्लंडच्या प्रधानास पत्रद्वारे अशी सूचना केली की हिंदुस्थानातील निरनिराळ्या संस्थानी मिळून एकंदर १२ प्रतिनिधि निवडावे आणि मग त्यातून योग्य प्रतिनिधींची वेळोवेळी निवड व्हावी. परंतु स्टेट सेक्रेटरीनी ' या सूचनेस मला पाठिंबा देता येत नाही ' असे उत्तर पाठविले. सुधारणेच्या योजनेसंबंधी सरकार व हिंदी प्रजा यांच्यात जो मतभेद उत्पन्न झाला आहे तो लक्षात घेता

स्टेटसेक्रेटरीचा हा नकार शोचनीय आहे. अशा परिस्थितीत तहपरिषदेच्या नियम नं. ११ स अनुसरून मी पुढील विनंति–अर्ज तहपरिषदेच्या विचाराकरिता पाठवीत आहे. या छोट्या अर्जांत सुधारणेच्या योजनेविषयी लोकमताची बाजू सविस्तर पुढे मांडणे शक्य नाही. परंतु माझी बाजू कोणत्याहि कमिटीपुढे मांडावयाला किंवा मला ' पासपोर्ट ' मिळाल्यास तहपरिषदेपुढे समक्ष प्रतिपादन करण्याला मी तयार आहे. दिल्ली--काँग्रेसचा माझ्या निवडणुकीचा ठराव होण्याच्या पूर्वीच ' वर्तमानपत्रकार ' या नात्याने मी तहपरिषदेला जाण्याविषयी ' पासपोर्ट ' मागितले होते. परंतु ' प्रेक्षक म्हणून परिषदेला हजर राहण्याची तुमची इच्छा सफल होऊ शकणार नाही ' असे म्हणून ब्रिटिश सरकारने मला पासपोर्ट देण्याचे नाकारले.

३. जगातील शांतता कायम राखणे आणि हिंदी लोकांची प्रगति साधणे या उभय दृष्टींनी हिंदुस्थानचा प्रश्न उत्तम रीतीने सोडविणे किती अगत्याचे आहे हे काही सांगावयास नको. हिंदुस्थान हा स्वतः पूर्ण देश आहे त्याचा दुसऱ्या कोणत्या देशावर डोळा नाही आणि त्याच्या महत्त्वाकांक्षेचे क्षेत्रहि हिंदुस्थानाबाहेर कोठेहि नाही. या देशाचा अफाट विस्तार मोठी लोकसंख्या आणि विपुल साधनसंपत्ति यांच्या जोरावर हा देश जगातील नाही तरी आशियाखंडातील प्रमुख राष्ट्र होऊ शकेल. अर्थातच शांतताभंग करू पाहणाऱ्या कोणत्याहि राष्ट्राविरुद्ध ब्रिटिश साम्राज्याची शाश्वती राखण्याला आणि पूर्वगोलार्धात शांतता राखण्याचे कार्य करण्याला हा देश राष्ट्रसंघाचा योग्य मुनीम होऊ शकेल. परंतु जोपर्यंत हल्लीप्रमाणे हिंदुस्थान देश शृंखलाबद्ध आहे तोपर्यंत त्याला राष्ट्रसंघात योग्य स्थान मिळणे आणि जगात शांतता राखण्याचे संघाचे कार्य करण्याची शक्ति त्यास येणे शक्य नाही. शिवाय हिंदुस्थान देश जर असा प्रबळ न होईल तर तो देश स्वतः युरोपियन राष्ट्रांच्या कलहाचे एक बीज होऊन राहील आणि या कलहात यापुढे आशियातील व अमेरिकेतील राष्ट्रांचीहि भर पडेल. या राष्ट्रामध्ये हिंदुस्थान देश जिंकण्याविषयी नसली तरी हिंदुस्थानातील कच्च्या मालाविषयी चढाओढ सुरू होईल आणि त्याचे पर्यवसान असूया व मत्सर यात होऊन युद्धापर्यंतहि पाळी येईल. जोपर्यंत हिंदुस्थानाला अंतर्गत कारभारात आणि व्यापारी धोरणात स्वराज्य मिळाले नाही आणि जोपर्यंत व्हाइट हॉलमधून ( इंग्लंडकडून ) हे धोरण ठरविले जाते तोपर्यंत त्या धोरणाविषयी हिंदुस्थान आशिया व युरोप यामध्ये साशंक वृत्ति कायम राहणार. यास्तव जगाच्या शांततेच्या दृष्टीने आणि राष्ट्रसंघाचा पूर्व–दिशेचा आधारस्तंभ या दृष्टीने हिंदुस्थानाला अंतर्गत कारभारात स्वराज्य मिळणे जरूर आहे.

४. कानडा आस्ट्रेलिया दक्षिणआफ्रिका इत्यादि वसाहतीप्रमाणे ब्रिटिश साम्राज्यात राहूनच हिंदुस्थानाला स्वराज्य मिळाल्याखेरीज जगाच्या ⅙ लोकवस्तीच्या या देशात संतोष किंवा शांतता नांदणे शक्य नाही. स्वराज्याखेरीज

खरी प्रगति होऊं शकत नाही. परकी अमलाखाली कल्पनाशक्तीस वाव मिळत नाही आणि आत्मप्रत्ययाला तर आधारच रहात नाही. अशाच शेकडो अदृश्य मार्गांनी परवशता ही राष्ट्राचे पौरुष खच्ची करिते आणि त्याच्या नैतिक व भौतिक सुधारणेचीहि कुचंबणा होते.

जर्मनीच्या भीतिप्रद जुलमातून जगाची मुक्तता करून या महायुद्धाने 'नव्या युगास' प्रारंभ केल्यानंतर आता कोणत्याहि सुधारलेल्या देशावर त्याच्या इच्छेशिवाय दुसऱ्याचा अंमल बाह्यतः त्याच्या कल्याणासाठी म्हणून देखील चालू नये हे सांगण्याची अवश्यकता राहिली नाही. या देशातील नानाविध घोटाळ्याचे प्रश्न सोडविण्याकरिता हिंदुस्थानाला 'स्वसंमती'चें तत्त्व लाविले जावे हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे अशी हिंदुस्थानची मागणी आहे. हे प्रश्न परकी लोकाकडून सोडविले जाणार नाहीत. पाश्चात्य संस्कृतीत मुरलेले परकी सत्ताधारी कितीही बुद्धिवान व सद्बुद्धीचे असले तरी हिंदी संस्कृतीविषयी त्याना खरी सहानुभूति व कळकळ असल्याविना त्यानी हे भानगडीचे प्रश्न सोडविण्याची जबाबदारी घेऊं नये. याच दृष्टीने " हिंदुस्थानातील राष्ट्रीय सभा व मॉस्लेमलीग या दोन प्रमुख संस्थानी दिल्लीच्या बैठकीत 'हिंदुस्थान देश हा सुधारलेला देश असून त्यास 'स्वसंमती'चें तत्व लागू करावे' असा ठराव केला."

५. हिंदुस्थानाला स्वसंमतीचे तत्त्व लागू न करण्याला वास्तविक कोणतेच कारण नाही. त्याला अडथळा होतो तो अज्ञानी किंवा वतनदार बनलेल्या लोकाकडून होतो. हिंदुस्थानची संस्कृति ही रोम व अथेन्सच्याहि पूर्वीची आहे आणि युरोपखंडाने रानटी दशेतून डोके वर काढले नव्हते त्याच्या पूर्वीपासून कित्येक शतके हिंदुस्थान सुधारलेले राष्ट्र म्हणून गाजत आहे. शिकंदराची स्वारी हिंदुस्थानावर होण्यापूर्वी कित्येक शतके या देशात लोकसत्ताक राज्यपद्धतीचेहि नमुने ठिकठिकाणी होते. अर्थातच हिंदी लोक लोकसत्ताक पद्धतीला नालायक आहेत असल्या राष्ट्राची बदनामी करणाऱ्या विधानांचा सर्व सुशिक्षित हिंदी लोकाकडून निषेध केला जातो. हिंदुस्थानचे दारिद्र्य शारीरिक ऱ्हास औद्योगिक पुनरुज्जीवन आर्थिक उन्नति औद्योगिक शिक्षण जाति व रूढीसंबंधी नाजूक प्रश्न या सर्वांचा केवळ पाश्चात्य संस्कृतीत वाढलेल्या परकीयाकडून निकाल होऊ शकणार नाही तर तो हिंदी लोकाकडूनच होईल. यासंबंधात दिल्ली येथे भरलेल्या कॉंग्रेसने हिंदी लोकांच्या लायकीविषयी ठराव केला असून इंग्लंडात नाटिंगहॅम येथे भरलेल्या मजूरसंघाच्या परिषदेने हिंदुस्थानदेश कानडा वगैरे वसाहतीप्रमाणे होमरूलला पात्र आहे असा ठराव केला आहे.

६. आता हिंदुस्थानाला जी नवी सुधारणेची योजना देण्यात येणार आहे तिच्याविषयी २५ कोटि लोकात एकमत होणे अशक्य आहे. बेल्जम देशावर जेव्हा जर्मनीचा अम्मल चालू होता त्या वेळी जर्मनीचा ताबा कायम रहावा असे म्हणणारे काही बेशरम इसम खुद्द बेल्जममध्ये देखील आढळले मग हिंदुस्थानात

तरी तसे लोक आढळल्यास नवल काय ? तथापि या लोकाना देखील हिंदी लोक स्वराज्याला अपात्र वाटत नसून त्याना अधिकाऱ्यांचा कल पाहून मागणी केल्यास ती सुलभपणे साध्य होईल असे वाटते एवढेच काय ते ! हिंदुमुसलमानांची जी एकी १९१६ साली घडवून आणण्यात आली तीवरून हिंदी लोकांची यासंबंधी पात्रता चांगली सिद्ध होते. सरकारी अधिकाऱ्यांचा विरोध दिसत असूनहि बहुजनसमाजाने स्वसंमतीचे तत्त्व लागू करण्याची मागणी केली असून सुधारणेची सरकारी योजना निराशाजनक व समाधानकारक आहे असे मत दिले आहे. ”

यानंतर सदरहू अर्जात हिंदुस्थानातील हल्लीची राज्यपद्धति कशी आहे आणि मॉंटेग्यु चेल्म्सफर्ड योजनेने तीत कोणते फरक केले जाणार आहेत त्यांचे विस्तृत विवेचन असून कॉंग्रेसच्या ठरावास अनुसरून त्या योजनेतील दोषाविष्करण केले आहे. आणि अखेरीस या अर्जाची पुढीलप्रमाणे परिसमाप्ति केली आहे.

१४. “वर जी सरकारी व बिनसरकारी योजनांची तुलना केली त्यावरून हे दिसून येते की, स्वातंत्र्य हे सर्व सुधारणेचे मूळ आहे ही गोष्ट ब्रि० सरकारच्या ध्यानात येत नाही. लोकसत्तेच्या तत्त्वावर स्वतःची राज्यपद्धति ठरवून आपल्या अडचणीतून आपणच मार्ग काढण्याची देशास स्वतंत्रता पाहिजे. हल्लीच्या सुधारणेच्या युगात कंटाळवाणी उमेदवारीची मुदत आणि दशवार्षिक कसोटी या गोष्टी असह्य आहेत. लोकाना वरिष्ठ सरकारच्या सत्तेत भागीदारी पाहिजे आहे. ती मिळाल्यास स्वसंमतीच्या तत्त्वावर देशात प्रांत किती असावे, त्यांच्या मर्यादा कोणत्या असाव्या, स्वराज्याचा पहिला हप्ता केवढा असल्यास तो पुरेसा होईल, आणि बाह्य मदत न घेता अंतर्गत कारभारात पूर्ण स्वातंत्र्य किती कालात मिळावे वगैरे प्रश्न सोडविण्यात येतील. हिंदी लोकाना साम्राज्यातून फुटून जावयाचे नाही अशी ब्रिटिशांची खात्री करण्याकरिता आम्ही लष्कर आरमार परराष्ट्रसंबंध युद्ध व तह ही खाती आमच्याकडे मागत नाही. लष्करात व आरमारात हिंदी लोकाना युरोपियनांच्या जोडीने कमिशने मिळाली म्हणजे बस्स आहे. मात्र पंधरा वर्षानंतर स्वसत्ताक वसाहतीच्या जोडीने त्यांच्याप्रमाणे आम्हास सर्व बाबतीत सर्व हक्क मिळावे म्हणजे झाले.

१५. अशा परिस्थितीत हिंदी राष्ट्रीय सभेने निवडलेला हिंदुस्थानचा प्रतिनिधि या नात्याने माझी एवढीच मागणी आहे की ब्रिटिश वसाहतीना राष्ट्रसंघात प्रतिनिधी पाठविण्याचा जो हक्क आहे तसाच हक्क हिंदुस्थानालाहि मिळावा. हिंदी लोक स्वराज्य चालविण्याला पात्र असून ते सुधारलेले राष्ट्र असल्याने त्याला स्वसंमतीचे तत्त्व लावण्यात यावे आणि या स्वसंमतीच्या तत्त्वास अनुसरून त्यानी आपल्या परिस्थितील योग्य अशा प्रकारची आणि लोकसत्ताक राज्यपद्धतीच्या तत्वाला धरून असलेली अशी आपली राज्यपद्धति ठरवावी. सत्याचे शाश्वत तत्व आणि दंडुकेशाहीवर सत्याचा झालेला विजय लक्षात घेता हिंदुस्था-

नाविषयी हे स्वसंमतीचे तत्व जाहीर करणे न्याय्य व जरूर आहे. असल्या जाहीर वचनाने हिंदुस्थानातील ३१ कोटि प्रजेची अंतःकरणे अत्यंत उल्हासाने व कृतज्ञतेने उचंबळून येतील हे तर खरेच. पण याहून महत्वाची गोष्ट ही की पार्लमेंटने हिंदुस्थानासंबंधी स्वसंमतीच्या तत्वाचा पुकारा केल्यास जगात शांतता नांदण्याची हमी देता येईल, हिंदुस्थानची भरभराट होईल, आणि आमच्या महान् हिंदिराष्ट्राशी ब्रिटिश साम्राज्याचा संबंध कल्याणकारक संबंध होऊन तो कायम राहील.

## परिशिष्ट २

### टिळक व लेडी सिडनहॅम

'ब्रिटन अँड इंडिया' संस्थेने टिळकाना सभेला बोलावले होते. त्या प्रसंगी एक मौज झाली. टिळक सभागृहात शिरले इतक्यात पलीकडे थोड्या अंतरावर लॉर्ड सिडेनहॅम यांची बायको उभी होती. तिची दृष्टी टिळकांकडे गेली. त्याना पाहताच तिला फार राग आला व जवळच असलेल्या सभेच्या एका चालकाला ती शेजारच्या लोकाना ऐकू जाईल इतक्या मोठ्याने म्हणाली "कोण हा तुमचा अप्रयोजकपणा? टिळक हा राजद्रोही मनुष्य आहे. माझ्या नवऱ्याने त्याच्यावर खटला करून त्याला सहा वर्षे काळे पाणी दाखविले. असे असता तुम्ही त्याला सभेला बोलाविता आणि त्या सभेला आम्हालाहि बोलाविता! हा आमचा अपमान व उपमर्द आहे." बाईचे हे शब्द संपतात न संपतात तोच लॉर्ड शॉ हे तेथे आले. ते प्रिव्ही कौन्सिलचे एक न्यायाधीश होते. ताईमहाराज प्रकरणी अपीलाची प्रिव्ही कौन्सिलात सुनावणी झाली तेव्हा हे न्यायाधीशमंडळापैकी एक न्यायाधीश म्हणून बसले होते व अखेर त्यानी टिळकासारखा निकाल दिला होता. बॅरिस्टर बॅप्टिस्टा हे जवळच उभे होते त्यानी टिळकाना हाक मारून त्यांची व लॉर्ड शॉ यांची ओळख करून दिली. तेव्हा लॉर्ड शॉ याना फार आनंद झाला व टिळकाशी दोनदोनदा शेकहँड करून "ओ इज धिस मिस्टर टायलक दि ग्रेट मॅन ऑफ इंडिया?" असे मोठ्याने म्हणून त्यानी आपला आनंद प्रदर्शित केला. आणि मौज ही की लॉर्ड सिडेनहॅम यांची बायको जवळच उभी असून बिचारी हा सर्व प्रकार पहात होती! प्रिव्ही कौन्सिलच्या न्यायाधीशानी टिळकाशी आदरबुद्धीने हस्तांदोलन केलेले पाहून बाई खजील झाली व तिने तोंड फिरविले. आणि हे दोन्ही प्रकार जवळ जवळ एकदम घडलेले पाहून बॅ. बॅप्टिस्टा याना हसे आवरेना असे सांगतात.

# परिशिष्ट ३

## ब्रिटिश साम्राज्य व विश्वबंधुत्व

( बातमी पत्र )

१८ सप्टेंबर १९१९

चळवळीच्या दृष्टीने राहता राहिले आयर्लंड. पण आयर्लंडात जाऊन हिंदुस्थानाकरिता चळवळ करण्याची आज सोय नाहीच. वस्तुतः गरजहि नाही. होमरूलकरिता आयर्लंडात जाऊन चळवळ करावयाची म्हणजे उघडा दरवाजा उघडण्याचे श्रम करण्यासारखे निरर्थक आहे. किंबहुना आयरिश लोकापुढे आपला प्रश्न काढण्याची हिंदी लोकांची छातीच नाही. याचा अनुभव आम्हास खुद्द इंग्लंडातहि येत आहे. मग तिकडे जा कशाला ? इंग्लंड स्कॉटलंड वगैरे ठिकाणी सभा होतात किंवा खाजगी चहापार्ट्या वगैरे होतात तेथे श्रोतृवर्गात आयरिश लोक भेटतात व ते आम्हाला आमची भूक होमरूलने भागेल म्हटले तर नुसते हसतात झाले ! ते म्हणतात आम्ही मूठभर आयरिश लोक सत्तर मैलावरचे म्हणजे इंग्लंडच्या टांचेखाली सापडलेले स्वातंत्र्य मागतो आणि तुम्ही सहा हजार-मैलावरचे तीस कोटि लोक नुसते होमरूल मागता ? तुम्ही माणसे आहा की जनावरे ? पण अशा प्रश्नास उत्तर देण्याच्या भानगडीत न पडावे हेच श्रेयस्कर असे आम्हास वाटून आम्ही प्रायः गप्प बसतो. "बारा वर्षांपूर्वी तुम्ही आयरिश लोक झाला तरी स्वातंत्र्य कोठे मागत होता ? होमरूलवरच तुमचीहि तहान भागत होतीच की नाही ? विलायतसरकार गाढव म्हणून वेळेवर तुम्हाला होमरूल दिले नाही. तरी पार्लमेंटातील तुमचे ऐंशी सभासद हे तुम्हाला पार्लमेंटातील पक्ष एकमेकाविरुद्ध लढविण्याचे साधन आहेच. सिव्हिल सर्व्हिस व लष्कर यातल्या वरिष्ठ जागा तुम्हाला इंग्रजाप्रमाणे मिळू शकतात. अमेरिकेसारखा तुम्हाला पाठिराखा आहे. तात्पर्य इतर बऱ्याच गोष्टीत स्वास्थ्य असल्यामुळे तुम्हाला स्वातंत्र्य आठवते. आमची गोष्ट तशी नाही. दुष्काळ पडला तर म्हणे दूधभातच का नाही खात ? असे तुम्ही आम्हास विचारता. पण त्याचा काय उपयोग ? व त्याला आम्ही उत्तर तरी काय द्यावे ?" असे प्रश्न विचारून आम्हीहि वेळ मारून नेऊ शकतो. आयरिश लोकांचे या युक्तिवादाने अर्थातच समाधान होत नाही. पण सांगावयाचा मुद्दा इतकाच की, त्यांचे समाधान होवो न होवो, आमच्या होमरूलच्या मागणीला आयरिश लोक सोळा आणेच तर काय पण अठरा आणे अनुकूल आहेत ! मजूरपक्षाइतके देखील त्यांचे मन वळविण्याचे श्रम नाहीत. आयरिश सभासद पूर्वी पार्लमेंटात हजर रहात तेव्हा त्यानी सदैव हिंदुस्थानास मदतच केलेली आहे. व आज जर ते सिनफेनर बनले नसते तर आम्हास हल्लीच्या बिलाच्या कामी त्यांचा पुष्कळच उपयोग झाला असता.

आयर्लंडमध्ये गेल्या दोन दिवसापासून धुमश्चक्री माजल्याचे वर्तमान तुम्हाला तारेने कळलेच असेल. पण या धुमश्चक्रीबद्दल खुद्द इंग्लंडच्या लोकास काय वाटते याचे सूक्ष्म प्रत्यंतर परवांच्या लंडन टाइम्सच्या अग्रलेखात पाहावयास सापडले. या अग्रलेखाचा सारांश रूटर तारेने हिंदुस्थानास सहसा पाठविणार नाही या समजुतीने तो खाली थोडक्यात देतो. पण त्यापूर्वी फक्त एकच गोष्ट सांगणे जरूर आहे ती ही की गेल्या महिन्यात टाइम्सने अमेरिकेला खूष करण्याकरिता आयर्लंडला वसाहतीच्या नमुन्याचे स्वराज्य द्यावे अशी जोराची चळवळ केली. तिचा उपयोग झाला नाही याचे टाइम्सला वैषम्य वाटले. पण त्याचा सदुपयोग इतकाच झाला की आयर्लंडातील असंतोषवर टाइम्सने हत्यार उपसून उठावयाचे ते न करिता त्याने त्या असंतोषाचे एक प्रकारे समर्थनच केले आहे. टाइम्स म्हणतो—" आयर्लंडातील दंगेधोपे मोडण्याचा प्रयत्न सरकाराने करावा हे ठीकच आहे. पण त्याने अधिकारी मुत्सद्यांच्या शहाणपणाची दिवाळखोरी झाकत नाही. एकाने दंगे करावे व दुसऱ्याने ते मोडावे या पाठशिवणीच्या भातुकलीच्या खेळापासून कोणासच काही फायदा नाही. दडपशाही हाही एक मार्ग आहे. पण तो एकतोंडी बोळाप्रमाणे आहे. या बोळात एका तोंडाने शिरता येते पण दुसऱ्या तोंडाने बाहेर मात्र निघता येत नाही. या स्थितीची जबाबदारी सर्वस्वी सरकारावर आहे. अत्याचार हे निराशेच्या परमावधीस जाऊन पोचलेल्या अल्प संख्यांकाचे शेवटचे हत्यार आहे. आयर्लंडातील जनसमाजाला अत्याचार व खून आवडतात असे म्हणणे ही गोष्ट खोटी आहे. तसे म्हणणे अन्यायाचे होईल. इंग्रज लोकांचा द्वेष आयरिश लोकांच्या मनात जुनाच आहे. पण निराशेच्या रोज मिळणाऱ्या नव्या पुराव्यानेच तो दृढ होत आहे. स्वराज्याची आशा दिसती तर जे लोक नेमस्तपणाने वागले असते त्याना आज एकीकडे दडपशाही सरकार व दुसरीकडे अत्याचारी लोक या दोन दगडात सापडून भरडून निघाल्यासारखे वाटत आहे. या सर्वांना स्वराज्य देणे हाच उपाय ! " का ? कसे आहे ?

असो. या दंग्याधोप्यांच्या गोष्टी बाजूस ठेवून या आठवड्यात दुसऱ्याच एका प्रकारची जी गोष्ट लंडनमध्ये घडली तिच्याबद्दल दोन शब्द अधिक लिहितो. ही गोष्ट म्हणजे सिटी टेंपल नामक धार्मिक सभागृहात शनवार ते बुधवार भरलेली परिषद. या मंडळाला ही परिषद यंदा इंग्लंडातच भरविण्याची प्रेरणा का झाली माहीत नाही. पण तीनचार दिवस परिषदेचे काम पाहून केव्हा गंभीर सोज्वळ विचार मनात येत तर केव्हा या इंग्रज लोकांच्या ढोंगीपणाचे पोट धरधरून हसू येई ! मंडळाचे हेतू जगातील युद्ध थांबविणे व शांततेच्या काळात सर्व देशातील मनुष्यवर्गामध्ये बंधुप्रेम वृद्धिंगत करणे असे आहेत. परिषद डॉ. क्लिफर्ड यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. ८४ वर्षांचे परम पवित्र गृहस्थ केवळ पाटलोण घातलेले ऋषि आहेत येवढे म्हटले म्हणजे त्यात त्यांचे सर्व गुणवर्णन आले. त्यांचा जन्म धर्मपंथांचे द्वंद्व मोडण्यात आणि नाठाळांच्या पाठीत काठ्या

घालण्यात गेला आहे. त्यांचे अध्यक्ष या नात्याने भाषण ऐकून कोणाच्याहि मनात सत्स्फूर्ति झाल्याशिवाय रहाणार नाही. पण दैव असे लबाड की त्याने या विश्वबंधुत्वाच्या परिषदेत लॉइड जार्जसारखे पाताळयंत्री राजकीय मुत्सद्दीहि आणवून परिषदेचे मातेरे केले! या परिषदेस अनेक देशांचे लोक आले होते पण त्यातल्या त्यात बहुतेक साम्राज्यातलेच होते. आमच्या राष्ट्रीय सभेतर्फे डेप्युटेशनची मंडळी या परिषदेस प्रतिनिधि म्हणून गेली होती. प्रार्थना व्याख्याने धर्मोपदेश चर्चा या सर्वांना आम्ही मधून मधून हजर होतो. सोमवारी लंडनच्या लॉर्ड मेयरने सर्व प्रतिनिधींना आपल्या इतिहासप्रसिद्ध प्रासादात (मॅन्शन हाऊस) चहास बोलावून सत्कार केला.

मि. स्पेंडर लॉर्ड रॉबर्ट सेसील वगैरेंचे निबंध चांगले होते. मि. मैत्र नावाच्या एका बंगाली गृहस्थानेहि एक निबंध वाचला. बुधवारी सकाळी मुख्य प्रधान मि. लॉईड जॉर्ज यांचे भाषण झाले. आम्ही प्रतिनिधींत सामील असल्याने आम्हास चार हातावरून हे भाषण ऐकावयास सापडले. लॉईड जॉर्ज यांचे वक्तृत्व दांडगे आहे पण त्यांच्या योग्यतेचे वक्ते हिंदुस्थानातहि अनेक आहेत. त्यांचा आवाज मोठा व चांगला आहे पण वरचेवर टिपणाकडे पाहणे व चष्म्याच्या घालकाढीचा खेळ करणे यामुळे स्वारस्य जाते. त्यांचे हातवारे व नाटकी थाट हे पूर्वी शोभत असतील पण मुख्य प्रधानाच्या दर्जाच्या माणसास ते शोभत नाहीत. ही सभा उत्तमोत्तम लोकांची होती. पण खूप टाळ्या पिटणे वगैरे फाजील दिखाऊ प्रकार अशाहि सभामधून होतात हे दिसून आले.

या परिषदेच्या निमित्ताने चार दिवस लंडन शहरात निदान त्याच्या एका लहानशा भागात बंधुप्रेमाचा पूर वहात होता. तो इतका की खऱ्या भाविक श्रोत्यास आपण कलियुगात नसून सत्ययुगात किंवा तत्पूर्वीच्या म्हणून वर्णन केलेल्या सुवर्णयुगात आहो असे वाटले असते. वर आकाशात एक बाप आणि खाली पृथ्वीवर सर्व भाऊबहिणी याशिवाय तिसरा पदार्थ नाही! चार दिवस ईश्वराच्या प्रार्थनेचा एकसारखा मारा सुरू होता. कोणत्याहि कार्यक्रमाच्या आधी प्रार्थना मध्ये प्रार्थना व शेवटी प्रार्थना! मधूनमधून सर्व सभा मुक्तकंठाने गीते गायी व हरदास 'टाळी महाराज' म्हणतो त्याप्रमाणे उपदेशक उपदेशाचा कोरडा ओढी. जितका वेळ डोळे उघडून काम चालले होते तितकाच वेळ डोळे मिटून चालले असेल! ज्या व्यासपीठावरून नुकतेच द्वेषाग्नीचे लोळ उठत होते त्यावरून आता विश्वप्रेमाच्या गुलाबपाण्याचे हजारे उडू लागले. ईश्वरस्तुतिरूपी गुलाबाच्या फुलांचा एक थर तर लगेच त्याच्यावर बंधुप्रेमाच्या खडीसाखरेचा एक थर असे पांचपंचवीस थर रचले जाऊन जणु काय सर्व जगाला खायला पुरण्याइतका मिठा स्वादिष्ट व औषधी गुलकंद बनत होता. मीहि एक वेळ डोळे मिटून अंतर्मुख होत्साता पाहू लागलो तों पौर्णिमेच्या चांदण्यामध्ये स्फटिकाच्या

मंडपात बसून ' आइसक्रीम ' खात असल्याप्रमाणे मला अंतर्बाह्य शीतळता वाटली ! मी इंग्रजांचा भाऊ इंग्रज माझे भाऊ. आता कसले साम्राज्य आणि कसला होमरूल ! खुद्द लंडन हेंच पुणे झाले ! ' हें विश्वचि माझे घर ' असे म्हणून टाळ्याहि पिटल्या असत्या. पण असली समाधी निमिषमात्रच टिकणार !

तथापि हा सर्वस्वी माझाच दोष होता असे म्हणवत नाही. विश्वबंधूच्या या मेळ्यात सर्वच भोंदू होते असे मी म्हणेन तर तो अन्याय होईल. काही खास सच्चे होते. पण सूर्यप्रकाशाप्रमाणे तिऱ्हाइतास स्पष्ट दिसणाऱ्या काही गोष्टी याना दिसत नव्हत्या याचे नवल वाटले. विश्वबंधुत्वाची इमारत बांधावयाची. पण यांचा विचार ती खिस्ती धर्माच्या पायावर बांधावयाची. खिस्ती धर्माचे अनुयायी नसणारे लोक जर या परिषदेस सभासद म्हणून जाऊ शकतात तर दुसऱ्या ईश्वराचे नावाने प्रार्थनादि का होऊ नयेत ? त्यात खिस्ताचे नावच कशाला ? बरे तुमचा ख्राइस्ट तर आमचाहि राम काढून तेथे त्याच्या नावाने प्रार्थना करा म्हटले असते किंवा आमची आम्ही केली असती तर ते मात्र चालले नसते ! ' खिस्ती विश्वबंधुत्व ' हा शब्दप्रयोग ' ब्राह्मणांचा जगद्गुरु ' या शब्दप्रयोगा-प्रमाणेच अतिव्याप्तिदुष्ट नव्हे काय ? पण हा भोळसरपणा नुसत्या धर्मकल्पनेपुर-ताच नव्हता. विश्वबंधुत्वाच्या या गोमुखीला आतून साम्राज्यमूलक स्वार्थपरायण-तेचे खूप जाड अस्तर लावले होते. या विश्वबंधुपरिषदेचा हेतु राष्ट्रसंघाला मदत कर-ण्याचा आहे. राष्ट्रसंघाच्या हातून जगाची शांतता कितपत राहणार हे दिसतच आहे. पण राष्ट्रसंघाच्या अंतर्व्यवस्थेत जो धडधतीत अन्याय दिसून येतो तोहि या मायावी लोकांच्या नजरेस पडत नाही असा बहाणा ! राष्ट्रसंघाच्या रचनेत इंग्लं-डला प्रमुख मान पाहिजे तो न मिळेल तर कुणा लेकाला हवा राष्ट्रसंघ ? युरो-पातल्या टीचभर परक्या राष्ट्रांच्या हक्कांचे रक्षण करण्यास हा राष्ट्रसंघ निर्माण झाला. पण याच्या अवतारकृत्यात आजची साम्राज्ये मात्र कायमच राहणार ! जर्मनी ऑस्ट्रिया तुर्कस्थान व रशिया यांचे साम्राज्य मोडले तर ते चालेल. पण इंग्रजांचे साम्राज्य मात्र अबाधित राहिले पाहिजे. एवढेच नव्हे तर त्यातल्या प्रचंड पुराण राष्ट्रानी स्वराज्य मागितले तर त्यांचा न्याय मात्र करण्यास या राष्ट्र-संघास अधिकार नाही ! आमचे आम्हीच पाहून घेऊ आणि दुसऱ्याचेहि आम्ही पाहू. हा न्याय ! 'तुम्ही आम्ही भाऊभाऊ पण तुमचे-आमचे आम्हीच खाऊ !' ही बंधुप्रेमदर्शनाची उत्सुकता हिंदी लोकाप्रमाणेच जगातील इतर अनेकाना हास्यास्पद वाटली तर त्यात त्यांचा काय दोष ? आपल्या बुडाखालचे तर संभाळायचेच पण दुसऱ्याचेहि साधल्यास हाताखाली घालावयाचे. या भोळेपणास भाळणारा कोण असेल तो असो ! राष्ट्रसंघात एक मत अधिक मिळावे म्हणून वसाहतीबरोबर हिंदुस्थानास इंग्लंडने आपल्याबरोबर घेतले. अमेरिकेने हे ओळखून या कावेबा-जपणाला हरकत घेतलीच. पण ज्याला आपल्या घरी स्वराज्याचा मान नाही त्याला आमच्या बरोबरीला आम्ही बसवून कां घेऊ ? असे उघड म्हणून तिने हिंदु-

स्थानच्या जखमेत मीठ भरले. पण याची लाज इंग्लंडला कोठे आहे? असेल तर हिंदुस्थानास स्वराज्य दिल्याशिवाय इंग्लंड एक दिवसभरहि राहणार नाही. असो. अशा अंतर्बाह्य विषम स्थितीत विश्वबंधुत्वाचा उपदेश कुणाला करता? या परिषदेस जमलेल्या काही लोकाना हे म्हणणे पटण्यासारखे आहे पण त्यांचे ऐकणार कोण?

या विश्वबंधूंच्या मेंढ्यांच्या कळपात काही लांडगेहि होते. मंगळवारच्या सभेत सर हॅरी जॉन्स्टन यानी 'विश्वबंधुत्व व देशोदेशीचे नेटिव्ह लोक' या विषयावर निबंध वाचला. त्यात त्यानी धडधडीत असे विधान केले की काळ्या लोकांची सुधारणा गोऱ्यानी करून त्याना उच्च पदाला पोचविले त्याअर्थी त्यांच्या दरम्यानचा आजचा संबंध अर्थात् वरिष्ठ कनिष्ठ भावाचा पुढेहि असाच राहिला पाहिजे. या विधानाचा श्रोतृवर्गापैकी एका न्यायप्रिय गोऱ्या मनुष्यानेच निषेध केला. पण आमच्या पालबाबूंनीहि जागच्या जागी जॉन्स्टनसाहेबाना खण-खणीत उत्तर दिले. हे उत्तर श्रोतृवृंदाला इतके आवडले की त्यानी अनेक वेळा टाळ्यांचा गजर केला व पालबाबूंचे भाषण संपल्यावर पांचपंचवीस स्त्रीपुरुषानी त्यांच्याशी हस्तांदोलन करून त्यांचे अभिनंदन केले.

## परिशिष्ट ४

### इंग्लंडातला एक संप

(बातमीपत्र)

२ आक्टोबर १९१९

नाटकात ट्रान्सफर सीन करतात त्याप्रमाणे हा संपाचा घाला अचानक पडला. शुक्रवारी सकाळी संप होणार अशी बातमी पत्रातून वाचली व रात्री संप सुरू झाला. याच्याहि आधी एक दिवस गुप्त खलबते चालू होती म्हणतात. पण सरकार व रेलवेचे लोक यांच्या दरम्यानच्या भांडणाचा कडेलोट निर्वाणीचा खलिता व युद्धाचा पुकारा ही सर्व चोवीस तासात घडून आली! रात्री दहा व बारा यांच्या दरम्यान रेलवेचे लोक आपल्या कामात शिथिलता करू लागले व बाराच्या ठोक्यास सर्व इंग्लंड व स्काटलंडभर रेलवेकामदार काम टाकून घरोघर चालते झाले. स्टेशनास कुलपे पडली. शनिवारी सकाळी ट्रॅम व बस सुरू होत्या त्यावरच कामकाजास जाणाऱ्या सर्व लोकांची धाड पडली. शेकडो लोकांच्या रांगा या वाहनांची वाट पहात तास-तास उभ्या होत्या. रात्रीच्या सुमारास ही गर्दी थोडी कमी झाली. कारण अगदी जरूरीच्या कामाशिवाय बाहेर पडून मैल-मैल विनाकारण चालत येण्याचे साहस कोण करणार? शनिवार व रविवार दोनहि दिवस जवळ जवळ बिनकामकाजाचे असल्यामुळे कसे तरी भागले. पण फिरून सोमवारपासून दंगल उडाली. लंडनच्या आसपास पन्नाससाठ मैलापासून

रोज शहरात कामकाजास येणारे धंदेवाले अनेक आहेत त्यांचे तर खाडेच पडले. पण खुद्द शहरची वस्ती या टोकापासून त्या टोकापर्यंत सुमारे बावीस पंचवीस मैल चौफेर पसरलेली आहे यामुळे शहरात राहणाऱ्या लोकांचीहि जवळ जवळ तीच स्थिति झाली. विजेच्या चमकेप्रमाणे झालेला हा संप विजेच्या चमकेप्रमाणे संपेल ही आशा नष्ट होताच सरकार व लोक आपापली सोय करण्याच्या मार्गास लागले. त्यांतल्यात्यात लोकांपेक्षाहि सरकारवर वाहनांची सोय करून देण्याची जबाबदारी अधिक यामुळे सरकारने जाहीरनामा काढून लोकास धीर दिला व आपली सर्व साधने सज्ज केली.

पहिली तयारी सैन्य आणण्याची. कारण दंग्याधोप्यास सुरवात होते की काय ही भीति. पण संपवाल्यांचे पुढारी शहाणे आहेत. त्यानी संपवाल्यास थोपटून धरले. संपवाल्याना त्यांच्या फंडातून रोज थोडेबहुत पोटास मिळण्यासारखे असल्यामुळे बाजारहाट एकदम लुटले जाण्याचे कारण नव्हते. संपवाल्यांची संख्या पांचलक्ष पण ती सर्व देशभर पसरलेली. यामुळे सैन्यास दंगेधोपे मोडण्याचे नसले तरी आगगाड्या चालू करण्याचे काम होतेच. पण त्याहिपेक्षा लोकास अन्न भाजीपाला दूध पुरविण्याचे काम अधिक महत्त्वाचे होते. जेथे शे– पन्नास आगगाड्या दिवसात सुटावयाच्या तेथून सैनिकांच्या मदतीने दहापाच तरी बऱ्या असे मानून लष्करी अधिकारी अस्तन्या सारून इंजिनड्रायव्हर व फायरमन बनले. सरकारी तबेल्यातल्या सर्व मोटारगाड्या बाहेर निघाल्या. हाईड पार्कात लोकाना मज्जाव करून हजारो मोटारगाड्या तेथे जमविण्यात आल्या. व ज्या स्टेशनावरून धान्य अन्न दूध वगैरे रोज गावात यावयाचे तेथून ते आणून गावात घाऊक व्यापाऱ्यांच्या घरी पोचविण्याचे काम सुरू झाले. शिवाय हे काम पुरे पडावे म्हणून युद्धाच्या दिवसाप्रमाणे संप चालू असेपर्यंत तिकिटाशिवाय कोणास काही पदार्थ मिळू नये व मिळावयाचा तोही फारच माफक मिळावा, एक आठवड्यापेक्षा अधिक कोणीहि आपल्याजवळ शिधा ठेऊ नये, असे हुकूम सुटले. दिवाबत्ती कोळसा ग्यास जरूरीपुरतीच वापरावी, कामापेक्षा अधिक तारा करू नये पत्रे पाठवू नये, असा इशारा देण्यात आला. सर्व सरकारी नोकरांची रजा रद्द करण्यात येऊन वाहतुकीच्या कामास उपयोगी पडणारे स्वयंसेवकांचे पथक उभारण्यात आले. आरमाराच्या नोकरपेशाची जहाजे टेम्सनदीमध्ये आणून नांगरली. सर्व सरकारी व खासगी विमाने कामगिरीस धरून तीं टपाल व पार्सले नेण्याकरिता व क्वचित् उतारू वगैरेच्या उपयोगाकरिता संचारार्थ योजण्यात आली. कारण सरकारला हरप्रयत्नाने संप मोडावयाचा होता.

खासगी लोकानीहि आपल्या साधनांची शिकस्त केली. मात्र ती संप मोडण्याच्या हेतूने नव्हे तर स्वतःच्या सोईकरिता. लोकास खरोखर एकीकडे आड व एकीकडे विहीर असे झाले. मनातून संपवाल्याशी सहानुभूति. पण संप सिद्धीस जावा म्हणून स्वतःची गैरसोय कोण किती सोसणार? बरे, संपवाल्यांचीहि

खरी इच्छा लोकांची गैरसोय व्हावी ही नसून आपली मजुरी वाढावी इतकीच आहे. तात्पर्य दोघांचा कटाक्ष एकमेकावर नसून सरकारावरच आहे. सरकार व रेल्वे-नोकर यांची जंगी कुस्ती पाहण्याची लोकांस हौस आहे. पण पेहेलवानांची कुस्ती पाहताना आपल्या अंगावर त्यांची धुडे कोसळू नयेत किंवा त्यांनी उडवलेली माती पडू नये याविषयी प्रेक्षक जितकी खबरदारी घेतात तितकी खबरदारी येथील लोक घेत आहेत इतकेच काय ते. असो. लोकानी आपल्या केलेल्या सोयी-तजविजीमुळे शहरात खूप गडबड उडून राहिली असून नवीन देखावे दिसू लागले. रस्ते मोटारगाड्यानी फुलून गेले. श्रीमंतांच्या मोटारीतून पूर्वी एखाद-दुसरा मनुष्य तणावून बसलेला दिसावयाचा तेथे स्त्रीपुरुषांची खेंच झाली. ठेवणीतल्या सर्व शोभिवंत चार-चाकी गाड्या व उमदे घोडे बाहेर निघाले असून दोहोंचाहि बैठा शीण लांब मजलानी निघून जाऊ लागला. सर्व हरप्रकारच्या वाहनातून निर्जीव मालाच्या जोडीला सजीव मालहि शीग लागेपर्यंत भरला गेला. बाहेरून लांबून येणाऱ्या भाजीपाल्याच्या गाड्यातून उत्तम उंची पोषाख केलेले लोकहि बागवानांच्या नोकरासारखे उंच बसलेले असे रोज सकाळी गावात येताना पाहून शहरचे लोक त्यांच्याकडे व ते लोकाकडे पाहून हसण्याची रेलचेल उडाली. भाड्याच्या मोटारी तर भिंगऱ्यासारख्या फिरत होत्या. साध्या बायसिकली लंडनच्या रस्त्यानी पूर्वी क्वचित् दिसत. पण आता त्यांची अखंड रांग लागून राहिली. येवढेच नव्हे तर एकाने सायकल चालवावी व त्याच्या मागे दोघातिघानी एकमेकांच्या आंगाखांद्यावर बसावे असे सर्कशीचे खेळ फुकट पहावयास सांपडू लागले! पायाला पाय फुटल्याप्रमाणे हजारो स्त्रीपुरुष तुडुतुडु चालताना दिसत. पायानी कोणी किती मजल मारली याविषयी चढाओढ सुरू झाली. बाहेर प्रांतांत कित्येक लोकानी जरूरीच्या कामाकरिता पन्नास-पन्नास मैल प्रवास केल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. अखेर गाढवांच्या गाड्यातून बसण्यापर्यंत पाळी आली! एका विनोदी पत्रात चितारलेल्या गाढवाला वाचा फुटली असून ते म्हणते "बाबानो घाबरू नका. मी गाढव जिवंत असे तोंपर्यंत तुम्हाला काळजी नको!" बायबलातल्या एका 'शहाण्या गाढवाला' अशीच योग्य वेळी वाचा फुटली होती!

## परिशिष्ट ५

### इंग्लंडचे पुराणमतवादित्व

इंग्रज लोक हे जितके प्रगमनशील तितकेच पुराणमतवादी आहेत. इकडे प्रगतीचे पाणी त्यांच्या हनुवटीपर्यंत येऊन भिडलेले असते व इकडे ते तोंडाने जुन्या गोष्टींचा पुरस्कार करीत असतात. केंब्रिज युनिव्हर्सिटीत बायका परीक्षा पास झाल्या तरी त्याना पदवी देत नाहीत. पण इकडे बायकाना मतदारीचा हक्क

मिळून एक बायको पार्लमेंटची सभासद म्हणून निवडलीहि गेली! बायकाना मतदारीचा हक्क मिळेना पण त्यापूर्वी सर्व प्रकारच्या कचेऱ्यातून बायका पुरुषाप्रमाणे कामधाम करीत होत्या! पार्लमेंटात राजाला काहीएक अधिकार उरलेला नाही. व 'गॉड सेव्ह धि किंग' हे (राजस्तोत्र) गाइले जात असता एखादा पार्लमेंटचा सभासद खुशाल बसला तरी त्याचे कोणास काही करिता येत नाही. पण सर्व कारभार राजाच्या नावानेच चालला पाहिजे! तहाची बातमी शिळी होऊन तत्संबंधी केलेल्या मद्यप्राशनाच्या धुंदीतून लोक शुद्धीवर येऊन कामालाहि लागल्यावर मग काही दिवसानी जुन्या पद्धतीप्रमाणे राजाच्या तुतारीवाल्यांनी मोठ्या लवाजम्यानिशी मिरवणूक काढून शहरात चारचवाठ्यावर तहाचा जाहिरनामा वाचून दाखवावाच लागतो तसा दाखविला. जुने लंडन शहर व नवे लंडन शहर यांच्यातला भेद लोपून शेकडो वर्षे झाली तरी अजून या दोहोच्या दरम्यान काल्पनिक सीमेवर राजदूतानी उभे राहून पलीकडे दहा हातावर उभा राहिलेल्या लॉर्ड मेयरला तुतारी वाजवून आपल्या आगमनाची वर्दी दिली पाहिजे! त्यानी 'कोण' म्हणून विचारिलेपाहिजे. यानी आम्ही राजदूत म्हणून सांगितले पाहिजे. मग जुन्या काळचे वेशी उघडण्याचे नाटक करण्याकरिता रस्त्यावर आडवा लावलेला रेशमाचा दोरा तोडला पाहिजे. व मग राजदूतानी आत प्रवेश केला पाहिजे! पार्लमेंटात सभासदाच्या नावाने निर्देश करावयाचा नाही तर त्याची निवडणूक करून दिलेल्या गावाच्या किंवा पेठेच्या नावाने करावयाचा! वडील राजपुत्राला परवा बॅरिस्टर करून घेण्यात आले. श्रीमंताच्या मुलांचा अभ्यास त्यांच्या शिक्षकानी घोकला तरी चालतो. त्याचप्रमाणे त्यांच्या परीक्षाहि अभ्यास केल्याशिवाय उतरतात हे ठीकच आहे. पण राजपुत्राला तो 'बडे बापका बेटा' म्हणून जर बॅरिस्टर करून घेता येते तर त्याजकडून नेहमीच्या सरनाम्यातील तपशील भरून घेण्याचे का वगळता येऊ नये? ज्याला परीक्षा माफ त्याला प्रतिज्ञालेख का माफ होऊ नये? पण नाही. त्यात जुना नमुना बरोबर वठला पाहिजे. मौज ही की त्याप्रमाणे सरनामा (declaration) भरून देताना राजपुत्राला आपल्या हाताने खालील गोष्टी लिहून द्याव्या लागल्या. प्र.—'तुझ्या बापाचा धंदा कोणता'? उ.- 'माझ्या बापाचा सांगण्यासारखा धंदा नाही.' प्र. 'तूं स्वतः काय करीत असतोस'? उ.- 'मी बेकार निरुद्योगी आहे!' सारांश, इतका पुराण–मतवादीपणा इतर देशात क्वचितच आढळेल. आणि हे इंग्लिश लोक हिंदी लोकाना जुन्या मताच्या अभिमानाबद्दल हसणार!

# परिशिष्ट ६

## तहाचा उत्सव

### ( बातमीपत्र )

ता. ३ जुलई १९१९

लंडनचा या आठवड्यातील मुख्य विषय म्हटला म्हणजे तह. जर्मनी तहावर सही करणार ही गोष्ट निश्चितप्राय होती. तथापि अखेरपर्यंत काय होते काय नाही याविषयी इंग्रजाना धागधुग वाटे. शेवटी शनिवारी दुपारी सव्वातीन वाजता तहावर सह्या झाल्याची बातमी येथे साडेतीन वाजता प्रसिद्ध झाली. त्याबरोबर विजयोत्सव सुरू झाला. सरकारी बडा उत्सव अजून पुढे व्हावयाचाच आहे. पण लोकानी छोटा उत्सव ताबडतोब उरकून घेतला. शहरचा मुख्य चव्हाटा ट्राफलगार स्क्वेअर या ठिकाणी हजारो रिकामटेकडे लोक पॅरिसहून बातमी येण्याची वाट पहात आगाऊच बसले होते. त्यातच दुकाने कचेऱ्या बंद होऊन बाहेर पडलेल्या लोकांची भर पडली. गाड्या व मोटारी यांची वाहतुक अशक्यच झाली. चोहोकडे तोफांचे प्रचंड आवाज व त्यातच फटाक्यांचे बार होऊ लागले. वर आकाशात विमाने घारीसारखी फिरू लागली. लहान मोठी निशाणे डोक्यातील टोप्यांपासून तो उंच इमारतीच्या शिखरापर्यंत लागली. इतर सर्व बाजार बंद पडून निशाणांची खरेदी-विक्री हाच मुख्य व्यापार होऊन बसला. भररस्त्यावर स्त्रीपुरुष उड्या मारू लागले. एखाद्या जत्रेतल्याप्रमाणे नाच गाणे बजावणे खेळ तमाशे मद्यपान व भामटेगिरी याना ऊत आला. हौशी लोकांच्या थव्यानी राजवाडा वेढून गेला व राजाराणी सज्जात येऊन लोकाना दर्शन देऊ लागली. रात्री अनेक विमानानी हजारो फुटावरून लखलखीत दीपकिरण पाडून राजवाडा पुष्कळ वेळ पाजळून धरला होता. इंग्लंडच्या ऐहिक वैभवाचा कळस झाला असे चर्चिल साहेबानी नुकतेच बोलून दाखविले ते खरेच आहे! जगातल्या सांधीकोपऱ्यात लक्ष्मी अजून दडून बसली असेल तिला तेथून खेचून आपल्या देशात आणण्यास या विजयाने इंग्रजाना मार्ग मोकळा झाला. हिंदुस्थानच्या वतीने बिकानेरच्या महाराजानी तहावर सही करून या बोडणात हात ओला करून घेतला. पण हिंददेवीच्या कपाळावर स्वराज्याचा टिळा मात्र आताच लागण्याचे चिन्ह दिसत नाही! बारशाच्या समारंभात वांझोटीकडे पाळण्याला चार झोके देण्याचे काम येणे यात फारसे औचित्य नाही. पण श्रीमंतांच्या घरचे सोन्याचे जड पाळणे हालवायला गरीब शेजारणीहि उपयोगी पडतात! त्याना चोळीचा एक खण दिला म्हणजे पुरतो!

# भाग ६ वा

[ सन १९१९ ते १९२० ]

## ( १ ) रौलेट अॅक्ट

टिळक विलायतेस असताना रौलेट बिले पास होऊन हिंदुस्थानात प्रचंड चळवळ झाली. ता. ५ फेब्रवारी १९१९ रोजी दिल्लीस कौन्सिलची बैठक सुरू झाली. व्हाइसरॉयच्या भाषणानंतर सर विलियम व्हिन्सेंट यानी दडपशाहीची दोन बिले प्रविष्ट केली. त्यानी सांगितले की "डिफेन्स ऑफ इंडिया अॅक्टाने आमचे बरेच काम केले. पण तो अॅक्ट पुढे मागे बंद होणार तरी तशा प्रकारचे काही शस्त्र आमच्या हाती पाहिजे. आम्हाला त्याचा उपयोग करून मामुली राजकीय चळवळ बंद करावयाची नाही तर अराजकतेवर आमचा कटाक्ष आहे. आणि या बिलाला तुम्ही विरोध कराल तर तुम्ही स्वराज्याला नालायक असे आम्ही समजू. कारण तुमच्या स्वराज्यातहि असला कायदा अवश्य आहे." ही बिले पुढे ढकलली जावी म्हणून लोकनियुक्त सभासदानी पुष्कळ प्रयत्न करून पाहिला. पण तातडीने ती दोन्ही बिले सिलेक्ट कमिटीकडे पाठविण्यात आली.

मध्यंतरी जी थोडी संधि मिळाली तिचा फायदा घेऊन विलायतेस डेप्युटेशन पाठविण्याची खटपट सुरू झाली. शिष्टमंडळाच्या कमिटीचे चिटणीस केळकर यानी अनेक लोकाशी पत्रव्यवहार करून माहिती मिळविल्यावर ता. ९ फेब्रुवारी रोजी दिल्लीस 'शिष्टमंडळ कमिटी'ची सभा झाली. एकंदर तेहतीस नावे शिष्टमंडळात पाठविण्यासारखी म्हणून पुढे आली. पण सरकार बोटीचे पास अवघे पंधराच देणार असल्यामुळे एक पहिली पंधराची याद व त्यातील कोणी न गेल्यास दुसरी याद अशा दोन यादी करण्यात आल्या. पासपोर्टाच्या बाबतीत मालवीय व केळकर यानी होम सेक्रेटरी याना भेटून निवडलेल्या लोकांच्याकडे ते परस्पर जावे म्हणजे ज्याला त्याला आपल्या सोयीप्रमाणे निघता येईल अशी व्यवस्था केली. या डेप्युटेशनची हकीगत मागील भागांत दिलीच आहे.

रौलेट बिले इतकी वाईट होती की सर नारायण चंदावरकर यानीहि त्याविषयी नापसंती दर्शविली. जरूर पडली तर व्हाइसरॉय यानी रेग्युलेशनचा उपयोग करून किंवा ऑर्डिनन्स काढून हव्या त्या लोकाना अटक करावी पण व्यक्तिस्वातंत्र्य घालविणारी आणि न्यायाच्या मूलतत्त्वाना हरताळ फासणारी ही बिले मंजूर करू नयेत असा त्यानी अभिप्राय दिला. पण सिलेक्ट कमिटीतून बिले बाहेर पडली त्यावरून काही आशा उरली नाही. लोकपक्षाच्या सभासदानी बिलाना मतभेद पत्रिका जोडल्या होत्या. तथापि ती खास मंजूर होणार याविषयी शंका नव्हती.

कौंसिलच्या बैठकीला ता. १८ मार्च रोजी सुरवात झाली तीत एका बाजूला ही बिले तावडतोब मंजूर करून घेण्याचा निश्चय व दुसऱ्या बाजूला ती

होतील तितकी पुढे ढकलली जावी निदान त्यांच्या शेंकडो अपायकारक अंगा-पैकी होतील तितकी तरी कमी करावी असा निश्चय होता. यामुळे कौन्सिल-सारख्या ठिकाणी वादयुद्धाचे जितके प्रकार शक्य तितके घडले. सुदैवाने वाच्छा पटेल सप्रू सुरेंद्रनाथ शास्त्री खापर्डे मदनमोहन कामिनीकुमार चंदा या सर्वांचे एकमत होते. तथापि सरकारच्या बाजूला निश्चित बहुमत असल्यामुळे काही उप-योग झाला नाही. शेवटच्या दिवशी तर रात्रीहि सभा बराच वेळ चालली. अशा रीतीने पुढील अनेक चळवळींना दंग्याधोप्यांना व अनर्थांना विनाकारण जन्म देणारी ही बिले लोकावर लादली गेली ! खरोखर पाहता या बिलांचा प्रत्यक्ष उपयोग सरकारला क्वचितच करावा लागला. नव्या सुधारणांचा अंमल सुरू झाल्यापासून जी क्रांतिकारक चळवळ देशात पूर्वी होती ती बहुतेक हटली असे म्हणण्यास हरकत नाही. मग मन्वन्तरपद्धतीप्रमाणे एक मनु संपला व दुसरा आला असे म्हणा किंवा सुधारणानी विचारांची एक नवीन दिशा उघडली असे म्हणा. कसेहि असले तरी आठ दहा वर्षांपूर्वी जी क्रांतिकारक व गुप्त चळवळ देशात होती ती यावेळी नाहीशी झाली होती ही गोष्ट खचित. या बिलांचा अंमल सरकारास बहुतेक केव्हाच करावा लागला नाही. पण वांझोटीचाच अधिक उप-द्रव म्हणतात त्याप्रमाणे या बिलानी अवांतर पीडा देशाला फार दिली.

बिलाचा प्रत्यक्ष उपयोग पडला नाही तरी सरकार खातेबाकी अगदीच पूज्य होऊ नये इतकी काळजी घेत असे. दुकानदारांची ही पद्धतच आहे की खात्याची बाकी कोणी सगळी देण्याला आला तरी ती न घेता मुद्दाम एखादा रुपया त्याचे नावे शिल्लक ठेवावयाचा किंवा व्यवहाराला मंगल प्रारंभ व्हावा म्हणून लक्ष्मीपूजनाच्या दिवशी आवडत्या गिऱ्हाईकांच्या पदरी थोडा तरी माल घालावयाचा व तसेहि नसले तर अनागुंदी दुबेरजी करावयाची. गेल्या आठ वर्षांतील रौलेट बिलाची खाती तपासून पाहिली तर असाच अनुभव येईल. पण डिफेन्स ऑफ इंडिया अॅक्टाच्या धर्तीवर काही कायद्याचे शस्त्र हाती पाहिजे म्हणूनच सरकारने ही बिले पुढे आणली. रौलेट कमिटीने संशोधनाचा एवढा कापूस पिंजला आणि अत्याचारी प्रवृत्तीचा ढीग रचला तेव्हा त्यातून एक दोन सुतेहि कातून काढता आली नाहीत तर सर्व श्रम व्यर्थ ! अॅंग्लो इंडियन लोक सिव्हिल सर्व्हंट इंग्रज व्यापारी सर्वांनी असा गिल्ला चालविला की सुधारणा येणार मग आता आम्ही जगावयाचे कसे ? पण खरोखर याना मरावयाला झाले होते काय ? अस्वल येण्यापूर्वीच आरोळी मारावी या न्यायाने त्यानी हाकाटी चालविली होती. बिचारे अस्वल येणार त्याला दात व नखे नाहीत ही गोष्ट कोणालाहि उघड दिसून येण्यासारखी होती. शिवाय त्याचे चारी पाय व नाकतोंड याना बांधलेल्या दोऱ्या पार्लमेंटच्या हाती रहावयाच्या हेहि ठरलेले होते. मग या अस्वलाची भीति कसली ? पण भ्यालो असे दाखविण्याचा सर्व गोऱ्या रहिवाशानी कटच केला होता. अत्याचाराच्या एकंदर चळवळीत फार तर पांच चार गोऱ्या

लोकांचे बळी पडले असतील. आमच्यातले विष आम्हालाच बाधले. बरे चार खाती सोपीव करून दिल्याने युरोपियन लोकांचे असे काय नुकसान झाले ? पण त्यानी एकंदर बहाणा असा केला की आता या देशात राहण्याची सोय राहिलेली नाही. राहावयाचेच तर पक्की जामीनकी सरकाराकडून मागून घ्यावी. राज्यकारभारात ही जामिनकी ठळक शब्दानी लिहून ठिकठिकाणी चिकटविलेलीच होती. बरे देशात अत्याचार होऊ नयेत अशाविषयी हा कायदा काय करणार होता ? कारण बंगाल्यात किंवा इतर कोठे जे अत्याचार म्हणून होत असतील ते गोऱ्या लोकाविरुद्ध नसून कोठे एखाद्या व्यक्तीचा खून कोठे दरोडे असली कृत्ये घडत होती पण त्यांचा राजकारणाशी संबंध येत नव्हता. तात्पर्य रौलेट बिले ही निष्कारण होती. मात्र त्यांचा इतर रीतीने उपद्रव फार झाला.

## ( २ ) गांधी व सत्याग्रहाची चळवळ

कौंसिलातील प्रतिकार यशस्वी होत नाही असे दिसून येताच गांधीनी या बिलाविरुद्ध सत्याग्रहाची चळवळ करण्याचे योजिले. त्यानी सत्याग्रहाच्या शपथेचा एक नमुना तयार केला. त्यात असा मजकूर होता की " सदर बिलानी स्वातंत्र्य न्याय वगैरे तत्त्वाना आणि तदनुषंगिक जन्मसिद्ध हक्काना बाध येतो अशी आमची प्रामाणिक समजूत असल्यामुळे या बिलांचा उद्या कायदा झाला तर तो, किंवा आम्हाला योग्य सल्ला मिळेल त्याप्रमाणे इतर काही कायदेहि, आम्ही मोडूं. मात्र या झगड्यात सत्य सोडणार नाही आणि कोणाच्या जीविताला किंवा मालमत्तेला धक्का लागेल अशी गोष्ट आम्ही करणार नाही. " बिले मंजूर झाली व त्याबरोबर सत्याग्रहाची मोहीम सुरू झाली. एप्रिल महिन्याचा दुसरा आठवडा हा एकंदरीने हिंदुस्थानच्या इतिहासात नमूद करून ठेवण्यासारखा झाला. सर्वच प्रांतात एकदम उचल झाली. पण मुंबई व पंजाब प्रांतात ती विशेष झाली. हरताळ पडले. सभातून कडक भाषणे झाली. आणि याच्याहि पुढले प्रकार उभयपक्षी झाले. ता. ३० मार्च हा दिवस दिल्ली येथील हरताळाचा होता. हिंदुमुसलमानांची एकी होती. लोकानी शांततेचा भंग केलेला नव्हता. असे असता पोलिसानी गोळीबार केला व त्याला अगदी थोडे निमित्त घेतले. पण एकदा गोळीबार सुरू झाल्यावर दंगल झाली व आता दिल्लीचे काय होते असे वाटू लागले. एके ठिकाणची जाहीर सभा आटपून स्वामी श्रद्धानंद हे परत चालले होते तों पोलिसानी रस्ते रोखले. तेव्हा त्याच्या कारणाची पुसतपास करण्याकरिता स्वामीजी पुढे झाले तों त्यांच्यावर शिपायानी बंदुका रोखल्या. तेव्हा स्वामीजी म्हणाले " हा मी उभा आहे. तुम्हाला गोळी घालावयाची असेल तर घाला. " दंग्यात अनेक लोक मारले गेले व अनेक जखमी झाले.

दिल्लीकडील बातमी ऐकून गांधीनी प्रेस-ॲक्ट मोडण्याकरिता शिळा-छापावर 'सत्याग्रह' नावाचे वर्तमानपत्र काढले. ते केवळ कायदा आपल्यावर ओढून

घेण्याकरिता. प्रेस ॲक्ट मोडून छापलेली पुस्तके विकण्याचे काम चांगल्या चांगल्या लोकानी सुरू केले. मुंबईहून दिल्लीस जाऊन ही चळवळ सुरू करावी म्हणून गांधी निघाले तो वाटेत त्याना कोसिकलन स्टेशनावर पंजाबात शिरण्याच्या बंदीचा हुकूम लावण्यात आला. परंतु 'मी तो मान्य करीत नाही' असे म्हणल्या-वर पोलिसानी गांधीना अटक केली व त्याना निराळ्या गाडीतून मुंबईस परत पाठविले. या बातमीमुळे दिल्लीसच काय पण इतर अनेक ठिकाणी पुनः गडबड झाली. गांधीना मुंबईस आणून सोडले त्या दिवशी मुंबईसहि बरीच गडबड उडाली. परंतु गांधीनी आपल्याला अटक झाली तरी चांगले वागविले वगैरे सांगून लोकांची मने शांत केली. त्यानी जीव तोडून अहिंसेचा उपदेश केला व ही चळ-वळ शांततेने केली तरच यशस्वी होईल असे सांगितले. पण या उपदेशाने काही कार्य न होता रौलेट बिलाना चिडून लोकानी खूप धामधूम केली.

सर्वात अनिष्ट प्रकार अमृतसर येथे घडले. त्यात लोकानी काय केले अधि-काऱ्यानी काय केले याची फोड करीत बसण्यापेक्षा 'अनर्थ कोसळला' एवढे मोघम वर्णन केलेलेच बरे. खून चढावा त्याप्रमाणे लोकानी आगळीक करून जाळपोळ व हाणामारी केली आणि मग त्याचा सूड सरकारने एकास शंभरपट या मापाने घेतला. पण लष्करी कायद्याने पंजाबात केलेली धामधूम दंगेधोपे जालियन-वाला बागेतील कत्तल लोकांची मानहानि करण्याचे झालेले अमानुष प्रकार लष्करी चौकशा आणि भयंकर कडक शिक्षा या सर्वांचा इतिहास सांगत बसल्यास तो एक ग्रंथच होईल म्हणून ते करण्याचे सोडून देऊन इतकेच म्हणतो की १८५७ नंतर सरकारी अत्याचाराच्या दृष्टीने एप्रिलातील या आठवड्यासारखे दिवस हिंदुस्थानाने एरव्ही केव्हाहि पाहिले नाहीत! शिमग्यात रात्रभर दंगल माजवून जिकडे तिकडे होळ्या पेटवून जागलेले लोक सकाळी झोंपत पड-ल्यामुळे जशी स्मशानी शांतता गावात दिसते त्याप्रमाणे एप्रिलचा हा आठ-वडा प्रथम भडकून गेला आणि त्यानंतर लोकात इतकी निश्चलता व उदासीन-पणा आला की सांगता पुरवत नाही. पण लष्करी कायद्यामुळे सरकाराने असा बंदोबस्त ठेवला होता की इकडची बातमी म्हणून तिकडे जाऊ नये! यामुळे ठिक-ठिकाणी घडलेल्या प्रकाराची वर्णने केवळ घड्याच्या चिरांतून पाणी झिरपावे त्याप्रमाणे हळूहळू कर्णोपकर्णी लोकाना कळत होती. आणि पुढे स्थिरस्थावर होऊन चौकशा सुरू झाल्या तेव्हा खरा प्रकार बाहेर येऊ लागला. कोणाला आश्चर्य वाटेल पण जालियनवाला बागेच्या कत्तलीत खरे काय घडले याची एप्रिला-तली बातमी विलायतेत ऑक्टोबर महिन्यात कळली! पुढे चौकशी होऊन प्रत्यक्ष जबान्याच झाल्या तेव्हा मग सर्वच गोष्टी छापून प्रसिद्ध झाल्या हे निराळे. सत्या-ग्रहाची चळवळ व त्यानंतर झालेले पंजाब प्रकरण यांची थोडीशी कल्पना येण्या-करिता केसरीचे दोन उतारे वाचकां करितां पुढें दिले आहेत.

## ( ३ ) सत्याग्रहाची हकीगत

[ केसरी ता० ८ एप्रिल १९१९ तील उतारा ]

रौलेटबिलाविरुद्ध सत्याग्रहव्रताच्या द्वारा जाहीर निषेध करण्याचा विचार इतर अनेक ठिकाणाप्रमाणेच दिल्ली शहरातहि ठरला होता. त्याप्रमाणे रविवार ता. ३० मार्च हा दिवस दिल्ली शहरातील हिंदुमुसलमानानी सत्याग्रहदिन म्हणून पाळला. परंतु समारंभ निर्विघ्नपणे तडीस न जाता लष्करी लोकाकडून निःशस्त्र लोकावर गोळ्या झाडण्यात आल्या आणि जागच्या जागी सहा इसम ठार झाले २ इसम इस्पितळात मरण पावले आणि १२ असामी जखमी होऊन इस्पितळात पडले. याखेरीज बरेच जखमी इसम इस्पितळात न जाता घरी किंवा खाजगी दवाखान्यात गेले असावेत पण त्यांची संख्या कळली नाही. हा जो शोचनीय प्रकार घडून आला त्याचे कारण काय व त्याला जबाबदार कोण याविषयी भिन्न भिन्न हकीकती प्रसिद्ध होत होत्या. परंतु सरकारी रीत्या सिमल्याहून ता. ३ रोजी जी हकीकत जाहीर झाली ती काय सांगते ते पहा.

"रौलेट–बिलाविरुद्ध निषेधप्रदर्शनार्थ रविवार ता. ३० रोजी दिल्ली शहरातील बहुतेक दुकाने बंद ठेवण्यात आली. ज्या कोणी आपली दुकाने उघडली होती त्यानाहि ती लवकरच बंद करावी लागली. दहा वाजल्यानंतर टांग्यांचीहि रहदारी बंद करण्याचा प्रयत्न होऊन उतारूना पायी चालावे लागले. या सर्व गोष्टीकडे पोलिसचे लक्ष होते आणि पोलिसची सर्वत्र जय्यत तयारी होती. दीड वाजण्याच्या सुमारास सत्याग्रह्यांचा मोठा जमाव स्टेशनाजवळ दाखल झाला आणि त्यातले काही इसम स्टेशनात जाऊन त्यानी तेथील फराळाच्या दुकानदारास आपले दुकान बंद करण्यास सांगितले व त्याने ते नाकारताच दुकानदारावर हल्ला करण्यात आला. तेव्हा रेल्वे–पोलिसानी हल्ला करणाऱ्या दोघा इसमास पकडून अटकेत ठेवले. हे वर्तमान कळताच बाहेरच्या जमावापैकी शेकडो लोक स्टेशनात घुसले आणि त्यानी अटकेत सापडलेल्या दोघा इसमास सोडविण्याचा यत्न केला आणि स्टेशनावरील सर्व व्यवहार बंद होण्याची धास्ती वाटू लागली. त्या वेळी प्लॅटफॉर्मवर असलेले काही युरोपियन सोल्जर व मेसापोटेमियाहून येऊन मणीपुरीला जाण्याकरिता रेल्वेत बसलेले २५० गुरखे शिपाई यांच्या साहाय्याने स्टेशनचे रक्षण करण्यात आले. परंतु जास्त मदतीची अपेक्षा वाटून किल्ल्यातून लष्कर बोलावण्यात आले. त्यास अनुसरून सुमारे २० ते ३० ब्रिटिश सोल्जरांची एक तुकडी स्टेशनवर येऊन दाखल झाली. नंतर २ वाजता काही घोडेस्वारांसह पोलीससुपरिंटेंडेंटचीहि स्वारी येऊन दाखल झाली. त्या वेळी स्टेशनवरील पायउतारा पोलिस व त्यांच्या मदतीस आलेले २० ते ३० सोजीर यांच्याभोंवती जमावाचा पूर्ण गराडा पडला होता. लष्करचे व पोलिसचे लोक स्टेशनच्या दारांचा बंदोबस्त राखीत

होते. पण दंगेखोरांचा जमाव इतका मोठा व इतका नजीक होता की एकाने तर शिपायाच्या हातची बंदूक हिसकून घेण्याचा प्रयत्न केला व त्याला संगिनीने भोकसावे लागले.

"ही परिस्थिति पाहताच पोलीस सुपरिंटेंडंटने गर्दी मोडण्याकरिता आपल्या घोडेस्वारासह गर्दीवर चाल केली व जमावास दुभंगून स्टेशनचा दरवाजा व समोरचा रस्ता मोकळा केला. दंगेखोराकडून विटांचे तुकडे फेकण्यात येत होते व त्यातले काही तुकडे स्वतः पोलीस सुपरिंटेंडंट व त्यांचे असिस्टंट डि. ट्रॅफिक सुपरिंटेंडंट आणि अॅ. डि. मॅजिस्ट्रेट यानाहि लागले. याप्रमाणे लष्करपोलीस आणि दंगेखोरांचा जमाव यांच्यामध्ये दोन तास झटपट चालल्यावर २–३० वाजता सुपरिंटेंडंट व मॅजिस्ट्रेट यानी असे ठरविले की जर आता जास्त कडक उपाय योजिले नाहीत तर बेसुमार रक्तपात होण्याचा प्रसंग येईल म्हणून लष्करी लोकाना एकदोन फैरी झाडण्यास हुकूम देण्यात आला. त्याबरोबर २ इसम तात्काळ ठार झाले व बाकीचे दंगेखोर पळाले. तेव्हा मग पोलिसानी अर्ध्या तासात राणीचा बाग मोकळा केला. टाऊन हॉलपर्यंत लष्करी पहारा ठेवण्यात आला व राणीच्या बागेभोंवती गुरख्यांचे कडे बसविण्यात आले.

## दुसरा गोळीबार

"इकडे चांदणीचौकात दंगेखोरांचा जोर अधिक आहे असे पो. सु. यास दिसून आले व टौन–हॉलच्या दिशेला दोन गोळीबार झाल्याचेहि कानी पडल्यावरून पो. सु. तिकडे गेले. त्या वेळी १५ सोल्जर व १५ पोलीस यांच्यावर सारखा दगडांचा मारा होत आहे आणि दंगेखोर राणीच्या बागेचे कठड्यावरून आत घुसत आहेत असे त्यास दिसून आले. हा प्रकार असाच चालू दिल्यास काही सोल्जर व पोलीस याना जबर जखमा होतील अशी भीति दिसून आल्यावरून जमावावर गोळीबार करण्यास हुकूम देण्यात आला. गोळीबाराच्या दोनतीन फैरी झडल्या. तीन असामी पटकन प्राणास मुकले आणि इतरानाहि जखमा झाल्या असाव्यात. या योगाने दंगा मोडला व दंगेखोरांची पांगापांग झाली. आठ इसम मयत असून १२।१३ दवाखान्यात घायाळ आहेत. मेलेल्या इसमात लहान मुलगे कोणीच नाहीत. मशीनगन चढविलेली मोटारगाडी रस्त्यातून हिंडविण्यात आली. पण मशीनगनचा उपयोग करण्यात आला नाही. त्याचप्रमाणे लष्करी स्वाराची तुकडी मागविली होती. पण दंगेखोरांची वाताहत झाल्यावर मग ती येऊन दाखल झाली. दंगा मोडण्यात लष्कर व पोलीस यानी मोठे आत्मसंयमन केले आणि पो. सु. व अॅ. डि. मॅजिस्ट्रेट यानी अकस्मात उद्भवलेला वेडावाकडा प्रसंग मोठ्या धैर्याने पार पाडला असे स्थानिक अधिकाऱ्यांचे मत आहे!"

## जाहीर सभेची हकीकत

इकडे हा रक्तपाताचा प्रकार झाल्यावर सायंकाळी काँग्रेसच्या मंडपाऱ्या मैदानावर स्वामी श्रद्धानंद ( पूर्वाश्रमीचे गुरुकुलाचे संस्थापक लाला मुनशीराम ) यांच्या अध्यक्षतेखाली १५ हजार लोकांची जाहीर सभा भरली. या सभेला हरकत करण्याचा दोन वेळ प्रयत्न करण्यात आला. दुसऱ्या वेळी तर चीफ कमिशनर व डि. मॅ. हे सभेच्या जागी हजर होऊन त्यानी सभा बंद करण्यास सांगितले. परंतु सभेचे सर्व काम अत्यंत शांतपणे चालेल व सर्व श्रोतृसमूह माझ्या हुकमतीप्रमाणे वागेल असे स्वामीजींनी आश्वासन दिले व त्यास श्रोत्याकडून होकार मिळाला तेव्हा अधिकाऱ्यांची काही डाळ न शिजून ते निघून गेले व सभेत रौलेटबिलाचा निषेध करून स्टेटसेक्रेटरींनी त्यास संमति देऊ नये असा ठराव पास करण्यात आला. सभेचे काम आटपून लोक घरोघर जात असता स्वामी श्रद्धानंदजी यांवेवर जो प्रसंग गुदरला होता व त्यात त्यानी जे अलौकिक धैर्य दाखविले त्याची हकीगत त्यांच्याच शब्दानी देणे बरे. ती हकीगत अशी—

## स्वामी श्रद्धानंद यांची हकीगत

"जाहीर सभा आटपल्यावर आम्ही मोठ्या शिस्तीने शहरातून चाललो होतो. आम्ही क्लॉक–टॉवरपाशी आलो त्या वेळी गुरखे लोकांचा त्या रस्त्यावर पाहरा ठेवण्यात आलेला आम्हाला दिसला. आम्ही आल्यावर गुरखे अर्थातच एका बाजूला सरले. पण एका गुरख्याने हवेत बंदुकीचा बार केला. बार होण्याबरोबर माझ्याबरोबर असलेल्या लोकात चलबिचल झालेली दिसली. पण मी सर्वांना स्वस्थ उभे राहण्यास सांगितले. त्याबरोबर जागचे जागी ते स्वस्थ उभे राहिले. गुरखे उभे असलेल्या ठिकाणी मी एकटाच गेलो. व निरपराधी लोकावर तुम्ही गोळ्या का झाडता? असा मी त्याना सवाल केला. लगेच दोन गुरख्यानी माझ्यावर रायफली रोखून 'तुमकू छेद देंगे' असे ते दरडावून म्हणाले. 'मैं खडा हूं गोळी चलाव' असे मीहि त्याना सांगितले. इतक्यात आठदहा रायफली माझ्यावर रोखल्या गेल्या. गुरख्यांच्या धमकावण्या चालूच होत्या. आता मात्र लोकाना दम धरवेना. 'तुम मत मरो हम मर जायेंगे' असे म्हणून लोक पुढे घुसण्याच्या बेतात होते. पण मी हाताने खूण केल्यावर लोक जागच्या जागी थबकून राहिले. इतक्यात एक युरोपिअन अधिकारी त्या ठिकाणी दाखल झाला व गुरख्यानीहि आपापल्या रायफली परत घेतल्या. गोळ्या झाडण्याबद्दल आपला हुकूम होता काय व आपण गोळीबार ऐकला काय असे मी त्यास विचारले. तेव्हा पहिल्याने नकारार्थी उत्तर देऊन गोळीबारासंबंधाने मी चौकशी करतो असे त्याने दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर दिले. नंतर तेथून आम्ही पुढे चाललो. इतक्यात एक गुरखा आपली कुकरी फिरवीत आमच्यावर चाल करून आला. पण असल्या धमकावणीला कोणीहि दाद दिली नाही. मशीनगनचे भेडसावणे चालूच

होते. पण त्यालाहि लोक घाबरले नाहीत किंवा गांगरून गेले नाहीत. पोलिससंबंधी आम्हाला कोणत्याहि प्रकारचा द्वेष वाटत नाही. पण या अत्याचारामुळे लोकांचा सरकारच्या न्यायबुद्धीवरील विश्वास उडाला आहे."

### प्रेतांची जंगी अपूर्व मिरवणूक

रविवारी हा शोचनीय प्रकार घडल्यावर सोमवारी मयत इसमांची प्रेते मागण्यात आली. अधिकाऱ्यानी प्रथम टोलवाटोलवीच केली. पण अखेरीस प्रेते स्वाधीन करण्यात आल्यावर हिंदु व मुसलमान हा भेदभाव विसरून जाऊन उभय धर्मीयांच्या बळी गेलेल्या इसमांच्या प्रेतांची जोड मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीला दहा हजारपर्यंत इसम हजर होते. ही मिरवणूक क्लॉक टॉवर-जवळ आल्यावर ज्या ठिकाणी हिंदू व मुसलमान वीरानी सत्याग्रहाच्या यज्ञात आपले बळी दिले तेथील रक्तस्रावाने पवित्र झालेल्या भूमीवर हिंदू व मुसलमान यांच्या एकीचे दृढीकरण करण्यात आले आणि नंतर हिंदूंची प्रेते स्मशानाकडे व मुसलमानांची दफनभूमीकडे नेण्यात आली.

या दंग्यास सुरुवात कशी झाली एकंदर प्रकार काय घडला व रक्तपाता-बद्दल जबाबदार कोण याची चौकशी करण्याकरिता नागरिकांच्या वतीने बिन-सरकारी इसमांचे कमिशन नेमिले असून सिव्हिल हॉस्पिटलमधील जखमी लोकांच्या साक्षी घेण्यास सुरुवात झाली आहे. सरकारनेहि आपले कमिशन नेमून चौकशी करावी अशी मागणी करण्यात आली पण ती नाकारण्यात आली.

मंगळवारपासून दिल्लीतील सर्व व्यवहार पूर्ववत सुरू झाला आहे. परंतु लष्कर व पोलीस यांच्या जोरावर आम्ही दंगा मोडून शांतता प्रस्थापित केली ही अधिकाऱ्यांची बढाई खरी नसून हकीम अजमलखान सुलतानसिंग वगैरे लोक-मान्य पुढाऱ्यानी जेव्हा आश्वासन दिले आणि लष्करचे लोक शहरातून काढून न्या म्हणजे पूर्ववत् व्यवहार चालतील असे सांगितले तेव्हा अधिकाऱ्यानी लष्कर काढून नेल्यावर शहरात पूर्ववत् व्यवहार सुरू झाले.

## (४) अमृतसरच्या लोकांचा छळ

[ता. १३ एप्रिलच्या १९२० च्या केसरीतील उतारा]

पंजाबात अमृतसर येथे सुवर्ण मंदिराशेजारी जालियनवाला बागेत जनरल डायर याने निरपराधी आबालवृद्धांची कत्तल केल्यास आज तारखेस बरोबर एक वर्ष झाले. या दुःखद गोष्टीच्या स्मरणार्थ आज रोजी हजारो ठिकाणी जाहीर सभा भरविण्यात येतील व डायर याच्या अमानुष कृत्यांचा निषेध करून जालि-यनवाला स्मारक फंड जमा करण्यात येईल. या कत्तलीची बरीच साग्र हकीकत आतापर्यंत वाचकास अवगत झालीच आहे. तथापि एका वर्षापूर्वी अमृतसरच्या लोकास जे जे अनेकविध अकल्पित असह्य हाल व उपमर्द अकारण सोसावे

लागले त्या यमयातनांची त्रोटक कहाणी आजच्या या प्रसंगी वाचकास सादर करण्यात येत आहे. यात ज्या गोष्टी आतापर्यंत जगजाहीर झाल्या आहेत त्यांची पुनरावृत्ति शक्य तितकी टाळून आतापर्यंत अप्रसिद्ध पण कॉंग्रेस कमिटीच्या रिपोर्टांत प्रसिद्ध झालेली अशी हकीकत देण्यात येत आहे.

डॉ. किश्वलू व सत्यपाल याना विश्वास दाखवून बोलावून आणून पकडून हद्दपार केल्यावर ता. १० रोजी अमृतसरचे नागरिक डे. कमिशनरकडे फिर्याद करण्याकरिता जात असता रेल्वे लाइनवरील दोनहि पुलांचे रस्ते बंद करण्यात अधिकाऱ्यांची चूक झाली. हे रस्ते बंद केले नसते तर डे. कमिशनरच्या जीवास अपाय झाला असता ही कल्पना चुकीची आहे. कारण रस्ता बंद केल्यामुळे दंगा सुरू झाल्याबरोबर गोळीबार सुरू केल्यावेळी डे. कमिशनर तेथे होते. परंतु कोणीहि त्यांच्यावर हल्ला केला नाही किंवा त्यास अपाय करण्याचा प्रयत्नही केला नाही. असे असून पुलावरील लोकाना मागे परतण्यास सांगण्याचा मि. मखबुल महंमद व मि. सालेरिया हे प्रयत्न करीत असता त्याना बाजूस होण्याविषयी सूचना न देता एकदम गोळीबार सुरू करण्यात आला. त्यात हे वकील स्वतः बळी पडले नाहीत हा दैवयोगच होय. हा गोळीबार सुरू होताच लोक परतू लागले असता गोळीबार बंद न होता तो तसाच चालू राहिला. व त्यामुळे जे २०।२५ लोक मृत्युमुखी पडले त्यातल्या बहुतेकाना गोळ्यांच्या जखमा पाठीवर झाल्या होत्या. व त्याहि कमरेच्या भागास न होता वरच्या भागास झाल्या होत्या. जायबंदी झालेल्या इसमांस दवाखान्यात नेण्यास डोल्या आणल्या नव्हत्या व मागाहूनहि आणू दिल्या नाहीत. वेळेवर औषधोपचार झाला असता तर काही जखमी इसम मृत्यूच्या दाढेतून वाचले असते. जखमी इसमांस सिव्हिल हॉस्पिटलमध्ये थारा मिळाला नाही हा प्रकार तर फारच गर्हणीय आहे. ता. ११ पासून चार पाच दिवस शहरातील पाण्याचे नळ व विजेचे दिवे बंद करण्यात आले व त्यामुळेहि लोकांचे अतोनात हाल झाले ता. १० रोजी शहरात जाळपोळ व नॅशनल-बॅंकेची लूट झाल्यानंतर ता. ११ रोजी अधिकारीवर्गाचे खलबत चालू असता डे. पो. क. मि. मिसूर म्हणाले की 'युरोपिअनांच्या एकेका खुनाला नेटिव्हांचे हजारो मुडदे पाडले पाहिजेत!' याच खलबतात शहरावर तोफांचा भडिमार करून अर्ध्या तासात शहर उध्वस्त करण्याच्या कल्पनेची भवति न भवति झाली. त्या वेळी लाला धोलनदास यानी स्पष्टपणे असे बजावले की सुवर्णमंदिरास जर यत्किंचितहि धक्का लागला तर पंजाबात शांतता प्रस्थापित होण्याची आशाच बाळगू नका. ही सुवर्ण मंदिराची अडचण झाल्यामुळेच शहराचा बचाव झाला असे म्हणण्यास हरकत नाही कारण शहरावर तोफा डागण्याच्या कल्पनेची मजल शाब्दिक चर्चेच्या पुढे जाऊन कोणत्या बाजूने कसा मारा करावा याचा नकाशाहि तयार झाला असून सिव्हिल सर्जन कर्नल स्मिथ याने आपले असिस्टंट डॉ. धनपतराय यास आणखी अर्ध्यातासाने जनरल डायर शहरावर मारा

करणार आहे सबब तुम्ही शहरात जाऊ नका अशी इषारत दिली होती! मि. वॅथन यानी मात्र डोके शांत ठेवले असून भडिमार करण्याच्या सूचनेला हरकत घेतली. ज्यांचा दंग्याशी काही संबंध नाही असे दोघे नेत्र–रोगी शीख आपल्या डोळ्यावर शस्त्रक्रिया करून घेण्याकरिता याच कर्नल स्मिथकडे आले असता 'जा गांधीकडे जा म्हणजे ते तुमचे डोळे नीट करतील' असला उद्धट जबाब देऊन त्याने त्यास इस्पितळातून घालवून दिले! याच कर्नल स्मिथने जालियनवालाबागेत जखमी झालेले काही इसम इस्पितळात आले असता 'या पिसाळलेल्या कुत्र्याना येथून हाकलून लावा. गांधी सत्यपाल व किश्चलू हे त्याना औषधोपचार करतील' असे उद्गार काढले! डॉ. सत्यपाल व किश्चलू याना हद्दपार करण्याचा हुकूम आला असून देखील त्याची बजावणी करण्याचा डे. कमिशनरला विचार पडला असता, याच कर्नल स्मिथने लाहोरला मुद्दाम जाऊन ले. गव्हर्नरकडून हुकमाची बजावणी करण्याविषयी हुकूम आणला!

### घुशीचा सापळा

ता. १३ रोजी जालियनवाला बागेतील कत्तल झाली हे सर्वश्रुतच आहे. हा 'घुशीचा सांपळा' कसा तयार केला गेला हे गूढ उकलणे कठिण नाही. लाला कन्हयालाल हे अध्यक्षस्थान स्वीकारणार आहेत असे जाहीर करण्यात आले होते पण लाला कन्हयालाल याना त्याची वार्ताहि नव्हती. लालाजींना वार्ताहि नसता त्यांच्या नावाचा उपयोग करण्यात आला याचा अर्थ काय हे ज्याचे त्याने ओळखावे असे कन्हयालाल हे आपल्या साक्षीत म्हणतात व वाचकाना त्याचा अर्थ लक्षात येईलच. जालियनवालाबागेतील सभा बोलावणारा हंसराज याच्या कित्येक गुप्तपोलीस अधिकाऱ्याशी मुलाखती होत असत. डॉ. सत्यपाल याना हद्दपार केल्यावर हरताळ पाडा व डे. कमिशनरकडे फिर्याद करण्याला चला म्हणून लोकाना चिथावणारा इसम हाच! ता. १३ च्या पूर्वी सी. आय. डी. च्या अधिकाऱ्याशी याची मुलाखत झाली होती. याच इसमाने ता. १३ रोजी जालियनवालाबागेत सभेच्या तयारी करिता जागा साफसूफ करविली प्लॅटफॉर्म तयार करविला डोकीवर विमान घिरट्या घालू लागले असता सभा सोडून बाहेर जाऊं नका असे श्रोत्यास सांगितले. ही सर्व कारवाई चालू असता उघड व गुप्त पोलिसांचे अधिकारी सभेच्या जागी येत व त्यांच्याशी हंसराजाचे बोलणे किंवा खाणाखुणा होत. डोकीवर विमान घिरट्या घालू लागताच गुप्त पोलीस अधिकारी बागेतून निघून शेजारच्या घरात जाऊन बसले. विमान निघून गेल्यानंतर अर्ध्या तासात लष्करी लोकानी बागेचे तोंड व्यापिले व गोळीबार सुरू होण्यापूर्वी हंसराजाने हातरुमाल उडवून खूण केली व नंतर तो प्लॅटफार्मवरून उतरला! इतर लोक घाबरून भिंतीवरून उड्या टाकीत असता

हंसराज हा लष्करी शिपायानी व्यापलेल्या दरवाज्याकडेच गेला व तो त्या दरवाज्यानेच बाहेर पडला. या 'घुशीच्या सांपळ्यातून' बाहेर पडलेला प्रत्येक इसम तातडीने आपल्या घराकडे जात असता हंसराज माल घराकडे न जाता आपण सुखरूप असल्याचा नुसता निरोप घराकडे पाठवून हॉल बझार-कडे चालता झाला! अशा या इसमास हंटर-कमिटीपुढे साक्षीला न आणता मेसापोटेमियात पाठवून देण्यात आले. या सर्व गोष्टीवरून हा 'घुशीचा सापळा' कसा बनवला गेला हे उघड होत आहे. लाला हरकिसनलाल यांचे जालंदरच्या प्रांतिक परिषदेत जे भाषण झाले त्यात ते म्हणतात की "काँग्रेस कमिटीपुढे या गोष्टीचा स्पष्ट निर्णय करणारा पुरावा दाखल झाला होता. परंतु तो पुरावा जाहीर करण्याला साक्षीदारांची संमति नसल्यामुळे कमिटीने स्पष्ट निर्णय दिला नाही." पण असे करणे हा सत्याग्रहाचा अतिरेक होय!

मि. थॉमसन यांच्या मताप्रमाणे अवघे २९० इसम मृत्यु पावले नसून मेले-ल्यांची संख्या एक हजारावर व दगावलेल्यांची संख्या आणखी एक हजारावर गेली हे या रिपोर्टातील शेकडो जबान्यावरून सिद्ध आहे. पण या कत्तलीत सात महिन्यापासून सत्तर वर्षापर्यंत सर्व वयाची माणसे होती व त्यात साधु बैरागीहि होते व स्त्रियाहि होत्या हे बहुतेकास अवगत नाही. परंतु निशाणी नंबर २४ ४५ ४६ ५० ५२ ७६ वगैरे जबान्यावरून ही गोष्ट कळून येते. एकंदर समाज २० हजारापर्यंत असून त्यात अल्पवयी मुले ४००।५०० होती! या गोळीबाराने जितके अधिक बळी घेता येतील तितके घेण्याचा डायरचा निश्चय स्वतः त्याच्याच जबानीवरून उघड झाला असून या रिपोर्टातहि त्यास प्रत्यंतर सांपडते. गोळीबार सुरू झाल्यावर कित्येक इसम जमिनीवर लोळण घेऊन आपला बचाव करून घेऊ लागले तेव्हा शिपायाना खाली बसून गुडघे टेकून खाली नेम धरण्याचा हुकूम देण्यात आला. व हा हुकूम नीट बजावला जात नाही असे पाहताच एका ऑफिसरने शिपायाना शिव्या हासडून रिव्हॉल्व्हरचा धाक घालून बंदुका खाली रोखण्यास भाग पाडले! ज्यास्तीत जास्त प्राणहानि होण्याकरिता हंसराजाने तर सर्व उपाय योजले होतेच. पण त्याशिवाय ज्यावेळी लष्करी शिपाई बागेच्या दरवाज्यात शिरत होते त्यावेळी जे इसम बाहेर जात होते त्याना दरडावून बागेत जावयास लाविले.

### साध्वी रतनदेवी

अशा रीतीने जाणून बुजून शक्य तितक्या अधिक इसमांची कत्तल करून केवळ दारूगोळा संपल्यामुळे आणखी प्राणघात करण्याचे साधन न राहिल्याने डायरची स्वारी परत निघून गेल्यानंतर, त्या बागेत व आसपास जो करुण रौद्र बीभत्स व भयानक या रसानी परिपूर्ण असा देखावा दिसू लागला त्याचे वर्णन करणे अशक्य आहे! ज्यांचे जे कोणी आप्त घरी आले नाहीत त्याना शोधून काढण्याची धांदल रात्री ८ वाजेपर्यंत चालली होती. पण प्रेतांचा व मृतप्राय

देहांचा एवढा खच पडला होता व कोणाच्याच ओळखीचे नसलेले परस्थ लोकहि त्यात इतके होते की सर्व प्रेतांची तपासणी व विल्हेवाट रात्री ८ वाजेपर्यंत होऊ शकली नाही. आणि रात्री ८ वाजल्यानंतर बाहेर पडणाऱ्यास गोळी घालून ठार करण्याची द्वाही फिरली असल्याने बरीच प्रेते बरेच जखमी इसम यांची रात्रभर विल्हेवाट लागली नाही. त्या गर्दीत कित्येक जखमी इसमास वेळेवर पाणीहि न मिळाल्याने ते गतप्राण झाले. त्या भयानक रात्री त्या बागेतील देखाव्याची कल्पना येण्यास निशाणी नं. ७५ ची साध्वी रतन देवी या स्त्रीची जबानी वाचावी. या साध्वीचा पति घरी न आल्याने तिने बागेत जाऊन पतीचे प्रेत धुंडाळून काढले. तितक्यात आठ वाजल्याने सर्व रहदारी बंद झाली व आळीआळी फिरून तिने आपल्या पतीचे प्रेत घरापर्यंत पोचविण्यास मदत करण्याविषयी विनवणी केली असता गोळीबाराच्या दहशतीने कोणीहि घर सोडून बाहेर येईना! तेव्हा ती बिचारी त्या कत्तलखान्यात परत पतीच्या प्रेताशेजारी जाऊन बसली. लवकरच त्या मसणवटीत कुत्र्यांचा धुमाकूळ सुरू झाला. तेव्हा रतनदेवीने कुत्र्यापासून आपला स्वतःचा व नवऱ्याच्या प्रेताचा बचाव करण्याकरिता तेथेच पडलेली एक काठी हातात घेतली व कुत्र्याना दटावीत ती काळरात्र त्या स्मशानात घालविली! ज्यांचा प्राण अद्यापि गेला नव्हता अशांचे विव्हळणे कुत्र्यांचे भुंकणे दिवाभीतांचा घूत्कार घड्याळाचे ठोके व आपल्या धडधडणाऱ्या छातीचे ठोके याखेरीज दुसरे काही तिला ऐकू येत नव्हते! अशा भयानक रात्रीतहि एक दोनदा काही इसम त्या बागेत आले! रात्री बाहेर पडण्याचा हुकूम नसता हे इसम निर्भयपणे आले कसे व गेले कसे? कोणा आप्ताच्या प्रेताच्या शोधासाठी ते आले होते म्हणावे तर पुष्कळशी प्रेते त्यानी धुंडाळून व चाचपून पाहिली खरी पण एकहि प्रेत उचलून नेले नाही. कित्येक प्रेतांच्या अंगावर दागिने होते खिशात घड्याळे होती कप्यात नोटा व रोकडहि असेल. परंतु सकाळी पहावे तो सर्व काही झळझळीत झाले होते! अशा रीतीने ही काळरात्र निघून गेल्यावर सूर्योदय होताच पुनः प्रेते शोधून घेऊन जाण्याचा व त्यांचा अंत्य संस्कार करण्याचा धुमधडाका सुरू झाला. किती इसम मृत्युमुखी पडले याची नोंद या वेळी अधिकाऱ्यानी केलीच नाही. पण पुढे चार महिन्यानंतर ज्या कोणाचे आप्तइष्ट त्या कत्तलीत मेले असतील त्यांची चौकशी करून नावे नोंदविण्याचा जाहिरनामा लागला!

ही कत्तल झाल्यानंतर अधिकारीवर्गात चर्चा होऊन तिच्या युक्तायुक्तेबद्दल कोणाचे काय मत झाले असेल ते असो. पण ही कत्तल चालू असता पोलिस अधिकारी मि. रोहिल व जव्हारमल याना तो देखावा पाहावेना म्हणून ते बागेच्या बाहेर गेले होते. डे. कमिशनर मि. आयर्व्हिंग याला मात्र त्याची दिक्कत न वाटून उलट आपले समर्थन करण्याकरिता त्याने एक जाहिरनामा काढला. त्यात जनरल डायर व त्यांचे शिपाई बागेत आले असता लोकानी त्यानाच दटाव-

ण्याचा प्रयत्न केला म्हणून गोळीबार करावा लागला असा धडधडीत खोटा जाहीरनामा प्रसिद्ध केला. सभेतील लोकानी आपणास दटावल्याबद्दल स्वत: जनरल डायर हंटर कमिटीपुढील साक्षीत एक अवाक्षरहि बोलत नाही! हा जाहीरनामा आणखी एकदोन मुद्याच्या दृष्टीनेहि महत्त्वाचा आहे. सभाबंदीचा हुकूम झाला असता 'सरकारच्या वाइटावर असलेल्या काही इसमानी ही सभा भरविली व खोट्या थापा मारून त्या सभेस शक्य तितके अधिक इसम गोळा केले पण त्या सभेला जाण्यात धोका काय आहे तो कळविला नाही' असे मि. आयर्व्हिंग म्हणतात! सरकारच्या वाइटावर असलेले हे इसम कोण? त्यानी कोणत्या बाता झोकून दिल्या याचा मि. आयर्व्हिंग हे खुलासा करतील काय? या घुशीच्या सापळ्यात शक्य तितकी अधिक सावजे कोंडण्याचा लबाडीने प्रयत्न करण्यात आला ही गोष्ट सरकारलाहि कबूल आहे. पण सभेची उभारणी करणारा हंसराज हा तर पोलिसांचा हस्तक! शिवाय सभेच्या आधी तीन वाजल्यापासून त्या जागी गुप्त व उघड पोलीस अधिकारी येऊन गेले व गोळीबार सुरू होण्याच्या आधी दहा मिनिटे त्या सर्वांनी आसपासच्या घरात दडी मारली. पण तत्पूर्वी एकानेहि श्रोतृवर्गापैकी एकालाहि त्या घुशीच्या सापळ्यातून निघून जाण्याविषयी सूचना किंवा इषारा किंवा हुकूम दिला नाही. अर्थात हेच इसम सरकारचे 'हितशत्रु' (ill-wishers) ठरत नाहीत काय? याच जाहिरनाम्यात मि. आयर्व्हिंग आणखी असे जाहीर करतात की ही कत्तल करणाऱ्यात एकहि युरोपियन शिपाई नव्हता पण हे जाहीर करण्यातला हेतु काय? ही अमानुष कत्तल युरोपियन सोजिरानी केली नसून तुमच्याच शिपायानी केली हाच ना या 'न मया' म्हणण्यातला अभिप्राय? पण कानावर हात ठेवण्याच्या या असल्या क्लृप्तीने त्या कत्तलीचा अमानुषपणा जास्तच निंद्य ठरतो. हा गोळीबार करणे न्याय्य होते असे जर तुमचे मत आहे तर हे 'न मया' म्हणण्यात मतलब काय? आणि तो गोळीबार चुकीचा व राक्षसीपणाचा होता असे जर तुमचे मन तुम्हास खात असेल तर गोळीबार करणारे शिपाई गोरे नव्हते एवढ्याने जनरल डायरच्या शिरावरचे पापाचे खापर दुसऱ्याच्या माथी थोडेच फुटणार आहे!

या आसुरी कृत्याची जबाबदारी एकमेकावर लोटण्याचा प्रयन कसा चालला होता याची कल्पना ता. १४ रोजी घडलेल्या हकीकतीवरून चांगली करता येते. त्या दिवशी कोतवालीत प्रमुख नागरिकांची सभा भरली होती. त्या वेळी डायरने स्पष्ट सांगितले की मी सीधा माणूस आहे मला डावपेंच काही कळत नाहीत. लढाई म्हटल्यानंतर मला फ्रेंच रणभूमि व अमृतसर सारखेच आहे. या भाषणावरून जनरल डायर याची अमृतसरच्या दंग्यासंबंधी भलतीच कल्पना करून देण्यात आली होती हे उघड दिसते व त्याची जबाबदारी मि. आयर्व्हिंग याच्या शिरावर येऊन पडते. अर्थातच मि. आयर्व्हिंग यास ती असह्य होऊन त्याच सभेच्या वेळी खानबहादूर गुलाम सादिक हे बोलावयास उभे राहिले

असताना मि. आयर्व्हिंग हे एकदम उसळून म्हणाले 'खानसाहेब गप्प बसा. तुम्ही लोकानी मला जी भलतीच बातमी दिली त्याचा हा सगळा परिणाम आहे!' अशा रीतीने ही टोलवाटोलवी करण्याचा निंद्य प्रयत्न दुसरे दिवसापासून सुरू झाला. कत्तल करण्याचा हुकूम डायरने दिला असल्याने त्याच्यावरची जबाबदारी नाहीशी होऊ शकत नाही हे खरे. परंतु मि. आयर्व्हिंग हेही या दोषाचे बरोबरीने हिस्सेदार आहेत. परंतु काँग्रेस कमिटीने मि. आयर्व्हिंग यांची चौकशी व्हावी अशी शिफारस केली नाही याचे सखेदाश्चर्य वाटते. हंटर कमिटीच्या रिपोर्टात ही उणीव भरून काढली जाते की काय पहावे!

या अमानुष कत्तलीशिवाय इतर रीतीनेही अमृतसरच्या निरपराधी लोकांचा अत्यंत छळ करण्यात आला. त्यात फटके मारणे पोटाने सरपटावयास लावणे वगैरे अमानुष प्रकार सर्वश्रुतच आहेत. पण त्या सर्वांपेक्षा खोट्या साक्षी देण्यासाठी झालेला छळ फारच भयंकर असून रक्ताचे पाणी करून सोडणारा असल्याने त्याचा तेवढा उल्लेख करून ही हृदयद्रावक कहाणी तूर्त संपवू. काँग्रेस कमिटीच्या रिपोर्टात असली शेकडो उदाहरणे नमूद आहेत. पण त्यातल्यात्यात मौलवी गुलाम झिलानी याची हकीकत आंगावर शहारे आणणारी आहे. डॉ. किश्लू डॉ. सत्यपाल मि. बाशीर यांच्या विरुद्ध साक्ष देण्याकरिता गुलाम झिलानी यांचा अत्यंत क्रूरपणे छळ करण्यात आला. त्या छळाच्या प्रकाराचा उच्चार करणे देखील किळसवाणे असल्याने ती हकीकत सविस्तर देता येत नाही. खोटी साक्ष देण्याच्या धमकीतून स्त्रिया देखील सुटल्या नाहीत हे मिसेस नेली बेंजामिन हिच्या साक्षीवरून सिद्ध होते. या छळाची ही कहाणी जितकी लांबवावी तितकी लांबणार परंतु विस्तारभयास्तव ती संपविणे जरूर आहे. तथापि या छळात हिंदी लोकाना औषधोपचाराची व डॉक्टरांची मदत न मिळाल्याने त्यांचे झालेले हाल व झालेली प्राणहानि ही अत्यंत शोचनीय व गर्हणीय होय. रात्री आठ वाजल्यानंतर कोणीहि घराबाहेर पडू नये हा जुलमी हुकूम निदान डॉक्टराना तरी लागू केला नसता तर जालियनवाला बागेत जखमी झालेले काही इसम तरी प्राणास मुकले नसते. शेरवुडलेनमधून पोटाने फरपटल्याशिवाय जाण्याचा हुकूम नसल्याने आजारी इसमास डॉक्टराची मदत मिळू शकली नाही व त्यामुळे माझा मुलगा मृत्यूच्या दाढेत सांपडला असली केविलवाणी जबानी वाचून कोणाच्या काळजाचे पाणी होणार नाही ? असे एक ना दोन तर शेकडो प्रकार या रिपोर्टात नमूद आहेत. असली मनुष्यत्वाला लाज आणणारी कृत्ये या विसाव्या शतकात ब्रिटिश राज्यात न्यायाकरिता व सत्याकरिता महायुद्ध करून जय संपादन केल्यानंतर त्या विजयाला कारणीभूत झालेल्या पंजाबी लोकात घडून यावी हे देशाचे दुर्दैव होय! ता. १३ एप्रिल १९१९ पासून अमृतसर वगैरे ठिकाणच्या पंजाबी लोकावर जो असह्य छळ सोसण्याचा प्रसंग आला तसा प्रसंग वैऱ्यावरहि येऊ नये. पण ज्यानी तसा प्रसंग आणला त्या उद्दाम अधिकाऱ्याना ब्रिटिश पार्लमेंट कोणती शिक्षा करणार

हा प्रश्न आज सर्वांच्या पुढे असून हंटर कमिटीच्या रिपोर्टाने त्या प्रश्नाची लवकरच वासलात लागणार आहे. या हंटर कमिटीच्या रिपोर्टाने हिंदी लोकांच्या काळजाला झालेलीहि जखम भरून येते का त्या जखमेत आणखी मीठ चोळले जाते याचाहि उलगडा लवकरच होईल.

पंजाबात लष्करी कायद्यान्वये ज्या लोकाना शिक्षा झाल्या होत्या त्यांच्यातर्फे विलायतेत प्रीव्ही कौंसिलपुढे अपील करण्यात आले होते. सर जॉन सायमन यानी अपील अर्ज गुदरून तक्रार सांगितली परंतु तिचा उपयोग न होता लॉर्ड हॉल्डेन यानी आपणाला हे अपील घेण्याचाहि अधिकार नाही असे ठरवून ते काढून टाकले. त्यानंतर इकडे पंजाब प्रकरणाची चौकशी करण्याकरिता स्कॉटलंडातील एक न्यायमूर्ती लॉर्ड हंटर यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमण्यात आली. पण कॉँग्रेसचे अध्यक्ष या नात्याने पं. मदनमोहन यानी या कमिटीच्या म्हणजे न्यायकोर्टाच्या घटनेविरुद्ध जाहीर तक्रार केली. ता. १० सप्टेंबर रोजी भरलेल्या कायदेकौन्सिलात त्यासंबंधाने त्यानी एक ठरावहि मांडला पण तो बहुमताने नामंजूर झाला. हंटर कमिटीवर फक्त दोनच हिंदी गृहस्थ नेमण्यात आले. एक अलाहाबादचे जगत् नारायण व मुंबईचे चिमणलाल सेटलवाड. या कमिटीपुढे डायर–ओड्वायर वगैरे लोकांच्या साक्षी व्हावयाच्या होत्या आणि न जाणो कदाचित् या चौकशीतून काही अधिकाऱ्यांचे काही अपराध अक्षम्य असे निष्पन्न झाले तर कायद्याच्या कचाटीत ते सांपडावयाचे म्हणून त्याना कायदेशीर अभयवचन देण्याकरिता 'माफीचे बिल' म्हणून एक बिल सरकाराने कौंसिलपुढे आणून झटपट मंजूर करून घेतले. ज्याना निष्कारण कैदेच्या शिक्षा झाल्या ते अजून तुरुंगातच होते. आणि जे फुकट मारले गेले ते तर मेलेच. पण ज्यानी हे अन्याय केले त्यानी चुकून माकून फसगमतीने कायद्याच्या तडाक्यात सापडू नये म्हणून ही आगाऊ तरतूद करण्यात आली होती!

## ( ५ ) चिरोल–केस–फंड

असो. असहकारितेच्या चळवळीचा वरील प्रकार मूळ उगम होय इतके सांगून दुसरीकडे वळू. ता. २१ फेब्रुवारी रोजी चिरोल खटल्याचा निकाल टिळकांविरुद्ध झाला. त्याची तार प्रथम सरकारला येऊन ती दिल्लीस २२–२३ तारखेला प्रसिद्ध झाली. व खाजगी तार म्हणून नंतर मुंबईला ता. २४ रोजी प्रसिद्ध झाली. यानंतर पुण्यामुंबईस टिळकांकडील तारा आल्या. त्यात 'खर्चासह दावा काढून टाकला' इतकाच मजकूर होता. दावा बुडाल्याने टिळकांवर इतर परिणाम काय होणार हा प्रश्न वेगळाच पण त्यांच्यावर खर्चाची तोहमत किती येणार हीच त्यांच्या स्नेहीमंडळींना प्रथम व सर्वांत मोठी काळजी पडली. नक्की आकडा कळला नव्हता तरी हा दोनतीन लाखांचा प्रश्न आहे अशी कल्पना पूर्वी थोडथोडी आली होती. व एवढी धोंड आली तर ती कशी निवारावी याचा विचार करणे प्राप्तच होते.

टिळकाना अगदी आयत्या वेळी जरूर तर खर्चण्याकरिता होमरूललीगची काही शिल्लक विलायतेस होती. पण ती ताबडतोब भरूनहि पुरणार नाही व न जाणो एक दम टिळकांवर तेथे दिवाणी वारंट काढतात की काय किंवा इकडे तारेने दिवाणी वारंट पाठवून वाड्यावर व छापखान्यावर जप्ती आणतात की काय अशी काही लोकाना एक प्रकारची संदिग्ध भीति वाटू लागली. पुण्याहून टिळकाना तार करून नक्की आकडा काय तो कळवा असे विचारण्यात आले. पण त्याना तो लवकर कळविता येणे शक्य नव्हते. पण तो कळेपर्यंत थांबावयाचे नाही अशा निश्चयाने टिळकांवरील हे संकट निवारण्याकरिता एक मोठा फंड उभारावा व तो सुमारे दोन अडीच लक्षांचा तरी असावा असे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे मुंबई पुणे वऱ्हाड नागपूर कर्नाटक वगैरे प्रांतातील पुढाऱ्यांच्या सह्यानिशी एक खाजगी विनंतीपत्र काढण्यात आले व नंतर ते ता. ११ मार्चच्या केसरीत प्रसिद्ध झाले. या जाहीर विनंती-पत्रात असे लिहिले होते की “ खटला बुडाल्याने सांपत्तिकदृष्ट्या टिळकांचा सर्व-नाश होणार आहे. आजवर या खटल्याच्या पायी टिळकाना दोन सव्वादोन लक्ष रुपये खर्च आला असावा असा आमचा अंदाज आहे. शिवाय चिरोल याना देण्याचा खर्च किती बसेल अपील झाल्यास त्याला खर्च किती लागेल या गोष्टी अद्यापि नक्की कळत नाही. तथापि टिळकांवर ऐन बोजा तीन लक्षांचा असावा असा अंदाज आहे. टिळकानी हा दावा सकृद्दर्शनी व्यक्तीचा म्हणून मांडला असला तरी त्याला सर्वस्वी राष्ट्रीयपक्षापुरते तरी सार्वजनिक स्वरूप आहे. आणि खट-ल्याचा निकाल अनुकूल झाला असता ज्याप्रमाणे त्याचे भूषण या पक्षाने पर्या-याने आपल्याकडे घेतले असते त्याप्रमाणे प्रतिकूल निकाल झाल्याची जबाब-दारीहि त्याने आपणावर घेतली पाहिजे आणि टिळकाना कर्जमुक्त केले पाहिजे. दोन वर्षापूर्वी ज्युबिली फंड हा आनंदाचा प्रसंग म्हणून आपण जमविला तर हल्लीचा प्रसंग संकटाचा आहे म्हणून जरूर ती रक्कम आपण उभी करण्यास राष्ट्रीयपक्षाला उत्साहच वाटला पाहिजे. आणि टिळकांचे संकट ते या पक्षातील प्रत्येक मनुष्याने आपले संकट असे मानल्यास जरूर ती रक्कम उभी करण्यास अडचण पडणार नाही. या कामी टिळकांचे स्वतःच्या सहीचे कर्जरोखे गुंतलेले असून त्यांची दहा हजारांची विम्याची पॉलिसी देखील गहाण पडली आहे हे सांगितले असता टिळकांवरील संकटाची कल्पना येईल. कार्याचे महत्त्व व राष्ट्रीयपक्षाच्या परीक्षेची ही वेळ लक्षात आणून सर्वांनी वर्गणी द्यावी. या फंडाला कदाचित् इतर प्रांता-कडूनहि मदत मिळण्याचा संभव आहे. पण त्याची वाट न पाहता आपल्या पायावरच उभे राहून या रकमेची उभारणी इकडील राष्ट्रीय पक्षानेच केली पाहिजे.” अशा अर्थाचे हे विनंतीपत्र असून त्यावर खापर्डे मुंजे अणे बेळवी देश-पांडे परांजपे देशमुख नेने वैद्य साठ्ये खाडिलकर व केळकर इतक्यांच्या सह्या होत्या. फंडाचे मुख्य खजिनदार अण्णासाहेब नेने व गणपतराव मराठे हे नेमण्यात आले आणि सर्व फंडाचा योग्य हिशेब लागावा म्हणून रुपयांच्या आकड्यांचा निर्देश

केलेली निरनिराळया किंमतींची तिकिटे काढण्यात आली. ही तिकिटे याच पावत्या लोकानी समजाव्या असे ठरविण्यात आले. त्यामुळे ज्याना आपली नावे प्रसिद्ध करावयाची नसतील अशा लोकानीहि मदत करण्याची त्यातल्या त्यात बिनबोलता सोय झाली होती. हे विनंतीपत्र प्रसिद्ध झाल्याबरोबर वर्गणी गोळा करण्याला सुरवात झाली व त्याची पोंच तिकिटाच्या नंबरासुद्धा केसरीच्या दर अंकात प्रसिद्ध होऊ लागली. व सांगण्यास आनंद वाटतो की खरोखरच अदमासाप्रमाणे ही रक्कम थोड्याच दिवसात जमा झाली. यावेळी केसरीत दर आठवड्यास जी लांबलचक पोंचेची यादी प्रसिद्ध होत होती तिजवरून राष्ट्रीयपक्ष आपल्या कर्तव्याला कसा काय जागला हे आपोआप कळून येण्यासारखे होते.

बॅ. बॅपटिस्टा हे १९१९च्या मार्चच्या शेवटच्या आठवड्यात हिंदुस्थानात परत आले. त्यानंतर दादासाहेब करंदीकर हेहि ता. ८ एप्रिल रोजी परत आले. त्या दोघानी तिकडील सर्व हकीकत सांगितली व जाहीर सभातून त्यानी टिळकांचे संदेशहि सांगितले. त्यावरून असे दिसले की टिळकाना एका दृष्टीने या खटल्याच्या निकालाने मोठाच धक्का बसला असला तरी ते तो चार दोन दिवसातच विसरून गेले आणि पूर्वीपेक्षा दुप्पट जोराने तेथील आपल्या चळवळीच्या कामाला ते शांतमनाने लागले. इकडे राष्ट्रीय पक्षाने लौकरच टिळकांच्या कर्जमुक्ततेचा फंड जमविण्याचे काम आटोक्यात आणले. इतरहि स्थिरस्थावर झाले होते यामुळे मामुली राजकीय चळवळी सुरू झाल्या. ता. १९ एप्रिल रोजी ठाणे जिल्ह्याची सभा गंगाधरराव देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली भरली. तेरावी बेळगाव जिल्हा सभा ता. २० एप्रिल रोजी माधवरावजी अणे यांच्या अध्यक्षतेखाली भरली व ता. २४ एप्रिल रोजी मुंबई इलाख्याची प्रांतिक परिषद बॅपटिस्टा यांच्या अध्यक्षतेखाली नगर येथे भरली. तशाच कुलाबा वगैरे जिल्ह्यानीहि आपल्या सभा भरविल्या. ऑ. इं. कॉ. कमिटीने पंजाबातील हकीगती व सत्याग्रहाची चळवळ इत्यादिकासंबंधाने मुख्य प्रधान लॉईड जॉर्ज यांचेकडे एक लांबलचक खलिता पाठविला. पण त्याला अमुक एक उत्तर येईल किंवा अमुक एक निष्पन्न होईल अशी अपेक्षा नव्हती. अधिकाऱ्याकडून एकतर्फी हकीगत विलायतसरकारकडे जात असे. तिची दुसरी बाजू कॉंग्रेसच्या नावाने जावी आणि विलायतेत असलेल्या हिंदी पुढाऱ्याना तेथे आधार असावा अशाकरिताच हा खलिता पाठविण्यात आला होता. याच सुमारास साउथबरो कमिटीने आपला रिपोर्ट प्रसिद्ध केला. त्यात मतदारसंघ कसे असावे म्हणजे क्षेत्रमर्यादा काय असाव्या गट कोणते असावे मतदारीची पात्रता काय असावी कोणत्या गटाला कौन्सिलातील किती जागा द्याव्या वगैरे गोष्टींची रूपरेखा आखली होती. या रिपोर्टाचे महत्व बरेच होते आणि तो हाती आल्याशिवाय बिल पार्लमेंटमध्ये आणावयाचे नाही व सिलेक्ट कमिटी नेमून घ्यावयाची नाही असे मॉंटेग्यू यानी ठरविले होते. त्याप्रमाणे ते घडून आल्यामुळे पुढील मार्ग मोकळा झाला. इकडील शिष्टमंडळेहि जाण्याला सुरवात झाली होती.

यामुळे ती सर्व परत येईपर्यंत म्हणजे प्रायः पुढील डिसेंबरपर्यंत हिंदुस्थानातील राजकारणाचा भर ओसरून तो सहजच विलायतेत भरू लागला होता.

ता. ३० मे रोजी मुंबई येथे शांतारामाच्या चाळीत मोठी सभा भरून टिळकांच्या आजपर्यंतच्या देशसेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. अध्यक्ष-स्थानी गांधी हे होते. ते म्हणाले " टिळकांचे व माझे मार्ग वेगळे आहेत. पण त्यांच्या स्वार्थत्यागाचे व विद्वत्तेचे गुण घेण्याचा जो जो प्रसंग असेल त्यात मी सामील होणारच. विलायतेतील खटला टिळकांच्या विरुद्ध गेला म्हणून त्यांच्या-विषयीची लोकांची आदरबुद्धी कमी झाली नसून उलट वाढलीच आहे. ज्याच्या पिशवीचे तोंड मोठे त्याची फत्ते हा न्यायच आहे. पण न्यायकोर्टांना मी कंटा-ळून गेल्यामुळे मला असे वाटते की टिळक हे केवळ सत्याग्रही असते तर काय बहार झाली असती ! तथापि या अपयशाने निराश न होता टिळकानी विलायतेतील आपली कामगिरी खंबीरपणाने चालविली आहे हे पाहून कौतुक वाटते. तरी इकडे आपण प्रयत्न करून त्यांच्यावरील खर्चाचा बोजा उठविला पाहिजे." शेवटी शिवराम-पंत परांजपे म्हणाले " टिळक हे सत्याग्रही आहेत म्हणूनच त्यानी हा खटला विलायतेपर्यंत नेला. सत्याचा आग्रह गेल्या एप्रिलातच सुरू झाला असे नाही. तर तो फार पुरातन काळापासूनचा आहे. "

जुलै महिन्यात टिळकांचा त्या सालचा वाढदिवस समारंभ विशेष रीतीने साजरा करण्यात येण्याची खटपट झाली. ही चळवळ मुख्यतः नरहर शिवराम ऊर्फ बाबासाहेब परांजपे यानी केली. प्रत्येक प्रांतातील पुढाऱ्यांच्या संम-तीने एकेक मंडळ नेमण्यात येऊन टिळकांचे अभिनंदन करणारे कार्ड एक रुपया देऊन लोकानी घ्यावे व ते सही करून कचेरीकडे पाठवावे अशी योजना होती. ता. २३ रोजी वाढदिवसाचा समारंभ अनेक प्रांतातून झाला व सर्वांतर्फे म्हणून एक अभिनंदनपर तार बॅपटिस्टा यानी विलायतेस पाठविली.

ता. १३ ऑगस्टपर्यंत टिळक पर्स फंडाची वर्गणी २॥ लाखपर्यंत झाली. अद्याप प्रतिवादीना खर्चाबद्दल किती रक्कम द्यावी लागेल हे निश्चित कळले नव्हते. तथापि फंड गोळा करण्याचे काम बंद करावे असे टिळकांचे लिहून आल्यावरून तो १५ सप्टेंबर रोजी बंद करावा असे ठ ले.

## ( ६ ) टिळक विलायतेहून परत यतात.

टिळक व त्यांजबरोबरची मंडळी हे विलायतेहून ता. ६ नोव्हेंबर रोजी इजिप्त नामक बोटीने निघाले ते ता. २६ रोजी मुंबईस येऊन पोहोचले. त्यापूर्वी ता. ८ नव्हेंबर रोजी टिळक फंडाच्या खजिनदारानी तोपर्यंतचे आकडे प्रसिद्ध केले त्यांची बेरीज जवळ जवळ तीन लाखापर्यंत येत होती. या रकमेत वाढदिवसानिमित्त झालेल्या रुपया फंडाचीहि पंचवीस हजारांची रक्कम होती. टिळक विलायतेहून आल्यावर पुढे केव्हातरी सवडीने ही सर्व रक्कम त्याना समक्ष अर्पण करावी असे

मूळ फंड सुरू करणारानी ठरविले. हा आकडा प्रसिद्ध झालेला पाहून अँग्लो इंडियन पत्रांच्या कपाळात तिडीक उठली व त्यानी लगेच काही आश्चर्य दाखवून काही टिळकांच्या अनुयायाना मोठेपणा देऊन आणि थोडेसे कुत्सितबुद्धीने वाचकाना सांगितले की " चिरोल साहेबानी खटला जिंकला त्याला या लोकानी तीन लाख रुपये जमवून पाहा कसे उत्तर दिले ते!" वास्तविक चिरोलवरील खटला टिळकानी दाखल केला त्यावेळी होताहोईतो त्याचा खर्च आपला आपण करावा असे त्यांच्या मनाने घेतले होते. ताईमहाराजांचा खटला प्रिव्हि कौन्सिलात जिंकल्यामुळे या खटल्याचे बाबतीत त्याना उत्तेजन आले हे खरे. पण त्याबरोबर ताईमहाराज प्रकरणी त्यांचे जे पैसे खर्च झाले होते ते परत मिळण्याचीहि आशा वाटू लागली होती. आणि आपण फिर्याद जिंकली तर ही मोकळी झालेली रकम आपल्या खर्चाला पुरेल व आणखी थोडी लागली तर ती घालण्याला एकदोन वर्षे अवधि मिळेल असे त्याना वाटले होते. उलट निकाल आपल्या विरुद्ध गेला तर थोडा अधिक खर्च पडेल पण तो पडला तरी हे धाडस करून पाहावयाचे असे त्यानी ठरविले होते. ताई महाराज प्रकरणातील पैसे मोकळे झाले नसते, किंवा चिरोल खटला आपण हरलो तर २--३ लाख रुपये खर्च पडेल असे त्याना आगाऊ पक्के समजले असते तर त्यानी हे धाडस केले नसते. कारण लोकाकडून वर्गणी घेऊन हा खटला लढावा अशी त्यांची मनापासून इच्छा नव्हती. पण टिळक खटला तर हरलेच, शिवाय उलट सुलट खर्चासकट एकंदर रकम २॥--३ लाखापर्यंत गेली, आणि टिळक तर विलायतेत अडकून पडले हे जेव्हा त्यांच्या मित्रमंडळीनी पाहिले तेव्हा त्याना ते फार मोठे संकट वाटून टिळकांची परवानगी न घेता इतकेच काय पण त्याना ती गोष्ट कळण्यापूर्वीच त्यानी फंड उभारण्यास प्रारंभ केला होता. म्हणून टिळकानीहि त्या गोष्टीला नकार दिला नाही. कारण त्यानाहि हे माहीत होते की केसरीने निवळ आपल्या उत्पन्नातून हे कर्ज वारावयाचे असे ठरविले असते तर वाडा छापखाना वर्तमानपत्र सर्व काही गहाण पडून अनेक वर्षेपर्यंत जमा व खर्च यांची नुसती हातातोंडाशी गाठ पडली असती व सार्वजनिक कार्याला काहीच वाव राहिला नसता.

ता. २७ नवंबर रोजी सकाळी टिळकांची आगबोट बंदरात आली पण दोन प्रहरपर्यंत ती धक्क्याला लागली नाही. सकाळपासून हिंदू व मुसलमान स्वयंसेवकांच्या तुकड्यानी बंदरावरील स्वागताची सर्व तयारी ठेविली होती. गर्दी होणार म्हणून पोलिसानी बंदराचे आवार ताब्यात घेतले आणि ज्यांच्या हाती पास होते अशाच लोकाना आत सोडण्यास सुरवात केली. गर्दीतून कशीबशी वाट काढून टिळकांना स्वयंसेवकानी बाहेर आणून मोटारीत बसविले आणि एका वेगळ्या रस्त्याने त्याना सरदारगृहात नेऊन पोहोचविले ! सायंकाळीं ६॥वाजता शांतारामाच्या चाळीपुढे प्रचंड जाहीर सभा भरली. अध्यक्ष बॅपटिस्टा यानी टिळकांचे स्वागत केल्यावर गंगाधरराव देशपांडे यानी टिळकाना देण्याचे मानपत्र वाचून दाखविले. नंतर

दादर येथील होमरूलर क्लबातर्फे मानपत्र तेथेच दिल्यावर टिळकानी उत्तरादाखल भाषण करून हिंदुस्थानातील आपल्या सर्व स्नेहीमंडळीचे व जनतेचे आभार मानले. व विलायतेत बॅपटिस्टा वगैरे ज्या लोकानी त्याना मदत केली त्यांचेहि आभार मानले. सुधारणासंबंधी त्यानी असे सांगितले की "आज बिलाने दिलेल्या सुधारणा थोडया असल्या तरी आपल्याला निराश होण्याचे कारण नाही. मजूर-पक्षाने आमचे होमरूल बिल पार्लमेंटात आणण्याबद्दल आश्वासन दिले आहे. म्हणून बिल अपुरे असले तरी त्याचा त्याग करावा असे नाही. आज जे काही मिळेल तेवढे तर पदरात घ्याच पण तेवढ्याने संतुष्ट होऊन चळवळ सोडू नका. कारण 'संतोषो हरति श्रियम्' ही म्हणच आहे. इकडील हकीगती मला सर्व कळल्या. रौलेट बिलाविरुद्ध गांधीनी सत्याग्रह सुरू केला तेव्हा त्यात भाग घेण्याला मी हजर नव्हतो एवढेच मला वाईट वाटते." ता. २८ रोजी सरदारगृहात टिळकाना मुंबई नॅशनल यूनियनने मोठी मेजवानी दिली. ता. २९ रोजी परळ येथील एका मैदानात मावजी गोविंदजी यांचे अध्यक्षतेखाली गिरणी कामगारानी टिळकाना मानपत्र दिले. त्याच दिवशी लॉ क्लासच्या विद्यार्थ्यांनी सरदार गृहात उपहार समारंभ केला. तसेच पैसाफंड स्वयंसेवक गोरक्षण संस्था ब्राह्मणसभा व खुद्द सरदार गृहसंस्था यानीहि आपापल्यापरीने टिळक व इतर गृहस्थ यांचा सत्कार केला.

## (७) पुण्याचा स्वागतसमारंभ

ता. १ डिसेंबर रोजी टिळक पुण्याला परत आले. त्यांच्या सत्काराची व्यवस्था करण्याकरिता एक स्वागतमंडळ बनविण्यात आले होते. फिरून जाण्याच्या दिवसाप्रमाणे येण्याच्या दिवशी गावच्या लोकानी तोरणे कमानी वगैरे लावून शोभा आणली होती. मिरवणूकीला प्रो. देवल यानी आपले दोन हत्ती व घोडे दिले होते. रानडे कॉंट्रॅक्टर यांच्या मोटारीत बसून टिळक व मिरवणुकीतील लोक परत येत असता ठरलेल्या ठिकाणी लोक आगाऊ पानसुपाऱ्यांची तयारी करून जय्यत उभे राहिलेले होते तेथे थांबून पुढे जावे असे होता होता घरी येऊन पोहोचण्याला त्याना ११॥ वाजले. ब्राह्मणेतर मंडळी या प्रसंगी काही विरोधाची चुणूक दाखविणार अशी गुणगुण असल्यामुळे पोलिस अधिकारी व स्वयंसेवक यानी बंदोबस्त फार चांगला ठेवला होता. सार्वजनिक मानपत्राची सभा मंगळवार ता. २ डिसेंबर रोजी करण्याचा विचार होता. पण टिळकांचा आवाज बसलेला असून त्याना श्रमही झालेले होते म्हणून ती सभा ता. ७ डिसेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आली. तथापि शहर म्युनिसिपालिटीकडून मानपत्र देणेची तारीख आल्या दिवसाचीच ठरलेली असल्यामुळे त्याच दिवशी तो समारंभ करावा लागला. हा समारंभ रे-मार्केटाच्या इमारतीच्या पण खालच्या पाकळयांच्या जागेत केला होता. यामुळे फारच खेचाखेच झाली. अध्यक्ष लक्ष्मण जनार्दन आपटे यानी टिळक व केळकर याना मानपत्रे वाचून अर्पण केल्यावर उभयतानी उत्तरादाखल भाषणें केली.

**पुणें शहर म्युनिसिपालिटीतर्फे सन्मान**

पुणे येथील म्युनिसिपालिटीने ता. १ डिसेंबर रोजी टिळकाना जे मानपत्र दिले त्याचा सारांश पुढे दिल्याप्रमाणे आहे—

"राजकीय औद्योगिक शैक्षणिक व सामाजिक चळवळीचे केंद्रस्थान आणि गेली चाळीस ४० वर्षे आपले वसतिस्थान अशा या प्राचीन व इतिहासप्रख्यात शहराला आपण विलायतेहून सुखरूपपणे परत आला या प्रसंगी आम्ही आपले मनःपूर्वक स्वागत करितो. पुणे शहर हे महाराष्ट्राला ललामभूत असे शहर असून ज्यांच्या परिश्रमाने या पुण्यपत्तनाला हे उच्च स्थान मिळाले त्यात आपली गणना असल्याने आपणास हे मानपत्र देणे आम्ही आपले कर्तव्यच समजतो. आपण दोन वर्षे या कमिटीचे सभासद होता. व त्यावेळी आपण जी कामगिरी केली तिचे चीज यापूर्वीच व्हावयास पाहिजे होते.

"आपल्या आयुष्याचा पूर्वभाग वृत्तपत्रीय व शिक्षणविषयक चळवळीत गेला. त्यावेळी संस्थापित झालेल्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या द्वारे आपण व आपले सहकारी यानी नव्या पिढीला स्वार्थत्यागाचा धडा घालून दिला. स्वार्थत्यागाविना कोणताही देश ऊर्जित दशेस येत नाही. या आपल्या स्वार्थ-त्यागाच्या उदाहरणाने महाराष्ट्राचे लक्ष सरकारी नोकरी हेच ध्येय न मानता, उद्योगधंद्याची वाढ खासगी कारखाने आणि सर्व चळवळीत पाश्चात्य राष्ट्राशी चढाओढ याकडे वळले. आपण वाङ्मय तत्त्वज्ञान व प्राचीन संशोधन या विषयात जे महत्कार्य केले त्यांचा प्रामुख्येकरून उल्लेख करणे जरूर आहे. आपले 'ओरायन' व 'आर्क्टिक होम' या दोन ग्रंथांची प्रख्यात पंडिताकडून जगभर वाखाणणी झाली. गीतारहस्य हा ग्रंथ केवळ टीकारूप नसून त्यात नावीन्य आहे आणि नीतितत्त्वाची फोड फारच विशदपणे केलेली आहे.

"गेली तीस वर्षे आपण जी राजकीय चळवळ चालविली आहे तिचे ध्येय ब्रिटिश छत्राखाली वसाहतीच्या पद्धतीचे स्वराज्य हिंदुस्थानास मिळावे हेच असून त्या ध्येयाकरिता आपण जे अविरत श्रम करीत आहा त्याबद्दल सर्व हिंदुस्थान व विशेषतः महाराष्ट्र आपला अत्यंत ऋणी आहे. ब्रिटिश जनतेचे मन हिंदीराष्ट्राला अनुकूल करून घेण्याकरिता आपण विलायतेत एक वर्ष खर्ची घातले. या कालात आपण ज्या मुलाखती घेतल्या आणि आपल्या मोहक वाणीने व दूरदर्शीपणाने जबाबदार पुढाऱ्यावर जी छाप पाडली तिचा इष्ट परिणाम झाल्याविना राहणार नाही. आपल्या अनुयायांच्या सहाय्याने आपण मजूरपक्ष आपल्याकडे वळवून घेतला. आणि हाच पक्ष पुढे सत्ताधारी होणार असल्याने आपण स्वीकारलेले धोरण अगदी यथायोग्य आहे. इतक्या उतार वयात आपण इतकी कामगिरी बजावल्याबद्दल हिंदराष्ट्र आपले अत्यंत आभारी राहील. असेच उपयुक्त राष्ट्रकार्य करण्याकरिता सर्व शक्तिमान परमेश्वर आपणास दीर्घायुष्य व वैभव देवो."

या मानपत्रासंबंधाने सांगण्याची एकच गोष्ट महत्वाची ती अशी की पुणे म्युनिसिपालिटीने सरकारी अधिकारी नाही अशा गृहस्थाला मानपत्र दिले असे हे पहिलेच. आजपर्यंत मानपत्रे देण्यात येत असत पण ती प्रायः गव्हर्नर वगैरेनाच. म्युनिसिपल कायद्यात अशा मानपत्राना खर्च करण्याचा अधिकार म्युनिसिपालिटीस दिलेला नव्हता. आणि खर्च स्वतंत्र रीतीने केला तर मानपत्र देण्याला कायदा आडवा येत नाही असा श्लेष त्यातून निघण्याजोगा होता. अर्थात् तो श्लेष हुडकून काढून खर्च खाजगी उभारून मानपत्र म्युनिसिपालिटीने द्याव-याचे अशी शक्कल निघण्यालाहि टिळकाना मानपत्र देण्याची उत्सुकताच मूळ कारणीभूत झाली. पुण्यात म्युनिसिपालिटीतर्फे पहिला पुतळा होऊन उभारण्याचा मान जसा टिळकाना मिळाला तसाच पहिले मानपत्र देण्याचा मानहि टिळका-नाच मिळाला. यानंतर पुढे अनेक लोकाना मानपत्रे देण्यात आली व काही खाजगी खर्चाने तर काही म्युनिसिपालिटीच्या खर्चाने देण्यात आली. त्यात कोणाचा खर्च सरकारने मंजूर केला कोणाचा नामंजूर केला कोणाचा कोर्टात फिर्यादी करून वसूल केला असे अनेक प्रकार झाले. आणि या प्रकारामुळे म्युनिसिपल ॲक्टाची मुद्दाम दुरुस्ती करण्यात येऊन अमुक इतक्या बहुमताने म्युनिसिपालिटीने ठराव केला म्हणजे मानपत्र देता येते इतकेच काय पण त्यावर वाटेल तो खर्चहि करता येतो असा सरांस कायदा झाला. पण सांगण्याचे तात्पर्य इतकेच की या नव्या विचाराला व आचाराला म्हणजे या क्रान्तीला टिळकांच्या मानपत्रापासून सुरवात झाली. पुतळ्याच्या खर्चासंबंधानेहि पुढे सरकारने म्यु. वर फिर्याद केली होती तीत सरकारचाच पराभव झाला ही गोष्ट जाता जाता येथे सांगितली पाहिजे.

### जाहीर सन्मान व विरोध

हे स्वागतसमारंभ तर उरकलेच. पण शहर नागरिकातर्फे जे मानपत्र द्याव-याचे ठरले होते त्यासंबंधात टिळकांच्या प्रतिपक्षीयानी विरोध करण्याचा विचार केला. त्यांचे म्हणणे असे की टिळकाना मानपत्र द्यावयाचे तर त्यांचे मित्र भक्त व चाहाते यानी आपल्यापुरते द्यावे पण सर्व शहरच्या नागरिकांचे नाव त्यात का घालावे ? आम्हाला हे मानपत्र मंजूर नाही म्हणून आम्हाला समक्ष तेथे येऊन विरोध करावा लागेल. पण असे करण्यापेक्षा सर्व नागरिकातर्फे हे शब्द त्यातून काढून टाकले तर मग आमचे काहीच म्हणणे नाही. या प्रतिपक्षीयात शहरातील नेमस्त व ब्राह्मणेतर चळवळीचे पुढारी असे दोन वर्ग होते. ता. ४ डि० रोजी रात्रौ जेधे मॅन्शनमध्ये विरोधी मंडळीची सभा होऊन मानपत्राच्या सभेत विरोध कर-ण्याचा ठराव त्यानी मंजूर केला व त्याची एक प्रत प्रि० परांजपे व गुप्ते वकील यांच्या सहीने स्वागतमंडळाकडे पाठविण्यात आली. त्याना उलट स्वागतमंडळाकडून असे लिहिण्यात आले की "मानपत्र सर्व नागरिकातर्फे आहे ही गोष्ट खरी आहे. त्याचा उपक्रम म्यु०ने यापूर्वीच केला आहे. तुमच्यासारखे काही लोक या गोष्टीला

विरुद्ध असतील. पण असल्या गोष्टीना कोणत्याहि शहरातील एकून एक लोकांची संमति असणे शक्यच नाही. शहरातील बहुजनसमाजाला एखादी गोष्ट मान्य असली म्हणजे ती शहराला मान्य आहे असेच म्हणतात. पण आपली समजूत या कामी वेगळी असल्यास बहुजनसमाजाची तशी खात्री करून देण्याकरिता तुम्ही सभेला या. तुमच्याकरिता जागा ठेवू आणि विरोध करण्याला कायदेशीर सनदशीर संधी देऊ. उगीच बखेडा न व्हावा म्हणून जागा तुमच्यासाठी वेगळी राखून ठेवू. तरी किती लोक बसण्याची सोय पाहिजे ते आगाऊ कळवावे." पण ही व्यवस्था स्वीकारण्यास परांजपे वगैरे पुढारी तयार नसल्याने त्यानी ता. ७ च्या 'ज्ञानप्रकाशा'त असे प्रसिद्ध केले की "मानपत्र हे स्नेही व चाहाते लोक यांच्यातर्फेच आहे अशी आमची समजूत झाल्यामुळे आम्ही आपल्या अनुयायाना सभेला कोणीहि हजर न राहण्याविषयी सूचना दिली आहे." पण त्यांची तशी समजूत व्हावी असे खरोखर कोठेच काहीहि घडलेले नव्हते. पण 'आमची तशी समजूत झाली' असे लिहून सभेला हजर राहण्याचा अवघड प्रसंग त्यानी टाळला इतकाच त्याचा अर्थ. कारण उघडच आहे की विरोध करणारे लोक आधी फारच थोडे व होते त्यातूनहि सभेला येऊन विरोध करण्याचे धैर्य फारच थोड्याना होते. तेव्हा खोट्या समजुतीची बतावणी पुढे करून विरोधकानी पाऊल मागे घेतले इतकेच. दुसरे काय? पण त्यांची ही भोळी व सोयीची समजूत टिकू देऊ नये व विरोध करावयाचा असेल तर या असे उघड आव्हान द्यावे म्हणून स्वागतमंडळाने त्याना पुनः लिहून कळविले की "आम्ही तुम्हाला फिरून सांगतो की मानपत्र सर्व नागरिकांतर्फे म्हणून आहे. तुमची समजूत चुकीची आहे. तुम्ही आमच्याकडे ठराव पाठविला नसता आणि सभेला आला नसता तर मग काहीच हरकत नाही. बसल्या जागी कोणी काय वाटेल ते समजावे. पण ठराव आमच्याकडे पाठविला तुमच्या बसण्याची आम्ही व्यवस्था केली आणि आता जर तुम्ही सभेला न याल तर तुम्ही आपला विरोध परत घेतला असे आम्ही समजू." हे उत्तर सभेच्या वेळेपूर्वी चांगले सहा तास परांजपे यांजकडे पाठविण्याची खबरदारी घेतली होती. परंतु या राखून ठेवलेल्या जागेत कोणाचीच भरती झाली नाही. इतर समाज मात्र त्या विस्तीर्ण पटांगणात न मावे इतका मोठा होता. सभेचे अध्यक्षस्थान लक्ष्मणराव आपटे वकील याना दिले होते. त्यानी लहानसे भाषण करून अभिनंदन व स्वागतपर संदेश वाचून दाखविले. मुख्य मानपत्र लक्ष्मणराव भोपटकर वकील यानी वाचून दाखविले व त्यावर इतर काही भाषणे झाल्यावर अध्यक्षानी सहजच विचारले की कोणास उलट बोलावयाचे असल्यास मी संधी देतो. तेव्हा एक ब्राह्मणेतर मुलगा पुढे आला आणि म्हणाला "आणखी काही दिवसानी आम्ही अस्पृश्य वर्गाचे सहभोजन करणार आहो त्याला टिळक येतील तर मग माझा मानपत्राला विरोध नाही!" याशिवाय दुसरा कोणी वक्ता पुढे आला नाही. शेवटी मते घेता 'एकविरुद्ध सर्व' असे अध्यक्षानी जाहीर केले आणि सुंदर

रुप्याच्या करंड्यात घालून मानपत्र टिळकाना अर्पण करण्यात आले. टिळकानी उत्तर देताना जो होणार होता त्या विरोधाचा उल्लेख करून म्हटले की हा विरोधाभास झाला नसता तर समारंभ आळणी झाला असता. पण विलायती मीठ मात्र समक्ष येऊन आमच्या खिरीत पडले नाही. त्याची मी वाट पाहात होतो. पण विरोध करणारे पुढारी कोठे आहेत? आणि एवढ्या जबाबदारीचे काम या एकट्या लहान अप्रसिद्ध मुलावर त्यानी का सोपविले? अमक्याने अमुक कार्य केले नाही असा आक्षेप घेणे चुकीचे आहे. कारण एकटी व्यक्ती सर्वच कामे करू शकत नाही. प्रत्यक्ष परमेश्वरासहि निरनिराळी कामे करण्याला निरनिराळ्या देवतांची योजना करावी लागते. नंतर त्यानी सुधारणाना उद्देशून "जे काही मिळेल ते तर घ्याच पण पुनः बाकीचे राहिलेले मिळविण्याविषयी निश्चयाने झटा. आपसातील फाटा-फूट आज योग्य नाही. एकी असल्याशिवाय ज्यांच्या हाती स्वराज्य आहे त्यांची मूठ आपणाला उघडणार नाही" असे सांगितले. टिळकानी मूळ रेमार्केटमधील सभातूनच आपल्या सार्वजनिक चरित्रात प्रवेश केला असे काहीचे म्हणणे आहे. ते कसेहि असो. पण ते या जागेतल्या सभेला हजर राहिले अशी ही बहुधा शेवटचीच सभा होय व तिच्याइतकी दुसरी कोणतीच सभा या ठिकाणी साजली नाही व गाजलीहि नाही. प्रि. परांजपे यानी सभेला येण्याचे टाळले पण त्यानी क्रॉनिकलला एक लांबलचक पत्र पाठवून आपला विरोध व्यक्त केला व त्यात टिळकांची जितकी पापे म्हणून त्याना आठविली तितकी क्रमवार लिहिली. त्याला टिळकानी क्रॉनि-कलमध्येच उत्तर दिले. शिवाय अग्रलेखाच्या रूपाने १६ डिसेंबरच्या केसरीतहि त्यानी उत्तर दिले आहे. पुण्याच्या या सत्कार समारंभासंबंधाने त्याना दिलेले मान पत्र आणि रॅ. परांजप्याना केसरीतून त्यानी दिलेले उत्तर ही दोन्ही मुद्दाम परिशि-ष्टात दिली आहेत म्हणून त्यातील मजकूर आम्ही आपल्या शब्दानी देत बसत नाही.

## (८) मद्रासची सफर

टिळक अमृतसरच्या राष्ट्रीय सभेला जाणारच होते. पण त्यापूर्वी मद्रास येथे त्याना निमंत्रण आल्यावरून ता. १७ रोजी ते मद्रासेस पोहोचले. स्टेशनवर मद्रासचे बहुतेक सर्व पुढारी व मजूरसंघाचे प्रतिनिधी हजर होते. त्यानी टिळ-काना मिरवणूक काढून सुब्बाराव कामत यांच्या बंगल्यावर पोहोचविले. सायं-काळी प्रेसिडेन्सी कॉलेजच्या समोर समुद्रतीरावर 'हिंदू'चे संपादक कस्तुरीरंग अय्यं-गार यांचे अध्यक्षतेखाली जाहीरसभा भरली. तीत अनेक संस्थातर्फे मानपत्रे देऊन सत्कार करण्यात आला. त्यात ब्राह्मणेतर संघाने दिलेले मानपत्र अर्थात विशेष महत्त्वाचे होते म्हणून ते यापुढे मुद्दाम दिले आहे. पुण्यास ब्राह्मणेतरांच्या नावाने टिळकाना जो थोडासा विरोध झाला त्याला मद्रासच्या या संघटित ब्राह्मणेतर समाजाने दिलेले मानपत्र हे चोख उत्तर होते. ते मानपत्र असेः—

## ब्राह्मणेतरांचे मानपत्र

"अत्यंत पूज्य देशभक्त—मद्रास प्रे. असोसिएशन ही जरी येथील सर्व संस्थात वयाच्या मानाने सर्वात लहान आहे तरी ती या इलाख्यातील असंख्य ब्राह्मणेतरांची प्रतिनिधि आहे. सुधारणा–बिलासंबंधाने आपण विलायतेत जी कामगिरी केली व आपल्या मातृभूमीच्या कार्याविषयी आपण जे अदम्य धैर्य व अखंड कळकळ दाखविली तिच्याविषयी इतर संस्थाप्रमाणेच आम्हासहि अंतःकरणपूर्वक आदर व कौतुक वाटत आहे. वृद्धापकाळ आणि आपल्याविषयी विलायतेत पसरलेले दुष्ट दुर्ग्रह या अडचणीतूनहि आपण अतिशय कुशलतेने मार्ग काढून नुसत्या मजूरपक्षासच नव्हे तर लिबरल पक्षाच्या अनुयायांसहि हिंदी लोकांची मागणी न्याय्य असल्याचे कबूल करावयास लाविले. मातृभूमीला गुलामगिरीतून मुक्त करण्याकरिता ज्या देशभक्तानी श्रम केले व कष्ट सोसले त्या सर्वात कोणासहि आपल्यावर नंबर देता येत नाही हेच आजचे मत पुढील पिढ्यासहि मान्य होईल. या भूमीच्या उद्धारार्थ अद्यापिहि पुष्कळच पवित्र कर्तव्ये करावयाची जरूरी आहे. अशा वेळी येथे जातीजातीत मत्सर वाढावा आणि पक्षभेद प्रबळ होत जाऊन ते राजकीय मोक्षाच्या मार्गात आडवे यावे हे अत्यंत शोचनीय आहे. पण आपण आपल्या नैसर्गिक उदारशीलतेने व समंजसपणाने हे सगळे भेदभाव मोडून टाकून सर्वांची एकवाक्यता करण्याची मुत्सद्दीगिरी दर्शवाल अशी आमची खात्री आहे. पंजाबावर कोसळलेल्या अनर्थाचे केंद्रस्थान जे अमृतसर तेथे इतिहासप्रसिद्ध होणारी यंदाची कॉंग्रेस भरण्यापूर्वीच सुधारणा–बिल पास होऊन जाईल. तेव्हा पुढे आम्ही धोरण कोणते स्वीकारावे याविषयी आपणच उत्तम दिग्दर्शन कराल. राष्ट्रातील भिन्नभिन्न मतौघांचा विरोध मोडून त्या सर्वांना इष्ट वळण लावून त्यांच्यात ऐक्यशक्ति निर्माण करण्याचे कार्य आपणच करू शकाल. हिंदभूमीला मार्ग दर्शविणारा व तिचे रक्षण करणारा दयाळू भगवान आपणाला सामर्थ्य व उमेद देवो आणि त्या योगेकरून ब्रिटिश छत्राखाली हिंदुस्थानाला आपल्या परिश्रमाने प्राप्त होणारे स्वराज्यरूपी फळ चाखावयास मिळो एवढीच आमची प्रार्थना आहे."

या सर्व मानपत्राना मिळून टिळकानी एकच उत्तर दिले. त्यात विलायतेतील हकीगती सांगितल्या व तेथेहि टिळकानी असे स्पष्ट सांगितले की "हल्लीच्या बिलाचा फायदा घेऊन त्याच्याच अनुरोधाने आम्हाला पुढील चळवळीची दिशा आखली पाहिजे." ता. १८ रोजी टिळकाना मजूरसंघाने आपले स्वतंत्र मानपत्र दिले. त्यालाहि टिळकानी समयोचित उत्तर दिले. याशिवाय लॉ कॉलेजातील विद्यार्थ्यांपुढे 'इंडियन नॅशनॅलिटी' या विषयावर टिळकांचे व्याख्यान झाले. मद्रासच्या व्यापारी मंडळीनीहि वेगळी पानसुपारी करून स्वराज्यसंघाला तीन हजारांची रक्कम दिली. शेवटी पुनः मोठी मिरवणूक काढून मद्रासच्या नागरिकानी त्याना स्टेशनावर परत पोहोचविले.

## (९) दोन अप्रिय वाद

डिसेंबर १९१९ व मार्च १९२० या महिन्यात टिळकाना दोन अप्रिय वादात पडावे लागले. एक रँगलर परांजप्याशी व दुसरा बेझंटबाईच्या अनुयायाशी. परांजपे यानी मुंबईच्या दैनिक पत्रातून टिळकांची मनसोक्त निंदा करून आपल्याकडून पुण्याच्या मानपत्रप्रसंगी विरोध करण्यात आलेल्या अपयशाचा वचपा काढण्याचा प्रयत्न केला होता. त्याला टिळकाना उत्तर द्यावे लागले व ते त्यानी इंग्रजी पत्रातून व केसरीतूनहि दिले. दुसऱ्या वादात बेझंटबाईनी विलायतेत केलेली वर्तणूक आणि खापर्डे पटेल यानी बाईवर केलेली टीका हा विषय असून अकोलेकर वासुदेवराव चिपळूणकर वगैरे मंडळीनी मुंबईच्या एका मराठी दैनिक पत्रात टिळकावर टीकापर असे अनेक लेख लिहिले होते. टिळकाना त्यानाहि उत्तर द्यावे लागले. ही दोनहि उत्तरे केसरीत प्रसिद्ध झाली होती. पृष्ठ २४ वर रँगलर परांजपे यास टिळकानी दिलेले उत्तर परिशिष्टात दिले आहे असे सांगितले आहे. तथापि टिळकानी प्रि. परांजपे याना दिलेले उत्तर व बेझंटबाईस दिलेले उत्तर ही एका ठिकाणीच देणे इष्ट वाटल्यावरून त्यातला महत्त्वाचा भाग याखाली दिला आहे.

### ना. परांजप्यांचा जळफळाट

क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ।
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ।।

मनुष्य एकदा क्रोधवश झाला म्हणजे तो काय करील व काय न करील याचा नेमच रहात नाही. तशी गत फर्ग्युसन कॉलेजचे प्रि. परांजपे यांची आता झाली आहे. पुणे नागरिकांच्या तर्फे टिळक-केळकरास दिलेल्या मानपत्रास विरोध करण्याचा त्यानी कसा प्रयत्न केला आणि चोवीस तासांची नोटीस मिळाली असताहि सभेत तोंड दाखविण्याचे धैर्य न झाल्यामुळे त्यांचा तो प्रयत्न कसा फसला गेला याची हकीकत आम्ही गेल्या अंकी दिलीच आहे. पण प्रि. परांजप्यासारख्या केंब्रिजमध्ये रँग्लरच्या परीक्षेत पास झालेल्या गृहस्थास ही फजिती व हा अपमान कसा सहन होणार? पुण्यातील सामान्य लोकसमूह अविद्वान् मूर्ख आणि टिळकांच्या नादी लागणारा असल्यामुळे त्यांच्यापुढे आपल्या विद्वत्तेचे प्रदर्शन करण्यास परांजपे आले नाहीत खरे, पण त्यांची लिहिण्यावाचण्याची खोली काही अशा प्रकारच्या जनावरानी भरलेली नव्हती. तीत अनेक गणित्यांची व शहाण्यांची परांजपे पुस्तकरूपाने नित्य भेट घेत असतात. म्हणून तेथूनच आपले अगाध ज्ञान ज्यात प्रगट झाले आहे असे एक लांबलचक पत्र मुंबईच्या 'क्रॉनिकल' पत्रास पाठवून त्याने टिळकांचा पराभव करण्याची अजब युक्ति त्यानी शोधून काढली व टिळकांच्या आयुष्याच्या एकंदर इतिहासाचे अवलोकन

करून बहुत परिश्रमाने टिळकांच्या पापांची एक अशी यादी तयार केली की त्याखाली बिचारे टिळक आणि त्यांचे अनुयायी एकदम चीत होऊन जावे. पण क्रोधाने जळफळत लिहिलेल्या अशा प्रकारच्या लेखाने लेखक आपला अविचारीपणा आणि सारासारशून्यता मात्र व्यक्त करून आपले हसे करून घेत असतो हे ना. परांजपे यांचे लक्षात आलेले दिसत नाही. आमच्यात अशी एक म्हण आहे की कावळ्याच्या शापाने गाय मरत नसते व तीच स्थिति परांजपे यांच्या लेखाची आहे. टिळकांच्या पापांची केवढी मोठी जंत्री जरी परांजप्यानी प्रसिद्ध केली तरी त्यामुळे टिळकांबद्दल असलेली लोकांची आदरबुद्धि कमी होणे शक्य नाही व अशा दृष्टीने पाहिले तर परांजप्यानी टिळकावर केलेल्या आरोपास सविस्तर उत्तर देण्याचीहि जरूर नव्हती. शिवाय टिळकानी व इतर गृहस्थानी योग्य उत्तरे त्यास दिलीहि आहेत. म्हणून त्यातील जेवढे मुद्दे सार्वजनिक आहेत तेवढ्यांचाच विचार आज या लेखामध्ये आम्ही करणार आहो व तोहि टिळकांचा केसरीशी जो संबंध होता तो लक्षात ठेवून करावयाचा आहे. कारण टिळकांच्या पूर्वेतिहासात केसरीचाहि इतिहास अंतर्भूत झालेला आहे. परांजपे यांचा टिळकावर पहिला मोटा दोषारोप हा की पुणे शहरातील लोकानी त्याना मानपत्र देण्यासारखे त्यानी काय केले ? विधवांचे विवाह लावले नाहीत अस्पृश्य वर्गातील लोकाबरोबर एका ताटात जेवले नाहीत किंवा अभक्ष्यभक्षणहि केले नाही अथवा आपल्या जुन्या धर्माचा इतिहासाचा अगर परंपरेचा अभिमान सोडून उदार तर्काने प्राप्त झालेल्या दुसऱ्या सुधारणाहि समाजावर सरकारच्या मदतीने लादण्याचा उद्योग केला नाही इतकेच नव्हे तर अशा प्रकारच्या सुधारणास शक्य तेवढा प्रतिरोधच केला. मग यास मानपत्र कशाला ? यावर परांजपे यास पहिल्याने आमचे असे विचारणे आहे की टिळकाना जे मानपत्र देण्यात आले ते वरील कारणाकरिता होय असे तुम्हाला कोणी सांगितले ? परांजपे केंब्रिजहून येथे परत आल्यावर त्यांचा जो लोकानी सन्मान केला त्यावर जर कोणी असे आक्षेप घेतले असते की गणितशास्त्राची त्यानी काथ्याकूट केली त्यात त्यानी देशहित काय केले यापेक्षा चामडे कमावण्याचा किंवा घरसफाईचा जर ते धंदा शिकून आले असते तर बरे झाले असते, कारण अस्पृश्य वर्गाची उन्नति मग त्यांच्या हातून चांगली झाली असती आणि आमच्या घरातील स्वच्छता ठेवण्यासहि मग बरे पडले असते तर ते आक्षेप खुद्द परांजपे यास कितीसे पटले असते ? कोणी कोणाला जो मान देतो तो त्याने न केलेल्या गोष्टीबद्दल नव्हे तर केलेल्या गोष्टीबद्दल असतो हे रागाच्या व चिरडीच्या सपाट्यात प्रि. परांजपे यांच्या लक्षात राहिले नाही. टिळकाना जे मानपत्र देण्यात आले त्यात टिळकानी जी कामगिरी केली तिचा स्पष्ट उल्लेख आलेला होता. आणि ती कामगिरी खरी नाही असे जोपर्यंत दाखविता येत नाही तोपर्यंत टिळकानी परस्पर-सुधारकाप्रमाणे विधवांची लग्ने लाविली नाहीत म्हणून हे मानपत्र योग्य नव्हे हा कोटिक्रम अत्यंत मूर्खपणाचा होय. ज्या

फर्ग्युसन कॉलेजचे परांजपे हे प्रिन्सिपाल आहेत त्याची स्थापना सुधारक पक्षाने केलेली नव्हे, राष्ट्रीय पक्षाचे पुरस्कर्ते टिळक-चिपळूणकर यानीच केलेली आहे ही गोष्ट क्रोधाच्या भरात स्मृतिनाश झाल्यामुळे परांजपे यास आठवली नाही. इतकेच नव्हे तर लोकांचे शिक्षण लोकांच्या ताब्यात पाहिजे अशा हेतूने ज्या राष्ट्रीय शिक्षणसंस्था पुणे शहरात राष्ट्रीय पक्षाच्या पुरस्कर्त्यांकडून स्थापन झाल्या त्या निमसरकारी बनवून त्यांच्या मूळ हेतूवर बिब्बा घालण्याचे महत्कृत्य मात्र गोखले आदिकरून परांजपे यांच्या गुरूंच्या व आद्यगुरूंच्या हातून घडले हेहि आयत्या बिळावर नागोबा या न्यायाने सदर संस्थांचे आधिपत्य स्वीकारणाऱ्या प्रिन्सिपालांच्या ध्यानात आले नाही. पण टिळकास या कामी आपल्या आयुष्याची पहिली उमेदीची अकरा वर्षे खर्च करावी लागली आणि पुढे मूळ हेतु तडीस जाणे जेव्हा अशक्य झाले तेव्हा सदर संस्थाशी आपला संबंध तोडून टाकावा लागला ही गोष्ट पुण्यातच काय तर महाराष्ट्रातहि विश्रुत आहे. डेक्कन एज्युकेशन सोसायटीनंतर टिळकानी ‘ केसरी ’ पत्र हाती घेतले व तेव्हापासून केसरीकार या नात्याने राष्ट्रीय मतांचा देशात प्रसार करण्यास त्यांच्या हातून सुरुवात झाली. हे काम त्यानी कसे बजावले हे गणिताच्या गुहेत पडलेल्या प्रि. परांजप्यास जरी दिसले नाही तरी सर्व महाराष्ट्रात ते महशूर आहे. त्या काली व तत्पूर्वी सुधारणावाल्यांचा पक्ष आपल्याला मोठा प्रबल मानीत असे. आणि त्यांचे रथी व महारथी बहुतेक सरकारी अमलदार किंवा पेन्शनर असल्यामुळे धन्याकडे पाठ करून गरीब बिचाऱ्या समाजावर यथेच्छ तोंडसुख घेऊन आपली प्रौढी मिरविण्याची त्यास मोडी संधि मिळालेली होती. एखाद्या गरिबाची पोर कोणत्याहि प्रकारे पकडून आणून तिचा कोणत्या तरी मनुष्याशी कसा तरी पुनर्विवाह लावून दिला म्हणजे आपण कृतार्थ झालो किंवा एक मोठे शतकृत्य केले असे या सुधारकास तेव्हा वाटत असे. आणि इंग्रजी आचार इंग्रजी विचार इंग्रजी खाणेपिणे किंबहुना इंग्रजी रीतीने देवाची प्रार्थना करणे यातच काय तो पुरुषार्थ आहे आपले जुने आचार किंवा शास्त्र सर्व कुचकामाचे होत असे या सुधारक पंडितांचे त्यावेळी नित्य प्रतिपादन चालत असे. मात्र या सुधारणा स्वतःच्या आचरणाने अमलात आणण्याचा जेव्हा परमेश्वरकृपेने प्रसंग येई तेव्हा कोणी आईची तर कोणी बापाची अगर बहिणीची सबब सांगून मोठ्या युक्तीने ते आपल्या भित्रेपणावर पांघरूण घालण्याचा प्रयत्न करीत असत. ना. परांजपे यास या गोष्टी कदाचित अवगत नसतील किंवा असल्यास जळफळाटाच्या भरात त्या ते विसरून गेले असतील. कसेहि असो. आम्ही परांजपे यास निक्षून असे बजावतो की त्यास ज्या सुधारक पक्षाचा अभिमान आहे त्या पक्षाची सुधारणा घडवून आणण्याची तत्कालीन पद्धत इतकी गर्ह्य होती की त्यामुळे त्यांचे वर्तन उपहासास्पद होई इतकेच नव्हे तर खऱ्या सुधारणा समाजात लवकर रूढ होण्यासहि त्यामुळे पुष्कळ अडथळा झालेला आहे. सुधारक पक्षाच्या तत्कालीन वर्तनाच्या खऱ्या

स्वरूपाचे आविष्करण करणे हे देशहितदृष्ट्या तेव्हाच्या वर्तमानपत्रांचे काम होते. "सोम्याची पोरगी काही तरी भुलथापीने गोम्याच्या पदरी बांधणे" ही काही खरी सुधारणा नव्हे. खऱ्या सुधारकाचे काम समाजातील बहुमत आपल्याकडे वळवून घेऊन त्याच्याकडून व स्वतः सुधारणा अमलात आणणे व आणविणे होय. पण स्वतःवर प्रसंग आल्याबरोबर कानावर हात ठेवून मोकळे होणाऱ्या परस्पर-सुधारकांच्या हातून ते कसे घडून येणार? अशा दृष्टीने पाहिले म्हणजे रानडे काय गोखले काय किंवा खुद्द परांजपे काय सगळे एकाच माळेचे मणी होत. किंबहुना बापसे बेटा सवाई म्हटले तरी चालेल. सुधारकांच्या या धोरणात हल्लींच्या काळी थोडाबहुत फरक झालेला आहे. पण त्याचे श्रेय सुधारकास न देता त्यांच्या टीकाकारासच दिले पाहिजे. फार लांब कशाला? पुण्यास जेव्हा स्त्री-शिक्षणासाठी इंग्रजी पद्धतीने चालविलेल्या शाळांची योजना झाली तेव्हाच या संस्था अशा पद्धतीने चालविल्यास खिस्ती मिशनऱ्यांची त्यात मोठी सोय होईल असे सुधारकास बजावण्यात आले होते. लोक व टीकाकार मूर्ख आहेत अशा समजुतीवर ठेंच लागेपर्यंत त्यानी या सावधगिरीच्या सूचनेची उपेक्षा केली आणि ठेच लागल्यावरहि ते अजून पुरे सावध झाले नाहीत हे महाराष्ट्रात तरी कोणास नव्याने सांगावयास नको. प्रौढ-विवाह विधवा-विवाह स्त्रीशिक्षण वगैरे सुधारणा नकोत असे टिळकानी अगर केसरीकारानी केव्हाहि म्हटलेले नाही. पण या सर्व सुधारणा देशास हितावह अशा राष्ट्रीय पद्धतीनेच घडवून आणल्या पाहिजेत असे टिळकाप्रमाणे बहुजनसमाजासहि त्या वेळी वाटत होते. पण परांजपे यास ते तसे कळावे किंवा कळत असले तरी सुधारकांच्याच दुर्भेद्य गोटात सांपडल्यामुळे त्यांच्या डोळ्यापुढे ते कसे उभे राहावे? स्मृतिनाशच नव्हे तर खोटेपणा देखील क्रोधाने कसा उत्पन्न होतो याचे एक उत्कृष्ट उदाहरण त्यांच्या लेखात आलेले आहे. १८९५ साली सामाजिक परिषद राष्ट्रीय सभेच्या मंडपात भरू नये असा बहुमताला अनुसरून टिळकांचा आग्रह होता. या वेळी टिळकानी "सभामंडप जाळला" असे प्रथम जेधेमॅन्शनच्या आपल्या ढोलकेवाल्यांच्या सभेत विधान करून पुढे आपल्या पत्रात टिळकानी सभामंडप जाळण्याची भीति घातली असे त्यानी विधान केले आहे. वस्तुतः ही दोनहि विधाने खोटी होत. यापैकी दुसरे म्हणजे भीतीचे विधान सहज बोलता बोलता गमतीखातर कै. श्रीधर विठ्ठल दाते यानी केले होते. आणि ह्यामुळे सुधारकांचे शेंदाडशिपाई घाबरून जाऊन आपणास कसे उपहासास्पद करून घेतात एवढीच गंमत दाते यास पहावयाची होती. परांजपे यास ही गोष्ट माहीत आहे काय? असल्यास असला विपर्यास त्यानी का करावा? सुरतेच्या बखेड्याबद्दल बोलतानाहि त्यानी अशाच प्रकारच्या त्यांच्या गोटात चालू असलेल्या निवळ गप्पांच्या आधारे सत्यापलाप केलेला आहे. सुधारकपक्षाचे धोरण पहिल्यापासूनच असे आहे की सामान्य जनसमूहाला शिव्या द्याव्या आणि सरकारशी प्रसंग आला म्हणजे नमते घ्यावे. त्यांच्या मते

राजकीय प्रगति होण्यापूर्वी सामाजिक प्रगति झाली पाहिजे आणि ती सामाजिक प्रगति या मूठभर शहाण्यांच्या सांगण्यावरून सरकारने समाजावर कायद्याने लादावी.

राष्ट्रीय पक्ष म्हणजे बहुजनसमाजाचा पक्ष याच्या अगदी विरुद्ध आहे. मुसलमानी अमलातच ज्यानी स्वातंत्र्याची स्थापना केली त्यानी या सामाजिक सुधारणा प्रथम घडवून आणलेल्या नव्हत्या असा आमचा इतिहास आहे. परंपरेने प्राप्त झालेला रीतिरिवाज काही तरी मोठा प्रसंग प्रथम प्राप्त झाल्याखेरीज कोणी बदलीत नाही. हिंदुपदपाच्छाईची जेव्हा उज्ज्वल भावना महाराष्ट्रात उत्पन्न झाली तेव्हा एक ब्राह्मण संभाजीस घेऊन एका ताटात जेवला आणि रणांगणावर सर्व जाति एकाच पखालीतले पाणी पिऊ लागले व स्पर्शास्पर्श दोष न मानता एकाच ठिकाणी एकाच कारखान्यात शिजलेले अन्न ग्रहण करू लागले. हाच न्याय स्वीकारून हल्लीच्या गणपति-उत्सवातहि विसर्जनप्रसंगी ब्राह्मणाचे व अस्पृश्य वर्गाचे गणपति एकत्र मिळून मिसळून नेण्यात येतात आणि पूर्वीच्या कालीहि काही पेशवे आपले सुतक दुसऱ्या एका जहागीरदारावर लादून आपण दरबारात खुशाल राजकारण पहात बसत असत हे ऐतिहासिक दाखले लक्षात आणले म्हणजे सुधारणा फुकाफुकी घडत नसतात समाजास कोणती गोष्ट आपल्या उत्कर्षाच्या आड येते हे प्रत्यक्ष कळावे लागते आणि ते कळले म्हणजे समाज आपोआपच हे अडथळे दूर करण्यास प्रवृत्त होतो असे दिसून येईल. आमच्या सुधारकानी प्रथमच ही गोष्ट जर लक्षात ठेवली असती तर फार बरे झाले असते. पण तसे न करता वेळी अवेळी शास्त्रकर्त्यांस समाजास किंवा जुन्या रीतीभातीस शिव्या दिल्याने त्यानी एका प्रकारे सुधारणेचे मागे मागेच हटविले आहे. राष्ट्रीय पक्षाचे धोरण याच्या अगदी विरुद्ध आहे. पारतंत्र्याखाली हताश झालेल्या समाजात स्वाभिमान जागृत होऊन आपल्या परंपरागत आलेल्या संस्कृतीवरच सुधारणेची इमारत उभारण्याचे जेव्हा त्यांच्या मनात भरेल तेव्हाच देशाचे वैशिष्ट्य कायम राहून हिंदुस्थान देश सुधारून जगातील पहिल्या प्रतीच्या राष्ट्राच्या योग्यतेस चढेल असे या पक्षाचे ठाम मत आहे आणि असे मत असल्यामुळे स्वाभिमान देशाभिमान धर्माभिमान मातृभाषाभिमान आणि स्वराज्याची आवड लोकात प्रथम उत्पन्न करून मग दुसरे जे काय करावयाचे ते केले पाहिजे असे त्याने ठरविले आहे. सुधारक पक्षाला हे मत नडत असल्यामुळे स्वराज्याची आवड या शब्दांचा इंग्रजाना देशातून घालवून देणे असा मुद्दाम खोटाच अर्थ करून राष्ट्रीय पक्षावर सरकारचा गुस्सा होण्यास सुमार्गाने अगर कुमार्गाने या सुधारक पक्षातील लोकानी आतापर्यंत अनेकदा प्रयत्न केलेले आहेत. ना. परांजप्यास लोकांच्या डोळ्यातील कुसळ दिसते, पण आपल्या डोळ्यातील मुसळ दिसत नाही यास आमचा नाइलाज आहे. पण गेल्या चाळीसपन्नास वर्षांच्या महाराष्ट्राच्या किंवा हिंदुस्थानच्या इति-

हासाचे जर ते सूक्ष्म अवलोकन करतील तर सुधारक आणि राष्ट्रीय पक्ष यांचे हे शून्यलब्धि--समीकरण सोडविण्यास त्यास फारसे कठीण पडणार नाही. संमति कायद्यास लोकानी जो विरोध केला तो याच राष्ट्रीय तत्त्वावर होय. ज्या कायदे-कौन्सिलात लोकमताचा पूर्ण पगडा नाही त्या कौन्सिलाच्या हातात आमची सामाजिक शेंडी आम्ही कधीहि देणार नाही. निदान रौलेट-अॅक्टावरून तरी ही गोष्ट परांजपे यांच्या लक्षात यावयास पाहिजे होती. पण दुर्दैव आमचे की, तसा प्रकार अद्याप घडला नाही व पुढेहि घडेल का नाही याचा वानवाच आहे. संमति वयाच्या वेळी डॉ. भांडारकर यानी लावलेले स्मृतिवचनाचे अर्थ चुकीचे होते हे पूर्ण विचारांती आता त्यानाहि काही बाबतीत कबूल आहे. पण प्रि. परांजप्यांचे संस्कृताचे ज्ञान इतके अकटोविकट आहे की डॉ. भांडारकरांच्या चुका दाखविण्यात केसरीची अगर टिळकांची त्या वेळी चूक झाली नाही हेहि त्यांच्या काही लक्षात आले नाही. टिळकानी जेव्हा तेव्हा सुधारकास शिव्या दिल्या हीच एक त्यांची मुख्य तक्रार आहे. पण ते असे लक्षात घेत नाहीत की त्या कालात सुधारकांच्या बाजूलाहि आगरकरासारखे खंबीर लेखणीबहादर होते. ते रँग्लर नव्हते हे खरे आहे पण प्रतिपक्षावर तुटून पडून कधी उपहासानी तर कधी मर्मभेदक लेखानी विरुद्ध पक्षाचा कोटिक्रम हाणून पाडण्यात त्यांचा हातखंडा काही कमी नव्हता हे परांजपे यास माहीत असले पाहिजे. केसरीच्या गोटातून अशा प्रकारचा योद्धा सुधारणेच्या पुरस्कारासाठी जेव्हा बाहेर पडला तेव्हा केसरीवर एक मोठेच संकट ओढवले असे पुष्कळास वाटले होते. पण सत्याचे बल वाग्बलापेक्षा नेहमीच अधिक असते व त्यामुळे सुधाकरपक्षाच्या या वीराचे हल्लेहि केसरीकारास सव्याज मागे हटविता आले ते तत्कालीन 'सुधारक–केसरी'च्या वाचकास आम्ही सांगावयास नको. टिळकानी शिव्या दिल्याखेरीज काही केले नाही अशी रडकथा गाण्यात काय हशील ? सुधारकानीही काही कमी शिव्या दिल्या नाहीत इतकेच नव्हे तर सुधारणापक्षीयानी सरकारची आग टिळकावर पाखण्याच्या कामीहि पर्यायाने यथाशक्ति मदत केली आहे. मग ही रड कशाला ? आपल्या मदतीस आता कोणी उरले नाही म्हणून अस्पृश्य जातीतील गाजारबुणगे आपल्याकडे वळवून घेण्याकरिता तर नव्हेना ? पण आयत्या वेळी आपल्या शिपायास सोडून जाणाऱ्या अवसानघातकी पुढाऱ्यावर या नव्या शिपायांचा तरी विश्वास कसा बसणार ! पुढारी झाले म्हणजे 'मुखरस्तत्र हन्यते' या न्यायाने आघातहि सोसावे लागतात याचा परांजपे यास अद्याप अनुभव आलेला नाही. म्हणून टिळकांच्या पापांची यादी करून आपण त्यास सहज जिंकू आणि या कामी आपल्याला पाठबळ देण्यास गोखल्यांची पत्रे व जेध्याच्या राजवाड्यातील बाजारबुणगे उत्सुकतेने पुढे सरसावतील अशी त्यास उमेद आहे. राष्ट्रीय पक्षाकडील बहुजनसमाजास जनावरे किंवा बाजारबुणगे अशी संज्ञा देऊन स्वतःच मागासलेल्या वर्गाचे बाजारबुणगे गोळा करणाऱ्या आणि त्यांचेच मत खरे राष्ट्रमत

होय असे प्रतिपादन करणाऱ्या या अभिनव लेखकाचे चातुर्य व तर्कशास्त्र अगाध असले पाहिजे यात संशय नाही. सुधारणापक्षीयानी आजपर्यंत काही राजकीय कामगिरी केली असेल तर ती स्वराज्याचे पाऊल मागे हटवण्यात आहे स्वतःची मेषपात्रता गाण्यात आहे किंवा आपल्याबरोबर लोकांच्या आंगीहि मेषपात्रता आणण्याचा प्रयत्न करण्यात आहे. सन १९०६ साली दादाभाई नौरोजी यानी कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेत स्वराज्याचे निशाण उभारण्यापूर्वीच नव्हे तर तदनंतरहि सुधारकपक्ष मागे मागे हटण्यातच आपले खरे कर्तव्य आहे असे मानीत होता. आज ज्या सुधारणा मॅंटेग्यू बिलाने आपल्यास प्राप्त होत आहेत त्यापेक्षाहि जरा कमीच सुधारणेचा प्रथम हप्ता मागण्यास सुरुवात करा असे १९०७ साली राष्ट्रीय पक्षाचे सुरतेस म्हणणे होते. पण त्या वेळी मेथा गोखले वगैरे परांजप्यास शिरसावंद्य असलेल्या सुधारक पक्षाच्या अग्रणीनीच राष्ट्रीय पक्षास हाणून पाडण्यासाठी कॉंग्रेस मोडून टाकण्याचीहि पर्वा ठेवली नाही. परांजप्यांच्या दृष्टीने त्यानी हे एक मोठे शतकृत्य केले असेल पण परस्पर—सुधारणापेक्षा राष्ट्रीय अभिमानासच आम्ही जास्त महत्त्व देत असल्यामुळे आम्हास हे मत स्वीकारता येत नाही. सामाजिक पक्षाच्या मनातून जितक्या सुधारणा हिंदुस्थानात झाल्या पाहिजेत त्यापेक्षा दोन तसू अधिक सुधारणा ब्रह्मी लोकात व हिंदुस्थानातील नेटिव ख्रिस्ती समाजात झालेल्या आहेत. पण हे दोनहि समाज आमच्याप्रमाणेच आज अधोगतीस गेलेले आहेत. स्वाभिमान हुरूप स्वराज्यनिष्ठा हाच राष्ट्राचा खरा जीव होय आणि हा जिवंतपणा जेथे वसत आहे त्या ठिकाणी सुईच्या मागे जसा दोरा तद्वत सामाजिक सुधारणाहि मागोमाग येत असतात अशी इतिहास साक्ष देत आहे. म्हणून राष्ट्रीय पक्ष राजकीय चळवळीस जितके महत्त्व देतो तितके सामाजिक चळवळीस देत नाही. राष्ट्राची सामाजिक प्रगति होऊ नये असे त्यांचे म्हणणे नाही पण ती राजकीय प्रगतीच्या व स्वाभिमानाच्या अनुषंगानेच झाली पाहिजे. राजकीय परवशता फार तर मुळमुळीत विरोधाने स्वीकारून जिवंत सुधारणा होणेच शक्य नाही असे राष्ट्रीय पक्षाचे तत्त्व आहे. व याप्रमाणे तो वागत आहे म्हणून त्याने अमुक सामाजिक गोष्टी केल्या नाहीत तमुक केल्या नाहीत अशी तक्रार करण्यात काही हशील नाही. सुधारक पक्षाला जी आपली कामगिरी वाटते ती जितकी लोकांच्या डोळ्यापुढे आहे तितकीच राष्ट्रीय पक्षाचीहि कामगिरी लोकांस अवगत आहे. म्हणून ना. परांजप्यासारख्याच्या एककल्ली लेखाने किंवा शिव्याशापाने राष्ट्रीय पक्ष बुडणे अशक्य आहे. जगातील सर्व देश स्वातंत्र्याच्या भावनेने प्रेरित होऊन आपल्या देशाचा कारभार आपल्या हातात असावा अशा प्रयत्नास कालानुसार लागले आहेत. ही वेळ घालवू नका. मॅंटेग्यूसाहेबांचे आभार माना असे परांजप्यांचे म्हणणे आहे. का तर कालानुरूप त्यानी आपले काम बजावण्याचा प्रयत्न केला म्हणून. पण खरे कर्तृत्व कालाचे आहे मॅंटेग्यूसाहेबांचे नव्हे ही

गोम त्यांच्या लक्षात आलेली नाही. कालाचा महिमा अगाध आहे व तोच आपणास पुढे लोटीत आहे. या वेळी राष्ट्रीय पक्षास शिव्या देऊन व आपल्या कामाची तारीफ करून सरकारशी अविरोध करणे देशहितदृष्ट्या गैरमुत्सद्दीपणाचे आणि अविचाराचे लक्षण होय. म्हणून असला आचरटपणा सोडून देऊन व आपापसातील मतभेद विसरून ज्याने त्याने आपली क्षेत्रमर्यादा ओळखावी व अनसूयापूर्वक यथाशक्ति देशकार्यास प्रवृत्त व्हावे अशी सर्वपक्षीयासच आमची विनंति आहे. ना. गोखले जेव्हा विलायतेहून १९०५ साली येथे परत आले तेव्हा त्यास मानपत्र देण्याच्या कामी टिळकानी पुढाकार घेतला होता हे परांजपे विसरले काय? टिळक–गोखल्यांचा मतभेद टिळक–परांजप्यांच्या मतभेदापेक्षा कमी तीव्र होता असे नाही. पण तसा असताहि जर टिळक प्रसंगविशेषी तो मतभेद विसरून ना. गोखल्यांचे स्वागत करण्यास तयार झाले तर परांजप्यास तसे करण्यास काय हरकत होती? क्रोध आणि मत्सर ही नरकाची द्वारे होत असे गीतेत स्वच्छ सांगितले आहे. म्हणून ही द्वारे बंद करण्याचा परांजपे यानी अवश्य प्रयत्न करावा म्हणजे अशी घोडचूक पुनः त्यांच्या हातून घडणार नाही एवढीच त्यास अखेरची विनंति करून आम्ही हा लेख येथे संपवितो.

## बेझंटबाईंच्या अनुयायाना उत्तर

बाई विलायतेत गेल्याबरोबर टिळक त्यास प्रथम स्टेशनवर व नंतर त्यांच्या घरीहि भेटले आणि त्यानी विनंति केली की, हिंदुस्थानातील भांडणे हिंदुस्थानांत ठेवून विलायतेत राष्ट्रीय सभेच्या धोरणानेच चालावे हे बरे. बाई अर्धवट कबूल झाल्या आणि प्रथम प्रथम आणि पुढे क्वचित प्रसंगी त्यांचे तसे वर्तनहि होते. पण एकंदरीत नेमस्ताप्रमाणे त्यानीहि काँग्रेसच्या शिष्टमंडळाच्या कार्यास विलायतेत विरोध केला असे म्हणणे भाग आहे. आणि ही गोष्ट जर कबूल असेल–मग बाईंच्या भक्तास ती ‘ वाजवी ’ म्हणून कबूल असो वा ‘ वावगी ’ म्हणून कबूल असो–तर वादच मिटला म्हणावयाचा. कारण अशा तऱ्हेचा विरोध करून पुनः राष्ट्रीय सभेत “ मी तुमच्यातीलच ” असे म्हणून जाणे कोणासहि युक्त नव्हे, असे मग न्यायतःच प्राप्त होते. असो. बाई आणि टिळक यांच्या विलायतच्या कामगिरीत अंतर पडणे स्वाभाविकच होते, असे वरील पूर्व हकीकतीवरून वाचकास कळून येईल. राष्ट्रीय सभा चुकली, नेमस्त चुकले हिंदुस्थानचे खरे हित आपल्या स्वतःच्याच सिद्धातांत व्यक्त झालेले आहे असे बाईना विलायतच्या लोकापुढे मांडावयाचे होते, तर उलटपक्षी टिळक यास राष्ट्रीय सभेची महती स्थापित करावयाची असून राष्ट्रीय सभेचे ठरावच स्वयंनिर्णयदृष्ट्या हिंदुस्थानातील बहुजनसमाजाचे मत होय, असे ब्रिटिश जनतेपुढे मांडावयाचे होते. आपल्याला पुढे करून बाई स्वतःच्या मतास अधिक मान देत होत्या तर टिळक क्षणभर आपल्याला बाजूला ठेवून राष्ट्रीय सभेत बहु-

मताने मंजूर झालेले ठराव हेच खऱ्या राष्ट्रीय मताचे निदर्शक होत असे प्रतिपादन करीत होते. दिल्लीत आपले मत ग्राह्य न ठरल्यामुळे बाई राष्ट्रीय सभेवर रुसलेल्या होत्या आणि काही झाले तरी कॉंग्रेसचे ठराव हेच या बाबतीत मुख्य होत असे टिळकांचे सांगणे होते. थोडक्यात सांगावयाचे म्हटल्यास कॉंग्रेसच्या शिष्ट–मंडळाने किंवा टिळकानी विलायतेस जे प्रयत्न केले त्याचा कॉंग्रेसचे ठराव हा केन्द्र होता आणि बाईनी किंवा त्यांच्या नेतृत्वाखाली विलायतेस गेलेल्या शिष्ट–मंडळाने तिकडे जे प्रयत्न केले त्याचा स्वतः बाई याच केन्द्र होत्या असे म्हटले तरी चालेल. बाई मॉन्टेग्युकडे झुकल्या होत्या तर टिळक व कॉंग्रेसचे शिष्टमंडळ राष्ट्रीय सभेकडे झुकले होते. मॉन्टेग्युसाहेबाचे कृतज्ञतापूर्वक आभार मानणे किंवा स्तुति करणे हे बाईस पहिल्यापासूनच इष्ट वाटत होते तर स्वयंनिर्णयाच्या तत्त्वावर राष्ट्रीय सभेच्या ठरावास मॉटेग्युसाहेबानी जितका मान द्यावयास पाहिजे होता तितका दिलेला नाही असे टिळकास व कॉंग्रेसच्या शिष्टमंडळास ब्रिटिश जनतेपुढे उघड सिद्ध करून दाखवावयाचे होते. विलायतेत टिळक ‘ मॉडरेट् ’ झाले होते असे बाई आता म्हणतात. पण राष्ट्रीय सभेच्या ठरावात रेसभर देखील फरक न करिता ते ठरावच सयुक्तिक न्याय्य आणि खऱ्या मुत्सद्दीपणाचे आहेत असे समर्पक रीत्या पण ठासून प्रतिपादन करणे हेच जर बाईच्या मते टिळकांच्या विलायतेतील ‘ मॉडरेट् ’ पणाचे लक्षण असेल तर टिळक तो दोष किंवा आरोप सुखाने माथी घेण्यास तयार आहेत असे चिपळुणकरासच काय पण सर्व लोकास आम्ही टिळकातर्फे कळवितो. मवाळास किंवा बाईस टिळकांची ही कृति पसंत पडत नाही हा काही टिळकांचा दोष नव्हे. राष्ट्रीय सभेचा मान राखावयाचा का आपला हेका अगर अहंकार पुरवावयाचा असा प्रत्येक शिष्ट–मंडळापुढे प्रश्न होता. आणि बाईचा किंवा इतर शिष्ट–मंडळाचा कित्ता न गिरवता टिळकानी आणि कॉंग्रेसच्या शिष्ट–मंडळाने, पुढे किंवा मागे न जाता, राष्ट्रीय सभेचेच मत ब्रिटिश जनतेकडून व मजूर–पक्षाकडून मान्य करून घेतले हीच नामदार पटेल यांच्या नेतृत्वाखाली वागणाऱ्या टिळक–खापड्यांची मुख्य कामगिरी होय. कोणी म्हणेल की, बाईचे व टिळकांचे मार्ग जरी भिन्न असले तरी ज्याअर्थी मतभेद होणे हे स्वाभाविक आहे, त्याअर्थी केवळ मार्गभेदास्तव बाईवर इतके तुटून पडण्याची जरूर नव्हती. बाई केवळ मतभेदावरच जर संतुष्ट राहिल्या असत्या तर वरील शंकेस काही अवकाश मिळण्याचा संभव होता. पण तसा प्रकार घडून आला नाही. अखेर राष्ट्रीय सभेशी व तिच्या कार्याशी बाईनी विरोधच केला असे म्हणण्यास सबळ पुरावा आहे. बाईनी पार्लमेंटरी कमिटी स्थापन केली असे काहींचे म्हणणे आहे. परंतु खरे पाहता बाई विलायतेस जाण्यापूर्वी कित्येक महिने टिळकानी ही कमिटी स्थापन करून तिला राष्ट्रीय सभेच्या मागण्यांची पूर्ण ओळख करून दिली होती. बाईनी विलायतेस आल्यावर जे कार्य केले ते

येवढेच की या पार्लमेंटरी कमिटीच्या त्या स्वयं-सेक्रेटरी झाल्या. आणि कमिटीच्या नावाने इतर शिष्ट-मंडळावर छाप बसविण्याचा प्रयत्न करू लागल्या. नामदार पटेल यानी त्यातील इंगित तेव्हाच ताडले आणि राष्ट्रीय सभेच्या तर्फे स्वतंत्र उद्योगास सुरुवात केली. बाईच्या या करण्यात आणि समेट होत असल्यास स्वतः मागे रहाण्यास देखील तयार असलेल्या टिळकांच्या वर्तनात कोणता फरक आहे हे आता सांगावयास नको. राष्ट्रीय सभेला मागे टाकून जे काय केले ते मी केले असे एकाला दाखवावयाचे होते आणि दुसऱ्यास स्वतः मागे राहून राष्ट्रीय सभा पुढे ढकलावयाची होती. ' ब्रिटन ॲन्ड इंडिया ' या संस्थेमार्फत भरलेल्या इंडियन कॉन्फरन्सची अगर आल्बर्ट हॉलमध्ये भरलेल्या बड्या सभेची विलायतेतील सर्व खरी हकीकत चिपळूणकर यास माहीत नाही हे ते स्वमुखानेच कबूल करितात. ती हकीकत जर त्यास माहीत असती—आणि त्याबद्दलचे सर्व अस्सल कागद टिळकापाशी अद्यापहि आहेत—तर हल्लींच्याप्रमाणे सर्वस्वी चुकीची विधाने करण्यास वासुदेवरावजी तयार झाले नसते अशी आमची खात्री आहे. ' इंडियन कॉन्फरन्स ' ची राजकीय शाखा बेझंटबाईच्या अध्यक्षतेखाली ता. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी म्हणजे जॉईन्ट कमिटीचा रिपोर्ट होण्यापूर्वीच भरली होती व त्यात माँटेग्यूसाहेबाना उचलून धरण्याकरिता प्रथम असा ठराव यावयाचा होता की " सर्व प्रागतिक शिष्टमंडळांच्या मागणीत जे मुद्दे सर्वसाधारण असतील ते सरकारने स्वीकारावे. " अंकगणित किंवा बीजगणिताची ज्यास्त ओळख असेल त्यास यातील डावपेच लवकर कळून येतील. समजा की जांची मागणी ५० डिग्रीच्या वर आहे त्याना आपण प्रागतिक म्हणू आणि यापैकी एकाची मागणी ६० डिग्री आहे दुसऱ्याची ७५ आहे व तिसऱ्याची १०० डिग्री आहे. तर ६० ७५ व १०० यात ६०च सर्वसाधारण होणार ७५ नाहीत व १०० हि नाहीत. तात्पर्य राष्ट्रीय सभेची मागणी सर्वांत अधिक म्हणजे १०० डिग्रीची असल्यामुळे ती सोडून देऊन बाईची किंवा नेमस्तांची कमी मागणी कबूल करा असा या ठरावाचा अर्थ होत होता. हा अर्थ टिळक पटेल खापर्डे ( या सर्वांस या परिषदेस आमंत्रण होते ) यांच्या लक्षात आल्यावर त्यानी या ठरावाचा आगाऊच निषेध केला व त्यामुळे परिषदेचे अध्यक्ष म्हणजे बेझंटबाई यास अखेर या सभेत कोणतेच ठराव पास करावयाचे नाहीत असे सभेच्या प्रारंभीच जाहीर करावे लागले. आणि वरील ठराव करण्याकरिताच बोलाविलेल्या परिषदेत नुसत्या शुष्क व्याख्यानाखेरीज काहीएक काम झाले नाही. दुसरी गोष्ट आल्बर्ट हॉलमधील सभेची. या सभेचे मि. लॅन्सबरी हे अध्यक्ष होते व ती सभा बेझंटबाईच्याच उद्योगाने व खर्चाने भरविण्यात आली होती. त्यात अखेर स्वयंनिर्णयाचा व स्वराज्याचाच ठराव पास झाला. पण त्याला जोडूनच माँटेग्यूसाहेबांच्या रिफॉर्म–बिलाचे अभिनंदन करावयाचा बाईचा प्रथम विचार होता. हा विचार टिळकानी मि. लॅन्सबरी यांची आगाऊ भेट घेऊन रहित करविला.

इतकेच नव्हे तर हे बिलच नको असे म्हणणारा जो तिसरा एक पक्ष त्या सभेत उत्पन्न झाला होता त्यालाहि जागच्या जागी सभेतच समर्पक उत्तर देऊन त्यानी खाली बसविले. तसेच 'पाचरेच्या चंचुप्रवेशाचे तत्त्व' स्वीकारून मॅाँटेग्यूच्या सुधारणा तुम्ही का पत्करीत नाही असा जेव्हा या सभेत एकाने टिळकास प्रश्न विचारला तेव्हा 'पाचरेवर टोला मारण्याची सत्ता जर माझ्या हातात असेल तर मी हा न्याय पत्करण्यास तयार आहे' असे उत्तर देऊस टिळकानी त्यास गप्प केले. पण इतका खुलासा कोठेच प्रसिद्ध झाला नसल्यामुळे रा. चिपळूणकर यांची या बाबतीत चूक झालेली आहे. असो ही सभाहि ता. २५ ऑक्टोबर १९१९ रोजी म्हणजे जॉइंट-कमिटीचा रिपोर्ट प्रसिद्ध होण्यापूर्वीच भरलेली होती. विलायतेत हिंदुस्थानची गाऱ्हाणी सहानुभूतिपूर्वक ऐकण्यास तयार असा काय तो एक मजूर-पक्षच होय. बाईची आणि काँग्रेसच्या शिष्ट-मंडळाची मिळून दोहोंचीहि भिस्त या पक्षावर होती. पैकी बाईची मागणी राष्ट्रीय सभेपेक्षा कमी डिग्रीची असल्यामुळे राष्ट्रीय सभेच्या मागणीत बाईच्या मागणीचाहि सहज अंतर्भाव होत होता असे असता व काँग्रेसची मागणी मजूर पक्षास ग्राह्य होण्याचा पूर्ण संभव असता काँग्रेसच्या मागण्याना आश्रय देवूं नका असे बाईनी मजूर-पक्षातील पुढाऱ्याना सांगणे आमच्या मते योग्य नव्हते आणि अखेर मजूरपक्षासहि ते योग्य वाटले नाही. काँग्रेसच्या मागणी प्रमाणे मॉन्टेग्यु बिलास प्रतिसूचना आणून त्यापैकी एकादी जर परमेश्वराचे कृपेने पार्लमेंटात मंजूर झाली असती तर त्यात बाईचे काय खर्चले असते कोणास ठाऊक ? पण-पण-आम्ही आज जास्त बोलत नाही. " मी हिंदुस्थानची खरी प्रतिनिधी. राष्ट्रीय सभा कोणी नव्हे, माझे ऐका " अशा खोट्या भावनेने प्रेरित होऊन बाईनी राष्ट्रीय सभेच्या विलायतेतील कामास विरोध केला आणि तो टिळकास काही ठिकाणी तरी हाणून पाडावा लागला येवढे मात्र निश्चित होय. इतकेच नव्हे तर बाईनी ही भावना अमृतसर येथे आणून राष्ट्रीय सभेवर आपली स्वारी ठेवण्याचा पुनः एकवार कसा निष्फळ प्रयत्न केला ही गोष्ट आता सर्वास माहीत झाली आहे. चिपळुणकर म्हणतात त्याप्रमाणे बाईच्या चेल्यास त्यात बाईचे शहाणपणच वाटत असल्यास निदान या बाबतीत तरी बाईवरील आमची श्रद्धा आम्हास त्यांच्याप्रमाणे नाचवू शकत नाही हे आम्ही मोठ्या आनंदाने कबूल करतो. धार्मिक आणि राजकीय श्रद्धा यांमध्ये जो काही मोठा भेद आहे तो हाच होय. पण इतक्या खोल पाण्यात न शिरता बाईस आमची शेवटची विनंति येवढीच आहे की हिंदुस्थानाबद्दल त्यास जितकी कळकळ आहे तितकीच हिंदुस्थान त्यांच्या सहाय्याची अपेक्षा ठेवीत आहे. त्या विद्वान आहेत कार्यकर्त्या आहेत इत्यादि गोष्टी आम्ही प्रारंभी सांगितल्याच आहेत. अशा व्यक्तीच्या सहाय्याची स्वराज्यप्राप्त्यर्थ उद्योग करणारा कोण गृहस्थ अपेक्षा ठेवणार नाही ? करिता राष्ट्रीय सभेशी टिळकांशी किंवा राष्ट्रीय पक्षाशी बाईचा हा जो विरोध हल्ली उत्पन्न झाला आहे

तो काढून टाकून त्यानी पूर्ववत् आपले ध्येय कायम ठेवून व मिळाले तेवढे पदरात टाकून स्वराज्यप्राप्तीच्या पुढच्या उद्योगास एकीने लागावे. मॉंटेग्यू—ॲक्ट जरी पास झाला तरी तेवढ्याने काही सर्व काम झालेले नाही. अर्थात् ॲक्ट कितीहि बरा असला तरी त्यास हुरळून जाणे योग्य नाही. किंबहुना आता जे प्रयत्न करावयाचे आहेत ते या ॲक्टावर संतुष्ट न राहता पूर्वीपेक्षाहि अधिक उद्योगाने नेटाने व निश्चयाने केले पाहिजेत. आणि तेहि आम्ही जितक्या लवकर करावयास लागू तितक्या लवकर झाले पाहिजेत. जग पालटत चालले आहे, तोच त्याच्या प्रवाहात आम्ही आपले हात धुऊन घेतले पाहिजेत. 'नेमस्त-पक्ष' हे बाईंचे कायमचे वसतिस्थान होणे शक्य नाही. राष्ट्रीय पक्षासच त्याना येऊन मिळाले पाहिजे. त्यातच बाईंचे राष्ट्रीय पक्षाचे व हिंदुस्थानचे कल्याण आहे. म्हणून मागील सर्व गोष्टी विसरून जाऊन निरहंकार बुद्धीने बाईंनी टिळकाशी म्हणजे राष्ट्रीय पक्षाशी अगर राष्ट्रीय सभेशी पूर्ववत् सहकारिता करावी, रुसून फुटून जाऊ नये अशी त्यास आम्ही विनंति करतो. ही गोष्ट जर शक्यच नसेल तर

यथा काष्ठं च काष्ठं च समेयातां महोदधौ ।
समेत्य च व्यपेयातां तद्वद्भूतसमागमः ॥

हे ऋषिवाक्य लक्षात ठेवून खेद व हर्ष मनात न आणता ज्याने त्याने आपापल्या वाटेने जाणे जरूर आहे. राजकारणातील संयोग वा वियोग यांचा वरील श्लोकात वर्णन केलेल्या वेदांत दृष्टीने कर्मयोग्यानी विचार केला पाहिजे.

## ( १० ) अमृतसरची कॉंग्रेस

ता. २७ डिसेंबर रोजी अमृतसर येथे राष्ट्रीय सभा भरण्याचे ठरले होते. ती सभा दोन कारणानी विशेष महत्त्वाची होती. पहिले असे की विलायतेतील कामगिरी आटोपून शिष्टमंडळे परत आली त्यातील लोक सभेला हजर राहणार होते. पण त्याहून महत्त्वाचे कारण हे की पंजाब प्रकरणावर सर्व राष्ट्राने मिळून मत प्रगट करण्याचा हाच पहिला प्रसंग होता. व शेपन्नास वर्षात न घडलेले असे दारुण प्रसंग या दुर्दैवी सालात अमृतसर येथेच घडले म्हणून पंजाबात कॉंग्रेस व्हावयाची ती लाहोरास न होता अमृतसर येथेच शक्य तर भरवावी हे औचित्याच्या दृष्टीने ठीकच होते. प्रथम अशी शंका आली की अमृतसर येथे एवढ्या सभेची व्यवस्था नीट कशी होईल? पण उत्साहामुळे सर्व काही होते तसेच येथेहि घडून आले. बिचाऱ्या अमृतसरच्या लोकानी आपली सर्व दुःखे विसरून आपणात नवजीवन उत्पन्न झाले हे दाखविण्याकरिता सभेची सर्व व्यवस्था फार चांगली केली होती. या संकटात ज्या लोकानी पंजाबाला विशेष मदत केली त्यापैकीच एक म्हणजे पं० मोतिलाल नेहरू हे अध्यक्ष होणार होते. यामुळे या उत्साहात भर पडली होती. यंदाहि कॉंग्रेसकरिता मुंबईहून स्पेशल

ट्रेनची व्यवस्था करण्यात आली होती. टिळकांच्या बरोबर त्यांच्या पक्षातील बहुतेक पुढारी हजर होते. ही स्पेशल ट्रेन बी. बी. सी. लाईनने गेली. ती वाट चालत असता मधल्याच एका स्टेशनवर त्याना बादशाही जाहीरनामा निघालेला वाचावयास मिळाला. तेव्हा त्याला ताबडतोब उत्तर द्यावे म्हणून टिळकानी पुढच्या एका स्टेशनावरून तार पाठविली. ही तार हा वादाचा एक विषय होऊन लोकापुढे आली तेव्हा झालेली हकीगत स्वतः टिळकानी लिहून केसरीत प्रसिद्ध केली म्हणून ती त्यांच्याच शब्दानी पुढे दिली आहे.

### प्रतिसहकारितेचा जन्म

"ज्या तारेबद्दल येवढी चर्चा चाललेली आहे ती तार तरी काय आहे हे पहिल्याने पाहिले पाहिजे. कारण यावरील टीकाकारांची दृष्टि धांदलीत क्षुद्र मनोविकाराने अंध होऊन साधे इंग्रजी शब्दहि त्याना न कळता त्यानी या तारेची सपशेल खोटी भाषांतरे प्रसिद्ध केली आहेत. टिळकानी तारेत मानलेले आभार हे बादशहाचे आहेत. मॉंटेग्यूसाहेबांचे नव्हत अगर व्हाइसरॉयसाहेबांचेहि नव्हत. बादशहास काहीहि मजकूर कळवावयाचा असला तरी तो त्याचे मंत्री चिटणीस किंवा व्हाइसरॉय यांचे मार्फतच कळवावा लागतो. म्हणून बादशहास उद्देशून केलेल्या तारा मॉंटेग्यू व व्हाइसरॉय यांच्याद्वारे पाठविण्यात आल्या असल्या तरी त्यातील मजकूर त्या दोघासहि उद्देशून नव्हता.

"मॉंटेग्यू आणि व्हाइसरॉय यांच्या द्वारे बादशहाकडे जी तार पाठविण्यात आली ती पुढे लिहिल्याप्रमाणेः—

"Please convey to His Majesty grateful and loyal thanks of Indian Home Rule League and the people of India for Proclamation and amnesty and assure him of responsive cooperation."

अर्थः—"बादशहास मेहेरबानीने असे कळवा की जाहिरनामा आणि माफी याबद्दल इंडियन होमरूल लीग आणि हिंदुस्थानचे लोक त्यांचे कृतज्ञपणे आणि राजनिष्ठपणे आभारी आहेत आणि (या बाबतीत) प्रतियोगी सहकारिता (लोकाकडून) मिळेल असेही बादशहास आश्वासन द्या."

या तारेत आभार बादशहांचे आहेत, आणि तेहि त्यांचा जाहिरनामा व सर्वसाधारण माफीबद्दल असून सहकारित्वाचे वचनही प्रतियोगी स्वरूपाचे आहे.

Responsive (प्रतियोगी) हा शब्द सहकारितेला प्रायः लावीत नाहीत हे खरे. पण त्याच कारणामुळे प्रस्तुतच्या तारेतील या शब्दाकडे टीकाकारांचे विशेष लक्ष जावयास पाहिजे होते. बादशहांच्या जाहीरनाम्यात सहकारित्वाचा उपदेश नोकरशाही आणि प्रजा या दोघासहि केलेला होता. टिळकांच्या मते प्रजेस हा उपदेश करणे जरूर नव्हते. कारण प्रजेच्या कल्याणाच्या गोष्टीत प्रजेने

आपण होऊन कधी अडथळा आणला नाही किंबहुना आणणेहि शक्य नाही. आजपर्यंत जो अडथळा आणि विरोध झाला तो सर्व नोकरशाहीचा. ही नोकरशाही जर सहकारिता करावयास कबूल असेल व करील तर त्याला प्रतियोगित्वाच्या नात्याने म्हणजे जबाबाला प्रतिजबाब म्हणून लोकहि सहकारिता दाखविण्यास तयार आहेत असे बादशहास आश्वासन द्या असा टिळकांच्या या तारेचा अर्थ होता. पण येवढ्या खोल पाण्यात शिरावे कोणी !

"सहकारिता नेहमीच दोहो बाजूकडे सापेक्ष असते. त्यातून जी गोष्ट प्रजेच्या कल्याणाची तीत सहकारिता करा हे प्रजेस सांगावयासच नको. स्वतःच्या कल्याणास आडकाठी घालणारा मनुष्य पशु समजला पाहिजे. म्हणून सहकारित्वाचा उपदेश प्रजेस करणे योग्य नव्हते. या कामात आजपर्यंत जर कोणी आडकाठी घातलेली असली तर ती नोकरशाहीने. यासाठी बादशहांच्या आज्ञेबरहुकूम सहकारिता करण्यास नोकरशाहीची तयारी असल्यास लोकहि आपल्या बाजूने सहकारिता करण्यास तयार आहेतच. नसल्यास मात्र विरोध करावा लागेल असा टिळकांच्या तारेचा खरा मथितार्थ आहे आणि याच अर्थाचे शब्द जर काँग्रेसच्या ठरावात पहिल्यापासूनच योजण्यात आले असते तर मग त्यास कोणी विरोध केला नसता. पण हे तत्त्व पंडितजींनी आपल्या भाषणात जरी कबूल केले होते तरी त्यानी पुढे आणलेल्या ठरावात 'सहकारिता' येवढाच शब्द वापरला असल्यामुळे वाद माजला. आणि सहकारीतेच्या स्वरूपाबद्दल काहीच न बोलता नव्या अॅक्टान्वये आपल्या उन्नतीसाठी काम करा ( Work ) येवढ्यावरच अखेर तडजोड करण्यात आली.

"टिळकानी आपल्या तारेत ज्या सहकारितेचा उल्लेख केला आहे ती प्रतियोगी स्वरूपाची आहे हे जरी कबूल केले तरी ही तार इतक्या लवकर करण्याचे कारण काय, असे एखादा घमेंडानंदन विचारू शकेल. या प्रश्नास एक उत्तर वर दिलेच आहे. होमरूल–लीगचे मुख्य मुख्य अधिकारी अनायासेच गाडीत जमलेले होते. आणि त्या लीगपुढे जर केव्हातरी हा विषय चर्चेस येणारच तर मग तो लवकर आलेला काय वाईट ? पण याहीपेक्षा बलवत्तर असे दुसरेही एक कारण आहे. पंजाब प्रकरण तर आता उपस्थित झाले. पण त्यापूर्वीपासून राजकीय कैद्याना पूर्ण माफी मिळाली पाहिजे अशा मागण्या लोकानी व राष्ट्रीय सभेनेहि वेळोवेळी केल्या होत्या. लखनौस तर बादशाही जाहिरनाम्यात स्वराज्याचाहि उल्लेख पाहिजे अशी स्पष्ट मागणी केलेली होती. आणि होमरूल लीगनेहि हेच ठराव मान्य केलेले होते. इतकेच नव्हे तर काँग्रेस आणि होमरूल–लीग यांच्या वतीने विलायतेस जी डेप्युटेशने गेली होती त्यानी राजकीय कैद्यास सर्वसाधारण माफी देऊन शांतता करण्याची हीच वेळ आहे असे मॉंटेग्यू साहेबास सुचविले होते. मवाळ या गोष्टीला अनुकूल नव्हते, मॉंटेग्यू साहेबांच्या कौन्सिलातील बहुमत प्रतिकूल होते, आणि हिंदुस्थानसरकार तर या गोष्टीस बोलूनचालून

अत्यंत विरुद्ध होते. इतके असताहि बादशहानी माफी दिली तर त्याबद्दल त्यांचे आभार मानावयास नकोत काय ? आणि आभार मानण्याचे एकदा ठरल्यावर ते प्रथम कोणी मानावयाचे ? होमरूल–लीगने राष्ट्रीय सभेने किंवा नेमस्तानी ? टिळकांच्या तारेत केवळ जाहिनाम्याचाच नव्हे तर माफीबद्दलहि जो मुद्दाम निराळा उल्लेख केलेला आहे त्याचे कारण यावरून दिसून येईल.

"कित्येक बेजबाबदार व व्यवहारशून्य जहालांचे असे म्हणणे आहे की माफी देताना बादशहानी जी भाषा वापरली आहे ती आम्हास मान्य नसल्यामुळे आभार मानण्यास आम्ही तयार नाही. पण हे खरे जहाल किंवा नेमस्तहि नव्हत असे त्यास मोठ्या दुःखाने कळविणे प्राप्त आहे. तुम्हाला माफी नको तर खुशाल रहा तुरुंगात ! नको कोणी म्हटले आहे ? नोकरशाहीच्या जुलमाने राजकीय कैदेत गेलेले लोक तुरुंगाबाहेर काढणे हे प्रत्येक देशहितचिंतकाचे पहिले कर्तव्य होय व यासाठीच बादशहास लोकानी व कॉंग्रेसने अनेक वेळा विनंति केलेली होती. ही विनंति आता बादशहानी मान्य केली आणि स्वराज्याचे स्पष्ट अभिवचन दिले इतकेच नव्हे तर सर्व राजकीय कैद्यास माफीहि देण्यास फर्माविले. आता या यांच्या जाहिरनाम्यातील शब्दाबद्दल तक्रार करणे नुसत्या फाजीलपणाचे लक्षण होय. कदाचित् असेहि घडेल की हिंदुस्थानसरकार काही बाबतीत बादशहांच्या जाहिरनाम्याप्रमाणे माफी देण्यास तयार होणार नाही. कारण राणीच्या जाहिरनाम्याला अशक्य सनद म्हणणारे व्हाइसरॉयसाहेब अद्याप जिवंत आहेत. पण असे घडले तरी जाहिरनाम्याची किंमत त्यामुळे कमी होत नाही. जाहिरनाम्याच्याच जोरावर आम्ही सरकारशी पुनः भांडू. पण असले प्रसंग पुढे उपस्थित होतील अशा मनच्याच कल्पना करून आज आम्हास प्राप्त झालेल्या आश्वासनाची किंमत कमी करणे हे अत्यंत गैरमुत्सद्दीपणाचे अविचाराचे आणि अप्रामाणिकपणाचे लक्षण होय."

### टिळकांविषयी प्रामाण्यबुद्धि

टिळक अमृतसरला पोहोचले तेव्हा तेथेहि त्यांची फारच मोठी मिरवणूक निघाली. अमृतसर येथे आधीच थंडी फार. त्यातून यापूर्वी दोन दिवस पाऊस पडल्याने थंडीचा जोर फारच झाला होता. तरीहि लोकानी या थंडीकडे न पाहता टिळकांची मिरवणूक अध्यक्षांची मिरवणूक वगैरे सर्व गोष्टी उत्साहाने पार पाडल्या. काही नेमस्त पुढाऱ्यानी आपण राष्ट्रीय सभेला हजर राहत नाही असे आगाऊ कळविले होते. तथापि ना. शास्त्री देवधर शर्मा वगैरे त्यांची मंडळी हजर होती. शिवाय गांधी व त्यांची मंडळी बेझंटबाई व त्यांची मंडळी जिना हसन इमाम अजमलखान महमदाबादचे राजेसाहेब वगैरे मुसलमान पुढारी सर दिनशा पेटीट दास चक्रवर्ति विजयराघवाचार्य बमनजी वगैरे अनेक पुढारी हजर होते. लष्करी कायद्यान्वये शिक्षा झालेल्या लोकांपैकी डॉ. किश्वलू सत्यपाल हर-

किसनलाल दुनीचंद राम भुजदत्त आधीच सुटून आल्यामुळे ते सभेला आले होते व त्याना पाहताच सर्व सभेने त्यांचे अतिशय आनंदाने स्वागत केले.

स्वागत मंडळाचे अध्यक्ष स्वामी श्रद्धानंद हे असून त्यानी आपल्या भाषणातील पहिलेच वाक्य उच्चारले ते चिरस्मरणीय होईल. ते म्हणाले "या महासभेच्या शृंगारलेल्या प्लॅटफॉर्मवर उभा राहून एक संन्यासी प्रतिनिधींचे स्वागत करीत आहे हा या सभेच्या इतिहासातील पहिलाच प्रसंग होय." आणखी पुढे ते असे म्हणाले, "'राजकीय चळवळीत संन्याशाने भाग घेणे योग्य आहे काय?' असा प्रश्न मला कित्येकानी विचारला. त्याला माझे सरळ उत्तर असे आहे की, ज्या दिवशी या संन्यासाश्रमाचा मी स्वीकार केला त्या दिवशी सर्व जग हा माझ्या कुटुंबाचा परिवार आहे अशी भावना मी धारण केली. आणि जगातील वस्तु-मात्राकडे मी समदृष्टीने पाहू लागलो. म्हणून लोकलज्जा सोडून लोककल्याणात दत्त-चित्त होण्याचे व्रत मी धारण केले. या पवित्र वेदीवर उभे राहण्याचे माझे दुसरे कारण असे की, ज्या नररत्नानी भारत मातेचा माथा उज्ज्वल राखण्याकरिता फांशीची जन्मठेपीची अशाहि शिक्षा सोसल्या त्यांच्या धर्मपत्न्यानी, आपल्या पतीचे आत्म काँग्रेसचा हा महोत्सव बंद न पडेल तरच शांत होतील अशी इच्छा प्रगट करून मजसारख्या भिक्षूजवळ या कार्याची उलट भिक्षा मागितली तेव्हा मला त्यांच्या आज्ञेला मस्तक नमविणे प्राप्त झाले. 'कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतङ् समाः' अशी वेदाची आज्ञा असल्यामुळे संन्यासाश्रम घेतला तरी केवळ कर्तव्य म्हणून मी हे काम पत्करले. निर्भयपणे व निश्च-याने सत्यरक्षणाची वेळ आता आली आहे. सत्यपालन हेच अशा कठीण प्रसंगी संन्यासी सांप्रदायाचे कर्तव्य होय. सर्व जगाची सेवा करण्याचा विडा ह्या संन्या-साश्रमाने उचलला आहे. श्रद्धेमध्ये माझा सर्व आनंद साठविला असून भारत-मातेच्या संतानाबरोबर माझेहि भवितव्य उज्ज्वल होईल असे मनोदेवता मला सांगत आहे!"

सुधारणा बिलाला उद्देशून स्वामीजी म्हणाले "कोणाच्याहि प्रयत्नाने का होईना—नरमपक्षाच्या शहाणपणामुळे किंवा गरमपक्षाच्या जोरामुळे—या सुधारणा आज आम्हाला मिळाल्या आहेत. नरम व गरम ही दोनहि दळे त्यांचा स्वीकार करण्यास आज तयार आहेत. असे असता क्षुल्लक मतभेद उकरून काढून दोघा-नीहि आपापल्या ठिकाणी अडून बसून राहणे योग्य नाही. सुधारणेच्या योजनेचा स्वीकार करण्याच्या बाबतीत एकमत झाल्यावर आता झगडा तो काय राहिला?" नंतर सुधारणांचा त्याग करावा असे म्हणण्याचा ध्वनी जो थोडासा कोठून उमटत होता त्याला उद्देशून स्वामी म्हणाले "जर हिंदुस्थानातील सर्व जनता एकमत होऊन आज मिळालेल्या अधिकारांची उपेक्षा करण्यास तयार असेल तरच या योजनेचा आपण स्वीकार करणार नाही असे म्हणण्यात काही तरी अर्थ राहिला असता. परंतु यावेळी तर ही गोष्ट असंभवनीय आहे. झगडा मागेच संपला

आहे. कारण प्रत्यक्ष लो० टिळक महाराजानी आपल्याला जे मिळाले आहे ते स्वीकारा व बाकीच्या हक्काबद्दल सनदशीर चळवळ जोराने चालू ठेवा अशी या बाबतीत सीमा घालून दिली आहे. हिंदुस्थानात राष्ट्रीय भावनांचा प्रसार करणाऱ्या आदिपुरुषात टिळक महाराजांची गणना प्रमुख स्थानी केली जाते. असा कोण भारतसुपुत्र आहे की ज्याने आपल्या मातृभूमीच्या अब्रूच्या संरक्षणाकरिता बहादूर टिळकांपेक्षाहि अधिक कष्ट सहन केले आहेत? मातृसेवक सेनेतील सैनिक आपल्या बुद्ध्या सेनापतीने घालून दिलेल्या अनुशासनाला मान देऊन त्यांच्यापुढे शिर नमविण्याला तयार नाहीत काय?"

## सभेतील उत्साह व वाद

यानंतर अध्यक्ष मोतिलाल नेहरू यांचे सुधारणांच्या त्यागाविरुद्ध असे भाषण झाले. त्यानी प्रथम बादशाही जाहीरनाम्याचा उल्लेख 'दुःखांधःकारातील एक सूर्य किरण' या शब्दानी करून पंजाबातील चळवळ अत्याचार व सत्याग्रह' यांचे समालोचन केले. जुलुमाचा निष्कर्ष म्हणून त्यानी एका वाक्यात असे गणित सांगितले की एकशे आठ इसमाना फांशीची शिक्षा सांगण्यात आली आणि सर्व कैद्यांच्या शिक्षेच्या वर्षांची बेरीज केली तर ती सात हजार तीनशे एकाहत्तर वर्षांहून अधिक भरेल! नंतर सुधारणांच्या कायद्याला उद्देशून ते म्हणाले "कॉंग्रेसच्या मागणीप्रमाणे हा कायदा झालेला नाही. तथापि या कायद्याने जे दिले आहे त्याबद्दल तुच्छता दाखविणे योग्य नाही. या कायद्याने काही सत्ता आम्हास दिली आहे हे आम्ही कबूल केले पाहिजे. शिवाय देशसेवेचे नवीन मार्गहि खुले झाले आहेत. आम्हास मिळाले आहे त्याचा उपयोग करून घेणे हे आमचे कर्तव्य आहे. आम्हाला जे हक्क मिळाले पाहिजेत त्याबद्दल चळवळहि सुरू ठेवली पाहिजे."

सभेचा दुसरा दिवस म्हणजे रविवार ता. २७।२८ या सर्व दिवसभर विषयनियामक मंडळाचे काम सुरू होते. कारण त्यांत वादाच्या गोष्टी बऱ्याच होत्या. या वादाच्या वेळीं प्रतिनिधींची मनःस्थिति उल्लसित अशी होती व दिवसेदिवस नवीन नवीन उत्साह येण्यासारख्या गोष्टी घडत होत्या. कॉंग्रेस सुरू असताच अलीबंधूंना सोडल्याची तार आली. टिळक व बिपिन पाल यांच्यावरील पंजाबात शिरण्याची बंदी उठली नव्हती. तथापि 'मी राष्ट्रीय सभेला जात आहे' असे त्यानी पंजाबसरकारला कळवून ठेवले होते. यामुळे त्यानी व दिल्ली कमिशनरनी त्यांची मनाई दूर केली होती. तिसरे दिवशी गांधी हे सरकारी अत्याचाराचा निषेध करीत असता दिवाण मंगळसेन व लाला दुनिचंद हे तुरुंगातून सुटून सभेत येऊन दाखल झाले. व रुचिराम सहानी हे जनरल डायर संबंधाने सहावा ठराव मांडीत असता अलीबंधू सभेत येऊन दाखल झाले. त्यावेळी सभेचे काम काही वेळ थांबून तुरुंगातून सुटून आलेल्या या पांचसहा लोकांचे अभि-

नंदन ज्याने त्याने उठून करण्यात काही वेळ गेला. तसेच जालियनवाला बागे-संबंधाने नाव निघताच सगळा समाज उठून उभा राहिला व बागेतील कत्तलीचे स्मारक करावे म्हणून पंडित मदनमोहन यानी ठराव आणला तेव्हा पांच मिनिटात एक लाख रुपयांचे आकडे पडले. तिसरे दिवशी राष्ट्रीय सभेत बादशहांचा जाहीरनामा व युवराजाचे स्वागत याना अनुकूल असे ठराव करण्यात आले. अशा स्थितीतहि मतभेद थोडासा होताच. पण तो केवळ सुधारणांच्या ठरावा-संबंधाने होता. डायर–ओड्वायर यांच्यासंबंधाने जे ठराव व भाषणे झाली त्यात कोणाचाच विरोध नव्हता. लॉर्ड चेल्म्सफोर्ड याना कामावरून दूर करून परत बोलवावे या ठरावाला शर्मा यानी एकट्यानी विरोध केला. पण खरा मतभेद 'सुधारणांच्या कायद्याला असमाधानकारक व निराशाजनक म्हणावे की नाही? त्यांचा उपयोग करून घेण्यासंबंधाने काय शब्दयोजना करावी? आणि मॉंटेग्यू-साहेबांचे आभार मानावे की नाही?' यापुरताच होता. स्वामी श्रद्धानंद यानी जी दोन दळे किंवा सैन्ये म्हटली त्यांत एका बाजूला नेहरू गांधी मदनमोहन बेझंटबाई शास्त्री वगैरे लोक होते. आणि दुसऱ्यात टिळक दास पाल वगैरे लोक होते. एका पक्षाचे म्हणणे सुधारणांच्या कायद्याला दूषणास्पद असे शब्द लावू नयेत. दुसऱ्याचे म्हणणे ते शब्द जरूर घालावेत. विशेषणांचा वाद होता. याहिपेक्षा कमी वाद पुढे कसे वागावे याबद्दल होता. व सर्वात कमी वाद मॉंटेग्यू साहेबांच्या आभारप्रदर्शनाबद्दल झाला. केव्हा एका बाजूचा खल गांधीच्या बिऱ्हाडी दुसऱ्या बाजूचा खल टिळकांच्या बिऱ्हाडी व केव्हा दोन्ही पक्षाचे पुढारी एकत्र बसून खल होई. टिळकांचे म्हणणे, पूर्वीच्या राष्ट्रीय सभानी हे शब्द योजलेच आहेत तेव्हा ते आपणहि योजावेत. उलट पक्षाचे म्हणणे ते शब्द ठेवल्याने सुधारणांचा उपयोग करण्याविषयी जो ठराव आपण करीत आहो त्याचा तेजोभंग होतो. गांधीना वाटले की 'निराशा' शब्द घातल्याने पुढे सुधारणा टाकून देऊन तुम्ही संन्यस्तवृत्ति पत्करणार असे ध्वनित होते. याच्या उलट टिळक म्हणत की मी बोलून चालून कर्मयोगी आहे. निराशेने माझ्या कर्मयोगाला उलट जोर चढतो. तुम्हा आम्हा दोघानाहि सुधारणांचा उपयोग करून घेणे ही गोष्ट मान्य आहे ती ठेवू. आणि याच योजनेसंबंधाने पूर्वीच्या राष्ट्रीय सभेने दिलेली विशेषणेहि कायम ठेवू. या वादात गांधीपेक्षाहि बेझंट-बाईनी नेमस्तांच्या ऋणानुबंधाकरिता अधिक हट्ट धरिला. पण वास्तविक त्यानीच पूर्वी या शब्दाना अनुमति दिली होती. आम्हा लोकांच्या संवयीप्रमाणे हा वाद पक्के दोन दिवस सुरू होता. आणि तो न तुटता मते मोजून निकाल करण्याची वेळ येणार असेहि दिसू लागले. पण शेवटी सुदैवाने तडजोड निघून टिळकांच्या म्हणण्याप्रमाणे सुधारणांचे गौणत्व दर्शविणारी विशेषणे ठरावात आली. टिळक व गांधी यांच्या म्हणण्याप्रमाणे सुधारणांचा पुढे उपयोग करून घ्यावा हा भाग आला. आणि बेझंटबाईच्या म्हणण्याप्रमाणे मॉंटेग्यू साहेबांचे आभार मानण्याचाहि

भाग आला. आणि अशा रीतीने एकीचा बिघाड न होता अमृतसरहून सर्व मंडळी परत गेली. अमृतसर सोडण्यापूर्वी एक दिवस डॉ. किश्लू यांच्या अध्यक्षतेखाली स्वराज्य-संघ-शाखेने भरविलेल्या सभेत टिळकांचे भाषण झाले. त्यात टिळक म्हणाले "मी जो ठरावात शब्द घालण्याचा आग्रह धरला त्याचे कारण असंतुष्टाः द्विजा नष्टाः, हे सूत्रवाक्य आहे. संतोष व समाधान झाले की उद्योग थांबतो."

पुढील आठवड्यात शिष्टमंडळाचे इतर लोक म्हणजे पटेल खापर्डे वगैरे लोक परत आले. त्यानी आपल्या भाषणात बेझंटबाईवर विशेष टीका केली. नंतर ता. १३ रोजी पुण्यास जाहीर सभा भरली. या सभेत केळकरानी व्याख्यानात अमृतसरची सर्व हकीकत सांगितली. शेवटी अध्यक्ष या नात्याने बोलताना टिळकानी सांगितले की "बेझंटबाईनी आपले धोरण वरचेवर बदलले आहे. पण त्यांचे म्हणणे बहुमताला पटत नसेल तर त्यानी रागावून काय उपयोग ?" दिवाणगिरी पत्करण्यासंबंधाने टिळक म्हणाले "सरकार शहाणे असेल तर पुढे जे दिवाण नेमावयाचे ते स्तुतिपाठक न नेमता योग्य दिसेल ते स्पष्टपणे बोलणारे नेमील व या दिवाणानाहि लोकांचे व सरकारचे आराधन करण्याचे बिकट काम यापुढे करावे लागेल."

ता. १ फेब्रुवारी रोजी पुण्यास स्वराज्यसंघाच्या कार्यकारीमंडळाची सभा झाली. तीत नवीन सुधारणांच्या दृष्टीने संघाचे किंबहुना राष्ट्रीय पक्षाचे धोरण काय असावे यासंबंधी बरीच वाटाघाट होऊन काही तरी निश्चित योजना शक्य तितक्या लौकर प्रसिद्ध करावी असे ठरले. टिळक पुण्यास आल्यावर ते विश्रांतिकरिता काही दिवस गावाबाहेर घर घेऊन राहिले होते. या अवधीत पुण्यातील एका वादात त्याना सहजासहजी पडावे लागले. पुणे म्युनिसिपालिटीत सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न निघाला तेव्हा नेमस्तपक्षाने असा आग्रह धरिला की मुलगे व मुली यांच्याकरिता अशा शिक्षणाची योजना एकदमच करावी. उलट राष्ट्रीयपक्षाचे म्हणणे असे की ही योजना फार खर्चाची होणार म्हणून प्रथम मुलग्यांपुरतीच ही योजना करावी आणि नंतर काही दिवसानी मुलींच्याकरिताहि करावी. हा वाद म्युनिसिपालिटीबाहेरहि सुरू झाला. नेमस्तपक्षाने असा बहाणा चालविला की राष्ट्रीयपक्ष हा स्त्रीशिक्षणविरोधी आहे. म्हणून त्यानी ब्राह्मणेतरपक्षाची मदत घेऊन शहरातील सेवासदन वगैरे संस्थांचे साहाय्य घेऊन बरीच चळवळ केली. गावात दोन्ही वर्गांचे शिक्षण एकदम करावे अशी चळवळ करण्याकरिता स्त्रियानी एक मोठी मिरवणूक काढली व किर्लोस्कर थिएटरमध्ये सभा झाली त्यात उभयपक्ष हजर असल्याने बराच कडाक्याचा वाद झाला. राष्ट्रीय पक्षाने या सभेस टिळकानाहि आणले. यामुळे त्या संधीचा फायदा घेऊन पूर्वी मानपत्राच्या वेळी टिळकाना विरोध करण्याची जी शिल्लक बाकी उरली होती ती नेमस्तानी व ब्राह्मणेतर पक्षाने यावेळी वसूल करण्याचा प्रयत्न केला. त्यात दंगलीशिवाय दुसरे काही निष्पन्न झाले नाही.

## ( ११ ) सांगलीचे ज्योतिष संमेलन

ता. १४ फेब्रुवारी रोजी टिळक सांगली येथे भरणाऱ्या तिसऱ्या ज्योतिष संमेलनाकरिता पुण्याहून निघाले. बरोबर संमेलनाचे नियोजित अध्यक्ष श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे होते. वाटेत मिरज स्टेशनावर नागरिकानी त्यांचे स्वागत केले मिरवणूक काढली व काही वेळ मिरज शहरात नेऊन लगेच सांगलीस पोच-विले. या लहानशा मुक्कामात मिरजेस त्यानी स्वराज्य या विषयावर व्याख्यान दिले. ता. १५ रोजी रात्री संमेलनाच्या मंडपात श्रीशंकराचार्य ( डॉ. कूर्तकोटी ) यांच्या अध्यक्षतेखाली टिळकांचे व्याख्यान झाले.

या ज्योतिष संमेलनाची थोडक्यात हकीकत अशी आहे की पंचांग शोध-नाचे उरलेले काम पुरे करावे हा संमेलनाचा हेतु होता. बाहेर गावाहून सुमारे सत्तर पंचाहत्तर ज्योतिषी व धर्मशास्त्री हजर होते. ज्योतिष विषय हा कळण्याला कठिण तथापि टिळक त्यात भाग घेणार हे ऐकून संमेलनाला प्रेक्षक लोकांची गर्दी झाली होती. स्वागताध्यक्ष केशवराव छापखाने वकील यांचे भाषण झाल्या-वर अध्यक्ष कोल्हटकर यानी ज्योतिष विषयासंबंधाने पूर्ण माहितीने भरलेले व त्यातल्या त्यात विनोदी असे भाषण केले. भारतीय ज्योतिषाची वाढ कसकशी होत गेली ते सांगून नाक्षत्र वर्ष हे भारतीय पंचांग पद्धतीचे एक महत्त्वाचे अंग कसे होऊन बसले याचे त्यानी विवरण केले. नाक्षत्रपद्धति आणि सांपातिकपद्धति यांचा विरोध दिवसेदिवस अधिकाधिक स्पष्ट कसा होत जाणार याचे विनोदी भाषेने चटकदार वर्णन केले. पूर्वीचे सिद्धांत ग्रंथकार केवळ शब्दप्रामाण्य मानणारे नसून वेधप्रामाण्य मानणारे होते. त्यानी वेदांग ज्योतिषपद्धति वेधाशी जुळेनाशी झाल्याबरोबर ती सोडून दिली पण आपण मात्र अजून दृक्प्रत्ययाला मान देत नाही. म्हणून पंचांगात सुधारणा कसकशी होत आली हे सूर्यसिद्धांतापर्यंत व नंतर भास्कराचार्यापर्यंत आणून त्यानी सांगितले. व शेवटी विनंति केली की शास्त्रीय अयनांश शुद्ध अयनगति व नाक्षत्रवर्षमान व सूक्ष्मग्रहगति अशा मार्गाने गेल्या-शिवाय पक्षभेद नाहीसे होऊन प्रगति होणार नाही. ता. १६ सोमवार रोजी सर्व दिवसभर खल होऊन संध्याकाळी विषयमंडळात ठरलेले काही ठराव मंजूर झाले. तिसरे दिवशी सायनवादी लोकाकडून काही उपसूचना वगैरे आल्या. त्याहि दिवशी विषयमंडळाचे काम चालले होते. शेवटी उरलेले ठराव मंजूर होऊन त्याप्रमाणे नवीन करणग्रंथ करवून घ्यावा असे ठरले. शेवटी संमेलनाने शंकरा-चार्यांच्या हस्ते टिळकाना मानपत्र दिले. संमेलनात ठराव झाले ते असेः—( १ ) वर्षमान घ्यावयाचे ते सूर्यसिद्धांताप्रमाणे नाक्षत्र घ्यावे पण बीजसंस्कार करून घ्यावे (२) प्रत्यक्ष वेधाने येईल ते अयनगतीचे मान समजावे (३) जुन्या सिद्धांत-ग्रंथात सांगितल्याप्रमाणे निरशर रेवती योगतारा हेच राशिचक्राचे आरंभस्थान मानावे ( ४ ) नवीन करणग्रंथात या आरंभापासून वेधाने येतील ते अयनांश

स्वीकारावेत. हे ठराव बहुमतानेच मान्य झाले. त्याना काही ज्योतिषांचा विरोध होता. पण मुंबई पुणे व सांगली या तीन ठिकाणी ज्योतिषसंमेलने भरवून ज्योतिषी लोकाना पंचांग शोधनाचे काम पटवून करणग्रंथ तयार करण्यापर्यंत टिळकानी हे कार्य येथपर्यंत आणिले. करणग्रंथ अद्यापि व्हावयाचा होता. तथापि इतर साधनांवरून तयार केलेले नवीन पंचांग सुरू करण्याची खटपट आधीच झाली होती. आणि विलायतेस जाण्यापूर्वी टिळकानी जी अनेक कार्यें केली त्यांतच शुद्धपंचांग सुरू करावे व लोकानी ते मानावे असा आपल्या सहीचा लेखी संदेश त्यानी लिहून ठेऊन दिला होता !

या संमेलनात टिळकानी अखेरचे भाषण केले ते थोडक्यात खाली दिले आहे. "शुद्ध पंचांगविषयक चळवळ सुरू होऊन जवळजवळ ५० वर्षे झाली. ज्या वेळी ही चळवळ सुरू झाली, त्या वेळची परिस्थिति व समाजाची मनोवृत्ति फार निराळी होती. त्या वेळी ग्रहलाघवावरून करण्यात येणाऱ्या पंचांगात फरक पडतो, असे म्हणणे देखील समाजाला सहन होत नव्हते. असे म्हणणारावर सर्वांचा भयंकर रोष होत असे. येवढेंच नव्हे, तर कित्येक वेळा शुद्ध पंचांगाची चळवळ करणाराशी समाजातील लोक संबंध ठेवण्याचेही टाळीत. ४० वर्षांपूर्वी, पंचांग सुधारण्याचा प्रयत्न म्हणजे धर्माशी व शास्त्राशी विरोध करण्याची चळवळ अशा प्रकारची समजूत झाली होती. त्या वेळी ज्योतिषीच नव्हे तर सामान्य जनसमूहही पंचांगशोधनाच्या विरुद्ध होता. ती स्थिति आता पालटली असून सर्वांना शुद्ध पंचागाची आवश्यकता जाणवूं लागली आहे. आणि त्याच गोष्टीचा विचार करण्याकरिता आपण सर्वजण येथे जमलो आहो. या कार्याकरिता शके १८२६ साली मुंबईस सबंध हिंदुस्थानातील ज्योतिषाचे संमेलन भरले होते. त्यात सर्व ठिकाणचे प्रमुख ज्योतिषी व धर्मशास्त्री हजर असून श्रीशंकराचार्य अध्यक्ष होते. संमेलन सुमारे १०।११ दिवस चालले होते. ७–८ दिवस झाले तरी संमेलनात एकवाक्यता होण्याचा रंग दिसेना. मग पुढे प्रत्येक पक्षाच्या प्रमुख पुढाऱ्याशी वाटाघाट करून निर्णय करावा लागला. त्याकरिताच निव्वळ तीन दिवस गेले. परंतु समाधानाची गोष्ट ही की, अखेरीस सर्वानुमते ठराव करण्यात आले. आणि अयनांश २२ व २३ यांच्या दरम्यान धरावे असा ठराव पास झाला.

"मुंबईच्या संमेलनानंतर पुणे येथे ज्योतिषसंमेलन भरले त्यातहि मुंबईच्या संमेलनाच्या ठरावाशी शक्य तितकी एकवाक्यता रहावी अशाच प्रकारचे ठराव झाले. पुण्याचे संमेलन झाल्यापासून हा प्रश्न एकसारखा लोकापुढे आहे. आमचा कोणत्याही प्रकारचा हट्ट नाही परंतु आमची इच्छा मात्र अशी आहे की पंचांगातील दुही कायमची नाहीशी व्हावी व सर्व महाराष्ट्रातच नव्हे तर सर्व हिंदुस्थानात एकमुखी पंचांग प्रचारात यावे. ही गोष्ट आपल्या हातातील आहे. आपण सर्वजण जर हट्ट आणि दुराग्रह सोडून देऊन एकमुखी शुद्ध पंचांग प्रचारात आणण्याचा प्रयत्न कराल तर त्यापासून ज्योतिषशास्त्राच्या उत्कर्षाला साहाय्य

केल्याचे श्रेय आपणास मिळेल आणि ज्योतिषशास्त्राच्या प्रगतीचा मार्ग मोकळा होईल.

"भारतीय ज्योतिषग्रंथकाराबद्दल आदर व अभिमान बाळगणे हे आपणा सर्वांचे आद्य कर्तव्य आहे. असा अभिमान बाळगल्याबद्दल मला केव्हाही आनंदच वाटेल. परंतु त्या अभिमानात दुराग्रहास थारा देता कामा नये. अभिमान आणि दुराग्रह यांच्या झगड्यात अभिमान एका बाजूस राहून दुराग्रहच बळावतो आणि मग मनुष्य दुराग्रहाचेच समर्थन करू लागतो. तेव्हा असला दुराग्रह धरू नका. नवीन उपलब्ध झालेल्या माहितीचा उपयोग करून घ्या, आणि आपणापुढे असलेल्या प्रश्नाचा विचारपूर्वक निर्णय करा. आज आपणापुढे आलेला प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. आरंभस्थान आणि अयनांश असे दोन प्रश्न नसून खरोखरी तो एकच प्रश्न आहे. आरंभस्थानाचा निर्णय झाला, म्हणजे अयनांश आपोआपच ठरतात. निरयन पंचांगाला स्थिर आरंभस्थान धरणे अत्यंत जरूर आहे. आरंभस्थान केव्हाहि स्थिरच पाहिजे. शके ४०० व ५०० च्या दरम्यान रेवती योगतारा आरंभस्थानी धरण्यात आला. त्यानंतर आजपर्यंत तोच कायम आहे. राशी मागाहून आल्या. वेदांग ज्योतिष्यात राशि नाहीत. आरंभस्थान रेवतीबिंदूपासूनच धरले आहे. रेवतीपासून संपातापर्यंतचे अंतर म्हणजेच अयनांश. हे अयनांश म्हणजे संमेलनाच्या प्रगतीची पायरी आहे. मुंबईचे संमेलनात २२ व २३ च्या दरम्यान अयनांश धरावे असा ठराव झाला. त्यानंतर पुण्यास सर्वानुमते अयनांश मुक्रर करून आणखी एक पायरी आम्ही पुढे गेलो. आज त्याच्यापुढे जाण्याचा विचार चालू आहे. कोणत्याहि गोष्टीचे असे आहे की, चूक लोकांच्या ध्यानात आली पाहिजे. लोकांना चूक पटली म्हणजे आपोआपच ते सुधारणा करण्यास कबूल होतात एरव्ही कबूल करीत नाहीत. आता सर्वांना जुन्या पंचांगात फरक पडतो ही गोष्ट पटली आहे. आणि म्हणूनच सर्व लोक शुद्ध पंचांग वापरण्यास अनुकूल झाले आहेत. ही संधि आपण गमावता कामा नये. नाही तर याचा दोष सर्वस्वी तुमच्यावर येईल.

"अयनांशाबद्दलच बोलावयाचे असेल तर अयनांशाची पीछेहाट व ज्योतिषशास्त्राची–शुद्ध पंचांगांची–वाढ असा हा आजपर्यंतच्या प्रयत्नांचा अन्योन्य संबंध आहे. अशाच क्रमाने आपणास आरंभस्थानापासून येणाऱ्या अयनांशापर्यंत जावयाचे आहे. आणि तेथपर्यंत आम्ही जाणार. आज आपण जी व्यवस्था कराल ती कायमची करा, म्हणजे त्याबद्दल पुनः पुनः वादविवादाचे कारण रहाणार नाही.

"कोणत्याही गोष्टीचा निर्णय करताना आणि कार्य करताना आग्रह सुटावा लागतो. दुराग्रह उपयोगी नाही. ज्याचा दुराग्रह सुटत नाही त्याच्या हातून कोणतेच कार्य घडणे शक्य नाही. सर्वांना बरोबर घेऊन समजूत घालून, खरी परिस्थिति लक्षात आणून देऊन सर्वानुमतेच कोणतेहि काम केले पाहिजे. या गोष्टी लक्षात ठेवूनच मुंबई-पुण्याच्या संमेलनातील ठराव केले आहेत.

" आपणास असे वाटत असेल की, शुद्ध–पंचांग प्रचारात आणले म्हणजे हा प्रश्न मिटला. परंतु खरोखरी तसे नाही. माझी इच्छा अशी आहे की, आपले हिंदी पंचांग इंग्रजी नॉटिकलप्रमाणे नौका–गमनालाही उपयोगी पडावे, येथपर्यंत त्याची प्रगति झाली पाहिजे; आणि हाप्रसंग लवकरच येणार याबद्दल शंका नाही. हिंदुस्थानातहि वेधशाळा होतील. युरोपियन देशाप्रमाणेच हिंदी वेधशाळेची उच्च प्रगति घडणे शक्य आहे. आपण आपल्या ज्योतिषशास्त्राची प्रगति इतकी केली पाहिजे की वेधशाळा स्थापून त्या वेधशाळेमार्फत सूक्ष्म पंचांग निघाले पाहिजे. हिंदी वेधशाळेतून निघणारे पंचांगच सर्वत्र वापरले जाईल, यात केव्हाहि शंका नाही. परंतु आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, हा प्रश्न नुसत्या शुद्ध-पंचांगप्रवर्तनाने संपत नाही. तर त्याची शेवटची पायरी वेधज्ञान वेधशाळा हिंदी वेधवेत्ते व त्या वेधशाळेमार्फत निघणारे सूक्ष्म आणि शुद्ध पंचांग अशी ही चतुःसूत्री आहे. येथपर्यंत प्रगति झाल्याखेरीज हा प्रश्न मिटला असे कधीहि समजू नका.

"दोष सर्वांत आहेत. दोष दाखविणे आणि ते सुधारणे याचेच नाव प्रगति आणि अशीच प्रगति पंचांगसंशोधनाच्या बाबतीत सध्या करण्यात येत आहे हे आपण लक्षात ठेवा. वेळ अशी आली आहे की, पंचांगशुद्धीचे कार्य अवघ्या ४।५ वर्षांत पूर्णत्वास पोंचेल. करणग्रंथ लवकरच तयार होईल; आणि करण-ग्रंथासंबंधी ज्योतिषी लोकाना भासत असलेली व सर्वांनी कळविलेली अडचण व गैरसोय नाहीशी होईल. सत्य पक्षाकडे आपण जात आहो. अखेर सत्याचाच विजय होईल यात तिलप्राय शंका नाही.

"वेधशाळेबद्दल मी पूर्वी प्रयत्न केला होता. रा. ब. केरूनाना छत्रे यांच्या स्मारकाप्रीत्यर्थ येथे वेधशाळा करावी असा माझा उद्देश होता. त्या बाबतीत मी एका प्रमुख साहेबास भेटलो असता त्याने असे सांगितले की येथेच वेधशाळा कशाला ? ग्रीनवीचला आहेच. त्या वेळची परिस्थिति प्रतिकूल असल्याने तो प्रश्न तितकाच राहिला. तथापि आता फिरून या गोष्टी तडीस नेण्याकरिता आपण प्रयत्न केला पाहिजे.

"शुद्ध गणिताचा स्वीकार केल्यास धर्मशास्त्राशी विरोध येईल असे कित्येकाना वाटते. परंतु तसे होण्याचे बिलकूल कारण नाही. धर्मशास्त्री लोकानी सर्वानुमते निर्णय करून दिल्यास व त्या गोष्टीस श्रीजगद्गुरूंची संमति मिळविल्यास हा प्रश्न सुटणे अशक्य नाही. आणि अशाच प्रकारे तो सोडविला पाहिजे. वेदामध्ये ही तडजोड आहे. आपण तडजोड करण्यास नाकबूल होणे म्हणजे वेदांचा उपमर्द करण्यासारखे आहे. ' यथा शिखा मयूराणां नागानाम् मणयो यथा । तद्वद्वेदांगशास्त्राणां ज्योतिषं मूर्धनि स्थितम् ॥ वेदा हि यज्ञार्थमभिप्रवृत्ताः कालानुपूर्वा विहिताश्च यज्ञाः । तस्मादिदं कालविधानशास्त्रं यो ज्योतिषं

वेद स वेद यज्ञान् ।' असे प्रत्यक्ष वेदांगज्योतिषातच सांगितलेले आहे त्याचा विचार करा.

"ज्योतिषानी एकी केली व दुसरी पंचांगे काढलीच नाहीत म्हणजे सर्वत्र शुद्ध पंचांग अमलात येण्यास क्षणाचाही उशीर लागणार नाही. सर्व समाजाचा विश्वास व भरंवसा तुमच्यावर आहे. तरी त्याना योग्य मार्ग दाखवा व आपणापुढे असलेल्या प्रश्नाचा योग्य निकाल लावून संमेलनाचे कार्य यशस्वी करा."

टिळकांच्या भाषणाचे वेळी एक अकल्पित प्रकार झाला त्याचे वर्णन संमेलनाचे अध्यक्ष श्री. कृ. कोल्हटकर यानी खालीलप्रमाणे दिले आहेः—

"भाषण चालू असताच जो एक विलक्षण प्रकार घडला त्यामुळे लोकमान्यांचे स्वभाववैशिष्ट्य विशेष उठावाने दिसून आले. तो प्रकार असा. श्रोत्यांच्या रांगापैकी मागील काही रांगा एकदम उठल्या व काही गडबड न करता ओट्याकडे धूम पळत सुटल्या. त्यांच्या पावलामुळे जी धूळ उडाली ती धुरासारखी दिसू लागली. लागलीच 'मंडपात आग' अशी ओरड सुरू झाली. पण ती पुढे निराधार ठरली. श्रोत्यांचे पळणे चालू होतेच. त्यांचे पाहून पुढील रांगातील श्रोतेहि ओट्याकडे पळत सुटले. मी ओट्यावर बसलो होतो. श्रोत्यांच्या विलक्षण कृत्याचा उमज आम्हापैकी एकासहि पटेना. हे हजारो लोक ओट्यावर डोकी आपटून कपाळमोक्ष करून घेणार की काय? बरे असा कपाळमोक्ष करून घेण्याचे कारण तरी काय? यांजवर कोणी हिंस्र पशू तर सोडले नाहीत? मागाहून कोणी गोळीबार केला म्हणावे तर चोहोकडे सामसूम आहे. अशा विचाराचे काहूर प्रत्येकाच्या चित्तात उठले. पटागणांतील श्रोते पळत पळत ओट्याजवळ आले तेव्हा ओट्यावरील मंडळीही उठली व चोहोकडे एकच गोंधळ सुरू झाला. श्री. छापखाने यानी स्थिरस्थावर करण्याचा बराच प्रयत्न केला पण त्यास बराच वेळ पावेतो यश आले नाही. श्रोत्यापैकी बरेचजण घरोघर निघून गेले. बाकीच्या श्रोत्याना श्री. छापखान्यानी 'तुमचा धिःकार असो! आपले सन्मान्य पाहुणे येथे बसले असता तुम्ही पळून जाणे लाजिरवाणे आहे. आपल्या गावची अब्रू बचावावयाची असेल तर येथेच बसून रहा.' असे ओरडून परोपरीने सांगितले. अखेरीस अर्ध्या पाऊण तासाने सभेत पुन्हा शांतता झाली. या प्रकाराच्या मुळाशी गावातील विरुद्धपक्षीय मंडळी असली पाहिजे असा श्री. छापखान्यांस संशय आला होता. पण आगीच्या हुलीप्रमाणे तोही निराधार ठरला. चौकशीअंती असे बाहेर आले की एका मुसलमान श्रोत्यास आपल्या कपड्यात साप आल्याचा भास झाल्यावरून त्याने 'साप! साप!' अशी ओरड केली व तिचे पर्यवसान श्रोत्यांच्या पळापळीत झाले.

"श्रीप्रमाणे लोकमान्यही आपल्या स्थानावर बसून राहिले होते त्यानी घडलेल्या प्रकारावर जे भाषण केले ते अत्यंत समयोचित व हृदयस्पर्शी झाले. ते म्हणाले 'आजच्या माझ्या व्याख्यानाचा विषय कर्मयोग हा होता. परिणामाकडे

लक्ष न देता स्वतःचे कर्तव्य केले पाहिजे हे माझ्या उपदेशाचे सार होते. पण त्याचा श्रोत्यावर मुळीच परिणाम झालेला दिसत नाही. तुम्ही संख्येने इतके लोक असता यःकश्चित् सर्पाची हूल उठताच जीव बचावण्याकरिता वाट मिळेल तिकडे पळत सुटलात. तुम्हासारखे सामान्य लोक मोहामुळे रज्जूलाच सर्प मानितात. तो मोह घालविण्याकरिताच वेदान्ताचा अवतार आहे. वेदान्ताचे तत्त्व ज्याच्या मनावर बिंबले आहे त्याच्या ठायी इतका आत्मविश्वास उत्पन्न होतो की तो सर्पालाच रज्जूप्रमाणे पिरगाळून टाकितो. तसा आत्मविश्वास व पराक्रम तुम्हामध्ये उत्पन्न झाला पाहिजे.'

## ( १२ ) जुन्नरची जिल्हा सभा

डिसेंबर १९१८ मध्ये पुणे जिल्हा परिषद लोणावळा येथे भरली त्यानंतर ती मार्च महिन्यात जुन्नर येथे भरवावी असे ठरले होते. प्रतिनिधी व स्वागत सभेचे सभासद मिळून सुमारे पाचशे लोक जमले होते. प्रथम बागाईतकर वकील यांचे स्वागताध्यक्ष म्हणून भाषण झाल्यावर अध्यक्ष गंगाधरराव देशपांडे यानी भाषण केले. त्यात त्यानी सांगितले की "यावेळी आपणाला इष्ट स्थिति प्राप्त झाली आहे म्हणून सुधारणांचा जो उरलेला भाग आपणाला मिळालेला नाही त्याविषयी नेटाने मागणी केली पाहिजे. हिंदुस्थानात आज सुमारे पन्नास लाख लोकांना मतदारीचा हक्क मिळाला आहे त्याचा पूर्ण फायदा घेऊन योग्य ते प्रतिनिधी कौन्सिलात निवडून दिले पाहिजेत.यात जात किंवा धर्म किंवा पंथ याना महत्त्व नाही." संध्याकाळी फिरून सभेच्या कामाला सुरवात झाली व गोवधाची बंदी मुस्लिमलीगने स्वीकारल्याप्रमाणे करावी मुळशी पेट्यातील टाटा यांच्या धरणाला सरकारने संमति देऊ नये वगैरे अनेक ठराव झाले. व दुसरे दिवशी ता.४ रोजी इतर ठराव होऊन सभेचे काम संपले. ता. ३ रोजी परिषदेच्या मंडपात टिळकांचे व्याख्यान झाल्यावर जुन्नर म्युनिसिपालिटीने टिळकाना मानपत्र दिले. अशा रीतीने प्रत्यक्ष परिषद पार पडली. परंतु जुन्नरासहि नेमस्त व ब्राह्मणेतर यानी टिळकाना विरोध करण्याचा कसून प्रयत्न केला. प्रथम नेमस्तातर्फे ना. कामत यानी अशी मागणी केली की शेतकरी लोकांचे म्हणून काही प्रतिनिधी परिषदेला घ्या. याचा सरळ अर्थ असा होता की आम्ही काही दंगेखोर लोक तयार करून आणले आहेत त्याना आमच्या बरोबर बसू द्या आमच्या मतांची संख्या फुगवू द्या आणि वेळी दंगा करण्याला मदत करू द्या. पण हा भोळाभाव सिद्धीला कोण जाऊ देणार? शेतकऱ्याना प्रतिनिधी होण्याला शेतकरी म्हणून कोणी मना केले नव्हते. शिवाय मंडप भरावा तो रिकामा राहू नये अशी कोठेहि सभा भरविणाऱ्या चालकांची दृष्टि सहजच असते त्याप्रमाणे ते सन्मानार्थी म्हणजे फुकट तिकिटे देऊन जे येरव्ही प्रतिनिधी झाले नसते त्याना प्रतिनिधी करितात. असे असता या नेमस्त पुढाऱ्याला आयत्या वेळी शेतकऱ्यांची एवढी कळकळ कोठून आली? असा प्रश्न स्वाभा-

विकच होता. परिषद सोडून दिली तर एरव्ही ज्या अनेक सभा जुन्नरास टिळकांच्या मुक्कामात झाल्या त्याला कधी कोणी तिकिट ठेवले होते ? आणि त्यांची भाषणे ऐकावयाला जमणाऱ्या गर्दीत बहुधा शेतकरीच असत. असो. अशा रीतीने डाळ न शिजल्याने नेमस्त पुढाऱ्यानी मंडपाबाहेरच जमून इकडले तिकडले चाळीस पन्नास लोक घेऊन समोरच एका वडाच्या झाडाखाली सभा भरविली. आणि मोटमोठ्यानें भाषणे व गोंगाट होईल तितका केला. पण बातमीदार लिहितो "वडाखालील किंवा वडावरील कावळ्यांच्या कलकलाटानी जिल्हा सभेच्या कामात मुळीच व्यत्यय आला नाही." शेवटी मजल येथपर्यंत गेली की जमलेल्या या लोकानी ते दिवस शिमग्याचे असे पाहून शिमग्यातील सर्व प्रकार टिळकांच्या नावाने तेथे केले. वाईट इतकेच की त्यात प्रो. कानिटकर ना. कामत गोखले वकील रँग्लर परांजपे व काळे होते की नाही माही नाहीत असे लोकहि या तमाशावाईक प्रकरणात सामील होते. या लोकाना कदाचित् असे वाटले असेल की टिळकच एकटे कोण तेल्या तांबोळ्यांचे पुढारी होणार ! म्हणून हुल्लड करून हा एक अनुभव त्यानी घेऊन पाहिला असावा. तेथे काय प्रकार झाले याची वर्णने परस्पर नेमस्त पत्रातूनच आलेली आहेत. पण एकंदरीने जिल्हा परिषद उधळून देण्याचे त्यांचे प्रयत्न फुकट गेले. हजर असलेल्या काही लोकाकडून सुधारणाना दूषण देणारे शब्द ठरावातून काढून टाकावे असाहि विषय नियामक मंडळात प्रयत्न झाला पण तेथेहि काही साधले नाही. या सगळ्याच्या बुडाशी एक मर्माची गोष्ट होती ती ही की यापुढे लौकरच निवडणुकी होणार होत्या नेमस्त पुढारी उमेदवार म्हणून उभे राहणार होते आणि मतदारी उदार हस्ताने वाटण्यात आलेली असल्यामुळे आता तेली तांबोळी हेच मतदार म्हणून स्वराज्याचे धनी एकदम होऊन बसले होते तेव्हा या लोकात मिसळले तर निवडणुकीत मदत होईल हे या हुल्लडीतील सर्व बीज होते. जुन्नरास काही हस्तपत्रके वाटण्यात आली. त्यात असे लिहिले होते की सरकारने ज्या सुधारणा दिल्या आहेत त्यांचा अपमान करणे हा उपद्यापीपणा आहे म्हणजे एका अर्थी तो सरकारचाच अपमान आहे. शिवाय कोल्हापुरातील एका अमेरिकन बाईने इंग्रजी राज्यकारभाराला दिलेली सर्टिफिकिटेंहि काही त्या हस्तपत्रकात छापली होती. यावरून असे दिसते की काही सरकारी लोक काही जुन्नरच्या बाजूचे मिशनरी लोक काही नेमस्त काही ब्राह्मणेतर व काही गावगुंड अशांचा हा पंचमेळ चिवडा बनला होता. पण त्यांच्या प्रयत्नाला यश आले नाही.

बेळगाव येथील तिसरी जिल्हा परिषद बापुजी अणे यांच्या अध्यक्षतेखाली ता. ५ रोजी बेळगावास भरली. तेथेहि नेमस्तांचे व ब्राह्मणेतरांचे पुढारी यानी मिळून सुधारणानिंदक शब्द काढून टाकावे अशी उपसूचना आणली पण तिला अवघी सहा मते मिळाली. याहि परिषदेला टिळक गेले होते व तेथे संकेश्वर व हुकेरी तालुक्यातर्फे टिळकाना मानपत्रे देण्यात आली त्यावेळी प्रत्येक जातीच्या पुढाऱ्यानी

उठून संमति दर्शविली असता दोघा ब्राह्मणेतरानी मात्र त्यास विरोध केला. उत्तर देताना टिळक म्हणाले "एक दोघा गृहस्थानी विरोध केला याबद्दल मला वाईट न वाटता उलट आनंदच्च झाला. कारण हे दिवस आता सर्व वर्गांच्या लोकानी पुढे येऊन आपले मत स्पष्ट मांडण्याचे आले आहेत. मात्र लोकानी सरकाराला विरोध करताना देखील ही निस्पृह बाणेदार वृत्ति ठेवावी म्हणजे आमचे आयते कामच झाले." या प्रसंगी टिळकानी ब्राह्मण ब्राह्मणेतर या वादावर सुमारे दोन तासपर्यंत मोठे परिणामकारक भाषण केले. त्यात ते असे म्हणाले की "प्रत्येक मनुष्य कोणती तरी एखादीच चळवळ हाती घेऊन ती यशस्वी रीतीने चालवू शकतो. यामुळे मला सामाजिक चळवळीकडे लक्ष देण्याला फावतच नाही." या मुक्कामात शेवटी जैनांच्यातर्फे एक व ब्राह्मणेतरातर्फे एक अशी दोन मानपत्रे टिळकाना देण्यात आली.

अशा रीतीने टिळकाना करण्यात येणारा विरोध यशस्वी होत नव्हता हे खरे. तरी पण पुण्याच्या सभेतील एखाद्या मुलाप्रमाणे किंवा बेळगावच्या सभेतील एक दोन गृहस्थाप्रमाणे टिळकांच्या सामाजिक मतावर भरसभेत उभे राहून टीका करणारी माणसे निघू लागली होती. व याचा अर्थ हाच की काहीसे सामाजिक विचारात हळुहळु होणाऱ्या क्रांतीने आणि काहींसे नव्या मतदारीच्या मोहक दर्शनाने अशिक्षित अर्धशिक्षित अशा लोकाना व सरसकट ब्राह्मणेतर वर्गाला एक प्रकारचा नवा हुरूप आला होता यात शंका नाही. पण अशा रीतीने तुरळक होणारे हे प्रयत्न मोठ्या प्रमाणावर व संघटित स्वरूपाने करण्याची एक संधि नेमस्त पुढाऱ्याना लौकरच मिळाली व ती साधण्याचा त्यानी शक्य तितका प्रयत्न केला. ही संधि म्हणजे लौकरच सोलापूर येथे होऊ घातलेली मुंबई इलाख्यातील त्या सालची प्रांतिक परिषद. या परिषदेचे अध्यक्षस्थान केळकर याना देण्यात आले होते. टिळकहि अर्थात् हजर राहणार होते. कारण अमृतसरच्या राष्ट्रीय सभेतील वाद मुंबई इलाख्यापुरता तेथे निघणार व सर्व विरोधी वर्गाकडून संघटित प्रयत्न होणार हे आगाऊ उघड दिसून येत होते.

## ( १३ ) टिळकांचा सिंध प्रांतातील दौरा

पण या सभेला जाण्यापूर्वी टिळकाना आणखी एक लांबचा प्रवास उरकून घ्यावयाचा होता. ता. २ एप्रिल रोजी प्रांतिक परिषद भरणार होती. तिला हा मधला दौरा संपवून यावयाचे म्हणून टिळक पुण्याहून ता. १७ मार्चच्या सुमाराला निघाले. वाटेत मुंबई येथे हिंदमहिलासमाजापुढे "स्त्रिया व राष्ट्रकार्य" या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले. तेथून ता. २० रोजी दिल्लीस जाण्याकरिता निघाले ते ता. २२रोजी पोंचले. मोठी मिरवणूक निघाली हे सांगावयास नकोच. त्याच दिवशी मिरवणुकीनंतर जाहीर सभा भरून टिळकाना मानपत्र अर्पण करण्यात आले. नंतर दिल्ली येथील महाराष्ट्रीय स्नेह संवर्धक समाजाने पाडव्याचा मुहूर्त

साधून टिळकाना पानसुपारी केली ती घेऊन टिळक अजमीर येथील लोकांच्या निमंत्रणावरून तिकडे गेले. दिल्लीहून दादासाहेब खापर्डे व विठ्ठलभाई पटेल यानाहि त्यानी बरोबर घेतले होते. ता. २४ रोजी अजमीरचा सत्कारसमारंभ मोठ्या थाटाने झाला. जागजागी कमानी तोरणे उभारली होती. बाजार पेठेतील जरतारीच्या हिंदु व्यापाऱ्यानी सोनेरुपेरी फुले करून उधळली. मुसलमान पुढाऱ्यानी तेथील पुरातन मशिदीत टिळकाना बोलावून पानसुपारी केली. सायंकाळी मानपत्र समारंभ झाला.

हा समारंभ आटपताच विश्रांति न घेता सिंधमधील दौरा उरकण्याकरिता अजमीरहून टिळक परस्पर सिंधकडे वळले. ता. २६ रोजी ते सिंध–हैद्राबाद येथे पोचले. स्टेशनावरून दारूचे बार उडवीत व नौबती वाजवीत मिरवणूक निघाली. तेथील नॅशनल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी आपले स्वयंसेवक दल तयार करून सर्व व्यवस्था ठेवली होती. बिनघोड्याच्या गाडीतून त्यांची मुख्य मुख्य रस्त्यानी मिरवणूक नेण्यात आली व अनेक लोकानी वाटेत लहान लहान देणग्या दिल्या. शिकारपूर येथे हिंदी स्वराज्य संघ. खिलाफत कमिटी वगैरे संस्थानी मानपत्रे दिली व नागरिकातर्फे सहा हजार रुपयांची थैली देण्यात आली. सक्कर येथेहि मानपत्र देण्यात आले. येथे एक व्याख्यान तिकिटे लावून केले त्याचे उत्पन्न तीन हजार रुपये झाले ते जालियनवाला फंडाला देण्यात आले. ता. २९ रोजी कराची येथेहि अशीच मोठी मिरवणूक निघाली. गाडीत हिंदुमुसलमान पुढारी बसले असून बाजूला हिंदुमुसलमान स्वयंसेवक उभे राहून त्यानी कलाबतूच्या सोनेरी छत्र्या धरल्या होत्या. गाडीवर हिंदु व मुसलमान यांची निशाणे लावली होती. सिंध मद्रेसातील मुसलमान विद्यार्थी कापड मार्केटातील व्यापारी स्वदेशी स्टोअर्स वगैरे संस्थानी व लोकानी हार घातले. सायंकाळी सिंध स्टूडंड्स कनव्हेशनतर्फे व्याख्यान झाल्यावर कॉंग्रेस कमिटी मुस्लिम-लीग होमरूल–लीग वगैरेनी मानपत्रे दिली व रात्री उपहार समारंभ झाल्यावर चौदाशे रुपयांची थैली अर्पण करण्यात आली. नंतर वाटेत मिरपुरखास तांडोजा कोटी वगैरे ठिकाणी थोडथोड्या वेळात असेच स्वागत समारंभ झाले.

ता. ३० रोजी टिळक परत हैद्राबादला आले आणि तेथून जे निघाले ते थेट मुंबईला येऊन पुण्यास न उतरता एकदम सोलापुरास येऊन दाखल झाले. केळकर वगैरे लोक आधीच एक दिवस सोलापुरास जाऊन पोचले होते. विरोधक पक्षाचे पुढारीहि एक दिवस आधी येऊन टिळक केळकराना परिषदेत कसकसा विरोध करावयाचा याची तयारी त्यानी जोराने चालविली. नेमस्तांचे बहुतेक पुढारी रँ. परांजपे व कामत यांच्यासह हजर होते. बेझंटबाई या आपली अनुयायी मंडळी घेऊन हजर होत्या. कारण त्यांचा व टिळकांचा नुकताच वर्तमानपत्रातून कडाक्याचा वाद झाला होता व बाईना मुद्दाम मद्रासेहून आणविण्यात आले होते.

## ( १४ ) सोलापुरची प्रांतीक परिषद

सोलापूरची मिरवणूक सुमारे तीन तास चालू होती. या मिरवणुकीतच विरोधाचे पूर्वचिन्ह दिसून आले. कारण एक हस्तपत्रक मिरवणुकीत मधून मधून वाटण्यात येत होते. त्यात असे लिहिले होते की ' गांधी परिषदेस येत नाहीत. मिरवणूक कोणाची काढता ? ' पण लोक हस्तपत्रक हातात घेत वाचीत हंसत व हाताने चुरगळून फेकून देत. सायंकाळी चार वाजता परिषदेला सुरवात झाली. प्रतिनिधींची संख्या सुमारे बावीसशे असून प्रेक्षकहि सुमारे दोन हजार होते. दोनतीनशे स्त्रियाहि होत्या. प्रथम गायन वगैरे झाल्यावर श्रीशंकराचार्य कुर्तकोटी हे परिषदेला आले होते त्यानी आशीर्वाद दिला. नंतर निरनिराळ्या प्रांतातील हिंदुमुसलमान पुढाऱ्याकडून आलेले संदेश वाचून दाखविण्यात आले. स्वागत-सभेचे अध्यक्ष सामंतवकील यानी आपले भाषण वाचून दाखविल्यावर अध्यक्षांची निवडणूक झाली. सामंत यांचे भाषण चालू असता दंग्याला थोडीथोडी सुरवात झाली होती. अध्यक्षानी आपले भाषण इंग्रजीत वाचून दाखविले. नंतर त्याचा तर्जुमा गंगाधरराव देशपांडे यानी मोठ्या खणखणीत आवाजाने वाचून दाखविला. नंतर विषयमंडळ निवडण्यात येऊन पहिल्या दिवसाचे काम संपले.

सोलापुरात चाललेली ही गडबड कळून आल्यामुळे रात्री टिळकानी मुद्दाम जाहीर व्याख्यान ठरविले होते. खापर्डे यानी मुख्य भाषण केले. परंतु या सभेत प्रत्यक्ष गडबड काही झाली नाही. फक्त बाहेरून बाहेरून भुरटेपणाची थोडी थोडी गडबड झाली. पण राष्ट्रीयपक्षाचे बल किती व इतर संयुक्तपक्षांचे बल किती हे एकदा कळूनच यावे म्हणून सोलापूरच्या मुक्कामात रोज रात्री जाहीर व्याख्याने ठेवण्यात आली होती. आणि त्यात राष्ट्रीयपक्षाचे निरनिराळे पुढारी भाषणे करीत असत. या व्याख्यानमालेत खापर्डे गंगाधरराव देशपांडे लक्ष्मणराव भोपटकर चिंतामणराव वैद्य शिवरामपंत परांजपे डॉ. सावरकर वगैरे नामांकित वक्ते बोलणार असे आगाऊ जाहीर होत असे यामुळे सभाना खूपच गर्दी लोटे. आपले बल नेमस्तपक्षाला दाखवावयाचे तर त्यानाहि अशा जाहीरसभा भरविण्याला कोणी हरकत केली नव्हती. पण त्यानी तशा सभा मुळीच केल्या नाहीत. परिषदेच्या तिसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता फिरून कामाला सुरवात झाली तेव्हा स्वराज्य विषयक मुख्य ठराव पुढे यावयाचा होता व तो मुख्य युद्धाचा दिवस असे जाणून गर्दी फार झाली होती. आदल्या एक दोन दिवस गडबड दंगल व मारामारीहि झालेली असल्यामुळे या दिवशी पोलिसानी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता आणि नाक्यानाक्यावर चौक्या ठेवून परिषदेच्या बाहेरच्या अंगाला तंबूंत डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट व स्वतः पोलिस सुपरिंटेंडंट हे हजर होते. परंतु गर्दी मारामारी काय व्हावयाची ती पूर्वीच होऊन गेली होती व या दिवशी कामाला काही व्यत्यय आला नाही. वादग्रस्त

म्हणून जो ठराव टिळकपक्षीयानी मांडला तो असा होता की "जे उमेदवार अमृतसर कॉंग्रेसच्या ठरावाला अनुकूल असतील त्यानाच मतदारानी कायदेकौन्सिलच्या पुढील निवडणुकीत निवडून द्यावे." या ठरावाला विषय नियामक मंडळात वेळीच विरोध करण्यात येऊन तेथे तो मंजूर झाला होता म्हणून दुसऱ्या दिवशी भरसभेत आपण त्याला उपसूचना आणणार आहोत अशी बेझंटबाईनी उपसूचना दिली होती. अशा रीतीने वादाचे क्षेत्र निश्चित झाले होते. हा ठराव पुढे येताच स्वतः स्वागताध्यक्ष सामंत व बार्शीचे वकील रामभाऊ साने यानी असला ठरावच मुळीं या परिषदेत आणता येत नाही अशी नियमाची म्हणून हरकत घेतली. तिला करंदीकर यानी विरोध केल्यावर असला ठराव पुढे आणणे कोणत्याहि नियमाना सोडून नाही असा निकाल अध्यक्षानी देऊन तो मांडण्याविषयी टिळकाना निमंत्रण केले. तो मांडण्यापूर्वी अध्यक्षानी दुसरा एक ठराव औपचारिकरीत्या स्वतःच पुढे मांडला कारण तो वादग्रस्त नव्हता. तो ठराव असा होता की कलकत्याच्या कॉंग्रेसने अस्पृश्य वर्गाच्या उन्नतीसंबंधाने जे धोरण स्वीकारले ते या परिषदेला मान्य आहे. नंतर टिळकानी मुख्य ठराव मांडून त्यावर भाषण केले. त्यात ते म्हणाले की "ही परिषद राष्ट्रीय सभेचाच एक भाग होय म्हणून राष्ट्रीय सभेने अमृतसर येथे मंजूर केलेला स्वराज्य विषयक ठराव या परिषदेला मान्य असलाच पाहिजे. अर्थात् तो ठराव व्यक्तिशः ज्याना मान्य असेल अशाच उमेदवाराना कौन्सिलात निवडून द्यावे, इतराना देऊ नये असे म्हणण्याचाहि अधिकार या परिषदेला आहे. याला चिंतामणराव वैद्य यानी अनुमोदन दिले. नंतर बेझंटबाई यानी आपली उपसूचना मांडली.

उपसूचनेचा आशय असा होता की कोणताहि पक्षभेद मनात न आणता जे लोक बुद्धिमत्तेने श्रेष्ठ कॉंग्रेसच्या सर्वसाधारण धोरणाला अनुकूल आणि जे सरकाराशी सहकारिता करून सुधारणाचा उपयोग करतील त्यानाच मतदारानी निवडून द्यावे. या उपसूचनेला ना. परांजपे यानी अनुमोदन दिले. हा ठराव व उपसूचना यांच्यावर साधक बाधक बोलण्याकरिता अनेक वक्त्यांची नावे पुढे आली होती. त्यातून एक अनुकूल व एक प्रतिकूल बोलणारा अशा रीतीने व्यवस्था लावून, म्हणजे उत्तर प्रत्युत्तर रूपाने साधक बाधक चर्चा समर्पक व्हावी अशी, अध्यक्षानी मुद्दाम योजना करून ती जाहीर केली व सरसनिरस तारतम्याने एकामागून एक वक्त्याना बोलाविले. यामुळे वादविवाद परिणामकारक झाला. भाषणे जोरदार व त्यात कोट्या प्रतिकोट्या वगैरे सुरू असल्यामुळे वादाला रंग बराच चढला होता. सर्व भाषणे झाल्यावर टिळकानी बेझन्टबाईना उत्तर दिले. ते म्हणाले "पक्षभेद राहू नये हे जर खरे तर अलाहाबादच्या नेमस्तसंघाने केवळ आपल्या उमेदवारांची यादी करून त्यानाच मते द्या इतराना देऊ नका अशी विनंति मतदारसंघाना का केली आहे? तिचा तुम्ही कोणी निषेध केला आहे काय? उद्या मुंबई इलाख्यातहि नेमस्तपक्ष आपलीहि अशीच यादी करणार.

मग कॉंग्रेसलाच तेवढे असे बंधन का असावे ? विलायतेत देखील असा प्रकार होतो. मुख्य प्रधान ॲस्क्विथ हा काही बुद्धिमत्तेने कमी नाही असे असता त्याचा पराभव होऊन त्यांच्याहून कमी योग्यतेचा कान्झरव्हेटिव्ह किंवा युनियनिस्ट का निवडला जातो?'' शेवटी बेझन्टबाईच्या उपसूचनेला सुमारे ७०० आणि टिळकांच्या मूळ ठरावाला सुमारे दोन हजार मते पडली असावी असे अध्यक्षानी सांगन टिळकांचा ठराव मंजूर झाल्याचे जाहीर केले. हा टिळक पक्षांचा मोठाच विजय होय. पण हा अंदाज करताना काही शंका राहू नये म्हणून अध्यक्षानी ना. परांजपे याना मुद्दाम जवळ बोलावून तुम्हीहि वाटेल तर वर उचललेले हात मोजा असे सांगितले व परांजपे यानीहि अध्यक्षानी दिलेला निकाल बरोबर आहे अशी कबुली दिली. अशा रीतीने हा मुख्य वादाचा प्रसंग पार पडला. व त्यात राष्ट्रीय पक्षाचे बहुमत सिद्ध झाले. नंतर इतर ठराव पास होऊन परिषदेचे काम सुमारे बारा वाजता निर्विघ्नपणे पार पडले.

नेमस्त पक्षाने तीन महिन्यापासून विरोधाची तयारी सुरू केलेली असून पुणे जुन्नर बेळगाव व सातारा वगैरे ठिकाणी ती यापूर्वीच प्रगट केली होती. या प्रत्येक ठिकाणी मुख्य आक्षेप हा घेतला जात असे की टिळक सहभोजनाना जात नाहीत, विधवाविवाहासारखी सामाजिक सुधारणेची कार्ये ते करीत नाहीत, व ब्राह्मणेतर पक्षाला ते विरोध करतात. यापैकी काही आक्षेपाना टिळकानी पुण्याच्या सभेत व बेळगावच्या सभेत उत्तरे दिली होती. पण फिरून एकवार मोठा प्रयत्न करून पाहण्याचे ठरवून परांजपे यानी सोलापूर जिल्ह्यातीलच एक ब्राह्मणेतर पुढारी वालचंद कोठारी याना विरोधक सैन्याची भरती करण्यास पुढे पाठविले होते. त्यांच्यामागून कामत हेहि सोलापुरास गेले. सोलापुरास गिरणीमजूर कारखानदार वगैरे सरमिसळ बकाली वस्ती बरीच. आणि ब्राह्मणेतर चळवळ त्या जिल्ह्यात पूर्वीच सुरू झाली होती. यामुळे आपल्याला शेकडो लोक मिळतील अशी उभयतांची समजूत होती. आणि या कामी पुणे व कोल्हापूर येथून पैशाची मदत करण्यात आली होती. कामत यांच्या अध्यक्षतेखाली कोठारी यांचे एक व्याख्यान होऊन टिळकांच्या सर्व दोषांचा पाढा तेथे वाचण्यात आला होता. तथापि परिषदेत बहुमत मिळ-ण्याइतकी प्रतिनिधींची संख्या उभारता येत नाही असे पाहून त्यानी आगाऊ असेहि प्रसिद्ध केले होते की आमचा हेतू राष्ट्रीय सभेचे धोरण दुष्ट व विपरीत कसे आहे इतके दाखविण्याचाच आहे पण आम्ही स्वतः काही राष्ट्रीय सभेत जाऊन ते बदलून घेणार नाही. अखेर ७००।८०० लोकांची भरती कशी तरी करून परिषदेत दंगल करावी असे त्यानी ठरविले. परिषदेच्या पहिल्याच दिवशी ती सुरू होण्याच्या आधी तास दोन तास सर्व विरोधक पुढाऱ्यांची व त्यानी जमविलेल्या सैन्याची सभा जवळच्या थिएटरात भरून सर्वांनी मिळून एकदम मंडपात जाऊन घुसावे असे ठरविले. परांजपे व कामत यानी पुढे जाऊन स्वाग-

ताध्यक्षाशी असे बोलणे सुरू केले की आमच्या प्रतिनिधींना तिकिटे फुले मिळालेली नाहीत म्हणून आम्ही सांगतो त्या सर्व लोकाना आत घ्या किंवा सभा एक दिवस तहकूब ठेवा. सामंत म्हणाले की आज इतके दिवस परिषदेची कचेरी उघडी असता तुम्हाला तिकिटे मिळाली नाहीत यात आमचा काय दोष ? तरी तिकिटाऐवजी म्हणून गडबडीने ४०।५० चिठ्या सांगितलेल्या नावाच्या सामंत यानी कोठारीना दिल्या. तरी परांजपे व कामत यानी असा धाक घातला की तुम्ही सभा लांबणीवर टाकली नाही तर परिषदेचे काम तहकूब ठेवण्याविषयी आम्ही प्रारंभीच सूचना आणू. त्यावर सामंत म्हणाले ' तुम्हाला योग्य दिसेल ते करा. ' तेव्हा परांजपे कामत यांच्या भोवती जमलेले त्यांचे लोक दटावून आम्हा सर्वांना आत सोडा असे म्हणू लागले. आणि पहिले वंदेमातरमूचे पद चालू असताच ते आरडाओरड करून मंडपात घुसण्याचा प्रयत्न करू लागले. बाहेर मैदानात चाललेली आरडाओरड ऐकून स्वयंसेवक बाहेरच्या दाराशीच बंदोबस्ताला गेले व दाराशी त्यानी दोन तीन रांगा धरून घुसणाऱ्या लोकांना थांबविले. तसे झाले नसते तर हे सर्व लोक आत घुसल्याने मंडपातच दंगा व मारामारी झाली असती. पण परांजपे व कामत यानी स्वयंसेवकाशीच हुजत घालण्याचा प्रयत्न केला. अशा रीतीने आत घुसण्याचा प्रयत्न निष्फळ झाला तेव्हा त्यानी मंडपाकडे दगड फेकण्यास सुरवात केली. ते पुष्कळाना लागले आणि वजिरकर नावाच्या व्यापाऱ्याचे डोके फुटून रक्ताचे ओघळ तोंडावर येत आहेत अशा स्थितीत ते अध्यक्षाकडे आले. तेव्हा आतील लोकाना खरा प्रकार लक्षात आला. नंतर खुद्द कलेक्टर व पोलिस अधिकारी पुढे आले व त्यानी असा हुकूम केला की चिठ्या तिकिटे असतील त्यानी मंडपात एकामागून एक जावे व नसतील त्यानी निघून जावे. तेव्हा परांजपे व कामत यानी निघून जाण्याचे ठरवून फिरून रात्री आपली सभा थिएटरात होणार आहे असे जाहीर केले. पण झाला दंगा हाच शेवटचा. दुसरे दिवशी सकाळपासून अधिकाऱ्यानी विशेष बंदोबस्त ठेविला व परांजपे याना बोलावून आणून त्याना काही गोष्टी समजून सांगितल्या. त्यापुढे काही गडबड झाली नाही. यासंबंधाने खरा प्रकार काय झाला याविषयी काही लोकांच्या जबान्या घेण्यात आल्या त्यांचा निष्कर्ष पुढे दिला आहे.

### मवाळानी केलेली दंगल

सोलापूर येथील प्रांतिक परिषदेचे वेळी मवाळ लोकानी गुंडांच्या सहाय्याने परिषदेत गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी गुंडानी मारामारी करून दगडफेकहि केली तीत बरेच इसम जखमी झाले. या दंगलीची प्रत्यक्ष पाहिलेली हकीकत व दगडांच्या माराने दुखापती झाल्या त्यानी आपल्या सह्यानिशी कळविलेली हकीकत त्यावेळी परिषदेच्या अधिकाऱ्याकडे दिली गेली तिचा संकलित वृत्तांत पुढीलप्रमाणे आहे.

"ता. २ रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास परिषदेच्या मंडपाकडे सुमारे ७।८ शे इसमांचा घोळका गलबला करीत येऊ लागला. सदर लोक मंडपात घुसणार अशीहि बातमी पसरली. मंडपाच्या पाठीमागच्या दारावर रँ. परांजपे कामत कोठारी बॅ. गाडगीळ हे जाऊन आम्हास आत सोडा असे तेथील स्वयंसेवकांस म्हणू लागले. तेव्हा तुम्ही पुढच्या दरवाज्याने आत जा असे त्यास सांगण्यात आले. तरी त्यांचा आत सोडण्याबद्दल आग्रह सुरूच होता. परंतु स्वयंसेवक त्यांस न वळल्याने ते बरोबरच्या घोळक्यासह मुख्य दाराकडे वळले. हे सर्व लोक दारातून तिकिटे न दाखविताच आत घुसणार असे पाहताच स्वयंसेवकानी दारात बाक ठेवून दरवाजा अडविला व तिकिटे दाखविणारासच फक्त सोडण्यात येईल असे वरील लोकांच्या पुढाऱ्यास त्यानी स्पष्ट सांगितले. ते त्यांस मानवले नाही. इतक्यात जमावातून स्वयंसेवकांवर दगडांचा मारा सुरू झाला त्यात श्री. वजीरकर जानोरीकर गलगली वांगीकर मुरलीधर बळीरामदास इत्यादि गृहस्थास चांगल्याच जखमा झाल्या. पो. सु. मि. गुडी यानाहि दगडांचा मार बसला. हा सर्व प्रकार रँ. परांजपे कामत कोठारी तेथे जवळच कारंज्याजवळ उभे राहून पहात होते. दंगेखोर अनावर झालेले पाहताच पोलिसानी काठी चालवून दंगा मोडला व परिषद नीटपणे सुरू झाली."

वरील हकीकतीवरून नेमस्तांची मजल कोठपर्यंत गेली होती हे दिसून येईल. कोणत्याहि तऱ्हेचा घोटाळा होऊ नये व तक्रारीला जागा उरू नये म्हणून अध्यक्ष व स्वागताध्यक्ष यानी होईल तितके नमते घेऊन सामोपचाराचे धोरण ठेवले होते. पण अखेर हा प्रकार झालाच. परिषदेचे अध्यक्ष हे टिळकांचेच असल्यामुळे परिषद मोडली असता टिळकांच्या इभ्रतीला व वजनाला आपण धक्का दिला असे सिद्ध होईल हा नेमस्तांचा विचार उघड होता. पण तो साधला नाही. अशा रीतीने अमृतसरच्या राष्ट्रीय सभेची तिच्या खालोखाल ही दुसरी आवृत्ति चार महिन्यात निघाली. पण ती फुकट गेली. अमृतसरला आपल्या पक्षाला १०।१५ मते मिळाली त्यापेक्षा पुष्कळ अधिक बळ आपल्याला सोलापुरास मिळाले, आणि हे बळ आणखी असेच वाढविले तर आपल्याला निवडणुकीतहि यश येईल अशी त्यांची समजूत असावी. ही आशा व्यर्थ होती हे त्या सालच्या निवडणुकी झाल्या असत्या तर दिसून आलेच असते. पण पुढे असहकारिता जन्मास आल्यामुळे राष्ट्रीयपक्ष निवडणुकीना उभाच राहिला नाही. तथापि असहकारिता हटून कौन्सिलप्रवेशाचे धोरण कॉंग्रेसने पुनः स्वीकारले तेव्हा तेथपासून झालेल्या दोन निवडणुकीत राष्ट्रीयपक्ष व नेमस्तपक्ष यांचे खरे बलाबल सिद्धच झाले.

सोलापुराहून परत आल्यावर टिळकानी केसरीत तेथील प्रकारावर एक सणसणीत अग्रलेख लिहिला. त्यात ते लिहितात "परांजपे हे प्रिन्सिपाल होते,

त्याना आजपर्यंत शिशुपाल हेहि नाव शोभत होते. पण आता ते पशुपाल बनले आहेत. परांजप्याचे राजकीय आजेपणजे 'टिळक हे तेली तांबोळयात मिसळून सवंग लोकप्रियता मिळविण्याकरिता त्याना मवाळपक्षाशी विरोधाला प्रवृत्त करतात. टिळकांचा जोर म्हणजे 'ब्रूट फोर्स' आहे' असे म्हणत असत. पण आजपर्यंत राष्ट्रीय पक्षाने सोलापुरास घडले त्याप्रमाणे लाचलुचपतीने व भूलथापीने अक्षरशून्य आडमुठ्या लोकाना काँग्रेसचे किंवा परिषदांचे प्रतिनिधी बनवून या पेंढाराकाडून पेंढारीपणा करविला नव्हता. त्यांचे प्रतिनिधी नेमस्तांच्या दर्जाचेच असत. स्वतःच्या खर्चाने सभाना जात. आणि प्रत्यक्ष नियमांचे उलंघन होईपर्यंत व मवाळपक्षाने दांडगाईस प्रारंभ करीपर्यंत ते सुरतेसहि जागेवरून हलले नव्हते. पण आता यानी भूतपिशाच्च–वेतालादिकांचे गण आपल्या भोवती जमवून सभा उधळण्याचा संकल्प केला. आणि चंदावरकरासारखे लोक ही गंमत पाहण्याला आले होते. त्याना सोलापुरच्या काही रावबहादुरानी मदत केली. आणि हे सर्व करून आपल्या पराक्रमाचा डांगोरा मुंबईच्या पत्रातून पिटला. पण हा त्यांचा कावा सिद्धीस गेला नाही. बेझंटबाईंचीहि

पूतना हरिवधार्थमाययौ । प्राप तत्र वधमेव ह्यात्मनः ॥

अशी स्थिति झाली. परांजप्यानी रानड्यांच्या नावाला काळीमा आणला. परांजप्यांच्या विद्वत्तेला व शीलाला काळीमा आणणारी अशी ही गोष्ट झाली." टिळक व नेमस्त लोक यांच्यातील हा बहुधा शेवटचाच सामना होय. यानंतरहि वर्तमानपत्रातून वाद चालूच होता. व त्यात ओघाने विलायतेत घडलेल्या स्पर्धेच्या व चुरशीच्या प्रसंगांचीहि झडती निघाली.

## ( १५ ) काँ. डेमोक्रॅटिक पार्टीचा जाहीरनामा

पण हा वाद संपवून पुढील निवडणुकीच्या कार्याला लागणे अवश्य होते. म्हणून काही दिवसांपूर्वी स्वराज्यसंघाने टिळकांकडे लोकशाही पक्षाचे धोरण ठरविण्याचे जे काम सोपविले होते ते त्यानी केले. आणि ता. २० एप्रिलच्या केसरीत काँग्रेसमधील लोकशाही पक्षाचे धोरण काय असावे याविषयी आपली योजना प्रसिद्ध केली. ही योजना 'काँग्रेस डेमोक्रॅटिक पार्टीचा मॅनिफेस्टो' या नावाने प्रसिद्ध आहे. या जाहीरनाम्यावर पहिला हा आक्षेप घेण्यात आला की तो टिळकांचा व्यक्तिशः जाहीरनामा होता. पण त्याला असे उत्तर होते की वास्तविक हा जाहीरनामा टिळकानी तयार केलेला म्हणून प्रसिद्ध झाला तरी त्यानी अनेक लोकांची संमति घेतली होती. गुजराथच्या काही गृहस्थांशी व सिंधच्या काही गृहस्थांशी टिळकानी त्याविषयी चर्चा केली होती. फार काय पण गांधी व जीना यानाहि टिळकानी कच्चा खर्डा दाखविला होता. शिवाय तो मुंबई इलाख्यापुरताच होता. इतर प्रांतातील जाहीरनामे पाहिले तरी ते यासारखेच होते. नेहरू व मदनमोहन यानीहि त्यातली तत्त्वे मान्य केलेलीच होती. दुसरा एक आक्षेप असा होता की

जातीजातीतील समान हक्कासंबंधाने जाहीरनाम्यात नमूद केलेली मते ढोंगीपणाची आहेत. पण अशा आक्षेपाला उत्तर देणे कठिण. ती मते चूक आहेत असे कोणी म्हणता तर गोष्ट वेगळी. पण मते बरोबर तरी ती ढोंगीपणाची असे म्हणणे म्हणजे जिला आधार नाही म्हणून जी खोडूनहि काढता येणार नाही अशीच ती टीका होय. पण हा जाहीरनामा नेमस्त पक्षाकरिता काढला नव्हता. राष्ट्रीयपक्ष-करिता काढला होता. आणि त्या पक्षाला तो पूर्णपणे मान्य होता. शिवाय मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात केळकर यांच्या अध्यक्षतेखाली रत्नागिरी येथे भरलेल्या जिल्हासभेत व त्यानंतर खानदेश ठाणे वगैरे जिल्ह्यात केळकर यानी जो एक दौरा काढला त्यातहि ती गोष्ट सिद्ध झाली. रत्नागिरीच्या सभेला विरोध करण्याला नेमस्त व ब्राह्मणेतर जाणार अशी वदंता होती. परंतु ते घडून आले नाही. डहाणू येथे एका गृहस्थाने जाऊन काही थोडी गडबड केली. पण परिषदेत त्याची डाळ मुळीच शिजली नाही. आणि बाहेर जो व्याख्यानप्रसंग झाला त्यातहि त्याला हार खावी लागली.

## ( १६ ) पर्सफंड-समर्पण-समारंभ

यानंतर राष्ट्रीयपक्षाने जमविलेला टिळकपर्सफंड समक्ष अर्पण करण्याचा समारंभ मे महिन्याच्या २२ व्या तारखेस पुण्यास झाला. डॉ. नानासाहेब देशमुख हे अध्यक्ष होते. फंड जमविण्याच्या कामी ज्या लोकानी मेहेनत घेतली होती त्यापैकी काही स्वतः व काही प्रतिनिधीद्वारा हजर होते. प्रथम केळकर यानी फंडाची मूळ कल्पना का व कशी निघाली तो जमविण्याची खटपट कशी झाली वगैरे हकिकत सांगितली. लहानसहान रकमानी हा फंड गोळा केला असा त्यावर एक आक्षेप होता. पण त्याचे उत्तर असे की मोठ्या रकमा लोकानी द्याव्या असा परस्पर हवाला देऊन स्वतः काही न करणारे असे लोक अनेक होते. आणि फंडाची रकम तर मोठी म्हणून सामान्य माणसालाहि यथाशक्ति मदत करण्याला सवड रहावी याकरिता कोणी ज्या दिल्या त्या रकमा घेतल्या गेल्या. व त्याकरिता मुद्दाम एक-रुपयापासून हजार रुपयापर्यंत तिकिटे काढली होती. फंडाच्या सुरवातीपासून तो पुरा जमण्याला सहा महिने लागले. पण इतक्या थोड्या अवधीत एवढी मोठी रक्कम आजपर्यंत कोणीहि कोणाकरिता महाराष्ट्रात जमविली नव्हती. नेमस्तपक्षाने या फंडाला काहीच दिले नाही व त्यांच्याकडे कोणी मागितलेहि नाही. तथापि पूर्वी टिळकांचे भक्त म्हणून मिरविलेल्या व पुढे त्यांच्यावर उलटलेल्या आपल्या-तीलच काही लोकानी असे आक्षेप घेतले होते म्हणून त्याना उत्तरे द्यावी लागली. नंतर अण्णासाहेब नेने यानी फंडाच्या हिशोबासंबंधाने सर्व हकीकत सांगितली. शेवटी टिळकांनीहि आभारप्रदर्शनाचे भाषण करताना वरील आक्षेपाना समर्पक उत्तरे दिली.

लोकानी जे औदार्य दाखविले त्या संबंधाने ते म्हणाले की "मी फिर्याद केली ती व्यक्तिशः चिरोल साहेबावर असली तरी खरे युद्ध सरकारशीच होते. याचे प्रत्यंतर खटल्यात सर एडवर्ड कार्सन यानी 'हा खटला टिळकानी जिंकला तर इंग्रज सरकारावर अनर्थ गुदरेल व त्याना हिंदुस्थानात राज्य करणे कठिण जाईल' असे उद्गार काढले यावरूनच मिळणारे आहे. आणि या खटल्याचे सार्वजनिक स्वरूप लक्षात घेऊनच लोकानीहि एवढा फंड जमविला. हा फंड मजकरता उभारून खरोखर लोकानी आज मला विकत घेतले आहे." टिळकांचे भाषण झाल्यावर खापर्डे कौजलगी वगैरे गृहस्थांची भाषणे होऊन हा अपूर्व समारंभ समाप्त झाला. दुसरे दिवशी टिळकांच्या वाड्यात स्वराज्यसंघाची चवथी वार्षिक सभा भरली होती. आदले दिवशी समारंभाकरिता आलेली मंडळी दुसरे दिवशीच्या सभेकरिता बरीचशी राहिली होती. कारण आदले दिवशीचा समारंभ व टिळकांचे भाषण ही केवळ फंडासंबंधी होती. पण संघाच्या सभेत पुढील निवडणुका व राजकीय धोरण यांजविषयी टिळक विस्तृत भाषण करतील अशी लोकांची अपेक्षा होती ती सफळ झाली.

प्रारंभी कामाचा अहवाल व तपासनीसानी तपासलेले हिशेब सभेपुढे मांडले. नंतर विलायतेस गेलेल्या शिष्टमंडळाच्या कामाचा वृत्तांत वाचण्यात आला. त्यानंतर रीतीप्रमाणे संघाचे अधिकारी व शिष्टमंडळाचे सभासद यांचे आभार मानण्यात येऊन नव्या निवडणुकी केल्या. संघाच्या हाती असलेल्या शिलकेचा उपयोग कसा करावा? म्हणजे ती शाखावार वाटून देऊन कारण पडेल त्याप्रमाणे मुदलातूनही खर्चावी? किंवा कोणतीहि एक मोठी रक्कम म्हणजे सुमारे एक लक्ष रुपये गंगाजळीप्रमाणे कोठे तरी सुरक्षित व्याजी लावून व्याजातून नित्य खर्च करावा व नैमित्तिक कामाकरिता स्थानिक किंवा सार्वत्रिक वर्गणी गोळा करावी? पैकी काही लोक एका योजनेला व काही दुसरीला प्रतिकूल होते. अखेर फक्त दोन मते विरुद्ध पडून दुसरी सूचना मंजूर झाली. अमेरिकेत लजपतराय व हर्डीकर यानी केलेल्या कामाचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला. कारण त्यातले काही काम अमेरिकेतील संघ ही पुणे संघाची शाखा या नात्यानेच करण्यात आले होते. कॉ० डेमॉक्रॅटिक पार्टीचा जाहीरनामा पूर्वी टिळकांच्या विद्यमाने प्रसिद्ध झाला होता तो मंजूर करण्यात आला. यानंतर एक महत्त्वाचा पण थोडासा नाजुक प्रश्न उद्भवला तो असा की पुढील निवडणुकीकरिता या नव्या पार्टीतर्फे योग्य उमेदवार उभे करून एका जागेकरिता अनेक उमेदवारांची उभे राहण्याची इच्छा असेल तर त्या अडचणीचा निर्वाह कसा करावा? दरेक जिल्ह्यात या पक्षाच्या वाट्याला कौन्सिलातील एखाद दुसरीच जागा येणार. काही जागा राखीव. काही इतर कारणानी हातच्या जाणार. उरलेल्या जितक्या जागा त्याहून अधिक अनेक लायक व हौशी उमेदवार निवडणुकीची इच्छा धरणार. बरें त्यातील एकच पसंत करून त्यावर पक्षाने आपले सर्व बळ एकवटले तर तो

हटकून निवडून येणार पण आपापसात स्पर्धा व चुरस लागली तर पक्षाला हटकून अपयश येणार! अशी ही आपत्ति होती. तेव्हा ती टळण्याला एकच मार्ग. तो असा की पक्षाचे म्हणून एक पंचायत मंडळ नेमावे. आणि एका जागेकरिता उभे राहणाऱ्या आपल्याच पक्षाच्या उमेदवारापैकी काम करण्याच्या व निवडणूक जिंकण्याच्या दृष्टीने अधिकात अधिक सरस कोण याचा निकाल देण्याची जबाबदारी त्याने स्वीकारावी. उलट जे अनेक उमेदवार उभे राहतील त्यानीहि या मंडळाचा निकाल हा आपल्या एकंदर पक्षाचा निर्णय असे निष्ठापूर्वक समजावे. आणि त्या एकाच उमेदवाराला सर्वांनी मनोभावे मदत करावी. त्याप्रमाणे टिळक वैद्य करंदीकर व बेलवी यांचे मंडळ नेमण्यात आले.

शेवटी समारोपादाखल टिळकानी विस्तृत भाषण केले व आपल्या मंडळीस राजकारणाचे स्पष्ट धोरण आंखून देणारे असे त्यांचे शेवटचे भाषण हेच होय. ते म्हणालेः—" सुधारणांचा शक्य तितका उपयोग करून घ्यावयाचा की नाही हा प्रश्न आता उरलेला नाही. शक्य तितका उपयोग करून घ्यावयाचा. व तो करून घेता घेता पूर्ण स्वराज्य मिळण्याची खटपट करावयाची. असे आपले धोरण निश्चित झाले आहे. तरी प्रत्येक जिल्ह्यात आपले उमेदवार उभे केले पाहिजेत. मनुष्य आपल्या पक्षाचा आणि सरकारशी योग्य रीतीने झगडणारा असा असल्यास व तो निवडून येण्याचा अधिक संभव असल्यास तो पसंत करावा. मग तो कोणत्याहि धर्माचा जातीचा पंथाचा असला तरी चालेल. तंटा जातीचा नाही फक्त मताचा आहे. तसेच एखादा उमेदवार इंग्रजी चांगले न जाणणारा असला पण इतर रीतीने तो शहाणा असला तर त्यालाहि निवडून द्यावा. इंग्रजी भाषेची सबब सांगू नये. कारण कौन्सिलात मत कोणच्या बाजूने द्यावयाचे हाच मुख्य प्रश्न असतो. व इंग्रजी न येणाऱ्यालाहि आपल्या पक्षाचा पुढारी ज्या बाजूला मत देतो तिकडे आपण द्यावे हे सहज कळते. नव्या कौन्सिलातील काम हे थोडेसे घोटाळ्याचे आहे. कारण आपण निवडून दिलेला मनुष्य गव्हर्नराने नेमला तर व ठेवील तोपर्यंत दिवाण होणार. सुधारणा थोड्या आहेत. त्यानी मिळणारी सत्ता थोडी आहे. म्हणजे कौन्सिलच्याच कामाकरिता कोणी सर्वस्व वेचावे असे महत्त्व त्याला नाही. तथापि तेहि एक काम पक्षाच्या दृष्टीने कर्तव्य आहे असे समजून केले म्हणजे मग ते करण्यात कालाचा अपव्यय झाला असे वाटणार नाही." नंतर संघावर आलेल्या अनेक आक्षेपाना टिळकानी उत्तरे दिली. कारण काही व्यक्तीनी काही विशेष कारणावरून नाराज होऊन टिळक स्वराज्यसंघ शिष्टमंडळ या सर्वांवर वाटतील ते आक्षेप घेतले होते आणि दूषणे दिली होती. ती अधिकारयुक्त वाणीने खोडून काढणे हे आपले कर्तव्य आहे असे समजूनच त्यानी हे अप्रिय काम केले. ते म्हणालेच " मी न बोललो तर हे आक्षेपक उद्या अशा फुशारक्या मारीत सुटावयाचे की आम्ही आक्षेप प्रसिद्धपणे घेतले त्यानंतर यांची परिषद भरली पण तीत त्यानी आम्हाला उत्तरे दिली नाहीत." विलायतेतील चळवळीसंबंधाने

टिळक म्हणाले की "तिकडे याहून अधिक चळवळ झाली पाहिजे. राष्ट्रसंघ हे एखादे सोंग का असेना! पण काही तरी निमित्त काढून त्याच्यापुढे गेले पाहिजे. आपले म्हणणे मांडले पाहिजे. आणि युरोपियन राष्ट्रापुढे आपली गाऱ्हाणी मांडावयाची असली तर काँग्रेसशी असलेला आपला संबंध तोडून चालावयाचे नाही. तिच्याशी संबंध ठेवावयाचा पण तिच्या ठरावाची अंमलबजावणी स्वतंत्र रीतीनेहि करावयाची. आमच्या संघाने स्वतःच्या खर्चाने शिष्टमंडळ पाठविले. पण त्याने, आणि सर्वांपैकी त्या एकट्यानेच, काँग्रेसच्या धोरणाला धरून काम केले. पुष्कळाना भ्रम होता की विलायतेत स्वातंत्र्याची हवा आहे म्हणतात तेव्हा टिळक येथे वसाहतींचे स्वराज्य मागतात तर तेथे जाताच स्वातंत्र्य मागतील! पण मी काँग्रेसच्या मागणीपेक्षा एक रतीभर कमी मागितले नाही व ज्यास्तहि मागितले नाही. आणि मी स्वातंत्र्य मागितले नाही म्हणून आमच्यातल्याच कित्येक लोकानी मला मवाळ ठरविले! पण मला काँग्रेसविरोधी जहाल किंवा मवाळ यापैकी कोणतेंच व्हावयाचे नव्हते. मी काही लोकांची तऱ्हा पाहिली ती अशी की इकडे खटल्याच्या भीतीने अगदी नेमस्त बोलावयाचे आणि तिकडे ती भीति फारशी नाही म्हणून जहालपणे वाटेल ते भकत सुटावयाचे. दुसरे काही असे पाहिले की इकडे ते वाटेल तितके जहाल पण विलायतेतल्या लोकाना नेमस्तपणाचे माफक बोलणे आवडते म्हणून नेमस्त भाषा वापरावयाची. तिसरे काही असे पाहिले की इकडे सुधारणा अपुऱ्या आहेत म्हणून सांगावयाचे व तिकडे तेवढ्या पुरतील असे म्हणून काँग्रेस व स्वराज्यसंघ याना वेड्यात काढावयाचे. मी स्वतः निवडणुकीला उभे राहावे अशी सूचना गंगाधररावानी केली पण वृद्धावस्थेत सर्व शक्ति क्षीण होत असता नवे एखादे काम अंगावर घ्यावे की नाही याचा निर्णय तुम्ही माझ्या इच्छेवरच सोपवावा." अशा रीतीने हा चिरस्मरणीय प्रसंग समाप्त झाला.

ता० २७ मे रोजी टिळक इतर मंडळीसह बनारस येथे भरणाऱ्या ऑल-इंडिया काँग्रेस कमिटीच्या सभेला जाण्याकरिता मुंबईहून निघाले. गांधीहि त्याच गाडीत होते. बनारसेस ता० ३० रोजी सकाळी गंगेच्या घाटावर टिळकाना पंड्ये व गंगापुत्र वगैरे मंडळीनी संस्कृत मानपत्र दिले. ता० २९ रोजी टाऊनहॉलच्या मैदानात व ता० १ जून रोजी ब्रह्मघाटावर टिळकांची दोन व्याख्याने झाली. व या दुसऱ्या प्रसंगी नागरिकानी संस्कृतात मानपत्र दिले. ता० १ जून रोजी टिळक काशीक्षेत्रातील अनेक संस्था पाहण्यास गेले. बनारसेहून परत येताना टिळकानी जबलपूर येथे त्यांचे परम स्नेही काँट्रॅक्टर साने यांच्या निमंत्रणावरून दोन दिवस मुक्काम केला. तेथे ता० ३ रोजी गोलबझारच्या पटांगणावर व ता० ५ रोजी टाऊनहॉलमध्ये टिळक व खापर्डे यांची व्याख्याने झाली.

यानंतर परत आल्यावर फंडासंबंधाने काही एक वाद उत्पन्न झाला. त्यात टिळकाना नाइलाजाने पडावे लागले. आणि ते त्यात एकदा पडल्यावर त्यांच्या

नेहमीच्या स्वभावाप्रमाणे त्यानी त्याची कड पोचविली. आजपर्यंत टिळकानी अनेक जाहीर वाद केले पण ते करताना त्याना वाईट वाटले नव्हते. कारण ते बोलून चालून प्रतिपक्षाशी. पण हा वाद आपल्याच पक्षातील पूर्वीच्या एका व्यक्तीशी करावयाचा होता आणि अशा मनुष्याने स्वतः टिळकावर व आपल्याच पक्षातील इतर कित्येक लोकावर असे आरोप केले होते की ते प्रतिपक्षानेहि कधी केले नव्हते. पण येथेहि पूर्वी सांगितल्याप्रमाणे वाद अप्रिय म्हणून किंवा आक्षेपक व्यक्ती आता त्याज्य म्हणून मी गप्प बसेन तर त्याचा भलताच गैरसमज होईल या भीतीने, आणि स्वतःचे मत प्रगट करणे हेच न्यायाचे व अत्यंत अवश्यक होते येवढ्याकरिताच, तो वाद त्यानी हाती घेतला. व एरव्ही कधीहि दुःख झाले नव्हते इतक्या दुःखाने पण स्वाभाविक आवेशाने तो त्यानी केला. मरणापूर्वी त्याना अनेक गोड घास खावयास मिळाले होते. पण बदाम खाता खाता मध्येच एखादा कडू बदामहि दाताखाली सापडतो आणि त्याचा कडवटपणा व वाईट वास तोंडात बराच वेळ राहतो तशी टिळकांची स्थिति या वादात झाली. आणि तो वाद इतका वाईट झाला की आज त्याचा पुनरुच्चार करून हा ग्रंथ आम्ही दूषित करू इच्छित नाही. इतरहि एकदोन बाबीत त्याना असेच कडू घास अखेर खावे लागले. पण त्या घासानी कडू झालेले तोंड स्वतः टिळकानीहि बाहेर दाखविले नाही. यामुळे त्यांचा उल्लेख करण्याचे आम्हाला मुळीच कारण नाही.

## ( १७ ) ताईमहाराज प्रकरणातले भरतवाक्य

टिळकासारख्या अनेकविध व्यवसायाच्या व संसारिक मनुष्याला असे प्रसंग क्वचित यावयाचेच. कारण इतरांप्रमाणे त्यांच्याहि कुंडलीत सगळे नऊच्या नऊ ग्रह होते. ते एकंदरीने भाग्यवान असले तरी छळणारे ग्रह त्यांच्या कुंडलीतून काढून टाकण्याचे काम कोणाहि ज्योतिषाला करता आलेले नव्हते. अर्थात त्यानाहि कर्मभोगाचा अनुभव जसा चांगला घेता आला तसा थोडासा वाईटहि घ्यावा लागला. त्याला इलाज नाही. तथापि अखेर जिंकावयाची असाच त्यांच्या आयुष्यातील सर्व खेळांचा परिणाम झाला. म्हणून त्याना शेवटी जो एक गोड घास खाऊनच मृत्यू आला त्याविषयी मात्र दोन शब्द लिहितो.

स्वराज्यसंघाच्या शेवटच्या सभेत टिळक बोलून गेलेच होते की 'वृद्धावस्थेत माझ्या सर्व शक्ती क्षीण होत चालल्या आहेत म्हणून कोणतेहि एखादे नवे काम मी यापुढे अंगावर घ्यावे की नाही हे लोकानी माझ्या इच्छेवरच सोपवावे.' त्यांच्या शक्ती क्षीण होत चालल्या होत्या याचा अनुभव पुढे एक महिन्यात आलाच. तथापि या शेवटच्या महिन्यातहि त्यानी एक अवश्यक व आवडीचे असे नवे काम हाती घेतले. ते म्हटले म्हणजे त्यांचे आवडते मानसपुत्र श्री. जगन्नाथ महाराज याना स्थिरपद करण्याचे होय. पूर्वी ताईमहाराज प्रकरणाच्या शेवटी आम्ही हे सांगितलेच आहे की प्रिव्ही कौन्सिलमध्ये जगन्नाथ महाराज यांचे दत्तविधान

कायम झाले होते तरी, त्यांचे सर्व इनामी उत्पन्न मूळ आपल्या देणगीचे असे म्हणून, १८७६ च्या एका कायद्याच्या आधाराने बाळा महाराज व कोल्हापूरकर छत्रपति यानी मिळून मुंबई सरकारासहि सामील करून घेऊन मुंबई हायकोर्टाकडे एक अर्ज केला होता. पण तो अर्ज शेवटी हायकोर्टाने नामंजूर केला हेहि आम्ही त्याच प्रकरणात सांगितले आहे. आणि टिळकानी आपल्या इच्छेने नवीन म्हणून जे काम या शेवटच्या दिवसात अंगिकारले ते हायकोर्टाकडील या अर्जाच्या बाबतीत जगन्नाथ महाराजांच्या बाजूची कैफियत तयार करणे हे होय. या कामी त्यानी सुमारे पंधरा दिवस खर्चून एखाद्या उत्कृष्ट कायदे पंडिताप्रमाणे अत्यंत समर्पक व साधार अशी कैफियत तयार केली. व तिच्याच वरून जगन्नाथ महाराज यांचे वकील हायकोर्टात भांडले व त्यानी तो दावा जिंकला.

पण हे काम चालू असता टिळकाना पुण्यासच मलेरियाचा ताप येऊ लागला होता. ताप यावा घाम निघावा ताप कमी व्हावा थोडी हुशारी वाटावी फिरून ताप यावा असा क्रम सुरू असताहि टिळक ही कैफियत तयार करण्यात गुंतले होते. अर्जाच्या सुनावणीची तारीख १४ जुलै ही लागली होती. म्हणून मुंबईस जाणे जरूर. आणि हवापालट झाल्याने मलेरियाचा तापहि थोडा हटेल. या हेतूने ता. १२ जुलै रोजी ते नेहमीप्रमाणे सरदार गृहात जाऊन उतरले. पुढील दोन दिवसात आपण तयार केलेल्या कैफियती वरून त्यानी वकील बॅरिस्टर लोकाना कज्जा समजावून दिला. ठरल्याप्रमाणे ता. १४ रोजी अर्जाची सुनावणी झाली व ता. २१ रोजी हायकोर्टाने अर्ज नामंजूर करून काढून टाकला प्रतिवादीचा खर्चहि देवविला. आणि टिळकाना फार मोठे व शेवटचे असे हे यश वळवून दिले. हे मोठे यश म्हणण्याचे कारण असे की हा अर्ज मंजूर झाला असता तर जगन्नाथ महाराजांचे सर्व उत्पन्न कोल्हापूर दरबारच्या स्वाधीन झाले असते. आणि जगन्नाथ महाराज हे आपल्या दत्तक वडिलांच्या श्राद्धपक्षाचे केवळ धनि होऊन राहिले असते.

## (१८) अखेरचा आजार

ता. २० जुलै १९२० रोजी दिवाण चमनलाल हे सहज टिळकांच्या भेटीला गेले. टिळकाना किंचित् ताप आला होता. चमनलाल म्हणाले "एक महिनाभर काश्मिराकडे का जात नाही?" टिळक म्हणाले "इतके लांब जाऊ शकत नाही. पुण्याच्या आसपासच कोठे तरी जाईन म्हणतो." चमनलाल यानी अखिल भारतीय मजूर परिषदेचे उपाध्यक्ष होण्याला टिळकाना विनंती केली. ती मान्य करून ते म्हणाले "मजूरवर्गाकडे माझे लक्ष आहे. १९०८ साली मला शिक्षा झाली तेव्हा गिरणीमजुरानी माझ्याबद्दल केवढे प्रेम व्यक्त केले!" हे बोलताना टिळकांचे ऊर भरून आले. चमनलाल म्हणाले "विलायतेत तुम्ही मजूरपक्षाचेच म्हणवून घेत होता." नंतर असहकारितेवर बोलणे निघाले तेव्हा

टिळक चमनलाल याना म्हणाले "असहकारितेच्या तत्त्वावर विश्वास कोणाचा असणार नाही ? प्रश्न इतकाच की असहकारिता कोणत्या प्रकारची असावी. माझे तत्त्व असे आहे की जनतेच्या पुढे तर जावयाचे पण फार पुढे मात्र जावयाचे नाही. पुढारी जनतेपुढे थोडासा असला तर त्याला अनुयायी आपणाबरोबर नेता येतात. सर्व लोकांची मनापासून तयारी झाली म्हणजे असहकारिता काय सिन-फेन काय कोणताहि मार्ग सोपाच आहे. प्रागतिक आपल्याबरोबर येणार नाहीत. आणि आपण सर्वांनी कौन्सिलातून अंग काढून घेतले म्हणजे आम्हीच देशाचे खरे प्रतिनिधी असे ते म्हणू लागतील. संघशक्ती नाही तोपर्यंत नुसत्या उच्च ध्येयाकडे पाहून काय करणार ? पंजाबातील अत्याचारांची पूर्ण भरपाई होईपर्यंत सुधारणांवर पूर्ण बहिष्कार घालावा हे तुम्हा लोकाना विलायतेत जाऊन बोलण्याला ठीक आहे. पण येथे लोकशाहीचे सगळे सैनिक एकोप्याने झुंजण्याला तयार आहेत की काय हे पाहिले पाहिजे." ( सयाजी विजय ता. ५ सप्टेंबर १९२० ).

किंचित् ताप अंगात होता तरी तसेच दिवाण चमनलाल "सहज बाहेर हिंडून आला तर तुम्हाला थोडे बरे वाटेल" असे म्हणून त्याना मोटारीत घेऊन गेले व त्यानी टिळकाना बरेच दूरवर हिंडवून आणले. पण जुलै महिन्यात मुंबईस थोडीशी उष्णता असली तरी दिवस पावसाळी हवेचे म्हणून उघड्या गाडीतून दूरवर हिंडल्याने त्याना वारा बाधला म्हणा किंवा इतर कारणाने म्हणा त्याच रात्री त्याना थोडा अधिक ताप आला. आणि त्या दिवसापासून त्यानी जे अंथरूण धरले ते त्यांचे अखेरपर्यंत सुटले नाही. हायकोर्टाकडील अर्जाचे काम यावेळी न निघते तर टिळक मुंबईस न जाता सोलापूर यवत अशा कोरड्या हवेच्या जागी जाणार होते. सोलापूर येथील त्यांचे स्नेही पोलिस सुपरिंटेंडंट पागे यानी टिळकाना आपला बंगला देऊ केला होता. पण मनुष्याच्या मृत्यूच्या दिवसाप्रमाणे त्याचे ठिकाणहि ठरलेले असते अशी आपणा लोकांची समजूत आहे त्याप्रमाणे या अर्जाच्या निमित्ताने टिळकाना मुंबईस जावे लागले व तेथेच त्यांचा अंत झाला. एकादृष्टीने मुंबईस ते आजारी झाले हेंच बरे कारण मुंबईइतकी निष्णात डॉक्टर लोकांची मदत इतर ठिकाणी कशी मिळणार ? आणि आपण आजारी होऊन आंथरुणाला खिळलो ही गोष्ट लक्षात येताच स्वतः टिळकांच्या तोंडूनच असे उद्गार निघाले की "मला मुंबईला येण्याची बुद्धि झाली ती माझ्या हिताचीच झाली." पण आयुष्यच संपले तेथे धन्वंतरी झाला तरी काय करणार ? मुंबईच्या लोकांचे मात्र हित असे झाले की त्याना पुण्याशी आपली भाऊबंदकी सात्त्विकभावाने साधून घेता आली. कारण टिळकांचे सर्व आयुष्य पुण्यात गेले तरी हिंदुमात्राचा सर्वात शेवटचा म्हणून महत्त्वाचा जो धर्मसंस्कार तो मुंबईस घडला. आणि टिळकांच्या साडेतीन हात देहापैकी जो एखादा कण मृत्तिकारूपाने कदाचित् राहावयाचा तो मुंबईसच राहिला.

असो. बुधवार ता. २० पासून सोमवारपर्यंत ताप मलेरियाचा समजून उपाययोजना होत होती. पण पुढील सोमवारपासून न्युमोनियाची लक्षणे स्पष्ट दिसू लागली. प्रथम उजवीकडील फुफ्फुसाचा खालचा भाग सुजला. नंतर कोठा फुगला. यामुळे वरच्यावर उचकी लागून काळजावरहि दडपण पडूं लागले. पण औषध देऊन उचकी हटवितांच वात उद्भवला व त्यानेच अखेर जोर केला. या दहा दिवसात ताप १०४ डिग्रीवर कधी वाढला नाही व ता. २७ रोजी थोडा घाम आल्याने उतार पडेल अशी डॉक्टराना आशाहि वाटली. तथापि ज्वर हे बाह्यलक्षण असून शक्तिपात हाच खरा रोग ठरला. व त्यावर काही इलाज चालला नाही. शनिवार ता. ३१ पर्यंत नाडी क्षीण होती तरी तिने दगा दिला नव्हता. ता. २७ पासून शुद्धि मात्र जाऊन येऊन असे. यामुळे भेटावयास येणाऱ्या मंडळीपैकी काहीना ते ओळखीत काहीना ओळखीत नसत. पण शनिवारी तिसऱ्या प्रहरपासून समूळ आशा सुटली होती. मात्र आजारीपणा हा असा आठ दहा दिवसांचा झाल्यामुळे जवळच्या व दूरच्या स्नेहीमंडळीना मुंबईस मुद्दाम येऊन टिळकांचे अखेरचे दर्शन व भेट घेता आली. व त्यातल्यात्यात ज्या एखाद्याशी त्याना एखादा दुसरा शब्द बोलता आला त्याने आपणाला भाग्यवान मानले. या त्यांच्या आजारात मुंबईतील बहुतेक सर्व स्नेही डॉक्टर मंडळीनी आपली नित्याची कामे जवळजवळ टाकून दिली होती व त्यांच्याभोवती तज्ज्ञ माणसांचा जागता पाहारा ठेवला होता. कोणच्याहि गोष्टीचे उणे पडूं नये म्हणून स्वयंसेवक मंडळीनी वरच्या मजल्यापासून खालच्या मजल्यापर्यंत आपली माळ चोवीस तासपर्यंत अखंड टेवली होती. सरदारगृहाच्या मंडळीनीहि किती मेहनत घेतली असेल हे सांगावयास नकोच. तात्पर्य सर्वानीच आपल्या श्रमाची व उद्योगाची पराकाष्ठा केली. पण शेवटी दैवाला 'तूंच डाव जिंकलास' असे म्हणून त्याना टिळकाना मृत्यूच्या स्वाधीन करणे प्राप्त झाले !

ता. २७ पासून समाचाराला येणाऱ्या मंडळीना रीघ नव्हती. पण डॉक्टर लोकांच्या पाहऱ्यामुळे पुष्कळ लोकांना परस्पर समाचार घेऊनच परत जावे लागले. मुंबईच्या दैनिक पत्रातून रोज एक दोन वेळ तरी टिळकांच्या आजाराची ताजी बातमी प्रसिद्ध होत होती. तरी पण आपापल्या सवडीप्रमाणे रात्रीदिवसा केव्हा तरी लोक येऊन समाचार घेऊन जातच. नेहमीच्या पक्षभेदाचा यावेळी कोणाच्या मनात मागमूसहि नसल्यामुळे सर्व पक्षाचे लोक येऊन टिळकांच्या व्यक्तीविषयी आपली आदरबुद्धि व सदिच्छा प्रगट करून गेले. आपल्या घरचे माणूस असे समजून सरदारगृहाच्या मालकानी टिळकांकरिता अनेक धर्मकृत्ये करविली. त्याप्रमाणे शहरातील इतर काही लोकानीहि टिळकांच्या प्रकृतीला आराम पडावा म्हणून शेकडो रुपये खर्चून दानधर्म केला. शेवटच्या दोन दिवसात तर तारायंत्राला टिळकांचा समाचार हेच एक मोठे काम होऊन राहिले होते. ता. ३१ रोजी पुण्यास कॉंट्रॅक्टर रानडे यांच्या घरचा टेलिफोन चोवीस तास खुला होता व जी ताजी खबर येईल ती

घेऊन गावात लोकांना कळविण्याचे काम काही स्वयंसेवकानी चालविले होते. शनिवारी रात्री ९ वाजता टिळकाना श्वास लागला व मध्यरात्रीनंतर बारा वाजून चाळीस मिनिटानी म्हणजे उजाडत्या रविवारी त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. सुमारे दहा वाजताच डॉ. देशमुख भडकमकर वगैरे मंडळीनी खोलीच्या बाहेर येऊन वर आभाळाकडे पाहून ' टिळक आता मनुष्याधीन स्थितीत राहिलेले नसून ईश्वराधीन झाले ' असे उद्गार किंचित् मोठ्याने मुद्दाम काढले. याचा अर्थ आता यापुढे वर कोणी फारसे येऊ नये व खालच्याच मजल्यावर बसून चिंतन करावे !

डॉक्टर मंडळी बाजूस सरल्यावर जवळच्या मंडळीनी टिळकांचे शरीर पलंगावरून उचलून खाली ठेवले. तेव्हापासून वरखाली सर्वत्र शांत झाले. आणि कानांत कुजबुजण्यापेक्षा मोठा आवाज कोठेही निघेनासा झाला. ( उजाडता रविवार ता० १ आगष्ट रोजी ) बारा वाजून चाळीस मिनिटानी प्राणोत्क्रमण झाल्याची बातमी वरच्या मनुष्यानी खाली येऊन सांगितल्यावर एक दोन डॉक्टर मंडळी वर जाऊन खाली आली व त्यानी ' टिळक गेले ' येवढ्या दोन शब्दात सगळ्या हिंदुस्थानाला शोकात लोटणारी बातमी प्रगट केली !

## ( १९ ) अलौकिक स्मशानयात्रा

ही वेळ मध्यरात्र उलटून गेल्यावरची असल्यामुळे पुढील कोणतीच गोष्ट सकाळपर्यंत कर्तव्य नव्हती. यामुळे खाली जमलेल्या मंडळीना एकत्र बसून दुःख करीत एकमेकाशी हळूहळू बोलत राहण्यापेक्षा दुसरे काहीच करता येण्यासारखे नव्हते. स्मशानयात्रा मुंबईसच व्हावी ही गोष्ट उघड होती. तथापि मुंबईच्या लोकाप्रमाणे शक्य तर आसपासच्या व पुण्यापर्यंतच्या लोकाना स्मशानयात्रेला हजर राहून टिळकांचे अखेरचे दर्शन घेण्याला सवड मिळावी या हेतूने, स्मशानयात्रा उजाडताच न काढता ती थोडी पुढे ढकलून दोनप्रहरच्या सुमारास काढावी असे ठरले. त्याकरिता त्यांचा मृतदेह खालवर बर्फाने आच्छादून ठेवावा अशी सूचना करण्यात आली. पहाटे तीनचार वाजता चाहूल थोडथोडी सुरू होताच टिळकांच्या मृत्यूची वार्ता मुंबईस व आसपास पसरण्यास सुरुवात झाली. त्यामुळे हळूहळू लोक चहूकडून सरदारगृहाकडे येऊ लागले. आणि सकाळी सात साडेसाताच्या सुमारास तर सरदारगृहाचे दरवाजे स्वयंसैनिक ठेवून बंद करावे लागले. पुण्यास ही बातमी पहाटेच कळल्यामुळे प्रथम काही लोक मद्रासमेलनेहि येण्याला निघाले. नंतर सकाळच्या मेलमध्ये इतकी गर्दी झाली की तिकिट विचारणे व पाहणे ही गोष्ट अशक्य होऊन बसली. म्हणून रेलवे अधिकाऱ्यानी लगेच एक स्पेशल ट्रेन काढली. पण तीहि भरून पुनः एक्सप्रेसमध्ये गर्दी झालीच. होईल तितकी घाई करून मुंबईस लवकर पोचण्यांत पुण्याच्या मंडळींचा हेतू असा होता की शक्य तर टिळकांचे शव स्पेशल गाडीने किंवा मोटारीने पुण्यास न्यावे

व तेथे ओंकारेश्वरी त्यांचा अत्यंविधि करावा. पण कोणी किती घाई केली तरी मुंबईला पोचण्याला पाच तासांचा प्रवास करावाच लागणार. आणि पुणेकरांची संमति घ्यावयाची म्हटले तरी मुंबईच्या लोकाना स्मशानयात्रेचा निश्चय इतका वेळ न करता थांबणे शक्यच नव्हते. दुसरीहि एक गोष्ट अशी होती की जेथे देहावसान झाले तेथेच स्मशानयात्राहि होणे हेच योग्य. यात अभिमानाचा प्रश्न फारसा नव्हता. गोष्ट अगदी सरळ होती. तथापि अभिमानच धरावयाचा तर पुण्याप्रमाणे मुंबईनेहि तो का न धरावा? पुणेकरानी आग्रह धरला तरी मुंबईचे लाखो लोक तो कसा चालू देतील? तरी पण पुण्याची मंडळी आल्यावर स्मशानयात्रेची सर्व सिद्धता झाल्यानंतरहि पुण्याच्या प्रेमाखातर काही पुणेकर मंडळीनी हा प्रश्न काढलाच. व प्रेमाच्या उद्वेगाने त्यातील काही लोक वर्दळीवरहि आले. पण जी गोष्ट सरळ ती सरळच. म्हणून अशांचेहि योग्य समाधान होऊन स्मशानयात्रा मुंबईसच करावयाची असे ठरले.

सकाळपासून लोकांच्या झुंडींच्या झुंडी येत होत्या. त्याना स्मशानयात्रेची वेळ ठरलेली कळविण्यात आली. तथापि आल्यासारखे दर्शन घेऊन जावे अशी त्यांची इच्छा यामुळे सकाळीच टिळकांचे शव व्यवस्थित रीतीने चौरंगावर बसते करून त्यांच्या अंगावर शालजोडी घालून कपाळाला भस्म लावून पुष्पहार घालून सरदारगृहाच्या वरच्या मजल्याच्या गॅलरीत आणून ठेवले होते. त्यामुळे रस्त्यावरून परस्पर दर्शन घेऊन लोकाना जाता आले. पण गेले तेहि स्मशानयात्रेत परत सामील होऊन येण्याकरिताच गेले.

टिळकांची स्मशानयात्रा मुंबईस होण्याचे ठरले तरी एक प्रश्न असा निघाला की नेहमीच्या म्हणजे सोनापूरच्या स्मशानभूमीत दहनसंस्कार करावा म्हटले तर गर्दीमुळे ते अशक्य होणार! आणि गर्दी अनावर झाली म्हणजे लोकांचा चेंदामेंदा होईल आणि यात्रा सुरळीतपणे पार पडणार नाही. म्हणून समुद्रकांठच्या वाळवंटासारख्या प्रशस्त जागेत दहन केल्याशिवाय दुसरा इलाज नाही हे आपोआपच दिसून आले. पण नेहमीचे ठिकाण सोडून दुसरी एखादी जागा स्मशानभूमि बनवावयाची तर पोलिस अधिकाऱ्यांचीच नव्हे पण सरकारची परवानगी लागते. म्हणून काही लोक पोलिसकमिशनरकडे जाऊन त्याना भेटले. स्मशानयात्रेचा मार्ग ठरविणे पोलिसकमिशनर यानाहि जरूरच होते. आणि दहनभूमि ठरल्याशिवाय स्मशानयात्रेचा मार्गहि ठरत नव्हता. शेवटी उभयतानाहि चौपाटीवर दहन करणे हाच मार्ग सोयीचा दिसला. परंतु मुंबई सरकार यावेळी पुणे शहरी असल्यामुळे तारायंत्रावर संभाषण करून परवानगी मागणे अवश्य होते. त्याप्रमाणे पोलिस कमिशनरनी सर्व हकीगत सांगून चौपाटीची परवानगी मागितली. पण अशा वेळीहि सरकार मोठे दक्ष असते म्हणून त्यानी अशी शर्त घातली की "आज दहन करण्याला चौपाटीची परवानगी आम्ही विशेष प्रसंग म्हणून देतो. तरीपण या दहनभूमीवर पुढे आम्ही कोणताहि हक्क सांग-

णार नाही अशी कबूली लोकानी आधी दिली पाहिजे." अर्थात् ही कबूली देऊन परवानगी मिळवावी लागली व ती मिळाली. आणि लोकांच्या इच्छेप्रमाणे भरवस्तीच्या भागातून किंचित् लांबच्या मार्गाने स्मशानयात्रा काढण्याचा मार्ग पोलिस कमिशनर यानी ठरवून दिला.

रविवारी सकाळी शहरात बातमी कळल्यापासून कामधाम बंद झाले. आणि रीतीप्रमाणे बाजार व दुकाने उघडावयाची ती कोणी उघडलीच नाहीत. सरकारी हुकुमाने सुटी दिली गेली नव्हती यामुळे कचेऱ्या उघड्या राहणार होत्या. तथापि त्या दिवशी कोण केव्हा आला गेला याची वरिष्ठानी फारशी चौकशी करू नये असा न सांगता संकेत झाल्यामुळे कचेऱ्यातील लोकहि कोणी परवानगी विचारून कोणी तसेच मधून मधून आपापल्या सवडीप्रमाणे स्मशानयात्रेत येऊन टिळकांचे दर्शन घेऊन गेले. सुमारे दीड दोन वाजता स्मशानयात्रेला सुरवात झाली. प्रेतासनाला खांदा देऊन टिळकाविषयी आदरबुद्धीने आपले शेवटचे कार्य करावे या हेतूने अनेक प्रमुख लोकानी एकामागून एक खांदे दिले. त्यात कोणी जात किंवा धर्म पाहिला नाही. मुसलमानपुढाऱ्यानीहि मधून मधून खांदे दिले. यातेला गर्दी इतकी जमली की कोणत्याहि एका रस्त्यात ती मावणे शक्य नसल्याने व यात्रा कोणत्या मार्गाने जाणार हे आधी कळल्याने लोक कोठे तरी उभे राहून का होईना पण सोइने दर्शन घडावे म्हणून पुढच्या रस्त्याला आधी जाऊन जागा धरून उभे राहिले. अशा रीतीने प्रेतासन व त्या भोवतालचे हजार पाचशे मनुष्य हे चालत होते तरी ठिकठिकाणी गर्दी थबकून उभीच असल्याने लोकयाला एकंदरीने चल म्हणण्यापेक्षा स्थिरच अधिक म्हणावी लागली. त्या दिवशी पाऊस मधून मधून फार जोराचा पडत होता. तथापि त्याची पर्वा कोणीहि केली नाही. व अंगावरचे कपडे भिजल्याची कोणास आठवणहि झाली नाही. ज्या रस्त्यानी यात्रा गेली त्यातील खालचे वरचे मजले व ग्यालऱ्या स्त्रीपुरुषानी भरून गेल्या होत्या. दिंड्यांचे अखंड भजन सुरू होते व मधून मधून शवासनावर पुष्पवृष्टि होत असे. अशा रीतीने यात्रा चौपटीवर पोचल्यानंतर गर्दी जागच्याजागी उभी राहून तिच्या घेरामध्ये लहानशी जागा मोकळी ठेवून तीत चंदनकाष्ठांचे सरण रचण्यात आले. आणि काही थोर लोकांची समयोचित अशी लहानशी भाषणे झाल्यावर अग्निसंस्कार करण्यात आला.

## ( २० ) अस्थींचा पुण्यनगर–प्रवेश–समारंभ

लो. टिळक ता. १२ जुलै रोजी मुंबईस जाण्याकरिता गायकवाडवाड्यातून बाहेर पडले ते मुंबईहून गायकवाडवाड्यात ता. ३ आगस्ट रोजी परत आले! पण या दोन प्रसंगात केवढे तरी अंतर! जाताना ते आपल्या साडेतीन हात देहानिशी बाहेर पडले. येताना ते अंगुष्ठमात्र देहाने आले. जाताना त्यानी अंगात नेहमींचा पोषाख घातला होता. येताना त्यानी चिताभस्माचे रूप धारण केले होते. जाताना

ते आपल्या पायानी गेले. येताना ते एका वीतभर लांबीच्या चंदनी पेटीत निजून आपल्या परिचरांच्या खांद्यावर बसून आले. जाताना त्यांचा सर्व ऐहिक व्याप त्यांच्या डोक्यात घोळत होता. येताना त्या सर्व व्यापांचा त्याग त्यानी केला होता. जाताना ते वासनापूर्ण होते. येताना त्यानी सर्व वासना टाकून दिल्या होत्या. जाताना ते लोकाविषयी बोलत होते. येताना त्यानी स्वतः शाश्वत मौनव्रत स्वीकारले असून सर्व लोक मात्र त्यांच्याविषयी बोलत होते. जाताना त्यानी टिळकपूर्ण असे पुणे सोडले. येताना त्यानी टिळकशून्य अशा पुण्यात प्रवेश केला.

टिळकांच्या अस्थींचा नगरप्रवेशसमारंभ मंगळवार ता० ३ रोजी सकाळी झाला. मुंबई येथील स्मशानयात्रा आटपल्यावर त्याना सदेह पुण्यास आणण्याची पुणेकरांची आशा अर्थात् दग्ध झाली. पण त्यांच्या देहाची राख मुंबईस पडली तरी त्यांचा अस्थिदेह पुण्यास आणण्यासारखा होता. म्हणून निदान तो तरी सत्कारसमारंभाने आणावा असे पुणेकरानी ठरविले. त्याप्रमाणे रात्री ३ वाजता अस्थि घेऊन मंडळी स्पेशल गाडीत बसून निघाली.

ही स्पेशल ट्रेनची व्यवस्था पुण्यातील समारंभाच्या व्यवस्थापकास माहीत नव्हती ती दुसरे दिवशी सकाळी त्याना स्टेशनवर समजली. दरम्यान ७॥ ला गाडी येणार या अदमासाने मंडळी जमू लागली. स्पेशलगाडी 'साइडिंग' ला येताच सर्व मंडळीनी टिळकांच्या नावाचा जयघोष करून अस्थीना सलामी दिली. अस्थि लहानशा चंदनी नक्षीदार पेटीत घातलेल्या असून फुलांच्या माळानी ही पेटी वेष्टिली होती. साईडिंगपासून थोड्या अंतरावर एका मोठ्या चारचाकी रथावर पालखी ठेवली होती तीत ही पेटी ठेवण्यात आली. रथाला खांदे देऊन स्वयंसेवक मंडळी तो ओढीत होती. रथावर चढून पालखीमागे उभे राहून लोकमान्यांचे दोघे चिरंजीव पालखीवर चवऱ्या वारू लागले. पालखीवर उंच काठीची मोठी रेशमी डेरेदार छत्री उभी केलेली होती. दोहो बाजूस सुगंधी उदबत्त्यांचे गुच्छ धुपत होते. रथाचे मागेपुढे रिंगण करून त्यात प्रमुख मंडळींना घेण्यांत आले होते. रथामागोमाग काही स्त्रिया चालत होत्या. रथापुढे रिंगणापलीकडे भजनी दिंड्या रांगेने उभ्या असून त्यांचे टाळ व मृदंग सारखे तालावर वाजत होते.

अशा थाटाने ही मिरवणूक सुमारे ९ वाजण्याचे आधी स्टेशनच्या पश्चिमटोकापासून निघाली ती संथपणे चालत असून इस्पितळाजवळ येण्यासच ९॥। झाले. मिरवणूक जसजशी पुढे जाऊ लागली तसतशी माणसांची गर्दीहि अधिक होऊ लागली, यामुळे उशीर होतो असे वाटले तरी पाऊल मात्र जलद पडेना. रास्त्यांचे वाड्यापाशी येण्यालाच १०॥। झाले, रविवार गाठण्यास १२ झाले, बुधवारात येण्यास पाऊण वाजला. आणि पालखी गायकवाडवाड्यात शिरून अस्थिकरंडक टिळकांच्या माडीवर नेऊन ठेवून मंडळी परत फिरण्यास १॥ वाजून गेला.

सर्व वाटभर अस्थींचा सत्कार सुरू होता. ठिकठिकाणी फुलांचे हार समर्पण करण्यात येत होते. स्टेशन ते गायकवाडवाडा या दोन मैल लांबीच्या हद्दीतील प्रत्येक घराची प्रत्येक खिडकी व दरवाजा स्त्रीपुरुषानी, विशेषतः स्त्रियानी ठेचून भरला होता. रस्त्याप्रमाणे सज्जावर पत्र्याच्या छपरावर माणसाला माणूस भिडले होते. स्त्रिया प्रायः पालखीसमोरून जाताना भाविकपणाने नमस्कार करीत. काही वरून फुलेहि फेकीत. कित्येक स्त्रिया डोळ्याचे पाणी पदराने पुशीत होत्या. दिंड्यांचे टाळकरी एकसारखे भजन करीत होते. नुसता 'रामकृष्णहरि' किंवा 'ज्ञानदेवतुकाराम' हा पाठ चालू असे तोपर्यंत ते झराझर पाऊल उचलीत. पण अभंगास सुरुवात झाली की, तो संपेपर्यंत मुक्कामच पडावा व मागील गर्दी येऊन अंगाशी भिडून रेटारेटी व्हावी असे सुरू होते. मिरवणुकीतील पुढारीपणा सर्वस्वी भजनी मंडळीकडे होता. पाऊल सावकाश अगर जलद उचलावे अगर मुक्काम व्हावा हा सर्व त्यांचा अधिकार. भजनाच्या शब्दात सर्व प्रकारचे जयजयकार मिसळून दुमदुमत होते. सर्व नवेजुने साधु सर्व नवेजुने राष्ट्रभक्त वंदेमातरम्सारखे जयशब्द आणि खुद्द टिळकांची नावे व पदव्या यांची पदपरिवर्तने यापैकी एकनाएक उच्चारल्याशिवाय एक क्षणहि जात नव्हता. नाही म्हणावयाला 'दारूवाला पुला'च्या मशिदीसमोर भजनी वाद्ये बंद करण्यात आली आणि 'हिंदुमुसलमान की जय' असा एकच जयघोष करण्यात आला.

अशा गर्दीचे समारंभ खुद्द टिळकांच्यासंबंधानेच पूर्वी एकदोन वेळा पुण्यात पाहावयास सापडले होते. पण आजची गर्दी विशेष भासली. मधून जाण्यायेण्याला रीघ नव्हती. पावलामागे पाऊल लागल्यामुळे आपल्या टाचेलाच बोटे उलटी फुटली आहेत की काय असे वाटे. 'मुंगीच्या पायाने चालणे' ही म्हण माणसानी आपल्या चालीने खरी करून दाखविली. चार वेळा पावसाने रस्ता भिजला व चार वेळ ताबडतोब मनुष्यांच्या पावलानी तो कोरडा केला गेला. पुढच्या पायानी चिखल तुडवून मागच्या पायाकरिता पायघडी एकसारखी तयार होत होती. आजचा समारंभ मृताचा सन्मान करण्याचा असल्यामुळे सर्व लोक बोडके व अनवाणी चालले होते. या दृष्टीने आजचा मेळा काही चमत्कारिक दिसत होता. अस्थिरथ पुणे स्टेशनावरून गायकवाड–वाड्यात पोचण्यास सुमारे पाच तास लागले. वाड्यात गर्दी इतकी झाली की पाय ठेवण्यास जागा नव्हती. खुद्द अस्थिकरंडक नेण्यालाहि वाव मिळेना. शेवटी आडबाजूने कसा तरी तो एका माडीवरून दुसऱ्या माडीवर नेण्यात आला. शेवटचे दर्शन म्हणून लोक जिन्याच्या कठड्यावरून व ग्यालरीच्या खांबावरून तसेच एकमेकांच्या खांद्यावर उभे राहून चढू लागले. शेवटी लोकमान्य ज्या ग्यालरीत खुर्ची टाकून नेहमी बसत तेथे उभे राहून उंच हात करून अस्थि—करंडकाचे दर्शन दिल्यावर सर्वांनी नमस्कार करून निरोप घेतला.

पुण्यातील और्ध्वदेहिक कृत्य संपल्यावर टिळकांचे वडील चिरंजीव व कनिष्ठ जामात हे श्रीक्षेत्र प्रयाग येथे टिळकांच्या अस्थि घेऊन गेले व ता. ८

आगष्ट रोजी ( रविवार मिति आषाढ वद्य ९ ) त्रिवेणी संगमात विधिपूर्वक त्यांचे विसर्जन करण्यात आले. अशा रीतीने टिळकांचे लौकिक चरित्र संपले. **देह मातीला मिळाला. आत्मा स्वस्थानी गेला. आणि टिळकांच्या स्मरणाने हिंदी जनतेच्या मनोमंदिरात कायमची वसती केली !**

# परिशिष्ट

## [ सन १९१९–२० सालातील निवडक पत्रे. ]

### ( १ ) सत्यमूर्तींचे केळकरास पत्र

मद्रास ११ जानेवारी १९१९

बेझन्टबाईंनी काय चालविले आहे हे तुम्ही पाहताच. पण राष्ट्रीय सभेचे मत काय आहे हे इंग्लंडला नीट कळावे अशी खबरदारी आपण घेतली पाहिजे. बेझन्टबाई व रामस्वामी अय्यर यांचे आपसात ठरल्यावरून रामस्वामी मला म्हणाले की काँग्रेसतर्फे शांतता परिषदेकडे जे शिष्टमंडळ पाठवावयाचे त्यात टिळकांची नेमणूक करणे हिताचे नाही. यावरून काय ते समजा. वर्तमानपत्रात या विषयी गवगवा केला पाहिजे. पार्लमेंटकडील अर्ज तयार झाला असल्यास त्याची रूपरेखा मला कळवा. काँग्रेसचे शिष्टमंडळ होमरूलच्या शिष्टमंडळाच्या आधी गेले पाहिजे.

### ( २ ) ॲडव्होकेट मुनशी यांचे केळकराना पत्र

मुंबई १७ जानेवारी १९१९.

आपण जो अर्ज तयार करणार आहो त्याकरिता मी पूर्वीचे दाखले काही मिळाले तर पाहात आहे. अर्जाची टिपणे प्रथम करून मी यासोबत तुमच्याकडे पाठवीत आहे. तरी ती पाहून परत करावी. अर्ज मोघम काँग्रेसच्या नावाने लिहावा किंवा जे कोणी त्यावर प्रत्यक्ष सह्या करतील त्यांच्या नावाचा लिहावा याचा दाखला मी पाहात आहे.

### ( ३ ) विजयराघवाचार्य यांचे केळकराना पत्र

सेलम २० जानेवारी १९१९

कस्तुरीरंग अय्यंगार व मद्रासचे इतर काही स्नेही यांचे मत असे आहे की राजकीय सुधारणांचे बिल लोकापुढे आले म्हणजे त्याचा विचार करण्याक-

रिता राष्ट्रीय सभेची जादा बैठक भरवावी. त्याना असेहि वाटते की या गोष्टीला पुणे हे चांगले ठिकाण आहे. आपणाला आता गप्प बसून उपयोगी नाही. पुढील खटपट केलीच पाहिजे.

### ( ४ ) बेझंटबाईंचे केळकराना पत्र

मद्रास २४ जानेवारी १९१९

राष्ट्रीय सभेच्या शिष्टमंडळात जाऊन मग तिची आज्ञा मोडून सुधारणांचे बिल कोणी सुधारावे हे मला योग्य वाटत नाही. कॉंग्रेसच्या शिष्टमंडळात जाणे मला फार बरे वाटले असते. पण असे हात बांधून घेऊन जाणे मला योग्य वाटत नाही. महत्त्वाच्या मुद्यावर राष्ट्रीय सभेची आज्ञा मानावी हे ठीक. पण किरकोळ गोष्टीत देखील कोणी स्वतंत्र मत सांगू नये हे काय ? आज एकदम प्रांतिक स्वातंत्र्य मागावे असे राष्ट्रीय सभेत बहुमताने ठरले आहे व ती मागणी 'मुद्याची महत्त्वाची व न सोडण्याची' या सदरात घातली आहे. शिवाय माझ्याविषयी अनेक लोकांचा विद्वेष कसा आहे हे पहा. म्हणून मी कॉंग्रेसच्या शिष्टमंडळात राहणे योग्य नाही. एकंदर थाट असा की जे कोणी मोठमोठ्याने शिरा ताणून बोलतील त्यांचेच म्हणणे ग्राह्य! आणि कोणी परिस्थितीचा विचार केला खऱ्या अडचणी काय आहेत त्या लक्षात घेतल्या आणि त्याप्रमाणे मागणीला मुरड घालण्याचा प्रयत्न केला म्हणजे त्याच्यावर लोक रागावून तुटून पडतात. समेट करण्याला मी तयार आहे. पण अविचाराने सगळे हातचे गमावणाऱ्या जहालाबरोबर काम करण्यापेक्षा, ज्याचा उद्या अधिक काही मिळविण्याकडे उपयोग करता येईल असे थोडे तरी मिळवू पाहणाऱ्या नेमस्ताशीच सहकारिता करावी हे मला अधिक पसंत आहे. दिलेले टाकू नये अशा मताची मी प्रथमपासून आहे. मी काही टाकणार नाही. घेईन ते स्वीकारले असेहि म्हणणार नाही. मिळेल त्याची जबाबदारी पत्करणार नाही. पण लोकांचा हा अविचारी विरोध पाहून थोडेहि स्वीकारावे असा माझा कल होऊ लागला आहे. जे थोडेहि देऊ नका असे आमचे शत्रु म्हणतात त्यात स्वीकारण्यासारखे काही तरी असलेच पाहिजे असे मन सांगते !

### ( ५ ) विजयराघवाचारियर यांचे केळकराना पत्र

सेलम २५ जानेवारी १९१९

तुम्हाकडून आपले ठरल्याप्रमाणे पत्रे आली म्हणजे मी या इलाख्यातील लोकाना ती पाठवितो आणि ते विलायतेस जातात की नाही व गेले तर त्यांचा खर्च ते करणार की नाही याची माहिती मिळवितो. शिष्टमंडळाच्या सभेला दिल्लीस मी जाण्याचे काही कारण आहे असे वाटत नाही. कारण पुष्कळशा लोकांची मला माहिती नाही. या प्रांताकरिता किती संख्या निश्चित झाली हे

कळवा असे लोक विचारतात. रौलेट कमिटीच्या रिपोर्टाविरुद्ध रोज काही तरी चळवळ केल्याशिवाय माझा हल्ली एकहि दिवस जात नाही. यावेळी सर्व राष्ट्रीय-पक्ष एकविचाराचा होईल तर किती बरे होईल !

### ( ६ ) खापर्डे यांचे केळकराना पत्र

दिल्ली २५ जानेवारी १९१९

बेझंटबाईचे शिष्टमंडळ कॉंग्रेसवर आघाडी मारण्याच्या तयारीत दिसते. पण एप्रिलच्या पूर्वी फ्रॅन्चाईज कमिटीचा रिपोर्ट तयार होणार नाही. तो झाल्यावर एप्रिलच्यापुढे शिष्टमंडळाना पासपोर्ट देतील असे वाटते.

### ( ७ ) ॲड० मुनशी यांचे केळकराना पत्र

मुंबई ८ फेब्रुआरी १९१९

बेझन्टबाई व जिना यांच्याशी आमचा फार वाद झाला. व कडाक्याचाहि झाला. पण ती दोघे आपला हट्ट सोडीत नाहीत यामुळे राष्ट्रीय सभेच्या शिष्टमंडळावर त्यांची नेमणूक करून फुकट. मालवीयजी आपल्याकडून खटपट करीत आहेत पण ते जुळणे कठीण दिसते. ' राष्ट्रीय सभेचा ठराव ऑ. इं. कॉं. कमिटी दुरुस्त करील तर मी राष्ट्रीय सभेच्या शिष्टमंडळात जाण्यास तयार आहे असे मी केळकराना पूर्वी सांगितले आहे व ते माझे मत तसेच कायम आहे असे केळकराना लिहा ' असे जिना यानी मला सांगितले. पार्लमेंटकडे अर्ज करण्याविषयी टिपण मी तुमचेकडे पाठविले आहे ते वाचून तपासून व दुरुस्त करून माझ्याकडे परत पाठवा.

### ( ८ ) ॲड० मुनशी यांचे केळकराना पत्र

मुंबई १९ फेब्रुआरी १९१९

येथील होमरूल लीगचे शिष्टमंडळ विलायतेस जाणार की नाही म्हणून तुम्ही विचारता तर माझी माहिती अशी की ' शहाण्या लोकानी ' सल्ला दिल्यामुळे राष्ट्रीय सभेच्या शिष्टमंडळाशिवाय दुसरे कोणचेहि जात नाही ! पटेल मला लिहितात की ' पार्लमेंटकडे अर्ज म्हणून जो करावयाचे ठरले आहे त्याची व्यवस्था केळकर व तुम्ही मिळून करावी.'

### ( ९ ) इंदुभूषणसेन यांचे केळकराना पत्र

कलकत्ता २२ मार्च १९१९

व्योमकेश चक्रवर्ती याना तुम्ही मुंबईस बोलाविले पण ते आताच येऊ शकत नाहीत. टिळक अपील करणार असे काही वर्तमानपत्रात वाचले. पण त्याचा काही उपयोग होईल असे तुम्हास वाटते काय ? ता. १९ रोजी चक्रवर्ती-

दास हिरेंद्र दत्त फजलुल हक्क आणि मी बसून आम्ही विचार केला. रौलेट ॲक्टा-विरुद्ध चळवळ करावयाची तर तो विवक्षित कायदा मोडावा आणि विलायती मालावर बहिष्कार पुकारावा आणि प्रांतीवरील कर देऊ नये असे आम्ही ठरविले. पण एकवार फिरून बसून पक्के ठरविणार आहो. दास व हिरेंद्र बाबू याना पहिल्या दोन गोष्टींचे महत्त्व विशेष वाटते. पण पहिली टाकून दुसरी व तिसरी अंमलात आणली तर चळवळ अधिक वेळ चालेल. आम्हा पाच सहा लोकाना सरकारने अटकेत ठेवले तर चळवळीचे एक प्रकारे कार्यच झाले!

( १० ) केळकरांचे ए. रंगस्वामी याना पत्र.

पुणे १४ एप्रिल १९१९

नागपूरचे ना. शुक्ल यानी आपण विलायतेस जाऊ शकत नाही असे कळविले आहे. तरी त्यांचे जागी मी तुमचे नाव सुचविणार आहे. ते सुचवू का? तुमची निवडणूक झाल्यास सत्याग्रहाच्या शपथेने तुमच्या मार्गांत काही व्यत्यय येईल असे मला वाटत नाही. तुम्ही म्हणाल तितके दिवस बाबासाहेब परांजपे यानी तिकडे रहावे असे मी त्याना लिहीत आहे.

( ११ ) केळकर यांचें पंडित मदनमोहन याना पत्र.

मुंबई २१ एप्रिल १९१९

मला खरोखरच एक तक्रार केली पाहिजे. ती अशी की शिष्टमंडळे नक्की ठरविण्याचा दिवस तुम्हाला विचारूनच मी ठरविला. आणि त्याकरिता मी मुंबईस दोन दिवस आगाऊ येऊनहि राहिलो. असे असता आपण ही महत्त्वाची कमिटीची सभा टाकून देऊन गांधी याना भेटण्यास जात आहात. या कमिटीच्या कामाला देण्याला आपणाला पाच मिनिटेहि मिळाली नाहीत याचे आश्चर्य वाटते. आपण या कमिटीचे अध्यक्ष आहात तरी यामुळे काही बिघडले तर सर्व जबाबदारी आपणाकडे आहे असे मी आपणाला कळवितो. काँग्रेस-डेप्युटेशन-मध्ये काही जागा रिकाम्या पडल्या तर त्या भरण्याला आपणाजवळ माणसे आहेत व कमिटीला त्या भरण्याचा अधिकारहि आहे. तेव्हा ही बाब ऑल-इंडिया काँग्रेस कमिटीपुढे जाण्याचे कारण नाही. तथापि आपल्याला योग्य वाटल्यास ऑल-इंडिया काँग्रेस कमिटीची तारीख ठरवा. माझी त्यालाहि हरकत नाही.

( १२ ) हॉलफर्ड नाइट यांचे केळकराना पत्र

कॅलिडोनिया आगबोट १२ जानेवारी १९२०

तुम्ही पाठविलेले पार्सल मला आताच आगबोटीवर मिळाले. तुम्ही पाठविलेल्या वस्तू पुण्याचे स्मरण म्हणून आम्ही घरी घालीत जाऊ. विलायतेमध्ये

हिंदुस्थानासंबंधी कितीतरी काम होण्यासारखे आहे. मी आपल्याकडून होईल ती मदत करीन. मी परत जाताच लॉइड जॉर्ज व मॉंटेग्यू याना भेटतो. हिंदुस्थानातील हकीकत मधून मधून कळवीत जा. तुमच्याकडून येणाऱ्या पत्राना मी फार चाहतो.

**( १३ ) केळकर यांचे पंडित नेहरू यांस पत्र**

पुणे १९ जानेवारी १९२०

गेल्या राष्ट्रीय सभेने लंडन येथील इंडिया पत्रासंबंधाने ठराव केला त्याची अंमलबजावणी कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून आपण त्वरित कराल तर बरे होईल. कॉंग्रेसच्या शिष्टमंडळाने या पत्राची सुधारणा कशी करावी या संबंधाने पूर्वीच ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीकडे रिपोर्ट केला आहे. ता. १२ जानेवारी रोजी भरलेल्या सभेत त्याचा विचार करण्याला सवड झाली नाही व फिरून सभा लवकर बोलावली जाईल असे दिसत नाही. म्हणून लेखी अभिप्राय मागवून या गोष्टीचा विचार करावा असे मला वाटते. ही सुधारणा घडून येण्याला प्रथम सुमारे ७५० पौंड पाठविले पाहिजेत. तसेच त्या रिपोर्टात सुचविल्याप्रमाणे आपण इंडिया पत्राचा संपादक होऊन जाण्यास तयार असलेल्या लोकांची नावे व शिफारसी प्रत्येक प्रांताकडून मागवाव्या व त्या ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या सभासदाकडे लवकर पाठवाव्या असे मला वाटते.

**(१४) गणेश दामोदर सावरकर यांचे पत्र**

८ फेब्रुवारी १९२०

आम्ही वेळोवेळी पाठविलेल्या पत्रातून नवीन सुधारणांविषयी आमची मते प्रकट करीत आलोच आहो. ती वाचल्यावर आमच्या सुटकेला सरकारला काही प्रामाणिकपणाची हरकत घेण्याचे कारण नाही इतकी ती स्पष्ट आहे. पण पुन्हा एकवार ती मते या पत्राने स्पष्ट सांगतो.

साम्राज्यांतर्गत स्वराज्य हे ध्येय आम्हाला तिटकारा येण्यासारखे वाटत नाही. इतकेच नाही तर ते आमचे अजूनहि राष्ट्रीय आकांक्षेचे ध्येय आहे. फार काय पण विश्वबंधुत्वहि असावे असे आम्हाला वाटते. सर्व पृथ्वी हे एकच राष्ट्र व त्यातील सर्व स्त्री पुरुष ही एकाच घरची भावंडें आणि या सृष्टीचे सर्व पदार्थ व फायदे सर्वांनाच समान हक्काने मिळावे असे आमचे मत आहे. इतर कोणतीहि घटना कृत्रिमच होय. आज राष्ट्रासंबंधाने ध्येय मर्यादित ठेवावे लागते त्याला इलाज नाही. म्हणून इंग्लंड व हिंदुस्थान यांचे परस्परसंबंध दिवसेंदिवस अधिक सुदृढ व्हावे आणि कोणाहि एकाचा दुसऱ्यावर ताबा न चालता दोघांचीहि उन्नति व्हावी याकरिता आम्ही प्रामाणिकपणे प्रयत्न करू. मात्र साम्राज्यातील प्रत्येक अवयव स्वयंनिर्णयाचा अधिकारी झाला पाहिजे. आणि आपला आपल्याला

जबाबदार राहिला पाहिजे. नवीन सुधारणांचा कायदा झाला त्याच्या योगाने घटनात्मक राष्ट्रीय प्रगतीचा मार्ग खुला झाला असून त्या वाटेने आमच्या राष्ट्रीय आकांक्षा पुढेमागे सफल होण्याचा संभव आहे. या कायद्याअन्वये पुष्कळ काम करिता येण्यासारखे आहे व हे करिता करिता स्वराज्याचे शिक्षण लोकाना पुष्कळ मिळेल. सुधारणांचे हप्त्यामागून हप्ते मिळविता येतील या दृष्टीने पाहता हिंदुस्थानात एका नवीन युगाला प्रारंभ झालेला आहे व त्याच्या आड आम्ही येणार नाही किंवा आड येण्यासारखे कोणतेहि कृत्य करणार नाही. किंबहुना हरप्रयत्नाने ते यशस्वी होईल असे करू. आपल्या सरहद्दीवर भानगडी सुरू आहेत आणि पिढ्यान् पिढ्या ज्या परकी लोकांच्या स्वारीचा धाक हिंदुस्थानाला बाळगावा लागला तोहि अजून तसाच आहे. म्हणून आम्हा दोघाहि बंधूंना प्रामाणिकपणाने असे वाटते की इंग्लंड व हिंदुस्थान यांनी परस्परांवर स्नेही व दोस्त म्हणून विश्वास टाकून बसावे. मात्र हिंदुस्थानला तोंड मिटून दुसऱ्याच्या हाती दोरी असलेल्या गुलामासारखे राबावे लागू नये. परिस्थितीप्रमाणे साधनेहि बदलतात. म्हणून नवीन विधायक व संघटनात्मक युग आमच्यापुरते यशस्वी करण्याचा आम्ही शक्य तो प्रयत्न करू असे सांगतो. व आमचे टीकाकार किंवा आमचे मित्र यानी आमच्या या शब्दावर विश्वास ठेवावा.

### (१५) बेनस्पूर यांचे टिळकाना पत्र.

लंडन १२ फेब्रुवारी १९२०

अमृतसर राष्ट्रीय सभेची हकीकत लिहिलीत ती कळली. पंजाबात अनेक गोष्टी दुःखद घडल्या. पुढे लोक आशेने पाहात आहेत ही बरी गोष्ट आहे. कमिटीचे काम पुन्हा केव्हा सुरू होईल हे कळताच तुम्हाला मी लिहितो. कारण काँग्रेसच्या तर्फे कमिटीच्यापुढे साक्ष देण्याची खटपट ताबडतोब झाली पाहिजे.

### (१६) क. वेजवूड यांचे टिळकाना पत्र

स्टोक ऑन ट्रेंट १४ फेब्रुवारी १९२०

तुमचे पत्र व त्याबरोबर आलेले कागद पोचले. तुम्ही पाठवलेला गुप्त पोलिस खात्याचा रिपोर्ट येथे प्रसिद्ध करण्याची तजवीज पाहतो. पण त्याविषयी स्पूर व मी हे आधी एकदा बोलणार आहोत. लजपतराय हे इकडून जात आहेत ते सगळी ताजी हकीकत सांगतील. जनरल डायर यांच्या संबंधाने पार्लमेंटात वाद विवाद झाला तेव्हा बरीच कडक भाषणे झाली. मी पुढल्या नोव्हेंबरमध्ये हिंदुस्थानास येत आहे.

### ( १७ ) कालेश्वरराव यांचे टिळकांना पत्र

बेझवाडा १६ फेब्रुवारी १९२०

आंध्र देशाचे पुढारी ना. कोंडा वेकटप्पया गारू यानी आपणाला आंध्र देशाला भेट देण्याविषयी विनंती केलीच आहे. आणि आपण केव्हा याल या विषयी आम्ही उत्सुकतेने वाट पहात आहो. इतर कोणत्याहि प्रांताप्रमाणे आंध्रामध्ये राष्ट्रीय भावना उदित झालेली आहे. तरी आपण येऊन आम्हाला योग्य तो उपदेश कराल व आशीर्वाद द्याल अशी आशा आहे. आपण आल्याने या राष्ट्रीय बुद्धीला अधिक जोर येणार आहे. आपला इकडील कार्यक्रम कसा ठरवावा या विषयी आपण मला किंवा कोंडा वेंकट अप्पया याना लिहिल्यास बरे होईल.

### ( १८ ) दादासाहेब खापर्डे यांचे टिळकांना पत्र

दिल्ली १६ फेब्रुवारी १९२०

तुमचे पत्र पावले. लजपतराय याना भेटण्याकरता येता येत नाही. तरी तुम्ही आणि ते मिळून दिल्लीस २६ व २९ या तारखांच्या दरम्यान यावे. येथे आल्यास पंडितजींच्या विचारे विलायतेस पुन्हा शिष्टमंडळ पाठवून नियमासंबंधाने आपले म्हणणे कमिटीपुढे मांडण्याविषयी काय करावे याचा विचार करिता येईल. सनातन धर्म सभा त्याचवेळी येथे भरणार आहे. तरी येता आल्यास एका फेरीत दोन कामे होतील.

### ( १९ ) श्रीश्चंद्र दत्त यांचे टिळकांना पत्र

करीम गंज ( आसाम ) १६ फेब्रुवारी १९२०

अमृतसर येथील ठराव आम्ही वाचले. परंतु ते लोकाना नीट समजून सांगितल्याशिवाय त्यांचे मर्म त्याना कळणार नाही. मतदारावर जबाबदारी फार टाकली आहे. व स्वार्थसाधु लोक आतून आतून पुष्कळशी जागा पोखरणार. म्हणून खरे व प्रबल लोकमत तयार होण्याची खटपट झाली पाहिजे. आम्ही तारिख ५–६ मार्च रोजी प्रांतिक परिषद भरवीत आहो. आपल्यासारखे पुढारी इकडे आल्यास फारच मदत होईल. काही प्रश्न स्थानिक स्वरूपाचे निघतील. हे खरे. तथापि त्यांच्या बरोबर सुधारणांचा प्रश्नहि निघेल. तरी सर्वच बाबतीत आम्हाला आपला सल्ला पाहिजे. सामान्य लोक देखील आम्हाला विचारतात की इकडे टिळक येणार नाहीत काय ? आपण होय असे नुसते कळविले की बाकी सर्व व्यवस्था मी करतो.

### ( २० ) विरुमल बेगराज यांचे टिळकांना पत्र

सक्कर (सिंध) १७ फेब्रुवारी १९२०

आपण इकडे येणार हे ऐकून लहान थोर मुले मुली सुद्धा टिळक आपणाला पाहावयास मिळणार म्हणून अतिशय आनंदित झाली आहेत. सक्कर

येथील स्वागत मंडळाचा मी अध्यक्ष आहे. शिवाय मी गेल्या काँग्रेसचे वेळी मंडपात आपणाला भेटून आपले पादवंदन केले हे लक्षात असेलच. तसेच येरवडा येथील तुरुंगात तुम्ही ज्या खोलीत होता म्हणून सांगतात त्याच खोलीत मीहि दोन अडीच वर्षे वास्तव्य केले आहे. आपणाला भेटण्याला या प्रसंगी पंजाबातील काही पुढाऱ्यानाहि निमंत्रणे केली आहेत.

(२१) श्रीराम शर्मा यांचे टिळकाना पत्र

दिल्ली २२ फेब्रुवारी १९२०

सनातन धर्म सभेच्यातर्फे हे लिहित आहे. हल्ली धर्मरक्षणाचे काम किती कठीण झाले आहे हे आपण जाणताच. हिंदुस्थानाला धर्मभूमि म्हणण्याचे दिवस गेले. हल्ली राजकीय चळवळीत जे पुढारी आहेत व ज्यानी त्या बाजूने काही केले सवरले आहे त्यांच्याच हाती देशाचे पुढारीपण आहे. दिल्ली येथे धर्म महासभेचे अधिवेशन मोठ्या प्रमाणावर भरविण्याचे आम्ही ठरविले आहे. तरी या सभेला आपण उपस्थित होऊन गीतेच्या आधारे आपल्या मुखाने आपल्याला वाटतो तो सनातन धर्म सांगावा अशी प्रार्थना आहे. येत्या मेमध्ये सभा भरवावी असा विचार आहे. परंतु तुमच्या सोयीवर सर्व अवलंबून आहे.

(२२) ह. वि. फडके यांचे टिळकाना पत्र

सांगली २४ फेब्रुवारी १९२०

आपण येथे आल्यावेळी महार चांभारांच्या वतीने केलेली पानसुपारी स्वीकारलीत या योगाने आमच्या कार्याला उत्तेजन आले आहे. आपण येथे सांगितले की ' अस्पृश्यतेस भागवत धर्मात आधार नाही. मी धर्मपुस्तके वाचली आहेत. नारायणशास्त्री मराठे यानी उलट सांगितले. अर्थात् त्यांच्या व आपल्या भागवत धर्माच्या व्याप्तीत काही फरक आहे असे दिसते. म्हणून खुलासा झाल्यास बरे होईल. हल्ली मी महार लोकाना शिकविण्यास जात असतो. परवा मिरवणुकीच्या वेळी आपण विलिंग्डन कॉलेजसंबंधी चौकशी केली त्यावरून प्रिन्सिपाल भाटे यानी परवा म्हटल्याप्रमाणे सोसायटीचा नाश करावा असे आपल्या मनात नाही याची खात्री पटते. "

(२३) पी. एस. अय्यर यांचे टिळकाना पत्र

माल व्हर्न (दक्षिण आफ्रिका) २४ फेब्रुवारी १९२०

हे पत्र आपणाला दक्षिण आफ्रिकेतील हकीगतीची माहिती व्हावी म्हणून पाठवीत आहे. तिकडील लोकाना इकडील खरी माहिती फार थोडी असते. व्हाइसरॉयानी एक कमिशन नेमले एवढ्यावर तिकडील लोकानी खूष होऊ नये. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांची परिषद भरली होती. पण गांधी यानी तिला

न विचारता परस्पर आफ्रिकन सरकारकडे एक यादी लिहिली. कमिशनात हिंदी लोकाविरुद्ध असणारे बरेच आहेत. १९१४ साली गांधीशी झालेला पत्र व्यवहार कमिटीपुढे चर्चेला निघाला. गांधी यांची 'जुने हक्क' या शब्दाची व्याख्या फार संकुचित झाली आहे. या पत्रव्यवहाराची माहिती आम्हा लोकाना नव्हती. म्हणून तो पुढे काढल्यामुळे आमची फसगत झाली. जमीन धारण करण्यासंबंधाने दक्षिण आफ्रिकेतील निरनिराळ्या भागात निरनिराळे कायदे व वहिवाटी आहेत. हिंदुस्थान सरकारलाहि इकडच्या प्रश्नांची चांगली माहिती नसते. तुम्ही एकच असे पुढारी आहा की या परिषदेत काही तोड सुचवाल. तिकडील एक दोन गृहस्थ इकडे माहिती घेण्याकरिता व साह्य करण्याकरिता पाठवाल काय? तसेच आम्ही एखाद दुसरा प्रतिनिधि तिकडे पाठविल्यास उपयोग होईल काय?

### (२४) डॉ. मुंजे यांचे टिळकाना पत्र

नागपूर २४ फेब्रुवारी १९२०

मुलामुलींच्या बाबतीत सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची जी धामधूम पुण्यास झाली त्याची हकीकत वर्तमानपत्रातून वाचली. ती वाचून असे वाटले की आता स्थानिक पुढाऱ्यानीच असल्या चळवळी अंगावर घेऊन आपणासारख्याना यातून मुक्त करावे. याच प्रसंगाने मी पूर्वी आपणाजवळ अमृतसरला बोललो होतो त्याची पुनः आठवण करून देतो. गीतारहस्याप्रमाणेच हिंदुधर्मशास्त्रावर ग्रंथ लिहिण्याचे काम आपण अंगावर घ्यावे. शेकडो वर्षांमध्ये या विषयाचा शास्त्रीय रीतीने ऊहापोह झाला नाही. व सध्याच्या काळी आपणाशिवाय या कामाला दुसरा अधिकारी पुरुष मला दिसत नाही. गीतारहस्याप्रमाणेच युगप्रवर्तक असा हा नवीन ग्रंथ होईल. इतकेच नव्हे तर हिंदुधर्माविषयीच्या आपल्या कामगिरीचे हे दोन ग्रंथ म्हणजे एक चिरंतन स्मारक होईल.

### (२५) डॉ. हर्डीकर यांचे टिळकाना पत्र

वाशिंग्टन (अमेरिका) ३ मार्च १९२०

गेले काही दिवस मी वाशिंग्टन येथे काढले. काम संपताच न्यूयॉर्कला परत जाईन. येथे परराष्ट्रीय कारभारासंबंधाने काँग्रेसची कमिटी नेमण्यात आली आहे. तिच्यापुढे या सोबत पाठविलेले ठराव आम्ही प्रविष्ट करविले आहेत. ठराव काँग्रेसचे सभासद मिस्टर मेसन यांचे नावे गेले आहेत. या ठरावात अनेक कारणे देऊन शेवटी असे म्हटले आहे की 'हिंदुस्थानी राष्ट्राला' लोकांची इच्छा असेल त्याप्रमाणे म्हणजे त्यांचा स्वराज्य विषयक स्वयंनिर्णय असेल त्याप्रमाणे, स्वराज्य देण्यास मदत करणे हे अमेरिकन पार्लमेंटाचे कर्तव्य आहे. याची चर्चा पुढे होईल ती कळवू. तेव्हा आपली बाजू मांडण्याची खटपट करू. यू. एस.

कमिटी ऑफ इंडियन नॅशनल काँग्रेस ही संस्था स्थापण्यात आली आहे. तिचे अध्यक्ष सेनेटर ग्रॉना हे होतील असा अंदाज आहे.

### ( २६ ) डॉ. हर्डीकर यांचे टिळकाना पत्र

न्यूयॉर्क १८ मार्च १९२०

वॉशिंग्टन येथील सभेतील ठराव पाठविले ते पोचले असतीलच. येथे हिंदु मॉस्लेम–सोसायटी नावाची संस्था नुकतीच जन्मास आली आहे. 'यंग इंडिया' पत्राचे काम व्यवस्थित चालले आहे. वर्गणीदार वाढत आहेत. आम्हाजवळ सध्या फक्त तीन किंवा चार महिने पुरतील इतकेच पैसे आहेत. पुढे तिकडून पैसे न आल्यास मात्र काम बंद करावे लागेल. आपले इच्छेप्रमाणे कानडेशास्त्री यांची व्यवस्था करतो.

### ( २७ ) डॉ. अन्सारी यांचे टिळकाना पत्र

लखनौ २२ मार्च १९२०

ता. २१ रोजी दिल्ली येथे प्रॉपागँडा कमिटीची सभा भरून त्यात विठ्ठलभाई पटेल याना विलायतेस पाठविण्याचे ठरले. जॉइंट कमिटीपुढे नवीन बिलाखाली सरकारने केलेले नियम चर्चेला निघतील तेव्हा त्यासंबंधाने काँग्रेसचे मत कमिटीपुढे मांडण्याचे काम पटेल यांजकडे दिले आहे. तरी यासंबंधाने आपण आपले मत कळवावे. हंटर कमिटीचा रिपोर्ट २१ एप्रिलपर्यंत प्रसिद्ध होत नाही असे समजते. याकरिता ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची सभा पुढे ढकलावी लागत आहे. अशा रीतीने सभेच्या तारखा वरचेवर बदलाव्या लागत आहेत याबद्दल वाईट वाटते. पण एका दृष्टीने ते ठीकच आहे. कारण गांधींची प्रकृति बरी नसल्याने पंजाबातील अत्याचारासंबंधाने काँग्रेस कमिटीचा रिपोर्ट देखील तयार होण्याला वेळ लागणार आहे.

### ( २८ ) ताराजित प्रेमसिंग यांचे टिळकाना पत्र

शिकारपूर २७ मार्च १९२०

तुम्ही इकडे येणार हे ऐकून सगळ्या सिंध प्रांताला अतिशय आनंद झाला. इकडील हिंदु समाजावर शेकडो वर्षे मुसलमानांचा अंमल व त्यानंतर चकचकीत दिसणाऱ्या पाश्चात्य भौतिक सुधारणा यामुळे आमच्या समाजाचा सत्यानास झाला आहे. राष्ट्रीय बुद्धि अशी उरली नाही. आहारविहार या बाबतीत धरबंध राहिला नाही. अहिंसा ही गोष्टच सर्व लोक विसरले. तरी तुम्ही इकडे आल्याने लोकाना सनातन हिंदु धर्माची काही तत्त्वे तरी समजतील. होमरूल लीगच्या चळवळीचे जनक असे तुम्हाला लोक इकडे समजतात. तसेच हल्लीच्या एकंदर राजकारणाचे

आधारस्तंभ असेहि तुम्हाला मानतात. एक हिंदु या नात्याने तुम्ही येऊन काय उपदेश कराल त्याकडे लक्ष लागले आहे.

( २९ ) दिवाण चमनलाल यांचे टिळकाना पत्र

लाहोर १७ एप्रिल १९२०

आम्ही येथे एक इंग्रजी साप्ताहिक काढणार आहोत. त्याचेच पुढे दैनिक करू. लाहोरपेक्षा दिल्ली हे ठिकाण या गोष्टीला चांगले पण इलाज नाही. लाला लजपतराय हरकिसनलाल वगैरे मंडळी डायरेक्टर बोर्डात घालणार आहोत. तुम्हीहि आपले नाव घालू द्याल काय ? संपादक मंडळीचे एक बोर्डच नेमणार आहोत. सुरवातीचे भांडवल तीन लक्ष रुपये व शेअर १०० रुपयांचा असे योजले आहे. पहिल्या अंकाकरिता लेख किंवा निदान आशीर्वाद पाठवावा.

( ३० ) पंडित कृष्णशास्त्री यांचे टिळकाना पत्र

पुणे १० मे १९२०

मी पुण्यास काही हेतूने आलो. आपली भेट घेणे आहे. कर्नल ऑलकॉट यांचे वेळी अड्यार येथील ग्रंथसंग्रहालयाचा मी सात वर्षे अधिकारी होतो. पण मी थिऑसफिस्ट नाही. या अवधीत अनुभवाद्वैत या विषयावर ग्रंथ वाचला. ऑफ्रेट यानी या विषयावरील ग्रंथाचा आपल्या यादीत समावेश केला आहे हे आपणास माहीत असेलच. धर्म व तत्त्वज्ञान यांचा मी तुलनात्मक दृष्टीने अभ्यास करीत असतो. मी आतापर्यंत ५७ ग्रंथांचे प्रकाशन केले आहे व त्यावर सुमारे एक लक्ष रुपये खर्च केले आहेत. हल्ली पैशाचे अभावी पुस्तकप्रकाशनाचे काम मी थांबविले आहे. अनुभवाद्वैत यालाच सांख्ययोग हे दुसरे नाव आहे. ते शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानापेक्षा अधिक लोकसंग्रहकारक व व्यावहारिक आहे. गीतेचा अर्थ प्रवृत्तिपर तुम्ही लावला असे लोकानी मला सांगितले आहे. तरी मी आपले काम पुढे कसे चालवावे याविषयी तुमच्याकडून काही सूचना मिळतील अशी अपेक्षा आहे.

( ३१ ) व्ही. जे. पटेल यांचे टिळकाना पत्र

लंडन १२ मे १९२०

मी आल्यापासून ब्रिटिश कॉंग्रेस कमिटीच्या दोन सभा झाल्या. कमिटीने कॉंग्रेसकडे पैशाकरिता लिहिले आहे. एक हजार पौंड पाठविले असा जबाब आला. ते नेव्हिल याजकडे आले. पण आमच्याशी सहकारिता करून काम करण्याचा त्यांचा विचार दिसत नाही. स्टेट सेक्रेटरीकडे ते परभारेच बोलणे करणार असा रंग दिसतो. त्यांच्या सूचना नेमस्तानाहि नेमस्त वाटतील अशा आहेत. तरी कॉंग्रेसच्या नावाने बोलण्याचा नेव्हिल यांचा अधिकार यापुढे चालू देऊ

नये. लिबरलपक्षाच्या काही सभासदाना भेटत आहे. तसेच मजूरपक्षाचे दोन्ही उपपक्ष एकदिलाने या कामी वागतील अशी मी खटपट करीत आहे. बेझंट बाईच्या युनाइटेड इंडिया पत्राने मजवर टीका करूनच माझे स्वागत केले आहे!

(३२) जी पी. ब्लिझर्ड यांचे टिळकाना पत्र

लंडन १३ मे १९२०

काल ब्रिटिश कमिटीच्या सांगण्यावरून तुमच्याकडे मी तार केलीच आहे. पटेल यानीहि खालील अर्थाची तार केली आहे. 'पंजाबासंबंधी येथे जी काय चळवळ करावयाची ती सर्व कॉंग्रेस कमिटी मार्फतच झाली पाहिजे. त्याबद्दल येथे विशेष आग्रह आहे. नाही तर कदाचित् कमिटीहि मोडण्याचा संभव. नेव्हिल याना तार करून सर्व रिपोर्ट व फंडाचे पैसे ब्रिटिश कमिटीकडे देण्याला सांगा. ते स्वतंत्र रीतीने सरकारशी बोलणे चालणे करतात ते थांबले पाहिजे. कारण कॉंग्रेसच्या धोरणाशी ते विसंगत आहे. सर्व चळवळ पार्लमेंटमध्ये किंवा बाहेर करण्याची ती ब्रिटिश कमिटीच्या हातीच राहिली पाहिजे. तरी याकडे तावडतोब लक्ष द्यावे.

( ३३ ) ब्लीझर्ड यांचे टिळकाना पत्र

लंडन १४ मे १९२०

पूर्वीचे पत्र लिहिल्यानंतर नेव्हिल यानी आमच्याकडे पंजाबसंबंधी फंड व कॉंग्रेस कमिटीच्या रिपोर्टाच्या एक हजार प्रती देण्याचे कबूल केले आहे. हंटर कमिटीचा रिपोर्ट कॉंग्रेस कमिटीचा रिपोर्ट आणि येथील ब्रिटिश कॉंग्रेस कमिटीचा रिपोर्ट या सर्वांचा थोडक्यात सारांश काढून पार्लमेंटचे सभासद वर्तमानपत्रकर्ते व राजकीय संस्था यांच्याकडे पाठविण्याचा आमचा विचार आहे.

( ३४ ) डॉ. हर्डीकर यांचे गोखल्याना पत्र

न्यूयॉर्क १८ मे १९२०

पैसे तारेने पाठविल्यास बरे होईल. आमच्या संस्थेचे नाव बदलणे अत्यंत आवश्यक झाले आहे. याबद्दल मी पुण्यास व लालाजीना लिहिले होते. सध्या या ठिकाणी इंग्रजांच्या विरुद्ध बरीच खळबळ झाली असून उलट त्यानीहि आपले काम जोराने सुरू केले आहे. आमची संस्था तूर्त तिच्या नावामुळे कात्रीत सापडली आहे. विचार करीत आहो. शक्य असेल तर नाव बदलू. कॉंग्रेसच्या व पुण्याच्या संस्थेला कोणत्याहि तऱ्हेने बाध येणार नाही अशी खबरदारी घेऊ.

## ( ३५ ) फजलूल हक्क यांचे टिळकाना पत्र

कलकत्ता १९ मे १९२०

आपला देशी व्यापार बंदराबंदराने चालविण्याकरिता देशी व्यापारी गल-बते जरूर आहेत ही गोष्ट आपण जाणताच. अशी जहाजे नसल्यामुळे देशाचे फार नुकसान होत आहे. युरोपियन कंपन्यावर अवलंबून रहावे लागल्याने फार तोटा व गैरसोय होते. ही स्थिति पालटण्याकरता काही प्रयत्न करण्याचा आमचा प्रयत्न आहे. 'इंडो बर्मा स्टीम नॅव्हिगेशन कंपनी' या नावाची एक कंपनी आम्ही काढीत आहो. तिचे भांडवल पांच कोटी रुपये योजिले आहे. लाला हरकिसन लाल व व्योमकेश चक्रवर्ती यानी डायरेक्टर होण्याचे कबूल केले आहे. चितगांग येथील अबदुल रहमान यांची दर्यावर्दी पेढी विकत घेण्याचे आम्ही ठरविले आहे व ती थोड्या किंमतीला मिळणार आहे. एखादा जाणता युरोपियनहि नोकरीला ठेऊ. तरी आपण या कामात आम्हाला सहाय करावे व आपली सहानु-भूति असावी.

## ( ३६ ) विठ्ठलभाई पटेल यांचे टिळकाना पत्र

लंडन १९ मे १९२०

पूर्वी पत्र लिहिल्यानंतर ब्रिटिश कमिटीची सर्वसाधारण सभा पार्लमेंटच्या सभागृहात भरली होती. तिने एक स्पेशल कमिटी पंजाबच्या कामासंबंधाने नेम-ण्याचे ठरविले आहे. मि. नेव्हिल यांची योजना या कामावर करण्याचा विचार आहे. जूनमध्ये लंडन शहरी या प्रकरणी एक मोठी सभा भरवू म्हणतो. सेंट निहाल सिंग याना आमच्याशी सहकारिता करण्याची विनंति केली. पण ते पक्के असे काहीच बोलत नाहीत. त्यांचा विचार काय आहे न कळे. पार्लमेंटच्या सभासदांची मधून मधून गाठ घेत असतो. परंतु जॉइंट कमिटीची सभा पुनः होईपर्यंत रिफॉर्म ॲक्टाखालील नियमांची चर्चा होऊ शकत नाही. तथापि या नियमांच्या मसुद्यांची चर्चा खुद्द स्टेट सेक्रेटरीशी करण्याचा माझा विचार आहे व त्याकरिता त्याना मी लिहिले आहे. तुर्कस्तानचा प्रश्न निकालात निघाला. असहकारितेच्या चळवळीला कोणते स्वरूप येते याकडे इकडील लोकांचे लक्ष लागले आहे. सर्व हिंदुस्थानभर खिलाफतीच्या चळवळीबरोबर असहकारितेची चळवळ सुरू करण्याचे ठरले तर तीत पूर्ण जबाबदारीचे स्वराज्य एकदम देण्याची मागणी घालता येणार नाही का ? जर तशी मागणी घालता येण्या-सारखी असेल तर कितीहि स्वार्थत्याग पडला तरी ती चळवळ करावी असे मला वाटते.

### ( ३७ ) सकलातवाला यांचे टिळकाना पत्र

ट्विकनहॅन २० मे १९२०

वाइटाबरोबर काही चांगलेहि वारा वाहून नेतो. तसे बेझंटबाईनी जो हल्ली द्वाडपणा चालविला आहे त्या हकीगतीबरोबरच तुमच्या कडून जी पत्रे व पुस्तके आली ती वाचून फार समाधान वाटले. येथल्या लोकापुढे ही गोष्ट मांडतो. पण खरे सांगावयाचे तर त्या मॉंटेग्युसुधारणा ती पार्लमेंटरी कमिटी आणि तो बेझंट बाईचा वाद याकडे इकडे कोणीच लक्ष देत नाही. पांच वर्षांपूर्वी या ' चेटकी ' बाईपासून मी दूर राहिलो तर लंडन येथील माझ्या हिंदी स्नेह्यानी माझ्यावर कोण गहजब केला. असली माणसे म्हणजे दुधारी शस्त्रेच होत. त्यांचा उपयोग करून घ्यावा असा मोह होतो खरा. पण ती चूक आहे. आपण हिंदी लोकानी एकंदर जगातील चळवळीच्या दृष्टीने स्वराज्याच्या लढ्यात लढले पाहिजे. येथील लोकशाही मताचे लोक पार्लमेंट सभाच ' अप्रातिनिधिक ' म्हणून नाराज. तर तिकडे तुम्ही नव्या कौन्सिलाना पार्लमेंटच्या जोडीस नेऊ पाहता ! आपल्या इकडील हिंदी पंचायतीना थोडा नवा संस्कार देऊन सोव्हिएट पद्धतीवर नेऊन काम केले पाहिजे. तिकडे हिंदुस्थानात तुम्ही ' इंटर नॅशनल कम्युनिस्ट लेबर पक्ष ' का स्थापन करीत नाही ? तेथे असा पक्ष स्थापा व मला त्याचा प्रतिनिधि निवडा. म्हणजे तुमचा प्रतिनिधि म्हणून मी येथे लंडनमध्ये काम करीन.

### (३८) शौकतअली यांचे टिळकाना पत्र

मुंबई २६ मे १९२०

ता. १ जून रोजी अलाहाबाद येथे परिषद भरणार आहे. तरी आपण तेथे यावे. आम्ही शंभर प्रमुख लोकाना निमंत्रणे पाठविली आहेत. नेमस्त पुढाऱ्यानाहि बोलाविले आहे. हेतु हा की कोणाचीहि पुढे तक्रार राहू नये. काही मौलवीनाहि बोलाविले आहे. गेल्या २३ तारखेला पुण्यास मोठी सभा भरली होती असे कळले. मला वेळी कळते तर मीहि आलो असतो. कारण माझ्या राजकारणातील गुरूना मला अभिवादन करिता आले असते. महमदअली हा फ्रान्समध्ये हल्ली आहे. तो लिहितो की ' इंग्रज आमचे हितविरोधी आहेत. आणि फ्रान्स व इटली यांचीच काही झाली तर मदत होईल. सर्वांनी एकदिलाने प्रयत्न केल्यास काही फल हाती लागेल. '

### ( ३९ ) व्ही. जे. पटेल यांचे टिळकाना पत्र

लंडन ३ जून १९२०

या आठवड्यात अंडर सेक्रेटरीकडून एक पत्र आले. त्यावरून सुधारणांच्या कायद्याखाली होणाऱ्या नियमाविषयी सूचना व सुधारणा थोडथोड्या

लिहून पाठवीत आहे. थोड्याच दिवसानी मी समक्ष कमिटीपुढे हजर होईन. नियमांची चर्चा करण्याकरिता लॉर्ड सिंह यानी मला बोलाविले आहे. सर शंकरन नायर यांचा फार उपयोग झाला. स्पूर व वेजवुड याना मी माहिती देत आहे. हंटर कमिटीच्या रिपोर्टाचा सारांश काढून मी त्याना देतो. या वेळी इकडे पाच सहा पुढारी असते तर हवे होते. पण मी एकटाच आहे. इकडील वर्तमानपत्रातून काही उतारे पाठवीत आहे. बेझंटबाईनी पंजाब प्रकरणी प्रधानमंडळाचे समर्थन चालविले आहे असे समजते. नियमांचे काम कमिटीपुढे ऑगस्ट सप्टंबरपर्यंत चालेल. तुम्ही गुजराथेत जाणार होता त्याचे काय झाले. कदाचित कौन्सिल ऑफ स्टेटकरिता उमेदवार म्हणून उभे राहण्याचा माझा विचार आहे तरी उमेदवार म्हणून माझे नाव प्रसिद्ध करा व मजकरिता थोडी खटपट करा.

### ( ४० ) लजपतराय यांचे टिळकाना पत्र

लाहोर १० जून १९२०

हर्डीकरांची पत्रे पैशासंबंधाने आली. तूर्त त्याना एक हजार डॉलर पाठवावे. मात्र ते जपून खर्च करण्याला लिहावे. न्यूयॉर्क येथील ऑफिससंबंधाने केळकर याना सविस्तर पत्र लिहिले आहे ते ते तुम्हाला दाखवितीलच.

### ( ४१ ) पिसुर्लेकर यांचे टिळकाना पत्र

गोवा ११ जून १९२०

प्राचीन काळी अमेरिकेत हिंदू व बौद्ध लोकांच्या वसाहती झाल्या होत्या असे अनेक पाश्चात्य ग्रंथकारांच्या आधाराने मी एका पोर्तुगीज निबंधात दाखविले होते. ते मत काही युरोपियन पंडिताना मान्य झाल्याचे दिसते. तरी सोबत पाठविलेल्या निबंधाचे फ्रेंच भाषांतर पाहून आपला अभिप्राय कळवावा. आपल्या ग्रंथाची माहिती पोर्तुगीज वाचकास देण्याविषयी मी यथाशक्ति प्रयत्न करीत आहे व लिहिण्यास आनंद वाटतो की आपल्या आर्टिक होम इन दि वेदाज या ग्रंथातील मते कित्येक प्रमुख पोर्तुगीज लोकाना मान्य झाली आहेत.

### ( ४२ ) मुंजे यांचे टिळकाना पत्र

नागपूर १६ जून १९२०

अस्पृश्य वर्गाची परिषद नागपुरास कोल्हापूरचे महाराज यांचे अध्यक्षतेखाली भरावयाची आहे. राष्ट्रीयपक्षातील माझ्या एका स्नेह्यानेच ही परिषद नागपुरास बोलाविली आहे. त्याचे मला आलेले पत्र आपणास अवलोकनार्थ पाठवीत आहे. त्यातील सूचना स्वतः मला सर्वसाधारण रीत्या संमत आहेत. पण आपल्या हिंदुधर्मशास्त्राचा त्याला आधार असलेला बरा. स्थानिक किरकोळ वादातून तुम्ही आपले अंग काढून समाजधारणेच्या दृष्टीने महत्त्वाचे असे हिंदु-

धर्मशास्त्रावर पुस्तक लिहावे. ही मी सूचना आपणास कितीदा केली आहे ? गीता-रहस्याप्रमाणेच हा ग्रंथ लिहिल्याने या राष्ट्रावर तुमचे अगणित उपकार होणार आहेत. मी एक वेडगळ ध्येयाभ्यासी ( faddist ) आहे असे वाटल्यास म्हणा. पण मंडालेहून तुम्ही आल्यापासून मी जो आपल्या पाठीमागे या बाबतीत एकसारखा लागलो आहे याचे कारण आपणाशिवाय या बाबतीत मला दुसरा कोणीहि अधिकारी पुरुष दिसत नाही. हे सुचविताना मर्यादेचे अतिक्रमण झाले असल्यास क्षमा करावी.

### ( ४३ ) मिस नॉर्मैंटन बाईंचे टिळकांना पत्र

लंडन १७ जून १९२०

यासोबत एक हस्तपत्रक पाठवीत आहे. ते तुम्हाला पसंत पडेल असे मला वाटते. इंग्रज स्त्रियांची एक मोठी सभा मी भरवीत आहे व हिंदुस्थानातील स्त्रियांची वागवणूक व त्यांचे हक्क हे विषय सभेपुढे आणणार आहे. आमच्या वक्त्यापैकी एक जण बिशपच्या दर्जाचा आहे. लेडी कोर्टने याहि येणार आहेत. तुम्ही शिष्टमंडळाचे लोक पुनः परत येणार नाही का ? याल तर संधि बरी आहे. वक्त्यामध्ये हिंदी लोक नाहीत याची मोठी उणीव वाटते. तुम्ही गेल्यापासून आम्हाला चुकल्या चुकल्यासारखे वाटते व तुमच्याबद्दल इकडे लोक विचारतात. 'इंडिया' पत्राचे हल्लीचे धोरण तुम्हाला कसे काय आवडते ? कमांडर केनवर्दी म्हणत होते की हल्ली पार्लमेंटच्या सभासदाना इंडिया पत्राचा बराच उपयोग होतो. तुम्ही आपल्या सहीचा एखादा लेख 'इंडिया'ला पाठविणार नाही का ?

### ( ४४ ) दुर्गादास आडवानी यांचे केळकराना पत्र

कराची २५ जून १९२०

गतवर्षी पंजाब व सिंध या प्रांतात ज्या कित्येक गृहस्थाना तुरुंगाच्या शिक्षा झाल्या त्या लोकाना येत्या कौन्सिल निवडणुकीना नवीन कायद्याप्रमाणे उभे राहता येत नाही ही गोष्ट यापूर्वीच तुमच्या लक्षात आली असेल. अर्थात त्यानी निवडणुकीला उभे रहावयाचे तर त्यांच्यावरील नालायकीचा शेरा सरकारी हुकमाने निघाला पाहिजे व तो निघण्याला त्याना माफी देण्यात आली पाहिजे. तरी या बाबतीत टिळकांचा सल्ला घेऊन तुम्ही ताबडतोब विलायतेत पटेल याना तार कराल काय ? नियमांची इतर दुरुस्ती करिताना अशीहि एक दुरुस्ती झाली पाहिजे की राजद्रोहाच्या गुन्ह्याकरिता शिक्षा झालेल्या लोकाना निवडणुकीला उमेदवार म्हणून उभे राहण्याला हरकत होऊ नये. तरी पटेल याना ताबडतोब तार करावी.

### ( ४५ ) स्वामी श्रद्धानंद यांचे टिळकांना पत्र

कांगडी गुरुकुल १ जुलै १९२०

वैदिक मासिक व गुरुकुल समाचार याचा स्वतंत्र अंक आम्ही लवकरच काढणार आहोत. अनेक लोकांचे लेख मागविले आहेत. पण तुमच्या लेखाने या अंकाला विशेष शोभा येणार आहे. स्वामी दयानंद यांच्यासंबंधाने त्यांच्या कोणत्याहि कार्याला उद्देशून आपल्याला जे मनमोकळेपणाने लिहावेसे वाटेल ते लिहा.

### ( ४६ ) विठ्ठलभाई पटेल यांचे टिळकांना पत्र

लंडन ७ जुलै १९२०

लीड्स व ब्रॅडफोर्ड येथे जाऊन आलो. पंजाब प्रकरणी व्याख्याने दिली. स्वयंनिर्णयानुसार हिंदुस्थानाला स्वराज्य मिळावे असा ठराव मंजूर करून घेतला. ३ ऑगष्टच्या सुमाराला येथून निघतो. मी येथून लवकर निघावे असे मला अनेक स्नेहीमंडळीकडून लिहून आले आहे. पार्लमेंटरी पार्टीने असहकारितेसंबंधाने जो ठराव केला त्याविषयी बरीच चर्चा झाली. स्पूर व वेजवुड याना त्यासंबंधाने काहीच माहिती नाही. ते म्हणतात आम्ही हिंदी गृहस्थ असतो तर या चळवळीला जाऊन मिळालो असतो. पण आताच तुम्ही असे करा असा सल्ला आम्हाला या क्षणी देता येत नाही. बेझंटबाईनी लॅन्सबरी व स्कर यांच्या हातून तो ठराव करवून घेतला. क्लाइन्स यांचे म्हणणे असे की ही चळवळ हिंदुस्थानात झाल्याने आमचे हात खंबीर रहाणार नाहीत पण कोणी उलटहि म्हणतात. ब्रिटिश कमिटीचे काम चालावे तसे चालत नाही. मी समक्ष सर्व हकीकत सांगेन. बमनजीसाहेब भेटले. ते अलवारचे महाराज वगैरे लोक अशी खटपट करीत आहेत की चेम्सफर्ड यांचे जागी मॅांटेग्यू यांची नेमणूक व्हावी. पण त्याना ते माहीत नाही की चेम्सफर्ड याना परत बोलावले तर मॅांटेग्यू याना राजीनामा द्यावा लागेल.

### ( ४७ ) हिल्डा हॉसीन यांचे टिळकांना पत्र

लंडन ८ जुलै १९२०

येथे अनेक ठिकाणी सभांची व्यवस्था मी केली आहे. असहकारितेच्या चळवळीवर मी व्याख्यानात अजून कशाच प्रकारचा अभिप्राय देत नाही. कारण अजून त्या गोष्टीचा निर्णय राष्ट्रीय सभेकडून लागावयाचा आहे. पण तूर्त डायर ओडवायर चेम्सफर्ड यांच्या निषेधाचे ठराव मात्र मी करवीत आहे. व्याख्यानांचा सारांश मी पाठवून देईन. राष्ट्रसंघाची शाखा ज्या देशात आहे तेथे राष्ट्रीय सभेतर्फे मतप्रसाराचे काम करण्यासंबंधाने गेल्या राष्ट्रीय सभेत ठराव पसार झाला आहे. येथील एक ग्रंथप्रकाशक प्रारंभी ३००० पौंड घालून चहूकडे पुस्तके हस्तपत्रके छापून मतप्रसाराचे काम करीन म्हणतो तरी त्याचे हे ३०००

पौंड आपणास कर्ज म्हणून रहातील व ते आपणास द्यावे लागतील. वर्तमानपत्रे काढल्यास त्यांचे धोरण तुम्ही खापर्डे व मी वगैरे लोकानी ठरवावे असे म्हणते तरी या कामात पडावे की नाही ते कळवावे.

**(४८) डॉ. हर्डीकर यांचे केळकराना पत्र**

न्यूयॉर्क १२ जुलै १९२०.

यासोबत येथील स्वराज्य संघाच्या कामाचा अहवाल पाठविला आहे. येथे पैशाची फार टंचाई आहे. पण काँग्रेसकडून काही रकम आल्यास आम्ही अधिक काम करू शकू. प्रथम आम्ही ' यंग इंडिया ' पत्र काढले. हस्तपत्रके वगैरे सुमारे दहा लक्ष काढून वाटली. लहान पण हस्तपत्रकाहून मोठी अशीहि तीन पुस्तके काढून त्यांच्या पुष्कळ प्रती वाटल्या. व्याख्याने देतच आहोत. हिंदुस्थानविषयक पुस्तकांचे एक लहानसे दुकानच मांडले आहे म्हणाना. त्यांचा उपयोग व्याख्याने वगैरे देण्याकरिता येथील हिंदी विद्यार्थ्यांना होतो व काही अमेरिकन लोकहि पुस्तके घेतात. काही मोठ्या शहरी संघाच्या शाखा उघडण्याचा विचार आहे. महिन्यातून दोन बातमीपत्रे हिंदुस्थानास इकडून पाठवावयाची आणि विद्यार्थी व इतर कोणी याना लागेल ती माहिती पुरवावयाची असा विचार केला आहे. गेल्या तीस महिन्यात निरनिराळ्या प्रकारानी आम्हाला अठरा हजार डॉलर उत्पन्न झाले. त्यातच टिळकानी पाठविलेले सहा हजार डॉलर आहेत. पण निरनिराळे खर्च होऊन आता फक्त रोख हातात साडेतीनशे डॉलर व अठराशे पंचाहत्तर डॉलरचे शेअर्स असे आहेत. इकडील मतप्रसारावर काँग्रेसने खर्च केल्यास त्याचा चांगला उपयोग होईल. न्यूयॉर्कहून इतर सर्व देशात आम्हाला पत्रव्यवहाराला व इतर सर्व बाबतीत खुला दरवाजा मिळतो. त्याचा काँग्रेसने का उपयोग करून घेऊ नये ?

**( ४९ ) पटेल यांचे टिळकाना पत्र**

लंडन १४ जुलै १९२०

मी ता. ७ ऑगस्टला ' कैसरहिंद ' बोटीने निघतो. आपल्या पत्राची वाट पहात होतो पण शेवटी आगबोटीची तारीख निश्चित केली. स्पेशल काँग्रेसच्या आधी तिकडे येण्याची फार इच्छा आहे. जॉइंट कमिटीने मतदारीसंबंधाचे नियम केले ते फारसे उदारपणाचे नाहीत. त्याना काही उपसूचना देण्याची व्यवस्था मी करवितो. गेल्या आठवड्यात नॉटिंगहॅम व डर्बी येथे मी जाऊन दोन व्याख्याने दिली. मिसेस नायडू व मॉंटेग्यू यांच्या दरम्यान झालेला पत्रव्यवहार पाहण्यास पाठविला आहे. लष्करी कायदा सुरू असता पंजाबात स्त्रियाना किती वाईट वागविण्यात आले याची माहिती स्टेट सेक्रेटरीला नाही असा बाहाणा आहे व चौकशी करण्या-

करिता आता हुकूम देत आहेत ! पण चौकशी-साक्षीदार लोकाना धाक दपटशा दाखवून व तंबी देऊन पुराव्याची गळचेपी होईल असे वाटते.

ब्रिटिश काँग्रेस कमिटीची स्थिति समाधानकारक नाही. कमिटीचे सेक्रेटरी व 'इंडिया'पत्राच्या संपादक बाई यांची भांडणे सुरू आहेत. पार्लमेंटचे काही सभासद कमिटीवर घेतले आहेत. पण त्यातले कोणी अद्यापि कमिटीच्या सभेला आले नाहीत. ते म्हणतात की डॉ. क्लार्क यांचेपेक्षा अधिक कोणी तरी चलाख मनुष्य चेअरमन असावा. काही सभासद सेक्रेटरीच्या बाजूचे व काही संपादकांच्या बाजूचे आहेत. कमिटी मुख्यतः हॉर्निमन व मिस नॉर्मंटन यांच्या हाती आहे. स्पूर याना कमिटीचे चेअरमन करावे असे काही लोक सुचवितात. स्वतः डॉ. क्लार्क यांचे म्हणणे लॉर्ड क्लुईड ( हरबर्ट रॉबर्टस् ) हे चेअरमन होतील तर बरे. त्यावर मी म्हणालो की आता लिबरलपक्षाची संगत पुरे झाली. मजूरपक्षातील एखादा पुढारी पहा. सर शंकरन् नायर यांचे मत स्पूर याना चेअरमन करावे असे आहे. XXX तात्पर्य येथे एकदोन हिंदी गृहस्थ काँग्रेसतर्फे कायमचे राहतील अशी व्यवस्था होणे जरूर आहे.

इंटर कमिटीवरील वरिष्ठ सभेतील वादविवाद येत्या सोमवारी होणार आहे. हाऊस ऑफ कॉमन्समधील वाद आपण वाचलाच असेल. हिंदी लोकांच्या संमतीने आणि त्यांचा स्नेह संपादून राज्य चालविले पाहिजे असे मत मॉंटेग्यू-साहेबानी व्यक्त केले. पार्लमेंटमध्ये सात तास वादविवाद चालू होता. आणि हिंदुस्थान हे कोणत्या उपायानी ताब्यात ठेवावे याचाच तो मुख्यतः वाद होता.

### ( ५० ) हिल्डा हाऊसीन बाईंचे टिळकाना पत्र

लंडन २० जुलै १९२०

आम्ही नॉरफोल्क काउंटीत दौऱ्यावर गेलो होतो ते नुकतेच परत आलो. अनेक सभाना पाचशे पासून चार हजार पर्यंतहि गर्दी असे. चेम्सफर्ड ओड्वायर डायर यांची जाहीर चौकशी करावी व पंजाबच्या अत्याचारासंबंधी जे गुन्हे त्यांच्यावर लागू होतील त्याबद्दल त्याना शिक्षा द्यावी, तसेच हिंदुस्थानाला स्वराज्य द्यावे, अशा अर्थाचे ठराव प्रत्येक सभेतून पास झाले. पूर्वीचे अंडर सेक्रेटरी चार्लस् रॉबर्टस् व त्यांचे विरुद्ध मजूर पक्षाचे जॉर्ज एडवर्डस् हे निवडणुकीत उभे होते. एका सभेत चार्लस् रॉबर्टस् यानी चेम्सफर्ड याना हिंदुस्थानचा उपकारकर्ता असे म्हटले तेव्हा 'रौलेट ॲक्टाचाच उपकार नव्हे का?' असे मी मध्येच विचारले. तेव्हा ते निरुत्तर झाले. ॲंग्लो इंडियन लोक इकडे आपली शिकस्त करीत आहेत. मला कोणी विचारीत तेव्हा मी म्हणे की 'मी कोणत्याच राजकीय पक्षाची नाही. पण मजूर पक्षातली आहे. म्हणजे ज्या पक्षाला हिंदुस्थानाकरिता स्वातंत्र्य मागण्याचा हक्क आहे त्या पक्षातली आहे असे वाटेल तर म्हणा.'

## ( ५१ ) दप्तरी यांचे टिळकाना पत्र

नागपूर २२ जुलै १९२०

आपणाकडून मोघे व वाघोलीकर हे मदतीला आले त्याचे दुसऱ्या दिवसापासून कामास सुरवात केली आहे. सकाळी पाच पासून नऊ दहा पर्यंत मी करणग्रंथ सांगतो व ते लिहून घेतात. त्यांच्याबरोबर आमचे येथील एक ज्योतिषी अग्निहोत्री हेहि एक प्रत तयार करितात. अशा रीतीने या ग्रंथाच्या तीन प्रती तयार होत आहेत. दुपारी कोष्टके करण्याचे काम चालू असते. केतकरांच्या चंद्रमंदफल कोष्टकात कोठे कोठे १·५ कलांची चूक दिसून आल्यामुळे, व ते कोष्टक केतकरानी तिथी तिथीच्या अंतराने केल्यामुळे चूक होत असेल म्हणून ते करणाकरणाच्या अंतराने द्यावे असे इष्ट वाटल्यामुळे, ते कोष्टक पुनः करण्याची जरूरी दिसून आली. यामुळे त्याची सोपी रीती बसवून ते काम मोघे यांच्याकडे दिले आहे. या कोष्टकाचे ३६०० अंक तयार करावयाचे आहेत. प्रो. नाईक यांची शीघ्रफलासंबंधी सूचना होती त्यांचीहि एक सोपी रीत लॉगर्थमची बसवून ते काम वाघोलीकर याजकडे दिले आहे. आजपर्यंत ग्रंथाचे मध्यमाधिकार चंद्रसूर्य स्पष्टीकरण पंचागाधिकार त्रिप्रश्नाधिकार अंशतः झाले आहेत. हान्सेनचे अलमनॅक प्रमाण मानावे किंवा नॉटिकल प्रमाण मानावे हा मोठा प्रश्न आहे. मी हान्सेनच्या बाजूचा निर्णय करीन म्हणतो. तरी आपला अभिप्राय कळवावा. हर्षल व नेपच्यून यांचेहि गणित द्यावे काय ? मला खालील पुस्तके पाहिजेत.

1. Chamber's Mathematical Tables
2. Lunar Theory
3. Planatory Theory dealing specially with Jupitar and Saturn

शेवटची दोन पुस्तके केरोपंत छत्रे यांच्या ग्रंथसंग्रहात असावीत. ही सर्व मजकडे लौकर पाठवा.

## ( ५२ ) प्रो. विनयकुमार सरकार यांचे टिळकाना पत्र

न्यूयॉर्क २८ जुलै १९२०

माझे असे मत आहे की कला व शास्त्रे यामध्ये हिंदुस्थानची बरीच प्रगति झाली असल्याकारणाने तिकडील विद्वान् प्रोफेसर मंडळी इकडे यावी. तिकडील विद्यापीठे व परिषदा यांचा पुरस्कार घेऊन त्यानी इकडे यावे. इतर देशांचे प्रोफेसर अशाच हेतूने इकडे येतात व व्याख्याने देतात आणि सहानुभूति मिळवून

जातात. किंबहुना इकडे कायमची प्रोफेसराची जागा हिंदुस्थानने निर्माण करावी. आणि वर्षाच्या निम्या भागात एका देशात व निम्या भागात दुसऱ्या देशात हिंडून त्यानी व्याख्याने द्यावीत. इकडील विद्वान लोकांचे लक्ष देशी भाषामध्ये असलेल्या वाङ्मयाकडे लावण्याचा मी प्रयत्न करीत आहे. इकडे १९१६ च्या अंबर मी आलो. त्यानंतर मी निरनिराळी पुस्तके प्रसिद्ध केली आणि मासिकातून लेखहि लिहिले. असा एक प्रोफेसर नेमण्याला खर्च दरसाल दहा हजार रुपये व प्रवासखर्च १५०० रुपये येईल असे वाटते. सुचले ते आपणास लिहिले.

# भाग ७

## गीतारहस्य व इतर प्रबंध

### ( १ ) प्रास्ताविक

रिकाम्या हाताना काही तरी चाळा हा लागतोच. तो मनुष्यस्वभावच आहे. पण तो चाळा आसुरी असेल की दैवी असेल हे ' देणे ईश्वराचे. ' टिळकांचे हात फक्त तुरुंगवासाशिवाय मोकळे असे केव्हाहि फारसे नसत. पण ते मोकळे असत तेव्हा त्यांचा चाळा कोणत्या प्रकारचा असे हे आम्ही या ग्रंथाच्या पूर्वार्धाचे शेवटी सांगितलेच आहे. तुरुंगवासात हाताना चाळा करण्याला वेळ पुष्कळ पण तेथे साधने कमी. १८८२तली कैद साधी होती. तरी लिहिण्यावाचण्याचे साधन नव्हते. पण स्नेही आगरकर हे ' सांगाती ' असल्यामुळे त्यानी ते एकांतवासाचे व निरुद्योगीपणाचे चार महिने वादविवाद व चर्चा करून घालविले. १८९७–८ च्या तुरुंगवासात टिळकाना शिक्षा सक्तमजुरीची असल्यामुळे त्यांच्या हाताना चाळा जेलरने नेमून दिलेल्या कामाचाच असे. म्हणून काथ्या खोलणे रंग तयार करणे असली कामे त्यानी केली. १९०८च्या खटल्यात शिक्षा काळेपाण्याची म्हणून प्रथम सक्तमजुरीची. पण पुढे ती साधी करून टिळकाना सरकाराने मंडाले येथे नेऊन ठेवल्यावर लेखन वाचनाच्या व्यवसायाची साधनेहि त्याना देण्यात आली. यामुळे त्याना हाताचा चाळा मनाच्या आवडीप्रमाणे करिता आला. व तो त्यानी कोणता केला हे आता पाहू. हे पाहणाराला मुख्य सहाय टिळकांच्या चिरंजीवानी तीन वर्षांपूर्वी प्रसिद्ध केलेल्या. नावाच्या इंग्रजी पुस्तकाचे होईल. कारण या पुस्तकात आम्ही पुढे निर्दिष्ट केलेल्या काही ग्रंथांचा उल्लेख काहींची टिपणे व वेदांगज्योतिषावरील सबंध निबंध अशी छापलेली आहेत. पुस्तकात उल्लेखिलेले काही निबंध व ग्रंथ टिळकानी तुरुंगातून सुटून आल्यावर स्वतः छापविले. पण ' वेदांगज्योतिष ' हा निबंध त्यांच्या हातून छापून झाला नाही. म्हणून तो प्रसिद्ध करून त्यांच्या चिरंजीवानी वाचक वर्गावर मोठा उपकार केला आहे.

मंडाले येथील तुरुंगात हाती असलेल्या साधनांचा उपयोग करून जे ग्रंथ प्रबंध टिळकानी लिहिले त्यांची माहिती आम्ही पुढे देणारच आहो. तथापि रिकाम्या वेळात जे कोणकोणते ग्रन्थ लिहावयाचे म्हणून टिळक मनन करीत होते अशांची एक यादी उपलब्ध आहे. तीत खालील नावे मूळ इंग्रजीत लिहिलेली आहेत.

( १ ) हिंदुधर्माचा इतिहास–वैदिक श्रौत उपनिषदे इतिहास पुराणे दर्शने भक्ति. ऐतिहासिक कालापूर्वीचे–इतर धर्म व उपसंहार. ( २ ) हिंदु राष्ट्रधर्म ( वृत्तान्त व त्याच्या निरनिराळ्या अंगांचे वर्णन ) ( ३ ) रामायण महाभारत

यांच्या पूर्वीचा हिंदुस्थानचा इतिहास. ( ४ ) शांकरदर्शन ( अद्वैत ) ( ५ ) प्रांतिक राज्यव्यवस्था. ( ६ ) हिंदु लॉ किंवा हिंदुधर्मशास्त्र. ( ७ ) इन्फिनिटेसिमल कॅलक्युलस. ( ८ ) भगवद्गीतारहस्य–नीतिशास्त्र. ( ९ ) शिवाजीचे चरित्र. ( १० ) खाल्डिया व हिंदुस्थान.

## भाग—( राजकीय विषयक )

( १ ) प्रास्ताविक ( २ ) वर्णाधिराज्य–चातुर्वर्ण्य ( ३ ) (हिंदु) राज्य व साम्राज्य ( ४ ) बुद्ध युग–शक राजे. पुनरुज्जीवन (५) मुसलमानांच्या आधीची राज्ये व मुसलमानी साम्राज्य. ( ६ ) मुसलमानी राज्याचा ऱ्हास–मराठे शीख वगैरे ( ७ ) इंग्रजांची राज्यस्थापना ( ८ ) इंग्लंडच्या राजाच्या अमलाखालचा कारभार (राज्यघटना) ( ९ ) राज्यसत्तेचे एकीकरण ( १० ) नोकरशाही व तिचे ध्येय ( स्पेन आस्ट्रिया रशिया वगैरे देशातील नोकरशाहीशी तुलना ) ( ११ ) सुधारणा व प्रगति ( दोन निरनिराळी मते ) ( १२ ) हितविरोधाचा परिहार.

ही यादी एरवीच एवढी मोठी आहे की तींत लिहिलेले ग्रन्थ टिळकांच्या पद्धतीने संपूर्ण सांगोपांग लिहावयाचे तर त्याला कोणाचा एक जन्महि पुरता ना. वरील यादीच्या मथळ्यावर इतकाच मजकूर आहे की “खाली लिहिलेले ग्रन्थ योजले आहेत किंवा ते लिहावे असे मनात येत.” यादीत ‘वेदांगज्योतिष’ या ग्रंथाचा उल्लेख नाही. तथापि त्याच प्रबंधावर कार्तिक शुद्ध प्रतिपदा शके १८३५ व तारीख ३० आक्टोबर १९१३ हा दिवस स्वतः टिळकांच्या हाताने लिहिलेला आढळतो. पण ही तारीख ‘गीतारहस्य’ लिहून झाल्यानंतरची आहे. उलट खुद्द गीतारहस्य हे याच यादीत क्रमांक ८ला दिलेले आहे. आणि त्याच ग्रंथापुढे Ethics किंवा नीतिशास्त्र असा आणखी स्पष्ट उल्लेख असल्यामुळे टिळकानी लिहिलेले व हल्ली प्रसिद्ध झालेले हेच ते पुस्तक होय दुसरे कोणते नव्हे यांत शंका राहात नाही. दुसरे पक्षी क्रमांक १० या ठिकाणी उल्लेखिलेल्या म्हणजे ‘खाल्डिया व हिंदुस्थान’ या विषयावरचा निबंध टिळकानी मंडालेहून पुण्यास परत आल्यानंतर १९१७ साली डॉ. भांडारकर यांच्या स्मरणार्थ प्रसिद्ध झालेल्या निबंध संग्रहाकरिता लिहिला. तात्पर्य या यादीवरून निर्णायक असे अनुमान काही निघत नाही. कसे ते पहा. वेदांग–ज्योतिष हा प्रबंध गीतारहस्य लिहून झाल्यावर मंडाले येथील तुरुंगातच लिहिला. पण त्याचा यादीत उल्लेख नाही. गीतारहस्याचा उल्लेख यादीत आहे पण योजलेला किंवा मनात आलेला ग्रन्थ असाच त्याचा उल्लेख आहे. व खाल्डिया आणि हिंदुस्थान हा प्रबंध पुढे १९१७ साली लिहून झाला त्याचाहि याच यादीत उल्लेख आहे! तथापि त्यातल्या त्यात निश्चित अनुमान काढावयाचे तर ते असे वाटते की ही यादी हाताने लिहिताना वेदांग ज्योतिषावर ग्रंथ प्रबंध लिहिण्याचे टिळकांच्या मनात नसावे. मात्र गीतारहस्य

लिहून झाल्यावर तोच प्रबंध लिहावासा वाटला व यादीत नव्हता तरी तो लिहिला. उरलेल्या वेळात कदाचित यादीतील आणखी काही ग्रन्थ लिहून झाले असते. पण इतक्या ग्रन्थाना लागणारी साधने तुरुंगात कोठून मिळणार ? आधीच गीता-रहस्याकरिता व वेदांग ज्योतिषाकरिता मागविलेल्या ग्रंथांचा संग्रह शेकड्यानी मोजण्याइतका झाला होता. तेव्हा आणखी पुस्तके किती मागवणार? वेदांग ज्योतिषाला लागणारी पुस्तके थोडी व तो विषय मनात तयार म्हणून गीता रहस्यानंतर टिळकानी तोच प्रबंध लिहून पुरा केला असावा असे वाटते.

वरील यादीशिवाय लेखनविषयक अशा दोन संकल्पांचाहि उद्देश मंडाले येथील कागदोपत्रात व टिपणात उल्लेखिलेला आढळतो. एक संकल्प ओरायन ( अग्रहायन ) किंवा वेदांचे प्राचीनत्व या ग्रंथाची दुसरी आवृत्ति तयार करण्याविषयीचा. व दुसरा संकल्प आर्यांचे वसतिस्थान या ग्रंथाच्या सुधारून काढण्याच्या दुसऱ्या आवृत्तिविषयीचा.

या प्रत्येक नव्या आवृत्तीला उपयोगी पडणारे ग्रंथ निबंध इत्यादिकांचे टिपण टिळकानी तपशीलवार केलेले आढळते. मंडालेहून परत आल्यावर दुसरे वर्षी १९१५ साली ' संस्कृतसंशोधन ' नामक पुस्तकाकरिता "एक अनुपलब्ध सांख्यकारिका" या विषयावर टिळकानी एक निबंध इंग्रजीत लिहिला तोहि हल्ली छापून प्रसिद्ध झाला आहे. या विषयाचा उल्लेख वर दिलेल्या यादीत नाही. तथापि हा विषय मंडाले येथे असताना व तत्पूर्वीहि टिळकांच्या डोक्यात नव्हता असे म्हणवत नाही. कारण या विषयावर डॉ. गर्दे वगैरे लोकाशी त्यांची केव्हा केव्हा झालेली संभाषणे अनेकांच्या ऐकण्यात आहेत.

असो. प्रस्तुत जे प्रकरण आम्ही लिहित आहो त्याशी वरील यादीचा संबंध केवळ प्रस्तावनात्मक आहे. त्या यादीवरून इतकाच अर्थ घ्यावयाचा की, आम्ही प्रारंभी म्हटल्याप्रमाणे, तुरुंगात रिकामा वेळ सापडल्यामुळे टिळकांच्या ग्रंथकर्तृत्वाची व प्रबंधरचनेची बुद्धि विशेष स्फुरण पावू लागली होती. किंबहुना किंचित् ग्राम्य शब्दाची योजना करून आम्ही असेहि म्हणू की उपवासग्रस्त मनुष्याला जसे हे खाऊ का ते खाऊ असे होऊन जाते त्याप्रमाणे रिकाम्या फुरसतीचा अवधि अवचित लाभलेल्या टिळकांच्या प्रतिभेला संशोधक बुद्धीला आणि प्रतिष्ठितप्रज्ञेला हे लिहू का ते लिहू असेच बहुधा झाले असावे.

कोणाहि चांगल्या ग्रंथकाराची स्थिति अशीच असते की त्याच्या मनाने योजिलेले सर्व ग्रंथ लिहून होण्याइतके आयुष्यच त्याला लाभत नाही. आणि टिळकानी जरी तुरुंगातील रिकामेपणात बसल्या बसल्या संकल्पित ग्रंथांची लांबलचक माळ तयार केली असली तरी ती व्यर्थ होती हे त्यांचे त्यानाहि माहीतच होते. कारण तुरुंगात असे तोपर्यंत आवश्यक ती सर्व साधने मिळणारी नव्हती व तुरुंगातून सुटून बाहेर गेल्यावर इतर कामाचा व्याप सहजच इतका वाढणार की त्यात एखाद्या संकल्पित ग्रंथाकडे पहाण्याला वेळ मिळणे अशक्य.

मंडाले येथे गीतारहस्याखेरीज त्यातल्यात्यात मोठा असा प्रबंध टिळकानी हाती घेतला तो वेदांग ज्योतिषाचा. पण तुरुंगात असता तो जितका लिहून झाला तितकाच तो पुढेहि राहिला. बाहेर आल्यावर तो त्यानी पुरा केला नाही. 'खाल्डिया व हिंदुस्थान' व 'अनुपलब्ध सांख्यकारिका' हे निबंध तुरुंगातून सुटून आल्यावर त्यानी लिहिले पण ते फारच लहान आहेत. ते प्रत्यक्ष लिहिण्याला त्याना चार-दोन दिवसापेक्षा अधिक वेळ लागला नसावा. सुटून आल्यावर त्यानी ग्रंथ-विषयक काम केले ते फक्त गीतारहस्यासंबंधी. पण हा ग्रंथ बहुतेक तुरुंगातच लिहून झाला होता. बाहेर आल्यावर टिळकानी मुख्यतः काम केले ते इतकेच की छपाईकरिता सर्व ग्रंथ नीट लिहून काढला. काही टीपा लिहिल्या. तुरुंगात असताना जे काही ग्रंथ संदर्भ हाताशी आले नव्हते ते हुडकून काढून तपासून जागच्या जागी नोंदवून घेतले. व हस्तलिखित प्रत निरनिराळ्या लोकाना वाचावयास देऊन किंवा तोंडाने मुद्दे सांगून त्यातील विषयांची चर्चा केली. टिळकानी १९०८चा खटला होण्यापूर्वी काम पुष्कळच केले. तथापि १९१४ साली सुटून आल्यावर त्यानी ते अधिक केले. व परिस्थितिहि अशीच होती की पूर्वीपेक्षा अधिक काम करणे त्याना आवश्यक झाले. हा आमचा तुलनात्मक सिद्धांत बरोबर आहे किंवा नाही हे प्रस्तुत चरित्रग्रंथातल्या पहिल्या खंडातील हकीकत व तिसऱ्या खंडातील हकीगत वाचणाऱ्याच्या लक्षात येइल. होमरूलची चळवळ कॉंग्रेसची चळवळ विलायतेतील चळवळ दौरे चिरोल केस इत्यादि कामे इतकी मोठी होती की त्यानी टिळकांच्या आयुष्याच्या शेवटच्या सहा वर्षातील बहुतेक सगळा वेळ खाल्ला. आणि मंडालेच्या तुरुंगात बसून त्यानी ज्या संकल्पित ग्रंथांची भली मोठी याद तयार केली त्यातील एखाद दुसरा ग्रंथ नवीन लिहिण्याचे काम तडीस नेण्याच्या त्यांच्या आवडत्या कामाला वेळच मिळाला नाही.

कामकरी व उद्योगप्रिय मनुष्याला कोणतेहि काम केले तरी तेच समाधान व तोच आनंद असतो ही गोष्ट एका अर्थी खरी. पण कामकरी मनुष्याची देखील स्वतःची हौस म्हणून काही असतेच. परेच्छेचे नियंत्रण काही नसता, परिस्थितीचा पाश मुळीच न पडता, केवळ स्वतंत्र इच्छेने व अभिरुचीने जर मनुष्याला काम करावयाला मिळेल तर प्रत्यक्ष तो जे काम करतो त्याहून एखादे वेगळे काम त्याने उचलले असते असे अनेक ठिकाणी आढळते. मनुष्याची आवड अभिरुचि हौस यांच्यावर वैयक्तिक धर्माचे किंवा राष्ट्रधर्माचे वर्चस्व पडून सार्वजनिक कर्तव्य म्हणून एखाद्या कामाला श्रेष्ठ प्रतीचा मान तो देईल. पण त्यावरून त्याची अभिरुचि किंवा आवड ही ठरत नाहीत. प्रोफेसर होऊन ग्रंथ लिहिणे व शिकविणे या कामाकडे टिळकांचे मन राजकारणाच्या ऐन गर्दीत एखादे वेळी जाई. व ते तिकडे गेले असे दिसण्यासारखा एखादा उद्गार त्यांच्या तोंडून निघे. यावरून वरील सिद्धांतच सिद्ध होतो. गिरणीतील मजुरी करणारी स्त्री आपल्या व आपल्या बाळाकरिता आवश्यक संसारकृत्य म्हणून गिरणी खात्यात कोठेहि काम करीत

असली तरी, घरी राहिलेल्या मुलाला पाजावयाचे अगर जेऊ घालावयाचे ही आकांक्षा जशी तिच्या मनात सदैव जागृत रहाते व कामाच्या धुमश्चक्रीत त्याची तिला मधून मधून आठवण होते, त्याप्रमाणेच कर्तव्य व अभिरुचि या दोहोंच्या कात्रीत सांपडलेल्या ग्रंथकाराची स्थिति असते. ग्रंथविषयक अपत्यप्रेम अगर वात्सल्य याविषयी प्रतिभासंपन्न विद्वान ग्रंथकार आणि गिरणीत मोलमजुरी करणारी स्त्री ही दोन्ही एकाच भूमिकेवर उभी असतात असे म्हणण्यास हरकत नाही.

असो. चालू प्रकरणात मुख्य स्थान गीतारहस्य या ग्रंथालाच येत आहे. परंतु त्याविषयी लिहू लागण्यापूर्वी ज्या इतर दोनतीन प्रबंधांचा उल्लेख आम्ही वर केला आहे त्यांच्याशी हि वाचकांचा थोडा फार परिचय करून देणे योग्य आहे म्हणून प्रथम ते करितो.

## ( २ ) खाल्डियन व भारतीय वेद

या विषयावर टिळकानी पूर्वी १९०४ सालीच मुंबई प्रेसिडेन्सी असोसिएशनच्या दिवाणखान्यात व्याख्यान दिले होते. तो दिवस ६ डिसेंबर १९०४ हा होता. सभा 'पदवीधर संघा'च्या विद्यमाने भरली होती. अध्यक्षाचे जागी पारशी पंडित के. आर. कामा हे होते. त्याच विषयावर पुढे १३ वर्षांनी भांडारकर स्मारक ग्रन्थाकरिता संपादकांच्या विनंतिवरून टिळकानी एक निबंध लिहिला. त्याचा थोडक्यात सारांश असाः–"१९ व्या शतकात एक मोठी गोष्ट घडली ती अशी की मेसोपोटेमियाच्या प्राचीन इष्टिका, म्हणजे मातीच्या भाजलेल्या विटा, यावर कोरलेले लिहिलेले अनेक लेख संशोधकाना सापडले. आणि युरोपियन पंडितानी मोठ्या चातुर्याने कल्पकतेने व परिश्रमाने ते लावून वाचले व त्यांची भाषांतरे केली. त्या लेखांवरून असे दिसते की ख्रिस्ती शकापूर्वी सुमारे पांच हजार वर्षे युफ्रेटीस नदीचे काठी तुराणियन वंशाचे लोक राहात होते. हे मूळ उत्तर आशियाखंडातून तिकडे गेले असावे. त्या लोकांच्या या लेखाना युरोपियन पंडितानी खाल्डियन लोकांचे वेद अशी संज्ञा दिली आहे व ती यथार्थहि आहे. या लोकांची संस्कृति व सुधारणा उत्तरेकडे पसरली व तिच्याशी हिंदुस्थानातील लोकांचा संबंध आसीरियन समाजाचे द्वारे आला. ते कसेहि असो. मी भारतीय वेदाचा काल सुमारे पांच हजार वर्षांइतका जुना ठरविला आहे व खाल्डियन लोकांच्या या वेदाचा कालहि युरोपियन पंडितानी तोच ठरविला आहे. या दोन समकालीन वेदांमध्ये म्हणजे वेद निर्माण करणाऱ्या लोकामध्ये समुद्र किंवा भूमि यांच्या द्वारे काही तरी दळणवळण असले पाहिजे व ते असल्याचा पुरावा वेदातील काही शब्दांवरून मिळतो. असा एक शब्द सिन्धू हा होय. प्रो. साईस यांच्या मताप्रमाणे बाबिलोनियन भाषेत सिन्धू या शब्दाचा अर्थ पातळ विणलेले वस्त्र असा आहे. आणि हिंदुस्थानातील सिन्धू नदीच्या द्वारे खाल्डियामध्ये ही वस्त्रे व्यापारी नेत असतील म्हणून त्या वस्त्राला लक्षणेने सिन्धू हाच शब्द लावण्यात

आला असेल. याच्या उलट खाल्डियन लोकापासून वेदकालीन लोकानी घेतलेला ' मण ' हा शब्द असावा. १९०७ साली एशियामायनरमध्ये संशोधकानी खणती लावून काही वस्तू काढल्या त्यात 'हितिती' लोकांचा राजा व 'मितानी' राजा यांच्यामध्ये झालेला एक तहनामा निघाला आहे. त्याचा काल खि. पू. १४०० वर्षांचा असावा. या तहात उभय राष्ट्रांच्या देवतांची नावे आहेत. त्यात मित्र वरुण इन्द्र अश्विन वगैरे वैदिक नावे आहेत. वरील राजे पर्शियन होते. भारतीय नव्हते. तथापि देवांची नावे वैदिक यात शंका नाही. याच क्रमाने १४०० च्या पूर्वीहि बरेच जाता येते. आणि असे आढळते की आपल्या अथर्व वेदातील पुष्कळसे शब्द या खाल्डियन वेदसंहितेतील आहेत. भारतीय लोक देव पूजक व सत्विभूतिपूजक. याच्या उलट खाल्डियन वगैरे लोक हे भूतपिशाच्च राक्षस यांची पूजा करणारे आढळतात. अथर्व वेदात मंत्र तंत्र जारण मारण उच्चाटन विषप्रयोग जादूटोणा अशा प्रकारच्या आचारविचारांचा भरणा पुष्कळ आहे. आणि अथर्व वेद हा मूळचा भारतीय नसावा. कारण ऋक् यजुः साम हेच तीन मुख्य वेद होत व या तिहीना मिळून वेदत्रयी म्हणतात. आणि त्यातील धर्म तो त्रयी धर्म. अथर्व वेद हा या तिहीहून अर्वाचीन आहे. तरी ब्राह्मणे व उपनिषदे यांत अथर्वाचा उल्लेख असल्यामुळे तो दोनतीन हजार वर्षांपूर्वीचा असला पाहिजे. या अथर्व वेदात तैमात आलिगी विलिगी उरुगुलाय ताबूव वगैरे शब्द सापडतात. त्यांचा उच्चारच विदेशीय असा कानाला लागतो. तैमात वगैरे शब्द येणारे मंत्र विष उतरविण्याच्या प्रयोगात म्हणतात. हे कित्येक शब्द सर्प वाचक आहेत. मात्र या पलीकडे या शब्दांचे ज्ञान नव्हते. पण इष्टिकालेख सापडल्यापासून याविषयी ज्ञान अधिक झाले आहे. तैमात अपोदक वगैरे शब्द सर्पवाचक होत. पण सृष्टीच्या उत्पत्तीसंबंधीच्या कथातून ते येतात. हे शब्द वैदिक लोकानी घेतले तेव्हा ते आणि खाल्डियन लोक हे बरेच निकट रहात असावेत निदान त्यांच्यामध्ये व्यापाराचे दळणवळण असावे. या संसर्गाने तिकडचे शब्द व मंत्रहि आले आणि यज्ञात्मकधर्म अपभ्रष्ट होताना त्यात ते मंत्ररूपाने शिरले असावे. जारण मारणादि विद्या अर्थात् हीन मानली गेली आहे. त्यातूनहि ती विदेशी म्हणून अथर्व वेदाला कमीपणा सहजच येतो. अथर्व वेदात असे इतर अनेक विदेशीय शब्द आहेत. कैरात हा शब्द असाच म्हणजे किरात नावाच्या रानटी लोकासंबंधीचा असून तोहि सर्पवाचक आहे. बायबलातील जुन्या करारामध्ये सांगितलेल्या सृष्टीच्या उत्पत्तीचा व प्रळयाचा प्रकार खाल्डियन लोकापासूनच घेतलेला आहे. व हा शोध लागला तेव्हा खिस्ती भट पंडितात मोठी चळवळ झाली. पण बायबलातील इतर काही प्रसंग म्हणजे स्वर्गातील मनुष्याचा अधःपात सर्पाने ईव्हला केलेला वामोपदेश इत्यादि हेहि खाल्डियन लोकापासून घेतलेले असावे. खिस्ती जिहोव्हा हा शब्द खाल्डियन यव्हे हाच होय. व या शब्दाजवळजवळ असणारे असे अनेक शब्द संस्कृत वेदातहि आहेत. म्हणून यव्ह हा

शब्द मूळ वैदिक असावा व खाल्डियन लोकानी तो संस्कृत आर्यांपासून घेतला असावा. सिन्धू हा शब्द असा घेतला हे सिद्धच आहे. पाताळातील समुद्रात देव-दानवांची युद्धे झाल्याची कथा संस्कृत वेदाप्रमाणे खाल्डियन वेदातहि आहे. इकडे वृत्र तसा तिकडे तैमात. संस्कृत वेदातील अप्सुजित हा शब्द खाल्डियन वेदातील अफ‍ज़ू या शब्दाजवळजवळ आहे. अफ‍ज़ू हा खाल्डियन दैत्य व मार-दुक हा खाल्डियन इंद्र. त्यांचे युद्ध पाताळातील समुद्रातच झाले. उरू हा शब्द खाल्डियन व संस्कृत वेदात एकच आढळतो. 'सिनि वाली' हा शब्द तसाच आहे. खाल्डियन इतू व वेदिक ऋतू हेहि लक्षणार्थाने असेच जवळजवळ आहेत. आणि शब्द जवळजवळ असण्याचे कारण त्यांच्या कल्पना जवळजवळ हे होय. आमच्या इकडील सप्त पाताळ व सप्त स्वर्ग यांची कल्पना खाल्डियन वाङ्मयात आढळते. शेषाप्रमाणे खाल्डियन तैमात सर्पालाहि सात डोकी होती. व इन्द्र हा जसा सप्ताहन् म्हणजे सात डोक्यांच्या सर्पाला मारणारा तसाच मार्दुक हाहि तैमा-ताला मारणारा आहे.

या निबंधातील विचारसरणी व मुख्य विषय वरीलप्रमाणे आहे. तथापि त्यात विचार केलेले व विचिकित्सिलेले सगळे शब्द येथे दिले नाहीत. वरील शब्दा-र्थांवरून निघणारी अनुमाने बरोबर असतील तर त्यांवरून खाल्डियन य संस्कृत आर्य या दोन्ही वंशांचे मूळ वसतिस्थान एकच असावे असे अनुमान करण्यास जागा आहे. व खाल्डियन वेद आणि भारतीय वेद यांचा तुलनात्मक अभ्यास केला तर दोहोनीहि परस्परांपासून शब्द व कल्पना घेतल्या असल्या पाहिजेत हे अधिकाधिक दिसून येईल.

## (३) सांडलेली सांख्यकारिका

या लहानशा निबंधात टिळकानी अनुमानाने स्वतः एक सांख्यकारिका बनवून दिली आहे. ती अशी–

कारणमीश्वरमेके पुरुषं कालं परे स्वभावं वा ।
प्रजाः कथं निर्गुणतो व्यक्तः कालः स्वभावश्च ॥

ही कारिका नवीन बनविण्याचे कारण सांगणे हाच या निबंधाचा हेतू आहे व ती कारणे अशी.

"ईश्वरकृष्ण याच्या सांख्यकारिका हा सांख्य तत्त्वज्ञानावरील सर्वांत जुना ग्रंथ होय. कित्येकांच्या मते सांख्य प्रवचनसूत्रे ही कारिकाहून जुनी आहेत. पण दोहोंची तुलना करिता त्यातील अर्थ शब्दशः सारखाच आढळतो. फरक इतकाच की सूत्रे गद्यात्मक आहेत आणि कारिका या आर्यावृत्तात आहेत. सांख्य तत्त्वज्ञान हे जगाची उत्क्रांति वर्णन करणारे शास्त्र असल्यामुळे युरोपियन पंडितानी त्याकडे पुष्कळ लक्ष दिले आहे. कारिकांची भाषांतरे लॅटिन जर्मन फ्रेंच इंग्लिश या भाषात झाली आहेत. या कारिकांवर भाष्य

णारा गौडपाद हा शंकराचार्यांचा गुरु जो गौडपाद तोच असावा किंवा काय या विषयी मतभेद आहे. ते कसेहि असो. या कारिका व त्यावरील एक भाष्य यांचे चिनी भाषेत भाषांतर 'परमार्थ' याने केलेले आहे. हा भाषांतरकार बौद्धधर्मी होता. गौडपादाचे भाष्य उपलब्ध आहे पण हे दुसरे उपलब्ध नाही. सांख्यतत्त्वकौमुदी या नावाची एक टीका याच कारिकांवर आहे ती 'वाचस्पति मिश्र' याने लिहिली आहे. ती तितकी प्राचीन नाही. बुइल्सनसाहेबाने छापलेल्या कारिकांच्या प्रतीत एकंदर ७२ आर्या आहेत. त्यातील शेवटल्या तिहींत ईश्वरकृष्ण याची गुरुपरंपरा वर्णिलेली आहे. आणि 'मी ईश्वरकृष्ण याने षष्ठितंत्रावरून सत्तर आर्यांत सांख्यशास्त्र आणले' असे लिहिले आहे. पण या उल्लेखावरून एक विरोध उत्पन्न होतो. एकंदर छापलेल्या कारिका ७२. स्वतः ईश्वरकृष्ण म्हणतो की मूळ ग्रंथ ७० आर्यांचा आहे. पण वरीलप्रमाणे तीन आर्या अवांतर म्हणून सोडून दिल्या तर फक्त ६९ उरतात. तसेच गौडपादाचे भाष्य पाहिले तर तो स्वतः त्यात ७० कारिका आहेत असे स्पष्ट लिहितो. पण त्याच्या भाष्याची शेवटची कारिका संख्येने ६९ वी आहे. अर्थात् या सत्तरातील एक कारिका अनुपलब्ध खरी. मग ती कोणत्याहि रीतीने सांडली गहाळ झाली असो. पण शेवटल्या तीन कारिकांतील एक जमेला धरून ७० कराव्या हे कोणाहि संपादकास किंवा संशोधकास मान्य नाही. दुसरे पक्षी चिनी भाषांतरात फक्त ७१ कारिका आहेत पण बुइल्सनच्या प्रतीतील ६३ वी कारिका त्यात नाही. ती अर्थातच चुकीने गळलेली असावी व तसे मानले असता चिनी भाषांतरातील मूळ कारिकाहि ७२ च असाव्यात. पण संस्कृतात जसे या कारिकाना आर्यासप्तति असे नाव आहे तसेच चिनीत सुवर्णसप्तति असेच आहे. यावरून मुख्य विषयात्मक ग्रंथाच्या सत्तर आर्या असाव्या हे निर्विवाद सिद्ध होते.

मग ही सांडलेली गळलेली कारिका कोणची असावी ? टिळकांच्या मते ती हल्लीच्या ६१ व्या व ६२ व्या कारिकांच्या मध्यंतरी असावी. व ती गळली किंवा सांडली नसती तर हल्लीच्या ६२ व्या कारिकेला ६३ हा आकडा मिळून पुढे त्या क्रमाने क्रमांक चालू झाला असता. ६१ वी कारिका अशी आहे—

> प्रकृतेः सुकुमारतरं न किंचिदस्तीतिमे मतिर्भवति
> या दृष्टास्मीतिपुनर्नदर्शनमुपैति पुरुषस्य ॥

याचा अर्थ असा की ''प्रकृतीहून अधिक सुकुमारतर ( सूक्ष्म ) असे काही नाही. सांख्यतत्त्वज्ञानाप्रमाणे प्रकृति हेच जगाचे मूळ कारण आहे. पण सुकुमारतर हा शब्द तुलनात्मक असल्यामुळे तुलनाविषयक अशी इतर काही जगत् कारणे असली पाहिजेत. म्हणजे ती आहेत असे इतर कोणी म्हणत असले पाहिजे व त्या म्हणण्याचा परिहार करून तुलनात्मक अनुमानपद्धतीने प्रकृति हेच खरे जगत्कारण शिल्लक उरते असा सिद्धांत बांधला गेला असला पाहिजे. अशी इतर कारणे म्हणजे ईश्वर पुरुष काल आणि स्वभाव ही कोणी मानीत असल्याचे गौडपादाच्या भाष्यावरून दिसते. पण पहिली दोन म्हणजे ईश्वर व पुरुष हे निर्गुण

असल्यामुळे सगुण अशा जगताच्या उत्पत्तीचे ते कारण होऊ शकत नाही. आणि काल व स्वभाव हे व्यक्त असल्यामुळे तेहि अव्यक्त अशी जी प्रकृति तिच्या पूर्वी असणे शक्य नाही अशी ही अनुमानपरंपरा आहे.

टिळक म्हणतात "हे भाष्य वाचताना मला अशी कल्पना आली की वर जी चार इतर मानीव कारणे सांगून त्यांचा परिहार केला ती भाष्यकाराने आपल्याच जबाबदारीवर उल्लेखिली नसली पाहिजेत. उलट 'तत्र सुकुमारतरं वर्णयति' या भाष्यातील शब्दावरून वर्णन करणारा हा स्वतः भाष्यकार असा अर्थ अभिप्रेत नाही तर मूळ कारिका रचणारा असाच असला पाहिजे. शिवाय भाष्यात 'इतर कारणे इतर कोणी मानतात' अशा अर्थाचे शब्द आहेत. व ते प्रतीकात्मक असावेत. म्हणून असे वाटते की हल्ली नष्ट असलेली एकादी कारिका गौडपादाच्या डोळ्यापुढे असावी व तीत इतर मानीव कारणांचा उल्लेख असल्यामुळे ६१ व्या कारिकेत तुलनात्मक असा 'सुकुमारतर' हा शब्द घातला असावा. २७ व्या कारिकेवरील भाष्यातहि या चार कारणांची चर्चा आलेली आहे. परंतु तेथे 'सुकुमारतरं वर्णयति' असे शब्द आलेले नाहीत. व त्या ठिकाणी या चार कारणांचे पद्धतशीर खंडनहि नाही. यावरून हल्लीच्या ६१ व्या कारिकेपुढे हल्ली अनुपलब्ध असलेली कारिका असावी. या कारिकेचे शब्द प्रत्यक्ष कोणते असतील हे सांगणे कठीण आहे. तथापि खाली दिल्याप्रमाणे ती कारिका असावी निदान तशी ती लिहिली असता लुप्त कारिकेतील अर्थ बरोबर येईल असे वाटते. व ती नवी रचलेली कारिका वर सांगितल्याप्रमाणे 'कारणमीश्वरमेके' इ० ही असावी. कारण या दोन ओळीत इतर चारी कारणांचा उल्लेख असून परिहारार्ह येतो. आणि अशी कारिका नसेल तर सांख्यांच्या मुख्य सिद्धांताचा उल्लेख अपुरा व अस्पष्ट राहणार. नवीन सुचविलेली कारिका ही केवळ संख्येची भरती करण्याकरता नव्हे तर विषयपूर्ततेकरताहि अवश्य आहे. भाष्याचा हा भाग प्रक्षिप्त नाही. चिनी भाषांतरात हा सर्व विषय स्पष्ट व अधिक सविस्तरहि आहे. व पूर्वपक्ष उत्तरपक्ष दर्शक शब्द म्हणजे 'अपरे ब्रुवते' 'अत्र आहुः' या शब्दाची भाषांतरे चिनीवरून केलेल्या फ्रेंच भाषांतरात आहेत. फक्त त्या भाष्याचे मूळचे संस्कृत शब्द आज उपलब्ध नाहीत. श्वेताश्वतर उपनिषदामध्ये स्वभाव काल ईश्वर इत्यादि कारणांचा उल्लेख असून फक्त ईश्वर हेच कारण उपनिषदाने निश्चित केले आहे. पण ईश्वरकृष्ण हा निरीश्वरवादी आहे. म्हणून तो ईश्वर हे कारण मानीत नाही. ते कसेहि असो. अशा प्रकारची चर्चा जी उपनिषदात आहे ती सांख्य कारिकातहि असणारच. आणि ती चर्चा हल्लीच्या ६९ मुख्य कारिकात कोठेहि नाही. म्हणून सांडलेली सत्तरावी कारिका 'कारणमीश्वर मेके' या किंवा त्याच अर्थाच्या शब्दानी रचलेली मुळात असली पाहिजे."

## (४) वेदांग ज्योतिष

'वेदांग ज्योतिष' हा प्रबंध वरील दोन प्रबंधाहून पुष्कळच मोठा आहे. त्याची सुमारे छापील १०० पाने झालेली आहेत. पहिल्या भागात या विषयाची प्रस्तावना टिळकानी लिहिली आहे तीत ते म्हणतात-"वेदोत्तरकालीन इतिहासाच्या व वाङ्मयाच्या अनुपूर्वीचा निश्चय करण्याला अनेक खुणा मिळतात तशा वेदकालासंबंधी मिळत नाहीत. युरोपियन पंडितानी वैदिक वाङ्मयाचे निरनिराळे थर पृथ्वीच्या पोटातील थराप्रमाणे मानलेले असून प्रत्येक थर बनण्याला अमुक एक वर्षे लागतील असे गृहीत धरून कालगणना केली आहे. पण त्याप्रमाणे वेदकाल ख्रि. पू. २५०० वर्षांहून मागे जात नाही. म्हणून ओरायन किंवा अग्रहायन या नावाच्या ग्रंथात यातील चूक मी दाखवून दिली आहे. प्रो. जॅकोबी यानीहि माझ्याप्रमाणे वेदाचा काल ४॥ ते ५ हजार वर्षांइतका जुना ठरविला आहे. दोघानीहि मुख्यतः आधार घेतले ते वेदातील ज्योतिर्गणितवाचक शब्दांचे. अनेक युरोपियन पंडितानी भारतीय ज्योतिषशास्त्रासंबंधाने लेख लिहिलेले आहेत. अर्थात् वेदांग ज्योतिष हा जो त्यातील सर्वांत प्राचीन ग्रंथ त्याचाहि त्यानी विचार केला. पण त्याच्याहि पूर्वी ज्योतिर्गणितासंबंधी विचार करणारे किंवा उल्लेख करणारे अनेक प्रबंध असले पाहिजेत. या विषयावर निरनिराळ्या युरोपियन पंडितांचे झालेले वाद सांगण्याचे कारण नाही. त्यातील चर्चा मुख्यतः वेदोत्तरकालीन ज्योतिषग्रंथाविषयी आहे. प्रत्यक्ष वेदातील ज्योतिषविषयक उल्लेखांची चर्चा थोडी आहे. प्रो. वेबर यानी वैदिक नक्षत्रावर १८६०-६२ साली दोन ग्रंथ प्रसिद्ध केले. त्यानी बहुतेक सर्व उल्लेखांचा संग्रह केला आहे. व त्यानंतर आणखी सापडलेले ज्योतिषविषयक उल्लेख फारच थोडे आहेत. फक्त नक्षत्रचक्राचा प्रारंभ कृत्तिकापासून असल्याचे वेबर याने मानिले ते चूक असून मृगशीर्षापासून तो प्रारंभ मानिला पाहिजे. व तसे झाले असता वेदाचे प्राचीनत्व ४।५ हजार वर्षांपर्यंत मागे जाते ही गोष्ट निराळी. इतके सांगितल्यावर टिळकानी इकडील पंचांग शोधनाचा थोडासा इतिहास दिला आहे पण तो पूर्वी अनेक ठिकाणी आल्याने आम्ही येथे त्याचा पुनः उल्लेख करीत नाही.

दुसऱ्या भागात टिळकानी वेदकालीन पंचांगाची माहिती दिली आहे.हे पंचांग वेदाचे एक अंगच मानितात. आणि वेदपठणामध्ये संहितेनंतर जी अंगे वेदपाठी म्हणतात त्यात वेदांग ज्योतिषाचाहि भाग म्हणतात. युरोपियन पंडितानी वेदांग ज्योतिष छापले आहे. पण त्यांतील काही थोड्या श्लोकांखेरीज बाकीच्यांचा त्याना अर्थ कळला नाही. त्यामुळे त्यानी त्याला योग्य ते महत्त्वहि दिले नाही. परंतु कै० शंकर बाळकृष्ण दीक्षित लाला छोटेलाल पं. सुधाकर द्विवेदी यानी त्यातील पुष्कळसे श्लोक लावून दाखविले व त्यावरून वेदकालीन पंचांग कसे होते हे चांगले कळून येते. वेदांग ज्योतिष हा मोठा सिद्धांत ग्रंथ नव्हे. परंतु त्यावरून वेद-

कालीन ज्योतिष्याला सामान्य गणिताने तिथी नक्षत्र वगैरे गोष्टी काढता येत असत. तसेच त्यामध्ये स्तवन चांद्र नाक्षत्र व सौर अशा निरनिराळ्या कालगणनांचा मेळ घालण्याची व्यवस्था केलेली आहे. सूर्य व चंद्र हे धनिष्ठामध्ये असता तेथून गणनारंभ करावा व राशिचक्राचे २७ सारखे भाग कल्पून त्या प्रत्येकातील मुख्य तारकेला वेगवेगळे नक्षत्रनाम द्यावे वगैरे व्यवस्था वेदांग ज्योतिषात आहे. या ग्रंथात निरनिराळ्या ऋतूंचा प्रारंभ केव्हा होतो हे दिले आहे. पण त्याच्या कर्त्याला अयनगतीची माहिती नव्हती. यामुळे ऋतूंची आरंभस्थाने या ग्रंथात सांगितली तशीच अनुभवाला येत नाहीत. राशि हा शब्दहि वेदांग ज्योतिषात येतो. पण ज्याना आपण बारा राशी असे म्हणतो त्याच्या कल्पनेशी त्या शब्दाचा काही संबंध नाही. तर तो शब्द केवळ संख्यावाचक आहे ! वेदांग ज्योतिषातील ग्रहगतीचे मान व तदनुसार कालगणना ही अर्थात फार स्थूल होती. यामुळे त्यावरून कालगणना चालू ठेवणाराना चुका आढळून येऊ लागल्या विरोध दिसू लागले व फरक पडू लागले. परंतु शं. बा. दीक्षित यानी असे सिद्ध केले आहे की वेदकाली जे पंचांग सुरू होते तेच त्यानंतर वैदिक वाङ्मयाच्या ब्राह्मण निर्दिष्ट कालातहि प्रचलित होते. दोन्ही काळी नक्षत्रांची संख्या क्रम एकच होता. फक्त वेदांग ज्योतिषात धनिष्ठा नक्षत्री युगारंभ मानिलेला आहे तो ब्राह्मणकाली व संहिताकाली तसा मानिलेला नाहीं.

* ऋग्वेदीय व यजुर्वेदीय असे वेदांग ज्योतिषाचे दोन पाठ आहेत. पैकी ऋग्वेदी पाठ वैदिकांच्या म्हणण्यात आहे तसा यजुर्वेदी नाही. भारतीयांच्या ज्योतिषविषयक ग्रंथात वेदांग ज्योतिषाइतका प्राचीनग्रंथ उपलब्ध नाही. यामुळे ऐतिहासिक दृष्टीने प्राचीनत्वाचा मान तर या ग्रंथास आहेच. पण यातील अयनविषयक उल्लेखामुळे त्याचा रचनाकाल ठरविण्याचेहि साधन मिळते. ही त्यातील विशेष महत्त्वाची बाब आहे. या विशेषामुळेच कोलबुक जोन्स वगैरे युरोपियन संशोधकांचे लक्ष वेदांग ज्योतिषाकडे फार पूर्वीपासून वेधले. जर्व्हिसने इ. स. १८३४ मध्ये ऋग्वेदी पाठ Indian Metrology या ग्रंथात छापला आणि वेबरने १८७२ मध्ये दोनहि पाठांच्या हस्तलिखित पोथ्या मिळवून या ग्रंथाची संहिता लोकापुढे मांडली. परंतु व्याकरणदृष्ट्या या ग्रंथात अनेक अशुद्ध पाठ फार पूर्वीपासून शिरले आहेत. यामुळे व ग्रंथातील भाषेत संक्षेपाकडे विशेष लक्ष दिले गेल्यामुळे यातील फारच थोड्या श्लोकांचा अर्थ त्या वेळच्या संशोधकाना लावता आला. त्यानंतर डॉ. थिबो यानी इ. स. १८७७ मध्ये वेदांग ज्योतिषातील काही श्लोक लावले. आणि कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित

---

*वेदांग ज्योतिषावरील टिळकांच्या निबंधाचा यापुढील सारांश या विषयाचा परिश्रमपूर्वक व आवर्जाने अभ्यास करणारे आमचे स्नेही श्री. **दत्तोपंत आपटे** यानी आमच्या विनंतिवरून लिहून दिला ही गोष्ट येथे नमूद करणे अवश्य आहे आणि हे सहाय्य केले याकरिता आम्ही त्यांचे आभारी आहो. **ग्रंथकर्ता.**

यानी यापुढे बरीच मजल मारून इ. स. १८९६ मध्ये बऱ्याच श्लोकांचा अर्थ लावला व वेदांगज्योतिषातील गणिताची उपपत्ति 'भारतीय ज्योतिःशास्त्र' या ग्रंथात प्रसिद्ध केली. तथापि वेदांगज्योतिषातील १२ श्लोक त्यानाहि लागले नव्हते. त्यातले बरेच लावण्याचा प्रयत्न लाला छोटेलाल यानी केला आणि १९०६ मध्ये त्यानी 'बार्हस्पत्य' या टोपण नावाने हिंदुस्थानरिव्ह्यू मध्ये आणि १९०७ मध्ये ग्रंथरूपाने सर्व श्लोकांचा अर्थ देऊन प्रसिद्ध केला. अर्थात त्यानी दिलेल्या अर्थावर आक्षेप घेण्यास अनेक ठिकाणी जागा होती तिचा फायदा घेऊन काशीस्थ पंडित सुधाकर द्विवेदी यानी वेदांगज्योतिषाची नवी आवृत्ती काढली. त्यात श्लोकाखाली 'सुधाकरभाष्य' या नावाची नवीन अर्थबोधिनी टीका देऊन 'सोमाकरभाष्य' नावाची जुनी टीकाहि संग्रहीत केली. ही टीका १९०८ मध्ये प्रसिद्ध झाली. तिच्यात लाला छोटेलाल यांच्या ग्रंथातील दोषस्थले सांगण्याचा प्रयत्न ठिकठिकाणी केलेला आहे. द्विवेदी यानी सुचविलेले नवीन अर्थ मान्य करण्यास मुख्य अडचण ही आहे की त्यानी प्रचलित पाठ सोडून नवीन काल्पनिक पाठ घेऊन अर्थ लावला आहे. तथापि द्विवेदी यांच्या ग्रंथामुळे लाला छोटेलाल यांच्या ग्रंथावर कोणकोणत्या ठिकाणी आक्षेप घेण्यास जागा आहे हे समजून घेण्यास एक चांगले साधन निर्माण झाले. वेदांगज्योतिषाच्या वादास वर सांगितल्याप्रमाणे स्वरूप आले त्या सुमारास टिळकाना मंडालेच्या तुरुंगाकडे रवाना करण्यात आले. कैदेत जाण्यापूर्वी वरील दोनहि विद्वानांची पुस्तके त्यांच्याकडे अभिप्रायार्थ आली होती. यामुळे त्या ग्रंथाचे सूक्ष्म अध्ययन करून वादविषयक बारा श्लोकांचा अर्थ लावण्यासंबंधी आपले मत काय आहे ते टिळकानी आपल्या या पर्यालोचनात्मक व अभिप्रायात्मक लेखात नमूद केले आहे.

वेदांग ज्योतिषाचे सूक्ष्म अध्ययन करताना टिळकानी प्रथम सर्व श्लोकांची वर्णानुक्रमसूची तयार करून त्यात शंकर बाळकृष्ण दिक्षित यांच्या वेळेपर्यंत कोणते श्लोक लागले होते व वाद कोणत्या श्लोकासंबंधी राहिला होता हे नक्की ठरविले. त्या वेळचे टिळकांच्या हातचे एक टिपण कित्येकांच्या पाहण्यात आहे ते येथे देतो. त्यात पहिल्या रकान्यात अक्षरानुक्रमाने श्लोकांचा प्रथम चरण, दुसऱ्या रकान्यात याजुष ज्योतिषातील श्लोकाचा अनुक्रमांक, तिसऱ्यात ऋक् ज्योतिषातील अनुक्रमांक आणि चौथ्यात दिक्षिताना कोणता श्लोक लागला होता हे स्पष्टपणे दाखविण्यासाठी 'दि' हे अक्षर योजले आहे. त्याचप्रमाणे टिळकानी विवेचिलेले श्लोक कोणते हे समजण्यासाठी डावीकडील अनुक्रमांक जाड्या टाईपात घेतला आहे.

# वेदांग ज्योतिषांतील श्लोकांची सूची

| | यअ | ऋअ | | | यअ | ऋअ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ अग्निः प्रजापतिः सोमो | ३२ | २५ | दि | २६ पंचात्रिंशं शतं पौष्णं | ३० | — | दि |
| २ अतीतपर्वभागेभ्यः शोध | २२ | २० | – | २७ पंचसंवत्सरमयं | १ | १ | दि |
| ३ इत्युपायसमुद्देशो भूयो | ४२ | २४ | दि | २८ पलानि पंचाशदपां | २४ | १७ | दि |
| ४ इत्येतन्मासवर्षाणां | — | २९ | दि | २९ प्रणम्य शिरसा कालं | — | २ | दि |
| ५ उग्राण्यार्द्रा च चित्रा च | ३६ | — | दि | ३० प्रथमं सप्तमं चाहुरय | ९ | ८ | दि |
| ६ उदया वासवस्य स्युः | २९ | — | दि | ३१ प्रपद्येते श्रविष्ठादौ सूर्या | ७ | ६ | दि |
| ७ एकादशाभिरभ्यस्य पर्वाणि | २५ | — | दि | ३२ भांशास्युरष्टकाः कार्या | १५ | १० | – |
| ८ एकांतरेऽन्हि मासे च | ११ | — | दि | ३३ माघशुक्लप्रपन्नस्य | ५ | ३२ | दि |
| ९ कला दश सविंशा | ३८ | १६ | दि | ३४ यथा शिखा मयूराणां | ४ | ३५ | दि |
| १० कार्या भांशाष्टकास्थाने | १९ | ११ | | ३५ यदर्धं दिनभागानां | ४१ | २३ | दि |
| ११ घर्मवृद्धिरपां प्रस्थः | ८ | ७ | दि | ३६ यदुत्तरस्यायनतो | ४० | २२ | दि |
| १२ चतुर्दशीमुपवसथस्तथा | — | ३४ | दि | ३७ याः पर्वभादानकलाः | २१ | २१ | दि |
| १३ जावाद्यंशैः समं विद्यात् | १७ | १५ | | ३८ विषुवंतं द्विरभ्यस्तं | २३ | — | दि |
| १४ जौद्रागः खेश्वेहिरोषा | १८ | १४ | दि | विषुवं तद्गुणं द्वाभ्यां | — | ३१ | दि |
| १५ ज्योतिषामयनं कृत्स्नं | २ | ३ | दि | ३९ विष्णुर्वसवो वरुणो | ३४ | २७ | दि |
| १६ तिथिमेकादशाभ्यस्तां | २० | — | – | ४० वसुस्त्वष्टाभवोजश्च | १० | ९ | दि |
| १७ तृतीयं नवमीं चैव | — | ३३ | दि | ४१ वेदाहि यज्ञार्थं | ३ | ३६ | दि |
| १८ त्रिंशत्यन्हां सषट्षष्टिरब्दः | २८ | — | दि | ४२ श्रविष्ठाभ्यां | — | १९ | दि |
| १९ त्र्यंशी भशेषो दिवसांश | २७ | १२ | दि | ४३ सविता त्वष्टाथ | ३३ | २६ | दि |
| २० दुहेयं पर्वचेत्पादे पादः | १२ | — | – | ४४ ससप्तकं भयुक् | ३९ | १८ | दि |
| २१ ध्यूनं द्विषष्ठिभागे | ३७ | — | दि | ४५ सावनेंदुस्तृमा | ३१ | — | दि |
| २२ नक्षत्रदेवता ह्येता | ३५ | २८ | दि | ४६ सूर्यर्क्षभागान्न | २६ | — | – |
| २३ नवकैरुद्गतोंशः स्यादूनः | १६ | — | – | ४७ सोमसूर्यस्तृ | ४३ | ३० | दि |
| २४ निरेकं द्वादशाभ्यस्तं | १३ | ४ | दि | ४८ स्युःपादोर्ध्वे | १४ | — | – |
| २५ पक्षात्पंचदशादूर्ध्वम् | — | १३ | – | ४९ स्वराक्रमेते सो | ६ | ५ | दि |

दोनहि वेदांगातील मिळून श्लोकसंख्या ४९ आहे. त्यापैकी थिबोच्या वेळेपर्यंत २३ श्लोक लागले होते. शंकर बाळकृष्ण दीक्षित यानी आणखी १४ श्लोक लावले. मिळून न लागलेले श्लोक (४९ – ३७)=१२ होते. त्यातील बरेच श्लोक व पूर्वी लागलेल्यापैकी काही यांचे विवेचन लोकमान्यानी आपल्या लेखात केले आहे. त्यातील मुद्दे समजण्यास हे लक्षात ठेवले पाहिजे की वेदांगज्योतिषात सूर्य व चंद्र यांचे मध्यमगणित तेवढे दिलेले आहे. स्पष्ट व सूक्ष्म

गणित त्यात दिलेले नाही. त्यातहि प्रथम पर्वांती आणि नंतर तिथ्यंती सूर्यचंद्रांचे स्थान काय होते; म्हणजे ते कोणत्या नक्षत्राच्या कोणत्या अंशावर होते व त्या नक्षत्रात त्यांनी प्रवेश केल्याचा काळ कोणता हे त्यात ठरविले आहे. सारांश सूर्यचंद्रांच्या नक्षत्रप्रवेशकालापासून पर्वांत व तिथ्यंत होईपर्यंतचा कलात्मक काल सांगणे हा या गणिताचा विषय आहे. पैकी चंद्रसूर्यांचे नक्षत्रांश काढण्याची रीति सांगणारा श्लोक असा आहे.

भांशास्युरष्टकाः कार्याः पक्षा द्वादशकोद्गताः ।
एकादशगुणस्योनः शुक्लेऽर्धं चैदंवा यदि ॥

ऋ. १०; य. १५.

वरील श्लोकात ऋक्पाठ 'गुणस्योनः' असा आहे त्याजागी यजुःपाठ 'गुणश्चोनः' असा आहे व तोच बहुतेकानी ग्राह्य ठरविला आहे. पण द्विवेदी यानी 'स्योनः' बद्दल 'श्चेन्दोः' 'अष्टकाः' बद्दल 'इष्टका' असा नवीन काल्पनिक पाठ घेतला आहे आणि 'द्वादशक' याचा अर्थ (बारा महिन्याचे) वर्ष असा केला आहे. इतकी ओढाताण करूनहि द्विवेदी याना 'इंदवा यदि' हे शब्द निरर्थक आहेत असे म्हटल्यावाचून श्लोक लावता येत नाही. लोकमान्यांच्या मताने हे काल्पनिक पाठ तर अग्राह्य आहेतच पण याखेरीज बार्हस्पत्य व द्विवेदी यानी लावलेला अर्थहि बरोबर नाही. त्यातल्यात्यात या श्लोकातील 'ऊन' या शब्दाचा अर्थ दोघानीहि 'उणा=कमी' असा केला आहे त्याऐवजी भागाकारात शेवटी जी बाकी राहते तिचा पर्याय म्हणून 'ऊन' हा शब्द या ठिकाणी वापरला आहे असे लोकमान्यानी आपले मत दिले आहे. उदाहरणार्थ

९३ पक्ष = ७ द्वादशक + ९ ऊन

असे या परिभाषेचे स्वरूप ठरते. ते लक्षात ठेऊन वरील श्लोकाचा अर्थ असा होतो "पक्षांच्या 'द्वादशकाना' आठानी गुणून व 'ऊना' ना अकरानी गुणून (त्यांची बेरीज केली असता), (पर्वांतीचे) नक्षत्रांश होतात. परंतु शुक्लपक्षांतीच्या चंद्राचे नक्षत्रांश पाहिजे असल्यास निमे नक्षत्रांश (=१२४÷२=६२) त्यात आणखी मिळवावे." यावरून या श्लोकातील पहिल्या ३ चरणात सामान्य नियम दिला आहे व चौथ्या चरणात या नियमाचा अपवाद सांगितला आहे. उदाहरणार्थ ९३ व्या पक्षांती चंद्रसूर्यांचे स्थान निश्चित करावयाचे असल्यास

९३ पक्ष = ७ द्वादशक + ९ ऊन

∴ नक्षत्रांश = ७ × ८ + ९ × ११
= ५६ + ९९ = १५५
= (१५५ − १२४) = ३१

हे सूर्याचे पर्वांश झाले; परंतु ९३ वा शुक्लपक्ष असल्यामुळे चंद्राचे पर्वांश काढावयाचे असल्यास ते ३१ + ६२ = ९३ येतील. अशा रीतीने कोणत्याही

पर्वाच्या अंती चंद्र व सूर्य यांचे ( नक्षत्रांश म्हणजे ) स्थान सहज ठरविता येते. पंचसंवत्सरात्मक एका युगात १२४ पर्व असतात व प्रत्येक पर्वांती चंद्रसूर्य कोणत्या अंशावर असतात याचे साद्यंत गणित कै. दीक्षित यानी दिले आहे व त्यातील तत्त्व बार्हस्पत्य व द्विवेदी यानाहि मान्य आहे. पण गणिताची रीत निर्विवाद असली तरी ती या श्लोकातून कशी निघते हे कोडे पूर्वीच्या संशोधकाना उलगडले नव्हते; याचे कारण 'ऊन' या शब्दाचा अर्थ त्यांच्या लक्षात आला नव्हता हे आहे. 'ऊन' याचा अर्थ भागाकारात राहणारी 'बाकी' असा या ठिकाणी केला पाहिजे ही लोकमान्यांची सूचना मान्य केल्यास आणखी काही श्लोकांची संगति लावणे सोपे जाते.

चंद्रसूर्यांचे पर्वान्तीचे स्थान निश्चित केल्यानंतर या पर्वांशावरून चंद्राच्या पर्वनक्षत्राचा 'कलात्मक' प्रवेशकाल काढण्याची रीति अशी आहे.

कार्याः भांशाष्टकास्थाने कला एकान्नविंशतिः ।
ऊनस्थाने द्विसप्ततीरुद्वपेद् ऊनसंमिताः ॥

ऋ. ११; य. १९

याचा अर्थ "नक्षत्रांशाच्या प्रत्येक आठक्यास १९ कला आणि ऊनाच्या आंकड्यात ऊनाची ७२ पट मिळवावी." यात श्लोकाच्या पूर्वार्धाबद्दल वाद नाही. कारण एका युगात १२४ पक्ष व तेवढ्यात चंद्र १८०९ नक्षत्रे चालतो; तेव्हा १२ पक्षात तो $\frac{१८०९ \times १२}{१२४} = १७५\frac{८}{१२४}$ नक्षत्रे चालतो. चंद्रास १ नक्षत्र चालण्यास १ दिवस व ७ कला लागतात; त्या अर्थी १७५ नक्षत्रे संपवून १७६ व्या नक्षत्राचा प्रवेशकाल १७७ दिवस व १९ कला असा येतो. यावरून पुरे दिवस सोडून कलांचा हिशेब करावयाचा असल्यास बारा पक्षांच्या अंतीच्या नक्षत्राचा प्रवेशकाल १९ कला असा सांगता येईल. अशा रीतीने या श्लोकातील पूर्वार्धाची उपपत्ति चांगल्या रीतीने लागते व त्यात 'भांशाष्टकास्थाने' याचा संबंध पूर्वी दिलेल्या 'पक्षद्वादशकोद्गत' 'भांशाष्टका'शी आहे असेहि ठरते.

या श्लोकातील उत्तरार्धाची उपपत्ति मात्र बार्हस्पत्य याना चांगली लावता आली नाही; याचे कारण त्यात दोन वेळा आलेला 'ऊन' शब्द त्याना समजला नाही. लोकमान्यांच्या मते 'ऊन' याचा अर्थ 'बाकी' असा घेऊन या उत्तरार्धात चंद्राचा नक्षत्रप्रवेशकाल काढण्याची रीत अर्धीच दिली आहे; व तिची पूर्ती पुढच्या श्लोकात झाली आहे.

उदाहरणार्थ १८ व्या पक्षांच्या अंतीच्या नक्षत्राचा प्रवेशकाल काढावयाचा आहे असे समजल्यास

१८ पक्ष = १ द्वादशक + ६ ऊन

पैकी श्लोकाच्या पूर्वार्धावरून १ द्वादशका अखेरचा नाक्षत्रप्रवेशकाल १९ कला हा आला; तेव्हा ऊन पक्षापुरतेच गणीत करावयाचे राहिले. त्यास प्रारंभी उत्तरा-

र्धात सांगितलेला संस्कार करून ( ६ + ६ × ७२ =) ६ × ७३ हा आकडा आला. यास 'भशेष' अशी संज्ञा देता येते. या भशेषावरून नक्षत्राचा कलात्मक प्रवेशकाल काढता येतो. तो प्रकार लक्षात येण्यासाठी थोडी उपपत्ति लक्षात घेतली पाहिजे ती अशी.

चंद्र एका युगात ( १२४ पक्षात ) १८०९ नक्षत्रे चालतो. यावरून एका पक्षात त्याची गति $\frac{१८०९}{१२४}$ = १४ $\frac{७३}{१२४}$ नक्षत्रे ( एक नक्षत्र = १२४ अंश हे लक्षात ठेवल्यास ) = १४ नक्षत्रे + ७३ भांश अशी ठरते. केवळ भांशाचाच विचार केल्यास एका पक्षाचे भांश म्हणजे (७३ = ६२ + ११ =) $\frac{१}{२}$ नक्षत्र + ११ अंश अशी मांडणी करता येईल व ऊनपक्षांची संख्या बारापेक्षा नेहेमी कमी असल्यामुळे पक्षांच्या निंपट नक्षत्रे व ११ पट अंश असा नियम देता येईल. पण ७।९।११ या पक्षांच्या वेळी नक्षत्राचे अपूर्णांक व पुढले ११ पटीचे अंश मिळून एक पूर्ण नक्षत्र होऊ शकते. शिवाय श्लोकाच्या पूर्वार्धात सांगितल्याप्रमाणे द्वादशकांच्या आठपटीने येणारे भांश लक्षात घेतले असता पूर्ण नक्षत्रांची संख्या काढताना केवळ पक्षांची निंपट करून भागत नाही हे लक्षात येण्याजोगे आहे. अशा रीतीने भशेष म्हणजे काय व पूर्ण नक्षत्रांची संख्या कशी काढावी हे ध्यानात आल्यावर

> त्र्यंशी भशेषो दिवसांशभागश्चतुर्दशस्याप्यपनीतभिन्नम् ।
> भार्धेधिके चाधिगते परेंशे द्वावुत्तमैकं नवकैरवेद्यम् ॥
>
> ऋ. १२; य. २७

यातील पूर्वार्धाचा अर्थ असा. "भशेषाचा व दिवसांश भागाचा चारतृतियांश घेतला असता अपूर्णांक सोडून १४ व्या नक्षत्राच्या (पक्षांतीच्या) कला येतात." याची उपपत्ति अशी:—वेदांगातील परिभाषेप्रमाणे चंद्रास एक नक्षत्र चालण्यास एक दिवस + ७ कला हा काल लागतो. तेव्हा १४ नक्षत्रे चालण्यास १४ दिवस + ९८ कला लागतील. पण मागे सांगितल्याप्रमाणे एका पक्षाचा भशेष ७३ आहे. आणि भशेषाचा $\frac{४}{३}$ म्हणजे ($\frac{७३}{१}$ × $\frac{४}{३}$ = ९७$\frac{१}{३}$ जवळजवळ) ९८ येतो. यामुळे वरील श्लोकातील पूर्वार्धात भशेषावरून कालगणित काढण्याची रीति सांगितली आहे. अर्थात ऊन पक्षापुरते गणित करण्यास वरील नियम उपयोगी पडेल. पण पक्षांची संख्या जास्त असल्यास त्यांची निंपट घेऊन मागे सांगितलेले गणित करताना पूर्ण नक्षत्रे येऊ शकतील. याकरिता त्याचा हिशेब करताना चंद्रगणितात दिवसांश भाग म्हणजे ७ कला यांची $\frac{४}{३}$ घ्यावा म्हणजे या योगाने ९ कला गति घेतल्याप्रमाणे होते. किंवा रवीची गति ९ कला असल्यामुळे दिवसांश भाग याचा अर्थ ९ कला असाहि करता येईल. अशा रीतीने १४ व्या पक्षांतीच्या नक्षत्राचा प्रवेशकाल काढावयाचा असल्यास १४ पक्ष = १ द्वादशक + २ ऊन.

पैकी १ द्वादशकाच्या १९ कला झाल्या. राहिलेल्या २ ऊनाच्या काढण्यासाठी

२× ७३ =१४६ भशेष व त्याच्या $\frac{४}{३}$ = १९४ कला शिवाय २ पक्षाची निंपट १ व याच्या दिवसांश भाग ९ कला; यामुळे १४ व्या पक्षांतीच्या नक्षत्रप्रवेशाच्या ( १९ + १९४ + ९ ) = २२२ कला येतील.

आता वरील श्लोकाच्या उत्तरार्धाचा अर्थ असा आहे. " जेव्हा परांश अर्ध्या नक्षत्राइतके किंवा त्याहून अधिक असतात तेव्हा दोन अर्धे मिळून एक पुरे नक्षत्र झाल्यास त्याबद्दल नऊ कला धराव्या." याची उपपत्ति लक्षात येण्यास १९ व्या पक्षांतीच्या नक्षत्राच्या प्रवेशकला काढू.

१९ पक्ष = १ द्वादशक + ७ ऊन.

१ द्वादशकाच्या १९ कला.

७ ऊन × ७३ = ५११ भशेष.

∴ $\frac{५११}{१}$ × $\frac{४}{३}$ = ६८१ ( अपूर्णांक सोडून ).

७ ऊन याची निंपट ३॥ नक्षत्रे; पण ७ व्या ऊनाचे अंश ७ × ११ = ७७ = ॥ नक्षत्र + १५ अंश. ∴ पूर्ण नक्षत्रांची संख्या ( ३॥ + ॥ = ) ४ धरली पाहिजे; आणि एका नक्षत्रास ९ कला या हिशबाने ( ९ × ४ = ) ३६ कला होतात. ∴ एकंदर कलांची संख्या १९ + ६८१ + ३६ = ७३६. परंतु ६०३ कला = १ दिवस ∴ ७३६−६०३=१३३. ∴ १९ व्या पक्षांतीच्या नक्षत्राचा प्रवेशकाल पर्वाच्या दिवशी १३३ कला लोटल्यानंतर येतो.

चौदा पक्षापर्यंतचे गणित सांगितल्यानंतर पुढील पक्षांचे गणित सांगणारा श्लोक असा आहे.

पक्षात्पंचदशाच्चोर्ध्वं तद्भुक्तमिति निर्दिशेत् ।
नवकैरुद्गतोंशःस्यादूनांशं द्यधिकेनतु ॥

ऋ. १३.

याचा अर्थः " १५ व्या व पुढील पक्षाच्या वेळी मागल्या नियमाअन्वये काढलेली संख्या ' भुक्तकला ' समजावी. सूर्यांशांत एका दिवसात ९ अंशाची वाढ होते; आणि ऊनपक्षात ११ ( = ९ + २ ) अंशाची वाढ होते. "

पर्वांतीच्या नक्षत्राच्या प्रवेशकला काढल्यानंतर दिननक्षत्राच्या कला काढणे सोपे आहे. कारण चंद्रास १ नक्षत्र चालण्यास १ दिवस ७ कला लागतात. यामुळे पर्वनक्षत्राच्या कलात तिथीची ७ पट मिळविली म्हणजे इष्टदिन नक्षत्राच्या कला येतात. हे गणित

याः पर्वभादानकलास्तासु सप्तगुणां तिथिम् ।
प्रक्षिपेत् कलासमूहस्तु विद्यादादानकीः कलाः ॥

ऋ. २१; य. २१

या श्लोकात सांगितले आहे.

यानंतर तिथिनक्षत्र निश्चित करणारा नियम

> तिथिमेकादशाभ्यस्तां पर्वभांशसमन्विताम् ।
> विभज्य भसमूहेन तिथिनक्षत्रमादिशेत् ॥ य. २०

असा दिला आहे. त्याचा अर्थ हा:–" तिथीस ११ नीं गुणून त्यांत पर्वनक्षत्राचे अंश मिळवावे; आणि बेरजेस नक्षत्रसंख्येने ( २७ नीं ) भागून तिथिनक्षत्र ठरवावे."

चंद्राचे गणित सांगितल्यानंतर इष्ट तिथ्यंतीचे रवीचे स्थान काढण्याची रीति

> एकादशभिरभ्यस्य पर्वाणि नवभिस्तिथिम् ॥
> युगलब्धं सपर्व स्याद्वर्तमानार्कभं क्रमात् ॥ य. २५

या श्लोकात दिली आहे. त्याचे तात्पर्य "गतपर्वसंख्येची ११ पट व वर्तमान तिथीची ९ पट याची बेरीज घेतली असता ( धनिष्ठादि क्रमाने ) वर्तमानरविनक्षत्र येते." असे आहे.

यानंतर रवीचे पर्वनक्षत्र अगर दिननक्षत्र यांचा प्रवेशकाल आणि पर्वान्त व तिथ्यंत यांचा काल यामधील अवधि निश्चित करावयाचा राहिला. त्या संबंधीचा नियम शोधताना हे लक्षात ठेवले पाहिजे की एक नक्षत्र क्रमण्यास रवीला १३ ५/९ दिवस लागतात आणि एका तिथींत तो ९ नक्षत्रांश चालतो ( ऋ. २४ ). त्याचप्रमाणे १ दिवस = १२४ अंश आणि १ तिथि = १२२ अंश.

१ तिथि = १ दिवस – २ अंश. (ह्या अंशसंख्येला दिनोपभुक्ति म्हणतात.) किंवा १२४ अंशात्मक ( नक्षत्र ) चालण्यास रवीला १३ ५/९ दिवस लागतात तर इष्ट अंश चालण्यास किती दिवस लागतील? या त्रैराशिकाने उत्तर काढता येईल. या विषयीचा नियम

> सूर्यर्क्षभागान् नवभिर्विभज्य शेषं द्विरभ्यस्य दिनोपभुक्तिः ।
> तिथिर्युता भुक्तिदिनेषु कालो योगो दिनैकादशकेन तद्भम् ॥ य. २६

असा आहे. त्यांत 'तिथि:'च्या जागी तिथे: असा पाठ घेऊन श्लोकाचा सारांश हा. " सूर्य नक्षत्राच्या अंशाना ९ नीं भागावे ( भागाकार गततिथिसंख्या निदर्शक असतो ). नंतर बाकीची दुप्पट करून तिथीची दिनोपभुक्ति मिळवावी. म्हणजे रोजचे ११ अंश या नियमाने नक्षत्राचा प्रवेशकाल येतो."

बार्हस्पत्य व सुधाकर यांचे ऐकमत्य असून लोकमान्यांचा मतभेद असलेला श्लोक असा आहे.

> दुहेयं पर्वचेत्पादे पादस्त्रिंशत्तु सैकिका ।
> भागात्मनावपृज्यांशान् निर्दिशेदधिको यदि ॥ य. १२

या ठिकाणी ' दुहेयं ' या जागी लोकमान्यांच्या मते ' द्यु हेयं ' असा पाठ मानला पाहिजे. आणि हा पाठ घेऊन श्लोकार्थ असा सांगता येईल. " ( द्यु )

एक अहोरात्र ( हेयं ) सोडावा. केव्हा? उत्तरः–पादांती पर्व असेल तेव्हा. पाद म्हणजे काय? उः–पाद म्हणजे ३१ अंश. अंशांची मोजणी कशी करावी? उः– १२४ अंशानी भागून बाकीच्या अंशाने पादमापन करावे. ”

अशा रीतीने एक दिवस सोडण्याचा परिपाठ वेदकालीन पंचांगात होता हे तैत्तिरीय संहितेतील उल्लेखावरूनहि दाखविता येते. हा एक दिवसाचा संस्कार करून दृक्प्रत्यय साधण्याचा योग कधी येत होता? या प्रश्नाचे उत्तर ९३ व्या पक्षांतीच्या रात्री असे देता येते. म्हणजे पंचसंवत्सरात्मक युगातील अनुवत्सराच्या कार्तिकी पौर्णिमेस हा संस्कार करीत असत. याचा अर्थ त्या दिवसाची तिथी अगर नक्षत्र पंचांगात मांडीत नसत. अर्थात् या दिवसाची गणना मागल्या पर्वात करावयाची किंवा प्रत्यक्ष चंद्र ज्या नक्षत्रात दिसेल ते नक्षत्र त्या दिवसाचे मानावयाचे याचा निर्णय याज्ञिकाना करणे प्राप्त होते. तो निर्णय

स्युः पादोर्ध्वे त्रिपद्यायास्त्रिद्व्येकेह्नः कृते स्थितिम्।
साम्येनेन्दोस्तृणोऽन्ये तु पञ्चकाः पर्वसंमिताः ॥

य. १४

या श्लोकात आहे. त्यात ‘ गतपर्वाचे चतुर्थपाद आणि त्रिपद्येचे (=प्रतिपदेचे ) १ २ ३ हे पाद यात चंद्राचे नक्षत्र एकसारखे मानावे असे कित्येकांचे मत आहे. पण पांचहि पादांची गणना पर्वात करावी असे दुसरे काही लोक मानतात. ” अर्थात हा मतभेद मागे सांगितलेल्या अधिकदिन विषयक प्रतिपदेच्या वेळचाच आहे.

शेवटचा वादविषयक श्लोक असा आहे.

श्रविष्ठाभ्यां गुणाभ्यस्तान् प्राग्विलग्नान् विनिर्दिशेत्।
सूर्यान्मासान् षडभ्यस्तान् विद्याच्चांद्रमसानृतून् ॥ ऋ. १९

यात उत्तरार्धाच्या अर्थाबद्दल वाद नाही. कारण ‘ सौर मासांची साहापट केली असता चांद्रऋतु येतात. ’ हे ठोकळमानाने खरे आहे. पण सूक्ष्म गणिताच्या दृष्टीने हे चुकीचे आहे. ही गोष्ट दिक्षितानी आपल्या ग्रंथात स्पष्ट करून सांगितली आहे. मुख्य वाद पूर्वार्धातील ‘ गुणाभ्यस्तान् ’ व ‘ प्राग्विलग्नान् ’ या शब्दाबद्दल आहे. गुण याचा अर्थ तीन असा बहुधा करतात. पण बार्हस्पत्याने या ठिकाणी गुण = ८ असा अर्थ मानला आहे. तो ओढाताणीचा आहे. त्याचप्रमाणे ‘ लग्न ’ म्हणजे पूर्वक्षितिजबिंदूशी संलग्न असा राशिचक्राचा बिंदू हा अर्थ घेतल्यास; व लग्न निश्चित करण्याची पद्धति त्यावेळी होती असे मानल्यास त्यावेळी लग्नांची संख्या १२ नसून ९ असण्याचा संभव पुष्कळसा आहे. व या कल्पनेप्रमाणे “ श्रविष्टेपासून तीन नक्षत्रांचे एक लग्न ” असा अर्थ पूर्वार्धाचा घेता येईल. पण हा निर्णय करण्यास वेदकालीन पंचांगविषयक माहिती आज उपलब्ध आहे त्यापेक्षा जास्त सापडली पाहिजे. तोपर्यंत वेदांगज्योतिष बहुतेक समजले असे

म्हणण्यास हरकत नसली तर त्यात शंकास्थान कोठेहि राहिले नाही असे म्हणण्याची वेळ अद्याप आली नाही. तो काळ भावी संशोधकांच्या वाट्यास येईल असे मत लोकमान्यानी व्यक्त केले आहे.

## ( ५ ) तीन ग्रंथांची तुलना

टिळकानी जे मोठे तीन ग्रंथ लिहिले त्या प्रत्येकात एक एक गुण विशेषरूपाने नजरेस पडतो. ' ओरायन 'मध्ये ज्योतिष विषयक ज्ञान ' आर्यांचे वसतिस्थान ' यामध्ये रम्य कल्पनाचातुर्य आणि गीतारहस्यात खोल तात्विक विचार. पहिला ग्रंथ विशिष्ट ज्ञान प्रचुर दुसरा प्रतिभोद्दीपित आणि तिसरा पांडित्य मंडित असा आहे. दुसऱ्या दृष्टीने असे म्हणता येईल की पहिला व दुसरा ग्रंथ सात्विक-राजस व तिसरा शुद्ध राजस गुणदर्शक आहे. एकाच रत्नावर एकाच किरणाने तीन पैलूतून तीन निरनिराळ्या रंगांची छटा चमकावी त्याप्रमाणे टिळकांच्या एकाच बुद्धिमत्तेने तीन निरनिराळ्या प्रकारचे हे ग्रंथ टिळकांकडून लिहविले आहेत. पहिल्या दोन ग्रंथात प्रतिपाद्य विषय जवळ जवळ एकच आहे असे म्हटले तरी चालेल. तो विषय म्हटला म्हणजे वेदकालाचे प्राचीनत्व ठरविणे हा होय. ओरायनमध्ये ज्योतिर्गणिताच्या सहायाने प्रथम वेदांचा काल ४।५ हजार वर्षापर्यंत मागे नेऊन कोणत्याहि युरोपियन राष्ट्राच्या संस्कृतीपेक्षा आर्य ( वैदिक ) संस्कृति प्राचीनतर आहे हे टिळकानी ठरविले. पण ' वसतिस्थाना'च्या ग्रंथात वेद अनादि म्हणजे आदि न समजून येण्याइतके प्राचीनतम कसे ठरतात हे दर्शवून प्राचीनत्वामुळे प्राप्त होणारी श्रेष्ठता आर्य संस्कृतीकडे घेतली आहे. हे दोनहि ग्रंथ वाद–बुद्धिमूलकच आहेत. पण ती बुद्धि आरोयनमध्ये जितकी स्पष्ट दिसते तितकी ' वसतिस्थान ' या ग्रंथात दिसत नाही.

बॉक्सिंगच्या युद्धात दोघे सामनेवाले समोरासमोर उभे असताना त्यांच्यामध्ये जी युद्ध्यमान बुद्धि व जिगीषा प्रेक्षकाना दिसते ती ओरायनमध्ये दिसून येते. कारण वेदाना हजार दोन हजार वर्षांहून अधिक प्राचीनत्व लाभू न देणारे प्रतिपक्षी युरोपियन पंडित हा ग्रंथ लिहिताना टिळकांच्या डोळ्यासमोर उभे आहेत. पण वेद हे चार पांच हजार वर्षापूर्वीचे असे एकदा सिद्ध केल्यावर व प्रतिपक्षी आपल्या राष्ट्राच्या तुटपुंज्या अडीच हजार वर्षांच्या संस्कृतीला उराशी घेऊन वादरणक्षेत्राच्या टोकाशी कोलमडून पडल्यावर अधिक ठोसे लगावण्याचे कारण उरत नाही. बॉक्सिंगच्या खेळात असा एक नियमच आहे की प्रतिपक्षी जमीनदोस्त केल्याबद्दल विजयाचा दाखला पंचाकडून मिळावयाला हवा असेल तर विजयी गड्याने पड्या गड्याला सोडून दूर रंगणाच्या दुसऱ्या टोकाला जाऊन स्वस्थ उभे राहिले पाहिजे. याचा अर्थ असा की विजयाचा पूर्ण आत्मविश्वास व तन्मूलक निःशंक भावना त्याच्या ठिकाणी प्रगट झाली पाहिजे. तोच दाखला येथे लावला असता असे म्हणता येईल की जाकोबीसारख्या पंडिताने वेदांचा काल ४।५

हजार वर्षांपूर्वीचा आहे हे ओरायन वरून किंवा स्वतंत्रपणे कबूल केल्यावर मुष्टि-मल्लयुद्धातील विजयी वीराप्रमाणे टिळकांची मनःस्थिति विजयासंबंधाने निःशंक आणि आत्मविश्वासामुळे येणाऱ्या समाधानाने प्रसन्न झाली होती. त्याना या पुढे युद्ध चालविण्याचे कारण उरले नव्हते. असे असल्याने 'वसतिस्थान' नामक ग्रंथात ते जे मागे जात जात उत्तर ध्रुवापर्यंत गेले आणि ऋषिपूर्वजांच्या दिव्य दृष्टीने सभोवार चाललेले क्षितिजावरचे उषा देवीचे नृत्य कौतुकाने पाहत राहिले याचे कारण युध्यमान बुद्धि हे नसून केवळ प्रतिभाविलास हेच होय.

आर्य संस्कृति युरोपिअन संस्कृतीहून प्राचीनतर ठरल्यावर वादाला प्रतिपक्षी शिल्लक नव्हता. आर्यांची वसती मूळ उत्तर ध्रुवाजवळ नव्हती असा प्रतिपक्ष घेऊन कोणी म्हटलेले होते असे नाही. अर्थात या संबंधाचे पुस्तक हे कोणाला उत्तर होऊ शकत नाही. पण गीतारहस्य हा ग्रंथ सर्वस्वी वादाच्या भूमिकेवर उभे राहून लिहिलेला आहे. त्यातील पूर्वपक्ष आज शेकडो वर्षे परंपरेने चालू आहे. त्याविरुद्ध उत्तर देण्याची बुद्धि क्वचित् कोणाला झाली तर ती त्याने भीतीने जागच्याजागी दडपून टाकली किंवा आपल्या सिद्धान्ताकडे अर्थवादाचे स्वरूप घेऊन मुग्धता स्वीकारली. पण सत्यान्वेषणात निर्वीरमुर्वीतलम् असे का व्हावे ? कोणाला एखादे सत्य प्रतीत झाले तर त्याने ते बोलून का दाखवू नये ? परंपरेला विरोध करण्याचे भय का बाळगावे ? अधिकारप्रामाण्याला वश का व्हावे ? आचार्य पीठाविषयी आदर असणाऱ्यानेहि असा जुलूम का चालू द्यावा ? अशा विचाराने स्वकीयाशीच वाद करण्याकरिता ह्या ग्रंथात टिळक सज्ज झाले. पूर्वीच्या ग्रंथातील वाद परकीयाशी होता व हा स्वकीयाशी होता यामुळे त्यांच्या वादपद्धतीत किंवा आवेशात काही कमी पडले नाही. उलट असेच कदाचित म्हणता येईल की, ओरायन ग्रंथासंबंधाने युरोपिअन पंडितांची मते खोडून काढताना टिळकानी जितके वाग्दाक्षिण्य दाखविले तितके या 'गीतारहस्य' ग्रंथात स्वकीय प्रतिपक्षाविषयी दाखविले नाही !

## ( ६ ) गीतारहस्य

गीतारहस्य अथवा कर्मयोगशास्त्र हा टिळकांचा ग्रंथ त्यानी मराठीत लिहिलेला असा पहिलाच होय. पूर्वीचे दोन ग्रंथ इंग्रजी भाषेत लिहिले होते व त्याचे कारण काय असावे याची चर्चा या चरित्र ग्रंथाच्या पूर्वार्धाच्या शेवटी एका प्रकरणात आम्ही केलीच आहे. ते कसेहि असो. वर्तमानपत्रकार या नात्याने महाराष्ट्रातील लोकांचा व टिळकांचा जरी फार दिवसाचा परिचय असला तरी ग्रंथकार या नात्याने तो पूर्वी आलेला नव्हता. पण हा ग्रंथ मराठीत असल्यामुळे सर्व प्रकारच्या व सर्व दर्जाच्या वाचकवर्गाला तो समक्ष वाचावयास सापडला. टिळकांच्या विद्वत्तेविषयी लोकांची जी एक निर्विकल्पक भावना होती ती या ग्रंथवाचनाने सविकल्पक झाली. वर्तमानपत्रातील विषय प्रायः चालू राजकारणाचे. ते लिहिण्याला सामान्य

विद्वत्ता पुरते. लोकोत्तर विद्वत्ता लागत नाही. किंवा कोणत्याहि एका विषयाचे गूढ सांगोपांग असे ज्ञान लागत नाही. सामान्य वाचकांचेच विचार पण त्यांच्यापेक्षा थोडे अधिक कल्पकतेने थोड्या अधिक माहितीने व थोड्या अधिक निश्चितार्थाने कोणास लिहिता आले म्हणजे संपादक हा वाचकापेक्षा अधिक शहाणा ठरतो ! पण टिळकांच्या विद्वत्तेविषयी याच्याहि पलीकडे जाऊन काही एक प्रकारची लोकांची कल्पना होती व ती यथार्थ होती. ज्यानी त्यांची वर्तमानपत्रे हाती धरली नाहीत त्यानी त्यांचे ग्रंथ निर्विकार बुद्धीने हाती घेऊन वाचले व त्यांच्या बुद्धिमत्तेविषयी प्रांजल कबूली दिली. युरोपियन पंडितानी तर टिळकाना वेदविद्येतील पंडितात गणले ते त्यांच्या केसरी मराठ्यातील लेखावरून नव्हे. तेव्हा अशा रीतीने देशात व परदेशात कीर्ति पावलेली टिळकांची ही विद्वत्ता होती तरी कसली हे पाहण्याला मराठी वाचकवर्ग सदैव उत्सुक असला पाहिजे. व त्याचे समाधान या ग्रंथाने खचित केले.

पण ग्रंथ मराठीत लिहिल्यामुळे स्वकीयातलेच प्रतिपक्षी टिळकाना या ग्रंथापुरते तरी अधिक भेटले. ओरायन ग्रंथातील सिद्धांत अमान्य करणाऱ्या हिंदु पंडिताचे नाव आम्ही आजवर ऐकलेले नाही. आर्यांच्या वसतिस्थानासंबंधाने एक नाना- साहेब पावगी यांखेरीज दुसऱ्या कोणी विद्वानाने अमान्यता दाखविलेली आमच्या आढळात नाही. पण गीता—रहस्यातील टिळकांचे सिद्धांत अमान्य म्हणणारे पुष्कळ लोक आढळले. व त्या इतर दोन ग्रंथाप्रमाणे या ग्रंथाचे यश निःसंदेह मानले जात नाही. मराठी भाषेत ग्रंथ लिहिल्याचा एक फायदा तर एक तोटा झाला. पण आमच्या दृष्टीने फायद्यापेक्षा तोटा फारच थोडा. कोणाहि ग्रंथकाराला चार सिद्धांतिक प्रतिपक्षी भेटणे यात विशेष हानी नाही. पण 'गीतारहस्या'- सारख्या महत्त्वाच्या ग्रंथातील आपल्या मनाने मानलेले रहस्य हजारो स्वकीयांच्या मनात बिंबवून देण्याची संधि लाभणे हा फारच मोठा फायदा होय. आणि हा ग्रंथ मराठी भाषेत लिहिल्यामुळे टिळकाना तो फायदा लाभला खरा.

हा ग्रंथ मराठी भाषेत लिहिला असल्यामुळे हे प्रकरण लिहिण्याचे आमचे कामहि पुष्कळच सुलभ झाले आहे. ते असे की त्यात स्पष्ट लिहिलेल्या कोणत्याहि गोष्टीसंबंधाने आम्हाला वाचकाना या ग्रंथात माहिती देण्याचे कारण नाही. एरवी लिहिताना केसरी पत्रातील टिळकांच्या लेखातील कित्येक उतारे आम्ही मधून मधून दिले आहेत. तसेच त्यांच्या व्याख्यानांची जी पुस्तके उपलब्ध आहेत त्यांतूनहि काही उतारे आम्ही प्रसंग विशेषी दिले आहेत. पण त्याचे कारण हेच की ते ते केसरीचे अंक त्या त्या वेळी लोकानी वाचले असले तरी केसरीची जुनी 'फाइले' कोणाला सुलभ नसतात. तीच गोष्ट जप्त झालेल्या व्याख्यानांच्या पुस्तकासंबंधाने. केसरीचा कोणचाहि अंक जप्त किंवा सरकारजमा झालेला नसला तरी केसरीची फाइले एका निराळ्या कारणाने कोणी फारशी ठेवीत नाही. व ठेविली तरी काही दिवसानी ती अवजड होतात व फुकट जातात. याकरिता केसरीचे अंक दुर्मिळ.

व्याख्यानांची पुस्तके लहान सुटसुटीत असल्यामुळे ती वाचावयास मिळणे हे इतके दुष्कर न व्हावे. पण मराठीत छापलेली टिळकांच्या व्याख्यानांची पुस्तके सरकार जमा असल्यामुळे पुष्कळशा ग्रंथसंग्रहालयातून त्यांचे उच्चाटन झाले व त्यांच्या हातोहात होणारा प्रसारहि थांबला. पण गीतारहस्य ग्रंथाची गोष्ट तशी नाही. खुद्द मराठी भाषेतील या ग्रंथाच्या तीन चार आवृत्त्या आजवर निघाल्या आहेत. व इतर देशी भाषांतूनहि त्याची भाषांतरे होऊन त्यापैकी कोणाची दुसरी तर कोणाची तिसरी आवृत्ति निघाली आहे. तात्पर्य जो ग्रंथ मराठी वाचकाना सहज सुलभ आहे त्याच्या विषयी पुष्कळशी माहिती देऊन आम्ही या पुस्तकाची जागा अडवू इच्छीत नाही. म्हणून ग्रंथ व ग्रंथकार यांच्यासंबंधाने जी अवांतर माहिती म्हणजे या ग्रंथात न मिळणारी माहिती तीच थोडीबहुत देणार आहो.

ग्रंथाच्या प्रस्तावनेत टिळकानी आपला व भगवद्गीतेचा प्रथम परिचय केव्हा झाला व पुढे तो कसा वाढला याविषयी माहिती स्वतःच लिहिली आहे. प्रथम निर्विकार पठण किंबहुना निर्विचारपूर्वक पठण. नंतर अर्थप्रतीतीचा प्रकाश. नंतर शंका व संशय. नंतर गीतेवरील टीका व भाष्ये यांचे अध्ययन. नंतर स्वतःच्या सिद्धांताची खात्री पटणे. व नंतर योग्य संधि मिळाल्याने स्वतःची टीका व भाष्य लिहिणे. अशा क्रमाने हा ग्रंथ निर्माण झाला. व वयाच्या १६ व्या वर्षापासून ६० व्या वर्षापर्यंत जर कोणत्याहि एका विषयाच्या परिशीलनाचे सूत्र टिळकांच्या अंतःकरणात अखंड गोवले गेले असेल तर तो हाच ग्रंथ होय. टिळकानी लिहिल्याप्रमाणे लहान वयात मनावर घडणारे संस्कार टिकाऊ असतात हे खरे. पण पुष्कळ वेळा शिक्षण व प्रौढपणातील अनुभव यांच्या योगाने बालपणातील संस्कार बदलूहि शकतात. ही गोष्ट लक्षात घेता गीता प्रवृत्तीपर आहे कर्मयोग-पर आहे हा सिद्धान्त इतक्या अल्पवयी त्याना पटला व इतक्या उतारवयापर्यंत तो दृढमूल होऊन राहिला–किंबहुना विशेष बलवत्तर होऊन त्याने सिद्धान्त ग्रंथाचे स्वरूप धारण केले–ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. टिळकाना पट-लेला सिद्धान्त इतर कोणाला पटलेला नसेल असे नाही. पण टिळकांच्यासारखी साधने त्याना नव्हती असे म्हणा. किंवा ते धैर्य प्रगट करण्याला अनुकूल अशी जी प्रतिष्ठेची व मान्यतेची भूमिका टिळकाना लाभली ती त्याना लाभलेली नव्हती म्हणून म्हणा. कोणत्याहि कारणाने असो. परंपरेच्या विरुद्ध जाऊन वादाच्या रणांगणात दण्ड थोपटून उभे राहण्याचे धैर्य टिळकानी केल्यामुळे, आपल्या मनाशी विचार करून पण भिऊन गांगरून राहिलेल्या लोकांचेहि कार्य त्यानी केले. टीका व भाष्ये ही एखादा ग्रंथ समजण्याला उपकारक असतात. पण अंधारातून बाहेर पडण्याकरिता म्हणून एखाद्याचा हात धरावा व त्याने आपल्या इच्छेप्रमाणे भलत्या मार्गाला न्यावे तशी गति टीका व भाष्ये वाचणारांची होते. पण टीका व भाष्ये बाजूला ठेऊन आधी मूळ ग्रंथ वाचून आपले मत बनविणे हीच टिळकांची अभ्यासपद्धति होती. व एल् एल् बी. च्या परिक्षेचा अभ्यास करिताना ती जशी दिसून

आली तशीच ती गीतेच्या अध्ययनातहि दिसून आली. आपल्या नवीन कल्पनेचा पहिला उच्चार टिळकानी १९०२ साली नागपुरास एका व्याख्यानात केला. पण त्यांच्याशी यापूर्वी परिचय असणाऱ्या पुष्कळ लोकाना त्यांची ही कल्पना तुटक उद्गारातून बाहेर पडलेली ऐकावयाला मिळाली होती. आता याच विषयावर अशी व्याख्याने टिळकानी दिलेली नमूद नाहीत. ही मात्र किंचित् आश्चर्याची गोष्ट आहे. कारण अनेक प्रकारच्या उत्सवात अनेक प्रकारच्या धार्मिक चर्चेचे विषय निघणे स्वाभाविक. व अशा विषयावर व्याख्याने देण्याचे प्रसंग पुष्कळच. तसेच एखादे मत आपले म्हणून ते लोकांच्या गळी उतरेपर्यंत त्याची टाकी सुरू ठेवण्याची टिळकाना सवय. या सर्व गोष्टी लक्षात घेता या विषयावरील त्यांची व्याख्याने आहेत त्याहून अधिक उपलब्ध असावयास पाहिजे होती. पण तसे घडले नाही खरे. आणि या विषयावर त्यानी पुस्तक लिहावे म्हटले तरी त्याला वेळ मिळणे सर्वच बाजूनी कठीण. अशा रीतीने प्रवृत्तिमार्गाचा उपदेश करणारा हा ग्रंथ प्रवृत्ति–प्रवाह–पतित कर्मात रात्रंदिवस घातलेल्या टिळकाना निवृत्तकार्य अशी तुरुंगातील सवड अनिच्छेने लाभली तेव्हाच लिहिता आला हा योग विलक्षण नव्हे काय ?

## (७) गीतारहस्याचे तात्पर्य

गीतारहस्य हा ग्रंथ सुलभ असला तरी त्याचे बिनचूक तात्पर्य काढणे ही गोष्ट काही तितकी सुलभ नाही. पण सुदैवाने स्वतः टिळकानीच हा ग्रंथ प्रसिद्ध करण्यापूर्वी त्याचे तात्पर्य पुण्यास १९१४ च्या सप्टेंबर महिन्यात स्वतःच्या वाड्यात गणपत्युत्सवात व्याख्यानरूपाने सांगितले. इतकेच नव्हे तर नंतर ते स्वतः सांगून लिहवून घेऊन व तपासून केसरीत प्रसिद्ध केले. अर्थात् या तात्पर्याहून अधिक अधिकृत असे तात्पर्य दुसरे कोणते असणार ? म्हणून तेच आम्ही या खाली उतरून देतो. टिळक म्हणतात:—

गीतारहस्यासंबंधी मी जे प्रवचन केले ते ‘ गीतारहस्य ’ नामक मी लिहिलेल्या नव्या ग्रंथाचा सारांश होय. या ग्रंथात प्रथम पंधरा सोळा प्रकरणात गीतारहस्याचा शास्त्रीय रीत्या सांगोपांग विचार केल्यावर मग या प्रकरणात गीतेचे जे तात्पर्य निश्चित केले त्यास अनुसरून गीतेचे मराठी भाषांतर जोडलेले आहे. एवढ्या समग्र ग्रंथाचा पुरा सारांशहि तीन चार प्रवचनात सांगणे शक्य नव्हते. तथापि एकंदर ग्रंथाचे मुख्य धोरण काय असा मला पुष्कळानी प्रश्न केला असल्यामुळे तोच विषय प्रवचनासाठी मी घेतलेला होता. या प्रवचनानी माझ्या ग्रंथातील मुख्य मुद्दा कळला तरी त्यावरील शंका व त्यांची समाधाने कळण्यास मूळ ग्रंथच पहावा लागेल हे सांगावयास नको. गीतेवर अनेक भाषेत टीका व निरूपणे झाली असता तुम्ही गीतेसंबंधाने नवे असे काय सांगणार ? असा पहिल्यानेच प्रश्न निघणे अगदी साहजिक आहे. या प्रश्नास माझे असे उत्तर आहे

की गीतेवर जी भाष्ये व टीका सध्या उपलब्ध आहेत त्या निरनिराळे सांप्रदायिक आचार्य व त्यांचे अनुयायी यांच्या आहेत. व त्यामुळे ज्याने त्याने गीतार्थ आपल्या सांप्रदायास अनुकूल होईल अशा रीतीनेच निरूपिला आहे. उदाहरणार्थ श्रीमत् आद्य शंकराचार्य यांच्या भाष्यात गीतेचा अर्थ अद्वैतपर व संन्यासप्रतिपादक लावला असून रामानुजाचार्यांच्या मते तीच गीता विशिष्टाद्वैतपर व भक्तिप्रतिपादक आहे आणि मध्वाचार्यांच्या मते गीतेत भक्ति प्रधान असली तरी ती द्वैतमूलक आहे. किंबहुना शंकराचार्यांनी आपल्या भाष्याच्या आरंभीच असे म्हटले आहे की "गीतेवर अनेकानी पूर्वी टीका केल्या पण त्यास गीतेचा अर्थ नीट कळला नसून सर्वकर्मसंन्यासपूर्वक ज्ञानानेच मोक्ष मिळतो हेच काय ते खरे गीतेचे तात्पर्य होय हे सिद्ध करण्यासाठी हे भाष्य लिहिले आहे." वल्लभ व निंबार्क यांच्या सांप्रदायांच्या गीतेवर ज्या टीका आहेत त्यात अशीच विधाने केली आहेत. कोणी कर्मसंन्यासपूर्वक अद्वैत तर कोणी विशिष्टाद्वैतयुक्त भक्ति, कोणी द्वैती भक्ति तर कोणी ज्ञानपूर्वक पातंजल योग, कोणी सगुणभक्ति तर कोणी ज्ञान व भक्ति, यांचा मिलाफ गीतेत प्रतिपाद्य आहे असे म्हणतात. केवळ माझेच असे मत आहे असे नाही तर प्रसिद्ध मराठी कवि वामन पंडित यांची गीतेवर यथार्थदीपिका नामक जी टीका आहे तिच्या आरंभी "या कलियुगामाजि। जो तो गीतार्थ योजी। मतानुसार ॥" असे म्हटले आहे. यावरून गीतेवरील सर्व टीका प्रायः त्या त्या टीकाकारांचा जो सांप्रदाय त्याला अनुसरून आहेत. सांप्रदायनिरपेक्ष म्हणजे कोणत्याहि सांप्रदायाचा आग्रह न ठेविता केवळ सर्व गीता वाचून तिचा सरळ अर्थ काय लागतो हे सांगण्याचा या टीकाकारांचा हेतु नाही असे दिसून येईल. सांप्रदायिक दृष्ट्या गीतेची ही जी निरनिराळी तात्पर्ये ठरविलेली आहेत ती त्या त्या सांप्रदायातील लोकास मान्य असल्यास त्यात काही नवल नाही. प्रस्थानत्रयीतील सर्व ग्रंथ आपल्याच सांप्रदायास अनुकूल आहेत असे दाखविल्याखेरीज लोकात कोणताहि सांप्रदाय मान्य होत नाही त्यामुळे असे अर्थ लावणे भाग पडते. पण हे सर्वच अर्थ यथार्थ असणे ज्या अर्थी शक्य नाही त्या अर्थी त्या सर्वांची छाननी करून गीतेचे कोणते तात्पर्य यथार्थ आहे हे पाहणे जरूर पडते. ही शंका माझ्या मनात येऊन आज बरीच वर्षे झालेली आहेत. व या कालात मनात घोळत असलेले विचार व्यवस्थित रीतीने एकत्र करून माझ्या गीतारहस्य नामक ग्रंथात नमूद केलेले आहेत. माझे सिद्धांत एकदमच सर्वास ग्राह्य होतील असे मी म्हणत नाही. पण गीतार्थासंबंधाने विचार करण्यास आधुनिक चिकित्सकदृष्ट्या त्यांचा बराच उपयोग होईल अशी मला आशा आहे.

### ग्रंथपरीक्षणाचे प्रकार

सांप्रदायिक दृष्टि सोडली तर ग्रंथाचे परीक्षण कसे करावे हा यापुढला प्रश्न होय. ग्रंथपरीक्षण दोन प्रकारचे असते. एक अंतरंगपरीक्षण व दुसरे बहिरंग-

परीक्षण. अंतरंगपरीक्षणात ग्रंथाचे तात्पर्य ठरविण्यात येते. आणि बहिरंगपरीक्षणात ग्रंथ कोणी कोठे व केव्हा केला त्या ग्रंथात दुसऱ्या ग्रंथांचा कोणता उल्लेख आला आहे इत्यादि बाह्यांगाचाच विचार करीत असतात. माझ्या गीतारहस्यात या दोनहि प्रकारे गीतेचा विचार केलेला आहे. पण या लेखात फक्त अंतरंगपरीक्षणाबद्दलच माहिती दिली आहे. कारण बहिरंगपरीक्षण ऐतिहासिक दृष्टया जरी महत्त्वाचे असले तरी ऐतिहासिकच नव्हे तर धार्मिक नैतिक वगैरे अनेक दृष्टींनी अंतरंगपरीक्षण म्हणजे ग्रंथ–तात्पर्य निर्णयच सर्व लोक अधिक महत्त्वाचा समजतात व सध्याच्या काली तर तो विशेष महत्त्वाचा आहे. कारण वरील द्वैती अद्वैती वगैरे पंथाखेरीज काही मिशनरी लोक गीता अत्याचारास प्रवृत्त करणारी आहे अशीहि दीर्घ शंका आता काढू लागले आहेत. ही शंका खोटी व सर्वस्वी निर्मूल होय असे पुढील विवेचनावरून दिसून येईल. गीतेतच काय पण सामान्य हिंदु धर्मासहि अत्याचाराचे प्रकार केव्हाच मान्य झालेले नाहीत व ते मान्य असणे शक्यहि नाही. असो. गीता महाभारताचे एक आवश्यक अंग आहे किंवा त्यात घुसडून दिलेली आहे? अथवा मूळ गीता लहान असून त्यात प्रसंगाप्रमाणे मागाहून अनेकानी अनेक क्षेपक श्लोक घातलेले आहेत? आणि असल्यास ते कोणते? इत्यादि प्रश्न या बहिरंगपरीक्षणाच्या वर्गातच पडतात. पण त्याचा सविस्तर विचार या लेखात करणे शक्य नाही. पण माझ्या मते या सर्व शंका निर्मूल होत. आणि हल्लीचा गीता–ग्रंथ पौराणिक पद्धतीने व संवादरूपाने लिहिला असला तरी तो सुसंगत असून त्यातील सर्व विषय शास्त्रीय प्रतिपादनास अवश्यक आहेत एवढा माझा सिद्धांत येथे सांगून अंतरंगपरीक्षणाच्या मुख्य विषयाकडे वळतो.

### अंतरंगपरीक्षणाची रीति

एखाद्या ग्रंथाच्या तात्पर्याचा निर्णय कसा करावा याबद्दल आधुनिक ग्रंथपरीक्षाशास्त्रज्ञानी जे नियम घालून दिले आहेत ते काही नवीन नाहीत. आमच्या मीमांसकानी हजारो वर्षांपूर्वी असे ठरविले आहे की ‘ कोणत्याहि ग्रंथाचे तात्पर्य ठरविण्यास ( १ ) त्या ग्रंथाचा आरंभ व शेवट कसा आहे ( २ ) त्यात वारंवार काय सांगितले आहे ( ३ ) त्यात अपूर्वता कोणती ( ४ ) त्याचा परिणाम किंवा फल काय घडले ( ५ ) त्यात उपपत्ति कोणती सांगितली आहे आणि ( ६ ) या उपपत्तीच्या दृढीकरणार्थ किंवा अन्य कारणासाठी दुसऱ्या कोणत्या कोणत्या प्रासंगिक गोष्टी त्यात आहेत? या सहा गोष्टींचा विचार करून ग्रंथाच्या तात्पर्याचा निर्णय केला पाहिजे. ग्रंथतात्पर्यनिर्णयाची मीमांसकांची ही कसोटी गीतेस लावून गीतेचा आरंभ व शेवट काय हें पाहू लागले म्हणजे असे दिसून येते की भारती युद्धाच्या आरंभी समोर आलेल्या बांधवास पाहून अर्जुनास आपल्या कर्तव्याचा मोह पडला अशी गीतेची सुरुवात आहे. युद्ध करावे तर कुलक्षय होणार इतकेच

नव्हे तर पितामह भीष्म व गुरु द्रोण यांचा वध करावा लागणार. आणि न करावे तर क्षात्र धर्म सुटल्यामुळे तिकडूनहि नरकवास प्राप्त होणार. एकीकडे आड तर दुसरीकडे विहीर अशी स्थिति झाल्यावर तो श्रीकृष्णास शरण गेला आणि श्रीकृष्णानी गीता सांगून त्याला ताळ्यावर आणला व युद्ध करण्यास लावले. हा गीतेचा उपसंहार आहे. हा उपसंहार केवळ वाचनिक किंवा ग्रंथात लेखी आहे इतकेच नव्हे तर पुढे तसा साक्षात् परिणामहि घडलेला आहे. तसेच सबंध ग्रंथात जागोजाग अनेक कारणे सांगून 'तस्माद्युद्धयस्व भारत' 'हे अर्जुना म्हणून तू युद्ध कर '—असा उपदेश केलेला आहे. यातील ' म्हणून ' हा शब्द अत्यंत महत्त्वाचा आहे. त्याचा असा अर्थ होतो की निरनिराळी कारणे दाखवून अनेक बाजूंनी " या वेळी युद्ध करणे हेच तुझे कर्तव्य होय " या सिद्धांताबद्दल अर्जुनाची न्यायदृष्ट्या खात्री करून दिली आहे. अर्जुनाने संन्यास घ्यावा किंवा सर्वकाल भक्तीत गढून राहून दुसरे काही कर्म करू नये, असे श्रीकृष्णाच्या मनातून त्यास सांगावयाचे नव्हते. तसे असते तर गीता सांगण्याचीच जरूरी नव्हती. कारण अर्जुन संन्यास घेण्यास तयारच झाला होता तेव्हा. " तू म्हणतोस तसेच माझे मत आहे आपण दोघेही संन्यास घेऊन आपल्या आत्म्याचे कल्याण करू " असे उत्तर त्यास दिल्याने काम भागत होते. पण तसे काही एक न करतां ' हा हिजडेपणा ( क्लैब्य ) तुला शोभत नाही ' अशी दुसऱ्या अध्यायाच्या आरंभी श्रीकृष्णानी त्याची निर्भर्त्सना केली आहे व ' नियतं कुरु कर्म त्वम् ' असे त्यास सांगितले आहे. यावरून गीतेचे जर काही तात्पर्य असेल तर ते अखेर प्रवृत्तिपर म्हणजे कर्मपरच असले पाहिजे हे उघड होते. भक्तीत किंवा ज्ञानात गढून जाऊन सर्व कर्मांचा स्वरूपतः संन्यास करणे हें मत गीतेत प्रतिपाद्य असणे शक्य नाही.

### गीतेचे पहिले पांच अध्याय

गीतेच्या उपक्रमोपसंहारावरून गीतेच्या तात्पर्याचा जो निर्णय केला त्याचे उपपादन गीतेच्या अठरा अध्यायात कसे केले आहे हे आता आपण पाहू. पैकी पहिले पांच अध्याय प्रथम घ्या. यातील पहिल्या अध्यायाचे तात्पर्य वर सांगितलेच आहे. दुसऱ्या अध्यायातील " अशोच्यानन्वशोचस्त्वम् " येथपासून भगवंताच्या उपदेशास सुरुवात झाली आहे व यातील पहिले काही श्लोक वेदांतपर असल्यामुळे गीतेत हाच वेदांत प्रतिपाद्य आहे असे कित्येक समजतात ! पण खरा प्रकार तसा नाही असे थोड्या सूक्ष्म विचारांती दिसून येईल. 'अशोच्यानन्वशोचस्त्वम्' येथपासून 'एषा तेऽभिहिता सांख्ये बुद्धिर्योगे त्विमां शृणु' येथपर्यंत सांख्यमार्गाचे ज्ञान सांगून पुढे याच अध्यायात योगाचे म्हणजे कर्मयोग मार्गाचे ज्ञान सांगण्यास सुरुवात केली आहे. म्हणजे गीतेतील उपदेशास सांख्य व कर्मयोग या दोन मार्गापासून सुरुवात आहे नुसत्या वेदांतापासून नाही असे निष्पन्न होते. युद्ध सोडून देऊन सांख्य मार्गातील संन्याश्याप्रमाणे भिक्षा मागत रानात राहूं

किंवा युद्ध करू? ज्ञानी पुरुषास यापैकी उचित काय? हा अर्जुनाचा प्रश्न होता. म्हणून ज्ञानी पुरुषाच्या आचरणाचे या जगात आढळून येणारे जे दोन मार्ग किंवा 'निष्ठा'–सांख्य व कर्मयोग–या दोहोपासूनच गीतेस सुरुवात झाली आहे व या दोन मार्गापैकी ग्राह्य कोणता हे ठरविणे हाच गीतेतील मुख्य विषय आहे. योग म्हणजे पातंजल योग नव्हे. सहाव्या अध्यायातील काही श्लोक खेरीजकरून योग म्हणजे कर्मयोग हाच अर्थ गीतेत विवक्षित आहे हे 'समत्वं योग उच्यते' आणि 'योगः कर्मसु कौशलम्' या गीतेतील व्याख्येवरूनच उघड होते. किंबहुना 'योग' या शब्दाचा कर्मयोगाखेरीज दुसरा भलतासलता अर्थ कोणी करू नये एतदर्थच या व्याख्या दिलेल्या आहेत असे म्हटले तरी चालेल. पुरुष ज्ञानी झाला म्हणजे तो (१) शुकाचार्याप्रमाणे कर्मे सोडील किंवा (२) जनक–श्रीकृष्णाप्रमाणे सर्व व्यावहारिक कर्मे निष्कामबुद्धीने करील असे दोन पक्ष संभवतात व यासच अनुक्रमे सांख्य व योग या संज्ञा आहेत. पण हे दोनहि पक्ष अर्जुनाला सांगून काय उपयोग? 'तदेकं वद निश्चित्य'–यापैकी काही तरी एक मला निश्चयेकरून सांगा असे भगवंताजवळ याचे मागणे होते. म्हणून त्यास उत्तर देताना पांचव्या अध्यायात 'कर्मसंन्यास आणि कर्मयोग हे दोनहि जरी एकसारखेच निःश्रेयस्कर म्हणजे मोक्षप्रद आहेत तरी 'तयोस्तु कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते'–या दोहोत कर्मसंन्यासापेक्षा कर्मयोगाची मातब्बरी अधिक–असे भगवंतानी स्वच्छ सांगितले आहे. आणि ही योग्यता अधिक का? याची कारणे तिसऱ्या व चौथ्या अध्यायात आहेत. या अध्यायामध्ये भगवान् असे सांगतात की कोणी मनुष्य कितीहि ज्ञानी झाला तरी निजणे बसणे उठणे इ. कर्म त्याला कधीच सुटत नाही. सृष्टि उत्पन्न झाली तेव्हा यज्ञचक्र उत्पन्न झाले आणि यज्ञ जर कर्माखेरीज होत नाही तर कर्म सोडणे म्हणजे यज्ञचक्र बुडवून ब्रह्मदेवाची गुन्हेगारी करणे होय! आता कोणी असे म्हणेल की ज्ञानी झाला म्हणजे त्याला मोक्ष मिळाला मग त्याचे काही कर्तव्य उरत नाही (कार्यं न विद्यते) किंवा त्याने काही केले काय न केले काय सारखेच असते (अ. ३ श्लोक १७–१८). कित्येकांच्या मते हाच गीतेचा सिद्धांत पक्ष होय. पण हा अर्थ प्रकरणास जुळत नाही. प्रकरण कर्मयोगाचे आहे आणि ज्ञानी पुरुषानेहि कर्मे केले पाहिजे हा अर्थ (अ. ३–२५) या ठिकाणी प्रतिपाद्य असून तत्सिद्ध्यर्थ जनकादिकाचा व पुढे खुद्द भगवंतानी आपलाहि दाखला दिला आहे. म्हणून ज्ञानी पुरुषाने काही करू नये असे मध्येच विधान करणे शक्य नाही. यासाठी 'ज्ञानी पुरुषाचे काही कर्तव्य शिलक राहिले नसते. त्याने एखादी गोष्ट केली काय न केली काय सारखेच' हा पूर्वपक्षाचा किंवा हेतूंचा अनुवाद घेतला पाहिजे. आणि त्याचे उत्तर काय हे पुढील श्लोकात 'तस्मात्' हे कारण-बोधक पद घालून सांगितले आहे. ज्ञानी पुरुषाला कर्म करणे न करणे जर सारखेच तर न करण्याचा तरी आग्रह का? केव्हाहि झाले तरी "कर्म उपायो ह्यक-

मेण:—" अकर्मापेक्षा कर्म श्रेष्ठ हा सिद्धांत होय. 'तस्मात्' ज्ञानी पुरुषानेहि निष्कामबुद्धीने कर्म केले पाहिजे असा गीतेत सिद्धांत असून त्याचप्रमाणे लागलीच अर्जुनास उपदेशहि केला आहे. गीतेतच नव्हे तर योगवासिष्ठातहि हा अर्थ स्पष्ट केला आहे. अर्जुन अज्ञानी म्हणून त्यास निष्काम कर्म करण्यास सांगितले ही कोटी ग्राह्य धरिता येत नाही. असो. कर्म करण्यास शेवटचे म्हणून जे कारण सांगितले आहे ते लोकसंग्रह होय. लोकसंग्रह म्हणजे अडाणी लोकास न दुखविण्यासाठी त्यांच्याप्रमाणे वागण्याचे सोंग करणे असा अर्थ नाही. व्यावहारिक कर्मे कशी करावयाची याचा लोकास प्रत्यक्ष आपल्या निष्काम वर्तनाने धडा घालून देऊन केवळ पृथ्वीवरील लोकांचीच नव्हे तर देवादि लोकांचीहि ( अ. ३ श्लोक ११ ) सुस्थिति उत्तरोत्तर वृद्धिंगत व कायम करणे हा लोकसंग्रहाचा खरा अर्थ होय. साधूंचे संरक्षण व दुष्टांचा निग्रह—' परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् '—हा त्यांतलाच एक भाग आहे; व तो करण्यासाठी खुद्द भगवानहि जर वेळोवेळी अवतार घेतात तर ज्ञानी पुरुषानेहि तेच काम करून लोकसंग्रह केला पाहिजे, असा गीतेतील उपदेशाचा इत्यर्थ आहे. सारांश ' कर्म मोक्षाला कारण होत नाही ज्ञान हेच मोक्षाचे कारण आहे ज्ञानाचा उजेड पडल्यावर कर्माचा अंधकार त्या ठिकाणी राहू शकत नाही ' इत्यादि जो संन्यासपक्षीयांचा कोटिक्रम आहे तो भगवद्गीतेत स्वीकारलेला नाही. मोक्ष ज्ञानानेच मिळतो हे तत्त्व भगवद्गीतेस मान्य आहे. पण मनुष्य कितीहि मोठा ज्ञानी किंवा भगवद्भक्त झाला तरी निष्काम कर्म त्याला सुटत नाही; मोक्षाकरिता नको असले तरी लोकसंग्रहार्थ त्याने ते अवश्य केले पाहिजे असे भगवद्गीतेचे विशेष सांगणे आहे. किंबहुना मनुष्य ज्ञानी झाला म्हणजे अज्ञानी जनास निष्काम कर्म करण्याची प्रत्यक्ष उदाहरणाने संवय लावून देण्याची एक नवीन जबाबदारी त्याचेवर पडते असे ' यद्यदाचरति श्रेष्ठः ' या श्लोकाचे तात्पर्य आहे म्हटले तरी चालेल. निरनिराळे आचार्य आपापल्या भाष्यातून असा अर्थ करीत नाहीत हे मला माहीत आहे व हे आचार्य मोठे विद्वान् धार्मिक व सत्त्वशील होते हेहि मला मान्य आहे. विशेषतः श्रीशंकराचार्यांसारखा तत्त्वज्ञानी पुरुष आजपर्यंत या जगात झाला नाही असे मी समजतो व शांकरभाष्यात प्रतिपादन केल्याप्रमाणे गीतेतील वेदांतहि अद्वैतपरच आहे असे माझे मत आहे. पण निरनिराळ्या आचार्यांचे मत काय आहे हे आपणास सध्या पाहावयाचे नसून सांप्रदायिक दृष्टि सोडली तर गीतेचे अखेर ध्येय काय ठरते एवढाच आपल्यापुढचा प्रस्तुत प्रश्न होय. म्हणून या बाबतीत अनेक आचार्यांशी माझा मतभेद असल्यास त्यावरून या आचार्यांस मी कमी पूज्य समजतो असे कोणीहि समजू नये. याला उत्तम उदाहरण म्हटले म्हणजे आचार्यांच्या मागून त्यांच्या सांप्रदायिक अनुयायानीहि आपापल्या टीकात प्रसंगानुसार निरनिराळे अर्थ केले आहेत हे होय. किंबहुना गीतेचे असे अर्थ करण्यास सवड

नसती, तर गीतेवर अनेक टीका होणेहि शक्य झाले नसते. गीतेमध्ये निष्काम कर्मयोगच प्रतिपाद्य आहे, याबद्दल दुसरा पुरावा म्हणजे चौथ्या अध्यायात दिलेली गीताधर्माची परंपरा होय. भगवान–विवस्वान–मनु–इक्ष्वाकु अशी ही परंपरा सांगितली आहे. पातंजलयोगात ही परंपरा कोठेच दिलेली नाही महाभारतात शांतिपर्वाच्या अखेर नारायणीयोपाख्यानात नारायणीय किंवा भागवतधर्माची सात कल्पातील जी एक मोठी परंपरा दिली आहे, त्यातील हल्लीच्या महायुगातील त्रेतायुगाच्या परंपरेशी मात्र गीतेची परंपरा जुळते व त्यावरून नारायणीय किंवा भागवतधर्म 'योग' या नावाने गीतेत प्रतिपाद्य आहे, असे सिद्ध होते. हा नारायणीय धर्म प्रवृत्तिपर असून शिवाय मोक्षप्रदहि आहे, असे याच म्हणजे नारायणीयोपाख्यानात पुढे वर्णन आहे. गीतेवरील टीकाकारानी गीता–धर्माच्या या परंपरेसंबंधाने विचार केला असल्याचे मला आढळून आले नाही.

### गीतेचे पांचव्यापुढले अध्याय

गीतेतील उपदेशास सांख्य व योग या दोन मार्गांपासून सुरुवात झाली असून या दोहोंपैकी निष्काम कर्मयोगच श्रेष्ठ, असा निकाल झाल्यावर पुढे दुसरे काही प्रश्न साहजिक रीत्याच उपस्थित होतात; व त्यांचे उत्तर पांचपासून सतराव्या अध्यायापर्यंत दिलेले असून गीतेतील शेवटल्या म्हणजे अठराव्या अध्यायात एकंदर सर्व विषयांचा उपसंहार केला आहे. गीतेतील अठरा अध्यायांची अशा प्रकारे वांटणी न करता कर्म, भक्ति व ज्ञान या तिहींना किंवा तत्, त्वं, असि या "तत्वमसि" वाक्यातील तीन पदाना यथानुक्रम सहा सहा अध्याय वांटून देण्याची काही टीकाकारांची रीत आहे. पण माझ्या मते ही रीत बरोबर नाही. कर्म, भक्ति व ज्ञान ही स्थूल मानाने तीनहि गीतेत प्रतिपाद्य असली, तरी एकेकाच्या वांटणीस बरोबर सहा सहा अध्यायच येतात असे नसून हे तीन विभाग स्वतंत्र म्हणजे परस्परनिरपेक्ष आहेत, असेहि मानता येत नाही. पण त्वं तत् आणि असि या तीन पदांचे निरूपण करणारे सहा सहा अध्याय आहेत असे म्हणणे याहून विचित्र आणि निराधार आहे. गीतेतील नऊ, दहा, अकरा व बारा हे चार अध्याय भक्तिपर आहेत असे म्हणता येईल. पण जरा सूक्ष्म विचार केला तर असे दिसून येईल की, या अध्यायातूनही ज्ञानाचा व विशेषतः कर्माचा धागा कायम ठेवला असून भक्तितत्त्वाचा उल्लेख मागे म्हणजे चौथ्या अध्यायातच "श्रद्धावान् लभते ज्ञानम्" या श्लोकात झालेला आहे. सारांश, वर सांगितलेली त्रिविध वांटणी सयुक्तिक नसून सहाव्या अध्यायात पातंजल योग आणि पुढील अकरा अध्यायात सामान्यतः भक्तियुक्त ज्ञानविज्ञान वर्णिले आहे, असे म्हणावे लागते. हे ज्ञानविज्ञान का वर्णिले ? स्वतंत्र म्हणून किंवा दुसऱ्या काही कारणासाठी ? याचा आता विचार केला पाहिजे. हा विचार करू लागले असता

असे आढळून येईल की पातंजलयोगाचे किंवा ज्ञानविज्ञानाचे हे निरूपण स्वतंत्र नाही. निष्काम कर्मयोगाची मातब्बरी कर्मसंन्यासापेक्षाअधिक असे सांगितल्यानंतर निष्काम कर्मयोगाचे सिद्ध्यर्थ अवश्य लागणारी निष्कामबुद्धि संपादन करण्यास साधने कोणती आणि संन्यासमार्गाप्रमाणे निष्काम मार्गानेही मोक्ष कसा मिळतो, हे सप्रमाण सिद्ध करून दाखविणे जरूर होते. पैकी निष्कामबुद्धि संपादन करण्याचे साधन म्हणून अर्जुनाच्या प्रश्नावरून पातंजलयोगातील आसनाचे व चित्तनिरोधाचे सहाव्या अध्यायात निरूपण आले आहे. पण चित्तनिग्रहाचे हे काम एकाच जन्मात सिद्ध न झाल्यास मनुष्य बुडालाच समजावयाचा की काय, अशी अर्जुनास शंका आल्यामुळे निष्काम कर्मयोगात काही फुकट जात नाही, यथाशक्ति प्रयत्न करीत गेले म्हणजे पूर्वजन्मीचे संस्कार पुढे कायम राहून आज नाही तर उद्या, या जन्मी नाही तर पुढील जन्मी तरी, कर्मयोगाने अखेर खास सिद्धि प्राप्त होते, असे भगवंतानी आश्वासन दिले आहे. परंतु बुद्धि निष्काम होण्यास पातंजल योगापेक्षाहि अध्यात्मचिंतन आणि अध्यात्मचिंतनापेक्षाहि भक्ति ही महत्त्वाची व सुलभ साधने होत व यांचा विचार ७ पासून १७ अध्यायापर्यंत केला आहे. अध्यात्मविचार करण्याची पद्धत अशी आहे की, प्रथम बाह्य सृष्टीचा विचार करून त्याच्या बुडाशी काय तत्त्व आहे हे ठरवावयाचे यास **क्षराक्षर–विचार** असे म्हणतात. हा विचार कापिल–सांख्यशास्त्रात केलेला आहे. म्हणून तदनुरोधाने गीतेतील ७–८–९ व पुढे चौदापासून सतरा अध्यायातील वर्णने केलेली आहेत. क्षराक्षरांचा याप्रमाणे विचार केल्यावर मनुष्याच्या देहात चालक शक्ति कोण याचा विचार करावा लागतो व तो तेराव्या अध्यायात केला आहे. यास क्षेत्रक्षेत्रज्ञ विचार असे म्हणतात. क्षराक्षर व क्षेत्रक्षेत्रज्ञ यांचा याप्रमाणे विचार झाल्यावर दोहोकडे अखेर जी तत्त्वे निष्पन्न होतात ती दोन नसून एकच आहेत. जे पिंडी ते ब्रह्मांडी-असे सिद्ध करावे लागते. व हेच सर्व वेदांताचे रहस्य होय. यासच परब्रह्म किंवा भक्तिशास्त्रातील परिभाषेत पुरुषोत्तम असे म्हणतात. या परमत्वाचे अनुभवात्मक ज्ञान होऊन बुद्धि आत्मनिष्ठ किंवा ब्रह्मनिष्ठ म्हणजे सर्वोभूती सम व शांत होणे हाच खरा मोक्ष होय. मोक्ष ही एक विशिष्ट प्रकारची आध्यात्मिक मनोवस्था आहे; इह लोकाच्या पलीकडे ठेवलेला गड्डा नव्हे–मोक्षस्य न हि वासोस्ति न ग्रामांतरमेव वा। अज्ञानहृदयग्रंथिनाशी मोक्ष इतिस्मृतः ॥— असे शिवगीतेत म्हटले असून भगवद्गीतेचा व उपनिषदांचा सिद्धांत तसाच आहे. ही आध्यात्मिक स्थिति ज्या पुरुषास प्राप्त झाली त्यास जीवन्मुक्त असे म्हणतात व अशा प्रकारची जीवन्मुक्तावस्था संपादन करून त्यात सिद्ध झालेल्या निष्काम बुद्धीने लोकसंग्रहार्थ आमरणांत निष्काम कर्मे करीत राहणे हेच गीतेतील सर्व उपदेशाचे सार होय. अशा ज्ञानी पुरुषास त्याने केलेल्या निष्काम कर्मांचे पापपुण्य लागत नाही इतकेच नव्हे, तर त्याची कर्म करण्याची जी रीत तीच इतरास किस्त्यासारखी होऊन त्यामुळे लोकांची स्थिति उत्तरोत्तर सुधारत जात असते.

हाच खरा लोकसंग्रह होय व तो निष्काम बुद्धीने करणे म्हणजे लोकोपकारहि निरभिमान बुद्धीने करणे हेच मनुष्याचे इहलोकातील परम ध्येय होय. ही स्थिति प्राप्त होणे अत्यंत दुर्घट आहे खरे पण अभ्यासाने तीहि साध्य होते, असे गीतेचे सांगणे आहे. निष्कामबुद्धि किंवा **फलाशात्याग** याचा अर्थ बराच खोल असल्यामुळे त्याचाहि येथे थोडासा खुलासा केला पाहिजे. फलाशात्याग म्हणजे फलत्याग किंवा कर्मांचे फल मिळाले तरीहि ते सोडून देणे असा अर्थ नव्हे. गीतेला या जगातील जीवमात्राचे सर्व कर्म काढून टाकावयाचे नाही. जे सामान्यतः काम्य असते ते मात्र निष्काम करावयाचे आहे. कर्म सोडण्यास गीता कोठेच सांगत नाही. अर्थात् कर्म करण्याची इच्छा मनुष्यास असली पाहिजे इतकेच नव्हे तर त्या कर्मापासून पुढे काय परिणाम होण्याचा संभव आहे याचे त्यास ज्ञान असून तदनुसार त्या कर्माची योजना करणेही मनुष्याचे काम आहे. एरवी त्याच्या सर्व क्रिया वेड्यासारख्या होतील म्हणून कर्म करण्याची इच्छा अगर हेतूचे ज्ञान किंवा योजना सोडून द्या असा फलाशात्याग या शब्दाचा अर्थ करता येत नाही किंबहुना या सर्व मनोवृत्ति मनुष्यास परिणामी दुःखकारक किंवा बंधकारक होऊ शकत नाहीत असे म्हटले तरी चालेल. दुःखाचे मूळ फलाच्या ठायी जी मनुष्याची ममत्वयुक्त आसक्ति असते त्यात आहे. कर्मात नाही. व कर्म करण्याच्या इच्छेतहि नाही. 'कर्मण्येवाऽधिकारस्ते मा फलेषु कदा च न' या कर्मयोगाच्या गीतेतील चतुःसूत्रीचा अर्थ हाच होय. यासच इंग्रजीत Duty for duty's sake म्हणजे केवळ कर्तव्य म्हणून (कार्यमित्येव) जे काय करावयाचे ते करावे असे म्हणतात. गीतेचा सर्व कटाक्ष याच तत्त्वावर आहे आणि असे करीत असता हत्येसारखी घोर क्रिया करावी लागली तरीहि त्याचा लेप कर्त्यास लागत नाही. उदाहरणार्थ भ्रूणहत्येसारखे दुसरे पाप नाही पण आडवे आले असता कापून काढणाऱ्या डॉक्टरास कोणी दोष देत नाही. परोपकारासाठी औषध देणाऱ्या डॉक्टरास रोगी बरा न झाल्यास त्याचे दुःख होत नाही हे याच तत्त्वाचे उदाहरण होय. पण त्याच डॉक्टराचा मुलगा आजारी पडला असता त्याची बुद्धि कशी गुंग होते हे पाहिले म्हणजे निष्काम किंवा फलाशारहित कर्म कशाला म्हणावे हे ध्यानात येईल. बुद्धि फलाशारहित झाली म्हणजे कर्मच होणे शक्य नाही असे जे कित्येकांचे म्हणणे आहे त्यात काही अर्थ नाही. ज्यांची बुद्धि संसारात गुंतली आहे त्यास ही गोष्ट शक्य वाटत नाही म्हणून ती नाहीच म्हणणे म्हणजे आंधळ्यास सूर्य दिसत नाही म्हणून तो नाहीच म्हणण्यासारखे आहे. बुद्धि अशा प्रकारची निष्काम झाली म्हणजे त्या मनुष्यास 'पुष्कळ मनुष्यांच्या पुष्कळ कल्याणाकरिता प्रयत्न कर' असा उपदेश करण्याची जरूरच रहात नाही. मनुष्य म्हटला म्हणजे तो आपल्या कृत्याच्या बाह्य परिमाणाचा सारासार विचार करणारच एरवी तो मनुष्यच नव्हे. पण बाह्य परिणामाचा सारासार विचार करणे एवढेच काही सदाचरणाचे तत्त्व नाही कारण एखाद्या गरीबाने

एखाद्या सत्कृत्याकडे दोन पैसे आणि त्याच कामासाठी एखाद्या लक्षाधीशाने शंभर रुपये दिले तरी त्याची नैतिक योग्यता आम्ही एकच समजतो. यावरून शुद्ध निष्काम व सर्वांभूती सम झालेली अतएव फलासंगविरहित बुद्धि हेच काय ते गीतेत वर्णिलेले सदाचरणाचे मूळ होय असे सिद्ध होते. 'पत्रं पुष्पं फलं तोयं' याचा भावार्थ हाच असून अशा रीतीने जो आपले कर्तव्य करतो त्यास कर्मांचे बंधन न लागता स्वधर्माने लोकसंग्रह केल्याचे श्रेय संपादन करून त्याच कर्माने अखेर त्यास मोक्ष मिळतो म्हणून मोक्षासाठी साधन म्हणूनच नव्हे तर ज्ञानोत्तरहि निष्काम कर्मे अवश्य केली पाहिजेत असे गीतेचे पुनः पुनः सांगणे आहे व याचमुळे अखेर स्वधर्माप्रमाणे युद्ध करण्यास अर्जुन प्रवृत्त झाला आहे.

### भक्तिमार्ग

वर जी बुद्धीची निष्काम अवस्था वर्णन केली ती अध्यात्मविचाराने प्राप्त होते हे खरे. पण ती सिद्ध होण्यास अध्यात्मविचार हा मार्ग क्लेशमय असून भक्तिमार्गाने तोच हेतु सुलभ रीतीने प्राप्त होतो. आणि हा मार्ग प्रत्यक्ष असल्यामुळे त्याचे आचरणहि सुखाने घडते असे गीतेचे यापुढे दुसरे महत्त्वाचे सांगणे आहे. पण यावरून निष्कामकर्मविरहित भक्तीच गीतेत प्रतिपाद्य आहे असे होत नाही. भक्ति हे साधन आहे. साध्य नव्हे. व सर्व साधनात हे साधन जरी सुलभ असले तरी त्याने निष्काम व समबुद्धि संपादन करून कर्मे सोडावी असे सिद्ध न होता उलट त्या बुद्धीने जगातील सर्व व्यवहार करीत रहावे हेच गीतेचे अखेरचे सांगणे आहे. याने मोक्षप्राप्ति होते इतकेच नव्हे तर जगातील सुस्थितिहि कायम रहाते. यासच ज्ञानकर्म–समुच्चयपक्ष असे म्हणतात व तोच गीतेतील प्रतिपाद्य विषय होय. केवळ म्हणजे कर्मत्यागपूर्वकज्ञान किंवा केवळ भक्ति हे गीतेतील अंतिम ध्येय नव्हे. हा ज्ञानकर्म–समुच्चयपक्ष गीतेतच नव्हे तर ईशावास्यादि उपनिषदातहि वर्णिलेला आहे. किंबहुना गीता हे मोक्षदृष्ट्या संसार कसा करावा याचे शास्त्र आहे. संसार सोडून देण्यासाठी गीता सांगितलेली नाही. आधुनिक पाश्चिमात्य पंडित आपली संसारशास्त्रे केवळ आधिभौतिक पायावर रचीत असतात. पण हा पाया अपुरा असल्यामुळे तो सोडून देऊन संसारशास्त्राचा मोक्षशास्त्राशी म्हणजे अध्यात्मशास्त्राशी गीतेने उत्तम मेळ घालून दिला आहे. गीतेत जर काही अपूर्वता असेल तर ती हीच होय. नुसता वेदांत किंवा नुसती भक्ति प्रतिपादन करणारे ग्रंथ पुष्कळ आहेत. पण त्यातून प्रायः अखेर कर्मसंन्यासरूपी चतुर्थाश्रम प्रतिपादिलेला असतो. पण गीतेचा कटाक्ष तसा नाही. संन्यास या शब्दाचा अर्थ व्यापक करून कर्मांचा संन्यास न करिता फलाचा संन्यास करा किंवा संन्यास बुद्धीत ठेवून केवळ इंद्रियानेच जगातील सर्व व्यवहार करीत जा. कर्मे सोडणे इष्ट नाही. ती अवश्य केली पाहिजेत असा गीतेचा भावार्थ आहे. यासच भागवत-धर्म असे म्हणतात. भागवत व स्मार्त या शब्दाचे अर्थ व्यवहारात काही लोक

अनुक्रमे वैष्णव व शैव असा करितात. पण हे अर्थ खरे नव्हत. भागवत भगवंताची उपासना करणारे असतात हे खरे, पण शिवाची उपासना भगवंतास अमान्य नाही हे 'येप्यन्यदेवताभक्ता' या गीतेतील श्लोकावरून उघड होते. तसेच स्मार्त म्हणजे केवळ शिवोपासकच असतात असेहि नाही. कारण आमच्याकडील स्मार्तांमध्ये पंचायतनाची पूजा चालू असून स्मार्त मार्गाचे प्रवर्तक जे आद्यश्रीशंकराचार्य त्यांच्या मठातील उपास्य दैवतहि शिव नसून शारदा आहे. यावरून स्मृत्युक्त आश्रमव्यवस्थेप्रमाणे चालून अखेर कर्मत्यागरूपी संन्यासाश्रम घेणे हे मनुष्याचे कर्तव्य होय असे मानणारे लोक स्मार्त आणि अखेर कर्मत्यागरूप संन्यास घेण्याची जरूर नसून ते काम फलाशासंन्यासानेहि तितकेच सिद्ध होते [illegible] जे भगवंताचे मत ते जे ग्राह्य मानतात ते भागवत—असे या दोन शब्दांचे मूळ अर्थ असावे हे उघड होते. पहिल्या ग्रंथास स्मार्त किंवा सांख्यभागी हे नाव आहे आणि दुसऱ्या पंथास भागवतधर्म किंवा कर्मयोग असे म्हणतात. वस्तुतः पाहिले तर गीता भागवत मार्गाची आहे स्मार्त मार्गाची नव्हे. तथापि या दोन मार्गाबद्दल तंटा करीत बसण्यात हंशील नाही. कर्माचा संन्यास केला काय आणि फलाशेचा संन्यास केला काय सन्यासाचे म्हणजे निवृत्तीचे तत्त्व दोनही ठिकाणी एकसारखेच कायम राहते—एकं सांख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति—अशी समबुद्धीने या दोन मार्गांची एकवाक्यता गीतेत केली आहे. भागवतपुराण हा भागवत धर्मावरील हल्ली मुख्य ग्रंथ समजतात पण ऐतिहासिक दृष्ट्या तो भारतानंतरचा आहे हे त्यातील पहिल्या अध्यायाच्या कथेवरूनच उघड होते. म्हणून मूळचा भागवत धर्म गीतेचाच होय. त्यात केवळ भक्तीला प्राधान्य दिलेले नसून भक्तीने अंतःकरणशुद्धि झाल्यावर निष्काम कर्म केलेच पाहिजे—मामनुस्मर युद्धय च—असा दुहेरी उपदेश आहे. भागवतात निष्काम कर्माचे हे प्राधान्य न राहता भक्तीला प्राधान्य आले असा फरक झाला आहे. भागवत धर्माचे हे दुसरे स्वरूप होय. यात अद्वैतवेदांत कायम होता. पण तोहि पुढे काढून टाकून गीतेत अद्वैताऐवजी विशिष्टाद्वैताचा भक्तीशीं मेळ घातला आहे असे रामानुजानी ठरविले आहे आणि अद्वैत किंवा विशिष्टाद्वैतहि गीतेत प्रतिपाद्य नसून द्वैतवेदांतच गीतेत प्रतिपाद्य आहे असे मध्वाचार्यांचे म्हणणे आहे. पण आमच्या मते हे सांप्रदाय एकदेशी असून अद्वैतज्ञानमूलक भक्तिप्रधान निष्कामकर्मयोगच गीतेतील मुख्य प्रतिपाद्य विषय होय. केवळ ज्ञान व संन्यास अगर केवळ भक्ति गीतेत प्रतिपाद्य नाही.

## उपसंहार

सारांश गीतेतील उपदेश परलोक आणि इहलोक या दोहोतील कार्य साधण्यासाठी सांगितलेला आहे नुसत्या परलोकासाठी नव्हे हे सर्वांनी लक्षात ठेवण्यासारखे आहे. कर्मसंन्यासाने मोक्ष मिळत नाही असे नाही. परंतु लोकसंग्रहासाठी शास्त्रतः प्राप्त होणारे आपले कर्तव्य तुम्ही केलेच पाहिजे असे गीतेचे सांगणे

आहे. नुसती भक्ति या दृष्टीने पाहिले तर नामस्मरण करण्यातच सर्व वेळ घालविणे हाच भक्तीचा परम उत्कर्ष ठरतो. पण कर्मावाचून अशा तऱ्हेची भक्ति करण्याबद्दल गीतेमध्ये कोठेहि वचन नाही. हे जग काही आम्ही केलेले नाही. म्हणून यातील व्यवहारहि आमचे नसून ईश्वरनिर्मित आहेत असे म्हणावे लागते. हे व्यवहार काम्य बुद्धीने अभिमानाने किंवा स्वार्थबुद्धीने केले म्हणजे बंधाला कारण होतात. पण उत्कट भगवद्भक्तीबरोबर जगातील सर्व कामे परमेश्वराची च आहेत किंवा त्यातील काही विशिष्ट भाग करण्याकरिताच ईश्वराने मला जन्म दिला आहे या भावनेने म्हणजे आपण जे काही करतो ते परमेश्वरार्पण करून जगाचे सर्व व्यवहार चालविणे हे प्रत्येक मनुष्याचे काम आहे असा गीतेचा उपदेश आहे. किंबहुना विराटरूपी परमेश्वराची ही एक उपासनाच होते असे म्हटले तरी चालेल व याच हेतूने 'स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः' हा श्लोक गीतेच्या अखेर आला आहे. 'सर्व भूतांच्या हितामध्ये रत' होऊन स्वार्थाचा सर्वस्वी परार्थात लय करणे व अशा आत्मौपम्य बुद्धीने फलाशाविरहित जगातील कामे करणे हा भक्तियोग सर्व भक्तियोगामध्ये श्रेष्ठ होय व हाच गीतेत प्रतिपाद्य आहे. लोककल्याणाची किंवा परोपकाराची उपपत्ति इतक्या सुंदर रीतीने प्राश्चिमात्य पंडित म्हणतात त्याप्रमाणे नुसत्या आधिभौतिक मार्गाने कधीहि लागत नाही. म्हणून गीतेतील कर्मयोग पाश्चिमात्य कर्मयोगापेक्षा अधिक श्रेष्ठ व उदात्त आहे असे माझे मत आहे. अर्जुन अशा तऱ्हेने कर्म करण्यास तयार झाल्यावर ज्याप्रमाणे भगवंताने त्याचे सारथ्य केले त्याप्रमाणे तुम्हीहि हा योग आचरण्यास लागल्यावर तुमचे भगवान साहाय्य करतील यात शंका नाही. ज्ञान आणि काम्य कर्म यांचा विरोध आहे खरा; पण ज्ञान व निष्काम कर्म यात कोणताहि विरोध नाही. म्हणून निष्काम कर्म हे ज्ञानप्राप्तीचे नुसते साधन न मानता ज्ञानोत्तरकर्म गीतेत विहित धरले आहे. सर्वाभूती समबुद्धि झाल्याने कुलाभिमान, देशाभिमान वगैरे सद्गुण नाहीसे होतात असा कित्येकांचा आक्षेप आहे. पण तोहि माझ्या मते खरा नाही. गाय व ब्राह्मण यांच्या ठिकाणी समबुद्धि झाल्यावर गाईच्या पुढला चारा ब्राह्मणास व ब्राह्मणाचे अन्न गाईस ज्याप्रमाणे कोणी घालीत नाहीत, तद्वतच सर्वभूतात्मैक्यबुद्धि व देशाभिमान यांची गोष्ट आहे. स्पेन्सर वगैरे आधुनिक आणि भौतिक पंडितहि सर्वभूतात्मैक्यबुद्धि हेच इहलोकीचे परम श्रेय मानतात. पण ही बुद्धि कायम ठेवूनहि प्रसंगविशेषी सारासार विचारांती देशाभिमानच पतकरावा लागतो, असे जे त्यानी प्रतिपादन केले आहे त्यास कोणी हरकत घेत नाही. मग वेदांतासच ती हरकत लागू का करावयाची ? वेदांत तुम्ही देशाभिमानाने वागता किंवा कुलाभिमानाने वागता हे पाहत नाही. सारासार विचारांती ज्या प्रसंगी शास्त्रतः जे योग्य दिसेल ते तुम्ही करा, त्यास वेदांत नको म्हणत नाही. पण या सर्वांचे मूळ सर्वभूतात्मैक्यबुद्धि असल्यामुळे ती बुद्धि प्रथम संपादन करा आणि मग व्यवहारात जी कर्मे प्राप्त होतील त्यांचा समबुद्धीने

विचार करून ती करीत जा, असे गीताधर्म कंठरवाने सांगत आहे. आणि मनुष्यमात्राच्या अंगी असणाऱ्या बुद्धि ( ज्ञान ) श्रद्धा ( भक्ति ) आणि कर्म या तीन वृत्तींची अशा रीतीने जितकी सुंदर जोड घालता येते तितकी दुसऱ्या कोणत्याहि शास्त्रीय पद्धतीने घालता येत नाही, असे माझे मत आहे. माझ्या ग्रंथाचा सारांश काय हे यावरून सामान्यतः लक्षात येईल. यावर पुष्कळ शंका घेण्यासारख्या आहेत, नाही असे नाही. कारण निष्काम कर्मयोगाला मी देतो तितके महत्त्व टीकाकार देत नाहीत हे मला माहीत आहे पण माझ्या मतावरील सर्व शंकांची उत्तरे येथे देणे शक्य नाही; त्यासाठी समग्र ग्रंथच वाचला पाहिजे व तो शक्य तितका लवकर प्रसिद्ध करण्याची व्यवस्था मी करीत आहे. थोडक्यात सांगणे असल्यास ब्रह्मविद्यामूलक भक्ति गीतेत प्रतिपाद्य आहे, इतकेच नव्हे तर त्याबरोबर तितक्याच योग्यतेचा निष्काम कर्मयोगहि अवश्यक म्हणून प्रतिपादिला असल्यामुळे गीता हे ब्रह्मविद्यामूलक भक्तिसहचारी नीतिशास्त्र होय असे माझे मत आहे."

## ( ८ ) गीतारहस्यावरील अभिप्राय व टीका

गीतारहस्याविषयी जे निरनिराळे अभिप्राय प्रगट झाले त्यात जमीन अस्मानचे अंतर आहे असे म्हटल्यास खरोखरच यात अतिशयोक्ति होणार नाही. कारण गीतारहस्यात ' दगड देखील ' विशेष काही नाही असे म्हणणारे भेटले ही जमीन ! आणि गीतारहस्य ही ' भगवंताचीच वाणी पुन्हा एक वेळ टिळक मुखातून अवतीर्ण झाली ' असे म्हणणारे भेटले हे अस्मान होय ! वस्तुवर्णन करिताना मनुष्य गुणदोषांच्या दृष्टीने ते वर्णन यथार्थ रेखीव मापीव कसे होईल याकडे लक्ष देत नाही. तर आपली भावना अधिकात अधिक ठसकेदार शब्दानी कशी व्यक्त होईल याकडेच त्याचे लक्ष असते. गीतारहस्य हा ग्रंथ गीतेइतकाच पवित्र मानणारानी, तो छापखान्यात बांधविताना पृष्ठभागी त्याला चामड्याचा तुकडा लावला याबद्दलहि टिळकाना प्रेमाने दूषण दिले. आणि आपण घेतलेली प्रत पुन्हा उसवून ती सोवळ्यात वापरण्याकरिता रेशमी पुठ्याने बांधवून घेतली. याच्या उलट गीतारहस्याला नावे ठेवण्याच्या भरात केवळ त्यात गीतेला सर्वोत्कृष्टपणा दिला तोहि न खपून मूळ गीतेला निकृष्ट व कवडीमोल ठरविण्याचा हिसाळहि कित्येकाना आला. कित्येक भाविकानी असे म्हटले की श्रीकृष्णाचा अवतार तुरुंगाच्या बंदिवासात झाला तसाच गीतारहस्याचा अवतार मंडाले येथील तुरुंगात झाला हे ठीकच झाले. कारण भारत कालीन पिढीला जसा श्रीकृष्ण हा कर्तव्यप्रेरक झाला तसेच गीतारहस्य हे हल्लीच्या भारतीय पिढीला कर्तव्यप्रेरक होणारे आहे. 'भगवान टिळक' हे नाव एकूण अगदीच फुकट गेले नव्हते ! उलट कित्येक निंदकानी असे म्हटले की तुरुंगवासाने प्राप्त झालेल्या खोट्या मोठेपणामुळे अंगी आलेल्या अहंकारात भर पडण्याला गीतारहस्य ही टिळकाना आणखी एक टूम

झाली खरी ! आपणासंबंधाने तीव्र लोभाप्रमाणे तीव्र द्वेष लोकांच्या मनात उत्पन्न करण्याची पात्रता टिळकांच्या अंगी होती याचे गीतारहस्यावरील अभिप्राय हे एक प्रत्यंतरच होय.

गीतारहस्याची स्तुति करणारामध्ये किती प्रकारचे लोक होते व कोणत्या निरनिराळ्या कारणानी त्यानी गीतारहस्याची स्तुती केली याचा थोडासा खुलासा करून नंतर त्यांच्या टीकाकारांकडे वळू. मात्र गीतारहस्याची स्तुति करणारांपेक्षा त्याची निंदा करणारानी किंवा त्यावर टीका करणारानी तो ग्रंथ अधिक काळजी-पूर्वक वाचला होता यात शंका नाही. असो. स्तुति करणारापैकी पहिला व मोठा वर्ग तो 'ग्रंथ टिळकांचा' म्हणून स्तुति करणारांचा. दुसऱ्या कोणी हा लिहिला असता तर त्याची त्यानी इतकी स्तुति केली नसती. टिळक मोठे त्यांचा ग्रंथहि मोठा. मोठ्या मनुष्याच्या हातून मोठाच ग्रंथ निर्माण व्हावयाचा. ग्रंथ इतक्या महत्त्वाचा नसता तर तो लिहिण्यात टिळकानी आपला वेळ खर्चलाच नसता. वेळ मोकळा असला म्हणून काय झाले ? सिंहाला कितीहि भूक लागली तरी तो काही गवत काडी खाणार नाही. अशा अनुमानिकाना अर्थात् ग्रंथ पाहण्याचेहि कारण नाही. याच्या पुढची पायरी म्हणजे ग्रंथ नुसता पाहून त्याची स्तुति करणारांची. आणि खरोखर गीतारहस्य हा 'ग्रंथ इतका मोठा' आहे की तो नुसता पाहूनहि त्याच्याबद्दल आदरबुद्धि उत्पन्न व्हावी. मराठी भाषेत एका मनुष्याने एकदम लिहिलेला येवढा मोठा ग्रंथ बहुधा पाहावयास सापडत नाही. नाही म्हणावयाला वे. शा. सं. बापट शास्त्री यांचा 'गीताभाष्यार्थ व रहस्यपरीक्षण' हा ग्रंथ याच विषयावर असून तो याहून सव्वादीडपट एवढा मोठा आहे. बापट शास्त्री हे गीतारहस्यापुरते टिळकांचे प्रतिपक्षी. त्यांचा जवळ जवळ सर्व जन्म श्रीमदा-चार्यांचे ग्रंथ वाचण्यात व त्यांचे मनन करण्यात गेला. टिळकांच्या गीतारहस्याने परंपरेचा व सत्याचा उच्छेद मांडला असे वाटून प्रतिकार बुद्धीने हा ग्रंथ लिहिण्यास ते प्रवृत्त झाले. आणि थोड्या कालावधीत त्यानी सुमारे १३०० पानांचा ग्रंथ लिहून छापून प्रसिद्ध केला. बापट शास्त्री यांच्या ग्रंथाला त्या ग्रंथाच्या महत्त्वाच्या मानाचे प्रसिद्धी लाभली नाही असे पुष्कळांचे म्हणणे आहे. पण व्यक्तिमहा-त्म्याचे अधिष्ठान ग्रंथाला लाभावे ही गोष्ट स्वाभाविकच आहे. त्याविषयी तक्रार करण्यात अर्थ नाही. शिवाय उपोद्घातरूपाने टिळकानी जी ५००।६०० पाने, गीतेचे भाषांतर टीका व टीपा यांच्या आधी, दिली आहेत त्यांतच खरोखर टिळकांच्या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे. यामुळे बापट व टिळक यांच्या ग्रंथांच्या तुलनेला समान अधिष्ठान आहे असे म्हणता येत नाही. मुख्य मुद्दा हा की एवढा मोठा ग्रंथ पूर्वी कोणाहि ग्रंथकाराने लिहिलेला नव्हता. असो. यानंतरची पायरी म्हणजे एवढा मोठा ग्रंथ 'गीता विषयावर लिहिला' या विषयी कौतुक करणारांची. टिळक राज-कीय विषयावरील वर्तमानपत्राचे लेखक म्हणून लोकाना माहीत होते. धर्मबुद्धीने ते आस्तिक पुराणमतवादी व वेदशास्त्र पाहिलेले इतकी लोकाना कल्पना होती.

परंतु गीतेवर हजार पाचशे पानांचा स्वतंत्र ग्रंथ लिहिण्याइतका व गीतेवर नुसते भाष्यच नव्हे तर तुलनात्मक तत्त्वज्ञानाचा निबंध लिहिण्याइतका असा धर्मविषयाचा टिळकांचा अभ्यास होता ही गोष्ट लोकांच्या प्रत्ययाला प्रथमच आली. म्हणून त्यांच्या विद्वत्तेच्या पैलुदारपणाचेच त्याना आश्चर्य वाटले. यानंतरची पायरी एवढा ग्रंथ 'तुरुंगात लिहिला' याबद्दल कौतुक करणारांची. आणि हे त्यांचे कौतुक मात्र खरोखरच योग्य प्रकारचे होते. कारण तुरुंगातून स्मरणाने व शेकडो पुस्तके मागवून ती वाचून असा ग्रंथ लिहिणे ही मोठीच गोष्ट होती. आणि याहि पेक्षा कौतुक करण्याची खरी एक गोष्ट अशी की टिळकानी हा 'सर्व ग्रंथ पेनसिलीने व स्वहस्ते' लिहिला. जी गोष्ट म्हणजे हाताने मजकूर लिहिण्याची गोष्ट टिळकानी जन्मात केली नाही ती तुरुंगात यावेळी केली. तुरुंगात कंटाळा येण्याइतका वेळ मोकळा होता. तेथे लिहिण्याला लेखकच नव्हता. पेनसिलीनेहि कागदावर अक्षर उमटत नाही असे नाही. या सर्व गोष्टी खऱ्या. पण प्रतिकूल स्थितीत इतर मनुष्य कंटाळतो तसे टिळक कंटाळले नाहीत ही कौतुकाची गोष्ट काही लहानसहान नाही.

गीतारहस्यात इतर भाष्यग्रंथावर व टीकांवर स्वतः टिळकानी केलेली प्रतिटीका, त्या टीकेवर टिळकानी दिलेली उत्तरे, त्या उत्तरावर इतरानी दिलेली प्रत्युत्तरे, आणि या सर्व वादात पुढे आलेल्या शंका व त्यांचे समाधान, कोट्या व प्रतिकोट्या निंदा व प्रतिनिंदा अपशब्द व प्रत्यपशब्द यांचा संभार इतका मोठा आहे की तो सर्व एकत्र छापला असता जवळ जवळ एक हजार पृष्ठे भरतील. या सर्वांचा परामर्ष स्थूलपणानेहि घेणे या ग्रंथात शक्य नाही. शिवाय तो घेण्याचे फारसे प्रयोजन नाही. कारण आपण इतके खोलात गेलो तरी हाताला काय लागणार? फक्त चार दोनच महत्त्वाचे मुद्दे. पण तेच इतर रीतीने सांगता येण्यासारखे आहेत. पण वादाचे मुख्य कारण हे की कोणताहि ग्रंथ लावताना मनुष्य असे घेऊन चालतो की लिहिणाराने तो काही एका विशिष्ट हेतूने लिहिलेला असतो इतकेच नव्हे तर त्यातील प्रत्येक शब्द त्या हेतूच्या सिद्ध्यर्थ असतो. या समजुतीत फारशी चूक नाही. पण जेव्हा निरनिराळ्या वृत्तीचे निरनिराळ्या मतांचे लोक प्रामाण्य बुद्धीने त्या ग्रंथाला आदरितात, व तसे करिताना तो ग्रंथ आपल्याच विशिष्ट वृत्तीच्या किंवा मताच्या सिद्ध्यर्थ किंवा समर्थनार्थ मूळ लिहिला गेला आहे असे मानून चालतात तेव्हा अनवस्था प्राप्त होते.

ग्रंथकाराच्या लिहिण्यात प्रसाद म्हणजे स्वच्छता निर्मळता कितीहि असली तरी ग्रंथ हे चित्र आहे तो आरसा नव्हे. अगदी दोनप्रहरच्या उन्हाचे चित्र किंवा अंधकाराने व्यापिलेल्या गडद आभाळाचे चित्र म्हटले तरी ते कोणत्या तरी एका रंगाने एकजात सारविलेले असणार. त्यात अनेक आकृती फक्त मनाने कल्पण्यासारखीच भूमिका असते. परंतु आरसा जसा कोणाहि पाहणाराला त्याचेच तोंड बिनचूक प्रामाणिकपणाने व निरपवादरीतीने दाखवू शकतो तसे कर्तृत्व कोण-

ताहि ग्रंथ कितीहि प्रसादयुक्त असला तरी त्याच्यामध्ये असत नाही. दुसरे पक्षी ग्रंथामध्ये प्रसादाच्या स्वच्छपणापेक्षा प्रतिभेचे तेज अधिक चमकत असेल; तथापि प्रकाशात निरनिराळ्या बाजूनी धरला असता निरनिराळे रंग प्रकट करण्याची जी शक्ति पैलुदार हिऱ्यामध्ये असते ती प्रतिभोद्दीपित ग्रंथात असू शकणार नाही. प्रतिभेची व्याख्या कित्येक साहित्यशास्त्रकारांच्या मताप्रमाणे जरी 'प्रतिक्षणी नवीन काही तरी उन्मेष विकास किंवा रमणीय रूप दाखविणारी शक्ति' अशी असली तरी ग्रंथ म्हटला म्हणजे तो सर्वच काही शब्दशः असा विचित्रदर्शन किंवा अनंतदर्शन होऊ शकणार नाही. त्यातील मुख्य सिद्धांताच्या आजूबाजूने इतर अनेक सिद्धांत डोके वर काढून दाखवू शकोत. किंवा सुचविले जावोत. पण मूळ ग्रंथकाराला अभिमत असा काही तरी एक सिद्धांत स्थिर व आधारभूत अशा स्थाणूप्रमाणे असावाच लागतो. पण आपल्या इकडील काही प्रकारच्या धार्मिक वाङ्मयात सूत्ररूपाने लिहिण्याची पद्धति व त्याच्या जोडीला निरतिशय शब्दप्रामाण्यबुद्धि असल्यामुळे, एका शब्दातून अनेक लोक आपापल्या परी अर्थ काढण्याचा प्रयत्न करितात. यामुळे त्यांची स्वतःची आणि ते ज्याचा अर्थ करितात त्याची बेसुमार ओढाताण सहजच होते. जुने वैदिक वाङ्मय आज इतक्या दिवसानी शिल्लक उरले हीच मोठी गोष्ट. पण त्याचा अर्थ आजच्या भाषेने लावून दाखविणारे शब्द–कोश किंवा भाष्ये वार्तिके उपलब्ध नाहीत. काही असली तरी ती निराळ्या हेतूने लिहिलेली आहेत. पुढे येणाऱ्या अनंत पिढ्याना मध्यंतरी येणारी गंडांतरे–म्हणजे अपभ्रंश लक्षणा रूढी–वगैरे सर्वातून उत्तीर्ण होऊन प्रत्येक पिढीला त्या त्या काळी पटणाऱ्या शब्दानी अर्थ समजावून देण्याकरिता ती लिहिलेली नाहीत खास. यामुळे जुन्या शब्दप्रयोगांचा आम्ही नवीन अर्थ आपल्या आजच्या रूढीप्रमाणे बसविणार. आणि या रूढीभेदात मतवैचित्र्याची व हेतुवैचित्र्याची भर पडली म्हणजे मग मूळच्या शब्दार्थात विकृति किती होत असेल हे सांगावयास नको. वेदांतसूत्राचे उदाहरण घेतले तर असे दिसून येईल की एकाच सूत्राचा अर्थ चार मतांच्या भाष्यकारानी चार प्रकारचा लाविलेला आहे. सूत्रे त्रुटित म्हणून कदाचित् ही युक्ति साधली असेल असे म्हणावे तर ज्यात तो दोष नाही अशा सरळ सबंध भरपूर शब्दांच्या वाक्यानी लिहिलेल्या काही प्रमाण ग्रंथांची गोष्टहि तशीच झालेली आहे. व भगवद्गीता हेच त्याचे एक उत्कृष्ट उदाहरण होय. कारण या ग्रंथात शब्द कमी किंवा अपुरे पडले आहेत असा आक्षेप कोणालाहि काढण्याला जागा नाही. उलट शब्दप्राचुर्य व पुनरावृत्ति या दोषांचा आरोप करण्यासहि गीतेत थोडीशी जागा आहे. असे असता संक्षिप्त किंवा त्रुटित स्वरूपाच्या वेदांत–सूत्रावर जितकी अनेक मतप्रदर्शक भाष्ये झाली आहेत तितकी किंवा त्याहून अधिक सरळ सोप्या प्रासादिक किंबहुना पाल्हाळिक अशा गीतेवर झाली आहेत. व त्याचे कारण अनेक मतांच्या लोकानी

प्रामाण्यबुद्धीमुळे "गीता हा ग्रंथ आमचेच मत प्रतिपादन करणारा आहे, आमचेच मत सहेतुक व निर्भेळ प्रतिपादन करणारा आहे", असा आग्रह धरिला हे होय.

या आग्रहामुळे प्रत्येक सिद्धांतवादी आपल्या प्रतिपक्षावर नेमका तोच-म्हणजे शब्दांची ओढाताण केल्याचा व अर्थ विपरीत लावल्याचा—आक्षेप घेत असल्याचे दिसून येईल. आणि या बाबतीत टिळकानी जसा पूर्वीच्या टीकाकारांवर हा आक्षेप घेतला तसाच गीतारहस्याच्या टीकाकारांनी तो टिळकांवर घेतलेला आहे. आणि काही ठिकाणी तो लागूही पडतो. याचे कारण टिळक हे आधुनिक शास्त्र-संस्कृतीने युक्त असले तरी गीतेच्या बाबतीत त्यानी पुरातनांइतकीच प्रामाण्यबुद्धि ठेविली आहे. यामुळे इतरांप्रमाणे स्वतः टिळकानाहि गीतेचा अर्थ बसविताना नडणारे शब्द निरर्थक म्हणून गाळावे लागले आहेत. किंवा त्यांचा अर्थ विपरीत किंवा रूढीविरुद्ध करावा लागला आहे. किंवा जेथे त्यानेहि भागले नाही तेथे काही विशिष्ट शब्द किंवा विशिष्ट परिस्थिति किंवा विशिष्ट शंका–समाधान किंवा विशिष्ट हेतू गृहीत धरावा लागला आहे. यामुळे टिळकाना आपला सिद्धांत निःशंक किंवा निरपवाद रीतीने सिद्ध करता आलेला नाही. आता हे सर्व आक्षेप जमेस धरले तरी टिळकांची विद्वत्ता बहुश्रुतपणा कुशाग्रबुद्धि आणि समाजोप-कारित्व इतक्या गोष्टी गीतारहस्य ग्रंथात शिल्लक उरतात म्हणून निःपक्षपाती मनुष्य याच दृष्टीने या ग्रंथाची वाहवा करितो. पण एकंदरीने येवढी गोष्ट खरी की हा ग्रंथ लिहिल्याबद्दल टिळकांची कसून स्तुति करणारापेक्षा त्यांची कसून निंदा करणारे किंवा टीका करणारे लोकच अधिक निघाले. 'अस्फुट' रीतीने टिळकांचा या ग्रंथाबद्दल गौरव करणारे शेकडो किंवा हजारो लोक झाले व आहेत यात शंका नाही. किंबहुना सरसकट रीतीने असेहि म्हणता येईल की यच्चयावत नव्या पिढीला कोणत्याहि कारणाने का होईना पण गीतेचा प्रवृत्तिपर अर्थ लावणारा हा ग्रंथ मान्य व आदरणीय झाला आहे. पण हा बहुतेक करभार गुप्त दानाच्या स्वरूपाचा आहे. उलट ग्रंथासंबंधाने मत व्यक्त करण्याकरिता म्हणून ज्यानी शाईत लेखणी बुडविली अशांची गणति केली असता गीतारहस्यावर टीका करणारे किंवा आक्षेप घेणारेच लोक अधिक निघाले यात शंका नाही. याचे कारण ज्याचे पोट दुखेल तोच ओवा खाईल ही म्हण होय. ज्याना मान्यता दर्शवावयाची आदर प्रकट करावयाचा स्तुति करावयाची त्याना खोल पाण्यात शिरण्याचे कारणच नव्हते. त्यांच्या कार्याला काही सामान्य ठराविक शब्दच पुरे पडण्या-सारखे होते. पण या ग्रंथाने आपल्या जुन्या समजुतीना धक्का दिला असे ज्याना भासले त्यानाच खोल पाण्यात शिरावे लागले चर्चेची उठाठेव करावी लागली व मना-तला अभिप्राय कागदावर लिहिण्याचे श्रम करावे लागले. नाही म्हणण्याला रहस्यदीपिकाकार भिडे शास्त्री यांच्यासारखा एकादा जुन्या पद्धतीचा विद्वान किंवा चिंतामणराव वैद्य यांच्यासारखा नव्या पद्धतीचा विद्वान गीतारहस्याला

समर्थनपर लेख लिहिण्याला पुढे आला. नाही असे [illegible]. [illegible]ण प्रत्यक्ष लेख लिहिणारात प्रतिकूल टीका करणारेच अधिक.

इतकी प्रस्तावना करून या ग्रंथावरील साधक बाधक टीकेचे काही थोडे नमुने या खाली देतो. या नमुन्यांची वर्गवारी लाविली असता असे आढळून येईल की काही थोडे निवळ बौद्धिक टीकाकार आहेत. पण पुष्कळसे भावनाप्रधान आहेत. पण त्यांतहि एक पोटभेद असा की बौद्धिक म्हणजे अश्रद्धावान अशा टीकाकारानीदेखील पुष्कळ ठिकाणी विकारवश होऊन स्वतः टिळक किंवा वेदांत किंवा हिंदु धर्म यांच्याविषयी नापसंतीची भावना उत्कट रीतीने प्रकट केली आहे. तशीच उलट श्रद्धाळू व भावना-प्रधान टीकाकारामध्येहि ग्रंथसंगति लाविताना अर्थ करताना किंवा अनुमान रचिताना काहीनी पुष्कळच चिकित्साबुद्धि व शुद्ध तर्कप्रेम दाखविले आहे. या उभय टीकाकारात जसे सात्त्विक रजोगुणी व तामस टीकाकार आहेत तसेच सांप्रदायिक किंवा बुद्धिस्वातंत्र्याविषयी प्रेम बाळगणारेहि टीकाकार आढळतात. कारण सांप्रदाय म्हटला म्हणजे त्याचा प्रकार एकच. मग तो पुराणमतवादी असो किंवा नवमतवादी असो. तसेच अनुकूल टीकेत काही टीका इतक्या वीट येणाऱ्या स्तुतीच्या आहेत की सुगंधी हे नाव घेऊन एक मैलावरून कपाळ उठविणाऱ्या किंवा वांति करविणाऱ्या दर्पयुक्त जर्मन सेंटची किंवा ओटो दिल-बहारच्या कार्डाचीच उपमा त्याना साजेल. उलट प्रतिकूल टीकेतहि असे काही मासले आढळले की जणू काही डिकेमाली किंवा आयडोफार्म यांच्या रसाने बनविलेल्या शाईतच वरचेवर लेखणी बुडवून लेखकाने लिहिले असावे.

अतिशयोक्तिपूर्ण स्तुतीचा नमुना पाहिजे असेल तर मुंबईच्या एका पत्रातील खालील उतारा वाचा:—

" लो. टिळकांचा गीतारहस्याचा हा ग्रंथ प्रकट झाला. ज्या ग्रंथाने एका असामान्य विद्वान् पुरुषाच्या बुद्धि–कुक्षीत सहा वर्षे गर्भवास केला त्याने महाराष्ट्र-वाङ्मयाचा पाळणा गेल्या आठवड्यात पाहिला. ज्या ग्रन्थरवीची अरुण–प्रभा आपल्या रुचिर कल्पना–कान्तीने गेली दोन वर्षे महाराष्ट्रावर मन्द परन्तु सौख्यकर प्रकाश पाडीत होती त्या बालसूर्याने मुद्रणकल्पाच्या उदय–गिरीवरून गेल्या आठवड्यात आपले कमनीय शीर्ष व्यक्त केले. ज्या कोहिनूर हिऱ्यावरील सन्देहस्थितीच्या पेटीचे झाकण एक वर्षापूर्वीच उघडले गेले होते त्याचेवरील मुद्रणसंस्काराचे किनखाबी वेष्टन गेल्या आठवड्यात दूर सारले जाऊन त्याचे नेत्रानन्दकारक तेज झळकूं लागले. भगवान् श्रीकृष्णाच्या मुरलीचा ध्वनि ज्ञानेश्वर आणि वामन-पण्डित ह्यांच्या वेळेपासून ह्या महाराष्ट्रात घुमण्याचे जे बन्द पडले होते त्याला गेल्या आठवड्यात पुन्हा सुरवात झाली. नन्दकिशोराची जी हृद्यवेणुगीते पूर्वी यमुना-तटावरील गोधने व खिल्लारे ह्यांच्या कर्णप्रान्तावर आदळून त्यानाही सहजानन्द–स्थिति प्राप्त करून देत असत त्या वेणु–गीतांचा उत्साह–प्रवर्तक–नाद गेल्या

आठवड्यात महाराष्ट्राच्या पुन्हा कानावर आला. कर्तव्या–कर्तव्याच्या व्यामोहात पडलेल्या अर्जुनास छिन्नसंशय करून त्यास जन्म–सार्थक्याचा मार्ग दाखविणारी कृष्णवाणी गेल्या आठवड्यात पुन्हा जागृत झाली. गीताक्षरांचे अक्षरत्व गेल्या आठवड्यात पुन्हा प्रस्थापित झाले. गीता-वाक्याना गेल्या आठवड्यात फिरून वाचा फुटली. गीतार्थ संदोहनाच्या अमृतधारा गेल्या आठवड्यात पुन्हा वर्षावू लागल्या. इतके दिवस फक्त आकाश–जीवनाच्या वृष्टीसच आरंभ करणाऱ्या मृग-नक्षत्राने गेल्या आठवड्यात आपली प्रतिवार्षिक जलसेवा थाम्बवून प्रथम गीतान्तर्गत ज्ञानजीवनाच्या मृग–झडीस आरंभ केला. जलवृष्टीच्या कार्याची प्रतिवर्षी चिन्ता वाहणाऱ्या वृत्र–हंत्या इन्द्राने गीतार्थ–तुंदिल ज्ञानमेघाना पाहून आपले जल–मेघ व्योम-मार्गातून एक क्षणभर दूर केले. पर्जन्य-वृष्टीच्या कृष्णमेघानो, ह्या महाराष्ट्राला जल–वर्षावापेक्षा ज्ञान–वर्षावाची जास्ती अवश्यकता आहे अशी तुमचीहि समजूत झाली काय ? अचेतन वापीना आणि चंचल नद्याना भरपूर भरून टाकून क्षार जलाची भरती करण्यापेक्षा महाराष्ट्रातील चेतन परंतु निश्चल लोकप्रवृत्तीत ज्ञानाचे जीवन ओतणे हेच तुम्हास जास्ती महत्त्वाचे वाटले काय ? निसर्गतः मृदु व कृष्णा–वेण्यासारख्या पवित्र सरितांच्या योगाने तर जास्तीच मृदुहृदय झालेल्या ह्या महाराष्ट्र भूमीत आकाशातील पाणी वाटेल तसे बेअंदाजाने ओतून कर्दम व पंक ह्यांचीच निष्पत्ति करण्यापेक्षा, अज्ञानाच्या योगाने पाषाणतुल्य बनलेल्या महाराष्ट्रीय लोकांच्या अन्तःकरणावर स्वर्गातील बोधामृताचा मारा करून त्याना पाझर फोडणे हेच तुम्हाला आपले सद्यःकर्तव्य वाटले काय ? खरोखर तुम्हांस जर असेच वाटले असेल तर तुम्ही महाराष्ट्राची स्थिति बरोबर ओळखलीत, तुम्हाला महाराष्ट्राच्या अवश्यकतेची खरी जाणीव झाली, भगवद्गीतारहस्य तुम्हाला खरे समजले ! ”

प्रतिकूल टीकेत वरील स्तुतिप्रमाणे निंदेचा एकाच ठिकाणी मारा केलेला असा लेख सापडत नाही तथापि ग्रंथकार व ग्रंथ यांच्याविषयी जे शेलके शब्द वापरण्यात आले आहेत त्यांची कंथा बनविली असता ती त्या दोघानाही पुरून उरेल इतकी मोठी होईल.

गीतारहस्याच्या टीकाकारामध्ये सर्वात प्रमुख स्थान पुण्याचे आचार्यभक्त विष्णुशास्त्री बापट याना दिले पाहिजे. यांचा बहुतेक जन्म शंकराचार्यांच्या ग्रंथाचे पठन व पाठण करण्यात गेला. व आचार्य या नावाचे मासिक पुस्तक काढून त्यानी आपली आचार्यभक्ति विशेष रीतीने प्रगट केलेली होती. टिळकानी मंडालेहून परत आल्यावर गीतारहस्य छापण्यापूर्वी गायकवाडवाड्यात गीतारहस्यावर चार व्याख्याने दिली. पण त्याबरोबर पाचव्याच दिवशी त्याच जागी स्वतः टिळकांच्याच अध्यक्षतेखाली बापटशास्त्री यानी व्याख्यान देऊन गीतारहस्यावर आक्षेप प्रगट केले. नंतर शांकरभाष्यानुसार गीतारहस्य सांख्ययोग शास्त्र वगैरे लेख लिहून व पुस्तके प्रसिद्ध करून त्यानी गीतारहस्यावर आणखी पद्धतशीर टीका केली. पण

एवढ्यानेहि न भागता त्यानी गीताभाष्यार्थ अर्थात रहस्यपरीक्षण या नावाचा पूर्वी सांगितलेला प्रचंड ग्रंथ १९२१ साली प्रसिद्ध केला. त्यात गीतारहस्यातील जवळ जवळ शब्दान् शब्द खोडून काढण्याचा प्रयत्न केला आहे असे म्हणण्यास हरकत नाही. इतर रीतीने टिळकांविषयी आदरबुद्धि किंबहुना पूज्यभाव असताहि विषयानुरोधाने टीका करण्याचा प्रसंग आला असता भाडभीड न धरता जशास तसे उत्तर देण्याचे एक नमुनेदार उदाहरण बापटशास्त्री यांचे होय. पण या टीकेतील प्रखर असा जो भाग आहे त्याचे कारण, बापटशास्त्री यांच्या म्हणण्याप्रमाणे, स्वतः टिळकानी शंकराचार्यांवर टीका करिताना जो प्रखरपणा दाखविला तोच होय. बापटशास्त्री यांचे म्हणणे असे की "टिळकानी संन्यास मार्गीय टीकाकारांचे नाव पुढे करून आचार्य भाष्यावरच दोषारोपाचे सर्व हल्ले केले आहेत. तसेच गीतेला कर्मयोगशास्त्र हे नाव देऊन नवीन शास्त्र किंवा सांप्रदाय बनविण्याचा वृथा प्रयत्न त्यानी केला आहे. आणि पुष्कळसे लोक टिळकांच्या नव्या ग्रंथाला जो मान देतात तो त्यांच्या इतर गुणावर व योग्यतेवर भुलून केवळ पक्षपाताने व विषयाच्या अज्ञानामुळे देतात." ते म्हणतात "गीतारहस्याच्या अनुकूल बोलणे सोपे आहे व ते दृष्टफल देणारे आहे! टिळकांच्या प्रतिपक्षीयाना त्यांच्यावर टीका करण्याला योग्य तो वाव किंवा संधि मिळत नाही. टिळकांचा जन्मसिद्ध विषय राजकारणाचा. पण जो त्यांचा जन्मसिद्ध विषय नव्हे त्यात त्यानी वृथा प्रवेश करून व निराधार सिद्धान्त प्रतिपादन करून आपल्या विषयीची आदरबुद्धि गमावली व अप्रीतिला प्रात्र झाले! गीतारहस्य हे त्यानी उगाच फावल्या वेळी दुसरे काही काम नाही म्हणून केलेले काम आहे. म्हणून त्याची योग्यता तितपतच. वाईट इतकेच की त्यांच्या उदाहरणाने व उत्तेजनाने ज्या लोकाना पूर्वी शंकराचार्याविरुद्ध लेखणी किंवा जीभ उचलण्याला छाती नव्हती त्या लोकाना सहजच सवड मिळाली. टिळकाशिवाय दुसऱ्या कोणी गीतारहस्य लिहिले असते तर जनतेने त्याची उपेक्षाच केली असती. असल्या योग्यतेच्या ग्रंथाला लोक 'ग्रंथराज' म्हणू लागले हा केवळ कालमहिमा व व्यक्तिमहिमा होय! किंबहुना टिळकांची गौतमबुद्धाच्या अल्प प्रमाणात नवी आवृत्ति आहे. गीतारहस्याचा उपयोग इतकाच की सुशिक्षित लोक गीतेपासून पूर्वी पराङ्मुख झाले होते, तरी त्यांचे तोंड आता या ग्रंथाकडे वळण्याला थोडीशी मदत झाली. व ज्यानी गीताभाष्याचे अध्ययन करण्यात जन्म घालविला त्यानाहि गीतारहस्याला उत्तर देण्याकरिता अधिक खोलात जाऊन अधिक अभ्यास करावा लागला. टिळकानी सांप्रदाय तर सोडलाच पण पाश्चात्यांचा चष्मा लावून गीतेकडे पाहिले यामुळे त्यांचा ग्रंथ पदोपदी आक्षेपार्ह झाला आहे." बापटशास्त्री टिळकाना येऊन जाऊन भलेपणा देतात तो इतकाच की 'या ग्रंथात टिळकांचा बहुश्रुतपणा दिसून येतो व आपल्या पक्षाचे समर्थन करण्याची त्यांची शैली इतकी विलक्षण आहे की उत्तर देताना प्रत्येक मुद्याचा विचारच करावा लागतो!'

बापटशास्त्र्यांच्या नंतर प्रतिकूल टीकाकारांत वाईचे भाऊशास्त्री लेले यांचा क्रम लागतो. लेलेशास्त्री यानीहि गीताभाष्याचे अध्ययन चांगले केलेले होते. गीतारहस्याची लेखी प्रत लेलेशास्त्री यानी वाचली होती आणि 'बऱ्याच उपयुक्त व मार्मिक सूचनाहि केल्या होत्या' असा टिळकानी ग्रंथाच्या प्रस्तावनेत त्यांचा उल्लेख केला आहे. तथापि या ज्या सूचना त्यानी टिळकाना केल्या त्या टिळकांच्या दृष्टीने केल्या असे म्हणावे लागते. निदान त्या करिताना विरोधक टीकाकाराची भूमिका लेले शास्त्र्यांच्या मनात विशेष स्पष्टपणाने प्रकट झाली नव्हती. लेले शास्त्री हे एक खंदे लेखक होते. त्यांचा लेखनव्यवसाय जसा मोठा जबर तसा त्यांचा युक्तिवाद व भाषाहि उघड व अप्रतिहत असे. शिवाय भाषेचा कडकपणा खवचटपणा वाटेल त्यावर व वाटेल तसे तोंड बेगुमान टाकण्याची त्यांची सवय या सर्व गोष्टी लक्षात घेता त्यानी गीतारहस्यावर जी टीका केली ती त्यांच्या नेहमीच्या मानाने पहाता बरीच सौम्य होती असे म्हणण्यास हरकत नाही. 'धर्मनिबंधमाला' या मासिक पुस्तकाच्या पहिल्या अंकात 'भगवान श्रीशंकराचार्य व लोकमान्य टिळक' या मथळ्याखाली त्यानी लेखमाला सुरू केली आणि पुढे पाचव्या अंकापासून कित्येक अंक त्यानी गीतारहस्याच्या परीक्षणाने भरून काढिले आहेत. तेव्हा अशा टीकाकाराचे म्हणणे गीतारहस्यासंबंधाने काय आहे हे थोडक्यात दिले पाहिजे. लेले शास्त्री लिहितात 'गीतेचे रहस्य टिळकानी काढले ते शंकराचार्यांच्या रहस्याहून एका गोष्टीत भिन्न होते. पण टिळकांचा शंकराचार्यांशी जो विरोध होता तो सप्रमाण आहे व त्यामुळे समाजाचे काहीएक नुकसान न होता झाला तर फायदाच होणार आहे. वर्णाश्रमविहित कर्मे केल्याशिवाय अंतःकरण-शुद्धि नाही व त्या शुद्धीशिवाय ज्ञानप्राप्ति नाही व ज्ञानप्राप्तिशिवाय मोक्ष नाही हा शंकराचार्यांचा सिद्धांत टिळकानाहि मान्य आहे. परंतु शंकराचार्यांचे जे मत टिळकाना मान्य नाही ते हे की संन्यासाश्रम स्वीकारल्याशिवाय मोक्ष प्राप्त होण्याचा संभव नाही. फक्त टिळकांचे म्हणणे असे की ज्ञानोत्तर संन्यासाश्रमाने मोक्षप्राप्ति होईल तशीच ज्ञानोत्तर कर्मानुष्ठानानेहि होईल. टिळकांचे हे मत जुन्या शास्त्रीलोकाना मान्य होणे शक्य नाही. परंतु ज्या श्रुतिस्मृति प्रमाणांवरून टिळकांचे हे मत झाले होते ती प्रमाणे मात्र जुन्या पंडिताना खोडता येणे शक्य नाही. उलट खुद्द शंकराचार्यांचे जे मत आहे ते जुन्या मताच्या पंडिताना व शंकराचार्यांच्या अनुयायाना सर्वस्वी मान्य आहे." अशा रीतीने जुन्या पंडितांचा आचार्यांशी कांही मुद्यावर विरोध व टिळकांचा आचार्यांशी काही मुद्यावर अविरोध, त्यानी दाखविला. पण गीतारहस्य-परीक्षणांत त्यानी गीतारहस्याच्या विरोधाला प्रारंभ केला व पूर्वीच्या लेखाबद्दल असे म्हटले की "टिळकांनी आपल्या ग्रंथाची हस्तलिखित प्रत आम्हाला दाखविली त्यावेळी ज्या सूचना टिळकांच्या मताला अनुकूल होण्यासारख्या होत्या त्याच त्याना केल्या. तसेच पहिल्या लेखात टिळकाना अनुकूल अशी वचने आम्ही दिली

तीहि टिळकाना अनुकूल अशी भासणारीच दिली आहेत. पण ते करिताना शंकराचार्यांचे मत बरोबर नाही असे आम्ही कोठे म्हटलेले नाही. अर्थात् टिळकांच्या ग्रंथावर टीका करावयाची तर त्याना अनुकूल वचने कोणती ही सर्व आधी पाहून पारखून घ्यावी ती नीट लावावी, व अशा रीतीने अनुकूल असणारी सर्व बाजू लक्षात घेऊन नंतर मग त्याच्यावर टीका केली तर ती अधिक खंबीर होते. म्हणून सकृद्दर्शनी टिळकाना अनुकूल असे मत मी प्रगट केले" असा त्यानी खुलासा केला. या प्राविडी प्राणायामाला एक मौजेचे कारण घडले होते असे दिसते. द्रव्यलोभाचा आरोप हा ह्या जगात प्रतिपक्षावर करण्याच्या आरोपात पहिल्या नंबरचा गुणकारी असतो. त्याप्रमाणे टिळकांवर टीका करण्याला बापटशास्त्री याना कोणी संस्थानिकाने पैशाची मदत केली हा आरोप जसा त्यांच्यावर काही लोकानी केला तसाच, भाऊशास्त्र्यानी प्रथम टिळकाना अनकूल असा लेख लिहिलेला पाहून तोच आरोप बापटशास्त्र्यानी लेलेशास्त्र्यावर केला व असे सुचविले की टिळकानी लेलेशास्त्र्याना पाच चार हजार रुपये दिले म्हणून ते गप्प बसले व त्यानी गीतारहस्याला मान्यता दिली. बापटशास्त्र्यांच्या ग्रंथातील एक उतारा पूर्वी दिला आहे त्यात 'गीतारहस्याचे समर्थन केल्याने दृश्यफल मिळण्यासारखे होते,' असे जे एक विधान आहे त्याचा उलगडा या आक्षेप–प्रत्याक्षेपाने होईल. वरील प्रकारचा खुलासा करून भाऊशास्त्री यानी गीतारहस्यावर टीका करण्याला प्रारंभ केला. ही टीका पुढे कित्येक दिवसपर्यंत सुरू होती. लेलेशास्त्री यांचे म्हणणे असे की शंकराचार्यांचे गीताभाष्यच बरोबर आहे. व टिळकानी गीतारहस्यातील मजकूर समजून उमजून विपरीत लिहिला नसला तरी तो ठिकठिकाणी विपरीत म्हणून खोडून टाकला पाहिजे. हे काम सौम्य शब्दात करावयाचे असा त्यांचा प्रथम संकल्प होता. पण पुढे लवकरच तो सुटला व आपल्या स्वभावाप्रमाणे त्यानी टिळकांवर कडकशब्दयोजना करिताना बापटशास्त्र्यानाहि मागे टाकले आहे. त्यानी टिळकांच्या ग्रंथातील निरनिराळी वचने एकत्र करून त्यांची विसंगति दाखवली. आपण स्वतंत्र विचारपूर्वक गीतेची अनेक पारायणे केली या टिळकांच्या विधानाचा त्यानी उपहास केला. नीटसा बोध न होण्यासारखी अनेक विधाने टिळकानी केली असे म्हटले आहे. टिळक हे ग्रंथात लिहिलेल्या मजकुरातून कोठेहि बांधले जाऊ न शकण्यासारखे म्हणजे 'धंदेवाल्या साक्षीदारा'प्रमाणे मोघम अनेकार्थी शब्दयोजना करतात! ग्रंथात नडले तर टीपेकडे वाट दाखवतात टीपेत नडले तर ग्रंथावर सावरून घेतात. 'पण' 'किंवा' असल्या शब्दांच्या आधाराने पळवाट निर्माण करून ठेवतात. आपल्याला अनुकूल असतील तेवढेच शब्द जमेला धरतात. बाकीच्यांचा खुलासा करीत नाहीत. त्यांची भाषाहि कित्येक ठिकाणी शुद्ध नाही. शब्दयोजनेमध्ये धरसोडीचा प्रकार फार झाला आहे. हाती केसरी आहे म्हणून टीकाका-

रावर ते मुलूखमैदान सोडून टीकाकारांचा उपहास करितात! टिळकानी घेतलेल्या आधारभूत संस्कृत वचनांचा अर्थ त्याना लागला नव्हता. कित्येकांचे भाषांतर चुकले आहे. आणि कित्येक ठिकाणी टिळकांचा अर्थ घेतला तर भगवान श्रीकृष्णच असंबद्ध प्रलाप करणारे होते असे ठरेल. तात्पर्य अमुक एका बाजूने गीतारहस्यावर आक्षेप घेता येणार नाहीत अशी बाजू त्यानी ठेवलेलीच नाही. किंबहुना असेहि म्हणता येईल की "टिळकानी पाच चार हजार रुपये देऊन तुम्हाला गप्प बसविले व तुमची मुग्ध अनुकूलता मिळविली" हा आरोप जितक्या प्रकारानी खोटा ठरविता येईल तितक्या प्रकारानी लेले शास्त्री यानी गीतारहस्याला नावे ठेऊन त्यातील दोष दाखविले आहेत! एवढ्याने समाधान न होता बापट शास्त्र्याप्रमाणे लेले शास्त्री यानीहि अर्थासह गीता प्रसिद्ध करण्याचे योजले. गीतारहस्याचे खंडन भरतखंडातील लोकानी करावे म्हणून तें एका संस्कृत ग्रंथाच्या रूपाने सर्व हिंदुस्थानभर प्रसिद्ध करण्याचा शास्त्रीबुवांचा विचार होता. व त्या लेखांचा पूर्वभाग १९१६ सालच्या मार्च महिन्यात त्यानी पुणे येथील 'वाग्वर्धिनी' सभेमध्ये वाचूनहि दाखविला. हे करिताना ज्या विद्वान लोकानी गीतारहस्याचे समर्थन केले त्यांचीहि हजिरी लेले शास्त्री यानी घेतली आहे. उदाहरणार्थ चिंतामणराव वैद्य यानी 'चित्रमय जगता'त गीतारहस्यावर टिळकाना उघड अनुकूल असा एक लेख लिहिला त्यावर लेले शास्त्री यानी खालील शब्दानी टीका केली आहे. "गीताभाष्यातील सिद्धान्त रा. ब. वैद्याना न कळणे स्वाभाविक आहे. पण वाचकानी मात्र तसें समजणे योग्य नव्हे. प्रत्येक परीक्षेत बक्षिसे मिळविलेल्या रावबहादूरासारख्या जंगी एम्. ए. एल्. एल्. बी. ना शारीरभाष्य समजणे शक्य असते तर मोठमोठ्या कॉलेजातून विद्यार्थ्यांना नव्हे परंतु प्रोफेसर लोकाना विषय समजावून सांगण्याकरिता शास्त्री लोक ठेवण्याचे काही प्रयोजनच उरले नव्हते." वरील अवतरण देण्याचा आमचा हेतू इतकाच की गीतारहस्यावर अनुकूल प्रतिकूल टीकेचा वाद सुरू झाल्यानंतर लवकरच या धार्मिक विषयाला सामान्य राजकीय विषयाचे स्वरूप आले. बापट शास्त्र्यांची टीका केवळ टिळकानी शंकराचार्यावर टीका केली या रागामुळेच प्रवृत्त झालेली होती. पण भाऊ शास्त्री लेले यांची टीका म्हणजे वाऱ्याच्या वावटळीसारखी असावयाची. ती कोणीकडून येईल कोणीकडे जाईल कोणावर हल्ला करील कोणाला जाता जाता विनाकारण धक्का देईल व कोणाविषयी किती क्षुद्रता बुद्धि प्रगट करील याचा नेमच नव्हता. आणि त्याप्रमाणेच त्यांची या विषयावरील टीका अनुभवास आली.

आता नव्या पद्धतीच्या चिकित्सक टीकाकारांकडे वळू. गीतारहस्यासंबंधाने प्रोफेसर भानू यानी टिळकाना तारीख ८ जून १९१५ रोजी खालीलप्रमाणे पत्र लिहिले आहे.

"आपण कृपा करून माझ्याकडेहि आपले गीतारहस्य पाठविले याबद्दल आपला फार आभारी आहे. पुस्तकाचे बाह्यांग पुष्कळच चांगले आहे. अंत-

रंगामध्ये यद्यपि आपली विचारसरणी भिन्न आहे तथापि व्यवहारात फरक पड- णार नाही असे आपण प्रसिद्ध केलेल्या गीतेच्या प्रवचनावरून मला वाटले होते. व त्याच दृष्टीने मी आपले पुस्तक वाचीत आहे. आपला बहुश्रुतपणा असामान्य आहे. यद्यपि त्याचा विनियोग कसा करावयाचा यात तीव्र मतभेद पडेल तथापि आपल्या अगाध वाचनाची व त्याचा उपयोग वकिली थाटाने करण्याची आपली बुद्धिहि कौतुकास्पद आहे असे सर्टिफिकीट देण्याचा जरी मला अधिकार नाही तथापि तेहि देतो."

प्रोफेसर वैजनाथ काशिनाथ राजवाडे यानी तर टिळकांचा सूड त्यांच्या गीतारहस्यावर न उगवता भगवद्गीतेवरच उगवून घेतला आहे. त्याचा प्रकार असा. टिळकांच्या गीतारहस्यातील पहिल्या प्रकरणात विषयप्रवेश करिताना टिळकानी गीतेचे महत्त्व वर्णिले आहे. व ते वर्णन करिताना असे म्हटले आहे की "गीता हा ग्रंथ परमपुरुषार्थाची ओळख करून देणारा, आत्मविद्येची गूढ तत्त्वे स्पष्ट करून सांगणारा, भक्ति ज्ञान व्यवहार यांची सांगड घालून कर्तव्याला प्रवृत्त करणारा, व मनाला शांतता मिळवून देणारा असा आहे. पण काव्य या दृष्टीनेहि जरी त्याचे परीक्षण केले तरी आत्मज्ञानाचे गहन सिद्धांत प्रासादिक भाषेने आबालवृद्धाना सुगम करणारा हा ग्रंथ उत्तम काव्यात गणला जाईल." हे स्तुतिपूर्ण वर्णन प्रोफेसर राजवाडे याना खपले नाही. म्हणून गीतारहस्य प्रसिद्ध झाल्यानंतर दोन वर्षांनी म्हणजे १९१७ साली कै. डॉ. भांडारकर यांच्या वयाला ८० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल अभिनंदन व्यक्त करण्याकरिता 'भांडारकर संशोधक मंडळा'ने प्रबंधा- वलीचा एक मोठा ग्रन्थ प्रसिद्ध केला त्यात, संस्कृत वाङ्मयासंबंधाने अनेक विषयावर निरनिराळ्या विद्वानानी लेख लिहिले आहेत. त्यातच राजवाडे यानी गीतेवर एक लेख लिहिला आहे. त्यात त्यानी गीतेचे परीक्षण वाङ्मयशास्त्र व व्याकरणशास्त्र यांच्या दृष्टीने केले आहे. या लेखाच्या पहिल्याच वाक्यात असे म्हटले आहे की "गीता हा ग्रन्थ तत्त्वज्ञानपर किंवा नीतिशास्त्रपर असून शिवाय जगातील उत्कृष्ट काव्यापैकी तो एक आहे असा हक्क कित्येक लोकाकडून पुढे आणण्यात येतो. म्हणून हा हक्क कितपत साधार किंवा न्याय्य आहे याची चर्चा मी या लेखात करितो."

गीता हे उत्तम काव्य म्हणणाऱ्या टिळकांचा प्रत्यक्ष उल्लेख यात नाही. तथापि राजवाडे यांची टीका लिहून होत असताना त्यांच्या डोळ्यापुढे टिळक व त्यांचे गीतारहस्य हा ग्रंथ होता यात मुळीच शंका नाही. राजवाडे यांची टीका प्रत्यक्ष गीतारहस्य या ग्रंथावर नसल्यामुळे तिचा विशेष परामर्ष या ठिकाणी घेण्याचे आम्हाला कारण नाही. तथापि टिळकांच्या गीतारहस्याने लोकमत कित्येक ठिकाणी किती मूळापासून ढवळून काढले होते हे लक्ष्यात यावे एवढ्याकरिता या टीकेतील १०–२० वाक्ये आम्ही खाली देतो. राजवाडे म्हणतात:—

"मम्मट जगन्नाथ इत्यादि संस्कृत-साहित्य-शास्त्रकार किंवा ड्रायडन कॉलेरिज वर्डस्वर्थ इत्यादि इंग्रज साहित्यशास्त्रकार यांची काव्याची व्याख्या लक्ष्यात घेतली तर गीता हे काव्य म्हणण्याच्या लायकीचेहि ठरत नाही. त्या लहानशा ग्रंथात व्याकरणाच्या शेकडो चुका आहेत. क्रियापद आत्मनैपदि की परस्मैपदि हेहि गीता लिहिणाराला चांगलेसे माहित नव्हते. शब्दांचे संधि पदोपदी चुकले आहेत. विभक्तिप्रयोग अनेक ठिकाणी चुकले आहेत. गीतेतील संस्कृतावर प्राकृताची छाया पडली आहे. श्लोकांचे भाग योग्य सांधा न जोडता विस्कळीत असे लिहिले आहेत. वाक्यरचनेमध्ये गोंधळ व गुंतागुंत झाली आहे. संबंधी सर्वनामे व नामे यांचा जाब बरोबर राहिलेला नाही. एका वाक्यातले शब्द दुसऱ्या वाक्यात गुंतून गेलेले आढळतात. पुष्कळ समास चुकीने जोडले आहेत. कित्येकांचा विग्रहहि करिता येत नाही. कित्येक ठिकाणी हा समास आहे की तद्धित आहे हे कळत नाही. च वै तु हि ही पूरक पदे वाटेल तशी दडपून दिली आहेत. कोणताहि विशेष अर्थ नसता एव हे पद ऐशी ठिकाणी निरर्थक वापरले आहे. संबोधनार्थ निरर्थक विशेषणे घातली आहेत. एकीकडे शब्द निरर्थक घातले तर दुसरीकडे आवश्यक शब्दांची अपेक्षा असता ते वगळले आहेत. रसभरित अशी वर्णने कोठेच नाहीत व ती तर काव्यात अवश्य हवीत. गीतेत तत्त्वज्ञान सांगितले असेल पण उत्प्रेक्षा दृष्टांत अशा रूपाने ते सांगितलेले नाही. तिजमध्ये पहावे तर युक्तिवाद आहे अनुमानपद्धति आहे पण प्रतिभाजन्य अद्भुत कल्पना नाहीत. उदात्त वर्णन करण्याला आत्म्यासारखा दुसरा विषय कोणता असणार ? पण तत्संबंधी गीतेतील श्लोक फारच किरकोळ व तुटपुंजे असे आहेत. कालिदास भवभूति शेक्सपियर शेले यानी हे वर्णन अधिक चांगले केले असते. विभूतिवर्णनात तारतम्य काहीच ठेवले नाही. लहानमोठ्यांची सरमिसळ झालेली आहे. अनुप्रास साधण्याकरिता भलत्याच शब्दांच्या जोड्या एकत्र बांधल्या आहेत. सुव्यवस्था अशी कोठेच नाही. श्लोक पुरा झाला म्हणजे झाले. मग कोठला चरण कोठे का बसेना ! विश्वरूपदर्शनात क्षुद्र गोष्टी घुसडून दिल्या आहेत. साधा व्यंकटेशस्तोत्रकार व मिल्टन याना विश्वावर रचलेली विश्वे दिसली तीहि गीताग्रंथकाराला दिसली नाहीत. तात्पर्य गीतेत प्रतिभा नाही कल्पना नाही भाषासौंदर्य नाही शुद्ध व्याकरण नाही मिळून काहीच नाही. केवळ श्रद्धेमुळे गीता हा ग्रंथ आदरणीय म्हटला तर म्हणावा." अशी टीका करून प्रो. राजवाडे हे शेवटी म्हणतात, "श्रद्धाळु लोकांची भावना दुखविण्याकरिता मी हे लिहिलेले नाही. पण गीता हे काव्यातील उत्तम काव्य व नीतिशास्त्रावरील सर्वोत्कृष्ट ग्रंथ अशी भूमिका जेव्हा कोणी घेतात व तिचे समर्थन युक्तिवादाने किंवा टीकेने करू पाहतात तेव्हा त्यांच्यावर अशी टीका करणे प्राप्तच होते. त्यानी मी दाखविलेले दोष नाहीत असे सिद्ध करावे असे माझे त्याना आव्हान आहे. जे यश कालिदासादिकाना मिळाले ते तुमच्या व्यासाला का मिळू नये ? माझे म्हणणे असे की पूर्वी

हिब्रू भविष्यवादी लोक ईश्वराचे म्हणून आपल्याच मनचे बोलत त्याप्रमाणे कृष्ण किंवा शिव यांचे नाव घेऊन आपल्या जुन्या ग्रंथकारानी आपल्याच मनचे दडपून देण्याला कमी केले नाही. पण बोलून चालून ती माणसे. त्याना आपल्या मर्यादा कशा उल्लंघिता येणार ? म्हणून गीतेमध्ये जुन्या लोकांचा श्रद्धाळूपणा व त्याचबरोबर त्यांचे अज्ञान वगैरे गोष्टी दिसून येतात." ही टीका करिताना टिळकच राजवाड्यांचे डोळ्यापुढे होते यात संशय नाही. आणि अशा रीतीने गीतारहस्य लिहून टिळकानी गीतेवर उपकार करण्यापेक्षा राजवाड्यांच्या या टीकेमुळे अपकारच केले असे ठरते !

एक म्हणतो "टिळक 'आचार्यपदारुरुक्षु' आहेत. ते 'आचार्यबुभूषु' आहेत. त्यानी काही तरी नवे सांगतो असे भोळ्या लोकाना भासवून उगीच ५०० पाने खरडली." दुसरा म्हणतो "टिळकानी गीतेचे रहस्य तर सांगितले नाहीच पण जुने आचार्य व साधुसंत यावर निवळ पुष्पांजली वाहण्याचा अतिप्रसंग मात्र केला." निळकंठराव सहस्रबुद्धे या नांवाचे एक साहेबी थाटाचे पण अण्णासाहेब पटवर्धनांचे भक्त म्हणविणारे एक पेन्शनर आहेत. वेदांत शास्त्रावर लिहिण्याचा त्यांचा अधिकार कोणीहि कधीहि मानलेला नाही. तथापि त्यानी सुधारक पत्रात अशी प्रौढी मिरविली की "टिळकांच्या कर्मयोग शास्त्रग्रंथातील हजारो प्रमाद लोकापुढे साधार सादर करण्यास मला बरेचसे ग्रंथ लिहावे लागतील ! व इतके मोठे कार्य वर्तमानपत्रातून होणे शक्य नाही म्हणून शितावरून भाताची परीक्षा या न्यायाने काही ढोबळ चुका दाखवितो !" पण शेवटी प्रत्यक्ष चुका नमूद करिताना भाताचा हंडा अदृश्य होऊन नमुन्याचे तेवढे एकच शीत निळकंठरावजीना वाचकाना जेवू घालता आले. सहस्रबुद्धे लिहितात "टिळकानी शंकराचार्यावर टीका करून सूर्यावर थुंकण्याचा प्रयत्न केला आहे. 'अहंभाव ज्या मानसीचा सरेना तया ज्ञान ते अन्न पोटी जिरेना' अशी टिळकांची गत झाली आहे. म्हणून टिळकानी विद्वत्तेचा टेंभा मिरवून शंकराचार्यावर अज्ञानाचा टेंभा मिरविल्याबद्दल त्यानी पुन्हा एकवार प्रायश्चित्त घ्यावे. पण तेहि श्रद्धापूर्वक न घेतले तर त्यांच्या पापकर्माचे क्षालन होणार नाही."

सुधारकात टीका करणाऱ्या 'पट्ट शिष्या'ने टिळकांच्या बरोबर गीता सांगणाऱ्या श्रीकृष्णाचीहि खूप हजेरी घेतली. ती इतकी की त्या बिचाऱ्याच्या सगळ्या चरित्राची झडती निघाली ! आणि ती वाचून श्रीकृष्णाला कदाचित् असेहि वाटले असेल की 'असंगाशी संग व प्राणाशी गाठ.' कोणी या उपद्यापी टिळकाना माझ्या गीतेवर एवढा ग्रंथ लिहावयास सांगितला कोणास ठाऊक ! "संपादक टिळक व इतर टिळक एक नव्हत त्याचप्रमाणे गीता सांगणारा श्रीकृष्ण व गोकुळातला श्रीकृष्ण एक नव्हत. आणि या अनैक्याच्या सबबीवर दोघानाहि सारखाच धिंगाणा घालिता आला या बोटावरची थुंकी त्या बोटावर करता आली. कपट करूनच्या करून त्याचे समर्थन करता आले. आणि

म्हणूनच जशास तसे वागावे आणि लोकसंग्रहार्थ काय वाटेल ते करावे हे तत्त्व टिळकाना पटले असावे " असे या पट्टशिष्याने लिहिले आहे. तो म्हणतो " जर तेच हे भगवान असतील तर धर्माला संदिग्ध बोलावयास लावणारे, जयद्रथाचा वध अद्भुत युक्तीने करविणारे, भीष्मावर रथचक्र उगारणारे, व प्रतिज्ञाभंग झाला नाही अशी मुजोरी करणारे, जरासंधाच्या वेळी वचनभंग करणारे, गदापर्वात अधर्मयुद्ध करू लावणारे, आणखी पुनः कर्णावर मुजोरी करून अर्जुनाला बाण सोडवयास लावणारे, वगैरे वगैरे जे भगवान ते एकच असतील तर 'लोकसंग्रहार्थ वाटेल ते करावे ' हाच निर्णय सामान्य जन काढतील. याकरिता तरी जनकाच्या तोडीला या श्रीकृष्ण उर्फ भगवानाना रा. टिळकानी बसवावयाचे नव्हते. शिवाय ' दोग्धा गोपालनंदनः ' यावरून हा भगवान् गोकुळातील 'यशोदेचा कान्हा' जर मानावा लागला तर निष्काम कर्मयोगाची रा. टिळकानी जी एवढी तरफदारी चालविली आहे ती धुळीला मिळाल्यासारखी होईल !"

टिळकानी गीतारहस्यात आधिभौतिक सुधारणाना कमी महत्त्व देऊन अध्यात्मिक सुधारणाना वरिष्ठपणाचा मान दिला हे पाहून 'पट्टशिष्या'चे पित्तच अगदी खवळले. तो लिहितो–" दाताला दात व हाताला हात बुक्कीला बुक्की व लाथेला लाथ हे तत्त्व रानटी असे वाटते. पण ज्यांना ' अरे तर कारे ' करण्यावाचून चैनच पडत नाही त्याना ही उत्तम नीति वाटेल हे खरे. ' एका गालात मारली तर दुसरा गाल पुढे करावा ' या खिस्तवचनाची विल्हेवाट ' तसे वागला आहे कोण ?' एवढ्यानेच लावणारे 'आपले ध्येय फार उत्तम असले पाहिजे' असे एकदाचे बोलणे विसरतात यात आश्चर्य आहे. पण आश्चर्य कसचे ? जेव्हा जे प्रतिपादन लागू पडेल तेव्हा ते योजावयाचे व प्रतिपक्षाची टवाळी करावयाची हाच ज्यांचा धंदा त्यानी काही केले तरी आश्चर्य नाही. 'अरे तर कारे' ही नीति असे घटकाभर कबूल केले तरीहि आधिभौतिक शास्त्राचा अभ्यास करून त्यात नवे नवे शोध लावणारी पाश्चिमात्य राष्ट्रे आपली आधिभौतिक उन्नतिच संपादतात. ते तुम्हाला काय करतात ? त्यांचा उत्कर्ष–पुनः आधिभौतिकच उत्कर्ष–हा तुम्हाला पहावत नाही काय ? इतका तुम्हाला त्यांचा मत्सर वाटतो काय ? हेच का तुमचे अध्यात्मज्ञान गुरुजी ? समजलो, गुरुजी, तुम्ही म्हणाल " पण ती पाश्चिमात्य राष्ट्रे आपलाच ऐहिक उत्कर्ष करून राहात नाहीत. रावणाने तपश्चर्या करून शिव प्रसन्न करून घेतला व सर्व देवास बंदिवान केले व माजला. तशी ही राष्ट्रे येऊन त्या आधिभौतिक ज्ञानाच्या साह्याने आमची स्वतंत्रता हरण करून आमच्यावर राज्य करतात. एकंदर मनुष्यजातीला पीडा देतात. म्हणून ' जशास तसे ' या न्यायाने त्यांची ती शास्त्रे शिकायची नवे शोध लावावयाचे व आपली स्वतंत्रता परत मिळवावयाची. " तथापि माझी शंका अशी आहे, गुरुजी, अध्यात्मज्ञानप्रवीण जे आपण त्यानी या खटाटोपात का पडावे ? आपली स्वतंत्रता पाश्चिमात्य राष्ट्रानी घेतली किंवा घेतील. पण त्याबद्दल आपणास हळहळ हवी कशाला ? ती स्वतंत्रता

आधिभौतिकच ना ? त्यानी आपल्याला जिवे मारिले तरी काय झाले ? ' हन्य-माने शरीरे नायं हन्यते '. आपला आत्मा दुसऱ्या खाली पांघरील. त्यांची बुद्धि सम नसल्यामुळे ते फार तर पापी ठरतील. 'येथे कोणाचे काय वा गेले? ज्याचे त्यानेच अहित केले.' एवंच शंका अशी रहाते की ही आधिभौतिक शास्त्रे पढून आपला त्या पाश्चिमात्याशी टिकाव लावायचा तो कशाकरिता ? " ' पट्टशिष्य ' हा बहुधा एक विद्वान् प्रोफेसर असावा. पण टिळकांच्या निमित्ताने गीतेला, गीतेच्या निमित्ताने कृष्णाला, कृष्णाच्या निमित्ताने हिंदुधर्माला नावे ठेवताना तो शब्दाने किती बहकला हे दाखविण्याला आम्ही खालील उतारा देतो.

' अर्जुन अगदी आयत्या वेळी क्लीब होऊन बसला हे कोणाचे दुर्दैव ? तुमचे आमचे ? की केवळ त्या द्रौपदीचे ? की कृष्णाचे ? की अर्जुनाच्या काळा-पर्यंत होऊन गेलेल्या धर्मव्याख्यानाचे ? अगर तीं व्याख्याने करणाऱ्यांचे ? अगर लोकसंग्रहकारांचे ? किंवा हे खापर केवळ कर्मसंन्यास संप्रदायावर फोडावयाचे ! रा. टिळकाना मोंगलाईच्या काळी कर्मयोगाचे पुनरुज्जीवन फार वेळ टिकले नाही म्हणून आमचे दुर्दैव असे वाटते. ज्या धर्माने महाभारतासारख्या मार्मिक काळात सूक्ष्म विचारी ऋषिमुनींच्या सहवासात व श्रीकृष्णभगवंताच्या नित्यसाह-चर्यात राहणाऱ्या महाभारत लिहिणाऱ्यांच्या अर्थात् श्रीकृष्णाकडून उपनिषदाचे अमृततुल्य सार काढवून अर्जुनाच्या तोंडात बळजबरीने ओतवणाऱ्या श्रीव्यास-मुनीच्या दर्शनाचा लाभ घडलेल्या, व त्या श्रीमद्व्यासमुनीच्या हयातीत जिवंत अस-णाऱ्या त्याच व्यासमुनीच्या नातवाला अशा आणीबाणीच्या वेळी क्लीब करून सोडले त्या धर्मातच क्लैब्य असले पाहिजे. '

याहीपेक्षा प्रखर उतारा खालील आहे. "रा. टिळक म्हणतात ' हा (कर्म-योग ) आमच्या देशात अनादिकालापासून चालत आला आहे असे सिद्ध होते.' ( गी. र. ४९४ ) सिद्ध होत असेल व चालत आला असेल. पण तो कर्मयोग—कर्मसंन्यासच केवळ नव्हे—क्लीब आहे. आपले कर्मसंन्यासाचेच नव्हे तर निष्काम-कर्मयोगाचेहि ध्येय घेऊन बसा. अध्यात्माचे गोडवे गाऊन आधिभौति-काची हवी तितकी टवाळी करा. पण मग इतिहासाकडे व वर्तमानकाळाकडे पाहून बालवैधव्यदग्धेसारखे रडत तरी बसू नका. एखाद्या स्थविराविधवेसारखे उदासीन राहून आमरणान्त दासीचे काम आनंदाने करा. खिस्तीधर्म कसाहि असला, त्याच्या अनुयायाना अध्यात्मज्ञानाचा गंधहि नसला, स्वतः खिस्ताने जरी ' एका गालफडात मारली तर दुसरा गाल पुढे करा ' असा उपदेश केला असला तरी या कर्मभूमीतच—या दृश्य सृष्टीतच—त्याच्या अनुयायानी सत्याचा शोध चाल विला आहे. मनुष्याला एखादे सहावे इंद्रिय उत्पन्न होईल काय म्हणून तो वाट पहात आहे. कालगणना दृश्यसृष्टीतील भूगर्भविद्येवरून व आकाशगणना त्याच दृश्यसृष्टीतील ज्योतिर्विद्येवरून करण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. आधि-भौतिक दुःखातून आधिभौतिक सुखात नेण्याचा स्वार्थनिरपेक्ष अगर सर्व

भूतहितदृष्टीने प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या प्रयत्नाने पुष्कळ सुख-होय! अगदी निव्वळ आधिभौतिक ज्यात अध्यात्माचा गंधहि नाही असे सुख भोगीत आहेत. दुःख नाही असे नाही. दुःख आहे. पण ते कमी करण्याच्या विचारात व प्रयत्नात ते गढले आहेत. इकडे प्रकृति तन्मात्रे लिंगशरीर आत्मा परमात्मा मोक्ष ब्रह्म या पोकळ शब्दांच्या जाळ्यात गुरफटून ब्रह्मानंदी टाळी लागली नाही म्हणून ते रडत बसत नाहीत. तसेच निष्काम कर्मयोगाची कास धरून आधिभौतिक सुखाला व ज्ञानाला ते लाथ मारीत नाहीत. तरुणपणीच संन्यास घेऊन एखाद्या बाईच्या प्रश्नांची स्वानुभवपूर्ण उत्तरे देता येत नाहीत म्हणून परकायाप्रवेशाच्या ढोंगाने सुरतरसाचा आस्वाद घेत नाहीत. अगर सोळा सहस्रनारींचा उपभोग घेऊन वरती मी ब्रह्मचारी असला लोकसंग्रह करीत नाहीत. ' दही खाऊ मही खाऊ की चाकवताची भाजी तोंडाला लावू ' अशी त्या आधिभौतिकवाद्यांची स्थिति नाही. तुम्हाला ते सुख व ज्ञान कनिष्ठ वाटते ना ? त्याच्याकरिता हळहळू नका. सर्व हिंदुधर्माच्या लोकाना निदान त्यातील ज्ञानाचा गड्डा पदरी बांधलेल्या ब्राह्मणाना, त्यातल्या त्यात सध्याच्या आचार्यपंडिताना, अगर आचार्यपदारुरुक्षूंना इतिहासदृष्टीच्या मिषाने तरी कर्मयोगाचे पुनरुज्जीवन फार वेळ टिकले नाही म्हणून हळहळ का वाटावी ? हळहळीचे कारण उघडच आहे. मुसलमानानी आमचा देश जिंकला. वाटले वाईट. रामदासशिष्य शिवाजीने स्वराज्य स्थापना केली झाला आनंद. अटकेला ब्राह्मणी झेंडा नेला झाला आनंद. सोनपतपानपत गेले झाला विषाद. माधवरावाला रामशास्त्र्यानी स्नानसंध्या करीत बसू नको म्हटले झाला आनंद. पाजी बाजीचेंहि राज्य इंग्रजांनीं घेतले झाला विषाद. सत्तावन साल बरें वाटलें पण शस्त्रे गेली म्हणून वाईट वाटले. कांग्रेस झाली आनंद उत्पन्न झाला. भिक्षांदेहि करतात वाटले वाईट. निर्भेळ स्वराज्य शब्द पुढें आला आनंदांत झाले मग्न. वसाहतींचे स्वराज्य पुरे म्हणताच झाला खेद. खुदिरामबोसच्या कृत्याने वाटली मजा. मन्डालेच्या एकान्तिक तपाने झाला खेद. रा. टिळकांनी गीतारहस्य लिहिले लागले आनंदसागरांत पोहावयाला. अध्यात्मज्ञान्यांना असला हर्षखेद हवा कशाला ? गुरुजी, राग करू नका. ' शिष्यस्तेहं शाधि मा त्वां प्रपन्नम् '. ख्रिस्ताच्या उपदेशाला तुम्ही वाटेल तितके हंसा. पण त्याच्या अनुयायानी दोन हजार वर्षांच्या आंत जवळ जवळ सर्व जग पादाक्रांत केले आहे ते कशाने ? तर ख्रिस्ताला ' आमचा गुरूच नव्हे ' असे म्हणून का ? की त्याच्या उपदेशाचा जेवढा भाग जरूर आचरणात आणण्यासारखा व येण्यासारखा तेवढा आणून आणि बाकीचा निमूटपणे मागे सारून? त्यांचा बायबलावर कितीहि विश्वास असला तरी त्यातील सृष्ट्युत्पत्ति प्रकरणाला ते कोठे चिकटून राहिले आहेत ? पण आम्ही प्रकृति-पुरुष प्रकृति-पुरुष आत्मा-परमात्मा आत्मा-परमात्मा करीत बसलो आहो. गीतारहस्यात सुद्धां कर्मसंन्यास नव्हे तरी निष्काम-कर्मयोग हे सार काढले. त्याच्या अनादित्वाचे व परमश्रेष्ठत्वाचे वाटेल तितके गोडवे गाइले आहेत. व

आधिभौतिकत्वाची वाटेल तितकी हेटाळणी केली आहे. पण त्याने समाधान होत नाही."

असो. याखाली सर्व इतर टीका! कारण त्यात गीतारहस्याचे दोष दाखविले असले तरी काही गुणहि घेतले आहेत. दरम्यानच्या इतर टीका करणाऱ्यामध्ये प्रो. बेलवलकर प्रो. रानडे छापखाने वकील यासारखे काही टिळकांचे चहातेहि आहेत. त्यानी गीतारहस्याची वहावा केली आहे. पण मधून मधून काही शंकाहि प्रकट केल्या आहेत. हे निव्वळ बौद्धिक टीकाकार म्हणण्याला हरकत नाही. कारण यांच्या ठिकाणी शंकराचार्यांविषयी जसा आदर तसा टिळकांविषयीहि होता. त्याना येऊन जाऊन दोष दिसला तो टिळकानी क्वचित ठिकाणी शंकराचार्यांच्या भाष्याचे विकृत स्वरूप दाखविले याकरिता. त्यातल्या त्यात छापखाने यांची टीका विशेष विस्तृत व समर्पक आहे. त्यांची उभयविध टीका थोडक्यात खालील शब्दात देता येईल. "गीतार्थाची संगति व एकवाक्यता 'गीतारहस्यात' ज्या सरळ पद्धतीने केली आहे तीत जे ज्ञानगांभीर्य व वाचन प्रकट होत आहे त्याहून अधिक ज्ञान व अधिक पांडित्य या विषयावर इंग्रजीत प्राकृतात व मराठीत क्वचितच प्रयुक्त झाले असेल. व हा ग्रंथ लोकमान्य होण्यास इतर कारणे नसती तरी स्वयंप्रकाशानेच तो योग्य मानास चढला असता व इतउत्तर चढेलहि यात तिळमात्र शंका नाही. परंतु लो. टिळकासारख्या स्वभावतः तीव्र बुद्धीच्या पुरुषाकडून 'संन्यास' व 'कर्म' या दोन निष्ठांच्या तात्त्विक क्रमाविषयी व व्युत्पत्तीविषयी जो सांगोपांग विचार गीतारहस्या-सारख्या अध्यात्मविषयपरग्रंथात सहजच अपेक्षित होता तो त्यांच्या या ग्रंथात ठळकपणे केलेला दिसून येत नाही. यामुळे एवढ्या शुद्ध अंतःकरणाने समबुद्धीने व कल्पकतेने लिहिलेल्या ग्रंथासहि पक्षमंडणार्थ लिहिलेल्या व्याख्यानाचेच अंशतः स्वरूप येत आहे ही किंचित् खेदाची गोष्ट आहे." छापखाने यांचा निर्णय असा की "भारतात वर्णिलेल्या प्रसंगाची कल्पना लक्ष्यात दृढ धरली म्हणजे श्रीकृष्णाचे गीतेतील कर्मप्रवृत्तीविषयीचे उत्साहप्रधान वचन यथायोग्यच वाटते. व सांप्रतच्या हिंदुस्थानच्या स्थितीस उद्देशून जरी गीतेचा अर्थ टिळकानी मुद्दाम लाविला असता तरी तो याहून भिन्न झाला नसता. हे जरी खरे आहे तरी मोक्षाचे सोपे साधन कोणते या प्रश्नाचा 'आचार्य' (रिलिजस टीचर) या अधिकारास अनु-सरून अधिकारी शिष्यासाठी परमार्थतः उत्तर देणे झाल्यास शंकराचार्यांचे भाष्य अधिक श्रेयस्कर होईल असे म्हटले तर ते केवळ गैर होणार नाही."

गोविंदसुत चिंचाळकर यानी टिळकाविषयी आदर दाखविला आहे तरी एकंदरीने ग्रंथाला नाकच मुरडले. त्यांचा मुख्य आक्षेप असा की "टिळकाना आत्मानुभव (!) नसल्याकारणाने अशा विषयावर लिहिण्याची व शंकराचार्यांसारख्या-वर टीका करण्याची त्यांची पात्रताच नाही. ठिकठिकाणी कर्मच करावे असे वेळी अवेळी सांगून टिळकानी वाचकांच्या मागे 'च'काराची विनाकारण टोंचणी लावली. लोकसंग्रह या शब्दाचे महत्त्व उगीच वाढविले. सर्व कर्म–संन्यास म्हणजे

स्वरूपतः संन्यास असा अर्थ शंकराचार्यांवर त्यानी उगाच लादला. कारण आचार्यांचा मूळ अर्थ संकल्पित संन्यास असा होता." पण मौज ही की पुराण मतवादित्वाच्या पठाडीपैकीच भाऊशास्त्री लेले यानी शंकराचार्यांचे खरे मत म्हणून काय होते व त्याविषयी त्यांचा आग्रह कसा होता हे दाखविले असल्याकारणाने त्यांच्याकडून गोविंदसुत चिंचाळकराना परस्परच उत्तर मिळाले आहे. आणि अशा रीतीने प्रत्येकाचे आक्षेप टिळकावर वेगळे पण एकाचा आधार दुसरा ढासळतो व दुसऱ्याचा आधार तिसरा ढासळतो असाच प्रकार झालेला या टीकेच्या क्षेत्रात पहावयास सापडेल.

प्रो. भानू यांचा आक्षेप असा की "शंकराचार्यांनाहि लोकोद्धाराची उत्कट इच्छा असताना त्याना टिळकानी विनाकारण सांप्रदायिक असे ठरविले. टिळकांचा सांप्रदाय व शास्त्रीय आर्य संस्कृति यांचा विरोध आहे. अपरोक्ष ज्ञानानंतर बुद्धिपूर्वक कर्म उरत नाही आणि त्याला कर्म करा असे सांगण्याचा कोणालाहि अधिकार रहात नाही. कुंभाराच्या चक्राप्रमाणे तो केवळ सवयीने कर्म करील व ते केवळ लोकसंग्रहकारकच असेल. पण ते लोकसंग्रहकारक असले म्हणून करणाऱ्याची इच्छा लोकसंग्रहाचीच असते असे ठरत नाही.ब्रह्मस्वरूपता व कर्म ही एकत्र नांदू शकत नाहीत म्हणून खरे ज्ञान ज्याला झाले त्याला कर्म करावयास सांगणे हे विपरीत आहे. टिळकाना अपरोक्ष ज्ञान नाही म्हणून त्यांच्या लिहिण्याला महत्त्व नाही. त्यांच्या अंगी विवेक भुरला असता तर त्यानी गीतारहस्य लिहून शंकराचार्यांशी विरोध केला नसता. टिळकानी शास्त्रविरोधी तत्त्वे प्रतिपादिली आहेत. गीता प्रवृत्तिपर नसून निवृत्तीपर आहे." पण दुर्दैवाने त्यांची टीका प्रसिद्ध झाली त्याच वेळेस स्वतः त्यांच्या गीतेवरील व उपनिषदावरील प्रचंड मराठी भाष्यातील उतारेच एकाने प्रसिद्ध करून भानूनी वेदांत प्रवृत्तिपर लावला असे दाखविले.

'वऱ्हाड समाचार' पत्रात अशीच जुन्या मताच्या दृष्टीची टीका आली होती. हा टीकाकार भक्तिमार्गी म्हणून त्याला असा राग आला की टिळकानी 'भक्तीची' तिसरी निष्ठा मानिली नाही तर केवळ निष्ठेचे साधन मानिले. अर्थात् भक्तीला गौणत्व आणिले. वास्तविक गीता सांगणाराने जर दोनच निष्ठा मानिल्या तर टिळक आपल्या पदरची तिसरी निष्ठा कोठून मानणार ? आणि मौज ही की तिसरी निष्ठा न मानल्याबद्दल टीकाकार टिळकाना दोष देतो पण 'लोकेस्मिन् द्विविधा निष्ठा' असे स्पष्ट म्हणणाऱ्या भगवंताला मात्र दोष देत नाही. हा टीकाकार भक्तिमार्गी अर्थात् त्याचे ब्रह्म भगवद्गीतेतील ब्रह्म म्हणजे सगुणब्रह्म होय. या टीकाकाराने 'भक्ति' ही 'ज्ञाना'पेक्षाहि श्रेष्ठ ठरविली. मग ती तो 'कर्मयोगा'पेक्षा श्रेष्ठ का ठरविणार नाही ? पण मौज ही की येथेहि त्याचा दावा टिळकाविरुद्ध आहे. शंकराचार्य व त्यांचे अनुयायी यांच्याविरुद्ध नाही !

मिरजेचे डॉक्टर जोशी यानी इंदुप्रकाशात सुमारे १४।१५ लेख लिहून टीका केली आहे. टिळकाविषयी त्यांची आदरबुद्धि निःसंदेह आहे. पण टिळकानी

आपला सिद्धान्त मांडण्याकरिता वकिली बाणा बराच दाखविला व आडरानात ते शिरले असे त्यांचे मत झाल्याचे दिसते. त्यांचे म्हणणे असे की "टिळकानी भगवद्भक्तीची मुमुक्षूंची व संन्याशांची विनाकारण टवाळी केली. केवळ गीतेतील शब्दबलावर त्यानी गीतेचे तात्पर्य काढले. टिळकांचा संप्रदाय हा शुद्ध वैदिक संप्रदाय नाही. गीतेचा अर्थ लावताना श्रुतिसंगति जितकी ठेवावयास पाहिजे तितकी त्यानी ठेविली नाही. टिळकानी जनकाचे उदाहरण दिले पण त्याची संसिद्धी ही कर्मयोगाची संसिद्धि नसून निवळ चित्तशुद्धि होय. श्रीकृष्णाने दिलेली म्हणून स्वतःची उदाहरणे टिळकानी कर्मयोगपर घेतली. पण ती केवळ परमार्थावस्थेतील नाहीत. कारण शुद्ध परमार्थात व्यवहार उरत नाही. शंकराचार्यानी मुंडनरूप स्मार्त संन्यासाला खरे महत्त्व दिले नसता त्यांच्यावर तसा वृथा आरोप करण्यात आला. 'जशास तसे' हे टिळकांचे तत्त्व राजकारणातले आहे. ब्रह्मवादातले नाही. व ईश्वरप्राप्तीच्या दृष्टीने ते गौण आहे." इत्यादि इत्यादि.

'दीनमित्र' वर्तमानपत्रात एक नांगऱ्याहि टीका करण्याला पुढे सरसावला. दुसऱ्या एकाने असा आक्षेप घेतला आहे की 'न बुद्धिभेदं जनयेत् अज्ञानाम् कर्मसंगिनाम्' ॥ याच्या आधारावर आपल्या कर्मयोगाची उभारणी करण्यात टिळकांचा खरा हेतू असा की हल्लीच्या काळात जे अशिक्षित लोक शिक्षणाशिवाय आपली नित्य कर्मे करीत आहेत त्याना अज्ञानात तसेच राहू द्यावयाचे. शिकू द्यावयाचे नाही. जागृति होऊ द्यावयाची नाही. सुधारू द्यावयाचे नाही. अर्थात् टिळकांचा कर्मयोग म्हणजे ती ब्राह्मणांची लबाडी होय."

सुबोध पत्रिकेला असा राग आला की "टिळक राजकारणात मिरवीत होते ते ठीक होते. पण धर्म व तत्त्वज्ञान यांच्या क्षेत्रातील मूर्धाभिषिक्त राजे म्हणजे रानडे भांडारकर इत्यादि लोकच होत. अर्थात् गीतारहस्य लिहून टिळकानी या मोठ्या गृहस्थांच्या पायरीला पाय लावला व इतकेहि करून सांगितले त्यात नवे काहीच नव्हते. कारण जे टिळकानी आज सांगितले ते रानडे भांडारकर यानी पूर्वीच सांगितलेले आहे. फक्त टिळकाना त्याची आठवण राहिलेली नाही इतकेच काय ते. पत्रिका म्हणते "टिळकानी नवे ते काय सांगितले ? गीता प्रवृत्तिपर आहे की निवृत्तिपर आहे ही शंका आम्हा प्रार्थनासमाजिकाना कधीच आलेली नाही. टिळक कर्मयोगपर गीता ठरविण्याला परवा परवांचे मिस्टर ब्रूकस यांचा आधार घेतात. पण एकाहि प्रार्थना समाजातील आचार्यांचा आधार घेत नाहीत."

गिरीराव अण्णा हे तुकारामाचे भक्त त्यानी असा आक्षेप घेतला की 'जशाच तसे' हे तत्त्व गीतेत नाही. टिळकानी ते उगाच घुसडून दिले आहे. 'समत्व' झाले म्हणजे 'जशास तसे' हे उरतच नाही.

'ज्ञानोदया'ने टीका केली तीत त्याने असे म्हटले की "वर्णाश्रम धर्माभिमानी लोकाना टिळकांचे विवेचन प्रामाणिक वाटणार नाही. आणि गीतारहस्य

वाचून तरुण लोकांची शंकराचार्याविषयी आधीच झालेली अप्रीति व अनादर बुद्धि शिथिल न होता अधिक वाढली. कारण टिळकानी जरी आचार्याना तत्त्ववेत्ते वगैरे म्हणून गौरव केला आहे तरी आचार्य हे आग्रही आहेत व गीतेच्या भाष्यात त्यानी पदरचे शेरे लिहिले असे म्हणून टिळकानी त्याना पायाखाली तुडविण्याचा प्रकार केला आहे. यामुळे आचार्याविषयी आदरबुद्धि दाखवून वरून उगाच दाढीला हात लावण्याचा जो प्रकार त्यानी केला तो यशस्वी होणार नाही." रामदुर्गचे कारभारी कोल्हटकर हे भागवतधर्मी असून त्यानीहि गीतारहस्यावर बरीच टीका केली होती. शिवाय ती बरीच व्यक्तिविषयकहि होती.

असो. अशा रीतीने प्रतिकूल टीकांचे उतारे देत बसलो तर जागा पुरणार नाही. परंतु वरील उताऱ्यावरून काही काही वर्गात गीतारहस्याची संभावना कशी झाली हे दिसून येईल. अनुकूल टीकाकारांपैकी दोन ठळक उदाहरणे सांगता येतील. एक 'रहस्यदीपिका' लिहिणारे भिडे शास्त्री हे जुन्या वर्गापैकी व चिंतामणराव वैद्य हे नव्या वर्गापैकी. या दोहोंच्या ठिकाणी शंकराचार्याविषयी आदरबुद्धि असली तरी टिळकाविषयी तशीच होती. म्हणून भिडे शास्त्री यानी होता होईतो दोघानाहि संभाळून घेतले आहे. व वैद्य यानी तर टिळकांच्या इतकेच किंबहुना टिळकापेक्षाहि आपण काकणभर अधिक प्रवृत्तिमार्गी आहो असे भासविले आहे. कर्मपक्ष व अकर्मपक्ष या दोहोनाहि गीतेत प्राधान्य दिलेले नाही. फक्त त्यातल्यात एक दुसऱ्याहून श्रेष्ठ असे टिळकानी म्हटले. पण वैद्यांच्या मताप्रमाणे कर्मपक्ष व अकर्मपक्ष हे दोन्ही प्रधान मानावे ही गोष्ट देखील भगवंताना गीतेत मान्य नव्हती असे वैद्य यानी प्रतिपादिले आहे.

## ( ९ ) टीकाकाराना टिळकाचे उत्तर

असो. या व इतर टीकातील प्रत्येक मुद्दा घेऊन टिळकानी उत्तर दिलेले आढळत नाही. टीकेला उत्तर देत बसण्याला त्याना वेळहि नव्हता. व ते उत्तर देत गेले असते तरी ते केव्हाहि न संपणारे असेच काम होते. पण स्वतः टिळकांच्या शब्दानीच गीतारहस्याचे तात्पर्य आम्ही मागे या प्रकरणात दिले आहे. त्याचप्रमाणे विशिष्ट टीकाकाराना टिळकानी दिलेले एक उत्तर उपलब्ध आहे. हे उत्तर टीकाकाराना जशास तसे याच न्यायाने दिलेले आहे. तथापि तसे करिताना इतर अनेक आक्षेपहि टिळकांच्या डोळ्यापुढे होते व त्यानाहि उत्तरे त्यानी ह्याच उत्तरात दिली आहेत. म्हणून ते एक उत्तर वाचले असता कोणत्याहि टीकाकाराच्या मुख्य मुद्याला त्यात उत्तर मिळते असे वाटते. म्हणून ते समग्र उत्तर आम्ही खाली देत आहोः—

### कोल्हटकर-ज्ञानप्रकाश-योग.

पहिले प्रवचन रा. कोल्हटकर यांच्या विचारसरणीवर होते, व प्रथमतः त्यांचा ग्रंथ कसा निर्माण झाला याबद्दल रा. टिळक यानी थोडी माहिती सांगि-

तली. ते म्हणाले की, गीतारहस्याचे एक पुस्तक ज्ञानप्रकाशकाराकडे प्रथमच अभिप्रायार्थ पाठविले होते. पण चरचरीत टीका करण्यास इंदुप्रकाशकारास ज्याप्रमाणे प्रो. भानु मिळाले तसा गीतारहस्यावर विरुद्ध लिहिणारा कोणी इसम ज्ञानप्रकाशकारास पुण्यक्षेत्री मिळेना. प्रो. भाटे, प्रो. रानडे, डॉ. गुणे वगैरे गृहस्थाकडे त्यानी खेपा घातल्या असे त्यानीच प्रस्तावनेत म्हटले आहे पण काय झाले कोणास ठाऊक ! या गृहस्थास सोडून ज्ञानप्रकाशकारानी यमाच्या दिशेकडे धाव घेतली. तेव्हा शोधता शोधता अखेरीस रहस्यावर प्रहार करण्यासाठी त्यानी सज्ज केलेल्या धनुष्यास बाण लावण्यास दत्तभक्त रा. कोल्हटकर हे त्यास रामदुर्गास सापडले. मागे ज्ञानप्रकाशकाराची लगट असल्यामुळे त्यानी "शक्य त्या तातडीने" ग्रंथ वाचून चरचरीत टीका तयार केली, पण मध्ये कोठे तरी खो येऊन अखेरीस रहस्यानंतर एक वर्षाने ती प्रसिद्ध झाली आहे. कोल्हटकरांची भाषाच पहावयाची तर ती बरीच चरचरीत व गालिप्रचुर आहे याबद्दल कोणासच शंका यावयाची नाही. रहस्यकाराच्या कृतीस 'आसुरी' ठरवून 'हे 'राजस' गृहस्थ कलियुगात ब्राह्मणयोनीत राष्ट्रभक्तिमिषाने धर्म बुडवण्याकरिता उत्पन्न झाले आहेत,' इत्यादि काही संस्कृत व काही प्राकृत शेलक्या शिव्यांचा रा. कोल्हटकर यानी ठिकठिकाणी उपयोग केला आहे. किंबहुना जेथे जेथे प्रमाणांची उणीव पडली तेथे तेथे रामदुर्ग संस्थानातील कारभाऱ्याच्या जागेवर असणाऱ्या या गृहस्थानी ती उणीव अशाच प्रकारे भरून काढली आहे असे म्हणण्यास हरकत नाही. पण दुर्दैव ज्ञानप्रकाशकाराचे की, रामाशी स्पर्धा करणाऱ्या या धनुर्धराचे बाण गालियुक्त असूनहि बोथट झाले आहेत. गीतारहस्यावरील या टीकेत तुरुंगाचाच नव्हे तर राजकीय पक्षातील जहाल–मवाळांचाहि उल्लेख केलेला आहे, व रहस्यातील सिद्धांताची मोठ्या कुत्सिकपणाने राजकीय जहाल पक्षाशी कोल्हटकरानी जोड घालून देऊन मवाळ ज्ञानप्रकाशकाराचे समाधान करण्याचा प्रयत्न केला आहे. टीका करण्याच्या असल्या पद्धतीस काय नाव द्यावे हे आम्ही सांगू इच्छित नाही. रा. कोल्हटकरास आम्ही इतकेच सांगतो की, राजकीय बाबतीत जहाल आणि मवाळ हे पक्ष होण्यापूर्वी वीस पंचवीस वर्षे गीतारहस्यातील विचाराचा उगम झालेला आहे.

### अनुकरण

"असो. कोल्हटकरांच्या ग्रंथाची उत्पत्ति जरी याप्रमाणे असली तरी त्यानी आपल्या ग्रंथाची अर्पणपत्रिका व प्रकरणे लिहिताना व सामान्यतः मांडणी करिताना गीतारहस्याचेच अनुकरण केलेले आहे. आपणास कोणतीहि गोष्ट प्रिय असल्यावरच आपण तिचे अनुकरण करितो या न्यायाने पाहिले तर रा. कोल्हटकर यानी पर्यायाने अजाणतेपणाने या बाबतीत रहस्याची स्तुतीच केली आहे असे म्हटले पाहिजे. किंबहुना गीतारहस्याची एक प्रत प्रथमतः पंढरीच्या विठोबास ज्याप्रमाणे अर्पण करण्यात आली त्याप्रमाणे वाडीच्या दत्तास आपल्या ग्रंथाची एक

प्रत प्रथमतः अर्पण करून त्यातहि कोल्हटकर यानी आपली अनुकरणेच्छा तृप्त करून घेतली आहे. पण या गोष्टी विशेष सांगत बसण्यात काही हंशील नाही. ग्रंथातील चरचरीत शिव्या बाजूला ठेवून त्याचे आपणास परीक्षण केले पाहिजे. तशा दृष्टीने कोल्हटकरांच्या ग्रंथाचा विशेष काय तो आता थोडक्यात सांगतो.

## गुरुपरंपरागत अर्थ

"कोल्हटकराना गीतेचा अर्थ आपल्या गुरुसंप्रदायाप्रमाणे लावावयाचा आहे आणि रहस्यकाराना तो सर्वसंप्रदाय-स्वतंत्र पद्धतीने लावावयाचा आहे. दोघांचे मार्गच भिन्न. एक जाणार पूर्वेस तर दुसरा जाणार पश्चिमेस. मग दोघांची एकवाक्यता होणार कशी ? कोल्हटकरानी गीतारहस्यातील पहिले प्रकरण जर नीट लक्ष लावून वाचले असते तर त्यांची चूक त्यांचे नजरेस आली असती. टिळक चुकले का कोल्हटकर चुकले हा प्रश्न नाही. ग्रंथाचा अर्थ कसा लावावयाचा हा मुख्य मुद्दा आहे. गुरूने चतुर्थी सांगितली म्हणजे चतुर्थी म्हणावयाची किंवा व्याकरण न्याय वगैरे पाहून ती चतुर्थी आहे का षष्ठी आहे हे ठरवावयाचे ? या बाबतीत गुरूपेक्षा पाणिन्यादिकांचा अधिकार अधिक असल्यामुळे गुरुपरंपरा म्हणजे एक प्रकारे अंधपरंपरा होय. आधुनिक ग्रंथचिकित्सक ग्रंथाचा अर्थ करताना ही पद्धत स्वीकारीत नाहीत हे एल् एल्. बी. झालेल्या कोल्हटकरास आम्ही सांगावयास पाहिजे असे नाही. सांप्रदायिक अर्थ संप्रदायसिद्ध्यर्थ अवश्य असतात हे गीतारहस्यकारानीहि कबूल केले आहे. पण ते ग्रंथाचे खरे अर्थ नव्हत. शिवाय कोल्हटकर यांस अशीहि शंका आली नाही की गुरुपरंपरा पहावयाची तर एकाच संप्रदायाची का पहावी ? शंकराचार्यांनी गीतेचा जो अर्थ केला आहे तो रामानुजाचार्यांनी किंवा मध्वाचार्यांनी केला आहे काय ? नाही. किंबहुना शंकराचार्यांना वाट पुशीत आपली टीका लिहिणारे ज्ञानेश्वरमहाराज यानीहि काही अर्थ शांकरभाष्याहून निराळे केले आहेत. मग गुरुपरंपरा राहिली कोठे ? गुरूचा उपदेश घ्यावा गुरूला मान द्यावा गुरूचा अनुभव शक्य तितका आपल्या अंतःकरणात उतरून घ्यावा त्याची शांति त्याचे सदाचरण त्याचे ब्रह्मज्ञान होईल तितके संपादन करण्याची उमेद बाळगावी इ. गोष्टी रहस्यकारासहि मान्य आहेत. पण जो ग्रंथ सर्व संप्रदायास सामान्य आहे त्याचा अर्थ एका विशिष्ट संप्रदायाने अमुक प्रकारे केला तर जगातील इतर सर्व मनुष्यानीहि तसाच अर्थ लावला पाहिजे असे म्हणणाऱ्या पुरुषास "तातस्य कूपोयमिति ब्रुवाणाः क्षारं जलं कापुरुषाः पिबंति" या कोटीत आधुनिक चिकित्सक काढीत असतात. गुरुपरंपरा तंतोतंत स्वीकारणे म्हणजे चिकित्सकबुद्धीस खो घालणे होय. आणि असा खो घातला म्हणजे ज्ञानाचीच नव्हे तर जगाचीहि प्रगति बंद होईल. एखाद्या शास्त्रयाने असे सांगितले असते तर आम्हास त्याचे नवल वाटले नसते पण ज्ञानप्रकाशप्रेरित एखाद्या एल् एल्. बी. ने असे साहस करणे आमच्या मते

अत्यंत अनुचित होय. गीतारहस्यकाराना ही पद्धत मान्य नाही किंवा ती स्वीकारून त्यानी आपला रहस्यग्रंथहि लिहिला नाही. गीतेचा स्वतंत्र रीत्या खरा अर्थ काय निघतो हे सांगण्याकरिता गीतारहस्य प्रवृत्त झाले आहे आणि ही गोष्ट लक्षात न ठेवता गुरुपरंपरेचा पडदा डोळयास बांधूनच जर कोणास परीक्षण करावयाचे असेल तर त्याचा हात धरण्याची आमची बिलकुल इच्छा नाही एवढेच आमचे याबद्दल रा. कोल्हटकर यास उत्तर आहे. आधुनिक ग्रंथचिकित्सकाचा हा मार्ग नव्हे.

"कोल्हटकरांच्या ग्रंथाचा तीनचतुर्थांश भाग वर सांगितल्याप्रमाणे सणसणीत पण दोषार्ह आंधळ्या पद्धतीचा परिणाम असल्यामुळे त्या पद्धतीसंबंधाने दोन शब्द सांगावे लागले. टीका करण्यास शिव्याच द्याव्या लागतात असे नाही; कारण वे. शा. सं. हुपरीकरशास्त्री हे जरी संप्रदायानुयायी आहेत तरी कोल्हटकरांचा शिवराळपणा त्यांच्या ग्रंथात कोठेहि दिसून येत नाही. पण कोल्हाटकरास शिव्याहि गुरुपरंपरागतच वाटतात असे दिसते. आपल्या ग्रंथाच्या पहिल्याच प्रकरणात अधिकारयोग सांगून रहस्यकारास गीतार्थ सांगण्यास त्यानी अनधिकारी ठरविले आहे. पण आम्ही या रामदुर्गच्या कारभाऱ्यास असे विचारतो की त्यानी तरी कोठे पंचाग्निसाधन केले होते? सरळ व रसाळ संस्कृत भाषेत अर्जुनाला निमित्त करून लोकोद्धारार्थ सांगितलेल्या गीतेचा अर्थ करण्यास तपश्चर्येशिवाय दुसरा मार्ग नसेल तर हा ग्रंथच महाभारतात घालण्याचे काही कारण नव्हते असे आम्ही म्हणतो. 'इदं ते नातपस्काय' इत्यादि श्लोक कोल्हटकर प्रमाणार्थ घेतात पण या श्लोकाचा अर्थ त्यास कळला नाही असे आम्ही सांगतो. नास्तिकाला गीता सांगू नये हे खरे पण त्याचे कारण त्याला त्याची गोडी नसते हे होय अर्थ समजत नाही हे नव्हे. कोल्हटकर तपस्वी नसून जर टीका करतात तर इतरासहि तसे करण्यास हरकत काय? श्रीकृष्णापासून कोल्हटकरापर्यंत अविच्छिन्न गुरुपरंपरा लागलेली आहे काय? नाही. किंबहुना आद्य शंकराचार्यांपासून कोल्हटकरापर्यंतहि ती अविछिन्न लागलेली नाही. ग्रंथावरूनच जर अर्थ लावावयाचा तर तो अधिकार अमक्याला आहे आणि तमक्याला नाही इत्यादि रिकाम्या गप्पा मारण्यात अर्थ काय? किंबहुना कोल्हटकराना देखील त्यांची गुरुपरंपरा कळलेली नाही आणि या परंपरेच्याच नव्हे तर वेदांतशास्त्राच्याहि विरुद्ध त्यानी काही सिद्धांत प्रतिपादिले आहेत असे आम्ही दाखविणार आहो. कोल्हटकरांचा गुरु जिवंत असल्यास त्याचा त्यानी कोठे उल्लेख केला नाही. शंकराचार्यांसच ते गुरू समजतात व ते गुरुत्व ग्रंथद्वारा जसे कोल्टकरास तसे आम्हासहि ग्राह्य आहे. पण वैश्वदेवाच्या वेळी बापाचा कासोटा काही कारणामुळे सुटत होता म्हणून मुलानेहि पुढे तसे करण्याचा आग्रह धरावा असे म्हणण्यास कोल्हटकराप्रमाणे आम्ही तयार नाही. हा मूर्खपणा होय असे आम्ही समजतो; मग ते कोणास पसंत पडो वा न पडो.

**संन्यासमार्गीयावर टीका.**

" आता कोल्हटकरांच्या मुद्याकडे वळू. त्यानी आपल्या ग्रंथाच्या अखेरीस २१ मुद्दे काढले आहेत परंतु त्यांची छाननी केली असता त्यातील ७।८ च खरे मुद्दे निघतात, व ते केवळ कोल्हटकरांचेच आहेत असे नाही तर वे. हुपरीकर, बापट, लेले यानीहि त्यांचाच पुनः पुनः खल केलेला आहे सबब या मुद्यास सामान्यतः उत्तर दिले म्हणजे ते सर्वांनाच लागू पडेल, प्रत्येकास निराळे उत्तर द्यावयास नको. कोल्हटकरांच्या मुद्यात विशेष काय तो चरचरीतपणा. त्यास उत्तर वर आलेच आहे. या मुद्यापैकी पहिला मुद्दा म्हटला म्हणजे संन्यासमार्गाची रहस्यात निंदा करून त्यास गेंड म्हटले हा होय. संन्यासमार्गीयांची ही निंदा ऐकून बापटशास्त्रयांचे डोके फिरले आहे पण दुःखाची गोष्ट ही की, संन्यासमार्गीयाबद्दलचे हे विवेचन कोणास उद्देशून आहे हे बापटासहि कळले नाही, व कोल्हटकरासहि कळले नाही. आचार्यांनी म्हटल्याप्रमाणे 'अंगं गलितं पलितं मुंडं' अशी स्थिति प्राप्त झाल्यावर जे संन्यास घेतात त्याबद्दल अगर नुसते अविवाहित अगर ब्रह्मचारी राहणाऱ्याबद्दल रहस्यकारांचे काही एक म्हणणे नाही हे प्रथमतः लक्षात ठेविले पाहिजे. ( गी. र. पृ. ३०१।२ पहा ). गीतारहस्यात ज्या संन्यासमार्गावर टीका केलेली आहे त्यात केवळ वैदिकच संन्यासी येतात असेहि नाही. बौद्ध, जैन व ख्रिस्ती संन्यासमार्गीहि येतात. शंकराचार्यांच्या मार्गासच उद्देशून तो शब्द घातलेला नाही. उलट निष्काम कर्म हे अकर्म होते असे जे आचार्यांचे मत त्याचाहि उल्लेख रहस्यात केलेला आहे. ज्ञानोत्तर जगाचा कंटाळा येणे किंवा ब्रह्मबुद्धीने सर्व व्यवहार करणे या दोहोंपैकी पहिल्यास उद्देशून संन्यास या शब्दाचा गीतारहस्यात उपयोग केलेला आहे. गीतेत जो संन्यास सांगितला आहे तो दुसऱ्या प्रकारचा म्हणजे बुद्धिस्थ संन्यास होय. तो रहस्यकारास संमत आहे इतकेच नव्हे तर त्याचे रहस्यात सर्व प्रकारे समर्थन केले आहे. गीतारहस्यकारांचा संन्यासावर जो काही कटाक्ष आहे तो स्वरूपतः कर्मसंन्यासावर, बुद्धिस्थ संन्यासावर नाही. कोल्हटकर म्हणतात आचार्यास हा बुद्धिस्थ संन्यास संमत आहे ठीक आहे. असे असल्यास इष्टापत्तीच म्हणावयाची आणि रहस्यकारानीहि तिचा उल्लेख केला आहे. पण शांकरभाष्य लक्षपूर्वक वाचल्यास आचार्यांचा विशेष कटाक्ष कर्मसंन्यासावर आहे असे कोणासहि दिसून येईल. गीतेस हा संन्यास पसंत नाही आणि हेच काय ते रहस्यकारांचे सांगणे आहे. गीतेत कर्मसंन्यास कोठेहि सांगितलेला नाही. हुपरीकर म्हणतात की सर्व कर्मे सोडावी असे गीता म्हणते पण तो श्लोक व त्यासारखे इतर श्लोक पाहता हा स्वरूपतः कर्मत्याग नव्हे फलत्याग आहे असे कोणासहि सहज कळून येईल. स्वरूपतः कर्मत्याग करून रानात राहणे यासच गेंड्यासारखे राहणे असे म्हणतात व याप्रमाणे संन्याश्यानी रहावे म्हणून " एको चरे खग्गविसाणकप्पो " ( गी. र. ५७६ ) असा सुत्तनिपातातील एका पाली सूत्रात ४१ दा बौद्ध संन्याश्यास उपदेश केलेला आहे. खग्गविसाण याचा अर्थ पाली भाषेत गेंडा असा

आहे पण संस्कृतात गेंड्याच्या शिंगालाच नव्हे तर खुद्द गेंड्यालाहि खड्ग म्हणतात आणि मेदिनी व विश्व या संस्कृत कोशात खड्ग=गेंडा हा शब्द बौद्ध संन्याश्यासहि लागतो असे म्हटले आहे. एका पंथाचे का होईना पण खुद्द संन्यासी लोकच जर आपणास गेंडा म्हणण्यात भूषण मानीत होते तर रहस्यकारानी त्यांच्याच शब्दानी त्यांची संभावना केल्यास कोल्हटकरादिकास संताप का यावा याचे कारण आम्हास समजत नाही. संन्याश्यापैकी एका पंथातील लोकास 'गेंडे' हे नावच संस्कृतात रूढ झालेले आहे. असला पंथ गीता प्रशस्त मानीत नाही आणि रहस्यकारहि प्रशस्त मानीत नाहीत. मग कोल्हटकरास त्याबद्दल काहीहि वाटो.

## योग-शब्दार्थ

"दुसरा मुद्दा गीतेतील योग शब्दाच्या अर्थाबद्दलचा होय आणि याबद्दल चर्चा करताना आपण काय म्हणतो याचेच नव्हे तर आपले गुरु काय म्हणतात याचेहि भान कोल्हटकराना राहिलेले नाही हे सहज दिसून येण्याजोगे आहे. योग शब्दाचे अनेक अर्थ आहेत म्हणून एखाद्या ग्रंथात त्या शब्दाचा काय अर्थ आहे हे त्या ग्रंथातील व्याख्येवरूनच ठरविले पाहिजे. दुसऱ्या ग्रंथातील व्याख्या घेऊन उपयोगी नाही. गीतेत 'समत्वं योग उच्यते' अशी योग शब्दाची स्पष्ट व्याख्या केलेली आहे (गी. २. ४८) आणि तेथेच समत्व म्हणजे काय हे 'सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा' या शब्दानी सांगितले आहे. 'सिद्ध्यसिद्धि' यातच मानापमान लाभालाभ जयापजय इत्यादींचा समावेश होतो हे सांगावयास नको. आचार्यांनी शांकरभाष्यात समत्वाचा असाच अर्थ केलेला आहे आणि गी. २. ५० श्लोकात सांगितलेले 'कर्मसु कौशलम्' याचा अर्थहि समत्वरूप कौशल असाच शांकरभाष्यात असून केला तोच गीतारहस्यात घेतलेला आहे. सारांश या बाबतीत शंकराचार्यांचाच अर्थ गीतारहस्यात स्वीकारला आहे किंवा कोल्हटकरांची गुरुपरंपरा रहस्यकारास अनुकूल आहे! पण या सर्वांचा विपर्यास कौशल म्हणजे सुतार लोहार इत्यादिकाचे काम करण्याचे प्रावीण्य असा कोल्हटकरानी अर्थ करून तो रहस्यकाराच्या माथी मारला आहे आणि मग गुरुपरंपरेच्या विरुद्ध जाण्याबद्दल रहस्यकारास निष्कारण दूषणे दिली आहेत! इंग्रजीत अशी एक म्हण आहे की 'एखाद्या कुत्र्यास फाशी द्यावयाचे असल्यास त्यास प्रथम तो पिसाळला आहे वगैरे काही तरी वाईट नाव द्यावे व मग त्यास फाशी द्यावे.' कोल्हटकरांची कृति याच मासल्याची झाली आहे. मग रहस्यग्रंथ तातडीने वाचला असल्यामुळे त्यांच्या हातून हा प्रमाद होवो किंवा दुसऱ्या काही कारणामुळे होवो. वरील श्लोकावरचे शांकरभाष्य त्यानी एक तर लक्षपूर्वक वाचले नसावे किंवा वाचून त्याना कळले नसावे किंवा कळूनहि विपर्यास केला असावा याखेरीज इतर अनु-

मान निघू शकत नाही. गीतेतील योग म्हणजे लाभालाभ जयापजय वगैरेबद्दल समदृष्टि किंवा सारखी बुद्धि ठेवून कर्मे करण्याचा योग होय आणि हाच अर्थ 'योगस्थः कुरु कर्माणि' 'योगमातिष्ठोतिष्ठ' वगैरे श्लोकात सांगितला असून 'योयं योगस्त्वया प्रोक्तः साम्येन मधुसूदन' या ठिकाणीहि तोच योग विवक्षित आहे आणि खुद्द शांकरभाष्यातहि 'साम्य' म्हणजे 'समत्व' असाच अर्थ केलेला आहे. योग शब्दाच्या अर्थाचा शांकरभाष्य प्रमाण धरूनच याप्रमाणे निर्णय झाल्यावर 'तस्माद्योगी भवार्जुन' याचा अर्थ काय करावा त्याबद्दल शंकाच रहात नाही. या ठिकाणी शांकरभाष्यात काहीच खुलासा केलेला नाही हे खरे आहे. पण 'योगस्थः कुरु कर्माणि' 'योगमातिष्ठोत्तिष्ठ' 'तस्माद्योगाय युज्यस्व' आणि 'कर्मयोगेन योगिनाम्' ही वचने लक्षात आणली म्हणजे योगी होण्याचा जो उपदेश भगवंतानी अर्जुनास केला आहे तो कर्मयोगी होण्याचाच उपदेश आहे. पातंजल योगी होण्याचा नव्हे, असे स्पष्ट होते. योगशब्दघटित उपदेश एकाच ठिकाणी आहे असे नाही; तीन चार ठिकाणी आहे. पैकी तीन ठिकाणी योग म्हणजे कर्मयोग असा अर्थ जर निर्विवाद आहे, तर चवथ्या ठिकाणी योगी म्हणजे पातंजल योगी असा अर्थ करणे म्हणजे सरळ, सामान्य, सर्वमान्य व शास्त्रीयग्रंथार्थनिर्णयपद्धतीचा त्याग करणे होय हे संप्रदायदूषित बुद्धीच्या माणसाखेरीज कोणाच्याहि लक्षात येईल. योगशब्दघटित जो उपदेश तीन ठिकाणी केला आहे तोच चवथ्या ठिकाणी असला पाहिजे. शिवाय 'सांख्य' आणि 'योग' अशा ज्या दोन निष्ठा गीतेत सांगितल्या आहेत, त्यासच पर्याय शब्द म्हणून 'संन्यास' आणि 'कर्मयोग' हे शब्द जर गीतेतच (गी. ५. २) वापरलेले आहेत, तर गीतेतील 'योग' म्हणजे कर्मयोग याबद्दल काहीच शंका रहात नाही. रहस्यकारांचा व सांप्रदायिक टीकाकारांचा जो मुख्य मतभेद आहे तो हाच होय, आणि ज्या चिकित्सापद्धतीने गीतारहस्यात या मताचे समर्थन केले आहे ती चिकित्सापद्धति सदोष आहे, असे न दाखविता नुसत्या गुरुपरंपरेच्या आधारावर हे मत खोडून टाकण्याचा प्रयत्न करणे म्हणजे डोळे बांधून उजेडाची चिकित्सा करण्याइतकेच असमंजसपणाचे होय.

### सुखदुःखविवेचन

"गीतारहस्याच्या पाचव्या प्रकरणात सुखदुःखाच्या स्वरूपाचे जे विवेचन केले आहे त्यातील मर्म कोल्हटकरांच्या बिलकुल लक्षात आले नाही. आधिभौतिक सुखाची व्याख्या करून नंतर त्यातूनच मानसिक किंवा आध्यात्मिक सुखाच्या पायरीवर कसे जाता येते याचे या प्रकरणात आम्ही विवेचन केले आहे आणि हे विवेचन बऱ्याच अंशी नव्या पद्धतीने केलेले आहे. पण त्यातील अखेरचा सिद्धांत वेदांतशास्त्रास धरून आहे हे सांगावयास नको. तथापि गुरुपरंपराच ज्यास प्रमाण किंवा गुरुपरंपरेहून भिन्न असे विवेचनच असणे शक्य नाही अशी ज्यांची समजूत

त्याना हे विवेचन कसे रुचणार ? त्यातूनहि सर्व सुख दुःखाभावरूप आहे अशी जी कित्येक संन्यासमार्गीयांची व्याख्या ती वस्तुस्थितीवरून सिद्ध होत नाही असे गीतारहस्यात दाखविले असल्यामुळे इतर सांप्रदायिकाप्रमाणे कोल्हटकरासहि राग आला आहे. ते म्हणतात की मुलाच्या तोंडात खडीसाखरेचा खडा घालण्याच्या पूर्वी खडीसाखरेबद्दलची व्यक्त इच्छा जरी त्याच्या मनात नसली तरी पुनर्जन्मवादाप्रमाणे बीजरूपाने ती त्याच्या मनात असली पाहिजे असे मानावे लागते आमच्या मते ही कोटी शुद्ध तर्कटपणाची आहे. आधिभौतिक सुखाचा हा वाद आहे आणि या ठिकाणी आधिभौतिकरीत्या व्यक्त होणारी इच्छा जर दाखविता येत नाही, तर केवळ काल्पनिक बीजरूपी इच्छा गृहीत धरणे म्हणजे पयार्याने प्रतिपक्षाचे मत कबूल करण्यासारखेच होय. जे दिसत नाही ते बीजरूपाने कोठेहि आणि केव्हाहि असूं शकेल, कारण त्यास दृश्य पुरावा केव्हाच मिळणार नाही, म्हणून असल्या काल्पनिक कारणापेक्षा आधिभौतिक शास्त्री दृश्य कारणाचांच विचार करीत असतात. आणि आधिभौतिक सुख कशाला म्हणावयाचे याचा विचार करताना हाच न्याय आम्हीहि स्वीकारला पाहिजे. इंद्रियांच्या ठिकाणी तत्तद्विषयाबद्दलचे रागद्वेष व्यवस्थित म्हणजे मुळचेच स्वभावसिद्ध असतात असे जे गीतेत म्हटले आहे ते याच अभिप्रायाने होय. आणि गीतेचा हा स्पष्ट सिद्धान्त सोडून देऊन बीजवासनेच्या कल्पनेने संन्यास मार्गाचे प्रतिपादन करणे म्हणजे गीतेचा उपमर्द करून संन्यासमार्गाच्या कल्पनेस बळी पडण्यासारखे होय. रागद्वेषच बीजरूपाने असतात असे जर कोल्हटकरांचे म्हणणे असेल तर त्यात काही विलक्षण नाही. पण तसे म्हटले म्हणजे राग आणि द्वेष या दोनहि वृत्ति स्वतंत्र होऊन सन्यासमार्गीय म्हणतात त्याप्रमाणे केवळ दुःखाभावासच सुख मानता येत नाही असे प्राप्त होते. किंवा गीतारहस्यात दिलेला सिद्धांतच अधिक दृढ होतो.

### ज्ञान्यास कर्म करणे अशक्य आहे काय ?

“कोल्हटकरानीच नव्हे तर दुसऱ्या टीकाकारानीहि ज्ञान्याच्या हातून कर्म घडणे अशक्य असल्यामुळे कर्मयोग त्यास संभवत नाही असे प्रतिपादन केले आहे. ज्ञानी म्हटला म्हणजे त्याच्या सर्व वासनांचा क्षय झालेला असून सर्व जग त्याला मिथ्या भासत असते आणि सदैव तो निर्विकल्प समाधीत रत असतो इत्यादि विधाने प्रथम करून ज्ञान्याला कर्म करता येणे शक्य नाही व कर्म रहातहि नाही असे हे टीकाकार निक्षून प्रतिपादन करीत असतात. जणु काय याना त्या स्थितीचा अनुभवच आलेला आहे ! पण आमच्या मते ही सर्व टीका आचरटपणाची आहे. आचरटपणा हा शब्द कित्येकास कठोर वाटेल पण तो शब्द अगदी यथार्थ आहे. कारण या टीकाकारांच्या गुरुपरंपरेतले जे स्थितप्रज्ञ ज्ञानी पुरुष—उदाहरणार्थ शंकराचार्य किंवा ज्ञानेश्वरमहाराज—यानीहि कर्मे केली ही गोष्ट या टीकाकारांस सर्वथैव कबूल आहे. आणि यानी जर कर्मे केली तर सर्व वासनांचा क्षय झाल्या-

नंतर कर्मे होत नाहीत वगैरे ज्या तार्किक कोट्या हे टीकाकार लढवतात त्यांची वाट काय? जनकाचे उदाहरण घ्या शंकराचार्यांचे घ्या ज्ञानेश्वराचे घ्या वसिष्ठाचे घ्या किंवा श्रीकृष्णाचे घ्या. पूर्ण स्थितप्रज्ञ असूनहि जर यानी कर्मे केली तर जे या स्थितीस पोचले नाहीत अशा लोकानी वासनाक्षयानंतर कर्म अशक्य आहे अशा जरी हजारो कोट्या केल्या तरी त्या सर्व व्यर्थ व तर्कटीपणाच्या होत. कारण त्या सर्व स्थितप्रज्ञांच्या प्रत्यक्ष कृतीशी पूर्ण विसंगत आहेत. कोल्हटकरानी 'विहाय कामान्यः सर्वान्' हा गीतेतला श्लोक मोठ्या डौलाने पुढे आणला आहे. पण या श्लोकातच पुढे चरति=वागतो असे जे पद आहे त्याचा त्यानी मुळीच विचार केला नाही. सारांश ज्या लोकांच्या सर्व वासना म्हणजे काम्यवासना नष्ट झाल्या ज्याना जग स्वप्नवत् भासू लागले किंवा ज्यांची चित्तवृत्ति सदैव ब्रह्मभूत झाली, त्यांच्याच आचरणावरून त्यास कर्म करता येते व तेहि धृतीने व उत्साहाने करता येते हे निर्विवाद सिद्ध होत आहे. मग आपल्या अज्ञानाने व भ्रांतीने या सिद्धांताच्या असंभवतेबद्दल लोकांच्या डोळ्यात विनाकारण धूळ फेकून रणे माजविण्यात हंशील काय? कोल्हटकर यानी या बाबतीत अमृतानुभवाचे उतारे घेतले आहेत. आणि त्यावरून ज्ञानोत्तर ज्ञान्याला कर्म राहत नाही असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. पण खुद्द ज्ञानेश्वरमहाराज यानी गीता ३·२० वर टीका करीत असता "देखे प्राप्तार्थ जाहले, जे निष्कामता पावले, तयाहि कर्तव्य असे उरले, लोकालागी।" असे जे स्पष्ट विधान केले आहे ते कोल्हटकरांच्या लक्षात आले नाही. तुकारामबुवांचे मत असेच आहे आणि योगवासिष्ठातहि सप्तभूमिकेतून वर गेल्यावर रामास लोकसंग्रहार्थ निष्कामपणाने सर्व व्यवहार करण्याचा उपदेश केला आहे. गीतेत अर्जुनास तोच उपदेश आहे. ज्ञान्यास कर्म करता येणेच जर शक्य नाही तर या सर्व उपदेशकांची वाट काय? अर्थात् ज्ञानी कर्म करतो इतकेच नव्हे तर लोकसंग्रहासाठी हे त्याचे कर्तव्य शिल्लक राहते असे यावरून सिद्ध होते.

## ज्ञान्यास विधि कोण सांगणार?

"ज्ञान्यास कर्मे करता येतात हे आपल्या ग्रंथातून अन्य ठिकाणी कोल्हटकरादिकानीहि कबूल केले आहे. अर्थात् ज्ञान्यास कर्मे अशक्य हा वाद त्यानी होऊनच सोडून दिला आहे. पण यापुढे त्यांचे असे म्हणणे आहे की, ब्रह्मज्ञान्याला कर्मे कर असे टिळक कोण सांगणार? आणि हा प्रश्न विचारून तो निरुत्तर आहे अशा कल्पनेवर या टीकाकारानी रहस्यकारांचा उपहास करण्याची बरीच खटपट केलेली आहे. पण हा त्यांचा प्रयत्नहि मागच्याप्रमाणेच निष्फळ आहे. स्थितप्रज्ञाचे वर्तन सामान्य जनास विधिनिषेध घालून देण्यास समर्थ असते, स्थितप्रज्ञ त्याने बांधला गेला नाही तरी इतर लोक बांधले जातात, किंवा स्थितप्रज्ञ विधिनिषेधाचा किंकर नसून जनक असतो, हा सिद्धांत गीतारहस्यात विस्तृत

रीतीने प्रतिपादिला आहे, ( गी. र. पा. ३७० ). अर्थात् रहस्यकारास तो संमत आहे हे सांगावयास नको. रहस्यावरील टीकाकारास जी गोष्ट कळत नाही ती निराळीच आहे. कायद्यात असे सांगत असतात की ( आणि हे निदान कोल्हटकरास तरी माहीत असले पाहिजे ) राजाने केलेल्या कायद्याने प्रजा जरी बांधली गेली तरी राजा बांधला जात नाही पण त्यावरून असे होत नाही की राजाने आपण होऊन प्रजेच्या कल्याणार्थ आपल्यावर काही निर्बंध घालून घेऊं नयेत. उदाहरणार्थ वाटेल त्या मनुष्यास वाटेल ती शिक्षा करण्याचा राजास अधिकार आहे. पण तो तसे करू शकत नाही; काही विशिष्ट कारणाकरिताच त्यास शिक्षा करावी लागते ही गोष्ट सर्वसंमत आहे. स्थितप्रज्ञासहि हाच न्याय लागू आहे. 'तेषां याः स्वैरकथास्ता एव भवंति शास्त्राणि'—त्याचे जे वर्तन तेच विधिनिषेधरूपी शास्त्र होय हे खरे. पण लोकांच्या हुकुमाने नव्हे तर विधिनिषेधाचे जनक या नात्यानेच सदर विधिनिषेध लोकसंग्रहार्थ त्यास पाळावे लागत असतात; आणि हाच अर्थ 'यद्यदाचरति श्रेष्ठः ' या गीतावचनात स्पष्ट केलेला आहे. विधिनिषेध घालणारे गृहस्थ जर त्याप्रमाणे वागणार नाहीत तर दुसरे लोक तरी कसे वागणार ? यासाठी स्थितप्रज्ञानी आपण होऊनच–टिळकांच्या सांगण्यावरून नव्हे–विधिनिषेधाची बंधने आपणास लावून घेतलेली असतात. किंबहुना ही बंधने पाळूनच जनकादिकासारख्या ज्ञानी पुरुषानी लोकसंग्रह केलेला आहे, आणि त्यांच्या या कर्मापासून जगाचे कल्याणहि झालेले आहे असे कोल्हटकर यानीच आपल्या ग्रंथात ( पृ० १३० ) कबूल केले आहे. मग वाद राहिला कोठे ? तुम्ही कर्मे करा असे ज्ञान्यास अज्ञानी लोक सांगत नाहीत ज्ञानीच सांगतात, एवढे लक्षात ठेवले म्हणजे वाद मिटला. मग टिळकाना शिव्या द्यावयाच्या असल्यास त्या दुसऱ्या कोठे तरी देता येतील. त्याला हेच निमित्त पाहिजे असे नाही. स्थितप्रज्ञ जगासच विधि लावतात असे नव्हे, तर लोकसंग्रहार्थ–लोकैषणेने नव्हे–तोच विधि आपणहि पाळतात हेच तत्त्व " कुर्याद्विद्वांस्तथाऽसक्तः " " जोषयेत्सर्वकर्माणि " " जिजीविषेच्छतं समाः " इ० वाक्यात कुर्यात् ( करावे ) जोषयेत् ( करवावे ) जिजीविषेत् ( जिवंत राहण्याची इच्छा धरावी ) इ० विध्यर्थक प्रयोगानी प्रतिपादिले आहे. 'कुर्यात्' वगैरे शब्द विधीचे दर्शक होत असा मीमांसकांचा स्पष्ट न्याय आहे; व तीच पदे जर वरील श्लोकात आहेत तर उडवाउडवीने ती कशी तरी अर्थवादात्मक समजून गीतेचा विपरीत अर्थ करणे अगदी गैरशिस्त होय असे आमचे मत आहे. तुम्ही काही बडबड करा सर्व ज्ञान्यामध्ये श्रेष्ठ जे भगवान् ते आपल्या प्रिय भक्तास म्ह० ज्ञान्यास लोकसंग्रहार्थ कर्मे करावी असे स्पष्ट सांगत आहेत. इतक्याउपरहि भगवंतास असे सांगण्याचा काय अधिकार ? अशा बाष्कळ कोट्या करून गीतेचा उपमर्द करणें आमच्या मते अत्यंत अनुचित व साहसाचे होय. यापेक्षा गीता मला मान्य नाही असे जर कोणी म्हणेल तर निदान तो प्रामाणिक आहे

असे तरी आम्ही समजू. फार काय सांगावे कोल्हटकरांचे गुरु शंकराचार्यदेखील लोकसंग्रहार्थ ज्ञानी पुरुषाने कर्म केल्यास चालेल असे म्हणतात. गीतेचा आणि त्यांचा भेद काय तो एवढाच की गीतेचा ओढा निष्कामकर्माकडे आणि आचार्यांचा ओढा कर्मसंन्यासाकडे आहे. कोल्हटकरास ही गोष्ट कळली नाही अगर कळत नाही असे नाही. पण वादाच्या या मुख्य मुद्द्याचा याप्रमाणे निर्णय होतो असे कबूल केल्यावर टिळकांची निंदा करावयास कसे सांपडणार ? आता कदाचित् कोणी असे म्हणतील की स्थितप्रज्ञांनी अशा रीतीने आपणास बांधून घेणे ज्या अर्थी त्यांच्या इच्छेवर अवलंबून आहे त्या अर्थी कदाचित् ते आपणास हा निर्बंध लागू करून घेणार नाहीत. होय; पण त्यानी असे करणे लोकसंग्रहदृष्ट्या गीता ( टिळक नव्हे ) प्रशस्त मानीत नाही आणि हाच काय तो गीता आणि संन्यासमार्ग यातील भेद आहे. ‘ कर्म ज्यायोह्यकर्मणः ’ ‘ कर्मयोगो विशिष्यते ’ यातील बीज हेंच होय. हे अर्थवाद नसून गीतेचे सिद्धांत आहेत.

### वेदविरोध

“आचार्यांचा कर्मसंन्यासाकडे जो ओढा आहे तो उपनिषदांच्या आधारे असल्यामुळे या उपनिषदाना अनुकूल असा गीतेचा अर्थ त्यानी केला आहे. पण त्यामुळे गीतेचा कर्मयोगपर अर्थ लावणे वेदविरुद्ध आहे असे जे कोल्हटकरप्रभृति प्रतिपादन करतात ते मात्र खरे म्हणता येत नाही. शंकराचार्यांनी उपनिषदाचे जे अर्थ केले तेच सरळ व खरे असून तद्विरुद्ध कोणताहि अर्थ करता येत नाही असे ज्यांचे मत असेल त्याना गीतेचा कर्मयोगपर अर्थ लावणे अप्रशस्त वाटेल नाही असे नाही. पण वेदांचा सर्वजण एकच अर्थ करतात असे नाही. रामानुजाचार्यादिकानी याच वचनांचे निराळे अर्थ केलेले आहेत आणि त्यापैकी सरळ कोणता आणि सांप्रदायिक कोणता हे ठरविण्याची साधने आज आपल्यास उपलब्ध आहेत. या साधनांचा उपयोग करून उपनिषदांचे अर्थ लावल्यास त्यात संन्यासमार्गाबरोबरच कर्मयोगमार्गहि विकल्पाने प्रतिपादिला आहे. असे गीतारहस्यात स्पष्ट दाखविले आहे. गुरुपरंपरेने अंध झालेल्या दृष्टीस ते दिसत नसल्यास आमचा इलाज नाही. आमचे एवढेच म्हणणे आहे की संन्यास जितका श्रुतिस्मृतिप्रतिपादित तितकाच कर्मयोगहि श्रुतिस्मृतिप्रतिपादित आहे. रहस्यकार श्रुतिस्मृति प्रमाण मानीत नाहीत वगैरे जी कुत्सित विधाने कोल्हटकरानी केली आहेत ती सर्व निर्मूल होत. अशी निर्मूल विधाने करण्यात त्यांचा काय हेतु असावा हे त्यांचे त्यासच माहीत. अथवा गीतारहस्य लिहिण्याचे प्रयोजनच ज्यास कळले नाही व कळत नाही त्याच्या हातून सदर ग्रंथावर अशा प्रकारची विपर्यस्त टीका झाली असल्यास त्यात नवल तरी कसले ?

### प्रयत्नवाद व दैववाद

'कर्मविपाक व आत्मस्वातंत्र्य' असे जे गीतारहस्यात प्रकरण आहे त्यावर कोल्हटकरानी जी टीका केली आहे ती चुकीचीच नव्हे, तर खऱ्या वेदांत सिद्धांताच्या विरुद्ध आहे. आत्मस्वातंत्र्य आणि आत्मकर्तृत्व या शब्दांचा भेदच त्यास कळला नाही. वेदांत शास्त्राप्रमाणे आत्मा अकर्ता आहे हे गीतारहस्यातहि स्पष्टपणे नमूद केलेले आहे. त्याचप्रमाणे सर्व कर्तृत्व जड प्रकृतीचे, हा सिद्धांतहि रहस्यात दिलेला आहे. पण वेदांत शास्त्राप्रमाणे पाहिले तर प्रकृतीच्या ठायी हे जे कर्तृत्व येत असते ते परमेश्वराच्या (किंवा आत्म्याच्या) अध्यक्षतेखाली येत असते (गीता ९. १०). नुसती प्रकृतीच घेतली तर ती आंधळी होय. तेव्हा आता असा प्रश्न उपस्थित होतो की, आत्मा देहात बद्ध झाल्यावर देहाकडून जी मोक्षानुकूल कर्मे होतात ती देहाचे धर्म म्हणून होतात किंवा आत्म्याकडून देह-प्रकृतीला तशी प्रेरणा होते? देहाकडूनच होतात म्हटले तर सर्वांस मोक्ष मिळाला पाहिजे. शिवाय प्रकृतीला स्वतंत्र कर्तृत्वहि नाही; म्हणून अशा स्थळी म्हणजे आत्मा देहात बद्ध झाल्यावर प्रकृतीकडून मोक्षानुकूल कर्मे करविण्यास तो समर्थ आहे असा सर्व वेदांतशास्त्राचा सिद्धांत आहे व हाच सिद्धांत जीवकर्तृत्वाधि-करणात व गीतारहस्यात स्वीकारलेला आहे. किंबहुना हा सिद्धांत स्वीकारल्या-खेरीज मोक्ष मिळणेच अशक्य होय. मोक्ष मिळविणे हा प्रकृतीचा धर्म नव्हे, आत्म्याच्या स्वातंत्र्यामुळे त्याच्या भोंवतालच्या प्रकृतीत तो ही प्रेरणा करीत असतो. याचे नाव प्रयत्न आणि हा प्रयत्न मनुष्याने एकसारखा केला पाहिजे, प्रकृति हट्टी असली तरी हळुहळु तिचे दमन करता येते, हे सिद्धांतच "प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः। अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम्" किंवा 'यतते च ततो भूयः' इत्यादि गीता–श्लोकात सांगितले आहेत. गीता प्रयत्नवादी नाही हे म्हणणे सर्वस्वी चुकीचे होय. योगवासिष्ठकारानी हाच सिद्धांत मुमुक्षु-व्यवहार-प्रकरणात दिला असून तेथे "मूर्ख मनुष्याना दैव म्हणून काही आहे असा भ्रम होतो" आणि "प्राक्तन कर्माने आपली सध्याची स्थिति नियमित झाली असली तरी आपल्याला मुळीच स्वातंत्र्य नाही अशी तुझी जी भावना झाली आहे ती बरोबर नाही," असे वसिष्ठानी रामास सांगितले आहे, (योगवासिष्ठ मराठी भाषांतर पान ८३ व ८६). योगवासिष्ठाचे आता सुलभ मराठीत भाषांतर झाले असल्यामुळे तेच मी आपल्यास वाचून दाखविले. कोल्हटकर यानी या बाबतीत सर्व भिस्त हेकेलवर ठेवली आहे. पण हेकेल अनात्मवादी आहे आणि वेदांत आत्मवादी आहे; आणि अनात्मवाद्यांचा सिद्धांत आत्म-वाद्याला सर्वस्वी स्वीकारता येत नाही हे रहस्यावर टीका करण्याच्या भरात कोल्हट-करांच्या लक्षात राहिले नाहीसे दिसते. जीवकर्तृत्व अधिकरण आत्म्याबद्दल नाही जीवाबद्दल आहे असे ते मोठ्या डौलाने सांगत आहेत. पण या अधिकरणात कर्तृत्व या शब्दानेच स्वातंत्र्याचा बोध होतो ही गोष्ट पुष्कळ शास्त्री लोकाप्रमाणे

त्यांच्याहि लक्षात आलेली नाही; आणि ब्रह्मसूत्रासच नव्हे तर त्यांचे गुरु जे आचार्य त्यांच्या भाष्यास आणि योगवासिष्ठादि प्रतिष्ठित वेदांतग्रंथास किंबहुना सर्व वेदांतशास्त्रासहि विरुद्ध असा अपसिद्धांत त्यांनी आपल्या कर्मविपाकयोगप्रकरणात ठासून प्रतिपादिला आहे! गुरुपरंपरा व सांप्रदाय यांच्याबद्दल त्यांचे किती अज्ञान आहे हे या एकाच गोष्टीवरून स्पष्ट।

### अर्जुन ज्ञानी का अज्ञानी ?

"कोल्हटकरानीच नव्हे तर दुसऱ्याहि टीकाकारानी अर्जुन ज्ञानी का अज्ञानी असा एक प्रश्न उपस्थित करून अर्जुन अज्ञानी होता म्हणून त्याला कर्मयोग उपदेशिला अशा कोट्या केल्या आहेत. पण आमच्या मते हा विचार सर्वथैव असंबद्ध व अप्रयोजक आहे. गीता हे एक शास्त्र आहे आणि स्वधर्माप्रमाणे आचरण करूनहि मनुष्य कृतकृत्य कसा होतो याचे त्यात थोडक्यात पण सांगोपांग व पूर्ण विवेचन आहे. गीता ही काही विशिष्ट प्रसंगाला उद्देशून 'ताकापुरते रामायण' सांगितलेली नव्हे. 'एतद्‌बुध्वा बुद्धिमान्स्यात्कृतकृत्यश्च भारत'—हे समजून घेतल्याने मनुष्य कृतकृत्य होतो असे भगवंतानी गीतेत स्वच्छ म्हटले आहे. भागवतात उद्धवास निराळ्या प्रकारचा उपदेश केला असल्यामुळे गीतेतील उपदेश अपुरा मानला पाहिजे अशी रा. बाबा गर्दे यानी एक शंका काढली होती. पण तीहि बरोबर नाही. कारण दोनहि ठिकाणी भगवंताचे जरी नाव असले तरी गीतेनंतर कित्येक शतकानी झालेल्या भागवताची व गीतेची एकवाक्यता करणे इष्ट नाही असे गीतारहस्यातच आम्ही दाखविले आहे. कोल्हटकर म्हणतात की ही ऐतिहासिक पद्धत धर्मविषयक चर्चेत कामाची नाही. पण हीहि चूक होय आणि या चुकीच्या समजामुळेच धर्मविषयक चर्चेत अनेक घोटाळे उत्पन्न होऊन एकवाक्यता म्हणजे भात, भाजी व आंमटी वगैरे सर्व जिन्नस कुटून एकरस बनाविणे असा भ्रम उत्पन्न झालेला आहे. एकवाक्यता करणे ती अशा प्रकारे न करता कधी कालभेदाने तर कधी विकल्प कल्पूनहि करावी लागते हे तत्त्व पूर्वीच्या मीमांसकासहि मान्य झालेले आहे, आणि तेच हल्लीचे मीमांसकहि प्रमाण धरून चालतात. किंबहुना कोणत्याही विषयाची ऐतिहासिक पद्धत म्हणजेच कालभेदाने व रुचिभेदाने व्यवस्था लावणे होय; आणि हीच पद्धत आम्ही गीतेसहि लावू इच्छितो. धर्माची मुख्य तत्त्वे व प्रमाणग्रंथ एक असताहि त्यात निरनिराळे संप्रदाय निघण्याचे हेच कारण होय. अशा दृष्टीने विचार केला म्हणजे गीता हे कर्मयोगपर स्वतंत्र, सुगम व पूर्ण शास्त्र आहे असे मानणे भाग पडते; आणि असे मानले म्हणजे अर्जुन अज्ञानी का ज्ञानी या प्रश्नाचे काहीच महत्त्व राहत नाही. शाळेतील वर्गामध्ये भूमिति–शास्त्र शिकवीत असता अमुक विद्यार्थी चलाख आणि अमुक मंद इ. गोष्टींचा जसा गुरु विचार करीत नाही, सर्व शास्त्र सर्वास नीट समजावून देतो, तद्वतच गीतेची गोष्ट आहे. अर्जुनाला मोह झाला म्हणून गीता-

शास्त्र सांगितले हे खरे. पण अर्जुन अज्ञानी म्हणून तितक्या पुरतेच त्याला सांगितले आम्ही ज्ञानी अतएव कर्मसंन्यासच केला पाहिजे या कोट्या सर्वथैव पोकळ अभिमानाच्या अतएव अग्राह्य होत. अशा कोट्या करण्यापेक्षा गीतेचा पंथ निराळा आमचा निराळा. गीताशास्त्र प्रमाण खरे पण आमची अभिरुचि निराळी असे प्रतिपादन करणे अधिक सरळपणाचे आणि प्रामाणिकपणाचे होईल. आपली अभिरुचि भिन्न म्हणून बलात्काराने गीतेसहि संन्यास देणे युक्त नाही. कित्येक म्हणतात युद्धाचा प्रसंग होता म्हणून कर्मयोग सांगितला पण हेहि योग्य नाही. कोणतेहि शास्त्र का होईना ते प्रसंगानेच सांगितले जाते हे खरे पण प्रसंगाला प्रसंगापुरतेच उत्तर देऊन काम भागविणे म्हणजे एकप्रकारे श्रोत्यास फसविणे होय. भगवानानी असे केले नाही व त्यांची तशी इच्छाहि नव्हती. संन्यास व कर्मयोग अशा ज्या जगात चालत आलेल्या दोन निष्ठा त्यापैकी कर्मयोगनिष्ठा लोकसंग्रहदृष्टया अधिक श्रेयस्कर हे शास्त्रोक्त रीतीने भगवंतानी प्रतिपादन केले आहे; आणि प्रसंग जरी युद्धाचा असला तरी या शास्त्रोक्त प्रतिपादनास त्यामुळे काही वैगुण्य किंवा कमीपणा येत नाही. प्रसंगाने जरी बोलावयाचे असले तरी भगवान नेहमीच खरे बोलतात हे लक्षात ठेवले पाहिजे.

## वर्णाश्रमधर्म

"गीतेत कर्मयोग प्रतिपाद्य नसून वर्णाश्रमधर्म प्रतिपाद्य आहे असे कोल्हटकर म्हणतात आणि त्यास 'श्रेयान्स्वधर्मः' इ० वचनांचा आधार देतात. पण आमचा त्यास एवढाच प्रश्न आहे की, नुसता वर्णाश्रमधर्मच जर भगवंतास गीतेत सांगावयाचा होता तर ज्ञान सांगण्याचा एवढा खटाटोप कशाला? क्षत्रिय आहेस म्हणून युद्ध कर, एवढे म्हटले म्हणजे संपले भिक्षा ब्राह्मण मागतात, तूं मागू नको. इत्यादि कोट्या टीकाकारानी लढवलेल्या आहेत, भगवंतांच्या नव्हत. प्रत्येकाची कर्मे चातुर्वर्ण्यव्यवस्थेप्रमाणे विभागलेली आहेत, किंबहुना भगवंतानीच गुणकर्मानुरूप ती निर्माण केली आहेत, ही गोष्ट गीतेस मान्य आहे. पण ही चातुर्वर्ण्यव्यवस्था पाळ किंवा स्नानसंध्यादि अगर यज्ञयागादि कर्मे कर, हे सांगण्याचा गीतेचा मुख्य हेतु नव्हे. ही कर्मे आजन्म करीत असताहि मोक्ष कसा मिळेल हा गीतेतला प्रश्न आहे. पूर्वशास्त्रे पाहू गेले असता यज्ञयागादिकानी मोक्ष मिळतो असे एक शास्त्र, तर कर्मसंन्यास केल्याखेरीज मोक्ष मिळत नाही असे दुसरे शास्त्र; आणि यज्ञयाग किंवा संन्यास ब्राह्मणासच विहित. मग सगळ्या वर्णातील लोकास मोक्ष कसा मिळणार? त्यानी आपली कर्मे सोडून संन्यास घ्यावा काय? आणि सर्वानी आपली स्ववर्णविहित कर्मे सोडली तर जग तरी कसे चालणार? उपनिषदात अगर पूर्वमीमांसेत या गोष्टीचा मुळीच विचार केलेला नाही, निदान उपेक्षा तरी केलेली आहे हे निश्चित होय. तेव्हा हा दोष दूर करून सर्व वर्णातील लोकाना आपापली कर्मे करीत असताच कोणत्या युक्तीने

तद्द्वारा मोक्ष प्राप्त करून घेता येतो याचे भगवंतानी गीतेत विवेचन केलेले आहे. स्मृतिग्रंथात चातुर्वर्ण्यविभागाचे नुसते वर्णन असून मोक्ष पाहिजे असल्यास संन्यास घ्या असे स्मृतिकार सांगतात. गीता तसे सांगत नाही. आश्रमसंन्यास गीतेत कोठेहि वर्णिला नाही. गीतेचा संन्यास म्हणजे फलसंन्यास होय. हा आश्रम-संन्यासाहून भिन्न आहे. किंबहुना याचमुळे स्मार्त आणि भागवत हे संप्रदाय भिन्न झालेले आहेत असे गीतारहस्यात स्पष्ट म्हटलेले आहे. पण कोल्हटकरांची दृष्टि तिकडे जाते कशाला ? मनुस्मृतीत वर्णिलेल्या संन्यासाश्रमाची व गीतेतील फलत्यागरूपी संन्यासाची तुलना करण्याचे परिश्रम त्यानी घेतले आहेत असे दिसत नाही; आणि ते परिश्रम तरी त्यानी का घ्यावे ? सर्व भिस्त जेथे गुरुपरंपरे-वर तेथे स्वतः एवढी खटपट करण्याचे कारण काय ? खाटिकाला निष्काम कर्मयोग कसा सिद्ध होणार ? अशी त्यास शंका आली आहे; आणि ग्रंथाच्या आरंभी एका शेतकऱ्याचा संवाद देऊन त्यानी निष्कामकर्माची टर उडविण्याचा प्रयत्न केला आहे. पण कोल्हटकराना असे कळेना की, ही टर किंवा निंदा टिळकांची होत नसून भगवंतांची होते; कारण गीतेत निष्कामकर्मयोग सांगितला आहे ही गोष्ट त्यासहि मान्य आहे. मग निष्कामकर्माची थट्टा कशाला ? सर्वच स्थितप्रज्ञ होणे शक्य नाही हे गीतेस माहीत नव्हते असे नाही. 'मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये' हा सिद्धांत गीतेतच सांगितला आहे. स्थितप्रज्ञ थोडेच असणार. पण या स्थितप्रज्ञाखेरीज इतर लोकांच्या डोळ्यापुढे चातुर्वर्ण्य विहित कर्मे करताना जे ध्येय मांडावयाचे ते स्थितप्रज्ञाच्या समबुद्धीचेच असले पाहिजे असा गीतेचा सिद्धांत आहे; आणि कोल्हटकरांच्या शेतकऱ्यास जरी हा सिद्धांत न समजला—किंबहुना कोल्हटकरासहि न समजला—तरीहि गीतेत अनु-करणीय म्हणून लोकांपुढे मांडलेल्या या ध्येयास यत्किंचितहि कमीपणा येत नाही.

### नीतीची उपपत्ति

"सरतेशेवटी रामदुर्गचे कारभारी असे म्हणतात की नीतीची उपपत्ति ब्रह्म-ज्ञानाने लागत नसून किंवा गीतेत लावलेली नसून ही उपपत्ति लावण्यास पुन-र्जन्मवादाचाच स्वीकार केला पाहिजे. परंतु त्याबद्दल गुरुपरंपरेचा साक्षात् आधार कोल्हटकरानी काहीएक दिला नाही. जसे करावे तसे भोगावे चांगले केले चांगले भोगावे वाईट केले वाईट भोगावे हा पुनर्जन्माचा सिद्धात. चांगले कोणते आणि वाईट कोणते याचा विचार पुनर्जन्मवाद करीत नाही. तो नीतीचा प्रश्न आहे आणि त्याचा विचार मोक्षशास्त्रदृष्ट्याच करावा लागतो कारण मोक्ष ही सर्वात चांगली व अत्यंत हिताची गोष्ट होय आणि ती सिद्ध होण्यास कर्म करणे तेहि अत्यंत चांगले करावे लागते म्हणून मोक्षप्रद कर्मयोगशास्त्रात कर्माचे बंधन घाल-विण्यास निष्कामता किंवा समत्वबुद्धि हाच एक उपाय असे प्रतिपादन करीत असतात आणि मोक्षशास्त्रदृष्ट्या हा उपाय सिद्ध झाल्यावर कर्मांच्या चांगुलपणा-

चीहि तीच कसोटी बनते. गीतेत हे सर्व विचार आलेले आहेत व शेवटी 'ध्रुवा नीतिर्मतिर्मम' यातच नव्हे तर 'किं कर्म किमकर्मेति' इ० श्लोकातहि भगवंतानी नीतीचे तत्त्व सुचविले आहे. कार्याकार्यव्यवस्थितीसाठी शास्त्र प्रमाण मानावे असे नुसते गीतेत म्हटले नाही तर 'तस्मात्' हा शब्द मागे असल्यामुळे शास्त्राला हे प्रामाण्य का आले याचेहि विवेचन गीताकारास इष्ट होते असे दिसून येते. पूर्वीचे शास्त्री नीति हा स्वतंत्र विषय मानीत नसल्यामुळे गीतेवरील पूर्वटीकातून या विषयाला विशेष महत्त्व दिलेले नाही हे खरे. पण पूर्वीच्या शास्त्र्यापेक्षा आमची दृष्टि तुलनात्मक शास्त्रीय अभ्यासाने जर अधिक व्यापक बनलेली आहे तर गीतेतील निष्काम कर्मयोग हे एक नीतिशास्त्राचेच आध्यात्मिक रूपांतर आहे ही गोष्ट स्पष्टपणे सांगण्यास आम्ही कचरलो म्हणजे आपल्या कर्तव्यास विसरणे होय. येथे केवळ गुरुपरंपरेवर राहून चालावयाचे नाही आणि चालूहि नये. इंग्रजी तत्त्वज्ञानाचे ग्रंथ वाचलेल्या कोल्हटकरास ही गोष्ट थोड्या विचाराअंती सहज कळली असती. पण अंध गुरुपरंपरेच्या भपक्यावर एखाद्या विशिष्ट व्यक्तीची निंदा करण्यासाठीच जो ग्रंथ लिहिला लिहविला व प्रसिद्ध झाला त्या ग्रंथात असले विचार कोठून येणार?"

## (१०) समारोप

शेवटी गीतारहस्यावरील टीकेचा हा विषय सोडून देऊन सामान्यपणे दोन शब्द लिहून हे प्रकरण पुरे करू. गीतारहस्यावर कोणीहि कितीहि प्रतिकूल टीका केली तरी त्यात दिसून येणाऱ्या टिळकांच्या विद्वत्तेविषयी व धार्मिक वाङ्मयातील त्यांच्या प्राविण्याविषयी कोणीहि शंका घेऊ शकला नाही. प्रतिपक्षी यानीहि प्रतिकूल टीका करण्याच्या आधी हा ग्रन्थ अपूर्व आहे आपल्यापरीने उत्तम आहे असेच उद्गार काढले आहेत. पूर्वीचे त्यांचे दोन इंग्रजी ग्रन्थ ज्यानी वाचले आहेत त्याना टिळकांच्या पांडित्यासंबंधाने शंकाच उरली नव्हती. इतकेच नव्हे तर अभ्यास केला असता बुद्धिमत्तेच्या जोरावर ते कोणत्याहि शास्त्रात ग्रन्थ लिहू शकतील अशीहि कबुली नवीन पद्धतीच्या सुशिक्षित लोकानी दिली असती. पण टिळकानी गीतेवर मराठीत भाष्य लिहिले ही गोष्ट जुन्या परंपरेच्या लोकाना मनापासून फारशी आवडली नाही. किंबहुना बुद्धिमत्तेच्या बलावर टिळकानी एकप्रकारे मर्यादा सोडली, दुसऱ्याच्या राखीव क्षेत्रात पाय टाकला, अतिक्रमण केले, टिळकांच्या अहंमन्यतेला ही वाचा फुटली, महत्त्वाकांक्षेचा कळस झाला, व लोकप्रियतेचा दुरुपयोग झाला असेहि कित्येकाना वाटले. याची कारणे दोन. एक शंकराचार्यांच्या भाष्याशी व तात्पर्याशी त्यांचा विरोध, व दुसरे जुने सांप्रदायिक भक्तिमार्गी लोक संन्यासी वगैरेसंबंधाने त्यांच्या लिहिण्यात कोठे कोठे आलेले अनादर दर्शक शब्द. पैकी या दुसऱ्या आक्षेपासंबंधाने पाहिले तर टिळकांचे टीकाकाराना जे उत्तर वर छापले आहे त्यात या आक्षेपाला उत्तर आलेच आहे. शिवाय

साधुसंत किंवा संन्यासी यांच्या विषयीच्या निंदेची वचने अशी काढून पाहिली तर ती फारच थोडी व सौम्यपणाची ठरतील. निदान इतके निश्चित म्हणता येईल की निवृत्तिमार्गी लोकानी प्रवृत्तिमार्गी संसारी लोक व व्यवहारी जग यांची जितकी तीव्र निंदा आपल्या ग्रंथांतून आजवर केलेली आहे तितकी टिळकानी केलेली ही निंदा खचित भरणार नाही.

पहिल्या आक्षेपासंबंधाने शंकराचार्यांचे मत व स्वतःचे मत यात भेद किती सूक्ष्म आहे हे टिळकानी स्वतःच दाखविले आहे. गीतारहस्याचे अकरावे प्रकरण 'संन्यास व कर्मयोग' या विषयीचे आहे. त्यात एक कोष्टक मांडून आयुष्य-क्रमणाच्या मार्गाच्या प्रती व त्याना मिळणारी गति यांची फोड टिळकानी केली आहे. केवळ आत्मसुखासाठी कर्म करणे अधम प्रत. यथार्थ ज्ञान नसले तरी शास्त्राज्ञेप्रमाणे काम्य कर्म करीत राहणे ही मध्यम प्रत. यथार्थ ज्ञान झाल्यावर वैराग्य बुद्धीने कर्मे सोडून देऊन केवळ ज्ञानाने तृप्त होऊन राहणे ही उत्तम प्रत. व यथार्थ ज्ञान झाल्यानंतरहि लोकसंग्रहार्थ शुद्ध बुद्धीने निष्काम कर्म करीत राहणे ही सर्वोत्तम प्रत. अशी टिळकानी वर्गवारी लाविली आहे. अर्थात् उत्तम व सर्वोत्तम या पदवीचाच काय तो झगडा आहे. या दोन्ही प्रतीना शेवटी मोक्ष ही एकच उत्तम गति मिळते हे टिळकाना नाकबूल नव्हते. आपल्या कर्मयोग्याला मोक्ष देण्यासाठी त्यानी संन्यासमार्गीयांचा मोक्ष काढून घेतला नाही. अर्थात् गतीच्या दृष्टीने नव्हे तर मनुष्यकर्तव्याच्या दृष्टीने ज्ञानोत्तर कर्म करण्याची 'शिफारस' किंवा 'सूचना' गीतेत आहे किंवा नाही इतकाच सूक्ष्म वाद उरतो. टिळकांच्या मते अशी शिफारस स्पष्ट दिसून येते. शंकराचार्यांच्याहि मताप्रमाणे ज्ञानोत्तर कर्म कोणी केले तर ते निषिद्धाचरण ठरत नाही. लोकसंग्रहार्थ कर्म करणे हे मनुष्यकर्तव्य असे एखाद्या ज्ञानी संन्याशाने म्हटले तर शंकराचार्यांच्या मतेहि त्याला अपवाद नाही. पण एखादा ज्ञानी संन्यासी हे मनुष्य–कर्तव्य आहे असे न म्हणेल तर शंकराचार्यांच्या मताप्रमाणे ते बरोबर ठरेल व टिळकांच्या मताप्रमाणे त्यात विचाराअंती दुरुस्ती करण्यासारखी काही जागा राहील. तात्पर्य न केले तर चूक नाही पण केले तर अधिक बरे इतका हा सूक्ष्म विवेक आहे. नुसता गीतेचा प्रसंग लक्षात घेऊनच जर टिळक मोघम म्हणते की 'गीता प्रवृत्तिकरिता सांगितली आहे' तर त्याना कोणी नावे ठेवली नसती अशी सवलतहि संन्यास मार्गीयापैकी काहीनी आपल्या टीकेत सुचविली आहे. पण त्यांच्या मते टिळकांचे चुकले ते हे की आपला सिद्धांत सिद्ध करण्याच्या भरात त्यानी शंकराचार्यांच्या भाष्याला नावे ठेवली. एका बाजूला टिळकांचा जसा आग्रह तसाच शंकराचार्यांचा आग्रह दुसऱ्या बाजूला असल्याची हि कबुली पुष्कळानी दिली आहे. यामुळे टिळकांच्या बाजूला जो ऐन दोष शिल्लक उरतो तो आग्रहाशी आग्रह लढविताना शब्दार्थाच्या ओढाताणीचा. शंकराचार्यांनी जो दोष केला तोच टिळकानीहि केला.

अशा दृष्टीने पाहिले तर फिटास फीट होऊन अधिक काही टिळकानी केले नाही. क्रियेला प्रतिक्रिया झाली इतकेच काय ते. पण आपला गीता हा धर्मग्रन्थ जर सनातन आहे तर निरनिराळ्या युगाला व प्रत्येक युगातील निरनिराळ्या पिढीला तो सारखाच उपयोगी पडला पाहिजे व तो तसा उपयोगी पडावयाचा तर कालमानाप्रमाणे जी वृत्ति समाजात विशेष प्रबल होईल तिला उपकारी व उपोद्बलक असा अर्थ या सनातन धर्मग्रंथातून काढता आला पाहिजे. शंकराचार्यांच्या वेळी किंवा बुद्धकाली संन्यास मार्गाविषयी काय प्रवृत्ति असेल ती असो. पण ती प्रवृत्ति आज या विसाव्या शतकात नाही. यज्ञकर्मांच्या अतिरेकामुळे अहिंसेची प्रतिक्रिया, अहिंसेच्या अतिरेकामुळे कुमारील भट्टादि मीमांसकांची प्रतिक्रिया, फिरून मीमांसक मार्गाच्या अतिरेकामुळे भक्तिमार्गीयांची प्रतिक्रिया, अशा क्रमाने क्रिया व प्रतिक्रिया यांच्या लाटावर लाटा उठलेल्या आपण भारतीय इतिहासात पाहतो. आणि टिळकानी कर्मयोगाचे समर्थन करून उठविलेली लाट ही जुन्या सांप्रदायिक भक्तिमार्गाच्या अतिरेकामुळे उठलेल्या प्रतिक्रियेचीच लाट होय. प्रत्येक प्रतिक्रिया ही क्रियेतील अतिरेकाने होणारे समाजाचे अनहित थांबविण्याकरिताच प्रवर्तित झालेली असते. यामुळे कोणत्याहि प्रतिक्रियेच्या समर्थनात तत्पूर्वीच्या मार्गाची थोडीबहुत प्रगट किंवा प्रच्छन्न निंदा किंवा दूषण देण्याची बुद्धि ही असावयाचीच. कोणत्याहि सुधारणेचे पहिले कार्य दिसण्यात विध्वंसक व निंदेच्या कर्तव्यामुळे अप्रिय असेच असते. पण तेवढा अपरिहार्य दोष वजा घातला असता प्रतिक्रिया होते ती चांगल्या करिताच होते म्हणून तिचे समाजाकडून शेवटी स्वागतच झालेले आढळते. पण कोणत्याहि हिंदी धार्मिक प्रतिक्रियेत हीच मौज आहे की तिला सनातन धर्मग्रंथांच्या पायावर उभे राहता येऊ शकते. आणि ज्या आधारावर संन्यासमार्गाची त्या काली तो योग्य म्हणून प्रतिष्ठा झाली त्या आधारावर वर्तमानकाली कर्मोपदेश हा योग्य म्हणून त्याचीहि प्रतिष्ठा सहजच होणार. हल्लीचा काल प्रवृत्तिपर आहे निवृत्तिपर नाही. ज्ञानोत्तर कर्म न करणे हे सर्वोत्तम मानले तरी ज्ञान्याला कर्म करण्यासाठी जी शास्त्रानी ऐच्छिक सवड ठेवली आहे तिचा उपयोग करून सर्व ज्ञानी मनुष्यानी पुढे येऊन समाजसेवेला सादर झाले पाहिजे असाच काल आता आला आहे. अशा स्थितीत 'गीतारहस्या'वर प्रथम प्रथम अनेक आक्षेप आले तरी एकंदरीने लोकाना उत्तेजन देणारा कर्मप्रवण करणारा उद्योगी बनविणारा नशिबाला दोष देऊन कपाळाला हात लावून स्वस्थ बसणारांचा निषेध करणारा जशास तसे वागणे ही नीति आहे असे सांगून धीर देणारा असाच आजहि गीतारहस्य ग्रन्थ नवीन पिढीला वाटेल याविषयी दुमत नाही. व तसे फल या ग्रन्थापासून मिळाले तर कोणत्या शब्दाची टिळकानी किती ओढाताण केली याकडे कोणी लक्ष देईल असे आम्हास वाटत नाही. त्यांची चूक असली तरी ती शास्त्रीय चूक असेल. पण त्या चुकीपासूनहि समाजाचे हितच होईल याविषयी कोणास शंका वाटत नाही.

गीतारहस्य प्रसिद्ध होताच त्यावर टीका करण्याकरिता मंडळे निर्माण झाली आणि Extremes meet या न्यायाने या मंडळात पुराणमतवादी लोक व प्रागतिक प्रोफेसर लोक एकत्र जुळले! तथापि आपला ग्रंथ शेवटी मान्य व स्थिरपद होईल असा टिळकाना भरवसा होता त्याप्रमाणे त्याची अनेक देशी भाषांतून भाषांतरे झाली व परप्रांतातूनहि त्याला मान्यता मिळाली.

असो. गीतारहस्य ग्रंथाचे महत्त्व दुसऱ्या एका दृष्टीने लोक मानतात. मात्र ही दृष्टि इंग्रजी शिकलेल्या लोकांचीच आहे हे नमूद केले पाहिजे. यांच्या दृष्टीने गीतारहस्य ग्रंथातील पूर्वार्धाचे महत्त्व उत्तरार्धापेक्षाहि अधिक आहे. गीतेच्या श्लोकांचा शब्दार्थ व त्यावरील टीका किंवा भाष्य यापेक्षा पहिल्या १५–१६ प्रकरणात टिळकानी तुलनात्मक नीतिशास्त्र व गीतेचे अंतरंग व बहिरंग परीक्षण केले आहे ते खरोखर अपूर्व होय. त्यातल्यात्यात महत्त्वाची बाब आमच्या मते ही की पाश्चात्य तत्त्वज्ञान व गीतेतील नीतिशास्त्र यांची सांगड टिळकानी फार चांगली घालून दाखविली.

मुंबई युनिव्हर्सिटी स्थापन झाल्यापासून तत्त्वज्ञान हा विषय इकडील लोकांच्या वाचण्यात थोडथोडा येऊ लागला. अलीकडे त्याचे अध्ययन व अध्यापन वाढले आहे. तथापि मराठी वाङ्मयाकडे पाहिले तर असा एकहि ग्रंथ गीतारहस्यापूर्वीचा दाखविता येणार नाही की ज्यात मराठी वाचकाना युरोपियन तत्त्वज्ञानाचा थोडासा तरी परिचय करून दिलेला आहे. आजहि नाही म्हणावयाला वामन मल्हार जोशी यांचे एक पुस्तक 'नीतिशास्त्र-प्रवेश' या नावाचे आहे. त्यात तत्त्वज्ञानाची मूलभूत काही सूत्रे सोप्या भाषेत समजावून सांगितली आहेत. पण तत्त्वज्ञानमंदिराची पहिली पायरी चढू लागणाऱ्यानाच ते उपयुक्त आहे. इंग्रजी वाङ्मयाच्याद्वारे थोडेबहुत झालेले युरोपियन तत्त्वज्ञानाचे शिक्षण मराठी वाङ्मयातून प्रतिबिंबित होते. पण शास्त्र या दृष्टीने युरोपिअन तत्त्वज्ञानाचा परिचय मराठीतून मिळण्याचे काहीच साधन नव्हते. आमच्या समजुतीप्रमाणे टिळकांच्या गीतारहस्याचा अभ्यासी विद्यार्थ्याला मुख्य उपयोग असला तर त्यात सोपी परिचित परिभाषा योजून तुलनात्मक पद्धतीने पाश्चात्य तत्त्वज्ञानाचे सार टिळकानी उपलब्ध करून दिले हाच होय. तत्त्वज्ञान या शब्दाचा थोडासा आणखी खुलासा करणे जरूर आहे. आमच्या इकडील वेदांत हेहि तत्त्वज्ञानच होय. परंतु वेदांत शास्त्रात नीतिशास्त्राचा अंतर्भाव नाही. नीतिशास्त्राचा अंतर्भाव आमच्या इकडे धर्म शास्त्रात होत असल्या कारणाने आमचे स्मृतिग्रंथ हेच मुख्य नीतिग्रंथ होत.

पण स्मृतिग्रंथात विधि नियम परिसंख्या अशा प्रकारानी फक्त आचरणाचे ठराविक नियम सांगितलेले असतात. त्यात कर्तव्याकर्तव्याची विचिकित्सा नसते. स्मृतिग्रंथावरील टीकांचाहि उद्देश ही विचिकित्सा करण्याचा नसून फक्त शब्दार्थ स्पष्ट व सुसंगत करून देण्याचा असतो. दुसरे पक्षी वेदांत शास्त्र घेतले तर त्यात जीवात्मा व परमात्मा यांचे स्वरूप व परस्पर संबंध इतक्यापुरताच मुख्य

विचार असतो. परंतु जीवात्मा धारण करणाऱ्या देही जीवानी प्रत्यक्ष सृष्टीत कसे वागावे याविषयी गमक मिळत नाही. अर्थात् येथेहि कर्तव्याकर्तव्याची विचिकित्सा संभवत नाही. म्हणून नीतिशास्त्ररूप तत्त्वज्ञान आमच्या सनातन धार्मिक वाङ्मयातून काढावयाचे तर त्याला भगवद्गीतेसारखा दुसरा ग्रंथ मिळणे शक्य नाही. कारण तीत वेदांत हा उपपत्तीदाखल किंवा शास्त्रादाखल येऊन प्रत्यक्ष व्यवहारासंबंधीच्या नियमांचे दिग्दर्शन कर्मयोगाच्या विवेचनात दिलेले आहे. गीतेत Theory व Practice, Science व Art किंवा शास्त्र व व्यवहार यांचा एकत्र विचार अशा रीतीने केलेला सांपडतो की जो नुसत्या वेदांतात सांपडत नाही व नुसत्या स्मृतिग्रंथातहि सापडत नाही. टिळकानी गीतेला जे महत्त्व दिले ते याच कारणाकरिता व गीता म्हणजे नीतिशास्त्र असे जे वर्णन टिळकानी पदोपदी केले आहे त्याचे कारण हेच होय. पण नीतिशास्त्र हा तत्त्वज्ञानाच्या अनेक भागापैकी एक भाग होय. म्हणून सामान्यतः तत्त्वज्ञानाचा विषय गीतेतील नीतिशास्त्र समजून सांगताना आधी मांडणे अवश्य. याकरिता प्रस्तावनेत टिळकानी तो मांडला आहे.

पण त्याना हेहि माहित होते की आपल्या इकडील सुशिक्षित लोकांचे मन असे तयार होऊन बसलेले आहे की त्याना तो युरोपियन तत्त्वज्ञानाच्या पद्धतीने किंबहुना परिभाषेने सांगितल्याशिवाय त्यांची समजूत पडणार नाही व समजूत पडली तरी मनाचे समाधान होणार नाही. पाश्चात्य तत्त्वज्ञानाने त्यांच्या मनावर तशी छापच पडलेली आहे व ती काही अंशी सकारणहि आहे. का की तत्त्वज्ञानविषयक संशोधन चिकित्सा व सिद्धान्त ग्रंथाची उत्पत्ति या गोष्टी युरोपात व अमेरिकेत सारख्या वाढत्या प्रमाणावर सुरू आहेत. आणि आमचेकडे खास आमच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास खुंटलेला असून तो इतका मागे पडलेला आहे की विद्यामंदिराच्या तळघरातच त्याला हुडकावे लागेल. पण टिळकांचा आत्मविश्वास असा की समजून सांगणारा नीट मांडून दाखविणारा चतुर विचिकित्सक भेटल्यास त्याला गीतेतील नीतिशास्त्र पाश्चात्य नीतिशास्त्राच्या बरोबरीचेच काय पण काही दृष्टीने श्रेष्ठ आहे असे सिद्ध करता येईल! कार्याकार्यव्यवस्थेच्या विचारप्रसंगी आमच्या लोकानी युरोपियन पंडितांच्या ओंजळीने काय म्हणून पाणी प्यावे? 'आमचेच पण कळेल तेव्हा' अशी स्थिति असल्यामुळे जे कळेल ते तरी आपण कळवू अशी उमेद टिळकाना मनातून वाटत होती. म्हणून सवड सापडताच त्यानी ती गोष्ट करून टाकिली.

मनुष्य ज्या वृत्तीचा असेल त्या वृत्तीत विशेषतः आपत्तीत व संकटात, त्याला आधार देणे हाच सनातन धर्मीय वाङ्मयाचा व शब्दप्रामाण्यबुद्धीचा एक मोठा उपयोग आहे हे पूर्वी सांगितलेच आहे. आणि टिळकांची वृत्ति उद्योगशील संकटात न डगमगणारी आपत्तीशी झगडणारी अडचणीतून कुशाग्र बुद्धीने व कार्यकुशलतेने मार्ग काढणारी असल्यामुळे, चालू राजकारणाच्या झगड्यात व एकंदर जीवनकलहात हिंदु लोकाना प्रवृत्तिधर्मच शिकविला पाहिजे असे

त्यांच्या मनाने घेतले. 'पण प्रवृत्ति धर्म हा चांगला असला तरी तो सांगणारे टिळक कोण ? त्याना काय अधिकार ? या कामी खरा अधिकार पुरातन धर्म ग्रन्थांचा आहे.' व त्यांतून सशास्त्र उपपत्ति काढून दाखविली तरच ती लोकाना पटेल. म्हणून टिळकाना गीतेवर मराठीत भाष्य लिहावे लागले. "हे भाष्य त्यानी केवळ आचार्य म्हणवून घेण्याकरिता लिहिले. लोकमान्यतेच्या बिरुदावळीत ही एक वाण होती ती भरून काढण्याकरिता लिहिले. आपल्या पैलुदार बुद्धिमत्तेचे प्रदर्शन करण्याकरिता हे नीतिशास्त्राचे कोंबडे उगाच सजवून मांडले" असे आक्षेप काही लोकानी काढल्याचे वर सांगितलेच आहे. पण खऱ्या सहृदय मनुष्याला गीता रहस्याचा हा उगम पटणार नाही. त्याच्या हे तेव्हाच लक्षात येईल की सहा वर्षे काळेपाण्याची शिक्षा भोगणारा मनुष्य बंदिवासात अहंकारबुद्धीने प्रेरित होण्या-पेक्षा, तो आत्मौपम्य बुद्धीने तशाच प्रकारच्या आपत्तीत सापडलेल्या तुरुंगातल्याच काय पण तुरुंगाबाहेरच्याहि आपल्या देशी बान्धवाना मार्गदर्शक असे काही तरी सांगावे या सद्भावनेनेच प्रेरित होण्याचा संभव अधिक. उद्या गीतारहस्य ग्रन्थ छापला म्हणजे "केवढा हा ग्रन्थ टिळकानी तुरुंगात लिहिला असे म्हणून आमचे लोक वाहवा करतील" असला क्षुद्र विचारच टिळकांच्या मनात आला असेल काय ? किंवा हिंदुस्थानात एक प्रकारचे रणक्षेत्रच सजून व गजबजून राहिलेले आहे, या रणक्षेत्राच्या अनेक भागात सरकार व प्रजा यांच्यामध्ये विविध प्रकारचे युद्ध सुरू आहे, काल सरकारला अनकूल आहे, विषाद व उदासीनता वाढण्याची सर्व कारणे लोकांच्या बाजूला आहेत, व राजनीतीचे शौर्य किंवा पराक्रम अंगी नसल्या-कारणाने प्रजा या राजकारणाच्या युद्धात पडण्याला कचरण्याचा संभव आहे, या सर्व गोष्टी लक्षात घेता त्यांचे खरे कर्तव्य कोणते व ते कशा बुद्धीने त्यानी करावे हे सांगणे हेच आपले कर्तव्य होय असे टिळकाना वाटले असेल ? या दोहोपैकी कोणती कल्पना अधिक ग्राह्य हे वाचकांच्या सहृदयतेवरच अवलंबून राहील.

# भाग ८

## राजकारणाचे मार्ग व अत्याचार

टिळकांच्या राजकारणाचा व्याप मोठा. त्यांचा लोकसंग्रह मोठा. आणि चळवळीची तीव्रता कायदेशीरपणाच्या मर्यादेला थेट जाऊन भिडलेली. यामुळे त्यांच्या साधनासंबंधाने अगर मार्गासंबंधाने शत्रूच्याच काय पण मित्रांच्याहि कल्पना सोळा आणे स्पष्ट नसाव्या यात आश्चर्य नाही. पाहणाराला केव्हा ते जहाल केव्हा ते मवाळ केव्हा कायद्याबद्दल आदर बाळगणारे तर केव्हा कायद्याला झुगारून देणारे केव्हा सनदशीरपणाचे भोक्ते तर केव्हा बंडखोरीचे गुण आळविणारे असे दिसत. पण एकाच स्वभावाची ती निरनिराळ्या प्रकारची दृश्ये होती. आंतून प्रतिष्ठित–प्रज्ञ व सुस्थिर धोरणाचे असता टिळकांची स्वरूपे इतक्या निरानिराळ्या प्रकारची दिसत याचे कारण ज्या ज्या विशेष प्रसंगी त्यांच्या विशेष भावनांचा आविर्भाव तीव्रतेने दिसत असे त्या त्या विशेष प्रसंगी त्यांचे विचार त्यांची वागणूक त्यांचे लिहिणे त्यांचे बोलणे हे एकाच कल्पनेभोंवती फिरते राही. यामुळे त्या कल्पनेचे ते एकनिष्ठ उपासक असा भास होई. पण हे आविर्भाव नैमित्तिक म्हणून काही मर्यादित काल टिकणारेच असत. त्या आविर्भावांवरून नित्य स्वरूपाच्या अशा त्यांच्या धोरणाची कल्पना बांधणे चुकीचे होते. व ही चूक ज्यांची झाली त्यांच्या हातून टिळकाना परस्पर विरोधी अशी निरनिराळी विशेषणे मिळाली. पण त्यांचे नित्य स्वरूपाचे धोरण काय होते याचा निर्णय नैमित्तिक प्रसंगावरून होण्यासारखा नव्हता तर त्यांच्या एकंदर चारित्र्याचे सामग्र्याने अवलोकन करणारालाच देता येईल. व तो निर्णय हाच की टिळकांचे नित्यस्वरूपाचे राजकारण हे *कायदेशीर व सनदशीर असून दांडगाई उद्धटपणा हुल्लड शारिरीक प्रतिकार भाषेचा अत्याचार धाडस धोका सोसण्याची तयारी कायदेभंग बंडखोरी या गोष्टी* त्यांच्यासंबंधी नैमित्तिक या सदराखालीच पडतात. टिळक बंडखोर नव्हते अराजक नव्हते अत्याचारी नव्हते असे असताहि त्यांचे वर्तन प्रसंगविशेषी इतके बाणेदार तेजस्वी व धडाडीचे असे की त्यामुळे प्रतिपक्षाला व सरकारालाहि ते काय करतील अशाविषयी एक प्रकारची दशहत बसे!

### ( १ ) टिळकांचा जाहीरनामा

१९१५ साली टिळकानी आपल्या धोरणाचा जो जाहीरनामा काढला त्यात अत्याचारी वर्गाची निंदा किंवा सनदशीर मार्गानी जाणाऱ्या वर्गाची स्तुति विशेष रीतीने करण्याचा त्यांचा हेतू दिसत नाही. तर सर्वसाधारण रीत्या देशात चळवळीचे धोरण काय असले पाहिजे हे दर्शविण्याचाच दिसतो. सहा वर्षांनी परत येऊन पाहतात तो त्याना १९०८ तली सर्व स्थिति बदलून क्षीणतेची शांतता देशावर

पसरलेली होती असे दिसले. ज्या गोष्टी होऊ नयेत त्या झाल्या व ज्या होणे अवश्य होत्या त्या झाल्या नाहीत. जॅक्सनसाहेबाच्या खुनाची बातमी परत आल्यावर त्याना कळली. ती ऐकून त्याना मनापासून वाईट वाटले असेल याविषयी कोणीच शंका घेणार नाही. जॅक्सनसाहेबांचा अधिकारी या नात्याने दुर्लौकिक नव्हता हे त्याना माहित होते. इतकेच नव्हे तर ते शांत स्वभावाचे सात्त्विकवृत्तीचे, आणि त्याहिपेक्षा टिळकासारख्याना विशेष सादरसहानुभूति वाटण्याचे कारण म्हटले म्हणजे ते अखंड विद्याव्यासंगी व संस्कृत पंडित होते. अर्थात् त्यांच्या खुनाला त्यांच्याविषयी राग किंवा अप्रीति वाटण्यासारखी पार्श्वभूमिका मुळीच नव्हती. आणि ज्या मुलाने खून केला तो कोण कसा होता हे जेव्हा टिळकाना कळले असेल तेव्हा दैवाच्या विपरीत लीलेचा त्याना अचंबाच वाटला असला पाहिजे.

चाफेकरानी रँडसाहेबांचा खून केला तो वध व गुन्हा या दोन्ही दृष्टीनी अनिष्ट असला तरी, शिस्तीच्या नावाखाली का होईना पण रँडसाहेबानी केलेला जुलूम पाच सहा महिने गाजत होता. व सहेतुक नसले किंवा अजाणता असले तरी त्यांच्या कारकीर्दीने अनेक लोकाना पीडा झाली होती. शिवाय प्लेगच्या जुलुमाविरुद्ध अत्याचाराचा प्रतिकार एकट्या पुण्यासच झाला असे नव्हे. तर सिन्नर मुंबई तसेच इतर अनेक ठिकाणी दंगे होऊन खून पडले होते. अशा गोष्टींचे तारतम्य टिळकाना कळत नव्हते असे नाही. तात्पर्य कोणी काही तरी केले आणि काही तरी झाले व दडपशाहीचे पाऊल मात्र पुढे पडले या गोष्टीचे त्याना मनापासून वाईट वाटत असले पाहिजे हे कोणीहि कबूल करील. आणि ज्या गोष्टी होत राहाव्या अशी त्यांची इच्छा त्या होत नव्हत्या हे पाहूनहि टिळकाना तितकेच वाईट वाटले असले पाहिजे.

कारण प्रत्यक्ष स्थिति काय होती ती पाहा. नेमस्त फुटून निघाले व त्यानी आपली कॉंग्रेस आपल्या मते सुरक्षित केली. पण तिचा प्रवाह उन्हाळ्यातील नदीप्रमाणे तेज व बळ यानी अगदी सूक्ष्म झाला होता. राष्ट्रीय पक्षाने स्वतःची कॉंग्रेस भरविण्याचा प्रयत्न केला ती सरकारी हुकुमाने बंद पडली. आणि इतर परिषदा व सभा या बंद पडून एकंदर नित्य राजकीय चळवळीला उन्हाळ्यात नदीला खांडवे पडतात तसे खांडवे पडले. प्रेस–ॲक्टाने वर्तमानपत्रांचे जीव संकटात घातले आणि लोकमत स्पष्ट रीतीने प्रगट होण्याचा तोहि मार्ग निरुंद झाला. ही एकंदर स्थिति पाहून प्रवृत्तिमार्गी टिळकाना किती वाईट वाटले असेल याची कोणालाहि कल्पना करता येईल.

धड हेहि नाही धड तेहि नाही मिळून जाग्यावर काहीच नाही-अशी राजकारणाची एकंदर स्थिति झाली. अशा रीतीने पुढे कोरी पाटी आल्यावर त्यावर जवळ जवळ श्रीगणेशाच लिहावयास पाहिजे होता. आणि राजकारणात श्रीगणेशा म्हणजे कायदेशीर सनदशीर चळवळ हाच होय. मनुष्यवृत्तिप्रमाणे राष्ट्रहि विशेष निमित्ताने रागाऊ शकेल. पण राग हे काही मनःस्थितीचे नित्य स्वरूप नव्हे. म्हणून बंगालची फाळणी प्लेगचा जुलूम असल्या गोष्टीनी

कोणत्याहि जिवंत समाजाला काही काळ राग येणे स्वाभाविक हे जरी टिळकाना मान्य होते तरी नित्यप्रवृत्तीचे ते लक्षण नव्हे हेच त्यांचे स्वतःचे पूर्वचरित्र दाखविते. झोपेतून मनुष्य जागा झाला तर त्याची मनःस्थिति प्रथम तरी समाधानाची व शांतवृत्तीची असते. सहा वर्षांच्या निद्रेतून टिळक परत आले व रिप वॅन विंकलप्रमाणे त्याना आपला जुना समाज व जुने राष्ट्र ओळखू न येण्यासारखे दिसले तेव्हा त्यांची प्रथमची वृत्ति झोपेतून उठलेला मनुष्य जसा हळूहळू पावले टाकीत चालतो व आजूबाजूला बघत जातो तशी झाली असल्यास नवल नाही. समाजाने तेज किंवा ओज दाखवावयाचे त्याला झाले तरी नैमित्तिक क्षोभ व त्यातूनहि राष्ट्रात जवळजवळ ऐकमत्य असावे लागते ही गोष्ट त्यांच्या मनाला नेहमी पटलेली असे. जहाल लोकांच्या भूमिकेवर नेमस्तांचे शहाणपण व मुत्सद्दीगिरी खुलून दिसो, किंवा नेमस्तांच्या भूमिकेवर राष्ट्रीय पक्षाचा स्वार्थत्याग व तेज खुलून दिसो. पण तापत्यावरील रंग चकाकण्याला जसे दोन रंगाचे धागे म्हणजे एक रेशीम व एक सूत यांचा एकजीव होऊन अखंड वस्त्र बनावे लागते, त्याप्रमाणे त्रिगुणात्मक गुणांच्या विलासाचे कौतुक, स्वकीयाना काय किंवा परकीयाना काय, वाटावयाचे तर त्रिगुणात्मक गुणांचा समाज एकजीव व एकाच कार्यात प्रवृत्त असला पाहिजे असे त्यांचे मत असे.

शिवाय महायुद्ध सुरू झाले होते त्यामुळे तर टिळकाना दिसून आले असले पाहिजे की नेहमीच्या धोरणापेक्षाहि प्रजेने यावेळी सरकारशी थोडे अधिक सामोपचाराने वागणे हेच श्रेयस्कर. सरकार अडचणीत सांपडले याचा फायदा तामसीवृत्तिपेक्षा राजसवृत्तीच अधिक मिळवील असे त्यांच्या कार्यकुशल मनाला वाटले असले पाहिजे. तिकडे महायुद्ध पुकारले गेले असता इकडे बंड यशस्वी होण्याची आशा असती तर एक गोष्ट वेगळी होती. पण ती आशा टिळकानाच काय पण कोणत्याहि प्रांतातील अत्याचारीवर्गालाहि वाटत नव्हती. उलट कोठे तशा प्रकारची थोडीशी हालचाल झाली तर, ज्यानी आपल्या स्वतःच्या देशात डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्ट लावून अधिकारीवर्गाला बेसुमार अधिकार दिले ते लोक इकडे युद्धाच्या निमित्ताने तसेच अधिकार नोकरशाहीला देणार हे उघड होते.

*टिळकानी यावेळी महायुद्धाचा फायदा घेऊन एखाद्या बंडाचे पुढारी व्हावयास* पाहिजे होते असे एका दोघा 'शहाण्या' विद्वानांचे मत असल्याचे आम्हाला ठाऊक आहे. पण खोलीत बसून कल्पनेचे तारे तोडणाऱ्यांचे ते विचार होते. स्वतः त्यांचे धैर्य पाहिले तर इतके होते की चुकून मोकळेपणाने सरकाराविरुद्ध लिहिलेले त्यांचे एक दोन कागद दुसऱ्याच्या हाती राहिले ते परत मागण्याकरिता त्यानी जिवाचे रान केले आणि ते कागद जाळले गेले असे जेव्हा त्याना कळले तेव्हा त्यांचा जीव थंडा झाला! देशात बंड शक्य आहे की नाही याचा खरा अंदाज अशा लेखनीपंडितांच्या अभिप्रायापेक्षा ज्यानी तामसीवृत्तीची का होईना पण काहीतरी धाडसाची कृत्ये केली होती व आपला जीव धोक्यात घालून दाख-

विला होता त्यांच्या अभिप्रायावरूनच करावा लागला असता. आणि अशाहि लोकानी मनाने व कृतीने कबुली दिली होती की फुटकळ अत्याचारी कृत्यानी दहापाच लोकांच्या तेजस्वी वृत्तीचे समाधान होत असले तरी एकंदर समाजाला उपदेशण्यासारखा तो मार्ग नव्हे कारण तो त्याला झेपण्यासारखा नाही.

किंबहुना आज एकान्तिक अनत्याचाराच्या उपदेशाविषयी राष्ट्राचा जो अभिप्राय तोच त्या पूर्वीच्या दहा पाच वर्षातील अत्याचाराच्या उपदेशाविषयीहि होता. उगाच तात्त्विक दृष्टया बोलावयाचे किंवा नुसती बोलण्याची हौस फेडावयाची तर एखाद्या वाक्पंडिताला असे म्हणता आले असते की, "देशात गोरा शिपाई एकहि उरला नाही, काळे सैन्यहि परदेशात पाठविण्यात आले, यापेक्षा बंड करण्याला अधिक सोयीची संधि दुसरी कोणती मिळणार!" पण बंड हे तोंडाने होत नसते किंबहुना निःशस्त्र प्रजेच्या मनानेहि होत नसते. १८५७चे बंड झाले ते ज्यांच्या हातात हत्यारे व लष्करी सामुग्री मिळाली होती त्यानी केले. ते शिपायांचे बंड होते नागरिकांचे नव्हते ही गोष्ट कोणालाहि माहीत आहे. त्या सशस्त्र बंडखोर शिपायाना नागरिक साहाय्य झाले असते व संस्थानिक अनुकूल असते तर बंड यशस्वी होण्याचा थोडा तरी संभव होता असे म्हणता येईल. पण त्यावेळचे सैन्य आज जागेवर नाही. संस्थानिकांची तेव्हाची मनोवृत्तीहि आज नाही. आणि नागरिक तर जुनी राज्ये मोडून इंग्रजांच्या हाती गेली त्यावेळी होते तसेच ते आज. किंबहुना जुन्या स्वराज्याची आठवणहि विसरलेले. भौतिक सुधारणानी अधिक सुखावलेले. चैनीच्याच काय पण आवश्यक परदेशी वस्तूंनी घेरलेले. पिढ्यानपिढ्या तेजोहीन झालेले. आणि पूर्वीहून अधिक निःशस्त्र बनलेले. अर्थात् महायुद्धाचा फायदा घेऊन बंड करावे हे म्हणणे लहरी तर्कटी विक्षिप्त लोकाशिवाय इतर कोणालाहि पटण्यासारखे नव्हते. येऊन जाऊन उरला मार्ग मामुली राजकारणाचा. पण त्यातहि यावेळी सामोपचारानेच अधिक लाभ होण्यासारखा असे टिळकांच्या धूर्त बुद्धीला दिसत होते.

याची कारणे आमच्यामते उघड आहेत. बंगालची फाळणी रद्द होऊन बंगाल थंड पडला होता. ज्याच्याशी सहानुभूति दाखविण्याकरिता म्हणून इतर प्रांतात तेव्हा चळवळ झाली त्या प्रांताचाच राग शांत झाला व गाऱ्हाणे मिटले असे झाल्यावर, स्वतःचे तसेच काही गाऱ्हाणे असल्याशिवाय शिळ्या कढीला ऊत आणून कसा येणार ? बहिष्काराची चळवळ तेव्हांहि सार्वत्रिक नव्हती व होती तीहि थंडावली होती. राष्ट्रीय शिक्षण बंगाल्यात फार पुढे गेले नव्हते. आणि इकडे वऱ्हाडांत नुसत्या धाकदपटशाने आणि मुंबई इलाख्यात समित्यांचा कायदा लावून सरकाराने बंद केले होते. तात्पर्य १९०७–०८ साली क्षोभाची जी कारणे होती ती टिळकांच्या सुटकेच्या वेळॉ कमी झाली होती. येऊन जाऊन चतुःसूत्री पैकी स्वराज्याचे ध्येय हे उरले होते. पण टिळकानी या जाहीरनाम्यांत ते सोडून दिले नव्हते इतकेच नव्हे तर स्पष्ट उच्चारून दृढच केले होते. नुसते

स्वराज्य द्या असे म्हणण्यापेक्षा आम्ही युद्धात मदत केली आहे म्हणून द्या, हे सहजच अधिक सयुक्तिक ठरणारे होते. याकरिता कलकत्त्याच्या चतुःसूत्रींतील स्वराज्याचे सूत्र तेवढे अखंड राखून बाकीची सूत्रे त्यानी आवरून प्रसंगावधानाच्या कांडीभोंवती गुंडाळून ठेवली होती. १९०६ साली देखील ते अत्याचाराचा उपदेश करीत नव्हते हे नाशिक व बेळगावच्या पुराव्यावरून सिद्ध होत असल्याचे आम्ही पूर्वीच दर्शविले आहे. मग जे टिळक क्षोभाच्या उत्कट स्थितीत व चळवळीच्या ऐन जोरात अत्याचाराविरुद्ध बोलत होते ते मंडालेहून परत आल्यावर वरच्या-सारख्या बदललेल्या परिस्थितीत त्याचा उपदेशच नव्हे तर मनात विचारहि कर-णार नाहीत ही गोष्ट स्वाभाविक होय.

जॅक्सन साहेबांचा खून आणि बारा पिस्तुलांचा खेदास्पद इतिहास लक्षात घेऊ-नच त्यानी अत्याचारांचा निषेध केला असला पाहिजे. हा खून व हा इतिहास न घडता व महायुद्धाची एक वेगळ्या प्रकारची संधि न येती तर टिळक जाहीरनाम्यात अत्या-चारांचा निषेध अशा रीतीने नच करते. पण परिस्थितिच अशी होऊन बसली की त्याना आपली खरी तत्त्वे प्रगट करणे भाग पडले. जो तो आपल्या स्वभावा-नुसार वर्तत असल्यामुळे कोणाचा कोणाला व्यक्तिशः निषेध करण्याचा अधिकार नाही असेच टिळकांचे सामान्य मत होते. एखाद्याने चुकीने का होईना पण देशाकरिता कोणत्याहि प्रकारचा स्वार्थत्याग केला तर निंदेने त्याला दुखवावयाचे नाही असेच त्यांचे नेहमीचे धोरण होते. आणि या जाहीरनाम्यात अत्याचाराचा निषेध करतानाहि अशा कोणा व्यक्तीची निंदा करणे त्यांच्या मनात नव्हते, तर हिंदुस्थानात राजकारणी पुरुषांचे धोरण सामान्यतः व या विशेष प्रसंगी काय असावे हेंच त्याना विशेषतः सांगावयाचे होते. बरे, एखाद्या अत्याचारी देशभक्ताला जाहीरनाम्यातील या निषेधाचे वाईट वाटले असे घेऊन चालले तरी त्याचा तरी टिळ-कांवर असा काय शक होता की योग्य वाटल्यास टिळकानी त्याचा निषेध करू नये ? त्याला टिळकानी अशी काय भर दिली होती व व्यक्तिशः उत्तेजन दिले होते की त्याची भीड किंवा भीति टिळकानी मानावी ? एखादी गोष्ट एखाद्याला कर म्हणून सांगितले तरच त्यामुळे त्याचा निषेध करण्याच्या कामी मिंधेपणा येतो कारण गोष्ट करावयाला सांगून वरती निषेध करणे हे अधमपणाचे ठरते. तसेच भ्याड लोक जो निषेध करतात तसाहि टिळकांचा होता असे म्हणता येत नाही. त्यांच्यावर इतर दोषारोप केले गेले पण टिळक भिले असे कोणी कधीच म्हटले नाही. ते एकदा सोडून तीनदा तुरुंगात जाऊन आले होते व या शेवटल्या वेळी तर पूर्ण सहा वर्षे. म्हणून टिळकाना अत्याचारीपणा वाईट असे म्हणावयाचे असल्यास कोणाच्या देवाचीहि भीति नव्हती.

## ( २ ) कडक टीका हा अत्याचाराचा उपदेश नव्हे

त्यांना मनात तसे खरोखर वाटत नसते तर त्यानी तसे बोलावे याला काही कारण नव्हते. टिळक सरकारावर कडक टीका करीत टाकून बोलत हे सगळे खरे असले तरी त्यांच्या लेखात किंवा भाषणात अत्याचाराचा उपदेश कोणा सहि काढून दाखविता येणार नाही. म्हणजे प्रगट तर नव्हेच पण प्रच्छन्नहि नाही. येऊन जाऊन दोन खटल्यातील झालेल्या शिक्षेवरून तसे कोणी अनुमान काढील तर त्याला इतकेच म्हणावयाचे की खटले कोणत्या परिस्थितीत झाले व टिळकाना कोणाच्या बहुमताने दोषी ठरविण्यात आले हे प्रसिद्धच आहे. सरकाराने टिळकाविषयी काय म्हटले किंवा अँग्लोइंडियनानी काय म्हटले या दृष्टीने या चर्चेच्या प्रसंगी आपणास पाहावयाचे नाही. तर सुज्ञ जनता काय म्हणते या दृष्टीने पाहावयाचे आहे. ज्या लेखाकरिता १८९७ चा खटला टिळकांवर झाला ते लेख किंवा टिळक हे अत्याचारी आहेत असे लोकाना वाटते तर त्यांच्याकरिता जाहीररीतीने एवढा डिफेन्स–फंड झालाच नसता. किंवा रँडसाहेबांच्या खुनात टिळकांचे अंग आहे असा कोणास संशय असता तरीहि एवढा फंड जमला नसता व त्यात नेमस्त लोकानी वर्गणी दिली ती तरी दिली नसती. १८९७ च्या खटल्यातील लेखाना सदभिरुचिच्या दृष्टीने कोणी नावे ठेवो किंवा त्याना ग्राम्य अथवा फाजील भावनाप्रधान म्हणो. परंतु ते अत्याचारप्रवर्तक असे कोणीच म्हटले नाही. दुसऱ्या खटल्याच्या वेळी थोडे दुमत होते. व दुमतापेक्षाहि भीति अधिक होती. तथापि नुसते दुमत म्हटले तरी मुद्द्याची एक गोष्ट लोकाना माहीत होती की, पहिल्या लेखात नाव ठेवण्यासारखे काहीच नव्हते व दुसरा लेख १८९७ च्या लेखाप्रमाणेच स्वतः टिळकानी लिहिलेला नव्हता. सरकारी खटल्यात ही गोष्ट पुढे कशी येणार ? व सरकारास ती कदाचित् माहीत असली तरी ते टिळकाना काय म्हणून सोडतील ?

पण फिरून हेच सांगतो की ही चर्चा आम्ही सरकारच्या दृष्टीने करीत नाही तर लोकांच्या दृष्टीने करतो. म्हणून लोकांच्याच दृष्टीने असे म्हणतो की दोन वेळा टिळकाना शिक्षा झाली येवढ्यावरून ते अत्याचारी असे कोणासहि म्हणता येणार नाही. स्वतः त्यांचा असा लेख किंवा त्यांचे असे भाषण दाखलच नाही की ज्यात त्यानी लोकाना अत्याचाराचा उपदेश केला आहे. तसे असते तर सरकार त्याकरिता खटला केल्याशिवाय कधीच न सोडते. व ज्याकरिता खटले झाले ते लेख त्यांचे नव्हते. टिळकांच्या लेखातले किंवा भाषणातले एखादे वाक्य अत्याचाराच्या दृष्टीने कडकपणाचे म्हणून काढून दाखविले तर तशी वाक्ये इतर पुष्कळांच्या फार काय पण कित्येक नेमस्तांच्याहि भाषणातून व लेखातून काढून दाखविता येतील. दिनशा वाच्छा हे आता नेमस्त गणले जातात पण त्यांचे पूर्वीचे लेख कोणीहि काढून पाहावे. कडक लिहिणे बोलणे हा त्यांचा हात-

खंडा होता. डॉ. राशबिहारी घोस हे नेमस्त पण 'सिडिशिअस मीटिंग्स बिला'चे वेळी त्यानी भर कौन्सिलात सरकारला बजावले की, "सांभाळा अशाने तुम्ही हिंदुस्थानाला आयर्लंड बनवाल." येथे त्यानी 'आयर्लंड' हा शब्द कोणत्या अर्थाने वापरला? राजनिष्ठेचे गाणे गाणाऱ्या बेलफास्टमधील लोकाना उद्देशून? किंवा सहकारितेची चळवळ करून आयर्लंडची सांपत्तिक सुधारणा करणाऱ्या सर होरेस प्लंकेटला उद्देशून? की शिक्षणाचा प्रसार करणाऱ्या रोमन कॅथोलिक पाद्रयाना उद्देशून? की कृषिशास्त्रात नव्या कल्पना काढून आयर्लंडच्या लोकाना दोन घास अधिक खावयाला मिळावे अशा सात्त्विक परोपकारकर्त्यांना उद्देशून? की ग्रॅटनसारख्या निवळ तरतरित वाक्पंडिताला उद्देशून? की आयझॅक बट सारख्या शुद्ध पार्लमेंटरी चळवळ करणाऱ्याला उद्देशून? की पार्नेलसारख्या लँडलीगची चळवळ करणाऱ्या इंग्रजद्वेष्ट्याला उद्देशून?

असे कितीहि प्रश्न विचारले तरी ते व्यर्थ होत. कारण त्यापैकी एकातूनहि खरे उत्तर मिळणार नाही. खरे उत्तर हेच की हिंदुस्थानाला तुम्ही दुसरा आयर्लंड बनवाल असे म्हणणाऱ्या डॉ. घोस यांच्या डोळ्यापुडे आयर्लंडातील अत्याचारी लोकच असले पाहिजेत. एका 'आयर्लंड' या शब्दात सरकारच्या डोळ्यापुढे त्या दुर्दैवी देशातील भांडखोरी जाळपोळ हाणामार खून या विविध अत्याचारांचेच शब्दचित्र डॉ. रासबिहारी याना ढळढळीतपणें उभे करावयाचे होते. मग त्याना अत्याचारप्रतर्वक का म्हणू नये? ते हे शब्द काही एकाद्या अधिकाऱ्याच्या कानात कुजबुजले नव्हते. त्यानी त्या शब्दांचा डंका भर कौन्सिलात उभे राहून वाजविला होता. सर्व देशातल्या वर्तमानपत्रानी ते भाषण छापले. बंगाल्यातील यच्चयावत् भावनाप्रधान तरुण लोकानी ते वाचले. बंगाल्यातील अत्याचारी लोकानी ते वाचले. मग ते भाषण काय फुकट गेले असेल? कल्पनाच करावयाची तर निदान चार दोन तरुण लोकांची तरी नाडी ते वाचून अधिक जलद चालू लागली नसेल काय? चार दोन लोकानी तरी पिस्तुलांची किंवा बॉंब गोळ्यांची उठाठेव केली नसेल काय? चार दोन लोकानी तरी पिस्तुले पैदा करण्याचा प्रयत्न केला नसेल काय? 'हिंदुस्थान आयर्लंड होईल सांभाळा' ही दहशत काय फुकटच गेली असेल? मग बोलण्याला अर्थच नाही म्हणावयाचा.

पण हे सर्व घडले असले तरी रासबिहारी याना कोणी अत्याचारप्रवर्तक म्हणत नाही. पेटलेल्या चुलीतील ठिणगी वाऱ्याने गंजीतल्या एखाद्या पेंढीवर जाऊन पडावयाचीच. पण ती पडली म्हणून स्वयंपाक्याला कोणी आगलाव्या म्हणत नाही. कारण तेथे तसा हेतू नाही. रासबिहारी घोस यानी आयर्लंडचे नाव घेतले तसेच इतर नेमस्तानी तीच गोष्ट अनेक वेळा पर्यायाने म्हटलेली आहे असे दाखवता येईल. कोणी म्हणतो "असंतोष माजेल." कोणी म्हणतो "असंतोष भुईत खोल जाईल." कोणी म्हणतो "परिणाम भयंकर होतील." पण सगळ्यांचा अर्थ एकच. तो हाच की, 'तुम्ही असे असे कराल तर लोक असे असे करतील,'

अमुकच व्यक्ति असे मात्र नव्हे. सरकारला उद्देशून नेमस्त कौन्सिलात हे बोलले म्हणून गावात ते कोणी ऐकले नाही असे झाले का ? आणि ज्यानी ज्यानी ते ऐकले त्या सर्वांच्याच कानावरून ते वाऱ्याच्या झुळुकेप्रमाणे निघून गेले काय ? कोणाच्याहि मनात ते शिरले नसेल ? कोणाच्याहि तामसी वृत्तीला त्याने यत्किंचितहि उत्तेजन दिले नसेल ? पण असे मानणे म्हणजे नेमस्तांची ती स्तुति होत नाही तर निंदा होते. मुद्दा हा की असले शब्द नेमस्त बोलले तर ते अत्याचारी ठरत नाहीत व टिळक तेवढे अत्याचारी ठरतात हे कसे ? ते कौन्सिलात एकदा बोलतात व टिळकाना दहा वेळा वर्तमानपत्रात लिहावे लागते किंवा दौऱ्यात व्याख्याने द्यावी लागतात. पण हेतूशिवाय अशा निव्वळ पुनरुक्तीने दोषारोप सिद्ध होत नाही. टिळकांचा धंदा वर्तमानपत्राचा व स्वीकारलेला उद्योग चळवळीचा म्हणून त्याना ही पुनरुक्ति करावीच लागत होती.

## ( ३ ) अत्याचारी लोक व टिळक

राहता एकच मुद्दा राहिला तो हा की अत्याचारी चळवळीत सापडलेले लोक नेमस्तांपेक्षा टिळकांच्या सान्निध्यात अधिक आढळत. काही अंशी ही गोष्ट खरी आहे. पण तिचाहि विचार थोडा सूक्ष्मपणानेच केला पाहिजे. पहिला विचार असा की जे असे लोक टिळकाना भेटत त्याना टिळक बोलावणे तर पाठवत नसतच. पण पुष्कळदा ते त्यांच्या परिचयाचेहि नसत. मग ते नेमस्ताकडे न जाता टिळकाकडेच का जात ? तर याचे उत्तर असे की टिळकांचे धैर्य टिळकांचे सरकारशी बाणेदार वर्तन टिळकांचा स्वार्थत्याग व टिळकांची राजकारणातील धडाडी हे त्यांचे गुण पाहून असले लोक मोहून जात. शिवाय स्वभावतः टिळक मनुष्यघाणे नव्हते. त्यांच्या घरी पहारा नव्हता. त्यांना व्हिझिटिंग कार्ड पाठवून भेटावे लागत नसे. किंवा आधी वेळ ठरवून मग जावे लागत नसे. आपला वेळ खर्चून प्रत्येकाचे ऐकून घेऊन त्याच्याशी शक्य तितके समरस होऊन व त्याच्याकरिता शक्य तितकी झीज सोसून टिळक त्यांजकडे जाणाराचे काम करीत म्हणूनच लोक त्यांजकडे जात. याविरुद्ध सर्व गुण ज्यांच्यामध्ये त्यांच्याकडे हे लोक कशाला जातील ? टिळकाना दोहोंच्या ऐवजी चार हात नव्हते किंवा त्यांच्या दिवसाचे तास चोविसाऐवजी अठ्ठेचाळीस नव्हते म्हणून लोकांचेहि काम करण्याला त्याना काही मर्यादा होत्या ही गोष्ट खरी. तरी पण पुष्कळ शिक्षितच काय पण अशिक्षित लोकानाहि असा आपल्या ठिकाणी दृढ विश्वास होता की आपण टिळकाकडे गेलो तर ते आपले काही तरी काम करतील. अर्थात् ज्या भावनेने संसारव्यवहारातील आर्त लोक टिळकांकडे जात त्याच भावनेने देशाभिमानी अत्याचारी लोक टिळकांकडे जात. पण स्वार्थी लोकांचे काम तडीस न्यावयाला जितकी मर्यादा होती तितकीच अत्याचारी लोकांचे काम होण्यालाहि. ही भावना टिळकांच्या लोकसंग्राहक बुद्धिमुळे व ते लोकसंग्रह करतात या कीर्तिमुळे उत्पन्न होत असे. कायद्याचा मुद्दा विचारायला कोणी गेला

तर टिळक लगेच उठून सगळे लॉरिपोर्टस् धुंडाळून त्याला काही आधार काढून देत नव्हते. तर संथपणे त्याची हकिकत ऐकून घेत व चांगलासा वकील पाहून त्याच्याकडे काम दे असे त्याला सांगून वाटेस लावीत. तशीच कल्पना त्याना कोणी अत्याचारी मनुष्य भेटावयाला गेला असताना टिळक कसे वागत असतील याबद्दल आपण केली पाहिजे. अर्जीवर विश्वास ठेवणारा मनुष्य जसा टिळकांकडे जाऊन कृतार्थ झालेसे वाटून येई तसेच अत्याचारी मनुष्यहि आपल्या स्वार्थत्यागी व देशाभिमानी वृत्तीचे कौतुक करणारा भेटला असे म्हणून कृतार्थ मानून परत येत असावा. नेमस्त लोकांकडेहि ते गेले असते पण काहींनी त्याना एकदम दरवाजा दाखविला असता व काहीनी त्याना कदाचित् पोलीसच्या स्वाधीन केले असते. मग ते त्यांच्याकडे कशाला जातील? आपले दुसऱ्याला न पटो, कदाचित् तो आपल्याला मोडूनहि काढो, पण आपले ऐकून घेतले आपल्याशी युक्तिवाद केला येवढ्यानेहि मनुष्याचे समाधान होत असते. व तितके समाधान अत्याचारी लोकाना टिळकांपासून मिळत असेल असे कोणी म्हटले तर ते मात्र योग्य होईल. पण या वरील सर्व विवेचनात अत्याचारी याचा अर्थ एखादा घातपात करून खासगी संरक्षणासाठी आलेला किंवा प्रत्यक्ष अत्याचाराच्या कृत्याला निघालेला असा घ्यावयाचा नाही. आणि खरे पाहिले असता असा मनुष्य दुसऱ्याकडे सहसा जातहि नाही. खरे कार्यप्रवण लोक दुसऱ्याचा सल्ला घेत बसत नसतात. आत्मस्फूर्ति हाच त्यांचा खरा गुरु असतो. आणि ज्यानी प्रत्यक्ष गुन्हा केला ते लोक पकडले तरी जातात किंवा दडून छपून बसतात किंवा देशत्याग करतात. टिळकांच्या घरच्यासारख्या खुल्या दरबाराला ते कशाला जातील? येऊन जाऊन तीव्र प्रतिकाराचा मार्ग हा देशसेवेचा एक मार्ग असे विचार ज्यांच्या डोक्यात घोळत असतील—म्हणजे जे अजून विचाराच्या विवेकाच्या सल्लामसलतीच्या युक्तिवादाच्या किंवा उपदेशाच्या कक्षेत असतील—असेच लोक कदाचित् टिळकाकडे जावयाचे. व असे लोक त्यांच्याकडे गेले असताना रजोगुणी व प्रवृत्तिमार्गी टिळक नित्य कर्माला महत्त्व देणारे टिळक त्याला अत्याचाराला प्रवृत्त न करता बहुधा निवृत्तच करीत असावेत असे अनुमान कोणीहि करील. हीच गोष्ट थोडीशी खुलासेवार सांगण्याकरिता अशा लोकाशी होणाऱ्या त्यांच्या संभाषणाचे एक वर्णन आम्ही खाली देतो. पण ते वास्तविक घडलेले असेहि आम्ही सांगत नाही किंवा निव्वळ काल्पनिक अशीहि खातरजमा आम्ही करीत नाही!

एके दिवशी परदेशाहून आलेला एक पाहुणा टिळकांकडे उतरण्याला आला. गावात कोणाची ओळख नाही आणि टिळक सर्वांचा परामर्ष घेणारे म्हणून तो त्यांच्याचकडे जाऊन उतरला. पाहुणा घरी आला तेव्हा यजमानाचे कर्तव्यच की त्याला उतरून घेऊन जेवावयाला घालावे. जेवणखाण झाल्यावर

स्वस्थपणे टिळकानी तुम्ही कोण कुठले वगैरे अधिक विचारपूस केली. तेव्हा खालील संभाषण झाले.

पाहुणा—मी गेली दोनतीन वर्षे युरोप अमेरिकेत गेलो होतो.

टिळक—कशाला गेला होतात ?

पाहुणा—काही नवीन उद्योग धंदा किंवा विद्या शिकावी म्हणून.

टिळक—मग काय काय शिकलात ?

पाहुणा—काही थोडी यंत्रकला शिकलो काही रसायनशास्त्र शिकलो.

टिळक—मग आता तुम्ही यापुढे काय करणार ?

पाहुणा—परत आपले गावी जाऊन किंवा इतर कोठे मिळविलेल्या विद्येचा उपयोग होतो का पाहून संसारयात्रा सुरू करणार.

टिळक—तुम्ही परदेशात आपल्या खर्चाने गेला होतात ? किंवा तेथे उद्योग धंदा शिकता शिकताच नोकरी वगैरे करून आपले पोटहि भरलेत ?

पाहुणा—केवळ स्वावलंबनाच्या तत्त्वावर मी विद्या शिकलो व उदरनिर्वाहहि केला.

टिळक—मग इतके दिवस तुम्ही परदेशात हिंडला फिरलात तेव्हा इकडच्या व तिकडच्या स्थितीत तुम्हाला काय अंतर दिसले ?

पाहुणा—अंतर हेच दिसले की आहे या स्थितीत आमच्या देशाला आणखी पाचशे वर्षे डोके वर काढण्याची आशा नको.

टिळक—पण तुम्ही गेलात ते देश आधीच स्वतंत्र व स्वराज्याचा उपभोग घेणारे असतील. हिंदुस्थानासारखे ते परकी लोकांच्या ताब्यात नसतील. तेव्हा आम्हाला वर येण्याला काही दिवस लागणारच.

पाहुणा—पण परकी देश झाले तरी ते पूर्वी केव्हा परतंत्र नव्हते असे नाही. त्याना आज स्वातंत्र्य आहे ते त्यानी स्वतः मिळविलेले आहे.

टिळक—ते कोणत्या उपायानी ?

पाहुणा—आपण असला प्रश्न कसा करता ? परतंत्र स्थितीत असता स्वातंत्र्य मिळविण्याचा मार्ग एकच. तो अर्ज विनंत्या हा नव्हे. तर स्वातंत्र्याकरिता प्राण देण्याला व प्राण घेण्याला तयार होणे हाच.

टिळक—तुम्ही स्वातंत्र्य म्हणता ते व्यक्तीचे की देशाचे ?

पाहुणा—प्राण देऊन किंवा घेऊन व्यक्तिस्वातंत्र्य मिळविणे ही सोपी गोष्ट आहे. पण माझ्या म्हणण्याचा रोख देशाच्या स्वातंत्र्याबद्दलच होता.

टिळक—तात्त्विकदृष्ट्या तुम्ही म्हणता हे बरोबर आहे व निरनिराळ्या देशांचा इतिहास पाहिला म्हणजे त्यात अशी एक पायरी कोठे तरी पायाला लागते ही गोष्ट खरी.

पाहुणा—म्हणूनच मी म्हणतो की तशी खटपट करून त्या पायरीपर्यंत मजल नेल्याशिवाय हिंदुस्थानचा तरणोपाय नाही.

टिळक—पण हिंदुस्थानच्या स्थितीसारखा देखावा तुम्हाला इतर कोणत्या देशात आढळला काय ?

पाहुणा—खरेच नाही. संख्येने इतके पुष्कळ लोक इतक्या थोड्या लोकांकडून आपल्यावर राज्य करून घेतात असा दाखला इतर ठिकाणी मिळणे शक्य नाही. आणि याच मुद्द्यावर तर जगातले लोक आम्हाला हंसतात !

टिळक—पण ज्या राष्ट्रानी बंडे करून स्वातंत्र्य मिळविले त्याना इतर एखाद्या राष्ट्राची तरी सहानुभूति नव्हती काय ? व त्या सहानुभूतिपूर्ण राष्ट्राकडून युद्धाची साधने मिळाली नव्हती काय ? उदाहरणार्थ इटलीला ऑस्ट्रियाविरुद्ध लढण्याच्या कामी फ्रान्सची मदत झाली. आज युरोपखंडात लहान सहान राष्ट्रे जिवंत आहेत ती इतर मदतगार राष्ट्रांच्या बळावरच नाहीत काय ? आयर्लंडला पूर्वी फ्रान्सची मदत झाली व अलीकडे अमेरिकेची झाली आहे. दुर्दैवाने हिंदुस्थानाला कोणत्याच राष्ट्राची आज तशी मदत नाही. म्हणून हिंदुस्थानच्या लोकानी बंड करण्याला तयार झाले तरी लढण्याची साधने कोठून मिळणार ?

पाहुणा—साधने मिळविण्याच्याच नादाला मनुष्य लागला म्हणजे त्याला ती मिळतात. हे पाहा.माझ्या ट्रंकेत मी सर्व अधिकाऱ्यांचा डोळा चुकवून एक पिस्तुल आणलेले आहे.

टिळक—पण हे मिळविण्याला तुम्हाला परदेशात जावे लागले तेव्हा तेथून तुम्ही ते आणले. तुम्हाला परदेशी जाऊन येण्याला खर्च किती लागला ?

पाहुणा—सुमारे तीन हजार रुपये.

टिळक—मग या पिस्तुलाची किंमत तीन हजार रुपये व शिवाय परदेशचा प्रवास हे ठरत नाही का ? असा खर्च करून प्रवास करणारे लोक हिंदुस्थानात किती ?

पाहुणा—पण सर्वांना काही असा खर्च आणि असा प्रवास करावा लागणार नाही. बंगाल्यात दरोडेखोराना पिस्तुले कशी मिळतात ? बंगाल्यातील अराजक चळवळीत किती तरी पिस्तुले बाहेर निघाली होती !

टिळक—पण इतकी पिस्तुले बाहेर पडून परिणाम काय झाला? हे पिस्तुलवाले घरच्या म्हातारीचेच काळ ठरले की नाही ? बंगाल्यातील दरोड्यांची वर्णने वाचली म्हणजे त्यात तरुण पिढीचे तेज चमकले असा सकृत्दर्शनी भास होतो. पण त्या दरोड्यांची वर्णने वाचली म्हणजे निरपराधी धनिक लोकांवर झालेल्या क्रूर अत्याचारांचीहि आठवण होते. ती विसरून कसे चालेल ? इतकी पिस्तुले बाहेर पडली म्हणता व जर्मनीतून युद्धाच्या वेळी कदाचित् कमीज्यास्त आलीहि असतील. पण स्पष्टच बोलावयाचे तर ज्यांच्यापासून स्वातंत्र्य मिळवावयाचे असे म्हणता अशा लोकांचे बळी किती घेतले गेले ? आमच्या इकडे एकदा १९०९ साली एक डझन पिस्तुले आली पण त्यांचा इतिहास काय झाला हे ऐकाल तर

त्या पिस्तुलानी स्वातंत्र्य मिळण्याला एक रतीभरहि साहाय्य झाले नाही. उलट अशा एका अधिकाऱ्याचा खून झाला की ज्याच्या मरणाने हळहळ वाटली नाही असा मनुष्य विरळा. पूर्वी बंडखोरीच्या कल्पनेला जो तात्त्विक तजेला होता तोहि या निव्वळ खेदकारक खुनाने जाऊन अशा मार्गाविषयी लोकांच्या मनात खंतीच उत्पन्न झाली.

पाहुणा—मग अशा पिस्तुलांचा काहीच उपयोग नाही असे म्हणता का?

टिळक—मी तसे म्हणत नाही. स्वाभिमानाचे संरक्षण करण्याचे प्रसंग हिंदी प्रजेवर अनेक वेळा येतात. अशा वेळी म्हणजे एखाद्या न्याय्य प्रसंगी सर्वांना खरोखर जुलुमी वाटणाऱ्या अधिकाऱ्याविरुद्ध, पण तेहि प्रत्यक्ष जुलुमाच्या कृत्यात प्रतिकार करताना, जर एखाद्या पिस्तुलाचा उपयोग झाला तर तो लोकाना पटेल. आणि मग पिस्तुल कोणी कसे मिळविले याचा विचार लोक करणार नाहीत.

पाहुणा—पण पिस्तुलाचे एक असो. इकडे लोकाना बाँबगोळे करता येऊ लागले होते त्याला तर परदेशी जाण्याचे कारण नाही ना?

टिळक—पण जो प्रश्न मी पिस्तुलाबद्दल विचारला तोच मला या बाँबसंबंधीहि विचारता येईल. जनरल डायर सारख्यावर कोणी तो फेकून दाखविला असता तर लोकाना त्याचे काही कौतुक वाटले असते. उलट लॉर्ड हार्डिज यांच्या सारख्या हिंदुस्थानाविषयी खरी सहानुभूति बाळगणाऱ्या व्हाईसरॉयवर तो टाकल्याने अद्भुतरस आळविणारी काही वर्णने लोकाना वर्तमानपत्रात वाचावयाला सांपडली पण सुज्ञ जनतेच्या मनावर त्याचा काय परिणाम झाला? याची काही कल्पना आहे काय? आणि मुझफरपूरच्या अत्याचारात तर बिचाऱ्या दोन गोऱ्या बायाच मेल्या! माझ्या म्हणण्याचा मुद्दा हाच की ज्या लोकांच्या हाती ही साधने जातात त्या सर्वांचेच शील चांगले असते असे नाही व शहाणपणा तर फार थोड्यांच्या ठिकाणी असतो. म्हणून त्याचा परिणाम विपरीत होतो.

पाहुणा—म्हणून सुशिक्षित लोकानीच या गोष्टी स्वतःच्या हाती घेतल्या पाहिजेत.

टिळक—पण त्यात अडचण ही की बंडाची कल्पना सुशिक्षिताला एक वेळ मानवते पण वैयक्तिक अत्याचार त्याला मानवत नाहीत. याला काय करणार?

पाहुणा—पण पाण्यात पडल्याशिवाय पोहता तरी कसे येणार? अंग भिजेल म्हणून पाण्यात पडावयाचे नाही. आणि पाण्यात पडल्याशिवाय पोहता यावयाचे नाही. एकदम प्रथमच पाण्यात पडलेला मनुष्य बुडतो. तो तेथे पोहायला शिकू शकत नाही.

टिळक—हे खरे आहे. पण बंडे ही तुम्ही सांगितलेल्या देशांतहि आकस्मिक उद्भवली? की पुढे केव्हातरी बंड करावयाचे म्हणून रोज त्यांची थोडथोडी कोणी तयारी करीत होते? १८५७ साली बंड झाले ते 'उद्भवले' असेच म्हणतात. ते आधी तयारी करून कोणी केले नव्हते. आणि जो नानासाहेब

पेशवा गोरे लोकाना मेजवान्या देण्यात व बॉलमध्ये नाचण्यात दंग असे असें म्हणतात तोच प्रसंग पडल्याबरोबर बंडवाल्यांचा पुढारी झाला की नाही ? झांशीच्या राणीचाहि इतिहास पाहाल तर तिने इंग्रज सरकारकडे अर्ज करण्याकरिता जितकी लेखणी झिजवली तितकी काही धार येण्याकरिता १८५७पर्यंत तरवार घासली नव्हती. पण प्रसंग आला तेव्हा ती वीरा ठरली की नाही ? इतिहासातील पुष्कळ बंडांचे असेच असते. ती 'उद्भवतात.' तुम्हाला मी दैववादी असा वाटेन—पण त्याना साधनेहि तशीच आयत्या वेळी तयार होतात. पाण्याचे बर्फ होतांना त्याची थंडी एकेक डिग्रीच्या क्रमाने कडेपर्यंत खाली येत नाही. तर काही एका मर्यादेला थंडपणा पोंचल्याबरोबर व धक्का लागल्याबरोबर 'क्रिस्टलायझेशन' होते. ज्याना तुम्ही बंडे म्हणता त्यांचा प्रकार बहुधा असाच असतो.

पाहुणा—तर मग दैवावर हवाला ठेवून नुसती वाटच बघत बसावयाची काय ?

टिळक—मुळीच नाही. प्रत्यक्ष बंडाच्या बाबतीत मी दैववादी असलो तरी त्याची मला जी तयारी म्हणून वाटते त्या बाबतीत मी पक्का उद्योगवादी आहे. माझ्या मते हल्लीच्या स्थितीत कधी काळी जे बंड होईल किंवा न होईल त्याची तयारी म्हणजे आजच्या आज पिस्तुले आणवून ती तरुण लोकात वाटून देणे किंवा बॉंबचे कारखाने काढणे ही नव्हे. तर सार्वत्रिक व सामुदायिक असंतोष उत्पन्न करणे ही होय. असंतोष हा शब्द सरकाराला वाईट लागो पण तो सर्वथा न्याय्य आहे. देशाच्या आजच्या स्थितीत आम्हाला असंतोष वाटू नये तर काय संतोष वाटावा ? पण तो असंतोष आजच्या घटकेला तरी काडी ओढून पेटविण्यासारखा नसावा तर पाणी तापवून हळूहळू ते अधिकाधिक उष्ण करण्यासारखा असावा. काडी पेटविल्याने हात भाजेल व लागलीच तर कोठे थोडीशी आग लागेल. तिने कदाचित् डोळे दिपले तरी काम होणार नाही. आग न लागता व डोळे न दिपता पाणी अधण येण्यापर्यंत तापविता येते व त्यानेच पाकनिष्पत्ति होते. आजच्या बंडाची माझी कल्पना इतकीच आहे की देशातील शक्य तितक्या अधिक लोकानी सकारण रीतीने असंतुष्ट बनावे, आणि जो लहानसहान स्वार्थत्याग करावा लागेल तो करण्याला शिकून ज्या ज्या ठिकाणी परकी राज्याच्या देहाचा स्पर्श होईल तेथे तेथे त्याच्या शक्तीचा प्रतिकार करावा. व्यक्तिपराक्रमाने व्यक्तिस्वभावाचे समाधान होते. उलट देशातील दहावीस लक्ष लोक लढाईला उभे राहण्याला एकदम सिद्ध होणार नाहीत व सिद्ध झाले तरी त्याना साधने एकदम मिळणार नाहीत. म्हणून पहिल्या पायऱ्या आपल्या स्वाधीन व शेवटची देवाच्या स्वाधीन असे समजून लोकाना असंतुष्ट धीट बाणेदार स्वाभिमानी व स्वार्थत्यागी होण्याला शिकविले पाहिजे. अशा गुणानी केलेल्या चळवळीत व्यक्तिपराक्रमाला जागा असते संधि सांपडते व पराक्रमाचे चीजहि होते. पण पुढे बंड करण्याकरिता आज अत्याचार शिकवावयाचे ही गोष्ट मला सयुक्तिक वाटत नाही.

तुम्हीच सांगा की हे पिस्तुल रसायनविद्या व यंत्रविद्या अशा तीन गोष्टी घेऊन तुम्ही आज आपल्या गावी परत चालला आहात. मग तुम्ही स्वतः त्यांचा उपयोग काय करणार आहात ?

पाहुणा—प्रथम मी यंत्रकलेचा उपयोग करून पाहणार. कारण काही असले तरी मला जगले हे पाहिजे. आणि चरितार्थ चालविता चालविता इतर दोन विद्यांचा उपयोग मला किंवा लोकाना काय करून देता येईल तो देईन.

टिळक—पण तुम्ही तरी ही बंडाची तयारी करता आहात असे मी म्हणू का? पण मी हे आज कशाला बोलू ? तुम्ही आज गावी जा. यांत्रिक कारखाना सुरू करा. संसाराच्या मागे लागा. आणि पांच वर्षांनी पुनः भेटा म्हणजे याच विषयावर बोलू. असे मात्र समजू नका की तुमच्या अंगातील तेज व धाडसीपणा यांची किंमत मी करीत नाही. पण तुमचे विचार कृतीत उतरण्याला या देशात किती मोठ्या मर्यादा आहेत, तुमचे पिस्तुल गंज खात कसे पडेल, आणि तुमच्या रसायनविद्येला लायक विद्यार्थी किती मिळतील हे तुमचे तुम्हालाच कळून येईल हाच माझ्या बोलण्याचा अर्थ. आमच्या वेदांतातलेच उदाहरण तुम्हाला देतो. आत्मा हा शुद्ध बुद्ध व चैतन्यात्मक आहे ही गोष्ट खरी. तथापि त्याला जड देहाचाच आश्रय करावा लागतो. त्याप्रमाणे बंडखोरीची बुद्धि हा स्वातंत्र्याचा आत्मा खरा. तरीपण त्याला नित्यस्वरूपाच्या राजकारणाच्या जडदेहाचाच आश्रय करावा लागतो. राजकारणाचे हे नित्यकर्म सहजच रुक्ष नीरस नाशवंत असे वाटते. पण त्याचा आधार घेतल्याशिवाय बंडखोरी ही फळाला येत नाही. आता मनुष्यात्मे तितके सगळे देहधारीच असले तरी मनुष्या मनुष्यात फरक असतोच. म्हणूनच अधम तो अधम व साधू तो साधू. त्या रीतीने राजकारणातहि सर्वच काही एका माळेचे मणी असत नाहीत व असून चालणारहि नाही. मी जन्मात पिस्तुलाला किंवा बंदुकीला हातहि लावलेला नाही. तरीपण सात वर्षे तुरुंगात जाऊन येऊन मी एवढे तरी सिद्ध केले असेन की अत्याचारीपणा नसताहि राजकारण थोडेबहुत तीव्र होऊ शकते. मी हे अहंकाराने बोलत नाही. पण राजकारणाच्या नित्यकर्माला मी किती महत्त्व देतो हे दर्शविण्याकरताच हे बोलले. खरोखर मनात भीति न धरता मी स्पष्टपणे प्रजेच्या न्यायनिष्ठ हक्कासंबंधाने बोलत आलो यापेक्षा मी वास्तविक अधिक पराक्रम तरी कोणता केला ? पण लोकामध्ये अजून ही साधी गोष्टहि आली नाही. येवढ्याचकरिता ते मला मोठा म्हणतात. माझी इच्छा इतकीच की हा माझा मोठेपणा निघून जावा व मी करतो इतके पुष्कळ लोकानी करावे. कारण माझ्याइतके व माझ्याहून अधिक बुद्धिमान असे लोक या देशात कितीतरी आहेत. मीहि तामसीवृत्तीचा आहे. नाही असे नाही. तुमच्यासारखे माझ्या हाती पिस्तुल असले आणि मी कोठे न सोसवेल असा प्रत्यक्ष वैयक्तिक जुलूम पाहिला तर माझा किंवा इतरांचा स्वाभिमान व अब्रू रक्षण करण्याकरिता मीहि हटकून त्याचा उपयोग करीन व अत्याचारी या नावाला पात्र

होईन. व तसा झाले तर त्याचे भूषणच मानीन. तुम्ही देखील अशा उपयोगाकरिता हे तुमचे पिस्तुल जरूर राखून ठेवा. पण तुम्ही बंडखोरीच्या ज्या कल्पना परदेशाहून घेऊन आलेले आहात त्यांचा उपयोग आज या देशात नाही इतके मात्र मी तुम्हाला म्हणेन. न्याय्य मार्गात झालेल्या सशस्त्र प्रतिकाराला अत्याचार कोणीच म्हणत नाही. पण असे सशस्त्र सत्याग्रही यदृच्छेने कोठे कोठे निर्माण झाले तरी त्याला मी बंडाची तयारी मात्र म्हणणार नाही.

अत्याचारी लोकांशी टिळकांचा संबंध येत असे याविषयी आणखी दोन शब्द सांगतो. कोणतीहि चळवळ करणारा कंपू घेतला असता त्याला एकप्रकारे सैन्याचे स्वरूप असते. म्हणजे सैन्यात जशी निरनिराळी पोटदळे असतात तशीच चळवळ करणाऱ्या कंपूमध्येहि असतात. आणि सैन्यातील प्रत्येक पोटदळाच्या वर्तनाची जबाबदारी सेनापतीवर असते त्याप्रमाणे चळवळी कंपूतील प्रत्येक भागाच्या वर्तनाची जबाबदारी पुढाऱ्यावर असते ही गोष्ट तात्त्विक दृष्ट्या खरी आहे. दोहोंत फरक इतकाच की सैन्यामध्ये शिस्तीचे नियम अधिक कडक असतात, पण खाजगी पक्ष किंवा कंपू यांच्यामध्ये शिस्तीची अवश्यकता असली व ती त्यातील लोकानी सामान्यतः मानली तरी लष्कराइतक्या परिणामकारक रीतीने त्या शिस्तीचा अंमल होऊ शकत नाही. ऑलिव्हर क्रॉमवेल याच्या चळवळीत त्याच्या हाताखालील लोकाना काही लष्कराचे व काही राष्ट्रीय चळवळ करणाऱ्या खाजगी कंपूचे स्वरूप होते. आणि त्याला वरील दोन्ही स्थितीतला अनुभव आला होता. त्या संबंधाने त्याने उद्गार काढले ते लक्षात ठेवण्यासारखे आहेत. तो म्हणतो "हल्लीच्या परिस्थितीत मी जे काही स्वतः करतो त्याची जबाबदारी मी घेतच आहे. पण ज्या गोष्टी मी स्वतः करीत नाही त्यांचीहि जबाबदारी मला घ्यावी लागत आहे. याचे कारण मी पुढारी बनलो आहे म्हणून. एखादे वेळी पहावे तो असे घडते की भावना अतिशय तीव्र वाढते, मूर्ख वेडे बनतात, आणि शहाण्याना देखील असे प्रसंग येतात की हे लोक बोलताना व वागताना शुद्धीवर तरी आहेत की नाही कोण जाणे !" क्रॉमवेल याचा चरित्रकार जॉनमोर्ले याने या गोष्टीला उद्देशून असे म्हटले आहे की "पुष्कळदा अशा पुढाऱ्याचे काम म्हणजे अनुयायानी उत्पन्न केलेल्या परिस्थितीशी झगडत बसणे हेच होऊन बसते. अनुयायानी काही असे सुचवावे की ते याला प्रत्यक्ष मोडून तर काढता येत नाही. पण फारच झाले तर ते लांबणीवर टाकणे, त्याला थोडी कलाटणी देणे, अंगावर घेतल्यासारखे दाखवून परतवणे, समजूत घालून मोडून काढणे, इतकेच त्याला करता येते. यामुळे तो परिस्थितीचा काहीसा दासच होऊन राहतो. पण ही अडचण खरी म्हणून जर तो पुढारी बनणार नाही, अनुयायांचा कंपू जुळवून तयार करणार नाही, तर त्याच्या हातून कोणचेही कार्य तरी कसे होईल ? अर्थात अशा मनुष्यावर टीका करताना टीकाकारानी थोडी सूक्ष्मदृष्टि चालवावी लागते व त्या दृष्टीत सहानुभूतीहि असावी लागते." कोणताही सरकारी नोकर जी एखादी चूक

करतो तिची तात्त्विक जबाबदारी सरकारावर असते तितकीच अनुयायांच्या कृत्याबद्दलची जबाबदारी पुढाऱ्यावर आहे अगर नाही असे समजले पाहिजे. म्हणजे तात्त्विक दृष्ट्या ती आहे खरी पण प्रत्यक्ष व्यवहारदृष्ट्या ती नाही. एखाद्या सैनिकाच्या अत्याचाराबद्दल जर सेनापतीला फाशी देत नाहीत तर अनुयायांच्या अत्याचाराबद्दल पुढाऱ्याला फाशी देण्याला का काढावे ! काही एका मर्यादेपलीकडे जबाबदारी ही प्रत्येक व्यक्तीच्या कृत्यावरूनच ठरवावी लागते. एरवी समाजात देखील लोक एकत्र राहतात त्याप्रमाणे राहता येणे शक्य नाही. राजकीय पक्ष घेतले असता त्यांच्या घटनेत व कार्यात फरक काय असतो हे वर दर्शविलेच आहे. अर्थात् अशा पक्षातील एखाद्याने स्वतंत्र रीतीने व आपल्या जबाबदारीवर जर एखादी गोष्ट केली आणि ती सामुदायिक उद्देशात पडत नसली तर तिजकरता पुढाऱ्याला जबाबदार धरणे किंवा दोष देणे हा अन्याय होय.

## ( ४ ) आयर्लंडचा दाखला

हिंदी राष्ट्रीय चळवळीत अत्याचार झाले हे वाक्य शब्दशः घेता येत नाही. व्याकरणदृष्ट्या या वाक्याचा जो अर्थ तो कायदेशीर किंवा नैतिकदृष्ट्या योग्य ठरत नाही. हिंदुस्थानातील राष्ट्रीय चळवळीत काही अत्याचार घडले याचा अर्थ ते अत्याचार हा त्या चळवळीचा एक भाग होता असा नाही. तर ज्या काळात ही राष्ट्रीय चळवळ चालू होती त्या काळात ते अत्याचार घडले इतकाच त्या वाक्याचा अर्थ घ्यावयाचा. आणि याला एखादा दाखला घ्यावयाचा तर आयर्लंड मधील राष्ट्रीय चळवळीचा देता येईल. ही चळवळ पांचपन्नास वर्षे चालू असली तरी माळेत ज्याप्रमाणे फुले निरनिराळी पण दोरा एकच त्याप्रमाणे कृत्ये निरनिराळ्या प्रकारची पण राष्ट्रीय भावना एकच प्रकारची होती. केवळ पार्लमेंटमध्ये राहून आयरिश राष्ट्राचे पाऊल पुढे टाकवणे हेच काय ते एकटे खरे राजकारण असे मानणाऱ्या आयझॅक बट्ट पासून प्रत्यक्ष बंडाशिवाय राजकारणाचा दुसरा कोणताही प्रकार संभवतच नाही असे मानणाऱ्या वुल्फटोनपर्यंत एकच माळ किंवा साखळी लागून राहिलेली दिसते. आणि याच्या दरम्यान गरम नरम सरस निरस कायदेशीर बेकायदेशीर सनदशीर बिनसनदशीर वगैरे सर्व प्रकार समाविष्ट होतात. पैकी दोन टोकांच्या या दोन माणसांची स्थिति एकप्रकारे सुखाची असते. मनुष्याच्या मनाचा एकेरीपणा कार्याच्या दृष्टीने परिणाम कारक नसतो तथापि त्याच्या मनाला तो नेहमी सुख देतो व त्याची अनेक प्रकारची दगदग आणि चिंता वाचवितो. आयझॅकबटला फक्त एकच गोष्ट माहीत असे ती ही की पार्लमेंटमध्ये आयर्लंडतर्फे निवडून यावे आणि तेथे जे कोणचे प्रधान मंडळ ज्या वेळी अधिकारारूढ असेल त्याच्याशी स्नेहभावाने वागून त्याची मर्जी संपादून त्याला थोडीशी भीड मोहबत घालून किंवा एखादे वेळी त्याच्या विरुद्ध मत देण्याचा धाक दाखवून किंवा प्रत्यक्ष विरुद्ध मत देऊन जे काय आय-

लंडचे हित साधेल ते साधावे. यापुढची चळवळीची कोणतीहि पायरी त्याला मान्य नव्हती. आणि बाहेर कितीहि लोकमताची खेती केली तरी प्रत्यक्ष पीक पदरात पडावयाचे ते कोणत्या तरी प्रधान मंडळाच्या हातून ही गोष्ट लक्षात घेतली असता आयझॅक बट याची उपपत्ति तितक्या पुरती बरोबर आहे. पण दुसऱ्या बाजूला पाहिले असता वुल्फ टोन याचीहि उपपत्ति तितक्या पुरती बरोबर असल्याने त्यालाहि चूक म्हणता येत नाही. आणि आयझॅक बट याने प्रधानमंडळाला खुष करणे हा जसा एकेरी मार्ग पतकरला तसाच वुल्फटोन यानेहि बंडाच्या खटपटीचा एकेरी मार्ग पतकरला व त्या दोघानाहि अपयश आले तरी मनाचे सुख लाभले. आयर्लंडच्या राष्ट्रीय पक्षात शुद्ध अत्याचारी म्हणून जे वर्ग होऊन गेले त्या सर्वांना आम्ही वुल्फटोन याच्याच वर्गात ढकलतो. त्यांचा वेगळा विचार करण्याचे कारण नाही. कारण वुल्फटोन प्रमाणे तेहि एकेरीच विचाराचे होते. फरक इतकाच की वुल्फटोन याची चळवळ सामुदायिक स्वरूपाची व या अत्याचारी लोकांची चळवळ व्यक्तिमर्यादित. पण दोघेहि शुद्ध दंडनीतीचेच भोक्ते. वुल्फटोन याचा विचार असा की डब्लिन कॅसलमधील अधिकारी मंडळच्या मंडळ सगळे कैद करून विलायतेला पाठवावे आणि या प्रयत्नात जे आड येतील त्याना कैद करून किंवा मारून टाकून वाट मोकळी करावी. व्यक्तिशः अत्याचार करणारांची येवढी व्यापकदृष्टि नव्हती. तर पायाला काटा लागला म्हणजे तेवढाच जसा काढून टाकावयाचा तसे जो कोणी आयर्लंडातील इंग्रज अधिकारी किंवा जमीनदार दुःसह होईल तेवढा काढून किंवा कापून टाकावयाचा इतकेंच ते जाणत. तात्पर्य वर सांगितलेल्या सर्व प्रकारच्या लोकाना डोळ्यापुढे एकच मार्ग दिसत असल्याने त्यांच्या मनाला व्यग्रता आली नाही.

पण 'युनायटेड आयर्लंड' पत्राचा संपादक वर्ग किंवा लँडलीगचा पुरस्कर्ता पार्नेल अशा लोकांची स्थिति मात्र अनुकंपनीय होती. कारण त्यांचे मन पूर्णपणे एकेरी नव्हते. निखालस एकेरी धोरणाने त्यांचे कार्य साध्य होण्यासारखे नव्हते पण उलट याच कारणामुळे त्यांच्या मनाला व्यग्रताहि अधिक जाचीत असे. आयझॅकबट प्रमाणे ब्रिटिश पार्लमेंटमध्ये राहून तेथील कार्यपद्धतीच्या द्वारे आयर्लंडचा जो फायदा होईल तो करून घेणे हे त्याना हवे होते, पण त्यांजबरोबर अपरिहार्य अशा कारणानी आणि स्वतंत्र स्फूर्तीने जे काही अत्याचार घडतील त्यांच्या धाकदहशतीमुळे प्रधान मंडळाच्या किंवा इंग्रज जनतेच्या मनावर जो वचक बसेल त्याचाहि फायदा घ्यावा अशा मताचे ते होते. एका बाजूला आयझॅकबटप्रमाणे ते अत्याचारांचा किंवा दंडनीतीचा एकांतिक निषेध करणारे नसत, व दुसऱ्या बाजूला क्रांतिकारक फेनियनिस्ट मूनलाइटर्स वगैरे अत्याचारी संप्रदायाप्रमाणे पार्लमेंटरी चळवळीचा एकांतिक निषेध करणारेहि ते नव्हते. पण या दुहेरी चळवळीचा फायदा विकत घेण्याकरिता त्याना अनेक प्रकारची किंमत द्यावी लागत असे. पहिली गोष्ट स्वतः त्यांच्या

चित्ताची अखंड व्यग्रता व दुसरी गोष्ट म्हटली म्हणजे त्यांच्या हेतूविषयी सर्व लोकांचा नेहमी होणारा गैरसमज आणि त्यामुळे इतर सर्व पक्षांच्या मिळणाऱ्या शिव्या ! लँडलीगच्या एकंदर चळवळीतील कायदेशीरपणाचा भाग किती व बेकायदेशीरपणाचा किंबहुना अत्याचारीपणाचा भाग किती हे उकलून काढणे ही गोष्ट कोणालाहि अशक्यप्रायच होती. पार्नेल प्रभृति अनेक आयरिश राष्ट्रीय पुढाऱ्यांचा कांही वेळ व काही श्रम हे ही गुंतागुंत सोडवून दाखविण्याच्या प्रयत्नात सतत खर्च होत असे. आणि सुप्रसिद्ध पार्नेल कमिशनचा रिपोर्ट जो कोणी वाचून पाहील त्याला या पुढाऱ्यांची स्थिति किती बिकट होती हें बरोबर कळून येईल.

कोणत्याहि समाजात असा कोणीहि मनुष्य नसतो की जो वरखाली निरनिराळ्या मताच्या लोकांच्या कात्रीत सांपडलेला नसतो. नेमस्ताना सरकार मनातून म्हणत असते की, 'हे लोक झाले तरी काय तोंडाने स्पष्ट बोलत नाहीत इतकेच काय ते ! पण अंतरंगात ते व जहाल एकच आहेत. आणि सरकार नेमस्ताना उघड असे म्हणत असते की, तुम्ही नेमस्त म्हणविता, राजनिष्ठ म्हणविता, पण टिळकासारखे राजद्रोही किंवा सर्वसामान्यपणे राष्ट्रीय पक्षाचे लोक यांच्याशी संबंध का ठेवता ?' पण स्वतः जहाल लोक झाले तरी या कात्रीतून सुटले आहेत असे नाही. त्याना एकीकडून मवाळ लोक म्हणत असतात की हे अत्याचारी लोकाशी संबंध ठेवतात म्हणून ते अत्याचारप्रवर्तकच होत. आणि दुसऱ्या बाजूने अत्याचारी लोक त्याना म्हणत असतात की 'टिळकासारखे लोक झाले तरी ते एकप्रकारचे मवाळच. कारण यांचा कायद्यावर व कायदेशीर मार्गावर विश्वास निदान भिस्त खरी. मवाळ लोकाप्रमाणे आम्हाशी ते फटकून वागत नाहीत. प्रसंगविशेषी आम्हाशी ते सहानुभूतिहि दाखवितात हे खरे. पण हा प्रश्न व्यक्तिमात्राशी भलेपणा ठेवण्याचा नाही. तर राष्ट्राला स्वराज्य किंवा स्वातंत्र्य खरे कोणत्या मार्गाने मिळेल याच्या निर्णयाचा आहे. टिळकासारखे लोक तेजस्वी बाणेदार किंवा स्वार्थत्यागी असले तरी त्यानाहि राष्ट्रीय चळवळीचे खरे मर्म समजलेले नाही व समजले असले तरी उमजले नाही. कार्यसिद्धीला जी उडी घालावी लागते ती यांच्या हातून घातली जात नाही. नेमस्ताहून अधिक स्वार्थत्यागी व धीट एवढ्याचकरिता त्याना आदराने वागविणे प्राप्त नाहीतर निवळ साधन, मार्गाच्या दृष्टीनेच पाहिले तर त्यानाहि मूर्खांच्या मालिकेंतच बसविणे योग्य होईल. अशाच रीतीने एकीकडे सरकार व दुसरीकडे स्वतःला एकांतिक म्हणविणारे अत्याचारी लोक हेहि मतविरोधाच्या कात्रीत कसे सांपडलेले असतात याची वाचकाना मनाने कल्पना करता येते.

आता या कात्रीचा अर्थ केवळ त्यांच्याबद्दल काही लोकांचे मत वाईट होणे इतकाच असल्यास तो फारसा जाचक होत नाही; पण त्याचा अर्थ असाहि असतो की, अमुक एका प्रकारच्या लोकाशी तुम्ही संबंध ठेवू नये व तो तुम्ही ठेवला तर

तुम्हीहि त्याच मताचे किंवा तीच कृत्ये करणारे असे आम्ही समजू. मग प्रश्न असा येतो की, हा आक्षेप दूर करण्याकरिता अशा लोकांचा संबंध व्यवहारात टाकून द्यावयाचा की काय ? व टाकून द्यावयाचा म्हटले तरी तो टाकून कसा देता येणार ? अगदी मूलग्राही उदाहरण घ्यावयाचे तर असे की एक भाऊ तीव्र राजकीय चळवळीत पडून सरकाराला अप्रिय झालेला आहे व दुसरा भाऊ सरकारी नोकरीत प्रथमपासून गेला असल्याने तो रीतीप्रमाणे आपले काम करीत आहे व बढती मिळवीत आहे. यावर प्रश्न हा की एका बाजूने सरकाराला एक आवडत नाही म्हणून व दुसऱ्या बाजूने लोकाना एक आवडत नाही म्हणून या भावानी आपला संबंध तोडून टाकावयाचा की काय ? व तो तोडणे शक्य आहे काय ? ही अडचण गेल्या वीस वर्षांत आपल्या देशामध्ये पुष्कळ भावाभावाना अनुभवावी लागलेली आहे. आणि जी गोष्ट भावाभावांची तीच स्नेह्यास्नेह्यांची आणि जी खासगी स्नेह्यांची तीच सार्वजनिक कार्यात पडलेल्या सहचर व सहकारी लोकांची. नुसते बोलणाराला तुम्ही अमक्याशी संबंध ठेऊ नका म्हणणे सोपे असते. तसेच ज्याला कार्य असे काहीच करावयाचे नाही त्यालाहि, मनाने एखादा मनुष्य अयोग्य ठरविला तर त्याच्याशी संबंध न ठेवणे किंवा तोडून टाकणे ही गोष्ट सोपी असते.पण ज्याला काही तरी कार्य म्हणून करावयाचे असेल त्याला स्वतःशी मते न जुळणाऱ्या किंवा अयोग्य व अपात्र अशा लोकाशीहि संबंध ठेवावा लागतो कारण तो न ठेवला तर कार्यच होत नाही. ही अडचण एखाद्या खासगी कामातहि येते मग ती सार्वजनिक कार्यात आल्यास काय नवल ? बुद्धिबळाच्या पटात निरनिराळ्या शक्तींची व चालींची मोहरी असतात आणि आपला डाव साधावयाचा तर तत्क्षणी उपयोगी पडेल त्या मोहऱ्याचाच खेळणाराला उपयोग करावा लागतो. मग तेथे उच्चनीच भाव किंवा आवडनिवड ही ठेऊन चालत नाही. वेळी नाकासमोर आणि एकच घर चालणारे प्यादे राजा वजीराचे घर रोखू शकते व त्यावर हल्ला करून मारून काढू शकते किंवा शह देऊ शकते. अर्थात् प्यादे क्षुद्र म्हणून ते वर्ज्य करून चालत नाही. उंट पल्लेदार पण सरळ मार्गी. त्याला मागेपुढे जाता येते पण आजूबाजूला जाता येत नाही. हत्ती असाच पल्लेदार पण तोहि सरळमार्गी; मात्र तो उंटापेक्षा अधिक कार्यक्षम. कारण त्याला नुसता पुढे मागेच नव्हे तर चौफेर मारा करता येतो. आणि त्याने एकदा मोहरे विरेला धरले म्हणजे खुद्द राजाने स्थलांतर केल्याशिवाय त्याची सुटका होत नाही. याच्या पुढची पायरी वजीराची. कारण त्याच्यामध्ये प्यादे उंट हत्ती या सर्वांचे गुण सांठविलेले असतात. पण मूळ खेळाची योजना करणाराने अशी करामत करून ठेवली आहे की घोड्याला जी एक विलक्षण शक्ति आहे ती खुद्द वजीराला नाही. त्याचा मारा फक्त अडचाव्या घरांतच होतो. प्याद्यासारखीहि दोन घरांत हल्ला करण्याची शक्ती त्याला नाही. पण या तिरकसपणाच्या शक्तिमुळेच घोड्याचा पराक्रम काही विशेष प्रकारचा घडतो. सार्वजनिक कार्यात कधीहि सरळ-

बुद्धि न चालविणारी तिरकस आडव्या तिडव्या चालीची म्हणजे केवळ कुत्सित मनाची अल्प मर्यादित शक्तीची पण इतर कोणालाहि न करता येण्यासारखे काम एखादे वेळी साधणारी माणसे उपयोगी पडतात. अशा रीतीने स्वभाव गुण बुद्धि कर्तृत्व कल्पना योजना पराक्रम स्वार्थत्याग वगैरे विविधगुणांच्या माणसांचा उपयोग सार्वजनिक कार्यात होत असतो. म्हणून तू अमुक मनुष्याशी संबंध ठेव अमक्याशी ठेवू नको अमुक मनुष्याचा उपयोग कर अमुकाचा करू नको असा निर्बंध कोणी घालू लागल्यास कार्यासक्त म्हणून लोकसंग्रहेच्छू असणाऱ्या पुढाऱ्याना त्याचा जाच दुःसह होतो. हा निर्बंध तो पाळीत नाही व त्याकरिता दुसऱ्याचा गैरसमज झाला तरी सोसण्यास तयार होतो. हिंदुस्थानातील परिस्थिति वाचकांच्या डोळ्यापुढे सर्व बाजूंनी आहेच. यामुळे इकडील उदाहरणे घेऊन वरील सिद्धांत स्पष्ट करण्याचे कारण नाही. किंबहुना अशी उदाहरणे आम्ही देऊ लागलो असता त्यात अनेक अप्रिय अशा गोष्टी बोलाव्या लागतील. म्हणून वरील भानगडीच्या तत्त्वावर किंवा गुंतागुंतीच्या प्रश्नावर सर्व बाजूनी प्रकाश पाडणाऱ्या अशा एका परराष्ट्राच्या इतिहासांतलेच एक ठळक उदाहरण घेऊ. आरशात प्रतिबिंब पाहिल्याने मनुष्याच्या प्रत्यक्ष तोंडाकडे न पाहता कार्यभाग होतो. त्याप्रमाणे इकडील उदाहरणे न देता परस्पर दुसऱ्या एका राष्ट्राच्या पुढाऱ्याची हकीगत वाचली असता वरील प्रश्नाचे स्पष्टीकरण सहज होऊन त्या प्रश्नाचे उत्तरहि समर्पक मिळेल.

हिंदी राजकारणाला आयरिश इतिहासाचे दाखले जितके तंतोतंत लागू पडतात तितके दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्राच्या इतिहासातील लागू पडत नाहीत ही गोष्ट आता पुष्कळाना माहीतच आहे. आम्ही पूर्वी आंयर्लंडच्या इतिहासावर जे एक पुस्तक १९१० साली प्रसिद्ध केले ते ज्यानी वाचले असेल त्याना चालू प्रश्नाची चर्चा त्यात थोडी बहुत केलेली आढळलीच असेल. तथापि कार्यानुरोधाने या पुस्तकातहि तोच विषय मांडणे पुनः प्राप्त म्हणून तो पुनः थोडासा मांडीत आहो. त्यावेळी टिळकांवर राजद्रोहाचा दुसरा खटला होऊन त्याना शिक्षा झाली होती तरी तिला आधार फक्त केसरीतील काही लेखांचाच होता. स्फोटक द्रव्यासंबंधाने दोन पुस्तकांची नावे लिहिलेले एक कार्ड खटल्यात पुढे आले होते पण त्यावर मुख्य भर कोणी दिला नाही. पण त्या खटल्यात जो एक मुद्दा टिळकांचे विरुद्ध आणण्यात आला नाही तो चिरोल खटल्यात आणला गेला हे त्या खटल्याची दुसऱ्या एका प्रकरणात दिलेली हकीगत वाचणारांच्या लक्षात आले असेल. हा मुद्दा म्हटला म्हणजे असा की 'टिळक हे अत्याचारी लोकांशी संगत व संबंध ठेवतात अर्थात् ते स्वतः एकप्रकारे अत्याचारी असे समजण्याला हरकत नाही. आणि त्यांचे कोणी तसे वर्णनहि केले तरी ती काही बेकायदेशीर बेअब्रू होत नाही.' हाच निकाल लंडनच्या ज्यूरीने या खटल्यात टिळकाविरुद्ध दिला. चिरोल काय किंवा ज्यूरीतील लोक काय यांचा बहाणा असा की A man

is known by the company he keeps किंवा Things which are equal to a third thing are equal to one another या तत्त्वाप्रमाणे टिळक हे अत्याचारीच होत. पण चिरोलसाहेब किंवा लंडनची ज्यूरी यांचा हा निकाल हिंदुस्थानच्या लोकाना कितपत मान्य होण्यासारखा आहे इतकाच विचार प्रस्तुत चर्चेत आम्हाला कर्तव्य आहे. स्वतः टिळकाना हा निकाल मान्य नव्हता ही गोष्ट त्यानी इतका खर्च सोसून व उलट तपासणीचे जोखीम पत्करून चिरोल साहेबावर फिर्याद लावली यावरूनच उघड होत आहे आणि त्यांच्या मित्रमंडळीनी त्यांच्या खर्चाकरिता तीन लक्ष रुपये जमविले व लोकानी ते दिले यावरून त्यानाहि हा निकाल मान्य नव्हता हे दिसून येते. पण आपल्या समाजात असे पुष्कळ लोक आहेत की त्याना या गोष्टीचा निर्णय आपल्या मनाशी बरोबर करता येत नाही. अशा लोकाना परराष्ट्राच्या इतिहासातील एखादा दाखला घेऊन सांगितले असता कदाचित विचाराला मदत होईल म्हणून तो दाखला खाली वाचकापुढे मांडित आहो.

टिळक स्वतःला राजद्रोही म्हणवून घेण्याला तयार किंवा त्यात कमीपणा न मानणारे होते. पण अत्याचारी म्हणणे ही त्याना आपली बेअब्रू वाटत होती. व अत्याचारी याचा अर्थ स्वतः अत्याचार करणारे नव्हेच पण अत्याचाराना प्रवृत्त करणारे असे अप्रत्यक्ष वर्णनहि त्याना बेअब्रूकारक वाटत होते. हा प्रश्न कायदेशीर जबाबदारीचा नव्हता तर नैतिक जबाबदारीचा होता. टिळक हे कोणत्याहि अत्याचाराला कायदेशीर रीतीने जबाबदार नव्हते याचे प्रमाण हेच की तो गुन्हा सरकाराला त्यांचे अंगी केव्हाहि भिडविता आला नाही. गुप्तपणाने समाजात हजारो ठिकाणी वावरणारे व हजारो डोळ्यानी पाहणारे सरकार तसा काही पुरावा मिळता तर तो पुढे आणल्याशिवाय राहते ना. आणि टिळक वर्तमानपत्रकर्ते नसते तर व्यक्तिशः त्यानी केलेल्या सर्व खटपटी व चळवळी करूनहि त्यांच्यावर कधी खटला झाला नसता व त्याना तुरुंगात जावे लागले नसते. पण एखादी जबाबदारी कायदेशीर नसली तरी नैतिक असू शकते. तीच टिळकांच्या गळ्यात बांधण्याचा प्रयत्न चिरोल साहेबानी पुढे केला व ती झिडकारून टाकण्याचा प्रयत्न टिळकानी केला. याचे कारण टिळकांचे मन त्याना असे सांगत असावे की, अत्याचारांची नैतिक जबाबदारी अंगावर येत असेल तर मनुष्याने ती स्वीकारली पाहिजे. पण ती गोष्ट अंगावर येण्याला अत्याचारी लोकाशी, अत्याचारी कृत्यांच्या पूर्वी किंवा नंतर, अमुक एक प्रकारचा व अमुक एका मर्यादेपलीकडे संबंध मनुष्याने ठेवलेला असला पाहिजे तसा माझा नाही. म्हणून ती नैतिक जबाबदारीहि मजवर नाही व ती आहे असे जो म्हणतो तो माझी बेअब्रू करतो. चिथावणी करणे उत्तेजन देणे हे शब्द फार व्यापक व भ्रामक होत. व कोणी कोणाशी किती संबंध ठेवल्याने चिथावणी दिली असे होते किंवा देऊ नये तितके उत्तेजन दिले असे ठरते हाच काय तो वादग्रस्त प्रश्न असतो. व या नाजूक सरहद्दीवरच सर्व ओढाताण व खेचाखेच चालू असते. टिळकांच्या या नाजूक स्थितीला

दाखला द्यावयाचा तर तो आयर्लंडच्या इतिहासातील पार्नेल प्रभृति पुढाऱ्यांचा. म्हणजे पार्लमेंटातील लँड लीगच्या पुढारी सभासदांचा. आयर्लंडमध्ये राष्ट्राकरिता म्हणून काम करणाऱ्या लोकांची उतरत्या चढत्या भांजणीने बिनशर्त राजनिष्ठापासून बंडखोरापर्यंत एक अखंड माळ लागलेली होती व या माळेतील मध्यमेरूचे स्थान लँड लीगची चळवळ करणाराकडे होते. लँड लीगचा उद्देश आयरिश शेतकऱ्याना स्वतंत्र करणे हा होता. सर्व शेतजमिनीचे मालक इंग्रज जमीनदार हेच जवळजवळ होऊन बसले होते. आयरिश लोक ही उपरी कुळे बनली होती. शेतीची सुधारणा नाही, उत्पन्न कमी, खंड फार व जमीनदार केव्हा घालवून देईल आणि बेकारी केव्हा पदरी येईल याचा नेम नाही. अशा स्थितीमुळे आयरिश शेतकरी वर्ग अगदी गांजून गेला होता. त्याच्या दारिद्र्याची व दुस्थितीची वर्णने वाचली असता कोणाच्याहि अंगावर शहारेच उभे राहतील. आयरिश जनतेतील फार मोठी संख्या शेतकरी वर्गाची. आणि आधी खाण्याला पोटभर घास मिळवून दिल्यावर मग आयर्लंडला स्वातंत्र्य कसे मिळविता येईल याचा विचार. म्हणून आयर्लंडला पूर्ण स्वतंत्र किंवा निदान अर्ध स्वतंत्र अशी पार्लमेंट मिळण्याची सर्व साधारण चळवळ सुरू असताच शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याची ही एक वेगळीच स्वतंत्र चळवळ त्याबरोबर चालू होती. नुसती ही स्थिति सुधारावयाची म्हटली तरी त्याला कायदा करावा लागणार आणि तो कायदा होणे हे कर्म महाकठीण. कारण सगळ्या पार्लमेंटात आयरिश सभासद असे साठ सत्तर आणि बहुमतवाल्या मोठ्या म्हणजे लिबरल किंवा कान्झर्व्हेटिव्ह पक्षातून असा कायदा करण्याचे काम स्वतः उचलण्याला कोणी तयार नाही. यामुळे स्वराज्य नाही म्हणून सुराज्य नाही व सुराज्य नाही म्हणून स्वराज्यहि नाही अशी-म्हणजे ज्याचे पाय त्याच्याच पायात घालून कोलदांडा बसवावा अशी-हिंदुस्थानाप्रमाणे आयर्लंडचीहि स्थिति झाली होती. ही स्थिति सुधारण्याचे निर्णायक साधन कोणाचेच हाती नव्हते. पण ज्याचा पाय जेथे रोवला जाई तेथे तो आपल्याकडून होईल ती खटपट करीत होता. या खटपटीचे प्रकार अर्थात् वेगवेगळेच असावयाचे. जे आयरिश सभासद ब्रिटिश पार्लमेंटात निवडून जात ते तेथल्या रीतिप्रमाणे साम दाम दण्ड भेद योजीत. बाहेर देशात जुलमी जमीनदार व गांजलेला शेतकरी यांची गाठ पडली असता तेथेहि साम दाम दण्ड भेद या नीतीचाच अवलंब होत असे. पण नीति तीच असली तरी तिची कृत्ये वेगळ्या ठिकाणी वेगळ्या प्रकारची होतात. पार्लमेंटातील साम म्हणजे आयझॅक बटसारखा संभावित दाक्षिण्यपूर्ण उदार स्वभावाचा देशभक्त गोड बोलून युक्तिवाद चालवून आणि इंग्रजांच्या औदार्यबुद्धीला आळवून करीत असे तो. दामनीति अनुसरण्याला व भेदनीति अनुसरण्याला आयरिश सभासदाजवळ त्यांच्या पाच पन्नास मतांच्या गटाशिवाय दुसरे काहीच साधन नव्हते. आपले काम साधण्याची किंमत किंवा मोबदला म्हणून या पाच पन्नास मतांचा लाच त्याना लिबरल किंवा कान्झर-

वेटिव्ह पक्षाला देता येई. आणि स्वतःचे काम न साधले तरी एका पक्षाला ती मते देऊन दुसऱ्याचा पाडाव करण्याची दहशत घातल्याने एखादे वेळी आयरिश पुढाऱ्यांची भेदनीति सिद्धीस जाऊ शके. पण साम दाम व भेद उपयोगी पडतना म्हणून दण्डनीति अनुसरावी म्हटले तर आयरिश पुढाऱ्याना इतकेच करता येत असे की अनेक प्रकारे अडथळा करून वादविवाद लांबवून पार्लमेंटाचे इंग्लंडसंबंधाचे काही काम सरळ होऊ द्यावयाचे नाही किंवा तडीस जाऊ द्यावयाचे नाही. आमचे काम नीट होत नाही तर तुमचेहि नीट होऊ देत नाही असे म्हणणे, किंवा प्रतिपक्षाला टाकून बोलणे, अध्यक्षाची अवज्ञा करणे, बाहेर जा म्हटले तरी हाताने धरून घालवून दिल्याशिवाय न जाणे—हेच येऊन जाऊन पार्लमेंटमधील दण्डनीतीचे अधिकांत अधिक स्वरूप होते. पार्नेल बिगर हीली ओब्रायन डिलन वगैरे लोक या अडवणुकीच्या धोरणामुळे प्रबल ठरले व प्रसिद्धीला आले.

पार्लमेंटातील बंडखोरी म्हणजे फक्त असभ्य वर्तन.त्यांत शिवी देण्यापेक्षा मोठा घातपात नाही व सभेतून बाहेर घालवून देण्यापेक्षा अधिक शिक्षा किंवा स्वार्थत्याग नाही. पण पार्लमेंटबाहेरील चळवळीत दण्डनीतीची मर्यादा फार पुढे जाऊ शकते. जुलुमाने गांजलेले शेतकरी किंवा माथेफिरू देशभक्त याना पार्लमेंटमधील ही लढाई लटुपुटीची वाटल्यास आश्चर्य नाही. गुलाल गोट्यांचे युद्ध खेळल्याने कपडे व अंग लाल होतात पण ते रंगाने रक्ताने नव्हे. गुलाल गोट्याच्या खेळाप्रमाणे बाम्बगोळे पिस्तुले तोफा बंदुका घातक शस्त्रे यांच्या खेळाला युद्ध हेच नाव—पण तेथे अंग रंगते ते रंगाने नव्हे तर रक्ताने रंगते हाच खरा भेद आहे. पार्लमेंटात बसणारा आयरिश पुढारी कायद्याचे बिल पुढे आणील पण बिचाऱ्या शेतकऱ्याजवळ हाताशिवाय आणि प्रसंगविशेषी हातातील हत्याराशिवाय पुढे आणण्याला काय मिळणार? पार्लमेंटातील शिव्या देण्याची भाषा झाली तरी तिला मर्यादा आहे. पण शेतकरी रागावून शिव्या देऊ लागला म्हणजे त्याला छापील शब्दकोशाचीहि मर्यादा नाही. पूर्वी कधी कोणी न ऐकल्या अशा नव्या शिव्या बनवून तो देणार आणि ऐकणारालाहि त्याप्रमाणानेच राग येणार. पार्लमेंटातील पुढारी पट्टेवाल्याने अंगाला हात लावल्यावर आपल्या पायाने बाहेर जाणार, पण शेतकरी जमीनदाराला म्हणणार माझ्या अंगाला हात लावण्याची कोणाची माय व्यायली आहे? मी जिता शेतांतून बाहेर निघणार नाही माझे प्रेत बाहेर न्याल तर कोणास ठाऊक! पण जीवच द्यावयाचा तर तो सुखासुखी का देईन? येऊन जाऊन गेला तर माझा एक जीव जाणार पण माझ्यासारख्या इतर अनेकाना छळणारे जितके अधिक जीव मला घेता येतील तितके जीव मी आपला जीव देण्यापूर्वी का घेऊ नयेत? पार्लमेंटातील सभासदांची व बाहेरच्या शेतकऱ्यांची ही तुलना झाली. पण त्या सभासदाला सहानुभूति दाखवून त्याला निवडून देऊन त्याच्या दंडनीतिला उत्तेजन किंवा चिथावणी देणारे जसे मतदार तसेच, या आडदांड शेतकऱ्याला सहानुभूति दाखवून उत्तेजन देणारे, पैसा पुरविणारे, हत्यारे पुरविणारे,

त्याला छपवून आश्रय देणारे, त्याला पळून जाण्याला मदत करणारे, आणि कोर्टात त्याचा खटला भांडून त्याला सोडवू पाहणारे अनेक लोक असणारच.

अशा रीतीनें दोन ठिकाणी पार्लमेंटात व बाहेर-एकच प्रयत्न एकाच हेतूने दोन प्रकारानी एकाच वेळी चालू होता. सरकारचा दोघानाहि सारखाच विरोध. पण सरकारच्या मनावर या प्रयत्नाचे परिणाम मात्र निरनिराळ्या प्रमाणाने होत होते. ते असे की पार्नेलने पार्लमेंटात शेतकऱ्यांच्या दुस्थितीचे कितीहि हृदयद्रावक वर्णन केले तरी प्रधानमंडळ ते एका कानाने ऐकून दुसऱ्या कानाने सोडून देई. पण एखाद्या जुलमी जमीनदाराचा खून एखाद्या गांजलेल्या शेतकऱ्याने केला किंवा त्याचा वाडा जाळला किंवा त्याच्या गुराढोराना जखमी करून निकामी केले अशी बातमी प्रधानमंडळाने ऐकली तर त्याला खरा क्रोध येई. आयर्लंडच्या कारभारात कोठे काही बिघडले आहे खास इतके ज्ञान त्याच्या मनाला होई! अशा रीतीने देशात चालू असलेल्या एकाच चळवळीच्या दोन प्रकारांचे व परिणामांचे ज्ञान त्या प्रयत्नात असलेल्या दोन्ही प्रकारच्या पुढाऱ्याना व अनुयायाना परस्पर असणारच. आणि नुसते ज्ञानच काय म्हणून? एक प्रकारची सहानुभूतीहि वाटणार. आणि लॅन्डलीग सारखी संस्था काढली म्हणजे या दोन्ही परंपरेचे लोक तीत येऊन सहजच मिसळणार, व ते असे मिसळले असता त्यानी परस्पर संबंधाची मर्यादा किती ठेवावी व किती ठेवू नये हे कोण ठरवणार? गंगा आणि यमुना यांचा संबंध होतो त्या ठिकाणी काळसर पाणी ते काळसरच व पांढुरके ते पांढुरकेच दिसते. पाणी आपला रंग काही बदलीत नाही. पण कोणत्या ठिकाणी यमुनेच्या पाण्याने गंगेच्या पाण्याला आत घेऊ नये, उलट कोणत्या ठिकाणी गंगेच्या पाण्याने यमुनेच्या पाण्याला आत घेऊ नये, अशी मर्यादा कोणी घालून देऊ शकेल काय? त्याच रीतीने पार्नेलने अत्याचारी शेतकऱ्यांशी किंवा अत्याचारी शेतकऱ्यानी पार्नेलशी कोणत्या मर्यादेपर्यंत संबंध ठेवावा याचा लेखी नियम करणे किंवा मर्यादा घालणे शक्य नव्हते.

शेतकऱ्यांची अशी खात्री की पार्लमेंटातील पार्नेलची सनदशीर चळवळ फुकट आहे. व पार्नेलची अशी खात्री की जुलूमी जमीनदारांचे कितीहि खून पडले तरी त्या दोन्ही वर्गाचे संबंध जुने जाऊन नवे काही व्हावयाचे तर पार्लमेंटात बिल येऊन त्याचा प्रत्यक्ष कायदा बनल्याशिवाय होणे नाही. तथापि कोणताही एक प्रयत्न स्वतंत्रपणे यशस्वी म्हणजे पूर्णफलदायी होऊ शकत नाही हे दोघानाहि दिसून येत होते. आणि केवळ स्वभावाप्रमाणे किंवा परिस्थितीप्रमाणे कोणी पार्नेलसारखा इकडे लँग लीगचा सभासद होऊन पार्लमेंटात जाऊन अडवणूक करी, कोणी मायकेलसारखा मनुष्य पार्लमेंटच्या निवडणुकीच्या भानगडीत न पडता स्वतः शेतकरी नसताहि शेतकऱ्यांचा जमीनदाराविरुद्ध पाठपुरावा करी आणि अमेरिकेहून पैसा व हत्यारे आणून त्याना पुरवी, तर कोणी स्वतः शेतकरी म्हणून जमीनदारांच्या जुलूमाला हातात दंडा किंवा हत्यार घेऊन प्रति-

कारालà उभा राही. या तिघांचाहि हेतु एकच म्हणून ते तिघेहि लँड लीगचे सभासद होत. पण त्यांची प्रत्यक्ष कार्ये वेगवेगळ्या स्वरूपाची असत. तथापि पार्लमेंटातील अडवणुकीबद्दल शेतकरी हा जसा जबाबदार नाही किंवा त्याला शिक्षा नाही, त्याच न्यायाने एखाद्या गांजलेल्या शेतकऱ्याने आत्मसंरक्षणासाठी किंवा सूड घेण्यासाठी अत्याचार केला तर त्याकरिता पार्नेल हा जबाबदार धरला जाऊ नये हे न्यायाचेच ठरेल. पण आपल्या प्रतिपक्षाची जबाबदारी वास्तविक असते त्याहून मोठी मानणे करून दाखविणे, नसते दोष किंवा गुन्हे त्याच्या गळी बांधणे, साधली तर त्याला त्याकरिता शिक्षा देऊन निकामी करणे, व ते न साधले तर त्याच्याबद्दल नुसता गवगवा किंवा गैरसमज तरी पिकवून ठेवणे, हे सरकार आपले काम असे समजत असे. पार्नेल व लँड लीग हे विषय अप्रिय व गैर-सोईचे असल्याने ब्रिटिश प्रधानमंडळाचा नेहमी त्याला संकटात आणण्याचा प्रयत्न असे.

अशा कामी विशिष्ट वर्तमानपत्रांची मदत प्रधानमंडळाला हिंदुस्थाना-प्रमाणे इंग्लंडातहि होती. लंडन टाइम्स हे विलायतेतील प्रमुख वर्तमानपत्र व ते आयरिश राष्ट्राला व राष्ट्रीय पक्षाला पाण्यात पाहणारे. त्यामुळे त्याने लँड लीगच्या स्थापनेपासून त्यावर हल्ले चढविण्याला सुरवात केली होती. टाइम्सने १८८७ साली आयर्लंडातील राष्ट्रीयपक्षा विरुद्ध एक लेखमाला सुरू केली. त्या मालेचा मथळा ‘ पार्नेलची चळवळ व आयर्लंडातील अत्याचार ’ असा होता. या मालेमध्ये लँड लीग तिचे पुरस्कर्ते व अनुयायी यांच्या विरुद्ध वाटतील ते खोटे नाटे आरोप करण्यात आले होते. जो खरा झाला असेल तो गुन्हा यांच्या पदरी, झाला नसेल तोहि गुन्हा यांच्या पदरी. आणि कोणी तिऱ्हाईताने केला असला तरी त्याच्या पापाचे धनी हेच. टाइम्स म्हणजे अस्सल कॉन्झर्व्हेटिव्ह पत्र. इंग्रज जमीनदारांचा तो कट्टा वकील. आणि आयरिश जनतेविषयी त्याच्या मनात पक्का द्वेष. पण कोण-त्याहि जनतेला दोष द्यावयाचा तर तो पुढाऱ्यांच्या नावाने देणे फार सोईचे असते. जनतेचा पुढारीपणा हेच सरकारच्या व सरकारी बगलबच्चांच्या रागाचे सहजच कारण होते. आयर्लंडामध्ये यावेळी अत्याचार होत नव्हते असे नाही. पण त्याचे कारण पूर्वी सांगितल्याप्रमाणे जुलमी जमीनदारांचा छळ. आयरिश शेतकऱ्याला खायला अन्न नाही, अंगावर वस्त्र नाही, निजायला अंथरूण नाही, पोरे भुकेने व्याकूळ, गुरे रोडकी, तात्पर्य आयरिश शेतकरी म्हटला म्हणजे तो दुःख व दुर्दशा यांचा मूर्तिमंत पुतळा होऊन राहिलेला. आणि आपल्या या स्थितीला खरे जबा-बदार इंग्रज जमीनदार व त्यांचे पगारी नोकर ही गोष्ट या दुःखी शेतकऱ्याला कळून चुकलेली. यामुळे छळाचे नेहमी जे पर्यवसान होते ते आयर्लंडामध्ये सुरू होते. म्हणूनच मधून मधून अत्याचारहि होत ही गोष्ट खरी. पण आयरिश पुढारी या अत्याचाराचा दोष जसे जमिनदारी पद्धतीवर लादीत होते, त्याच प्रमाणे टाइम्स पत्र या अत्याचारांचा सर्व दोष लँड लीग व पार्नेलची चळवळ यावर लादीत

असे. आणि हे सिद्ध करण्याकरिता ही लेखमाला सुरू होती. पण शिंतोडे उडवावयाचे म्हटले तरी कोरडे शिंतोडे उडविता येत नाहीत. ते ओले असावे लागतात. त्याचप्रमाणे पार्नेलवर दोषारोप करावयाचे तर त्याला काही तरी पुरावा पाहिजे एरवी दोषारोप लागू कसा पडणार ? पण वाईट विचार सुचू लागले म्हणजे वाईट साधनेहि सुचू लागतात. तसे याहि ठिकाणी घडले. टाइम्सची लेखमाला जोरात आली आहे असे पाहून, एका कलमबहाद्दर गड्याला अशी कल्पना सुचली की, पार्नेलची खोटी सही घालून काही बनावट पत्रे तयार करावी व ती टाइम्सला विकून पैसे मिळवावे. टाइम्सचे म्हणणे असे होते की पार्नेल वगैरे लॅंडलीगचे लोकच खून वगैरेना उत्तेजन देतात पैसा पुरवतात. अर्थात् बनावट पत्रे करणाऱ्याला हा विषय सोईचा वाटला. यापूर्वी पाच वर्षे फिनिक्स पार्कमध्ये दोघा इंग्रजी अधिकाऱ्यांचे खून झाले होते. सुमारे एक वर्षानंतर खुनी लोक सापडले व त्याना शिक्षाहि झाल्या. खून झाल्याची बातमी ऐकून पार्नेलला अतिशय वाईट वाटले. आणि या अत्याचाराचा परिणाम आपल्या या चळवळीवर फार वाईट होईल ही गोष्ट त्याच्या लक्षात आली. 'अशा गोष्टी घडणार असतील तर आपण ही चळवळ टाकून देऊ' असेहि त्याने खासगी व जाहीर रीतीने उद्गार काढले. आणि एका ग्रंथकर्त्याने तर असेहि लिहिले आहे की 'अत्याचारांच्या निषेधाबद्दल सतत बोललो तर आपला एखादेवेळी खून होईल अशी पार्नेल याला भीति वाटत असे व यामुळे आपल्या खिशात तो पिस्तुलहि बाळगी ! त्याचा निषेध अतिशय तीव्र व कळकळीचा होता व त्याने खुद्द ग्लॅडस्टनला लिहून कळविले होते की "अशा गोष्टी घडतात यामुळे मी राजकारण सोडून द्यावे असा तुमचा सल्ला असला तर मी तसेहि करणार आहे." पण स्वतः ग्लॅडस्टननेच त्याला उलट असे कळविले की "असे करणे चांगले नव्हे. त्यापासून अत्याचार काही थांबणार नाहीत. पण तुम्ही पुढारीपण सोडल्याने अशा तुमच्या सारख्याचा जो थोडा दाब असतो तो मात्र निघून जाईल." खुनी लोकांचे जाबजबाब झाले सर्व काही झाले. पण त्यात पार्नेल प्रभृति लोकांचा काही एक संबंध उमटला नाही कारण तो मुळी नव्हताच. ह्या खुनामुळे दडपशाहीचे बिल प्रधान मंडळाकडून पार्लमेंटपुढे आणले गेले. त्याला पार्नेल वगैरेनी अर्थात विरोध केला. आणि १८ सभासदाना अध्यक्षानी 'गैरशिस्त वर्तन करणारे' म्हणून काढून लाविले. या विरोधाच्या वेळी आयर्लंडातील अत्याचारांचे रसभरित वर्णन सरकारतर्फे करण्यात आले. पण त्यात पार्नेल प्रभृति लोकावर दोषारोप करण्यात आले नव्हते हीहि गोष्ट लक्षात ठेविली पाहिजे. इकडे बिलाला विरोध केला पण त्या बरोबर पार्नेलने अत्याचारी लोकाविरुद्ध जाहीर रीतीने निषेध चालविला. स्वतः त्याची बहीण त्याच्याहिपेक्षा अत्यंत जहाल व भावनाप्रधान होती. तिचा व इतर आयरिश बायांचा एक स्त्रीसंघ होता. आणि यातील काही स्त्रिया गुप्तपणाने

शेतकरी लोकाना हत्यारे वगैरे पुरवीत असत असे पार्नेल यांस कळल्यावरून त्याने या क्लबाला मिळणारी सर्व वर्गणी बंद करविली व क्लब मोडून टाकविला.

तात्पर्य अशा रीतीने एखाद्या पुढाऱ्याला जितक्या गोष्टी अत्याचाराविरुद्ध खाजगी रीतीने करिता येतील तितक्या त्याने केल्या. पण प्रधानमंडळाचे कैवारी व टाइम्स सारखी पत्रे यांची बडबड चालूच असे की पार्नेल वगैरे लोक हेच अत्याचाराचे खरे उत्पादक होत व त्यांची अत्याचारी लोकाना सहानूभूति व मदत असते. आणि याच अर्थाचीहि लेखमाला सुरू होती. ही संधि साधून पिगट नावाच्या एका साक्षर बदमाषाने पार्नेलच्या सहीची काही बनावट पत्रे तयार केली आणि त्यांची बातमी टाइम्सच्या कानावर घालविली. आपल्या लेखमालेला जोर येण्याला अशा पत्रांचा उपयोग अतिशय होईल, व असल्या एका पत्राने जे काम होईल ते इतर वीस लेखानी होणार नाही किंवा प्रधान मंडळाच्या पार्लमेंटरी निषेधानेहि होणार नाही असे टाइम्सला वाटून, ईषणेला बळी पडून टाइम्सने ती पत्रे फार मोठी किंमत देऊन विकत घेतली. १८८२ प्रमाणे १८८७ साली दडपशाहीचे काही कायदे पार्लमेंटात घाटत होते. आणि बिलाच्या दुसऱ्या वाचनाचे वेळी आयरिश सभासदांचा विरोध सुरू होता. अशा वेळी टाइम्सने पार्नेलच्या सहीचे म्हणून एक पत्र त्याचा अस्सल छाप बनवून १८ एप्रिल १८८७ च्या अंकात प्रसिद्ध केले. ते पत्र खाली दिल्याप्रमाणेः—

१५ एप्रिल १८८२

" वि. वि. तुमच्या स्नेह्याचा मजवर राग झाला असे तुम्ही लिहिता पण त्याचे मला आश्चर्य वाटत नाही. पण आम्हाला तरी खुनांचा निषेध करण्याशिवाय दुसरा कोणता मार्ग मोकळा होता ? याचा तुम्ही व त्यानीहि विचार करावयाला पाहिजे. खुनाचा ताबडतोब व स्पष्ट निषेध करणे हेच त्यावेळी आम्हाला योग्य असे धोरण नव्हते काय ? पण तुम्ही कृपा करून त्यानाहि व इतराना कळवा की लॉर्ड कॅव्हेन्डिश यांचा खून झाल्याबद्दल जरी मला फार वाईट वाटते तरी बर्क याचा खून झाल्याबद्दल मला वाईट वाटत नाही. कारण त्याला झाले ते शासन योग्यच होते. तुम्ही हे पत्र तुमच्या स्नेह्याना दाखवा. तसेच ज्या इतर कोणाला ते विश्वासाने दाखविता येईल त्यानाहि ते दाखवा. मात्र माझा खाजगी पत्ता त्याना सांगू नका. त्याना पत्र लिहावयाचे तर ते मला त्यानी पार्लमेंटच्या पत्त्यावर लिहावे. "

हें पत्र सहजच खरे वाटण्यासारखे होते. कारण फिनिक्स पार्कमधील खून झाल्यानंतरची तारिख त्यावर होती. पत्रातील मजकूर किती सूचक होता हे वेगळे सांगावयासच नको. आणि तसे ते बनविण्याचे कारण हे की पाचसहा आठवड्यापूर्वी टाइम्समध्ये पार्नेल विरुद्ध जो एक लेख आला होता. त्यात असे म्हटले होते की " १८८२ साली ग्लॅडस्टन साहेबानी पार्नेल वगैरेना तुरुंगातून सोडले ही चूक केली. कारण सुटका होताच 'आर्जिक्य' हे नाव धारण कर-

णाऱ्या खुनी टोळीच्या पुढाऱ्याशी पार्नेलने खलबते केली. अर्थात् या टोळीच्या चळवळी काय चालल्या आहेत आणि त्यानी कोणाचे खून करण्याचे योजिले याची बातमी पार्नेलला होती. " अशा प्रकारची पत्रे प्रसिद्ध झाल्यावर मग काय विचारता ? ज्याने त्याने पार्नेलवर एवढा डोळा केला. पण ' ज्याला कर नाही त्याला डर कुठली ?' या न्यायाने पार्नेलने ती गोष्ट प्रथम तुच्छता दर्शवून नुसत्या धिःकारावरच घालविली. त्याने दडपशाहीच्या बिलाना विरोध करताना जाहीर रीतीने असे सांगितले की टाइम्समधील पत्र सर्वस्वी बनावट आहे. पण हे त्याचे बोलणे प्रधानमंडळाने उघडपणे त्याला हसूनच निकालात काढले. त्यांच्या हसण्याच्या अर्थ असा की "लंडन टाइम्ससारखे अनुभविक कसलेले धंदेवाईक जबाबदार पत्रकार हे पुरी खात्री करून घेतल्याशिवाय बेअब्रूकारक पत्रे कधीहि छापणार नाहीत. पार्नेल हाच खरा बदमाष. कारण करून सवरून वरती तो परत निषेधाला तयार. पण त्याने एकवेळ त्यांचा निर्ढावलेला निर्लज्जपणा मात्र प्रगट होतो टाइम्सचे काहीच वाकडे होत नाही." मुख्य प्रधान लॉर्ड सॅलिस्बरी यानी या पत्रावर विश्वास ठेविला आणि बोलता बोलता ते असेहि वाक्य बोलून गेले की "पार्नेलच्या स्नेह्याच्या स्नेह्यानी बर्कचा खून केला ही गोष्ट आता पार्लमेंटला कळलेली आहे." 'पार्नेलच्या स्नेह्याच्या स्नेह्यानी' खून केला या शब्दांचा अर्थ अगदी उघडच होता. तो असा की पार्नेलला ह्या खुनाची पक्की माहिती होती. पण लॉर्ड सॅलिस्बरी हे नुसत्या पार्नेलचा निषेध करून थांबले नव्हते. त्यानी निषेधाचा पेंड खुद्द ग्लॅडस्टनसाहेबांपर्यंत पोचविला. कारण ग्लॅडस्टनसाहेब यानी पार्नेलचा स्नेह संपादिला होता ! पार्नेलचा स्नेही कोणी एक क्ष आणि त्याचा स्नेही बर्कचा खून करणार. अर्थात ग्लॅडस्टन हा खुनी मनुष्याचा एक प्रकारे चुलत भाऊ झाला. "जगाच्या इतिहासात मुख्य प्रधानाच्या जागी असणाऱ्या किंवा येणाऱ्या मुत्सद्याने अशा खुनी मनुष्याच्या स्नेही मनुष्याशी स्नेह ठेविल्याचे उदाहरण क्वचितच सांपडेल!"

अशा रीतीने टाइम्समध्ये छापलेल्या पत्राने आपले आगलावे काम केले. पण मग लोक सहजच विचारू लागले की, "पत्र बनावट आहे अशी जर स्वतः पार्नेल याची खात्री होती तर तो अब्रूनुकसानीबद्दल टाइम्सवर एकदम फिर्याद का करीत नाही ?" या प्रश्नाचे उत्तर जॉन मोर्ले यानी दिले आहे ते फार बोधप्रद आहे. ते लिहितातः—" पार्नेलने फिर्याद करावयाची तर स्वाभाविकपणे लंडन येथील कोर्टात व लंडन शहरच्या ज्यूरीपुढे. आणि लंडनमधील कोणतेहि १२ लोक घेतले असता ते पार्नेलच्या विरुद्ध निकाल देणार ही गोष्ट एखाद्या पोरानेहि झोपेतून सांगितली असती. इतकी इंग्रज लोकांची मने पार्नेलविरुद्ध झाली होती. बरे लंडनमध्ये फिर्याद न करिता आयर्लंडमध्ये केली तरी तेथेहि टाइम्सपत्र प्रसिद्ध केले जाते. पण तिकडूनहि उलटी अडचण अशी की, कोणत्याहि १२ आयरिश लोकांची ज्यूरी टाइम्सविरुद्ध व पार्नेलच्या तर्फे निकाल देणार ही गोष्ट देखील एखाद्या पोरानेहि तशीच सांगितली असती. इतकी आयरिश लोकांची मने इंग्रजा-

विरुद्ध बिथरली होती. असा हा दुहेरी कोलदांडा होता. पार्नेलच्यातर्फे पहावयाचे तर लंडनमध्ये फिर्याद करून फुकट. एक तर निकाल हटकून विरुद्ध व्हावयाचा आणि बनावट पत्रे खरी ठरून जावयाची. उलट डब्लिनमध्ये फिर्याद केली तरी फुकट. कारण पार्नेलला जय मिळाला तरी लोक म्हणणार बोलून चालून ज्यूरी पार्नेलसारखा निकाल देणार." अशा रीतीने फिर्यादीचा मार्ग हा व्यर्थ ठरला. आणि या फिर्यादीच्या कामावर एक पौंड देखील खर्च करू नये असे मोर्ले प्रभृति स्नेह्यानी पार्नेलला सांगितले.

पण या प्रकरणाला पुढे एका वेगळ्या रीतीने तोंड फुटले. टाइम्समधील लेखमालेविरुद्ध पार्नेलने फिर्याद केली नाही तरी, आयरिश पक्षातील एक गृहस्थ ओडोनेल याने टाइम्सवर आपली बदनामी झाल्याची फिर्याद केली. त्यात कैफियत देताना टाइम्सने असे सांगितले की, "ही लेखमाला लिहिताना आमच्या मनात हल्लीचे फिर्यादी मुळीच नव्हते असे आम्ही जाहीर रीतीने सांगावयास तयार आहो." आणि ज्यूरीनेहि असा निकाल दिला की हा फिर्यादी या लेखमालेतील विधाने स्वतःवर ओढून घेत आहे. पण टाइम्सपत्राच्या बॅरिस्टराने फिरून भाषण करिताना नसती कुरापत काढून असे म्हटले की, "ओडोनेल यांच्याविरुद्ध आमचे काही म्हणणे नसले तरी, आयरिश पक्षाविरुद्ध आमचे म्हणणे खरेच होते. इतकेच नव्हे तर पार्नेलचे म्हणून जे पत्र प्रसिद्ध झाले ते खरेच आहे." अशा अर्थाचा टाइम्सने काही पुरावाहि दिला. आणि भरीला भर म्हणून पिगटकडून विकत घेतलेली इतर अशीच आणखी काही बनावट पत्रे होती तीहि टाइम्सने छापिली. पूर्वीचे पत्र छापले असता 'पार्नेलने फिर्याद वगैरे काही केले नाही याचा अर्थ पार्नेलचे मन त्याला खात होते आणि बेअब्रूची फिर्याद करण्याची त्याला छाती होत नव्हती' या विचाराने पिगटला आणखी पत्रे बनावट करण्याला व टाइम्सला त्या पत्रांचा उपयोग करण्याला अधिक धैर्य आले होते.

एका वर्षानंतर फिरून तोच बदनामीचा प्रकार सुरू झालेला पाहून, पार्नेलला असे दिसून आले की काही तरी इलाज आपण केलाच पाहिजे. कोणाकडून तरी आपल्या आरोपाची चौकशी करविली पाहिजे. नाही तर टाइम्समधील सर्व पत्रे खरी असाच लोकांचा कायमचा ग्रह होऊन बसेल. म्हणून तारीख ६ जुलै १८८८ रोजी पार्नेलने प्रधान मंडळाला असे सुचविले की, पार्लमेंटच्या सभासदावर ज्या अर्थी विशेष प्रकारचे आरोप करण्यात आले आहेत, त्या अर्थी पार्लमेंटने एक सिलेक्ट कमिटी नेमून ही चौकशी करावी. पण प्रधान मंडळाने ही गोष्ट नाकारली. तेव्हा ही सूचना स्वतः पुढे आणण्याची नोटिस पार्नेलने दिली. तेव्हा उलट उत्तर म्हणून प्रधान मंडळाने असे सांगितले की, "आम्ही सिलेक्ट कमिटी नेमू इच्छित नाही. पण तीन स्वतंत्र न्यायाधीश चौकशीला नेमण्याला तयार आहो. मात्र ह्या कमिशनपुढे नुसत्या टाइम्समधील पत्रांची चौकशी होईल

असे नाही, तर ज्या लेखमालेच्या समर्थनार्थ ही पत्रे प्रसिद्ध झाली होती त्या लेखमालेत जितक्या लोकांविरुद्ध जितके आक्षेप आणण्यात आले आहेत त्या सर्वांची चौकशी एकत्र होईल." हे प्रथम पार्नेलला कबूल असेल तर हे कमिशन आम्ही नेमू असा बहाणा प्रधान मंडळाने केला. आणि पार्नेल ही गोष्ट कबूल करीत नाही असे दिसताच, यात काही तरी पाणी मुरते आहे असे समजून, प्रधानमंडळाने जी गोष्ट पार्नेलला 'देऊ केली' ती नाकबूल झाल्यावर त्याच्यावर 'लादण्याचे' ठरविले. कमिशनच्या या योजनेला पार्लमेंटरी बिलाचे स्वरूप देण्यात आले होते. कारण न्यायाधीश एरवी कायदेशीर अधिकारी करे होणार? पार्नेल व त्याचे मित्र यानी या बिलाला विरोध केला. त्यांचे म्हणणे असे की, " आम्ही मागितले एक आणि आम्हावर लादले जात आहे भलतेच. एकंदरीने लँडलीगची चळवळ कशी होती याविषयी टाइम्सने काय वाटेल ते लिहिले पण आम्ही तक्रार केली नाही. आणि त्याची आज आम्हाला चौकशीहि नको आहे. कारण टाइम्सचे या बाबतीतले आक्षेप कोणी खरे मानले तरी आमचे काही बिघडत नाही. ते सोसण्याला आम्ही तयार आहो. पण प्रत्यक्ष खुनाला उत्तेजन देणे हा आरोप असा तसा नाही. तो आरोप व्यक्तिशः काही पत्रव्यवहारातील आधारानेच करण्यात आला आहे. म्हणून फक्त तीं पत्रे खरी की खोटी इतकी चौकशी पार्लमेंटने करावी. एरवीची चळवळ व एरवीचा वाद हा पार्लमेंटमधील आपला नित्याचाच आहे." परंतु प्रधान मंडळाने या तक्रारीला न जुमानता बिल पास केले व कमिशन नेमले आणि चौकशीला सुरवात झाली. अर्थात पार्नेल व इतर आयरिश सभासद याना प्रतिवादी होऊन या चौकशीत सामील व्हावे लागले. प्रधान मंडळाचा डाव असा होता की एकंदर आयरिश चळवळीची चौकशी उपस्थित झाली म्हणजे एखाद्या ना एखाद्या प्रतिवादीवर अत्याचाराचा संसर्ग कोठून ना कोठून तरी चिकटेल आणि त्याच्या संपर्काने इतर प्रतिवादी आपोआपच खोटे ठरतील. कारण सर्वांचे हेतू व कार्य एकच असल्यामुळे एकाची जबाबदारी ती दुसऱ्याची जबाबदारीच आहे. या कमिशनच्या कार्याचा व्याप केवढा वाढला हे लक्षात येण्याला एवढे सांगितले असता पुरे की कमिशनची बैठक १८ सप्टेंबर १८८८ पासून २२ नोव्हेंबर १८८९पर्यंत सुरू होती. यापैकी प्रत्यक्ष काम १२८ दिवस चालले. साक्षीदारांची संख्या ४५० वर गेली. तीन वकीलांची भाषणे मिळून एकसारखी २४ दिवस चालू होती. पुराव्याच्या कागदाचे ११ मोठमोठे ग्रंथ बनले. आणि त्याच्या परिशिष्टांची संख्या सुमारे ८००० भरली. आणि साक्षीदाराना विचारलेल्या प्रश्नांची संख्या सुमारे ९८,००० होती. एकंदर १२ मुद्दे चौकशीला निघाले होते. त्यातील ३ पार्नेलच्या विषयीचे असून बाकीच्या ९ चा कटाक्ष असा होता की सर्व आयर्लंडभर मिळून पुढारी अनुयायी सहचर सहकारी स्नेही सोबती संबंधी संसर्गी सर्व लोकांचा मिळून एक गुप्त कट आहे. आणि त्या कटामुळे आयर्लंडमध्ये अत्याचार घडून येतात. वास्तविक हे

कमिशन टाइम्सच्या लेखांवरून उद्भवले. पण कमिशनची नेमणूक सरकारकडून झाल्यामुळे फिर्यादीतर्फेचे काम हे मुख्यतः आपलेच आहे असा बाहणा प्रधान मंडळाला करिता आला. आणि टाइम्सतर्फे पुराव्याची वगैरेची जी जी खटपट झाली ती सर्व सरकारने स्वतः केली. प्रगट पोलिस गुप्त पोलिस चहाडखोर हस्तक सरकारी अधिकारी ऑनररी मॅजिस्ट्रेट शेरीफ–तात्पर्य जितक्या लोकांकडून पुराव्याचे कामी मदत मिळण्यासारखी होती तितक्यांच्या कडून सरकारने ती देवबून नाही नाही तेथून म्हणजे अमेरिकेसारख्या परदेशातूनहि मिळतील ते साक्षीदार सरकारने आणविले व कमिशनपुढे उभे केले. पार्नेलविरुद्ध पत्रे प्रथम बाजूलाच राहिली. आणि लँडलीगच्या चळवळीच्या इतिहासापासूनच पुराव्याला सुरवात झाली. पार्नेलविरुद्ध जो काही प्रत्यक्ष तोंडी पुरावा म्हणून आला तो कमिशनच्या ४४ व्या बैठकीत! या दिवशी आयरिश चळवळीत गुप्त रूपाने आपण राहून कटवाल्यांचे सर्व बेत ऐकत होतो असे सांगणारा एक पोलिसवजा मनुष्य अमेरिकेतून साक्ष देण्याला आला. पण त्याने सांगितले ते इतकेच की "१८८१ साली एके दिवशी मी पार्लमेंटच्या सभागृहाजवळच्या दालनात उभा होतो. तेथे पार्नेलची व माझी गाठ पडली. पार्नेल मला म्हणाला की आयर्लंडमधील फिनीअन म्हणजे अत्याचारी लोक आमच्या सनदशीर पार्लमेंटरी चळवळीत सामील होतील अशी गोष्ट मला घडवून आणावयाची आहे तरी अमेरिकेतील कटवाल्याच्या मुख्य पुढाऱ्याला तुम्ही आयर्लंडात बोलवा व त्याची माझी गांठ घालून द्या. कारण त्याची खात्री करून देऊन इकडील अत्याचारी लोकांचे मन या सनदशीर चळवळीकडे वळवावयाचे आहे. त्याच्या सांगण्यानेच ते ऐकतील. पण चमत्कार हा की पार्नेलशी असे ते बोलणे झाले असताहि या गुप्त हेराने पुढे त्याविषयी काहीच केले नाही आणि प्रकरण तितकेच राहिले. स्वतः पार्नेलला कमिशनने विचारले तेव्हा त्याने सांगितले की "अशा एखाद्या गृहस्थाशी अशा विषयावर माझे संभाषण कदाचित झालेहि असेल. पण मला पक्के असे काहीच स्मरत नाही. आणि या मुद्यावर कमिशननेहि पुढे इतकेच लिहिले की पार्नेल आणि हा गृहस्थ यांच्या दरम्यान ही भेट व हे संभाषण झाले असेल असे दिसते. आणि पार्नेलच्या भाषणावरून या साक्षीदाराचा कदाचित असा ग्रह झाला असेल की पार्नेल हा उघडपणे अत्याचाराचा निषेध करीत नाही." पण केवढया मोठ्या कटाचा केवढा आरोप आणि त्याला तोंडी पुरावा हा इतका! जॉन मोर्ले यांचे म्हणणे असे की ही भेट खरी म्हटली तरी इतकेच संभवनीय दिसते की तो गृहस्थ बोलला आणि पार्नेलने नुसते त्याचे म्हणणे ऐकून घेतले. कारण पार्नेलच्या स्वभावाचे त्याच्या चरित्रग्रंथकाराने या बाबतीत वर्णन केले ते असे की 'सनदशीर चळवळ करणारे लोक व अत्याचारी यांचे मध्ये एक प्रकारची झुंझ लागून राहिलेली असे. अत्याचारी लोकांची व पार्नेलची गाठ पडली असता तो त्याच्याशी हुजत घालीत बसत नसे. त्यानी

बोलावे व याने फक्त ऐकून घ्यावे आणि आपल्याला काय हवे इतकेच त्यांच्यापुढे मांडावे असे घडे. पार्नेल लँग लीगकरिता वर्गणी गोळा करण्याला गेला त्यावेळी त्याच्यावर असे प्रसंग फार आले. कारण आयर्लंडात व अमेरिकेत देशभक्त पुष्कळ पण सनदशीर चळवळीचा भोक्ता एकहि नव्हता. अशा लोकांशी बोलण्याचा प्रसंग आला म्हणजे ते पार्नेलला जवळजवळ वेड्यात काढीत आणि आपल्या गुप्त चळवळीला येऊन मिळण्याविषयी सांगून पाहात. पण त्याना दाद न देता त्यांच्याशी हुजत न घालिता तो आपल्या प्रस्तुत कार्यापुरता त्यांच्याशी बोले. पार्नेलविरुद्ध वर सांगितलेला एवढाच तोंडी पुरावा.

कमिशनच्या ५० व्या बैठकीच्या दिवशी टाइम्समध्ये प्रसिद्ध केलेल्या बनावट पत्राबद्दल पुरावा सुरू झाला. प्रथम टाइम्सच्या व्यवस्थापकानी ही पत्रे आपणाला कोठून कशी मिळाली व त्याकरिता आपण २५०० पौंड कसे दिले वगैरे सांगितले. नंतर एक तज्ज्ञ बोलावून पत्रावरील सहीचे अक्षर हे पार्नेलचे असावे असे शाबीत करण्याचा प्रयत्न झाला. शेवटी मूळ ज्या गृहस्थाकडून पत्रे मिळाली त्याला पुढे आणणे भाग पडले; कारण मनुष्य जिवंत होता व पुढे येण्याला कबूल होता. असा साक्षीदार पुढे येऊन तो टिकला म्हणजे फिर्यादीचे काम झाले असे समजून पिगट याची साक्ष घेण्यात आली. पिगट याने तारीख २१ फेब्रुवारी रोजी पुढे येऊन जबानी दिली. पण आयरिश पक्षाचे बॅरिस्टर सर चार्लस रसेल यांच्या उलट तपासणीत तो कोसळला. त्याने लॉ बुशेरपुढे आपण पत्रे बनावट केल्याची कबुली लिहून दिली. आणि कोर्टाचे समन्स असता ते चुकवून तो स्पेन देशाला पळून गेला पोलिसाना पाहताच तुम्ही बाहेर बसा मी येतो असे सांगून तो आत गेला. आणि पिस्तुलाने त्याने कपाळमोक्ष करून घेतला. अशा रीतीने पार्नेलविरुद्ध टाइम्सने प्रसिद्ध केलेली पत्रे बनावट ठरली आणि अत्याचारी लोकाना सहानुभूति दाखविल्याचा लेखी म्हणून जो पुरावा पुढे आला होता तो फुकट गेला. तरीहि अर्थात कमिशनचे काम पुढे चालूच होते. आणि तारीख १३ फेब्रुवारी १८९० रोजी कमिशनचा रिपोर्ट पार्लमेंटपुढे दाखल करण्यात आला. कमिशनने निरनिराळ्या मुद्यावर काय काय निकाल दिला हे येथे थोडक्यात सांगितले असता हे एकंदर प्रकरण काय होते आरोप कसले होते त्यातून पार्नेल कशा रीतीने बाहेर पडला आणि कोणते दोषारोप त्याच्यावर चिकटले हे लक्षात येईल. कमिशनच्या निर्णयाचा सारांश खालीलप्रमाणेः—

( १ ) प्रतिवादी पार्लमेंटचे सभासद हे आयर्लंडला स्वातंत्र्य मिळविणारांच्या कटात सामील नव्हते. पण त्यातील काही व मायकेल डेव्हिड यानी आयरिश लँड–लीग स्थापन केली. आणि त्यांचा मात्र हेतू आयर्लंडला स्वातंत्र्य मिळवून देण्याचा होता.

( २ ) प्रतिवादी यानी असे ठरविले होते की जमीनदाराना धाक दाखवून व बळजबरी करून शेतकरी लोकांची चळवळ चालवावयाची, आणि इंग्रजी

जमीनदाराना खंड देण्याचे थांबवून त्याना भिकेला लावून इंग्लंडला परत पाठवावयाचे. लँड–लीग स्थापणारांचा व तिचे सभासद होणारांचा या बाबतीत कट होता.

( ३ ) प्रतिवादीवर एक आरोप असा होता की, सोईप्रमाणे ते अत्याचाराचा निषेध करीत आणि फिरून आम्ही निषेध केला तो खऱ्या मनाने नव्हे असेहि अत्याचारी लोकाना सांगत. परंतु हे आरोप खोटे आहेत. पार्नेलच्या सहीचे पत्र बनावट होते. आणि फिनिक्स पार्कमधील खुनाचा त्याने व इतरानी जो निषेध केला तो खऱ्या मनाचाच होता.

( ४ ) 'आयरिश वर्ल्ड' नांवाचे पत्र प्रतिवादीने काढून चालविले त्याचा हेतू राजद्रोह पसरविण्याचा फैलावण्याचा व राजद्रोहाचे गुन्हे करविण्याचा होता.

( ५ ) प्रतिवादीनी प्रत्यक्ष गुन्हेगाराना चिथावणी कधीहि दिली नव्हती. पण इंग्रज लोकाना धाक बसेल अशी कृत्ये करणारानाहि ते उत्तेजन देत व त्या उत्तेजनाचा परिणाम खुनात होई. पण कोणताहि गुन्हा करणाराला पैसे देऊन वगैरे मदत केली ही गोष्ट मुळीच शाबित झाली नाही.

( ६ ) प्रतिवादीनी गुन्हे थांबविण्याचे प्रयत्न केले नव्हते असा त्यांचेवर आरोप होता. पण आम्ही असा निर्णय देतो की, कित्येक प्रतिवादी व विशेषतः मायकेल डेव्हिट यानी अत्याचारांचा निषेध केला होता तो खऱ्या मनाचा होता. पण धाक दपटशाहीचा परिणाम खुनात होई तरी धाक दपटशाही करणारांचे प्रयत्न थांबविण्याचे प्रयत्न केले नव्हते. आणि धाकाचा परिणाम गुन्ह्यातच होतो हे त्याना माहीत होते.

( ७ ) प्रतिवादीनी गुन्हेगारांचा कोर्टात बचाव करण्याकरिता मदत केली ही गोष्ट खरी. तसेच तुरुंगात जाणाऱ्या लोकांच्या कुटुंबाना त्यांच्या पश्चात् पैशाची मदत देऊन जगविले हेहि खरे. पण गुन्हेगारांचा सत्कार करणे किंवा त्याना पळून जाण्याला मदत करणे अशा गोष्टीना त्यानी पैशाची मदत केली हे आरोप खरे नाहीत.

( ८ ) ज्या गुन्हेगाराना गुन्हेगारीत जखमा वगैरे झाल्या व ज्यांच्या कामगिऱ्या वगैरे बुडाल्या त्यांची नुकसानभरपाई करण्याकरिता काही प्रतिवादीनी पैशाची मदत केली हे खरे आहे.

( ९ ) अत्याचारी लोकापासूनहि प्रतिवादीनी आपल्या कार्याला वर्गण्यांची मदत घेतली ही गोष्ट खरी आहे. तसेच ही गोष्टहि खरी आहे की अमेरिकेतील अत्याचारी पक्षाकडून आपल्या पार्लमेंटमधील चळवळीला साहाय्य मिळावे याविषयी प्रतिवादीनी त्यांच्याकडे मदत मागितली. आणि ती मदत मागत असता व मिळावी म्हणून त्यानी त्यांच्या अत्याचारांचा उघड निषेध केला नव्हता.

(१०) फिनिक्स पार्कमधील खुनी लोकाशी पार्नेल याचा आगे मागे कसलाहि संबंध नव्हता आणि हे खुनी लोक लँडलीगचे सभासद तेव्हाहि नव्हते.

हे पार्नेल कमिशन कोणत्या कारणाने नेमले गेले? त्यापुढे चौकशीचा विषय केवढा मोठा होता? पुरावा किती घेतला गेला? आणि अखेर कमिशनने निर्णय काय दिला? हा सर्व वृत्तांत लक्षात घेतला म्हणजे आयर्लंडमध्ये पार्नेलसारखे पार्लमेंटरी पुढारी व अत्याचारी पक्ष यांचा परस्पर संबंध कसा होता हे इतके स्पष्ट रीतीने वाचकाना दिसून येईल की त्यावर वेगळी टीका करण्याचे कारणच नाही. आणि जे सहृदय वाचक या वरील सर्व वृतांताचे वाचन व मनन करतील त्याना राजकारणी पुढाऱ्याला दोन्ही अंगच्या मतभेदाच्या कात्रींतून स्वतःला कसे बचावावे लागते, व हा बचाव करिता करिताहि होणाऱ्या लहान सहान जखमा व ओरखाडे कसे सोसावे लागतात, हे सहज दिसून येईल.

आता शेवटी या दोन पक्षातील संबंध खरा काय असतो हे सांगितल्यावर त्यातील पुढाऱ्यांचे एकमेकाशी प्रत्यक्ष वर्तन कसे असते हेहि थोडेसे सांगून हे प्रकरण पुरे करू. या वर्तनासंबंधाने पहिली गोष्ट सांगण्याची ती अशी की तीव्र मतभेदाचा परिणाम अखेर विद्वेषात झाल्याशिवाय कोठेहि राहात नाही. आयर्लंडातहि ही गोष्ट ठळक रीतीने दिसून आली आहे. कोणाहि पुढाऱ्याला आपले मत प्रभावी व्हावे व इतर सर्व पुढाऱ्यानी तेच ग्राह्य समजून त्याचाच अंमल करावा असे वाटणे स्वाभाविक असते. कल्पनेच्या वाऱ्याने उठलेला काहीतरी विचारतरंग म्हणून नव्हे, तर कार्याकार्य युक्तायुक्त पाहून इष्टसाधक म्हणून एखादा मार्ग ठरवून त्यावर निश्चयाचें एकीकरण त्याने केले आहे व त्या मार्गाविषयी त्याची त्या वेळेपुरती अढळ निष्ठा बनली आहे असाच अर्थ 'जबाबदार पुढाऱ्याचे मत' या शब्दांचा करावा लागतो. पण जी गोष्ट एका पुढाऱ्याची ती इतर पुढाऱ्यांचीहि असते. निष्ठेचा गुण हा देशभक्तिप्रमाणे ईश्वराने एकालाच दिलेला नसतो. यामुळे निरनिराळ्या मार्गांच्या निष्ठामध्ये कलह होतो व वेळी युद्धहि जुंपते. तसेच लोकमत व लोकप्रियता या गोष्टी पुष्कळशा नित्य स्वरूपाच्या किंवा निष्ठेच्या नसतात तर वाऱ्याने उठणाऱ्या लाटेच्या आंदोलनाप्रमाणे त्यांची गति असते. एकाच दिशेने जात असताहि लोकाना एका वेळी एक मार्ग श्रेयस्कर वाटतो व हुल्लड उठते तर दुसऱ्या वेळी दुसराच एकादा मार्ग त्याना पटू लागतो व मग त्याचीहि हुल्लड उठू लागते. आयर्लंडच्या इतिहासात अर्जापासून अत्याचारापर्यंत निरनिराळ्या वेळी निरनिराळे मार्ग लोकाना पसंत पडले व त्यावर झोड उठविली गेली. पण त्याच्या अनुषंगाने हीहि गोष्ट घडली की एक उत्सवदेवता नव्या सणाकरिता पुजारी पुढे मांडून बसला म्हणजे पूर्वीची दुसरी उत्सवदेवता तो उचलून ठेवतो. आणि ती मोडून फेकूनच न दिली तरी अडगळीत टाकून देतो व मग ती धूळखात पडते किंवा आपोआप मोडते. त्याप्रमाणे कोणताहि एकादा राजकारणाचा नवा मार्ग लोकाना पटला म्हणजे त्या

मार्गाच्या पूजकांचे त्या वेळी देव्हारे माजतात आणि जुन्या पुढाऱ्यानी पूर्वी कितीहि लौकिक मिळविला असला तरी तो विसरला जाऊन त्यांच्या सेवेविषयींची कृतज्ञताबुद्धिहि दुर्दैवाने नष्ट होते. आयर्लंडच्या इतिहासात शार्लमॉट ग्रॅटन फ्लड वुल्फटोन डानियल ओकानेल स्मिथ ओब्रायन आयझॅक बट आकॉनर. पावर पार्नेल रेडमंड मॅकस्विनी डी व्हलेरा कॉजग्रेव्ह वगैरे पुढाऱ्यांची अशीच स्थिति झाल्याचे आढळते. एक वेळी ब्रिटिश पार्लमेंटशी संबंध ठेऊन तदंकित व तदंगभूत असे आयरिश पार्लमेंट आयरिश लोकाना बरे वाटले. एक वेळी फक्त इंग्लंडच्या राजाला मान्यता द्यावी पण बाकी सर्व आयरिश कारभार स्वतंत्र चालविणारे वेगळे पार्लमेंट असावे असा ध्यास लोकानी घेतला. एक वेळी ब्रिटिश पार्लमेंटमध्ये आयझॅक बट याचे सामोपचाराचे धोरण त्याना आशाजनक म्हणून बरे वाटले. एक वेळी स्वतंत्र पार्लमेंट मिळविण्याचीच चळवळ पण ती ओकॉनेलने चालविल्याप्रमाणे ब्रिटिश पार्लमेंटच्या कायद्याने मिळविण्याची चळवळ लोकाना पसंत वाटली. एक वेळी पार्नेलच्या अडवणुकीच्या धोरणावर लोक खुष होते. एक वेळी बंडाशिवाय काही होणे नाही असे त्यांच्या मनाने घेतले. एक वेळी लँडलीगसारखी चळवळ यशस्वी करून शेतकरी वर्ग सुखी केला म्हणजे त्यात सगळे आले असा त्याना भास झाला. अशा रीतीने रत्नाच्या निरनिराळ्या अंगातून निरनिराळे रंग दिसावे त्याप्रमाणे आयरिश जनतेच्या ध्येयाची व साधनांची निरनिराळी रूपे लोकाना दिसून आली.

पण राजकारणातील विचाराची ही क्रांति होण्याला लहरी जनता व निरनिराळ्या स्वभावाचे पुढारी हे दोघेहि मिळून कारणीभूत झाले. जनतेच्या मनाचा रागरंग पाहून पुढाऱ्यानी जसे आपले धोरण बनविले तसेच त्यांचे कर्तृत्व पाहून जनतेनेहि वेळोवेळी आपली मते बदलण्याची तयारी दाखविली. पण कोणतीहि क्रांति म्हटली म्हणजे तीत नवी उत्सवमूर्ति मांडून जुनी फेकून देणे हा क्रम अबाधितच राहिला. शिवाय या मूर्तिभंगाच्या कामात नवीन नवीन पुढाऱ्यानी स्वतः हातभार लावलेला होता. याचे कारण असे की एका म्यानात दोन तलवारी एकाच वेळी मावत नाहीत त्याचप्रमाणे कोणत्याहि एका वेळी एकच राजकारणाचे धोरण प्रभावी होऊ शकते. एकाच वेळी निरनिराळी धोरणे प्रभावी होत नाहीत. यामुळे नव्या पुढाऱ्याला जुन्या पुढाऱ्याची निंदा हेटाळणी करणे प्राप्त होते, व त्याला अहंकाराची भर पडली म्हणजे मग या अनिष्ट भावना सहजच विकोपास जातात. बरे परिस्थिति व लोकमताचा रागरंग पाहून जुना पुढारी नव्याला मान देऊन त्याच्या तंत्राने वागेल व दोघे मिळून काम करतील असे म्हणावे तर मनुष्यस्वभावामुळे तेहि शक्य नसते. पण व्यक्तिला व्यक्तीने कितीहि वाईट रीतीने वागविले तरी एका समग्र वर्गाच्या मनात दुसऱ्या समग्र वर्गासंबंधाने सर्वस्वी अनादर असतो असे नाही. ही गोष्ट निरनिराळ्या प्रकारानी सिद्ध करता येईल.

पण विस्तार टाळून प्रस्तुत मुद्यापुरतेच बोलावे म्हणून आयर्लंडातील सनदशीर चळवळीचे पुरस्कर्ते अत्याचारी लोकाविषयी कसे उद्गार काढीत यांचेच फक्त काही मासले देतो. आयझॅक बट याला अत्याचारी चळवळच काय पण पार्लमेंटातील पार्नेलचे अडवणुकीचे धोरणहि मान्य नव्हते. ही अडवणूक म्हणजे व्यक्तीच्या व राष्ट्राच्या संभावितपणाला दूषण, तो केवळ ग्राम्यपणा, म्हणून त्याज्य असे मानण्यापर्यंत त्याची मजल जाई. पण या इतक्या सोंवळ्या माणसाची भावना अत्याचारी देशभक्तासंबंधाने काय होती हे त्याच्याच शब्दाने पाहू. ते सांगण्यापूर्वी आणखीहि एक गोष्ट सांगणे अवश्य ती ही की अत्याचाराचा निषेध करणारा आयझॅक बट अत्याचारी गुन्हेगारांचा ठराविक वकील असे. आणि त्याचे मवाळ धोरण मनातून पसंत नसले तरी सहानुभूतिपूर्वक केलेल्या या मदतीबद्दल अत्याचारी लोकहि त्याच्याविषयी मनात आदरबुद्धि व कृतज्ञता बाळगीत. वकिलीत आपले खरे मतच बोलून दाखविले पाहिजे असे नाही. पण पार्लमेंटच्या सभागृहात मनुष्य जे बोलेल ते तरी त्याचे व्यक्तिशः मत खरोखर असते असे घेऊन चालण्यास हरकत नाही. म्हणून आयझॅक बट याने म्हणजे या अत्यंत सोंवळ्या मुत्सद्याने पार्लमेंटमध्ये अत्याचारी देशभक्तासंबंधाने काय उद्गार काढले तेच देतो. तो म्हणाला "ग्लॅड-स्टन साहेब म्हणतात की फीनिअन नामक अत्याचारी लोकानी आयरिश जन-तेचा असंतोष किती तीव्र आहे हे मला शिकविले. पण मी म्हणतो की याहूनहि कित्येक अधिक चांगल्या गोष्टी फिनिअन लोकानी मला शिकविल्या. परराज्याने लोक किती नाखुष होतात, त्यांची निराशा कशी होते, निराशेने ते तामसी कसे होतात, व अत्याचाराकडे वळतात हे तर मी शिकलोच. पण अशा लोकांचे मातृ-देशावरचे प्रेम किती थोर किती व्यापक व किती तळमळीचे असते हेहि पण मी शिकलो. त्यांच्या पैकी कित्येक लोकानी मरणाची शिक्षा किती धैर्याने व गांभी-र्याने सोसली हे पाहून कोणाचीहि तेव्हाच खात्री झाली असेल की या व्यक्ति अधम नसून त्याना खुनी किंवा गळेकापू म्हणणे हाच उलट अधमपणा होय. आपले सर्वस्व देशाला वाहणाऱ्या मनुष्याने आणखी निस्वार्थीपणा तो दाख-विण्याचा काय उरला? त्यांच्या तत्त्वांचा उच्चपणा त्यांच्या अंगीकृत कार्याची थोरवी हीच त्यांच्या तोंडून मृत्यूच्या प्रसंगीहि प्रतिष्ठेचे व भलेपणाचे शब्द वदविते आणि हा प्रकार पहाणाराला त्यांच्याविषयी दया व प्रेम वाटून त्यांच्या चरणी आदरबुद्धीचा करभारहि वाहावासा वाटल्यास काय नवल?"

पार्नेलसंबंधाने त्याचा चरित्रकार याविषयी असे म्हणतोः—"फिनिअन लोकांची कळकळ व उद्योगशीलता पाहून पार्नेल त्यांचा गुणच घेई. पण या सद्गुणांचा उपयोग आपल्या सनदशीर चळवळीला कसा होईल एवढ्याच दृष्टीने तो त्यांजकडे पाही. फिनिअन लोकांच्या आवेशाचा जोर कमकुवत करण्याचा प्रयत्न पार्नेलने कधी केला नाही. पण त्या शक्तीचा उपयोग आपण पसंत करू त्या मार्गाने कसा करून घेता येईल हेच तो पाही. फिनिअन लोक अत्याचार-

प्रिय म्हणून त्यांचा पक्ष मोडून काढण्याच्या फंदात पार्नेल पडता तर तो स्वतःच मोडला जाऊन निकामी झाला असता. म्हणून पार्नेलने असे धोरण ठेवले की, फिनिअन लोकाना आपला आधार द्यावयाचा नाही पण त्यांच्या आधारावर जर आपले धोरण टेकविल्याने ताठर व जोरकस करता येईल तर ती गोष्ट खुशाल करावयाची. म्हणून दिसण्यात तो अत्याचाराच्या सरहद्दीवर उभा आहे असे दिसे. इंग्रज लोक त्याकरिता त्याचा द्वेष करीत. पण आयरिश जनता त्याचकरिता त्यावर प्रेम करी. फिनिअन लोकाबद्दल त्याला अतिशय सहानुभूति वाटे. पण त्याना आपण हार जावयाचे नाही असा त्याचा निश्चय असे. त्यांच्या चळवळीची मदत आपल्या उद्योगाला होईल ती घ्यावी पण आपल्या पक्षात येऊन त्यानी बहुमत करून आपले धोरण बिघडवावे ही गोष्ट त्याला संकटासारखी वाटत असे. ही गोष्ट न घडावी असा त्याचा पराकाष्ठेचा प्रयत्नहि असे. फीनिअन चळवळीचा तापट घोडा आपल्या सनदशीर चळवळीच्या धिम्या घोड्याबरोबर जोडून राजकारणाची गाडी हाकण्याला तो तयार होता. पण आपल्या धिम्या घोड्याचा लगाम तर आपल्या हातून जाऊ नयेच पण तापट घोड्याचाहि लगाम आपल्याच हाती राहावा या शर्तीवर ही जोडी बनविण्याची त्याची तयारी असे." वुइल्यम ओब्रायन याने असे लिहिले आहे की " पार्नेलचे हे धोरण पुढे यशस्वी झाले आणि फीनिअन चळवळीतील काही पुढारी हेच त्याचे सर्वात कट्टे व विश्वासू अनुयायी ठरले. व असे होणेच स्वाभाविक होते. पार्लमेंटमधील सामोप-चाराची चळवळ अप्रामाणिक स्वार्थी भित्र्या लोकांच्या हाती गेल्यामुळे ती अप्रिय झाली होती. जे लोक हू की चू केल्याशिवाय फासात आपला गळा अड-कविण्याला किंवा तुरुंगात राहून जन्मभर आपले स्वातंत्र्य गमावण्याला तयार झाले त्याना या पार्लमेंटरी चळवळीबद्दल तिटकारा वाटावा हे अगदी स्वाभा-विक होते. हा त्यांचा तिटकारा पुढे निघून गेला पण तो कशाने तर ही चळवळ खरोखर प्रामाणिक व धीट अशा पार्लमेंटरी पुढाऱ्यांच्या हाती गेल्याने. पण अशा लोकाना ही विचारक्रांति घडवून आणण्याला अनेक वर्षे सतत परिश्रम करावे लागले. ते करिताना नैतिक शक्ति व शारीरिक शक्ति या दोहोंचा समानतेने स्वीकार करून, उदात्त अशा राष्ट्रीय भावनेने राष्ट्रीय कार्यात त्या दोहोंचा उप-योग करून घेतला, व अत्याचाराचा मार्ग हा खरा राजकारणाचा योग्य किंवा यशस्वी मार्ग नव्हे अशी खात्री करून देताना, सनदशीर म्हटल्या जाणाऱ्या मार्गाचा अवलंब करणाराने, स्वतः अप्रियता सोसण्याची तुरुंगात जाण्याची व वेळी मृत्यु-मुखी पडण्याचीहि तयारी दाखविली व आपला प्रामाणिकपणा सिद्ध केला म्हणू-नच ही गोष्ट घडून आली. त्याना जवळ जवळ असे सिद्ध करून दाखवावे लागले की तुमच्या आमच्यात फरक इतकाच की तुम्ही हातात हत्यारे घेता आणि आम्ही ती हातात घेत नाही किंवा घ्या म्हणून सांगत नाही. एरव्ही तुम्ही आम्ही एकच." आणि या दोन धोरणातील फरक स्वतः ग्लॅडस्टन याने एके प्रसंगी स्पष्ट शब्दानी

व्यक्त केला. तो म्हणाला. " माझ्या हयातीत पार्लमेंटमध्ये आयझॅक बट याने जी होमरूलची मागणी केली तीच पुढे पार्नेल यानेहि केली. पण आयझॅक बट याची मागणी मी उचलून धरली नाही आणि पार्नेलची उचलून धरली याचे कारण बट हा जरी आयरिश राष्ट्राकरिता म्हणून बोलत होता तरी त्याच्या मागे राष्ट्राचे संगीन लोकमत नव्हते. पण पार्नेलची गोष्ट वेगळी होती. त्याने व त्याच्या अनुयायानी जो निकराचा करारीपणा दाखविला तो पाहिल्यावर ते मागतील ते त्याना देणे योग्य आहे असेच कोणालाहि वाटावे." राष्ट्राचे हे संगीन लोकमत आयझॅक बटच्या मागे नसण्याचे कारण त्याने अत्याचारी लोकांच्या सहकारितेचे बळ तुच्छ मानले आणि पार्नेलच्या मागे ते असण्याचे कारण त्याने दुरून का होईना पण त्या बळाची अपेक्षा ठेवली व त्याला स्वतंत्रपणाचा योग्य तो मान दिला.

फिनिक्स पार्कमधील खून झाल्यानंतर लॉर्ड मोर्ले यांचे स्नेही सर आल्फ्रेड लायल यानी मोर्ले याना रागावून पत्र लिहिले व असा आरोप केला की या "खुनाना भिऊन दडपशाहीचे कायदे तुम्ही मागे घेतले व आयरिश होमरूलचे पाऊल पुढे टाकविले. पण तुमच्या हे लक्षात येत नाही की इंग्लंडच्या शेजारी झालेल्या खुनाना अशा प्रकारे उत्तेजन मिळाल्याने हिंदुस्थानातील लोकानाही असे वाटू लागेल की असल्या दडपशाहीने सरकार भिते." अर्थात आरोप नेहमीचेच होते. आणि त्याला मोर्ले यानी उत्तर दिले तेहि लक्षात ठेवण्यासारखे आहे. "कोणत्याहि देशातील सरकारला अत्याचार थांबविता येणे शक्य नसते. रशियन लोकाना निहिलिस्ट लोकांचा निःपात करिता आला नाही व ऑस्ट्रेलियालाहि कार्बोनारी गुप्तमंडळ्या नष्ट करिता आल्या नाहीत. आयर्लंडातील अत्याचार थांबत नाहीत याबद्दल तुम्हाला मलाहि अधिक दोष देता येणार नाही. बंडवाल्याशी सामोपचाराचे बोलणे करण्याचा निषेध तुम्ही केला. पण आधी शरण या मग तुमचे काय म्हणणे असेल ते पाहू ही भाषा फक्त जुलमी सुलतानानीच बोलावी. पण मुत्सद्दी अशी भाषा बोलणार नाहीत. ते सामोपचारानेच प्रतिपक्षाचे समाधान करण्याचा प्रयत्न करतील. पूर्वी लॉर्ड चॅथॅम याना बंडवाल्या अमेरिकन लोकानी शाबासकी दिली, तसेच मीहि हे खून झाल्यावर म्हणतो की आयर्लंडने जुलमाची प्रतिक्रिया केली याचा मला आनंद वाटतो. कारण आमच्या हातून न्यायाची तशी हेळसांडच झाली आहे. फ्रेंच राज्यक्रांतीत काही रक्तपात व अन्याय झाले ही गोष्ट खरी. तथापि गरिबाना छळणाऱ्या फ्रेंच जमीनदाराना बंडवाल्यापुढे मुठीत जीव घेऊन पळत सुटावे लागले ही गोष्ट एकंदरीने चांगलीच झाली. तुमचे म्हणणे असे काय की, हिंदुस्थानात जुलूम करिता यावा धाक दाखविता यावा म्हणून आयरिश लोकानाहि आम्ही तसेच वागवावे? तुम्ही अफगाण युद्धासारखी नसती युद्धे उपस्थित करून घरच्या लोकाना धाक दाखविता तो पुष्कळ झाला. पण इकडे इंग्लंड व आयर्लंड यांचा संबंध कसा राहावा, त्यांचा तंटा कसा तुटावा, याचा विचार करीत असता इकडची कृति पाहून हिंदुस्थानातील लोकहि उठतील व

अत्याचार करतील या म्हणण्याने न्याय करण्याविषयी आम्ही आपले हात मागे घ्यावे काय? युद्ध पुकारले म्हणजे त्यात असे अत्याचार व्हावयाचेच!"

हिंदुस्थानात प्रथम सरकाराकडून निरनिराळ्या वर्गांत फूट पाडण्याचे अनेक प्रयत्न सुरू झाले. पण त्याना फारसे यश आले नाही. तसेच नवे राजकारणहि सुरू झाले. निरनिराळ्या वर्गांचे लोक एकत्र येण्याचे प्रसंग उद्भवू लागले. तेव्हा पुढारी लोकांच्या अंगातहि बरीच बूज होती. काँग्रेससारख्या सभा घेतल्या तरी जी एकंदर राष्ट्राच्या नावावर विकण्याला तयार होती व जीमध्ये प्रवेश करण्याला कोणत्याहि तऱ्हेचा मुळात निर्बंध ठेवलेला नव्हता, अशा ह्या सभेत कोणी यावे कोणी येऊ नये याविषयी प्रथम प्रथम बरीच छाननी होई. नेमस्त वगैरे पुढाऱ्यांचा बाहणा असा असे की राजद्रोहाचा ज्याना दुरूनहि संपर्क झाला असेल अशा लोकानी राष्ट्रीय सभेत येऊ नये. पण मौज ही की अशा सोवळ्या वृत्तीने सभेत बसणाऱ्या लोकाना सरकारी अँग्लो इंडिअन पत्रे व सरकारी बगलबच्चे हे सरसकट राजद्रोही म्हणण्याला तयारच होते! अशा रीतीने अनिष्टदर्शनत्वाचे पेंड वरपासून खालपर्यंत सारखे पोंचत होते. सरकारने नेमस्ताना म्हणावे 'तुम्ही काँग्रेसवाले अनिष्ट.' काँग्रेसवाल्यानी टिळकांसारख्या जहाल लोकाना म्हणावे 'तुम्ही अनिष्ट.' आणि कदाचित जहाल म्हणविणाऱ्या काही लोकानी त्यांच्यापुढे जाणाऱ्या लोकाना म्हणावे 'तुम्ही अनिष्ट.' १८९८सालीच्या मद्रास राष्ट्रीय सभेला टिळक गेले यात वास्तविक वावगे काय होते? ते पूर्वी पुष्कळ काँग्रेसना हजर असत. पुण्याच्या काँग्रेसचे प्रथम ते सेक्रेटरीच होते. काँग्रेसचे उपांग अशी जी प्रांतिक परिषद तिचेहि ते पूर्वी सेक्रेटरी होते. अशा मनुष्याला राजद्रोहाची शिक्षा झाली तरी त्यानी ती सोसली येथेच तिचा संबंध तुटावयास पाहिजे होता. पण या शिक्षेमुळे डागळलेल्या टिळकानी राष्ट्रीय सभेत जाऊन बसावे की नाही याच्या चर्चेने त्या वेळी कित्येक विचारी लोकांच्या डोक्यात किडे पडले होते. मद्रासच्या सभेला टिळक व गोखले दोघेहि हजर होते. या गोष्टीचा विलायतेतील ग्लोब पत्राला इतका विषाद वाटला की सांगता पुरवत नाही. ते पत्र लिहिते "चळवळे टिळक व गोखले दोघेहि राष्ट्रीय सभेला हजर राहिले. झाले! यावरून आम्ही राष्ट्रीय सभेपासून काय अपेक्षा करावी हे उघडच दिसते. आम्हाला इतकेच वाईट वाटते की टिळक व गोखले यांच्याबरोबर दोघे खुनी चाफेकर बन्धू याना काँग्रेसला हजर राहता आले नाही!" यावरून ग्लोबच्या दृष्टीने गोखले टिळक व खुनी चाफेकर बन्धु हे सगळे एका माळेला बसले. म्हणजे असंबद्धतेची ती एक कमालच झाली. पण या टीकेला खरे प्रत्युत्तर पुढे दैवाने दिलेच. आणि ते असे की टिळक हे पुढे राष्ट्रीय सभेत बसू लागले एवढेच नव्हे तर एक वर्षी त्याना काँग्रेसचे अध्यक्षहि निवडण्यात आले आणि सरकार दरबारी काँग्रेसचे नियोजित अध्यक्ष या नात्याने टिळकानी कामहि केले. स्टेट सेक्रेटरी यानी पुढे एके काळी टिळकांच्या गाठी मुलाखतीहि घेतल्या,

तेव्हा आता सरकार बाटावयाचे काय उरले ? ही गोष्ट इतकी रूढ होऊन बसली होती की या गाठी भेटी झाल्याबद्दल विलायतेतील किंवा इकडील पत्रानी एक चकार शब्दहि काढला नाही. १९ व्या शतकाच्या मध्यभागी आयर्लंडचे पुढारी डॅनिअल ओकोनेल हे टिळकांसारखेच लोकांचे पुढारी होते. आणि टिळकाइतकेच ते इंग्रजाना अप्रिय होते. पण हिंदुस्थानचे राजकारण १९१९ साली ज्या थराला आले होते त्या थराला आयरिश राजकारण तेव्हा पोचले नव्हते. म्हणून आयर्लंडचे व्हाइसरॉय लॉर्ड मलग्रेव्ह यानी ओकोनेल याला जेवायला बोलविले या गोष्टीचा लंडन टाइम्स पत्राने मोठा गवगवा केला आणि असे लिहिले की "लॉर्ड मलग्रेव्ह यानी डॅनिअल ओकोनेलसारख्या इंग्रज विद्वेषि व घाण तोंडाच्या आयरिश पुढाऱ्याला प्रत्यक्ष जेवावयाला बोलाविले ही गोष्ट निःसंशय सिद्ध झाली आहे. तेव्हा आता काय म्हणावे ?" पण हेहि दिवस निघून गेले व पुढे आणखी अशीहि वेळ आली की ग्लॅडस्टन व पार्नेल यांची गट्टीच जमावी ! कारण दोघांचेहि काही काळपर्यंत एकच ध्येय होते. आणि याच गोष्टीला उद्देशून लॉर्ड सॅलिस्बरी यानी वर एका ठिकाणी लिहिल्याप्रमाणे ग्लॅड-स्टन साहेबावर निंदेचे कोरडे ओढले. मुख्य प्रधानाच्या योग्यतेच्या माणसाने पार्नेलशी संबंध ठेवणे या पलीकडे अनुचितपणा तो काय राहिला ! पण एका वेळच्या मुख्य प्रधानाने निंद्य मानलेली ही गोष्ट दुसऱ्या एका वेळच्या मुख्य प्रधानाने प्रत्यक्ष केली यावरूनच कोणी कोणाशी कसा किती संबंध ठेवावा याच्या कल्पना बदलत चालल्या होत्या हे उघड दिसते. १८९८ साली टिळ-काना राष्ट्रीय सभेत बसू दिले याबद्दल गहजब झाला. आणि कित्येक पत्रानी असे ध्वनित केले की टिळक राष्ट्रीय सभेला जाणार म्हणून त्यांचा संसर्ग चुकविण्या-करिता मेथा वगैरे लोक गेले नाहीत ! या पत्राने दिलेले हे कारण बहुधा खोटे असावे कारण मेथा यांचे मनात असा किंतू आला असता तरी त्यानी तो बाहेर दिसू दिला नसता. शिवाय तो आला असला तरी तो पुढे निघून गेला हे खाचित. कारण त्यापुढे झालेल्या दोन तीन राष्ट्रीय सभांची उदाहरणे अशी देता येतील की तीत मेथा टिळक हे राष्ट्रीय सभेत एकाच मंडपात बसले.

येऊन जाऊन खुनी लोकापुरता प्रश्न राहिला. पण त्याचाहि प्रश्न आता सोपा झाला आहे. कारण खुनाचा गुन्हा शाबित झाला तरच तो खुनी. तो गुन्हा शाबित होऊन तो फाशी गेला तर तो राष्ट्रीय सभा व त्यातील काही सोवळे लोक याना विटाळावयाला येऊच शकत नाही. पण समजा त्याला काळ्या पाण्याची शिक्षा झाली व ती भोगून तो परत आला तर आज स्थिति अशी आहे की राष्ट्रीय सभेच्या नियमाप्रमाणे त्याला मज्जाव नाही. अशा मनुष्याला सभेत का येऊ दिले ? असे म्हणण्याइतके सोवळे लोक आता हिंदुस्थानात कोणी उरलेले नाहीत. राजद्रोहाच्या दोनदोनदा शिक्षा झालेले लोक स्टेट सेक्रेटरीच्या मुलाखती घेऊ लागले—किंबहुना स्टेट सेक्रेटरी अशा लोकांच्या मुलाखती घेऊ

लागले हे म्हणणे अधिक शोभेल—व काळेपाण्याची शिक्षा झालेले लोक आयरिश देशभक्त गॅव्हिन डफी यांच्याप्रमाणे साम्राज्यातील प्रधानमंडळाची प्रधानकी करू लागले. इतकेच नव्हे तर अशा लोकांच्या सांनिध्याने किंवा समावेशाने राष्ट्रीय सभेला भूषणच येते अशी समजूत होऊ लागली आहे. कारण आता तुरुंगात गेले कोण असा प्रश्न नसून जाण्याचे राहिले कोण ? सुटले कोण ? चुकले कोण ? असेच प्रश्न खाजगी रीतीने विचारण्यात येऊ लागले आहेत !

## ( ५ ) रौलेट कमिटीचा रिपोर्ट

सन १९०६ साली जी क्रांतिकारक चळवळ सुरू झाली ती पुढे बरेच दिवस चालू होती. काही दिवस ती विशेष तीव्र असून तिजमध्ये अत्याचारहि घडले. काही दिवस तिचे स्वरूप सौम्य होते तरीहि त्या काळी परकी राजसत्तेचा निषेध जोराने सुरू होता. शेवटी शेवटी हे अत्याचार थांबले. निषेधप्रदर्शनहि कमी झाले. परंतु हिंदुस्थानातील एकंदर वातावरणच स्वातंत्र्यबुद्धीने इतके भरून गेले आणि ही बुद्धि सरकारच्याहि इतकी पचनी पडली की साम्राज्यांतर्गत स्वराज्य हे जुन्या राष्ट्रीय सभेच्या उद्देशविधानातील शब्द काढून टाकून स्वराज्य हा एकच मोघम शब्द त्याऐवजी घालण्यात आला. तरी सरकाराने काही पारिपत्य केले नाही. समित्यांचा कायदा जिवंत असताहि राष्ट्रीय सभा त्यामुळे राजद्रोही संस्था ठरविण्यात आली नाही. आणि आम्हाला स्वराज्य हवे, मिळेल तर ते साम्राज्यात हवे पण तेथे ते न मिळेल तर साम्राज्याबाहेरहि चालेल, असे लोक सरसकट बोलत व लिहीत. पण त्याकरिता कोणावर विशेष खटलेहि करण्यात आले नाहीत. ही क्रांतिकारक चळवळ १९१९च्या बादशाही जाहीरनाम्याने व सुधारणाच्या कायद्याने थोडीबहुत मऊ पडली परंतु ती अद्यापि लुप्त झालेली नाही व कायमची लुप्त होणारहि नाही. तिचे उद्योग वर्षातील ऋतुमान बदलावे त्या प्रकाराने केव्हा स्पष्ट तर केव्हा अस्पष्ट केव्हा गरम तर केव्हा नरम असे बदलतात ही गोष्ट खरी. तथापि स्वराज्य मागण्याला आता कायदेशीर स्वरूप आले आहे. आणि स्वराज्याच्या मागणीच्या योजनाहि व्यापक व विस्तृत होऊन त्या सरकाराने मान्य केल्या नसल्या तरी त्यांचा बेकायदेशीरपणा नाहीसा झाला आहे. अजूनहि इकडे तिकडे कोठे बॉबचे नाव ऐकू येते. एखादा बॉंब दृष्टीस पडतो. एकादा भ्रामक ठरतो. एकादा उडतो. एकादा खटला होतो. धरपकडहि होते. आणि अजूनहि बिनचौकशीने काही राजकीय कैदी तुरुंगात किंवा नजरकैदेत आहेत. तथापि एका बाजूने सुधारणांच्या विधायक कार्यक्रमाला अल्पसा का होईना प्रारंभ झाल्यामुळे, आणि दुसऱ्या बाजूने गांधी यानी अनत्याचारी वर्तनाचा उपदेश जोराने फैलाविल्यामुळे अत्याचाराची कर्मे बहुतेक नाहीशी झाली आहेत व क्रांतिकारक चळवळ म्हणून उरली असली तरी तिचे स्वरूप बरेचसे सात्त्विक होऊन राहिले आहे. सरकारच्या दृष्टीनेहि क्रांतिकारक चळवळीचे तीव्र स्वरूप १९१७ साली

संपले असे त्याना वाटल्यामुळेच त्या साली त्यानी या चळवळीचा एकंदर आढावा घेण्याकरिता रौलेट कमिटी नेमली. तिचा रिपोर्ट १९१८ साली झाला. त्यानंतर कुप्रसिद्ध 'रौलेट ॲक्ट' नावाचे कायदे करण्यात आले.खरे पाहिले तर ते तेव्हा अनवश्यक होते व सरकारालाहि ते अनवश्यक असेच वाटत असावे. परंतु पुष्कळसा कापूस पिंजून ठेवल्यावर त्यातून थोडेसे तरी सूत काढावे अशी बुद्धि होते त्याप्रमाणे रौलेट कमिटीच्या संशोधनातून निघणाऱ्या सिद्धांतांचा काही सक्रिय उपयोग न केला तर ते संशोधन फुकट झाले अशा बुद्धीनेच रौलेट कायदे घडविण्याचा सरकाराने आग्रह धरला. रौलेट कमिटीच्या या रिपोर्टात एकंदर क्रांतिकारक चळवळीचे संशोधन व वर्णन दिलेले आहे. त्याचा सारांश पुष्कळाना विदितच आहे. तथापि ही चळवळ व टिळक यांचा लोकांच्या मनात आणि सरकारच्या मनात काही संबंध आहे म्हणून तितक्यापुरता त्याचा उल्लेख थोडासा येथे करतो.

प्रथम ही गोष्ट सांगितली पाहिजे की या चळवळीचे सर्व श्रेय रौलेट कमिटीने पुण्याच्या ब्राह्मणाकडे दिलेले आहे. उद्या इतिहासात पुण्याच्या ब्राह्मणांचा हा एक बहुमानच ठरेल. परंतु या मानातील यथान्याय जितका अंश पुण्यातील ब्राह्मणाकडे येऊ शकेल तितकाच त्यानी घ्यावा, आणि रौलेट कमिटीच्या रिपोर्टात केवळ ऐतिहासिक न्यायबुद्धीनेहि काकपद लिहून जरूर तो शोध घालावा हे योग्य असल्यामुळे तसे करणे आम्हाला प्राप्त आहे. रौलेट कमिटीच्या रिपोर्टाच्या प्रस्तावनेत प्रारंभ हिंदुशास्त्रातील राजधर्माच्या उपपत्तिपासून केला आहे. आणि संशोधनाची ही गाडी तेथून जी निघाली ती वाटेत ईस्ट इंडिया कंपनी, मुसलमानी रियासत, शिवाजी महाराजांचे हिंदवी राज्य, व पेशवे या स्टेशनावरून अखेर पुणे जिल्ह्यातील चित्पावन ब्राह्मणांच्या घरापाशी येऊन ती बोरीबंदरावर कायमची थांबावी त्याप्रमाणे थांबली आहे. पुढे रिपोर्टात बंगाल्यासुद्धा सर्व प्रांतातील क्रांतिकारक व अत्याचारी चळवळीचा परामर्ष कमिटीने घेतला असला तरी प्रस्तावनेत इतर कोणत्याहि प्रांतातील लोकांचा उल्लेख केला नसून ब्राह्मण, चित्पावन ब्राह्मण, आणि पुणे जिल्ह्यातील चित्पावन ब्राह्मण, या क्रमाने या चळवळीचे कर्तृत्व पुण्याकडे आणून ठेवले आहे. कमिटीने दिलेला हा मान नाकारण्याची पुण्याच्या ब्राह्मणांची इच्छा नाही. तथापि बंगाल वगैरे इतर प्रांतातील पुढाऱ्याना यामुळे थोडासा अन्याय होतो इतकेच आम्ही म्हणतो. याचे कारण असे की पुण्यातील गणपती व शिवाजी उत्सवाना या चळवळीत उगमस्थानाचे महत्त्व कमिटीने दिले असले तरी अशा स्थूल राष्ट्रीय बुद्धीचे उद्योग महाराष्ट्राप्रमाणे इतर प्रांतातहि होत नव्हते असे नाही. पुणे शहरात गणपति उत्सवात झालेला दंगा आणि रायगडावरील शिवसमाधीच्या जिर्णोद्धाराची चळवळ या गोष्टी महाराष्ट्राला खऱ्या स्वरूपाने विदित आहेत. समाधीच्या दुरुस्तीची चळवळ ही महाराष्ट्राला भूषणभूत होती व पुण्यातील गणपत्युत्सवात झालेला दंगा हा मामुली स्वरूपाचाच होता. पण त्या दोहोतहि जिला क्रांतिकारक

चळवळ आपण मानतो तसें स्वरूप काहीच नव्हते. नंतर १८९७ साली रँडसाहेबांचा खून झाला त्याला राजकीय हेतू होता असे म्हटले तरी शिवाजी व गणपती उत्सव सुरू झाले नसते तरी तो खून झाला असता इतके दुःसह दुःख पुणेकराना रॅन्डशाहीचे झाले. पण रौलेट कमिटीत इतका सूक्ष्म विचार करणारा एकहि सभासद नव्हता. पोलीस खात्याच्या सर्व प्रांतिक रिपोर्टातून निरनिराळे उतारे काढून त्याचा एक भला मोठा गठ्ठा या कमिटीपुढे ठेवण्यात आला व त्याची वर्गवारी करून ठाकठीकपणाचे स्वरूप देऊन कमिटीने आपला रिपोर्ट लिहिला. याहून अधिक संशोधन असें तिने केल नाही. खरा कार्यकारण भाव पाहिला नाही, आणि मानसशास्त्रदृष्टीने जी पृच्छा करावी तीहि केली नाही.

रॅन्ड व द्रविड बंधु यांच्या खुनांच्या उल्लेखाने रिपोर्टाची सुरवात झाली आहे. पण रॅन्डचा खून कशामुळे झाला ते प्रसिद्ध आहे आणि द्रविड बंधूंचा खून हा क्रांतिकारक चळवळीचा पुरावा मुळीच नाही. पैशाच्या बक्षिसाच्या लोभाने चहाडी करणे आणि चहाडखोराचे पारिपत्य होणे या गोष्टी एरवीहि कितितरी होतात. "रॅन्डच्या खुनानंतर टिळकांवर खटला झाला व टिळकाना शिक्षा झाली तरी त्यांच्या अभावी केसरी मराठा पत्राचे धोरण बदलले नाही. १८९९ साली काळकर्ते परांजपे याना सावधगिरीची सूचना दिली. १९००,१९०४, १९०५,१९०७ या साली काळकर्त्यावर खटला भरण्याचा सरकारचा विचार होता व शेवटी १९०८ साली तो प्रत्यक्ष भरण्यात आला. १९०६,१९०७, व १९०८ या साली विहारी पत्राच्या संपादकावर खटले होऊन तीन संपादक ओळीने तुरुंगात गेले." वरील उदाहरणात खटले तरी झाले होते व इकडची तिकडची चार वाक्ये काढून ती खोटी किंवा तामसी किंवा सरकारची निंदा करणारी असे काही दाखविता तरी येऊ शकले. पण नातुबंधूना चौकशीशिवाय सरकाराने कैदेत ठेवले ही गोष्टहि क्रांतिकारक चळवळीचा पुरावा म्हणून कमिटीने उल्लेखिली हे पाहून कोणाला आश्चर्य वाटणार नाही? सरकाराने धडधडीत अन्यायाची व असमर्थनीय कृत्ये केली तीच लोकांच्या चळवळीचा पुरावा म्हणून कशी देता येतात? सरकारला उगीच भीति वाटून किंवा खोटा संशय येऊन त्यानी उचलून एकाद्याला तुरुंगात टाकले तर ही स्थिति व हा संशय लोकाविरुद्ध पुरावाच काय?

यानंतर रिपोर्टात कमिटीने शामजी कृष्णवर्मा त्यांचे इंडिया हौस इंडिअन सोशिआलॉजिस्ट हे पत्र आणि प्रतापसिंह शिवाजी इत्यादिकांच्या नावाने ठेवलेल्या शिष्यवृत्त्या यांचा उल्लेख आहे. कृष्णवर्मा यांच्या बोर्डिंगात ही शिष्यवृत्ति घेऊन राहिलेल्या सावरकरांचा सबंध सहजच येतो. आणि सावरकरांचा व टिळकांचा सबंध मित्रमेळ्याच्या द्वारे आल्याचे रिपोर्टात लिहिले आहे. पण मेळ्यात खासगी गुप्त पोलिस शिरला असताहि, व टिळकानी तेथे मेळ्याला काय उपदेश खरोखर केला हे प्रसिद्ध झाले असताहि, त्याचा मात्र उल्लेख रिपोर्टात नाही. विलायतेत १९०८ साली हिंदी विद्यार्थी बॉंबच्या गोष्टी उघडपणे बोलू लागून

१९०९ साली लंडनमध्ये कर्झन वायली यांचा खून मदनलाल धिंग्रा याने केला. त्याच साली जूनमध्ये गणेश दामोदर सावरकर यांच्यावर खटला झाला. डिसेंबरात जॅक्सन साहेबांचा नाशकास खून झाला. ग्वालेर येथे नवभारत नावाची गुप्त मंडळी स्थापण्यात आली. अमदाबाद येथे लॉर्ड मिंटो यांच्या मिरवणुकीच्या वाटेवर बॉंब ठेवण्यात आले. १९१० साली सातारा जिल्ह्यात गुप्त मंडळीचा कट झाला. १९१४ साली पुण्यात काही राजद्रोहकारक छापील मजकूर व बॉंबचे लेखी फार्म्युले सांपडले. या सर्व गोष्टी एकत्र जमेला धरून कमिटीने असा निष्कर्ष काढला की "यातील बहुतेक गुन्हेगार चित्पावन ब्राह्मण होते. चाफेकर बंधू हे स्वराज्यवादी नव्हते पण इंग्रजद्रोही कट्टे पुराणमतवादी होते. सावरकर तर बोलून चालून क्रांतिकारक होते. या सर्व चळवळीचे एक जाळे होते आणि कोळी जसा आपल्या तंतुजालाच्या मध्यभागी बसून हालचाली करतो त्याप्रमाणे टिळक हे या सर्वांच्या मुळाशी असून या सर्व चळवळीला उत्तेजन देत होते" ! पण १९१४ सालापर्यंत गोष्ट आणून भिडविल्यावर, त्या साली टिळकानी जो जाहीरनामा प्रसिद्ध केला व अत्याचारी चळवळीचा निषेध केला ही गोष्टहि जगजाहीर असल्यामुळे, तिचा उल्लेख केल्याशिवाय कमिटीला गत्यंतर नव्हते. म्हणून पहिल्या म्हणजे महाराष्ट्र प्रकरणाच्या शेवटी तो उल्लेख कमिटीने केला आहे. पण तो केवळ उल्लेखच आहे. कमिटीने त्यावर कोणत्याहि प्रकारची टीका केली नाही हे ध्यानात ठेवण्याजोगे आहे.

यानंतर कमिटीने आपल्या रिपोर्टात प्रथम बंगाल नंतर बहार ओरिसा वायव्य प्रांत मध्यप्रांत पंजाब मद्रास ब्रह्मदेश आणि जर्मन चिथावणीने झालेले कट या सर्वांचे परीक्षण क्रमाने केले आहे. आणि शेवटी निष्कर्ष म्हणून लिहिला आहे तो असा की बंगाल्यातील अत्याचारी चळवळे ब्राह्मण नव्हते पण सुशिक्षित होते. त्यांची चळवळ मोठी पद्धतशीर कल्पक चतुराईची आणि सतत चाललेली होती. आणि तीत दरोडे व खून पुष्कळ झाले. पंजाब व ब्रह्मदेश खेरीज करून इतर प्रांतात ही चळवळ मुळीच रुजली नाही व दंगे किंवा इतर गुन्हे अगदी तुरळक झाले. पण या प्रांतातील हे लोक ब्राह्मण अब्राह्मण सुशिक्षित अशिक्षित कोण कसे होते याचे वर्णन किंवा काही सिद्धांत कमिटीने दिला नाही. पंजाब व ब्रह्मदेश या प्रांतात चळवळ झाली ती अमेरिकेहून आलेल्या बंडखोर शीखानी केली. पण या चळवळीत अर्थात कोणी ब्राह्मण नव्हते. व सुशिक्षितहि नव्हते. मुसलमान लोकांचीहि चळवळ अगदीच थोड्या व धर्मवेड्या लोकांची होती. कमिटी म्हणते " या सर्व चळवळीचा हेतु बंड करून इंग्रजाना हिंदुस्थानातून घालवून देण्याचा होता. पण चळवळीतील निरनिराळ्या प्रांताच्या लोकांचा परस्पर संबंध होताच असे नाही. काही ठिकाणी देशाच्या बाहेरून म्हणजे जर्मनीहूनहि चिथावणी आली. ही सर्व चळवळ राजनिष्ठ जनतेच्या साहाय्याने हाणून पाडता आली. सरकाराला त्याकरिता वेळोवेळी असामान्य असे कायदे करावे लागले यात काही

आश्चर्य नाही. पण पुरावा हवा तसा मिळाला नाही. मिळाला त्यावर विश्वास बसला नाही. कबूली जबाब पुष्कळ वेळा खोटे होते व काही पोलिसापुढे झाल्यामुळे जुलमाने दिले होते. खटले फार लांबत." वगैरे कारणामुळे आणखी नवीन दडपशाहीचे कायदे करावे लागतील अशी शिफारस करून कमिटीने रिपोर्ट संपविला आहे.

## ( ६ ) टिळक व अत्याचार

अत्याचारी लोक हे जिवावर उदार होतात याविषयी टिळकाना मनातून खरोखर कौतुक वाटे. पण आपल्या देशातील अत्याचारी लोकांचेचसे काय, निःस्वार्थीपणाने कोणीहि आत्माहुति दिली असे आपण एखाद्या युद्धासंबंधाने किंवा परदेशातील घातपातासंबंधाने वाचले ऐकले, तर कोणाचीहि मनोवृत्ति अशीच कौतुकाची होईल. त्यातूनहि अशा लोकानी आपल्या देशाकरिता आत्माहुति दिली असे मनाला पटल्यावर त्याच्याबद्दल कोणाला कौतुक वाटणार नाही ? मग ते तो बोलून दाखवो वा न दाखवो. अत्याचाराला कोणाला मुद्दाम प्रवृत्त करणे ही गोष्ट वेगळी आणि त्याचे कौतुक वाटणे किंवा बोलून दाखविणे ही गोष्ट वेगळी. रँडसाहेबांचा खून झाला आणि तो प्लेगच्या जुलमाच्या त्रासामुळेच झाला ही गोष्ट ज्या नेमस्ताना पटली त्यानीहि खुनी मनुष्याचे मनांतून कौतुकच केले असेल. त्याचे कौतुक याचा अर्थ व्यक्तिशः रँडसाहेबांचा द्वेष नव्हे, तर हा मनुष्य आपले प्राण जाण्यासारखे कृत्य करून लोकांच्या रागाचा त्याने उपशम केला आणि ही गोष्ट निःस्वार्थीपणाने केली इतक्याबद्दलच न्यायबुद्धीने त्याचा योग्य तो गुण घेणे. असा उघड गुण घेतला म्हणजे सरकारला वाईट वाटणार ही गोष्ट खरी. एवढेच काय, पण स्वतः गुण घेणाऱ्यालाहि दुसरा मनुष्य प्राणाला मुकतो याचे वाईटच वाटते. तरीपण जनतेचा जो वैरी तो आपलाहि वैरी असेहि थोडेबहुत वाटल्याशिवाय राहात नाही. पण मग प्रश्न असा येतो की जर अशा अत्याचारी मनुष्याचे तुम्ही गुण घेणार तर असा अत्याचार तुम्ही स्वतःहि का करीत नाही ? त्यावर उत्तर इतकेच की आमचा स्वभाव तसा नाही. वाटेल तर धैर्य आमच्यामध्ये नाही असेहि म्हणा. पण तसा स्वभाव मुद्दाम आणू म्हणून येत नाही आणि तसा स्वभाव किंवा ते धैर्य असल्याशिवाय तसले कृत्यहि कोणाच्या हातून होत नाही. कोणच्याहि सहानुभूतीच्या भावनेला अशीच मर्यादा असते. एखाद्याला दुःख झाले तर आपण हळहळतो ही गोष्ट खरी. पण ते दुःख कदाचित् द्रव्यदानाने भरून येणारे आहे असे कोणी पाहिले आणि आपल्याला म्हटले की ' कायहो तुम्ही हळहळता तर तुमच्याजवळचे सर्व द्रव्य त्याला देऊन त्याचे बरे कां करीत नाही व आपली हळहळ वाचवीत नाही?' तर त्याला उत्तर हेच की हळहळ वाटली म्हणून स्वार्थत्यागाची उडी कोठपर्यंत जाईल याला मर्यादा आहेच. व जी गोष्ट दुःखी मनुष्याच्या हळहळीला लागू तीच निःस्वार्थी शूर हुतात्म्याच्या कौतुका-

लाहि लागू. पण सर्वस्व देण्यास तयार नाही म्हणून हळहळ वाटणे किंवा बोलून दाखविणे हे जसे चूक नाही, तसेच आपल्या हातून देशभक्तिप्रेरित अत्याचार होत नाही म्हणून दुसऱ्या कोणी तो केला तर त्याबद्दल कौतुक वाटणे किंवा बोलून दाखविणे हेहि चूक नाही. याचे तात्त्विक समर्थन दुसरेहि असे आहे की जो तो आपल्या कर्माचा धनि असल्यामुळे आपल्या कर्माचे सुख किंवा दुःख भोगतो. त्यात आपला संबंध नसला तर आपल्यावर जबाबदारीहि नाही. कौतुक करणे हे फक्त एक प्रकारचे मत व्यक्त करण्यासारखे आहे. समजा लोकपक्षाकडील एखाद्या मनुष्याचा सरकारी मनुष्याने घात केला, आणि ज्याचा घात झाला तो सरकारच्या दृष्टीने वाईट मनुष्य होता व शिक्षेला योग्य होता असे कोणा अधिकाऱ्यास वाटले, तर तो त्या घाती मनुष्याचे कौतुक केल्याशिवाय राहणार नाही पण स्वतः मात्र तो घात करण्याला प्रवृत्त होणार नाही. जनरल डायर याने गोळीबार करून पुष्कळ लोकांचे प्राण घेतले त्याचे ओड्वायर साहेबानी आपल्या पुस्तकात उघड उघड समर्थन केले आहे. व जनरल डायर याने आपले कर्तव्य तेच केले असे म्हणून त्याचे एकप्रकारे कौतुकच केले की नाही ? पण डायरच्या जागी ओड्वायर असते तर त्यानींहि तेच केले असते असे आम्हास म्हणवत नाही व वाटतहि नाही. बाजू सरकारची असली म्हणून अशा घातकी मनुष्याचे कौतुक करणे हे जितके समर्थनीय ठरेल तितकेच जनतेची बाजू म्हणून अत्याचारी मनुष्याचेहि कौतुक करणे योग्य ठरेल. यासंबंधाने टिळकानी माधवराव अणे यांच्याशी एकदा जी तात्त्विक चर्चा केली ती लक्षात ठेवण्यासारखी आहे. ते म्हणाले "परोपकारी वृत्ति ही निरनिराळ्या प्रकृतीच्या मानाने निरनिराळ्या रूपाने प्रगट होत असते. परोपकारी वृत्तीच्या मनुष्याने देशाच्या सांप्रतच्या विपन्नावस्थेचा विचार करावयास सुरवात केली तर त्याच्या प्रकृतिमानाप्रमाणे तो तीन मार्गांपैकी एका मार्गाचा स्वीकार करतो. दया करुणा श्रद्धा इत्यादि गुण ज्याचे ठिकाणी निसर्गतः विशेषत्वाने वास करितात व प्रापंचिक सुखाविषयी जो स्वभावतः उदासीन असतो तो साधुत्वाच्या मार्गास लागतो व देशावरील संकटपरिहारार्थ परमेश्वरी कृपेची याचना करतो. ज्यांच्या स्वभावात मूळचीच तामसी वृत्ती अधिक व क्रोधादिकांचा आविर्भाव विशेष असे लोक अराजक मार्गाने व अत्याचारी कृतीने आपला कार्यभाग साधण्याचे उद्योगास लागतात. परंतु ज्यांच्या ठिकाणी सर्वच वृत्ती काही प्रमाणबद्ध अतएव व्यवहारसन्मुख स्थितीत असतात अशी माणसे सद्यःप्राप्त साधनानींच प्रस्तुत संकट निवारण्याचा प्रयत्न करतात. या सर्वांचा हेतु एकच असल्यामुळे या मध्यम मार्गाने जाणाऱ्या माणसावर दोन्ही बाजूच्या प्रमुख व्यक्तीचा प्रसंगविशेषी रोष होतो. परंतु कार्याची गति जशी वेगवान होत जाते तशी सर्वांचीच आक्रमणकक्षाहि कमी कमी दूर होत जाते. व एक काळ असा येतो की या तीनहि मार्गांचे लोक मध्यम मार्गाला प्रामुख्य देऊन त्याच्याच आश्रयाने व नेतृत्वाखाली आपापले उद्योग त्या मार्गाला पोषक होतील अशा

रीतीने करावयास लागतात." या विवेचनात टिळकांच्या राजकारणातील मार्गांचे व नित्य नैमित्तिक आचरणाचे मर्म आहे असे म्हणण्यास हरकत नाही. अणे यांच्याशी बोलताना त्यानी या तीन मार्गांतील ठळक व परिचित लोकांची उदाहरणे तेव्हां दिली असतील की नाही हे सांगता येत नाही. परंतु त्यांच्या मनापुढे त्यावेळी तशी ठळक नावे असावी असे आम्हाला वाटते. पहिल्या मार्गाचे उदाहरण अण्णासाहेब पटवर्धन, दुसऱ्या मार्गाचे उदाहरण चाफेकर धिंग्रा सावरकर वगैरे लोक, व तिसऱ्या मार्गाचे उदाहरण स्वतः टिळक अशीच नावे त्यांच्या डोळ्यापुढे त्यावेळी असावी. या तीनहि मार्गांतील लोकांची देशभक्ति एकसारखीच गाढ व तीक्ष्ण परंतु केवळ स्वभावभेदामुळे त्यांचे मार्ग वेगळे झाले. अण्णासाहेब पटवर्धन हे साधुत्वाच्या मार्गाला लागले त्याचे कारण देशाविषयी निराश होताच त्यांची सत्त्ववृत्ति इतकी उत्कट दशेला पोचली की ते धर्माचार हेच आपले कर्म असे स्वीकारून ईश्वरकृपा संपादनाच्या उद्योगाला लागले. चाफेकर धिंग्रा वगैरेनी त्याच उत्कट स्थितीत तामसी वृत्तीला वश होऊन त्यानी अत्याचारी कृत्यात उडी घेतली व सावरकरानीहि त्याच उत्कट तामसी वृत्तीने अत्याचारी लोकाना मदत केली व त्यांचे समर्थन केले. टिळकांमध्ये ही सात्त्विक किंवा ही तामसी वृत्ति इतक्या उत्कट स्थितीला कधीच पोचली नाही. सत्त्व रज व तम हे तिन्ही गुण त्यांच्यामध्ये प्रमाणबद्ध असून त्याना ते नेहमी व्यवहारोन्मुख अशाच स्थितीत ठेवीत. म्हणजे काही निमित्ताने त्यांच्यामध्ये सात्त्विक गुण क्षणभर विशेष उत्कट झाला तरी तो टिकत नसे व पुनः ते रजोगुणी बनत. उलट त्याच रीतीने त्यांच्यामध्ये कित्येक वेळा तामसी वृत्ति क्षणभर उत्कट झाली तरी तो क्षण जाताच ते पुनः रजोगुणी बनत. अशा रीतीने व्यवहारात्मक रजोगुणाची त्यांची भूमिका कधीहि क्षणमात्रापलीकडे ढळलीच नाही. म्हणून ते नित्य व्यवहाराला योग्य ठरले व नित्य व्यवहारच त्यानी केला. आणि सद्यःप्राप्त साधनानीच प्रस्तुत संकटे निवारण करण्याचा प्रयत्न केला. पण रजोगुण हा स्थितिस्थापक स्वरूपाचा असल्यामुळे त्याची भूमिका दृढमूल असते. आणि ती सहसा ढळत नाही. आणि जगातले व्यवहारहि मुख्यतः रजोगुणानेच पार पडत असल्यामुळे इतर दोन गुणांची मनुष्येहि अखेर या मध्यम वृत्तीलाच मान देतात. अण्णासाहेब पटवर्धन हे धर्ममार्गीय असले तरी टिळकानी उचललेला नित्य व्यवहार हाच टिकाऊ व अंतिम फलदायी असे वाटून ते त्यांच्या राजकारणात सहकारिता करीत. उलट सावरकर वगैरे लोकानाहि आपल्या क्षणिक वृत्ती ओसरल्यावर टिळकांचा धोपट पण चिरस्थायी मार्ग हाच युक्त वाटून त्यानीहि शेवटी टिळकांच्या राजकारणातील नित्य व्यवसायाचे व त्यांच्या प्रयत्नाने मिळालेल्या राजकीय सुधारणांचे समर्थन केले. टिळकांची दृष्टि नैमित्तिकापेक्षा नित्यावर अधिक असे. प्राप्तकर्म व सद्यःफल याच त्याना मुख्य अशा गोष्टी वाटत. आणि साधुत्वाचे मार्ग व अत्याचाराचे मार्ग हे कौतुकास्पद असले तरी

वृत्तीला क्षणभरच उज्ज्वल करून उपशम पावणारे आहेत म्हणून त्यांचा नित्याचार होऊ शकत नाही, असेच टिळकांचे मत होते. वर्तमानपत्रे चालविण्यासंबंधाच्या धोरणासंबंधानेहि त्यांचे असेच मत असे. यामुळे धर्मप्रवृत्तीविषयी त्याना कौतुक व आदर असून तिचे प्रसंगविशेषी ते समर्थन करीत, तरी आपल्या वर्तमानपत्राना निव्वळ सात्त्विक व धार्मिक असे स्वरूप त्यानी ठेवले नाही. तसेच पूर्वी सांगितल्याप्रमाणे निःस्वार्थी हुतात्म्याविषयी त्यानी प्रसंगविशेषी जरी सहानुभूति व कौतुक प्रगट केले तरी आपल्या पत्रातून त्या गोष्टीचे प्रमाणाबाहेर समर्थन केले नाही. वर्तमानपत्र हे राजकारणाच्या नित्य व्यवहाराचे साधन असे ते मानीत असल्यामुळे मंडालेहून केळकराना त्यानी लिहिलेल्या एका खाजगी पत्रात वर्तमानपत्राला ताजव्याची उपमा दिली आहे. ते म्हणतातः—' A newspaper must be like a good balance stablo and sensitive at the same time." राष्ट्रात कोणतीहि नवी व तेजस्वी भावना उत्पन्न झाली असता तिचा परामर्ष अवश्य घ्यावा व तिचा फायदा आपल्या द्वारे जनतेला मिळवून द्यावा. पण त्या भावनेत श्रेयस्करपणाचे थोडेसे तत्त्व आहे म्हणून सर्वस्वी त्याच भावनेत वर्तमानपत्राने गुरफटून जाऊ नये. चांगल्या ताजव्यात एका बाजूला लहानसे वजन पडले तरी त्याने त्या बाजूला काटा झुकता दाखविलाच पाहिजे. पण ते क्षणिक वजन पारड्यातून निघून जाताच त्याने आपला काटा फिरून मध्य बिंदूवर आणून ठेवला पाहिजे. म्हणजे मूळची स्थिर स्थिति पुनः स्थापित केली पाहिजे. पारड्यात एकदा वजन पडले पण ते निघाले तरी ज्याचा काटा ढळलेलाच राहतो तो ताजवा चांगला नव्हे. त्याचप्रमाणे वजन एका पारड्यात कितीहि घातले तरी ज्याचा काटा तिकडे ढळत नाही, नुसता मध्यबिंदुच धरून राहतो, तोहि ताजवा तोलण्याच्या कामाला निरूपयोगी समजावा.

स्वार्थत्यागी किंवा हुतात्मे या लोकांच्या देशभक्तीचा गुण घेणे किंवा त्यांचे कौतुक करणे ही गोष्ट टिळकांच्या मनाला पटत असल्याने, व त्याहिपेक्षा वर्तमानपत्रात लिहिण्याचा नित्य प्रसंग त्याना असल्याने, अत्याचारासंबंधाने त्यांच्या खऱ्या मताचा गैरसमज व विपर्यासहि झाला आहे. या गोष्टीला आमच्या मते तीन गमके आहेत. पहिले गमक टिळकानी मंडालेहून आल्यानंतर जो जाहीरनामा काढला त्यात अत्याचाराच्या विरुद्ध आपले मत प्रगट केले आहे. कित्येक लोकाना असे वाटते की अत्याचाराना उत्तेजन दिल्याबद्दल टिळकाना शिक्षा झाली म्हणून तुरुंगवासाला भिऊन सरकाराला खुष करण्याकरिता आणि आपल्या घरावरील पाहारा उठविण्याकरिता त्यानी तसे मत प्रगट केले. पण या म्हणण्यात स्वारस्य नाही. भरपूर सहा वर्षे कैद भोगून परत आल्यावर त्याना भिण्याचे कारण काय उरले होते ? १९०८ पासून त्यांच्या गैरहजेरीत जे अनेक अत्याचार झाले त्यात त्यांचा संबंध कोणी ओढून ताणून आणू म्हटले तरी न येण्यासारखा बंदोबस्त त्यांच्या तुरुंगवासाने केलेलाच होता. म्हणून अत्याचाराविरुद्ध मत प्रगट करून

पुढे एखादा होणारा खटला वाचवावा अशा आपत्तीत ते सापडलेले नव्हते. सरकारच्या दृष्टीने त्यांची जी काही पापे असतील त्यांची झडती १९०८ साली व पूर्वी १८९७ साली होऊन गेली होती. बरे, त्यांच्यावर एखादा नवा खटला उपस्थित करण्यासारखी सामुग्री सरकाराजवळ जर असती तर त्यानी ती पुढे काढण्याला केव्हाहि कमी केले नसते. कारण टिळकांची कटकट चुकवावयाची तर बेळगाव नगरच्या भाषणावर फुसका खटला रचून त्यांचा जामीन घेऊन किंवा त्यांना बोलण्याची बंदी करून सरकाराने खचित भागविले नसते, तर आपल्या संग्रहातील पुरावा दाखवून त्यांना पुनः ऐनजिनसी शिक्षा मिळण्याच्या खटल्याची भीति घालूनच गप्प केले असते. घरावरचा पाहारा उठणे याचा अत्याचाराविषयक मताशी काही एक संबंध नव्हता. आणि टिळकांचा वेगळा काही हेतु नसता तर त्यानी या पाहाऱ्याला मुळीच भीक घातली नसती. जे लोक त्याना भेटणारे नाहीत ते पाहारा नसता तरी येऊन भेटले नसते, व जे भेटणारे होते किंवा भेटावयास पाहिजे होते ते या नाही तर त्या मार्गाने त्याना भेटल्याशिवाय कधीहि राहिले नसते. शिवाय पाहारा ठेवल्याने स्वतः त्यांना काहीच जाच नव्हता व इतरानाहि किती जाच होऊं शकेल याच्या मर्यादा त्याना चांगल्या कळत होत्या.

अत्याचाराविरुद्ध मत प्रगट केले म्हणून सरकार दरबारी त्यांची अशी कोणती घडी बसावयाची होती किंवा राजकारणात तरी त्याना असा कोणता फायदा व्हावयाचा होता? कारण ते अत्याचाराना उत्तेजन देणारे नसले तरी राजद्रोही तर खरेच. एकदा सोडून दोनदा राजद्रोही. आणि राजद्रोही असणे ही सरकाराशी वाकडेपणाची अप्रीतीची पराकाष्ठाच होय. अत्याचाराविरुद्ध मत प्रगट केल्याने राजद्रोहीपणाचा त्यांच्यावरचा छाप कसा निघून गेला असता? कित्येकाना असे वाटते की पुढे चिरोलसाहेबावर टिळकाना फिर्याद करावयाची होती आणि आपली बेअब्रू साफ करून घ्यावयाची होती म्हणून अत्याचाराविरुद्ध हा जाहीरनामा काढून त्यानी पुराव्याची पूर्व तयारी केली. याहि म्हणण्यात अर्थ नाही. या जाहीरनाम्यात चिरोलसाहेबांच्या पुस्तकाचा उल्लेख आहे ही गोष्ट खरी. तथापि बेअब्रूची फिर्याद लावण्याचा त्यांचा यावेळी पक्का निश्चय झाला होता असे म्हणण्याला आधार नाही. शिवाय न्यायकोर्टात कोणतीहि कबुली ती कबुली देणाऱ्याच्या हिताविरुद्ध असेल तरच पुराव्यात ग्राह्य होते हे कायद्याचे तत्त्व टिळकासारख्या कायदेपंडिताला माहित नसेल असे संभवत नाही. चिरोलसाहेबांचा सगळा भर रँडचा खून व जॅक्सनचा खून या प्रकरणी जे कागदपत्र उपलब्ध होते त्यावर होता, व तो १९१४ साली टिळकानी प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्यातील एखाद्या सात्त्विक मताने नाहीसा थोडाच होणार होता?

अत्याचाराविरुद्ध मत प्रगट केल्याने अत्याचारी लोकांची एक प्रकारे गर्भित निंदा होते. म्हणून टिळकांनी जर कोणाला खरोखरच प्रत्यक्ष चिथावून

अत्याचाराना प्रवृत्त केले असते तर, ते बिचारे तुरुंगात असता किंवा शिक्षा भोगून परत आले असता त्यांच्याविरुद्ध सरकारजवळ मत प्रगट करणे हा कृतघ्नपणा किंवा अधमपणाहि ठरला असता. व टिळकांच्या स्वभावाची ज्याला माहिती असेल तो, ते असा अधमपणा करतील असे कधीहि म्हणाला नसता. तात्पर्य टिळकांनी जाहीरनामा काढला तो जितका सरकाराला उद्देशून तितकाच वास्तविक लोकाना उद्देशून होता. युद्धाच्या विशेष परिस्थितीत, म्हणजे जमले तर सरकारच्या या संकटांतून, देशाला काही लाभ करून घेण्याच्या बुद्धीने त्यानी जाहीरनामा काढला असला तरी, चळवळीत पडणाऱ्या लोकांशी प्रथमच बोलावयाचे व साधनाविषयी सर्वसाधारण उपदेश त्याना करावयाचा म्हणून अत्याचाराविषयी एकंदरीने आपले खरे व प्रामाणिक मत काय हे प्रगट करण्याचा तो योग्य प्रसंग असेच त्याना वाटले असले पाहिजे. शिवाय असा उपदेश त्यानी कोणाला पूर्वी खाजगी रीतीने केला नसता तर प्रसिद्धपणे तो करण्याची त्याना अडचण वाटली असती.

पण पूर्वी ते जे प्रसंगविशेषी खाजगी बोलले तेच प्रसिद्धपणे बोलण्याची त्याना चोरी का असावी? १९०६ साली नाशिकच्या मुलाना त्यानी काय उपदेश केला हे तत्कालीन त्रयस्थाच्या स्वतंत्र पुराव्यावरून म्हणजे हिंदु पंचातील लेखावरून १९०६ सालीच प्रसिद्ध झाले होते. आणि त्याचेच दुसरे प्रत्यंतर गंगाधरराव देशपांडे यांच्या आठवणीत आढळते. ते लिहितात "बेळगावास १९०६ साली गणपतीच्या उत्सवाकरिता प्रथमच टिळक बेळगावास आले. गोविंदराव याळगी हे स्वयंसेवकांचे पुढारी असून त्यांच्याबरोबर शेदोनशे उत्साही व तालीमबाज असलेले तरुण त्यांच्या दृष्टीस पडले. मिरवणूक संपल्यानंतर लोकमान्यानी मला एकीकडे म्हटले 'मी नाशिकाहून आता नुकताच आलो आहे. तेथेहि मला अशीच तरुणमंडळी दिसली व काही मला भेटली. त्यांचा उत्साह व महत्त्वाकांक्षा अपूर्व आहे पण त्यांच्यामध्ये थोडा मूर्खपणा आहे. तुमच्या तरुणाना सांभाळा. अशा मूर्खपणामुळे कार्यहानि होते!' " टिळकानी जाहीरनामा काढला ती वेळ समालोचनाची व नवीन धोरण आंखण्याची होती. अशाहि वेळी समजा एखादे उदाहरण वीरनवालीसारखे किंवा दुसरे घडते व एखाद्या जुलमी दुष्ट चांडाळ निर्दय मनुष्याचा एखादा निस्वार्थी हुतात्मा वीर वध करता तर त्याहि वेळी टिळकानी असेच म्हटले असते की वध झालेल्या मनुष्याने आपल्या कर्माचे फळ भोगले. आणि घाती मनुष्याने जरी अत्याचार केला तरी तो त्याने निःस्वार्थी बुद्धीने केला व केवळ जुलमाचा प्रतिकार करण्याकरिता केला. तथापि असे म्हणणे म्हणजे त्या तर नाहीच पण तशा अत्याचाराला त्यानी उत्तेजन दिले असे म्हणणे चूक होईल. नुकते परवा कलकत्त्यास एक उदाहरण घडले. कलकत्त्यातील एक बदमाष श्रीमान मनुष्य पैशाच्या बळावर नेपाळातील मुली आणवून त्याना नुसत्या भ्रष्टच करीत नसे तर त्यांचा छळहि करी. ही गोष्ट एका नेपाळी तरुणाला सहन न होऊन त्याने त्या बदमाष मनुष्याचा खून केला.

कोर्टापुढे सर्व हकिकत आल्यावर शिक्षा तर देणे प्राप्तच पण न्यायाधिशाने थोडी दिली व तीहि त्याची शिक्षा माफ व्हावी म्हणून कलकत्त्यास वर्तमानपत्रातून व इतर रीतीने चळवळ झाली. याचा अर्थ सरळच असा नव्हे काय की घाती मनुष्याबद्दल लोकाना व स्वतः न्यायाधिशालाहि सहानुभूति वाटली व क्षमा करण्याची थोडीतरी बुद्धि झाली ? मग हे लोक व हा न्यायाधीश खुनाला उत्तेजन देणारे म्हणावयाचे की काय ? किंवा त्याच्या जागी स्वतः हे असते तर त्यानी तीच गोष्ट केली असती असे त्यानी मानावयाचे की काय ?

आमचा मुद्दा हा की व्यक्तिशः अशा एखाद्या असाधारण प्रसंगी खुनी अत्याचारी मनुष्याचा कोणी गुण घेतला किंवा त्याला सहानुभूति प्रगट करण्याच्या रीतीने ती केली तर तो अत्याचारप्रवर्तक ठरत नाही. विशेष परिस्थितीत खुनी मनुष्याला अत्याचारी मनुष्याला तामसीपणाच्या पराकोटीला जाण्याचा मोह आवरला नाही असे म्हणण्याचाच त्याचा अर्थ असतो. असे जुलुमी निर्दय लोक सरकारी नोकरीत कधी असतच नाहीत असे सरकारने तरी का मानावे ? जनरल डायर याचा कोणी खून केला असता आणि जर एखाद्या वर्तमानपत्राने लिहिले असते की 'ठीक झाले. अत्याचाराचा मोबदला मिळाला.' तर ते अत्याचाराला उत्तेजन ठरले असते काय ? अशा प्रसंगी 'ईश्वरा घरी न्याय आहे' असेच कोणीहि म्हटले असते आणि ईश्वरा घरचा न्याय हा पुष्कळ वेळा असाच कठोर असतो. तो अत्याचारांच्या रूपाने प्रगट होतो. दयाळू ईश्वराच्या घरचा न्याय झाला म्हणून तो काही नेहमी गुलाबपाणी शिंपडूनच होत नाही तर गुलाबाच्या काट्याने ओरखडूनहि होतो. ईश्वरा घरचा न्याय म्हणणे ही श्रद्धाळू भाषा झाली. पण तिला खरे तत्त्वज्ञानाचे बौद्धिक स्वरूप आहे. म्हणजे कार्यकारणसंबंधाच्या विधानाचे स्वरूप आहे. आणि कार्यकारणसंबंध दिसतो तो बोलून दाखविणे हे उत्तेजनाच्या सदरात येऊ शकत नाही. का की कार्य याच्या घरचे नाही व कारण हि यांच्या हातचे नाही. दोन्ही परस्पर आहेत. ग्लॅडस्टनसाहेबानी जेव्हा आयर्लंडमधील तुरुंग लोकानी डायनामाईटने उडवून दिला असे ऐकिले तेव्हा ते म्हणाले म्हणतात की 'याने तरी इंग्रज लोकांचे डोळे उघडतील.' या म्हणण्याचा काय अर्थ ? ईश्वरा घरचा न्याय झाला असाच याचा अर्थ. जुलूम असह्य झाला हे कारण व डायनामाईटचा अत्याचार हे कार्य. म्हणून काही ग्लॅडस्टन हा वरील अत्याचाराला उत्तेजनदेणारा होता असे कोणी म्हणत नाही. बंगालच्या अत्याचाराबद्दल टिळकानी संमति दर्शविली असा आरोप ठेवून त्याना शिक्षा देण्यात आली पण कोणत्या बंगाली तरुणाने केसरी किंवा मराठा वाचला होता ? किंवा अत्याचारांचा उपदेश करण्याला बंगाल्यात टिळकानी कोण दूत कधी पाठविले होते ? बरे त्यांच्या कक्षेत येण्यासारखे जे लोक त्यांना टिळक प्रत्यक्ष कसा उपदेश करीत हे वर नाशिक व बेळगाव यासंबंधी जे सांगितले त्यावरून दिसून आलेच आहे. हिंदुपंचाने त्यावेळी लिहिले ते टिळकाना पुढे खटल्यात उपयोगी पडावे म्हणून लिहिले

नाही, तर 'टिळक असावे तितके जहाल नाहीत' असे म्हणून त्याना मूर्खात काढू पाहणाऱ्या लोकाना त्यानी उलट उपदेश काय केला हे सांगून टिळकांच्या अभिमानाने त्या लोकांचा निषेध करण्याकरिता ! तेव्हा टिळक जिवंत तरी होते. पण टिळक वारल्यावर गंगाधरराव देशपांडे यानी जी आठवण लिहिली ती तर टिळकांच्या बचावाकरिता नाही ना? आता टिळक मेल्यावर त्यांच्यावर कोण खटला करतो? अर्थात् त्यानी दिलेले संभाषण यथार्थच होय.

टिळकांशी अनेक प्रकारच्या स्वभावांच्या लोकांचा संबंध येत होता ही गोष्ट खरी. पण पुष्कळ लोकाशी संबंध आला म्हणून टिळक आपला स्वभाव कसा सोडणार ? एखादा भाविक श्रद्धाळू मनुष्य जर टिळकाना येऊन म्हणू लागला की " देशवर येण्याकरिता मी सर्वसंगपरित्याग करून जपाला अनुष्ठानाला बसतो." तर ते त्याला म्हणाले असते " तूं चूक करितोस. निष्कामकर्मप्रवृत्ति व सदिच्छा हा ईश्वराराधनेचा एक मार्गच आहे. लोकसंग्रहकारक व लोकोपयुक्त कर्म मनुष्याने करीत राहिले पाहिजे. हा ईश्वराचाच गीतेत उपदेश आहे. म्हणून तुझ्यासारख्या निष्ठावंत माणसाचा उपयोग नुसती माळ ओढीत बसण्यापेक्षा आम्हा चार लोकानी आरंभिलेल्या कार्याकडेच व्हावा." तसेच उलट आततायी अत्याचारी माणसे टिळकाकडे येऊन 'एष पन्थाः एतत्कर्म--' असे म्हणती तर " अति तामसवृत्ति ही नाशाला कारण होते म्हणून तुम्ही ती टाकून देऊन नित्यकर्मप्रवृत्त व्हा " असेच टिळकानी त्याना सांगितले असते अशी कल्पना का करू नये? टिळक केव्हाहि आपल्या स्वभावाप्रमाणेच उपदेश करणार व आपल्या मार्गालाच येऊन लोकानी मिळावे आणि आपला रजोगुणी संप्रदाय वाढावा अशीच त्यांची इच्छा असली पाहिजे. अत्याचारी प्रवृत्तीचे अनेक लोक त्याना येऊन भेटले असतील हे खरे आहे. त्यांची कीर्ति व देशभक्तिच अशी होती की त्यांचे दर्शन घ्यावे किंवा त्याना भेटावे किंवा त्यांच्याशी चर्चा करावी किंवा त्यांचा सल्ला घ्यावा असेच कोणालाहि वाटावे. त्या काळात युरोप अमेरिकेत जाऊन अनेक लोक परत येत. तेथे चाललेल्या चळवळी पाहात. तेथे मिळणाऱ्या विद्या शिकून येत व तेथील स्वतंत्र विचाराच्या लोकांच्या उपदेशानी कान भरून व मन भारून घेऊन येत. असे लोक टिळकाना भेटल्याचा पुरावा गुप्त पोलिसखात्याच्या दप्तरी पुष्कळ असेल असे आम्हास वाटते. कारण हे असले लोक आले म्हणजे आपली गुप्त--पोलिसरूपी पडछाया बरोबरच घेऊन येत. पण ते टिळकाना भेटले हा काही टिळकानी त्यांचे मानले किंवा उत्तेजन दिले याचा पुरावा होत नाही. असल्या दरवाजाबाहेरच्या कितीतरी पुराव्याने सरकारचे मन कलुषित झाले असले पाहिजे.

आता टिळकाना जर अत्याचारप्रवर्तन करावयाचे नव्हते तर त्याना तरुणपिढीच्या शक्तीचे बलवर्धनाचे तेजाचे ओजाचे इतके कौतुक का वाटावे ?-- असा भोळा प्रश्न कित्येकाना सुचेल. पण हे वरील गुण फक्त अत्याचाराचे साधन होत असे समजणे हीच मुळातली चूक होय. चिरोलसाहेबांच्या पुस्तकात टिळ-

कानी आखाडे काढण्याला उत्तेजन दिले असा एक त्यांच्यावर आरोप केला आहे. पण याहून हास्यापद आरोप दुसरा कोणता असणार ? कारण हा आरोपच होऊ शकत नाही. टिळक एक राजकारणात पडले व जहाल मताचे होते म्हणून त्यांच्यावर हा आरोप करणे चिरोलसाहेबाना सोईचे वाटले. पण कोल्हापूरकरमहाराजानी आखाडे कुस्त्या पहिलवानगिरी याना एकंदरीने जितके उत्तेजन दिले त्याच्या एक दशांशहि टिळकानी दिले नसेल. गावोगाव आखाडे असतातच व नवे निघतातच. शरीरसामर्थ्य संपादण्याच्या त्या शाळाच होत. व इतर शाळाप्रमाणे वडील पिढीची माणसे आपल्या खर्चाने त्या काढून देतात किंवा तरुणपिढीची माणसे आपल्या हौसेने काढतात. आणि आखाड्याना उत्तेजन म्हणजे अत्याचाराना उत्तेजन हे खरे असले तर सगळ्या जगालाच अत्याचारी म्हणावे लागेल. विलायतेतहि बलवर्धनाचे असे आखाडे नसतील असे नाही. तेथे 'शूटिंग क्लब्स' तर खास आहेत. मग त्या क्लबात सर्व अत्याचारी लोकच निर्माण होतात काय ? तात्पर्य, मनुष्य बलवान असणे हा त्याचा स्वाभाविक धर्म व हक्क आहे व त्याच्या हितचिंतकाला तो हक्क त्याला मिळवून देण्याच्या कामी मदत करावीच लागते. पण स्वतःच्या आरोग्याशिवाय शरीरबलाचा दुसराहि उपयोग असतो. कालिदासाने रघुवंशात म्हटलेच आहे

> बलमार्तभयोपशान्तये विदुषां सत्कृतये बहुश्रुतं ।
> वसु तस्य विभोर्न केवलं गुणवत्तापि परप्रयोजना ॥

म्हणजे "या राजाचे बल दुसऱ्याचे भयनिवारण करण्याकरिताच होते, दुसऱ्याला पिडा करण्याकरिता नव्हते. त्याचा बहुश्रुतपणा हा विद्वान लोकांचा सत्कार करण्याकरिता होता, स्वतःची विद्वत्ता गाजविण्याकरिता नव्हता. तसेच त्याचे द्रव्य दुसऱ्याच्या उपयोगाकरिता होते, स्वतःच्या चैनीकरिता नव्हते. व त्याचे गुण इतर गुणीजनांचा परामर्ष घेण्याकरिता होते, स्वतःच्या वैभवाकरिता नव्हते." तात्पर्य मनुष्याचा प्रत्येक गुण किंवा त्याची प्रत्येक शक्ति हीं नेहमीच आपल्याला उपयोगी पडण्याकरिता असतात असे नाही. तर तीं परप्रयोजन म्हणजे दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याकरिताहि केव्हा केव्हा असतात. अशा बलसंपन्न तरुणपिढीचा उपयोग कोठे नजरेसमोर अन्याय घडत असला तर त्याचे निवणार करण्याला उपयोगी पडावा अशी अपेक्षा टिळकानी केली असल्यास त्यात काय गैर ? हिंदुस्थानात अत्याचारी तरुण नसोत, पण समोर दिसणारा अन्याय निवारण करतील असेहि तरुण नसावे काय ? पण टिळकाकडे अशा तात्त्विक दृष्टीने किंवा राष्ट्रीय दृष्टीने चिरोल साहेब कसे पाहणार ? व सरकार तरी कसे पाहणार ? म्हणून तेजस्वी ओजस्वी असे काही लोक अत्याचारी आणि त्यांच्यावर टिळकांचे प्रेम म्हणून टिळक अत्याचार प्रवर्तक अशी सरळ अनुमाने त्यानी बसविली. एखाद्या पोलिस रिपोर्टात ही विचारसरणी शोभेल. पण मुत्सद्दी म्हणविणाऱ्या

अधिकाऱ्याना ती शोभत नाही. आणि विलायतेतील ज्युरी तर काय ! त्यांच्यापुढे सर एडवर्ड कार्सन यानी खुनाच्या नांदीपासून जे नाटक सुरू केले ते खुनाच्या भरतवाक्यात संपविले. आणि त्यात गणेशोत्सव कोंबले आखाडे कोंबले शिवाजी उत्सव कोंबले काय वाटेल ते कोंबले. टिळकांची मजल अशा तरुणाशी फार तर आत्मसंरक्षक किंवा स्वाभिमानदर्शक कृत्यांचा उपदेश करण्यापर्यंत गेली असेल. पण ' ऊठ जा आणि, उच्च राजकीय हेतूकरिता, नाहक अत्याचार कर ' असे त्यानी कोणाहि तरुण मुलाला सांगितले असणे शक्यच नाही. आणि पहिली दोन प्रकारची कृत्ये करण्यास सांगितली असली तर ती वावगीहि नाहीत.

# भाग ९

## उपसंहार

लो. टिळक यांच्या चरित्रातील मुख्य गोष्टी व हकीकती येथवर क्रमशः आम्ही सांगितल्या. व प्रसंगोपात्त निरनिराळ्या प्रश्नासंबंधाने त्यांच्या धोरणाचे वर्णन होताहोईतो त्यांच्याच शब्दानी दिले. तथापि टिळक ही व्यक्ति, त्यांचे कुटुंब व संसार, त्यांचे स्नेही सोबती व अनुयायी, आणि सामाजिक व धार्मिक बाबतीतील त्यांचे आचरण व धोरण यासंबंधाने दोन शब्द लिहून हा ग्रंथ पुरा करितो. पाच वर्षांपूर्वी या ग्रंथाचा पूर्वार्ध लिहिला तेव्हा तो अपूर्ण व टिळकांच्या पूर्व वयाच्या कारकीर्दीचा म्हणून अशा प्रकारचे विवेचन त्यात करिता आले नाही. दुसरे पक्षी आता ते करण्याचे काम इतर रीतीने काहीसे अनवश्यकहि झाले आहे. कारण दरम्यान श्री. सदाशिव विनायक बापट यानी टिळकांच्या 'आठवणी व आख्यायिका' यांचे दोन खंड एकंदर सुमारे सातशे पानांचे प्रसिद्ध केले असून त्यात शेदोनशे गृहस्थानी टिळकाविषयी सांगण्यासारख्या व लक्षात ठेवण्यासारख्या शेकडो गोष्टी स्मरणपूर्वक सांगितल्या आहेत. अशा स्मरणकथनात टिळकांची व्यक्ति त्यांचा स्वभाव त्यांचे गुण त्यांची कार्ये त्यांची कार्य करण्याची पद्धति व महत्त्वाच्या विषयावरील त्यांची मते यावर अनेक बाजूनी उत्कृष्ट प्रकाश पडलेला आहे. यामुळे त्यांत टिळकांचे चित्र जितके ढळढळीत मनोवेधक व हृदय-स्पर्शी उमटले आहे तितके कोणाहि एका चरित्रकाराच्या हाताने, तो कितीहि कुशल असला तरी, उठविता येणे शक्यच नाही. म्हणून हा उपसंहार लिहिताना एरव्ही आम्हाला जितके लिहावे लागले असते व लिहिता आले असते तितके लिहिण्याचे कारण आता उरले नाही. आमचे काम आठवणी लिहिणाऱ्या शेकडो टिळकभक्तानी परस्पर पुष्कळच केले आहे. तथापि कोणीहि देऊळ बांधले तर त्याचे लहानसे का होईना शिखरही बांधलेच पाहिजे. म्हणून आमच्या या चरित्र ग्रंथाला या दृष्टीचे अपूर्णत्व राहू नये येवढ्याचकरिता प्रस्तुत प्रकरण लिहित आहो.

### ( १ ) व्यक्तिविषयक

**व्यक्तिस्वरूप**—टिळकांची कीर्ति सर्व हिंदुस्थानभरच काय पण इतर काही देशातहि पसरली होती. हिंदुस्थानातल्या रानाजंगलातल्याहि मनुष्यानी टिळकांचे नाव कर्णोपकर्णी ऐकले होते. आणि टिळक म्हटले म्हणजे कोणी तरी एक 'फार मोठा माणूस' इतकेच ज्ञान त्याना असे. देव भूत राक्षस यांचे वस्तु-रूप कोणीच पाहिलेले नाही. हे तीनहि आहेत किंवा असावेत अशी कबुली मन आंतून देते. पण या तिघांचेहि स्वरूप कोणी पाहिलेले नसते. त्यांची कल्पना मन करावयासच बसले तरी प्रत्येकाची वेगवेगळी होईल. किंबहुना त्याच एकाच

माणसाने निरनिराळ्या वेळी कल्पना चालविली तरी ही कल्पनारूपे वेगवेगळी असू शकतील. पण भक्तिभावना हे जसे ईश्वराचे अस्तित्व मानण्याला सबळ कारण, तशीच भूते व राक्षस यांचे अस्तित्व मानण्याचे खरे कारण भीति हे असते.

'कीर्तिमान्' टिळकांची हजारो लोकांची कल्पना त्यांच्या भौतिक स्वरूपाच्या कल्पनेइतकीच वस्तुस्थितीला सोडून असण्याचा संभव होता. ज्यानी टिळक कधी पाहिले नव्हते अशानी त्यांच्या स्वरूपाविषयी चालविलेल्या कल्पना ऐकण्याचा प्रसंग मला अनेक वेळा आला. त्यानी मुद्दाम होऊन टिळकांचे वर्णन केले नाही पण त्यांच्या बोलण्याच्या ओघावरून ते वर्णन न कळत बाहेर पडत असे. सामान्य लोकांची कल्पना अशी की टिळक हे कमीत कमी सहा सात फूट उंच, भले लठ्ठ. कदाचित् गुलमिशावाले. हातात एखादे भले मोठे दांडके वापरणारे असे पुरुष असावे. पण हे वर्णन वस्तुस्थितीला अगदी सोडून होते. दुसऱ्या कित्येकांची कल्पना अशी की टिळकाना एखादा साहेब दिसला न दिसला पुरे, ते त्याच्या अंगावर खेकसत असतील, त्याला तोंडावर शिव्याशाप देत असतील, त्याचे आईबाप उद्धरीत असतील, किंवा हातातले सोडगेहि त्याच्या अंगावर उगारीत असतील! ही कल्पना वरच्या इतकीच वस्तुस्थितीला सोडून होती हे सांगणे नकोच. टिळक हे कोणी मोठे विरागी म्हणजे साधूसंतासारखा पोशाख केलेले, किंवा अंगाला भस्म फासलेले, किंवा कपाळाला लाल शेंदराचे बोट लावलेले, अशी जी कित्येकांची कल्पना तिचीहि गत वरीलप्रमाणेच. आणि टिळक हे देवासारखे होते ते नवसाला पावत किंवा मनातले ओळखीत किंवा भविष्य सांगत किंवा रोग बरे करीत अशाहि ज्या कल्पना—अर्थात् फार थोड्या लोकांचे ठिकाणी दिसून येत होत्या त्याहि खोट्या होत्या हे सांगावयास नको.

टिळकांचे फोटो रंगीत चित्रे किंवा साधी छापील चित्रे ही सर्व हिंदुस्थानभर इतकी पसरलेली आहेत की त्यांच्या स्वरूपाची सामान्यहि कल्पना नाही असा मनुष्य विरळा. महाराष्ट्रात तर काही विशिष्ट वर्गाचे लोक सोडले असता बहुधा असे एकहि मध्यम वर्गातील घर सापडणार नाही की ज्यात टिळकांचे चित्र कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपात नसेल. टिळकांच्या आयुष्यात अनेक प्रसंग असे आले की सर्व देशाच्या तोंडी त्या वेळी त्यांचे नाव झाले. आणि या प्रत्येक प्रसंगाचा फायदा घेऊन छापखानेवाल्यानी त्यांची चित्रे हजारोनी काढून विकली. त्यांच्या मरणानंतरहि कोणी कॅलेंडरावर कोणी आल्बममध्ये कोणी वर्तमानपत्रावर कोणी पत्रव्यवहाराचे कागद किंवा लिफाफे याजवर कोणी पंचांगावर कोणी रोजनिशीवर अशा रीतीने त्यांचे चित्र अजूनहि छापतात. कोणी ही गोष्ट स्वार्थदृष्टीने कोणी व्यक्तिशः त्यांच्या अभिमानाने कोणी पक्षाच्या अभिमानाने तर कोणी राष्ट्रीय भावनेची खूण म्हणून करितात. कसेहि असले तरी प्रतिमादर्शनाचा मान या देशात टिळकाना जितका लोकानी दिला तितका इतर कोणाहि व्यक्तीला दिला असेल असे वाटत नाही.

पण या सर्व चित्रात व प्रतिमात टिळकाना परप्रांतीय लोकानी हटकून ओळखण्याच्या खुणा म्हटल्या म्हणजे त्यांचा आंगरखा व त्यांची पगडी याच होत. आंगरख्याचा पांढरा रंग व पगडीचा तांबडा रंग हे अखेरपर्यंत पेटंट घेतल्याप्रमाणे अबाधित राहिले. आणि टिळक विलायतेस गेले नसते तर त्यांचे कोटपाटलोण घातलेले चित्र कधीच कोणास पाहावयास मिळाले नसते. या विदेशी पोषाखात मुद्दाम कोणी विनंति केली तरी ते फोटो काढून घेण्याला उभे राहत नसत. कारण हा विदेशी पोषाख घालणे हे एक संकट व अनिर्वाह्य दूषण असे त्याना वाटे. आणि आज अशा पोषाखात त्यांची चित्रे पाहावयास सापडतात ती विलायतेत निघालेल्या फोटोवरून तयार केलेली आहेत असे समजावे. विदेशीच काय पण देशी पोषाखातहि त्यानी कधी फारसा फरक केला नाही. कित्येक तैल चित्रात त्यांच्या उपरण्याचा काठ जरीचा दाखविलेला असतो. परंतु तेहि अपवादाला नियम मानण्यासारखेच अयुक्त होय. कारण त्यांच्या अंगावर जर कधीकाळी कोणी जरीचे उपरणे पाहिले असेल तर ते लग्नासारख्या समारंभात व तेहि भाचाने जरीचेच उपरणे वेळी पुढे केले म्हणून. एखाद्या सभेत समारंभात एखाद्या हौशी भक्ताने जरीचे उपरणे अर्पण केले तर ते त्या समारंभापुरते त्यांच्या अंगावर राहत असे.

पोषाखाची ही गोष्ट. मग अलंकार किंवा इतर शोभा याविषयी बोलावयालाच नको. पुरुषाचे स्वाभाविक अलंकार म्हणजे डोक्याचे केस व दाढीमिशा. यासंबंधानेहि त्यांची उदासीनवृत्तिच असे. त्यानी डोक्यावर घेरा किंवा संजाब कधी ठेवला नाही. मिशा कोरल्याकातरल्या नाहीत. श्मश्रु चांगली वाढल्याशिवाय केली नाही. व केली तेव्हाहि न्हाव्याकडून शेंडीला कधी बोटभर तेल लावून घेतले नाही. आपल्या शरीराला दुसऱ्याचा स्पर्श हे दूषण मानण्याचा त्यांचा स्वभाव असे. यामुळे दमले भागले किंवा आजारी पडले तरी पाय दाबून घेणे अंग चेपून घेणे पाठीवर बुक्या मारून घेणे अशा गोष्टी नोकराकडून जवळच्या लोकाकडून किंवा घरच्या मुलाकडूनहि त्यानी कधी करून घेतल्या नाहीत. याच स्वभावामुळे त्यांच्या मित्राने देखील त्यांच्या खांद्यावर हात टाकून बोलणे चालणे केले असे कोणास पाहावयास सापडले नाही. मनुष्यघाणा असा त्यांचा स्वभाव नव्हता. किंबहुना सोबतसंगत त्याना प्रिय असे. तथापि मनाप्रमाणे त्यांच्या शरीरालाहि स्वातंत्र्याची आवड फारच होती.

टिळकांचा वर्ण निमगोरा होता. उंची पाच फूट पाच इंचाहून अधिक नव्हती. म्हणजे त्यांची गणना ठेंगण्या किंवा फार तर मध्यम उंचीच्या माणसातच करिता येईल. त्यांचे अंग सडपातळ होते. उतार वयातहि त्यांचे पोट सुटलेले नसून सालीसारखे पातळ असे. लहानपणी त्यानी तालीम केली होती तरी त्यांचे खांदे किंवा छाती यावर त्या मेहनतीचा विशेष परिणाम झालेला दिसून येत नव्हता. पण उलट अंगाच्या काठीला बाक किंवा पोकहि आले नव्हते. चाल-

ताना ते ताठ चालत. मात्र वयोमान झाल्यावर पाय लटपटत असत. तथापि इतर कोणाचा आधार त्याना घ्यावा लागत नसे. पुढे पुढे दृष्टीला मंदपणा आल्यावर उजेडातून अंधारात जाताना किंवा पायऱ्या उतरताना त्याना जवळच्या माणसाने हात देण्याची जरूरी वाटे. त्यांची दृष्टी साफ नव्हती तरी आरशी लावण्याचा त्यानी कंटाळाच केला. त्यांच्या चेहऱ्याची व डोळ्यांची ठेवण चित्रात दिसते, पण डोळ्यात जे तांबूस पिंगट वर्णाचे तेज असे व ज्यातून त्यांचे अनेक स्वभावगुण प्रगट होत ते चित्रात अर्थातच दिसून येत नाही. त्यांचा आवाज जात्या मोठा होता. व ते साधा वादविवाद करीत असले तरी भांडतात असे वाटे. आणि रागावून बोलू लागले म्हणजे मग काही विचारावयासच नको. एकदा थट्टा मस्करी सुरू असता विषय असा निघाला की सर्व पुढाऱ्यांची मिळून एक नाटक कंपनी काढावी. तेव्हा टिळक म्हणाले 'मला पार्ट कोणता द्याल?' त्यावर एक विनोदी मित्र म्हणाला 'तुम्हाला पार्ट देण्याची सोय नाही. कारण तुमचे आत्मगत भाषणहि दूर बसून लोकास ऐकावयाला मिळणार मग पैसे देऊन तिकीट काढून आत कोण येणार!'

**टिळकांचा गृहस्थाश्रम**—टिळकांचे कुटुंब सात आठ माणसांचे असे. त्याना वडिलांच्या बाजूचे आप्त म्हणजे चुलते. त्यांच्या संबंधी थोडा उल्लेख या ग्रंथाच्या पूर्वार्धात आलाच आहे. या चुलत्यांचे दोघे मुलगे प्लेगने वारले. एक मुलगी तीहि वारली. फक्त सून राहिली. तिच्याकरिता टिळकानी स्वतःचे पितृधन पाच हजार रुपयांचे होते त्यात भर घालून तिच्या करिता कोकणात एक घर व बागायती ठिकाण घेऊन ठेवले, व तिच्या हयातीनंतर ते आपला धाकटा भाचा गंगाधरपंत विध्वंस यास देणगी दाखल द्यावे असे मृत्युपत्रात लिहून ठेवले. टिळक घराण्याची मंडळी कोकणात व देशावर बरीच आहेत पण त्यांचे जाणेयेणे कोणाकडे फारसे नसे. त्याचप्रमाणे टिळकांच्या आजोळचे लोकांचाहि त्यांचा विशेष संबंध राहिला नाही. टिळकांच्या सासुरवाडची बाळ घराण्याची मंडळीहि त्यांच्या घरी कधी येऊन राहिली किंवा टिळकांचे मुलगे आपल्या आजोळी म्हणून कधी विशेष गेले असे घडले नाही. कोकणाशी टिळकांचा संबंध राहिला तो त्यांचे दोघे भाचे आणि मामेभाऊ रंगोपंत महाजन यांचा मुलगा गंगाधरपंत यांच्या पुरता. टिळकांचे ममत्व आपल्या बहिणीच्या ठिकाणी असे. व तिच्या घरची स्वास्था असावी तशी नाही म्हणून ते आपल्या मेहुण्याला मधून मधून खर्चाला पाठवीत. आणि सगळे भाचे त्यानी एकामागून एक शिकण्यासाठीं पुण्यास आणून घरीच ठेवले.

यापैकी दोन धाकटे भाचे अकाली वारले. वडिलापैकी लहान गंगाधरपंत हे पुण्यासच असतात. गंगाधरपंत महाजन हे शेतकी कॉलेजात शिकून पदवी घेऊन तयार झाले तेव्हा देशी साखरेचे काम शिकण्याला त्याना टिळकानी परदेशात पाठविले. पुढे त्याना सरकारी नोकरी लागली व मांजरी येथील सरकारी

शेताचे ते सुपरिंटेंडेंट होते. ती जागा सोडून त्यानी बेलापूर सिंडिकेटकडे नोकरी धरली व हल्ली हरिगाव येथे कंपनीच्या ऊसाच्या लागवडी खात्याचे ते मुख्याधिकारी आहेत. त्यांच्याचकडे कायम राहिले असे थोरले भाचे धोंडोपंत विध्वंस. याना त्यानी लहानपणापासून वाढविले शिकविले त्यांचे लग्नकार्य केले सगळा संसार चालविला. तात्पर्य जन्मभर मुलासारखे वागविले. आणि धोंडोपंत यानीहि टिळकांची सेवा मुलाहून अधिक केली. टिळक न्यू स्कुलात असता घरची भाजी आणण्यापासून त्यांची सेवा सुरू झाली. ती घरची भाजी तर ते टिळकांच्या आजन्म आणीतच होते. परंतु पुढे प्रत्येक काम घरच्या संसाराचे, म्हणजे लग्नमुंजींच्या समारंभांची व्यवस्था करणे, घरचे नित्यनैमित्तिक कार्य करणे, उपवर मुलीना स्थळे शोधणे, किंवा बाहेरचे म्हणजे छापखान्याचे वर्तमानपत्राचे निवडणुकीचे लातूरच्या गिरणीची व्यवस्था करण्याचे गुप्त स्वरूपाच्या बातम्या कागद पत्र आणण्या पोचविण्याचे पैशा अडक्याचा व्यवहार करण्याचे—ही धोंडोपंत विध्वंस यानीच केली. आणि कोलंबो येथे टिळकांनी मृत्युपत्र केले त्यात धोंडोपंत याना आपल्या छापखानावर्तमानपत्रांचे कायमचे व्यवस्थापक व मृत्युपत्राचे एक्झीक्यूटर नेमले. टिळकांचा धोंडोपंतावर पूर्ण विश्वास होता व धोंडोपंतानीहि तो आजन्म व मरणोत्तर संभाळला. खरा हरकामी मनुष्य संसारात कसा असतो याचे टिळकांच्या घरी धोंडोपंत हे एक मूर्तिमंत उदाहरण होते. त्यानी कॉलेजचा अभ्यास सोडून घर खाते लवकरच हाती घेतले. व ते घेण्याला टिळकाना घरचा असा मनुष्य हाताशी हवाच होता. आणि जिकडे फेकतील तिकडे बिन बोभाट बिन तक्रार जाणे व पडेल ते काम करणे यामुळे जन्मभर टिळकाना धोंडोपंत यांची फार मदत झाली. टिळकानी घरची अशी काळजी फारशी कधी वाहिलीच नाही. पण जी काय त्यानी वाहिली तिचा भार धोंडोपंतावर असल्यामुळे व तो संभाळण्याची पात्रताहि धोंडोपंतामध्ये असल्यामुळे घरातून पाऊल बाहेर पडल्यापासून परत येईपर्यंत त्यानी घरी कसे होईल ही चिंता कधी बाळगिली नाही. १८९७ सालापर्यंत केसरीछपाईचे बटवड्याचे व हिशेबाचे सर्व काम आर्यभूषण छापखान्याकडे आणि पैशा अडक्याचा व्यवहार चित्रशाळेकडे असल्यामुळे धोंडोपंताना घरखर्चाला लागणारे पैसे आणण्यापलीकडे काही काम नव्हते. पण १८९७ साली चित्रशाळेचे वासुदेवराव जोशी त्या वेळचे टिळकांचे कुलमुखत्यार हे ब्रह्मदेशांत गेले व तिकडेच फार दिवस राहिले आणि आर्यभूषणचे मालक हरिपंत गोखले यानी दगा देऊन केसरी छापीत नाही म्हणून सांगितले, तेव्हा धोंडोपंताना विंचुरकरांच्या वाड्यांच्या पडवीत चार देवद्वारी खोके मांडून कचेरीची स्थापना करावी लागली. व तेव्हांपासून आज तीस वर्षे पर्यंत सर्व प्रकारच्या परिस्थितीतून निभावून त्यानी ते काम चालविले आहे.

टिळकाना एकंदर ८।९ अपत्ये झाली. पैकी त्यांच्या मरणकाळी तीन मुली व दोन मुलगे हयात होते. दोन तीन मुले लहानपणीच निवर्तली. पण एक

मुलगा विश्वनाथ हा मोठा म्हणजे वीस वर्षांचा कॉलेजात शिकत असता प्लेगने वारला. टिळकांच्या मरणकाळी धाकटे दोन मुलगे कॉलेजात शिकत होते. एक फर्ग्यूसन कॉलेजात बी. ए. च्या वर्गात व दुसरा मुंबईस ग्रँट-मेडिकल कॉलेजात होता. टिळकांच्या मृत्यूनंतर काही दिवसानी या दोघानीहि कॉलेज सोडले व हल्ली ते वडिलांच्या निरनिराळ्या ग्रंथांच्या पुनर्मुद्रणाचे व भाषांतरांच्या छपाईचे वगैरे कामे करीत असतात. टिळकांच्या हयातीत एका मुलाचा विवाह १९२० साली झाला. तीनहि मुलींचे विवाह आधी बरीच वर्षे झालेले होते. सर्वात थोरली मुलगी कृष्णाबाई नाशिकचे वकील व म्युनिसिपल प्रेसिडेंट विश्वनाथपंत केतकर बी. ए. एलएल बी याना दिली. हा विवाह १८९२ साली झाला. दुसरी मुलगी दुर्गाबाई हिचा विवाह १९०२ साली पांडुरंगराव वैद्य यांच्याशी झाला. हे बी. ए. एल. सी. ई. असून हल्ली सरकारी इंजिनिअर खात्यांत नोकर आहेत. तिसरी मुलगी मथूबाई इचा विवाह डॉ० प्रो. श्रीरंग मोरेश्वर साने यांच्याशी १९०५ साली झाला. साने हे तेव्हां अलाहाबादेस कॉलेजात शिकत होते. त्यांचे वाडवडील इकडून बाजीराव-शाहीत उत्तर हिंदुस्थानात गेले ते तिकडेच राहिवासी झाले होते. लग्न झाल्यावर टिळकानी साने यांची बुद्धिमत्ता लक्षात घेऊन त्याना हिंदु एज्युकेशन फंडाची शिष्यवृत्ती देऊन व त्याचे भरीला स्वतःचे पैसे घालून १९०६ साली जर्मनीला रसायन शास्त्राच्या अभ्यासाला पाठविले. तेथे सुमारे सहा वर्षे राहून पी. एच. डी. ची पदवी मिळवून इकडे आल्यावर त्यानी मुंबईस एन्. पॉवेल कंपनीच्या रसायनशाळेत काही वर्षे रससंशोधनाचे व प्रयोगाचे काम केले. काही दिवस लाहोर येथे त्यानी प्रोफेसरी केली होती व हल्ली लखनौ येथील भौतिक शास्त्राभ्यासाच्या युनिव्हर्सिटीत ते कायमचे प्रोफेसर आहेत.

टिळकांच्या पत्नी सौ० सत्यभामाबाई यांचे स्वभाववर्णन आम्ही या चरित्रग्रंथाच्या पूर्वार्धात दिलेच आहे. त्यांना गृहसौख्य एका प्रकारचे फार चांगले होते. ते असे की टिळकानी त्याना कधी काही उणे पडू दिले नाही व रागाचा एक शब्दहि कधी बोलले नाहीत. पतीची साधी राहणी व उदात्त चरित्र डोळ्यापुढे असल्यामुळे त्यानीहि आपले चारित्र्य तसेच ठेवले होते. त्याना साक्षरतेचे शिक्षण नव्हते. तथापि आपल्या पतीच्या उद्योगाचे मर्म समजण्याइतकी मार्मिकता त्यांच्या अंगी होती. तसेच पतीची लोकप्रियता व कीर्तिमत्ता यांची नित्य नवी उदाहरणे डोळ्यापुढे येत असल्याकारणाने सौ० सत्यभामाबाईना घर प्रपंचात टिळकांचे लक्ष कमी का असते याची पूर्ण जाणीव होती. या बाईना आपल्या पतीप्रमाणेच मधुमेहाची व्यथा होती. व त्यातहि सर्व काळ चिंतेत व दुःखात जाई. या कारणाने त्या टिळक हे तुरुंगातून सुटून येण्याच्या आधीच निवर्तल्या. टिळकांचा संसार उध्वस्त झाला पण या हिंदु स्त्रीने सौभाग्याची शर्यत जिंकली.

**शारीरिक गुण**—टिळकानी लहानपणी मेहनत केली तरी मोठेपणी ते कोणत्याहि प्रकारचा व्यायाम घेत नसत. नित्याच्या कामकाजातली मेहनत व दगदग ही त्याना पुरेशी होई. शिवाय त्यांचा आहार नेहमी बेताचा असल्यामुळे शारीरिक श्रमाची विशेष आवश्यकता नव्हती. अगदीच घरी करमेनासे झाले तर एखादे दिवशी संध्याकाळी मित्रमंडळीबरोबर गप्पा मारीत ते लकडीपुलाकडे फिरावयास जात. पण व्यायाम नियमितपणे न घेतला तरी शरीरसामर्थ्य त्यांच्या स्वतःच्या कामापुरते भरपूर असे. उदाहरणार्थ सिंहगडावर उन्हाळ्यात त्यांचा मुक्काम असे तेव्हा ते फिरावयाला म्हणून निम्मा डोंगर उतरून चढून जात. पण विशेष प्रसंगी सबंध गड उतरून एखाद्या गावी जाऊनहि परत वर येत. अगदी पुढे पुढे ते गड चढावयाला खुर्ची करीत.

टिळकांच्या कामाचा व्याप जसा मोठा होता तसेच विश्रांति न घेता काम करण्याची त्यांची शक्तिहि जबरदस्त होती. कार्याच्या तन्मयतेने तहानभूक विसरणे ही गोष्ट अतिशयोक्तीची वाटली तरी काही मर्यादेपर्यंत ती खरी असते. आणि त्याची जास्तीत जास्त मर्यादा टिळकांच्या बाबतीत लोकाना पाहवयाला सांपडली असती. स्वतः त्यानीच एका स्नेह्याजवळ असे उद्गार काढलेले नमूद आहेत की, "मुंबईच्या एका राष्ट्रीय सभेच्या वेळी केसरीचे जादा अंक काढण्याकरिता मी एकसारखा एका खुर्चीवर बसून ३६ तास काम करीत होतो." व ही गोष्ट शब्दशः खरी असली पाहिजे असे मानण्याइतके त्यांचे इतर अनुभव लोकाना आले आहेत. त्यांच्या मोठमोठ्या दौऱ्यातून ते दिवसभर कसे काम करीत हे लोकानी पाहिलेच आहे. व ते काम दंगलीचे हालण्याचालण्याचे बोलण्याओरडण्याचेहि असे. अर्थात् घरी खुर्चीवर किंवा फार तर आराम खुर्चीवर बसून लिहिण्या-वाचण्याचे किंवा चर्चेचे काम ते तासनतास न दमता करीत असतील यात काय आश्चर्य ? बापट प्रकरणात रोज कमिशनपुढे हजर राहून शिवाय उरलेल्या वेळात पाचपन्नास बंद लिहून कमिशनपुढे वाचण्याकरिता ते वकीलाच्या हातात देत हे या ग्रंथाच्या पहिल्या खंडात आम्ही नमूद केलेच' आहे. चिरोलकेसची टिपणबुके तयार करिताना व हकीगती लिहून काढताना त्यानी दिवस की रात्र हे पाहिलेच नाही. सिंहगडावर ' आर्यांचे मूल वसतिस्थान ' हा ग्रंथ लिहिताना दोन प्रहरी एकदा लिहावयास बसले, म्हणजे रात्री जेवणाचे वेळे-पर्यंत ते हालत नसत व एकादा भाग पूर्ण करावयाचा असल्यास जेवणालाहि अवेळ करीत. त्यांच्या या सपाट्यात सांपडलेले लेखक दमून जात पण टिळक स्वतः दमत नसत. पण या सांगोवांगीच्या गोष्टीचे प्रत्यंतर त्यांच्या गीतारह-स्याच्या हस्तलिखित प्रतीत प्रत्यक्षच पहावयास सांपडते. एरवी एवढा मोठा ग्रंथ इतक्या थोड्या अवधीत लिहून पुरा होणे शक्य नाही. व त्यातहि विशेष गोष्ट लक्षात ठेवण्याची ती ही की टिळकाना स्वतः हाताने लिहिण्याचा कंटाळा असे व तोंडाने मजकूर सांगून लिहविण्यात त्यानी सारा जन्म घालविला. असे असता

हा सर्व ग्रंथ त्याना आपल्या हाताने लिहावा लागला. ताई महाराजांच्या खटल्याचे काम औरंगाबादेस चालू असता सकाळी १० वाजेतों कागदाचे वाचन व चर्चा, संध्याकाळी ५॥ वाजेपर्यंत कोर्टात हजेरी, व त्यानंतर घरी परत आल्यावर कोर्टातील कामाची रुजुवात चर्चा त्याच्या संकलित तारा व पत्रे आणि इतर पत्रव्यवहार अशा-रीतीने सकाळी सातपासून रात्री ८-८॥ पर्यंत टिळकांचा सर्व दिवस एकसारखा कामात जाई. गीतारहस्याची पहिली आवृत्ति छापली जात असता ते सकाळी उठून सर्वांच्या आधी चित्रशाळेत दाखल होत व कंपॉझिटर करेक्टर यांच्यामागे हात धुवून लागत. अशा रितीने त्यानी ही पहिली आवृत्ति दोनतीन महिन्यात काढली. कॉंग्रेस परिषदा वगैरे प्रसंगी ते सबंध बैठकांना हजर राहात व बैठकी संपताच अपरात्रीपर्यंतहि भेटी देत घेत चर्चा करीत भांडत तणतणत, निदान आपली मते मोठमोठ्याने बोलून लोकाना पटविण्यात त्यांचा काल जाई. कंटाळा हा शब्द खरोखरच त्याना माहित नव्हता व कंटाळा येई तेव्हा तो काम अप्रिय असेल तर त्याचा. श्रमाचा नव्हे. त्यातल्या त्यात काम आयत्या वेळी करण्याची त्याना विशेष हौस यामुळेहि त्यांच्यावर बराच ताण पडे पण ते तो हौसेने सोशीत. त्यानी नियमित रीतीने स्वस्थपणाने बसून ठरल्या वेळी मजकूर लिहून हातावेगळा केला व वेळेच्या आधी बाजूला काढून ठेवला असे क्वचित घडे. कारण स्वतःचे काम पुढे असले तरी भेटीला येणाऱ्याच्या कामाला ते अग्रपूजेचा मान देत. त्यांच्या भिडेचा जाच लोकाना न होता स्वतः त्यानाच होत असे. पण अशा अनियमितपणाने वागण्यात जणूकाय एक प्रकारची हौसच त्याना वाटे.

जेवणाखाणाच्या वेळेत ते अनियमितपणा करीत पण जेवणाच्या पदार्थांत तो करीत नसत. टिळक इतर कोणाहि प्रमाणे पोटभर जेवीत हे खरे असले तरी त्यांचे लक्ष जेवणातील पदार्थांच्या रुचीकडे फारसे नसे. पदार्थ चांगले म्हणून त्यांची स्तुति करणे किंवा वाईट म्हणून त्यांची निंदा करणे या गोष्टी ते सहसा करीत नसत. आणि कोणी मुद्दाम विचारले तर मग मुद्दाम चव घेऊन उत्तर देत. हा अनुभव त्यांच्या घरच्या मुलाबाळांचाच नव्हे तर मंडाले येथे त्यांच्या दिमतीला असलेल्या स्वयंपाक्याचाहि होता. वाईट झालेला पदार्थ टिळकाना खावा लागला तरी त्याचा खेद स्वतः त्यांच्यापेक्षा तो पदार्थ करणारालाच अधिक होई. दोन वेळच्या जेवणाशिवाय व चहाशिवाय टिळकानी इतर वेळी खाल्लेले असे कोणी सहसा पाहिले नाही. आणि आवडीचा म्हणून अमुक पदार्थ मुद्दाम करावयाला सांगितला आणि स्वस्थ बसून तो रुचीने व आनंदाने त्यानी खाल्लेला असे तर कोणासच आठवत नाही. चार मंडळीत बसून ते घेत म्हणजे चहा. खाण्याच्या पदार्थांवर त्यांचा इतका ताबा असे की भाते सोडून गहू, गहू सोडून सातू, आणि तुरुंगात सातू सोडून गहू व फिरून गहू सोडून सातू, असे फेरबदल करण्याचे त्याना कधीहि संकट वाटले नाही. आता मनुष्यच आहे म्हणून त्याला एकाच अन्नाची अरुची सहज उत्पन्न होणार. तशी टिळकाना होई. पण त्या अरुचीचा

राग ते, तें अन्न कमी खाऊनच त्यावर एखादे वेळी काढीत. पुढे पुढे सात्त्विक अन्न बरेच कमी झाले तेव्हा अंगच्या व्याधीला धरून त्याना कोणी बदाम खाण्याला सांगितले होते. त्याप्रमाणे बदाम कुटून त्यांचा केलेला लहानसा लाडु ते सकाळी चहाच्या पूर्वी खात. टिळकांचा आहार सामान्यतः कमीच असे. आणि पंक्तीत कोणी आग्रह केला तरी ते त्याला बळी पडत नसत. त्याना आवड म्हणून मुख्यतः थंड पदार्थांची. गार पाणी बर्फ घातलेले सोडा वॉटर व लेमोनेड व क्वचित् आइस्क्रीम हे पदार्थ मात्र ते आठवणीने मागवून घेत. १९२० साली त्याना हे शीतोपचार अखेरीला फार बाधले. मार्चमध्ये त्यांचा दौरा सिंधमध्ये निघाला. आगगाडीचा प्रवास जाग्रण व रोजचा भरगच्च कार्यक्रम यामुळे त्याना अतिशय शोष पडे. आणि दौरा संपवून सोलापूर परिषदेला ते निघाले तेव्हा वाटेत त्यानी आगगाडीत कोल्ड्रींक किती प्यावे याला समिाच राहिली नव्हती. आणि काहींचा समज असा आहे की, या उपचारांमुळे त्यांची प्रकृति जी बिघडली ती पुन्हा सावरली नाही.

**मनोगुण**—टिळकांच्या बुद्धिमत्तेविषयी लिहिण्याचे कारणच नाही. पण बुद्धिमत्तेप्रमाणे त्यांची स्मरणशक्तिहि दांडगी असे. फारा दिवसानी भेटलेल्या मनुष्याची ओळख ते जशी हटकून सांगत त्याचप्रमाणे फारा दिवसापूर्वी वाचलेल्या ग्रंथातील उतारा ते चट्दिशी काढून देत. टिपणबुकाचे महत्त्व त्याना वाटत नव्हते असे नाही. पण या बाबतीत चंदावरकरांच्या अगदी उलट वृत्तीचे ते होते. चंदारवरकरांची अशी ख्याति सांगतात की, त्यांच्याजवळ २५-३० वर्षांच्या अध्ययनातील टिपण बुके लिहिलेली तयार असत. हातात पेन्सिल घेतल्याशिवाय पुस्तक वाचावयाचे नाही व त्यातील आवडतील ते उतारे टिपल्याशिवाय पुस्तक बाजूला काढावयाचे नाही. यामुळे कोठल्या लिहिण्यात कोणती अवतरणे येतील याचा नियम नसे व त्यामुळे कोणत्याहि विषयावर लिहिणे चंदावरकराना सोपे जाई. पण टिळकांची वृत्ति अशी की, पुस्तक वाचताना हातात सहसा पेन्सिल घ्यावयाची नाही. मग वेळ मोडून टिपण बुके ठेऊन त्यात उतारे किंवा संदर्भांचे उल्लेख टिपणे ही गोष्ट तर दूरच. आणि जी गोष्ट मनुष्य स्वतः करीत नाही ती दुसऱ्याने केली असता सहजच त्याची थट्टा करावीशी वाटते. त्याप्रमाणे वकील बॅरिस्टर लोकांची टिळक फार थट्टा करीत. ते म्हणत की बॅरिस्टराचे ब्रीफ पाहिले म्हणजे मला इंद्र धनुष्याची आठवण होते. टेबलावर पाच सात रंगाच्या पेन्सिली व कोणत्या रंगाच्या पेन्सिलीच्या खुणेचा काय अर्थ हे जरी त्यांचे निश्चित नसले तरी त्यातल्यात्यात वेगवेगळ्या रंगाच्या खुणा करण्याची बॅरिस्टर लोकाना फार हौस. पण कित्येक मुकदम्याचे वेळी त्याना स्वतःला ब्रीफस किंवा टिपणे तयार करावी लागली तेव्हा वकील बॅरिस्टरांच्या या खोडीत नाही म्हटले तरी थोडासा अर्थ आहे हे त्याना अनुभवाला येऊन कबूल करावे लागले. आणि खुणा करण्याचा प्रसंग आला म्हणजे मग स्वतः ते आपण बॅरिस्टराविषयी काय बोलतो याची आठवण होऊन स्वतःची थट्टा करण्याच्या ऐटीने म्हणत

" आणारे बाबा निळी काळी व तांबडी! ह्याशिवाय आता काही भागत नाहीसे झाले आहे." पण एकंदरीने पाहता त्यांचा विश्वास खुणापेक्षा आपल्या स्मरणशक्तीवरच अधिक असे. आणि खुणा केलेले आधार लोक जितक्या त्वरित काढून देत तितके हे आपल्या स्मरणाने काढीत असा पुष्कळांना अनुभव आलेला आहे. स्मरणशक्ति सारखीच टिळकांची ग्रहणशक्तिहि विशेष त्वरित असे. पुस्तक वाचण्याची त्यांची पद्धति इतराहून भिन्न असे. म्हणजे हाती पुस्तक पडताच ते त्याचे आद्यन्त पाहात. नंतर मधली काही पाने चाळीत. नंतर प्रकरणाचे मथळे पाहून ग्रंथकाराने ग्रंथसंगती कशी काय बसविली आहे हे पाहात. पण आदिपासून इतिपर्यंत सगळे पुस्तक तर राहोच पण एखादा सगळा भागहि एखाद्या पुस्तकांतील त्यानी प्रथम वाचला असेल असे वाटत नाही. वैदिक विषयासारखा किचकट विषय असेल किंवा जेथे शब्द अपरिचित म्हणून स्पष्ट व सुवाच्य लिहिण्याचे महत्त्व असेल किंवा जेथे शब्दप्रयोग क्लिष्ट असून साधारणपणे स्मरणात राहण्यासारखा नसेल तेथे मात्र ते टिपणबुकेहि करीत व मधून मधून टिपणे लिहून ठेवीत. पण इंग्रजी ग्रंथापेक्षा संस्कृत ग्रंथाचीच टिपणे अधिक आढळत. लोकमान्यांच्या चिरंजीवानी अलिकडे एक पुस्तक छापले आहे. त्यात टिळकांची काही टिपणे दिलेली आहेत. ती पाहिली म्हणजे अवतरणे उतरून घ्यावयाची झाली तरी किती सूत्ररूपाने उतरून घेत हे दिसून येते.

**ग्रंथसंग्रह्**–टिळकांचा ग्रंथसंग्रह कोणी पाहिला तर त्यात संस्कृत विद्येच्या खालोखाल कायद्याची पुस्तके अधिक आढळतील. देशमुख यांच्या ग्रंथसंग्रहातील जुनी कायद्याची पुस्तके टिळकाकडे आली होती. तथापि नवी पुस्तकेहि ते केव्हा केव्हा घेत. एखाद्या स्वतंत्र विषयावरील पुस्तकापेक्षा न्यायकोर्टाच्या निवाड्यावरील पुस्तके ते अधिक वहात. व्यक्तिशः टीकाकाराच्या मताला ते किंमत देत नसत. पण न्यायकोर्टाचे निवाडे हे अंतिम स्वरूपात जरी व्यक्तीचे मत असले तरी त्याला कायद्याचे स्वरूप आहे या गोष्टीला ते महत्त्व देत. एखाद्या धंदेवाईक वकीलाप्रमाणे लॉ जर्नल इंडियन लॉ रिपोर्टर यासारख्या क्रमिक मासिक पुस्तकांची ते वर्गणी भरीत. वर्षाअखेर यांची पुस्तके बांधली गेली की नाही व अनुक्रमाने ती एकापुढे एक लावून ठेवली गेली की नाही हेहि ते मोठ्या आस्थेने पाहात. कारणपरत्वे ही न्याय निवाड्याची पुस्तके ते मधून मधून चाळीतहि. यामुळे अगदी थेट धंदेवाईक वकीलाइतके नसले तरी सामान्य वकीलाइतकी त्याना चालू निवाड्यांची उपस्थिति असे. मुद्दाम एखादा आधार पाहावयाचा झाला तर ते डायजेस्टाचे खंड तासनतास चाळीत बसत.

धंदेवाईक नसलेतरी टिळक हे कायदे पंडितच होते. याबाबतीत नाशिकचे त्यांचे शिष्य नीलकंठराव पाटणकर लिहितात की हिंदुधर्मशास्त्रातील वारसाईच्या हक्काचा प्रश्न विंचुरकर घराण्याच्या मिळकती संबंधाने निघाला. या मुकदम्यात टिळकानी बाळासाहेब विंचुरकर यांच्या बाजूने लक्ष घातले होते. आणि त्यांनी

शास्त्र ग्रंथावरून तयार केलेला युक्तिवाद मी व नानासाहेब पेंडसे यानी खालच्या कोर्टात समजावून सांगितला व नंतर हायकोर्टात चंदावरकर यानाहि समजावून दिला. कारण चंदावरकर हे जरी कायदेपंडित असले तरी मिताक्षरा ग्रंथांतील मर्म समजावून घेऊन त्यावरून युक्तिवाद करण्याइतके संस्कृताचे ज्ञान त्यांना नव्हते. शेवटी टिळकांनी सुचवून दिलेल्या युक्तिवादाप्रमाणे चंदावरकर यांनी हायकोर्टापुढे तक्रार सांगितली व ती यशस्वी झाली. पाटणकर म्हणतात "टिळकानी तयार केलेले आर्ग्युमेंट धर्मशास्त्र ग्रंथाचा अर्थ बरोबर लावून शास्त्रीय पद्धतीने तयार केलेले पाहून त्यावरून त्यांची बुद्धि व विद्वत्ता याबद्दलचा माझा आदर दुणावला." कोणत्याहि कामात कायद्याच्या शब्दाचा अर्थ हा कोणालाहि फार मोठा आधार. व तो आधार टाकून देऊन नुसत्या तार्किक पद्धतीने जाऊन न्यायकोर्टात काय किंवा राजकारणात काही चालावयाचे नाही ही गोष्ट टिळकांच्या मनात नेहमी बिंबलेली असे. राणीच्या जाहीरनाम्याची खरी किंमत किती हे त्याना माहीत नव्हते असे नाही. आणि कर्झनसाहेबानी अशक्य सनद म्हटले त्याचे मर्म टिळकाना कळत नव्हते असे नाही. पण सनदेचा शब्द हा कोणत्याहि हक्काचा मोठा व पहिल्या प्रतीचा आधार. आणि तो थोडासा असला तरी खंबीर म्हणून त्याच्यावर केवढीहि इमारत रचता येते. असा तो आधार काढून घेतला याबद्दल टिळकाना लॉर्ड कर्झन यांचा जितका राग आला तितका केवळ बंगालच्या फाळणीच्या कृत्यापासूनहि आला नाही. टिळक अराजक नव्हते हे पूर्वी एका अर्थाने सांगितलेच आहे. पण त्याहून विशेष अर्थाने ते सांगावयाचे म्हणजे असे की, कायदा करण्याचा अधिकार कोणाला असावा हा प्रश्न सोडून दिला असता, कायदा म्हणून प्रत्येक गोष्टीला असलाच पाहिजे व जेथे व्यवस्था नाही तेथे प्रगति नाही व पराक्रम नाही असे त्यांचे ठाम मत असे.

**वाङ्मयाभिरुचि**—संस्कृत ग्रंथांचा अभ्यास टिळकांचा विशेष पण त्यातल्यात्यात तो शास्त्रीय ग्रंथांचा असे. कॉलेजमध्ये त्यानी बी. ए. च्या परीक्षेकरिता ऐच्छिक विषय गणित हा घेतला होता. यामुळे संस्कृत ग्रंथाचे कॉलेजातील त्यांचे वाचन फार थोडे असले पाहिजे. तथापि कॉलेजमधून बाहेर पडल्यावर फावलेल्या वेळी त्यानी शास्त्रीय ग्रंथ टीकाग्रंथ सूत्रग्रंथ भाष्यग्रंथ कारणपरत्वे वाचले. आणि तेहि कोणा शास्त्र्याच्या मदतीने नव्हे तर स्वतःच्या प्रयत्नाने. पण अशा ग्रंथाचे त्यांचे ज्ञान व उपस्थिति वाखाणण्यासारखी असे. भिडेशास्त्री आपल्या एका आठवणीत लिहितात की "एकदा 'शारीर' हा शब्द वेदांतसूत्रात कोठे आला आहे असा प्रश्न निघाला तेव्हा माझ्यात व टिळकात मतभेद झाला. पण लगेच टिळकानी कपाटातून पुस्तके काढून संदर्भ शोधून पाहिला तो त्यांच्या म्हणण्याप्रमाणे आढळला." वास्तविक शास्त्रीबुवाना या बाबतीत आपणाकडे कमीपणा घेण्याचे कारण नव्हते. ते अध

असताहि त्यानी इतके अध्ययन केले व उपस्थिति संभाळली याचेच मुळी कोणीहि आश्चर्य करील. पण शास्त्रीबुवाना टिळकांच्या स्मरणशक्तीचे आश्चर्य वाटण्याचे कारण हे की, सूत्रग्रंथ भाष्यग्रंथ हा एकच विषय शास्त्रीबुवांच्या नित्य अभ्यासाचा, उलट टिळकांच्या वाचनाचे व चर्चेचे विषय अनेक असता या क्लिष्ट ग्रंथात अमुक शब्द कोठे आला हे आपणापेक्षा टिळकाना अधिक बिनचूक लक्षात ठेवले हे होय ! संस्कृत विद्येविषयी टिळकाना अभिमान व गोडी असली तरी ज्याला वाङ्मय असे समजतात ते वाचण्याची गोडी टिळकाना तितकी नव्हती. ही गोष्ट त्यांच्या लेखात किंवा भाषणात जी अवतरणे येतात त्यावरून कोणासहि दिसण्यासारखी आहे. ही अवतरणे सामान्यतः शास्त्रीय ग्रंथातील येत. पण वाङ्मय ग्रंथातील म्हणजे काव्य नाटक चंपू यातील सहसा येत नसत. तरी विद्यार्थी दशेत त्यानी वाचलेले शाकुंतल किंवा शिकविलेले मेघदूत अथवा प्रौढपणी अभ्यासिलेले महाभारत यातील येत. याचे कारण हेच की कोणतेहि वाङ्मय घेतले तरी त्याच्या शब्दसौंदर्यापेक्षा किंवा अर्थसंपत्तीपेक्षा तत्त्वाच्या गहनतेकडे त्यांचे लक्ष विशेष असे.

टिळकांचा लेखनव्यवसाय पाहिला तर त्यातहि हेच दिसून येते. ते असे की, त्यात बनावट किंवा सजावट अशी काही दिसावयाची नाही. अलंकाराची वेलबुट्टी फारच थोडी. आधाराकरिता वचन घेतले तरी ते ठळक व समर्पक असावयाचे. बारीक श्लेष घेतला तरी तो शब्दाचा नसावयाचा तर तर्कपद्धतीतील असावयाचा. त्यांच्या लेखनकलेतील खरा गुण म्हटला म्हणजे लेखातील मुख्य कल्पनेचे चित्र इतक्या स्पष्टपणे व रंगाच्या इतक्या थोड्या हातानी उमटविलेले असे की, ते पाहून मनुष्य कार्याकार्याविषयी निःशंक तर झालाच पाहिजे पण प्रवृत्तीपरहि बनला पाहिजे. आणि त्याच्या प्रवृत्तीला आधार म्हणून एखादे शिष्टवचन एखादा सर्वसंम्मत न्याय एखादे शास्त्रीय सूत्र किंवा नैतिक तत्त्वज्ञानाचा सिद्धान्तहि टिळकानी त्याला पुरवावा. आणि "तूं हा घेऊन निर्भयपणे प्रवृत्त हो" असेच जणु सांगितल्यासारखे त्यांचा कोणचाहि लेख वाचून वाटते. इतर कित्येक लेखकहि आपल्या परीने विवेचक असतात. पण त्यांच्यात्यांच्यात मुख्य फरक असा. ते वाचकाला अरण्याच्या तोंडी भुलवून नेऊन "यातून पुढे तू आपला मार्ग आपण काढ" असे सांगतात अशी कल्पना केली तर, टिळकांचे लेख वाचून अशी कल्पना सुचते की तेहि वाचकाचा हात आपल्या हातात घेऊन घट्ट धरून ठेवतात व त्याला वाट दाखवण्याकरिता बरोबर घेऊन अरण्याच्या तोंडी जातात, पण तेथे त्याला एकटा सोडून न देता त्याचा हात आपल्या हातात तसाच धरून ठेऊन मार्गामार्गातील निवड स्वतः करून पसंत पडलेल्या मार्गाने वाचकाला अरण्याबाहेर काढून पुढील रस्त्याला लावून मग आपण मागे फिरतात. टिळकांच्या लेखनपद्धतीचा महाराष्ट्रातील वाचकाना चांगलाच परिचय असल्यामुळे त्याविषयी फारसे लिहिण्याचे कारण नाही. टिळकांच्या केसरीनेच मराठी भाषा जोरदार शुद्ध व भारदस्त कशी लिहावी हे शिकविले अशी कबुली महा-

राष्ट्रातील वाचकवृंदाने दिलेली आहे. त्यांचे लेखन अनलंकृत सौंदर्याने मंडित असे येवढेच सामान्य वर्णन केले तरी ते समर्पक होईल. याचे विशेष गुण म्हटले म्हणजे–विचारांचा ओघ, शुद्ध पण त्याहूनहि अधिक [illegible] अनुमानपद्धति, ठसकेदार शब्द, इंग्रजी विचाराचे रूपांतर करण[illegible] संस्कृताचे समर्पक शब्द, विशेषणाच्या जोड्या, स्फूर्तिदायक प्रश्न, उपहासाने [illegible] उद्गारयुक्त वाक्यांचे शेवट, अनुरूप अशी ठेवणीतील संस्कृत अव[illegible] व्यवहारातले दाखले, आणि सर्वात श्रेष्ठ म्हणजे निर्भयता व सा[illegible] सुंदर मेळ घालणारी स्पष्टोक्ति हे त्यांच्या लेखनातील विशेष गुण म्ह[illegible]तील. त्यांची भाषापद्धति कदाचित् कोणाला प्रयत्नाने अनुसरिता येईल [illegible] त्यांची विवेचनाची जोरदार शैली जवळ जवळ अननुकरणीय होय. टिळकांच्या वक्तृत्वासंबंधानेहि चालू पिढीला सांगण्याचे कारण नाही व पुढील पिढीकरता वर्णन देऊन ठेवावयाचे तर ते काम मात्र सोपे नाही. वास्तविक पाहता लेखनाप्रमाणे त्यांचे वक्तृत्वहि अनलंकृत-सौंदर्य-मंडित याच शब्दानी वर्णिले पाहिजे. खापर्डे यानी एकदा व्याख्यानात सांगितल्याप्रमाणे टिळकांचा लेख वाचला म्हणजे ते समोर उभे राहून बोलत आहेत असे वाटावे, आणि त्यांचे व्याख्यान ऐकत असता ते छापण्याकरिता मजकूर सांगताहेत की काय असे वाटावे. याचा अर्थ हाच की केवळ विषयसंगति, विचार-परिणति, प्रसादयुक्त व पटतील अशा व्यावहारिक शब्दानी मनोगत व्यक्त करणे, हाच टिळकांचे लेखन व वक्तृत्व यांचा आत्मा होता. याच्या उलट उदाहरण आगरकरांच्या लेखनकलेचे होय. आगरकराविषयी टिळक सांगत की केसरीचा लेख कंपाझिटरकडे देण्याच्या आधी म्हणजे बहुधा शनिवारी किंवा रविवारी संबंध दिवस खपून स्वस्थपणे सुवाच्य लिहिल्याशिवाय आगरकराना चैन पडत नसे. व एक अग्रलेख लिहिण्याला ते दीड प्रहरहि घेत. आगरकरांची भाषा वाचताना फार मौज वाटते यात शंका नाही. पण त्यांच्या लिहिण्यात वाङ्मयाच्या अभिरुचीने केलेली कृत्रिम सजावट व बनावट बरीच असे ही गोष्ट त्यांच्या लेखातील शब्दावरूनच दिसून येते. पण टिळकाना भाषेवर शृंगार चढविण्याची हौस नसल्याने किल्ली देताच जसे यंत्र चालू होते तसेच टिळकानी एकदा लिहावयास सुरवात केली म्हणजे ते कोणताहि लेख झपाट्याने लिहून टाकीत. आपल्या सहकारी संपादकाना ते नेहमी सांगत की "पुढच्या अग्रलेखाचा विषय माझ्या मनात आठ आठ दिवस घोळत असतो." पण त्या घोळण्यामध्ये शब्दरचना कधीच येत नसली पाहिजे, तर विषयासंबंधाने ठरलेले मत घणाचे घाव घातल्याप्रमाणे त्यांच्या मनात विचारांच्या पुनरुक्तीने सुदृढ सकस बनत असले पाहिजे. व या विचाराचा घोटीवपणा स्पष्ट निःशंक तेजस्वी प्रवृत्तिपर अशा शब्दानी त्यांच्या लेखातून प्रगट होई. दुसऱ्या एका पुढाऱ्याशी विरोध किंवा फरक दाखवावयाचा तर असे म्हणता येईल की गोखले यांचे लेखन किंवा वक्तृत्व रंधा मारून साफ केलेल्या लाकडाच्या पट्टीप्रमाणे गुळगुळीत दिसे, तर टिळकांचा लेख किंवा व्याख्यान पाहिले असता ते

एकाद्या गाठाळ लाकडाच्या ओंड्याप्रमाणे दिसे. पण तें भरीव व जोरकस आहे असा अदमास डोळ्याना किंवा कानाना सहज करता येई. इंग्रजीत बोलावयाचे असता इतर कित्येक प्रसिद्ध वक्त्याप्रमाणे टिळक बिनचुक साफ किंवा अस्खलित बोलू शकत नसत. पण मुख्य मुद्याला एकदम हात घालून रंध्याने लाकडाची नाजूक साल काढावी त्याप्रमाणे कोणच्याहि विषयाचे पृथःकरण करून त्यातील सूक्ष्म विचाराचे पापुद्रे सोलून दाखविणे या कामी टिळकांचा हातखंडा होता त्या कामात परक्या इंग्रजी भाषेनेहि त्याना कधी दगा दिला नाही. आणि मराठी मायभाषेत तर त्यानी सर्व प्रकारे प्रभुत्व संपादले होते याविषयी वादच नाही.

अमे करूनहि टिळकाना वाङ्मयाची गोडी देता घेता आली नसती असा अर्थ नाही. पण अर्थसौंदर्यापेक्षा शब्दाच्या किंवा विवेचनाच्या परिणामकर्तृत्वाकडेच त्यांची दृष्टि अधिक असे. त्यानी मंडाले येथे तुरुंगात असता जी पुस्तके आपल्या भोवती जमविली त्यांवरूनहि त्यांची विद्याविषयक अभिरुचीची दिशा दिसून येते. त्या शेकडो ग्रंथात, निव्वळ वाङ्मयात्मक किंवा उच्च प्रतीचे का होईना पण, मनाला करमणुकीचे असे बहुधा एकहि पुस्तक आढळणार नाही. आणि तुरुंगातील ही आवड देखील केवळ वर्ष सहा महिन्यांची नव्हती. गीतारहस्य लिहून झाल्यानंतर व आधी त्याना मोकळा असा बराच वेळ होता. परंतु अशा मोकळ्या वेळातहि त्यांची करमणुकीची साधने म्हटली म्हणजे तत्त्वज्ञानाचे किंवा शास्त्रीय ग्रंथ हेच होत. संस्कृत वाङ्मयाचे त्यांचे इतके तरी वाचन होते. पण मराठी वाङ्मयाचे वाचन फारच थोडे होते म्हटले तरी चालेल. गीतारहस्यामध्ये जरी दासबोध तुकाराम किंवा ज्ञानेश्वरी यातील अवतरणे आली असली तरी यापैकी कोणत्याहि ग्रंथाचा सूक्ष्म अभ्यास त्यानी केला नव्हता. याचे पहिले कारण हे की प्राकृत टीकाकार पदरचे असे तत्त्वज्ञान काही सांगत नाहीत, म्हणून उसन्यातून उसने घेण्यापेक्षा काय घ्यावयाचे ते मुळातून घेतलेले बरे असे टिळकाना वाटे. रामदासाच्या प्रवृत्तिपर धोरणाचे टिळक जितके कौतुक करीत तितके त्यांच्या पद्यात्मक दासबोधाचे ते करीत नसत. समर्थांकडे ते कवि या दृष्टीने नाहीच पण साधुपेक्षाहि धर्माभिमानी मुत्सद्दी या दृष्टीने अधिक पाहात. आणि ज्याला स्वतः वाङ्मयातील अलंकाराची आवड नाही तो ज्ञानेश्वरी हे गीताभाष्य असले तरी त्याच्याकडे बारकाईने कशाला पाहील ? जुन्या संस्कृत पंडितांचा प्राकृताविषयीचा जो अनादर तोच टिळकानी थोडासा उचलेला होता असे म्हणावेसे वाटते. ते राजकारणात पडले व वर्तमानपत्रकार बनले म्हणूनच त्यानी मराठी भाषेत लिहिले. पण त्यांच्या मूळ कल्पनेप्रमाणे ते निवळ प्रोफेसर होऊन राहते तर काही ग्रंथ त्यानी इंग्रजीत व कदाचित् एखादा दुसरा संस्कृतातहि लिहिला असता. तुकारामाचा एखादा अभंग त्यांच्या तोंडून यदृच्छेने निघाला असे सबंध ३०-३५ वर्षात कोणी पाहिले नसेल. याचे कारण, तुकारामाच्या ग्रंथांतहि समर्पक किंवा चाबूक उडल्याप्रमाणे कडकडीत अभंग

वचने आढळण्यासारखी असली तरी तो संत कवि [illegible]रीने निवळ निवृत्तिपर व भक्तिमार्गाकडे लक्ष देत होता असा तुकाराम स्वभावाने त्यांचा ग्रह असे. संतसांप्रदायाचा धिःकार त्यानी रागाच्या भाषेने केला न केला तरी, भाविक जनता त्याना वंदन करिते म्हणून आपणहि त्याना वंदन करावे अशी त्यांची वृत्ति असे. तोंडावरील आंकडे व अक्षरे पुसून गेली असली तरी मैलाचे दगड हे [illegible] कोणी उपटून टाकीत नाही, मार्गदर्शक म्हणून ते उरू देतात, त्याप्रमाणे असंस्कृत व अतत्त्वज्ञानी जनतेच्या धार्मिक समाधानाचे ते एक साधन म्हणून संतसांप्रदाय उरू द्यावे आणि आपणहि त्याना सभ्यतेने वागवावे असे टिळकाना वाटे. संस्कृत शास्त्रीय ग्रंथ वाचून उरण्याइतका त्यांच्याजवळ वेळ नव्हता, आणि प्राकृत ग्रंथ वाचल्याशिवाय जनतेला बोधप्रद किंवा समर्पक उपदेश करण्याचे त्यांचे काम अडले नव्हते. इंग्रजी भाषेतील ग्रंथासंबंधानेहि हाच विवेक व हीच आवडनावड. त्यानी त्या भाषेतील काव्य नाटके कादंबऱ्या वाचल्या नाहीत. हे अर्थातच दूषण होऊ शकत नाहीत. पण इतिहास ग्रंथहि त्यानी फारसे वाचले नव्हते. म्हणजे इतिहासासारख्या विषयावर लिहिताना त्यांचे दाखले फक्त भारत वगैरे ग्रंथातून येत. जुन्या ग्रीक रोमन किंवा आधुनिक इंग्रजी इतिहासातून सहसा येत नसत.

**टिळक व ज्योतिष**–टिळकाना ज्योतिषाची आवड होती. पण ती ज्योतिर्गणिताची. फलज्योतिषाची नव्हे. स्वभावाने उद्योगवादी असल्यामुळे त्यानी कुंडल्या मांडून प्रश्न पाहण्याची, वर्षफलांची भेंडोळी चाळण्याची, किंवा ग्रहस्थिति पाहण्याकरिता पंचांग उघडण्याची तसदी घेतली नाही. तात्त्विक दृष्ट्या फलज्योतिष हेहि एक शास्त्र असावे असे त्याना वाटे. पण त्याचे नियम अद्यापि बनावे तसे बनलेले नाहीत आणि गृहीत गोष्टी पुष्कळशा चुकलेल्या असतात यामुळे नियम बरोबर असले तरी अनुमाने बरोबर येतीलच असे त्याना वाटत नसे. महाडकर व इतर काही ज्योतिषी यांच्या परिचयाने त्याना असे दिसून आले होते की, शरीराच्या काही लक्षणावरून जन्मकाळच्या काही ग्रहांच्या स्थितीचा अंदाज करिता येतो. पण ही विद्या त्यानी, महाडकर हे त्यांचे परम स्नेही असताहि, त्यांच्यापासून शिकून घेतली नव्हती. यावरून या विद्येने त्याना मोहून टाकले नव्हते इतके खचित ठरते. वास्तविक ज्या बुद्धीला हजारो वर्षापूर्वीच्या जुन्या काळातल्या अज्ञात गोष्टीविषयी अनुमाने बांधण्याची आवड व हौस तिला तीच आवड व तीच हौस पुढे येणाऱ्या काळातील गोष्टीविषयीची अनुमाने बांधण्याविषयीहि असावी हे स्वाभाविक वाटते. कारण ज्याला आपण भविष्य म्हणतो ते झाले तरी काय आहे? ज्ञातावरून अज्ञाताचे अनुमानच होय. पण टिळकाना ती आवड व हौस नव्हती यात शंका नाही. केवळ मिथ्यावादी अज्ञानी अशा अनेक ज्योतिषाशी नेहमी गांठ पडे यामुळेच त्यांची ही अश्रद्धा झाली होती असे मात्र नव्हे. तर ऐतिहासिक वाङ्मयात्मक संशोधनातील ज्ञात गोष्टी व फलज्योतिषातील ज्ञात गोष्टी यांच्या स्वरूपात फरक आहे असे टिळकांचे मत होते. तसेच अबाधित नियम

बांधण्याला ज्ञात गोष्टींचा जितका दीर्घ व विविध अनुभव लागतो तितका अनुभव ज्योतिषशास्त्रात मिळालेला नाही असेहि त्याना वाटे. ग्रहांच्या गति गणकज्योतिषी व फलज्योतिषी याना सारख्याच आधारभूत होत. तथापि त्या गतींनी येणाऱ्या ग्रहांच्या त्या त्या स्थानापासून फल काय मिळते याविषयी त्यांचे मत निःसंदेह नव्हते. टिळक हे निरयन पंचांग पद्धतीचे अभिमानी होते. पण त्याचे कारण ते भारतीय फलज्योतिषाचे अभिमानी होते हे नव्हे, तर भारतीय परंपरागत ज्योतिर्गणितपद्धतीचे अभिमानी होते हेच होय. जुने ठेवावे पण ते वाढवावे व सुधारावे याच दृष्टीने त्यानी पंचांगशोधनाची चळवळ केली.

फलज्योतिषावर टिळकांचा विश्वास फारसा नव्हता व हस्तमुद्रा–शास्त्र मास्तिष्कशास्त्र यांवरहि विश्वास तितकाच होता. तथापि या दोन्ही तिन्ही शास्त्राच्या काही अनुभवसिद्ध असे सिद्धान्त असावे व कदाचित् काही नियमहि बसवता मुळाशी येणे शक्य आहे ही गोष्ट टिळकानी या शास्त्रात वावरणाऱ्या कित्येक लोकाना दिलेल्या सर्टिफिकिटावरून दिसून येते. टिळकांसंबंधाने भविष्ये वर्तवण्याची पुष्कळ लोकांची उडी. पण ती साधली असे फार थोडे. ती फसली असेच पुष्कळ. तथापि अपवादादाखल दोन गोष्टींचा उल्लेख करण्याला आनंद वाटतो. १९०८ सालचा टिळकांचा खटला सुरू असता एका गृहस्थाने खटला संपण्याचे आधी थोडे दिवस, आणि खटला केव्हा संपेल याचा अंदाज नाही अशा स्थितीत, तो अमुक दिवशी अवेळी रात्री संपेल व शिक्षा होईल असे लिहून पाठविल्याचे आम्हाला स्मरते. इतर अदमासावरून हे भविष्य खोटे ठरणार असेच प्रथम वाटले. पण ते खोटे ठरण्याऐवजी खटल्याच्या कालक्रमातच अभावित रीतीने फरक झाला आणि भविष्य किंचित् फरकाने पण जुळले. भविष्य खरे ठरल्याची दुसरी गोष्ट श्री, दत्तात्रय व्यंकटेश बेळवी बेळगाव यानी स्वतः अनुभविली तिची हकीकत त्यानीच आपल्या हाताने आम्हाला लिहून दिली ती जशीच्या तशी खाली देत आहे.

" सन १९२० साली एप्रिल महिन्यात सोलापुरास मुंबई प्रांतिक परिषदेची बैठक होणार होती. त्यावेळी बेळगावाहून परिषदेला जाण्याकरिता आम्ही सुमारे ३० मंडळी निघून सायंकाळी ५ वाजता बेळगाव स्टेशनवर आलो. स्टेशनवर धारवाडकडून मेल गाडी आली. या गाडीत आमचे एक स्नेही रा. काशीनाथ गुरुनाथ कुळकर्णी बी. ए. एल्‌एल्. बी. हे होते. त्यानी मला व गंगाधरराव देशपांडे याना स्टेशनवर पाहिले तेव्हा आपल्या डब्यात येऊन बसण्याबद्दल सांगितले. परंतु मी त्यांच्या डब्यात गेलो नाही. फक्त गंगाधरराव देशपांडे एकटेच गेले. गाडी सुरू झाल्यावर कुळकर्णी व गंगाधरराव देशपांडे यांचेमध्ये संभाषण झाले त्यात कुळकर्णी यानी गंगाधररावाना विचारले की, " इतकी मंडळी कोठे निघाली आहे "? गंगाधररावानी सोलापुरास जाण्याचा उद्देश कळविला व सोलापुरास परिषदेकरिता लो. टिळक येणार आहेत असे सांगितले. तेव्हा कुळकर्णी यानी गंगाधररावाना तावडतोब असे म्हटले की, " तुम्ही सोला-

पुरास कशाला जाता ? यावर्षी जुलै अखेरला टिळक मरणार आहेत ! पण गेलाच तर तुम्ही सोलापुरास गेल्यानंतर शनीची काही तरी आराधना करण्याची खटपट करा. " गाडी गोकाक रोड स्टेशनवर आल्यावर गंगाधरराव देशपांडे हे मी ज्या डब्यात बसलो होतो त्या डब्यात आले व कुळकर्णी यानी सांगितलेली हकीकत त्यानी मला सांगितली. मी म्हणालो " त्याचे काय ऐकता ? तो तंबाकूच्या तारेत असेल ! " परंतु दुसऱ्या दिवशी सोलापुरास गेल्यानंतर माझी व श्री. तात्या-साहेब केळकर यांची गाठ पडली त्यावेळी मी ती गोष्ट केळकराना सांगितली. तसेच दुसरे दिवशी बेळगावची मंडळी पुणे स्टेशनवर उतरताच ही गोष्ट त्या सर्व मंडळीनाहि कळली. पुढे जुलैच्या ३१ तारखेस मी मुंबई कौन्सिलच्या बैठकीला हजर राहण्याकरिता बेळगावाहून निघालो. त्या दिवशी शनिवार होता. दुसरे दिवशी म्हणजे रविवारी तारिख १ ऑगस्ट रोजी मी पुणे स्टेशनवर आलो तेव्हा आदले दिवशी रात्री १२ चे सुमाराला टिळक वारल्याचे मला समजले. पुढे एक तासाचे आतच कुळकर्णी यांची व माझी गाठ पडली. त्यावेळी कुळकर्णी हे पुणे कोर्टात डिस्ट्रिक्ट जजाचे पर्सनल असिस्टंट होते. मी कुळकर्णी यांच्या घरी गेल्याबरोबर त्यानी मला विचारले की " का ? मी सांगितलेली गोष्ट खरी झाली की नाही ? " रात्री टिळक मरणार ही गोष्ट मी ह्या घरी राहणाऱ्या एका म्हातारीला काल सांगितली होती. " ह्या गोष्टीची खात्री करण्याकरिता त्यानी म्हातारीलाहि बोलावून आणले व मोघम विचारले " मी टिळकाविषयी तुम्हाला काल काय सांगितले होते ? " ती बाई म्हणाली " आज रात्री टिळक मरणार असे तुम्ही मला सांगितले. " कुळकर्णी यानी लो. टिळकांची जन्मतिथि व कुंडली आपल्या डायरीत टिपून ठेविली होती ती मला त्यानी दाखविली, व म्हणाले की "टिळक आधीच ३ दिवसापूर्वी मरणार होते परंतु त्यावेळी चंद्रग्रह अनुकूल होता, व आज पहाटे चंद्रग्रह प्रतिकूल होणार तेव्हा टिळक रात्री मरणार अशी माझी खात्री झाली. "

**अंतरंग व कलाभिरुचि**--टिळकांचे अंतरंग जरी उथळ नव्हते व कित्येक बाबतीत त्याचा निकट परिचितानाहि सहसा थांग लागत नसे तरी संभाषणाच्या किंवा वादाच्या भरात आले असता टिळक अपेक्षेपेक्षाहि स्पष्टपणे बोलून जात. याचे एकच उदाहरण दिले असता पुरे होईल. केतकर आपल्या आठवणीत असे लिहितात की सन १९१४ साली कॉंग्रेसच्या पूर्वी कॉंग्रेसचा वाद चालू असता गोखले हे टिळकाना परत भेट देण्याकरिता वाड्यांत आले. दोघे दोघेच मॅनेजरच्या खोलीत बसून बोलले. गोखले गेल्यावर टिळक माडीवर आले तेव्हा खाडिलकरानी टिळकाना विचारले गोखले काय म्हणतात ? टिळक म्हणाले " गोखले म्हणाले की तुम्ही कॉंग्रेसमध्ये येऊ नका. आजच्या कॉंग्रेसमधील मंडळीचे व तुमचे पटणार नाही. त्यावर मी उत्तर दिले. कॉंग्रेस सर्वांचीच आहे. ती काही कोणत्याहि एखाद्या पक्षाला आंदण दिलेली नाही. मी

प्रथम देश तयार करणार कॉंग्रेसमध्ये शिरणार व कॉंग्रेस काबीज करणार आहे." हे ऐकून खाडिलकर लवाटे वगैरे मंडळी आश्चर्यचकित झाली. त्याना वाटले की टिळकानी इतके स्पष्टपणे बोलावयास नको होते. होणे जाणे पुढेच आहे. मग अशी धमकी का ? ते पाहून टिळक म्हणाले "पूर्ण विचारांती जी माझी ठाम मते झाले असतात ती मी प्रतिपक्षाला नेहमी उघड व प्रथमच बजावीत असतो. आपले धोरण प्रतिपक्षाला उघड करून त्याच्याशी दोन हात करण्यातच पुरुषार्थ आहे असे मला वाटते."

कलापैकी टिळकाना वास्तविक कोणत्याहि एखाद्या कलेचा नाद तर नव्हताच पण मनातून अभिरुचिहि नव्हती. वेळ नाही म्हणून व्यासंग नसेल. अधिक महत्त्वाची दुसरी कामे म्हणून कोणत्याहि कलेकडे ते लक्ष देत नसतील. पण कोणत्याहि कलेत त्याना खरी करमणूक अशी वाटत नसावी. मराठी किंवा इंग्रजी किंवा संस्कृत काव्य घेऊन ते ते कधी वाचीत बसले असे सहसा कोणासहि आढळले नाही. आणि भारत हे जरी श्लोकबद्ध असले तरी ते काव्य म्हणून टिळक वाचीत नसत. संस्कृतातील कोणतेहि शास्त्र श्लोकबद्धच लिहिलेले असते. त्यात काही विशेष नाही. चित्रकलेचेहि तसेच. त्यानी एखादे चित्र चांगलें म्हणून घरात लावून ठेवले असे झाले नाही. त्यांच्या घरी पाहिले तरी त्यांचा व त्यांच्या बरोबर इतर मंडळीचा काढविलेला व त्याना नजर केलेला फोटो भिंतीवर आढळावयाचा. स्वतः टिळकांचा एक फोटो फ्रेमेत घालून त्याना नजर केलेला त्यांच्या टेबलावर पाहून गांधी यानी नाक मुरडले असा एक प्रवाद आहे. पण ते टेबलावर किंवा भिंतीवर स्वतः आपला फोटो किंवा इतरांचाहि मुद्दाम लावीत नसत. स्वतः देखणे असे मानून आपला फोटो त्यानी आपल्या टेबलावर ठेऊन दिला हे म्हणणे जितके खोटे तितकेच अहंकार बुद्धीमुळे तो त्यानी ठेऊन दिला हेहि म्हणणे खोटे आहे. आम्ही वर सांगितल्याप्रमाणे कोणीतरी नजर केलेला फोटो तेथे ठेवलेला असेल व गांधी येण्याला व तो फोटो तेथे असण्याला एक गाठ पडली असेल याहून दुसरा संभव वाटत नाही. टिळकांमध्ये अहंकारवृत्ति नव्हती असे आमचे म्हणणे नाही. पण स्वतःचा फोटो टेबलावर ठेऊन त्याकडे पाहात बसण्याइतकी ती ग्राम्य नव्हती इतकेच म्हणावयाचे. नाट्यकलेची हीच गोष्ट. ते आपल्या इच्छेने कधी नाटक पाहावयास गेले नाहीत. कॉलेजांत व कॉलेजातून बाहेर पडल्यावर आर्यक्रीडोद्धारक नामक खाजगी नाटक मंडळीचे खेळ पुण्यास चालू असता तिच्या हँडबिलावर टिळक सही घालीत, व तरुण मुलाच्या हौसेने हे खेळ चालू असता पडद्यामागे उभे राहून पडदे ओढविण्याचे व सरकविण्याचे काम त्यानी केले असे सांगतात. पण ही कंपनी धंदेवाईक नव्हती. ती हौशी सभ्यगृहस्थांची होती. तीत शंकरराव पाटकर गोविंदराव देवल इत्यादि गृहस्थ केवळ नाट्यकलेच्या आनंदाखातर व उद्धारार्थ स्वतः पार्ट करीत. स्वतः विष्णुशास्त्री चिपळूणकर यानी कॉलेजच्या दिवसात वेणीसंहार नाटकात धर्माची

भूमिका घेतली होती व त्यांचे वडील पाहावयास बसले असता शेवटच्या अंकातील पितराना तिळांजली देण्याचे काम त्यानी बेमालूम केले. त्याचप्रमाणे गोपाळराव आगरकरानी शेक्सपिअरच्या एका नाटकाचे भाषांतर केले असून त्या वेळच्या किर्लोस्कर मंडळीच्या हस्तपत्रकावर डॉ. गर्दे यांच्या समवेत व्यवस्थापक म्हणजे पुरस्कर्ते या नात्याने त्यांची सही असे. याच रीतीने टिळकहि तरुणपणी नाट्यविषयाच्या गोडीतून सुटले नव्हते. पण त्यानी ती गोडी पुढे टाकून देऊन आयुष्याच्या शेवटल्या ३०–३५ वर्षांत नाटक पाहण्यासहि हौसेने ते कधी गेले नाहीत. गेलेच तर एखादे वेळ कोणाच्या तरी आग्रहावरून व कोणाचा तरी सन्मान करण्याला किंवा स्वतःचा सन्मान करण्याची संधि आग्रहाच्या निमंत्रणामुळे देण्याला. त्याना दूरचे थोडे कमी दिसत असे. म्हणून ते रंगभूमीकडे सारखे टक लावून बसत नसत. ही सबब ठीक होतीच. पण संवाद किंवा गाणे रंगभूमीवर सुरू असता एकाग्र मनाने त्यानी ते कधी ऐकले असे नाही. रंगभूमीवर पात्रांचा संवाद सुरू असता शेजारी बसलेल्या एखाद्या स्नेह्याशी त्यांचा संवाद सुरू असे. जी गोष्ट कविता वाचनाची तीच कविता करण्याची. त्यानी विद्यार्थी दशेत संस्कृत श्लोक केल्याचे गुरुजी यानी आपल्या चरित्रात लिहिले आहे. आणि या ग्रंथाच्या पूर्वार्धात ते आम्ही उद्धृत केले आहेत. त्यानंतर प्रौढपणी त्यानी कधी कविता केल्या नाहीत. गीतारहस्याच्या शेवटी त्यानी जुन्या पद्धतीप्रमाणे आत्मनिवेदनाचे काही श्लोक करून घातले आहेत. आणि टिळक हट्टाला पेटते तर कविताहि करून लोकाना चकित करते यात शंका नाही. मात्र त्यांच्या कविता हल्लीच्या 'लिरिकल' पद्धतीच्या न होता जुन्या पद्धतीच्या झाल्या असत्या. नाही म्हणावयाला पुण्यास काशीनाथपंत छत्रे सरकस घेऊन आले तेव्हा त्याना कविताबद्ध मानपत्र द्यावे अशी एक टूम निघाल्यावरून गमतीने श्लोकाचा पहिला निमा भाग केळकरानी व दुसरा टिळकानी केला. इतकेच त्यांचे अलीकडचे काव्यकर्तृत्व दाखविता येईल. गाण्याची आवड त्याना नव्हती. त्यांच्या वाड्यांत मेळ्यातील पदाशिवाय एरवी कधी गाण्याचा आवाज किंवा आलाप कोणी ऐकला नाही. स्वतः ते कधीहि गुणगुणत नसत. त्याच्या तोंडून गुणगुणण्याच्या स्वरूपाने एखादे वेळी संस्कृत श्लोकच निघावयाचा. स्वतः गुणगुणत नसल्यामुळे वाड्यांत गायनविद्येवर जवळ जवळ बहिष्कार असे. एखाद्या लग्नसमारंभात सनईवाला चांगले वाजवीत असला तर लोकानी त्याचे कौतुक करावे, पण स्वतः यजमान समोर बसून आनंदाने कधी वाजवून घेतील असे मुळीच घडावयाचे नाही. पंक्तीतून कोणी श्लोक म्हटला तर सीताकान्त म्हणून म्हणून मंडळी ओरडतील त्यांत मात्र ते सामील व्हावयाचे! वाड्यातील गणपती उत्सवात केव्हा बालगंधर्व किंवा भास्करबुवा अशा गवयाना चालकानी पाचारण करावे. पण यजमानाने स्वतः बसून स्वस्थपणे एक दोन चिजा ऐकल्या असे कधी घडले नाही. आणि टिळकांच्या घरी जाऊन आपण गायलो व टिळक हजर होते हाच त्याना बहुमान वाटे. गुणग्राहक

शब्दांची तरी बिदागी आपणाला मिळेल अशी कोणाची अपेक्षा नव्हती. पांगारकर यानी एका आठवणीत असे लिहिले आहे की, "उत्तर हिंदुस्थानचा एक गायन शास्त्री गायनशास्त्रावर स्वतः लिहिलेला एक ग्रंथ घेऊन टिळकाकडे गेला आणि परत येऊन पांगारकराना सांगू लागला की काय या पुरुषाची बुद्धि अचाट! टिळकाना गायनविद्या माहिती नाही असे मी तरी काही म्हणणार नाही. माझे पुस्तक चाळून पाहता पाहता व मजशी बोलता बोलता त्यानी मला गायनासंबंधी ज्या मार्मिक सूचना केल्या त्या ऐकून मी तर थक्क झालो! या शास्त्रीबुवांच्या व टिळकांच्या भाषणात काय चर्चा झाली असेल हे सांगता येत नाही. पण शास्त्र या दृष्टीने गायनाची चर्चा झाली असली तर याहि बाबतीत टिळकानी काही सूचना केल्या असतील हे संभवनीय आहे. कारण तत्त्वग्राही मनुष्याचे मन व्यापक असते व कोणत्याहि विषयाचे त्या दृष्टीने त्याला आकलन करिता येते. टिळकानी सूचना कदाचित् ग्रंथपद्धतीच्या केल्या असतील, किंवा गायनशास्त्राला जी गणिताची बाजू आहे त्याहि दृष्टीने चर्चा झाली असेल. पण कोणीहि अशी खात्री देऊ शकेल की एवढा गायन शास्त्री भेटीला आला असता त्याच्या तोंडून एखादी चीज ऐकण्याची इच्छा टिळकानी खचित प्रदर्शित केली नसावी.

**स्वभावगुण**--टिळकांचा स्वभाव निर्भय व धाडसी होता हे सर्व गोष्टीत सारखेच दिसून येईल. मग तो प्रसंग रात्री बेरात्री प्रवास करण्याचा असो, रानातून एकटे हिंडण्याचा असो, गडासारख्या बिकट जागी चढण्या उतरण्याचा असो, गर्दी मारामारीतून घुसण्याचा असो, व शेवटी प्रत्यक्ष प्रसंग आला त्याप्रमाणे युद्धाच्या काळात आगबोटीतून प्रवास करण्याचा असो. त्याना पोहण्याची कला चांगली येत असल्यामुळे वाटेल तेथे पोहावयाला पडणे हे त्याना धाडस वाटत नसे. नामजोशी व करंदीकर यानी आपल्या आठवणीत इंग्लंडच्या प्रवासाची बोटीवरील हकीकत दिली आहे. पैकी करंदीकर लिहितात की 'बोटीवर असताना त्या दिवसात पाणसुरुंग व टार्पेडो लागून बोट बुडण्याचा संभव असे म्हणून जहाजावरील उतारूना गळ्यात तरते पट्टे बांधून छोट्या होड्यातून उतरण्याची विद्या त्याना शिकवीत. एके दिवशी बोटीवर उतरण्याची रंगी तालीम झाली तेव्हा उभ्या दोराच्या शिडीवरून एवढ्या वयात टिळक गळ्यात पट्टा बांधून भराभ. खाली उतरले आणि होडी वल्हवीत दूर जाण्याचा प्रयोग त्यानी स्वतः केला र त्यानी दोर सोडला पडाव खाली टाकला तीत उतरून तो वल्हवीत जहाजापासून दूर गेले आणि पुनः परत येऊन बरोबरच्या लोकाकडून ती गोष्ट त्यानी करवून घेतली.' १८९३ साली पुण्यातील दंग्याची वार्ता ऐकताच टिळक नामजोशी वगैरे मंडळीसह थेट दंग्याच्या जागी गेले. नामजोशीना मग दूरदृष्टि पोचवून टिळकाना काढून दुसरीकडे नेले. ही गोष्ट या ग्रंथाच्या पूर्वार्धात आम्ही सांगितलीच आहे.

सुरतेच्या राष्ट्रीय सभेत अध्यक्षाच्या ठरावाला उपसूचना आणण्याचे ठरले तेव्हा टिळकानी ते काम मुद्दाम स्वतःकडे घेतले. खटले व तुरुंगवास

यासंबंधाने त्यानी दाखविलेल्या धैर्याची माहिती पुष्कळाना आहे म्हणून त्याचा विशेष उल्लेख करण्याचे कारण नाही. याचे खरे प्रत्यंतर म्हटले म्हणजे फौजदारी खटल्याचे काम चालू असता आणि त्याचा निकाल होण्याची वेळ आली असता त्याना विनोद सुचे हे होय. क्लेमंट साहेबा-पुढील निकालाचे दिवशी गाडीत बसून निघाले असता ते बरोबरीच्या मंडळीना म्हणाले " जाताना आपण चौघे जाणार व परत येताना तुम्ही तिघे येणार. तेव्हा 'त्रयाणां धूर्तानां' हे शब्द लोक तुम्हाला लावतील संभाळा!" एक मोठा वकील देण्याच्या ऐवजी दोन मध्यम वकील देण्याच्या मुद्यावर 'वीस वर्षांच्या नवऱ्याऐवजी दहा दहा वर्षांचे दोन नवरे करून देण्याची कल्पना' मांडून त्यानी सूचना करणारांची थट्टा कशी केली हे पुष्कळाना माहीत आहे. आणि दुसऱ्या खटल्याच्या शेवटच्या दिवशी काही तरी भयंकर शिक्षा होणार असे लोकाना वाटून जवळच्या काही मंडळीच्या डोळ्यातून पाणी येऊ लागले तेव्हा ते म्हणाले " तुम्ही लोक माझ्यापुढे बसून रडणार असला तर निघून जा कसे!"

या खटल्याच्या अखेर शिक्षा सांगताना जजानी जे गंभीर व भयंकर शब्द उच्चारले ते बुडवून त्यांचे तेज लोपवून टाकण्यासारखे शब्द अखेरीस उच्चारून टिळकानी स्वतःला करिता येईल तितका न्यायाधीशाचा पाणउतारा केला ही गोष्ट जगजाहीर आहे. अखेर अखेर ब्राह्मणेतर चळवळीत कोणी त्यांची अप्रतिष्ठा करील किंवा त्यांच्या अंगावर हात टाकील असाहि संभव होता. विलायतेहून ते परत आल्यावर मानपत्राच्या सभेत दंगा होणार अशी बोलवा होती. त्याचा थोडासा बंदोबस्त स्वयंसेवक मंडळीने केला होता ही गोष्ट खरी. तथापि दुरून कोणी शेणमाती फेकणार नाही कशावरून? तेव्हा भुस्कुटे यांच्या आठवणीप्रमाणे टिळक मित्रमंडळीवर रागावून म्हणाले " मंडईत जाऊन मी उभा राहतो. कोण माझ्या अंगावर शेण फेकतो हेच मला पाहावयाचे आहे!" शारीरिक धैर्याची एक गोष्ट सोमण यानी लिहिली ती अशी की, रायगडावर तळ्यात मंडळी पोहण्याला उतरली तेव्हा एकजण म्हणाला 'एकदम तळ्यात उडी कशी टाकावी? दगड-बिगड लागावयाचा.' तेव्हा टिळक म्हणाले 'या तळ्यातील दगड काढूनच ज्या अर्थी एवढे मोठे वाडे गडावर उठविले आहेत त्याअर्थी खाली दगड लागण्याची भीति कसली?' असे म्हणून त्यानी पहिली उडी टाकली. आणि त्याच प्रकारची गोष्ट कृष्णाजीपंत देवल यानी सांगितली आहे ती अशी की 'डेक्कन कालेजात एकदा वरच्या मजल्यावर मंडळी जमून गप्पा गोष्टी निघाल्या. त्यात शारीरिक पराक्रमाच्याहि निघाल्या. मंडळीना आवेश चढला. एक म्हणाला "यावेळी येथून एकाएकी नाहीसे होण्याचा प्रसंग आला तर काय कराल? जो तो म्हणू लागला हे शक्यच नाही. इतक्यात टिळकानी काचा मारून एका क्षणाचाहि विचार न करिता मी हे असे करीन असे म्हणत दुमजल्यावरून खाली उडी

घातली. मंडळी म्हणाली याचा बहुधा पाय मोडला असेल. पण ते लोक जिन्याकडे जातात तोच टिळक आपल्या पायानी वर चढून येत होते."

**द्रव्य-व्यवहार**-याच्या बाबतीत टिळक इतके निर्लेप निःस्पृह होते की, त्यांच्या हाती असलेल्या मोठमोठ्या फंडांचे वैषम्य वाटून शत्रूनी काही टीका केली पण, त्यानी कोणाच्या पैशाचा कधी अपहार राहोच पण दुरुपयोग केल्याचे कोणालाहि माहित नाही. उलट त्यानी स्वतः झीज सोसून लोकाना मदत केल्याचे सांगणारेच पुष्कळ भेटतील. त्यांचे नातू ग. वि. केतकर हे आपल्या एका आठवणीत लिहितात की, " कोणी त्याना हे घ्या पैसे म्हणून आणून दिल्यास स्वतः ते न घेता एखाद्या सार्वजनिक फंडाचे नाव घेऊन तिकडे द्या म्हणून सांगत. काही लोक कोठेहि दूर प्रवासाला जावयाचे झाल्यास विश्वासाने आपल्या पैशाची थैली टिळकाकडे आणून देत ही ऐकीव गोष्ट नाही. एकाने आणून दिलेली चौदाशे रुपयांची थैली मी मोजून बांधून दिली आहे." उलट जो कोणी टिळकाकडे येऊन द्रव्यसहाय्य मागेल त्याला टिळक ते यथाशक्ति देत असत. त्यांच्याकडे पैशाच्या मागण्या किती याव्या याचा काही नेमच नव्हता. अर्थात् अशा सर्व मागण्या पुरविण्याइतके द्रव्यसहाय त्यांच्या जवळ नव्हतेच, पण त्या पुरविण्याला कोणाहि परोपकारी लक्षाधीशाची संपत्ति पुरी पडली नसती. टिळक परोपकारी असले तरी कोणाला काही सल्ला देतील, कोणाचे काही ऐकून सहानुभूति व्यक्त करतील, कोणाचे लिहिलेले काही वाचतील, कोणाला आधार काढून देतील, कोणाचा एखादा अर्ज लिहून देतील, कोणाला एखादे शिफारसपत्र लिहून देतील, कोणाशी तात्त्विक चर्चा करतील, कोणाला काही विषय समजला नसला तर समजून देतील. या गोष्टी वेळ असेल त्याप्रमाणे कंटाळा न करिताहि ते करीत. पण पैशाचे सोंग टिळक झाले तरी कसे उभे करणार? बरे लोकाना तरी हा विचार कोठे असतो? एक गृहस्थ असे म्हणताना आम्ही ऐकले आहे की, " टिळक एवढे देशभक्त म्हणवितात मग आपल्या वर्तमानपत्राला वर्गणी का घेतात? जाहीरातींना पैसे का घेतात? खऱ्या देशभक्ताने वर्गणीकरिता किंवा जाहीरातीकरिता पैसे घेऊ नये!" पण असे म्हणणारे लोकहि वेळ पडली असता मला अमुक मदत द्या अमक्याला अमुक मदत द्या असे म्हणावयाला तयारच असत. त्यांची विचारसरणी अशी की, " टिळकांच्या जवळ जर पैशाचे मोजमाप आहे व त्यांच्या संग्रहाला मर्यादा आहे तर त्यांच्या आमच्यामध्ये फरक तो काय? आम्ही त्याना देवासारखे मानतो ते फुकटच समजावयाचे!" हे बोलणाराला आपण काय बोलतो हे कळत नव्हते असेहि नाही. पण असा वितंडवाद करणारे लोकहि आढळतात.

त्याना एक गोष्ट कळे की आपणाला हवे ते थेट जाऊन टिळकाजवळ मागावे. कोणी कर्ज फेडीकरिता कोणी शेतीकरिता कोणी काशीयात्रेकरिता कोणी मुलाच्या शिक्षणाकरिता कोणी मुलाच्या लग्नाकरिता कोणी औषधोपचारा-

करिता कोणी देवळाच्या जीर्णोद्धाराकरिता कोणी नवीन धंदा सुरू करण्याकरिता, तात्पर्य कोणी कशाकरिता तर कोणी कशाकरिता म्हणून टिळकाकडे पैशाची मागणी करीत. त्यांच्या आयुष्यातील या मागण्याची बेरीज केली असता १०-२० लाख रुपये तरी सहज भरेल असे वाटते. अर्थात् बहुतेक सर्वांना नकार देणे टिळकाना प्राप्तच होई. मात्र ते अशा लोकाना लेखी उत्तरे देण्याच्या भानगडीत फारसे पडत नसत. असली पत्रे वाचून सहसा फाडून टाकीत. किंवा शेजारी कोणी स्नेही सोबती बसला असला तर मौजेने त्याला ती दाखवीत. पण याचक समक्षच आला म्हणजे त्याला विन्मुख परत पाठविण्याकरिता त्याना पाच चार मिनिटे तरी लागत व परोपरीने त्याचे समाधान करावे लागे. पूर्वी टिळकांजवळ पैसे असल्याचा बोभाटा तरी नव्हता. पण पुढे पुढे त्यांच्या नांवचे काही फंड गोळा झाल्यावर टिळकांच्या संपत्तिविषयीच्या काही लोकांच्या कल्पना काही अद्भुतच होऊन बसल्या. शिवाय आजपर्यंत टिळक नाही म्हणाले तरी ते रागावत तरी नसत. पण आता त्याना वाटे की एवढे मोठे फंड जमले असूनहि आमची यःकश्चित मागणी टिळक मान्य करीत नाहीत ते काय म्हणून ? पण त्याना हे कळेना की अशा प्रत्येक फंडाचा हेतु व कार्य आधी निश्चित होऊन त्याकरिता फंड जमविण्यात आला होता. आधी खर्चाचे कार्य निश्चित न होता फंड जमविला गेला असा त्यांच्या ६१ व्या वाढदिवसाच्या एक लक्ष रुपयांचा. पण त्याचाहि हेतु सार्वजनिक कार्याकडे खर्चणे हाच होता. कसेहि असो. याचकांची दृष्टि एवढी मोठी की 'मला दिले तर ते जगाला दिले' असेहि बहुधा त्याना वाटे !

स्वतः टिळकांच्या संपत्तिमत्तेसंबधाने पाहिले तर असेच म्हणावे लागेल की ती प्रथम वाईट होती. पुढे हळूहळू सुधारली. पण त्या सुधारणेबरोबर त्यांच्या खर्चाची तोंडे वाढली. १८९१ साली त्यानी केसरी मराठा विकत घेतला तो साडे सात हजार रुपयांचे कर्ज करून. हे कर्ज फिटण्यापूर्वीच १८९७ चा खटला उपस्थित झाला. या खटल्याकरिता फंड उभारण्यात आला तरी खासगी असा खर्च काही करावाच लागला. पुढे दोन वर्षे लॉक्लास बंद राहिल्याने कुटुंबचरितार्थाचे ते साधन नाहीसे झाले. यामुळे जमाखर्चाची तोंडे कशी तरी मिळविण्यापलीकडे काही करिता आले नाही. १९०१ सालापासून केसरीचे उत्पन्न थोडे वाढू लागले पण त्या वर्षापासून ताईमहाराज प्रकरण उपस्थित झाले व पुढील तीन सालांत त्याना या कामी पंधरावीस हजार रुपये पदरचे खर्चावे लागले. १९०४ सालापासून १९०७ पर्यंत बरे दिवस गेले तोंच सुरतेची राष्ट्रीय सभा आली. आणि या व पुढील सालांत त्यांचा सार्वजनिक खर्च सहा सात हजार रुपये झाला. पुढचे साली फिरून नवा खटला उपस्थित झाला. आणि टिळक कर्जाचा बोजा अंगावर घेऊनच तुरुंगात गेले ! तुरुंगात मृत्युपत्र लिहिताना कर्जाची व्यवस्था करणे हे त्यात एक मुख्य कलम होते. आणि मंडाले येथे असताना टिळक निष्कर्जी नव्हते ही गोष्ट याच ग्रंथात पूर्वी दिलेली मंडाले येथील पत्रें वाचणाराच्या ध्यानात

आलीच असेल. त्यांच्या पश्चात् १९१२ साली केसरीला एकदम पाच हजारांची जामीनकी प्रेस ॲक्टामुळे भरावी लागली त्यावेळी प्रथम कर्जच काढावे लागले. १९१२ पासून १९१६ पर्यंत चार वर्षे विशेष खर्च नाही अशा स्थितीत गेली. व कर्जफेडीकरिताच ही काटकसर टिळकांच्या सांगण्यावरून केली होती हेहि त्यांच्या मंडाले येथील एका पत्रावरून दिसून येईल. या कर्जफेडीनंतर केसरीच्या उत्पन्नातून घरखर्च जाऊन शिल्लक उरू लागली. पण १९१६ सालापूर्वीच चिरोल साहेबांवर विलायतेत फिर्याद लावून नव्या खर्चाला एक भले मोठे तोंड टिळकानी पाडून ठेवले होते. आणि येथपासून पुढे विलायतच्या या खर्चाकरिता होईल तितकी रकम एका बाजूला काढून ठेवणे हे टिळकांच्या फडणविसाचे काम होऊन बसले होते. अखेर चिरोल प्रकरणी अपयश आल्यामुळे ही बाजूला काढून ठेवलेली रकम तर कोटल्या कोठेच गेली, पण टिळकांच्या स्नेह्यानी व अनुयायानी चिरोल फंड उभारला नसता तर टिळक मरणाच्या वेळी कर्जात आकंठ बुडून राहिले असते व त्यांच्या केसरी मराठा संस्थेलाहि दहाबारा वर्षे तरी कर्जाची व्याजे भरणे व मुद्दलफेड करणे याशिवाय दुसरे काही एक करिता आले नसते. टिळकानी कोलंबो येथे मृत्युपत्र केले ते कोणी वाचील तर त्यावेळी टिळकांची सांपत्तिक स्थिति कशी होती हे तेव्हाच लक्षात येईल.

टिळक म्हटले म्हणजे त्यांच्या बरोबर त्यांचे फंडहि काही लोक पुढे आणतात. पण टिळकांचा आजवर किती फंडाशी संबंध आला व त्यांचा काय कसा उपयोग झाला या सर्व गोष्टी वेळोवेळी स्वतः त्यांच्या व इतर पत्रातून प्रसिद्ध झालेल्या आहेत. १८९५ साली त्यांच्या प्रयत्नाने रायगड येथील शिवाजी स्मारकफंड सुरू झाला. त्याचे काम टिळकांच्याकडे अखेरपर्यंत होते. या मुदतीत त्यानी त्याचे हिशेब वेळोवेळी पैन् पै प्रसिद्ध केले आहेत. सन १८९९ साली ता. १८ जुलै रोजी या हिशेबाचा पहिला हप्ता त्यानी प्रसिद्ध केला या वेळी फंडाची शिलकी रक्कम १९८५४ रु. ७ आ. ५॥पै इतकी होती. यानंतर सन १९०६ साली ता. २० एप्रिल रोजी दरम्यानचा हिशेब त्यानी प्रसिद्ध केला. त्यावेळी शिल्लक २४७५३ रु. १आ. ०पै इतकी होती. १९०८ साली टिळक तुरुंगात गेले व ते परत आल्यानंतर डेक्कन बँकेचे दिवाळे निघाले व त्यात शिवाजी स्मारक फंड गुंतला गेला. व बँकेचे लिक्विडेशनचे काम टिळकांच्या मृत्यूपूर्वी सर्व पुरे झाले नाही. यामुळे प्रत्यक्ष पैसे हातात किती येतात हे समजण्याला मार्ग नव्हता. शिवाय १९१४ नंतर रायगडावर जाऊन त्यानी उत्सवहि केला नाही. हा एक प्रसंग हिशेब प्रसिद्ध करण्याचा असतो. पण वरील दोन कारणामुळे १९०६ सालानंतर टिळकाना या फंडाचा हिशेब प्रसिद्ध करता आला नाही तथापि डेक्कन बँकेकडे टिळकानी ठेवलेली रक्कम व त्यावर चढलेले व्याज मिळून एकंदर ३६३७० रु. ५ आ. २ पै. येवढ्या रकमेचा क्लेम टिळकाकडून बँकेच्या लिक्विडेटरकडे आधी दिवाणी हुकूमनामा मिळवून दाखल करण्यात आला होता. टिळकांच्या मृत्यूनंतर रुपयात

नऊ आणे याप्रमाणे वसूल लिक्विडेटर याजकडे आला. आणि पुढे मूळ योजनेप्रमाणे छत्रीचे कामहि टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांच्या हेतूप्रमाणे पुरे करण्यात आले. तात्पर्य शिवाजी रायगड स्मारक फंडाचा १८९५ सालापासून आज तारखेपर्यंतचा सर्व हिशेब रीतसर मांडलेला व हिशेबनिसानी तपासलेला तयार आहे. व अगदी अलीकडे म्हणजे ता. ३१ मार्च सन १९२६ अखेरच्या हिशेबाचा शेवटला हप्ता समाधीच्या गेल्या समारंभाचे प्रसंगी केसरीतून व इतर रीतीने प्रसिद्ध करण्यात आला आहे. आणि टिळकांच्या हातून या फंडाचा जमाखर्च काय झाला त्याचा संकलित वृत्तांत ता. ८ जानेवारी १९२४च्या केसरीच्या अंकात सबंध छापला आहे तो कोणासहि पाहता येईल.

शिवाजी स्मारकासंबंधाने दुसऱ्या एका संस्थेशी टिळकांचा संबंध आला ती पुण्यातील श्रीशिवाजी मंदिर ही होय. या संस्थेचे ट्रस्ट डीड ता. २५ माहे मे १९१७ रोजी झाले. त्यात ट्रस्ट फंड १५००० चा नमूद असून ट्रस्टी मध्ये लो० टिळक प्रो० हरिभाऊ लिमये व न. चिं. केळकर यांची नेमणूक करण्यात आली होती. नंतर लवकरच टिळक विलायतेला गेले. त्यानंतर शिवाजी मंदिराकरिता हल्लीची जागा ४ मार्च १९१९ रोजी केळकर यानी ताब्यात घेतली. मंदिर कोठे कसे बांधावे याविषयी टिळकानी मृत्यूपूर्वी समक्ष जागेवर जाऊन सूचना केल्या होत्या. पण मंदिराचे काम २६ एप्रिल १९२२ च्या पूर्वी पुरे झाले नाही. अर्थात् टिळकांचा या संस्थेच्या प्रत्यक्ष पैशाशी काहीच संबंध आला नाही. तथापि या संस्थेचा जमाखर्च केसरी कचेरीच्या द्वारेच बहुतेक करण्यात आला व या संस्थेच्या फंडाचेहि हिशेब वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

टिळकांच्या खटल्यासंबंधाने तीन फंड झाले पैकी पहिला १८९७ साली. त्याची सर्व व्यवस्था परस्पर मुंबईस डॉ. नानासाहेब देशमुख यांच्याकडे होती. टिळकांच्या हाती केव्हाहि नव्हती. तथापि या टिळक डिफेन्स फंडाचा हिशेब केसरी व टाइम्स ऑफ इंडिया यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आला होता. शिवाय आमच्या टिळक चरित्र ग्रंथाच्या पूर्वार्धात २५ व्या भागाचे परिशिष्ट ३ म्हणजे पृष्ठ ५९८ यावर या फंडाची हकीकत दिलेलीच आहे ती वाचकाना पाहता येईल. खटल्यासंबंधी दुसरा फंड १९०८ साली खासगी रीतीने काढण्यात आला. परंतु त्याची परिस्थिति काय होती व त्याचे हिशेब का प्रसिद्ध झाले नाहीत याचे कारण प्रस्तुत चरित्रग्रंथाचा उत्तरार्ध खंड १ भाग ८ पृष्ठ ६६ या ठिकाणी आम्ही दिले आहे. पण हा फंड जमविणे व खर्च करणे या सर्व गोष्टी टिळकांच्या पश्चातच झालेल्या असल्यामुळे त्यांचा त्याच्याशी काहीच संबंध आलेला नव्हता यामुळे त्यांच्यावर कोणतीच जबाबदारी नव्हती. १९१६ साली टिळकावर राजद्रोहाचा तिसरा खटला झाला. परंतु त्या वेळचा सर्व खर्च स्वतः टिळकांच्या खाजगीतून म्हणजे केसरी कचेरीच्या शिलकेतून झाला. इतर फंडापैकी पहिला फंड १९१६ साली टिळकांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त त्याना अहेर करण्या-

करिता जमविला तो. त्यातहि अहेर एका रकमेने दिलेला घेण्यापलीकडे टिळकांचा काही सबंध आला नाही. या अहेरादाखल जी रक्कम त्याना देण्यात आली ती सर्व व तीत स्वतःचे तुळशीपत्र घालून टिळकानी मुंबईचे श्री. अण्णासाहेब नेने यांचेकडे दिली. सदर रकमेचाहि रीतसर ट्रस्ट करण्यात आला असून ट्रस्टडीड झाले आहे ट्रस्टी नेमण्यात आले आहेत व मधून मधून त्यांचे हिशेब प्रसिद्ध होतात हे केसरीच्या वाचकाना माहीत आहे. चिरोल केस करता जो सुमारे तीन लक्षांचा फंड जमविण्यात आला तो सर्व १९०८ प्रमाणे टिळकांच्याच पश्चात् जमविण्यात आला. या खेपेस तर तो तिकिटांच्या नंबरवारीने दर आठवड्यास प्रसिद्ध होत होता, आणि टिळकांच्या मृत्यूच्या आधी थोडे दिवस तो फंड त्याना जाहीर रीतीने अर्पण करण्याचा समारंभ झाला तेव्हाच त्याचा सर्व हिशेब प्रसिद्ध करण्यात आला होता. राहता राहिला होमरूल लीग किंवा स्वराज्य संघाचा फंड. पण त्याचे हिशेबहि वेळोवेळी पुस्तक रूपाने व वर्तमानपत्राने प्रसिद्ध झालेले आहेत. व या संघाच्या सभासदांची वार्षिक सभा होऊन बहुधा प्रत्येक वर्षी हिशेब सभेपुढे मांडण्यात येत. टिळकांच्या हयातीतला शेवटला हिशेब ता. ३१ मार्च १९२० पर्यंतचा त्या सालच्या मे महिन्यात ता. २३ रोजी भरलेल्या संघाच्या सभेपुढे मांडण्यात आला होता. स्वतः फंडाच्या पैशाच्या व्यवहाराशी टिळकांचा सबंध येत नसे कारण ते नुसते अध्यक्ष होते. खजिनदारांचे काम श्री. अण्णासाहेब नेने व प्रो. शिवरामपंत परांजपे यांच्याकडे असून हिशेब तपासणीचे काम श्री. गणेश सदाशिव मराठे यांचेकडे असे. ज्या निरनिराळ्या फंडाशी टिळकांचा संबंध आला त्याची हकीकत ही अशी आहे. उपरिनिर्दिष्ट फंडाशिवाय टिळकानी केव्हाही कोणापासूनहि देणग्या किंवा वर्गण्या मागितल्या नाहीत व घेतल्या नाहीत. कोणी एकादा त्यांचा भक्त क्वचित् एकादी रक्कम त्यांच्याकडे त्यांच्या हातून एकाद्या संस्थेला देण्याकरिता पाठवी व त्या हेतूप्रमाणेच तिचा विनियोग टिळक करीत. आणि एकाद्याने उद्देश न सांगता तशीच रक्कम त्यांच्या स्वाधीन केली तर आपल्या पसंतीप्रमाणे एकाद्या सार्वजनिक संस्थेला ते ती देऊन टाकीत.

## ( २ ) सामाजिक व धार्मिक

टिळकांवर प्रतिपक्षांचा आक्षेप व कटाक्ष येऊन जाऊन हा की ते सामाजिक सुधारणेच्या कार्याला विरोध करीत. या आक्षेपाला टिळकानी रँगलर परांजपे याना उत्तर देताना उत्तर दिलेच आहे. ते कोणास पटो वा न पटो. परंतु त्यात उल्लेखिलेल्या तत्त्वाचा पगडा टिळकांच्या मनावर बसला होता यात शंका नाही. पण राजकारणात वावरत असता सामाजिक सुधारणेचेहि कार्य टिळकानी त्याच्या बरोबरीने केले नाही हा आक्षेप टिळकावर आणताना त्यांचे टीकाकार ही गोष्ट विसरतात की अशा प्रकारचा आक्षेप इतर कार्यक्षेत्रात इतर अनेक लोकावरहि सहज आणता आला असता. मग एकट्या टिळकावरच

अशी टीका काय म्हणून ? गोखले हे सामाजिक सुधारणेला अनुकूल व तिचे पुरस्कर्ते होते ना ? मग त्यानी सामाजिक सुधारणेवर कितीसे लेख लिहिले व व्याख्याने दिली ? राजकीय सुधारणेच्या आधी सामाजिक सुधारणा असे जरी प्रत्यक्ष ते तोंडाने म्हणत नसत, तरी ती कल्पना त्याना सर्वस्वी अमान्य नव्हती. मग राजकीय मतप्रसाराच्या आधी किंवा निदान त्याच्या बरोबर व बरोबरीने सामाजिक सुधारणेविषयी लोकाना उपदेश करण्याला त्यानी आपले वक्तृत्व का खर्चिले नाही ? फेरोजशहा मेथा यांच्या भाषणांच्या किंवा लेखांच्या ग्रंथात सामाजिक सुधारणेवर कितीसा भर दिलेला आढळेल ? बरे एक आधी व एक नंतर ही विचारसरणी सोडून देऊनहि निदान सामाजिक व राजकीय सुधारणा, लष्करी शिपायांच्या पायचालीप्रमाणे बरोबरीने व समांतर चालाव्या असे मानले तरी आज जे सामाजिक सुधारणेचे पुढारी व पुरस्कर्ते म्हणून मानले गेले आहेत, त्यानी राजकीय सुधारणेसंबंधाने आपली मते प्रकट करणे व मतप्रसार करणे हे त्यांचेहि कर्तव्य नव्हते काय ? हिंदुस्थानातील राजकारण कसे आहे व कसे असावे याविषयी चंदावरकर भांडारकर कर्वे याना योग्य कल्पना नव्हत्या, किंवा निदान स्वतःच्या काही कल्पना नव्हत्या, असे कोण म्हणेल ? पण भांडारकरानी पेन्शन घेतल्यावर तरी राजकाणावर कितीशी व्याख्याने दिली व लेख लिहिले ? कर्व्यांनाही राजकीय स्वराज्य हवे आहे. असे असता त्यानी अवघ्या जन्मात राजकारणावर असे एकदा तरी व्याख्यान दिले किंवा एकादा तरी लेख लिहिला असे कोणास दाखवून देता येईल काय ? टिळक वर्तमानपत्रकार असल्यामुळे विविध विषयावर लिहिण्याचे त्याना सहजच अधिक प्रसंग हे खरे. तथापि कर्व्यांना उलट थोडे प्रसंग तरी का साधता आले नाहीत ? पण अवघ्या जन्मात त्यानी एकच एक विषय पत्करला होता. आणि तो तसा पत्करला होता म्हणूनच, म्हणजे त्यातील कार्य इतर कार्यांच्या उपसर्गाने बिघडू नये म्हणूनच, इतर विषय त्यानी टाळले हे कोणीहि सांगेल. त्याच रीतीने टिळकानी जर जाणून बुजून सांगून सवरून राजकारण हा एकच विषय आपलासा केला होता तर त्यानी सामाजिक सुधारणेचे कार्य प्रकट रीतीने किंवा उत्साहाने हाती घेतले नाही याबद्दल त्याना तरी कोणी दोष का द्यावा ?

१९१६ साली आगरकरांच्या पुण्यतिथीच्या प्रसंगाने टिळकानी आपल्यातला व आगरकरातला भेद केसरीत प्रकट केला होता. तसेच हेहि त्यानी प्रगट केले होते की इतर सुधारकांच्या मानाने आगरकर हे राजकारणात जहाल मताचे किंवा खऱ्या राष्ट्रीय बुद्धीचे असता त्यांची पुण्यतिथि करणारे त्यांचे भक्त, केवळ सामाजिक मतांच्या कारणाने आगरकरांचे श्रेष्ठत्व होते असे भासवितात, पण ती खरोखर चूक होय. आगरकरानी आपला तार्किकपणा सामाजिक सुधारणेप्रमाणे राजकीय बाबतीतहि उपयोगात आणला होता. शिक्षण व राजकीय बाब या दोहोमध्ये आपले व आगरकरांचे मत एकच असता त्यांच्यात व आपल्यात मतभेद का झाला

व आगरकराना केसरी का सोडावा लागला हे विशद करून सांगताना टिळक लिहि-तांत. "मतभेद धार्मिक आणि सामाजिक बाबतीत उत्पन्न झालेला होता. धर्मदृष्ट्या आगरकर केवळ बौद्धिकवादी होते आणि तोच पंथ सामाजिक बाबतीतहि निदान पक्षी आपल्या लेखात त्यानी स्वीकारलेला होता. आगरकरांची ही पद्धत टिळकांसच नव्हे तर त्यांचे जे दुसरे मित्र केसरीच्या चालकवर्गात होते त्यासहि पसंत नव्हती. व त्यामुळेच अखेर केसरीतून निघून गोपाळरावजीस 'सुधारक' काढावा लागला. सुधारणा नको असे केसरीचे म्हणणे केव्हाहि नव्हते. पण केवळ बौद्धिक दृष्ट्या किंवा तर्कदृष्ट्या सुधारणेचा विचार करण्यास केसरी तयार नव्हता. अर्थात् हीच पद्धत स्वीकारणे असल्यास आगरकरांस दुसरे वर्तमानपत्र काढणे जरूर होते व ते त्यानी काढलेहि. सुधारणांचा केवळ तर्कदृष्ट्या विचार करणे योग्य नाही हे मत आता सुधारलेल्या राष्ट्रांतहि ग्राह्य झालेले आहे. राजकीय बाबतीत राज-सत्तेच्या अस्तित्वामुळे केवळ तर्कवश होऊन लिहिता येत नाही असा आगर-करांसहि अनुभव आलेला होता. पण हिंदू-समाज अधिकारहीन आणि पंगू असल्यामुळे तशा प्रकारचा अनुभव सामाजिक बाबतीत सध्या आमच्याकडे येत नाही. तथापि तेवढ्यामुळे प्राचीन परंपरा देशकाल किंवा सद्यःकालीन सामाजिक परिस्थिति यास सोडून केवळ तार्किक रीत्या सामाजिक सुधारणेचा विचार करणे युक्त आहे असे सिद्ध होत नाही. समाजावर तार्किक हल्ले करणे म्हणजे केवळ पाडापाडीचे काम करणे होय. त्याने समाजाची बंधने शिथिल होतात पण नवी मात्र उत्पन्न होत नाहीत. मिल्लसारख्या तत्त्ववेत्त्यासहि ही गोष्ट कबूल करावी लागली आहे. आणि कॉट या फ्रेंच ग्रंथकाराने जेव्हा निवळ आधिभौतिक पायावर समाजरचना कशी करावी याचे विवेचन केले, तेव्हा त्यास चातुर्वर्ण्यासारखीच एक पद्धत पसंत पडून ती अमलात कशी आणावी याचा त्याने आपल्या ग्रंथात सांगोपांग विचार केला. मिल्लला ही पद्धत पसंत पडली नाही पण अशी पद्धत पाहिजे ही गोष्ट त्याने प्रांजलपणे कबूल केली आहे. व या पद्धतीचे विवेचन केल्याबद्दल त्याने कॉटचे अभिनंदन केले आहे. 'केसरी' आणि 'सुधारक' यांचा जो मतभेद होता तो तत्त्वाचा होता. आणि 'तर्कटी' 'माथेफिरू' 'गांवाबाहेरचा' किंवा 'सवंग लोक-प्रियतेच्छु' इ. वाक्शस्त्रे या वादात मौजेसाठी जरी उपयोगात आलेली असली तरी मुख्य भेद तत्त्वाचा आहे ही गोष्ट खुद्द आगरकरांच्याहि पूर्ण लक्षात आलेली होती. पण सुधारणेचीच ज्यास री ओढावयाची त्यास या गोष्टी कशा कळणार? आगरकरांचे तर्कचक्र राजकीय सामाजिक शिक्षणविषयक बाबतीत ज्याप्रमाणे एकसारखेच अप्रतिहत चालत होते, तसे त्यांच्या सन्मानार्थ जमलेल्या परवाच्या सभेतील फारच थोड्या लोकांचे चालत असेल. कोणी स्त्रीसुधारणेच्छु तर कोणी प्रार्थना-समाजिस्ट. कोणी विधवाविवाहेच्छु तर कोणी एकेश्वरी. आणि कोणी सर-कारी नोकरीत आयुष्य घालवून थकलेले तर कोणी राष्ट्रीय जेवण करून जातिभेद

मोडण्याच्या उद्योगास प्रवृत्त झालेले, अशा सरमिसळ समाजात आगरकरांच्या केवळ सुधारणातत्त्वांचा जयजयकार करण्यात यावा यात काही नवल नाही. ज्याना बाकीच्या बाबती पहावयाच्याच नव्हत्या त्यास सगळा आगरकर नको होता. किंब-हुना तो त्यांच्या पचनीहि पडला नसता. म्हणून गोपाळरावाजींच्या चरित्रापैकी आपणास पचेल तेवढाच भाग घेऊन त्यानी गोपाळरावांची श्राद्धतिथि त्यांच्या एकविसाव्या वर्षी साजरी करून घेतली."

**पुनर्विवाह**—सन १९०३ च्या जून महिन्यात पुण्यास रावबहादुर वामनराव कोल्हटकर यांच्या मुलीचे लग्न झाले.ही मुलगी वामनरावजींच्या पुनर्विवाहित स्त्रीपासून झालेली असल्यामुळे अशा अपत्यांचे लग्नसमारंभ कसे काय होतात याकडे सहजच लोकांचे लक्ष लागते. त्यांचा विशेष गाजावाजा न करता ते झाले तर त्याना प्रति-बंधहि होत नाही व पानसुपारीला जेवणाखाणाला एरव्ही यावयाचे ते लोक येता-तच. पण क्रिया व प्रतिक्रिया या नियमाने काही एका विशेष हेतूने या लग्नाचा पुण्यात गाजावाजा करण्यात आल्यामुळे त्याला किंचित् प्रतिकारहि झाला. प्रति-कार म्हणजे तरी एरवी कोणीच काही अडथळा केला नाही, तथापि लग्नाच्या अक्ष-तीची मिरवणूक निघाली ती कसब्याच्या गणपतीपाशी गेली तेव्हा तेथील पुजा-ऱ्यानी दरवाजे लावून घेतले. मिरवणूक न काढता अक्षत गेली असती तर हा प्रतिबंध झाला नसता असे दिसते. पण मिरवणूक काढली. ती गणपतीच्या निमि-त्ताने नव्हे तर पुनर्विवाहपक्षाचा तो जयोत्सव म्हणून काढली, आणि एका उत्साही गृहस्थाने त्याहि पलीकडे जाऊन थोडा अव्यापारेषु व्यापार केला. यामुळे प्रति-पक्षासहि जोर आला. स्वतः टिळकाना या लग्नाच्या पानसुपारीला आमंत्रण होते पण ते त्या दिवशी न जाता दुसरे दिवशी स्वतंत्रपणाने गेले. या संबंधाने केसरीत स्फुट लिहून टिळकानी आपले म्हणणे खुलासेवार मांडले आहे. ते लिहितातः—

"पुनर्विवाह शास्त्रनिषिद्ध आहे असे आमचेच नव्हे तर या विषयाचे ज्यानी चांगले अवलोकन केले आहे अशा आमच्या बऱ्याच संस्कृतज्ञ मित्रांचेहि मत आहे. तथापि ज्यानी पुनर्विवाह केला ते ब्राह्मण्यापासून कायमचे भ्रष्ट होतात असे आम्हास वाटत नाहीं. शास्त्राने सप्रवरांचा विवाहहि निषिद्ध आहे. पण अशा विवाहांची संतति ज्याप्रमाणे ब्राह्मणात गणली जाते त्याप्रमाणेच पौनर्भव संततीहि मानण्यास काही हरकत दिसत नाही. पुनर्विवाह सशास्त्र समजा की अशास्त्र समजा, जेथे जेथे तो प्रचलित आहे तेथे तेथे पहिल्या विवाहापेक्षा त्याची योग्यता कमीच समजतात. फार लांब कशाला कोल्हटकरांचेच घरी लग्नाकरिता स्त्रियांचा जो समूह गोळा झाला होता त्यातहि पुनर्विवाहित स्त्रिया व प्रथम विवाहित स्त्रिया असा भेद काही प्रसंगी करण्यात आला असे समजते. सारांश पुनर्विवाह शास्त्रनिषिद्ध असून पुनर्विवाहित लोक आणि त्यांची संतति पुनर्विवाह न करणारे लोक व त्यांच्या संततीपेक्षा जातीने जरा कमी आहेत असा लोकांचा समज असल्यास त्यात काही चूक नाही. ही वस्तुस्थिति लक्षात आणून व कबूल करून पुनर्विवाह पक्षाचे लोक

जर वागतील तर त्यांच्या व लोकांच्या दरम्यान परवाप्रमाणे लढा पडणार नाही असे आम्हास वाटते. परंतु पुनर्विवाह पक्षाचे समर्थन करणे ज्यांच्या हाती पडले आहे त्या मंडळींची भिस्त शास्त्र रूढि आणि सौजन्य यापेक्षा कायदा आणि पोलिस यावर जास्त असल्यामुळे 'मुखमस्तीति वक्तव्यं' या न्यायाने त्यानी वाटेल ते बडबडण्यास सुरवात केली आहे. स्वत: रा. ब. कोल्हटकर याना ही गोष्ट संमत नसल्याचे त्यानी आपल्या आचरणानेच दाखविले आहे व त्याबद्दल आम्ही त्यांचे अभिनंदन करतो. पण शास्त्र व आचार यांची ओळख नसताना तत्पक्षीय तरतरीतांच्या वर्तनाबद्दल आम्हास खेद वाटल्यावाचून रहात नाही."

केसरीच्या या उद्गारानी पुनर्विवाह पक्षाचे बरेच समाधान झाले. त्याचे पुण्यातील अध्वर्यू रामचंद्र भिकाजी जोशी यानी केसरीला पत्र लिहून कळविले की "टिळकांचे उद्गार मोठ्या उदारपणाचे व सध्याच्या देशकालवर्तमानाचा पोक्त विचार करून काढलेले आहेत यात शंका नाही. यासाठी पुनर्विवाह पक्षातील सर्व मंडळीच्या तर्फे मी त्यांचे आभार मानतो." ते पुढे म्हणतात "जो इतका वाद माजला त्याचे कारण एकतर ही अगदी नवीन गोष्ट होय. आणि शिवाय आरंभापासून दोन्ही पक्ष अभिमानाला पेटले होते. पुनर्विवाहाची सुधारणा करणारानी लोकाना खिजवू नये हे खरे. पण त्याचप्रमाणे त्याना जातिभ्रष्ट धर्मभ्रष्ट ही नावेहि कोणी ठेऊ नयेत. शास्त्र व आचार न कळणाऱ्या लोकांची तरतरी जशी बाधते तशीच शास्त्र व आचार यांची ओळख असणाऱ्यांचे औदासिन्य व मौनवृत्ति याहि सुधारणेला बाधतात" जोशी यानी टिळकाना असा उलट अहेर केला. पण मुख्य गोष्ट टिळकानी केसरीत लिहिली ती जोशी यानी कबूल केली. पुनर्विवाहमंडन पक्षाने देखील पुनर्विवाह हा योग्यतेने प्रथम विवाहाच्या बरोबरीचा आहे असे म्हटलेले नाही. विष्णुशास्त्री पंडितांच्या पुस्तकाच्या १० व्या अध्यायात असे लिहिले होते की बिजवरापेक्षा जसा प्रथम वर अधिक प्रशस्त त्याचप्रमाणे विधवेपेक्षा प्रथम विवाहाची पत्नी अधिक प्रशस्त होय. ही कबूली देऊन जोशी यानी टिळकाना अशी विनंति केली की "आपण संथपणाने व पोक्तपणाने जी तडजोडीची दिशा दाखविली ती पूर्वीहि दाखविली असती तर फार चांगले झाले असते. किंवा यापुढे दाखवाल तर तंटा मिटेल." जोशी यानी विशेष विनंति एवढीच केली की, बालविधवेचा विवाह प्रौढविधवेच्या विवाहाइतका शास्त्रनिषिद्ध मानला जाऊ नये. या पत्रावर टिळकानी फिरून उत्तर दिले. "पण आता वाद फार थोड्यावर आला होता." टिळकांचे म्हणणे असे की, "विष्णु शास्त्री पंडिताप्रमाणे विठोबा अण्णा दप्तरदार यांचाहि अभिप्राय पुनर्विवाहाला फारसे निषिद्ध न मानणारा पण पुनर्विवाहाला दुसरी प्रत देणारा असा होता. पुण्यास जेव्हा पुनर्विवाहाचा वाद झाला तेव्हा तडजोडीची दृष्टि कोणीहि ठेविली नव्हती. एका पक्षाचे म्हणणे हा विवाह बावनकशी सोन्याप्रमाणे शुद्ध व इष्ट आहे. अर्थात दुसरा पक्ष दुसऱ्या टोकाला गेला असल्यास नवल नाही. हल्लींच्या पूर्वी ५-७ वर्षे

मी काही पुढाऱ्यांजवळ अशा तऱ्हेच्या तडजोडीची वाटाघाट केली होती. पण तिचा तेव्हा उपयोग झाला नाही. तेव्हा असला वाद वर्तमानपत्रातून करण्यापेक्षा खाजगी झालेला बरा. आणि खाजगी रीतीने तडजोड करण्यास मी तयार आहे. समाजात पुनर्विवाहाच्या कारणाने पडलेली तेढ किंवा तंटा मिटावा अशी माझी इच्छा आहे. पण ही गोष्ट खाजगी रीतीने व्हावी एवढेच आमचे म्हणणे."

**पोटजाती**-ब्राह्मणातील पोटजाती मोडण्याविषयी टिळक प्रथमपासून अनुकूल होते. चिपळूणकर आगरकर वगैरे मंडळींचीहि तीच मते होती. केसरी पत्र सुरू झाल्यावर पहिल्या दोन आठवड्यातच केसरीत या विषयावर लेख आले. आणि कोकणस्थ देशस्थ कराडे यामधील विवाहाला होणारा प्रतिबंध शास्त्रसिद्ध नाही, तो व्यवहारदृष्ट्या व वैद्यशास्त्रदृष्ट्या मोडणे इष्ट आहे, असे मत प्रगट करण्यात आले. नंतर मधून मधून या विषयाचे तात्त्विक उल्लेख केसरीतून होत असत. १८८८ साली सोलापुरास शृंगेरी येथील जगद्गुरु असता त्यांच्यासमोर या विषयाची चर्चा झाली. तीत या तीन पोटजातीतील विवाहाना हरकत नाही असेच निष्पन्न झाले. सामाजिक परिषद सालोसाल या विषयावर ठराव करीतच होती. सन १९०० च्या नोव्हेंबर महिन्यात साताऱ्याच्या पुढाऱ्यानी या कामी उचल केली, आणि रामशास्त्री गोडबोले या प्रसिद्ध शास्त्र्यासह चाळीस पन्नास गृहस्थानी संकेश्वरच्या जगद्गुरूना एक विनंतिपत्र पाठवून या सुधारणेला त्यानी संमति द्यावी असे लिहिले. या विषयावर केसरीत दोन अग्रलेख लिहून टिळकानी आपला स्पष्ट अभिप्राय पुन्हा एकवार दिला. "मिळणारी सर्व माहिती व आधार लक्षात घेता या विवाहाना विरोध करण्याला शास्त्रात कोठेच आधार नाही. सूत्रकालापासून पुराणकालपर्यंत विवाहविषयक वचनात ब्राह्मणातील पोटजातींचा कोठेच उल्लेख नाही. इतकेच नव्हे तर ब्राह्मणाला पूर्वकाली तिन्ही वर्गातील कन्या ग्राह्य होत्या, मात्र अनुलोम विवाहाची संतति ब्राह्मण जातीत पडत असे इतकेच. "सवर्णेभ्यः सवर्णासु जायंते हि सजातयः" या स्मृतिवचनात फक्त स्थूल वर्णाचा उल्लेख आहे. आता रूढि उलट पडली असेल पण एकाला रूढी पाडता येते तशी दुसऱ्याला दुसरी पाडता येते. रूढी बदलण्याला प्रायश्चित्त नाही. फक्त समाजातील काही लोक टीका करतील पण ती सोसली म्हणजे झाले. प्रत्येक पोटजातीला इतरानी काही तरी नाव ठेवावे अशामुळे आणि मुख्यतः दळणवळण कमी असल्यामुळे परस्पर लग्नव्यवहार मागे पडला याहून निषेधाला दुसरे कारण नाही. प्रतिबंधक रूढी देखील सार्वत्रिक नाही. फक्त रूढीचे दडपण मनावर असणारा मनुष्य नकार देण्याला काही तरी सबब सांगतो. पोटजातीतील विवाह आणि पुनर्विवाह यामध्ये तत्त्वाचा पुष्कळ भेद असून शास्त्र व तारतम्य यांचाहि भेद आहे. सातारकरांची चूक इतकीच की, त्यानी अल्पसुधारणेच्या मागे फार व्यापक असा हेतु लावला, व एकंदर जाती मोडून त्यामध्ये सरास रोटी-बेटीव्यवहार व्हावा असेहि अनुमान ज्यातून कदाचित काढता येईल अशी शब्द-

योजना केली. महाराष्ट्रीय ब्राह्मणातील तीनहि उपवर्णात चालीरीति व गृहस्थिति ही जवळजवळ सारखी आहेत. म्हणून हे व्यवहार रूढ होण्यास फारशी अडचण नाही. नड शास्त्रार्थाची नाही तर प्रत्यक्ष कृतीची आहे. शंकराचार्योकडे विनाकारण विनंतिपत्र पाठविल्यास कदाचित विरोधी किंवा संशयात्मक निर्णय मिळून उगीच पायावर दगड पाडून घेतल्यासारखी स्थिति व्हावयाची. असले विवाह करण्यास तयार असलेल्या लोकांची यादी करावी व पुढील काम चालू करावे. मोठमोठ्या घराण्यानी यात पुढाकार घेतल्यास मार्ग सोपा होईल. 'काशीस जावे नित्य वदावे' इतके म्हणण्यापुरतेच विनंतिपत्र असेल तर त्यात अर्थ नाही," असा अभिप्राय टिळकानी या विषयावर दिला. तेव्हापासून अलीकडे या विषयात बरीच प्रगति झाली आहे. आणि सामान्य पदवीच्या सुशिक्षितानी ही सुधारणा घडवून आणली आहे इतकेच नव्हे तर मोठ्या घराण्यातील लोकानीहि ही गोष्ट अनुसरली आहे. केसरीतील या लेखाने समाजात प्रगतिपर विचार उत्पन्न झाले आणि कित्येकानी या तीन पोटजातीपलीकडेहि का जाऊ नये असा प्रश्न टिळकाना पत्रद्वारे केला. त्यावर टिळकानी पुढे एका लेखात असे उत्तर दिले की "देशस्थ कोकणस्थ कराडे यांचाच प्राधान्येकरून जरी आम्ही निर्देश केला होता तरी आमच्याकडील ज्या ब्राह्मणात अन्नव्यवहार होतो त्यांच्या दरम्यान विवाह होणे इष्ट आहे असे आम्ही पूर्वीच स्पष्ट लिहिले होते आणि त्या विधानात देवरुखे वगैरे इतर पोटजातींचा समावेश होतो हे उघड आहे. जेथे अन्नव्यवहारच होत नाही तेथेच खरी अड-चण आहे. आणि ज्या विषयी प्रत्यक्ष शास्त्रीय निषेध आहे ती बाब सोडून दिली पाहिजे. पण इतरत्र केवळ रूढिनिषेधावर अवलंबून राहणे योग्य नाही. नसत्या ठिकाणी शास्त्रनिषेधाचा अध्यारोप कोणी करू नये. शास्त्र आम्हाला प्रमाण आहे असे मानून व ते या कामी विरोधी नाही असे समजून पुढच्या मार्गाला लागावे" असे सुचवून टिळकानी हा प्रश्न तेव्हा निकालात काढला.

**अस्पृश्यता**—टिळक स्वतः अस्पृश्यता मानीत नसत व सार्वजनिकच काय पण खासगी जागेतहि ती मानली जाऊ नये असेच त्यांचे मत असे. आणि जुन्या समाजाला दमाने घेतले तर तोहि ती काढून टाकील असे त्याना वाटत असे. ते अस्पृश्य लोकांच्या निमंत्रणावरून त्यांच्याकडे पानसुपारीला जात. तथापि अस्पृश्यानी सत्या-ग्रहाच्या दंडेलीने हा प्रश्न सोडवावा असे त्यांचे मत नव्हते. अस्पृश्यतानिवारणाच्या बाबतीत १९२०साली ते मुंबईस परिषदेला हजर राहिले पण त्यानी वि. रा. शिंदे यानी तयार केलेल्या एका प्रतिज्ञा पत्रकावर सही केली नाही, म्हणून त्यांची सहानुभूति ढोंगीपणाची होती असा एक आक्षेप त्यांचेवर आणण्यात येतो. पण या बाबतीत शिंदे यांचे पत्र व टिळक यांचे उत्तर ही दोन्ही खाली दिली आहेत व त्यावरून प्रतिज्ञापत्रकावर सही न करण्याचे टिळकांचे कारण कळून येईल.

### विठ्ठलराव शिंदे यांचे टिळकांना पत्र

पुणे २ जुलै १९१८

"ना. पटेल व मुंबई प्रां. कॉं. कमिटीचे इतर चिटणीस मला कळवितात की, स्पेशल कॉंग्रेसकरिता तुम्ही अस्पृश्यातर्फे काही प्रतिनिधि निवडून पाठवा. प्रतिनिधि वगैरे निवडण्यासंबंधी कॉंग्रेसचे काय नियम आहेत हे मला माहीत नाही. अस्पृश्यांच्या जाहीरसभा बोलावून प्रतिनिधि निवडले तर चालतील काय ? तसेच कॉंग्रेससंस्थेविषयी अस्पृश्यांच्या मनात आदर व निष्ठा उत्पन्न करण्याकरिता, मोठमोठ्या पुढाऱ्यांच्या सह्या असलेले एक 'अस्पृश्यतानिषेधक जाहीरपत्रक' अशा सभातून वाचून दाखवावे असे वाटते. जाहीरपत्रक सोबत पाठविले आहे. त्यावर आपण सही दिल्यास कॉंग्रेसचे तसेच अस्पृश्य वर्गाचेहि हित होणार आहे. तरी कृपा करून मॅनिफेस्टोवर सही करून पाठवावी."

### टिळकांचे शिंदे यांस उत्तर

पुणे २ जुलै १९१८

"तुमचे पत्र पोचले. तुमच्या मॅनिफेस्टोच्या शेवटी काही कार्यक्रम शिरावर घेऊन तो प्रत्यक्ष अमलात आणण्याची व्यक्तिशः जबाबदारी त्यात टाकलेली असल्यामुळे सध्याच्या माझ्या कार्यव्यापृततेमध्ये हे नवीन कार्य मला अंगावर घेता येईलसे वाटत नाही. म्हणून तुमच्या जाहीरपत्रकावर मला सही देता येत नाही याबद्दल माफ करा. मॉंटेग्यू चेम्सफर्ड रिपोर्ट पाठविला आहे. त्यातील २३२ सावा प्यारा वाचा व नंतर रिपोर्ट परत पाठवून द्या."

पुण्यास नायकांच्या गणपतीपुढे १९०७साली हिंदुधर्मातील एकी व सहिष्णुता या विषयावर टिळकांचे व्याख्यान झाले. त्यात त्यांनी सांगितले की " गणपतीला अंत्यजाचा विटाळ होतो म्हणून सार्वजनिक गणपत्युत्सव नको असे म्हणणे म्हणजे माणसे ईश्वराने उत्पन्न केली नाहीत असे म्हणण्यासारखे आहे. वेदात चार वर्ण आहेत. ब्राह्मण मुखाचे ठिकाणी क्षत्रिय बाहूचे ठिकाणी वैश्य उरूचे ठिकाणी व शूद्र चरणाचे ठिकाणी आहेत असे सांगितले आहे. मग डोक्याला काय पायाचा विटाळ होतो ? की बाहूला पायाचा विटाळ होतो ? असे धरल्यास आधी डोके तोडून निराळे ठेवावे लागेल ! सर्व धर्मात हिंदुधर्माइतका सहिष्णुधर्म सापडणार नाही. महारमांगापासून ब्रह्मवाद्यापर्यंत सारे हिंदु या सदरात येतात. म्हणून हिंदु हा शब्द उच्चारल्याबरोबर आपल्यात एकप्रकारची ईर्ष्या आवेश उत्पन्न झाला पाहिजे. सरकार परधर्मी व समाजात फूट पाडीत आहे हे लक्षात घेऊन आपण एकी ठेवली पाहिजे."

वेदोक्ताच्या भांडणात खरे भांडण वेदाधिकाराचे नव्हते तर वेदाधिकाराचे निमित्त करून कित्येक संस्थानिक जी उच्छृंखल वृत्ति दाखवून अन्याय करीत

होते आणि जी न्याय्य हक्काची पायमल्ली करीत होते त्यासंबंधाचे होते. मुंबईचे सीताराम केशव बोले यानी आपल्या आठवणीत असे लिहिले आहे की " मी वेदोक्ताच्या बाबतीत स्वतः टिळकांकडे जाऊन चर्चा केली. तेव्हा ते म्हणाले की ' जर्मनीत छापलेले वेद जर आम्ही वाचतो तर ब्राह्मणेतरास ते वाचण्याचा व त्याप्रमाणे कर्मे करण्याचा अधिकार नाही या म्हणण्यात काही अर्थ नाही.' या उद्गारावरून सामाजिक बाबतीत टिळक उदारमतवादी नाहीत या म्हणण्यात काही अर्थ नाही. परंतु राजकीय बाबतीत लोकजागृति करण्याचा जो मार्ग आपण पत्करला आहे त्याला अडथळा येऊ नये या विचाराने कदाचित् त्यानी सामाजिक सुधारणेच्या बाबतीत आपल्या मताची विशेष परिस्फुटता केली नसावी. "

**धर्माचरण**–सन १९००च्या सप्टेंबर महिन्यात टिळकानी पुण्यातील गणपति उत्सवात रे मार्केटातील गणपतीपुढे भिंगारकरबुवा यांच्या अध्यक्षतेखाली ' हिंदुधर्माचे लक्षण ' या विषयावर व्याख्यान दिले. हे व्याख्यान दीड तास चालले होते. त्यातील विषय महत्त्वाचा आणि प्रतिपादनहि अतिशय विद्वत्तापूर्ण असे झाले यामुळे सभा चित्रासारखी तटस्थ होती. या व्याख्यानाचा सारांश १८ सप्टेंबर १९०० च्या केसरीत दिला आहे तो स्वतः टिळकानी मागाहून मुद्दाम लिहून काढला. या व्याख्यानात त्यांनी हिंदुधर्मलक्षणाचे वर्णन ज्या एका लहानशा श्लोकात केले तो श्लोक आता प्रसिद्ध असून त्यातील लक्षण प्रायः सर्वसंमत झाले आहे. तो श्लोक असाः—

" प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता
उपास्यानामनियमश्चैतद्धर्मस्य लक्षणम् ॥ "

यावरून टिळकांची हिंदुधर्माची कल्पना किती समर्पक होती हे दिसून येईल. टिळक हे नुसते तात्त्विक दृष्ट्या आस्तिक नव्हते तर ईश्वरावर त्यांची निष्ठा असे. पण ईश्वर हा पुराणांतरी वर्णिलेला तसा ते मानीत नसत. तर तर्क व निष्ठा यांच्या मिश्रणाने त्यांची ईश्वराची कल्पना बनलेली होती. ही कल्पना उदात्त होती. तथापि धर्म हा राजकारण व अर्थशास्त्र यांच्याप्रमाणे राष्ट्रीय स्वरूपाचा असा व्यवहारात मानला पाहिजे असे ते समजत. हिंदु–धार्मिक आचार म्हणून जे गणले जातात त्यातील फारच थोडे टिळक स्वतः करीत. या दृष्टीने त्यांची दिनचर्या पाहिली तर ती कर्मठ माणसाची मुळीच नव्हती. स्नानाच्या आधी खाण्यापिण्याला प्रसंगविशेषी त्यांची हरकत नसे. स्नान करिताना त्यानी आंग स्वच्छ करण्याची जितकी काळजी घेतली तितकी स्नान करिताना तीर्थे व नद्या यांची आठवण करण्याविषयी कधी घेतली नाही. स्नान करिताना त्यांच्या तोंडून ' गंगा गंगेति यो ब्रूयात् ' हे वचन किंवा ' गंगास्तोत्रा'चे कडवे कधी आलेले कोणी ऐकले नाही. स्नानानंतर त्यानी प्रौढीने आचमने कधी टाकली नाहीत, किंवा गीतेचे पाठ कर्मठ पद्धतीने वाचले नाहीत, किंवा देवापुढे बसून एखादे फूल कधी वाहिले नाही, किंवा खरोखर ध्यानस्थ बसून एखादा गायत्री

मंत्र कधी जपला नाही. धर्मग्रंथाचे वाचन त्यांचे हातून होई. पण ते देवघरात आसनावर बसून कधी झाले नाही, तर ते इझी चेअरवर बसून सुपारी खात खात किंवा चार लोकाशी लौकिक गोष्टी बोलत बोलत. गावात तुळशीबागेत किंवा बेलबागेत किंवा पर्वतीला देवदर्शनाकरिता म्हणून ते कधी गेले नाहीत. आणि रस्त्यातून जाता येता एखाद्या देवाच्या अंगावरून ते गेले तरी ते हटकून थांबून पायातील जोडे काढून ठेऊन हात जोडून वंदन करतील अशीहि कोणी अपेक्षा केली नाही. अण्णासाहेब पटवर्धनाप्रमाणे त्यानी देवाला किंवा पिंपळाला प्रदक्षणा घातल्या नाहीत. प्रार्थना समाजिस्ट माधवरावजी रानडे यांच्याप्रमाणे त्यानी पहाटे उठून चिपळ्या घेऊन तुकारामाचे अभंग कधी गाईले नाहीत. एखाद्या व्यासपीठावर बसून धार्मिक पुराण प्रवचन कधी केले नाही. ईश्वरभक्तिविषयी कधी उपदेश केला नाही व स्वतः मुक्तकंठ प्रार्थना म्हटली नाही.

पण टिळकानी काय गोष्टी केल्या नाहीत हे जसे सांगितले तसेच काय काय गोष्टी केल्या हेहि निश्चयात्मक सांगता येते. आणि त्या अशा की त्यानी हिंदुधर्माचे संस्कार पाळण्याची व्यक्तिनिष्ठ किंवा कौटुंबिक धर्मकृत्ये सर्व केली. घरात बायकोच्या समाधानाकरिता पाचवी पुजण्यासारखी धर्मकृत्ये त्यानी करू दिली आणि केव्हा केव्हा षष्ठीपूजन स्वतः केले. मौंजीबंधन लग्नविधी हे मंगल संस्कार जसे ते यथाविधि करीत तसेच श्राद्धपक्ष किंवा और्ध्वदेहिक असली धर्मकृत्ये ते करीत. आईबापांच्या और्ध्वदेहिकाचे वेळी त्यानी सक्षौर विधि केले. आणि ग्रामण्य झाले तेव्हा प्रायःश्चित्त घेतले. मुलानी कोणत्या वयापर्यंत काय धर्म-कृत्ये करावी याविषयी टिळकांची कल्पना काय होती हे त्यांचे जावई केतकर यानी एका आठवणीत सांगितले आहे. ते म्हणतात " वाड्यात आम्ही मंडळी भोजनास बसलो असता शेजारी बसलेल्या तरुण मंडळीस उद्देशून टिळक म्हणाले, अरे आज संध्या कोणी कोणी केली आहे ? संध्येला प्रत्येकाने टाळा दिला असल्याकारणाने जो तो दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहू लागला. हे पाहून लोकमान्य म्हणाले मी स्वतः रोज संध्या करीत नसलो तरी तुम्हाला ती इतक्यातच सोडण्याचे कारण नाही ! " या सर्व गोष्टी एकत्र विचारात घेतल्या असता सर्वसाधारणतः असा सिद्धान्त बांधिता येईल की, काही एका वयोमर्यादेपर्यंत प्रत्येक हिंदुमात्राच्या मनावर धर्माचा म्हणून काही बोज असावा याकरिता काही संस्कार व विधी त्यांच्या हातून होणे इष्ट आहे असे टिळकांचे मत असे. तसेच काही काही गोष्टी जन्मभर करण्याच्याच आहेत, तथापि मनुष्य कितपत कर्मठ असेल किंवा नसेल हे त्याच्या स्वभावावर व भावनेवर अवलंबून राहील आणि या बाबतीत व्यक्तिमात्राला काही एका मर्यादेपलीकडे स्वातंत्र्य असावे असेहि त्यांचे मत असे.

लहानपणी वाणीवर संस्कार व्हावा म्हणून चार वेदाक्षरे प्रत्येक मुलाने म्हणावी किंवा रूपावळी समासचक्रासारखे मूलभूत संस्कृत ग्रंथ प्रत्येक हिंदुमात्राने शिकावे

हे धर्म व संस्कृति यांच्या दृष्टीने इष्ट. तरी प्रौढपणी मनुष्याने किती कर्मठ असावे किंवा नसावे ही त्याच्या आवडीची गोष्ट होय. टिळक स्वतः जरी कर्मठ नसले तरी कर्मठपणाने वागणाऱ्या हिंदुबद्दल त्यांच्या मनात आदरबुद्धि असे. आणि कोणत्याहि कर्मठ मनुष्याची त्यानी कधींहि थट्टा केली नाही. पण लौकिक कर्मावर त्यांचा विशेष कटाक्ष असल्यामुळे प्रवृत्तीपर कर्मे संभाळून त्यांतल्यात्यांत जो धार्मिक कर्मठपणाहि संभाळील त्याच्याचविषयी त्यांना खरा आदर असे. उलट जे धर्म भावनेच्या भरात वहावले, लौकिक प्रवृत्तीपर कर्मे ज्यानी टाकून दिली आणि धार्मिक कर्मकांडातच जे गुरफटले गेले, त्यांच्याबद्दल मात्र टिळकाना आदर वाटत नसे. धार्मिक कर्मापासून प्रत्यक्ष मुक्ति मिळते ही गोष्ट त्याना मान्य नव्हती. धार्मिक कर्मे ही एक प्रकारची वरिष्ठ नैतिक भूमिकेला पोचण्याची पूर्वतयारी आहे असे ते म्हणत. पण त्याबरोबर असेहि म्हणत की अशा तयारीशिवाय कोणी त्या पदवीला पोचणारच नाही असे मात्र नाही. तात्पर्य त्यांची व्यावहारिक धर्मबुद्धि लोकसंग्रहाच्या दृष्टीने बनलेली होती. म्हणून ज्या धार्मिक आचाराने हिंदु म्हणविणारे अधिकात अधिक लोक एकत्र जमतील व अभिमानाने एकमेकाना हिंदु म्हणून ओळखतील तो धार्मिक कर्ममार्ग श्रेयस्कर असे त्याना वाटे.

वैयक्तिकापेक्षा सामुदायिक धर्माचरणाची त्याना अधिक काळजी असे. कारण अशा सामुदायिक धर्माचरणानेच समाज निगडित होऊन रहातो. कर्मकांडाबद्दल मनातून खरा उद्वेग नाही, पण कोणत्याहि लौकिक कृत्याला आड न येण्यापुरता तो असावा इतकेच त्यांचे म्हणणे होते. धर्माचरणासंबंधाने मनाची ही अनुकूल भूमिका असल्यामुळे, टिळकानी किंचित् पुढे जाऊन यमनियमांचे बंधन याहून थोडे अधिक लावून घेतले असते तर त्यांची राजकारणी पुढाऱ्याप्रमाणे धार्मिक पुढाऱ्यातहि गणना झाली असती. ते सामुदायिक हिंदु धर्माला फार जपत आणि त्याचे कसून समर्थन करीत. यामुळे त्याना धर्माभिमानी ही पदवी मिळाली होतीहि. पण कर्मठ मनुष्ये त्यांच्या आचारासंबंधाने खाजगी रीतीने बोलताना सहजच नाके मुरडीत व त्याना प्रच्छन्न सुधारक असेहि म्हणत. ही निंदा थोडेसे ढोंग करून त्याना सहज टाळता आली असती. त्यानी इतर कार्याची बंधने आपल्या मागे काही थोडथोडकी लावून घेतली नव्हती. आणि त्यातच याहि काही थोड्या बंधनांची भर टाकली असती तर हवीच होती. उदाहरणार्थ स्नानानंतर ते नियमाने संध्या करिते, किंवा गंधाला भस्माची बैठक घालते, किंवा गळ्यात रुद्राक्षाची किंवा पोवळ्याची माळ धारण करिते, किंवा स्नानानंतर ते काही वेळ ध्यानस्थ बसून कोणाची भेट न घेते, तर लोकानी त्यांची धर्मबुद्धि आणखी चौपट वाखाणली असती. आणि सुधारकांकडून मिथ्या पुराणमतवादी अशी टीका करून घेत असता सच्चे धर्माचरणी असे निदान पुराणमतवाद्यांकडून म्हणवून घेण्याचे श्रेय त्याना सहजासहजी लाभले असते ! पण ते मिळविण्याला लागणारी यमनियमांची झीज त्यानी सोसली नाही आणि अशा रीतीने दोन्ही बाजूकडून तोटे मात्र पदरी घेतले ! पण याचे कारण हेच

की काही एका मर्यादेपलीकडे ठराविक धर्माचरण करण्याचा त्यांना स्वभाव नव्हता. मग त्याचा फायदा किती व तोटा किती हा हिशेब त्यानी आकडे मांडून कधी केला नाही.

स्नानसंध्यादि कर्मे देवदेवतार्चन उपासना या गोष्टी चित्तशुद्धीला उपयोगी पडणाऱ्या आहेत हे त्याना माहित असल्यामुळे यथोचित स्नानसंध्या करणाराची त्यानी केव्हा थट्टा किंवा निंदा केली नाही, पण चित्तशुद्धीचा तो एकच मार्ग आहे ही गोष्ट त्याना कबूल नव्हती. आणि चित्तशुद्धीचे आपले मार्ग आपल्या पसंतीने स्वीकारण्याचा हक्क प्रत्येकाला आहे व असावा असे त्यांचे मत होते. "प्रत्युपकाराची इच्छा न ठेवता परोपकार करण्याच्या सवईने फार लवकर चित्तशुद्धि होते व मला हा मार्ग पसंत असल्यामुळे मी त्या मार्गाने जात आहे." असे ते म्हणत. या मार्ग-संशोधनात इतरांचा हक्क जसा ते मानीत तसा त्यांचा हक्कहि मान्य करणे इतराना प्राप्तच आहे. आता आपल्याकडे कमीपणा घ्यावा याकरिता ते म्हणत की 'मी अनुसरितो तो मार्ग अधिक सोपा म्हणून मी पसंत केला आहे.' पण दोहोत अधिक सोपा मार्ग कोणता हे जगात अनुभवसिद्ध असल्यामुळे त्याविषयी आम्ही काही लिहीत नाही! पण स्वतः स्वीकारलेला मार्ग कोणताहि असला तरी लोकांच्या दृष्टीने कर्मठपणालाच अधिक किंमत आहे ही गोष्ट लक्षात घेऊन तसा प्रसंग आल्यास टिळक धार्मिक समारंभात कर्मठ लोकानाच अग्रमान देत व देववीत. एकदा कोठे मूर्तीची स्थापना करण्याचा प्रसंग आला तेव्हा त्याना कोणी विनंति केली की "हा समारंभ तुमच्या हस्ते व्हावा अशी इच्छा आहे." तेव्हा टिळकानी सांगितले की "समारंभ लौकिक स्वरूपाचा असता तर मी नाही म्हटले नसते. पण या समारंभाला जुन्या पद्धतीचे धार्मिक स्वरूप आहे म्हणून तो करण्याला मी योग्य नाही. प्रत्येक कामाला योग्यता वेगवेगळ्या प्रकारची लागत असते."

त्यांच्याकडे कोणीहि साधूसंत बैरागी यति ब्रह्मचारी किंवा यात्रेकरू आला तरी जुन्या धर्मपद्धतीचा व धर्म भावनेचा तो एक प्रतिनिधि या नात्याने टिळक त्याला योग्य तो मान देत. कित्येक बुवाजी खुशाल त्यांचे घरी येऊन पाहुणे म्हणून राहात आणि कित्येकांचा उपद्रव दुःसहहि होई. पण त्यांचाहि अपमान त्यानी केला नाही किंवा त्याला आठमुठेपणाने घालवून दिले नाही. कित्येक उपद्रवी असत ही गोष्ट मुळीच खोटी नाही. एक साधुबुवा येऊन राहिला त्याचा नियम असा होता की आपल्या हाताने जेवावयाचे नाही. त्याला अविवाहित मुलीनेच भरविले पाहिजे! टिळकांच्या घरची अविवाहित मुलगी नव्हती. असती तर तीहि बिचारी कंटाळती. व बाहेरून रोज नवी कुमारिका साधुबुवाला भरविण्याकरिता कोठून पैदा करावयाची? दुसरे कित्येक असे असत की घरात आपल्या आधी कोणी जेवलेले त्याना खपत नसे आणि त्यांची लहर लागेल त्या-प्रमाणे आन्हिक आटोपून मग ते जेवावयाला यावयाचे. पण शाळेत जाणारी मुले असणाऱ्या घरी हे कसे निभणार? गांजा ओढणाऱ्या एका साधूचा मुक्काम

टिळकांच्या घरी पडलेला पुष्कळाना माहित आहे. व एका साधूच्या सामानात तर मदिरेची एक बाटली होती किंवा कदाचित् त्याची तलफ एरवी भागत नाही म्हणून तो आल्यावर बाहेरून त्याला कोणी पुरविली होती. कसेंहि असले तरी आपल्या सुधारक स्नेह्यांच्या ज्या गोष्टी टिळकानी घरी चालू दिल्या नाहीत तसल्या गोष्टी त्यानी अशा या लोकांच्या चालू दिल्या.

पण खरे व मोठ्या योग्यतेचे असे महंत साधुसंत किंवा यति ब्रह्मचारी टिळकांच्या घरी येऊन कधीच उतरत नसत. त्यांची यांची भेट स्वतः त्यांच्या निवासस्थानी किंवा इतर कोठे प्रसंगोपात्त पडे. घरी येत किंवा उतरत अशापैकी काही, इतर चार लोकांच्या कौतुकाप्रमाणे, टिळकानाहि आपल्या भेटण्याबोलण्याचे कौतुक पुरवण्याकरिता येत, तर काही टिळकांच्या पुढे साधुपणा मिरविण्यास येत. पण त्यानी यांचे वैभव पाहिले यानी त्यांचे वैभव पाहिले याखेरीज या भेटीतून काही अधिक निष्पन्न झाले असेल असे वाटत नाही. कारण खुणेच्या अशा गोष्टी परस्परांच्या वेगळ्याच होत्या. एखादा भोळा मनुष्य त्याना धर्माचरणाचा उपदेश करी. कोणी अनुष्ठानाचे महत्त्व गाई. कोणी खऱ्या मनाने काही जडीबुट्टी किंवा प्रसाद देई. त्या सर्वांचा स्वीकार ते त्यांच्या समाधानाकरिता करीत. उलट चालू युगातील मनुष्याचे खरे कर्तव्य काय लोकसंग्रह कसा करावा या गोष्टीहि अशा-पैकी कोणी समंजस दिसला तर टिळक त्याला सांगत. एकादा भाविक मनुष्य येऊन सांगे की तुमच्याकरिता मी अमुक उपासना केली अमुक अनुष्ठान केले तर त्याविषयी ते कृतज्ञता दाखवीत. पण एकादा अहंमन्य असाहि भेटे व त्याना सांगे की तुम्ही तुरुंगात असता निराश व उदास झाला तेव्हा आपल्या योगबलाचे सामर्थ्य मी तुमच्याकडे मानसिक व आध्यात्मिक विद्युत्शक्तीने पाठवीत होतो ! पण त्याचाहि त्यानी कधी उघड अपमान केला नाही. फार तर हासून तुच्छता दाखवीत. अशा कामी टिळ-कांच्या अंगी इतका भिडस्तपणा होता की त्यांचा नेहमीचा तापट स्वभाव माहित असणाराला त्याचे आश्चर्यच वाटेल. दुसरा एक प्रसंग विशेष सांगण्यासारखा घडला. तो असा. १९१७ साली नाशिक येथील परिषदेनंतर टिळक मोटारीतून संगमनेरकडे येण्याला निघाले. वाटेत काही अंतरावर शेरडी हा गाव लागतो व दादासाहेब खापर्डे हरी सिताराम दिक्षित वगैरे मंडळी साई महाराजांच्या सन्निध येऊन राहिली होती. खापर्डे यांच्या भेटीकरिता म्हणून टिळक वाकडी वाट करून शेरडीला गेले. साईमहारा-जाकरिता म्हणून ते गेले नसते हे निश्चित आहे. तेथे गेल्यावर साईमहाराजानी नित्यक्रमाप्रमाणे टिळकांच्या जवळ दाक्षिणा मागितली व दिली ती थोडी म्हणून आणखी मागितली. तीहि टिळकांनी उसनी घेतली पण दिली. साईबाबांचा अंगारा त्याना कोणी लावला व प्रसाद म्हणून फुलांची माळ व नारळ दिला तेहि त्यानी घेतला. पण याहून कठिण असा एक प्रसंग तेथे टिळकावर आला व त्यात त्यांच्या भिडस्त स्वभावाची परीक्षा झाली. टिळक साईमहाराजांचा निरोप घेण्यास गेले असता साईबाबानी तहान लागली म्हणून पाणी मागितले. तेव्हा तोटी असलेला

कधी मुसलमानी थाटाचा लोटा एकाने पुढे केला तो घेऊन ते पाणी प्याले. इतक्यात एका भाविक शिष्याला अशी इच्छा उत्पन्न झाली की साईबाबांचे उच्छिष्ट तीर्थ मंडळीना द्यावे. झाले! तोच लोटा घेऊन उष्टावलेल्या तोटीतून प्रत्येकाच्या हातावर आचमन घालण्याला सुरवात झाली. हे पाहताच टिळकांच्या डोळ्यात संकट उभे राहिलेले दिसले. पण त्यांच्याने तीर्थ नाही म्हणवेना व त्यानी तोंड वाईट केलेले दिसू न देता आचमन प्राशन केले. वास्तविक टिळकाना हे टाळता आले असते इतके प्रसंगावधान त्यांच्या अंगी खचित होते. पण या ठिकाणी युक्ति सुचूनहि ती अमलात न आणणे याचे कारण एक तर मित्राचे सान्निध्य. त्याची भावना कशी दुखवावी? व दुसरे असे की सत्पुरुष म्हणून मानलेल्या एका व्यक्तीच्या घरी आपण उठून गेलो तेव्हा तेथे त्याचा अपमान होईल किंवा इतरांची भावना दुखविली जाईल असे आचरण आपण करू नये असा मनाचा कल. वास्तविक कोणाला तोडून बोलावयाचे तर टिळकांच्या तोंडात व हातात कात्री नेहमी सज्ज व पाजळलेली असे. पण "घनगर्जिताप्रमाणे डुरकणारा सिंह देखील भावनेने किंवा भिडेने कबूतराप्रमाणे स्निग्ध आवाज काढतो आणि त्याचा स्पष्ट शब्दहि बाहेर कोणाला कळत नाही इतका तो खोल घुमतो" अशा अर्थाची इंग्रजीत एक म्हण आहे तिची प्रतीती जुन्या संस्कृतीशीच काय पण जुन्या संस्कृतीच्या विकृतीशीहि वागताना टिळकांची आढळून येत असे. तात्पर्य, धार्मिक म्हणून समजल्या जाणाऱ्या आचरणाच्या बाबतीत त्यानी नित्यक्रमाविषयी स्वतःला व्यक्तिस्वातंत्र्य हक्काने ठेवून घेतले होते, तथापि दुसऱ्याचा हक्कहि ते तितक्याच प्रांजलपणाने मानीत. एवढेच नव्हे तर या दोन हक्कांच्या सरहद्दी एकमेकात घुसत असत तेथे अंगुळभर जागा दुसऱ्याला झुकती देऊन ते सरहद्दीचा तंटा मिटवून घेत व क्वचित प्रसंगी स्वतःच्या हक्कापेक्षा सात्त्विक शेजारधर्माला अधिक महत्त्व देत. बाबा पटवर्धन लिहितात की "माझ्या वडिलांच्या स्नानसंध्येसंबंधाने गोष्टी सहज निघाल्या म्हणजे टिळक थट्टेने म्हणत की या बाबतीत आमच्या वाटण्या झाल्या आहेत. त्यानी स्नानसंध्या करून राजकारण करावे व मी लोकजागृति करून राजकारण साधावे." आणि ही वाटणी खरीच होती. गणपती उत्सवाला राष्ट्रीय हे सर्वसाधारण नाव आहे. पण अण्णासाहेब पटवर्धन या उत्सवाकडे त्यातल्या त्यात धार्मिक दृष्टीने पाहात व टिळक त्याच उत्सवाकडे लोकजागृतीच्या दृष्टीने पाहात.

टिळक व धर्मगुरूंची पीठे यांचा संबंध एकंदरीने पाहता मोठ्या गुंतागुंतीचा होता. एका बाजूने या पीठाना ही गोष्ट स्पष्ट दिसून येत होती की सनातन धर्माचा अभिमान धरून त्याचा पुरस्कार करणे या बाबतीत टिळक व केसरी यांची मदत सर्वश्रेष्ठ आहे. इतर धर्मांचे हल्ले परतविणे व हिंदुधर्माचे वैभव इतरांपुढे प्रगट करणे ही गोष्ट टिळक जितक्या विद्वत्तेने व तीव्रतेने करितात तितके इतर कोणीहि करीत नाही. सुशिक्षितांच्या नवीन पिढीत विद्वत्ता विचार विवेक असला तरी हिंदुत्वाचा असा अभिमान थोडा. कोणी विश्वबंधुत्वाचा

उपदेश करील, कोणी सामाजिक सुधारणेविषयी कळकळ दाखवील, कोणी प्रार्थनासमाज व ब्रह्मोसमाज काढून निर्लेप ईश्वरपूजा व इश्वरभक्ति यांचे सप्रमाण समर्थन करील. तथापि हिंदुत्वाचा अभिमान धरून हिंदुधर्माच्या भूमिकेवर या नवीन विचारांची कलमे करून उदार व उदात्त विचार तर घ्यावयाचे पण हिंदुधर्माची ओळख स्वतःच्या व जगाच्या दृष्टीने घालवू द्यावयाची नाही ही गोष्ट आचार्यपीठांना कळून चुकली होती. तथापि दुसऱ्या बाजूला प्रत्यक्ष आचाराचा संबंध आला म्हणजे टिळकावरहि फिर्यादी व ग्रामण्ये होत आणि यांचा निकाल लावण्याची वेळ आली म्हणजे आचार्यपीठांना ते एक मोठे संकट वाटे. फिर्याद आली की तिची चौकशी केलीच पाहिजे व टिळकाविरुद्धहि निकाल दिला पाहिजे. पण टिळकाना आपले म्हणणे खरे वाटले तर ते त्याकरिता जसे सरकाराशी तसे धर्मगुरूशीहि झगडण्यांत कमी करणारे नव्हते. एखाद्या राजाकडे त्याच्या आवडत्या सरदाराविरुद्ध फिर्याद जाऊन न्याय करण्याचा प्रसंग आला असता तो जसा घोटाळ्यात पडेल तशाच घोटाळ्यात आचार्यपीठेहि टिळकांच्या बाबतीत पडत. लोकावरील आपले वर्चस्व जात चालले आहे हे धर्मगुरूना उघड दिसत होते. तथापि काही जुने राखावे काही नवे करावे असे दुहेरी धोरण कोणाला स्वीकारावयाचे झाल्यास ते टिळकांच्या मदतीशिवाय पार पडणार नाही व ते पार पडूनहि आपले वर्चस्व राहावयाचे ते टिळकांच्या चतुर सल्लामसलतीशिवाय होणार नाही असे त्यांना वाटू लागले होते. पुढे काही काही धर्मनिर्णयाच्या कामी आचार्यांनी मंडळे नेमली त्यांत टिळकाना नेमले होते. परंतु प्रथम प्रथम टिळकाना या आचार्यपीठापुढे प्रतिवादी किंवा आरोपी म्हणून जाण्याचे प्रसंग अधिक आले.

चहाप्रकरणातील ग्रामण्याची हकिकत या चरित्रग्रंथाच्या पहिल्या भागांत दिलीच आहे. परंतु त्या ग्रामण्याचे शेपूट अजून उरलेच होते. ते १९०४ व १९०६ साली लग्नमुंजीच्या अक्षतीच्या बाबतीत पुनः उमटले. पुण्यातील एक गृहस्थ विनायक नारायण जोशी यानी १९०४ साली अर्ज केला की टिळकावर पूर्वीचे ग्रामण्य शिल्लक असता त्यांच्या मुलाच्या मुंजीची अक्षत देवळात गेली यामुळे गावात घोटाळा जास्त झाला. तरी त्याची चौकशी होऊन बखेडा मोडून प्रकरणाचा निकाल लावावा. या अर्जावरून शंकराचार्यांनी टिळकाना जाब विचारला. त्यात त्यानी उत्तर दिले की मजवर निग्रह मुळीच शिल्लक नाही. अक्षतीमुळे गावात बखेडा झालेला नाही. आणि हल्लीचे वादी हे पूर्वीच्या ग्रामण्यात पक्षकार नसल्यामुळे जुन्या प्रकरणातील पक्षकार नातू व खाजगीवाले याना नोटीसा काढून विचारण्यात यावे. त्याप्रमाणे नोटिसा निघून तीन शास्त्र्यांचे एक न्यायमंडळ व त्यांच्या मदतीला खेडचे गोळे वकील अशा नेमणुका करण्यात आल्या. त्याजपुढे सुनावणी सुरू झाली तेव्हा जोशी यानी अर्ज केला की हे काम खुद्द श्रीपुढे चालावे, या मंडळापुढे चालू नये. त्यावरून एक दिवसाची मुदत दिली.

पण श्रीकडे अर्ज न गेल्यामुळे मंडळानेच पुढे काम चालविले. नातू व खाजगीवाले हजर झाले पण त्यानी पक्षकार होण्याचे नाकारले. तेव्हा अर्जदार जोशी यांचा पुरावा व म्हणणे ऐकून घेण्यात आले. शेवटी मंडळाने असा निकाल दिला की टिळकांच्या कैफियतीवरून व पूर्वीच्या ग्रामण्यातील कागदपत्रावरून असे दिसते की पूर्वी टिळक यानी पंचहौद मिशनमध्ये चहा घेतल्यामुळें श्रीक्षेत्र काशी येथे सर्व प्रायश्चित्त घेतले व पुण्यासहि दोन कृच्छ्रे प्रायश्चित्त केले. त्यावर पुनः नातू यानी तक्रार केली होती त्यावरून पुनः चौकशी होऊन असे ठरले की "नवीन प्रायश्चित्ताची प्राप्ति होत नाही. व तो निकाल अद्यापि कायम आहे. जोशी यांचे या अर्जातील आरोप चुकीचे आहेत व टिळक दोषमुक्त आहेत. आणि नवीन प्रायश्चित्त देण्याची त्याना कोणी तजवीज करील तर ते गैरशिस्त होईल." यानंतर टिळकांची आचार्यपीठात थोडी बढतीच झाली आणि आरोपीला स्वतः आचार्यांच्या गादीच्या तंट्यात न्यायाधीश किंवा मंत्री होण्याचा मान मिळाला. दरबारच्या कलहात राजनिष्ठ बंडखोरांचे साधून जावे ही रीतच आहे. स्वतः गुरुस्वामी व शिष्यस्वामी यांचे बनेनासे झाले तेव्हा नवीन शिष्य करण्याचे त्यानी ठरविले व इतर चार लोकाबरोबर टिळकाना पंच नेमून या प्रकरणी गुरुस्वामीना सल्ला देण्याची आज्ञा ता. १ ऑगस्ट १९०६ रोजी करण्यात आली. पळशेब्राह्मण प्रकरणात टिळकाना कमिटीचे चिटणीस नेमण्यात आले. पुढे गुरु व शिष्य दोघे पुण्यास आले असता संस्थानचे काम कसे चालावे या संबंधाने टिळकांच्याच सूचनेवरून अधिकारविभागणीची घटनाहि त्यानी सुचविली. ता. ५ सप्टेंबर १९०६ रोजी टिळकाना शिष्यस्वामी यांच्याकडून अशी आज्ञा झाली की "गुरुस्वामी यानी संस्थानचे धर्मसंबंधी अधिकार मिळकत व उत्पन्न आमचे ताब्यात दिले आहे. तरी तुमच्यासारख्या धर्माभिमानी ब्रह्मवृंदांचे पुढारी शिष्यवर्गाची अत्यंत अवश्यकता आहे. आणि संस्थानदेवतेचा मनोदय असा आहे की संस्थानच्या उत्पन्नाची योग्य व्यवस्था लावणे व ज्ञातीधर्मसंबंधी कामे चालविणे ते धर्मशास्त्रास व देशकालास अनुसरून करावे. या सर्व गोष्टी त्या त्या विषयातील विद्वान निस्पृह व कार्यदक्ष अधिकाऱ्याकडून कशा करवाव्या इत्यादि गोष्टींचा विचार करण्याकरिता तुम्ही व तुम्हास योग्य वाटतील ते इतर गृहस्थ घेऊन संकेश्वर मुक्कामी दर्शनास यावे." अशा रीतीने टिळकांची प्रतिष्ठा व मान्यता आचार्यपिठाचे ठिकाणी वाढली व ती त्यानंतर अजूनहि कायम आहे ही गोष्ट हल्लीचे शंकराचार्य डॉ. कूर्तकोटी हे टिळकाना सल्लागार मानतात इतकेच नव्हे तर त्यांचे राजकारण व त्यांचे गीताभाष्य यांचे बहुमानपूर्वक जाहीर समर्थन करतात यावरून दिसून येतच आहे.

धर्मगुरूना योग्य सल्लामसलतीची अपेक्षा असे तेव्हा ती टिळकाकडूनच मिळे. आणि ही सल्लामसलत कोणी धर्मगुरूच्या गादीवर बसल्यानंतर जशी मिळत होती तशी कित्येक व्यक्ती धर्मगुरू होण्याच्या आधी-

पासूनच ती त्याजकडून घेत असत. श्रीशंकराचार्य ( डॉ. कूर्तकोटी ) यानी आपल्या आठवणीत असे सांगितले आहे की, आश्रम घेण्यापूर्वी कोल्हापूरच्या स्वामींचे शिष्यत्व स्वीकारावे की नाही याविषयी मी टिळकांचा सल्ला घेतला. तेव्हा टिळक मला म्हणाले " कोणाचे ऐकू नका. सरळ उठा. आणि कोल्हापूरला जाऊन आश्रम घ्या. आता काळ वेळ जाणणाऱ्या धर्मगुरूचीच गरज आहे. मिशनऱ्याप्रमाणे हिंदुधर्मासाठी काम करणारांची जरूरी आहे. ह्याच्याचसाठी प्रोफेसर विजापूरकर आणि प्रोफेसर काशीनाथ बापूजी पाठक याना तुम्ही पीठावर बसा असे मी म्हणत होतो. पण तो योग जुळून आला नाही. "

आचार्यपीठाकडून टिळकाना जी मान्यता मिळाली होती ती फुकट घ्यावी असे त्यांच्या मनात नव्हते म्हणून त्याना नित्य अशी चिंता असे की, आचार्य मंडळीनी आपल्या संस्थेची व्यवस्था नीट लावावी, कर्ज फेडावे, पूजा द्रव्याचा हिशेब नीट ठेवावा, त्यांचा उपयोग केवळ अन्नसंतर्पणाकडे न करिता जुन्या विद्यावृद्धीकडे करावा, काही धर्मस्थापनेचे कार्य करावे, आणि त्याकरिता काही घटना करून, आपले अधिकार संभाळून पण त्यातल्यात्यात थोडेसे लोकमतहि पाहून म्हणजे प्रवृत्ति व निवृत्ति यांचा मेळ घालून निग्रह अनुग्रह व धर्मकार्य करावे. ते म्हणत "मठदेवता स्वयंसिद्ध आहे. स्वतः तिला पैशाची जरूरी नाही. पण मठाचा कारभार पैशावाचून चालत नाही. आचार्य पीठाविषयी लोकांचा आदर पूर्वीपेक्षा कमी झाला असला तरी अजून तो बराच शिल्लक आहे आणि लोकहि पूजाद्रव्य देऊन व इतर सत्कार करून संस्था चालवितात व बहुमान करतात. म्हणून हातचे गमावले असे धर्मगुरूनी समाजाविषयी मानू नये. पण दिवसेदिवस लोकमत प्रभावी होणार म्हणून संस्थानाचा कारभार निर्विवाद उपयुक्त व प्रगतिपर व्हावा हे श्रेयस्कर. आणि तसे न होईल तर आचार्यपीठे कालांतराने नष्ट होतील." पण त्यांच्या या चिंतेला खुद्द आचार्यपीठाकडून मिळावा तसा जबाब मिळत नव्हता. टिळकानी कोणतीहि योजना सुचविली तरी तोंडापुरती स्तुति करावी, त्याना मोठेपणा द्यावा, भलेपणा द्यावा पण शेवटी प्रत्यक्ष काही करू नये. इतर कोणाहि अंहकारयुक्त लौकिक मनुष्याप्रमाणे, त्यानी आपल्या हातचा अधिकार काडीइतकाहि गमाविण्याला तयार होऊ नये हा अनुभव टिळकाना अखेरपर्यंत आला व त्याचे त्याना वाईट वाटे.

धर्मगुरूंचा अधिकार टिळक मानीत. अधिकार मानणे ही नुसती पहिली खूण आहे आणि ती टिळकानी पटविली होती. कारण पूर्वीच्या ग्रामण्यात त्यानी प्रायश्चित्त घेतले होते. आणि विलायतेहून परत आल्यावर देखील त्यानी प्रायश्चित्त घेतले. या दुसऱ्या वेळी त्यांचा लौकीक इतका वाढला होता की ब्रह्मवृंदानी त्याना आपण होऊन माफी केली असती. तरीपण शास्त्र मर्यादा रक्षणासाठी आग्रह दाखववयाचा, मर्यादा वाढवून घ्यावयाच्या पण त्या असत तोपर्यंत पाळावयाच्या, हे राजकारणाप्रमाणे धर्मातहि टिळकांचे तत्त्व होते. मर्यादेचे उल्लंघन आपल्या हातून

होणार नाहीं अशी बढाई त्यानी कधीं मारली नाहीं. कारण "मनुष्य चुकीला पात्र आहे त्याप्रमाणे माझ्या हातून सरकारी कायद्याचे किंवा धर्माच्या कायद्याचे उल्लंघन चुकूनहि होणार नाही असे नाहीं. ईर्षेत तशी गोष्ट होऊनहि जाईल. तरीपण राजकारणात किंवा धर्मात मी अराजक नाही. काही व्यवस्था म्हणून हवी नियम म्हणून हवे व त्यांचे उल्लंघन झाले तर शिक्षा सोसण्याला मनुष्याने तयार असावे" असे टिळकांचे म्हणणे असे.

## ( ३ ) टिळकांचा सांप्रदाय

टिळकानी गो. कृ. गोखले यांच्याप्रमाणे एखादी सोसायटी काढली नाही असा आक्षेप काही लोकाकडून घेण्यात येतो. पण त्याचे उत्तर इतकेच की अशी संस्था स्थापण्याशिवायहि तिजपासून होणारे इष्ट कार्य पुढाऱ्याच्या पदरात पडणे शक्य आहे. आणि सूक्ष्मपणे पाहणाराला हे फळ टिळकांच्या पदरात पडत असे असेच दिसून येईल. एखाद्या नियमावलीवर प्रतिज्ञेदाखल सही करून एखाद्या संस्थेचा कोणी सभासद झाला तरी त्याच्या हातून संस्थेचे कार्य पार पडणे किंवा न पडणे ही गोष्ट त्याच्या कर्तेपणावर व उत्साहावरच अवलंबून राहते. प्रतिज्ञालेख व नियम यानी एक प्रकारचे बंधन उत्पन्न होऊ शकते हे खरे. पण हे बंधन दिसण्यापुरतेच असते. सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटीचा उद्दिष्ट हेतू किती साधला किंवा तडीस गेला याविषयी आम्ही काही म्हणू इच्छित नाही. तथापि इतके मात्र म्हणू शकतो की अशी एखादी संस्था न काढताहि टिळकाना मनुष्यबल कधीहि कमी पडले नाही. त्यांची वर्तमानपत्रे चालविण्याला माणसे मिळाली यात काही विशेष नाही. पण त्यांच्या आयुष्यात वेळोवेळी जेव्हा त्याना कोणचेहि इतर काम पडले त्यावेळी प्रतिज्ञालेख किंवा नियमाचे बंधन नसताहि केवळ हौसेने व अभिमानाने त्यांचे काम तडीला नेण्याला माणूस वाटेल तेथे व वाटेल तितके उभे राही. सद्दीच्या दिवसात एखाद्या संस्थेकरिता त्याना भरपूर माणसे व पैसाहि मिळाला असता. तथापि सहकारिता ही सहानुभूतीने व खऱ्या मनाने करण्याची गोष्ट आहे. ती केवळ नियमानी सिद्ध होत नाही असे टिळकाना पूर्वी डेक्कन एजुकेशन सोसायटीत व बाहेरहि आढळून आल्यामुळे त्यानी अशी संस्था स्थापली नाही. वेळेला निघेल ते काम व हाताशी मिळेल तो मनुष्य अशीच त्यांची पद्धति असे. पण या दोहोंचीहि त्याना वाण पडली नाही. लोकसंग्रह करणारा कोणी असला तर त्याला नियमांचा पाश टाकल्याशिवाय मनुष्यबल आपणाकडे ओढता येते. व नियमबद्ध संस्था तयार असली तरी तिला लोकानी येऊन मिळावे अशी स्फूर्ति संस्थेच्या चालकांमध्ये असेलच असे नाही. टिळकांचे सहकारी सैन्य हे खड्या फौजेसारखे नव्हते. तर त्याला नॅशनल मिलिशिया सारखे स्वरूप होते. टिळकांची वर्तमानपत्रे म्हणजे केसरी मराठा हेच

त्यांच्या सांप्रदायाचें मुख्य घटनासाधन. यांची स्थिति व प्रगति ही लोकांना विदितच आहेत म्हणून त्याविषयी विशेष लिहिण्याचे कारण नाही. तथापि नमूद करण्यासारख्या काही थोडया गोष्टी खाली दिल्या आहेत.

१८९८ साली तुरुंगातून सुटून आल्यावर थोडी विश्रांति घेऊन ता. ३ जुलै १८९९ रोजी टिळकानी केसरी आपल्या नावाने हाती घेतला तो १९०८ साली त्याना शिक्षा होईपर्यंत म्हणजे ता. २२ जुलै १९०८ पर्यंत त्यांचेच नावावर सतत होता. ता० २८ जुलै १९०८ पासून केसरीवर कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचे नाव दाखल झाले ते ता० ४ जानेवारी १९१० पर्यंत होते. पुढील अंकापासून केळकर हे केसरीचे संपादक झाले. ते ता० १२ मार्च १९१८ पर्यंत संपादक होते. या सुमारास स्वराज्य संघातर्फे शिष्टमंडळ विलायतेस जाण्याकरता कोलंबोस निघाले तेव्हा ता० १९ मार्च १९१८ रोजी फिरून केसरीचे संपादक म्हणून खाडिलकर यांचे नाव दाखल झाले. विलायतची ही सफर पासपोर्ट न मिळाल्यामुळे कोलंबोहून परत फिरली व त्यानंतर केळकर १९१९ च्या एप्रिल अखेर विलायतेस जाईपर्यंत पुण्यासच होते. तथापि ते पुन्हा विलायतेस जाण्याकरता निघण्याचा संभव होता यामुळे खाडिलकर यांचेच हाती केसरीचे संपादकत्व ठेवण्यात आले होते. पण टिळक व केळकर हे विलायतेहून परत आल्यावर फिरून पूर्वीप्रमाणे तारीख २२ जून १९२० पासून केसरीचे संपादकत्व केळकरांकडे देण्यात आले. तात्पर्य १९०८ साली टिळकांचे नाव केसरीवरून संपादक या नात्याने निघाले ते कायमचेच निघाले. तथापि पुढे अखेरपर्यंत टिळक केसरीवर देखरेख ठेवीत इतकेच नव्हे तर एकादे वेळी केसरीकरिता लिहिलेले लेख तपासून देत, व त्यानी स्वतःहि वेळोवेळी अनेक लेख केसरीत लिहिले आहेत.

१८९१ च्या पूर्वी काही वर्षे केसरीवर टिळकांचे नाव असले तरी प्रत्यक्ष त्या पत्राची मालकी किंवा देखरेखहि त्यांच्याकडे नसे. पण १८९१ पासून १९२० पर्यंत म्हणजे सुमार २९ वर्षे टिळकांचा केसरीशी प्रत्यक्ष किंवा जिव्हाळ्याचा किंवा निकट संबंध होता. या मुदतीत केसरीच्या स्वरूपात अनेक स्थित्यंतरे झाली. तशीच वर्गणी वगैरे इतर बाबतीतहि झाली. १९०२ सालापासून टिळकानी केसरीचा आकार तोच ठेऊन पाने दुप्पट केली. ही क्रांति पूर्वीच्या क्रांतिनंतर ११ वर्षांनी घडून आली. १८९१ साली क्रांति झाली होती ती इतकीच की (वर्गणी तीच म्हणजे १ रु. १३ आ. ठेऊन व पृष्ठसंख्या तीच म्हणजे बाहेरील दोन व आतील दोन मिळून चार पाने इतकीच ठेऊन) मोठ्या ऐवजी लहान टाइप घातला, म्हणजे मजकूर वाढविला. पण १९०२ साली ही सुधारणाहि अपुरी ठरल्याने आकार व टाईप तोच ठेऊन पाने दुप्पट वाढविली त्यामुळे संपादकीय लेखाप्रमाणेच लिहून आलेले लेख पत्रव्यवहार बातम्या बिनसंपादकीय लेख जाहीराती वगैरेची पुष्कळच अधिक सोय झाली. पण इतका मजकूर वाढविल्यावर छपाईच्या व इतर खर्चाच्या दृष्टीने वर्गणी वाढविणेहि

अवश्य होते म्हणून पूर्वीची वर्गणी १ रु. १३ आणे होती ती २ रु. ५ आ. करण्यात आली. १९०२ साली जो आकार व मजकुराची जी बांधणी टिळकानी निश्चित केली ती १९१२ पर्यंत तशीच चालू होती. या सुमारास केळकर यानी केसरीत वाढत्या मजकुराच्या सोयीकरता पुरवणी घालण्याला सुरवात केली, व कर्मधर्मसंयोगाने ज्या वर्षी प्रेस ॲक्ट अमलात आला त्याच वर्षी या पुरवणीलाहि सुरुवात झाली. मात्र ही पुरवणी कायमची किंवा वर्गणीदारांच्या हक्काची अशी समजली जात नसे. संपादकाच्या इच्छेप्रमाणे, म्हणजे मजकूर अधिक असेल किंवा नसेल त्याप्रमाणे, पुरवणी घालावी किंवा न घालावी असा क्रम सुरू होता. पण त्यातल्या त्यात पुरवणी घालणे हा नियम व न घालणे हा अपवाद होऊन बसला. महायुद्ध सुरू झाल्यानंतर बाजार किंमती सर्वच बेसुमार वाढल्या त्यात कागदाची किंमतहि भडकली. त्यामुळे टिळकाना केसरीची वर्गणी वाढवावी लागली ती १ आक्टोबर १९१६ पासून २ रुपये १३ आणे करण्यात आली. त्यानंतर तारीख १ जानेवारी १९१८ पासून ३ रुपये १३ आणे करण्यात आली. आणि ती टिळकांच्या मृत्यूपर्यंत व त्यानंतरहि तशीच कायम राहिली. १३ आणे टपाल हशील हे केसरीच्या पहिल्या दिवसापासून आजवर तसेच कायम राहिले आहे; पण वर्गणीच्या रकमेत प्रथम एक रुपाया नंतर दीड रुपया नंतर दोन रुपये व नंतर तीन रुपये याप्रमाणे वाढ झाली. पण केसरीत मजकुराचीहि वाढ त्याच मानाने झाली. व वाचकानीही या तीन्ही वाढींचे प्रमाण योग्य मानले याचे प्रत्यंतर हेच की वर्गणी वाढली असताहि वर्गणीदारांची संख्या देखील वाढती राहिली. तारीख १ जानेवारी १९१८ पासून केसरीची वर्गणी ३ रुपया १३ आणे असता मध्यंतरी प्रथम दोन पानांची नंतर काही दिवस चार पानांची पुरवणी घालण्यात येऊन वाढत्या वर्गणीचा मोबदला वर्गणीदाराना देण्यात आला. आणि त्यापुढे नुसती पुरवणीच नव्हे तर केसरीची पानेहि बरोबर दुप्पट वाढवून म्हणजे ८ ची १६ करून केसरी त्याच वर्गणीत ता. १ जानेवारी १९२५ पासून आजवर सतत देण्यात येत आहे. ही वाढ व सुधारणा टिळकानाहि हवी होती, परंतु कागदाची किंमत वगैरे अनेक कारणानी आपल्या हयातीत त्याना ती करता आली नाही.

केसरीबरोबरच मराठा पत्रहि टिळकांच्या मालकीचे होऊन त्यांच्या हाती आले. १८९७ साली सप्टेंबरच्या १२ तारखेपर्यंत टिळकांचे नाव मराठ्यावर संपादक म्हणून होते पण पुढील अंकापासून केळकरांचे नाव त्यांचे ठिकाणी दाखल करण्यात आले व यानंतर पुढे केव्हाहि टिळकानी संपादक म्हणून आपले नाव मराठ्यावर घातलेच नाही. तरी केसरीप्रमाणे मराठ्यावरहि त्यांची सतत देखरेख असे. व त्यांचेच धोरण म्हणजे केसरीचेच धोरण केवळ भाषांतर रूपाने नसले तरी युक्तिवादाच्या व तत्त्वाच्या दृष्टीने मराठ्यातून प्रकट व्हावे अशी शिस्त होती. मराठ्याच्या स्वरूपात व वर्गणीत या सर्व अवधीत एकदाच म्हणजे १९०३ साली फरक झाला. तो असा की पूर्वी मराठ्याचा आकार मोठा होता तो लहान कर-

ण्यात येऊन वर्गणी ७ रु. ४ आणे टपालहशीलासह होती ती ४ रुपये करण्यात आली. हा बदल झाला तेव्हा प्रथम मराठ्यात आठच पाने घालण्यात येत असत. पुढे ती कायमची १२ करण्यात आली व प्रसंगी [illegible] हि पाने घातली जात. १९०२ साली केसरीचा आकार वाढविला त्यापूर्वीच टिळकानी फडणिसांच्या वाड्यात आर्यभूषण प्रेसला लागून स्वतंत्र इमारत बांधून नवे मोठे छापण्याचे यंत्र बसविले होते. पुढे १९०४ साली टिळकानी गायकवाड सरकाराकडून त्यांचा *पुण्यातील वाडा विकत घेतला.* व १९०६ पासून छापखान्याचे काम टाइप जुळविण्याचे काम आणि केसरीमराठ्याचे संपादक व व्यवस्थापक यांच्या कचेरीचे काम तेथे सर्व एकत्र चालू लागले. टिळकांच्या हयातीत महायुद्धापासून केसरीच्या वर्गणीदारांची संख्या विशेष वाढू लागली तेव्हा हे जुने यंत्रहि अपुरे पडू लागले. टिळक मंडालेहून परत आल्यापासूनच छापखान्याची अंतर्बाह्य सुधारणा करण्याचा विचार त्यांचे डोक्यात एकसारखा घोळत होता. १९१४ च्या पत्रव्यवहारावरून असे दिसते की या साली विलायतेतील वॉकर कंपनीशी पत्रव्यवहार करून टिळकानी आपल्या नव्या छापखान्याकरिता विजेचे दिवे लावण्याची योजना केली होती व त्याकरिता मोटर डायनेमो बॅटरी ऍक्युम्युलेटर दिवे तारा लहानसे पंखे वगैरे सर्व आणविण्याचा बेत केला होता. फक्त इंजिन मात्र नवे न घेता जुन्यावरच भागविण्याचा त्यांचा विचार होता. या सर्वाला सुमारे १५०० रुपये खर्च येणार होता. परंतु जुन्या इंजिनने काम पुरे पडणार नाही, आणि या कारणाकरिता जुने काढून टाकून नवे मोठे घ्यावयाचे तर आवाक्याबाहेर खर्च जाणार असा एकंदर अंदाज झाल्यामुळे त्यावेळी गायकवाडवाड्यात व कारखान्यात विजेचे दिवे लावण्याचा बेत रहित करण्यात आला. यानंतर चिरोल केसचा खर्च व वेळ खाणारे अनेक उद्योग निघाल्यामुळे नवीन छपाईचे यंत्र घेऊन बसविण्याची टिळकांची कल्पना तशीच राहिली. पण टिळक विलायतेस गेल्यावर अनायासेच ती त्याना फलद्रूप करता आली, व त्याप्रमाणे तेथे समक्ष पाहून त्यानी नव्या प्रकारचे एक छपाईचे यंत्र सुमारे २०००० रु. किंमतीचे विकत घेतले. या यंत्राचे वर्णन टिळकानी स्वदस्तुरचे पत्र धोंडोपंत विध्वंस याना लिहून त्यात दिले आहे ते खालीलप्रमाणे:—

“ आता जे मशीन घेणार ते सुटे कागद छापण्याचे नाही. कागदाची वाटोळी जुडकी ( rollers ) लावून दर तासास ६००० कॉपी ( ८ पेज एकदम ) छापून व घड्या पाडून तयार होतील असे मशीन आहे. तसेच सुट्ट्या टाइपाचा उपयोग न करिता stereo दर पेजास एक याप्रमाणे तयार करून आठ stereo वरून छापावे लागेल. stereoची मशीनरी मशीन बरोबरच विकत घेतलेली आहे. मशीन रवाना झाले म्हणजे कागदाचे रोलरना ऑर्डर देतो. मशीन सेकंड हॅंड आहे पण अगदी नव्यासारखे असून ज्या कंपनीने मशीन तयार केले त्याच कंपनीने ते सर्व तपासून नीट केले आहे. करिता काळजी नाही.

"हल्ली केसरीचा आकार ४५×३० आहे. पण या मशीनवर ४०×३० पासून ४०×६० पर्यंत (म्हणजे क्रॉड सब रॉयल किंवा क्रॉड रॉयल) कागद छापला जाईल.

"मशीन सुमारे १२ फूट लांब ९ फूट रुंद व फक्त ६ फूट उंच आहे म्हणजे आटोपशीर आहे. खाली खड्डा खणण्याची जरूर नाही.

"हे मशीन चालविण्यास ऑईल इंजिन दहा हॉर्स पॉवरचे लागेल. स॰ ाचे चालणार नाही. नवे घेतले पाहिजे. रा. पारधी यास विचारून तिकडे दहा हॉर्स पॉवरचे इंजिन मिळेल का नाही व केवढ्यास मिळेल ते उत्तरी कळवावे. नसल्यास येथे विकत घेऊ.

"आता फक्त एक लहान मशीन मराठ्याकरिता व लिनो अगर मोनो टाइप घेणे आहे. चौकशीत आहे.

"१९०१ साली टूफीडर घेऊन त्याप्रमाणे आज १८।१९वर्षे काम चालले तद्वतच यापुढे वीसपंचवीस वर्षे पूर्ण उपयोगाला येईल असे हल्लीचे मशीन आहे. आठी पेज एकदम छापून व घड्या पाडून तासास ६ हजार प्रती डझनवार मोडून बाहेर पडतील. पुढे केसरी आठवड्यातून दोनदा किंवा तीनदा निघाला तरी दुसरे मशीन घ्यावयास नको. हल्लीचा केसरी म्हणजे ३२००० प्रती ६ तासात सर्व छापून होतील. रात्री बारा वाजता सूरू केले की दोन्ही फर्मे एकदम छापून व घड्या पडून सकाळला तयार!"

या पत्रात उल्लेखिल्याप्रमाणे मराठ्याकरिता स्वतंत्र लहानसे छपाईचे यंत्र १९१९ साली घेण्यात आले व हल्ली मराठा त्यावरच छापण्यात येतो. १९१४ च्या संकल्पाप्रमाणे केसरी छापखाना व कचेरी यांच्याकरता ऑइलइंजिनला डायनेमो जोडून विजेचे दिवे लावण्याची व्यवस्था १९२२ पासून करण्यात आलेली आहे. लायनो टाइपवर केसरीचे टाइप जुळविण्याची व्यवस्था ही मात्र परतंत्र असल्यामुळे ती टिळकाना आपल्या हयातीत अमलात आणता आली नाही. व त्यापुढेहि ती आजवर अमलात आलेली नाही. तथापि लायनो टाइपवर केसरी निघावयाचा तर त्याला आधी त्या यंत्रावर बसविता येतील असे अखंड टाइप बनवावे लागणार, व असे टाइप आपण करून दिले तरच विलायतचे कारखानदार ते स्वीकारून लायनो टाइप बनवून देणार, म्हणून टिळकानी आपल्या कारखान्यात हे अखंड टाइप तयार केले. ही योजना टिळकांच्या मनात १९०६ सालापासून घोळत होती व त्यांच्या अखंड टाइपांचा एक संपूर्ण संच त्याच साली तयार झाला. फिरून त्याची सुधारणा १९१४ साली त्यांच्याच देखरेखीखाली झाली. आणि त्यानंतर त्यात आणखी सुधारणा १९२६ पासून सुरू आहे. या अखंड टाइपात कंपोज केलेला मजकूर केसरीत वेळोवेळी देण्यात येत असतो ही गोष्ट त्या टाइपांचे वळण व इतर टाइपांचे वळण यातील फरकावरून वाचकांच्या लक्षात आलीच आहे. या टाइपातील सुधारणा पूर्ण झाली म्हणजे पुढेमागे कदाचित्

तोच टाइप सबंध केसरी करता वापरण्याचा विचार आहे. आणि वाचकांच्या दृष्टीने तो रूढ झाला म्हणजे तोच लायनो टाइप यंत्रावर बसवून घेण्याची योजना होईल. वर दिलेल्या टिळकांच्या पत्रात असे लिहिले आहे की "पुढे केसरी आठवड्यातून दोनदा किंवा तीनदा तिघाला तरी दुसरे मशीन घ्यावयास नको." वरील शब्दात जी सुधारणा सुचविली आहे तिजपैकी केसरी आठवड्यातून दोनदा काढण्याची योजना हल्ली विचारात असून कदाचित पुढील वर्षापासून ती फलद्रूप होईल.

## (४) उपसंहार

असो. अशा रीतीने हे टिळक चरित्र संपले. आता फक्त उपसंहारादाखल दोन शब्द लिहितो.

सुरत येथील राष्ट्रीय सभेच्या मंडपात टिळक प्लॅटफॉर्मवर चढून गेले व छातीवर हात आडवे धरून "मी जागा सोडणार नाही वाटेल तर मला ओढून काढा" असे म्हणाले तो क्षण त्यांच्या आयुष्यातला अत्यंत महत्त्वाचा असा एक होता. त्याच्या बरोबरीचा असा दुसरा एक क्षण त्यांच्या आयुष्यात आणखी आला. व १९०८ साली मुंबई हायकोर्टात न्या० दावर यानी सहा वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा सांगितली व टिळकानी त्याना उत्तर दिले तो होय. कदाचित् या पहिल्या व दुसऱ्या क्षणात कार्यकारणाचा सूक्ष्म संबंधहि मानिता येईल. टिळकांवर १९०८ चा खटला होण्याची जी अनेक कारणे झाली त्यापैकी सुरतेस राष्ट्रीय सभा मोडली हे एक होते यात शंका नाही. ते कसेहि असो. मनुष्याच्या आयुष्यातील महत्त्वाचा क्षण कोणता असा प्रश्न कोणी विचारल्यास त्याचे उत्तर देण्याची एक रीत त्यालाच उलट एक प्रश्न विचारणे ही होऊ शकते. तो प्रश्न असा की "समजा तुमच्या या मनुष्यासंबंधी एखादे चित्र हस्तकौशल्याने रंगवून ठेवावयाचे आहे तर त्या चित्राला कोणता प्रसग चित्रकार पसंत करील?" या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर तेच पहिल्याचे! अशा उलट्या रीतीने उत्तर देण्याचे कारण असे की, कोणाहि मनुष्याच्या आयुष्यात महत्त्वाचे असे क्षण पुष्कळ असतात. पण महत्त्वा महत्त्वातले तारतम्य ठरविताना चित्रकार हेच लक्षात घेतो की ज्या प्रसंगावर प्रेक्षकाची दृष्टि ठरून कायम होईल, इतकेच नव्हे तर ज्या प्रसंगाची कल्पना मनात आली असता प्रतिक्षणी अद्भुतत्वाचा 'नवनवोन्मेष' होईल, तोच प्रसंग अधिक महत्त्वाचा. या दृष्टीने पाहता कोणाच्या आयुष्यातील यशाप्रमाणे अपयशाचे, विजयाप्रमाणे पराभवाचे, सुखाप्रमाणे दुःखाचेहि प्रसंग स्मरणीय होऊ शकतात. कारण या उभयविध प्रसंगातहि हृदयस्पर्शीपणाचा व उदात्तपणाचा गुण सारखाच असतो. बुद्धचरित्रात गौतम बुद्ध हा ज्ञानसंपन्न झाल्यानंतर शिष्याना उपदेश करीत आहे या शांतरसात्मक प्रसंगाइतकाच तो राजपुत्र असता निद्रिस्त अशा पत्नीला विरहसमुद्रात लोटून निघाल्याचा करुणप्रसंगहि चित्र काढण्याला योग्य ठरेल. रामरावणाचे युद्धाइत-

केच राम वनवासाला निघाल्याचे चित्र चित्ताकर्षक असते. ग्रीक पुराणातला योद्धा हेक्टर घेतला तर तो वीरश्रीने रणांगणाकडे निघाला असता त्याची स्त्री अँड्रोमॅकी ही त्याला जाऊ नको म्हणून विनवीत आहे हा एक प्रसंग, हेक्टर व अकिलीज यांच्या घनघोर युद्धाचा दुसरा प्रसंग, किंवा अकिलीज हा हेक्टरचे प्रेत आपल्या रथाला जोडून फरपटत नेत असता किल्ल्याच्या तटावरून अँड्रोमॅकीच्या नजरेला ते पडते हा तिसरा प्रसंग, हे सर्वच चित्रार्पित करण्यासारखे आहेत. लहान गोष्टींची मोठ्याशी तुलना करावयाची तर असे म्हणता येईल की टिळकांच्या चरित्रात चित्रे करून ठेवण्यासारखे अनेक प्रसंग आले, पण प्रथम दर्शविलेले दोन प्रसंग हेच चित्रकाराला अधिक प्रिय होतील. टिळक केसरीचा किंवा एखाद्या ग्रंथाचा मजकूर लेखकाला सांगत बसले आहेत, ते एखाद्या सभेत उभे राहून व्याख्यान देत आहेत, ते वाढदिवसाचा अहेर किंवा एखादे मानपत्र स्वीकारीत आहेत, ते बंदरावर आगबोटीत चढत किंवा उतरत आहेत, असे इतर अनेक प्रसंगहि चित्रकाराला सुचविता येण्यासारखे आहेत. पण तो खचित म्हणेल की वरील दोन प्रसंगच मला अधिक पटतात. म्हटले तर हे दोनहि प्रसंग फारसे इष्ट नव्हते. ते टळावे अशी टिळकांची व इतरांचीहि इच्छा असणार. ते प्रसंग अपयशाचे असे दिसण्यात दिसतात. कारण एक तर खटला अंगावर येऊन काळेपाण्याची शिक्षा होण्याचा, व दुसरा सुरतेची कॉंग्रेस मोडल्याच्या आक्षेपाचा ! पण या दोन्ही प्रसंगात टिळकांचे व्यक्तिवैशिष्ट्य दिसून आले. दोन्ही प्रसंग वीरश्रीचे तेज प्रगट होण्याचे रोमहर्षणाचे असेच होते. व या प्रसंगांचे चित्र काढले असता ते जितके टिळकांविषयी यथार्थ गुणदर्शक होईल तितके इतर कोणत्याहि प्रसंगाचे होणार नाहीत!

टिळकांच्या संबंधाने संकलित करून देण्यासारखी माहिती वाटली ती वर दिली आहे. पण यापलीकडे जाऊन विशेषणे लावून त्यांचे वर्णन करणे ही गोष्ट सहजच कठीण होऊन बसते. विशेषणे वापरण्याच्या कामी आपल्या इकडे करावी तेवढी काटकसर केली जात नाही यामुळे दुहेरी तोटा होतो. एक तर अपात्र अशा व्यक्तींना लावल्याने ती विशेषणे निरर्थक बनत जातात. शिवाय सत्पात्र अशाहि लोकांसंबंधी बोलताना ती उगीच वरचेवर उपयोगात आणल्याने सदोष पुनरुक्तीचा परिणाम वीट किंवा उपहासबुद्धि यात होतो. 'राजमान्य राजश्री' प्रमाणे 'श्रीयुत' हा शब्द आता जवळजवळ फुकटच गेला आहे. समाज–सत्तावादी लोक 'कॉमरेड' हा शब्द इतका विपुल वापरतात की त्याचा मूळचा सुंदर अर्थ लोपून गेला आहे. आणि खऱ्या अर्थाने 'सहानुभवी सहकारी मित्रा'ला आता एखादा नवाच शब्द हुडकून काढावा लागेल. 'देशभक्त' व 'देशबंधु' या शब्दांचा उपयोग आपल्या इकडे पूर्वी इतका बेसुमार झाला व कदाचित् अजूनहि होत आहे की ते शब्द कानावरून नुसत्या वाऱ्यासारखे निघून जातात व त्यांचा मनावर काहीच बोध होत नाही. टिळकांसंबंधाने बोलताना 'लोकमान्य' या सुंदर शब्दाचाहि आमच्यामते असाच दुरुप-

1954.

योग झाला आहे. व तो निदान या पुस्तकात तरा टळावा अशी आम्ही सावधगिरी ठेवली आहे. मान्यतादर्शक विशेषण हे आडनाव झाले की संपले! कोणाहि मोठया माणसाचे मोठेपण देशभक्ताची देशभक्ति ही त्याच्या कृतीच्या व चारित्र्याच्या वर्णनावरूनच लोकाना खरी अनुमानिता येऊ शकते. तेच खरे मोठेपण व तीच खरी देशभक्ति. टिळकांच्या लोकमान्यतेचीहि गोष्ट अशीच आहे. या ग्रंथात टिळकांचे विचार व आचरण यांचे जे वर्णन हकीकतीच्या रूपाने आम्ही दिले आहे त्यावरूनच त्यांची खरी लोकमान्यता वाचकाना उमगणारी व पटणारी आहे. पण कित्येक वेळा मित्रापेक्षा शत्रूच एखाद्याच्या गुणवर्णनाला अधिक उपयोगी पडतात. आणि गुणलुब्ध हिंदी जनतेने टिळकाना 'लोकमान्य' ही जी पदवी अर्पण केली तिचे प्रत्यंतर टिळकांचे शत्रू व्हॅलेंटाइन चिरोल यानीहि दिले आहे. त्यानी टिळकाना दूषणास्पद ठरविण्याकरिता 'हिंदुस्थानातील अस्वस्थतेचे जनक' असे आपल्या पुस्तकात म्हटले आहे. पण राष्ट्राचा अभ्युदय व्हावयाचा तर ते नेहमी असंतुष्ट व अस्वस्थच असले पाहिजे. 'असंतोषः श्रियो मूलं' हे वचन चांगल्या अर्थाने घेतले असता व्यक्तिप्रमाणे राष्ट्रालाहि ते लागू पडते. जर्मन कवि गटे याच्या फाऊस्ट नामक नाटकात असे दाखविले आहे की सैतानाला वचनबद्ध झालेला नाट्य–नायक जोपर्यंत स्वतःवर आणि जगावर असंतुष्ट होता तोपर्यंत सैतानाला आपले पाश घालून त्याला स्वाधीन करून घेता आले नाही. पण तो आपल्या स्थितीवर संतुष्ट झाल्याचा उद्गार त्याच्या तोंडून निघताच सैतानाने त्याला आपल्या पाशात खेचून घेऊन पाताळात नेले! हिंदुस्थान हे आपल्या विद्यमान परतंत्र स्थितीवर संतुष्ट होईल त्याच क्षणी त्याचा नाश होईल. म्हणून त्याने नेहमी असंतुष्टच राहिले पाहिजे, व तरच त्याचा भाग्योदय होण्याची आशा आहे हे टिळकानी ओळखून असंतोष व अस्वस्थता निर्माण केली. चिरोल साहेबानी टिळकाना 'हिंदुस्थानातील असंतोषाचे जनक' ठरविले त्यात त्यानी वस्तुस्थिति बरोबर वर्णन केली! हिंदुस्थानाने शांत व संतुष्ट राहावे यात इंग्लडचे हित असल्यामुळे 'अस्वस्थतेचे जनकत्व' हे मानभावी चिरोल साहेबानी सहजच दूषण ठरविले. तथापि राजकारणात 'नाथाच्या घरची उलटी खूण' हीच की चिरोल साहेबानी जे दूषण म्हणून दिले तेच टिळकासारख्या राष्ट्रपुरुषाला भूषणातले भूषण ठरले! टिळकाना लोकमान्य ही पदवी आत्मस्फूर्तीने देऊन, त्यांची शेंकडो स्मारके करून, आणि प्रतिवर्षी त्यांची मृत्युतिथि पाळून सर्व हिंदी राष्ट्राने हे भूषण मार्मिकपणाने आपल्या राष्ट्रीय निशाणावर मिरविले आहे. म्हणून 'हिंदुस्थानातील असंतोषाच्या जनकाला' वाचकवर्गासमवेत एकवार अभिवादन करून हा चरित्रग्रंथ समाप्त करितो.

समाप्त

# न. चिं. केळकर यांचे समग्र ग्रंथ

| | | |
|---|---|---|
| १ | लोकमान्य टिळकांचे चरित्र | किंमत. |
| | खंड १ ला | ३–०–० |
| | खंड २ व ३ | ४–०–० |
| २ | लो० टिळकांचे पुण्यस्मरण | १–०–० |
| ३ | ग्यारीबाल्डी ( एका इटालियन देशभक्ताचे चरित्र ) | १–८–० |
| ४ | आयर्लंडचा इतिहास ( शिल्लक नाही ) | |
| ५ | मराठे व इंग्रज | २–४–० |
| ६ | इतिहासविहार | १–८–० |
| ७ | केळकरकृत लेखसंग्रह ( शिल्लक नाही ) | |
| ८ | केळकरांचे लेख ( शिक्षणविषयक लेख व व्याख्याने ) | २–०–० |
| ९ | गेली पाच वर्षे ( असहकारितेच्या स्थित्यंतराचा इतिहास ) | २–०–० |
| १० | केसरीवरील खटला ( १९२४ ) | ०–६–० |
| ११ | विलायतेची बातमीपत्रे | १–४–० |
| १२ | आमचे स्वराज्यद्रोही छत्रपति ( अर्थात् छत्रपति व इंग्रजसरकार यामधील गुप्त पत्रव्यवहार (शिल्लक नाही) | |
| १३ | सुभाषित व विनोद | १–४–० |
| १४ | संस्कृत विद्येचे पुनरुज्जीवन | ०–८–० |
| १५ | गद्यगुच्छ ( निवडक वाङ्मयविषयक लेख ) | १–८–० |
| १६ | सरोजिनी नाटक ( शिल्लक नाही ) | |
| १७ | नवरदेवाची जोडगोळी गद्य नाटक ( शिल्लक नाही ) | |
| १८ | तोतयाचे बंड गद्य नाटक | १–०–० |
| १९ | चंद्रगुप्त गद्य नाटक | ०–१२–० |
| २० | कृष्णार्जुन युद्ध ( रंगावृत्ति-संगीत ) | १–०–० |
| २१ | कृष्णार्जुन युद्ध ( गद्य नाटक ) | ०–१२–० |
| २२ | अमात्यमाधव ( गद्य नाटक–शिल्लक नाही ) | |
| २३ | वीरविडंबन ( संगीत नाटक ) | १–०–० |
| २४ | भानुदास ( संगीत नाटक ) | १–०–० |

२५ कथासप्तक ( या पुस्तकातील तीन गोष्टी ) ०—१२—०
२६ काव्योपहार ( अलीकडील कांही कविता ) ०—६—०
२७ केळकर यांचे समग्र वाङ्मयविषयक लेख ( अप्रकाशित )
२८ केळकर यांची निवडक व्याख्याने ( अप्रकाशित )
२९ अंधार वड ( कादंबरी-अप्रकाशित )
३० भावी हिंदी नागरिक
( अर्थात् राज्यव्यवस्थेची मूलतत्त्वे—अप्रकाशित—अप्रकाशित )
३१ संस्थानीस्वराज्य ( अप्रकाशित )
३२ सुगम अर्थशास्त्र ( अप्रकाशित )
३३ हुंडणावळ व सुवर्णचलन } छोटी पुस्तके
३४ हुंडणावळीचे स्वरूप

## English Books.

35 Case for Indian Home Rule 2-0-0
36 A Passing Phase of Politics 1-4-0
37 Landmarks of Lokamanya's life 1-8-0
38 The Contempt of Court Case ( 1924 ) 0-8-0
39 Pleasures and Privileges of the Pen ( Unpublished )
40 Eminent Personages ( In the press )

## सौ० गिरिजाबाई केळकर यांची पुस्तके.

| | | | |
|---|---|---|---|
| १ गृहिणीभूषण | ८८ | २ पुष्पहार | ८८ |
| ३ समाजचित्रे | २ रु. | ४ स्त्रियांचा स्वर्ग | १८८ |
| ५ पुरुषांचे बंड (नाटक) | ८१० | ६ आयेषा (नाटक) | ८१२ |
| ७ राजकुवर (नाटक) | १ रु. | ८ केवळ विश्रांतिसाठीं | १ |

## कमलाबाई देशपांडे व य. न केळकर कृत

( १ ) गीत द्विदल ( स्फुट कवितांचा संग्रह ) —८—

**पुस्तके मिळण्याचा पत्ता**
१ केसरी कचेरी, पुणें शहर.
२ का. न. केळकर—५५४ सदाशिव, पुणें शहर
३ परचुरे पुराणीक आणि मंडळी,
माधवबाग, गिरगांव, मुंबई ४

लाल बहादुर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी, पुस्तकालय
*Lal Bahadur Shastri National Academy of Administration Library*

मसूरी
MUSSOORIE

अवाप्ति सं०
Acc. No..............................

कृपया इस पुस्तक को निम्न लिखित दिनांक या उससे पहले वापस कर दें।

Please return this book on or before the date last stamped below.

| दिनांक Date | उधारकर्ता की संख्या Borrower's No. | दिनांक Date | उधारकर्ता की संख्या Borrower's No. |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

Mar

अवाप्ति सं०
ACC. No..................

वर्ग स.
Class No..............

पुस्तक स.
Book No . ...........

लेखक
Author..........................................

शीर्षक
Title..........................................

Mar 92
320.540 LIBRARY 4984
टिळक
LAL BAHADUR SHASTRI
National Academy of Administration
भाग-3
MUSSOORIE

*Accession No.*

1. Books are issued for 15 days only but may have to be recalled earlier if urgently required.
2. An over-due charge of 25 Paise per day per volume will be charged.
3. Books may be renewed on request, at the discretion of the Librarian.
4. Periodicals, Rare and Reference books may not be issued and may be consulted only in the Library.
5. Books lost, defaced or injured in any way shall have to be replaced or its double price shall be paid by the borrower.